श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वति (टेम्बे) स्वामिविरचित

# श्रीदत्तमाहात्म्य.

## एक परिचय

श्रीदत्तमाहात्म्य या ग्रंथाची रचना भाविक जनांच्या आग्रहावरून महत्पूर येथे शके १८२३ (इ.स.१९०१) च्या चातुर्मासांत झाली असें श्री स्वामीमहाराजांच्या पत्रावरून कळते. (श्रीदत्तपुराणातील) तृतीयाष्टकापासून सहाव्याच्या सहाव्या अध्यापर्यंत आजपर्यंत (श्रावण शु।।११) ओव्या लिहिल्या. प्रायः प्रत्यहि एकशें आठ होत गेल्या. तेवढ्याचाच अध्याय ठेवला. उद्यां पन्नास अध्याय पुरा होईल. सुमारें साडेपाच हजार ग्रंथ झाला. आतां पुढें लिहिण्याची इच्छा होत नाहीं...' यानंतर अवतरणिकेचा एक अध्याय झाला. असे एकूण ५१ अध्याय आहेत.

श्री स्वामी महाराजांनी श्रीदत्तमाहात्म्याच्या सुरुवातीलाच ह्याची पुष्टि करीत म्हटले आहे, "जगदुद्धारार्थ परमेश्वर। अत्रीच्या घरीं धरी अवतार। त्याच्या चरिताचा विस्तार। वर्णिला सुंदर पुराणीं।। ७।। तत्सारभूत दत्तपुराण। औटसहस्र निरूपण। तें अपरिचित गीर्वाणभाषण। प्राकृतजन नेणती।। ८।। म्हणोनि हा ग्रंथारंभ। ह्या योगें उमजेल स्वयंप्रभ। भक्तवत्सल पद्मनाभ। चित्तक्षोभहर्ता जो।। ९।। श्रीदत्तपुराणाचे तीन भाग। ज्ञानोपासनाकर्मयोग। त्यांतील उपासनाकांडभाग। ईश्वरानुराग दावी जो।। १०।।" संस्कृत भाषा सर्वसामान्य भक्तांना समजत नसल्यामुळे हा मराठी ग्रंथ आपण लिहीत आहोंत असे स्पष्ट करून स्वयंप्रकाश चित्ताला शांत करणारा परमात्मा त्यांना उमजावा हेच या ग्रंथाचे प्रयोजन सांगितले आहे.

प्रथमाध्यांतच पुढे श्रीस्वामी महाराजांनी ह्या ग्रंथाचा विषय असा सांगितला आहे. "**ती नवविधाभक्ति येथ। वर्णिजेल यथार्थ। जी करील कृतार्थ। दावोनि पंथ भाविकां।। २०।।**" 'ती' म्हणजे मोक्षाचा राजमार्ग असलेली श्रीमद्भागवतांत वर्णिलेली नवविधा भक्ति. श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं। अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्।। विष्णु म्हणजे सर्वव्यापी परमेश्वराच्या लीलांचे आणि गुणांचे श्रवण तसेच कीर्तन (गायन, प्रवचन, वर्णन इत्यादि), त्याचे स्मरण, त्याच्या चरणांची सेवा, पूजा, दास्य, त्याच्याशी मैत्री आणि त्याला आपले सर्वस्व समर्पण करणे अशी ही नवविधा भक्ति आहे. यांत श्रीदत्तप्रभूंचे सांगोपांग चरित्र व सहस्रार्जुन, अलर्क, यदु, आयुराजा, परशुराम, प्रह्लाद वगैरे दत्तभक्तांची व तदनुषंगानें अत्रि, अनसूया, जमदग्नि इत्यादिकांचींहि चरित्रें अत्यंत रसाळवाणीनें वर्णन आले आहे.

मात्र भक्तीचा व्यापक अर्थ इथे महाराजांना अभिप्रेत आहे. आपल्या योगरहस्यांत त्यांनी म्हटले आहे, "भक्तिं विना न साफल्यं कर्मणः कर्मणा विना। न च ज्ञानं विना ज्ञानं न मोक्षो यस्य कस्यचित्। त्रिभिर्योगपथैरेव परस्परसहायकैः। ब्रह्मानंदं परं शातं गम्यते नैकयोगतः।।" भक्तिशिवाय कर्म फळत नाही, कर्मावांचून ज्ञान होत नाही आणि ज्ञानाशिवाय मोक्ष नाही असा क्रम व परस्परसंबंध दाखवून त्यांनी असा सिद्धांत मांडला आहे की भक्ति, कर्म, ज्ञान या तीनही योगमार्गांनी (मिळूनच) परमशांतिस्वरूप ब्रह्मानंदाची प्राप्ति होते. कोणत्याही एका योगाने नाही. अर्थातच भक्तियोग हा कर्म आण ज्ञान या योगांपासून तोडता येत नाही. भक्तियोगाच्या परिपूर्ण निरूपणासाठी कर्म आणि ज्ञान ह्या मार्गांचा समावेश अपरिहार्य आहे. त्यामुळेच पं.आत्मारामशास्त्री जेरे यांनी म्हणाल्याप्रमाणे या ग्रंथांत महाराजांनी "स्वस्वाधिकारानुरूप साधकांचे भक्ति, ज्ञान, वैराग्य, निष्कामकर्ममार्ग इत्यादि परमार्थमार्ग अत्यंत स्पष्ट व निश्चित स्वरूपानें वर्णिले आहेत. साल व कोयरहित आम्रादि फळाचा गाभा जसा सर्वच अमृतमय असतो तसाच हा ग्रंथ अगदीं अमृतमय आहे. त्यामुळे याच्या निरंतर सेवनानें मूळचाच अमृत असणारा मानव अमृतमय होईल यांत बिलकुल संशय नाहीं. हा एकच ग्रंथ वाचकाच्या सर्व कामना पूर्ण करून त्याला परब्रह्म पदवी देणारा आहे. एकावन्नाव्या अध्यायांत स्वतः महाराजांनी हे स्पष्ट केले आहे. ' मंदां विशेषेंकरून। नुमजे औपनिषदज्ञान। त्यांकरितां हें लेखन। करवी अत्रिनंदन दयाळू।।५१ : १०६।।' कलियुगातील अशक्त जीवांना उपनिषदांचे श्रवण, मनन, निदिध्यासनादि मार्ग अगम्य आहेत. तसेंच त्यांचा अधिकारही मर्यादित आहे. म्हणून गीतेच्या वचनाप्रमाणे स्त्रिया, वैश्य, शूद्र इत्यादि सर्व जीवांना ह्या ग्रंथाद्वारें श्रीस्वामीमहाराजांनी मोक्षाचा मार्ग प्रशस्त केला आहे.

**साहित्यगुण** :- श्रीमहाराजांनी हा ग्रंथ सर्वांना सुलभ व्हावा याकरितां सरल मराठी भाषेत लिहिला आहे. मात्र ही भाषा शंभर वर्षांपूर्वीची मराठी आहे. त्यामुळे आजकालच्या वाचकांना ती थोडी कठिण वाटण्याचा संभव आहे. तसेच अध्यात्माची परिभाषा सर्वांनी समजून घेऊनच वाचली पाहिजे. महाराजांची मराठी ओघवती व रसाळ आहे. ग्रंथात प्रामुख्याने लयबद्ध ओवी छंदाचा पर्योग केला आहे. प्रसंगोपात्त रसपुष्टीसाठी इतर गेय छंदांचा उपयोगही महाराजांनी केला आहे. उदाहरणार्थ पाळणे, धावे, करुणा, प्रार्थना इत्यादि पदे आली आहेत. श्रीस्वामी महाराजांना संगीताची प्रगल्भ जाण होती. त्याचा प्रत्यय ह्या रसभरित पदांतून येतो.

प्रास अनुप्रास इत्यादि शब्दालंकारांची तसाच उपमा, दृष्टांत इत्यादि अर्थालंकारांची योजनाही समर्पकतेने केलेली आढळते. ह्याची उदाहरणे देण्याइतकी या लेखाची मर्यादा नाही. पण पुढे ग्रंथाचा परामर्श घेतांना ती पाहतां येतील. पण

प्रस्तुत ग्रंथांत श्रीस्वामी महाराजांचा विशेष त्यांच्या स्पष्ट, नेमक्या आणि सरल प्रतिपादनांत आहे. वाचकापर्यंत सिद्धांत निःसंदिग्धपणे पोंचविण्यावर त्यांचा विशेष भर आहे. वेदांत, अष्टांगयोग इत्यादि परमार्थाचे विषय खुलासेवार व सोपे करून सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. म्हणूनच पं.जेरेशास्त्री म्हणतात, **' प्राकृत दत्तमाहात्म्यस्वरूप हीसुद्धां एक सर्वश्रेष्ठ अशी महाराजांची लीला आहे. आबालवृद्धांस सुलभबोध करून देणाया दत्तमाहात्म्य ग्रंथासारखा सर्वांगसुंदर ग्रंथ वाङ्मयांत अपूर्वच आहे.. '**

**मंत्रगर्भ रचना :-** श्री स्वामी महाराजांच्या वाङ्मयाचा एक विशेष मंत्रगर्भ रचना होय. विशेषतः त्यांच्या स्तोत्रवाङ्मयांतून विविध देवतांच्या स्तोत्रांची रचना करतांना त्यांत त्या त्या देवतांचे व दत्तप्रभूंचे मंत्र गुंफले आहेत. म्हणजे स्तोत्राच्या प्रत्येक चरणाचे विशिष्ट (1ले, 2रे इत्यादी) अक्षर क्रमाने घेतले की हा मंत्र तयार होतो. श्रीदत्तमाहात्म्यातही **३९** व्या अध्यायापासून शेवटपर्यंत प्रत्येक ओवीचें तिसरं अक्षर क्रमानें वाचल्यास मांडुक्योपनिषद, भद्रं कर्णेभिः व स्वस्ति नो हे शांतिमंत्र, ईशावास्योपनिषद्, पूर्णमदः.., अतो देवा अवंतु नो हे मंत्र साकार होतात. ह्यामागे श्रीमहाराजांचा उद्देश वाचकाला श्रीदत्तमाहात्म्याच्या पठणाबरोबरच ह्या मंत्रांच्या अप्रत्यक्ष अनुष्ठानाचाही लाभ व्हावा असा असावा. स्त्रीशूद्रादिकांना हे मंत्र निषिद्ध आहेत. पण या ग्रंथांत हे असे गुंफल्याने नकळत त्यांचे पठण, शास्त्रमर्यादा न ओलांडता होते. जनसामान्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी श्रीमहाराजांची कळकळ यांतून स्पष्ट होते. अर्थात् केवळ हे मंत्र मात्र वाचूं नयेत.

**ग्रंथाची प्रासादिकता** :- प्रसाद हा संतसाहित्याचा महत्त्वाचा गुण आहे. महान् संतांचे साहित्य हे ईश्वरी प्रसादानेच निर्माण झालेले असल्याने त्यांत ईश्वरी प्रसाद मिळवून देण्याचे सामर्थ्य असते. श्रीस्वामी महाराजांचे सर्वच वाङ्मय या प्रकारचे असल्याने त्यांत सहज वाचतांनाही एका अलौकिक प्रसन्नतेचा अनुभव येतो. पं. वाचस्पति मिश्र यांनी श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या भाष्याला दिलेली प्रसन्नं गंभीरं ही विशेषणे श्री स्वामी महाराजांच्या वाङ्मयाला समर्पक ठरतील. श्रीदत्तमाहात्म्यांत तर हा प्रसाद प्रकर्षाने जाणवतो. सर्वसंगपरित्यागी, अत्यंत निःस्पृह आप्तकाम अशा या यतिवर्यांनी श्रीदत्तमाहात्म्याच्या शेवटी **' प्रभो दत्तात्रेया, मागतों पसरूनी हात। ह्याग्रंथीं सतत सान्निध्य ठेवी।। '** (५१ : ११०) **व या प्रार्थनेप्रमाणें दत्तमहाराजांचें या ग्रंथांत सान्निध्य आहे असा अनुभव वाचकांसहि येतो.** हा ग्रंथ केवळ घरी ठेवला तरी अमंगल शक्तींपासून संरक्षण होते असा अनेकांचा अनुभव आहे. श्रीदत्तप्रभूंची कृपा संपादन करण्याचा हा एक सुलभ उपाय श्रीस्वामी महाराजांनी सर्वांना उपलब्ध करून दिला आहे.

**ग्रंथाची सप्ताहपद्धति** :- श्री महाराजांच्याच्या प्रश्नावलीत हा ग्रंथ रोज एक अध्याय असा नित्य पठणांत ठेवण्यास सांगितले आहे. श्रीगुरुमहाराज योगिराज गुळवणीमहाराजही आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू भक्तांना मुख्यतः हाच उपदेश देत असत. आपल्या इच्छेनुसार ज्यांना सप्ताह अनुष्ठान करावयाचे आहे त्यांच्यासाठी स्वामीभक्त नारोपंत उकिडवे यांनी प्रकाशित केलेल्या (सावंतवाडी 1926) पोथींतल्या प्रास्ताविकांत खालीलप्रमाणे निवेदन आहे.

करणे सप्ताहवाचन। तरी सहा अध्याय पठण। करोनि पुस्तकपूजन। करावे प्रथम दिवशी।।92।।
यानंतर पाच दिन। अध्याय आठ पठण। पूर्ण भक्तियुक्त होऊन। करावे हो प्रतिवारी।।93।।
अंत्य दिवशी पठण। पाच अध्याय करून। षोडशोपचार साधून। पुस्तकपूजन करावे।।94।।
आरत्या भजन करून। श्रीदत्ता भावे प्रार्थून। आनंदभरित होऊन। मानावी कृतकृत्यता।।95।।
.....
श्रीवासुदेव दत्ताचा। जन्म रविवार साचा। तोच असावा सप्ताहाचा। आद्य अथवा अंत्य दिवस।।98।।

याच प्रास्ताविकांत कांही अध्यायांचे विशेष महत्त्व सांगितले आहे.

जरी असे पुत्रकामना। तरी करावे नित्यपठणा। अध्याय चवथा जाणा। जो होत पुत्रकारक।।104।।
करावे भानुसप्तमी व्रत। तसोच हो अनंतव्रत। जसे कथिले या अध्यायांत। पूर्ण विश्वा ठेवुनी।।105।।
ईश्वरी भक्ति जडावी। भुक्ति मुक्ति चालत यावी। सर्व संपदा तुच्छ व्हावी। तरी पर्थमाध्या. पठण।।106।।
रोगशांति पूर्ण व्हावी। शरीरसंपत्ती वाढावी। तरी आवृत्ती नित्य करावी। दहाव्याची भक्तिभावे।।
विशेष इच्छा मोक्षाची। तरी सत्तेचाळिसाव्याची। आवृत्ती फलदायी साची। नको येथे अनुमान।।
चवेचाळिसाव्याचे पठण। अष्टसिद्धीचे साधन। अष्टांगयोगवर्धन। होत जेणे अतिसुलभ।।
अध्याय एकेचाळिसावा। सकाम भक्तिमार्ग बरवा। लाभण्या नित्य वाचावा। नियमबद्ध होऊनि।।

सारांश श्रीदत्तमाहात्म्य हा ग्रंथ प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांचे वाङ्मय स्वरूपच आहे. आणि स्त्रीपुरुष,आबालवृद्ध, लहान-थोर अशा सर्वांनाच हा मोक्षमार्गाचा सुलभ सोपान आहे.

**श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।**

स्मृतोऽप्यवति यो विघ्नं निघ्नमम्बासुतः स्तुतः। गन्धर्वस्थः स हि कलौ मलौघघ्नोऽस्तु मे हृदि।।१।।
नमस्ते शारदादेवी, वीणावादनतत्परे। सरस्वती जगन्माता सा मे बुद्धिं प्रचोदयात्।।२।।
वासुदेवयतिं वन्दे वामनं मम सद्गुरुम्। कवीश्वरं च दत्ताख्यं याचे मतिप्रकाशनम्।।३।।
वाङ्मयं वासुदेवस्य गहनं सागरादपि। चिंतनाय प्रवृत्तोऽस्मि मंदोऽप्यंतरशुद्धये।।४।।

## दत्तात्रेयांचे स्वरूप.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंबे) स्वामी महाराज यांनी आपल्या श्रीगुरुचरितम्(द्विसाहस्री) या ग्रंथातील श्रीगुरुस्तुति या प्रकरणांत सद्गुरु दत्त भगवंताचे वर्णन असे केले आहे. ते जन्म, मृत्यु, वृद्धि आदि विकाररहित आहेत; ते निर्गुण, निराकार, निष्क्रिय आणि एकमेवाद्वितीय आहेत; ते अनादि आणि अनंत आहेत. तेच नित्य सत्, चित् आणि आनंदस्वरूप दत्त परमात्मा आपल्या योगमायेच्या सामर्थ्याने ज्ञान, ऐश्वर्य आदि वैभवाने युक्त अशा विष्णु, शिव, गणेश, सूर्य, देवी(शक्ति) तसेच इंद्र, अग्नि (आदि) मूर्ति धारण करतात. थोडक्यांत उपनिषदांत वर्णन केलेले परब्रह्म म्हणजेच दत्त !

तोच दत्त परमात्मा आपल्या योगमायेने सोळा अंशांचे (११ इंद्रिये आणि पंचमहाभूते) बनलेले **विराट पुरुषरूप विश्व** निर्माण करतो. अनंत पाय आणि अनंत शिरे असलेले हे स्वरूप(योगीजनांनाच) ज्ञानचक्षूंनी दिसते. या विराट रूपाच्या अवयवांपासूनच स्वर्ग, मृत्यु, पातालादि लोकांचा विस्तार झाला आहे. हेच अनंत स्वरूप अनेक अवतारांचे बीज असून त्याच्यापासूनच देव, पशू आदि योनींनी युक्त अशा असीम विश्वाची निर्मिति झाली. (ह्या जगांत) इंद्रियांची आपापले विषय ग्रहण करण्याची क्षमता परमेश्वरानेच निर्मिली आहे. विश्वाचा विस्तार करणाऱ्या त्या ज्ञान. ऐश्वर्य, बल. तेज आणि वीर्यानी युक्त अशा अव्यक्त (परोक्ष) पुरुषाच्या ठायीं ते (विश्व) स्थित आहे. तरीसुद्धां तो ईश्वर मात्र त्या विश्वांत रहात नाही. मायेच्या योगाने पण मायेला वश न होता तिच्या बंधनाच्या पलीकडे असणारा (परमात्मा) ह्या वैविध्यपूर्ण जगाचे सृजन करतो. ज्याच्या आधिपत्याखाली माया ह्या जगताला जन्म देते; ते जगत् मात्र त्या शुद्ध ईश्वराला जाणत नाही[1].

सर्वांचे अधिष्ठान अशा ईश्वराखेरीज (ह्या सृष्टीत) कांहीच नाही. तरी पण देह आणि इंद्रिये यांच्याशी तादात्म्य पावूलेल्या जीवांना अभिमानाने राग (आकर्षण) आणि द्वेष प्राप्त झाले. हेच **जीव आणि शिव** यांच्या भेदाचे मूळ होय. म्हणूनच जीवसृष्टी आणि ईश्वरसृष्टी असा भेद भासू लागला. ह्या कल्पित भेदामुळेच जीव आपल्या सच्चिदानंदैकरस स्वरूपाला विसरून मी कर्ता, मी भोक्ता, मी सुखी, मी दुःखी अशी विपरीत भावना करतो.

## अवताररहस्य.

तोच सर्व भूतांचा ईश्वर, अजन्मा आणि अक्षर असूनही, आपल्या आपल्या प्रकृतीचा, म्हणजेच मायेचा आश्रय करून, मोक्षाला योग्य अशा साधूंच्या रक्षणासाठी जन्म घेतो.[2] त्या (त्या अवतारांच्या साधुरक्षणात्मक) चरित्रांचे - लीलांचे निष्कामतया श्रवण करणारा साधु कर्मबंधनांतून सुटतो; मात्र कर्मफलाची अभिलाषा करणारा भ्रांतचित्त श्रवणपराङ्मुख असाधु जन्म-मृत्यूच्या चक्रात फिरतच राहतो.[3] सत्व, रज आणि तम हे गुण आणि शमादि कर्म यांच्या भेदानुसार चार वर्णांची निर्मिती करणारा तो परमात्मा असंग आणि उदासीन असल्याने अकर्ताच आहे असे जाणणारे साधू स्वकर्मांनी बांधले जात नाहीत; अशा साधूंचा द्वेष करणाऱ्या भूमीला भारभूत झालेल्या दुष्टांच्या विनाशासाठी विविध अवतार धारण करून हा प्रभू (त्या त्या अवतारांचे) कार्य पूर्ण होतांच त्यांचा, कांटा काढण्यासाठी घेतलेल्या दुसऱ्या कांट्याप्रमाणे, त्याग करतो. म्हणजेच त्या त्या धारण केलेल्या देहांचे विसर्जन करतो.

असे असले तरी ज्यांचे कार्य अजून अपूर्ण आहे असे ह्या ईश्वराच्या अनेक मूर्ति चिरंजीव आहेत. उदाहरणार्थ, नर, नारायण, नारद, सनक इत्यादि. त्यांतीलच एक उत्तमोत्तम श्रीदत्त या नांवाचा अवतार कृपाळू आणि स्मर्तृगामी असा आहे. मानवांना परमेश्वराभिमुख करून त्यांना मोक्षाच्या मार्गावर अग्रेसर करण्याचे त्यांचे कार्य सृष्टीच्या अंतापर्यंत चालूच राहणार असल्याने हा नित्य अवतार आहे. स्मरणमात्रे संतोष पावून क्षणमात्रांत प्रत्येकाच्या कामना पुरविणारे, मुक्त, मुमक्षु आणि विषयी या सर्वांचे उपास्य दैवत कलियुगांत दुसरे नाही. त्या संत आणि धर्म यांच्या रक्षणासाठी मनुष्यरूपाने अवतरलेल्या योगगम्य भगवंताला त्याचे तत्त्व न जाणणारे आसुरी संपत्तीने अभिभूत झालेले (दुष्ट जीव) ओळखत नाहीत.[4]

## दत्तात्रेयांच्या सगुण स्वरूपाची पूजनीयता.

---

[1] मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्। हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते।।श्री.भ.गी.९।१०.

[2] अजोपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोपि सन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया।। ..
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।
श्री.भ.गी.४।६,८.

[3] जन्म कर्म च मे दिव्यं एवं यो वेत्ति तत्त्वतः। त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामैति सोर्जुन।।
श्री.भ.गी.४।९

[4] अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्। परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम्।।श्री.भ.गी.९।११

स्वतःचेच दान करून आपले दत्त हे नाम सार्थक केलेला अनसूया आणि अत्रीचा पुत्रच ईश्वर आहे असे जाणा. अचिंत्य आणि अव्यक्त (मन आणि इंद्रियांच्या अतीत) अशा त्या रूपाच्या स्मरणानेच संतुष्ट होणाऱ्या दत्ताचे पूजन करावे. परमानंदस्वरूप तो विष्णु हृदयस्थ असूनही अतीन्द्रिय असल्याने जाणीवेच्या पलीकडे आहे. तरीही भक्तीने तो वश होतो. याकरितां त्या दत्त भगवंताचे भक्तांनी श्रद्धेने नित्य पूजन केले पाहिजे.

तो अत्रींच्या घरांत लीलादेह धारण करून अवतरला; भक्तांची परीक्षा पाहण्यासाठी (ज्ञान व ऐश्वर्य यांनी संपन्न असूनही) बाल, उन्मत्त आणि पिशाचवत् वर्तन करतो; कधी बाल, कधी युवा, कधी जटाधारी वृद्ध तर कधी ऋषि; कधी योगी तर कधी भोगी; कधी उत्तम वेषांत तर कधी नग्न; कधी तुष्ट, कधी पुष्ट तर कधी कृश; कधी दंडधारी संन्यासी, कधी भिक्षु (दंडरहित परमहंस), कधी ब्रह्मचारी, कधी गृहस्थ, कधी वानप्रस्थ, कधी वर्णाश्रमांच्या विरुद्ध वागणारा तर कधी परत वर्णाश्रमांना धारण करणारा इत्यादि ज्याच्या अनेक प्रकारच्या अदभुत लीला देव आणि ऋषींच्यासुद्धां मन आणि वाचा यांना न आकळणाऱ्या आहेत तर मानवांचा काय पाड? आपल्या भक्तांचे रक्षण करणे हाच ज्याचा आनंदोत्सव आहे, केवळ स्मरण हीच ज्याची सेवा आहे, आपले अन्न ग्रहण करतांना त्याला भक्तीने समर्पण करणे इतकीच ज्याची पूजा आहे. जो अशा अर्चकांच्या भक्तीने प्रसन्न होऊन त्यांना तपादिकांनीही दुर्लभ असे फळ देतो. भक्तांनी स्मरतांच तो दत्त परमात्मा त्यांच्या निकट उभा राहतो.

**दत्तात्रेयांची दिनचर्या.**

भगवान दत्तप्रभू माहूरगडावर झोंपतात, सह्यशिखरावर राहतात, गंगाभागीरथींत नित्य स्नान करतात, गाणगापुरीं ध्यान करतात, कुरुक्षेत्रांत आचमन करतात, (हिमालयाच्या पायथ्याशी) धूतपापेश्वरला भस्म धारण करतात, कऱ्हाडला संध्या करतात, पंढरपूरला भिक्षा मागतात, पांचालेश्वरीं भोजन करतात आणि पश्चिमसागराच्या तटावर सायंसंध्या करतात.

ज्याच्या सत्तेने थोटासुद्धां (देतो) घेतो, पांगळाही वेगाने धांवतो, आंधळासुद्धां पाहतो, बहिराही ऐकतो; जाणण्यायोग्य सर्वांचा जो ज्ञाता आहे, पण त्याचा ज्ञाता कोणीही नाही[5]. कारण तो जाणीवेच्या पलीकडे आहे. तोही स्वतःला मी असा आहे असे जाणत नाही. तोच दत्त आद्य, श्रेष्ठ व अंतर्यामी पुरुष आहे.

सर्व चराचर सृष्टीचा आधार असणाऱ्या **पृथ्वी**च्या रूपाने तो नित्य स्थित आहे. तो **जल**रूपाने सर्व जगाची पुष्टि करतो, सर्व कायिक, वाचिक, मानसिक पापे धुवून टाकतो. तसेच सर्व स्थावर-जंगमांचा तो आत्मा आहे. **जठराग्नी**च्या रूपाने सर्व देहांत राहून, हा “प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्” ह्या भगवद्वचनाला अनुसरून प्राणाच्या साह्याने सदैव अन्नाचे पचन करतो.. **सूर्या**च्या रूपाने आपल्या तेजाने सर्व विश्व सदा प्रकाशणारा, सर्व कर्मांचा साक्षी (हाच दत्तप्रभू आहे.) जो रसात्मक **चंद्र** होऊन सर्व वनस्पतींचे पोषण करतो आणि जीवमात्रांचा दाह आपल्या शीतलतेने शमन करून सर्वांकडून स्तविला जातो. प्राणिमात्रांच्या देहांत दशधा होऊन (प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त आणि धनंजय) वाहणारा जो सूत्रात्मक[6] **प्राण** आहे. जो **आकाश**रूपाने सर्वव्यापी, सूक्ष्मत्वाने अभेद आणि असंग आहे आणि ज्याच्या आश्रयाने शब्द राहतो. **जीव**रूपाने स्थित असलेल्या, सुखदुःखांचा भोग घेणाऱ्या आणि मृत्यूसमयीं देह सोडून जाणाऱ्या त्याला अज्ञानी जाणत नाहीत. ह्या अष्ट मूर्ती त्याच दत्त परमात्म्याच्या आहेत. तो सर्वांतर्यामी आहे, ज्याच्यापासून प्राणिमात्रांना स्मृती (पूर्वी अनुभवलेल्या विषयाचे स्मरण) आणि ज्ञान (विषय आणि इंद्रिय यांच्या संयोगाची जाणीव) प्राप्त होतात, तोच वेदांताचा कर्ता, ज्ञानदाता गुरु आणि संप्रदायाचा प्रवर्तक आहे. सर्व वेद विविध देवतारूपाने त्याचेच वर्णन करतात. चेतनत्वाने सम (सारख्या स्वभावाचे), सयुज (परस्पर मित्र), सुपर्ण (उत्तम गति असलेले), गीतेने असंगशस्त्राने छेदण्यास सांगितलेल्या देहरूपी वृक्षाच्या आश्रयाने राहणारे, कर्मफलांचा भोग भोगणारा जीव आणि साक्षित्वाने पाहणारा ईश्वर त्याचेच अंश आहेत[7].

कलिकाळांतील दीन जनांचे रक्षण करण्यासाठी, तो श्रीपादवल्लभ आणि नरसिंहसरस्वती या नांवांनी साधू आणि धर्म यांच्या रक्षणासाठी दोन वेळां अवतरला. त्यांचीच चरित्रे श्रीगुरुचरित्रात सरस्वती गंगाधरांनी रचिली आहेत.

---

[5] श्वेताश्वतर उपनिषद् – ३:१९

[6] वायुर्वै गौतम तत्सूत्रम्.. बृहदारण्यकोपनिषद् ३.७.२

[7] द्वा सुपर्णा सयुजा.. ऋग्वेद १.१६४.२०

# प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज.

एकोणिसाव्या शतकांत आंग्ल विचारवंतांनीं, मुख्यतः आंग्ल शिक्षणाच्या माध्यमांतून, भारतीय संस्कृतीच्या पारंपरिक श्रद्धास्थानांवर छुपे हल्ले चढविले आपल्याला आपल्याच धर्माचीं मूलतत्त्वें संदिग्ध भासूं लागलीं; आपल्या श्रद्धा डळमळूं लागल्या. अशा वेळीं समाजाची श्रुतिप्रणीत धर्माची तात्त्विक बैठक सुस्थिर करून तदुनसारी स्मृतिप्रणीत कर्मयोग आचरून एक आदर्श निर्माण करून हिंदु समाजाच्या सर्वच घटकांना आपल्या धर्ममार्गावर अग्रेसर करण्यासाठीच **प.प.श्रीवासुदेवानन्दसरस्वती (टेम्बे) स्वामीमहाराज** यांचा अवतार झाला. कोंकणांतल्या एका छोट्या गांवांत, गरीब पण धर्मनिष्ठ, दत्तभक्त वैदिक ब्राह्मण कुटुंबांत जन्म घेऊन (श्रावण वद्य पंचमी, शके १७७६ इ.स..१८५४), आदर्श ब्रह्मचर्याश्रम, आदर्श गृहस्थाश्रम आणि आदर्श संन्यासाश्रम आचरीत, कर्म, अष्टांगयोग, भक्ति आणि ज्ञान या सर्वांचें अनुभूतिपूर्ण दिग्दर्शन करीत, आसेतुहिमाचल संचार करून त्यांनीं श्रुतिस्मृतिपुराणोक्त धर्मसेतु दृढ केला; हजारों स्त्रीपुरुषांना परमेश्वरोन्मुख केलें आणि श्रीदत्तभक्तीची पावन परंपरा पुष्ट केली.

**माणगांव येथेच, श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील महान् सत्पुरुष श्रीगोविंदस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी खडतर तपश्चर्या, योगसाधना व श्रीदत्तोपासना केली. नरसोबावाडीचे श्रीदत्तप्रभू त्यांना स्वप्नदृष्टांत देऊन माणगांवला आले. अशा रीतीने माणगांव येथे एका जाग्रत दत्तस्थानाचा प्रभव झाला आणि त्याच्या माध्यमांतून वासुदेवशास्त्रींचे लोकोद्धाराचे कार्य सुरू झाले. हजारो आर्त, अर्थार्थी जिज्ञासू भक्तांना त्यांनी मार्गदर्शन केले. श्रीदत्तप्रभूंच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा योगाभ्यासही पूर्ण झाला. त्यांना सर्व सिद्धींचा लाभ झाला. तिथेच त्यांनी श्रीदत्ताज्ञेने त्यांचा पहिला ग्रंथ श्रीगुरुचरितम् (द्विसाहस्री) लिहिला. स्वप्नदृष्टांतानुसार सात वर्षे पूर्ण होतांच देवांनी त्यांना पत्नीसह माणगांव सोडण्याची आज्ञा केली. त्याबरोबर माणगांवच्या सर्व वैभवावर पाणी सोडून आपली गरोदर पत्नी अन्नपूर्णा यांना घेऊन ते नरसोबावाडीला आले. तेथे एका ओंवरीत शुक्ल भिक्षा मागून त्यांनी एक वर्ष गृहस्थाश्रम केला. तेथेच अन्नपूर्णा माता प्रसूत झाल्या. पण तो मुलगा जन्मतःच मरण पावला. शास्त्रीबुवांनीच आपल्या पत्नीचे सांत्वन केले.**

**वाडीच्या वास्तव्यांत आपले सद्गुरु श्रीगोविंदस्वामी यांच्याकडून वेदांताचे सरहस्य ज्ञान प्राप्त केले. श्रीगोविंदस्वामींच्या महासमाधीनंतर भगवंतांच्या आदेशानुसार उत्तरेकडे जात असतां, गंगाखेड येथे गोदातीरी त्यांच्या पत्नीचे महामारीने (कॉलरा) निधन झाले. पत्नीचे और्ध्वदेहिक पूर्ण होतांच चौदाव्या दिवशीच संन्यास घेतला. अशा 'रीतीने अनाश्रमी न तिष्ठेत' ह्या धर्माज्ञेचे पालन केले.** यानंतर महाराजांनीं देवांच्या आज्ञेने उज्जयिनी येथील दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती यांचे वंशज, समर्थसंप्रदायांतील नारायणानंदसरस्वती यांच्याकडून दंड घेतला. दंड धारण केल्यावर श्रीदत्ताज्ञेनेच महाराजांनी आसेतुहिमाचल संन्यासाश्रमाच्या कठोर नियमांचे पालन करीत पायींच २४ वर्षे संचार केला व धर्मप्रतिष्ठापनेचे कार्य केले. अत्यंत कठोर कांटेकोर आचरण, श्रुति-स्मृति-पुराणें यांचा सांगोपांग, सखोल अभ्यास, निःस्वार्थ शास्त्रनिष्ठ जीवनशैली आणि सर्वांत मुख्य म्ह**णजे संपर्कांत येणाऱ्या प्रत्येक जीवमात्राविषयीं अकृत्रिम, आंतरिक, निरपेक्ष आणि तीव्र अनुकंपा**, ह्यांमुळें श्रीस्वामीमहाराजांना सहस्रावधि भक्तांची निष्ठा मिळाली. औषध, मंत्र , यंत्र, **दैवी उपासना** अशा त्यांना अवगत असलेल्या विविध उपायांनीं व स्वतःच्या तपःसामर्थ्यानेंहि **आपल्याकडे आलेल्या हजारो दीन व आर्त शरणागत भक्तांना महाराजांनी त्रिविध तापांपासून मुक्त करून श्रीदत्तप्रभूंच्या भक्तिमार्गावर अग्रेसर केले आहे.**

**शिष्यपरंपरा:-** वरील अर्थार्थी भक्तांशिवाय महाराजांकडे येणारे शेकडो भक्त परमार्थाचे खरे जिज्ञासूहि होते. त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार स्वामीमहाराज त्यांना वेदांत, योग, कर्म, उपासना यांपैकीं योग्य मार्गावर अग्रेसर करीत. त्यांच्या शिष्यांत वाडीचे **प.प.नरसिंहसरस्वती (दीक्षित) स्वामी**, करवीरपीठाचे **शंकराचार्य श्रीशिरोळकरस्वामी**, **गुंजेचे प.प. योगानंदसरस्वती** असे संन्यासी आहेत; तसेच त्यांचे पूर्वाश्रमबंधू **प.पू. सीताराममहाराज** (झिरी), नारेश्वरचे **प.पू. रंग अवधूतमहाराज**, पुण्याचे **योगीराज गुळवणीमहाराज,** वठारचे **पू.नरहरि दिवाण** (अष्ट्याचे दत्तमहाराज) इत्यादि ब्रह्मचारी शिष्य आहेत; व **प.पू. नानामहाराज तराणेकरां**सारखे गृहस्थहि आहेत.

प.प. **श्रीटेंबेस्वामी स्वामामहाराजांनी श्रीक्षेत्र नरसोबावाडी येथील देवस्थानाची घडी व्यवस्थित बसवली. श्रीक्षेत्र कुरुगड्डी या श्रीपादवल्लभांच्या स्थानाचा जीर्णोद्धार केला. आंध्रांतील पीठापूर येथील श्रीपादवल्लभांचे जन्मस्थान आणि विदर्भातील कारंजा येथील श्रीनृसिंहसरस्वतींचे जन्मस्थान श्रीस्वामीमहाराजांनीच प्रकट केले. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा हा मंत्र, श्रीसत्यदत्तव्रत इत्यादि दत्तोपासनांचा आविष्कार केला.**

शेवटचा (23वा) चातुर्मास श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे करून तेथेच या महान् दत्तभक्ताने वयाच्या साठाव्या वर्षी आनंदनाम संवत्सरांतच आषाढ शुद्ध प्रतिपदा, शके १८३६ (इ.स. १९१४) या दिवशीं रात्री ११ च्या सुमारास, अमावास्या संपून प्रतिपदा लागतांच, सिद्धासनस्थ होऊन, देवाकडे पहात दीर्घ प्रणवोच्चारपूर्वक देहत्याग केला व ब्रह्मस्वरूपांत लीन झाले.

**वाङ्मयः-** श्रीमहाराजांनी इतक्या खडतर, फिरत्या जीवनांत कुठल्याही सोयी नसतांना जे अफाट वाङ्मय निर्माण केले आहे त्याची तुलना केवळ श्रीमदाद्यशंकाराचार्यांच्या वाङ्मयाशींच करतां येईल. **श्रीस्वामी महाराजांचे सर्वच लिखाण श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेने झालेले आहे. देवांच्या आज्ञेशिवाय कांही लिहिण्याचा एकदोन वेळां त्यांनी प्रयत्न केला. एकदा लेखणी**

खाली ठेव अशी स्पष्ट आज्ञा झाली तर दुसऱ्या वेळी लिहायला लागतांच ताप येऊं लागला. दत्तप्रभूंच्या आज्ञेने लिहितांना मात्र प्रतिकूल परिस्थितीतही लिखाण शीघ्र होत असे. ब्रह्मावर्त येथे श्रीगुरुचरित्राचा समश्लोकी संस्कृत अनुवाद अवघ्या अडीच ते तीन महिन्यांत झाला. त्या वेळी श्रीस्वामी महाराजांना प्लेग झाला होता व बरेच दिवस ताप होता. तरीही रोज 100 हून अधिक श्लोक लिहून होत. पांच दिवस तर 200हून अधिक श्लोक प्रतिदिन झाले! प्रभास व द्वारका क्षेत्री प्रभूंच्या आज्ञेने द्विसाहस्री गुरुचरित्रावर टीका लिहितांना तर मूळ ग्रंथ उपलब्ध नसतांनाच केवळ स्मरणानेच आशयघन, प्रमाणप्रचुर, व्युत्पन्न टीका लिहून झाली.

प.प. श्रीस्वामिमहाराजांचे वाङ्मय "अनन्यसाधारण, श्रीशप्रेरणेने निर्माण झालेले, स्वयंस्फूर्त, प्रसन्न, ईशप्रसादयुक्त, ग्राहकांना फलद्रूप होणारे, सर्वत्र प्रसिद्धीस पावून सर्वांना पटणारे असे सहज आविर्भूत झालेले आहे ....... गुरुमहाराज हे ईश्वरी अवतार असल्याने त्यांचे काव्य अधिकारीवाणीरूप अर्थात् निखिलादरणीय, इष्टापादक असेच आहे यांत संशय नाही." या प.पू.धुंडीराजमहाराज कवीश्वर यांच्या शब्दांपेक्षा श्रीस्वामिमहाराजांच्या वाङ्मयाचे अधिक समर्पक वर्णन करणे अशक्यप्राय आहे.

१९व्या शतकांत कोंकणातल्या एका लहान खेड्यात, गरीब ब्राह्मण कुटुंबांत जन्म घेतलेल्या, शिक्षणासाठी कुठेही बाहेर न गेलेल्या, कुठलाहि ग्रंथसंग्रह उपलब्ध नसलेल्या एका संन्याशाने, सर्व भारतभर प्रवास करीत. अनेक व्याधींना तोंड देत, अत्यंत कठिण व्रतांचे कांटेकोर आचरण करीत, तहान-भूक, उपास-तापास, ऊन-पाऊस ही द्वंद्वे सहन करीत, हे अलौकिक वाङ्मय निर्माण केले आहे. आज शतकाधिक वर्षांनी ते केवळ टिकूनच आहे असे नाही तर हजारों आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू दत्तभक्तांना आश्रयभूत झालेले आहे.

प्रकांड पंडितांनी त्यांच्या वाङ्मयाच्या विस्ताराची, व्यापकतेची, गहनतेची, प्रासादिकतेची आणि विविधतेची तुलना श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या वाङ्मयाशी केलेली आहे. मुख्यतः मराठी आणि संस्कृत भाषांतून श्रीस्वामिमहाराजांनी आपल्या दिव्य आणि चतुरस्र प्रतिभेचे दर्शन घडविले आहे. श्रीदत्तप्रभू आणि त्यांचे कलियुगांतील दोन अवतार श्रीपादश्रीवल्लभ व श्रीमन्नृसिंहसरस्वती यांची चरित्रे, स्वरूप, तत्त्वज्ञान, कार्य आणि मुख्य म्हणजे उपासना हेच या वाङ्मयाचे विषय होत. सर्व प्रकारच्या दत्तभक्तांना आपापल्या अधिकारानुरूप परमार्थमार्गाचे पाथेय श्रीस्वामिमहाराजांनी निर्माण केले आहे - नव्हे श्रीद्त्तभगवंतांनीच त्यांच्या माध्यमांतून निर्माण करविले आहे.

अति सरल गेय भक्तिरसपूर्ण अशी मराठी पदे जशी त्यांनी केली तशाच नाना वृत्तांनी सुबद्ध आणि विविध अलंकारांनी सजलेल्या **दत्तचंपू** व **त्रिशति** गुरुकाव्य या संस्कृत रचनाही केल्या. श्रीगुरुचरित्र आणि श्रीदत्तचरित्र यांच्यांत तात्त्विक प्रमेये त्यांनी उकलून दाखविली तशीच श्रीदत्तसंप्रदायांतील गूढ परमार्थसाधनेही प्रकट केली.

त्यांना **श्रीदत्तपुराण, द्विसाहस्री गुरुचरि**तम्, समश्लोकी गुरुसंहिता, **शिक्षा**त्रय इत्यादि संस्कृत ग्रंथांतून, श्रीदत्तसंप्रदायाच्या अद्वैत तत्त्वज्ञानाची बैठक श्रीमहाराजांनी स्पष्ट केली आहे. त्याचप्रमाणे **श्रीदत्तमाहात्म्य, सप्तशतीगुरुचरित्रसार, दत्तलीलामृताब्धिसार** यांसारखे **प्राकृत** प्रासादिक **ग्रंथा**तून त्यांनी दत्तप्रभू, **श्रीपादवल्लभ** व श्रीनृसिंहसरस्वती यांची चरित्रे गायली; त्यांच्या अनुष्ठानांनी हजारो दत्तभक्तांनी श्रीदत्तकृपा प्राप्त करून घेतली व आजही घेत आहेत. भारत देशांतील सर्व दैवते, नद्या, तीर्थे यांच्यावर व्युत्पन्न **स्तोत्र**रचना केली..

*श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।*

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]


## उपोद्घात.

**स्मृतोऽप्यवति यो विघ्नं निघ्नमम्बासुतः स्तुतः। गन्धर्वस्थः स हि कलौ मलौघघ्नोऽस्तु मे हृदि।।१।।**
**नमस्ते शारदादेवी, वीणावादनतत्परे। सरस्वती जगन्माता सा मे बुद्धिं प्रचोदयात्।।२।।**
**वासुदेवयतिं वन्दे वामनं मम सद्गुरुम्। कवीश्वरं च दत्ताख्यं याचे मतिप्रकाशनम्।।३।।**
**वाङ्मयं वासुदेवस्य गहनं सागरादपि। चिंतनाय प्रवृत्तोऽस्मि मंदोऽप्यंतरशुद्धये।।४।।**

विषयप्रवेशाच्या लेखांकात आपण श्रीदत्तमाहात्म्याची सर्वसाधारण रूपरेषा, रचनेची वैशिष्ट्ये, साहित्यगुण, प्रासादिकता आणि सप्ताहपद्धती यांचा मागोवा घेतला. या लेखापासून आपण या महान ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाचे यथामति मनन करावयाचे आहे. ग्रंथाची भाषा मूलतः सरल असली तरी थोडी संस्कृतप्रचुर असल्याने कठिण शब्दांचे अर्थ स्पष्ट करीत ग्रंथाचा भावार्थ समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे. त्याला लेखकाच्या बुद्धीच्या मर्यादा साहजिकच पडणार आहेत. श्रीस्वामीमहाराजांनी 'मंदां'नाही 'औपनिषद ज्ञाना'चा बोध व्हावा म्हणून हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांच्या परीने त्यांनी वेदांत, योग इत्यादि विषय खूपच सुलभ केले असले तरी त्या विषयांच्या आकलनासाठी प्रस्तुत लेखकाचा'अधिकार' (eligibility) किंवा पूर्वतयारी मर्यादितच आहे. तेव्हां ह्या विषयांची मांडणी तळहातावरच्या आवळ्यासारखी होईलच अशी खात्री देता येत नाही. हे स्वतःची मर्यादा ध्यानांत ठेवूनच, मुख्यतः स्वतःच्या चित्तशुद्धीसाठीच मी या चिंतनास प्रवृत्त होत आहे. सुजाण, महामना वाचकांनी लेखकाच्या त्रुटींकडे डोळेझांक करून ग्रंथाचे सार नीरक्षीरविवेकाने ग्रहण करावे अशी नम्र प्रार्थना आहे. विवेचनांत कुठे काही प्रमाद, स्खलन, विपर्यास आदि आढळल्यास विचक्षण वाचकांनी ते अवश्य लेखकाच्या निदर्शनास आणावेत अशी आवर्जून विनंति आहे. वाचकांच्या सौहार्द आणि क्षमाशीलतेवर विसंबूनच मी श्रीवासुदेवयतींच्या साहित्यसागरांत ही नाव घालत आहे.

सरल, गद्य भावार्थ हे या अनुवादाचे मुख्य स्वरूप आहे. जिथे प.प.श्रीस्वामीमहाराजांना वाचकाकडून कांही पूर्वज्ञानाची अपेक्षा आहे परंतु वर्तमान वाचकाकडे ते असेलच याविषयी शंका आहे; तसेच श्रीमहाराजांच्या प्रतिपादनात काही अध्याहृत विषय आहेत; त्या ठिकाणी ते स्पष्ट करण्यापुरता विस्तार केला आहे. तसेच मूळ ग्रंथाच्या प्रतिपादनाला पूरक असणारे व/किंवा जिज्ञासूंना त्या विषयाचा अधिक अभ्यासाला उपयुक्त संदर्भ तळटीपांच्या स्वरूपांत दिले आहे.

## अध्याय १ ला.

**स्वयमेव केलें मंगलाचरण। नवविध भक्तीचें वर्णन। सांगितलें क्रमेंकरुन। सृष्टिक्रमण संक्षिप्त।।**
**दत्तात्रेयाचे मायबाप। यांचें गुणस्वरुप। गुरुशिष्यकथेचा संक्षेप। प्रथमाध्यायीं जाणावें।। श्रीदत्तमाहात्म्य 51.4-5**

अवतरणिकेच्या एकावन्नाव्या अध्यायात श्रीस्वामी महाराजांनी ह्या अध्यायांतील विषय वरीलप्रमाणे सांगितले आहेत. त्यानुसारच एक एक विषय आपण पाहू या.

**मंगलाचरण** :- भारतीय वैदिक परंपरेत ग्रंथाच्या आरंभी मंगलाचरण करण्याचा शिष्टाचार आहे. यांत बहुधा श्री, **ॐ,** अथ अशा शुभसूचक शब्दाची किंवा देवतावाचक शब्दांची योजना केली जाते. ह्याने ग्रंथ सफल होतो आणि कदाचित त्यामुळेच वेदांनीही ह्याचा पुरस्कार केला आहे. श्रीस्वामीमहाराजांनी येथे केलेले मंगलाचरण हे श्रीज्ञानेश्वरीच्या मंगलाचरणाप्रमाणे आत्मस्वरूपी गणेशाचे आहे. 'ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये आणि प्राण या तिन्ही गणांचे संरक्षण करणारा' म्हणजेच पति अशा 'त्या' गणपतीचे स्मरण हेच आपले मंगलाचरण आहे असे श्रीस्वामीमहाराज म्हणतात. दुसऱ्या ओवीत श्लेषालंकाराने गणपती आणि श्रीगुरु श्रीमन्नृसिंहसरस्वती यांचे वंदन केले आहे. गणपतिपक्षी अंबाभवानीचा पुत्र, कलियुगात ज्याचे वाहन घोडा (गंधर्व) आहे तर श्रीगुरुपक्षी कारंज्याच्या माधवपत्नी अंबेचा मुलगा झालेला आणि कलियुगांत गाणगापूरी राहणारा असे पूर्वार्धाचे अर्थ होतात. वर आणि अभय देणारे हात स्मरणामात्रे सर्व विघ्नांचा निरास करणारा हा उत्तरार्ध गणपति आणि श्रीगुरु ह्या दोघांनाही सारखाच लागू होतो. थोडक्यांत ग्रंथकारानी आलंकारिक भाषेत 'श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः' म्हटले आहे.

पुढील तीन ओव्यात स्वामीश्रींनी सद्गुरुवंदन केले आहे. 'जगताची उत्पत्ति, स्थिति आणि लय करणारा, विश्वातील आर्तांना तारणारा – दीनबंधू, केवळ स्मरण करणाऱ्यालाही दुःखांची वार्तासुद्धा न राहू देणारा दत्तप्रभू आमचा


[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

स्वामी आहे. देवदेवतांनाही वंदनीय असणाऱ्या त्या गुरुनाथाच्या चरणी हात जोडून मी माथा ठेवला आहे. तेच नरसिंहसरस्वती म्हणून अवतरलेले भगवान दत्तात्रेयच वेदांनी गाइलेले परमात्मा आहेत, सत्, चित् आणि आनंद यांनी भरलेले एकमेवाद्वितीय, निरामय परब्रह्म आहेत.'

## अनुबंधचतुष्टय.

भारतीय वैदिक परंपरेतील सर्व ग्रंथांच्या आरंभी ग्रंथांच्या आरंभी चार अनुबंध स्पष्ट करण्याचा परिपाठ आहे. ग्रंथाचा विषय, ग्रंथाचे प्रयोजन, ग्रंथाचा अधिकारी आणि श्रोत्याशी ग्रंथाचा संबंध हे ते अनुबंध होत. ग्रंथात कोणता विषय मांडला आहे, त्याचा उद्देश्य काय आहे, ग्रंथाच्या वाचनासाठी वाचकाची पार्श्वभूमि कशी असावी आणि वाचकाशी ग्रंथ कोणत्या भूमिकेतून संवाद करतो हे ह्या अनुबंधातून स्पष्ट होते. 6व्या ओवीत श्रीगुरूच श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांना निमित्त करून हा ग्रंथ लिहीत आहेत असे प्रतिपादून ग्रंथकर्त्यांनी ग्रंथाचे प्रयोजन आणि अधिकारी पुढील शब्दांत निर्देशिले आहेत '**श्रवणे पठणे करवील स्वार्थ। हा यथार्थ भाविकांचा।।** ' यावरून हा ग्रंथ भाविकांसाठी लिहिला आहे. म्हणजेच ईश्वरचरणी भाव म्हणजे श्रद्धा असणारेच ह्या ग्रंथाचे **अधिकारी** आहेत. यावेगळी दुसरी कोणतीच योग्यता अपेक्षित नाही. स्त्री, पुरुष, बाल, युवा, वृद्ध, सर्व वर्ण तसेच जातीच्या व्यक्तींना ह्या ग्रंथाचा लाभ घेता येईल. फक्त श्रद्धा-भक्ति मात्र हवी. या ग्रंथाच्या पठणाने आणि श्रवणाने भाविक जन आपापले अभीष्ट पुरुषार्थ – म्हणजेच धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष प्राप्त करून घेतील. 'स्व' म्हणजे आत्मा असा विशेष अर्थ लावल्यास आत्मलाभ म्हणजे मोक्षपुरुषार्थ सिद्ध करण्यास प्राधान्य आहे. यानुसार मुमुक्षूसाठी आत्मसाक्षात्कार हेच ह्या ग्रंथाचे मुख्य **प्रयोजन** असले तरी इतर अर्थार्थी आणि आर्त भक्तांना त्यांच्या त्यांच्या इष्टार्थाची प्राप्ती ह्या ग्रंथाचे पठण करवील असे सूचित केले आहे. संबंधाविषयी पुढे विचार केला आहे.

**विषय :-** यानंतर पांच ओव्यात या ग्रंथाचा विषय स्पष्ट केला आहे. जगाच्या उद्धारासाठी परमेश्वराने अत्रिमुनींच्या घरी अवतार धारण केला. त्यांच्या चरित्राचे सुंदर वर्णन ब्रह्मांड, मार्कंडेय, भागवत आदि पुराणातून केले आहे. त्या सर्वांचे सार असलेला, श्रीस्वामीमहाराजांनीच रचलेला साडे तीन हजार श्लोकांचा श्रीदत्तपुराण हा ग्रंथ आहे. पण तो ग्रंथ बहुसंख्य लोकांना अपरिचित असलेल्या संस्कृत भाषेत आहे. (ते अपरिचित गीर्वाण भाषण.) तेवढ्यासाठी ह्या ग्रंथाला आरंभ केला आहे. याच्या वाचनाने स्वयंप्रकाश, भक्तवत्सल, चित्ताचा क्षोभ शमवून शांति देणाऱ्या भगवान विष्णूंचे ज्ञान होईल. इथे पुन्हां एकदा ग्रंथाचे मुख्य **प्रयोजन** आत्मज्ञान हेच असल्याचे सुचविले आहे. श्रीदत्तपुराणाचे तीन भाग आहेत. प्रथम दोन अष्टकांचे – सोळा अध्यायांचे ज्ञानकांड, दुसरे चार अष्टकांचे (32 अध्याय) उपासनाकांड आणि तिसरे पुन्हा दोन अष्टकांचे कर्मकांड. ह्यापैकी उपासनाकांडाचे निरूपण ह्या ग्रंथांत केले आहे. ह्यांत मुख्यतः ईश्वरप्रेमाचेच प्रतिपादन श्रीदत्तभक्तांच्या चरित्रातून केले. ह्यांत सहस्रार्जुन कार्तवीर्याचे आख्यान आहे. श्रीदत्तानी अलर्काला उपदेशिलेले विज्ञान आहे. आयु आणि यदूंच्या उद्धारांच्या कथा आहेत. यातून मुख्य उपदेश हाच आहे की ज्याला मुक्तीची चाड आहे त्याने नवविधा भक्तीचा सादर अवलंब करावा. ही भक्तीच त्याला अनायासेच इथे – इहलोकी सुखोपभोग मिळवून दईल आणि मृत्यूनंतर परलोकी मुक्तीचा लाभ करवून देईल. (7 -12)

## नवविधा भक्ति.

श्रीदत्तप्रभूंचे स्मरण, वंदन, सख्य (मैत्री), सेवन, अर्चन (पूजन), दास्य, श्रवण, कीर्तन आणि सर्व(आत्म)निवेदन हेच भक्तीचे नऊ प्रकार होत. कार्तवीर्याने स्मरणभक्ति केली, अलर्काने वंदनभक्ति, आयुराजाने दास्यभक्ति, परशुरामाने सख्यभक्ति, विष्णुदत्ताने सेवनभक्ति, यदूने अर्चनभक्ति, वेदधर्म्याने कीर्तन तर दीपकाने श्रवण करून श्रीदत्तप्रभूंचा प्रसाद मिळविला. सर्वस्व भगवंताला अर्पण करून म्हणजेच आत्मनिवेदन भक्तीने श्रदत्तपदी लीन झालेल्या कित्येक भक्तांना निर्वाण – सायुज्य मुक्ति मिळाली. अशी ही भक्ति आत्मज्ञानाची जननी आहे. ती भक्तावर कृपेची पाखर घालते. भक्तीमुळेच निर्गुण निराकार परब्रह्मही नामरूपाला येते. त्या अव्यक्त परमात्मस्वरूपाचा साक्षात्कार करून घेण्यासाठी ही भक्ती (कलियुगातील) दुर्बल जीवांना क्रममुक्तीचा सोपान दाखवून त्यांचे श्रम निवारण करते. सगुण ब्रह्माचे ध्यान करीत करीत भक्ताचे चित्त शीघ्रच स्थिर होते. अशा या स्थिर चित्तातून कल्पित गुणांची उपाधि बाजूला केली की आत्मज्ञान आपोआपच स्फुरते. भाविकांना हा क्रममुक्तीचा मार्ग दाखवून कृतार्थ करणाऱ्या त्या नवविधा भक्तीचे यथार्थ स्वरूप आतां विशद करू. (13 -20)

**स्मरणभक्ति** :- सर्व भक्तीत श्रेष्ठ अशी ही स्मरणभक्ति इतर आठही भक्तींना व्यापणारी असल्याने ती गुरुतर आहे. भगवंताला ती अतिशय प्रिय आहे. भगवंताची हजारो शरीरे आहेत, हजारो अवयव आहेत; तो हजारो स्वरूपे धारण करतो, हजारो नामांनी ओळखला जातो आणि हजारो लीला करतो. त्या सर्वांचे प्रेमभावाने नित्य क्षणोक्षणी केल्याने जन्मजन्मांतरीच्या संचित कर्माचा बोजा हलका होतो आणि सहजच मोक्ष लाभतो. येता-जाता, काम

करतांना, खाता-पिता, देता-घेता, सर्व अवस्थात मनाने भगवान दत्ताचे स्मरण केले की कर्माला अकर्मता येते. म्हणजेच परमेश्वराचे स्मरण करीत जी काही बरी वाईट कर्मे आपल्या हातून घडतील ती सर्व निष्फळ होतील. अशी या स्मरणभक्तीची महती आहे. शिवाय स्मरणच नसेल तर इतर कुठलीच भक्ती घडू शकत नाही. (20 -25)

**कीर्तनभक्ति** :- हीसुद्धा भाविकांना तारणारी आहे. वैदिक परंपरेत संध्या, यज्ञ, पूजा, श्राद्ध, जप इत्यादि सर्व धार्मिक कर्मांच्या शेवटी पुढील मंत्र म्हणतात. “यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपःपूजाक्रियादिषु। न्यूनं सम्पूर्णतां याति सद्यो वन्दे तमच्युतम्।।“ ज्याच्या स्मरणाने आणि नामोच्चाराने तप, यज्ञ, पूजा आदि कर्मातील त्रुटी दूर होऊन त्या कर्माला परिपूर्णता येते त्या अच्युताला वंदन करतो. आणि मग विष्णवे नमो, विष्णवे नमो, विष्णवे नमः असा त्रिवार नमस्कार करतात. हे शास्त्रवचन असत्य कसे होईल? भगवंताचे कीर्तन – नाम आणि गुण याचे गायन आपल्या सर्व धार्मिक कृत्यांना परिपूर्णता प्राप्त करून देते. ज्याला जन्म-मरणादि विकार नाहीत त्या भगवंताच्या जन्माचे कीर्तन, जो निष्क्रिय आहे त्याच्या क्रियांचे – लीलांचे, कीर्तन आपल्या जन्माचे वासनारूपी बीज नष्ट करते आणि गहन अशा कर्माची वार्ताही उरू देत नाही. मात्र भगवंताचे कीर्तन करतांना अष्ट सात्त्विक भाव प्रकट झाले पाहिजेत[2] तरच जन्माचे सार्थक होईल. अन्यथा, सात्त्विक भाव विरहित कीर्तन हे दंभाचे ठाणेच होय. सात्त्विक भावांचे वर्णन करतात. हृदय भरून आले नाही, कंठ सद्गदित झाला नाही, अंग रोमांचांनी फुलून आले नाही, मन अंतर्मुख होऊन देहाची शुद्ध हरपली नाही तर शहाण्यानी ते कीर्तन नसून दांभिक मिथ्या प्रलाप आहे असे समजावे. (२६ -३०)

**श्रवणभक्ति** :- कीर्तनभक्तीप्रमाणेच श्रवणभक्तीतही भावशुद्धीला महत्त्व आहे. हरिकथा आणि हरिगुण यांचे श्रवण करतांना काया, वाचा आणि मन ही दृढ – स्थिर, झाली पाहिजेत. इंद्रिये आणि मनाची अंतर्मुखता साधली पाहिजे. हेवा, मत्सर, असूया मनातून काढून, दृढ श्रद्धेने, एकाग्रतेने, आसन बांधून, झोप दवडून, श्रवण होणे आवश्यक आहे. दुसरा कुणी ऐकवत असलेले भगवद्गुण, हरिकथा इत्यादि जरी आपल्याला माहिती असले तर ते श्रद्धेने आणि भक्तीने ऐकणे हीच खरी श्रवणभक्ति होय. आवर्जून कीर्तनाला जायचे आणि तिथे कीर्तनाकडे लक्ष न देता इतर सांसारिक गोष्टींचा चर्चा करायची किंवा बसल्या बसल्या डुलक्या घ्यायच्या. अशा श्रवणाचे कष्ट व्यर्थ आहेत. त्या श्रवणाने ना संसाराचा भ्रम दूर होतो, ना मोक्षाची वाट गंवसते. मग आत्मस्वरूप विश्राम मिळण्याची वार्ता तर दूरच. तरी भक्तीभावाने सावधान राहून श्रवण करावे. (३० -३६)

**सेवनभक्ति** :- मूलतः आत्मस्वरूप एकच आहे. त्यात श्रेष्ठ- कनिष्ठ, उत्तम-अधम अशा भावांना वावच नाही. मग कोण सेव्य आणि कोण सेवक? पण द्वैतभावाचा आश्रय घेऊन लोक तसा भाव धारण करतात. ही अनादिकालापासूनची प्रवृत्ती लक्षात घेऊन वेदांचे सांगणे असते. वेदवचनाना अनुसरल्याने लोकांना उपासनापद्धती मिळते आणि ते विनासायास तरून जातात. वज्र, अंकुश, ध्वजा आणि कमळ या चिह्नांनी अंकिलेल्या भगवंताच्या पदकमलांची सेवा करणारे संत निश्चयाने मुक्त होतात. (37 – 39)

**अर्चनभक्ति** :- निराकार परमेश्वराचीच साकार मूर्ति कल्पनेत आणून सर्व भावांनी, ध्यान, आवाहनादि सर्व उपचारांनी त्याची पूजा करावी. ही मानसपूजा सर्वश्रेष्ठ होय. दुसरा प्रकार, आपल्या आवडीची काष्ठ, पाषाण, सुवर्णादि धातु, वालुका, मृत्तिका, चित्र, रत्नमणि, मनोमयी इत्यादि पर्यायापैकी एक प्रतिमा करावी[3]. ती आपल्या देहासारखीच मानून तिला मिळतील ते सर्व उपचार समर्पण करून भक्तिभावाने पूजा करावी. ही देवपूजा सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशी तीन वेळा करावी. किंवा प्रातःकाळी 16 उपचारांनी पूजा करावी, माध्याह्नी पंचोपचार पूजा करावी आणि संध्याकाळी आरती करावी. जी जी वस्तु आपल्याला आवडेल ती आधी देवाला अर्पण करावी. याने भगवंताबरोबर प्रेम जुळते व भक्त संसारसागराला पार करतो. देवाची पूजा डोळ्यानी पाहून चित्तात साठवावी आणि त्या मनात रेखलेल्या मूर्तीतच मन स्थिर करावे. यायोगे ब्रह्मपदवी प्राप्त होईल. अशा रीतीने एकाग्रतेने पूजा करून देवापुढे बसावे आणि एकाकार वृत्ती करून सद्गुरूंनी दिलेला मंत्र जपावा. हेच अर्चन होय. (40 – 45)

**वंदनभक्ति** :- आता वंदनाचे स्वरूप पाहू. या वंदनभक्तीने चित्तवृत्ती समान होऊन अढळपदाची प्राप्ति होते. ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सर्व मनुष्यमात्रांनाच नव्हे तर गाय, घोडा, श्वान, गाढव इत्यादि सर्व पवित्र वा अपवित्र

---

[2] *स्तम्भः स्वेदोऽथ रोमाञ्च स्वरभङ्गोऽथ वेपथुः। वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्त्विकाः स्मृताः।।* (स्तब्धता किंवा ताटस्थ्य, घाम, रोमांच, गद्गद वाचा, कंप, चेहऱ्याचा आणि शरीराचा रंग पालटणे, अश्रुपात आणि मूर्छा हे आठ सात्त्विक भाव जाणावेत.)

[3] शैली दारुमयी लौही, लेप्या लेख्या च सैकती। मनोमयी मणिमयी प्रतिमाष्टविधा स्मृता।। (पाषाणाच्या, देवदार, मंदार, पिंपळ इत्यादि काष्ठांच्या, सुवर्णादि धातु, मृत्तिका, कापड, लुकण यांच्या, स्थंडिलावर लिहिलेल्या, वाळूच्या, रत्नांच्या आणि मनोमयी अशा आठ प्रकारच्या मूर्ति आहेत.) श्रीमद्भागवतपुराण. 11.27.12

पशूंना, तसेच सर्व जगातील स्थावर-जंगम पदार्थांनासुद्धा सतत नमस्कार करीत जावा[4]. त्या त्या शब्दांनी निर्दिष्ट गुणात्मक देह हे वाच्यार्थ जाणावेत. त्यांच्या अंतर्यामी असलेला निर्गुण परमात्मा हाच खरा लक्ष्यार्थ होय. तोच परिपूर्ण परमात्मा सर्व देहांचा नियंता आणि प्रकाशक आहे. तो सत्य आणि चैतन्यस्वरूप आत्मा 'अस्ति भाति प्रिय' (अस्तित्व, जाणीव आणि प्रेम) ह्या लक्षणांनी सर्वांच्या अंतर्यामीं वसतो असा भाव ठेवून त्याला वंदन करीत जावे. कुणाचीही निंदा करू नये, कुणी केलेल्या निंदेचा खेद मानू नये, सर्वांनाच देव मानून नमस्कार करावा. याला रुद्राध्याय प्रमाण आहे. यांत सर्व प्रकारचे चांगले वाईट मानव, प्राणी, वनस्पती इत्यादींचा स्वमी असलेल्या रुद्राला नमन केले आहे. (46 -53)

**दास्यभक्ति** :- मालकाजवळ नोकर ज्याप्रमाणे मानापमान, आळस सोडून रात्रंदिवस मालकाच्या आज्ञेप्रमाणे तो सांगेल ते काम करतो तसेच भक्ताने सर्वा ठिकाणी व्यापून राहिलेल्या भगवंताची चाकरी करावी. चाकराच्या चरितार्थाची चिंता जशी मालक करतो त्याप्रमाणेच आपल्या योगक्षेमाची चिंता परमेश्वरावर सोडून निश्चिंत मनाने दास्य करावे. (51 – 54)

**सख्यभक्ति** :- जन्मजन्मांतरापासून असंख्य देह प्राप्त झाले व नष्ट झाले तरी जो अंतरात्मा आपल्याला पळभरही विसंबत नाही, 'सर्वाच्या हृदयामध्ये मी वास करतो' असे भगवद्गीतेत (15.15) स्पष्ट सांगितले आहे. तोच परमात्मा आपला प्रियतम (प्रेष्ठ) जिवलग मित्र आहे. त्याचेच सख्य करावे[5]. ही मैत्री निरपेक्ष असणे हे विशेष महत्त्वाचे आहे. अशा निरपेक्ष सख्यभक्तीने सांख्ययोगाने जाणले जाणारे ब्रह्मपद लाभते. त्या अंतरीच्या सख्याविना करमू नये, त्याला कधीच विसरू नये, त्याच्यावाचून कांही करू नये आणि त्याचेच निरपेक्ष गुणगान करावे. अपेक्षेने केलेली लौकिक मैत्री खरोखर संसारातून सोडवील का? परमेश्वराचे सख्य साधल्यास पुन्हा या जन्ममरणरूपी संसारात यावे लागत नाही. (55 – 59)

**आत्मनिवेदन** :- आपले सर्वस्व – तन, मन, धन, कुटुंब, शेती, घर हे सर्व ईश्वराला समर्पण करणे हीच आत्मनिवेदन भक्ति होय. केवळ एवढ्यानेच आत्मनिवेदन पूर्ण होत नाही तर आपला देह मन-बुद्धीसहित परमेश्वराला अर्पण झाला पाहिजे. त्यासाठी 'मी केवळ शुद्ध, बुद्ध (ज्ञानी) अद्वितीय, स्वयंसिद्ध, नित्य निष्पाप आत्मा आहे' असा अभ्यास करायला हवा. 'मी साक्षी आहे' असे समजणेही विपरीत आहे. ' माझ्याशिवाय दुसरा कुणी नाहीच तर कोण कुणाचा साक्षी असेल? मी काही करीतच नसल्याने मला कर्तृत्वच नाही तर मग भोक्तृत्व (केलेल्या कर्माच्या फळाचा भोग) कसे येईल? अर्थातच कर्माचे बंधन मला नाही. मी निश्चयाने नित्य मुक्त आहे.' असा अभ्यास केल्याने सहजच निःसंगता, अलिप्तता येते. अशा रीतीने अहंकार नष्ट झाल्याने सिद्ध होणारी आत्मनिवेदन भक्ति हीच साधुसंतांनी गौरवलेली आहे. (60 -63)

## सृष्टिक्रमण

अशा प्रकारे नवविधा भक्ति करून महामुनी अत्रि देवांना प्रिय होऊन देवपिता झाला. नैमित्तिक प्रलयाच्या अंती, ब्रह्मदेवाची रात्र संपल्यावर, सर्व जगत् जलमय झालेले असताना शेषाची शय्येवर पहुडलेल्या नारायणाने विश्वाच्या निर्मितीचा संकल्प केला व आपल्या दृष्टिक्षेपाने (ईक्षण) मायेला प्रेरणा करून प्रथम ब्रह्मदेवाला जागे केले; व त्याला वेद देऊन त्याच्याकरवी भूतभौतिक सृष्टीची रचना केली. ब्रह्मदेवाने मरीचि, अत्रि, क्रतु, पुलस्त्य, पुलह, अंगिरस आणि दक्ष हे सप्तर्षी (तसेच सनत्कुमार, सनक, सनन्दन, सनातन आणि नारद) ह्या मानसपुत्रांना जन्म दिला. (63 -65)

## महर्षि अत्रि

यातील दुसरा पुत्र अत्रि याचा वेदानी गौरव केला आहे. स्थूल, सूक्ष्म आणि कारण या तीनही देहांचा अभिमान सोडून, जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तीनही अवस्थांचा त्याग करून, तसेच सत्त्व, रज आणि तम या तीनही गुणांना ओलांडून त्याने आपले अत्रि हे नाव सार्थ केले होते. ब्रह्मदेवांचे निष्कलंक तप त्यांच्या डोळ्यांतून सहज प्रकटले त्या तपाचे सुंदर मूर्त रूप म्हणजेच अत्रि ऋषि होत. सर्वांत प्रथम जेव्हा राहूने सूर्याला अंधःकाराने ग्रासले तेव्हा त्या ग्रहणाची कारणमीमांसा अत्रिऋषींनीच आकळली.[6] ऋग्वेदाच्या सर्वानुक्रमणीनुसार, अग्न्यादि देवता ज्यातील मंत्रानी शीघ्र फलप्रद होतात त्या ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलाचे द्रष्टे अत्रि महर्षीच आहेत. कृतयुगात रोगग्रस्त

---

[4] *खं वायुमग्निं सलिलं महीं च ज्योतींषि सत्वानि दिशो द्रुमादीन्। सरित्समुद्रांश्च हरेः शरीरं यत्किंच भूतं प्रणमेदनन्यः।।* आकाश, वायु, अग्नि, पृथ्वी, सूर्य-चंद्र-तारे इत्यादि प्रकाशणाऱ्या ज्योति, प्राणिमात्र, दिशा, वृक्षवल्ली, नदी, समुद्र हे सर्व स्थावर-जंगम पदार्थ भगवंताच्या शरीराचे अवयवच आहेत असे जाणून त्यांना एकोभावे प्रणाम करावा. श्रीमद्भागवतपुराण. 11.2.41

[5] *'आपुला तो एक देव करोनि घ्यावा.'* संत तुकाराम

[6] *ऋग्वेद 4:40:9*

झालेल्या पीडित जीवांना आरोग्य देण्यासाठी अत्रिमुनीच वैद्य झाले व त्यांनी सर्वांना सुखी केले[7]. मंद बुद्धीच्या लोकांना वेदांच्या आज्ञा समजावण्यासाठी मनूने यथार्थ स्मृति करूनही लोकांना कळेना तेव्हा त्यांच्या कल्याणासाठी अत्रिमुनींनी दुसरी आत्रेय स्मृति केली. अत्रि ऋषि स्वतः ब्रह्मविद्वरीयान् – ब्रह्मज्ञानाची अत्युच्च भूमिका[8], असल्याने निरिच्छ होते. पण ब्रह्मदेवांच्या आज्ञेला मान देऊनच त्यांनी अनसूयेशी विवाह केला. (66 - 73)

## सती अनसूया.

अत्रिमुनीनी जिचे पाणिग्रहण केले ती अनसूया म्हणजे कर्दम ऋषींचे, मनूची कन्या देवहूतीच्या उदरांत साकारलेले मूर्तिमंत तप होय. जिने स्वप्नातही अतिथीला आपल्या दारातून विमुख जाऊ दिले नाही, जिने स्वतः नग्न होऊनही अतिथिवेषात आलेल्या ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रिमूर्तीला भिक्षा दिली; सावित्री-लक्ष्मी-पार्वती या तीन देवींनी तिच्या पातिव्रत्याच्या कीर्तीने मत्सरग्रस्त होऊन आपले पति जिचे सत्वहरण करण्यासाठी पाठविले असता त्या त्रिमूर्तींची आपल्या पातिव्रत्य धर्माच्या सामर्थ्याने ज्या अनसूयेने बाळे केली; तेव्हा गर्वाचा ताठा उतरून त्या तीनही देवी आपले पति परत घ्यायला जिच्याकडे आल्या असतांना ज्या सतीने ती बाळे त्यांच्यापुढे ठेवली; आणि मग जेव्हा त्यांना आपल्या पतींची ओळख पटली नाही तेव्हा त्याच अनसूयेने त्यांचे त्यांचे पती त्यांना सुपूर्त केले. पातिव्रत्यधर्माने तिला असे सामर्थ्य प्राप्त झाले होते. मांडव्य ऋषीच्या शापाने आपला पति सूर्योदयापूर्वी मरण पावणार असे समजल्यावर त्या कौशिक ब्राह्मणाच्या पत्नीने आपल्या पातिव्रत्याच्या जोरावर सूर्याचेच स्तंभन केले तेव्हा सर्व विश्व अंधःकारग्रस्त झाले त्या वेळी अनसूयेनेच त्या सतीला समजावून, आश्वासन देऊन सूर्याला उदयाला आणले. मांडव्याच्या शापाने कौशिक मरून पडला असता अनसूयेनेच तत्क्षणी त्याला उठविले. हे अत्यंत कठिण कार्य करून त्रैलोक्याचे रक्षण केलेल्या अनसूयेला देवांनी "ब्रह्मा-विष्णु-महेश हे तिघेही तुझे पुत्र होऊन तुझ्या अधीन राहतील" असा वर दिला. तिच्या धर्मबलाच्या धाकाने, तिला त्रास होऊ नये म्हणून तिच्याजवळ पृथ्वीसुद्धा मऊ व्हायची, वाराही मंद मंद वाहायचा, सूर्यही शीतल व्हायचा आणि सर्व देवता तिच्यासमोर थरथरा कापू लागल्या. तिच्या सौंदर्याला चंद्राची उपमा द्यायलाही भीति वाटते कारण तो तिचा पुत्र असूनही त्याला कलंक आहे आणि त्याच्या कलांचा क्षय होतो; पौर्णिमेला तो पूर्ण होतो पण रात्र संपतांच तो निस्तेज होतो. नित्य पूर्ण तेजाने झळाळणाऱ्या अनसूयेशी त्याची कशी बरोबरी होईल? सूर्य तेजस्वी आहे खरा पण त्यालाही उदयास्त आहेच. अनसूयेच्या तेजाची सर त्याला कशी येणार? शिवाय कौशिक सतीच्या शापाला भिऊन त्याने दहा दिवस झोप घेतली त्या वेळी त्याला अनसूयेनेच उठवला. अशा अनसूयेची तुलना जगांत कुणाशी तरी करता येईल काय? अहो दया, क्षमा, शांति इत्यादि गुणांनी शोभणाऱ्या भगवान विष्णूंना जिने आधी आपला धाकटा भाऊ – कपिलमुनि, केला आणि नंतर पुत्रच केला त्या अनसूयेला कसलीही उपमा देण्याचीच मला लाज वाटते. तेव्हां अनसूया ही केवळ अनुपम चैतन्याची कोरच आहे असे मला वाटते. तिला अबला कोण म्हणेल? (74 - 91)

तप हेच ज्यांचे सर्वस्व आहे अशा महासमर्थ परोपकारी, निःस्वार्थ अत्रिमुनींची ही अनसूया पत्नी झाली. त्रिभुवन धुंडाळूनही मिळणार नाही असे परमार्थसाधनभूत साध्वीरत्न तपादि प्रयत्न न करताच सहज अत्रींना प्राप्त झाले. सृष्टीच्या आरंभी जशी परमात्म्याने प्रथम त्रिगुणात्मक माया निर्माण केली आणि तिच्या माध्यमातून आपले सगुण रूप जगात प्रकट केले. त्याचप्रमाणे भगवंताने अवतार धारण करण्यापूर्वी ही अनसूयेची कमनीय मूर्ति आपले प्राकट्यस्थान म्हणून निर्मिली. तेव्हा आदिमायेचीच उपमा अनसूयेला द्यावी तर ती माया जड – अचेतन आहे. अनसूया तर साक्षात चेतनाच आह, तेव्हा मायेलाही तिची बरोबरी येणार नाही. अशी ही कर्दममुनीची निरुपम द्वितीय कन्या, ब्रह्मदेवांच्या द्वितीय मानसपुत्राला दिली. त्यांचा पुत्र दत्त मात्र अद्वितीय आहे. (92 – 98)

तो हा स्वतःचेच दान करणारा – स्वयंदत्त, भगवान दत्तात्रेय नावाने प्रसिद्ध आहे. आजकालचे जे दत्तक पुत्र त्यांना जनक आणि दत्तक असे दोन पिते (द्वि + आमुष्यायण) असतात. हे द्व्यामुष्यायण दत्तप्रभूंना मात्र नाही कारण ते अजन्मा असल्याने त्यांना माता, पिता, कुळ, गोत्र इत्यादि कांहीच नाही. त्यांनी आत्मदान केल्याने त्यांना कसे द्व्यामुष्यायण येईल? असा तो अप्रमेय अत्रिमुनींच्या भक्तीसाठी स्वतःच दाता आणि देय झालेला भगवान सद्गुणाकर दत्तात्रेय - ज्याचे गुणगान करून वेद आणि पुराणे थकून गेले, त्यांचे आमच्या स्वल्पबुद्धीने संपूर्ण गुण कसे गाता येतील? किंवा सुंदर काव्याच्या रचनेने देवाचे मन तोषवायला निघालेल्या बृहस्पतीचेही कवित्व विस्मित

---

[7] *आयुर्वेदात आत्रेय संहिता प्रसिद्ध आहे.*

[8] या ज्ञानाच्या सहाव्या भूमिकेत ज्ञानी पुरुषाला समाधि अवस्थेतून भानावर यायला दुसऱ्याची आवश्यकता असते (परतो व्युत्थान). पाचव्या भूमिकेत तो स्वतःच्या संकल्पाने भानावर येतो तर सातव्या भूमिकेतून तो जागा होतच नाही.

होईल; त्यालाही जे जमणार नाही. याची मला पूर्ण जाणीव असल्याने मला काहीच करावयाचे नाही. जशी सद्गुरु दत्तात्रेय प्रेरणा करतील तसेच हे लेखन घडत आहे. येथे कर्तृत्वाचा यत्किंचितही अभिमान नाही. (99 -104)

## गुरुशिष्य कथेचा संक्षेप.

अध्यायाच्या शेवटी पाच ओव्यात वेदधर्मा आणि संदीपक या गुरुशिष्यांच्या कथेचा थोडक्यात निर्देश केला आहे. ही कथा श्रीगुरुचरित्राच्या दुसऱ्या अध्यायात आलेली आहे. भूलोकाची सर्व चराचर जगासह चार वर्ण आणि चार आश्रम यांच्यासह मानवाची निर्मिति केली. मानवी संस्कृतीच्या धारणासाठी कृत, त्रेता, द्वापर आणि कली या चार युगांची योजना करून, त्यांना एकानंतर एक या क्रमाने करून ब्रह्मदेवांनी त्यांना पृथ्वीवर पाठविले. कली मात्र, विशेषतः भरतखंडातील धर्मपरायण मानवांना पृथ्वीवर येण्याला घाबरू लागला. तेव्हा ब्रह्मदेवाने 'तुझ्याबरोबर आसुरी संपत्ति आणि तुला अनुकून काळ पाठवतो, त्यांच्यामुळे सगळे मानव तुला अनुकूल होतील. तुझा कालावधि कमी असेल.' असे समजावून त्याला सांगितले की, 'गुरु, ईश्वर, सद्ब्राह्मण, साधु, संत, माता-पिता यांची भक्ति करणाऱ्याना मात्र तू त्रास देऊ नकोस. विशेषतः गुरूच्या भक्ताकडेतर तू पाहूसुद्धा नकोस. सद्गुरूच्या भक्तावर देवादिकांचाही रोष झाला तरी सद्गुरू त्याचे रक्षण करतात. मात्र गुरूंचा रोष झाला तर त्रैलोक्यात कुणीही त्याचे रक्षण करू शकत नाही.' त्यावर कलीने सद्गुरूंचे हे माहात्म्य सोदहरण स्पष्ट करायची विनंत केली. तेव्हा ब्रह्मदेवाने त्याला ही कथा सांगितली.

वेदधर्मा नावाच्या ऋषींचा गोदावरीच्या तीरावर मोठा आश्रम होता. तिथे त्यांचे अनेक शिष्य, प्रशिष्य विद्या संपादन करीत होते. एकदा वेदधर्मा मुनींनी त्यांच्या गुरुभक्तीची कसोटी पाहयचे ठरविले. त्यांनी सर्व शिष्यांना बोलावून त्यांना सांगितले की, "माझे जन्मजन्मांतरीचे खूपसे पाप मी तपाने नाहीसे केले आहे. परंतु आणखीही बरेच पाप शिल्लक आहे. ते मला भोगूनच संपवणे भाग आहे. मला गलत्कुष्ठ होऊन अंधत्व पण येईल. मला माझे स्वतःचे रक्षणही करता येणार नाही. हा रोग मला 21 वर्षे भोगावा लागणार. तेव्हा अशा या कठिण अवस्थेत काशीत जाऊन वास करावा असे मी ठरविले आहे. तेव्हा तिथे मला अन्नपाणी देऊन, माझ्या शरीराचा सांभाळ करायला माझ्याबरोबर तुमच्यापैकी कुणी येईल का? विचार करून सांगा." हे गुरूंचे भाषण ऐकून सर्व शिष्य स्तब्ध झाले. एवढी अवघड व मोठी जबाबदारी स्वीकारण्यास कुणीच धजावला नाही. त्यांच्यातला एक संदीपक नावाचा शिष्य मात्र त्यांची सर्व प्रकारे काळजी घेऊन त्यांना सांभाळायला तयार झाला. त्यानुसार उभयता गुरुशिष्य काशीला येऊन कंबलाश्वतराजवळ आश्रम करून राहिले. काशीत येताच वेदधर्मा मुनि रुग्ण झाले. सर्व अंग गळत्या व्रणांनी भरून गेले. त्यांची दृष्टी गेली आणि शरीर दुर्बल झाले. वेदधर्मा मुनींची सहनशक्ति जाऊन विवेकही नष्ट झाला. ते तापट झाले. दीपकाने त्यांची बोलणी सहन करीत, क्वचित् त्यांचा मारही खाऊन अत्यंत प्रेमाने त्यांना अन्न आणून द्यावे, त्यांच्या व्रणादिकांची स्वच्छता करून शुश्रूषा करावी. त्यांनी कधी त्याने आणलेल्या भिक्षान्नाला नावे ठेवावीत. कधी कधी तर ते फेकून द्यावे, त्याला दुसरे रुचकर अन्न आणायला सांगावे तर कधी अमुकच अन्न आणायला सांगावे. तो भिक्षेला निघाला तर "माझे व्रण धुवायचे सोडून कुठे निघालास, या माशा मला खाऊन टाकतील," असे म्हणावे. असा त्यांच्याकडून कळत नकळत होणारा सर्व छळ दीपकाने शांतपणे सहन करावा. "सद्गुरूच सर्व देवांचे देव आहेत. त्यांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ साधना आहे. त्यांच्या पादतीर्थ हीच गंगा आहे." या दृढ भावनेने त्याने आपल्या शरीराचीही काळजी केली नाही. 21 वर्षांच्या त्या काळात तो कधी विश्वश्वराच्या दर्शनाला गेला नाही की कधी गंगास्नानाला!

त्याच्या अविश्रांत गुरुसेवेने साक्षात् भगवान विश्वेश्वर आणि भगवान विष्णु दीपकावर प्रसन्न होऊन त्यांनी त्याला हवा तो वर मागण्यास सांगितले. पण दीपकाने सद्गुरूंची आज्ञा नसल्याने वर घेण्याचे नाकारले. सद्गुरू प्रसन्न झाले. संदीपकाला त्यानी तो आपल्या परीक्षेला पूर्ण उतरला असल्याचे सांगून त्याच्या मस्तकावर आपला कृपापूर्ण हात ठेवला. तो तत्क्षणी वेदवेदांगांत पारंगत झाला, ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होऊन तो ब्रह्मविद्येत कुशल झाला. वेदधर्मा मुनींचे शरीर पूर्ववत् दिव्य झाले. हे सर्व त्यांनी शिष्याची परीक्षा पाहण्यासाठी आणि काशीचे माहात्म्य प्रकट करण्यासाठी केलेले नाटक होते. मग वेदधर्मा मुनीनी आपल्या प्रिय शिष्याला – संदीपकाला वर मागायला सांगितले. तेव्हा संदीपकाने आपल्याला श्रीदत्तचरित्र एकण्याची इच्छा असल्याचे सांगितले. वेदधर्मा मुनि प्रसन्नपणे दत्तचरित्र सांगायला प्रारंभ केला.

दुसऱ्या अध्यायापासूनचा सर्व ग्रंथ ह्या गुरुशिष्यांच्या संवादरूपानेच रचला आहे. त्यात पुराणपद्धतीनुसार आणखीही संवाद आले आहेत. हे सर्व उपदेशपरच आहेत. यावरून या ग्रंथाचा वाचकाशी बोधक या नात्याने **संबंध** आहे हे स्पष्ट होते. वाचक हा बोध्य आणि ग्रंथकार बोधक असा हा संबंध आहे.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पहिला अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो. श्रीगुरुदेव दत्त!

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय 2 रा.

**बहुधा केले दीपकें प्रश्न। वेदधर्मा हर्षून। पितृपुत्रसंवाद सांगून। कौशिकाख्यान कथन करी।।६।।**
**शापूनि सूर्या ठेवी सती। अनसूयेसी देव स्तविती। अनसूया ये सतीप्रती। द्वितीयाध्यायीं ही कथा।।७।।**

### दीपकाचे प्रश्न

वेदधर्मामुनींची अनुकूलता पाहून दीपक त्यांना साष्टांग नमस्कार करून बोलला, "गुरुमहाराज! मला कांही प्रश्न पडले आहेत. आपण कृपा करून माझे समाधान करावे. कुणी म्हणतात दत्तात्रेय हा (अत्रि) ऋषींचा पुत्र आहे; कुणी म्हणतात तो देव आहे. कुणी त्याला ध्यान करण्यास योग्य म्हणतात तर आणखी कुणी त्याला साक्षात् परब्रह्मच म्हणतात. ही सर्व मतांतरे ऐकून माझी मति गोंधळून गेली आहे. आपणच यथातथ्य सत्य काय आहे ते मला सांगावे. दत्तप्रभूंनी कसा अवतार घेतला? कशा लीला केल्या? शिष्यांचा कसा उद्धार केला? इत्यादि सर्व मला समजावून सांगा." (1 – 4)

### पितापुत्रसंवाद.

आपल्या प्रिय शिष्याची श्रीदत्ताविषयीची जिज्ञासा आणि आस्था पाहून वेदधर्मामुनि गंहिवरले आणि बोलले, "बा शिष्या! लक्ष देऊन, कान लावून ऐक. एक भार्गव गोत्राचा वेदशास्त्रसंपन्न सदाचारी ब्राह्मण होता. त्याला नवसा-सायासांनी म्हातारपणी एक मुलगा झाला. तो योगभ्रष्ट असून सर्वज्ञ होता. पण शहाणासवरता असूनही वरवर तो वेड्यासारखा वागायचा. त्याच्या विद्वान् पित्याने त्याला प्रयत्नपूर्वक शिकविले. योग्य वयात त्याची मुंज करून त्याच्या वेदाध्ययनाला सुरुवात केली. (5 -7)

आपल्या वडिलांची ही धडपड पाहून तो पुत्र हंसून बोलू लागला, 'बाबा, तुम्ही का हा खटाटोप करता आहात?' त्यावर ते म्हणाले, 'आपल्या वैदिक परंपरेप्रमाणे तू वेदाध्ययन केले पाहिजेस. मग विवाह करून गृहस्थाश्रम केल्यावर मोक्षप्राप्तीसाठी विहित कर्मांचे आचरण करावे. त्यानेच परमपद पावून जन्म सफल होतो.' तेव्हा तो मुलगा सांगू लागला, 'ऐका बाबा! माझे वेदादिक सर्व काही शिकून झाले आहे. सर्व कर्मांचे मी यथासांग आचरण केले आहे. नानाविध भोग मी भोगलेले आहेत. मी राजा झालो, मंत्री झालो, सेवक झालो आणि रयतही झालो. एवढेच नाही तर मनुष्याहून श्रेष्ठ व नीच अशा कित्येक योनींचा मी अनुभव घेतला आहे. मला ते सर्व स्पष्ट आठवते आहे. मी पूर्वीचा योगभ्रष्ट आहे आहे. माझे काहीही कर्तव्य राहिलेले नाही. (न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु कञ्चन। (भ.गीता 3.22) तेव्हां माझ्यासाठी हे श्रम करू नका. मी ज्याला बोध झाला आहे असा बुद्ध आहे. मनाचे सारे मल मी धुऊन टाकले आहेत आणि त्यायोगे माझे वैराग्य बलवान् आहे; कुठल्याही मोहाचा सामना करायला समर्थ आहे. ' (7 -13)

'पूर्वजन्मी मी ब्राह्मण होतो. संतसंगाची कास धरून मी वेदाभ्यास केला. वैराग्य धारण करून मन आणि इंद्रिये बाह्य विषयांपासून आंत खेचून एकाग्र मनाने मी ध्यानाचा अभ्यास केला. पण प्रारब्धयोगाने अभ्यास पूर्ण होण्यापूर्वीच त्यात विघ्न आले आणि मला अकस्मात मृत्यू आला. मात्र पिताजी, पूर्वाभ्यासाच्या बळाने मला विस्मरण झाले नाही! जसे झोपेत विसरलेली विद्या जाग येताच आठवावी तसा माझा योगाभ्यास यथापूर्व स्पष्ट आठवला. आत्मज्ञानाच्या विचारणा, तनुमानसा आणि सत्त्वापत्ती या तीन भूमी ओलांडून मी असंसक्तीच्या पंचम भूमिकेवर आदराने आरूढ झालो हे मला स्पष्ट स्मरले. (योगवासिष्ठांत योगाच्या – ज्ञानाच्या, सात भूमिकांचे वर्णन आहे. *योगभूमिःशुभेच्छाख्या प्रथमा समुदाहृता। विचारणा द्वितीया स्यात्तृतीया तनुमानसा। सत्त्वापत्तिश्चतुर्थी स्यादसंसक्तिस्तु पञ्चमी। पदार्थाभाविनी षष्ठी*

---

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

*सप्तमी तुर्यका स्मृता। आद्यत्रयं जागरितं साधकस्य प्रकीर्तितम्। तुर्या स्वप्नः साधकोऽत्र प्राज्ञैर्ब्रह्मविदुच्यते। निद्रा तु पञ्चमी ब्रह्मविद्वरोऽत्र उच्यते। षष्ठी तु गाढनिद्रा स्याद्वरीयानत्र स स्मृतः। ज्ञेयं परत उत्थानमस्य भावितचेतसः। अन्त्या तुरीयात्र ब्रह्मविद्वरिष्ठो महामतिः। स्वतो वा परतो वाऽस्य व्युत्थानं नैव कर्हिचित्।।* (यो.वा. 3.118.5-6) जन्मजन्मांतरीच्या पुण्याईने जेव्हां जगत नश्वर आहे, विषयोपभोग क्षणिक आणि दुःखमूलक आहेत हे जाणवून जीवात्मा त्यांपासून विरक्त होतो आणि शाश्वत सुखाचा शोध घेऊ लागतो तीच ज्ञानाची प्रथम भूमिका **शुभेच्छा** होय. *बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी.* (संत ज्ञानेश्वर). परमेश्वरप्राप्तीची तळमळ वाढून जेव्हा तो जीव शास्त्रे धुंडाळतो, सत्संग करतो आणि त्याची पुण्यकर्माकडे प्रवृत्ती होते ती दुसरी भूमिका **विचारणा.** अशा रीतीने त्याचा सत्त्वगुण वाढीला लागून तो कर्मसाम्य दशेला येतो तेव्हा सद्गुरूंची भेट होऊन ते त्याला आत्मज्ञानाच्या वाटेवर आणतात आणि तो मुमुक्षूचा साधक होतो हाच **तनुमानसा** या तिसऱ्या भूमीचा आरंभ होय. सद्गुरु आणि ईश्वर यांच्यावर अभेद परम श्रद्धा ठेवून चिकाटीने गुरुदत्त साधन करता करता जेव्हा आत्मसाक्षत्कार होतो तेव्हा तो **सत्त्वापत्ति** ह्या चतुर्थ भूमिकेवर चढतो. पहिल्या तीन भूमिकात साधकाला जगच खरे वाटत असते. आत्मसाक्षात्कारानंतर आत्मस्वरूप खरे आहे हे जाणवून जग स्वप्नवत् भासते. ह्या भूमिकेनंतर साधकाला **ब्रह्मवित्** असे म्हणतात. **असंसक्ति** ह्या पाचव्या भूमिकेत साधकाचा जगाशी संबंध लुप्तप्राय होतो. हिची तुलना निद्रेशी केली आहे. हा साधक बहुंशी आत्ममग्नच असतो. याला **ब्रह्मविद्वर** असे नाव आहे. मधूनमधून भानावर येतो (स्वतो व्यत्थान). पण जगातील घडामोडींचा वा आपण केलेल्या कर्मांचा त्याच्यावर काही परिणाम होत नाही. **पदार्थाभावनी** ह्या सहाव्या भूमीवरील ज्ञानी – ब्रह्मविद्वरीयान, आत्मानुभावात इतका गढून गेलेला असतो की दुसऱ्याच्या प्रयत्नानीच त्याला प्रपंचाचे भान होते. ही गाढ निद्रेसारखी स्थिति असते. **तुर्यका** या चरम सप्तम भूमीला प्राप्त झालेला ब्रह्मविद्वरिष्ठ आत्मानंदात इतका निमग्न झालेला असतो की स्वतःच्या वा इतरांच्या प्रयत्नानीसुध्दा तो जागा होत नाही. पहिल्या अध्यायात अत्रि ऋषींचे वर्णन ब्रह्मविद्वरीयान असे केलेले वाचकांना स्मरत असेलच.) '(14 -17)

तो मुलगा पुढे आपल्या पित्याला सांगतो, 'आता माझ्या सर्व चित्तवृत्ती - मनाचे संकल्प-विकल्प, निमाल्या आहेत आणि मला परम शांतीचा लाभ झाला आहे. वैराग्य पक्के झाले आहे. (*पडिले वळण इंद्रियां सकळां.* (संत तुकाराम). *यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः। इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।। (भ.गीता 2.58)* जेव्हा साधक, कासव आपले अवयव जसे आंत ओढून घेते तद्वत् आपल्या सर्व इन्द्रियांना त्यांच्या त्यांच्या विषयांपासून परावृत्त करतो तेव्हा त्याला स्थितप्रज्ञ म्हणावे.) जे करायचे ते मी केले आहे, मिळवायचे ते मिळवले आहे. आता काही कमवायचे उरले नाही हे मी आपल्या निदर्शनाला आणले आहे. हे आपल्या मुलाचे बोलणे ऐकून पित्याला वैराग्य उत्पन्न झाले. अत्यंत नम्र होऊन तो त्या बालकाला म्हणाला, 'बाळा तू धन्य आहेस! तू आपले कुळ धन्य केलेस. पूर्वजांचा उद्धार केला आहेस. आता मलासुद्धा ह्या शाब्दिक ज्ञानाचा उपदेश कर. मी ह्या संसाराला भ्यालो (उबगलो) आहे. ऐहिक आणि पारलौकिक सुखांचा मी त्याग करीत आहे. ज्ञान आणि वैराग्य यांच्यासहित आत्मानुभूतीरूप विज्ञानच मला हवे आहे. मी तुझा पिता आहे या कारणाने तू मला उपदेश करण्यास कचरू नकोस. कारण मी अज्ञानाने वेष्टित आहे. ***त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसि'*** 'आम्हाला अविद्येतून तारून पैलतीरी पोंचविणारा तूच आमचा पिता आहेस', या वेदवचनानुसार (प्रश्नोपनिषद् 6.8) मीच तुझे पुत्रत्व (शिष्यत्व) स्वीकारतो.' (17 – 23)

यावर पुत्र त्याला म्हणाला, 'श्रीदत्ताच्या उपदेशाने कार्तवीर्य अर्जुनाने योगाभ्यास करून ज्ञान प्राप्त केले. तसाच प्रयत्न तुम्ही करा. पित्याने त्याला विचारले की, 'हा श्रीदत्त कोण, अर्जुन कुणाचा पुत्र, त्याने ज्ञान कसे प्राप्त केले हे सर्व मला तू विस्ताराने सांग' पुत्र म्हणाला, 'या संसारचक्रात अडकून जीवाची दुःखाशी गांठ पडली आहे (दुःखसंयोग). त्या दुःखापासून सोडवण्याचा (वियोग) उपाय म्हणजेच योग. (योगः कर्मसु कौशलम्। कर्मचक्रातून सुटण्याची युक्ति म्हणजे योग. भ.गीता.) दत्तप्रभूंनी हा योगच त्याच्या आठ अंगासहित, कृतवीर्याचा मुलगा अर्जुन याला निरूपिला. ते सर्व मी आता तुला सांगेन. एकाग्रचित्ताने सावधपणे ऐक.' (23 -27)

## कौशिकाख्यान.

पैठण क्षेत्रामध्ये एक कौशिक गोत्राचा ब्राह्मण रहात होता. प्रारब्धयोगाने तो व्यसनाधीन होऊन सदैव वेश्येच्या घरीच राहू लागला. स्वैर आणि अतिरिक्त विषयसेनाने तो कुष्ठाने ग्रस्त झाला. त्याचे बीभत्स रूप पाहून त्या वेश्येने त्याला हाकलून दिले. मग त्याला आपल्या धर्मपत्नीची आठवण झाली आणि तो घरी परतला. अशी ही लोकरहाटी असते हे सूज्ञाने लक्षात ठेवावे. त्याची साध्वी पत्नी त्याला बऱ्याच दिवसांनी घरी येतांना बघून धावतच सामोरी गेली आणि त्याच्या तशा अवस्थेतही त्याच्या पायांना मिठी घातली. पतीचे स्वागत करीत ती म्हणाली, 'आजचा दिवस खरेच शुभ आहे. मला इष्टदेवाचे दर्शन झाले. सोन्याचा पाऊस पडावा तसा आनंदाचा वर्षाव करणारा मेघ जणू दाटून आला आहे.' असे बोलून तिने पतीला उत्तम आसनावर बसविले. त्याची पूजा केली, जिह्वाळ्याने त्याच्या कुष्ठाची मलमपट्टी केली. मग त्याला प्रेमाने स्नान घातले. त्याचे पादोदक सेवन केले आणि अंगावर शिंपून घेतले. उत्तम प्रकारचे अन्न करून त्याला जेवण घातले. त्याची पू आणि रक्त यांनी माखलेली वस्त्रे धुऊन ती त्याला उत्तम वस्त्रे नेसवायची. नित्य त्याचे अंग चेपायची. मंजुळ वाणीने बोलून त्याच्या व्रणावर औषधाचे लेपन करायची. त्याच्या मल-मूत्राची तसेच कफ आणि लाळ यांची स्वच्छता करताना ती कधी कंटाळायची नाही. अशा रीतीने अत्यंत नम्रतेने, आस्थेने, निरलसपणे तिने सेवा करूनही तो पति मात्र तिच्यावर काही ना काही कारणावरून रागावत असे, तिची निर्भर्त्सना करीत असे. रोगजर्जर आणि पराधीन होऊनही त्याचे वेश्येचे चिंतन मात्र सुटले नाही. पत्नीला शिव्या देऊन आपली सेवा करीत नाहीस असे म्हणत असे. वेश्येने अंग चेपल्याने तो प्रसन्न होई पण पत्नीच्या अंग दाबण्याने त्याला त्रास वाटे. पतीचा भाव कसाही असला तरी सतीने मात्र त्याची अनन्य भावाने सेवा करावी. (२८ -39)

एकदा त्या ब्राह्मणाच्या दृष्टीला एक वेश्या पडली. एखाद्या शिकाऱ्याने सावजावर बाण सोडावा तसे त्या वेश्येने आपल्या बिनदोरीच्या भ्रुकुटीरूप धनुष्याने कटाक्षरूपी शराचे संधान करून त्या ब्राह्मणाच्या मनरूपी सावजाला विद्ध केले. वेश्या खरोखर मदनाचा बाणच. त्याने वेधलेला तो ब्राह्मण लाजलज्जा सोडून आपल्या पत्नीला बोलू लागला. 'हे लाडके, तू खरेच धर्म जाणणारी आहेस. म्हणूनच माझे बाणासारखे कठोर आणि तीव्र भाषण सहन करतेस. आता ह्या वेळी माझी एक मनोव्यथा दूर कर. सुखाची इच्छा असणाऱ्याने, आपले दुःख जिवलग मित्र, प्रिय पत्नी, गुणी चाकर किंवा साधूजवळ खरे तसे सांगावे. ही जी घटस्तनी वेश्या चालली आहे तिने दुरूनच आपल्या सौंदर्याने माझे चित्त चोरले आहे. माझा हा देह अशक्त झाला असला तरी मन मात्र अजून विरक्त होत नाही. ह्या गणिकेच्या मोहात माझे मन गुरफटले आहे. ह्याला तूच सोडवू शकतेस. काही करून मला ह्या वेश्येच्या घरी घेऊन जा. त्याविना मी जगेन असे वाटत नाही. तेवढ्यासाठी मी तुझ्याजवळ काकुळतीला आलो आहे. ह्या कामापुढे ब्रह्मादिकांची मतीसुद्धां खुंटली आहे. मी तर बिचारा मंदमति आहे. मी कसा ह्या कामाचा प्रतिकार करू शकेन? ' आपल्या पतीने आपल्याला काही मागितले यानेच त्या सतीच्या मनाला हर्ष झाला. 'ठीक आहे' असे म्हणून ती कंबर कसून उभी राहिली. त्या वेश्येला अनुकूल करण्यासाठी म्हणून तिने काही दागिने काढून पदरात बांधले आणि पतीला खांद्यावर घेऊन ती निघाली. नवऱ्याला त्रास होऊ नये म्हणून ती हळू हळू न कंटाळता चालत होती. एवढ्यांत अंधार झाला. मधून मधून चमकणाऱ्या विजेच्या प्रकाशाने वाटेचा मागोवा घेत धडपडत ती जात होती. तेवढ्यात दैवयोगाने एक मोठेच विघ्न उपस्थित झाले. (39 -51)

## मांडव्य ऋषींचा शाप आणि सूर्याचा गतिरोध.

एका चोराला राजसेवक राजाज्ञेने सुळावर चढवायला नेताना तो चोर पळून गेला. त्याचा पाठलाग करतांना त्यांना त्याच्यासारखाच दिसणारा एक माणूस दिसला. त्यालाच चोर समजून त्या राजदूतांनी सुळावर चढवले आणि ते निघून गेले. सुळावर चढवले गेलेले ते मांडव्य नावाचे ऋषि होते. सुळाच्या वेदना निवारण्यासाठी त्यांनी ध्यान लावले होते. अंधारात पतीला घेऊन जाणाऱ्या त्या सतीला

ते दिसले नाहीत व तिच्या खांद्यावरच्या कौशिकाचा त्यांना धक्का लागला. त्या धक्क्याने मांडव्यमुनींचे ध्यान भंगून ते कासावीस झाले. त्या वेदनांनी त्रस्त होऊन विचार न करता मांडव्य मुनीनी शाप दिला की, 'ज्याच्या धक्क्याने माझे ध्यान मोडले तो सूर्योदय होतांच मृत्यू पावेल.' हा ऋषींचा शाप कानावर पडतांच ती सती विह्वळली. पतीविना जगण्यात काय अर्थ असा विचार करून तिने सूर्यालाच आज्ञा केली की , 'ऐक सूर्या, तू आता उगवायचेच नाहीस. मी जर पतिव्रता स्त्री असेन तर तू उदयाला येताच भस्म होशील. माझे वचन नीट ध्यानात ठेव.' असा सूर्याला शाप देऊन तिने आपल्या पतीला वेश्येच्या घरी नेऊन त्याची इच्छा पूर्ण केली आणि पुन्हा त्याला घेऊन घरी परतली. (52 – 59)

## कामलंपट वृत्तीचा धिक्कार!

कामी पुरुष अविचारी असतात. काय करावे, काय करू नये ह्याचा विचार करीत नाहीत. पापाची पर्वा करीत नाहीत. त्यांच्या वासना कधी शमतच नाहीत. वेश्या ही रूपाच्या इंधनाने भडकलेली कामाची ज्वालाच असते. तिच्या गळां पडून हे कामी लोक आपल्या धनाची आणि यौवनाची राख करून टाकतात. दुर्गंधी व्रणासारख्या योनीचा वीट येत नसेल तर किडे यांच्याहून हीन कसे मानावे? थुंकी, कफ, शेंबूड यांनी भरलेल्या मुखाला हे मूर्ख चंद्राची उपमा देऊन मायेने घट्ट आलिंगन देतात. भरलेले तळे सोडून कावळ्याने मडक्यातील घाण पाणी प्यावे तसे आपली पत्नी अनुकूल असूनही हे नीच परस्त्रीची वांछा धरतात. असा हा ब्राह्मण विषय भोगून रोगी झाला तरीही विषयांना सोडीत नाही. हा त्याचा मूर्खपणाच होय. ही भर्त्सना स्त्रीशरीराची आहे असे कदाचित् वाटण्याची शक्यता आहे. पण ही स्त्रीदेहाची निंदा नसून कामलंपट पुरुषांना त्याविषयी वाटणाऱ्या अनिर्बंध भोगवासनेची आहे. शृंगाररसाला रसराज म्हणून काव्यात स्त्रीच्या शरीराची अफाट स्तुति करणारे कवि त्या शरीराच्या भोग्यत्वाचाच पुरस्कार करीत असतात. त्याचा हा प्रतिषेध आहे, धिक्कार आहे. श्रीस्वामीमहाराजांच्या श्रीनृसिंहवाटिकावर्णनम् या चंपूत (36 -38) त्यांनी हेच अधिक प्रभावीपणे मांडले आहे. त्यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. इथे फक्त 38व्या श्लोकाचा भावार्थ दिला आहे. 'अरेरे, काय ही मूर्खांची (किंवा मूर्खांनी केलेली) फसवणूक आहे? पहा, पहा, सच्छिद्र घड्यासारख्या शेंबूड, मेकूड, कफ इत्यादींनी भरलेल्या, घाणेरड्या पण अलंकारादीनी बाहेरून शृंगारलेल्या तोंडाला डाग नसलेला चंद्र मानणे; मोत्यांनी सजवलेल्या मांसाच्या गोळ्यांना सुवर्णघट म्हणणे? दुभंगलेल्या, मूत्राने भिजलेल्या आणि अपानवायूने धुपवलेल्या, किड्यांच्या वस्तीसारख्या कातडीच्या तुकड्याला मदाच्या रसाने निथळणाऱ्या हत्तीच्या गंडस्थलाची उपमा देणे? हिंस्र प्राण्यांपासून रक्षण्यासाठी कातडीने वेष्टिलेल्या रक्त, मांस, हाडे यांनी घडलेल्या, अगदी अमंगळ अशा, केवळ विवाहादि कार्यापुरती पवित्र मानलेल्या, मी आणि माझे ह्या भावांनी भारलेल्या, आपल्या किंवा दुसऱ्याच्या स्त्रीला, अपार तृप्ती देणारी सुवर्णमूर्ति म्हणणे? केवळ भ्रमाने धर्मपथापासून भ्रष्ट झालेल्या ह्या अधमांचा धिक्कार असो. हर, हर, ही हरीची माया ज्ञानी पुरुषांनाही मोहांत पाडते ह्या (मार्कंडेय) महर्षीच्या वाक्याला ("ज्ञानिनामपि चेतांसि। माया भगवती हि सा।। बलादाकृष्य मोहाय। महामाया प्रयच्छति।।' (सप्तशती 1.55) शतशत प्रणाम !' (60 – 66)

## देवगणांची सती अनसूयेला प्रार्थना.

त्या कौशिकाची साध्वी पत्नी मात्र धन्य होय. सवतीच्या मत्सराने स्त्रिया प्राण देतात. पतीला खांद्यावर वाहून वेश्येच्या घरी घेऊन जाणारी ही पतिव्रता धन्य होय. तिच्या शापाच्या धाकाने सूर्य लपून बसला. सूर्योदयाच्या अभावी सर्वत्र गाढ अंधःकार पसरला. सर्वत्र गोंधळ माजला. मनुष्य, पशु, पक्षी कासावीस झाले. ब्राह्मणांना दिवस, रात्र, सकाळ, संध्याकाळ इत्यादींचा कांहीच अंदाज न आल्याने स्नान-संध्या, भोजनादि नित्यकर्मे थांबली. यज्ञयाग लोपले. यज्ञाच्या हवीवर ज्यांची उपजीविका आहे अशा स्वर्गस्थ देवांना उपवास घडू लागले. ते म्हणू लागले, 'मानव आम्हाला बली देतात व आणि पर्जन्याद्वारे आम्ही त्यांना अन्न देऊन त्यांची तृप्ती करतो. (भ.गीता 3.10-12) आम्ही अन्न देऊनही मानव यज्ञ करीत नसतील तर त्यांना आम्ही अतिवृष्टी, अनावृष्टी, उंदीर, टोळधाड, पोपटादि पक्षी, अंतर्गत बंडाळी आणि परकीय आक्रमण या सात ईतींद्वारा अपसर्ग देऊ शकतो. (अतिवृष्टिरनावृष्टिर्मूषकाः शलभाः शुकाः। स्वचक्रं

परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः।।१।।) पण या वेळी तसे करणे नीतीला धरून होणार नाही. काळाचाच लोप झाल्याने त्यांना यज्ञ करणे शक्य नाही यांत त्यांचा काय दोष? या स्थितीवर उपाय शोधण्यासाठी आतां ब्रह्मदेवांकडेच जावे.' असा विचार करून देवगणांनी सत्यलोकात जाऊन ब्रह्मदेवांना वंदनपूर्वक सर्व स्थिति निवेदन केली. ब्रह्मदेव म्हणाले, 'सतीच्या शापाच्या भयाने सूर्य थरथर कांपत आहे यांत काय आश्चर्य? सूर्यच काय सर्व ब्रह्मांडाचासुद्धा सतीच्या शापाने थरकांप उडेल. आता यावर मला एकच उपाय दिसतो. तेजानेच तेजाचे शमन करायला हवे. सूर्याच्या तेजाने जसे सर्वही दिवे फिके पडतात, तसेच सतीशिरोमणि अनसूयेच्या तेजाने सर्व सती मंदावतात. तेव्हां त्या महामना अनसूयेला विनवून तुम्ही तिला पैठणला घेऊन चला. अनसूयाच त्या कौशिकपत्नीची समजून घालून तुमचे हे संकट दूर करू शकते. इतर कुणी नाही. देवांनी ब्रह्मदेवांनाही आपल्याबरोबर येण्याची विनंति केली. मग ते सर्व अत्रि आणि अनसूयेच्या आश्रमाला आले. उभयतांनी सर्व देवांचे अत्यंत विनम्रतेने यथायोग्य पूजन केले. त्यांचे कुशल विचारले. यावर सर्व देवांनी अनसूयेला नमस्कार केला आणि विनयपूर्वक बोलू लागले. 'हे साध्वी तुझी कीर्ति ऐकून, तुझ्या चरणी भाव ठेवून आम्ही आलो आहोत. कौशिकाच्या सतीच्या शापाने सूर्याचा लोप झाला आहे. त्याने पृथ्वीवरील सर्व कर्ममार्ग बंद झाला आहे. सर्व जगतात अनर्थ झाला आहे. आता तूच प्रसन्न होऊन त्या सतीचे समाधान कर आणि सूर्याचा उदय घडव. तुझ्याशिवाय इतर कुणाचेही एवढे तप नाही.' यावर अनसूया म्हणाली, 'आपण सर्व देव आहात, लोकपाल आहात! आपण माझ्याकडे धाव घेतली याचे फारच नवल वाटते. असो. चला आपण पैठणला जाऊन त्या सतीची युक्तिप्रयुक्तीने समजूत घालू या,' असे बोलून अनसूया पतीसह निघाली. देवांना आनंद झाला आणि ते सर्व पैठणला कौशिकाच्या घरी आले. (67 -87)

## पतिव्रताधर्मनिरूपण.

त्यांना पाहून कौशिकस्त्रीने पुढे येऊन अनसूयेला आलिंगन दिले आणि घरात नेऊन तिचा सत्कार केला. तिच्या क्षेमकुशलाची चौकशी केली. अनसूया म्हणाली, 'हे साध्वी, तुझी वाणी किती गोड आहे. जगातील सतींची कीर्ति मधुर आहे. सतीला पति देवाहून अधिक श्रेष्ठ आहे. त्याचे मुख पाहतांच ब्रह्मानंदाहून अधिक सुख वाटते ते कसे बोलून दाखविता येईल? काया, वाचा आणि मन यांनी पतिचे सेवन करणारी सती स्वतः तर पवित्र होतेच पण इतरांनाही पावन करते. यामुळेच पतिव्रता नारी ही तीर्थासमान आहे असे स्मृतिकारांनी म्हटले आहे. पतीच्या सेवेनेच स्त्री सर्वही (देव, ऋषि आणि पितर यांच्या) ऋणांपासून मुक्त होते. धर्म, अर्थ आणि काम हे पुरुषार्थ स्त्रीला पतिसेवनानेच प्राप्त होतात. तिला काळाचीही भीति रहात नाही. तिला कसलेच कष्ट रहात नाहीत. पतिव्रताधर्माचे पालन कष्टदायक मानून पतिसेवेचा कंटाळा करणाऱ्या स्त्रीला मात्र घोर यातनांना सामोरे जावे लागते. मनासारखी साडी मिळाली नाही तर जी माहेरी जाऊन तक्रार करते, आवडीचे दागिने मिलाले नाहीत तर पतीसमोर आकांडतांडव करते तिचीही तीच गति होते. चांगले-चुंगले खायला-प्यायला मिळणे, आपल्या आवडीचे कपडे, अलंकार मिळणे यांनी काय कल्याण होणार? इहजन्मात आणि परलोकातही त्यांचा सोस दोषदायकच ठरतो. त्यांचा वीट मानणारी सतीच धन्य होय. आपला नवरा जसा असेल तसा स्वीकारून त्याच्यावर प्रेम करणाऱ्या स्त्रीला पतीसह पतिलोकात उत्तम गति मिळते. स्त्रियांना यावेगळा धर्म नाही. पतीच्या धर्माचा तिला अर्धा वाटा मिळतो. (परंतु पतीने केलेल्या पापाचा दोष तिला मुळीच स्पर्शत नाही. तिच्या पुण्यात पतीचा वाटा नसतो पण पापात मात्र असतो.) एवढ्यासाठी हे पतिव्रते, तू पतीची नित्य सेवा कर म्हणजे ऐहिक आणि पारत्रिक सुखे तुला प्राप्त होतील. ह्या पातिव्रत्याच्या प्रभावानेच मीही माझा आत्मा पवित्र करून घेतला आहे. त्यामुळेच माझे मन सदैव पतिचरणीच समाधान पावते. पती हेच माझे परब्रह्म आहे. आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक तापांसह सर्व संसाराचे ओझे उतरणाऱ्या पतीवांचून मला दुसरे काही आठवतच नाही.' (88 – 101)

अनसूयेचे हे बोलणे ऐकून कौशिकसती प्रसन्न झाली. दोन्ही हात जोडून ती लाघवीपणाने बोलू लागली. 'हे अत्रिप्रिये, पतिव्रते, अनसूये, तू धन्य आहेस. वेदांनीही स्तविलेली तू प्रत्यक्ष महामायाच

आहेस. मला धर्म, कर्म वा वर्म कांही कळत नाही. सुखाचे कारणही मी जाणत नाही. पतीच्या सेवेची मात्र मला आवड आहे. आणि त्यालाच तू उत्तेजन दिलेस. प्राणाचे प्राण असणाऱ्या आणि पूर्णाधार पतीवाचून आपल्याला दुसरे काय दैवत आहे? जिची तप करूनही भेट होणे अशक्य आहे अशी तू प्रत्यक्ष येऊन माझ्या गळां पडलीस, मला पोटाशी धरून माझी विचारपूस केलीस, माझी खिन्नता दूर केलीस त्याचा मला खूपच आनंद झाला आहे. हे नक्कीच माझ्या पतिसेवेचेच फळ आहे असे मी मानते. देवांसह तुम्हा दोघांचे दर्शन झाले. आमचे घर पवित्र झाले. आज मोठाच भाग्याचा दिवस आहे. हे माते, तू तर पूर्णकाम आहेस. केवळ संकल्पानेच तुझ्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तथापि तुम्ही आम्हां पामरांकडे येणे का केले असा प्रश्न मला पडला आहे. थोडी विश्रांति घेऊन माझ्या या प्रश्नाचे उत्तर दे.'

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा दुसरा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो. श्रीगुरुदेव दत्त!

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय 3 रा.

**सूर्योदय करवितां। कौशिका मृत्यू येतां। अनसूया करी जिता। स्तविती देवता अनसूयेसी।।८।। वसुधेश्वरें मांडव्या सोडिला। त्रिमूर्ति दत्त अवतरला। नानापरी करी लीला। तृतीयाध्यायी हे कथा।।९।।**

## अनसूयेची विनवणी.

पुढे गुरुदेव वेदधर्मा शिष्य संदीपकाला सांगू लागले, सतीचा लाघवी प्रश्न ऐकून अनसूया देवांकडे पहात सतीला म्हणाली, 'हे सर्व देव तुझ्या घरी आले आहेत ते सूर्योदय व्हावा याच एका हेतूने! हीच त्यांची विनवणी आहे आणि माझेही हेच मानस आहे. सूर्य न दिसल्याने कालगतीचा उच्छेद झाला आहे. कालाच्या अभावी कर्मांचा लोप झाला आहे. कर्मांच्या लोपाने तिन्ही लोकांचे स्थैर्य साहजिकच डळमळले आहे. तेव्हा हे सती, हा सर्व अनर्थ कशासाठी करायचा? तरी तुझा हा दुराग्रह तू सोड. परोपकारासाठी देहही गेला तरी त्याचा त्याग करावा.'

तेव्हा सती उत्तरली, 'ऐक.माते अनसूये! हा कसला विवेक (शहाणपण) मला सांगतेस? असे झाले तर मोठाच अनर्थ होईल, माझ्यावर दुखाचा पहाडच कोसळेल! मांडव्य मुनींच्या घोर शापाने सूर्योदय होताच माझा केवळ प्राणच असलेला माझा पति मरण पावेल. हे किती दुर्धर आहे हे तुला काय सांगूं?'

तेव्हां अनसूयेने तिला समजाविले, 'हे सूज्ञ सती, जर तुझ्या पतीला मृत्यू आला तर मी तात्काळ त्याला वांचवीन. त्याची तू काळजीच करू नकोस, एवढेच नाही तर तुझा पति पूर्ण निरोगी होऊन उठेल. ह्याविषयी तू मनांत मुळीच शंका ठेवू नकोस. दुःखाचा विचारसुद्धा मनातून काढून टाक. मी तुला त्रिवार वचन देते! ' हे अनसूयेचे बोलणे सतीला पटले व 'तथास्तु,' असे म्हणून त्या सतीने सूर्याला हात जोडले व म्हणाली, 'हे तेजोराशी भास्करा, तू सर्वसमर्थ असूनही मर्यादा ओलांडीत नाहीस. माझ्या वाक्याचा मान तू राखलास! माझे वचन मी आता परत घेते. तू आता त्वरित उदयाला ये.' सतीने हे वाक्य उच्चारताक्षणी आदित्याचा उदय झाला. ज्या सतीच्या वाक्याने सूर्य लोपला होता त्याच सतीच्या वचनाने उगवून त्याने त्रिभुवन सुखी केले. खूप दिवसांनी परदेशी गेलेला पति आलेला पाहून जशी पत्नी खुलते तशा कमळिणी विकसल्या. (1 -11)

## सूर्योदय आणि अनसूयेला देवांचे वरदान.

सूर्याने उदयाला येताच दोन गोष्टी केल्या. अंधाराचा समूळ नाश केला आणि त्याच वेळी त्या कौशिक ब्राह्मणाचे प्राणही शोषून टाकले. त्या वेळी त्या सतीचा कोमेजलेला चेहरा पाहून अनसूया गंभीरपणे तिला म्हणाली, 'भिऊ नकोस, माझे वचन लक्षात ठेवून सावध हो.' आणि तिने पुढील संकल्प केला, 'जर मी अनन्य भक्तिभावाने पतिसेवेत देह झिजवला असेल, तन-मन-वाणीने धर्मानुसार पतीची सेवा केली असेल, पतीवांचून अन्य दैवत स्वप्नातही न आणता पातिव्रत्यधर्माचे यथार्थ निरंतर पालन केले असेल तर त्या धर्माच्या प्रभावाने ह्या (कौशिक) ब्राह्मणाला पुर्जीवन प्राप्त होवो, त्याला पूर्ण आरोग्य लाभून तो शंभर वर्षे जगो. जेथे

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

कुठे ह्याचे मन गेले असेल त्याचे पुनरावर्तन होऊन 'असुनीता' (प्राणाची नियंत्रक देवता. प्राणप्रतिष्ठेच्या वेळी हिचे ध्यान व आवाहन केले जाते.) ह्याला जीवन देवो.' 'मनोन्वाहुमह' या ऋचेचा (ऋग्वेद ८।१।१९।९७) संदर्भ आहे. अभिचाराने मृत झालेल्या सुबंधूला पुनः जीवित करण्यासाठी त्याचे बांधव ह्या मंत्राने हवन करतात अशी गोष्ट आहे. ह्यावरून जीवाचे गमनागमन हे मनाचे गुणधर्म आहेत, आत्म्याचे नाहीत, असे यांतून सूचित होते. अनसूयेने ह्या संकल्पाचा उच्चार करताच तो कौशिक ब्राह्मण सजीव होऊन स्वतः उठून बसला. ते पाहून त्याच्या पत्नीला हर्ष झाला. तो अंतर्बाह्य पालटून गेला होता. तो सर्वांना देवाप्रमाणेच भासला. सर्वांनाच आनंद झाला. देवगण पुष्पवृष्टी करू लागले; अप्सरा आनंदाने नाचू लागल्या; गंधर्व प्रेमभराने गाऊ लागले. सर्वही अनसूयेची स्तुति करून लागले. 'हे वेदांनी स्तविलेल्या, पतिव्रतांमध्ये श्रेष्ठ अशा अत्रिपत्नी, स्वधर्म हेच तुझे शौर्य आहे. पतीची उत्तम प्रकारे सेवा करणारी तू आहेस. सतीच्या शापाने पीडित सूर्याला मुक्त करून तू त्याचे जगाला दर्शन घडविलेस. नित्य धैर्यशील माते, तुला आमचा नमस्कार!' पुढे ते ब्रह्मादि देवगण अनसूयेला म्हणाले, 'तू हे अघटित – अशक्यप्राय असे कार्य करून विश्वाचे संरक्षण केले आहेस. आमच्या पदरी हे महान यश तू टाकलेस. आम्ही तुझ्यावर प्रसन्न आहोत. तुला हवा तो वर आमच्याकडून मागून घे.' यावर अनसूयेने सर्व देवांना नमस्कार केला आणि म्हणाली, 'स्वधर्माच्या पालनानेच मी खरोखर कृतार्थ आहे. आणखी काय मागावयाचे? जर तुम्हाला वर द्यायचाच असेल तर हेच मागते की सदैव पतियोग (अखंड सौभाग्य) असावा आणि ब्रह्मा विष्णु आणि महेश हे माझे पुत्र व्हावेत. ह्यापेक्षा वेगळी माझी ऐहिक वा पारत्रिक कांहीच इच्छा नाही. इतर कशाचीही अभिलाषा माझे मन करीत नाही.' तेव्हा सर्व देवगण एकमुखाने म्हणाले, 'हे अनसूये, तुला हा वर दिला. तू मनात खात्री बाळग की ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर हे तीनही सुरश्रेष्ठ तुझे पुत्र होऊन जगाचा उद्धार करतील.' असा वर देऊन आणि अनसूयेचा निरोप घेऊन देवगण स्वर्गाला गेले. तसेच अनसूया अत्रीसह आपल्या आश्रमाला परतली. (11 -29)

## मांडव्य ऋषींचा यमधर्माला शाप

इकडे त्या राजाला आपली चूक लक्षात येऊन त्याने मांडव्य ऋषींना सुळावरून काढले आणि मुक्त केले. त्यांची नम्र शब्दांनी क्षमा मागितली. राजाला अभय देऊन मांडव्य ऋषि थेट यमधर्माच्या घरी गेले. त्याला त्यांनी विचारले, 'पृथ्वीवर जो राजा (शासक) होतो तो दिक्पालांच्या अंशाने होतो. तेव्हा तो जी शिक्षा देतो तिची पूर्ण जबाबदारी दिक्पालाची म्हणजे तुझी आहे. तर मला ताबडतोब सांग, मला सुळावर का चढविलेस?' (ह्या मांडव्य ऋषींच्या विवेकावरून आपण बरेच शिकण्यासारखे आहे. लौकिक राजाच्या शिक्षेमागे, दिक्पालांची प्रेरणा आहे हे ज्ञान त्यांना होते. म्हणून त्या राजाला शाप न देता ते सरळ यमधर्माकडे गेले. दिक्पालादि देवताच मानवाला चांगले-वाईट भोग देतात. लौकिक दृष्ट्या त्याचे निमित्त कांहीही किंवा कुणीही असो त्या सुख-दुखांचे मूळ देवताच असतात. ह्या देवता परमेश्वराच्या विधानानुसारच मानवाला त्याच्याच कर्माची फळे देत असतात. ज्याप्रमाणे न्यायाधीशाने सुनावलेली शिक्षा पोलीस देतात, त्यांत त्यांचा वैयक्तिक हेवादावा कांही नसतो. ईश्वर न्यायाधीशाप्रमाणे त्या त्या जीवाच्या कर्मानुसार त्याला शुभाशुभ फळे देतो. त्यामुळे त्याच्यावर वैषम्य (पक्षपात) किंवा नैर्घृण्य (दुष्टता) यांचा आरोप करतां येत नाही. हेच यमधर्माच्या उत्तरात स्पष्ट होते.)

यमधर्माने उत्तर दिले, 'आपण कुमारावस्थेत असतांना सहज गंमतीने एका पांखराला कांट्याने वेधले. त्या पापाचा परिपाक म्हणून हे शूलारोहण आहे.' मांडव्य ऋषी म्हणाले, 'हा तर अविवेकाचा कहरच झाला! कुमारावस्थेतील कर्माचे पाप तो कर्ता अज्ञानी असल्याने पित्याला लागते. ह्या तुझ्या अधर्माची शिक्षा तुला व्हायला पाहिजे! त्यासाठी तू (द्वापरयुगात) दासीच्या पोटी जन्म घेशील.' त्याप्रमाणे यमाला विदुर म्हणून जन्म घ्यावा लागला. तेवढा काळ यमाच्या जागी पितरांचा अधिपति अर्यमा याने त्याचा दंड (अधिकार) धारण केला. (30 – 34)

## श्रीदत्तजन्म.

गुरु वेदधर्मा आपल्या शिष्याला – दीपकाला म्हणतात, 'ते असो. आता पुढे ऐक. ब्रह्मा-विष्णु-महेश हे त्रिमूर्ति देवगणांच्या वरदानाला मान देऊन सती अनसूयेच्या उदरी गर्भरूपाने वाढू लागले. पहा कशी मौज आहे. ज्यांच्या स्मरणाने संसारपाशातून मुक्ति मिळते व जे जन्ममरणादि विकारातीत आहेत तेच आपली भक्तपराधीनता प्रकट करण्यासाठी गर्भवास सोसत आहेत. अनसूयेला त्या महान गर्भाचा संकेत देणारे उत्तम डोहाळे होऊ लागले. उत्तम ब्रह्मज्ञानाते निरूपण ती करू लागली. अशा रीतीने नऊ महिने गेले. अत्रिमहर्षींनी यथाकाल ब्राह्मणत्वाला उचित असे पुंसवनादि संस्कार केले. याप्रमाणे मार्गशीर्ष पौर्णिमेस, बुधवारी, शुभदिनी, संध्याकाळच्या वेळी मृग नक्षत्रावर अनसूयेला तीन बाळे झाली. ' (35 - 37)

## अत्रि-अनसूयेला झालेले दत्तदर्शन.

जेव्हा पुत्रमुख बघण्यासाठी अत्रमुनि आले तेव्हां त्यांना त्या ठिकाणी त्रयमूर्तीचे दर्शन झाले आणि ते विस्मित झाले. खालील दोन हातात माला आणि कमंडलु, मधल्या दोन करात डमरू आणि त्रिशूल तसेच वरच्या हातात शंख आणि चक्र धारण केलेला भक्तकैवारी त्रिमूर्ति त्यांनी पाहिला. (मालाकमंडलुरधःकरपद्मयुग्मे। मध्यस्थपाणियुगुले डमरूत्रिशूले।। यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे। वन्दे तमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम्।।1।।) भगवे वस्त्र परिधान केलेले, सर्वांगांवर भस्म चर्चिलेले, मस्तकावर जटाभार धरलेले ते जणू मूर्तिमंत वात्सल्यरसायन असे दिव्य रूप पाहून अत्रि आणि अनसूया सद्गदित झाले. त्याला वंदन करून हात जोडून ते उत्स्फूर्तपणे दाटलेल्या गळ्याने स्तवन करू लागले. 'हे श्रेष्ठांहून श्रेष्ठ, जन्ममरणादि विकारांनी रहित, ह्या जगताचे एकच निमित्त आणि उपादान कारण (जसे घटाचे निमित्त कारण कुंभार तर उपादान कारण मृत्तिका असते), त्याचा आधार म्हणजेच जगदाभासाचे अधिष्ठान), त्रिकालाबाधित सत्य, अलिप्त आणि उदासीन'भगवंता, अवकाशासहित कोट्यवधी ब्रह्मांडे ज्याच्या पोटांत परिभ्रमण करतात तो तू व्यापक परमात्मा आमच्या पोटी आलास असे म्हणणे मिथ्या आहे. विश्वाच्या निर्मितीपूर्वी तू एकच सत्य होतास, स्थितीकाळीही तू असत्य नव्हतास आणि प्रलयाच्या वेळीही तुझा बाध होत नसल्याने तू सत्यच असतोस, हे तुझेच वचन असत्य कसे होईल? भक्तसंरक्षक, भक्तकामकल्पद्रुम, भक्तकैवारी इत्यादि तुझ्या बिरुदावळीची तू बूज राखण्यासाठी वासनांची वने जाळून भक्ताचा सांभाळ करतोस. भक्तांच्या कार्यात मुळीच आळस करीत नाहीस. सर्वतंत्रस्वतंत्र असा तू केवळ भावाच्या भुकेने भक्तपराधीन होतोस. एखाद्या यंत्राने बांधल्यासारखे ह्या विश्वचक्राचे तू परिभ्रमण करतोस. तुझा मंत्र कोण जाणील? ह्या आपल्या रूपाला आमचा पुत्र म्हणणे हे खरोखर विडबनच ठरेल. तरी हे भगवंता आपण बालरूप धारण करून रहाल तर आम्हांला आनंद वाटेल. पुत्रभावाने आपले

कोडकौतुक करीत आमच्या बुद्धीवरील मायेचे आवरण नष्ट होईल.' असे बोलून त्या महान ऋषिदंपतीने भगवंताचे चरण धरले, (38 - 49)

त्या वेळी दत्तप्रभू त्या दंपतीला पूर्वीचे स्मरण देत म्हणाले, 'तुम्ही पूर्वी कूलाचल (ऋक्ष) पर्वतावर तप केले. त्या तपाने प्रसन्न होऊन आम्ही तीन रूपानी दर्शन दिले. तेव्हा तुम्ही विचारले की, "मी एकाच परमात्म्याचे ध्यान करीत असता आपण तिघे कसे आलात." त्या वेळी आम्ही तिघेही एकरूपच असल्याचे सांगितले. (ही श्रीदत्तात्रेयांच्या अत्रिवरद या तृतीय अवताराची कथा षोडशावतारचरित्रात सविस्तर आली आहे.) त्यानंतर पुन्हा आम्ही तिघे, आमच्या शक्तींच्या आग्रहाने अनसूयेचे सत्त्व हरण करावयास अतिथिवेषाने आलो आणि तिला नग्न होऊन भिक्षा वाढायला सांगितले. तिच्या पातिव्रत्याच्या प्रभावाने आम्ही बालके झालो. त्या वेळी आमच्या शक्ती सावित्री, लक्ष्मी आणि पार्वती अनसूयेला शरण आल्या आणि आम्हाला घेऊन परत गेल्या. जातांना हा पाळणा रिता राहू नये असा वर तुम्ही दोघांनी आमच्याकडून मागून घेतला. पुनश्च तसाच वर कौशिक सतीच्या शापापासून सूर्याला सोडवल्यावर देवगणांनी तुम्हाला दिला. ते सर्व खरे करण्यासाठी, तुम्हाला त्याचे स्मरण करून देण्यासाठी तसेच लोकांत भक्तीची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी हे दिव्य रूप दाखविले. तुमचा भक्तिभाव पाहून मी माझे स्वतःचे दान तुम्हाला दिले आहे. मी सदैव तुमच्या स्वाधीन राहीन हे माझे त्रिवार वचन घ्या. माझे दर्शन कधीच निष्फळ होत नाही. ते तात्काल उत्तम गति प्राप्त करून देते.' असे बोलून तो विश्वनाटकी घननीळ तीन बालके होऊन राहिला. (50 -57)

## श्रीदत्तप्रभूंचे बालपण.

नंतर अत्रिमुनींनी स्नान करून जातकर्म केले. त्या वेळी जमलेल्या सर्व ऋषींनी जयजयकार केला. देवांनी आकाशातून पुष्पवृष्टी केली. त्या परात्पर मूळ पुरुषाचा अवतार होताच सर्व जग आनंदाने मोहरून गेले. मंद व सुखद वारा वाहू लागला, वांझ वृक्षांनाही फळे आली, वंध्या स्त्रियांना बाळे झाली, दुष्काळ पळून गेला. धन्य ती अनसूया माता जिने विधि-हरि-हर या त्रिमूर्तीला पुत्र केले, जिचे दुग्धपान करून ह्या विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयकर्त्यांना तृप्तीचा अनुभव आला. मग बाराव्या दिवशी अत्रिमुनींनी नामकरण विधि करून तिन्ही बाळांची अर्थाला अनुसरून नावे ठेवली. आत्मदान करणाऱ्या भगवान विष्णूंचे नांव त्यांनी 'दत्त' – ज्याने स्वतःलाच देऊन टाकले आहे, असे ठेवले. सर्वांना आल्हाद देणारा या अर्थाने ब्रह्मदेवांच्या अंशाला 'चंद्र' हे नांव दिले. रुद्राच्या अंशाला त्याच्या उग्रतेला साजेसे 'दुर्वास' असे नांव दिले. मग अनसूया बाळाला पाळण्यात घालून अंगाईगीते गाऊ लागली. (58 – 64)

इथे अनसूयामातेच्या मुखात श्रीस्वामिमहाराजांनी दोन पाळणे घातले आहेत. त्यांची गेयता, माधुर्य आणि रसवत्ता त्यांच्या गायनाने आणि श्रवणानेच समजणारी आहे. पहिला पाळणा भक्तिरसपूर्ण आहे. त्यांत दत्तावताराच्या लीलांचे निर्देश आहेत. दुसऱ्या पाळण्यांत वेदांतसार रूपकातून सांगितले आहे. 'हे श्रेष्ठांहूनही श्रेष्ठ अशा भगवंता, तूच सह्याद्रीवर राहणारा अत्रिसुत म्हणून अनसूयेच्या उदरी प्रकट झाला आहेस. हे भक्तांच्या माहेरा, जगाच्या उद्धारकर्त्या, उदारा, तू आपल्या भक्तांना तारणार आहेस. मी तुला जोजवते आहे. प्रल्हादाला विज्ञान (अपरोक्ष ज्ञान) देणाऱ्या, शरणागत (कार्तवीर्य) अर्जुनाला प्रथम सिद्धी देऊन मग त्याचा उद्धार करून आपल्या पदी ठाव देणाऱ्या, अलर्क आणि यदूच्या तारणकर्त्या भक्तांच्या माहेरा, मी तुला जोजवते आहे.'

दुसऱ्या पाळण्यात जीवरूपाने संसारांत सांपडलेल्या परमात्म्याचे वर्णन आहे. चार प्रकारच्या (उद्भिज, स्वेदज, जारज, अंडज) जीवांच्या खाणी ह्या चार बाजू असलेला हा विश्वरूपी पाळणा बनवून तो चोवीस तत्त्वांनी (पंच महाभूते, पंच ज्ञानेन्द्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंच प्राण आणि अंतःकरणचतुष्टय – मन, बुद्धि, चित्त आणि अहंकार ही चोवीस तत्त्वे. ह्या सगळ्यांचा मिळून पंचकोशात्मक देह होतो.) घट्ट आंवळला आहे. असा हा पाळणा सत्त्व, रज आणि तम ह्या तीन गुणांच्या तीनपदरी दोरीने मायास्तंतभाला बांधला आहेस. त्याला कर्मसूत्राच्या दोरीने उगीचच चौऱ्यांशी लक्ष योनीतून जन्ममरणरूपी झोके घेत आहेस. आता ही चळवळ टाकून दे आणि श्रुतिमाउलीची महावाक्यात्मक अंगाई ऐक. (मी ब्रह्म आहे, ते तू आहेस, प्रज्ञान ब्रह्म आहे, हे सर्वच खरोखर ब्रह्म आहे, अशा अर्थाची ही महावाक्ये आहेत.) त्यायोगे तुला आत्मानुभवाची उन्मनी झोप लागेल. तुझ्या विश्वात्मक, व्यापक, सर्वसामर्थ्यशील स्वरूपात तू विसावशील. जो जो रे जो जो! (65 - ६९).

विश्वाची उत्पत्ती, स्थिति आणि संहार करणाऱ्या त्या बालांना निजवून ती अनसूया सती पाळण्यांत घालून वरचेवर जोजवत आहे. या भक्तीची थोरवी किती म्हणून गावी? त्रैलोक्याचे स्वामी भूक लागली म्हणून तिच्यापुढे आक्रंदत आहेत. त्यांची खरी भूक भावाची आहे. दोघांना दोन स्तनांना लावायची तर तिसऱ्याला ती लाघवी अनसूया कृपाकूर्मदृष्टीनेच पोसायची. (कासवी आपल्या पिलांचे केवळ दृष्टीद्वाराच पोषण करते असे मानतात.) मोठमोठ्या यज्ञयागांनी ज्यांची अजूनही तृप्ती होत नाही ते अनसूयेचे स्तनपान करून तृप्तीची ढेकर देत आहेत. खरोखर या अनसूयेच्या भक्तीचे फल अनिर्वचनीय आहे. क्षुद्र ऐहिक भोगांना भक्तीची फळे कधीच म्हणता येणार नाही. सायुज्य मुक्ति ही तिच्या लेखी केवळ एक अवांतर स्थिति आहे. निःसीम प्रेम हे फळ मानावे तर लालनादिकांचे काय फळ सांगतां येईल? पितृकुलाचा उद्धार झाला असे म्हणावे तर पिता ब्रह्मदेव आणि पितामह विष्णूच बाळ झाले आहेत. तेव्हा आता तो विचारच सोडावा. तो महान भगवंतच त्याची लीला जाणे! (70 – 76)

अशा रीतीने ते तिघेही मोठे झाले. तेव्हा चंद्राने आपल्या आईवडिलांना वंदन करून चंद्रमंडलांत जाऊन राहण्यासाठी त्यांची आज्ञा घेतली. तिथे राहून तो आजही भूलोकावरील वनस्पतींची पुष्टि आणि जीवमात्रांची वंशवृद्धि करतो आहे. मनस्वी दुर्वास मुनि स्वच्छंद संचार करून उन्मार्गगामी लोकांना सन्मार्गावर आणण्याचे कार्य करीत आहेत. अशा रीतीने दोघे पुत्र निघून गेल्यावर अनसूयामाता थोडी उदास झाली. त्या वेळी लहानगा श्रीदत्त तिच्या पुढ्यात येऊन उभा राहिला आणि त्याने तिला पूर्वीचे स्मरण करून दिले. तेव्हां तिला पूर्वी पाहिलेले त्रिमूर्तिरूप दिसू लागले. त्या दर्शनाने ती विस्मित होते न होते तोंच तिला त्या दत्तरूपात सर्व विश्व सामावलेले दिसू लागले. आश्चर्याने ते विश्वरूप ती आपल्या डोळ्यांत सांठवू लागली तोंच पुनश्च तिला मांडीवर बाल दत्त बसून स्तनपान मागतो आहे असे दिसले. मुक्याला वाचाळ करणारा (मूकं करोति वाचालं) दत्त तिच्याशी बोबडे बोल बोलू लागला. पांगळ्याला चालविणारा प्रभू (पंगुं लंघयते गिरिम्) तिच्याकडे अडखळत येऊन तिच्या गळां पडत होता. अशा बाललीला दाखवून बाळदत्ताने आपल्या मातेचा शोक दूर केला. शेजारपाजारच्या आश्रमांतील मुनींच्या बालकांना जमवून त्याने खेळ मांडावे. त्या खेळांत इतके गुंगून जावे की अनसूयेने जेवायला बोलावले तरीही येऊ नये. आई त्याला धरायला जाई. पण योग्यांनाही न गंवसणारा तो प्रभू तिच्या कसा हाती लागणार? शेवटी तिची दमणूक पाहून त्याने स्वतःच तिच्या हाती जावे. अनंत कोटी ब्रह्मांडाना उदरात सांठवणाऱ्या त्या परमात्म्याला अनसूयेने कडेवर घ्यावे.

न्हाऊं घालून घरात बसवावे. लगेच दत्ताने सगळ्या अंगाला माती फासून घ्यावी. अशा अनेक लीला करून त्या निःसंग प्रभूने आपल्या मातापित्यांना वात्सल्यसुखाचा आनंद भरभरून दिला आणि जगाला आपली भक्तवशता दाखवून दिली. (76 – 89)

## श्रीदत्तांच्या अतर्क्य लीला.

दत्तप्रभूंना आठ वर्षे पूर्ण होताच अत्रिमुनींनी त्यांचा व्रतबंध केला आणि वेदविद्येचा बोध केला. सर्व शास्त्रांचे उत्पत्तिस्थान असलेल्या प्रभूंची लीला कोण जाणू शकतो? दत्तात्रेयांनी कौपीनादिकांचा त्याग केला आणि ते नग्नावस्थेत स्मशानात जाऊन नासाग्रदृष्टी लावून ध्यानस्थ झाले. त्या वेळी तेथे पिंगल नाग आणि साध्यदेव आले. त्यांनी दत्ताची कोणत्याही आश्रमाशी सुसंगत नसलेली वामनमूर्ति पाहून गर्वानेच त्यांना प्रश्न केला की, 'तुमचा आश्रम कोणता?' त्या वेळी दत्तप्रभूंनी 'हा माझा पंचमाश्रम आहे,' असे सांगून आपले त्रिगुणातीत अवधूतरूप प्रकट केले आणि त्यांना योगसहित आत्मज्ञानाचा उपदेश केला. त्या दिवसापासून दुर्जनांना शिक्षा करणारा, सज्जनांचे पालन करणारा योगमार्गप्रवर्तक अशी श्रीदत्तांची सर्वत्र प्रसिद्धी झाली. त्यामुळे ठिकठिकाणाहून मुनींचे बालक त्यांचा उपदेश घेण्यासाठी येऊ लागले. (89 – 94)

हे जाणून विश्वचालक दत्तप्रभूंनी त्यांची परीक्षा पहायचे ठरविले. ते अगाध जलात बुडी मारून दीर्घ काळ तिथेच राहिले. तेव्हा घाबरून जाऊन कित्येक मुनिबालक पळून गेले. तरीही बरेच बालक शंभर वर्षांपर्यंत त्यांची प्रतीक्षा करीत थांबले. त्यांनासुद्धा मोहवून परीक्षा पहाण्यासाठी दत्तप्रभूंनी वेगळाच खेळ मांडला. एक नग्न स्त्री घेऊन, आपणही नग्न होऊन तिला मांडीवर घेऊन तिच्यासह क्रीडा करू लागला. ती स्त्री दुसरी कोणी नसून भगवंताच्या आश्रयानेच राहणारी, भगवंतच जिचा विषय आहेत अशी पराशक्ति आदिमाया होती. ती अनघा दत्ताच्या मांडीवर बसून वाद्ये वाजवीत गायन करू लागली. तिच्यासह मद्यमांस सेवन करून तिचे उच्छिष्ट दत्तप्रभूंनी घेतले आणि आपले उच्छिष्ट तिला दिले. तिच्यासह वीर्यचर्वणादि बीभत्स क्रीडा आरंभिल्या. हे पाहून आणखी खूपसे विद्यार्थी पळून गेले. 'ज्याप्रमाणे अग्नीत पडलेले अमंगळ पदार्थही तो जाळून टाकतो. त्याला त्यांची अमंगलता स्पर्शत नाही, त्याचप्रमाणे व्यापक, सर्वसमर्थ परमात्म्याला आणि ज्ञानी पुरुषांना त्यांच्या तेजस्वितेमुळे दोष स्पर्शत नाही.' असा विचार करून जे थांबले त्यांच्यावर मात्र दत्तप्रभू प्रसन्न झाले आणि त्यांना मात्र सविशेष योगाचा उपदेश केला, ज्यायोगे त्यांचे ऐहिक आणि आमुष्मिक कल्याण झाले. (95 – 100).

ईश्वराने साहस केले आणि धर्माच्या विरुद्ध आचरण केले तर त्याच्या तेजस्वितेमुळे त्याला दोष स्पर्शत नाही. पण ईश्वरी सामर्थ्य नसतांना जे मूर्ख तोक एवढाच गुण घेतात ते तात्काळ नष्ट होतात. कर्माच्या दारुण गतीला प्राप्त होतात. भगवान शंकरांनी काळकूट पचवले म्हणून एखाद्याने काळकूट विषाला स्पर्श जरी केला तरी तो जळून जाईल. परमेश्वर आणि गुणातीत अवधूत हे धर्म आणि अधर्म यांच्या पलीकडे गेलेले असतात. ते वेदांनाही शिरसा वंद्य असतात. अशांची आचरणे प्रायशः घ्यायची नसतात. वचने मात्र टाळायची नसतात. त्यांच्या आज्ञा कसोशीने पाळाव्यात. धर्माला अनुकूल अशी योग्य ती आचरणे आणि वचने अवश्य पाळवीत. त्यांची सुचरिते घ्यावीत (*यान्यस्माकं सुचरितानि तानि त्वयोपास्यानि। नो इतराणि।* तैत्तिरीयोपनिषत्. 1.11.2). त्यांच्या तेजाची बरोबरी सूर्यालाही येणार नाही तर अशक्त मानवाची काय कथा? बाहेरून ज्ञानी आणि अज्ञानी सारखेच दिसले तरी त्यांची बरोबरी होऊ शकत नाही

हे शहाण्या सूज्ञ लोकांनी जाणावे. याविषयी कुतर्क करणारा मूर्खच होय. असो. असा सर्व बीभत्स व्यवहार पाहूनही, आणि (परीक्षेचे) सर्व कष्ट सहन करूनही कृतवीर्याचा पुत्र अर्जुन टिकला. त्याला योग आणि ज्ञान यांचा लाभ झाला.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा तिसरा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]


## अध्याय 4 था.

**व्हावा परमोत्कृष्ट सुत। म्हणून भानुसप्तमीव्रत। कथिलें अनंतव्रत। कार्तवीर्यार्जुन जन्मला।।१०।।**
**गर्गें दंडनीती ऐकवून। दत्तमाहात्म्य सांगून। वळविलें अर्जुनाचें मन। हे कथा चवथ्यांत।।११।।**

श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः। सोमवंशांतर्गत हैहय राजाच्या वंशात कृतवीर्य या नांवाचा एक प्रसिद्ध धर्मपरायण राजा झाला. त्याने आपल्या सर्व शत्रूंना जिंकलेले होते (जिताहित) आणि म्हणून तो सार्वभौम म्हणजेच सम्राट राजा होता. त्याला एकूण शंभर पुत्र झाले; पण त्याच्याकडून च्यवन ऋषींचा कांही अपराध घडल्याने त्यांच्या शापाने ते सर्वही भस्मसात झाले. ह्या असह्य दुःखाने राजा खचून गेला आणि त्याचे राज्यकाराभारातले लक्षही लागेनासे झाले. अनुकूल काळांत आप्त आणि इष्ट जमा होतात पण प्रतिकूल काळी मात्र संतसज्जनच उपयोगी पडतात ह्या वचनानुसार एके दिवशी अचानक घरी आलेल्या आपल्या गुरूंना साष्टाग नमस्कार करून अत्यंत आर्त चित्ताने कृतवीर्य गुरूंना म्हणाला "आज खरोखर भाग्याचा दिवस आहे ज्यायोगे आपले चरणदर्शन मला झाले. आपण जाणतांच की मी पुत्रहीन झालो आहे. ह्या दुःखांतून माझी सुटका आपणच करू शकता." सद्गुरूंनी राजाला धीर धरायला सांगितले आणि म्हणाले, "मी तुला ह्यावर असा उपाय सांगतो ज्याने तुला पुण्यप्राप्ति होऊन तुझा वंश (अन्वय) वाढेल. हे सूर्य देवतेचे व्रत आहे. ह्या व्रताने सर्व पापांची शांति होते, उत्तम सुखाची प्राप्ति होते आणि उत्तमच पुत्रही लाभतो. जन्मतः वांझ असलेल्या (जातिवंध्या), ज्यांचे पुत्र जन्मानंतर लगेच मरतात (मृतवंध्या), ज्यांचे गर्भ स्थिर न होता पडून जातात (गर्भस्राव), ज्यांच्या गर्भाशयांत वेदना होऊन (सल) गर्भाचा नाश होतो किंवा ज्यांची मुले अकालीच (नऊ महिन्याच्या आधीच) प्रसूतीपूर्वी मरतात किंवा प्रसवतांच मरतात, ज्यांची मुले जन्मत) निपचित होऊन पडतात, भूत, पिशाच्च, रोग इत्यादि कोणत्याही कारणाने ज्यांची मुले मृत्यु पावतात अशा सर्व दोषांचे निवारण करून उत्तम पुत्राची प्राप्ति करविणारे हे व्रत आहे. " (1 – 10)

आपल्या पुराणातून अशा अनेक प्रकारच्या व्रतांची वर्णने आहेत. दत्तमाहात्म्यसुद्धा श्रीदत्तपुराणाचाच अनुवाद असल्याने त्यांतही कांही व्रतांची माहिती आढळते. ही व्रते सकाम ईश्वरोपासनेचा भाग आहेत. मानवी जीवनांत सुख आणि दुःख यांची 'अलक्ष्य भेसळ' असते असे कविवर्य तांबे म्हणतात. याउलट स्वर्गलोकांत भूलोकात संपादन केलेल्या पुण्यापासून मिळणाऱ्या केवळ सुखांचाच उपभोग असतो, तर नरकांत केवळ पापांचा निचरा होण्यासाठी केवळ यातनाच सोसायच्या असतात. नरकांत पाप किंवा स्वर्गांत पुण्य भोगून जेव्हा पुण्य आणि पाप यांची समानता होते तेव्हां मनुष्यदेहाची (भूलोकाची) प्राप्ति होते. साहजिकच इथे सुखाबरोबर दुःख आहे आणि दुःखाच्या सोबतीलाही सुख आहे. हे सर्व मनुष्यमात्रांना लागूं आहे, मग तो सम्राट राजा असो की कुणी सामान्य माणूस असो. मानवी जीवनाचे आणखी एक वैशिष्ट्य इथे ध्यानांत घेतले पाहिजे. स्वर्गांतले उपभोग घेणारे देवादिक असोत की नरकांत पिचणारे पापी असोत, त्यांना आपल्या अवस्थेत बदल करण्याचा उपाय नसतो. स्वर्गांतल्या पुण्यवान जीवांना तशी शक्यता असूनही ते एकामागून एक येणाऱ्या सुखांचा उपभोगांत इतके गुंगून जातात की असा कांही उपाय करण्याचा विचारही त्यांच्या मनांत येत नाही. मानवांना मात्र पुण्याचा संग्रह करण्याची, पापांचा क्षय करण्याची, एवढेच काय पापपुण्याच्या चक्रातून (संसारातून) मुक्त होऊन परमानंदाची प्राप्ति करून घेण्याची संधि असते. साधारणतः विषयांना लुब्ध झालेले जीव अंतर्मुख होऊन असा विचार करीत नाहीत. पण एखादा दुःखाचा मोठा आघात झाला की मात्र त्यांचे मन अंतर्मुख होऊं लागते. एखादी तीव्र इच्छा (पुत्रप्राप्ति, धनलाभ, सत्ता, विवाह इत्यादि) पूर्ण करण्यासाठी (**अर्थार्थी भक्त**) किंवा एखाद्या असह्य दुःखापासून सुटका करून घेण्यासाठी (**आर्त भक्त**) कां होईन तो परमेश्वराकडे वळतो. यांतूनच पुढे परमेश्वराला जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू होतो (**जिज्ञासू भक्त**) आणि त्या प्रयत्नांना यश आले की मानवी जीवनाची कृतकृत्यता होते (**ज्ञानी भक्त**). या सर्व भक्तांचे वर्णन गीतेत आले आहे. **चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोर्जुन। आर्त जिज्ञासुर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।**7:16). भगवान पुढे अर्जुनाला सांगतात की हे सर्वच आपापल्या परीने श्रेष्ठ आहेत; ज्ञानी तर माझा आत्माच आहे. सकाम भक्ति ही मोक्षाची पहिली पायरी आहे असे म्हणायला हरकत नाही. कार्तवीर्य, आयु इत्यादि भक्तांच्या चरित्रांतून श्रीस्वामी महाराजांनी ही भक्तांची उत्क्रांति विशद केली आहे. वैदिक परंपरेतील व्रतवैकल्यांची वर्णने मानवाला ह्या **भक्तीच्या पहिल्या पायरीवर आरूढ होण्यासाठी आहेत. संसाराच्या सुखातच निमग्न राहण्यासाठी नाहीत** हे इथे लक्षात घेतले पाहिजे.

## भानुसप्तमीचे व्रत.

गुरुदेव कृतवीर्याला पुढे व्रताचे विधान सांगतात. "रविवारी सप्तमी असतांना (भानुसप्तमी) तिथि, वार, करण, नक्षत्र, योग या पांचांची (पंचांग) शुद्धि पाहून चंद्र अनुकूल असतांना ह्या व्रताला सुरुवात करावी. व्रताचा संकल्प करून पुण्याहवाचन


[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

करावे व आचार्यांना (गुरुजींना) वर्णी द्यावी. आचार्यांनी गृहशुद्धि करून अग्नीची स्थापना करावी. अग्नीच्या ईशान्य दिशेला कलश मांडून त्यावर सूर्य, रुद्र आणि सात मातृका या देवतांच्या सोन्याच्या प्रतिमा मांडून त्यांची विधिवत् पूजा करावी. त्यानंतर शांतीसाठी पूर्व, पश्चिम, आग्नेय, नैर्ऋत्य वायव्य, ईशान्य या दिशांना व मध्ये असे पाण्याने भरलेले सात कलश ठेवावेत. त्यांची विधीने पूजा, शांतिसूक्ताचा जप आणि अन्वाधान करून यथाविधि समिधा, तीळ, जव आणि पायस यांच्या प्रत्येकी 108 आहुतींनी हवन करावे. मग बलीदानादि करून पूर्णहुती करावी. त्यानंतर यजमान आणि यजमानपत्नी यांना उत्तराभिमुख बसवून त्यांना, ज्याची मुले जिवंत आहेत अशा सुवासिनीकरवी कलशाच्या मुखावर ठेवलेल्या पानांनी त्यांतील पाण्याचा अभिषेक करवावा. त्यावेळी “यांचा बाळ दीर्घायुषी होवो, सूर्यादि ग्रहमंडळ, ब्रह्मा-विष्णु-महेश या त्रिमूर्ति, सर्व लोकपाल यांच्या बाळाचे सतत रक्षण करोत. बालग्रह, भूत, अग्नि, शनि त्याला कधीही पीडा न करोत ” असे चिंतन करावे. अभिषेकानंतर स्नान करून अंगावरची वस्त्रे आचार्यांना द्यावीत. देवतांचे पूजन करून सुवासिनी आणि ब्राह्मणांना यथाशक्ति दक्षिणा द्यावी. आचार्यांना गोप्रदान करावे. तिळाच्या पात्रात कालमूर्तीची पूजा करून ती ब्राह्मणाला दान करावी. त्यानंतर ब्राह्मणांना भोजन द्यावे. त्यांना यथेष्ट पायसान्न वाढून भरपूर दक्षिणा द्यावी आणि पुढीलप्रमाणे त्यांचे आशीर्वाद घ्यावेत. “हा बालक दीर्घायुषी होवो आणि शंभर वर्षांपर्यंत सुखाने जगो. ह्याचे सर्व पाप वडवाग्नीत भस्म होऊन जावो. ब्रह्मा, विष्ेणु, महेश, कार्तिकेय, इंद्र, वायु, अग्नि या सर्व देवता याच्यावरील अरिष्टांचे निरसन करोत” (**दीर्घायुरस्तु बालोऽयं यावद्वर्षशतं सुखम्।। यत्किञ्चिदस्य दुरितं तत्क्षिप्तं वडवामुखे। ब्रह्मा विष्णुर्हरिः स्कन्दो वायुः शक्रो हुताशनः।। रक्षन्तु सर्वदुष्टेभ्यो वरदाः सन्तु सर्वदा।** श्रीदत्तपुराण 3:2:17-19). शेवटी केलेले कर्म ईश्वरास समर्पण करून कुटुंबासह आपण भोजन करावे. अशा रीतीने व्रत केल्याने सूर्यनारायणाचे कृपेने सर्व अरिष्टे दूर होऊन संतती वाढेल.” हे सद्गुरूंचे बोलणे ऐकून कृतवीर्य राजाने त्यांचा सत्कार केला आणि भक्तियुक्त अंतःकरणाने त्या व्रताचे आचरण केले. (11-26)

वरील व्रताच्या वर्णनात असलेला नेमकेपणा आणि तपशील लक्षात घेण्यासारखा आहे. हा श्रीस्वामी महाराजांच्या निरूपणाचा विशेष आहे. व्रतांची किंवा मंत्रांची विधाने, योगमार्गातील प्रक्रिया, औषधी तयार करण्याच्या कृती इत्यादि प्रयोगांचे त्यांचे वर्णन असेच नेमके आणि तपशीलवार असल्याचे आपल्याला आढळून येईल. या वर्णनावरून हे भानुसप्तमीचे व्रत कुणालाही करता येऊ शकेल. असो.

## श्रीदत्तप्रणीत अनंतव्रत.

त्यानंतर कांही दिवसांनी एकदा महासाध्वी मैत्रेयी सहज घरी आली असता कृतवीर्याची पत्नी शीलधरा हिने तिच्या चरणी आपले दुःख निवेदन केले. मैत्रेयीने तिला अनंतव्रताचे आचरण करायला सांगितले. दत्तपुराणात ह्याला दत्तव्रत म्हणजे दत्तप्रभूंनी सांगितलेले व्रत असे म्हटले आहे. “ह्या व्रताच्या प्रभावाने तुम्हांला सद्गुणी पुत्र होईल. त्याची सर्व भूमंडळात शूर वीर म्हणून ख्याति होईल,” असे सांगून मौत्रेयी पुढे म्हणाली, “मार्गशीर्ष पौर्णिमेला या व्रताचा आरंभ विधिवत् स्वस्तिवाचनाने करावा. पुढे वर्षभर केवळ हविष्यान्न सेवन करून प्रत्येक पौर्णिमेला प्रदोषकाळी (सायंकाळी) अनंताची पूजा करावी. अनंत भगवान सर्वांच्या इच्छा पूर्ण करतात. प्रसन्न चित्ताने हे व्रत केल्यास सर्वेश्वर अनंत तुला फळ देईल आणि कल्याणकारी मुलगा होईल. वर्षभर व्रत केल्यावर त्याचे उद्यापन करून ब्राह्मणाला गोप्रदान द्यावे. तसेच बारा पाण्याने भरलेले कलश देऊन ब्राह्मणभोजन करावे. असे हे व्रत आचरल्यावर सर्व पापांची शांति होऊन तुम्हांला लोकोत्तर, गुणसंपन्न, पुण्यवंत, शत्रूंवर विजय मिळवून सर्वमान्य होणारा चक्रवर्ती सम्राट् पुत्र लाभेल.” असे सांगून ती ब्रह्मज्ञानी मौत्रेयी निघाली. शीलधरेने तिच्या पायांवर डोके ठेवून आपल्यावर कृपा असू द्यावी अशी प्रार्थना केली. मौत्रेयीचा उपदेश राजाच्या कानी घालून त्याची अनुज्ञा घेऊन राणीने व्रताला आरंभ केला. स्त्रियांनी कोणताही नेम-धर्म, व्रतवैकल्य पतीच्या आज्ञेनेच करावा असे शास्त्र आहे. राणीने एक वर्ष केवळ हविष्यान्न ग्रहण केले; ब्रह्मचर्य धारण केले; पलंग, गादी सोडून भूमीवर शयन केले; काम क्रोध इत्यादींचा त्याग करून मौन धारण केले. शीलधरेची पूर्वीपासूनच दत्तप्रभूंची उपासना होती. अनंतव्रत करतांनासुद्धा तिने अनंत म्हणजेच दत्त अशीच भावना ठेवली आणि प्रयत्नपूर्वक निष्ठेने ते व्रत केले. (27 -38)

आपल्याकडील सर्व व्रतांत योगांतल्या यमनियमांचा अंतर्भाव आहे. पातंजल योगांत हे यमनियम सर्वकाल, सर्व स्थळी पाळावयाचे असतात. याला सार्वभौम महाव्रत असे म्हणतात. हे साधारणतः प्रापंचिकांना शक्य होत नाही. त्यांना ह्या व्रतांच्या आचरणाने कांही काळ वा कांही ठिकाणी तरी या यमनियमांचा अभ्यास घडतो. त्याने पापक्षय आणि पुण्यसंचय होतो. मन अंतर्मुख होते. आपल्या इच्छापूर्तीचे प्रलोभन दाखवून श्रुतिमाउली अशा रीतीने ईश्वराभिमुख करते हाच या व्रतांचा प्रमुख लाभ होय. जशी एखादी आई आपल्या आजारी मुलाला लाडूचे आमिष दाखवून कडू औषध घेण्याला त्याचे मन वळवते तसेच हे आहे.

# राणीला स्वप्नांत श्रीदत्तदर्शन.

ह्या शीलधरेच्या व्रताचरणाने श्रीदत्तप्रभू प्रसन्न झाले. तिच्या स्वप्नांत दर्शन देऊन त्यांनी तिचे अभिनंदन केले आणि म्हणाले, “हे राणी, ज्या आत्यंतिक उत्कटतेने तू हे धर्माचरण केलेस त्याचे फळ तुला तात्काळ मिळेल. तुला सप्तद्वीपांवर राज्य करणारा, केवळ संकल्पाने कुठेही जाऊं शकणारा आणि स्मरण केल्याबरोबर भेटणारा असा बलवान मुलगा होईल. ” असा वर देऊन तो भक्तांचा कैवारी गुप्त झाला. (39 – 41)

**सप्तद्वीपे** - पुराणांत भूलोकाची विभागणी सात द्वीपांत केली आहे. आज आपल्याला ज्ञात असलेली पृथ्वी म्हणजे त्यांतील जम्बुद्वीप होय. ही लवणाब्धीने (खाऱ्या समुद्राने) वेढलेली आहे. खाऱ्या सागराच्या पलीकडे प्लक्ष द्वीप असून ते इक्षुरसाच्या म्हणजे ऊसाच्या रसाच्या समुद्राने वेढलेले आहे. त्यापलीकडे शाल्मल, कुश, क्रौञ्च, शाक, पुष्कर ही पांच द्वीपे अनुक्रमे मदिरा, तूप, दही, दूध आणि गोड पाणी यांच्या समुद्राने वेढलेली आहे. ही सर्व द्वीपे मध्यस्थित मेरू पर्वताभोवती कमळाच्या पाकळ्यासारखी रचलेली आहेत. ह्या सर्व भाकड कल्पना समजण्याकडे सध्यांच्या तथाकथित विज्ञानवाद्यांचा कल आहे. पण पृथ्वीच्या कांही भागांत (उदा. बर्म्युडा त्रिकोण) मोठमोठी जहाजे, विमाने अचानक गडप झाल्याच्या घटनांनी कांही अभ्यासकांना असे वाटू लागले आहे की पृथ्वी आपल्याला माहिती आहे त्यापेक्षा खूपच अधिक विस्तृत असावी. या विषयावर अनेक ग्रंथही झाले आहेत. भारतीय पुराणानुसार या द्वीपांत विशेष पुण्यवान जीव जन्म घेतात.

# अत्युत्कट धर्मफळ.

अत्युत्कट धर्माचे फळ असे म्हणतांना श्रीस्वामी महाराजांना “प्रारब्धकर्माणां भोगादेव क्षयः” हा सिद्धांत सुचवायचा आहे. ह्या सृष्टीच्या मुळाशी निगडित अशा कांही तत्त्वापैकी कर्मसिद्धांत आहे. त्रैलोक्यांतले सर्वही जीव ह्या कर्माच्या सूत्राने बांधलेले आहेत. आपण वर पाहिल्याप्रमाणे स्वर्ग, नरक, पशु-पक्षी इत्यादी योनीत कर्माचे स्वातंत्र्य नाही. ते मानवालाच आहे. त्यामुळेच भूलोकाला कर्मभूमि म्हटले आहे. “**तुलसी यह तनु खेत है, मन, बच, कर्म किसान। पाप पुण्य द्वै बीज हैं, जो बोयेगा सो काटेगा निधान।।**” संत तुलसीदास मनाला उपदेश करतात की हे शरीर एक शेत आहे. **इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते.** (भगवद्गीता 13:1). मन, वाणी आणि (देहाने केलेले) कर्म हे तीन शेतकरी आहेत. पाप आणि पुण्य अशी दोन बीजे आहेत. ह्या शेतकऱ्याकरवी जे तू पेरशील तेच पीक उगवेल. हे जे कर्म आपण या जन्मात सतत निर्माण करतो आहोत त्याला **क्रियमाण कर्म** अशी संज्ञा आहे. अनंतकाळापासून जन्मरणाचे फेरे चालू आहेत. त्यांत हा जीवाने कर्माचे एवढे मोठे गांठोडे जमा केले आहे की त्यांची फळे भोगायला कित्येक जन्म घ्यावे लागतील. पापपुण्याची समानता झाली की मनुष्य योनी लाभते आणि विषमता असेल तर स्वर्ग, नरक, तिर्यक् (पशुपक्षी) योनीत जन्म होतो. असे हे कर्मचक्र चालू आहे. अर्थात् कर्मचक्राच्या गतीवर परिणाम करण्याची क्षमता असलेल्या मानव जन्माची संधि ही दुर्मिळच आहे. प्रत्येक जन्माच्या वेळी जीव आपल्या सांचलेल्या (**संचित कर्म**) कर्माच्या गाठोड्यातून त्या जन्मापुरते कर्म घेऊन येतो. यालाच **प्रारब्ध कर्म** असे नांव आहे. आपले संचित एखाद्या बाणाच्या भात्यासारखे मानले तर प्रारब्ध हा त्या भात्यांतील अनेक बाणांपैकी धनुष्यातून सुटलेला एक बाण म्हणावा लागेल. एकदा बाण धनुष्यातून सुटला की तो अडवणे अशक्यप्रायच असते. त्याचप्रमाणे आपण जे प्रारब्ध जन्माच्या वेळीच बरोबर घेऊन येतो ते भोगणे अपिरहार्य आहे. जीवन्मुक्त झालेल्या महात्म्यांनासुद्धा देहात असेपर्यंत प्रारब्ध भोगावेच लागते असे शास्त्र सांगते. असे जर आहे तर मग वर सांगितलेल्या व्रतवैकल्यांचा, सकाम ईश्वरोपासनेचा काय उपयोग असा प्रश्न उपस्थित होतो. याचे समाधान हेच आहे की सुटलेला बाण थांबवणे “जवळजवळ” अशक्य आहे. सर्वसाधारण मानवी प्रयत्नांनी ते साधणार नाही. पण साधुसंतांच्या आज्ञेने कांही विशिष्ट उपासना अत्यंत उत्कटतेने केली तर प्रारब्धातही बदल होऊ शकतो असा सिद्धांत आहे. साधुसंत जेव्हां एखादी उपासना देतात तेव्हां त्यांच्या संकल्पाचे सामर्थ्य त्यामागे असते. उपासकाने जर त्यांच्यावर दृढ निष्ठा ठेवून उत्कटतेने, दृढ निष्ठेने आणि काटेकोरपणे ती केली तर तिचे फळ अवश्य मिळते. हेच “अत्युत्कट धर्मफळ” ह्या शब्दातून श्रीस्वामी महाराजांना सुचवायचे आहे. “अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते” (अत्यंत तीव्र पापाचे अथवा पुण्याचे फळ इथेच भोगावे लागते असे शास्त्रवचन आहे. साधारण पापपुण्याप्रमाणे ते कर्म परिपक्व होण्याची प्रतीक्षा करावी लागत नाही.

# अर्जुनाचा जन्म.

स्वप्न संपतांच राणी जागी झाली आणि स्वप्नांत पाहिलेल्या त्या दर्शनाच्या स्मृतीने वरचेवर आनंदाने मोहरून गेली. तिने राजाला ते स्वप्न सांगितले. कृतवीर्यालाही आनंद वाटला. लवकरच त्या शुभस्वप्नाची प्रचीती त्यांना आली आणि राणीला गर्भ राहिला. उत्तम डोहाळे लागले. ते सर्व राजाने तत्परतेने पुरविले. तसेच राजाने हर्षयुक्त चित्ताने पुंसवनादि संस्कार यथाकाल यथाशास्त्र संपन्न केले. पुढे दिवस पूर्ण होतांच राणीने रात्रीच्या शुभ वेळी पुत्ररत्नाला जन्म दिला. त्या वेळी पांचही ग्रह उच्चीचे होते. तसेच दिशा प्रसन्न झाल्या, वारा मंद मंद वाहू लागला, अग्नीच्या ज्वाला उजवीकडून फिरू लागल्या, आकाश निरभ्र झाले. सर्व ब्रह्मांड आनंदाने भरून गेले. देवांनी दुंदुभी वाजविल्या. अप्सरा नृत्य करू लागल्या आणि

गंधर्व गायन करू लागले. देवांनी पुष्पवृष्टि केली. बाळाच्या तेजाने दीप निस्तेज भासू लाहले आणि नक्षत्रांना लाज वाटू लागली. सर्व लोकांची मने सहजच धर्मात स्थिरावली, साधुजन प्रसन्न झाले आणि सिद्धांच्या मुखांतून "आयुष्मान् हो" असे आशीर्वाद बाहेर पडू लागले. राजाने लोकांना धन, धान्य, वस्त्रे यांचे यथायोग्य दान केले. ब्राह्मणांना अमाप गायींचे आणि सोन्याचे दान केले. ज्योतिष्यांना पाचारण करून त्यांच्याकडून बाळाचे जातक वर्तविले. त्यांनी लग्नसाधन करून सांगितले की "हा मोठा भाग्यवान कुमार आहे. हा श्रीदत्तप्रभूंची कृपा प्राप्त करून घेईल. आपल्या तपोबळाने हा पवित्र होईल आणि त्रैलोक्यांत याचे सुयश पसरेल. याच्या नामाच्या जपाने हरवलेली अथवा नष्ट झालेली वस्तु परत मिळेल. (**कार्तवीर्यार्जुनो नाम राजा बाहुसहस्रवान्। तस्य स्मरणमात्रेन गतं नष्टं च लभ्यते।।** ह्या मंत्राचा जप आजही हरवलेल्या किंवा नाहीशा झालेल्या वस्तु परत मिळण्यासाठी केला जातो. आणि त्याची प्रचीतीही अनेकांना येते.) कुणीही कुठेही याचे स्मरण केले की तो तात्काळ तेथे जाईल. हा वेदशास्त्रसंपन्न होईल. अनंतव्रताच्या प्रभावाने सप्तद्वीपांकित पृथ्वीचे सार्वभौम राज्य हा पंचाऐंशी हजार वर्षे करील. सूर्यव्रताच्या फलस्वरूप हा निरोगी होऊन लक्ष वर्षे जगेल. हा जितेंद्रिय नित्य विजयी आणि सर्वमान्य होईल." ही भविष्यवाणी ऐकून राजाने त्या ज्योतिषांचा सत्कार करून त्यांना निरोप दिला. सोळाव्या दिवशी राजाने मुलाचे "अर्जुन" असे नामकरण केले. कृतवीर्याचा मुलगा म्हणू कार्तवीर्य अर्जुन किंवा पुढे श्रीदत्ताच्या वराने त्याला सहस्र बाहू लाभले म्हणून सहस्रार्जुन अशी त्याची आणखी नावे आहेत. (41 – 55)

मानवी जीवनाची शंभर वर्षांची मर्यादा ही कलियुगासाठी आहे. कृतयुगात ती 60 हजार वर्षे होती. आयुष्यमर्यादाच नव्हे तर प्रत्येक युगाचे जीवशास्त्र वेगवेगळे असते असे पुराणात सांगितले आहे.

## अर्जुनाचा राज्यावर बसायला नकार.

अर्जुन शुक्ल पक्षातील चंद्रासारखा वाढू लागला. यथावकाश तो राजगुरु गर्गमुनींकडून सर्व शास्त्रांचे शिक्षण घेऊ लागला. परंतु दैववशात् अर्जुन युवराजपदाला योग्य होण्याच्या पूर्वीच कृतवीर्याचा मृत्यू झाला. तेव्हा राज्याचे नागरिक, मंत्रीगण, गुरुवर्य गर्गमुनि इत्यादि सर्वांनी अर्जुनाला राज्याची धुरा सांभाळण्यास सांगितले. पण अर्जुनाने मात्र ते स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. तो म्हणाला, "मला हे राज्य नको. मला मनापासून त्याचा तिटकारा आहे. राजाला मोठेपण मिळते हे खरे आहे. पण परिणामी त्यांत अमाप कष्टच होतात. शेतकऱ्याकडून भूमीच्या उत्पन्नाचा सहावा भाग आणि व्यापऱ्यांच्या उत्पन्नाचा बारावा भाग राजाला मिळतो खरा! पण हे भाग घेऊन जो राजा प्रजेचे न्यायाने पालन करीत नाही, चोराचिलटांपासून त्यांचे रक्षण करीत नाही तो राजा म्हणवून घेण्याला योग्य तर नाहीच; पण त्याला घोर नरकात पिचावे लागते. जो सामर्थ्य असूनही अन्याय दूर करीत नाही, उलट अन्यायाने पैसा साठवून ठेवतो तो स्वतःला धूर्त समजत असला तरी नरकात पडेल. न्यायाची कांस सोडून रागाने किंवा लोभाने निरपराधाला शिक्षा करतो आणि अपराध्याला सोडून देतो त्याची तीच गति होते. तुम्ही यावर म्हणाल की 'हे जर तू जाणतोस तर तू तसे वाग! ' तर मला सांगा इतरांवर ्हणजे राजसेवकांवर विसंबून हे कसे शक्य आहे? राजा जे नोकर ठेवतो त्यांनी केलेल्या पापाचा चौथा हिस्सा आपोआप त्याच्या मस्तकावर पडतो. मग आता मला सांगा मी एकटा हे राज्य स्वीकारून पुण्यसंपादन करू शकेन का? " (56 -64)

अर्जुनाचे हे प्रतिपादन सर्वच राज्यकर्त्यांनी विचारात घेण्यासारखे आहे. वंशपरंपरेने प्राप्त झालेले अकंटक राज्यही स्वीकारतांना राजाच्या कर्तव्यांचा, जबाबदारीचा इतका सूक्ष्म विवेक करणारा अर्जुन आणि लोकांचा अनुनय करून काही मुदतीची सत्ता मिळवणारे आजचे राज्यकर्ते यांची तुलना करण्यासारखी आहे. आज साऱ्याचे आणि करांचे उत्पन्न जरी शासकीय कोषांत जमा होत असले तरी राज्यकर्त्यांच्या संपत्तीत बिनहिशेबी वाढ होत असतांना आपण सतत पाहतो. आपल्या राज्यात होणाऱ्या अन्यायाचे, भ्रष्टाचाराचे खापर आपल्या अधिकाऱ्यांच्या आणि नोकरांच्या माथीं फोडतांना आपले राज्यकर्ते मुळीच कचरत नाहीत. निर्दोष माणसाला शिक्षा आणि दोषी माणसाची सुटका झाल्याच्या बागम्या रोजच वृत्तपत्रात वाचायला मिळतात. या सर्व गोष्टींची कसलीही लाज आमच्या राज्यकर्त्यांना वाटत नाही. आपली संपत्ती आणि आपली सत्ता ह्यांचे हिडीस प्रदर्शन करण्यात ते धन्यता मानतात. हे लोकशाहीने प्रसविलेले राज्यकर्ते पाहिले की अर्जुनासारखे राजेरजवाडे आदर्शवत् वाटतात. असो.

## गर्गमुनींचा अर्जुनाला दुजोरा.

हे अर्जुनाचे बोलऩे ऐकून गर्गमुनीना आनंद वाटला. अर्जुनाला आपण जे शिक्षण दिले त्याच्या साफल्याची ती साक्ष होती. ते म्हणाले, "अर्जुना तू धन्य आहेस. तू जे बोललास ते अगदी योग्यच आहे. ज्याला भूमीरूपी गाईची धार काढायची आहे त्याने तिच्या प्रजारूपी वासराचे पालन केलेच पाहिजे. राजाने आपला कारभा फारच कडक केला तर रयतेला जाच होईल. त्याने कारभारात मऊपणा दाखविला तर लोक त्याला वेडा करतील. वारा जसा फार उष्ण किंवा फार थंड नसला की सुखद होतो, तसाच राजदंडही युक्त असला तरच प्रजेला सुख लागते. तुला जरा सेवकांवर विसंबून राज्य करायचे नसेल तर तू योगाभ्यास कर. तोच तुला वाटणारी राज्याच्या धुरेचे भय दूर करील. योगाभ्यासाने तुलाच अनेक देह धारण करतां

येतील आणि मग तू एकटाच सर्व राज्याचा कारभार करू शकशील. मनाच्या वेगाने तू संचार करशील आणि अंतर्ज्ञानाने सर्व जाणशील. मग कोणताही अपराधी शिक्षा चुकवू शकणार नाही की कुणा निरपराध्याला शिक्षा होणार नाही. त्यासाठी तू भगवान दत्तात्रेयांना शरण जा. " (64 – 69)

## दत्तात्रेयप्रभूंचे माहात्म्य.

"अनसूयेच्या गर्भातून प्रकटलेले ते दत्तात्रेय नावाचे रत्न सह्याद्रीच्या शिखरावर स्थित आहे. ज्याचा सर्वजण योगीश्वर या नांवाने आदर करतात, ज्याच्या नामस्मरणाने संसारसागर सुकून जातो, जो भक्तांच्या कामासाठी निद्रा सोडून नित्य जागा राहतो, आळसाचा त्याग करून योगी ज्याचे निरंतर ध्यान करतात, ज्याचे त्रिगुणातीत आचरण देवादिकांनाही न कळणारे आहे, जो योगसामर्थ्याने भक्तांचे रक्षण करतो, जो सतत आत्मानंदाने डोलत असतो, समदर्शनी महात्मेच फक्त ज्याला पाहू शकतात, तो विश्वाला साक्षीरूपाने पाहणारा महात्मा दत्त सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. त्याच्या लेखी कुणी मोठा नाही की कुणी लहान नाही. तो भक्तांचा कैवारी आहे आणि दुष्टांचा शास्ता आहे. असे असले तरी त्याला वैषम्याचा दोष लागत नाही की त्याला निर्दयी म्हणता येणार नाही. याला कारण त्याचे योगबळाने धारण केलेले समत्व हेच आहे. आई प्रसंगानुसार आपल्या मुलाचे कधी लाड करते तर आवश्यक तेव्हां त्याला मारही देते. त्यासाठी तिला कुणा निर्दयी म्हणेल का. त्याचप्रमाणे साधूंचे रक्षण केल्याने आणि दुष्टांचे शासन केल्याने जगन्नियंत्या परमेश्वराला दूषण लागत नाही. उलट त्या गुणदोषातीत परमेश्वराचे हे भूषणच ठरते. तेव्हा विश्वाचा रचयिता जो अत्रीचा पुत्र झालेला आहे, जो आपल्या भक्तांना त्याचे ईप्सित देतो त्याचीच तू आराधना कर. प्रत्यक्ष इंद्रानेसुद्धा, त्याला जंभासुराने स्वर्गातून हाकलले तेव्हा श्रीदत्तचरणांचाच आश्रय घेतला. दत्तानेच त्याचे स्थान इंद्राला परत मिळवून दिले. आजही इंद्र देवांसह रोज दत्तप्रभूंच्या दर्शनाला येतो, त्यांची सेवा करण्याची संधि पाहत असतो. त्यामुळेच त्याची बरोबरी कुणा करू शकत नाही आणि तो निर्वेध स्वर्गाचे राज्य करत असतो. " (70 – 79)

## श्रीदत्तप्रभूंना प्रसन्न करण्याचा उपाय.

गर्गमुनि पुढे सांगतात, "अर्जुना, पण एक लक्षात ठेव. दत्तप्रभूंना प्रसन्न करणे दुष्कर आहे. आपल्या देहाचा अभिमान धरून इंद्रियांचे लाड करणाऱ्या माणसांची बुद्धि मलिन असते. अशा दुर्बुद्धीना भगवंत कसा दिसणार आणि त्यांना खऱ्या सुखाची प्राप्ति तरी कशी होणार? त्यांच्यापासून परमेश्वर कायमच दूर असतो. विषयांपासून वैराग्याच्या बळाने मन मागे खेचून जे ईश्वरोन्मुख झालेले आहेत अशा शुद्धचित्त भक्तांना मात्र दत्तप्रभू नेहमीच जवळ आहेत. त्यांच्यापासून तू वर मिळव." (80 – 82) इथे अध्यात्मसाधनेत इंद्रियनिग्रहाचे महत्त्व दाखविले आहे. गीतेत भगवंतानी हेच सांगितले आहे. **भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसां। व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते**।।2:44।। विषयजनित भोग आणि प्रापंचिक ऐश्वर्याच्या प्राप्तीसाठी धर्माचे आचरण करणाऱ्यांची बुद्धि तिथेच आसक्त असते. अशी बुद्धी निश्चयात्मक होऊ शकत नाही. आणि निश्चयात्मक बुद्धीविना परमेश्वरप्राप्ति अशक्य आहे. "ये इंद्रियें जें जें म्हणती। तें तेंचि जे पुरुष करती। ते तरिलेचि न तरती। विषयसिंधु।।ज्ञानेश्वरी 2:48)" इंद्रियांच्या मागे धांवणारे पुरुष अगदी संसारसमुद्राला ओलांडून गेल्यासारखे वाटले तरी पैलथडीला लागलेली नाव एकदम उलटावी तसे परत विषयरूपी जळांत गटांगळ्या खातात, असे श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात. परमेश्वरप्राप्तीच्या वाटेवर जाणाऱ्या प्रत्येक साधकाने ही खूणगाठ मनात ठेवली पाहिजे हेच गर्गमुनि अर्जुनाला सांगत आहेत.

## दत्तात्रेयांची दिनचर्या.

"ज्या दत्तप्रभूंचे स्नान नित्य गंगेतच असते, माहुरक्षेत्री जे निद्रा करतात, गाणगापरी ध्यान करतात, कुरुक्षेत्री आचमन करून धोपेश्वरी भस्म धारण करतात आणि कऱ्हाडला संध्या करतात; रोज कोल्हापुरला भिक्षा मागून ते पांचाळेश्वरला भोजन करतात; पंढरपूरला जाऊन ते गंधलेपन करतात आणि पश्चिम समुद्राला (चिपळूण) सायंसंध्या करतात. अशी त्यांची जगावेगळी दिनचर्या आहे. " (83 -86)

## श्रीदत्ताचे परमात्मस्वरूप.

"बाळा कार्तवीर्या, जो कोणी त्यांचे नुसते स्मरण करतो त्याला ते दर्शन देतात. अशा त्रिभुवनव्यापी परमात्म्याच्या चरणी माझे दंडवत! ज्याची लीला श्रवण केल्याने कानमन तृप्त होतात अशा जगद्वंद्य दत्ताला कोण नमन करणार नाही? आपल्या योगमायेच्या द्वारा जो ब्रह्मदेवाच्या रूपाने जगाची उत्पत्ति करतो, विष्णूच्या रूपाने त्याचे पालन करतो आणि रुद्राच्या रूपाने संहार करतो आणि हे सर्व एकट्यानेच करून त्याला त्याच्या ठइकाणी कर्तृत्वाच्या अहंकाराचा लेशसुद्धा नसतो. जो भक्तीचा भुकेला आहे. भक्तीखातर जो भक्तपराधीन होऊन राहतो. स्वेच्छेने धारण केलेल्या देहांनी पावक लीला करतांना जो भक्तांना कधीही दुरावत नाही. आपली भक्ति करणाऱ्याचे योगक्षेम चालविणे हे ज्याचे ब्रीद पुराणे गर्जून सांगतात त्या दत्तप्रभूचे तू दर्शन कर. भक्तिभावाने सेवा करूनच त्याला प्रसन्न करता येईल. नाही तर कोण कसे त्याचे मन वळवू

शकेल? त्या दत्ताने वरदान दिले तरच तू एकटाच आपल्या इच्छेनुसार ह्या सप्तद्वीप पृथ्वीचे पालन करू शकशील. त्यासाठी आवश्यक ते धैर्य तोच दत्त भगवंत तुला देईल आणि त्याबरोबरच अनेक शक्तीसुद्धा देईल. मनोभावाने त्याची भक्ती कर म्हणजे तो मुक्तिदाता तुला सद्बुद्धी देईल, जे जे तू मनात आणशील ते ते योगप्रभावाने सहजच मिळवू शकशील. माझ्या सांगण्याचा आदर करून तू शीघ्र दत्ताची सेवा कर!" (86 – 96)

जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय ही परब्रह्माची **तटस्थ लक्षणे** आहेत. खरे तर परब्रह्म सत्, चित् आणि आनंदस्वरूप, अखंड, एकरस, सर्वव्यापी आहे. ही त्याची वेदांत प्रतिपादलेली **स्वरूपलक्षणे** आहेत. परमेश्वराला आदि नाही, अंत नाही, विकार नाही, कला नाहीत किंवा क्रिया नाहीत ही वेदात सांगितलेली **निषेधलक्षणे आहेत.** जगत हे स्वभावतः अध्यासात्मक आहे. परमेश्वराच्या अधिष्ठानावर झालेला तो भास मात्र आहे. ह्या अशा जगताचा आणि परमेश्वराचा खरे तर कांही संबंधच असूं शकत नाही. पण परमेश्वरी मायेच्या प्रभावाने स्वरूपाचा विसर पडलेला जीव हे जग सत्य मानतो. त्याला सत्याची जाणीव करून देण्यासाठी ह्या जगाच्या संदर्भात वेदांनी परमात्म्याचे वर्णन केले आहे. त्यालाच **तटस्थलक्षण** असे म्हणतात. आत्मज्ञान होऊन जगदाभासच मावळला की जीवात्मा आणि परमात्मा हा भेदच नाहीसा होतो. मग या तटस्थलक्षणांना अर्थ उरत नाही. पण अज्ञानी जीवाला मात्र परमात्म्याची ओळख ह्या विश्वाचा निर्माता, रक्षणकर्ता आणि संहर्ता अशीच करून द्यावी लागते. "भजनाय विभेज्येते जीवेश्वरावस्यामिति भक्तिः" अशी एक भक्तीची व्याख्या आहे. भजन करण्यासाठी जिच्यामध्ये जीव आणि ईश्वर असा भेद मानावा लागतो ती भक्ति. ह्याच भक्तिमार्गाचा उपदेश गर्गमुनि अर्जुनाला करीत आहे. याच भक्तीचे पर्यवसान पराभक्तीत आणि आत्मज्ञानात कसे होते याचे रसपूर्ण वर्णन श्रीज्ञानेश्वर महाराजांनी "**भक्त्या मामभिजानाति यावन्यश्चास्मि तत्त्वतः। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम्।।** 18:55।।" या गीतेच्या श्लोकाच्या भाष्यात केले आहे ते मुळातच वाचले पाहिजे. याच भक्तिमार्गाचा अवलंब करायला गर्गमुनीनी अर्जुनाला सांगितले आहे.

ह्या गर्गमुनींच्या उपदेशाच्या अर्जुनाच्या मनावर तात्काळ आणि तीव्र परिणाम झाला. कारण त्याचे मन पूर्वसंस्कारांमुळे 'अतीव पक्व' होते. त्याच्या मनात गर्गमुनींच्या विषयीचा कृतज्ञतेचा आणि प्रेमाचा भाव सहजच उचंबळून आला. "मुनिराज, आपण खरोखर धन्य आहांत. मला दत्तप्रभूंच्या स्मरणभक्तीला आपण लावले हा आपला मोठाच अनुग्रह मी मानतो. राज्याची धुरा सांभाळण्याची योग्यता मला लाभावी या माझ्या कामनेची पूर्ति करण्याच्या निमित्ताने आपण माझे मन दत्तभक्तीकडे वळविले याचा मला परम हर्ष होत आहे. आपण सांगितलेले दत्तचरित्र पुनःपुनः आठवून माझे मन आनंदाने भरून येत आहे. धन्य ते अत्रिमुनि! धन्य ती सती अनसूया! ज्यांनी निर्गुण निराकार परमात्मा नामरूपाला आणला. अशा त्या सर्वात्मक, पवित्र दत्तप्रभूने योगसत्र आरंभले आहे. त्यांची दिनचर्या ऐकून मी आश्चर्यचकित झालो आहे. ह्या दत्तप्रभूंची आणि देवेंद्राची भेट कशी आणि कुठे झाली? त्याने दत्तप्रभूंचे दर्शन कसे घेतले? त्यांची आराधना कशी केली? तसेच त्यांचे मन कसे वळविले? इंद्राच्या राज्याचा अपहार जंभासुराने कसा केला? इंद्राने असुरांशी युद्ध का केले? आणि इंद्राला दत्तप्रभूंनी काय वर दिला? हे सर्व अद्भुत चरित्र ऐकण्याची मला फार उत्सुकता वाटत आहे. खरोखर भगवान शंकरही कान पसरून नम्रतेने हे चरित्र ऐकणार नाहीत का? गुरुदेव, मी श्रद्धापूर्वक प्रार्थना करीत आहे, मला परमपावन दत्तचरित कान भरून ऐकवाून माझे समाधान करावे. मग मीसुद्धा (इंद्राप्रमाणेच) दत्तप्रभूंना प्रसन्न करून त्यांच्याकडून वरदान प्राप्त करीन." (97 – 107)

अर्जुनाला असे बोलतांना ऐकून गर्गमुनींना आपल्या उपदेशाचा उत्तम परिणाम झाल्याचे समजून समाधान वाटले आणि मनात श्रीदत्ताचे स्मरण करून त्यांनी अर्जुनाच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास आरंभ केला. (108)

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चौथा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]


### अध्याय ३ रा.

भूपास सांगे गर्गमुनी। देव जिंकिले दैत्यांनीं। ते दत्तापाशीं येऊनी। सेवा करूनी राहिले।।12।।
दैत्यां मूढ करून। देवांहातीं मारवून। स्वर्गी पाठविलें देवगण। पंचमाध्यायीं हें कथा।।13।।

## जंभासुराची स्वर्गावर चढाई

वेदधर्मा गुरुजी शिष्य संदीपकाला म्हणतात, ' गर्गमुनि राजा अर्जुनाला पुढे सांगू लागले, "पूर्वी पृथ्वीतलावर एक जंभासुर नांवाचा दैत्य राहात होतो. त्याने पृथ्वीच्या सर्व राजांना जिंकून भूमंडळाचा ताबा घेतला. तो जुलुमी सम्राट अजिंक्य होऊन सत्ता गाजवू लागला. पण तेवढ्याने समाधान न होऊन तो देवांना जिंकून स्वर्गाचे राज्य मिळविण्याचा विचार करू लागला. त्यासाठी त्याने आपला एक दूत देवराज इंद्राकडे पाठवला. देवांनी त्याचा प्रस्ताव नाकारल्यावर त्याने स्वर्गावर चढाई करण्याची तयारी केली. आपल्या दैत्य सैन्याची जमवाजमव करून तो स्वर्गावर चालून गेला. देवांनी हे वर्तमान इंद्राला कळवितांच तोही आपले सैन्य घेऊन जंभासुराशी युद्ध करू लागला. त्या घनघोर युद्धात इंद्राच्या सामर्थ्यापुढे सुरुवातीला दैत्यांचा टिकाव लागेना. देवांनी दैत्यांचा मोठ्या प्रमाणांत संहार केला. दैत्यसेनेत पळापळ सुरू झालेली पाहून जंभासुराने त्यांना प्रयत्नपूर्वक सावरले आणि तो देवसेनेशी दोन हात करायला सरसावला. त्याने आपल्या सैन्याच्या आघाडीवर जाऊन विविध शस्त्रांनी देवांना झोडपून जर्जर करून सोडले. त्याच्या हल्ल्याला प्रतिकार न करता आल्याने देव माघार घेऊ लागले. ते पाहून इंद्र ऐरावतावर बसून आपल्या वज्राने दैत्यसेनेचे कंदन करू लागला. असंख्य दैत्य मरू लागले; कुणाची डोकी फोड, कुणाला वाहनावरून खाली पाड, कुणाचे हातपाय तोड अशा भयंकर प्रकारे दैत्यांचा संहार करून त्याने जंभालाही वज्राघाताने मूर्च्छित केले. पण तो महाशूर जंभ लगेच स्वतःला सावरून पुन्हा युद्धाला उभा राहिला. नव्या जोमाने लढून इंद्राला जर्जर कले, सर्व देवांना पळवून लावले आणि अशा रीतीने तो विजयी झाला. अमरावतीचा ताबा घेऊन स्वतः इंद्रपदावर बसला. देवांना स्वर्गातून हाकून लावून दिक्पालांचे अधिकारही आपल्याकडे घेतले. देवांची फांकाफाक झाली. जिथे कुठे देव जातील तिथे त्यांना गाठून दैत्य त्यांच्यावर हल्ले करू लागले. शेवटी आपले जीव वाचविण्यासाठी देवांनी मेरू पर्वताच्या एका गुहेचा आसरा घेतला. 1 – 16

## दैवी आणि आसुरी संपदा.

देवासुर संग्रामाच्या अनेक कथा पोथ्यापुराणातून आपण वाचतो. अनादिकालापासून कश्यप ऋषींच्या दिति आणि अदिति या दोन पत्न्यांच्या मुलांत ही युद्धे चालू आहेत. दैत्य म्हणजे दितिपुत्र यांना असुर असेही म्हटले जाते. श्रीमद्भगवद्गीतेत १६व्या अध्यायात देवांच्या आणि असुरांच्या मनोवृत्तींचे वर्णन आले आहे. दैवी संपत्तीचे वर्णन असे आहे. अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः। दानं दमं च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्।।१।। अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम्म्।। २।। तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानता। भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत।।३।। अभय म्हणजे कुणाचीही किंवा कशाचीही भीति न वाटणे; सत्त्वसंशुद्धि म्हणजे मनाची शुद्धता किंवा प्रामाणिकता, नेकी; ज्ञानयोगव्यवस्थिति म्हणजे शास्त्राच्या ज्ञानाची आणि योगाची आवड; दान म्हणजे योग्य व्यक्तीला योग्य कारणासाठी योग्य वस्तु कोणत्याही अपेक्षेविना देणे; दम म्हणजे इंद्रियांचा निग्रह, संयम; यज्ञ म्हणजे शास्त्रांनी घालून दिलेले देवांसाठी, पितरांसाठी, ऋषींसाठी, मानवांसाठी, मानवेतर जीवांसाठी करावयाची कर्मे; स्वाध्याय म्हणजे वेद, स्मृति, पुराण, संतवाङ्मय इत्यादींचे वाचन तसेच जप; तप म्हणजे शीत-उष्ण, तहान-भूक इत्यादि द्वंद्वे सहन करणे तसेच मनाची एकाग्रता किंवा आध्यात्मिक चिंतनालासुद्धा तप म्हणतात; आर्जव म्हणजे मनाची ऋजुता किंवा सरळपणा; अहिंसा म्हणजे कुणालाही दुःख न पोंचविण्याची वृत्ती, 'शरीर-वाचा-मानसे। जगाचिये सुखोद्देशे। राहाटणे ते अहिंसे। नांव येथ।।' संत ज्ञानेश्वर; सत्य म्हणजे कोणत्याही कारणाने खोटे न बोलणे, सर्वदा खरे बोलणे; अक्रोध म्हणजे मनाविरुद्ध गोष्टी झाल्या तरी चित्ताचा क्षोभ न होणे; त्याग म्हणजे दुसऱ्याच्या

---

1 Email ID: Vasudeo@gmail.com

सुखासाठी, देशासाठी किंवा एखाद्या चांगल्या कार्यासाठी आपल्या संपत्तीचा निरपेक्ष विनियोग करणे; अपैशून्य म्हणजो इतरांची निंदा न करणे; दया म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाने चित्त द्रवून त्यांना साह्य करण्याची प्रवृत्ती; अलोलुपता म्हणजे हव्या असलेल्या विषयांच्या सान्निध्यातही इंद्रियावर ताबा असणे; मार्दव म्हणजे वागण्या-बोलण्यातील आणि मनाचा मऊपणा; अचापल्य म्हणजे शरीर आणि मनाच्या चांचल्याचा अभाव; तेज म्हणजे त्वचेची चकाकी नाही तर व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव; क्षमा म्हणजे दुसऱ्याच्या अपराधाच्या प्रतिशोधाची, बदल्याची वृत्ती नसणे; धृति किंवा धैर्य म्हणजे प्रतिकूल परिस्थितीत शरीराची आणि मनाची उभारी टिकविणे; शौच म्हणजे माती, पाणी इत्यादीनी शरीर स्वच्छ ठेवणे आणि काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आणि दंभ हे मल मनातून काढून टाकणे; अद्रोह म्हणजे 'कुणाही जिवाचा न घडो मत्सर। हेचि वर्म सर्वेश्वरपूजनाचे' (संत तुकाराम); नातिमानता स्वतःच्या मोठेपणाविषयी फार अपेक्षा नसणे, आपल्याला लोकानी मान द्यावा असा हव्यास नसणे.

दम्भो दर्पोभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च। अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम्।।1६:४।।
दम्भ म्हणजे स्वतःच्या धर्माचे, पुण्याचे, सत्कर्माचे, जपतपाचे प्रदर्शन; दर्प म्हणजे स्वतःच्या संपत्तीचा, वैभवाचा टेंभा मिरवणे किंवा बडेजाव; अभिमान (अतिमान असाही पाठ आहे) म्हणजे आपल्या असलेल्या वा नसलेल्या मोठेपणाचा अहंकार; क्रोध म्हणजे आपल्या मनासारखे न झाल्याने होणारा मनाचा क्षोभ; पारुष्य म्हणजे उद्धट, टोचून, लागट आणि निष्ठुरपणे बोलणे; अज्ञान म्हणजे वस्तुस्थितीच्या विपरीत कल्पना करून तेच खरे मानणे. हे गुण किंवा दुर्गुण ज्यांच्यात जन्मजातच आहेत ते आसुरी संपत्तीचे धनी आहेत असे भगवान सांगतात. दैवी संपत्तीच्या तुलनेत आसुरी संपत्तीचे वर्णन थोडे संक्षिप्त असले तरी दैवी संपत्तीतील गुणांच्या उलट गुणांचा समावेश त्यांत करता येईल. उदाहरणार्थ क्रोधाप्रमाणेच द्रोह, अतिमानता, लोलूपता, पैशून्य इत्यादि गुण आसुरी संपत्तीचेच आहेत.

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की दैवी आणि आसुरी या दोन प्रवृत्ती आहेत. या दोन प्रवृत्तीत नेहमीच द्वंद्व चालू असते. जगात ह्या दोन प्रवृत्तीने प्रभावित व्यक्ति, समाज, देश आणि संघ परस्परांशी झगडत असतात. त्याचप्रमाणे मानवी मनांतही ह्या दोन प्रवृत्तींचे युद्ध चालूच असते. संत तुकारामांच्या शब्दात सांगायचे तर 'रात्रंदिस आम्हा युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन.' पुराणात वर्णन केलेल्या संग्रामांच्या कथांचा मुख्य उद्देश्य आपल्याला ह्या प्रवृत्तींची स्वरूपे यथार्थतेने कळावीत आणि आपल्या मनातील आसुरी प्रवृत्तींचे दमन करून दैवी संपत्तीचा परिपोष करण्यास त्याचे साह्य व्हावे हाच आहे. हे ध्यानात ठेवूनच आपण ह्या गोष्टीतून बोध घेणे आवश्यक आहे. गीतेतच पुढे स्पष्ट केले आहे की दैवी संपदा मोक्षाला कारण होते आणि आसुरी संपदा बंधनाला कारण होते. (दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता।।१६:५।।) वेदांतप्रणीत ज्ञानयोगाच्या अधिकारासाठी जे साधनचतुष्टय आवश्यक असेत त्यात दैवी संपत्तीचा संग्रह महत्त्वाचा आहे.

### जंभासुराचे तप.

जंभासुर हा तर पृथ्वीवरच उत्पन्न झालेला आहे. परमेश्वराच्या या सृष्टीत सर्व जीवांना कर्मानुसारच गति आहे. आपण केलेल्या कर्मसंचयातूनच आपला नवा जन्म निश्चित होतो. पुण्यकर्माच्या तारतम्यानेच देव, राक्षस इत्यादि योनी मिळतात. त्यानुसारच बल, बुद्धि, आयु, भोग, यश ह्या सर्वांची मात्रा निश्चित होते. देवामध्येसुद्धा पुण्याच्या प्रमाणात कमी-जास्त अधिकार, भोग इत्यादि मिळतात. तिथे साम्यवादाला वाव नाही. १०० अश्वमेध करणाराच इंद्र होतो. त्याचप्रमाणे विशिष्ट पुण्यकर्मांच्या संग्रहाने दिक्पालादि पदे जीवांना मिळतात. केवळ आपल्यापेक्षा अधिक बलवान, संपन्न किंवा अधिकारी आहे म्हणून कुणाचा तरी द्रोह करणे, त्याच्या संपत्तीचा लोभ धरणे, त्याचा प्रसंगी घात करून त्यांचा अपहार करणे ह्या सर्व आसुरी प्रवृत्ती आहेत. त्यानुसारच जंभाने आपल्या सामर्थ्याचा विनियोग केला म्हणूनच तो असुर ठरतो. इंद्रपदच मिळवायचे तर त्यालाही शंभर अश्वमेध करता आले असते. पण तसे करण्याइतका संयम व धीर हे दैवी संपदेचे गुण त्याच्याकडे नसल्याने त्याने बलाचा दुरुपयोग करून दुसऱ्याच्या हक्काचे पद हिसकावून घेणे त्याने पसंत केले. इंद्राच्या वज्राला न जुमानणारे सामर्थ्य त्याने भगवान शंकरांकडून आपल्या तपाच्या प्रभावाने मिळविले होते. त्याचा पुढे उल्लेख आहे. याचा अर्थ असुरही तपश्चर्या करतात. पण त्यांचे तपही आसुरीच असते..
आत्मसंभाविताः स्तब्धाः धनमानमदान्विताः। यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्।।१६:१७।।
आपल्याच मोठेपणाचा टेंभा मिरवीत, धनदांडगेपणाने, औद्धत्यपूर्ण वर्तनाने, विधीचा फारसा विचार न

करता केवळ नावापुरताच यज्ञ, अनुष्ठान किंवा कर्म ते करतात. १७व्या अध्यायात राजस व तामस तपांचे वर्णन आहे. सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत्। क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम्।। १७:१८।। आपला उदो उदो व्हावा, लोकांत मानमान्यता मिळावी म्हणून गाजावाजा करीत जे तप केले जाते ते राजस होय. अशा तपाचे फळ तात्पुरते आणि अस्थिर असते. त्याचप्रमाणे काही तरी विपरीत कल्पनेने, स्वतःला ताप करून घेऊन, इतरांच्या नाशासाठी केलेले तप तामस म्हटले आहे. मूढग्रहेण आत्मनो पीडया क्रियते तपः। परस्योत्सादनार्थं तत्तामसमुदाहृतम्।। १७:१९।। प्रायः असुर, दानव, दैत्य आदि अशा प्रकारे तप करताना आढळतात. हिरण्यकशिपु, रावण, कुंभकर्ण इत्यदींच्या तपांची वर्णने बहुतेकांच्या परिचयाची आहेत. जंभासुराने स्वर्गाच्या प्राप्तीकरता असेच तप केले. भगवान शंकरांनी त्याला वरही दिला. त्याच्या बळावरच त्याने काही काळ स्वर्गावर सत्ता गाजवली आणि इंद्रादिक देवतांना परागंदा केले.

## दत्तप्रभूना शरण जाण्याचा बृहस्पतींचा उपदेश.

अखेर या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी देवगण गुरु बृहस्पतीना शरण गेले. दीन आणि दुःखातुर झालेल्या देवांनी आपली दुरवस्था गुरूंना निवेदन केली. ते म्हणाले, “आमचे शत्रू आम्हांला वरचढ झाले आहेत. आम्ही त्यांच्यापुढे निर्बल झालो आहो. आमची बुद्धि खचली आहे. आपणच आम्हाला यांतून बाहेर पडण्याचा उपाय सांगावा.” बृहस्पतीनी इंद्राची समजूत घातली. ते म्हणाले, “ज्या ज्या वेळी जे जे घडायचे ते घडतच असते. दैवापुढे कुणाचेही चालत नाही. आतां तुम्ही लवकर सह्याद्री पर्वतावर जा. तिथे अत्रिपुत्र भगवान दत्तात्रेय राहतात.” तप हेच धन असलेला तो दत्त परमात्मा शरणागतांचे रक्षण करतो. तो दीनांचा आश्रय असलेला प्रभूच आपल्या कृपाकटाक्षाने तुमचे दुःख दूर करील. पण ध्यानात ठेवा, जो धैर्याने त्याची सेवा करतो त्याच्यावरच तो कृपा करतो. तेव्हा सेवाभाव धारण करून तुम्ही तात्काळ सह्याद्रीच्या वाटेला लागा. १७ - २२

## श्रद्धा आणि सबूरी.

“कालेनुकूले प्रतीपे ना स्वैः सद्भिश्च युज्यते।" असे श्रीस्वामी महाराजांनीच द्विसाहस्री गुरुचरितात म्हटले आहे. अनुकूल काळ असेल तेव्हा आप्त इष्ट जमा होतात; प्रतिकूल काळांत मात्र साधु, संत, गुरु यांचाच आश्रय असतो. त्याप्रमाणे देवांनी आपल्या संकटकाळी गुरूंकडे धांव घेतली हे ठीकच झाले. आपला चांगला काळ असतो त्यावेळी ते आपणच आपल्या कर्माने मिळवले आहे ह्याविषयी आपल्या मनात यत्किंचतही शंका नसते. तोच काळ बदलून वाईट झाला की मात्र आपण दैवाला बोल लावतो. पण हे दैवसुद्धा आपल्याच कर्माचे फळ आहे हे गुरूनीच सांगावे लागते. अशा वेळी साधुसंत आणि गुरु परमेश्वरालाच शरण जाण्याचा उपदेश करतात आणि परमेश्वराची कृपा संपादन करण्याचा मार्गही दाखवतात. गर्गमुनीनी अर्जुनाला आणि आता बृहस्पतीनी इंद्राला तीच वाट दाखविली आहे. ईश्वरोपासनेत निष्ठा, धैर्य आणि चिकाटी यांचे महत्त्व दोघांनीही दाखवून दिले आहे. 'तुका म्हणे नाही चालत तातडी, प्राप्त काळघडी आल्याविणे' हे संतवचन तसेच श्रद्धा आणि सबूरी यांविषयीचा साईबाबांचा आग्रह हेच सांगत आहेत.

## कृपाळूपणे स्वल्प धारिष्ट पाहे.

गुरूंची आज्ञा घेऊन इंद्रादिक देव लगेच निघून सह्याद्रीच्या शिखरावर श्रीदत्तप्रभूंच्या आश्रमात आले. सर्वांनी त्या भगवंताला साष्टांग प्रणिपात केले आणि ती आजानुबाहू, त्रिभुवनमनोहर, अतर्क्य (मन-बुद्धीला अगोचर) मूर्ति डोळ्यांत सांठवून घेतली. विकसित कमळासारखे ते प्रसन्न मुख, शंखाच्या आकाराचा तीन रेखांनी अंकित कंठ आणि ती कमनीय देहाकृति पाहून त्यांचे मन अमाप सुखाने भरून गेले. त्या वेळी दत्तप्रभूंनी एका सुंदर युवतीला मांडीवर घेतले होते आणि प्रेमभराने तिला कवटाळून तिचे ते वारंवार चुंबन घेत होते. अनघ म्हणजे निष्पाप (अपापविद्ध) अशा त्या दत्ताने त्या अनघा नावाच्या स्त्रीला जवळ घेतले होते आणि धुंद आणि आसक्त होऊन तिला मद्यपानाचा आग्रह करीत होते. त्यांची ही अवस्था पाहून देवांनी दुरूनच त्यांना पुन्हा साष्टांग नमस्कार घातला आणि निमूटपणे एका बाजूला उभे राहिले. पण दत्तांनी मात्र त्यांच्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. देवगण मात्र एकाग्रचित्ताने दत्तप्रभूंकडे पहात, ते चालू लागले की चालावे, उभे राहिले की उभे राहावे, पुनःपुन नमस्कार करावे अशा रीतीने सेवा करीत होते. असा खूपसा काळ गेला पण दत्ताने ना त्यांची दखल

घेतली ना त्यांची विचारपूस केली. त्यामुळे निराश आणि खिन्न झालेले देव मनोमन आपलीच निर्भर्त्सना करू लागले. “आमचा धिक्कार असो. आमच्याजवळ ना तपाचे सामर्थ्य आहे ना भावभक्तीचे! म्हणूनच भक्तरक्षक दत्तप्रभू आमची उपेक्षा करीत आहेत.!! असो. आतां आम्ही दत्तप्रभूंची कृपा होईपर्यंत हलणार नाही. मग आमचे देह इथेच पडले तरी बेहत्तर.” असा दृढ निश्चय करून त्यांनी आपली सेवा नेटाने चालू ठेवली. २३ - ३२.

ईश्वर आपल्या योगमायेच्या आश्रयाने स्वेच्छेने तिच्या अधिकारकक्षेत येतो. त्यावेळीही त्याचे सर्वतंत्रस्वातंत्र्य, कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् सामर्थ्य अकुंठित असते. मायेचे नियम कितपत पाळायचे हे केवळ त्याच्या इच्छेवर आहे. श्रीदत्तप्रभूंच्या ह्या मानवी मनाला संभ्रमात टाकणाऱ्या लीलांविषयी आपण याआधीच विचार केला आहे. देवांच्या येण्याचे कारण त्यांना माहीत होते. त्यांना पाहून न पाहिल्यासारखे करण्यात यांच्या धैर्याच्या परीक्षेचाच हेतु होता.

' भगवान सर्वज्ञ आहेत. सगळ्यांच्या मनातले जाणतात. असे आहे तर मग त्यांना परीक्षा पहाण्याची काय आवश्यकता आहे?' असा प्रश्न साहजिकच मनात येतो. ईश्वर सर्वांतर्यामी आहे. सर्वांचे हृद्गत त्यांच्याहूनही चांगले तो जाणतो, हे खरेच आहे. तरीही आपण बऱ्याच भक्तांच्या कथा ऐकताना त्यांच्या अति कठोर परीक्षा देवांनी घेतल्याचे ऐकतो, वाचतो. ह्याचे कारण असे आहे की परमेश्वराला भक्तावर जेव्हा कृपा करायची असते त्यावेळी त्या भक्ताचेच अदृष्ट त्याला प्रतिबंध करीत असते. भक्ताच्या त्या प्रतिकूल कर्माचा अडसर दूर करण्याची प्रक्रिया म्हणजेच त्याची परीक्षा होय. ही परमेश्वराला भक्ताच्या भावाची खात्री पटविण्यासाठी नसते. देवाला भक्ताचा भाव उत्तम अवगत असतो. पण सृष्टीच्या निर्मितीच्या मुळाशी जो कर्मसिद्धांत आहे त्याच्या कक्षेतच शक्य तो ईश्वराचे कार्य चालत असते. त्याला कर्मगतीचे नियम बंधनकारक नसले तरी मायेच्या प्रांतात असतांना मायेचे दंडक साधारणतः तो मोडत नाही. तेवढ्यासाठी त्या प्रतिकूल कर्माचा भोग त्या भक्ताला किंवा भक्तांना भोगवूनच संपवावा लागतो. हे आपल्याला सकृद्दर्शनी कितीही कठोर वाटले तरी भगवंत ते दयार्द्र चित्ताने करीत असतात. म्हणूनच समर्थांनी सांगितले आहे, “सदासर्वदा देव सन्नीध आहे, कृपाळूपणे स्वल्प धारिष्ट पाहे।।" हाच अनुभव इथे इंद्रादिक देवतांना आला आहे. अशा रीतीने प्रारब्धदोषांचा निचरा होत असतांना साहजिकच भक्ताचा भाव दृढ होत असतो. जसजसा भाव पक्का होत जातो तसतसा परमेश्वरकृपेचा क्षण निकट येत असतो.

### देवांची विनवणी.

त्यांचा भाव आतां दृढ झाला आहे असे जाणून दत्तप्रभूंनी त्यांच्याशी बोलायला आरंभ केला. “अरे! इंद्रादिक देवांनो, तुम्ही स्वर्ग सोडून इथे कसे आलां? आणि तुमचे चेहरे असे सुकलेले का आहेत? तुमचा कुणी पराभव तर केला नाही ना?” भगवंतानी विचारणा केल्यावर देवांना हायसे वाटले आणि ते सांगू लागले, “देवाधिदेवा, आपण सर्वज्ञ आहांत. आपल्याला सर्व ठाऊकच आहे. जंभ नांवाचा दैत्य त्याला मिळालेल्या ऐश्वर्याने उन्मत्त झाला आहे.. त्याने शंकरांची उपासना करून मिळवलेल्या सामर्थ्याने आमचा स्वर्ग हिरावून घेतला आहे. तिथे आता दैत्य राहात आहेत. आमचे यज्ञभागही तोच भोगतो आहे. आमचे सर्व अधिकारही त्याने हिरावून घतले आहेत. शंकरांच्या वराच्या प्रभावाने त्याच्यावर शस्त्रे चालत नाहीत. तो अजिंक्य झाला आहे. आतां आम्ही काय करावे?कुठे जावे? हे परमेश्वरा, आता आम्हाला तुमचाच एक आधार आहे. अखिल ब्रह्मांडाला क्षणार्धात जाळून टाकणे आपल्याला सहज शक्य आहे. एका दैत्याचे पारिपत्य करणे आपल्याला काय अवघड आहे? भगवंता, आतां उशीर लावू नका. आम्ही पदभ्रष्ट होऊन दीनपणे स्वर्ग सोडून भूतलावर संचार करीत आहो. आपल्या ह्या दासांवर कृपा करा. आम्ही तुमचे भक्त आहोत. आम्हाला दुसरी काहीच गति नाही. म्हणून आम्ही आपले चरण धरले आहेत. दयावंत होऊन आमचे रक्षण करा. ह्या दुःखापासून आम्हाला आता सोडवा.“ ३३ -४२.

## दत्तात्रेयांचे कूट बोलणे आणि देवांचे उत्तर.

यावर दत्तप्रभू खदखदा हंसू लागले. ते म्हणाले, “देवांनो! तुम्हाला दिसत नाही का? स्त्रीचे उष्टे खाऊन मी भ्रष्ट झालो आहे. तिच्या उष्ट्या मद्याच्या सेवनाने मी दूषित झालो आहे. असा मी मद्यासक्त हे, माझा माझ्यावर ताबा नाही. ही माझी स्थिति पाहूनही तुम्हाला माझ्यापासून कांही लाभ होईल असे वाटते? उगीच तुम्ही इथे येण्याचे कष्ट घेतले. इथे वेळ वाया घालवण्यापेक्षा तुम्ही लवकर दुसऱ्या

कुणा योग्य पुरुषाकडे जा. पहा ना, स्त्रीचा संग पतनाला कारण होतो. स्त्रीशी संभोग केल्याने भयंकर दुःखाला सामोरे जावे लागते. मी तर तिचे उच्छिष्ट पिऊन भ्रष्ट झालो. आतां धर्माधर्माची आणि पापपुण्याची चाड नसणाऱ्या माझी पुढे काय गति होईल कोण जाणे? " हे दत्ताचे बोलणे ऐकून देवांना गुरु बृहस्पतींचा उपदेश आठवला. दत्तप्रभूंचे बोलणे कूट आहे हे जाणून देवांनी पुनश्च त्यांना वंदन करून बोलायला आरंभ केला. "आपले बोलणे यथार्थ आहे, महाराज! आपल्या मांडीवरील ही स्त्री आपली योगमायाच आहे. हे सर्व जगत या मायेने रचलेले असल्याने तिचे उच्छिष्टच आहे. आपला अंश असलेला जीव त्याच्या संपर्काने आपल्या सच्चिदानंदस्वरूपापासून भ्रष्ट होतो. मोह आणि प्रमादरूपी मद्याचा स्वाद घेणाऱ्या जीवाची तीच गति आहे. आपण तर सर्वतंत्रस्वतंत्र ईश्वर आहां. आपल्याला कोणत्याच पापाचा - अघाचा स्पर्शसुद्धा होत नाही. अशा अनघाची - आपली शक्ति ही अनघा आहे. ही विद्या माया आपल्यापासून अभिन्न आहे. सूर्याचा प्रकाश ब्राह्मण आणि चांडाळ अशा सर्वांनाच स्पर्श करतो त्याचा त्याला विटाळ होतो काय? तसेच आपल्याला पाप किंवा पुण्य दोन्हीही लिप्त होत नाहीत. जीवभावाला प्राप्त झालेल्या जीवांसाठी धर्माधर्माचे विधान आहे. आपल्या अनुग्रहाने आत्मज्ञान झालेल्यांच्यासुद्धा पापपुण्याचा निवाडा कोण करू धजेल? मग आपल्या ठायी तर तो विचारच अप्रस्तुत आहे. "४३ - ५२

इतकी परीक्षा होऊनही दत्तात्रेयांनी आपले स्वरूप लगेच प्रकट केले नाही. देवांची चित्तशुद्धि झाली आहे. त्यांचा भावही दृढ झाला आहे. मग दत्तप्रभु हे कोडे त्यांना का घालताहेत? ह्याचा अर्थ इतकाच आहे की देवांची पुण्याई अजूनही कमी पडते आहे. तिची भरपाई करण्यासाठी त्यांच्याकडून आपली स्तुति दत्ताला करून घ्यायची आहे. देवाला स्तुति प्रिय असण्यामागचे रहस्य हेच आहे. वाचा किंवा मनाच्या पलीकडे असणाऱ्या देवाची कोण आणि कशी स्तुति करू शकेल? पण तरीही ते ईश्वराला प्रसन्न करण्याचे एक प्रमुख साधन आहे. कलियुगांत तर ईश्वराचे गुणगान हेच सर्वश्रेष्ठ साधन आहे. ह्या गुणगानाने अमाप पुण्य लाभते. अशी स्तुति त्या देवतांकडून घडावी म्हणूनच दत्तप्रभूंनी आपली योग्यताच नसल्याचा दावा केला आहे. त्यांच्याच कृपेनेच देवांना त्यांच्या बोलण्याचे रहस्य लक्षात आले आणि त्यांनी त्यांच्या औपनिषद स्वरूपाचे प्रतिपादन करणारी स्तुति करून त्यांची कृपा संपादन केली.

### दत्तप्रभूंचे देवांना **मार्गदर्शन.**

देवांचे हे निश्चयाचे बोलणे ऐकून दत्त म्हणाले, "असा जर तुमचा निर्धार झाला असेल तर मग चिंता सोडा. तुमचे दुःख गेलेच म्हणून समजा. तसेच तुम्हाला उत्तम गतीही लाभेल. जा तुम्ही आतां तुमच्या शत्रूंना जाऊन भिडा आणि युद्ध करून त्यांना इथे घेऊन या. मी त्यांना तात्काळ सामर्थ्यहीन करून टाकतो." ह्या आश्वासक बोलण्याने देवांनी दैत्यांवर चढाई केली. दैत्यांनी त्यांना खूप मार दिला. देव पळत सुटले आणि दैत्य आपल्या पाठीमागे लागले आहेत ह्याची खातरजमा करीत ते दत्ताच्या आश्रमाकडे आले. त्यांच्या मागावर लागलेले दैत्य आश्रमात आले आणि त्यांची दृष्टी अनघेवर पडली. ते स्त्रीरत्न पाहून दैत्य लुब्ध झाले. कांचन आणि कामिनी यांना पाहून ज्याला भुरळ पडत नाही तो जीवन्मुक्तच जाणावा. जिचे सर्व अवयव सुंदर आहेत, डोळे कमलदलाप्रमाणे विशाल आहेत, मुख कमलपुष्पासारखे प्रफुल्ल आहे, पिकलेल्या तोंडल्यासारखे लाल चुटुक ओठ आहेत, हिऱ्यासारखे चमकदार दात आहेत, स्तन म्हणजे जणू सोन्याचे घडे आहेत, अशा अवर्णनीय सौंदर्याची पुतळीच अशी ती लोभस नारी दत्ताच्या मांडीवर बसलेली बघून लालचावलेल्या दैत्यांना तिची अभिलाषा उत्पन्न झाली आणि ते कामातुर झाले. आपल्याला विनासायास असे अनुपम स्त्रीरत्न मिळाल्याने ते हरखून गेले. "आमचे शत्रू तर दुर्बळ आहेत. आमच्या मागे आले तर फुकट मरतील." असा विचार करून त्यांनी अनघेला दत्ताच्या मांडीवरून उचलले आणि तिला आपल्या डोक्यावर पालखीत बसवून निघून गेले. ५३ - ६५.

असुरांच्या नाशाची बीजे त्यांच्या आसुरी वृत्तीतच आहेत हे जाणणाऱ्या दत्तप्रभूंनी त्यांच्या स्त्रीलोलुपतेचा उपयोग त्यांच्या नाशासाठी केला आहे. 'अलोलुप्त्वं' हा दैवी संपत्तीचा भाग आहे. दैत्य मात्र ऐंद्रिय आकर्षणाला सहज भुलतात. त्यांनी बलाने पळविलेला अमृतघटसुद्धा भगवान विष्णूंनी मोहिनीचा अवतार घेऊन असाच त्यांच्याकडून परत मिळविल्याची कथा प्रसिद्ध आहे. हवा असलेला विषय समोर येतांच लुब्ध होऊन धर्माधर्माचा विवेक न राहण्याचा दैत्यांचा स्वभाव त्यांना विनाशाकडे नेतो. आपल्या मनातील अशा आसुरी प्रवृत्तींना आपण थारा देऊ नये हाच महत्त्वाचा धडा आपल्याला

शिकायचा आहे.

## देवांचा दैत्यांवर विजय.

हा प्रकार पाहून देव एकदम स्तब्ध झाले. त्यांच्या तोंडून अक्षरही फुटेना. दत्त म्हणाले, “अहो बघा, त्यांनी माझी पत्नी नेली! सर्व पापांत परस्त्रीचा स्पर्श हे महापाप आहे. त्याने क्षणार्धात दैत्यांचे कुळ निःशेष जळून जाईल. यांनी केलेल्या ह्या महापातकाच्या कलंकाने ह्यांचे सामर्थ्य आणि ऐश्वर्य नष्ट होऊन जाईल. हे आता इहलोक आणि परलोक यांपासून भ्रष्ट झाले आहेत. ही माझी शक्ति अनघा साक्षात् लक्ष्मी आहे. तिला डोक्यावर घेऊन यांनी मोठीच चूक केली आहे. ती त्यांची शिरे तोडूनच परतेल. हे दैत्य आता मेल्यासारखेच झाले आहेत. तुम्ही खुशाल त्यांच्याशी लढा. ते तुमच्या केसालाही धक्का लावू शकणार नाहीत. तुम्ही केवळ निमित्त मात्र व्हा. लवकर उठा, वेळ लावू नका. मनात यत्किंचितही भय न बाळगतां दैत्यांवर चालून जा.” या दत्तप्रभूंच्या वचनावर विश्वास ठेवून देवगण त्वेषाने उठले आणि दैत्यांवर धावून गेले. त्यांनी आपल्या शस्त्रांनी दैत्यांचा संहार आरंभिला. परांगनास्पर्शाच्या महापापाने निस्तेज झालेले ते महामूर्ख दैत्य प्रतिकारासाठी आपले हातसुद्धा उचलू शकले नाहीत. त्यांचे सगळे सामर्थ्य नष्टप्राय झाले. त्यांना अस्त्रांचे मंत्रही आठवेनात. अशा रीतीने श्रीदत्तकृपेने सर्व असुरांचा संहार होऊन देवांना थोड्याच वेळांत विजयश्री प्राप्त झाली. असुरांपासून मुक्त झालेली अनघा शक्ति परत येऊन दत्तप्रभूंच्या मांडीवर विराजली आणि प्रेमाने त्यांचे चुंबन घेऊ लागली. एवढ्यांत देवगण तिथे येऊन ठेपले आणि सर्वांनी दत्ताला साष्टांग नमन केले. तेव्हा त्यांचे अभिनंदन करीत दत्त बोलले, "देव हो! तुम्ही आज दैत्यांशी घनघोर युद्ध करून मोठाच विजय मिळवला आहे. तुम्ही उभारलेल्या या विजयपताकेने आज धन्य झाला आहात. आज तुम्ही माझ्या स्त्रीला मुक्त करून माझीही लाज राखली. हे शूरवीर अमरहो, तुमचे किती उपकार मानावेत? पण ते उपकार परत फेडायची इच्छा मी करीत नाहीत. ते माझ्यांतच जिरून जावोत.”66 – 82.

जंभादि दैत्यांना परस्त्रीस्पर्शाच्या पापाला प्रवृत्त करून त्यांच्या सामर्थ्याचे शोषण करूनच काम झाले नाही तर त्यांचा पुरा निःपात केला पाहिजे याकरतां त्यांना अनघेला पालखीत घालून डोक्यावर घ्यायची बुद्धि दिली आहे. इथे दत्तपुराणात खालील श्लोक आले आहेत.

श्रीः पदगाऽऽलयदात्री सक्थिगतांशुकदात्री।। गुह्यगता प्रमदादा क्रोडगतार्भकदा चेत्।।26।।
चेद्धृदि कामितदात्री कण्ठगता वसुदात्री।। चेन्मुखगाऽशनवाग्दा मूर्धगता तु शिरोदा।।27।।
तन्मूर्धगाऽधुनेयं श्रीः शीर्षाण्युत्कृत्य सत्वरम्।। आयास्यत्यत्र नैवात्र शङ्का ह्येते मतोपमाः।।28।।

लक्ष्मी पायात धारण केली तर निवासासाठी घर मिळते, छातीवर घेतली वस्त्रांचा लाभ होतो, तीच गुह्येंद्रियांत असेल तर स्त्रीलाभ होतो, बाहूंवर संतानकारक, हृदयस्थानी इच्छापूरक, कंठात धनदायक, मुखात भोजन किंवा वाचा देणारी आणि मस्तकावर शिरच्छेदाला कारण होते. या मूर्खांनी तिला डोक्यावर घेतली आहे. ती खचितच त्यांची मस्तके तोडूनच परतेल यांत काहीच संशय नाही. तेव्हा हे दैत्य आता मेल्यातच जमा आहेत. अशा प्रकारे दत्तप्रभूंनी देवांचा विजय निश्चित केला आणि मगच त्याना युद्धाला पाठविले. पण जेव्हा देव विजयध्वजा मिरवीत आले तेव्हा मात्र आपला त्यांच्याशी काही संबंधच नसल्याचे त्यांनी भासविले. देवांच्या मनातला कृतज्ञतेचा भाव जागवून त्यांची भक्ति दृढ करण्यासाठी ही लीला केली आहे. देवांचे उपकार फेडण्याची इच्छा दत्तप्रभू करीत नाहीत. ते उपकार आपल्यातच जिरून जावोत हे त्यांचे बोलणे विचारात घेण्यासारखे आहे. रामायणात मारुतीरायांना श्रीरामचंद्रप्रभूंनी असेच म्हटले आहे. उपकारांची परतफेड करायची तर उपकारकर्त्यावर कांही तरी संकट यावे, त्याला कशाची तरी गरज उत्पन्न व्हावी असे चिंतण्यासारखे आहे. असे अनिष्ट चिंतन घडू नये एवढ्यासाठी दत्त आणि रामचंद्र हे उपकार आपल्यातच जिरून जावे असा संकल्प करीत आहे. उपकारकर्त्याला आपल्या प्रत्युपकाराची आवश्यकताच कधी निर्माण होऊ नये अभीष्ट चिंतन त्यांत अभिप्रेत आहे.

हे दत्तांचे बोलणे ऐकून सुरगण आश्चर्याने थक्क झाले. दत्तांच्या चरणी वारंवार वंदन करीत ते सद्गदित कंठाने बोलू लागले. “हे जनार्दना, आपल्याला पुनःपुनः नमस्कार असो. स्वतःच सर्व कार्य संपन्न करून आपण ह्या कोड्यातल्या बोलण्याने आम्हाला मोहात टाकीत आहात. आम्हाला बंधनात टाकणाऱ्या अजिंक्य दैत्यांचा आमच्या हातूनच निःपात आपणच करविला. ही आमची शक्ति नव्हे. आमच्या कठपुतळ्या करून आपण सूत्रधाराप्रमाणे आमच्याकडून विजयश्री प्राप्त करविली. आमची बुद्धि ती केवढी, आमचे सामर्थ्य ते कितीसे? आमच्या मनात तर तुझी थोडीसुद्धा भक्ती नाही. असे असूनही

तूच आमची दैत्यापासून सुटका केलीस. तूच खरोखर स्वतंत्र आहेस. तुझ्याकडून कर्माच्या दोरीने बांधले जाऊन मायेच्या फेऱ्यात फिरविले जाणारे आम्ही मात्र परतंत्र आहोत. तुझे आदि आणि अंत जाणण्यास आम्ही असमर्थ आहो. तुला दोन्ही हात जोडून हे शरीर भूमीवर टाकून, मस्तक तुझ्या पायावर ठेवणेच आम्हाला शक्य आहे." ह्यानंतर त्या सर्व देवांनी अर्थपूर्ण नांवानी दत्तप्रभूंची स्तुति केली आहे. "आमचे भय निवारण करणाऱ्या, भक्तांच्या मनाप्रमाणे वागणाऱ्या, आपल्या चरणी विनीत झालेल्यांना संसारसागरातून तारणाऱ्या, मानवरूप धारण करून त्यांच्यासारखे वर्तन करणाऱ्या, दयार्द्र हृदयाने सर्वत्र विचरणाऱ्या, आपल्याला शरण आलेल्यांचे सदैव रक्षण करणाऱ्या, भक्तांच्या चित्ताची चोरी करणाऱ्या देवा, तुझा जयजयकार! तुला वारंवार नमस्कार असो." दत्तात्रेयाने ह्या स्तवनाने प्रसन्न होऊन देवांना कर्तव्यदक्ष राहून स्वर्गसुखाचा उपभोग घ्यायला सांगितले आणि म्हणाले, "मी तुमच्यावर प्रसन्न आहे. तुम्हाला हवा तो वर मागून घ्या. मी माझ्या भक्तांच्या सततच निकट असतो. त्यांना काय कमी आहे? " यावर नम्रपणे देवांनी हाच वर मागितला की, "आम्हाला रात्रंदिवस आपली प्रेमपूर्ण भक्ति द्यावी." मग अनायास संकटातून सुटलेले ते देवगण दत्तचरणांना वंदन करून त्यांचे चिंतन करीतच स्वर्गभुवनाला गेले आणि आपापल्या पदावर स्थानापन्न झाले. आतासुद्धा आनंद आणि प्रेमाने भरलेल्या चित्ताने इंद्र प्रतिदिन योगिराज दत्तप्रभूंच्या दर्शनाला येत असतो. ८३ - ९६.

## हेचि दान दे गा देवा

देवांनी दत्ताकडून वर म्हणून त्यांच्या चरणांची भक्तीच मागून घेतली हे त्यांच्यावर असलेल्या पूर्ण कृपेचे द्योतक आहे. देव प्रथम आर्त होऊन प्रभूंच्या आश्रयाला आले होते. त्यांच्या सद्भावावर प्रसन्न होऊन भगवंताने त्यांचे संकट दूर केले. त्याच वेळी त्यांच्या मनातील भक्ति शुद्ध करण्याची प्रक्रिया चालू होती. देवांनी "हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा।" हे खऱ्या भक्ताचे मागणेच मागितले आहे. हीच भक्तीच्या साधनेची परिपूर्णता आहे. मुक्ति, संपदा, स्वर्गाचे वैभवही देवाच्या भक्तीपुढे गौण वाटणे हेच भक्तीचे अंतिम फळ आहे. ह्याच अहैतुकी भक्तीची याचना श्रीगुरुचरणी करून आपण हे देवविजयाचे आख्यान संपूर्ण करू या.

## अर्जुनाचे दत्ताश्रमात आगमन.

हा कथाभाग सांगून झाल्यावर गर्ग अर्जुनाला म्हणाले, "ही तुझ्या मनात उदभवलेली दत्तदर्शनाची इच्छा फार उत्तम आहे. लवकर जाऊन त्यांचे पाय धर. ते तुझ्या सर्व कामना पुरवतील. निःशंक मनाने पूर्ण श्रद्धेने त्यांचे पाय धरायचा हा उपाय वेदांनीच सांगितला आहे. त्याने कसा काही अपाय होईल? " गर्गमुनींच्या भाषणाने अर्जुनाचे मन भक्तिभावाने भरून आले. सद्गदित वाचेने तो गर्गमुनीना धन्यवाद देत म्हणाला, "आपण धन्य आहात. आपण माझ्या हृदयात दत्तचरणांची भक्ति उपजविली! आता मला आज्ञा द्यावी, मी दत्तदर्शनासाठी उत्सुक झालो आहे. मला शीघ्र दत्तचरणांचे दर्शन घडावे असा वर मला आपण द्या." गर्गमुनीनी तथास्तु म्हणताच अर्जुनाने एकट्यानेच सह्याद्रीची वाट धरली. सह्याद्रीच्या शिखरावर पोंचतांच तेथील झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यांच्या स्वराने, शीतल आणि मंद वाऱ्याच्या स्पर्शाने, कोकिळांच्या मधुर कूजनाने, घनदाट वनराईने, पक्ष्यांच्या किलबिलाटाने मोहून गेला. फळाफुलांनी बहरलेल्या त्या वनांत वाघ आणि गाई वैरभाव विसरून एकमेकांशी खेळतांना त्याला दिसल्या. अशा त्या नंदनवनाप्रमाणे शोभणाऱ्या आश्रमात येऊन त्यांने अत्रिनंदन दत्ताच्या चरणांचे दर्शन घेतले. त्या दर्शनाने उल्हसित आणि चकित झालेल्या राजाच्या चित्ताचे वर्णन दीपकाला गुरु वेदधर्मानी सांगितले.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पाचवा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]


### अध्याय ६ वा.

**समूळ होऊनी भक्तीरसें। दत्ता अर्जुन भेटतसे। दत्त बीभत्सरूप दावीतसे। न विटतसे अर्जुन।।१४।।**
**दत्तें मनोरथ पुरवितां। अर्जुन बसे गादीवरता। त्याच्या राज्याची व्यवस्था। षष्ठाध्यायीं वर्णिली।।१५।।**

## दत्ताश्रमात अर्जुनाचा प्रवेश

गुरु वेदधर्मा संदीपक शिष्याला म्हणाले, योगभ्रष्ट पुत्राने आपल्या वडिलांना जे सांगितले तेच मी तुला सांगत आहे. अर्जुन सह्याद्रीवर गेल्यावर त्याला तिथे दत्तप्रभूंच्या पायाचे ठसे उमटलेले दिसले. वज्र, अंकुश, पताका आणि कमळ या चिह्नांनी सुशोभित ते ठसे पाहून अर्जुनाचे मन भरून आले, अंगावर सरसरून कांटा आला आणि डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. मन स्तब्ध होऊन इंद्रियांची चळवळ थांबली. बुद्धीला शुद्धता आली आणि अर्जुनाचे अंतर्बाह्य भान हरपले. आपपर द्वैत निमाले. योग्यांनाही अगम्य अशी ही अवस्था त्याला केवळ त्या पावलांच्या ठशांनीच प्राप्त झाली. प्रारब्धाच्या योगानेच तो कसाबसा भानावर आला आणि त्या पावलांना साष्टाग नमस्कार करून तिथली माती अंगावर घेऊन तिच्यांत जणू न्हाऊ लागला. तो आपल्या मनाशीच म्हणू लागला, "अहो! इथली ही भूमि किती धन्य आहे. देवांनाही दुर्लभ असणारे दत्ताचे पाय ही नित्य धारण करते. हिच्याइतकी धन्यता कुणाला तरी असेल का? अशा महत्कृपेला पात्र झालेली भूमि गवताच्या अंकुराचे रोमांच उभवून आपला निखळ आनंद व्यक्त करीत आहे." तेवढ्यात त्याची दृष्टी तेथील फळभाराने वांकलेल्या वृक्षांवर पडली. त्याला ते भगवद्भक्तासारखेच भासले. जणू कांही पूर्वजन्मी अहंकाराच्या ताठरतेने उन्मत्त झाल्याच्या अपराधाची शिक्षा म्हणूनच हा तमोगुणाने अंध असलेला जन्म आपल्या मिळाला या जाणीवेनेच हे फळे पुढे करून आपली शाखारूपी मस्तके नमवीत आहेत. तो रमणीय पर्वत अर्जुनाला दत्तप्रभूंची प्रेमभावाने नित्य सेवा करणाऱ्या एखाद्या श्रेष्ठ भागवतासारखा भासला. त्याच्या मनात आले, "भगवंताला सतत कंद, मूळ, फळे इत्यादी आहार तसेच मधुर जल पुरविणारा हा कुणी प्रेमळ, भाविक भक्तच आहे." अशा रीतीने श्रीदत्तप्रभूंच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या त्या प्रदेशाला पाहून, चांदण्याच्या दर्शनाने आनंदित झालेल्या चकोरासारखा हरखून अर्जुन पुढे निघाला. लवकरच त्याच्या दृष्टीसमोर श्रीदत्तांचा आश्रम आला आणि तेथील वेदध्वनींच्या अनुरोधाने पुढे जाऊन त्यांने दत्तपर्भूंचे दर्शन घेतले. १ - १५.

*गर्गमुनींच्या भक्तिपूर्ण उपदेशाने आणि दत्तप्रभूंच्या माहात्म्यश्रवणाने अर्जुनाचे मन द्रवीभूत झालेले आहे. अशा अवस्थेत तो सह्यपर्वतावर आला आणि तेथे दत्तप्रभूंच्या परमपावन पदकमलांचे ठसे त्याच्या दृष्टीला पडले. गर्गमुनींच्या कथनानुसार त्यांच्यावरील वज्र, अंकुश, ध्वजा आणि कमल या चिह्नांनी त्याला त्यांची ओळख पटली. साहजिकच त्याच्या मनात दत्तभक्तीचे उमाळे आले. पहिल्या अध्यायातच आपण या अष्ट सात्त्विक भावांचे वर्णन पाहिले आहे. भक्तिमार्गावरील प्रगतीचे हे जणू आठ मापदंडच आहेत. ह्यांच्या वाढत्या तीव्रतेवरून साधकाला आपल्या आध्यात्मिक प्रगतीची जाणीव होते. पण ही जाणीव ज्याची त्यालाच होते हे लक्षात ठेवले पाहिजे. इतरांना ह्या भावांची निखळता कळणे शक्य नसते. लोकांसमोर आपल्या भावभक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी नाटकही करणारे असतात तसेच मनोदौर्बल्याने लहान-सहान भावनांच्या आवेगाने विह्वळ होणारेही असतात. ऊठसूठ सद्गदित होणारे, डोळ्यात पाणी आणणारेही बरेच असतात. स्वामी विवेकानंद (त्यावेळचे नरेंद्र) श्रीरामकृष्ण परमहंसांच्या सहवासांत असतांना तेथील भक्तीच्या वार्तालापात बऱ्याच भक्तांचे अष्टसात्त्विकभाव जागृत होत. कुणीकुणी तर भावावेशाने मूर्च्छित होत. पण नरेंद्रला मात्र तसे फारसे काही होत नसे. याचे त्याला वैषम्य वाटून त्याने ठाकुरमहाशयांना एकदा याविषयी विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले, "तुझा आधार मोठा आहे. इतर भक्त थोड्याफार भावाने उचंबळून जातात. तुझे तसे नाही. तू तीव्रातितीव्र भावही सहज धारण करू शकतोस." साधकाच्या वाढत्या चित्तशुद्धीबरोबर त्याच्या मनाची खोलीही वाढत असते. त्यामुळे त्याची भावना धारण करण्याची क्षमताही वाढते. हे सर्व साधकांनी*


[1] Email ID: Vasudeo@gmail.com

*मनात ठेवले पाहिजे. आपला आधार आपल्याला कळणे कठीण आहे. तरीही आपल्या चित्तातली भक्ति आणि ईश्वरप्रेम ह्यांचे प्रमाण वाढते आहे की कमी होते आहे याचे अनुमान ज्याचे त्याला करणे शक्य असते. फक्त आंतरिक प्रामाणिकता मात्र पाहिजे.*

*अर्जुनाच्या सह्यगिरीवर प्रवेश करण्याच्या ह्या प्रसंगाचे श्रीस्वामी महाराजांनी केलेले वर्णन आणि श्रीमद्भागवतातील अक्रूराचे गोकुळात आगमन यांत लक्षणीय साम्य आहे. तो प्रसंग इथे पडताळून पाहण्यासारखा आहे. "श्रीकृष्णाच्या स्वरूपाचे आणि गुणांचे चिंतन करीत जेव्हा अक्रूर गोकुळाच्या परिसरांत आला तेव्हा सूर्य अस्ताचलाला गेला होता. त्यावेळी अक्रूराने राजेमहाराजे ज्या पदांची धूलि आपल्या शिरावर धारण करीत असलेली, कमळ, यव, अंकुश इत्यादि चिह्नांनी सुशोभित अशी श्रीकृष्णाची पदचिह्ने पाहिली. त्या दर्शनाच्या आनंदाने उचंबळलेल्या भावसंभ्रमाने त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि डोळे अश्रूंनी भरून आले आणि 'अहाहा! ही प्रभूंच्या चरणांची धूळ आहे' असे म्हणत तो त्या मातीत लोळू लागला." (श्रीमद्भागवतपुराण १०.३८.२५-२६)*

**पदानि तस्याखिललोकपाल- -किरीटजुष्टानि पदाङ्घ्रिरेणोः।**
**ददर्श गोष्ठे क्षितिकौतुकानि विलक्षितान्यब्जयवाङ्कुशाद्यैः।। 25।।**
**तद्दर्शनाह्लादविवृद्धसंभ्रमः प्रेम्णोर्ध्वरोमाकलाकुलेक्षणः।**
**रथादवस्कंद्य स तेष्वचेष्टत प्रभोरमून्यङ्घ्रिरजांसहो इति।। 26।।**

*स्थावर वृक्षांच्या तसेच अचेतन पर्वताच्या ठिकाणी हे दत्तभक्त आहेत ही भावनाही अर्जुनाच्या मनातील भक्तिभावाचाच परिपाक आहे.*

## सद्गुरुदर्शन

जणू कोट्यवधी मदन गाळून केलेल्या पुतळ्यासमान ती विलोभनीय मूर्ति पाहून त्याचे मन आनंदनिर्भर झाले. गुडघ्याला लागणाऱ्या लांब हातांचा तो देह पाहून मनासहित दृष्टी जणू त्या रूपाची अवीट गोडी चाखीत तिथेच चिकटून गेली. टवटवीत कमळासारख्या त्या मुखाचे चुंबन घेऊन त्या सुंदर तनूला आलिंगन द्यावे अशी प्रबळ इच्छा त्याला झाली. त्या गोजिरवाण्या दिगंबर मूर्तीत स्थिरावलेले मन आत्मसमाधीत बुडालेल्या योग्याच्या वृत्तीसारखे तिथून परतच फिरत नव्हते. मायेची स्त्री करून तिच्यासह श्रांगारिक क्रीडा करणाऱ्या त्या दत्तमूर्तीला पाहून विवेकशून्य तथाकथित मुनी दूर पळून जात. पण भक्तिप्रेमाने भारलेला अर्जुन मात्र गर्गमुनींच्या वचनाची आठवण ठेवून, हा सर्व खेळ आहे ही खूणगांठ मनात बांधून अविचल भावाने दत्ताची सेवा करूं लागला. १६ - २१.

*सर्व पुराणात आणि संतवाङ्मयात भगवंताच्या रूपाचे वर्णन करताना त्याच्या अनुपम सौंदर्याचे आणि अवीट गोडीचे वर्णन केले आहे. श्रीस्वीमीमहाराजांनीही श्रीदत्तांच्या सगुण रूपाचे वर्णन आसेचनका - जिच्याकडे पहाताना तृप्ती होतच नाही, असे केले आहे. 'गोड तुझे रूप' असे संतवचनही आहे. हे रूपमाधुर्य सर्वसाधारण श्रांगारिक काव्यात किंवा वाङ्मयात केलेल्या वर्णनापेक्षा सर्वस्वी भिन्न आहे. भगवंताविषयी वाटणारे हे आकर्षण सामान्य शारीरिक स्वरूपाचे नसते. भगवंताचे रूप हे आपल्या सच्चिदानंद आत्मस्वरूपाचेच व्यक्त रूप असते. अविद्येच्या प्रभावाने जीवाला आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडलेला असतो. कर्म, भक्ति, योग किंवा ज्ञान या उपायांनी जसजशी चित्ताची शुद्धि होते तसतसा आत्मस्वरूपाचा प्रकाश चित्तांत उजळत जातो. हे आत्मस्वरूप इंद्रियांना अगोचर असले तरी साधकांच्या अंतरांत प्रकाशतांना साधकाला ते इंद्रियांच्या माध्यमातून जाणवते. ह्यामुळेच साधकाला दृश्य, श्राव्य इत्यादि अनुभव येतात. 'आत्मा वा अरे द्रष्टव्यः' इत्यादि वेदवाक्यांचे हेच गमक आहे. साधकाला येणाऱ्या ह्या अनुभवांचा उगम त्याच्या अंतःकरणातूनच होतो. त्यामुळेच जसजसे चित्त शुद्ध होत जाते तसतसा अनुभवांचा विकास होतो. परमेश्वर जेव्हा आपल्या मायेच्या आश्रयाने भौतिक रूप धारण करतो तेव्हा त्याचे दर्शन सर्वांना सारखेच होत नाही. तसे असते तर केवळ त्या दर्शनानेच सगळ्यांचा उद्धार झाला असता. त्याच्या भगवत्त्वाची जाणीव होणे किंवा न होणे हे पाहणाऱ्याच्या चित्ताच्या अवस्थेवर आणि परमेश्वरी संकल्पावर अवलंबून असते. हे महाभारतातील एक-दोन उदाहरणानी स्पष्ट होईल. श्रीकृष्णांच्या शिष्टाईचा वेळी कौरवांच्या राज्यसभेत दुर्योधनाने पांडवांना सुईच्या टोकावर बसेल एवढीही जमीन न देण्याचा आपला निर्धार प्रकट केला. तेवढ्यावरच न थांबता*

*त्याने सर्व राजधर्माचे संकेत डावलून श्रीकृष्णालाच पकडून ठेवण्याची आज्ञा आपल्या सैनिकांना दिली. त्या वेळी श्रीकृष्णांनी आपले दिव्य रूप प्रकट केले. महाभारतांतील वर्णनानुसार हे रूप फक्त भीष्म आणि विदुर यांनाच दिसले. इतर सर्व सभाजन त्या रूपाच्या प्रादुर्भावाने मूर्च्छित झाले आणि श्रीकृष्ण तेथून निघून गेले. त्याचप्रमाणे गीतेच्या अकराव्या अध्यायात अर्जुनाला विश्वरूप दाखविले तेव्हा पहिल्यांदा अर्जुनाला काहीच दिसले नाही. तेव्हा भगवंतांनी त्याला सांगितले "या चर्मचक्षूनी तू मला पाहू शकणार नाहीस तेवढ्यासाठी मी तुला दिव्य चक्षू देतो. त्यांच्या योगे तू माझे योगवैभव पहा." पुढे अर्जुनालाच ते सहन होईना तेव्हा त्या विश्वरूपाचा लोप करून पुन्हा आपले पूर्वरूप प्रकट केले. सारांश, कार्तवीर्यार्जुनाला आणि भगवंतांच्या भक्तांना ईश्वराच्या किंवा सद्गुरूंच्या रूपाची जी अनिर्वचनीय ओढ लागते तिचे मूळ त्या रूपाच्या शारीरिक सौंदर्यांत नसून त्या भक्ताच्या चित्तशुद्धीत आणि सद्गुरूंच्या आणि ईश्वराच्या कृपेत असते. अवतारादिकांच्या रूपात शारीरिक सौंदर्यही असतेच; पण भक्तांना लोभविण्यात त्या सौंदर्यापेक्षा त्याच्या दिव्यत्वाचा भाग महत्त्वाचा असतो. गोकुळातल्या गोपीना आठ वर्षाच्या नंदकिशोराविषयी वाटणारे आकर्षण हे असेच कामगंधहीन होते. हे न कळाल्यामुळेच आपल्या मनात श्रीमद्भागवतात वर्णिलेल्या रासक्रीडेविषयी नसत्या शंका येतात. कार्तवीर्याच्या स्थिरावलेल्या चित्ताला आत्मसमाधीत निमग्न योग्याच्या चित्ताची उपमा देऊन श्रीस्वामी महाराजांनी सगुण रूपाचे दर्शन ही निर्विकल्प समाधीच असल्याचे सूचित केले आहे.*

## सद्गुरुसेवन

तेव्हा दत्ताने अर्जुनाला निघून जायला सांगितले; तरी तो जात नाही असे पाहून त्याला मारण्याची धमकीही दिली. त्यावरही अर्जुन त्यांचे चरण मांडीवर घेऊन चुरत राहिला. पतिव्रता स्त्री ज्याप्रमाणे पतीचा मार खाऊनही त्याची खंत न मानता त्याची सेवा करीत राहते त्याप्रमाणे अर्जुन दत्तप्रभूंची सेवा करीत राहिला. भगवंताचे पाय चुरतांना त्यांच्या माणकासारख्या तेजस्वी नखांच्या दीप्तीने अर्जुनाच्या चित्तांतील तम नाहीसे होई आणि तो आपोआपच आत्मस्वरूपात निमग्न होई. दत्तसेवेने त्याचे अज्ञान सहजच मुळासकट नष्ट झाले आणि भगवंताविषयीचे प्रेम वाढू लागले. हे बंधन कोण बरे तोडू शकेल? कधीकधी दत्तांनी त्याला पायांनी लाथाडावे तरी हा शिष्योत्तम मात्र चुंबकाला लोखंड चिकटावे तसा त्या पायांना धरून राहिला. पाय दाबण्याखेरीज इतरही सेवा तो उत्साहाने करीत होता. त्यांना हवे तेव्हा मद्य, मांस, फुलाच्या माळा, चंदनादि सुगंधी पदार्थ, फळे तो नित्य आणून देत असे. झोप आणि आळस टाकून न सांगता दत्तप्रभूंना इष्ट ती सेवा तो करायचा. त्यांचे उरलेसुरले खाऊन तो आपली भूक भागवायचा. २२ - २९.

*ह्या ओव्यातून अर्जुनाच्या आदर्श गुरुसेवेचे वर्णन आले. गुरसेवा हे मोक्षाचे महाद्वार आहे. ही सेवा किती निरपेक्ष असली पाहिजे त्याची थोडीशी कल्पना येते. सद्गुरूंविषयी किंचितही विकल्प मनात न आणता, आपल्या शरीरधारणेचीही पर्वा न करता एखाद्या पतिव्रतेसारखी (हा दृष्टांत सध्याच्या काळांत लक्षांत येणे कठिण आहे) निरलस सेवा अर्जुनाने केली. त्याने काय फळ मिळते ते तिथेच स्पष्ट केले आहे. त्या सेवेने, नित्य दत्तदर्शनाने आणि ध्यानाने त्याच्या चित्तातील मल धुऊन टाकले. म्हणजे चित्तांतील रजोगुण आणि तमोगुण यांचा क्षय झाला आणि सत्त्वगुणाची वृद्धि झाली. आपण जी साधना करतो ती योग्य प्रकारे चालली आहे याचे हेच गमक आहे. आपल्या मनांतील रज-तम किती कमी झाले यावरून आपली आध्यात्मिक प्रगती योग्य दिशेने होत आहे हे साधकाला पडताळून पाहता येते. गीतेच्या सतराव्या अध्यायात ही विषय आला आहे.*

*आळस, झोप आणि आहार ह्यांचा त्याग हे देहात्मभाव क्षीण झल्याचे द्योतक आहे. मी देह आहे हा अनेक जन्मांचा अध्यास सर्वसाधारण मानवी प्रयत्नांनी जाणे अशक्यप्राय आहे. सद्गुरुसेवन आणि सद्गुरुकृपा याच सत्कर्मांनी हे साध्य आहे. श्रीगुरुचरण योगिराज गुळवणीमहाराज यांनी प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती महाराज यांची गरुडेश्वर येथे जी सेवा केली ती ह्याच श्रेणीची होती. श्रीस्वामी महाराज उठायच्या आत जागे होऊन ते झोपल्यावर योगिराज (तेव्हांचे वामनराव) झोपत असत. श्रीस्वामिमहाराजांच्यासमोर त्यांच्या आज्ञेशिवाय ते बसतही नसत. त्यांना ह्या काळात उभ्यने झोप घेण्याची युक्ति साधली होती. एकदा दुपारी भोजनोत्तर स्वामिमहाराजांच्या विश्रांतीच्या वेळी वामनरावांना डुलकी लागली. स्वाममिमहाराज विश्रांतीनंतर आलेल्या पत्रांना उत्तरे देत असत. वामनरावांच्या*

*ळळणदारअक्षरामुळे हे काम त्यांच्याकडे असे. त्या दिवशी स्वामिमहाराजांनी वामनरावांना रोजच्याप्रमाणे हांक मारली. वामनराव दुसऱ्या झोपडीत झोपले होते. झोपेतच स्वप्नात त्यांना एक मोठा बैल डोळे लाल करून, शिंगे रोखून आपल्यावर चालून येतांना दिसला व ते खडबडून जागे झाले. लगेच त्यांना स्वामिमहाराजांची हाक ऐकायला येऊन ते तात्काळ तिकडे धावले. अशा रीतीने ध्यानी, मनी, स्वप्नीसुद्धा ज्यांना सद्गुरुसेवेचाच ध्यास असतो, आपल्या आहार-निद्रादिकांचाही विसर पडतो अशा भक्तांचा देहभाव क्षीण होतो. हेच कार्तवीर्याच्या सेवेच्या वर्णनावरून शिकायचे आहे.*

*हे दत्तमाहात्म्य ज्या गुरुशिष्यांच्या संवादात स्वामिमहाराजांनी गुंफले आहे त्या वेदधर्मा मुनींची शिष्य संदीपकाने केलेली सेवा अशीच आदर्शवत आहे. गलत्कुष्ठाने जर्जर, त्रस्त आणि निष्ठुर झालेल्या गुरूंनी त्याला दुरुत्तरे करावीत, एक सांगितलेले काम करीत असता दुसरेच सांगावे आमि मग ते पहिले काम का केले नाही म्हणून नाही नाही ते बोलावे, वेळप्रसंगी मारावेही! असे असूनही त्या संदीपकाने आपले गुरूच साक्षात विश्वेश्वर आहेत आणि त्यांचे चरणतीर्थच गंगाजल आहे या दृढ श्रद्धेने त्यांची आपल्या शरीराची पर्वा न करता 20 वर्षे त्यांची सेवा केली. काशीत राहूनही तो विश्वेश्वराच्या दर्शनाला गेला नाही की कधी गंगास्नान केले नाही. त्या सेवेने प्रसन्न होऊन प्रथम साक्षात् विश्वेश्वर व मग भगवान विष्णूंनी दर्शन देऊन वर मागायला सांगितला तर सद्गुरूंची आज्ञा नाही म्हणून दीपकाने ते वर नाकारले. कार्तवीर्याची गुरुसेवा ही ह्याच जातीची होती.*

## सद्गुरुपरीक्षण

मग त्याची आणखी परीक्षा पाहण्यासाठी दत्ताने केवळ दृष्टिक्षेपाने त्याचे दोन्ही हात तोडून टाकले. आणि मोठ्याने हंसून त्याला बोलले, "अरे राजा, केवढे हे अरिष्ट आहे. इथून लवकर पळून जा. नाही तर फुकट मरशील! हे सगळे माझ्या अशुद्ध संगतीचे फळ दिसते. माझ्यासारख्या अमंगळ, कर्मभ्रष्ट, भक्ष्य आणि अभक्ष्य यांचा विचार नसलेल्या, उद्दाम, नागड्या, स्त्रीलंपट पुरुषाचा संसर्ग शेवटी तुला बाधलाच ! तोच आतां तुझा प्राण घेईल. " हे दत्ताचे वचन ऐकून, गर्गमुनींच्या शिकवणीचे स्मरण करून अर्जुन नमस्कारपूर्वक त्याना म्हणाला, "देवा, कां असे बोलून मला भूल पाडतां आहां? लोकांना ह्या ज्या अतर्क्य लीला आपण दाखवता त्याना अनुसरूनच हे आपण बोलतां हे मला कळत का नाही? आपण विश्वात्मक विराट पुरुष आहां. त्रिगुणातीत असूनही आपल्या मायेच्या आश्रयाने आपण हे रूप घेऊन सगुण भासत आहां. आपण अपापविद्ध, निष्क्रिय, निराकार आहां. तरी ह्या विश्वाचा आधार असल्याचा खोटाच आळ आपण स्वतःवर घेत आहात. हे जग जर खरोखरच उपजलेले असते तर त्यांत तू आहेस असे म्हणतां आले असते. परंतु हे विश्व निव्वळ आभासात्मक आहे. सारखे बदलणारे आणि नाशिवंत आहे. अशा या जगाच्या आणि तुझ्या स्वरूपातला फरक न जाणल्याने जगाला सत्य मानून भेदबुद्धी धारण करणाऱ्या पामर जीवांनाच शास्त्राचे बंधन असते. आपण अशुद्ध तर आहातच. ज्याच्याहून शुद्ध असे दुसरे काही नाही असे आपण अशुद्ध आहांत. हा खरा अर्थ जाणणाराच खरा ज्ञानी होय आणि आपल्यासारखाच तोही अशुद्ध होतो. अज्ञानी लोकांना मात्र जगत् आणि भगवंत यांच्यात भेद दिसतो. त्यांनाच वेदांनी धर्माचे बंधन घातले आहे. त्यामुळे हे सर्व विधिनिषेध त्यांच्यासाठी आहेत. ह्या विधिनेषेधांचे बंधन आपल्याला असूच शकत नाही. एवढ्यासाठी हे प्रभो! आता एकच निर्धाराची प्रार्थना आहे की हा देह राहो अथवा जावो, तुमच्या स्वरूपातच चित्त स्थिरावो, विपरीत भावना न होवो. " ३० - ४३.

*आपण मागच्या लेखात सद्गुरु शिष्याची परीक्षा का घेतात आणि कशी घेतात याचा थोडा विचार केला आहे. परीक्षा घेण्याची सर्वज्ञ आणि कूटस्थ सद्गुरूंना खरोखर काही आवश्यकता नसते. भक्ताच्या अंतःकरणाची परिपक्वता साधण्यासाठी आणि त्याचे परमार्थाला प्रतिकूल प्रारब्ध संपविण्यासाठीच हा उपक्रम असतो. त्यासाठी त्याला काही विशिष्ट अनुभवातून जावे लागते. हे अनुभव वा प्रसंग बऱ्याच वेळा त्याला दुःसह दुःख देणारे असतात. पण त्यातून पुढे त्याचा उत्कर्षच सद्गुरूंना साधायचा असतो. कार्तवीर्याचे बाहू तोडण्यामागे हेच कारण आहे. त्याला पुढे हजार बाहू द्यायचे आहेत. त्याची पूर्वपीठिका म्हणून दत्तप्रभूंनी त्याचे बाहू तोडून टाकले. अर्जुन क्षत्रिय होता. आपल्या बाहुबलाचा अभिमान त्याला साहजिकच होता. बाहू नष्ट होणे हे त्याला मृत्यूपेक्षाही अधिक दुःखदायक होते. अशा प्रसंगी मानवी मनाची प्रवृत्ती समोर असलेल्याला दोष देण्याची किंवा देवाला बोल लावण्याची साहजिकच*

*असते. हे आपल्या नित्य अनुभवाचे. आपल्या मिळालेल्या यशाचे, सुखाचे, लाभाचे श्रेय आपण आपल्या स्वतःकडे घेतो. अपयश, दुःख किंवा हानीला मात्र आपण देवाला जबाबदार ठरवतो. ह्या मानवी स्वभावाला अनुसरूनच अर्जुनावरच्या ह्या वज्राघताला आपल्यासारख्याचा दुःसंग कारणीभूत आहे असे त्याच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न दत्तप्रभू करीत आहेत. पण अर्जुनाचे चित्त शुद्ध झाले आहे. हा वज्राघात सहज पचविण्याचे धैर्य त्याच्यात आले आहे. हा दैवी संपत्तीचा उत्कर्ष आहे. त्याच्या विवेकाची धार तीक्ष्ण झाली आहे. त्यामुळे त्याला दत्तस्वरूपाचे ज्ञान झाले आहे. ते त्याच्या उत्तरात स्पष्ट प्रतिबिंबित झाले आहे. नित्य, शुद्ध, बुद्ध, अखंडैकरस, निरपेक्ष, निर्लेप अशा दत्तसंज्ञित आत्मतत्त्वावर परिवर्तनशील जगताचा अध्यारोप करण्याला कारण जो मोह, मूळ अज्ञान, ते अर्जुनापासून केव्हांच दुरावले आहे. सायंप्रकाशात दोरीच्या जागी साप दिसावा तसे अविद्येच्या प्रभावाने आत्मतत्त्वाच्या ठिकाणी जगत भासू लागते. दिव्याच्या प्रकाशाने अंधार जावा आणि दोरी स्पष्टपणे दिसावी तसेच शुद्ध चित्तात ज्ञानाचा प्रकाश पडतो आणि जगदाभास मावळतो. मी म्हणजे हा देह हा देहात्मभाव आता त्या साधकाच्या वाऱ्यालाही उभा राहत नाही. आपल्या शिष्याची ही परिपक्वता पाहण्यासाठीच सद्गुरू त्याची परीक्षा पाहतात. त्याने केलेल्या आपल्या स्तुतीने नव्हे तर त्याच्या बोलण्यातून प्रकाशणाऱ्या त्याच्या ज्ञानाग्नीच्या तेजाने दत्तप्रभू प्रसन्न झाले आहेत.*

## वरप्राप्ती

अर्जुनाचे हे निश्चयाचे बोलणे ऐकून दत्तप्रभू प्रसन्न झाले आणि त्याला म्हणाले, "हे राजकुमारा, तू धन्य आहेस! तुला हवा तो वर मागून घे. तू खरोखर भक्तीचे तत्त्व जाणणारा आहेस; महणूनच तू मला सोडले नाहीस. तुझ्या या अविचल भक्तीने तू मला प्राणप्रिय झाला आहेस. माझे जे अनन्य भक्त आहेत मी सतत त्यांच्या सन्निधच राहतो. अभक्तांना मात्र सतत दुःखच भोगावे लागते. तू देहाची पर्वा न करता, सर्व विषयोपभोग सोडून माझी यथार्थ सेवा करून जन्माचे सार्थक केले आहेस." हे दत्ताचे शब्द कानावर पडतांच राजाचे अंग हर्षाने मोहरले. खरे तर दत्तसेवेने त्याचे अंतःकरण निरिच्छ झाले होते; पण प्रारब्धाच्या प्रेरणेने तो बोलू लागला. "भगवंता आपण जर खरेच माझ्यावर प्रसन्न झाला असाल तर मला सर्व ऐश्वर्य देऊन माझ्या एकट्याच्या बळावर प्रजापालन करण्याचे सामर्थ्य द्यावे. धर्म, अर्थ आणि काम हे त्रिविध पुरुषार्थ एकमेकांना विरोध न करता सिद्ध व्हावेत. माझी निःसीम कीर्ति व्हावी. मी बलवंत व्हावे; माझ्या नामस्मरणानेच नाहीसे झालेले परत मिळावे; मी धर्माने प्रजेचे पालन करावे; दुसऱ्याच्या मनातले मला कळावे; जो माझे स्मरण करील त्याला माझे दर्शन घडावे; सर्व (आठही) सिद्धी माझ्याकडे असाव्यात; मला सहस्र बाहू असावेत; हवे तेथे जाण्यासाठी माझी गति अकुंठित असावी; पर्वत, भूमी, आकाश आणि जल या सर्वांतून मला जातां यावे; नेहमी सर्व गोष्टींचे ज्ञान असावे; स्वर्गाला आणि पाताळालाही जाण्याचे सामर्थ्य मला असावे; मात्र मी चुकीच्या वाटेने जाऊं नये आणि सदैव सज्जनांच्या संगतीत असावे. पूजनीय अतिथि माझ्या घरी नित्य यावेत; माझा कोषागार नित्य द्रव्याने परिपूर्ण असावा; सर्व भूमंडळाचा माझा कुणी शत्रू राहू नये; संपूर्ण पृथ्वीवर माझे साम्राज्य असावे; मला पूर्ण आयुष्य असावे; मला समरांगणांत आपल्या योग्यतेच्या पुरुषाकडून मृत्यु यावा; आपल्या चरणाचे नित्य स्मरण असावे आणि त्यांच्या ठायी निरंतर अनन्य भक्ती असावी हीच माझी अभिलाषा आहे." असे बोलून अर्जुनाने दत्तप्रभूंना साष्टांग नमस्कार केला. दत्तप्रभू त्यावर म्हणाले "तू मागितलेले हे सगळे वर मी तुला दिले. तू पृथ्वीवरील सातही द्वीपांचा अधिपति होशील." दत्तप्रभूंच्या मुखातून हे शब्द बाहेर पडतांच अर्जुनाला दोन सुंदर भुजा फुटल्या. तेव्हां त्याचे हृदय प्रेमाने भरून आले आणि त्याने भगवंताला दृढ आलिंगन दिले. त्या मिठीत त्याला स्वतःचा विसर पडून तो तटस्थ झाला. त्याची ती समाधि अवस्था देवांच्या लक्षात आली. त्यांनी आपले वरदान सिद्ध करण्यासाठी अर्जुनाला त्या अवस्थेतून आपली जगन्मोहिनी माया त्याच्यावर सोडून बाहेर काढले आणि त्याला म्हणाले, "अर्जुना आता तू माहिष्मतीला जाऊन स्वतःला विधियुक्त राज्याभिषेक करून घे, ही माझी आज्ञा आहे." ४४-६०

*दत्तप्रभूंच्या सेवेने अंतःकरण शुद्ध होऊनही, नित्यानित्यवस्तुविवेक दृढ होऊनही, दत्तप्रभूंचे स्वरूप जाणूनही अर्जुनाने जे मागणे मागितले आहे ते सर्वथैव ऐहिक आहे. इथेच प्रारब्धाची अनिवार्यता प्रत्ययाला येते. "हेचि दान दे गा देवा, तुझा विसर न व्हावा " हे अर्जुनाच्या मागण्यात शेवटी आले आहे. तीच खरी भगवत्कृपा आहे. इतर*

*सर्व मागणे हे प्रारब्धप्रेरित आहे. मुळात एकट्याच्या बळावर, कुणावरही न विसंबतां राज्याची धुरा सांभाळण्याच्या ज्या एका तीव्र इच्छेने तो माहिष्मतीहून निघाला होता ती मनात तशीच दबून राहिली होती. दत्तभक्ति आणि दत्तसेवा यांच्या अग्नीत इतर सर्व वासना जाळूनसुद्धा ही वासना मात्र संधीची वाट पहात बसली होती. मन हे कसे ओढाळ आहे याचे हे उत्तम उदाहरण आहे. श्रीमद्भागवतातील भरत राजाने सर्वसंगपरित्याग करून अरण्यसेवन केले. कंदमूळांचा आहार करून ईश्वरोपासना केली. त्या उपासनेत त्याला स्वतःचाही विसर पडत असे, असे वर्णन भागवतात आहे. पण सिंहाच्या भयाने नदीपार उडी मारतांना एका प्रसवोन्मुख हरिणीचे पाडस नदीत पडलेले त्याने पाहिले. भूतदयेने प्रेरित होऊन त्याचे संगोपन भरताने केले. तो त्या हरणाच्या इतका मोहात पडला की अंतकाळीसुद्धा त्याच्या आठवणीतच त्याने देह सोडला. परिणामी त्याला हरिणाचा जन्म घ्यावा लागला. मनाचा हा ओढाळपणा ध्यानात ठेवूनच भक्ताने, साधकाने आपल्या सर्व इंद्रियांचा विषय एक नारायणच करावा असे साधुसंत सांगतात.*

यावर अर्जुनाने "आपली आज्ञा शिरोधार्य आहे," असे म्हणून पुनश्च वंदन केले आणि प्रार्थना केली की "हे प्रभो, आपला विसर मला कधीही न व्हावा तसेच आपणही माझे सतत स्मरण ठेवावे. आपले चरण हेच माझे जीवन आहे; ह्याला साक्ष आपले मनच आहे. कासवीची पिले ज्याप्रमाणे तिच्यापासून दूर असूनही केवळ तिने स्मरण केल्यानेच जगतात त्याचप्रमाणे आपण आठवण केल्यानेच भक्ताला जीवन लाभते. कासवी जर पिलांना विसरली तर तिची पिले मरून जातात. पण कासवीच्या बुद्धीला जसा भ्रम होऊ शकतो किंवा तिच्याकडून अनवधानाने प्रमाद होऊ शकतो, तसे आपले नाही. याला वेदांची साक्षी आहे. आपल्याच आज्ञेने ही कराल माया जीवाला अज्ञानाने झांकून टाकते आणि त्यामुळेच तो या जन्ममरणरूपी संसारचक्रात फिरत असतो. तीच माया तुम्हांला मात्र स्पर्शू शकत नाही. जसा जादूचे प्रयोग करणारा गारुडी आपल्या इंद्रजालाने प्रेक्षकांना मोहून टाकतो पण तीच माया त्याच्यावर स्वतःवर मात्र निष्प्रभ ठरते ह्या उपमेप्रमाणे आपली मायासुद्धा तिचा आश्रय असलेल्या आपल्याला म्हणजे भगवंताला कशी मोहवू शकेल? जसा पाळलेला कुत्रा छू म्हणताच सर्वांवर भुंकत असला तरी आपल्या धन्यासमोर मात्र शेपूट घोळतो तशीच ह्या मायेची आपल्यासमोर गत आहे. एवढेच काय जे तुझे भक्त आहेत त्यांच्यासमोरही ह्या मायेचे काही चालत नाही. मी आपला व्यक्त भक्त आहे; ही अव्यक्त माया मला काय करू शकेल? आम्हा भक्तांना ह्या मायेचे कसले भय? तुझ्या पायांच्या स्मरणाने प्रत्यक्ष मृत्यूलाही आम्ही घाबरत नाही, आम्ही दैवाच्या रेषेलाही ओलांडू शकतो. ह्याच चरणांच्या आठवात आम्ही आमच्या उपजीविकेचाही विचार सोडून जिकडे तिकडे तुझ्या कथा गात माथा झुकवू. असो. आता पुनःपुन्हा हेच काकुळतीची मागणे आहे की आम्हांला स्मरणाद्वारे जगवावे. आमचा विसर न व्हावा. " अशी विनवणी करीत, सासरला जाणाऱ्या नवरीप्रमाणे अर्जुन फिरून फिरून मागे पहात, दत्तप्रभूंचे रूप डोळ्याद्वारे मनात साठवत कसाबसा माहिष्मतीच्या वाटेला लागला. ६१ - ७४

*माया कशी दुस्तर आहे आणि मोठमोठ्या योगी, ज्ञानी आणि तपस्वी पुरुषांनाही ती कशी बांधून ठेवते ते आपण आता पाहिले. प्रारब्धाच्या म्हणजेच त्या मायेच्याच प्रभावाने अर्जुनाला ऐहिक बलांचा वर मागण्याची प्रवृत्ती झाली हेही आपण पाहिले. तर मग अशा मायेपासून सुटका कशी होऊ शकेल या प्रश्नाचे उत्तर श्रीस्वामी महाराजांनी अर्जुनाच्या तोंडूनच दिले आहे. ईश्वराचे जे भक्त आहेत त्यांना त्याच्या मायेची भीति नाही. ईश्वराच्या स्मरणात आपल्या जीविकेचाही विसर ज्याला पडला आहे त्याला दैव आणि मृत्यू यांचेही भय नाही हे अर्जुनाचे म्हणणे खालील गीतावचनाशी सुसंगतच आहे.* ***दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया। मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते।। 7:14।।*** *माझी ही त्रिगुणात्मक दैवी माया दुस्तर आहे खरी पण मलाच जे शरण येतात ते ही माया तरून जातात असे भगवंतच स्वतः म्हणताहेत. श्रीमच्छंकराचार्यांनी पांडुरंगाष्टकात म्हटल्याप्रमाणे विठोबाने "माझ्या भक्ताना मायेचे प्रमाण इतकेच आहे," हे दाखविण्यासाठीच जणू कमरेवर हात ठेवलेले आहेत. एवढ्यासाठीच पांडव अर्जुनाला त्यांनी "मामनुस्मर युद्ध्य च." उपदेश केला आहे.*

*शेवटी दत्तचरणांपासून दूर जातांना झालेली अर्जुनाच्या मनाची अवस्था "कन्या सासुरासी जाये, मागे परतोनी पाहे। तैसे झाले माझ्या जीवा," ह्या तुकोबारायांच्या अभंगात वर्णिल्याप्रमाणे झाली आहे.*

## अर्जुनाचा राज्यकारभार.

अशा रीतीने राजा अर्जुन रेवातीरावर माहिष्मतीला येऊन पोंचला. सर्व मंत्री आणि नागरिक, देवता, ऋषी आणि महर्षि त्याला सामोरे आले आणि समारंभपूर्वक नगरात घेऊन गेले. त्या सर्वांनी अर्जुनाला शास्त्रविधीनुसार सोन्याच्या कड्याने मढवलेल्या औदुंबराच्या डहाळीने सर्व वेदांच्या शाखांच्या मंत्राच्या घोषांत अनेक तीर्थांच्या जलाने अभिषेक केला. अशा रीतीने राज्याभिषिक्त झाल्यावर त्याने दीन-दुबळ्या अंध आणि अपंग लोकांना सुवर्ण, गाई, धन आणि अन्न ह्यांचे विपुल दान केले. ह्या समारंभाला वरुण, मरुद्गण, वसु इत्यादि देवताही आल्या होत्या. त्या सर्वांचे राजाने यथोचित पूजन केले आणि त्यांचे "सुखी हो, आयुष्मान हो!" असे आशीर्वाद घेतले. करभार घेऊन अनेक देशाचे राजे आले. त्यानंतर कार्तवार्याने सर्व राज्यात दवंडी पिटविली की "माझ्या या राज्यात माझ्यावाचून जो कोणी शस्त्र धारण करील, चोरी करील किंवा हिंसा करील त्याला मी ठार मारीन." त्या राजाज्ञेच्या धाकाने सर्वांनी शस्त्रे टाकून दिली. सर्वजण मवाळपणे त्याच्या आज्ञांचे पालन करू लागले. क्षेत्रपाळ, ग्रामपाळ, पशुपाळ, धान्यपाळ, सेनापति इत्यादि सर्व पदे अर्जुनानेच धारण केली आणि तो ब्राह्मणादि सर्वांचे पालन करू लागला. अग्नि, चोर, शत्रू, सर्प इत्यादि सर्व संकटापासून तो एकटाच अनेक रूपे धारण करून सर्वांचे रक्षण करू लागला. नष्ट झालेल्या (हरवलेल्या, जळालेल्या, बुडालेल्या इत्यादि) वस्तु त्याचे स्मरण करतांच परत मिळत. कुणीही कुठेही त्याचे ध्यान करताच तो प्रकट होत असे. सर्व प्रजेला आरोग्य लाभले. पाऊसही वेळच्या वेळी पडून भूमि सुफला झाली. राजाने यज्ञादिकांच्या अनुष्ठानानी देवा-ब्राह्मणांना तृप्त केले; तसेच प्रजेचे न्यायाने पालन करीत तो त्रैलोक्यांत संचार करू लागला. ७५ - ८७.

*उत्तम प्रकारे प्रजापालन, गोब्राह्मणाप्रतिपालन, आणि चोराचिलटापासून, नैसर्गिक उत्पातापासून आणि परचक्रापासून देशाचे रक्षण करणे या सर्वांसाठी समर्थ, बलशाली आणि निर्णयक्षम सत्ताकेंद्राची आवश्यकता असते. कार्तवीर्याने दत्तकृपेच्या बळावर असे एकछत्री शासन स्थापन केले. आज आपल्या देशात ह्याची किती निकडीची गरज आहे ते सर्वविदितच आहे. लोकशाहीच्या या काळात हे अशक्यप्रायच असले तरी आजकालच्या राज्यकर्त्यांनी कार्तवीर्यार्जुनाच्या राज्यशासनापासून खूपच शिकण्यासारखे आहे यात शंका नाही.*

## अनघाष्टमीचे व्रत.

प्रतिवर्षी माघ महिन्याच्या वद्य अष्टमीला अनघाष्टमीचे व्रत करी. त्या दिवशी त्याला श्रीदत्तदर्शन झाले होते. त्याच्या स्मरणार्थ त्या दिवशी उपवास करून, 'अतो देवा ' इत्यदा सहा मंत्रांनी तो त्या अनघ दत्ताचे पूजन करीत, प्रेमभराने वारंवार दत्तदर्शन करीत जागरण करी व दुसऱ्या दिवशी ब्राह्मणाना भोजन देऊन सांगता करीत असे. या बोलावर विश्वास ठेवून जो हे व्रत दर वर्षी नियमाने करील त्याच्या इच्छा पूर्ण होऊन सुखी होईल. ८८ - ९०

*पुराणवाङ्मयाचा एक विशेष म्हणजे त्यांतून लोकोपयोगी अशा व्रतांचे व उपासनांचे उद्घाटन होय श्रीमद्दत्तपुराणातही अशा व्रतांचे निरूपण आले आहे. याआधी आपण अनंतव्रताचे वर्णन पाहिले आहे. हे अनघाष्टमीचे व्रतही दत्तभक्तांना आचरण्यास सोपे आणि फलदायी आहे.*

अशा प्रकारे त्या सूर्यासारख्या दुःसह, परम तेजस्वी, सहस्र किरणांप्रमाणे हजार बाहू असणाऱ्या अर्जुनाने सर्वत्र विजय संपादन करून त्रैलोक्यांत ख्याति मिळविली, त्याला कधीही कशाचाही विसर असा ठाऊकच नव्हता; तो शरणागतांचे संरक्षण करीत असे आणि सर्व प्रकारचे ऐश्वर्य भोगून पुढील बिरुदाचा मानकरी झाला. "न नूनं कार्तवीर्यस्य गतिं यास्यति पार्थिवाः। "यज्ञदानतपोयोगश्रुतवीर्यजयादिभिः।।" खरोखर, यज्ञ, दान, तज, योग, ज्ञान, शौर्य आणि विजय ह्यांच्यांत कार्तवीर्याची बरोबरी करील असा कोणी राजा झाला नाही. एकदा आपल्या सहस्र पत्नींसह अर्जुन नर्मदातीरी क्रीडा करीत असता, नारदाकडून त्याच्या शौर्याची कीर्ति ऐकून देवांचा शत्रू रावण ईर्षेने पेटून त्याच्याशी युद्ध करण्यासाठी आला. त्याने फक्त डोळ्यांच्या इशाऱ्याने त्याला आपल्या स्त्रियांकरवीच बांधून टाकले आणि आपल्या मुलांना खेळणे म्हणून आपल्या घरांत आणून ठेवला. कार्तवीर्याची मुले मजेखातर त्या दशमुखाला धरून गरगरा फिरवायची. ही रावणाची गति त्याचा भाऊ कुबेर याला कळल्यावर त्याने कार्तवीर्याला विनवून रावणाला तिथून सोडवले. असा तो बलवान अर्जुन सदैव आपल्या नगरीत राहूनही, अनेक रूपे धारण पृथ्वीच्या

सातही द्वीपांत संचार करून धर्मानुसार प्रजेचे पालन करीत होता.

*रावणाचा पराभव हा कार्तवीर्याच्या प्रमुख पराक्रमापैकी एक आहे. रावण त्या काळांत ब्रह्मदेवाच्या वराने देवादिकांनाही अनावर झाला होता. त्याच्या अर्जुनाने केलेल्या ह्या फजितीनंतर अर्जुनाचा त्रैलोक्यात दरारा पसरला असल्यास त्यात आश्चर्य नाही.*

## कार्तवीर्यमंत्र.

"**नमस्ते कार्तवीर्याय**"" हा त्याचा मंत्र आहे. प्रणव (**ॐ**) बीज लावू जप केला असता ह्या मंत्राने मानव संसारबंधनातून मुक्त होतो; **ऐं** बीज लावल्यास वाचासिद्धि प्राप्त होते, सर्व विद्यामध्ये जापक प्रवीण होतो आणि मंत्रशक्तीच्या प्रभावाने ईप्सित कार्याची सिद्धि होते; **श्रीं** बीजाच्या प्रयोगाने लक्ष्मीची म्हणजे धनाची प्राप्ति होते; **द्रां** बीजाने अपमृत्यू टळतो, रोग बरे होऊन हमखास आरोग्याचा लाभ होतो; **वषट्** बीजाने इतरांना वश करतां येते; **वौषट्** बीजाने हव्या त्या व्यक्तीला आपल्याकडे आकर्षित करता येते; **हुं** बीजाने द्वेष निर्माण करतां येतो; **फट्** बीजाने उच्चाटण (घालवणे, नाहीसे करणे) होते; **ठः ठः** बीजाने स्तंभन (क्रिया थांबवणे), **खें खें** बीजाने मारण (मारून टाकणे, नाश करणे), **नमः** बीजाने संपत्ति मिळते; **स्वाहा** बीजाने पुष्टि; **क्लीं** बीजाने वशीकरण; **हुं फट्** बीजाने भूत, पिशाचादि ग्रहांची बाधा जाते. प्रणव बीजाने, नेत्रविकार, मधुमेहादि मूत्रविकार, संनिपात, कफ, ज्वर, क्षय, कुष्ठ, गुल्म (कॅन्सर), पित्त, वात इत्यादि सर्व रोग तसेच भूकंप, जलप्रलय आणि अग्नि हे त्रिविध उत्पात ह्यांपासून संरक्षण होते; तसेच दुसऱ्याने आपल्यावर काही जारण-मारणादि प्रयोग केला असेल तर त्याचाही अंत होतो.

मंत्रशास्त्रात मंत्राची बीज, शक्ति, कीलक इत्यादि अवयव सांगितले आहेत. उपास्य देवतेचे नाम कीलक आहे. हा मंत्रशक्तीचा आधार आहे. क्रियावाचक शब्दाला शक्ति म्हणतात. ह्यांतूनच मंत्राचे सामर्थ्य प्रवाहित होते. बीज मंत्राच्या शक्तीचा विनियोग निश्चित करते. कांही बीजे मंत्राच्या आधी लावतात तर काही मंत्राच्या शेवटी. इते दिलेल्या कार्तवीर्य मंत्राच्या बीजांचे प्रयोग खालील तालिकेत दिले आहेत.

| **बीज** | **मंत्र** | | **फळ** |
|---|---|---|---|
| **ॐ** | नमस्ते कार्तवीर्याय | | संसारबंधनांतून मुक्ति, मेहादि असाध्य विकार, भूकंपादि प्रलयांपासून संरक्षण. |
| **ऐं** | नमस्ते कार्तवीर्याय | | वाचासिद्धि, वियेत प्रावीण्य |
| **श्रीं** | नमस्ते कार्तवीर्याय | | धनप्राप्ती. |
| **द्रां** | नमस्ते कार्तवीर्याय | | रोगनिवारण, अपमृत्युनिवारण आणि आरोग्य |
| **वषट्** | नमस्ते कार्तवीर्याय | | वशीकरण. |
| **वौषट्** | नमस्ते कार्तवीर्याय | | आकर्षण. |
| **हुं** | नमस्ते कार्तवीर्याय | | विद्वेषण. |
| **फट्** | नमस्ते कार्तवीर्याय | | उच्चाटण. |
| **ठः ठः** | नमस्ते कार्तवीर्याय | | स्तंभन |
| **खें खें** | नमस्ते कार्तवीर्याय | | मारण. |
| | नमस्ते कार्तवीर्याय | **नमः** | संपत्तीलाभ. |

| | | | |
|---|---|---|---|
| | नमस्ते कार्तवीर्याय | **स्वाहा** | पुष्टि. |
| **क्लीं** | नमस्ते कार्तवीर्याय | | वशीकरण. |
| | नमस्ते कार्तवीर्याय | **हुं फट्** | भूत-प्रेतादि बाधांचे निवारण. |

कुणाला दिलेले, गुंतवलेले, गमावलेले अथवा लावलेले धन, एकांतात धूप लावून वरील मंत्राचा जप केल्यास परत मिळते. **कार्वीर्यार्जुनो नाम राजा बाहुसहस्रवान् । तस्य स्मरणामात्रेण गतं नष्टं च लभ्यते ।।** ह्या मंत्राचा जपही श्रीस्वामीमहाराजांनी इतरत्र सांगितला आहे. तसेच **ॐ फ्रों व्रीं क्लीं भ्रूं आं ऱ्हीं क्रों श्रीं हुं फट् कार्तवीर्यार्जुनाय नमः।** या मंत्राचे विधानही त्यांनी दिलेले आहे. श्रीटेंबेस्वामिविरचित मंत्रविधानम् या श्रीवासुदेवनिवासाने प्रकाशित केलेल्या ग्रंथात ही विधाने दिली आहेत.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सहावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय 6 वा.

**स्वारस्य विषयांचे जाऊन। अर्जुन विरक्त होऊन। दत्तापाशी येऊन। करी स्तवन नानापरी।।16।।**
**त्या नृपांतःकरणा पारखून। दत्त दे आश्वासन। मग नृप करी प्रश्न। हे कथन सप्तमाध्यायी।।17।।**

### कार्तवीर्याची उपरति.

श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः। अशा त्या महाप्रतापी शूर चक्रवर्ती राजाने योगीश्वर दत्तात्रेयाच्या प्रसादाने 84 हजार वर्षे राज्य केले. त्या बुद्धिमान सम्राटाने धर्माच्या बळाने एकहाती सप्तद्वीप पृथ्वीचे पालन केले. सर्व मांडलिक त्याला नमून रहात. तो नित्य प्रतिदिवशी दत्तदर्शनाला माहूरला येऊन त्यांना वंदन करीत असे. अधूनमधून तिथे राहून धर्माचा विचारही करीत असे. अशा रीतीने 84 सहस्र वर्षांचा काळ लोटला. एके दिवशी रात्री शय्येवर पडल्या पडल्या राजा विचार करू लागला. “मी हा काय मोठा पुरुषार्थ केला? एवढ्या कष्टाने हे राज्य मिळवले आणि सांभाळले! त्याने काय साध्य होईल? शेवटी या सगळ्यांची परिणति मृत्युरूपी अनर्थातच होणार! जे जे दृश्य आहे ते नाशिवंत आणि क्षणभंगुर आहे. निष्क्रिय, शुद्ध असे सर्वव्यापी तत्त्व काही मी जाणूनघेतले नाही. एखाद्या राजाने कुणा दरिद्री माणसाला हवे ते मागून घ्यायला सांगावे आणि त्याने कोंडा मागावा तशी माझी अवस्था झाली आहे. भगवान दत्तात्रेयांनी प्रसन्न होऊन वर दिला आणि माझे दुर्दैवच आड आले! मी मूढपणाने भुलून हे (राज्य) काय मागून घेतले? देवाचा यांत काही दोष नाही; मीच माझे अनहित करून घेतले. सर्वसंगपरित्याग करून योगी ज्याच्या चरणांची इच्छा करतात त्या भगवंताचे पाय धरून मी जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्ति न मागता, डोळस असूनही ह्या राज्यरूपी खोल अंधाऱ्या विहिरीत पडलो. हा लक्ष्मीचा विलास क्षणभंगुर आहे; आयुष्याचा काय भरंवसा? आणि आपले म्हणून जवळ केलेल्या ह्या परिवाराचा, अंतकाळाची वेळ आल्यावर काय उपयोग? कोण कुणाचे पुत्र, कोण कुणाची स्त्री आणि कोण कुणाचे सेवक? मृत्यूनंतर हे राज्य, हे भांडार कुठे राहील? असा हा सगळा परिवार मिथ्याच होय. आपल्या हाताने शत्रूंना जखडून टाकणाऱ्याच्या निश्चेष्ट देहाला ताटीवर बांधून खांद्यावरून वाहून नेतात. आपल्या प्रतापाने वैऱ्यांना जाळणाऱ्याला स्मशानात नेऊन जाळून टाकतात. राजेरजवाडे ज्याला वंदन करतात त्या देहाला पशूसारखा बांधून तरुण स्त्रिया नाचवतात. शेवटी किडे, विष्ठा आणि भस्म यांतच परिवर्तन होणाऱ्या ह्या देहाचे लाड करण्यासाठी मूर्खपणाने मी दुर्मार्गाला प्रवृत्त झालो त्याची मला किळस येते. हा सद्विचार माझ्या अंतःकरणात उगविणाऱ्या त्या दयाघन परमेश्वराला माझा नमस्कार! तो करुणाकर आहे; त्यालाच आतां शरण जावे, त्याचेच पाय धरावेत; त्याच्याशिवाय कोण मला तारणार? ” 1 – 17.

कृतयुगातील कालगणनेनुसारही प्रदीर्घ कालपर्यंत कार्तवीर्यार्जुनाने राज्य केले. त्याचा रोज दत्तदर्शनाचा नियम कधी चुकला नाही. मधून मधून तो तिथे दत्तप्रभूंच्या सान्निध्यात रहातही असे. कांही विशेष आणले किंवा मिळविले तर ते त्याने दत्तप्रभूंना आणून समर्पण करावे. त्यांच्या आज्ञेनेच त्याचा विनियोग करावा. दत्तप्रभूंचेही अर्जुनावर फार प्रेम होते. त्याला आग्रहाने ठेवून घेत. त्याच्याबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी करीत. साहजिकच त्यांच्या सत्संगाने अर्जुनाचे चित्त शुद्ध होत गेले. त्याच्या मनातील भोगेच्छा क्षीण होत गेल्या. हीच उपरति! हळूंहळूं मनाला विषयाच्या भोगात गोडी वाटेना. उत्तरोत्तर दत्तप्रभूंच्या संगतीतच राहावे असे वाटायला लागले. हेच

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

वैराग्य. **दृष्टानुश्रविक विषयवितृष्णस्य वशीकारसंज्ञा वैराग्यम्।** (योगसूत्र 1:15) *दृष्ट* म्हणजे इथे भूलोकात पाहण्यात येणाऱ्या आणि *आनुश्रविक* ऐकण्यात येणाऱ्या म्हणजे पारलौकिक विषयांविषय ज्याची तृष्णा, आसक्ति मावळली आहे आणि हे विषय माझ्या अधीन असले पाहिजेत वश्य आहेत मी यांच्या अधीन होता कामा नये अशी जी जाणीव तेच वैराग्य! हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे. हे ऐंद्रिय भोग क्षणिक आहेत, ह्यांच्यापासून मिळणारे सुख टिकाऊ नाही, खात्रीचे नाही, परिणामी ते दुःखालाच कारण आहेत, ही जाणीव होणे म्हणजेच वैराग्य. अनेक जन्मांच्या अभ्यासाने जीव आपले मूळ स्वरूप विसरून स्थूल-सूक्ष्म देहांशी तादात्म्य पावतो. क्षणभंगुर, सुखाभासात्मक ऐंद्रिय भोगांना भुलून जीवाचा हा देहभाव दृढावत जातो. आपल्या सत्य स्वरूपाकडे उन्मुख होण्यासाठी जीवाचा हा देहभाव शिथिल व्हायला हवा. त्यासाठी ह्या विषयांच्या भुलावणीतून तो बाहेर पडायला हवा. त्यासाठी हे विषय नाशिवंत, फसवे आणि दुःखपर्यवसायी आहेत हे प्रथम जाणवायला हवे. तेवढ्यासाठीच वैराग्य ही ज्ञानाची पहिली पायरी मानली जाते. संसाराच्या आसक्तीचा मुख्य आधार हा देहच असतो. आयुष्यभर त्या देहाचे आपण लाड करतो, त्याला सजवतो, पोसतो आणि त्याचा अभिमान वागवतो. पण त्यांतले चैतन्य हरपले की त्याची काय अवस्था होते हे आपण जगात नेहमीच पहात असूनही त्याचा विचार करीत नाही. अर्जुनाला ह्या देहाची नश्वरता, अशुद्धता आणि व्यर्थता तीव्रतेने जाणवली आहे.

## ज्ञानाची साधने.

वैराग्याबरोबरच विवेक जागा होतो. वैषयिक सुख जर अनित्य आहे, बेभरंवशाचे आहे तर मग नित्य काय आहे याचा शोध मन घेऊं लागते. हा नित्यानित्यवस्तुविवेक होय. विषयोपभोगांतील सुख फसवे आहे तर खरे सुख कशात आहे याचा विचारच सदसद्विवेक होय. हाच विवेक कार्तवीर्याच्या मनात जागा झाला आहे. ऐंद्रिय सुखांच्या मृगजळामागे धावून माझी सुखाची तृष्णा शमतच नाही. मात्र त्या सुखाच्या मागे लागून जीव अनेक बरी-वाईट कर्मे करतो. हीच कर्मे त्याला जन्मरणाच्या परंपरेत फिरवतात. परत-परत आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक तापांत भाजून काढतात. विवेकाने त्याला ह्या बद्धावस्थेची जाणीव झाली की तिच्यातून सुटण्याची त्याच्या मनात मूळ धरते आणि सत्संगाने आणि सच्छास्त्राच्या परिशीलनाने हळूहळू वाढत जाते. हीच संसाराच्या दुःखमूलक दुष्ट चक्रातून सुटण्याची इच्छा म्हणजे मुमुक्षा. **विवेक(1), वैराग्य(2), मुमुक्षा(3)** आणि शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान ही **षट्संपत्ती(4)** हीच ज्ञानाची मुख्य चार साधने मानली गेलेली आहेत. ह्या सतरा ओंव्यातून श्रीस्वामीमहारजांनी कार्तवीर्यार्जुनाची ज्ञानाच्या अभ्यासाची पूर्वतयारी झाली होती हे सूचित केले आहे.

## पुन्हा सत्त्वपरीक्षा

यापप्रमाणे विरक्त होऊन अर्जुन सह्याद्रीवर आला. त्यापूर्वीच भगवान दत्तप्रभू ध्यानस्थ होऊन तटस्थ बसले होते. शिष्याची कसोटी पाहण्यासाठी असे वागणे सद्गुरूंना योग्यच होय. त्यानेच शिष्याचा भाव दृढ होतो आणि त्याचे कल्याण होते. कार्तवीर्याने तन-मन-वाणीने भक्तिभावाने भजन केले; तरीही सर्वांतर्यामी दत्तप्रभूंनी आपले ध्यान सोडले नाही. त्याने अत्यंत कष्टी होऊन अर्जुनाने पाणीही न पितां पुनःपुन्हां नमस्कार करून स्तुति केली. पण श्रीदत्त कांही बोललेच नाहीत. मग तो राजा तळमळला. सद्गदित होऊन, श्रीदत्तांच्या चरणी दृष्टी लावून स्तवन करूं लागला. 18 – 22

अर्जुनाचे हे आंतरिक परिवर्तन अर्थात् दत्तप्रभूंना कळाले आहे. त्यांच्याच कृपेने ते घडले आहे. अर्जुन राज्यापासून, संसारापासून, विषयभोगांपासून उपरत होऊन मोक्षाच्या इच्छेने आपल्याकडे येत आहे हे जाणूनही त्यांनी ध्यानाचा आविर्भाव करून त्याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ते करीत आहेत. अशा वेळी त्याची मुमुक्षा तीव्र करण्यासाठी, वैराग्य बळकट करण्यासाठी आणि त्याच्या विवेकाला धार आणण्यासाठी ही परीक्षा सद्गुरु घेत आहेत त्याला पुढे जो ज्ञानाचा उपदेश करायचा आहे त्यासाठी त्याच्या चित्ताला स्थैर्य आणण्यासाठी हे नाटक सद्गुरू करीत आहेत. ते योग्य तर आहेच, पण आवश्यकही आहे. अगदी सुरुवातीलही अर्जुनाची परीक्षा झाली आह. पण ही त्यापेक्षा वरची परीक्षा आहे. त्या वेळी अर्जुन विशिष्ट प्रापंचिक वासना मनात धरून आला होता. या वेळी तो मुमुक्षू होऊन ब्रह्मजिज्ञासेने आला आहे. त्याला मनुष्यजन्माचे सार्थक करणारे परमश्रेयस्वरूपी स्वरूपज्ञान करून द्यायचे आहे. तेव्हा ही सर्वात मोठी परीक्षा आहे.

# अर्जुनाची आळवणी.

हे करुणाकर, विश्वोद्धारक उदारतम देवा, आज का आपण माझ्यावर रोष केला आहे? तूच माझी माता आणि पितासुद्धा आहेस; तुझ्याविना माझे (आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक) ताप कोण बरे दूर करील? हे संसाराच्या वैऱ्या, माझ्या बालकाच्या बोबड्या बोलांकडे लक्ष देऊन माझ्या सर्व चिंता तूच दूर कर. तुला जे शरण येतात तेच कृतार्थ होतात हे वेदांचे प्रतिपादन व्यर्थ का आहे? “जो माझा भक्त माझ्या चरणी आसक्त होतो त्याचे सर्व दोष जाऊन तो सुखी आणि मुक्त होतो. माझ्या भक्ताचा कधीच नाश होत नाही.” हे आपले वचन आपण लटके करू नका. 23 – 27.

ह्या व पुढील दोन पदांनी कार्तवीर्याने दत्तप्रभूंची आळवणी केली आहे. त्यांचा रोष काढायचा प्रयत्न केला आहे. ही पदे गेय छंदात असून त्यांत करुणरसाचा परिपोष आहे. आपल्या अज्ञानाची आणि अपराधित्वाची कबुली आहे. प्रभूंच्या औदार्याचा आणि दयाशीलतेचा गौरव करून त्यांच्याविना आपला कुणी वाली नाही असे म्हणून आपली अनन्यगतिकता स्पष्ट केली आहे. एवढ्यानेही दत्तप्रभू प्रसन्न होत नाहीत हे पाहून त्यांना वेदांच्या आणि गीतेच्या वचनांचा म्हणजे पर्यायाने त्यांच्याच प्रतिज्ञेचे (कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।।9:31।।) स्मरण करून दिले आहे.

हे भवाच्या शत्रो, श्रीहरे! मित्रा! आज माझ्यावर का रुष्ट आहेस? तुझी भक्त तुझ्याच सेवेत तत्पर होऊन तुझ्यासाठीच हे प्राण धारण केले आहेत. आज माझ्यावर नाराज होऊन हे निष्ठुरतेच्या बाणांनी मला विद्ध करीत आहेस हे कुणाला सहन होईल? माझे काय चुकले ते तरी सांग. पाण्यातून काढलेल्या माशासारखा मी तळमळतो आहे, मी कसा जिवंत राहू? माझी तुला कींव येत नाही का? आपल्य भुकेल्या वासराकडे जशी गाय धावून येते तशा कळवळ्याने येऊन मला त्वरेने दयारूपी दुग्ध पा ज; अन्यथा मी मरून जाईन! 28 – 31.

या पदात आपल्या, “जळाविण मासोळी तैसा तुका तळमळी” अशा मरणोन्मुख अवस्थेचे वर्णन करून देवाच्या कारुण्याला आणि वात्सल्याला आवाहन केले आहे. या “तू माझी गाउली मी तुझे वांसरू। नको पान्हा चोरू, पांडुरंगे। ” या नामदेवांच्या अभंगाची आठवण करून देणारे हे पद आहे.

मी अपराधी आहे म्हणून आपली कृपादृष्टी माझ्यावर टाकीत नाही का? माझे अपराध तर पृथ्वीवरील रजःकणांसारखे अगणित आहेत. माझ्यासारखा दोषी या त्रैलोक्यात नाही असे असले तरी तुझ्यासारखा दयाळूही नाही! जगातले सर्व रोगीच नाहीसे झाले तर वैद्याला कोण विचारील? तद्वत् माझ्यासारखे दयनीय (दया करण्याजोगे)च नसतील तर दयाळूचे काय महत्त्व? हे सद्गुरो, आपणच माझे आई-बाप आहांत तेव्हा माझ्या पापांचे निवारण करा. आपल्या मनात रागाला मुळीच थारा नाही हे मला ठाऊक आहे. 32 - 37

तिसऱ्या पदात आपले अपराधित्वानेच आपण कसे भगवत्कृपेला पात्र आहोत हे सिद्ध केले आहे. “पतितपावन म्हणविसि म्हणुनि आलो मी द्वारी” या संतवचनाचे स्मरण करून देणारे हे पद आहे. ह्या तीनही पदांत अर्जुनाची आर्तता, भक्ति आणि अनन्यता प्रभावीपणे प्रकट होते. श्रीदत्तमाहात्म्यात ठिकठिकाणी अशी भक्तिरसपूर्ण आणि गेय पदे श्रीस्वामीमहाराजांनी दिली आहेत. साधकांच्या भक्तिभावाचा परिपोष करणारी ही भजने त्यांनी हेतुपुरःसरच दिली आहेत. संगीताची आवड असणाऱ्या भक्तांना हे एक प्रभावी साधन आहे.

# गुरूपसत्ती

ज्याच्या स्वरूपावर जगताचा आभास स्वप्नासारखा किंवा दिवट्या फिरवल्यावर भासणाऱ्या अग्निचक्रासारखा दिसतो त्याची शांति केवळ ज्ञानबळानेच संन्यासी साधक करू शकतात; आणि जगदाभासाचा उपशम करून ज्याच्या पदीं भक्त इतके पराकाष्ठेचे लीन होतात की तेथून परत फिरत नाहीत. असे हे परमानंदस्वरूप पद म्हणजेच त्रिगुणात्मक मायेचा आणि

सर्व इंद्रियांचा नियंता तूच आहेस. म्हणूनच तू निश्चयपूर्वक सर्वतंत्रस्वतंत्र आहेस. अशा तुझा मी भक्त असूनही ह्या मायेने बांधला जाऊन, ज्नम-मरणांच्या भयाने त्रासलो आहे आणि शोक आणि मोहाने ग्रासला गेलो आहे. तुला माझी करुणा येत नाही का? प्रसन्न मुखाने एकदा माझ्याकडे पहा. मला या संसाराचे ताप आता सहन होत नाहीत, हे तुला कळत नाही का? आत्ता आठवले, तुला कशा या कळणार? वांझ स्त्रीला प्रसूतीच्या वेदना ठाऊक नसतात तशाच तुला संसाराच्या यातना तुला कुठून कळणार? तू सर्वज्ञ, नित्यमुक्त, जन्ममरणांच्या भीतीपासून दूर, शोक-मोहांनी अस्पृष्ट, सतत आनंदाने भरलेला आहेस. गर्भश्रीमंताला जसा दुष्काळ कधीच कळत नाही तशाच अनंत मंगलमय अशा तुला संसारचा ताप माहीत नाही. तुला संसाराचा अनुभव नसला तरी तू साक्षित्वाने हे सर्व विश्व पहात आहेस ना? मग संसाराने गांजलेला ह्या जीवाकडे जरा पहा! सूर्यरूपी डोळ्याने तू जग पाहतोस तो काय झांकून घेतला काय, ज्यायोगे तुला मी दिसत नाही आणि माझी उपेक्षा तू करीत आहेस? धागा जसा संपूर्ण वस्त्रांत अनुस्यूत असतो तसे हे जग तू व्यापलेले आहेस. असा तू अनंत असून माझा मात्र अंत पहातो आहेस. तूच अस्तित्त्व, जाणीव आणि सुख यांनी भरलेला नारायण आहेस. तू संसाराची भीति दूर करतोय म्हणून तुझ्या आश्रयाला येऊन तुझे पाय मी धरले आहेत. ब्रह्मदेवादि देवांनाही तुझा अंत लागत नाही. तुझे हृद्गत जाणण्याला कोण समर्थ आहे? माझ्यासारख्या पामराला काय कळणार? आता माझे अपराध पोटांत घेऊन प्रसन्न हो आणि डोळे उघडून माझ्याशी दोन गोड शब्द बोल! 38 – 51.

प.प.श्रीस्वामीमहाराजांनी असे वारंवार प्रतिपादन केले आहे की कर्म, भक्ति आणि ज्ञान हे वेगवेगळे मार्ग नसून एकाच मोक्षमार्गावरचे क्रमाने येणारे टप्पे आहेत. श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या सिद्धांतानुसार ज्ञानानेच मोक्ष प्राप्त होतो. (ज्ञानादेव तु कैवल्यम्।) अर्थात् भक्तिसुद्धा ज्ञानपर्यवसायीच असली पाहिजे. त्याप्रमाणे अर्जुनाच्या भक्तीची परिणती आता ज्ञानांत होत आहे. तो ज्ञानाचा अधिकारी कसा होत आहे हे आपण पाहिलेच आहे. आता येथे त्याने दत्तप्रभूंची जी स्तुति केली आहे. तिच्यात त्याचे परोक्ष ज्ञान प्रतिबिंबित झाले आहे. परोक्ष ज्ञान याचा अर्थ बोद्धिक ज्ञान होय. ज्ञानमार्गाची पहिली पायरी श्रवण होय. श्रवण म्हणजे वेदांतशास्त्राचे, उपनिषदांतील विचारांचे श्रवण होय. वर आपण पीहिलेली चार साधने (विवेक, वैराग्य, मुमुक्षा आणि षट्संपत्ति) मिळविल्यानंतर मुमुक्षूने शाब्दिक आणि अनुभवजन्य ज्ञानाने संपन्न (शाब्दे परे च निष्णातम्।) अशा सद्गुरूंना शरण जावे असे वेदांचे सांगण आहे. यालाच गुरूपसत्ति अशी संज्ञा आहे. अशा गुरूंजवळ जाऊन त्यांची सेवा करून, नम्रतेने, सावधानतेने त्यांना प्रश्न विचारावे म्हणजे ते ब्रह्मानुभवी विद्वान् आपल्याला ज्ञानाचा उपदेश करतात असे भगद्गीतेतही म्हटले आहे. (**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः**।।4:34।।) अर्जुन दत्तप्रभूंचा शिष्य पूर्वीपासूनच आहे. त्यांच्याशी झालेल्या सहज संवादांतून त्याच्या कळत नकळत त्याचे श्रवण झाले आहे. तेच परोक्ष ज्ञान या स्तवनांत व्यक्त झाले आहे.

पेटलेला पलिता वेगाने फिरवून जसे चक्राचा (अलातचक्र) आभास होतो तसाच तुझ्याच स्वरूपावर हा मिथ्या मायिक जगदाभास उगवला आहे. स्वप्नासारख्या या जड प्रपंचाचे छेदन यत्नशील, यमनियमांचे व्रत घेतलेले संन्यासी ज्ञानी साधकच सद्गुरुवचनरूपी ज्ञनखड्गाने करू शकतात. तेच पुनरावृत्तिरहित असे तुझे पद पावतात. (**अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेन दृढेन छित्वा। ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः**।।भ.गी.15:3-4।। अशा शब्दांत अर्जुनाने आपला ज्ञानप्राप्तीचा हेतु निःसंदिग्धपणे निवेदन केला आहे. मग 'सच्चिदानंदस्वरूप परमात्मा तूच आहेस, ह्या संसारभयापासून सुटण्यासाठी मी तुला शरण आलो आहे' असे स्पष्ट उद्गार त्याने काढले आहेत. हे उद्गार पांडव अर्जुनाच्या "शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।" (मी तुझा शिष्य आहे, शरणागत आहे, माझे रक्षण कर) ह्या उद्गारांशी पडताळून पाहण्यासारखे आहेत. सद्गुरूना संपूर्ण शरणागति झाल्यावरच शिष्य ज्ञानाला पात्र होतो. दत्तप्रभू साक्षात् परब्रह्म आहेत ही अर्जुनाची श्रद्धाही महत्त्वाची आहे. ज्याची परमेश्वरावर परम भक्ति आहे आणि तशीच भक्ति सद्गुरूंवर आहे, परमेश्वर आणि सद्गुरु अभिन्न आहेत अशी दृढ श्रद्धा आहे त्याच महात्म्याच्या बुद्धीत या ज्ञानाचा प्रकाश होतो असे श्वेताश्वतर उपनिषदाचे वचन

आहे.(6:21) पातंजल सूत्रानुसारही ईश्वर कालातीत असल्याने पूर्वीच्या सर्व सिद्धांचा गुरू आहे. (स एव पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्||1:26)).

"अरे! मी ध्यानाला बसलो आहे ते पाहतोस तरीहि का माझ्या मागे लागला आहेस?" असे कदाचित् दत्तप्रभू म्हणतील त्याला उत्तर म्हणून " तुमच्या मनाचा थांग ब्रह्मादिकांनाही लागत नाही तिथे माझ्या पामराचा काय पाड? " असे म्हटले आहे.

ह्या ऐंद्रिय सुखाच्या वासनेने मी संसाररूपी बिळांत घुसलो खरा;पण तेथे उंदराला सापाने गिळावे तसा हा मृत्यू माझा ग्रास करतो आहे. ह्या संसाररूपी अरण्यात मी सांपडलो आणि त्रितापांच्या वणव्यात मी होरपळत आहे. हे दयाघना, त्याने मी लाचार आणि आर्त होऊन मरणोन्मुख झाल्याने तुला शरण आलो आहे. हा तू घेतलेला दत्तरूपी अवतार भक्ती, ज्ञान आणि विरक्ती यांचे वर देऊन मुमुक्षूंचा उद्धार करतो असा माझ्या मनाचा दृढ निश्चय आहे. "अरे संसारसुखाचा उपभोग घे" असे म्हणशील तर ते मला दुःखच वाटते; त्यापेक्षा विष बरे वाटावे इतका मी त्या संसारसुखाला विटलो आहे. स्त्री, पुत्र, मित्र, धन, राज्यपद हे सगळे मायिक असून आपले स्वरूप झांकणारे असल्याने त्याज्य आहेत. त्यांच्या आठवणीनेही मनस्ताप वाटतो. अशा संसारांत रमण्यापेक्षा विंचवांचे पांघरूण घेऊन, सापाची उशी करून लाल निखाऱ्यांवर झोंपणे सोपे आहे! हेसुद्धा कदाचित् कुणाला जमेल पण तथाकथित संसारसुख त्यापेक्षां अधिक कष्ट आणि मनस्ताप देणारे आहे. कारण ते प्रमादरूपी मृत्यूला आणि मोहाला कारण होते. त्याहून नरक परवडला पण संसारसुखाची वार्तासुद्धा आम्हांला नको अशी खूणगांठ मनाशी बांधून मी तुझी कांस धरली आहे. संसारसुखाशिवाय जे इतर शत्रू – मग इंद्राचे वज्र, दंड धारण करणारा यम, पंचमहाभूते, हिंस्र पशू जरी असले तरी त्यांचे तेवढे भय वाटत नाही. ह्या संसारचक्राचा भेद करण्याचा फक्त तुझे भयालाच भिवविणारे तुझे चरणकमलच आहेत अशी माझ्या मनाची खात्री झाली आहे. तुझ्या पायांचा आसरा घेतल्याने हा देह आनंदाश्रूंनी भिजून निघेल आणि संसारचक्राची गतीच खुंटेल. यापेक्षा अधिक कल्याण ते काय? हे विषयांचे सुख कुणाला द्यायचेच असले तर जे मानव आपल्याला विन्मुख आहेत त्यांना द्या. ते हे विषयसुख भोगायला उत्सुक असतील. आपल्या कृपेने मला ह्या जीवनाचे सार समजले आहे त्याने मी संसारापासून विरक्त झालो आहे आणि तुझ्या चरणी जीव जडविला आहे, तरी हे मुकुंदा (मुक्तिदात्या) मला मुक्त कर. मला ऐहिक किंवा पारलौकिक (स्वर्गीय) भोगांची इच्छा नाही; त्या तुच्छ भोगांकडे कोण पाहतो? मला केवळ तुझ्या चरणसेवेची इच्छा आहे ती हे कल्पतरो, ती तू पुरव ! ते अत्रि आणि अनसूया धन्य होत ज्यांनी वेदांनाही अगोचर अशा तुज परमात्म्याला नामरूपात आणले. तो तू साक्षात् भगवंत आपल्या भक्तांचे माहेर आहेस. तू का मला दूर ढकलतो आहेस? काठीने कधी पाणी दुभंगता येते काय? भक्तांच्या आधि आणि व्याधि नष्ट करणाऱ्या विश्वनाथा, इंद्रियांच्या नियंत्या, सर्वव्यापी परमेश्वरा, मायाधीशा तुला नमस्कार असो. अशी स्तुति करून अर्जुन मूर्च्छित झाला. नंतर पुनश्च भानावर येऊन भक्तिभावाने त्याने स्तवन सुरू केले. 51 – 69

ह्या ओव्यातून आपण या संसारचक्रांत कसे अडकलो याचे वर्णन केले आहे. इंद्रियांच्या आवडी-निवडीने त्या त्या विषयांची आवड किंवा नावड उत्पन्न होते. हेच राग आणि द्वेष होत. ज्या विषयांपासून सुखाची अनुभूति होते त्यांच्याविषयी राग म्हणजे आकर्षण वाटते. (सुखानुशयी रागः|| योगसूत्र 2:7) तसेच ज्या विषयापासून इंद्रियांना दुःखाची अनुभूति येते त्यांच्याविषयी द्वेष वाटतो. (दुःखानुशयी रागः|| योगसूत्र 2:8) हे विषय सर्वांनाच सर्व काळी सुखच किंवा दुःखच देतील असे सांगतां येत नाही. एकाला सुखद वाटणारा विषय दुसऱ्याला दुःखकारकही वाटू शकतो. इतकेच नाही तर एकाच व्यक्तीला आज सुखद वाटणारा विषय उद्यां सुखद

वाटेलच असे नाही. अशा रीतीने ह्या आवडी-नावडी बदलत असतात. ह्यांच्या ऊर्मींनी प्रेरित होऊन जीव विषयांच्या मागे धावतो आणि त्यांच्या प्राप्तीसाठी केलेल्या कर्मांपासून पापपुण्यांचा संचय करतो. पुनरपि जननं पुनरपि मरणं अशा दुर्धर संसारात त्रिविध तापांनी होरपळून निघतो. अशा ह्या जीवांच्या उद्धाराकरितांच आपला अवतार आहे याचे राजाने प्रभूंना स्मरण करून दिले आहेत. “ते पुढे पाहता येईल; पण तोंपर्यंत तुला दिलेल्या राज्याचा आणि सिद्धींचा उपभोग घे, ” असे कदाचित् दत्तप्रभू म्हणतील या अपेक्षेने हे संसारसुख कसे अनर्थकारक आहे ते अर्जुनाने सांगितले आहे. संसारसुखाला अग्नीची उपमा देण्यात अर्जुनाला असे म्हणायचे आहे की त्याच्या उपभोगांनी माणूस कधीच तृप्त होत नाही. उलट अग्नीत जितकी आहुती घालावी तितका तो जसा अधिकच भडकतो त्याप्रमाणे उपभोगाने काम अधिकच बळावतो, (**न जातुः कामः कामानामुपभोगेन शाम्यति। हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते।।** आदिपर्व 85:12) या महाभारतातल्या ययातीच्या वचनाचे इथे स्मरण होते. वैराग्य किती तीव्र असावे त्याचे हे दिग्दर्शन आहे. संसारसुखाची ओढ तर दूरच पण त्याची हिंस्र पशूंपेक्षा किंवा बलाढ्य शत्रूंपेक्षा अधिक भीति वाटली पाहिजे. तीव्र मुमुक्षूचेही असेच वर्णन इथे आठवते. सगळीकडून पेटलेल्या घरांतला माणूस तिथून बाहेर पडायला जसा आतुर होतो तसाच संसारातून सुटायला उद्युक्त होतो तोच तीव्र मुमुक्षू. असा मुमुक्षूच ज्ञानाचा अधिकारी असतो. शेवटी आपली श्रीदत्तचरणावरूल नितांत श्रद्धा अर्जुनाने व्यक्त केली आहे. भक्तीच्या आवेगाने तो मूर्च्छित झाला आहे.

हे अत्रिमुनींच्या मुला, जागे व्हा! आपले भक्त आपल्या दर्शनासाठी आले आहे; डोळे उघडून त्यांच्याकडे पहा आणि त्यांच्या इच्छा पूर्ण करा. आपले दयापूर्ण नयन उघडून आपल्या या दासाला पोटाशी धरा. त्याला निराश न करतां त्याच्या आनंदाने कवेत घ्या. कारण ते आनंदाने तुझ्या पायी रमले आहेत आणि आपल्या स्त्रीपुत्रांना, घरादाराला विसरले आहेत. एवढेच नाही स्वतःच्या देहाचीही त्यांनी पर्वा न करता तुझ्या चरणी भावभराने लीन झाले आहेत. भक्तिभावाने तुझ्या आसऱ्याला आलेल्या आम्हा भक्तांपासून पापी जनांला तारणारे आणि मृत्यूच्या भयापासून मुक्त करणारे आपले चरण का बरे लपवीत आहेस? आता मन कठोर न करता आम्हाला लवकर दिलासा दे. दयेचा वर्षाव करणाऱ्या मेघा आता लवकर तापापासून तोडव. हे चिन्मय करुणासागर सद्गुरुराया त्वरेने उठून आपली माया आवरा. 70 – 75.

अशी ती रात्र निघून गेली आणि अर्जुन सावध झाला तेव्हा सकाळ होत होती. ह्या भूपाळीने राजाने आपली आळवणी पुढे चालू ठेवली आहे.

अशी स्तुति करून अर्जुन मुकाट्याने एका बाजूला उभा राहिला. तेवढ्यात सूर्योदय झाला आणि पूर्व दिशा अरुण तेजाने उजळली. सिद्ध, मुनी, ऋषी, गंधर्व, देव, अप्सरा, गंधर्व यांची दर्शनासाठी रीघ लागला. अत्यंत नम्रपणे ते सर्व येऊन दत्तप्रभूंना नमस्कार करून जात होते. सह्याद्रि पर्वतावर राहणारे मुनीही दर्शनाल येऊन गेले. त्यांतीलच एक शांततपा मुनी मृत्तिका आण पाणी घेऊन आला. तेव्हा श्रीदत्त ती माती आणि पाणी घेऊन नैर्ऋत्येली (बहिर्दिशेला) जाऊन आले. मग दुसऱ्या एका मुनीने आणलेल्या मातीने आणि समिधांनी शौच करून दंतधावन केले. मग दत्तप्रभूंनी सरोवरांत स्नान करून देव, ऋषि आणि पितर यांचे तर्पण केले. मग आणखी एका मुनीने आळलेली भस्म आणि वल्कले धारण करून त्यांनी संध्या केली आणि पुनः ध्यान लावून बसले. राजा खिन्नपणे हात जोडून उभा होता. मग शांततपानेच सद्गुरूंना वंदन करून नम्रपणे बोलण्यास सुरुवात केली. “भगवंता! हा आपला भक्त अर्जुन उपाशी तिष्ठत आहे. याने आपला आश्रय केला आहे. ह्याला निराश करू नका. ह्या अर्जुनाने मनापासून आपली भक्ति केली आहे. आपण हा किती भाविक आहे ते जाणतांच. तरी आपण याची उपेक्षा न करता ह्याच्यावर कृपादृष्टी टाकावी.” 76 – 85.

यानंतर श्रीदत्तप्रभूंच्या दिनचर्येचे वर्णन आहे. सर्व आश्रमांच्या अतीत झालेल्या प्रभूंना कांहीही अप्राप्त नव्हते. कांहीच मिळविण्यासारखे नव्हते. त्यांना कर्तव्य असे कांहीच नव्हते. तरीही वर्णाश्रमोचित कर्मे ते करीत आहेत. (न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किन्चन। नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।। भ.गी.3:21). श्रेष्ठ लोक ज्याप्रमाणे आचरण करतात त्याप्रमाणेच सगळे वागतात. ते ज्याला प्रमाण करतात त्याचेच अनुसरण लोक करतात. अशी लोकसंग्रहाकडे दृष्टी ठेवून दत्तप्रभू कर्मयोग आचरून दाखवीत आहेत.

अशा रीतीने उपेक्षिला गेलेला अर्जुन उदास झालेला पाहून शांततपा मुनींना त्याची दया आली. त्यांनी त्याची एक प्रकारे वकीलीच प्रभूंकडे केली आहे. इथे संतकृपेचे महत्त्व दिसून येते. ईश्वराची कृपा संपादन करणे कठिण आहे. आपापल्या कर्मानुसारच तो फळ देतो. तपस्येच्या किंवा साधनेच्या बळावर त्याला प्रसन्न करून घेणे दुरापास्त आहे. मात्र त्याच्या कृपेला पात्र झालेल्या दयाळू संतांची अनुकूलता सहज आहे. त्यांनी मध्यस्थी केली तर देव त्यांचा शब्द व्यर्थ जाऊं देत नाही. एवढ्यासाठीच आद्यशंकराचार्यांपासून (त्रिजगति सज्जनसंगतिरेका भवति भवर्णवतरणे नौका) संत तुकाराममहाराजांपर्यंत (न लगे मुक्ति धन संपदा। संतसंग दे गा सदा) सर्वांनीच संतसंगाचे महिमान वर्णिले आहे.

यावर किंचित् हंसून श्रीदत्त म्हणतात, “काय इच्छा आहे त्याची? आणखी संपत्ती, वैभव हवे असेल तर लगेच देतो. माझ्या भक्ताला काय दुर्लभ आहे? त्याच्यावरच्या प्रेमाने सगळ्या सिद्धि तर त्याला दिल्याच आहेत. हव्या तर आणखीही देतो!” हे ऐकून अर्जुनाच्या डोळ्यांत पाणी आले. तो म्हणाला, “देवा! प्राणेश्वरा!! तू अंतर्यामी आहेस, माझे मनोगत जाणतोस. ही कठोर परीक्षा आता पुरे झाली. ही आपण मला चांगली शिक्षा केली. आतां मात्र माझ्यावर कृपादृष्टी करा, माझी उपेक्षा करू नका. तहानलेल्याला पाणी द्यावे, भुकेलेल्याला अन्न द्यावे, दरिद्र्याला धन द्यावे, पीडिताला संरक्षण द्यावे. सारांश ज्याला जे ज्या काळी योग्य असेल तेच द्यावे हे मी आपल्याला काय सांगावे? आपण सर्वज्ञ आहांत. मी काय मागूं? आपणच माझे हृद्गत जाणून योग्य ते करावे. आतां काही इच्छा नाही. पूर्वसुकृताने आपली कृपा झाल्याने मला मोक्षाची इच्छा झाली आहे. मला आपण ज्ञानदीक्षा द्यावी. आपल्या बुद्धीने शास्त्राभ्यासाचे कष्ट मी घेतले खरे; पण त्याने माझ्या मनाचा गोंधळच झाला आहे. या शास्त्रांची संगती लागत नाही आणि इंद्रियांवर ताबाही रहात नाही. ”

शांततपा मुनींच्या विनंतीला मान देऊन दत्तप्रभूंनी अर्जुनाशी संवाद आरंभिला आहे. त्यांतही किंचित् उपरोध गर्भित आहे. अर्जुनाचा उरलासुरला अभिमानही गळून जावा असाच त्याचा उद्देश आहे. राजाने आपला अपराध पुन्हा पदरांत घेऊन आपल्याला आत्मज्ञानाची भूक असल्याचे स्पष्ट केले. ह्या जिज्ञासेने आपण जो शास्त्राभ्यास केला त्याने मनाचा गोंधळच वाढला. निश्चित दिशा कांही मिळाली नाही. याचे कारण त्याच्याच बोलण्यात स्पष्ट झाले आहे. त्याने आपल्या बुद्धीनेच शास्त्रे वाचली. परमार्थासाठी अशा केवळ स्वबुद्धीनेच केलेल्या अभ्यासाचा विपरीतच परिणाम होतो हे इथे श्रीस्वामीमहाराजांना सुचवायचे आहे. अधिकारी गुरूवाचून शास्त्राभ्यासाचा इष्ट परिणाम होत नाही याची सर्वच साधकांनी खूणगांठ बांधून ठेवावी.

“वेदांती म्हणतात वाणी आणि मन यांना अगोचर असे ब्रह्मच परम सत्य आहे; हे दृश्य जग जगत मायिक आणि क्षणभंगुर आहे. दुसरे (काणाद इत्यादि वैशेषिक) जे प्रत्यक्ष अनुभवाला येते ते असत्य कसे असेल? ते अनादि आणि सत्य आहे. जैमिनी आदि पूर्वमीमासक सुखप्राप्तीसाठी कर्मयोगाचीच आवश्यकता प्रतिपादन करतात. काणाद (वैशेषिक) असतापासूनच जगताची उत्पत्ति मानतात तर सांख्य जीव अनेक आहेत असे सांगतात. योगी योगापासूनच सुख मिळते असे म्हणतात तर शून्यवादी (बौद्ध) सर्व क्षणिक आणि दुःखमयच असल्याचे ठासून सांगतात. कुणी ईश्वराला निमित्तकारण मानतात, तर कुणी त्याला कर्मपरतंत्र ठरवतात. कुणी प्रधानाला कारण मानतात तर कुणी निमित्त आणि उपादान अशी दोन कारणे मानतात. हे सर्व आपापली मते सिद्ध करण्यासाठी वेदवाक्याचेच प्रमाण दाखवितात. ह्या सर्वांनी

माझी बुद्धि गोंधळून गेल्याने मी आपल्याला शरण आलो आहे. या सगळ्यांत खरे काय आहे, मुमुक्षूने काय केले पाहिजे ते आपण मला समजावून मोक्षाचा उपाय दाखवाव एवढ्यासाठी मी हे पाय धरले आहेत. " ८६ – ९९.

ह्या ओव्यांतून राजाने भारतीय परंपरेतील सहा मुख्य शास्त्रांच्या (यांनाच दर्शने असेही म्हणतात) सिद्धांतांचा निर्देश केला आहे. जैमिनीची पूर्वमीमांसा (किंवा नुसती मीमांसा), व्यासांचे वेदान्तदर्शन (किंवा उत्तरमीमांसा), काणादाचे वैशेषिक, गौतमाचे न्याय, कपिलाचे सांख्य आणि पतंजलीचे योग अशी सहा दर्शने आहेत. जीव, जगत आणि ईश्वर यांचे स्वरूप, परस्परसंबंध, दुःखाचे कारण, दुःखनिवृत्ती किंवा सुखप्राप्तीचा उपाय याचे मार्ग यांचा विचार या षड्दर्शनातून या महान दार्शनिकांनी केला आहे. ही सर्व दर्शने वेदांचे प्रामाण्य मानणारी आहे. अर्जुनाने न गणलेली, वेदांचे प्रामाण्य न मानणारीही कांही दर्शने आहेत. उदा:- चार्वाक, जैन, सौगत (बौद्ध) इत्यादि. या शास्त्रांतील सकृद्दर्शनी परस्परविरोधी सिद्धांतांनी अर्जुन गोंधळून गेला आहे. वेदांतशास्त्राचे अनुयायी हे जग आभासात्मक आहे, केवळ ब्रह्मच सत्य आहे असे म्हणतात. उलट वैशेषिक, नैयायिक, सांख्यमतानुसारी जगाला सत्य मानतात कारण ते प्रत्यक्ष अनुभवाला येते. वेदांत्यांच्या मते ज्ञानानेच सुख मिळते तर मीमांसकांच्या मते यज्ञांच्या अनुष्ठानाने. योगी म्हणतात की योगाभ्यासच सुखाचे साधन आहे. या सर्व सिद्धांतांचा विचार इथे करणे शक्य नाही. मुख्य आशय असा आहे की केवळ स्वबुद्धीनेच केलेल्या शास्त्राभ्यासाने मनाचा गोंधळच होतो. सर्व शास्त्रांचा अभ्यास करून जो त्यांचा समन्वय करतो असा साक्षात्कारी सद्गुरूच शिष्याच्या बुद्धीला स्थैर्य आणतो.

“हे प्रभो! आपल्या कृपेने संपूर्ण त्रैलोक्यांत माझी आज्ञा कुणीही उल्लंघत नाही, सर्व शत्रूंना मी माझे जास केले आहे. माझ्या घरात अक्षय समृद्धि आहे. सर्व भोग भोगून माझे मन त्यांना विटले आहे. आत्मज्ञानापेक्षा श्रेष्ठ असे इतर काहीच मला वाटत नाही. माझ्या गुरुदेवा! मी शपथेवर तुम्हाला सांगतो आपले पाय मी घट्ट धरले आहेत. माझा या संसारसागरातून उद्धार करा. काहीही युक्ति करून मला ह्या भयावह संसाराच्या दरीतून वर काढा. दुसरा कुणीच माझा उद्धार करणारा नाही. आपण ब्रह्मादिकांचेही गुरु आहांत असे वेदांचे वचन आहे. हा मायेचा पडदा काढणारा आपणांहून दुसरा दयाळू कोण आहे? तन, मन आणि वाणीने आपल्यावर भरंवसा ठेवून मी धरणे धरून बसलो आहे हे आपण जाणतांच. आपण पूर्वी सुप्रसन्न होऊन वर मागायला सांगितला होता. त्या वेळी माझे दुर्दैव आड आल्याने मी नाशिवंत ऐहिक वैभवच मागून घेतले. आपल्याच दुर्धर मायेचा तो प्रभाव होता. तिला कोण जिंकू शकेल? आता मी पुनःपुन्हा पाया पडतो आहे, माझा उद्धार करा!”

कार्तवीर्याच्या ह्या निवेदनात ह्या अध्यायाचाच समारोप आणि सारंश आहे. त्यावर अधिक स्पष्टीकरणाची आवश्यकता नाही.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सातवा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ८ वा.

गुरुसुरेंद्र संवाद। सात गाथेचा अनुवाद। शिल्पज्ञ कथा विशद। जन्मांतर तयाचें।।१८।।
एक रेवातटस्थ ब्राह्मण। कामशास्त्रप्रवीण। तो अनुक्रमें घे निर्वाण। अष्टमाध्यायीं हे कथा।।१९।।

**दीपकाला वेदधर्मा गुरु पुढे सांगताहेत. अर्जुनाची प्रार्थना ऐकून योगिराज दत्तात्रेय त्याला समजावून सांगतात. "अर्जुना तू सात्त्विक आहेस आणि दैवी संपत्तीचा धनी आहेस. पूर्वकर्मानुसार माझ्या वरदानाने तू सगळे भोग भोगलेले आहेत. त्यानंतर तू केलेल्या माझ्या सेवेने तुला सांप्रत हे वैराग्य प्राप्त झाले आहे. आता तुला लवकरच याचि देही याचि डोळां मुक्तीचे सुख अनुभवाला येईल. मुक्तीसाठी आवश्यक असणारे स्वस्वरूपाचे ज्ञान हवे असेल शास्त्रांच्या प्रमाणांचा अवलंब करावा लागतो. पण त्यासाठी सुविचाराने सर्व शास्त्रांचे एकच तत्त्व जाणून द्वैतदृष्टी सोडली पाहिजे. अशा समन्वयात्मक परिशीलनाने सर्व शास्त्रांचे तात्पर्य एकच आहे हे कळते. ह्याचा अभिप्राय विशद करण्यासाठी तुला एक आख्यान सांगतो."**

## क्षुद्र शास्त्राच्या अभ्यासावर इंद्राचा आक्षेप.

**एकदा देवांचा राजा इंद्र देवगुरु बृहस्पतींच्या दर्शनाला आला. गुरुमहाराजांना पाहतांच ऐरावतावरून उतरून पायीं चालत येऊन त्याने त्यांना नमस्कार केला. गुरूंनी त्याला बसायला आसन दिले. त्या वेळी त्याने तेथे बृहस्पतींजवळ एकाग्रतेने शास्त्राभ्यास करणारे बरेच शिष्य पाहिले. त्यांतील कांही शिष्य चार्वाकाच्या लोकायत शास्त्राचा अभ्यास करीत होते तर काही कामशास्त्राचा; कुणी शिल्पशास्त्राचा तर कुणी न्यायशास्त्राचा! ते पाहून त्याने गुरूंना विचारले, "गुरुमहाराज! आपण जे शिक्षण देत आहांत त्याने ते शिष्य (मायेच्या) बंधनात अधिकच गुरफटतील असे नाही वाटत? पूर्वजन्मीच्या संस्कारांनी जन्मतःच विषयवासना असते. कामादि शास्त्रांच्या अभ्यासाने ती अधिकच बलवान होऊन शिष्याला पुरता नरकात बुडवून टाकील ! आधीच उल्हास त्यांतून फाल्गुन मास असेच हे झाले ! ह्या क्षुद्र शास्त्राच्या अभ्यासाने ह्यांचा विषयांचेच चिंतन होईल. असल्या हीन शास्त्रांच्या परिशीलनाने यांची मने विषयांनीच व्यापून जातील. म्हणजे त्यांना अंधाऱ्या आडात ढकलून दिल्यासारखेच हे होईल. स्वभावतःच कामुक असलेल्यांना हे विषयात्मक शास्त्रांचे शिक्षण घातकच ठरेल ना? " (1 -13)**

मागच्या अध्यायात कार्तवीर्याने विचारलेली शंका मुख्यतः आध्यात्मिक शास्त्रांविषयी होती. तिचे उत्तर देतांना मात्र दत्तप्रभूंनी लहान मोठ्या सर्व शास्त्रांचा विचार केला आहे. जीव, जगत, शाश्वत सुखाचा शोध यांचा मागोवा घेणारी दर्शनेच केवळ विचारात न घेता सर्वच शास्त्रांचा समावेश इथे केलेला दिसतो. इथे शास्त्र हा शब्द अधिक व्यापक झाला आहे. मीमांसा, न्याय, वेदांत, योग इत्यादि शास्त्रांबरोबर शिल्प, काम इत्यादि सर्वच शास्त्रे या विवेचनात आली आहेत. इंद्राचा ह्या शास्त्रांच्या अभ्यासालाच आक्षेप आहे. तो त्याने स्पष्ट शब्दात गुरूंपुढे मांडला आहे.

## सर्व शास्त्रे परमेश्वरप्रणीत.

**त्यावर बृहस्पतींनी इंद्राला यांत आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही असे म्हणून सर्व शास्त्राचे तात्पर्य – अंतिम लक्ष्य एक परमेश्वरच आहे त्यामुळे ती बाधक होत नाहीत ह्या अर्थी सात गाथा**

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

**इंद्राचे मन निःशंक होण्यासाठी सांगायला आरंभ केला. कापिल्यनगरीत एक विधिज्ञ नावाचा शिल्पकार होता. वास्तुशासात्राचा तो उत्तम जाणकार होता. घराच्या जागेची शुद्धि, घर बांधण्यातील आर्थक व्यवहार तसेच घरांतील भूतप्रेतादि बाधांचे निराकरण ह्यांत तो तज्ज्ञ होता. घर बांधण्याचे विधीहि तो उत्तम प्रकारे जाणत होता. त्यामुळे त्याने बांधलेले घर सुखाचे धाम होत असे. त्या घरांत धर्माचे उत्सव, यज्ञ आदि मंगल कार्ये संपन्न होत. त्या घरांत राहणारे लोक ज्वरादि रोगांपासून मुक्त असत. त्याच्याकडूनच घर बांधून घेण्याचा लोक आग्रह धरीत. अशा रीतीने तो विधिज्ञ प्रसिद्ध झाला. त्याला खूप पैसाही मिळाला. कधीही असत्य भाषण न करणाऱ्या, शास्त्राधाराने लोकांचे आधी, व्याधी, अपमृत्यू इत्यादीपासून संरक्षण करणारी उत्तम घरे बांधूणाऱ्या त्याला सर्व लोक नावाजीत. अशा रीतीने यश मिळवून तो वृद्धापकाळी मरण पावला. मृत्यूनंतर स्वर्गात जाऊन उत्तम सुखांचा उपभोग घेऊन पूर्वपुण्याईच्या बळाने तो पुन्हा पृथ्वीवर राजा होऊन जन्म पावला. त्या जन्मातही त्याने लोककल्याणासाठी प्रासाद, देवालये, धर्मशाळा बांधविल्या. पूर्त, इष्ट, दत्त अशी पुण्यकर्मे करीत आपले आयुष्य व्यतात करून तो मरण पावला. पुनश्च स्वर्गांत जाऊन परत भूलोकात ब्राह्मण कुळात त्याचा जन्म झाला. (14 -23)**

इंद्राच्या आक्षेपाचे समाधान करतांना गुरूंनी एक महत्त्वाचा पण सकृद्दर्शनी गोंधळात टाकणारा सिद्धांत मांडला आहे. ते म्हणतात की सर्व श्रेष्ठ-कनिष्ठ शास्त्रांचे तात्पर्य ईश्वरात आहे. शिल्पशास्त्र, कामशास्त्र इत्यादि शास्त्रांचे तात्पर्य किंवा लक्ष्य ईश्वर कसे असू शकते हे समजायला जरा कठिण आहे. जरी श्रीस्वामीमहाराजांनी आधुनिक भौतिक शास्त्रांचा उल्लेख केला नसले तरी लोकायत शास्त्राचा निर्देश आहे. लोकायत शास्त्र हे केवळ प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित आहे. अनुमान किंवा शब्द ही प्रमाणे तें मानीत नाही. मानवी इंद्रियांना गोचर असलेले जगच सत्य आहे, त्यापेक्षा अधिक किंवा वेगळे असे काहीच नाही असे त्या दर्शनाचे मत आहे. पदार्थविज्ञान, रसायन, जीवशास्त्र इत्यादि आधुनिक भौतिक शास्त्रे प्रत्यक्ष प्रमाणच मानणारी आहेत. त्या अर्थाने ती लोकायत शास्त्राचाच आधुनिक आविष्कार आहेत असे मानता येईल. म्हणजेच या सर्व शास्त्रांचे तात्पर्यही ईश्वरातच आहे असे बृहस्पतींचे मत आहे.

ह्याचा गर्भित अर्थ कळण्यासाठी शास्त्रांच्या स्वरूपाचा थोडा विचार करणे गरजेचे आहे. शास्त्र हे मानवी जीवनाच्या किंवा मानवी जीवनाच्या विवक्षित अंगाच्या अभ्यासातून बनते. मानवी जीवनाच्या कोणत्याही भागाचा हा अभ्यास सत्याचाच शोध असतो. काम, शिल्प, रसायन, पदार्थविज्ञान इत्यादि त्या त्या विषयाच्या मुळाशी जाऊन त्याचे वास्तव स्वरूप शोधत असतात. हे सत्यान्वेषण जितके सखोल होते तितके ते परमेश्वराच्या जवळ जाते कारण वैदिक विचारसरणीप्रमाणे सर्व चराचर सृष्टी ईश्वराने व्यापलेली आहे. ह्या सृष्टीच्या कोणत्याही घटकाच्या स्वरूपाचा कोणत्याही अंगाने, कोणत्याही पद्धतीने शोध घेतला तरी तो ईश्वराकडेच जाणार. त्यामुळेच लोकायत, सौगत इत्यादि अवैदिक शास्त्रांविषयीसुद्धा यत्किंचितही आकस वैदिक विचारसरणीत नाही. अर्थात् हे खरेच आहे की ह्या शास्त्रांच्या - पर्यायाने मानवी बुद्धीच्या मर्यादा लक्षांत घेता, ही शास्त्रे साक्षात् परमेश्वरी तत्त्वापर्यंत पोहोंचू शकणार नाहीत. पण त्या शास्त्रांचा अभ्यास आणि निःस्वार्थ आचरण हे परमेश्वराच्या जवळ नेणारेच ठरते. साक्षात् परम सत्याचे दर्शन ह्या शास्त्रांच्या द्वारा न झाले तरी त्यांचा अभ्यास करून त्या शास्त्राची तत्त्वें आपल्या जीवनांत प्रामाणिकपणे उतरविणारा ईश्वरदर्शनाला अधिकाधिक योग्य होतो. हाच बृहस्पतींच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. मग ते अगदी कामशास्त्रही असले तरी! हेच विशद करण्यासाठी भारतीय परंपरेनुसार बृहस्पतींनी सात आख्याने

सांगितली आहेत. यांतून भौतिक आणि आध्यात्मिक अशा सर्वच शास्त्रांच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट केले आहे तसेच इतर कांही आनुषंगिक विषयांवरही प्रकाश टाकला आहे.

पहिले उदाहरण शिल्पाशास्त्राचे घेतले आहे. भारतीय शिल्पशास्त्रात किती गोष्टींचा विचार होतो ते जाता जाता सांगितले आहे. स्थान, वास्तु, तेथील शल्ये (सुखाला बाधक गोष्टी), बांधकामाचा विधि इत्यादि सर्व अंगांचा साकल्याने अभ्यास करून अनेक लोकांच्या सुरक्षित, सुखकारक आणि मंगलदायक घरांची रचना केल्याने त्या शिल्पकाराला स्वर्ग मिळाला. त्याचबरोबर शिल्पशास्त्राच्या अभ्यासाने त्याची आध्यात्मिक प्रगति होऊन त्याला सत्प्रवृत्त राजाचा जन्म मिळाला. त्याही जन्मात त्याने राजधर्माचे उत्तम पालन करून लोकल्याणासाठी इष्ट, दत्त आणि पूर्त कार्ये केली. अग्निहोत्र, तप, सत्य, वेदांचे अनुपालन, आतिथ्य आणि वैश्वदेव यांना **इष्ट** असे नाव आहे. शरणागतांचे संरक्षण, प्राणिमात्रांना अभय (अहिंसा), यज्ञाव्यतिरिक्त केलेले दान यांना **दत्त** म्हणतात. विहीर, आड, तलाव इत्यादि जलसंचय, देवळे बांधणे, अन्नसत्रे आणि उद्याने यांची निर्मिति ही **पूर्त** कर्मे होत. ह्या पुण्याईच्या बळावर तो पुनश्च स्वर्गोपभोग भोगून सर्वश्रेष्ठ अशा ब्राह्मण जन्माला आला.

## ब्राह्मणजन्माचे महत्त्व

**कर्माची गति फार गहन आहे. नरजन्मच आधी दुर्लभ आहे. त्यांतही सर्व इंद्रिये व्यवस्थित असणारा जन्म एखाद्याच पुण्यवान माणसाला लाभतो. त्यांतही ब्राह्मणाचा जन्म मोठ्या कष्टानेच येतो. त्यांतही विद्वत्ता आणि सद्बुद्धि ज्यांना मिळते ते अत्यंत पुण्यशील होत. ब्राह्मणाचा जन्म होताच भगवान सूर्यनारायण गोदान करतो असे म्हणतात. ब्राह्मण देहात इतरांचा उद्धार करण्याची संभावना आहे. शिल्पज्ञ आणि राजा ह्या दोनही जन्मात सातत्याने पुण्याईचे संपादन केल्यानेच तो ब्राह्मणाचा मुलगा झाला. (24 -27)**

इथे ब्राह्मण जन्माचे महत्व सांगितले आहे. आधुनिक विचारसरणीत लिंग, जाति इत्यादींचे श्रेष्ठत्व कनिष्ठत्व नाकारण्याची प्रवृत्ति आहे. पण आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहता जो जन्म परमेश्वरी साक्षात्काराला अधिक अनुकून तो श्रेष्ठ मानला गेला आहे. म्हणूनच सर्व जीवांत प्राणी श्रेष्ठ, प्राण्यात बुद्धिजीवी श्रेष्ठ, त्यांच्यातही मानव श्रेष्ठ, मानवांतही द्विज (ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य) श्रेष्ठ, त्यांच्यातही विद्वान् श्रेष्ठ, विद्वांनांत ज्यांनी परमार्थ हेच जीवनाचे ध्येय निश्चित केले आहे ते श्रेष्ठ, अशा निश्चय केलेल्यातही त्यासाठी कृतिशील असणारे श्रेष्ठ आणि त्यांच्यातही ब्रह्मज्ञानी श्रेष्ठ अशी श्रेणी लावली आहे. (दत्तपुराण अ.54 श्लोक 31-32). त्या अर्थानेच ब्राह्मण देहाचे श्रेष्ठत्व समजून घ्यायला हवे. समाजात विषमता निर्माण करणे, विशिष्ट जातीला प्राधान्य देणे, जातीजातीत संघर्ष निर्माण करणे हा उद्देश तिथे मुळीच नाही. सर्व जीवमात्रात परमेश्वराचा वास आहे हा सिद्धांत भारतीय विचारसरणीत पायाभूत आहे. त्यापेक्षाही अध्यात्माच्या क्षेत्रात समोरच्याचे दोषगुण पाहणे निषिद्ध आहे. त्याचे श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व मनात आणणेही दोषास्पद आहे. ब्राह्मण देहाचे श्रेष्ठत्व मुख्यतः ब्राह्मणानाचा सांगितले आहे. त्याचा एकमेव उद्देश त्यांना प्राप्त झालेल्या ह्या अनमोल संधीची जाणीव करून देऊन मानवी जीवनाचा विनियोग परमेश्वरप्राप्तीसाठीच करण्याला प्रवृत्त करणे हाच आहे. ह्या वर्णाश्रमधर्माचा एक मोठा पुरस्कर्ता मनू हा ब्राह्मण नव्हता हे विचारात घेतले पाहिजे. आधुनिक काळांतही संत तुकाराम, संत गुलाबराव महाराज, महात्मा गांधी यांनी वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार केला तो कोणत्याही विशिष्ट वर्णाला, जातील लहान किंवा मोठे ठरविण्यासाठी किंवा कांही विशिष्ट वर्णांचे विशेषाधिकार राखून ठेवण्यासाठी नक्कीच नव्हता.योगवासिष्ठात म्हटलेच आहे, ब्राह्मणाचा देह हा उपभोगासाठी केलेला नाही. या लोकांत कष्ट सोसून मृत्यूनंतर अनंत सुखाची प्राप्ति करून

घेण्यासाठीच हा निर्मिला आहे. (**ब्राह्मणस्य तु देहोयं नोपभोगाय कल्पते। इह क्लेशाय महते प्रेत्यानन्तसुखाय च।।**)

याच दृष्टिकोनांतून भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांचा विवेकचूडामणीतील खालील श्लोक समजून घेतला पाहिजे.

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतो पुंस्त्वं ततो विप्रता।**
**तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्वमस्मात्परम्।।**
**आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थितिः।**
**मुक्तिर्नो शतकोटिजन्मसु कृतैः पुण्यैर्विना लभ्यते।। 2 ।।**

जीवमात्रांमध्ये माणसाचा जन्म (देह) दुर्लभ आहे. त्यांतूनही पुरुषाचा देह, त्यापेक्षां ब्राह्मण वर्ण दुर्मिळ आहे. ब्राह्मण जन्म लाभूनही वैदिक धर्माचे पालन होणे, त्यांतही वेदशास्त्रांचे अध्ययन घडणे दुष्प्राप्य आहे. त्यानंतरच मग आत्मा आणि अनात्मा (जड आणि चैतन्य) यांचा विवेक, मग स्वरूपानुभव आणि अंती आत्मा आणि परमात्मा यांच्या ऐक्याची स्थिति म्हणजेच मोक्ष. हा लाभ शतकोटि जन्मांच्या पुण्याईशिवाय होणे अशक्य आहे.

# संस्काराद् द्विज उच्यते

**त्यामुळे शास्त्राने घालून दिलेले गर्भधानादि संस्कार त्याच्यावर झाले. मातेला फारसे कष्ट न देतां उत्तम वेळेवर तो सुबुद्ध जन्मला. पित्याने त्याचे जातकर्म केले, प्रसन्नतेने दानधर्म केले आणि त्याचे नाव देवशर्मा ठेवले. त्याचे रूप सौम्य होते आणि स्वभाव शांत होता. तो तेजस्वी आणि आनंदी बालक सर्वांची मने रमवीत असे. पित्याने योग्य वेळी चौल संस्कार करून त्याची मुंज केली. मुंजीनंतर खेळात फारसा वेळ न घातविता तो वेदाध्ययन करू लागला. तीन वेळा संध्यावंदन करणे, समिधा आणणे इत्यादि अग्निकार्य करणे, गुरूंची सेवा करणे इत्यादि ब्रह्मचर्याश्रमाची कर्तव्ये उत्तम रीतीने पार पाडून त्याने स्वभावात औदार्यादि सद्गुणांची जोपासना केली. वेदमंत्रांचे संहिता, पद, क्रम असे पठण करून, वेदांच्या अंगांचेही अध्ययन करून ज्याला अहंतेचा संभ्रम होत नाही, जो विनयशील राहतो त्याचे अध्ययनाचे श्रम सफळ झाले असे समजावे. अशा रीतीने ब्रह्मचर्य व्रताचे आचरण करीत सर्व विद्या अर्थासहित संपादन करून, गुरूना दक्षिणा देऊन त्याने सोडमुंज केली. (28 -34)**

ब्राह्मणधर्माचा मुख्य आधार संस्कारांत आहे. “संस्कारांत् द्विज उच्यते” असे म्हणतात. जन्मतः शूद्र असलेला ब्राह्मण उपनयन संस्कारांनेच ब्राह्मण होतो. वैदिक धर्मानुसार जन्माच्या आधीपासूनच गर्भाधान, पुंसवन इत्यादि संस्कार असतात. पुढे चौल, उपनयन इत्यादि संस्कार. प्रमुख संस्कारांची संख्या सोळा आहे. कुठे 24 तर कुठे 28 संस्कारांचेद्वजत्व वर्णन आहे. मौंजीबंधनाच्या संस्कारात गायत्री मंत्राचा उपदेश होतो, वेदाध्ययनाचा अधिकार (Eligibility) येतो आणि ब्रह्मचर्य ह्या पहिल्या आश्रमाचा आरंभ होतो. वर श्रीस्वामी महाराजांनी ब्रह्मचर्याश्रमाची कर्तव्ये थोडक्यात सांगितली आहेत. हा ब्रह्मचर्याश्रम पुढच्या तीन आश्रमांचा पायाच असतो. यानंतर गुरुगृहीचे वास्तव्याचा समारोप करून गुरूंना दक्षिणा देऊन सोडमुंज म्हणजेच समावर्तन हा संस्कार झाला की बटूचा स्नातक होतो आणि आपल्या घरी परततो. आतां तो पुढच्या गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याला योग्य होतो.

# गृहस्थाश्रमात निष्काम कर्मयोग

त्यानंतर बुद्धि, रूप, शील यांनी संपन्न अशी कुलीन कन्या पाहून त्याने तिच्याशी विवाह केला आणि यथाशास्त्र गृहस्थाश्रमाचे आचरण केले. वेद आणि शास्त्र यांचा यथार्थ तत्त्व जाणणारा तो असल्याने तो नित्य पंचयज्ञ करीत असे. दैवयोगाने तो बुद्धिमंत जपयज्ञाचे विशेष अनुष्ठान करूत असे. वेळच्या वेळी स्नान, संध्या, होम, जप, पाठ करून तो सद्गुरूंची उपासना आणि भावपूर्ण भगवद्भजनांत काळ क्रमीत होता. असे असूनही आपण हे कर्म करतो असा अभिमान त्याला कधी शिवला नाही की त्या कर्माच्या फळाची अभिलाषाही ठेवली नाही. अशा निर्मम, उदासीन वृत्तीने त्याने यज्ञ, याजन, दान परिग्रह, अध्ययन आणि अध्यापन ह्या षट्कर्माद्वारे आपली उपजीविका चालविली होती. ह्या प्रकारे परमेश्वरार्पण बुद्धीने कर्म करीत असता त्याचे चित्त शुद्ध झाले. तेव्हा त्याने तप आणि तेजाची हानि करणारा प्रतिग्रह सोडून दिला. पुढे त्याच्या मनात ईश्वरभक्तीचा उदय झाला तेव्हा याजन, अध्यापन हेही सोडले आणि भिक्षावृत्तीचा अंगीकार केला आणि विषयसुखांचाही त्याग केला. शम, दम, तप, शौच, क्षांति, आर्जव, ज्ञान, आस्तिक्य आणि विज्ञान या स्वाभाविक ब्रह्मकर्मांचे अनुष्ठान त्या देवशर्माचे सहजच घडू लागले. वरचेवर त्याचे काम, क्रोध इत्यादि विकार क्षीण होऊन त्याचा अहंकारही गळत गेला. असे कर्माने मन शुद्ध झाले आणि ज्ञानयोगाची पहिली पायरी जे श्रवण त्याची आवड उत्पन्न झाली. मग त्याने गृहस्थाश्रमाचा उपसंहार करून वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केला. (34 – 44)

गुरुगृही राहून शिकलेल्या वेदशास्त्रांना आचरणात उतरविण्यासाठी गृहस्थ धर्माची योजना आहे. त्यानुसार त्याने वैदिक विधींना अनुसरून अनुरूप कन्येचे पाणिग्रहण केले. गृहस्थाला पंचयज्ञांचे अनुष्ठान नित्य म्हणजे प्रतिदिन करावयाचे आहे. हे पंचयज्ञ देव, ऋषि, पितर, भूत आणि मानव यांच्याप्रीत्यर्थ करावयाचे असतात. देवांसाठी संध्या, पूजा, अर्चा, हवन इत्यादि. पितरांसाठी तर्पण, श्राद्ध, पिंडदान वगैरे, ऋषींसाठी ब्रह्मयज्ञ, वेदांचे अध्ययन, अध्यापन इत्यादि, भूत म्हणजे प्राण्यासाठी गोग्रास, भूतबली आणि मनुष्ययज्ञ म्हणजे अतिथीला अन्नदान. ही नित्यकर्मे ही पुण्यप्राप्तीसाठी करावयाची नसून ती केल्याने मानव, त्याच्यावर जन्मतःच असलेली देव, पितर आणि ऋषि यांची ऋणे फेडीत असतो. नित्यकर्मांचा त्याग करणाऱ्या ब्राह्मणाला प्रत्यवाय नांवाच्या दोष लागतो. आध्यात्मिक प्रगतीसाठी आणि पुण्यप्राप्तीसाठी करावयाच्या यज्ञांचे वर्णन भगवद्गीतेच्या ३ऱ्या अध्यायात (9 – 14) केले आहे. मानवादि जीवाबरोबरच ब्रह्मदेवाने यज्ञसुद्धा निर्माण केले. त्या यज्ञांच्या द्वारा देवांना प्रसन्न करून मानवांनी आपले इष्ट भोग प्राप्त करून घ्यावेत अशी आज्ञा पण दिली. यज्ञ न करता आपले उदरभरण करणारे चोर होत असे म्हटले आहे.

सर्व यज्ञात जपयज्ञ श्रेष्ठ आहे. भगवंतांनी "यज्ञानां जपयज्ञोस्मि" (10:25) अशा शब्दात जपयज्ञाचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे. ऋषिमुनीपासून साधुसंतांपर्यंत देवाच्या नामजपाचे महत्त्व एकमुखाने प्रतिपादले आहे. ह्या ब्राह्मण जन्माला आलेल्या शिल्पकाराचा विशेष भर जपयज्ञावर होता असे म्हणून ते आपणही तेच विशेषेकरून करावे असे सुचवीत आहेत. ह्याच्या जोडीला तो सद्गुरूंची उपासना आणि भगवद्भजन करीत असे. ह्यालाच पतंजलींनी क्रियायोग म्हटले आहे. (तपः स्वाध्यायेश्वरप्रणिधानानि क्रियायोगः।। 2:1). ही सर्व कर्मे करीत असतांना त्या कर्माच्या कर्तृत्वाचा अभिमान त्याच्या मनाला शिवला नाही की त्या कर्मापासून कसल्या फळाची आशा ठेवली नाही. हाच गीतेत भगवान श्रीकृष्णानी प्रतिपादलेला निष्काम कर्मयोग होय. मानव जे जे कर्म करतो त्याचे फल त्याला भोगावे लागते असा सिद्धांत आहे. हे कर्माचे बंधन त्या कर्माच्या कर्तेपणाच्या

अभिमानाने आणि कर्मापासून मिळणाऱ्या फळाच्या अभिलाषेने उत्पन्न होतो. "तैसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफळाचा आस्वादु। या दोन्हींचे नांव बंधु। कर्माचा की।। 18:205।।" साहजिकच या कर्मयोगाच्या अनुष्ठानाने त्याचे चित्त शुद्ध होत गेले.

चित्तशुद्धीच्या दोन अवस्थांचे वर्णन इथे श्रीस्वामी महाराजांनी केले आहे. शास्त्रांनी ब्राह्मणाला चरितार्थासाठी यजन, याजन, (यज्ञ करणे आणि करविणे) दान, परिग्रह (दान देणे आणि दान घेणे), अध्ययन, अध्यापन (वेदशास्त्रांचा अभ्यास करणे आणि शिकवणे) अशा सहा कर्मांची अनुज्ञा दिली आहे. दान घेण्याने ब्राह्मणाचे पुण्य दात्याला जाते आणि दात्याचे पाप घ्यावे लागते. ह्याने त्याच्या तेजाची आणि तपाची हानी होते. म्हणू चित्तशुद्धीच्या प्रथमावस्थेत त्याने परिग्रह सोडून दिला. चित्त शुद्ध झाले की त्या चित्तात जे परमेश्वराविषयी सहज प्रेम उत्स्फूर्त होते तीच भक्ति! ही ईश्वरभक्ती हृदयात उगवली की संसारातून मन आपोआपच बाजूला होते. तसे झाल्याबरोबर त्या ब्राह्मणाने याजन आणि अध्यापन यांचाही त्याग केला आणि भिक्षा वृत्तीचा अंगीकार केला. अशा रीतीने गीतेत सांगितलेल्या स्वाभाविक ब्रह्मकर्मात तो स्थिर झाला. शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च। ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्।। 18:42). आपण मागील लेखांत पाहिल्याप्रमाणे कामक्रोधादि विकार क्षीण झाले आणि दैवी संपत्तीचा लाभ झाला. हेच कर्मयोगाचे साध्य होय. ते प्राप्त होताच देवशर्माची प्रवृत्ती ज्ञानयोगाची पहिली पायरी श्रवण तिकडे होऊ लागली आणि त्याने गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला.

## संन्यासाने मानवी जीवनाची कृतार्थता.

वनांत राहून शीत, उष्ण इत्यादि सहन करीत, ध्यानमग्न श्रीहरीचे चिंतन करीत आपल्या योगक्षेमाचा विचारसुद्धा मनातून काढून टाकला. असा महाव्रती होऊन संन्यास ग्रहण करून गुरूंनी उपदेशिलेल्या ब्रह्माचे चिंतन करू लागला. शास्त्राच्या श्रवणाने संशयभावनेचा, मननाने असंभावनेचा आणि निदिध्यासनाने विपरीत भावनेचा निरास त्याने केला. योगाभ्यासाने प्रारब्धजनित प्रतिबंधाचा भंग केला. नंतर वासनाक्षयाचा अभ्यास करून मनाचा नाश करून त्याने ज्ञानयोग सिद्ध केला. उपरति, वैराग्य आणि ज्ञान ज्याच्याजवळ पूर्णत्वाने राहतात त्याची मुक्ति दासी होते हे सत्य त्याने अनुभवले. अशा रीतीने जीवन्मुक्त झालेला तो ब्राह्मण देवाचा भक्त झाला. अनासक्त वृत्तीने देहाचे प्रारब्ध भोगून अंती देहाचा त्याग करून तो विदेहमुक्त झाला. सारांश सर्व शास्त्रे ही ईश्वराची वचने आहेत. ती क्षुद्र जरी वाटली तरी त्यांच्यावर श्रद्धा ठेवून वागणाऱ्याला असा अनुक्रमाने मोक्षलाभ होतो. त्या विधिज्ञाने शिल्पशास्त्राच्या विधीने आचरण करून अनुक्रमाने योग्यांनाही दुर्लभ अशी उत्तम गति प्राप्त करून घेतली. (45 – 51)

वानप्रस्थात शीतोष्णादि द्वंद्वे सहन करीत, आपल्या योगक्षेमाचाही विचार न करता ईश्वराचे ध्यान करावयाचे असते. त्यानंतर विधिवत् संन्यास घेऊन विद्वान् आणि अनुभवसंपन्न सद्गुरूंकडून श्रवण करून गुरूपदिष्ट ब्रह्माचे चिंतन (मनन) आणि शेवटी निदिध्यासन करावयाचे असते. श्रवणाच्या पूर्वी साधकाच्या मनात विविध शंका असतात. ईश्वर आहे का, असला तर तो साकार आहे का निराकार, सगुण की निर्गुण? त्याचे दर्शन होऊ शकते का? अशा नाना शंका चित्तात गर्दी करीत असतात. अधिकारी गुरूंकडून सच्छास्त्राचे श्रवण करीत गेले की ह्या शंका हळूहळू कमी होत जातात. हे संशय गेले तरी अविद्येच्या प्रभावाने ईश्वर आणि जग हे भिन्न आहेत असे वाटणे ही असंभावना आहे. ती गुरूंनी उपदेशिलेल्या ब्रह्माच्या चिंतनाने दूर होते. जगत आणि ईश्वर हे एकरूप आहेत अशी भावना झाली तरीही जगाचे अस्तित्व प्रत्यक्ष अनुभवाला येत असते. ही विपरीत भावना

निदिध्यासनाने नष्ट अखंड, एकरस, अद्वितीय आत्मस्वरूपाच्या अनुभवाने (समाधीने) नष्ट होते. संशय, असंभावना आणि विपरीत भावना ह्या बंधत्रयांचा नाश झाल्याशिवाय ज्ञानाग्नि प्रज्वलित होत नाही. अशा रीतीने ज्ञान झाले तरीही प्रारब्धामुळे आलेले प्रतिबंध ते स्थिरावूं देत नाहीत. त्यासाठी योगाभ्यासाची आवश्यकता आहे. तसेच मनातील उरल्यासुरल्या वासनांचा क्षय करून मनाचा संपूर्ण नाश केला म्हणजेच मनात सतत उठणारे आणि मावळणारे संकल्प आणि विकल्प पूर्णपणे थांबवल्यावरच साधक जीवन्मुक्त होतो. इथे श्रीस्वामी महाराजांनी थोडक्यांत कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग यांचे वर्णन करून ते एकाच मोक्षमार्गाचे कसे क्रमिक टप्पे आहेत ते दाखविले आहे.

ह्या शिल्पज्ञाच्या ब्राह्मण जीवनाच्या वर्णनात प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या स्वतःच्या जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले आपल्याला दिसते. असेच संक्षिप्त वर्णन श्रीदत्तपुराणाच्या दुसऱ्या अध्यायात आहे. त्यावर निरूपण करतांना एका श्रोत्याने असे उद्गार काढले की, “तो ब्राह्मण इतर कुणी नसून स्वतः श्रीस्वामी महाराजच आहेत.” त्यावर महाराजांनी नुसते स्मित केले होते. ते काही असो पण ब्राह्मणाच्या जीवनाचा एक आदर्श या वर्णनातून महाराजांनी आपल्यासमोर ठेवला आहे हे नक्कीच.

शिल्पासारख्या भौतिक शास्त्राच्या नैष्ठिक आचरणानेसुद्धा मोक्षाच्या मार्गावर कसे अग्रेसर होता येते ह्याचे हे उदाहरण आहे. ह्यावरून सर्व शास्त्रे ईश्वराची वचने आहेत ह्या सिद्धांताला बळकटी येते.

## कामशास्त्रज्ञ गायकाची गाथा

**दत्तप्रभू अर्जुनाला म्हणतात, “ही जशी शिल्पशास्त्रज्ञाची गोष्ट ऐकलीस तशीच दुसरी एक गोष्ट इंद्राला बृहस्पतींनी सांगितली ती ऐक.”**

**नर्मदातीरावर माहिष्मति (उज्जैन) नगरीत एक गायन-वादनात कुशल असणारा ब्राह्मण रहात होता. तो रूपानेही सुंदर असून श्रेष्ठ कवीही होता. त्याला कामशास्त्र पूर्णपणे अवगत असून तो सुंदर सुलक्षणी पद्मिनी स्त्रीच्या शोधात होता. हा हेतू मनात ठेवून तो एकदा राजवाड्यात गेला. राजाने विचारल्यावर त्याने आपण कामशास्त्रानुसार उत्तम मानल्या गेलेल्या पद्मिनी स्त्रीच्या शोधात असल्याचे त्याने सांगितले. कामशास्त्राप्रमाणे सामुद्रिक शास्त्राचा आपला अभ्यास असून उत्तम आणि पवित्र लक्षणांनी युक्त नारी मिळावी हा हेतू त्याने व्यक्त केला. राजाने त्याच्या रूपगुणांकडे पाहून त्याला आपलीच उपवर मुलगी दाखविली. त्या कन्येला पाहून त्याला तिच्या ठिकाणी शास्त्रोक्त सर्व लक्षणे दिसल्याने तो ब्राह्मण एकदम मदनाच्या बाणाने मोहित होऊन मूर्छित झाला. सावध होऊन त्याने त्या कन्येची सर्व लक्षणे पुन्हा एकदा पडताळून पाहिली. ती राजकन्याही त्या ब्राह्मणाला पाहून लुब्ध झाली. उभयतांचे हृद्गत ध्यानात येऊन तो राजासुद्धा सुखावला. त्याने विचार केला की हा पवित्र ब्राह्मण कुळातला मुलगा माझ्या मुलीला योग्य वर आहे. आपल्यालाही मुलगा नाही तेव्हा ह्यालाच घरजांवई करून घ्यावा. हे दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले आहेत ह्यापेक्षा वेगळे काय पहायचे? फक्त हा निर्धन आहे तरी आपण त्याला आपले अर्धे राज्य द्यावे असा विचार करून एका सुमुहूर्तावर त्याने त्यांचे लग्न लावून दिले. ब्राह्मविधीने कन्यादान करून निम्मे राज्य आंदण दिले आणि सोळा दिवस मोठा विवाहोत्सव साजरा केला. लग्नानंतर जांवयाला राजाने आपल्या घरीच ठेवून घेतले. (52 – 65)**

आता हाच सिद्धांत कामशास्त्राच्या अभ्यासालाही कसा लागू पडतो ते दुसऱ्या उदाहरणाने स्पष्ट केले आहे. स्त्रीपुरुषांना परस्परसंयोगाने प्राप्त होणाऱ्या आनंदाचे शास्त्र म्हणजे कामशास्त्र. ह्या

आनंदाचे स्वरूप, तो अधिकाधिक उत्कटने प्राप्त करून घेण्याचे विधि इत्यादींचा विचार करणारे शास्त्र भारतात प्राचीन काळापासून प्रगत आहे. वात्स्यायनानेसुद्धा आपल्या संहितेत दहापेक्षा अधिक अभ्यासकांचा उल्लेख केला आहे. वेदांतही उपस्थाला (लिंगाला) सुखाचे घर असे म्हटले आहे. भारतीय परंपरेनुसार मानवी जीवनाच्या चार प्रमुख पुरुषार्थांत काम पुरुषार्थाचा समावेश आहे. कामसुखाचा विचार केवळ शारीरिक दृष्टिकोनांतून करणे बालिशच ठरेल. आधुनिक मनोवैज्ञानिकांनीही कामप्रवृत्तीचा स्रोत मुख्यतः स्त्रीपुरुषांच्या मनात आहे हे मान्य केले आहे. शारीरिक क्रिया, आसने इत्यादींचा विचार म्हणजेच कामशास्त्र अशी समजूत असलेल्यांना कामशास्त्राचा आध्यात्मिक संदर्भ ध्यानात येणार नाही. त्यासाठी इथे कामशास्त्रांतील मानसशास्त्रीय तत्त्वांचा निर्देश केला आहे.

बाकीची गोष्ट सरळ सोपी आहे. कामशास्त्राचा अभ्यासक असल्याने त्याला कामशास्त्रांत सर्वोत्तम गणली गेलेल्या पद्मिनी प्रकारची स्त्री हवी वाटणे साहजिक आहे. त्याचे रूप आणि गुण यांनी प्रभावित होऊन तशी राजकन्याच पत्नी म्हणून प्राप्त होणे हा शुभ दैवाचा भाग होता.

**तो ब्राह्मण आणि राजकन्या चक्रवाक पक्ष्यांप्रमाणे प्रेम परस्परांच्या प्रेमात बांधले गेले आणि ते त्यांचे दिवस त्या आनंदात निमग्न होऊन जाऊ लागले. वाणी आणि मन यांना न आकळणारे आत्मानंदाचे नित्य परम श्रेष्ठ असे सुख वेदात वर्णिलेले आहे. मानवी आनंदाच्या गंधर्वाचा आनंद, त्याच्या शतपट देवांचा आनंद, त्याच्याही शतपट इंद्राचा, त्याच्याही शतपट ब्रह्मदेवाचा आनंद आणि त्याच्याही शतपट आत्मसुखाचा आनंद श्रुतीत वर्णिलेला आहे. तो ब्राह्मण आपल्या कामसुखाच्या ज्ञानाने संभोगाच्या वेळी त्या ब्रह्मसुखाची पूर्ण अनुभूति घेत होता. सामान्य मानवाला मिळणारे संभोगाचे सुख स्थूल-सूक्ष्मदेहांच्या उपाधीपासून मिळणारे असते. त्याला नित्य निरतिशय आत्मसुखाची बरोबरी कशा येईल? त्याला शास्त्राचे स्पष्ट ज्ञान नसल्याने त्याचे कामसुख स्पर्धा आणि असूया यांनी लांछित असते. रतिसुखाचा खरा आस्वाद त्याचे तत्त्व जाणणाराच घेऊं शकतो. संभोगानंतर आणि झोपेतून उठल्यावर माणसाची जी आनंदपूर्ण अवस्था होते ती सदैव जोपासणाऱ्यांनाच जीवन्मुक्ती साधते. सामान्य मानवांना हे कसे कळणार? संसाराला (देहभावाला) चिकटून तो केवळ विषयासक्तीत रमतो. आत्म्याला तो पराङ्मुखच असतो. असा कामशास्त्रात प्रवीण असलेल्या ब्राह्मणाने संभोगाच्या माध्यमातून ब्रह्मानंदाचा लाभ घेतला. राजकन्याही त्या सुखाने आनंदून आपल्या पतीच्या पदी रमली. तिने परपुरुषाकडे आपली नजरही कधी वळवली नाही. त्याचे मन सांभाळून आनंदाने संसार केला. पति हेच तिचे परब्रह्म होते. ह्याप्रमाणे परस्परांना सुखी करीत एकमनाने राहिल्याने त्यांनी स्वप्नातही दुःख पाहिले नाही. पापापासून दूर राहून, शास्त्राज्ञेप्रमाणे धर्माचे आचरण करीत परब्रह्माच्या प्राप्तीला अनुकूल असे सत्कर्म करीत ते जगले. देवांनाही दुर्लभ अशा सुखाचा उपभोग घेऊन ते शेवटी मरण पावले आणि गंधर्व झाले. (66 – 79)**

वरील गोष्टीत रतिसुखाच्या मार्गे ब्रह्मानंदप्राप्तीची उपलब्धि हा विषय आपण थोडा समजून घेणे आवश्यक आहे. हे वाक्य पूर्ण विवेचनाच्या संदर्भातच समजून घ्यावे लागेल. श्रीस्वामी महाराजांनी इथे आनंद या विषयाची वैदिक विचारसरणीच संक्षेपाने मांडली आहे. तैत्तिरीय उपनिषदांत आनंदवल्लीत मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व जीवांना अनुभवाला येणाऱ्या आनंदाचे वर्णन आहे. मनुष्याचा आनंद हे मानक (Unit) घेतले आहे. मनुष्यात सर्वात मोठा आनंद सार्वभौम राजाचा धरला आहे. त्याच्या उत्तरोत्तर शंभर पटीने गंधर्व, देव, इंद्र आणि ब्रह्मदेव यांचे आनंद आहेत. आत्मज्ञानी पुरुषाला होणारा ब्रह्मानंद ब्रह्मदेवाच्या आनंदाच्याही शतपट वर्णिलेला आहे. कामशास्त्रतज्ज्ञ ब्राह्मणाने ह्या ब्रह्मानंदाच्या तोडीचा आनंद मिळविला असे पुढे सांगितले आहे.

मानवी जीवनात आनंद कसा मिळतो हे आधी समजून घ्यायला हवे. मानव योनीत येणाऱ्या जीवाचे पुण्य आणि पाप सम प्रमाणात असते. त्यामुळे या जन्मात त्याला सुख आणि दुःख या दोन्हीचा अनुभव घ्यावा लागतो. स्वर्गात केवळ सुखाचाच उपभोग असतो तर नरकात फक्त यातनाच वाट्याला येतात. अशा रीतीने स्वर्गात पुण्य आणि नरकात पाप भोगून दोन्ही सारखे झाले की माणसाचा जन्म येतो. त्यामुळे पुण्यापासून सुखाची व पापापासून दुःखाची प्राप्ती होते. सुख होते म्हणजे नेमके काय होते? त्या जीवाच्या पुण्याने मिळणाऱ्या अनुकूल भोगाने त्याच्या कारण देहातील अज्ञानाचे आवरण तात्पुरते क्षीण होते आणि **आनंदमय कोशा**तला आनंद चित्तांत झिरपतो किंवा प्रकाशतो. हेच सुख! वास्तविक जीव स्वरूपतःच आनंदमय आहे. ते आपले सच्चिदानंद स्वरूप त्याच्या अज्ञानाने आच्छादलेले असल्याने त्याला त्याची अनुभूति येत नाही. हे अज्ञानच **कारण देह** आहे. त्याच्यांतच सत्त्व आणि आनंद असतात. या कारणदेहाची अवस्था निद्रा असते. त्यामुळेच निद्रेच्या वेळी जीव आनंदमय अवस्थेत असतो. पण ती पूर्ण अज्ञानाची अवस्था असल्याने त्याची जाणीव होत नाही. जागे झाल्यावर मात्र त्या सुखाची स्मृति असते. म्हणूनच तो म्हणतो, "अशी छान झोप लागली होती की कांहीसुद्धा कळले नाही!" त्यासाठीच आपल्याला झोप हवीहवीशी वाटते.

आनंदमय कोशावर **विज्ञानमय कोश** आहे. ह्यात ज्ञानेंद्रियासहित बुद्धीचा समावेश आहे. विवेक, विचार, निश्चय आणि निर्णय करणारी बुद्धि अंतर्वृत्तिक असते. विज्ञानमय कोशाच्या बाहेर **मनोमय कोश** असतो. ह्यात ज्ञानेंद्रिये आणि मन यांचा अंतर्भाव आहे. मन हे संकल्प-विकल्पात्मक असते. म्हणजे त्यात अमुक हवे तमुक नको, हे अनुकूल ते प्रतिकूल अशा वृत्ती सारख्या उचंबळत असतात. ते इंद्रियांच्या वाटांनी विषयांकडे धावत असते.यासाठी ते बहिर्वृत्तिक असते. मनोमय कोशाच्या बाहेर **प्राणमय कोश** असतो. हा सर्वात बाहेर असलेल्या **अन्नमय कोशा**ला मनोमय कोशाशी जोडतो. तसेच अन्नमय कोशाची श्वसन, पचन, रक्ताभिसरण इत्यादि कार्ये सतत करीत असतो. यांत पाच प्राण, पाच उपप्राण आणि कर्मेंद्रिये यांचा समावेश आहे. विज्ञानमय, मनोमय आणि प्राणमय ह्या तीन कोशांचा मिळून **लिंगदेह** होतो. आपण स्वप्नावस्थेत असताना लिंगदेहाच्याच जाणिवेत असतो. अन्नमय कोशालाच स्थूल देह असे म्हणतात. जन्म, वाढ, विकास, स्थिति, क्षय आणि नाश ह्या अवस्था ह्यालाच असतात. जाग्रत अवस्थेत आपल्याला ह्याचे भान असते. स्वप्न आणि निद्रा ह्या अवस्थात आपल्याला स्थूल देहाची जाणीव नसते. सर्वसाधारणतः हाच इंद्रियगोचर असतो.

| देह | कोश | घटक | कार्य | अवस्था |
|---|---|---|---|---|
| स्थूल | अन्नमय | इंद्रियगोचर शरीर | जन्म-वृद्धि इत्यादि षड्विकार | जाग्रत |
| लिंग (सूक्ष्म) | प्राणमय | पंचप्राण, उपप्राण आणि कर्मेंद्रिये | श्वसन, पचन आदि क्रिया | स्वप्न |
| | मनोमय | ज्ञानंद्रिये आणि बहिर्वृत्तिक मन | संकल्प-विकल्प | |
| | विज्ञानमय | ज्ञानंद्रिये आणि अंतर्वृत्तिक मन | विचार, विवेक, निश्चय | |
| कारण | आनंदमय | आनंद आणि सत्त्व | अज्ञान | निद्रा |

सामान्य मानवी जीवनात दोन आनंदांना सर्वोच्च मानले आहे. एक झोपेत मिळणारा आनंद आणि दुसरा मैथुनातून मिळणारा. इतर सर्व आनंदापेक्षा या दोहोंना अधिक श्रेष्ठ मानले आहे. निद्रेच्या आनंदाविषयी आपण वर विचार केला आहे. कामानंदाविषयी स्वामीमहाराजांनी इथे एक वेगळा विचार मांडला आहे. सर्वसाधारण – कामशास्त्राचा सखोल अभ्यास नसलेल्या, जीवांना जो आनंद मैथुनात मिळतो तो सोपाधिक असतो. वर सांगितलेले सगळे पंचकोश आत्मस्वरूपाच्या उपाधि आहेत. **"पामरें भोगता नारी। सोपाधिक सुख घेतो अंतरी। निरतिशय सुखाची सरी। मैथुनांतरी त्या द्यावी की।।70।।"** संभोगातून समाधीकडे जाणे कामशास्त्राच्या अभ्यासाने शक्य आहे. पण तो मार्ग सर्वांसाठी नक्कीच नाही. आणि त्यात पतनाचीच शक्यता अधिक आहे. यासाठीच दत्तपुराणावरील टीकेत श्रीस्वामी महाराजांनी हा मुद्दा उपस्थित करून त्याचा निषेधच केला आहे. **वृत्त्यारूढं च तत्पूर्णं भाव्यते रतिकर्मणा। विधिज्ञेन, न मूर्खेण, तत्सौख्यं सोलभत्सदा।।8:52।।** विधिज्ञालासुद्धा तो आनंद शाखाचंद्रन्यायाने मिळतो. लहान मुलाला चंद्र दाखवितांना दृष्टीला दिशा देण्यासाठी जशी शाखा दाखवितात, वास्तविक त्या शाखेचा आणि चंद्राचा सुतराम संबंध नसतो. तद्वतच कामसुखाच्या माध्यमांतून परमानंदाची दिशा कळू शकते. एवढेच त्याचे महत्त्व आहे. नाही तर मैथुनाच्या उपायानेच सगळे साक्षात्कारी होऊ पाहतील. तो मूर्खपणाच ठरेल.

या शारीरिक सुख हे स्थूल देहाचे असते. त्यापेक्षा श्रेष्ठ सुख सूक्ष्म देहातले असते. त्याच्यापेक्षाही उत्तम सुख आनंदमय कोशात अनुभवाला येते. श्रीस्वामीमहाराजांचे म्हणणे असे आहे की खरा प्रगत कामशास्त्रज्ञ ह्या सर्व उपाधींच्या पलीकडे जातो आणि वर वर्णन केलेल्या ब्रह्मानंदाच्या तोडीचा आनंद प्राप्त करून घेतो. कामक्रीडेचा हा सर्वोच्च विधि मानावा लागेल. आपल्या पाहण्यात जे कामशास्त्र आहे ते स्थूलदेहाच्याही फारसे पलीकडे पोंचलेले नसते. आपल्याला याची सहजी कल्पना करणे अशक्यप्राय आहे. तेवढ्यासाठीच महाराजांनी मैथुनांती आणि शयनांति अंगात जी पूर्ण आनंदाची अनुभूति किंचित्काळ आपल्याला भारून टाकते त्याच अनुभूतीत जीवन्मुक्त सतत राहतो असे स्पष्ट केले. अशा रीतीने कामशास्त्राचे लक्ष्य परमानंद हेच आहे आणि तेच परमेश्वराचे स्वरूप आहे. अशा सर्व शास्त्रांचे तात्पर्य ईश्वरात आहे हा सिद्धांत दृढ झाला.

**गंधर्वलोकातही ते पतिपत्नी हेऊन नादब्रह्माच्या उपासनेत रममाण झाले. गायन-वादन या संगीताच्या उभय अंगात प्रावीण्य मिळवून ते सर्व गंधर्वात मान्यता पावले. एके दिवशी ते हिमालयात स्वच्छंदाने गात असतां त्यांचे मनोरम गाणे ऐकून भगवान शंकर त्यांच्याजवळ आले. त्यांच्या सुस्वर गायनात तालांसह, सात स्वर, बावीस श्रुति, एकोणपन्नास ताना, रागांसहित रागिणी आणि विराम ह्या सर्वांचा त्यांनी केलेला आविष्कार ऐकून शंकरांचे कान तृप्त झाले आणि ते हर्षोत्फुल्ल होऊन त्यांनी ध्यानांतून उठून प्रसन्नतेने वरदहस्त धारण केला आणि प्रीतीपूर्वक त्या दंपतीला म्हणाले, "तुम्ही खरोखरच संगीतात उत्तम शिक्षण प्राप्त केले आहे. सामवेदाच्या गायनाहून इतके आनंददायक असे गाणे मी आजवर कधी ऐकले नाही. ते ऐकून माझे मन पूर्ण तृप्त झाले आहे. तुम्हांला मुळीच क्लेश होणार नाहीत असा स्वर्गवास तुम्हाला देतो. तिथे देवादिकांची मने रिझवीत तुम्ही सुखाने रहा." असा वर देऊन शंकरांनी त्यांना सन्मानपूर्वक विमानाने स्वर्गात पाठविले. त्यांचे गाणे ऐकून गंधर्व आणि किन्नरही भुलून जात आणि गंधर्वही थक्क होत. एकदा त्या गंधर्व झालेल्या पूर्वजन्मीच्या ब्राह्मणाला देवांनी ब्रह्मलोकाला संगीत सभेत नेले. त्या सभेत विविध प्रकारची मृदंगीदि चर्मवाद्ये, वीणादि तंतुवाद्ये, बासरी आदि छिद्रयुक्त वाद्ये आणि टाळा, झांजा इत्यादि घनवाद्ये वाजविली जात होती. अप्सरा कौशल्यपूर्ण नृत्याने, हावभावांनी युक्त अशी आपली**

**कला प्रदर्शित करीत होत्या. अनेक गंधर्व प्रेमभराने गाऊन देवांना रमवीत होते. त्या सर्व गंधर्वात त्या ब्राह्मणाचा आवाज अत्यंत सुरेल आणि आनंददायक होता. त्याने आकृष्ट होऊन ब्रह्मदेवाने इतर सर्व गंधर्वांना बाजूला करून त्या दोघा पतिपत्नीना समोर बसवून त्यांची चित्तवेधक गाणी ऐकली. त्या गायनाच्या श्रवणाने ब्रह्मदेवाना प्रत्यक्ष ब्रह्मानंदाची अनुभूति आली. ते त्या जोडप्याला म्हणाले. "तुमचे जीवन धन्य आहे! देव हो! नादब्रह्माचे निरुपम सर्वोत्कृष्ट तत्त्व तें ह्यानेच जाणले आहे. सर्व खेद निवारून दुसऱ्यांनाही परमानंद देणारी ही निखळ ब्रह्मरसाची गोडी ह्याला कळली आहे. ह्याला पत्नीसह कायम ब्रह्मलोकातच ठेवून घेतो." असे बोलून ब्रह्मदेवाने त्या दोघांना सन्मानाने आपल्या जवळ स्थान दिले. अशा रीतीने त्या कामशास्त्रज्ञ ब्राह्मणाने गंधर्व होऊन ब्रह्मलोक प्राप्त करून घेतला. कालांतराने त्याला उपासनेच्या बळावर ब्रह्मलोक मिळविणाऱ्यांची गति मिळाली आणि पुनरावृत्तिरहित क्रममुक्तीचा तो अधिकारी झाला. उपासनेच्या प्रभावाने ब्रह्मलोकी आलेले अधिकारी तिथे श्रवणादि साधने करून क्रमाने मोक्ष पावतात. इतर जे लोक आपल्या पुण्याईच्या बळावर ब्रह्मलोकात येतात त्यांना मात्र त्यांची पुण्याई संपतांच भूलोकावर परत यावे लागते. ही गाथा सांगून गुरु बृहस्पति इंद्राला म्हणाले, "असा तो कामशास्त्राचा अभ्यासक ब्राह्मण पत्नीसह ब्रह्मलोकात निवास करू लागला, तो क्रममुक्तीचा अधिकारी  झाला. कोणत्याही शास्त्राच्या परिपूर्ण अध्ययनाने चारी मुक्ती अनुक्रमे मिळतात हेच यावरून स्पष्ट होते." दत्तप्रभू अर्जुनाला म्हणतात, "हे ऐकून समाधान पावलेल्या देवराजाने गुरूंना तिसरे उदाहरण कोणते ते विचारले. "**

ह्यानंतरची कथा समजायला सोपी आहेच. परस्परावर प्रेम आणि निष्ठा ठेवून धर्माचरण करून ते जोडपे गंधर्व योनीत गेले. विद्याधर, अप्सरा, यक्ष, राक्षस, गंधर्व, किन्नर, पिशाच, गुह्यक, सिद्ध, चारण, नाग आणि भूत अशा देवयोनींचे वर्णन पुराणांतरी आहे. विद्याधर सर्वांत श्रेष्ठ मानले जातात. आपापल्या पुण्याईच्या मानाने मानवांना या योनी प्राप्त होतात. या गोष्टीचे आणखी एक वैशिष्ट्य हे की हे क्रममुक्तीचेच उदाहरण असले तरी तो कामशास्त्री परत मानव जन्माला आला नाही. गंधर्वलोकापासून आरंभ करून उत्तरोत्तर श्रेष्ठ लोकांत जाऊन शेवटी ब्रह्मलोकात वास करून त्याने मोक्ष प्राप्त केला.

या गोष्टीत कामशास्त्राबरोबरच संगीतशास्त्राचे महत्वही वर्णिले आहे. नादब्रह्माच्या एकनिष्ठ उपासनेनेच त्याने ही प्रगती केली. ह्या गाथांतून प्रतिपाद्य सर्व शास्त्रांच्या ईश्वरैक तात्पर्याच्या सिद्धांताल बळकटी देणारेच हे कथानक आहे. ब्रह्मलोकाच्या प्राप्तीच्या दोन मार्गांविषयी थोडा विचार करून ह्या लेखाचा समारोप करू या. सहा मुख्य दर्शनांपैकी पूर्वमीमांसा या दर्शनांत स्वर्गप्राप्तीसाठी जे अनेक यज्ञ सांगितले आहेत. त्यांच्या सकाम अनुष्ठानाने ब्रह्मलोकसुद्धा मिळतो. तसेच आत्मसाक्षात्कारासाठी निष्काम कर्म, भक्ति, योग आणि ज्ञान या उपासनांनीही ब्रह्मलोक मिळतो. त्यापैकी पुण्याच्या बळावर पोंचलेले जीव आधी पाहिल्याप्रमाणे पुण्याचा क्षय होतांच पुनश्च भूलोकी येतात. उपासक मात्र ब्रह्मलोकातच कायम राहून ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात. संगीताच्या उपासनेने त्या गंधर्वाने ही सर्वश्रेष्ठ गति प्राप्त केली.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा आठवा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय ९ वा.

**गायत्रीजापक सुशीलास। पीडिती सात राक्षस। श्रीदत्त भेटोनी त्यांस। मंत्र देऊनी घालवी।।२०।।**
**प्रामाणिक विष्णुदत्त। भूतें तया दाविला दत्त। दत्त तया मुक्त करीत। नवमाध्यायीं हे कथा।।२१।।**

श्रीदत्तप्रभू पुढे अर्जुनाला म्हणतात, "मन एकाग्र करून आता हे तिसरे उदाहरण ऐक म्हणजे तुझे समाधान होईल." गोदातीरी राहणारा एक वेदशर्मा नावाचा ब्राह्मण होता. त्याला एक सुशील नावाचा मुलगा होता. तो नाव सार्थ करणारा म्हणजेच शीलवान, उत्तम आचार पाळणारा असून नित्य गायत्री जप करीत असे. दैवयोगाने त्याला सात पिशाचांनी पछाडला. ते सातही ब्रह्मराक्षस असून नाना प्रकारे त्या सुशीलाला पीडत असत आणि त्याच्या पोटात घासभर अन्नही जाऊ देत नसत. त्या सातही भुतांच्या सात चेष्टा (क्रिया) होत्या. एका वेळी एक भूत अंगात येऊन आपल्या चेष्टा दाखवीत असे. एक रडायचे, एक उड्या मारी, एक मोठ्याने हंसत असे, एक पुढे येऊन नाचत असे, एक खात सुटे, एक गात असे तर एक सारखा पडत असे. त्या ब्राह्मणपुत्राच्या शरीरात घुसून ती सात भुते अशा प्रकारचे चाळे करीत असत. त्या ब्राह्मणाने केलेल्या अनेक उपायांना त्यांनी दाद दिली नाही. ब्राह्मण खूपच घाबरला आणि म्हणू लागला, "माझा हा एकुलता एक मुलगा या भुतांनी पछाडला आहे. त्याला होणारी पीडा पाहून मी फारच कष्टी झालो आहे. हा माझा पुत्र ऐहिक आणि पारलौकिक सुखांना मुकला आहे. मी श्रीदत्तप्रभूंचा भक्त असूनही हे दुःख मला कसे झाले? माझी विचारशक्तीच खुंटला आहे!" याप्रमाणे तो ब्राह्मण शोक करीत असता एक मळकट कपडे घातलेला, अंगाला दुर्गंधी येणारा भिकारी त्याच्याकडे आला. सामान्य लोकांना तो मूर्खच वाटत होता. त्याला भिक्षा देतांना त्या ब्राह्मणाला तो सूर्यासारखा तेजस्वी आहे असा भास झाला. आपल्याला कसला भ्रम होत आहे असे वाटून तो त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहून त्याला पारखू लागला. ते पाहून तो भिकारी लागलीच पळत सुटला. तो ब्राह्मणही त्याच्या पाठीमागे लागला. पुढे पळणाऱ्या भिकाऱ्याने आपल्यामागे ब्राह्मण धावतो आहे हे पाहून त्याला दगड मारण्यास सुरुवात केली आणि "जा जा! मागे फिर!! " असे ओरडू लागाला. तो दगडांचा मार सहन करीतच त्या ब्राह्मणाने त्याच्याजवळ जाऊन त्याचे पाय धरले आणि काकुळतीने म्हणाला, "हे सत्पुरुषा! मी तुला शरण आलो आहे, माझे रक्षण करा. " तो भिकारी म्हणाला, "अहो तुम्ही श्रेष्ठ आणि पूज्य असे ब्राह्मण आहांत. मी तर एक असंस्कृत आणि भ्रष्ट भिकारी आहे." तो ब्राह्मण यावर उत्तरला, "आपण मला भूलोकावर अवतरलेले वंदनीय देव आहात असे खात्रीने वाटते." मग मात्र त्या भिकाऱ्याच्या रूपांतील दत्तप्रभूंनी त्याला आपले स्वरूप दाखविले. ते त्रिमूर्तिस्वरूप पाहून ब्राह्मणाला आपले पाप आणि ताप नष्ट झाल्याचा आनंद वाटला. त्याने प्रभूंना प्रार्थना केली, "देवा! माझा मुलगा भुतांनी पछाडला आहे. त्याला आपण ह्या पीडेपासून सोडवा!" त्यावर भिक्षुकरूपाने आलेल्या दत्ताने स्मितपूर्वक त्याला सात मंत्रांचा उपदेश केला. "क्रमाक्रमाने एकेका भुताला एकेका मंत्राच्या प्रयोगाने बांध म्हणजे तुझा पुत्र या पीडेपासून सुटेल. ज्याप्रमाणे एकेका शास्त्राच्या अध्ययनाने मनाचे मालिन्य जाऊन ज्ञानावरची एकेक आवरणे दूर होऊन आत्मस्वरूप प्रकाशते त्याप्रमाणेच एकेका मंत्राने एकेक भूत जाईल. त्या शास्त्रांप्रमाणेच ही भुतेही परस्परांच्या विरुद्ध आहेत त्यामुळे एकाच मंत्राने त्यांचा निरोध होणार नाही," असे त्याला सांगून आणि त्या मंत्रांची विधाने सांगून भगवान गुप्त झाले. त्यांना नमस्कार करून तो ब्राह्मणही घरी परत आला. (1 -21)

ह्या कथेत एका सत्वशील ब्राह्मणाच्या होतकरू मुलाला पिशाचांची बाधा झाल्याचे वर्णन आहे. तेव्हा या ठिकाणी प्राचीन भारतीय शास्त्रातील पिशाचयोनीसंबंधीचा विचार संक्षेपाने पाहू या.

मृत्यूनंतर आत्मा स्थूलशरीराचा त्याग करतो तेव्हां प्रथम आतिवाहिक देह धारण करतो. या प्रेतशरीराला अन्न-पाणी देण्याचा मंत्र असा आहे - *'आकाशस्थो निरालम्बो वायुभूतो निराश्रयः। इदं नीरमिदं क्षीरं स्नात्वा पीत्वा सुखी भव।। '*. याचाच अर्थ परलोकगत आत्मा वायुभूत (वायव्य) असून तो आकाशांत निराश्रित असा तरंगत असतो. विष्णुधर्मोत्तरपुराणानुसार मरणोत्तर तत्क्षणीं (जीव) आतिवाहिक देह धारण करून वर जातो. त्याच्याबरोबर (पृथ्वी आणि आप हीं जड तत्त्वे खालींच राहून) तेज, वायु आणि आकाश ही तीन तत्वेच संलग्न असतात. कांहीं शास्त्रांत हा देह केवळ वायूचाच असतो असेहि सांगितले आहे. हा देह फक्त मानवांनाच प्राप्त होतो पशुपक्ष्यांना नाही. ह्या देहांत भोग घेण्याची क्षमता नसते. दाहकाली व नंतरच्या दहा दिवसांत प्रेताला उद्देशून केलेल्या पिंडांच्या परमाणूंपासून हळूंहळूं भोगदेहाची निर्मिति होते. "प्रेतत्वविमुक्तये एष पिंडस्तुभ्यं स्वाहा" या मंत्रानेच श्राद्धकाली पिंडदान केले जाते. या काळांत जर पिंडदान व सोळा श्राद्धें घडली नाहींत तर तो जीव प्रेत(पिशाच)रूपानेच दीर्घकाल अतृप्तावस्थेत भ्रमण करीत राहतो. एकदा ही वेळ निघून गेल्यावर पुढे अनेक श्राद्धे केली तरी त्या जीवाला शांतीचा मार्ग सांपडत नाही. हा भोगदेहही तात्पुरता असतो वर्षश्राद्धाचे वेळीं सपिण्डीकरण झाल्यावरच शाश्वत भोगदेहाची प्राप्ति जीवाच्या कर्मानुसार होते. पुण्य अधिक असेल तर दिव्य देहाची प्राप्ति होऊन तो जीव स्वर्गाला जातो व पाप अधिक असेल तर यातना देह प्राप्त होऊन नरकवास घडतो.

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

आयुर्वेदांत "भूतोऽमी देवयोनयः" अशा शब्दांत पिशाचांची गणना देवयोनीत केली आहे. आयुर्वेदांत १८ प्रकारची भुतें वर्णिलेली आहेत. विविध पुराणें व स्मृतिग्रंथांतूनहि प्रेतयोनि व प्रेतबाधानिवारण यांच्याविषयी विपुल माहिती आहे. अशा रीतीने भारतीय परंपरांत पिशाच/ प्रेत/ भूत-योनीला सार्वत्रिक मान्यता **आढळते**. तसेच ह्या योनीचे अनुभव अनेक अर्वाचीन व प्राचीन तसेच पाश्चात्य व पौर्वात्य देशांतून वर्णन केलेले आहेत. एवढेच नाही तर त्या सर्व वर्णनांतून बऱ्याच प्रमाणांत एकवाक्यताहि आहे. बहुतेक पुराणांनी भूतप्रेतगणांचा अंतर्भाव भगवान शंकरांच्या गणांत केला आहे.

प्रेतबाधेचे प्रमाण कलियुगांत अत्यधिक असल्याचे पुराणांनी सांगितले आहे. तरीहि आपल्याला या योनीच्या अस्तित्वाचीच शंका वाटते. याचे कारण पिशाचबाधा ओळखण्याची क्षमता आपल्यांत नसते. अमंगल, अपवित्र व सर्वथा दुष्ट आणि **तिरस्कृत** अशी ही योनि असली तरी तिची गणना देवयोनींत आहे. ज्ञान व क्रिया या दोन्ही शक्तींत ते कलियुगांतील सर्वसामान्य मानवांपेक्षां खूपच वरचढ असतात. थोडक्यांत सांगायचे तर प्रेतबाधेने माणसाच्या मति, प्रीति, रति, लक्ष्मी आणि बुद्धि (प्रवृत्ति) यांचा नाश होतो. पिशाच अदृश्य किंवा दृश्य रूपांत त्या व्यक्तीच्या प्राणमय कोशांत प्रवेश करते व त्या शरीराचा ताबा घेऊन आपल्या वासनांच्या पूर्तीचा प्रयत्न करते. त्या व्यक्तीच्या वागण्यांत यामुळे लक्षणीय फरक पडतो. उदाहरणार्थः- आहारांत अमर्याद वाढ, अकारण वा क्षुल्लक कारणावरून रागावणे, शिवीगाळी, आरडाओरडा करणे इत्यादि.. **श्रीदत्तपुराणात श्रीस्वामी महाराजांनी पिशाचांना परकायप्रवेशनशील असे म्हटले आहे. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाच्या मुलाच्या शरीरात घुसून ती भुते नाना अंगविक्षेपादि क्रिया करू लागले. ह्या कथेत सात पिशाचांच्या सात वेगवेगळ्या चेष्टांचा उल्लेख आहे. ह्यामुळे तो मुलगा आपल्या इच्छेने ब्राह्मणकर्म तर सोडाच पण भोजनपानादि शरीरधारणेला आवश्यक क्रियाही करण्यास असमर्थ झाला.**

**तो ब्राह्मण दत्तभक्त असल्याने त्याने साहजिकच प्रभूंचा आश्रय घेतला आहे. त्याच्या आर्त भक्तीने द्रवून दत्तप्रभूंनी त्याला भिकाऱ्याच्या वेषांत प्रकट होऊन आपले तेज दाखविले. त्यांच्या कृपेनेच त्या ब्राह्मणाने त्यांचा पाठलाग केला आणि त्यांनी मारलेल्या दगडांना न जुमानता त्यांचे पाय धरले. त्याच्या मुलाला सात पिशाचांची बाधा असल्याचे जाणून दत्तप्रभूंनी त्याला सात मंत्रांचा उपदेश केलेला आहे. इथे श्रीस्वामी महाराजांनी एक समर्पक दृष्टांत दिला आहे. त्यांनी भुतांना बांधणाऱ्या मंत्रांना शास्त्रांची उपमा दिली आहे. परस्परविरोधी शास्त्रे अज्ञानाचा निरास करू शकत नाहीत. पण एकेक शास्त्र मनाचा एकेक चाळा – विकार, घालवून अनेक शास्त्रांच्या अध्ययनाने आत्मज्ञानाला होणारे अडथळे दूर होतात त्याचप्रमाणे क्रमाक्रमाने एकेका मंत्राचा उपयोग करून ह्या सर्व भुतांचा निरास होतो.**

अथर्ववेदांत प्रेतापसारणाचे व मारणाचे अनेक मंत्र व प्रयोग वर्णन केले आहेत. सुश्रुत, वाग्भट्ट यांच्या ग्रंथांतहि बालप्रकरणांत भूतादि ग्रहांच्या निवृत्तीचे प्रयोग बरेच सांगितले आहे. पिशाचबाधेपासून सुटका करण्याचे अनेक उपाय शास्त्रांत वर्णिलेले आहेत. त्या सर्वांची सविस्तर चर्चा इथे करणे अप्रस्तुत आणि अशक्य आहे. याचा अभ्यास करणारी मंडळीहि असतात. अर्थात् यांत ढोंगी लोकांपासून सावध रहाणे आवश्यक आहे. तपस्वी, निःस्वार्थी अशाच मांत्रिकाचा या कामी आश्रय घेण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

**घरी येऊन त्याने स्नान केले आणि दत्ताने सांगितलेल्या विधीने न्यास आणि ध्यान करून पहिल्या मंत्राचा प्रयोग केला. त्याने एका भुताचे बंधन झाले आणि त्या भुताची विशिष्ट क्रिया बंद झाली आणि त्या मुलाला आराम पडला. अशा रीतीने त्या ब्राह्मणाने सात दिवसांत सात मंत्रांचे विधिपूर्वक अनष्ठान करून मंत्रांच्या बळाने त्या सातही भुतांस बांधून टाकले. ज्या भुताचे बंधन होई त्याचे चाळे बंद होत. अशा रीतीने क्रमाने सातही प्रकारचे चाळे थांबले आणि तो मुलगा भूतबाधेपासून मुक्त झाला. पिशाचपीडेपासून सुटका झाल्यावर त्या ब्राह्मणपुत्राने वेदशास्त्रांचा अभ्यास केला आणि तो मुक्त झाला. क्षुद्र वाटणाऱ्या शास्त्रांचाही असा उपयोग लोक करून घेतात. तसे हे मंत्रशास्त्रही उपकारक आहे हे या तिसऱ्या सुंदर गाथेचे तात्पर्य आहे. आता चौथी गाथा ऐक म्हणजे तुझे मन निःशंक होईल. (22 -27)**

**मंत्रशास्त्राविषयी कांही माहिती आपण मागील एका लेखांकात पाहिली आहे. मननात् त्रायते इति मंत्रः म्हणजे ज्याचे मनन केले असता मानव तरतो, त्याचे रक्षण होते तो मंत्र अशी व्याख्या आहे. शब्दाच्या अचिंत्य शक्तीचा उपयोग माणसाला आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी करण्याचे शास्त्र म्हणजे मंत्रशास्त्र होय. भारतीय वर्णमालेतील प्रत्येक अक्षरात विशिष्ट मंत्रशक्ती सुप्त रूपाने आहे. ह्या शक्तीला जाग्रत करून विशिष्ट कार्यासाठी प्रवाहित करण्याचे प्रयोग मंत्रशास्त्रात दिलेले असतात. सहाव्या अध्यायात आपण पाहिल्याप्रमाणे बीज, कीलक, शक्ति, कवच इत्यादींचा उपयोग करून त्या मंत्राची शक्ति हवी तशी परिवर्तित करता येते आणि तिचा विनियोग आपल्या आवश्यकतेनुसार करता येतो. अर्थात् त्यासाठी मंत्रशास्त्राचा तसा प्रयोगसिद्ध अभ्यास करणाऱ्या मार्गदर्शकाची आवश्यकता आहे. मंत्र पुस्तकांत वाचून करण्याचा फारसा उपयोग होत नाही. तो मंत्र सिद्ध केलेल्या अधिकारी व्यक्तीकडूनच घेतला पाहिजे. मंत्र देणाऱ्या व्यक्तीचे तपःसामर्थ्य त्या मंत्राच्या माध्यमातून मंत्रजप करणाऱ्या व्यक्तीला मिळत असते. विशिष्ट इच्छा मनात ठेवून मंत्राचा जप करतांना त्याच्या विधानाचे कांटेकोर पालन आवश्यक आहे. पवित्र ठिकाणी, शुचि अवस्थेत, आचमन, प्राणायाम, संकल्प, न्यास (मंत्रशक्तीची शरीराच्या निरनिराळ्या अंगात स्थापना), मंत्रदेवतेचे ध्यान आणि मानसपूजा करून जपाच्या माळेचे पूजन करून मंत्राचा जप करायचा असतो. मोठ्याने उच्चार करून केलेला जप वाचिक होय. उच्चार न करता केवळ जीभ आणि ओठ हलले तर तो रहस्य किंवा उपांशु जप होतो. हे कांहीच न**

होता मनातल्या मनात होणारा मानसिक जप सर्वात श्रेष्ठ, म्हणजे सर्वाधिक परिणामकारी आहे.मंत्रजपासाठी योग्य माळेचा उपयोग करणे महत्त्वाचे आहे. सर्वांना सर्वच प्रकारच्या माळांचा उपयोग होत नाही. हे सर्व जाणून त्यानुसार नियमित, अखंडपणे जप केल्यानेच त्याचे फळ मिळते. त्या ब्राह्मणाने दत्तप्रभूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे वरील सर्व गोष्टींचे पालन करून एकेक दिवशी एकेका मंत्राचे अनुष्ठान केले. अशा रीतीने क्रमाक्रमाने एकेका भुताचे बंधन होऊन सात दिवसात तो ब्राह्मणपुत्र त्या पिशाचांच्या बाधांपासून पूर्ण मुक्त झाला.

ऐहिक पारलौकिक कामनांच्या पूर्तीसाठी, पिशाच, सर्प, विंचू बाधांपासून सुटण्यासाठी ह्या शास्त्राचा मुख्यतः उपयोग होतो. हे शास्त्र प्रत्यक्षपणे मोक्षाचे साधन होऊ शकत नाही. त्यामुळे त्याची गणना क्षुद्र शास्त्रांतच केली जाते. तरी पण या शास्त्राच्या आधारानेच ब्राह्मणपुत्राने पुनश्च आपल्या अध्ययन-अध्यापनादि विहित कर्मांचे अनुष्ठान करून, चित्तशुद्धि झाल्यावर ज्ञानमार्गाने मोक्ष प्राप्त करून घेतला. अशा रीतीने सर्व शास्त्रे ईश्वरप्राप्तीला उपकारकच ठरतात हा सिद्धांत ह्या तिसऱ्या गाथेतून पक्का केला आणि दत्तप्रभूंनी चौथी गाथा सांगायला आरंभ केला.

सह्याद्रि पर्वताजवळ माहूर नावाच्या गांवी विष्णुदत्त शर्मा नावाचा कर्मनिष्ठ गृहस्थाश्रमी ब्राह्मण रहात होता. त्याची पत्नी सुशीला नेहमी पतीचे मन राखून त्याच्या सेवेत तत्पर असे आणि कधीही त्याच्या मनाविरुद्ध वागत नसे. तो ब्राह्मण दत्तप्रभूंचा भक्त असून पूर्वमीमांसेचा अभ्यास करून त्यानुसार निष्ठेने आणि विवेकाने तो आपली दैनंदिन कर्मे वेळच्या वेळी करीत असे. त्याच्या दारांत एक पिंपळाचे झाड होते. त्या झाडावर एका ब्रह्मराक्षसाचा वास होता. तो ब्राह्मण सकाळचे आह्निक झाल्यावर वैश्वदेव करून पिंपळाच्या झाडाखाली भूतबळी टाकीत असे. जे असे बलिदान करीत नाहीत त्यांना भुते पीडा देतात हा त्यांचा स्वभाव जाणूनच शास्त्राने हा बलिदानाचा विधि सांगितला आहे. अशा रीतीने विष्णुदत्ताने रोज दिलेला बळी खाऊन त्या ब्रह्मराक्षसालाही शांततेचा लाभ झाला. शुद्धान्न सेवनाने काय अशक्य आहे? एके दिवशी विष्णुदत्त बळी हातात घेऊन पिंपळाखाली आला असता तो ब्रह्मराक्षस झाडावरून खाली उतरला. त्याचे ते भयंकर रूप पाहून आश्चर्यकित झाला आणि भीतीने थरथरा कापू लागला. ते विक्राळ तोंडाचे धूड पाहून तो ब्राह्मण अचानक सिंहाच्या पुढ्यात आलेल्या गाईसारखा व्याकुळ झाला. “हे अचानक माझे कुठले पाप उगवले? हे आज कसले विघ्न उपस्थित झाले? योगिराज दत्तांचा माझ्यावर रोष झाला काय? ते माझी लाज राखोत ” असा मनाशी विचार करणाऱ्या विष्णुदत्ताला त्याचे भय ओळखून त्या ब्रह्मराक्षसाने शांत रूप घेतले आणि मृदु शब्दात त्याला म्हणाला, “मी बह्मराक्षस आहे, तुला वरदान द्यायला आलो आहे. तू जे नित्य बलिदान देतोस ते खाऊन मी शांत झालो आहे. ते उपकार फेडण्याच्या हेतूने मी आलो आहे.” हे राक्षसाचे बोलणे ऐकून आपल्या कर्माला बोल लावीत ब्राह्मण मनांतल्या मनांत दत्ताचा धांवा करू लागाला. (28 -40)

ह्या गाथेत पूर्वमीमांसेच्या एका निष्ठावान् अभ्यासकाची कथा आहे. व्यासशिष्य जैमिनि यांनी प्रतिपादिलेले हे शास्त्र वैदिक सहा दर्शनांत गणले जाते. ह्या शास्त्रांत मुख्यतः कर्मकांडाचाच विचार आहे. सर्व कर्मांचा अंतर्भाव ह्या दर्शनात यज्ञ या संज्ञेखाली केला आहे. आपण नित्य किंवा प्रतिदिन करावयाच्या ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, बलिवैश्वदेवयज्ञ आणि अतिथियज्ञ या पंचयज्ञांचा थोडा विचार केला आहे. याशिवाय अनेक नैमित्तिक लहानमोठे यज्ञ आणि त्यांच्या विधींचा पूर्वमीमांसेत ऊहापोह केला आहे. आजीवन स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञ करीत रहाणे यालाच मीमांसक धर्म मानतात. हेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट असून हाच शाश्वत सुखाचा मार्ग आहे असे प्रतिपादन या दर्शनात केले आहे. ईश्वर या संकल्पनेचा ह्या शास्त्रात समावेश नाही. त्यामुळे हे दर्शन निरीश्वरवादी असल्याचे कांहीजण मानतात. पण व्यासांच्या मते ईश्वराच्या अस्तित्वाला या दर्शनात विरोध नाही. या शास्त्रात प्रतिपादन केलेली कर्मे विष्णुदत्त करीत असे. अर्थातच त्यांत पांच महायज्ञही तो करीत असे. रोज वैश्वदेव करून भूतबली अर्पण करण्याचा त्याचा नियम होता. आपल्याला बली देणाऱ्या मानवांना भुते त्रास देत नाहीत हा त्यांचा स्वभाव ध्यानात घेऊनच शास्त्राने ह्या बलीचे विधान केले आहे. विष्णुदत्ताच्या घरासमोरील पिंपळावर राहणारा ब्रह्मराक्षस प्रतिदिन बली ग्रहण करून शांत झाला.

विद्वान ब्राह्मणाला तशाच कांही पापाने पिशाच योनि प्राप्त झाली तर तो ब्रह्मराक्षस होतो. ह्या योनीत त्याचे पूर्वजन्मी संपादन केलेले ज्ञान राहतेच. शिवाय त्याला भूत-भविष्य ज्ञानही असते. स्वतः श्रीस्वामी महाराजांच्या पूर्वायुष्यात त्यांना एक ब्रह्मराक्षस भेटत असे. माणगावजवळ सावंतवाडी येथे एक आणावकर नांवाचे वकील होते त्यांचा हा पूर्वज त्यांच्याच शरीरात प्रवेश करीत असे. त्याच्या ज्योतिष्यादि शास्त्रांतील गतीचा आणि त्याच्या भूतभविष्य ज्ञानाचा महाराजांना अनेक वेळां अनुभव आला होता. त्याने एकदा त्याच्या परसात आलेल्या एका गाईला हाकलण्यासाठी एक दगड मारला. तो चुकून त्या गोमातेच्या मर्मी रागल्याने ती मरण पावली. त्या आणावकराच्या पूर्वजाने ही गोष्ट कुणाला सांगितली नाही आणि त्यासाठी काही प्रायश्चित्तही घेतले नाही. मृत्यूनंतर चित्रगुप्ताने त्याला हे पाप सांगून यासाठी व्याघ्रयोनि किंवा पिशाचयोनि यांपैकी एक पर्याय निवडायला सांगितले. पिशाचयोनीत ज्ञान तरी असेल असा विचार करून तीच आणावकराने स्वीकारली. ह्या योनीत शेंकडो, कदाचित् हजारो वर्षेही आपापल्या कर्मानसार रहावे लागते अशी माहितीही त्याने सांगितली. श्रीगुरुचरित्रात अनेक ब्राह्मणांशी वाद घालून जयपत्रे घेत संचार करणाऱ्या दोन ब्राह्मणांना ब्रह्मराक्षस व्हावे लागल्याची गोष्ट आली आहे. श्रीगुरु नृसिंहसरस्वती यांच्या

दर्शनामुळे पश्चात्ताप झाल्याने त्यांना ह्या योनीत फक्त बारा वर्षेच काढावी लागला. गुरूंचा किंवा ब्राह्मणांचा अहंकाराने उपमर्द करणारा ब्रह्मराक्षस होतो. प्रसिद्ध कवि वामन पंडित यांच्याकडून हे पाप घडले होते. पण त्यांना त्याची पूर्वसूचना मिळून ते समर्थ रामदास स्वामींना शरण गेले आणि त्यांच्या कृपेने आवश्यक प्रायश्चित्त घेऊन त्या पापातून – पर्यायाने ब्रह्मराक्षस होण्यापासीन, बचावले अशी हकीकत आहे. प्रस्तुत कथेतील ब्रह्मराक्षस पूर्वजन्मीचा दत्तभक्त आहे. त्यानेच पुढे आपल्या हातून घडलेल्या ब्राह्मणांच्या अवमानाने आपण या योनीत आल्याचे स्पष्ट केले आहे. पिशाचाची भूक कितीही खाल्ले तर शमत नाही असे म्हणतात. पण विष्णुदत्ताने दिलेले शुद्ध अन्न खाऊन तो ब्रह्मराक्षस शांत आणि तृप्त झाला. त्यामुळे प्रसन्न होऊन तो त्याच्यासमोर प्रकट झाला.

हे दत्ता ही काय विचित्र लीला आपण जगांत प्रकट करीत आहांत? आपली नित्य सेवा मी करीत असतां आणि सद्भावाने धर्माचे आचरण करीत असतां आपण भुताला प्रसन्न केले आहे! ज्या तुझ्या नावाच्या स्मरणानेसुद्धा भुते दूर पळतात त्या तुझ्या उपासकाला ह्या भयंकर राक्षसाचे दर्शन घडवतो आहेस! (41 -43)

अचानक अक्राळविक्राळ पिशाचाचे दर्शन झाल्याने घाबरून गेलेल्या विष्णुदत्ताने केलेला हा धावा आहे. सन्मार्गावर चालत असताना अशा कांही अनपेक्षित घटना घडत असतात. खरा भक्त त्या सर्वांत परमेश्वरी कृपाच पहात असतो. फक्त आपल्याला ती ओळखायला आला पाहिजे. पंजाबचे प्रसिद्ध संत श्रीस्वामी रामतीर्थ यांच्या साधनकालात त्यांना एका भयंकर नागाचे दर्शन झाले होते. “देवा, मला आपले ह्या स्वरूपात दर्शन नको ” असे म्हणून ते त्या नागाला नमस्कार करून तिथून निघून गेले. अशा प्रसंगी आपण करीत असलेल्या उपासनेविषयी शंकाही वाटू शकते. विष्णुदत्ताचा मात्र “कर्ता करविता दत्त ” हा विश्वास ठाम आहे.

त्याची ती अवस्था पाहून तो ब्रह्मराक्षस म्हणाला, “अरे ब्राह्मणा! ही कसली तुझी विचारशक्ती? जर शहाणा अससील तर उगीचच केविलवाणा होऊ नकोस! मनातली भीती टाकून दे आणि कसलाही संकोच न करता वरदान मागून घे! मी आनंदाने देतो आहे.” हे ऐकून विष्णुदत्ताने विचार केला, “आपण निर्धन आहोत तेव्हा पैसे मागावेत तर आपल्याला रहायला घर नाही. शिवाय हे सर्व ऐहिक नश्वर आहे. तेव्हा परलोक मागावा काय? पण तोही नश्वरच आहे म्हणतात. मग मोक्षसुखच मागावे.” अशा परस्परविरोधी विचारांनी तो ब्राह्मण गोंधळून गेला त्याने घरात जाऊन आपल्या पत्नीला सर्व सांगून तिचा सल्ला घेतला. तेव्हा ती म्हणाली, “हे प्राणनाथा! नाशिवंत असे कांहीच मागू नका. आपले उपास्य दैवत श्रीदत्त आहेत. तेव्हा त्यांची भेट करवून दे असा वर त्या राक्षसाला मागा. एकदा दत्तप्रभूंचे दर्शन झाले की मग सर्व ऐहिक आणि पारलौकिक संपत्ती मिळविल्यासारख्याच आहेत. म्हणून तर मोठमोठे योगीसुद्धा त्यांच्या दर्शनासाठी तळमळत असतात. अहो दत्तप्रभू भेटले की सगळे देव भेटल्यासारखे आहेत. मग संपदाच आपली पाठ सोडणार नाहीत! मग इतर कांहीच खटाटोप करण्याची आवश्यकता राहणार नाही. ” हे आपल्या पत्नीचे बोलणे त्या ब्राह्मणाला पटले. श्रीदत्तपदांचे दर्शन मागण्यांतच खरा शहाणपणा आहे असा निश्चय करून तो विष्णुदत्त घरांतून बाहेर आला आणि त्या ब्रह्मराक्षसाला म्हणाला, “हे समंधा, मला श्रीदत्तप्रभूंचे दर्शन व्हावे हाच वर पाहिजे.” यावर ते भूत म्हणाले, “बाप रे! जे नाव ऐकूनही आम्हां भुतांची भीतीने गाळण उडते त्यांचे दर्शनच तू मागतो आहेस! पण असो. मी तुला शब्द दिला आहे तो खरा करीनच. तू माझ्यावर मोठाच उपकार केला आहेस. तेव्हा त्याची परतफेड अशा रीतीने मी केली नाही माझा धिक्कार असो! मी खात्रीने हर प्रयत्नाने तुला दर्शन घडवीन. मात्र तू धैर्याने त्याचे पाय धर. तो नानारूपे धारण करतो आणि देवादिकांनाही अगम्य आहे. असा तो भक्तिभावन योगिराज दृढ निश्चय असणाऱ्यालाच भेटतो. जर त्याचे दर्शन झाले तर जीवन कृतकृत्य होईल; तो पुरुष मुक्त होईल,” असे बोलून तो राक्षस दिसेनासा झाला. आश्चर्यचकित होऊन तो ब्राह्मण घरी परत आला. (44 – 60)

ब्रह्मराक्षसाने आश्वासल्यावरही त्या ब्राह्मणाच्या मनात काय वर मागावा याविषयी गोंधळ उत्पन्न झाला. आहे. त्याची पत्नी मात्र विवेकी आहे. अशाश्वत काही नको असे वाटणे याचा अर्थ नित्यानित्यवस्तुविवेक जाग्र असल्याचे लक्षण आहे. तिच्या मनात संशयाला थारा नव्हता. तिची बुद्धि निश्चयात्मिका होती. हिलाच श्रीमद्भगवद्गीतेत व्यवसायात्मिका बुद्धि (2:41) असे म्हटले आहे. योग आणि आत्मज्ञान यांच्यात प्रगति हवी असेल तर ही निश्चयप्रवण बुद्धि आवश्यक आहे.

पत्नीच्या सल्ल्याप्रमाणे ब्राह्मणाने दत्तदर्शनाचा वर पिशाचाला मागितला. पिशाचाने तेव्हा सांगितलेले एक महत्त्वाचे रहस्य आपल्या सर्वांनीच ध्यानात ठेवण्याजोगे आहे. तो म्हणतो “अरे ब्राह्मणा! ज्याचे नुसते नाव कानावर पडले तर आम्हा भुतांचा भयाने थरकांप होतो त्यांचे दर्शन तू माझ्याकडे मागतोस! ” श्रीस्वामीमहाराजांचे वचन आहे, “भूतप्रेतपिशाचाद्याः यस्य स्मरणामात्रतः। दूरादेव पलायन्ते दत्तात्रेयं नमामि तम्।।1।। ” श्रीदत्तनामाचा हा प्रभाव ध्यानांत घेऊन आपण सर्वांनी दत्तनामाचाच आश्रय केला पाहिजे. कलियुगात सर्व अपप्रवृत्तीवर मात करण्यासाठी इतका सोपा व प्रभावी उपाय दुसरा नाही. येता-जाता, उठता-बसता, शुचि-अशुचि अवस्थात, हसता-रडता, खेळात-कामात, सर्व ठिकाणी श्रीदत्तप्रभूंचे नामस्मरण करण्याचे ज्याला व्यसन जडले आहे, त्याला भूत-पिशाचांचेच काय, जगातील कुठल्याही शक्तीला भिण्याचे कारण नाही. समर्थ रासदासस्वामींनी म्हटल्याप्रमाणे “समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळी कोण आहे?” असो.

असे असूनही दिलेला शब्द पाळण्यासाठी आणि विष्णुदत्ताच्या उपकाराची फेड करण्यासाठी त्या पिशाचाने विष्णुदत्ताला दत्तमहाराज दाखवून देण्याचे मान्य केले. त्याचबरोबर "धैर्याने दत्तप्रभूंचे पाय धरण्याची जबाबदारी मात्र तुझीच आहे," असेही त्याला बजावले आहे.

एकदा दत्तभगवान एका दारूच्या गुत्यात आले. त्यांना ओळखून त्या राक्षसाने विष्णुदत्त ब्राह्मणाला बातमी दिली. त्याने लवकर जाऊन, मागेपुढे न पाहता त्यांचे पाय घट्ट धरले तरच ते हाती लागतील असे सांगितले. त्याच्या सांगण्याप्रमाणे दारूच्या अड्ड्यावर जाऊन ब्राह्मणाने पाहिले तर त्याला, माशांनी भरलेल्या दुर्गंधयुक्त शरीराचा एक वेडापिसा दिसला. ब्राह्मणाने विचार केला, "हा कसा अवधूत असेल. मीसुद्धा त्या भुताच्या सांगण्यावर विश्वास ठेवून इथे आलो. ह्या दारुड्याचे पाय धरले तर लोक मला नक्कीच हसतील." हा विचार त्याच्या मनात येताच तो दारुडा एकदम दिसेनासा झाला. तेव्हां मात्र तो ब्राह्मण पश्चात्तापाने पाण्याबाहेर काढलेल्या मासळीसारखा तळमळू लागला. "मी खरोखर किती दैवहीन आहे. हा जर खराच वेडा असता गुप्त झाला नसता. राक्षसाने भरंवशाने मला हाच दत्त आहे असे दाखवूनही मी श्रद्धा ठेवली नाही. काय माझी कुबुद्धी? आता त्या भुताला काय तोंड दाखवू. माझी बायकोही माझ्या अश्रद्धेला बोल लावील, माझा धिक्कार करील." असा अनुतापाने तळमळत तो ब्राह्मण परतला तेव्हां त्या भुताने आपल्या सांगण्यावर अविश्वास दाखविल्याबद्दल त्याचा धिक्कार केला. पण पुढे त्याची समजूत घातली आणि पुन्हा दत्ताला दुरून दाखविण्याचे आश्वासन दिले. त्यावेळी मात्र सावधपणे आणि धैर्याने त्यांच्या पायी लागण्याबद्दल बजावले. (61 -70).

असाच काही काळ गेल्यावर त्या भुताने योगीश्वर दत्तप्रभू स्मशानांत खेळत बसलेले पाहून विष्णुदत्ताला सांगितले, "अरे तुझा देव धुळीने माखलेल्या अंगाने स्मशानात कुत्र्यांबरोबर मजेत खेळतो आहे. आत्मक्रीडेत पटु असलेला तो आत्मारामच मोक्षाचे धाम  आहे, त्यालाच सगळे योगी भजतात. त्याची गति (माझ्यासारख्या) भुतांना कशी समजणार?  पण मी पूर्वजन्मी त्याची भक्ति केली असल्याने तुला हे रहस्य सांगूं शकतो. मी दत्तभक्त असूनही ब्राह्मणांचा अपमान केल्याने मला ही योनी प्राप्त झाली आहे. तरीसुद्धा त्या भक्तीच्या प्रभावाने माझी स्मृति शिल्लक आहे." हे ऐकून तो ब्राह्मण स्मशानात गेला तेव्हा दत्त त्याला हाडे फेकून मारू लागला तसा तो मृत्यूच्या भीतीने पळून घरी परतला. तेथे भुताने त्याची छी थू करीत म्हटले, "अरे पाप्या! ह्या आभासमय देहाच्या लोभाने तू देवाला सोडून आलास? असो आता आणखी (एकदाच) तुला दाखवितो. त्यावर तुझे नशीब!" कालांतराने पुन्हा एके दिवशी दत्त मेलेल्या गाढवाचे मांस तोडून कुत्र्या-कावळ्यांना वाटत असल्याचे पाहून त्या भुताने विष्णुदत्ताला येऊन सांगितले. तेव्हा त्याच्या पत्नीने त्यांना या वेळी सावध राहण्याविषयी बजावले. "या वेळी मी धीर सोडणार नाही" असे म्हणून तो ब्राह्मण निघाला त्याला भुताने सांगितले, "योगिराज वर देतील त्या वेळी त्यांना 'दर्शश्राद्धाचे आमंत्रण द्यायला आलो' असाच वर माग." .स्मशानात आल्यावर त्या ब्राह्मणाला भुताच्या वर्णनासारखीच मूर्ती दिसली तेव्हां त्याने त्यांचे पाय घट्ट धरले. दत्तप्रभूंनी  त्याला मारले तरीही त्याने पाय सोडले नाहीत."अरे, का पाय धरतोस? " असे दत्ताने विचारल्यावर ब्राह्मणाने "आपल्याला दर्श श्राद्धाचे आमंत्रण द्यायला आलो" असे तो म्हणाला. यावर "माझ्यासारख्या भ्रष्टाला श्राद्धाला कसा बोलावतोस? मी तर धर्म आणि अधर्म सगळेच सोडले आहे" असे दत्तप्रभूंचे बोलणे ऐकून विष्णुदत्त उत्तरला, "तुम्ही सर्वशक्तिमान परमेश्वर आहां. तुम्हाला कसला धर्म आण अधर्म?" हे त्याचे उद्गार ऐकून दत्तप्रभु हंसले आणि त्यांनी आपले षड्भुज स्वरूप प्रकट केले. कुत्र्यांच्या ठिकाणी मूर्तिमंत वेद, कावळ्याच्या जागी शास्त्रे आणि स्मशानाच्या जागी योगभूमी दिसूं लागली. हे पाहून चकित झालेल्या ब्राह्मणाला दत्तप्रभू म्हणाले, "दुपारी स्नान करून मी येतो, पण लक्षात ठेव, माझ्या पंक्तीला बसायला योग्य असा ब्राह्मण असेल तरच मी जेवीन!" ब्राह्मणाने ते मान्य केले आणि दत्तप्रभूंना नमस्कार करून तो घरी आला. (71 – 86)

दत्तप्रभूंच्या दर्शनाला आवश्यक तेवढे धैर्य ब्राह्मणाला यायला तीन वेळा प्रयत्न करावा लागला. तिसऱ्या खेपेला मात्र तो दत्तप्रभूंच्या परीक्षेला उतरला. तेव्हांही त्याला राक्षसाच्या मार्गदर्शनाचा उपयोग झाला. आणि त्याने दर्शश्राद्धासाठी येण्याचा वर महाराजांना मागितला. त्या वेळी त्याला श्रीदत्तप्रभूचे सगुण दर्शन झाले. आपल्याबरोबर पंक्तीला आपल्याच योग्यतेचे ब्राह्मण बोलवावेत या अटीवर दत्तप्रभूंनी त्याचे आमंत्रणही स्वीकारले.

त्याने राक्षसाला हे सर्व वृत्त निवेदन केले आणि "दत्तप्रभूंच्या पंक्तीला योग्य ब्राह्मण कुठून आणावे?" हा प्रश्न त्याला विचारला. भुताने सांगितले, "अग्नि आणि सूर्य हेच त्यांच्या पंक्तीला योग्य ब्राह्मण आहेत. आता तुझे काम झाले. पण (दत्तप्रभूंसमोर) माझी आठवण ठेव. " असे सांगून भूत निघून गेले. घरात येऊन विष्णुदत्ताने पत्नीला सर्व वृत्तांत सविस्तर कळविला. तिला खूप आनंद झाला आणि उत्साहाने सर्व स्वयंपाक करून ती तयार झाली. मध्याह्नी दत्तप्रभूंची स्वारी आली. तो ब्राह्मण ते अद्भुत स्वरूप आश्चर्याने पहातच राहिला. तेवढ्यात त्याच्या पत्नीने प्रभूंना आसन दिले आणि "एवढ्यात ब्राह्मण येतीलच!" असे सांगून त्यांना बसवून ती बाहेर आली. तिने भगवान सूर्यनारायणांची प्रार्थना केली, "हे सर्वात्मक कश्यपपुत्रा, आपणच सर्व जीवांना चैतन्य प्रदान करता. आम्हा ब्राह्मणांचे आपणच दैवत आहांत. तरी आपण सौम्य रूप धारण करून श्राद्धाचे भोजन स्वीकारावे अशी प्रार्थना आहे. अत्रिसुत दत्त प्रतीक्षा करीत आहेत तेव्हा लवकर यावे." ही तिची प्रार्थना ऐकून सूर्य

ब्राह्मणाचे रूप घेऊन लगेच भूतलावर आला आणि ब्राह्मणपत्नीने दिलेल्या आसनावर बसला. त्या वेळी दत्त म्हणाले "दर्शश्राद्ध हे सहा दैवतांचे आहे, तरी आणखी एक ब्राह्मण पाहिजे." तेव्हा "तिसरा ब्राह्मण येतो आहे" असे म्हणून ती साध्वी अग्निशाळेत गेली आणि तिने अग्निनारायणाची हात जोडून प्रार्थना केली, "हे अग्निदेवा, आपण गृहपति आहांत आणि कर्माचे अध्यक्ष म्हणवता. ह्या घराची लाज आता आपल्या हाती आहे. आपण ब्राह्मणरूपाने श्राद्धाचे भोजन ग्रहण करायला लवकर यावे. योगिराज दत्तात्रेय खोळंबले आहेत!" मग विष्णुदत्ताने संकल्पपूर्वक यथाविधि श्राद्ध केले. तीनही देव तृप्त झाले. ब्राह्मणाच्या पितरांना सद्गति मिळाली. त्यावर विष्णुदत्ताने श्रीदत्तप्रभूंची एकशे आठ नावांनी स्तुति केली आणि त्यांना प्रेमभराने साष्टांग नमस्कार केला. (८६ – ९९)

त्या पिशाचाच्याच सूचनेनुसार दत्तप्रभूंच्या पंक्तीजोग्या ब्राह्मणांची योजना झाली. अग्नि आणि सूर्य हेच सानवाला दृष्टिगोचर होणारे देव आहेत आणि ब्राह्मणांना त्यांचीच उपासना प्रामुख्याने विहित आहे. ब्राह्मणाच्या निष्ठापूर्ण कर्माचरणामुळे त्यांची प्रसन्नता त्याला अपेक्षित होती. ब्राह्मणस्त्रीची दृढ श्रद्धा ह्या कामीही यशस्वी झाली. साधारणतः श्राद्धात एक पार्वण असते. त्यांत तीन पितरांचा (उदा. पिता, पितामह आणि प्रपितामह) समावेश असतो. दर्श म्हणजे अमावास्येला करावयाच्या मासिक श्राद्धात दोन पार्वणे (वरील पार्वणाखेरीज मातामह, मातृपितामह आणि मातृप्रपितामह यांचे पार्वण) असतात. म्हणून त्याला षड्दैवत म्हटले आहे. त्यासाठी देवांच्या स्थानी कमीत कमी दोन ब्राह्मणांचे विधान आहे. अशा रीतीने देवांच्या स्थानी अग्नि आणि दत्तप्रभू व पितरांच्या स्थानी सूर्य अशी योजना झाली व विधीचे उत्तम ज्ञान असलेल्या विष्णुदत्ताने ते श्राद्ध यथासांग परिपूर्ण केले. त्याला तीन देवांची प्रसन्नता आणि पितरांची सद्गति मिळवली.

विष्णुदत्त म्हणाला, "हे भगवंता, माझी बुद्धि अल्प असल्याने माझ्या मनात विकल्प आले. परंतु आपण सत्यसंकल्प असल्याने दया करून माझ्या मनातील विकल्प दूर केले. आपल्या दर्शनाने माझे डोळे निवले, माझे सर्व अवयव धन्य झाले, माझे कुळ आणि गोत्र पवित्र झाले. आपण समर्थ भगवंत आहांत. माझ्यासारख्या यःकश्चित ब्राह्मणाची मनोकामना पूर्ण करून मला कुळासह कृतार्थ केले आहे. महाराज, हे सर्व एका ब्रह्मराक्षसाच्या वचनामुळे शक्य झाले. त्याच्यामुळेच आपले पाय दृष्टीस पडले." तेव्हा दत्तप्रभू म्हणाले, "अरे ब्राह्मणा, तो राक्षस माझा भक्तच आहे. कांही दैवयोगाने त्याला ही दुर्गति प्राप्त झाली. (माझे) हे उष्टे त्याला दे म्हणजे त्यालाही सद्गति मिळेल. तू तुझ्या पत्नीसह मोक्ष पावशील. माझी भक्ति दुर्लभ आहे. ती तुला लाभली आहे. तू ऐहिक आणि पारलौकिक भोग भोगून अंती सायुज्य मुक्ती घेशील. " असे बोलून दत्तप्रभूंनी त्याला लोकोपकाराकरिता अनेक विद्या दिल्या. सूर्यनारायणाने त्याला इच्छेप्रमाणे कुढेही नेणारे विमान दिले. अग्निनारायणाने भाग्य आणि संपत्ति दिली. नंतर विष्णुदत्त आणि त्याच्या पत्नीचा निरोप घेऊन तिघेही देव आपापल्या स्थानी परतले. मनांत श्रीदत्तप्रभूंचे चिंतन करून त्या ब्राह्मणाने त्यांचे उच्छिष्ट राक्षसाला दिले व तो सद्गतीला गेला. विष्णुदत्त आणि त्याची पत्नी जीवन्मुक्त झाले. मीमांसा शास्त्रांत प्रतिपादलेले कर्म करून त्या ब्राह्मणाला अलौकिक सुखाचा लाभ झाला. अशा रीतीने शास्त्राचे तात्पर्य जाणणाऱ्याला सर्व धर्मांचे फळ मिळते. (100 -108)

श्राद्धानंतर विष्णुदत्ताने दत्तप्रभूंची एकशे आठ नांवांनी स्तुति करून कृतज्ञतापूर्वक प्रार्थना करून आपल्या या सद्भाग्याला तो ब्रह्मराक्षस कारण झाल्याचे सांगितले. श्रीदत्तांच्या आज्ञेने त्याला त्यांचे उष्टे खायला देऊन त्यालाही सद्गति मिळाली. तीनही देवतांकडून दुर्लभ वरांची प्राप्ती करून घेऊन ते दांपत्य इहपर सुख भोगून अंती मोक्ष पावले. अशा रीतीने मीमांसाशास्त्राचा अभ्यास साक्षात् नाही तरी अप्रत्यक्षतः ईश्वरप्राप्तीचे साधन झाला. सर्व शास्त्रांची परिणति ईश्वरात आहे ह्या सिद्धांताला बळकट करणारी ही आणखी एक कथा बृहस्पतीने इंद्राला आणि दत्तप्रभूंनी कार्तवीर्याला निवेदन केली.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा नववा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]


## अध्याय १० वा.

**जो उपजल्यापासून। रोगें ग्रासिला ब्राह्मण। कर्मविपाक सांगून। त्या दे जीवन विष्णुदत्त।।२२।।**
**फल दाऊनी औषध पाजिलें। झोटिंगाचें बंधन केलें। शास्त्रतत्त्व कथिलें। दहाव्या अध्यायांत।।२३।।**

# विष्णुदत्ताची महती.

श्रीदत्तात्रेयाय नमः। गुरु बृहस्पति इंद्राला सांगतात, "ही विष्णुदत्ताची गोष्ट अत्यंत पवित्र आहे. सर्वतंत्रस्वतंत्र असा परमात्मा भगवान दत्त भावाच्या भुकेने परतंत्र होतो. अजूनही मोठ्मोठ्या यज्ञांद्वारा त्याला तृप्त करणे देवादिकांनाही जमले नाही. विष्णुदत्ताच्या घरी श्राद्धाचे अन्न आनंदाने सेवन करून मात्र त्याने तृप्तीची ढेकर दिली. दत्ताला आपल्या हातांनी आग्रह करून त्याच्या पत्नीने यथेच्छ जेवू घातले. यज्ञांची दीक्षा घेतलेल्या याजकांनासुद्धा हे भाग्य दुर्लभ आहे. तो अतीव शुद्ध मनाचा विष्णुदत्त धन्य आहे. आपले संपूर्ण कुळ त्याने उद्धरले. त्याला आत्यंतिक हिताचा मार्ग दाखवून त्याच्या उद्धाराला कारणीभूत झालेला आणि स्वतः उत्तम गतीला पावलेला तो ब्रह्मराक्षसही धन्यच आहे! श्रीदत्तांनी विष्णुदत्तावर मोठीच कृपा केली आणि लोककल्याणासाठी त्याला आणखी विद्याही दिल्या. तो विष्णुदत्त ज्याच्यावर कृपा करीत असे तोही या संसारातून तरून जाई. विष्णुदत्तासारखे उपकारकर्ते ह्या सगळ्या ब्रह्मांडातही क्वचितच आढळतात. त्याला भूतादि दुष्ट शक्तीच काय देवादिकसुद्धा दबकून असत. आपल्याला शरण आलेल्या लोकांचे दुःख तो निःशेष नष्ट करीत असे. आतां हे देवराज! कर्मविपाकाची मोक्षमार्गावर नेणारी पांचवी गाघा ऐक." (1 – 9)

देवगुरूंनी इंद्राला सांगितलेल्या सात गाथांपैकी चार गाथा विष्णुदत्ताच्या चरित्रावर आधारित आहेत. चौथ्या गाथेत विष्णुदत्तावर झालेल्या दत्तकृपेचे वर्मन आहे. त्यानंतर त्याच्याच चरित्रातील तीन घटनांचे वर्णन पुढील तीन गाथांत आले आहे. शास्त्रांचे ईश्वरपर्यवासित्व हे मुख्य सूत्र कायम ठेवून विष्णुदत्त या महान दत्तभक्ताचे चरित्र यांतून आले आहे. साहजिकच प्रस्तुत अध्यायाच्या आरंभी या दत्तभक्ताचे मोठेपण वाणले आहे. मीमांसाशास्त्राचा जाणकार तर तो होताच. पण त्याला दत्तभक्तीची जोड मिळाल्यानेच त्याच्यावर भगवंताची कृपा झाली. त्यातही त्याला पूर्वजन्मी दत्ताचा भक्त असणाऱ्या ब्रह्मराक्षसाचे मार्गदर्शन लाभले आणि आपल्या भक्तिमान साध्वी पत्नीची मोलाची साथ मिळाली. त्याचा परिपाक म्हणूनच अग्निनारायण आणि सूर्यनारायण यांच्यासह दत्तप्रभूंना श्राद्धप्रसंगी भोजन घालून तृप्त केले. ज्या परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी मानवच काय पण देव, असुर आदि यज्ञादिक करतात त्याला विष्णुदत्ताच्या पत्नीने आपल्या हातानी पाक करून आग्रहपूर्वक यथेच्छ जेवू घातले तिच्या भाग्याचे काय वर्णन करावे? इथे अशाच एका दुसऱ्या प्रसंगाचे श्रीस्वामीमहाराजांनी केले आहे ते थोडक्यात पाहण्यासारखे आहे.

# शिरोळच्या भोजनपात्राची गोष्ट.

श्रीक्षेत्र नरसोबावाडीजवळ कृष्णाकाठी एक शिरोळ नावाचे गांव आहे. तिथे श्रीमन्नृसिंहसरस्वती स्वामींच्या भोजनपात्राचे मंदिर आहे. ते भोजनपात्र म्हणजे एक सपाट दगड आहे. त्याच्यावर श्रीगुरूंच्या हाताची बोटे उमटलेली आजही पहायला मिळतात. ह्या भोजनपात्राचीच कहाणी महाराजांनी कुमारशिक्षा नावाच्या आपल्या छोट्या ग्रंथाच्या शेवटी दिली आहे. ह्या शिरोळ गांवात एक दरिद्री पण आचारनिष्ठ ब्राह्मण आपल्या साध्वी पत्नीसह रहात होता. दोघेही दत्तप्रभूंचे भक्त होते. एकदा माध्याह्नसमयी श्रीगुरु भिक्षेसाठी त्यांच्या घरी आले. त्यावेळी तो ब्राह्मण बाहेर गेला होता. त्यामुळे ती साध्वी अत्यंत नम्रतेने आणि भक्तिभावाने त्याना म्हणाली, " यतिमहाराज! आपण सर्वव्यापी परमात्म्याची चरा मूर्तीच आहां! आपल्याला जेवायला घातल्याने त्रैलोक्याला जेवू घातल्यासारखे होईल.(***विष्णोर्भगवतः साक्षाच्चरा मूर्तिर्यतिः खलु। संभोजनेन भवतां त्रैलोक्यं भोजितं भवेत्।।*** कुमारशिक्षाः७१।।) माझा स्वयंपाक झाला आहे. पण घरचे मालक बाहेर गेले आहेत .ते आल्यावर वैश्वदेव करतील. तोंवर आपण थांबू शकाल तर बरे होईल. तथापि आपल्याला घाई असेल तर वैश्वदेवासाठी अन्न बाजूला काढून भिक्षा घालता येईल." परिस्थिति अशी होती की घरात दुसरे काही काही नसल्याने केवळ ज्वारीच्या कण्याच होत्या. शिवाय श्रीगुरूंना वाढायला घरात पात्रही नव्हते. त्यामुळे ती कोड्यात पडली होती. यजमान आल्यावर कांही तरी मार्ग काढता येईल या आशेने तिने श्रीगुरूंना थांबायची विनंति केली. त्यावर श्रीगुरु म्हणाले, "तुझा कसा का होईना स्वयंपाक तयार आहे ना? आम्हां संन्याशांना रुचीचे कांही महत्त्व नाही. भूकेला कोंडा चालतो. तेव्हा जसे असेल तसे अन्न लवकर वाढ!" तेव्हा ती साध्वी म्हणाली, "जेवायला कण्याच आहेत; पण वाढायला ताट नाही. मी पत्रावळीसाठी पाने आणते." त्यावर तिला थांबायला सांगून श्रीगुरूंनी जवळच पडलेली एक मोठीशी शिला आणली. ब्राह्मणीला घरात एक चौकोनी मंडल करायला सांगून त्यावर ती शिला


[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

ठेवली. पाण्याने स्वच्छ धुवून त्या शिळेवर एक ॐकारयुक्त अष्टदल कमळ काढले आणि त्या ब्राह्मणीला म्हणाले, “या पवित्र पात्रात भिक्षा वाढ.” तेव्हां त्या सतीने त्या शिळेवरच कण्या घातल्या. यतिरूपाने आलेल्या दत्तप्रभूंनी त्या कण्या खायला सुरुवात केली. ती ब्राह्मणीसुद्धा लोखंडाच्या पळीने, यज्ञाच्या अध्वर्यूने यज्ञात आहुती घालाव्या तशी कण्या घालू लागली. वाढतांना तिने उच्चारलेली वचने हीच यज्ञाच्या मंत्रासारखी झाली. ती म्हणाली, “महाराज! आपण स्वस्थपणे जेवावे. आपल्याला हव्या तेवढ्या कण्या घ्याव्या; नको असतील तर पानात राहू द्याव्या. कुठे आपल्यासारखे महान यति आणि कुठे आम्ही दरिद्री! तरी आमच्या ह्या कण्या आपण कृपा करून गोड करून घ्याव्या. विदुराच्या घरी नाही का आपण कण्या खाल्ल्या? तसाच ह्यांचाही स्वीकार करावा.” पुढे स्वामी महाराज म्हणतात, ‘असा आग्रह करीत ती सती अग्निहोत्र्याप्रमाणे वरचेवर कण्या वाढत गेली. खरोखर अग्निहोत्री ब्राह्मणालाही एवढे पुण्य संपादणे शक्य नाही. त्याला अग्नीच्या मुखाने मोजक्याच आहुती ठराविक काळीच टाकता येतात. त्या भाग्यवंत साध्वीने मात्र तो कण्याचा हवि साक्षात भगवंताच्याच मुखात त्यानी पुरे पुरे म्हणेपर्यंत पोटभर वाढला.(*यद्याहिताग्निः प्रमितां यवागूः ददाति तर्ह्यग्निमुखेभ्य एव। साक्षान्न विष्णोर्वदने त्वियं तु साक्षात्प्रकामं परमाय चादात्।।***कुमारशिक्षाः९४।।**)’ अशा रीतीने तृप्त झालेले श्रीगुरु तिथून निघून गेले. त्यानंतर गृहस्वामी परतला. त्याने झालेली हकीकत पत्नीकडून

ऐकली, देवाची बोटे उमटलेले पात्र पाहिले आणि तो स्वतःच्या भाग्यहीनतेला कोसूं लागला. “कांहीच अनुष्ठान नसतांना, वेदांच्या अध्ययनाचा अधिकारही नसतांना, केवळ भक्तीच्या प्रभावाने हिने ईश्वराला तृप्त केले. अशा स्त्रीच्या संयोगाने मी धन्य झालो.” पुढे त्या भोजनपात्राची नित्य पूजा करून तो ब्राह्मणही कृतकृत्य झाला.

विष्णुदत्तालासुद्धा अशीच भक्तिमान पत्नी लाभली होती. त्यामुळेच तो दत्तकृपेला पात्र झाला. त्यांच्या कृपेने आणि त्यानी दिलेल्या विद्यांच्या योगे त्याने अनेक लोकांना पीडामुक्त केले, त्यांच्या कामना पूर्ण केल्या आणि त्यांना दत्तभक्तीच्या मार्गावर प्रवृत्त केले. अमानवी शक्तींवरसुद्धा त्याचा प्रभाव चालत असे.

## कर्मविपाक.

गोदावरी नदीच्या काठी हरिशर्मा नांवाचा एक ब्राह्मण होता. त्याला एक मलगा झाला. त्या मुलाच्या लहानपणीच त्याच्या आईवडिलांना मृत्यु आला. तो धनवान असल्याने त्याचे लग्न झाले खरे; पण त्याचे आरोग्य काही ठीक नव्हते. त्यामुळे तो सदैव दुःखीकष्टी आणि बेचैन असायचा. जन्मतःच त्याच्या पोटात गांठी (गुळंब) होत्या. तेराव्या वर्षी त्याला क्षयरोग झाला. त्याला अठरा वर्षे होतात तोंच जलोदर झाला. त्याचे सर्व शरीर फिके पडले. एकोणास वर्षाच्या वयाला त्याला अतिसाराचाही त्रास सुरू झाला. त्याचबरोबर त्याला श्वासाचा (दम्याचा) त्रास आणि खोकलाही सुरू झाला. त्यांतच त्याला भगंदर झाला. शेवटी कफ, वात आणि पित्त यांचा प्रकोप झाला. पत्नीने सर्व औषधोपचार केले, त्याच्यासाठी मृत्युंजय मंत्राचा जप आणि हवन केले, ग्रहांची शांति केली आणि देवतांचे पूजनही केले; पण या सर्वांचा कांहीही उपयोग झाला नाही. त्याची सोळा वर्षांची पत्नी विष्णुदत्ताची कीर्ति ऐकून त्याच्याकडे आली आणि त्याचे पाय धरून आपल्या सौभाग्याचे रक्षण करण्याची विनवणी केली. “माझा नवरा वीस वर्षांचा आहे. जन्मतःच त्याच्या पोटात गांठी आहेत. आठ वर्षांपासून राजयक्ष्मा, तीन वर्षांपासून जलोदर, एक वर्षाचा सतत ज्वर, सहा महिन्यापासून अतिसार, चार महिन्यापासून भगंदर आणि आतां संनिपात झाला आहे. नाना उपाय मी केले, करविले; पण त्यांना बरे कांही वाटत नाही. आपण थोर दत्तभक्त आहांत, मला सौभाग्याचे दान द्यावे.”

अशी तिची विनवणी ऐकून विष्णुदत्त तिच्या घरी आले. तिच्या नवऱ्याची तपासणी केली आणि तिला सांगितले की “सगळे रोग हे पूर्वजन्मी केलेल्या पापानेच उद्भवतात. त्या पापांच्या शमनासाठी प्रायश्चित्त केले असता त्या पापांची शांति होते असेच ऋषिमुनींनी कर्मविपाकात सांगितले आहे. तुझ्या पतीला जो क्षय झाला आहे त्याचे कारण त्याच्या हातून पूर्वजन्मी ब्रह्महत्या घडली आहे. त्याला शास्त्राने बारा वर्षांचे प्रायश्चित्त करायला सांगितले आहे. त्याला झालेला गुळंब देवद्रोहामुळे झाला असून त्याची शांति सहा वर्षांच्या प्रायश्चिताने होईल. त्याचप्रमाणे जलोदराला बारा वर्षांचे तसेच जीर्णज्वर, भगंदर आणि अतिसार यांना प्रत्येकी एक एक वर्षाचे प्रायश्चित्त तुला करावे लागेल.“ अशा रीतीने विष्णुदत्ताने एकामगून एक प्रायश्चित्ते त्या ब्राह्मणस्त्रीकडून करून घेतली. ते ते प्रायश्चित्त घेतले की तो तो रोग निघून जाई. असे सर्व रोगांचे शमन झाल्यावर विष्णुदत्ताने त्रिदोषांच्या प्रकोपावर शक्तिवर्धक औषध करून दिले आणि तो ब्राह्मण उठून बसला. तेव्हा विष्णुदत्ताने त्याच्या हृदयाला स्पर्श करून विशिष्ट मंत्रांचा उच्चार केला आणि दत्तप्रभूंचे स्मरण करून त्याला आशीर्वाद दिला. त्यायोगे त्या ब्राह्मणाला आरोग्य, आयुष्य, संतति, ऐश्वर्य, दिव्यगति, वीर्य आणि औदार्य यांची प्राप्ति झाली. दत्तचरणी दृढ भक्ति लाभून, त्याचे चित्त शुद्ध झाले आणि तो उत्तम मुक्तीचा अधिकारी झाला. असे हे मंत्राचे सामर्थ्य आहे. आपल्या सौभाग्याच्या दानातून उतराई होण्यासाठी त्याच्या पत्नीने विष्णुदत्ताला हवे तेवढे द्रव्य देऊं केले. पण विष्णुदत्ताने त्याचा स्वीकार केला नाही. (10 – 28)

ऋषि ह्या शब्दाचा अर्थ द्रष्टा आहे. भारतीय ऋषीमुनीना सामान्य मानवांपेक्षा अधिक असे पाहण्याचे सामर्थ्य होते. त्यांनी आपल्या ह्या अतींद्रिय शक्तीने मिळवलेले ज्ञान विविध शास्त्रांच्या माध्यमातून ग्रथित केलेल आहे. कर्मविपाक हे असेच शास्त्र आहे. मानवी जीवन हे सुखदुःखांची ‘अलक्ष्य भेसळ’ आहे. हे असे का आहे. मानवी जीवनात घडणाऱ्या घटना केवळ

अपघात आहेत की त्यामागे कांही कारणमीमांसा आहे याचा शोध साहजिकच अनेक शास्त्रज्ञांनी घेतला आहे. भारतीय परंपरेतील प्राचीन आणि अर्वाचीन शास्त्रज्ञांच्या असा निष्कर्ष आहे की कुठलेच कार्य हे कारणाशिवाय घडत नाही. मानवी जीवनात येणारी सुदुःखेही याला अपवाद माहीत. हाच कर्मसिद्धांत होय. माणूस जी सुखदुःखे या जन्मात भोगतो ती त्याने पूर्वजन्मी स्वतःच केलेल्या चांगल्या-वाईट कर्माची फळे असतात. ज्या पांचभौतिक देहाने कर्म केले तो तर मृत्यूनंतर नष्टच होतो. तेव्हाच ती कर्मेही त्याच्याबरोबरच जातील असे कुणी म्हणेल तर ते बरोबर नाही. तो स्थूल देह नाहीसा झाला तरी त्यांत राहणारा जीव पुन्हा जन्म घेतोच. गीतेत (2:27) सांगितल्याप्रमाणे जो जन्म घेतो त्याचे मरण निश्चितच आहे; तसेच जो मरतो त्याचा जन्मही तितकाच अटळ आहे. त्या जीवाला आत्मज्ञान होईपर्यंत हा क्रम चालतच राहतो. त्या जीवाच्या कर्मांनुसार त्याला चांगली वाईट फळे देणारा ईश्वर आहे.

कोणत्या कर्माचे काय फळ मिळते याचे शास्त्र म्हणजेच कर्मविपाकशास्त्र होय. मनुस्मृतीत असे म्हटले आहे की पूर्वजन्मी केलेली पापे रोगरूपाने या जन्मी त्रास देतात, त्यांची शांति औषध, दान, जप, होम आणि देवांची आराधना या उपायांनी होते. (पूर्वजन्मकृतं पापं व्याधिरूपेण पीडते। तच्छान्तिरौषधैर्दानैर्जपहोमसुरार्चनैः।।). या वचनानुसार त्या ब्राह्मणपुत्राने उपायही केले. पण ते अपुरे ठरले. विष्णुदत्ताने मात्र कर्मविपाकाचे ज्ञान असल्याने त्याने मुळावरच घाव घातला. त्या ब्राह्मणाला कोणता रोग कोणत्या कर्मामुळे झाला ते जाणून त्यानुसार त्याच्या पत्नीकडून आवश्यक ते प्रायश्चित्त करून घेतले.

**प्रायश्चित्त** हे आपण केलेल्या पापाच्या परिमार्जनासाठी केलेले कर्म आहे. आपण जी कर्मे करतो त्याचे मुख्य दोन प्रकार आहेत. **काम्य** आणि विहित. **विहित** कर्मे म्हणजे वर्ण, आश्रम इत्यादीचा विचार करून शास्त्राने सांगितलेली कर्मे. ही न करण्याने **प्रत्यवाय** नावाचा दोष लागतो. काम्य कर्मे म्हणजे आपण आपल्या आवडीने करतो ती कर्मे. त्यांतही कांही कर्मांचा शास्त्राने निषेध केला आहे. ही **निषिद्ध** कर्मे (उदा. चोरी, हिंसा, व्यभिचार इत्यादि) केल्यास दोष म्हणजेच पाप लागते. शास्त्राच्या विरुद्ध नसणारी काम्य कर्मे केल्याने पाप किंवा पुण्य लागत नाही. याशिवाय शास्त्राने आपल्या हातून कळत नकळत घडलेल्या पापकर्मांच्या परिणामापासून बचण्यासाठी जी कर्मे सांगतली आहेत त्यांनाच प्रायश्चित्त म्हणतात. पाप जसे लहान किंवा मोठे असेल त्या प्रमाणात ही प्रायश्चित्ते शास्त्रात दिली आहेत. ब्रह्महत्या, दारू पिणे, सोन्याची चोरी आणि गुरुतल्प (आपला पिता वा गुरु यांच्या स्त्रीशी संग) ही महापापे आहेत. अशा पाप्याचा संसर्ग ठेवणाराही महापापीच आहे. याशिवाय इतर पापांचीही शास्त्राने क्रमवारी केली आहे. त्यानुसार प्रायश्चित्तांची योजना केली आहे. वर सांगिल्याप्रमाणे ब्रह्महत्येने झालेल्या क्षयासाठी बारा वर्षे, विविध दोषांनी झालेल्या गुल्मासाठी सहा वर्षे, देवद्रोहाने उद्भवलेल्या जलोदरासाठी बारा वर्षं, तसेच जीर्णज्वर, भगंदर आणि अतिसार यांच्यासाठी एकेक वर्षे म्हणजे ३३ वर्षांची प्रायश्चित्ते त्या ब्राह्मणस्त्रीकडून करून घेतली.

ह्या प्रायश्चित्तांची वर्णने इथे देणे शक्य नाही. पण चांद्रायण कृच्छ्र नावाचे एक महिन्याचे प्रायश्चित्त श्रीस्वामी महाराजांनी स्वतः केले होते. त्यावरून त्या ब्राह्मणीने केलेल्या ह्या तपश्चर्येचे स्वरूप थोडेफार ध्यानात येईल. चांद्रायण कृच्छ्राचा आरंभ अमावास्येच्या दिवशी पूर्ण उपास करून करावयाचा असतो. शुक्ल प्रतिपदेला फक्त कोंबडीच्या (किंवा मोराच्या) अंड्याएवढा एक घास एक वेळ खायचा. द्वितीयेला दोन घास, तृतीयेला तीन घास अशा प्रमाणात आहार वाढवीत पौर्णिमेला पंधरा घासांचा आहार घ्यायचा. वद्य प्रतिपदेपासून पुन्हा एकेक घास कमी करीत पुढच्या अमावास्येला पुन्हा पूर्ण निराहार! ह्या महिनाभरात त्रिकाल संध्या, देवपूजा, होम इत्यादि नित्य कर्मे चालूंच ठेवायची, भूमीवर शयन, ब्रह्मचर्य इत्यादि कडक नियम पाळावयाचे. अशा परिस्थितीत "मी जर बेशुद्ध पडलो तरीही माझ्या तोंडात कांही औषध, अन्न इत्यादि घालावयाचे नाही," अशी सक्त ताकीद त्यांनी घरी दिली होती. हे कठिण कृच्छ्र श्रीदत्तकृपेने निर्विघ्न पार पडले. अशा प्रकारची नव्वद कृच्छ्रें एका बारा वर्षांच्या प्रायश्चित्तांत त्या ब्राह्मणीद्वारा करून घेतली असा दत्तपुराणाच्या टीकेत उल्लेख आहे. यात त्या स्त्रीचा निर्धार, तितिक्षा, दृढ श्रद्धा, धैर्य इत्यादि गुणांची कल्पना येते.

ह्या प्रदीर्घ आणि खडतर प्रायश्चित्तांनी सर्व व्याधींचा नाश झाल्यावर विष्णुदत्ताने त्या ब्राह्मणाला शक्तिकारक औषधी रस पाजला. त्याचे शरीर सुदृढ झाल्यावर त्याला मंत्रसामर्थ्याने आणि श्रीदत्तकृपेने आयु, वीर्य, औदार्य इत्यादि मानसिक सामर्थ्ये प्राप्त करून दिली आणि मुख्य म्हणजे मानवी जीवनाच्या कृतकृत्यतेसाठी आवश्यक अशा श्रीदत्तभक्तीच्या मार्गाला लावले. हे सर्व कसलीही अपेक्षा न ठेवता, त्या ब्राह्मणीने देऊ केलेले धन न घेतां त्या स्त्रीला आपली मानलेली लेकच केली. तिच्या पातिव्रत्याचा गौरव करून पतिव्रतांची श्रेणी विशद केली.

विष्णुदत्त तिला म्हणाले, "तू तर माझी लेकच आहेस! शिवाय तू केलेल्या पतिसेवेने तू जगाद्वंद्य झाली आहेस. तुम्हा स्त्रियांना पतीशिवाय दुसरा तरणोपाय नाही. पतीशिवाय इतर पुरुषाला स्वप्नातही न पाहणारी तीच उत्तम सती जाणावी. पतीविना अन्य पुरुषांकडे भावासारखे पाहणारी ती मध्यम सती होय. परपुरुषाला पाहून त्याच्याविषयी आकर्षण वाटले तरीही प्रयत्नपूर्वक संयमाने राहणारी ती कनिष्ठ सती समजावी. परपुरुषाशी संग करणारी स्त्री जारिणी होय. ती पुढील जन्मात पुनःपुन्हा वैधव्य भोगावे लागते. अशी जारकर्म करणारी स्त्री तिन्ही कुळांना (आपले पितृकुळ आणि मातृकुळ तसेच पतीचे कुळ) रौरव नरकात घालते आणि स्वतःही दारुण नरकयातना भोगते. यासाठी हे साध्वी, तू आतां घरी जाऊन आपल्या पतीचे मन राख.

स्वप्नातही सद्वर्तनापासून ढळू नकोस म्हणजे तुला अखंड सौभाग्य लाभेल." असा तिला उपदेश करून तो निस्पृह विष्णुदत्त घरी परतला. कर्मविपाकशास्त्राच्या योगाने रोग जाऊन अशी सद्गति प्राप्त होते. (29 -35)

## शास्त्रांचे मार्गदर्शन.

प्रायश्चित्ताने रोगनाश होऊन जसे औषधाने आरोग्य मिळते त्याच त-हेने शास्त्राच्या अभ्यासाने अविद्येचा नाश होतो आणि ब्रह्मरसाने ज्ञान होते. रोग अथवा इतर पीडांचा नाश, कुठल्या करी इच्छेची पूर्ति किंवा स्वर्गादि सुखांचा लाभ असे आमिष जरी शास्त्रे दाखवत असली तरी ती शास्त्राची आपले मन वळविण्याची ती युक्ति आहे हे समजून घ्यावे. एखादा मुलगा प्रमाणाबाहेर गोड खाऊन रुग्ण झाला असेल आणि त्याला कडू निंबाच्या रसाने बरे वाटणार असेल तर त्याची आई जशी त्याच्या गळी निंबाचा रस उरविण्यासाठी त्याला लाडू द्यायचे आश्वासन देते आणि गडूभर रस पिऊन झाल्यावर युक्तीने तो लाडू त्याच्या हातातून काढून घेते तसेच शास्त्राचे आहे. लाडू खाण्याने अपथ्य होऊन मुलाचा विकार वाढेल हे माहीत असल्याने ती मुलाच्या हिताचा विचार करून लाडू लपवते. तिच्या दृष्टीने मुलाचे आरोग्य हेच मुख्य फळ असून लाडू गौण फळासारखे आहे. त्याचप्रमाणे आईसारखीच कनवाळू शास्त्रे संसाररूपी रोगाने ग्रस्त झालेल्या आणि विषयसुखाला लालचावलेल्या मानवाच्या मनाला कामनापूर्तीचे आमिष दाखवून सत्कर्माकडे वळवतात. वास्तविक शास्त्रे वैषयिक सुखासाठी, स्वर्गप्राप्तीसाठी, शत्रुघातासाठी किंवा वशीकरणासाठी नाहीत. शास्त्रे माणसाची बुद्धि शुद्ध करतात आणि युक्तिप्रयुक्तीने त्याच्या भ्रमांचे निरसन करतात. यासंबंधीची सहावी गाथा ऐकण्यासारखी आहे. (36 -43)

पाप आणि तापांचा नाश करणारी प्रायश्चित्तादि शांतिकर्मे तसेच अभीप्सिताची प्राप्ति करवणारी यज्ञादि पुष्टिकर्मे ही सकाम कर्मे आहेत. मोक्षमार्गासाठी निष्काम कर्मयोगाचे महत्त्व सांगितले आहे. मग ह्या सकाम कर्मामुळे माणूस संसारात अधिकच लिप्त होणार नाही का असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. त्याचे उत्तर वरील आठ ओंव्यात श्रीस्वामी महाराजांनी दिले आहे. अनेक जन्मांच्या संवयीने माणूस संसारातली किंवा विषयांतली आसक्ति सोडून एकदम आत्मज्ञानाकडे वळत नाही. म्हणून त्याला शास्त्र सकाम कर्मांचा पर्याय दाखविते. सकाम कर्माचा संकल्प जरी आयुष्य, आरोग्य, ऐश्वर्य इत्यादींच्या अभिवृद्धीसाठी केला जात असला तरी त्या कर्माचा खरा उद्देश माणसाची श्रद्धा जोपासण्याचा आहे. त्या त्या कर्माच्या अनुषंगाने माणूस संयम, शुचिता, निष्ठा, धैर्य यांचा कळत नकळत अभ्यास करत असतो. हाच तो निंबाचा रस! हा अभ्यास करीत करीतच चित्तशुद्धि होत जाते आणि तो क्रमाने भक्तीच्या वाटेला लागतो. भवभ्रमाच्या गुंगीतून त्याला जागवण्याची ही शास्त्राची युक्ति आहे हे श्रीस्वामी महाराजांनी मातेच्या दृष्टांताने छान समजावून सांगितले आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीही म्हटले आहे "***पैं अहितापासूनि काढिती। हित देऊनि वाढविती। नाही श्रुतिपरौति। माउली जगा।***/6:462।।

## झोटिंगाची गोष्ट.

सह्याद्रीच्या उत्तरेला एक ब्राह्मण रहात होता. त्याला एकदा त्याच्या मित्राने आपल्या गांवी बोलावले. आपल्या सुस्वरूप पत्नीला, आपण मित्राच्या बोलावण्यावरून त्याच्याकडे एक महिनाभर रहायला जात असल्याचे सांगून व तिला आरामात घरी रहायला सांगून तो निघाला. त्याच्या पत्नीने त्याला वाटेत खायला करून दिले. ते घेऊन तो गेला. इकडे ती स्त्री स्नानासाठी नदीवर आली. वाटेत एका पिंपळावर एक झोटिंग बसलेला होता. ब्रह्मचारी अवस्थेत कामवासना अतृप्त राहिलेला मुंज्या मेला तर झोटिंग होतो. तो कामलंपट असून त्याची कामवासना कधीच शांत होत नाही. अशा त्या भुताने त्या स्त्रीला पाहिले. भुतांना भूतकाळाचे आणि वर्तमानकाळाचे सर्व ज्ञान स्पष्ट कळत असते. तिचा पति गावाला गेल्याचे जाणून तो तिच्या पतीचे रूप घेऊन तिच्या घरी आला. त्या पतिव्रता स्त्रीला त्या भुताचे कपट कळाले नाही. तिने त्याचे हसतमुखाने समोर जाऊन स्वागत केले; त्याला बसायला दिले; त्याचे पाय धुऊन ते पाणी डोक्यावर घेतले आणि त्याला पंख्याने वारा घतला. त्यानंतर तिने मृदु शब्दांनी त्याचे लगेच परतण्याचे कारण विचारले. "कांही अपशकुन झाला का? की माझ्यावरील प्रेमाने मला विरहदुःख होऊ नये म्हणून आपण परतलां?" असे तिचे प्रश्न ऐकून तो कपटी झोटिंग म्हणाला, "ज्यांना भेटायला मी निघालो होतो ते जवळच वाटेवर भेटले.त्यांनीच मला परत यायला सांगितले. त्यानेच असे म्हटल्यावर मी विचार केला की महिन्याभराने पुनः जाता येईल. तुला विनाकारण विरहाचे दुःख का द्यायचे?" त्याचे बोलण्यावर त्या बिचारीने विश्वास ठेवला आणि सालसपणे ती त्याची सेवा करू लागली. ती याप्रमाणे अनुकूल झाल्यावर त्या झोटिंग पतीप्रमाणे तिच्याशी रोज संग करूं लागला. त्या दुष्ट भुताने वय, अवस्था, रूप, वागणूक, आवाज, रंग, आकार, चाल-चालणूक इत्यादि सर्व गोष्टी हुबेहूब तिच्या पतीसारख्या प्रगट केल्या. त्याची कामवासना शमवता शमवता त्या स्त्रीचे अंगांग चुरडले तरी त्याचा भोग पुरेना. त्याचे शरीर दांडगट बळवान होतेच; पण त्याचा प्रक्षुब्ध कामविकार आणि अफाट भोगशक्तीने ती अबला गांजून गेली. त्याला विरोध करावा तर धर्म बुडतो आणि त्याची इच्छा पुरवली तर सहन होत नाही अशा कात्रीत ती सांपडली. त्याचा तिला संशयही आला; पण हा अनर्थ इतर कुणाला कसा सांगावा? रोजच्या रोज रात्र रात्र त्याची वासना पुरवून ती बापडी रोडावली. असा एक महिना गेल्यावर तिचा गांवाला गेलेला नवरा परत आला. तो दाराशी येऊन पाहतो तर त्याच्यासारखाच दुसरा तिथे बसलेला त्याने पाहिला. साहजिकच त्याला संशय

आला आणि त्याने त्या झोटिंगाला विचारले, “कोण रे तू? माझे रूप घेऊन कपटाने माझ्या घरात येऊन राहिला आहेस?” झोटिंग म्हणाला, “मी तर या घराचा मालक आहे हे सर्व जाणतात. तूच माझे रूप घेतलेला तोतया आहेस!” असे ते एकमेकांना तोतया म्हणत भांडू लागले तेवढ्यात तिथे ग्रामस्थ लोक जमले. त्या दोघांना पाहून ते लोकही भ्रमांत पडले. हुबेहूब सारख्या दिसणाऱ्या “या दोघांत खरा-खोटा कुणी कसा ठरवायचा? ह्यांचे हे कडाक्याचे भांडण कोण सोडवू शकेल?” असा संभ्रम त्या लोकांना पडला. तो (खरा) ब्राह्मण त्या सगळ्यांना म्हणाला, “ह्याला माझ्या घरातून हाकला!” त्यावर तो झोटिंगही तितक्याच आवेशाने म्हणाला, “लोक हो! ह्याला माझ्या दारासमोरून घालवा. माझ्या सुंदर पत्नीवर डोळा ठेवून हा आला आहे. हा जर बळजबरीने घरांत घुसला तर मी याला ठार मारीन!” ह्यावर काय बोलावे, काय करावे ते त्या लोकांना कांहीच सुचेना. त्या ब्राह्मणाचे सासू-सासरे तेवढ्यात तिथे आले. हा प्रकार पाहून त्यानी त्या दोघांना विष्णुदत्ताचे घरी नेण्याचा विचार केला. तो महान दत्तभक्त आहे आणि सर्वज्ञ आहे. तोच खऱ्याखोट्याचा निवाडा करील असे त्यांचे म्हणणे सर्वांनाच पटले. वाद करणाऱ्या दोघांनीही ते मान्य केले आणि त्या स्त्रीला पुढे करून ते विष्णुदत्ताच्या घरी आले. (44 -75)

ह्या गोष्टीत आपल्याला आणखी एका नव्या प्रकारच्या झोटिंग नावाच्या भुताची माहिती झाली आहे. आपल्याकडे याला मुंज्या असे नाव आहे आणि तो पिंपळावर राहतो असेही म्हटले जाते. अतृप्त वासना, ती पुरविण्यासाठी आपल्या अमानुष शक्तीचा उपयोग, कपटीपणा, निर्घृणता इत्यादि सर्वच प्रकारच्या भुतांचे सामान्य गुणधर्म या गोष्टीत दिसून येतात. माणसाची ओळख पटविण्यासाठी केवळ त्याच्यासारखा चेहरा असून भागत नाही तर वय, अवस्था, स्वर, लकबी, चाल, शील इत्यादींतही बेमालूम साम्य असणे आवश्यक आहे. हे माणसाला सर्वसाधारणतः अशक्यप्राय आहे. आजकाल चित्रपटांतून आणि दूरदर्शनाच्या मालिकांतून केवळ शस्त्रक्रियेने चेहरा बदलून कुठल्या तरी पात्राची जागा घेतल्याच्या गोष्टींना ऊत आला आहे. ते किती बालिश आहे ते यावरून कळू शकेल. शस्त्रक्रियेने चेहरा बदलणे कदाचित् भावी काळात शक्य होईलही. पण याशिवायही अनेक अशा गोष्टी आहेत ज्यावरून माणसाचे सोंग सहज उघडे पडू शकेल. असो. त्या भुताने आपल्या अतिमानवी सामर्थ्याने त्या ब्राह्मणाचे सोंग हुबेहूब वठवले होते. पत्नीला संशय आला पण सर्वसाधारण लोकांनाच काय पण त्याच्या सासू-सासऱ्यांनाही त्या दोघांतला फरक कळू शकला नाही.

विष्णुदत्ताने सर्वांचे स्वागत करून त्याना बसविले. त्याने झोटिंगालाही (पाहतांच) ओळखले. त्याने त्या दोघांना त्यांची नावे, गोत्र, कुळ, वय, अवस्था इत्यादी विचारले. तेव्हा दोघांनीही सारखीच उत्तरे दिली. तेव्हा सर्वांना उद्देशून विष्णुदत्त म्हणाले, “आता ह्याचा निवाडा कसा काय करायचा? मी यावर उपाय करतो. क्षमा करा, पण मी जो पुराव्यासह निर्णय करीन तो आपण सर्वांनी मान्य करावा.” यावर सर्व लोकांनी संमति दाखवली. मग विष्णुदत्ताने त्या ब्राह्मणाच्या कपाळावर पांढरी मुद्रा काढली आणि भुताच्या कपाळावर लाल मुद्रा काढली. सर्वांना त्यांनी त्या मुद्रा ध्यानात ठेवायला सांगितल्या. तसेच या मुद्रा मंत्रित असलयाने त्या भुताला पुसतां येणार नाहीत अशी ग्वाही दिली. नंतर त्याने फक्त ब्राह्मणालाच सर्वांसमक्ष बोलावून त्याच्या घरात काय काय भांडीकुंडी, वस्त्र इत्यादि आहेत त्याचा तपशील विचारला. तसेच त्याच्या बायकोच्या गुप्त खुणाही विचारल्या. ब्राह्मणाने बायकोच्या कांही बाह्य खुणा सांगितल्या. पण यापेक्षा गुह्य खुणा तो सभेत सांगायला कचरला. त्याला भांडीकुंडी कांही नक्की सांगता आली नाहीत. जेव्हा भुताची पाळी आली तेव्हा भुताने कोणती भांडी व वस्त्रे किती आहेत ते सर्व बिनचूक तपशीलवार सांगितलेच; पण तो म्हणाला की भांड्यांची वजनेच काय, पाहिजे तर घराच्या विटा किती आहेत तेसुद्धा तो सांगील. भुताने जेव्हा पत्नीच्या बाहेरच्या आणि आंतल्या खुणा सांगितल्या तेव्हा मात्र सभेतील लोकांना त्याचा संशय आला. कुणी कुणी तर म्हणालेसुद्धा, ”हा काही खरा वाटत नाही!” नंतर विष्णुदत्ताने त्या दोघांना सांगितले ह्या गांवाच्या पंचक्रोशीची प्रदक्षिणा करून जो आधी परत येईल त्याला खरे मानले जाईल. “ठीक” म्हणून दोघेही गेले. भूत एका घटकेतच (24 मिनिटे) परत आला आणि म्हणाला, “क्षेत्रप्रदक्षिणा करून मीच पहिल्यांदा आलो.” गांवकऱ्यांनी विचारलेल्या सर्व खाणाखुणा त्याने बरोबर सांगितल्या. तेव्हा ते लोक आपापसात बोलू लागले की, “हे तर माणसाला शक्य नाही. तेव्हा हाच भूत असला पाहिजे!” ब्राह्मणाला यायला दोव प्रहर (सहा तास) लागले. त्यावेळीही त्याला सर्व खुणा सांगतां आल्या नाहीत: पण कांही कांही खुणा त्याने ठीक सांगितल्या त्या लोकांना पटल्या. मग विष्णुदत्ताने आणखी एक परीक्षा घेतली. तो त्या दोघांना म्हणाला, “या गांवाजवळच्या पर्वतावर किती सिद्ध पुरुष राहतात. त्यांची नांव-गोत्रे विचारून पर्वताला प्रदक्षिणा करून जो आधी येऊन आम्हाला भेटेल त्यावरून आम्हाला कोण खरा आहे ते कळेल.” पुन्हा भूत दोन घटकांतच परत आला. त्याने पर्वतावर राहणाऱ्या सर्व सिद्ध पुरुषांची इत्थंभूत माहिती दिली. ब्राह्मणाला यायला मात्र पांच घटका लागल्या. आपल्याला पर्वतावर कुणीच सिद्ध भेटले नाहीत असे त्याने सांगितले. हे ऐकल्यावर सभेतील सर्वच लोकांचा त्या ब्राह्मणावर विश्वास बसला. मग विष्णुदत्ताने आता एक शेवटची परीक्षा राहिली आहे असे सांगितले. त्याने एक लोखंडाची झारी आणवली आणि तिच्या तोंडातून बाहेर जाऊन तोटीतून यावे आणि मग आपली बायको घ्यावी असे सांगून आपल्या शरीराच्या रक्षणासाठी दिग्बंधन केले. तो भूत झारीत शिरतांच त्याने मंत्राने झारीची दोन्ही तोंडे बंद केली. अशा रीतीने त्या भुताचा झारीतून बाहेर पडण्याचा मार्ग रुद्ध झाला. ती झारी एकदम जड झाली. ती पर्वतावर दूर ठिकाणी पुरून टाकली. ते पाहून सर्वांना आनंद झाला. त्यावर विष्णुदत्त सर्वांना

म्हणाले, "तुम्ही सर्व आलां त्याच वेळी मी त्या भुताला ओळखले होते. पण त्याच वेळी त्याचे बंधन केले असते तर लोकांनी मलाच दोष दिला असता. म्हणून हा सर्व खटाटोप करावा लागला. सगळ्यांचा संशय फिटला, झोटिंग बांधला गेला आणि ती बापडी ब्राह्मणी सुटली! शास्त्रानुसार कर्मे करून अज्ञानाचा निरास होतो आणि संशय दूर होतात आणि आत्म्याची ओळख पटते. तसेच या प्रयत्नाने प्रथम भुताच्या सत्यतेविषयी संशय निर्माण झाला. दुसऱ्या वेळी त्या ब्राह्मणाच्या सत्यतेविषयी संशय राहिला नाही. आणि तिसऱ्या वेळी खऱ्याखोट्याचा निश्चय झाला. आता कुणाला कांही बोल ठेवायला वाव राहिला नाही. भूतही सुटणार नाही आणि त्या साध्वीलाही दोष लागणार नाही." हे त्याचे बोलणे ऐकून लोक त्याला धन्योद्गार देत निघून गेले. तो ब्राह्मण आपल्या पत्नीसहित विष्णुदत्ताला नमस्कार करून म्हणाला, "आपण झोटिंगाचे बंधन करून माझ्यावरचे मोठे संकट दूर केले. माझे घर मला परत मिळवून देऊन मोठीच कीर्ति संपादन केली आहे. तुम्ही समर्थ दत्तभक्त आहां. खरोखर, निःस्वार्थपणे परोपकार करण्यातच आपल्या जीवनाचे सार्थक आहे!" असे बोलत आणि पुनःपुन्हा विष्णुदत्ताला नमस्कार करीत ते दांपत्य घरी गेले. ही गोष्ट सांगून बृहस्पति इंद्राला म्हणतात, ". तंत्रशास्त्राच्या प्रयोगाने जसा भ्रम जाऊन खऱ्याचा निवाडा झाला तसेच शास्त्रांच्या अभ्यासाने संशय जातात आणि ब्रह्मज्ञान होते."

या गोष्टीत विष्णुदत्ताच्या तंत्रशास्त्राच्या ज्ञानाबरोबरच त्याचे प्रसंगावधान, सभेच्या मानसशास्त्राचे ज्ञान, चातुर्य इत्यादि अनेक गुणांचा प्रत्यय येतो. ही गोष्ट श्रीस्वामी महाराजांनी त्यांतील रहस्ये उलगडून दाखवीत सांगितली आहे. त्यावर फार कांही भाष्य करण्याची आवश्यकताच नाही. त्या भुताचे अलौकिक सामर्थ्याचाच पुरावा विष्णुदत्ताने मोठ्या युक्तीने त्याच्याविरुद्ध निःसंदिग्धपणे मांडला. तसेच त्याच्या अधीरतेचा, उतावळेपणाचा आणि फाजील आत्मविश्वासाचा उपयोग करून त्याला झारीत बंद करून टाकले.

खरा ब्राह्मण आणि तोतया भूत यांच्यात झालेला संभ्रम हा जीवदशेत आत्मस्वरूप आणि बाह्य जगत यांच्यात होणाऱ्या संभ्रमासारखाच आहे. पतीचे ग्रामांतराला जाणे म्हणजेच नित्य, शुद्ध, बुद्ध, अविकारी आत्म्याचा विसर पडणे हेच सर्व अनर्थाचे मूळ आहे. त्यामुळेच बाहेरच्या भुताला पतीचा आभास निर्माण करणे शक्य झाले. तद्वतच ईश्वरी मायेने विस्तारलेला जगदाभासाला जीव भुलतो. त्या आभासाला भुललेला जीव त्या ब्राह्मणस्त्रीसारखाच कष्ट भोगतो. पति परतला तरी त्याची ओळख पटण्यासाठी विष्णुदत्तासारख्या गुरूला शरण जावे लागते. तसेच सद्गुरूंच्या कृपेमुळेच शास्त्राध्ययन होऊन प्रथम संसाररूपी झोटिंगाच्या सत्यतेविषयी शंका निर्माण होते. हळूहळू खऱ्या आत्मस्वरूपाची जाणीव होऊ लागते. नंतर आत्मस्वरूपच सत्य आहे असा निश्चयही होतो. पण सद्गुरूंच्या कृपेने जेव्हां संसाराररूपी भुताचे बंधन होते तेव्हांच जीवाचा आत्मरूपी पतीशी संयोग होतो; म्हणजेच आत्मसाक्षात्कार होतो.

हेच श्रीदत्तपुराणातील टीकेत श्रीस्वामी महाराजांनी अधिक स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, पुत्र, स्त्री, घर इत्यादींविषयी ममता जाण्यासाठी प्रत्यक्ष प्रमाणच मानणाऱ्या चार्वाकप्रणीत लौकायत शास्त्राचा 'देह म्हणजेच आत्मा' हा सिद्धांत उपयुक्त ठरतो. हा देहात्मभाव अनुमानप्रमाणावर आधरित बौद्धादिप्रणीत विज्ञानवादाने दूर होतो. हा विज्ञानवाद आत्म्याच्या असंगत्वाचे प्रतिपादन करणाऱ्या सांख्यमताने दूर होतो. शेवटी या मताच्या अनीश्वरवादाचा संभ्रमही अद्वैतप्रतिपादक वेदांतशास्त्राने जाऊन मनुष्य आत्मज्ञानात स्थिरावतो. अशी ही शास्त्रे क्रमाक्रमाने एकेका भ्रमाचा निरास करीत मानवाला अंतिम सत्यापर्यंत नेतात.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा दहावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ११ वा.

**जीवा विविध भ्रमण। कर्मयोगेकरून। गर्भवासनिरूपण। अवस्था लक्षण यथार्थ।।२४।।**
**पुत्र चतुर ज्ञानी असून। जड होई भिऊन। विष्णुदत्त त्या दे आश्वासन। अक्रावे अध्यायीं हे कथा।।२५।।**

## गर्भवास

श्रीदत्तसमर्थ। देवगुरु बृहस्पति इंद्राला सांगतात "जो शास्त्रांच्या अभ्यासाने (मनुष्यजन्मातच प्रपंचाचा) भ्रम घालवीत नाही त्याला मुक्ती मिळत नाही आणि तो (पुन्हां) गर्भवास घडतो. भूलोकांत येऊन पर्जन्यद्वारा तो अन्नात आणि अन्नातून पित्याच्या शरीरांत येऊन तो तिथे तीन महिने रेत होऊन राहतो. कामाग्नीने तप्त होऊन, स्त्रीच्या ऋतुकाळांत मैथुनाच्या वेळी योनीत प्रवेश करतो. योनीतील रक्तात मिसळून तो गर्भाशयांत राहतो. प्रारब्धाच्या जोराने वारेने वेढलेला तो जीव गर्भाशयांतील कष्टांना तोंड देत न मरतां वाढतो. अस्थि, स्नायु आणि मज्जा हे रेतापासून होतात तर त्वचा, मांस आणि रक्त हे रक्ता(रजा)पासून होतात. ही रेत-रक्ताची उकड, जठराग्नीच्या आगीवर, आईच्या कुशीच्या भांड्यात, मूत्राच्या आधणावर, विष्ठेचा दाथर लावून मोदकासारखी उकडली जाते. अशा ह्या अमंगळ परिसरांत देहाची वाढ होते. शुक्राचे प्रमाण अधिक असेल तर पुरुषदेह निपजतो आणि रक्ताचे प्रमाण अधिक असेल तर स्त्रीदेह निपजतो. रक्त आणि रेत यांची समानता असल्यास नपुंसकता येते. शुक्र वायूने भिन्न झाले तर जुळे होते. रजस्वलेचा विटाळ अत्यंत अमंगळ मानला आहे. त्यांतच बाळाचा जन्म होतो. तो त्याला धुतल्यावर शुद्ध होतो. रक्त आणि रेत यांचे मिश्रण होऊन पांच दिवसांनी बुडबुड्यासारखे होते. सात दिवसांनी पिशवीसारखे होते. पंधरवड्याने तीच फुगून मोठी होते. एका महिन्याने ती कठिण होते. दोन महिन्यांनी डोके निर्माण होते. तिसऱ्या महिन्यात पोट आकाराला येऊन हातपायांचे अंकुर फुटतात. चौथ्या महिन्यात त्वचा दिसूं लागते आणि पांचव्या महिन्यात नखे येतात. सहाव्या महिन्यात मुखादि नऊ छिद्रे फुटतात आणि वायू पायापासून सर्व शरीरात प्राण होऊन राहतो. सातव्या महिन्यात टाळू फोडून जीव (चैतन्य) त्या शरीरांत प्रवेश करतो. मातेने खाल्लेल्या अन्नाचा रस नाळेवाटे गर्भाच्या पोटात जातो; तेच त्याचे पोषण करते. आईचे आणि गर्भाचे अंतःकरण एक झाले की डोहाळे लागतात आणि आईला अजीर्ण आणि उलट्या होऊन ती रोड होते व तिला सुस्ती येते. हा (एक प्रकारचा) नरकवास जीव आपल्या कर्मानेच भोगत असतो. पण तिथेही ईश्वरच त्याचा सांभाळ करतो. याच वेळी स्तन पुष्ट होऊन त्यांची अग्रे काळी होतात. हे (देवाने केलेले) गर्भाच्या अन्नाचे पूर्वनियोजन होय. उजवी कूस मोठी असेल तर पुत्र आणि डावी कूस मोठी असेत कन्या होईल असे समजावे." 1 – 17.

## शुक्ल आणि कृष्ण गति.

छांदोग्य उपनिषदांत (5:7:1) मानवाच्या ऐहिक जीवनाच्या अंती मृत्यूनंतर दोन गतींचे वर्णन आहे. ईश्वरप्रणीत शास्त्रांचे तात्पर्य जाणून सांसारिक विषयांचा त्याग करून श्रद्धा आणि तप यांनी परमेश्वराची भक्ति करतात ते प्रकाश, दिवस, शुक्ल पक्ष, उत्तरायण, वर्ष, सूर्य, चंद्रमा आणि विद्युत् या मार्गाने – म्हणजेच त्या त्या देवतांच्या अधिकारांतील **देवयान** पंथाने ब्रह्मलोकाला जातात. त्यांना परत भूलोकावर जन्म घ्यावा लागत नाही. याउलट केवळ यज्ञादि वैदिक कर्मांचे अनुष्ठान (इष्ट) आणि लोकोपयोगी (पूर्त) कर्मे करणारा धूम्र, रात्र, दक्षिणायन या मार्गाने (त्या देवतांच्या अधिकारातील **पितृयान** पंथाने) पितृलोकाला जातात. आपल्या कर्मांची फळे भोगून ते चंद्रलोकाला येतात. श्रीमद्भगवद्गीतेतही (8:23 – 26) या **शुक्ल** (दोवयान) आणि **कृष्ण** (पितृयान) गतींचे वर्णन आहे. याशिवाय उपासना किंवा इष्टपूर्तादि कर्मे न करतां पापाचरण करणारे मात्र तिसऱ्या मार्गाने म्हणजे यमपंथाने जातात आणि नरकांत आणि तिर्यक् (मानवेतर पशुपक्ष्यादि) योनीत फिरून परत मनुष्यजन्माला येतात. मानव जन्माला येतांना पहिला टप्पा चंद्रलोकाचा असतो हे आपण वर पाहिलेच आहे.

## गर्भधारणा आणि गर्भसंवर्धन.

चंद्रलोकापासून पुढील पर्जन्य, वनस्पती, पुरुषाचे रेत आणि स्त्रीचे रज हा क्रम वर सांगितला आहे. ह्या क्रमाला पंचाग्निक्रम असे नाव आहे. सूर्याच्या अग्नीत श्रद्धेचा हवि अर्पण करून सोमाची उत्पत्ति होते. वरुणाच्या अग्नीत सोमाचा हवि अर्पण करून पर्जन्याची उत्पत्ति होते. पृथ्वीच्या अग्नीत पर्जन्याचा हवि अर्पण करून अन्नाची उत्पत्ति होते. पुरुषाच्या अग्नीत अन्नाची आहुति घालून रेताची उत्पत्ति होते. आणि स्त्रीरूपी अग्नीत रेताची आहुति टाकल्याने गर्भाची उत्पत्ति होते. गर्भधारणा आणि गर्भसंवर्धनाचे संक्षिप्त वर्णन बऱ्याच प्रमाणात आधुनिक गर्भवृद्धिशास्त्राशी जुळते. खालील कांही चित्रांतून हे स्पष्ट होईल.

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

पांचवा दिवस



सात दिवस (बुडबुडा)




तेरावा दिवस पिशवी




एक महिना




दोन महिने



तीन महिने



अशा प्रकारे ऩऊ महिने झाले की गर्भाला पूर्णत्व येते. आणि आपल्या पूर्वकर्माच्या स्मरण करीत तो गर्भवासाने त्रासलेला जीव देवाची प्रार्थना करूं लागतो. सातव्या महिन्यापासूनच (चेन झाल्यावर) तो हालचाल करणारा अधोमुख संत्रस्त गर्भ देवाला वारंवार नमस्कार करीत बोलूं लागतो. “भगवंता, मीच पूर्वी केलेल्या गहन कर्माचे हे भयंकर फळ तू मला भोगवीत आहेस! पण ही शिक्षा आतां पुरे झाली! ह्या दुर्गंधीला मी उबगलो आहे आणि जठराग्नीच्या दाहाने भाजला जात ह्या नरकात लोळून मी थकलो आहे. मला येथून सोडव. माझ्या कर्मानुसार विविध योनीत फिरून मी इथे आलो आहे. हा गर्भवास मला नरकाहून अधिक क्लेशकारक वाटतो आहे. आतां इथून मला (लवकर) सोडव. यापुढे मी पाप करणार नाही. तुझे भजन करीन आणि कधीही तुला विसरणार नाही.” अशी स्तुति करीतच दहावा महिना आला की सूतिवायूच्या लहरी (प्रसूतीच्या कळा) उठू

लागतात आणि तो बाळ योनिद्वारे एखाद्या किड्यासारखा बाहेर पडतो. जन्म झाल्याबरोबर बाहेरची हवा लागली की (देवाला दिलेल्या शब्दाची) ती स्मृति जाते. सोऽहं सूत्राचा विसर पडून तो कोऽहं, कोऽहं असे रडूं लागतो. 18 -25.

गर्भात प्रवेश केल्यावर जीवाला प्रारंभी आपल्या पूर्वजन्माचे स्मरण असते हा मुद्दा इथे लक्षात घेण्यासारखा आहे. आईच्या पोटांतून बाहेर आल्याबरोबर त्याचे ते स्मरण जाते असे वर सांगितले आहे. आपल्याकडे असेही मानले जाते की जन्मानंतरच्या पहिल्या कांही महिन्यात बाळाला आपल्या पूर्वजन्मीच्या घटनांचे स्मरण होते. त्या सुखद अथवा दुःखद आठवणीमुळेच अर्भक झोपेत हसते किंवा रडते अशी समजूत आहे. बोलता येईपर्यंत बहुतेक सगळ्यांच्याच पूर्वजन्मीच्या स्मृती लोपतात हे नक्कीच. पण मोठ्या वयांतही क्वचित कांही व्यक्तींच्या पूर्वजन्मीच्या आठवणी कायम राहतात. अशी उदाहरणे भारतांतच नव्हे तर पाश्चात्य देशांतही नोंदविली गेली आहे. हा एक मोठाच विषय आहे. इथे त्याचा विस्तार करण्याची आवश्यकता नाही.

## संसारी जीवनाचा आलेख.

पराधीन अर्भकावस्थेत त्याला बोलतांही येत नाही. त्यामुळे त्याचे मनोगत कुणालाच कळत नाही. खाणेपिणे, झोप इत्यादीच्या योजना सर्व ह्याच्या मनाच्या विपरीत होत असतात. पुढे बाळपण खेळण्यात जाते. मग तारुण्य विषयभोगांत जाते. त्या वेळी धर्म काय अधर्म काय याची आठवण कुठून होणार? संतांचे पाय धरण्याचे कसे सुचणार? पत्नीचे सांगणेच त्याला प्रमाण होते. आईच वैरीण भासूं लागते. शास्त्रपुराणाचे नांव काढले तरी कपाळावर आंठ्या येतात. असे हे तारुण्य बघता बघतां मोगरीच्या फुलासारखे कोमेजून जाते. मनांत विषयांचा खेळ मांडलेला असतांनाच यौवनाचा जोम ओसरून जातो. ईश्वरभजनाविषयी आस्था दाखवली नाही. त्याचे फळ म्हणूनच जणूं काळ जरेला (म्हातारपण) पाठवतो. ती हळूंच कानाजवळ (पांढऱ्या केसांच्या रूपाने) येऊन जे (देवाची भक्ति करायला) सांगते त्याला हा हलणाऱ्या मानेने नकार देतो. मग ती जरा (वार्धक्य) त्याचे दांत पाडते, कान आणि डोळे आंत खेचून घेते. मग तसले ते कुरूप ध्यान पाहून पोरेसोरे त्याची टर उडवतात. त्या अपमानाने त्याला राग येतो. आतां तो 'राम राम' म्हणू लागला तो लाम लाम (दूरच) होऊं लागतो. आपल्या नित्य समीप असणारा, तो बिनपैशांचा निष्काम राम त्याला दुरावतो ! पुन्हा काळाच्या अटळ चक्रांत सांपडून तो मृत्यु पावतो. पुन्हा पूर्वीप्रमाणेच फिरत राहतो. मनांत असलेला (मी ब्रह्म नसून जीव आहे) हा भ्रम जोंवर फिटत नाही तोंवर या दुष्ट चक्रांतून सुटका नाही. 26 -33.

संसारचक्राची विवश परिवर्तनशीलता आणि ईश्वरपराङ्मुख मानवी जीवनाची शोकांतिका थोड्या नर्मविनोदाच्या माध्यामांतून प्रभावीपणे दर्शविली आहे. आपल्या आयुष्याकडे आपण खरोखर त्रयस्थपणे पाहिले तर आपल्याही लक्षात येऊं शकेल की आपणही ह्याच चक्रात अगतिकपणे फिरत आहोत. दिवसानुदिवस, वर्षानुवर्षे आपण एखाद्या घाण्याला जुंपलेल्या बैलासारखे प्रपंचाचा गाडा ओढीत राहतो आणि मग एके दिवशी इथून जाण्याची वेळ येते. आपण इथे जे कमावले त्यातले कितीसे आपल्या बरोबर नेतां येण्यासारखे आहे ह्याचा विचार आपल्याला करायला लावण्यासाठी हे विदारक चित्र उभे केले आहे. नैराश्यासाठी नाही. असे घडलेच पाहिजे असे नाही. आपल्याला वेगळा पर्याय उपलब्ध आहे. सद्यःस्थितीचा उबग आला आणि शास्त्रावर विश्वास बसला तरच हे बदलावेसे वाटते.

पूर्व कर्मानुसार घडलेली जी प्रकृति आहे तिच्यामुळे तीच तीच चुकीची कर्मे जीवाच्या हातून घडत असतात. प्रकृति शास्त्राच्या अनुशीलनाशिवाय पालटत नाही. तेवढ्यासाठी शास्त्राच्या या उपायाचा आदराने अवलंब करावा. शास्त्राने भ्रमाचा निरास होऊन ज्ञान मिळाले तरी तो बोध (अंतःकरणात) स्थिरावत नाही तोंपर्यंत संसाराची भीषण भीती वाटतच राहते. 34 -36

कठ उपनिषदात असे म्हटले आहे की ब्रह्मदेवाने इंद्रिये स्वभावतःच बहिर्मुख केली आहेत. त्यामुळे ती बाहेरचे जगच पाहतात, अनुभवतात. आपल्या अंतरातला आत्मा ते पाहूं शकत नाहीत. साहजिकच संसारी माणूस सगळे आयुष्य इंद्रियजन्य सुखाभासाला भुलून त्यांच्यामागेच धांवत राहतो. पण त्या भोगांपासून मिळणारे सुख क्षणभंगुर आणि फसवे असते. त्यांच्या सेवनाने तृप्तीचा अनुभव न येता तृष्णाच वाढत जाते. खऱ्या सुखाचा शोध घेण्यासाठी मन विषयांपासून काढून आंत वळविणे आवश्यक आहे. पूर्वकर्माच्या परिपाकाने घडलेल्या स्वभावात जर ही अंतर्मुखता नसेल तर माणूस पुनःपुन्हा त्याच चुका करीत इंद्रियांच्या भलभुलैय्यात भ्रमत राहतो. ही अंतर्मुखता शास्त्राच्या अभ्यासानेच येऊं शकते. शास्त्राचा अभ्यास करण्याकडेही प्रवृत्ती सहजी होत नाही. नंतर शास्त्रांचा श्रद्धेने अभ्यास झाला पाहिजे. मग त्या शास्त्रातील तत्त्वांचे ज्ञान होते. तसे ज्ञान झाले तरीही ते प्रारब्धाच्या प्रेरणेने गतिशील असलेल्या जीवनप्रवाहात आणि विषयांच्या ओढीने चंचल झालेल्या चित्तांत स्थिर राहत. नाही. जोंपर्यंत हे ज्ञान स्थिर होत नाही तोंपर्यंत मनांत संसाराची भीति वाटतच राहते. हे शास्त्रांपासून मिळालेले ज्ञान कसे स्थिरावेल हे स्पष्ट करण्यासाठीच पुढील सातवी गाथा सांगितली आहे.

# वेड पांघरलेला योगभ्रष्ट.

एवढे बोलून देवगुरु म्हणाले, “हे इंद्रा! याविषयींची सातवी गाथा आतां तुला सांगतो. लक्ष देऊन ऐक. प्रतिष्ठान नगरीत (पैठण) एक ब्राह्मण होता. त्याला मुलगा झाला. तो पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट होता. द्वैताच्या (द्वैतमूल संसाराच्या) भयाने तो खरा शहाणा असूनही वेडा झाला. असंबद्ध बडबड करू लागला. लोकांच्या संपर्काला घाबरून, विषयांना विषासमान लेखून मानपानापासून दूर राहण्यासाठी तो भ्रमिष्टासारखा वागूं लागला. त्याची आई वडिलांना म्हणू लागली ‘हा मुलगा कांही ऐकतच नाही. विष्ठामूत्रांत लोळत असतो.’ वडिलांना वाटले ह्याला नक्कीच भूतबाधा झाली आहे. त्याची बाधा दूर करण्यासाठी त्यांनी विविध व्रते केली, नियम पाळून देवांची पूजा केली, हातांत गंडे बांधले, ब्राह्मणांना दाने दिली, वैद्यांकरवी औषधोपचार केले, तीर्थयात्रा केल्या, जप केले, शांति केली, अंगारे लावले. पण कशाचाही उपयोग झाला नाही. जगालाच चालवणारे महाभूत त्याला लागले होते, ते कसे बांधता येणार? तो मुलगा ‘अहं ब्रह्मास्मि’ असा उच्चार करून स्वतःच पंचाक्षरी झाला. त्याच्यापुढे भगवद्भक्तावांचून इतर बिचाऱ्या मंत्रज्ञाचे काय चालणार? आईवडिलांनी खूप उपचार केले. तरी त्याच्या वागण्यात फरक पडला नाही. मल-मूत्र यांची शुद्ध न ठेवता जमीनीवर लोळणे, उभ्यानेच हगणे-मुतणे, काय खावे काय प्यावे याचे भान नसणे हे चालूंच राहिले. तो काय बोलतो ते कुणालाच कळत नसे. आपले बरे-वाईटही त्याला कळत नसे. अशाच अवस्थेत त्याला आठ वर्षे झाली म्हणून पित्याने त्याची मुंजही लावली आणि कानांत गायत्री मंत्राचा उच्चार केला. पण तो संध्यावंदन करीना. वडिलांचा मार खाऊनही गायत्रीचा जप कांही त्याने केला नाही. कुणाशीही तो मैत्री करीत नसे. ” ३७ – ४८.

भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायात (३७ – ४५) अर्जुनाने भगवान श्रीकृष्णाला सामान्य साधकांच्या जिह्वाळ्याचा एक प्रश्न विचारला आहे. तो म्बणतो, “जो श्रद्धावान आहे पण त्याचे प्रयत्न कमी पडल्याने ज्याचे चित्त योगापासून ढळलेले आहे अशा साधकाला योगाचे फळ (सिद्धी किंवा ज्ञान) मिळणार नाहीच. मग त्याची काय गति होते? तो ऐहिक सुख आणि मोक्ष या दोहोंना गमावून नष्ट होतो का?” ह्या प्रश्नाचे उत्तर देताना श्रीकृष्णानी अर्जुनाला कल्याणाच्या मार्गावर असलेल्या साधकाचे ऐहिक अथवा पारत्रिक अकल्याण कदापि होत नाही असे आश्वासन देऊन योगभ्रष्ट स्वर्गादि पुण्यवंतांच्या लोकांत दीर्घकाल सुखांचा अनुभव घेऊन पवित्र आणि श्रीमंत घरांत किंवा योग्यांच्याच कुळांत जन्म घेतो आणि पूर्वजन्मीच्या साधनाभ्यासाने प्रेरित बुद्धीच्या योगाने पुनश्च योगमार्गाकडे खेचला जातो. अशा रीतीने आपला अभ्यास पूर्ण करून अनेक जन्माच्या साधनाने त्याला परम गति (मोक्ष) प्राप्त होते.

## जडभरत.

योगभ्रष्टाचे भागवत पुराणातील जडभरताचे उदाहरण प्रसिद्ध आहे. महान राजा भरत राज्याचा त्याग करून वनांत जाऊन तपश्चर्या करीत असतां त्याने, सिंहाला भिऊन उडी मारणाऱ्या हरिणीचे नदीमध्ये पडलेले पाडस सांभाळले. त्या पाडसाला वाढवतां वाढवतां त्या भरत राजाचा जीव त्याच्यात इतका गुंतला की अंतकाळी त्याच्याच चिंतनात त्याने प्राण सोडले. त्यामुळे ईश्वरचिंतनापासून त्याचे मन ढळले आणि त्याला पुन्हा हरणाचाच जन्म मिळाला. पण त्या जन्मातही त्याची पूर्वजन्मीची स्मृति जाग्रत राहून त्याने आहारविहारातून मन काढून ईश्वरानुसंधानातच ते लावले. त्या तपश्चर्येने त्याचा पुन्हा ब्राह्मणकुळात जन्म झाला. पण कुणालाही जीव लावला तर ईश्वरप्राप्तीला प्रतिबंधक होतो हे त्याच्या मनांत पक्के बिंबले होते. त्यामुळे अंतरात पूर्ण ज्ञानी असूनही तो बाह्यतः वेड्यासारखा वागत असे. त्यामुळे त्याचे नाव जड (मंदमति) भरत असे पडले.

## हस्तामलक.

दक्षिण भारतांतील संचारांत भ.पू.पा.श्रीमदादिशंकराचार्यांकडे श्रीबली या गांवी प्रभाकरभट्ट नांवाचे एक विद्वान् ब्राह्मण पत्नीसह आपल्या ८ – १० वर्षांच्या मुक्या, बहिऱ्या व मंदमति मुलाला घेऊन आले. तो मुलगा त्यांनी आचार्यांना समर्पण केला. त्या आईवडिलांचे हृद्गत जाणून आचार्यांनी त्या मुलाला विचारले :-

**कस्त्वं शिशो ! कस्य कुतोऽसि गन्ता किं नाम ते त्वं कुत आगतोऽसि।**

**एतं मयोक्तं वद चार्भक त्वं मत्प्रीतये प्रीतिविवर्धनोऽसि।।**

बाळा ! तू कोण, कुणाचा आहेस? कुठून आलास आणि कुठे जाणार? तुझे नांव काय ? लाघवी बाळा, ह्या माझ्या प्रश्नाची उत्तरे माझ्या लोभाखातर दे ! हे आचार्यांचे प्रश्न ऐकून इतके दिवस एक अक्षरही न बोलणाऱ्या त्या बालकाने तात्काळ बारा श्लोकांत त्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्यांचा भावार्थ हाच होता की मी देहेंद्रियांच्या अतीत, इंद्रियांना अगोचर, मनाला अचिंत्य नित्य, शुद्ध-बुद्धस्वरूप एकमेवाद्वितीय आत्मा आहे. आत्म्याचे वर्णन तळहातावरील आंवळ्यासारखे सुस्पष्ट करणारे हे स्तोत्र हस्तामलक स्तोत्र म्हणून प्रसिद्ध आहे. त्यावर भ.पू.पा. आदिशंकराचार्यांनी स्वतः टीका लिहिली आहे. मराठीत संत एकनाथांनी यावर विस्तृत ओंवीबद्ध टीका केली आहे. या गाथेतील ब्राह्मणाच्या मुलाच्या कथेशी या चरित्राचे साम्य लक्षणीय आहे.

प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या शके १८२८च्या वाडींतील मुक्कामांत एक गृहस्थ आपल्या मुलाला घेऊन श्रीमहाराजांकडे आला. ५-६ वर्षांपर्यंत चांगला असलेला हा मुलगा एकदम वेड्यासारखें वागूं लागला. हें त्याचें वेड

घालवावें अशी प्रार्थना त्याच्या पित्यानें महाराजांना केली. महाराजांनीं त्याच्याकडे दृष्टि टाकली तेव्हां त्यानेंहि त्यांच्या नजरेला नजर दिली. १०-१५ **मिनिटे** नुसती दृष्टादृष्टच झाली. त्यानंतर महाराज त्याच्या पित्याला म्हणाले कीं “हें वेड कांहीं बरें होण्यासारखें नाहीं, पण अपायकारकहि नाहीं... उलट कल्याणकारकच ठरेल” तो गृहस्थ गेल्यावर महाराजांनीं खुलासा केला कीं, 'हा मुलगा कोणीतरी पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट पुरुष आहे. यानें लोकांची उपाधि नको म्हणून हें वेड्याचें सोंग मुद्दाम घेतलें आहे. दक्षिणेंत हा एक मोठा सिद्ध पुरुष पहाण्यांत आला'

## विष्णुदत्ताची भेट.

पुढे त्या ब्राह्मणाच्या कानांवर दत्तभक्त विष्णुदत्ताची हकीकत आली. मग आईवडील त्या मुलाला घेऊन विष्णुदत्ताच्या घरी गेले. त्याला नमस्कार करून ते म्हणाले, ‘हा मुलगा जन्मापासून वेड्यासारखा पडलेला असतो. आपण याच्यावर उपाय करून आम्हाल पुत्रदान द्या ! आमचा हा एकुलता एक मुलगा आहे. ह्याला कसली व्याधि आहे की कुणा भूताने पछाडले आहे किंवा इतर कांही बाधा आहे, कांही कळत नाही!’ विष्णुदत्ताने एकदांच त्या मुलाला पाहिले आणि तो ब्रह्मनिष्ठ असल्याचे जाणले. तो त्यांना म्हणाला ‘मुलाला इथे ठेवा आणि तुम्ही चला!’ त्या मुलाचे वडील म्हणाले, ‘अहो इथे तुमच्या यज्ञशाळेत हा घाण करील..’ त्यावर विष्णुदत्ताने त्या दोघांना कांही काळजी न करता घरी जायला सांगितले. ते निरोप घेऊन घरी गेल्यावर विष्णुदत्त त्या मुलाला म्हणाला, “अरे तू असा का घाबरतोस? तुझ्या मनांत कशाचा विचार आहे? तू कुणाचा कोण आहेस? इथे का आलास? ह्या नसत्या खोड्या का दाखवतोस? तुला कोण मोहात टाकील? तू सुखाने आपल्या घरी जा, आईवडिलांना सुख दे! लोकांचा संपर्क टाकू नकोस. या अशी स्वच्छंदी वागण्याने काय फायदा? हे चाळे सोडून दे. तुझे मी आतां करू ते तूच सांग.” असे बोलून विष्णुदत्ताने त्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवला. 48 -57.

साधू होऊनच साधूला ओळखतां येते असे म्हणतात. त्याप्रमाणे त्या ज्ञानी बालकाची ओळख विष्णुदत्ताला पटली. त्याचे वेडे चार तो संसारात लिप्त न होण्यासाठी करतो आहे हेही त्यांनी जाणले. असे असले तरी त्याचे ज्ञान अजून अपरिपक्व असल्यानेच त्याला संसाराचे भय वाटते आहे हेही विष्णुदत्तांच्या ध्यानात आले. त्याला त्यांनी मातापित्यांच्या सुखासाठी आपले उसने वेड टाकण्यास सांगितले.

तो मुलगा हंसून बोलूं लागला. “हे विप्रवर्य! हे आपण मला काय सांगतां? माझे आत्मस्वरूप तूच एकटा जाणतोस. मुळांत माझा जन्म झाला हेच मिथ्या आहे. मग मला आईबाप कसे असतील? मी अक्रिय आहे. माझ्या हातून चाळे कसे घडतील? मी अस्तित्व, चैतन्य आणि आनंदस्वरूप आहे. प्रलयकाळीच्या जळाप्रमाणे मी सर्व विश्व व्यापणारा एकटाच एक आहे. मी कुणाचा मुलगा कसा होऊ? मीच अन्न आहे आणि मीच भोक्ता आहे. मला भोग्यच नाही तर भोगाची रुची कशी असेल? मला सीमित करणारा परिच्छेदच कसा असेल? मी परिच्छिन्न असतो तर तुझा प्रश्न योग्य होता. पण हे सर्वथैव अशक्य आहे! देश, काल, वस्तु या सर्वांनाच व्यापून राहणारा मी असल्याने मला परिच्छेद आहे ना भेद आहे!” 58 – 63

वरूल बोलण्यातून त्या बालकाची स्थिति स्पष्ट होते. त्याने स्थूल आणि सूक्ष्म देहाचा अहंता टाकून दिली होती व तो आपले नित्य, शुद्ध, बुद्ध, सच्चिदानंद आत्मस्वरूप तो अनुभवत होता. त्यामुळे आई, वडील इत्यादि देहाशी संबंधित व्यक्तीविषयी त्याला ममता वाटत नव्हती. पण ही आनंदमय अवस्था प्राप्त होण्याआधीचे सांसारिक क्लेश त्याला आठवत होते आणि त्यांच्या मुळाशी ही अहंता आणि ममताच होत्या हे त्याला पक्के समजले होते. म्हणूनच तो या कोणत्याही संबंधांत अडकायला घाबरत होता. दूध पोळलेल्याने ताकही फुंकून प्यावे तसा तो संसाराचे मिथ्यत्व जाणूनही त्याला घाबरत होता.

## नैष्कर्म्य.

हे ऐकून विष्णुदत्ताने त्याला प्रेमाने आणि आनंदभराने छातीशी लावले आणि म्हणाला, “तू खरोखर धन्य आहेस. देवादिकांनी सत्कारलेला आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोण आहे? तू खरा संन्यासी आहेस. पण हे पहा, कुणीही पुरुष कधीही कर्माविना राहू शकत नाही. प्रकृति आणि स्वभाव यांचे प्रवाह कर्मे करवीतच असतात. तेवढ्यासाठी शास्त्राप्रमाणे आचरण करावे. तेच इतरांनाही शिक्षण होते. त्याने लोक दूषण देतील की भूषण ह्याचा विचार कर. वसिष्ठादिक जे उत्तम ज्ञानी होऊन गेले त्यानी लौकिक कर्मांचा मुळीच त्याग केला नाही. 63 -67

कोणीही मनुष्य क्षणमात्रसुद्धां कर्म न करतां राहू शकत नाही. कारण त्रिगुणात्मक प्रकृति (माया) त्याला बळेच कर्म करायला भाग पाडते. हा भगवद्गीतेचा सिद्धांत आहे. (3:5) “म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा। तंव त्यागु न घडे कर्माचा। ऐसियाही करूं म्हणती तयांचा। आग्रहोचि उरे।। (ज्ञानेश्वरी 3:63)”. याला अपवाद फक्त ज्ञानी महात्म्याचा आहे. पुढे सांगितल्याप्रमाणे ज्ञानाच्या सातव्या भूमिकेनंतर योगी कर्म करून शकत नाही. कर्म आपोआपच गळून पडते. तोंपर्यंत विहित कर्मांचे आचरण केलेच पाहिजे. जो शास्त्राच्या विधानाचा अव्हेर करून स्वच्छंदाने कर्म करतो त्याला न सुख मिळते न मोक्ष ! म्हणून काय करावे व काय करू नये ह्याचा निर्णय शास्त्राच्या आधारेच करावा. असे भगवद्गीतेत (16:23-24) सांगितले आहे. अर्थात् ते कर्म असंगपणे – म्हणजेच निरहंकार बुद्धीने आणि फळाची अपेक्षा न ठेवतां करावे. अशा आचरणाचा लोकांनाही आदर्श होतो. श्रेष्ठ

लोक जसे आचरण करतात तसेच सगळे सामान्य लोक वागतात. (भ.गीता 3:21।।). म्हणूनच वसिष्ठ, जनक इत्यादि नैष्कर्म्य स्थिति लाभूनही उत्तम कर्माचरणाचे आदर्श प्रकट केले. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, "मार्गाधारे वर्तावे। जन हे मोहरे लावावे। अलौकिक नोहावे। लोकांप्रती।।3:271।।" आपले म्हणणे अधिक विशद करण्यासाठी विष्णुदत्तानी पुढे वसिष्ठ मुनींनी वर्णिलेल्या ज्ञानाच्या सात भूमिका त्या मुलाला सांगितल्या आहेत.

## ज्ञानाच्या सात भूमी.

ते प्राचीन मुनी स्वतः आचार करून इतरांना मार्ग दाखवून आपल्या ज्ञानभूमीवर दृढ राहिले. पहिल्या तीन योगभूमी योग्यांचा जाग्रतावस्था आहे. चौथी अवस्था स्वप्नासारखी आहे. ह्या अवस्थेत योगी ब्रह्मज्ञानी म्हणवितो. पांचवी भूमिका हलक्या झोपेसारखी आहे. ह्या अवस्थेतील योग्याला ब्रह्मविद्वर म्हणतात. सहावी भूमिका गाढ झोपेसारखी असून ह्या अवस्थेतील योग्याला जगाचे भान (व्युत्थान) दुसऱ्याने (परतो) करून द्यावे लागते. हा ब्रह्मविद्वरीयान होय. तुर्या नांवाच्या सातव्या भूमिकेतील योगी स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या द्वाराही जगाच्या भानावर येत नाही. ह्या अवस्थेच्या प्राप्तीने ब्रह्मविद्वरिष्ठ ही पदवी लाभते. त्याला विधिनिषेध नसतात. तुला ही गोष्ट ठाऊक नाही म्हणून तू घाबरतो आहेस आणि हे वायां चाळे करतो आहेस. 68 – 74.

ज्ञानाच्या सात भूमिकांचे वर्णन योगवासिष्ठांत (उत्पत्तिप्रकरण सर्ग 118) आले आहे. आपण दुसऱ्या अधअयायात यांचा थोडा विचार केला आहे. शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभावनी आणि तुर्यगा अशी त्यांची नांवे आहेत. मुक्ति म्हणजे सर्व शोकांचा समुळ नाश या सात भूमींच्या पलीकडे आहे. सांसारिक सुखदुःखांच्या रहाटगाडग्याला कंटाळून आपण यांतून सुटण्याचा कांही प्रयत्न केला पाहिजे अशा इच्छेने जेव्हां माणूस सत्संग आणि शास्त्रश्रवणा(वाचना)कडे वळतो तेव्हां पहिल्या **शुभेच्छा** या भूमीचा उदय झाला असे समजावे. शास्त्रांचे आलोडन, संतांचा सहवास आणि वैराग्य यांच्या अभ्यासाने सदाचाराकडे प्रवृत्ती झाली की दुसरी **विचारणा** भूमिका सुरू होते. समर्थ रामदासांच्या म्हटल्याप्रमाणे 'विचारें क्रिया आपुली पालटावी' या वचनानुसार मनुष्य भोगाभिमुख जीवनापासून परावृत्त होऊन ईश्वराभिमुख होऊन उपासनेला लागतो तीच विचारणा भूमिका होय. या पहिल्या दोन भूमिकांच्या अभ्यासाने विषयांकडे वाटणारा ओढा क्षीण (तनू) होतो तेव्हां **तनुमानसा** ह्या तृतीय भूमीचा आरंभ होतो. पहिल्या तीन भूमिकांत साधकाला बाह्य जगाचे पूर्ण भान असते. त्यामुळे ह्यांचा योग्याच्या जाग्रतावस्था असे म्हटले आहे. वरील तीन भूमींच्या अभ्यासाने विषयोपभोगांना मन पुरते विटले आणि आपला त्याच्यावर पूर्ण ताबा आला की सहजच अंतर्मुख होऊन आत्मस्वरूपात स्थिरावूं लागते. हीच **सत्त्वापत्ति** नामक चौथी भूमिका आहे. ही ब्रह्मज्ञानाची पहिली भूमिका आहे. हिच्यात जगाचे भान स्वप्नासारखे असते आणि त्या योग्याला ब्रह्मवित् म्हणतात. या चार भूमींच्या परिपाकाने विषयांचा संग पूर्णतया सुटतो आणि चित्त आत्मस्वरूपांत आरूढ होते. ही **असंसक्ति** नांवाची पांचवी भूमिका हलक्या झोंपेसारखी आहे. ब्रह्मविद्वर म्हणविणारा हा आत्मरत योगी मधूनमधूनच जगाच्या भानावर येतो (स्वतो उत्थान). हळूंहळू या पांच भूमिकांच्या अभ्यासाने योगी आत्मरूपांत इतका निमग्न होतो की जगाचे, बाह्य विषयांचे त्याचे भानच नाहीसे होते. हिलाच **पदार्थाभावनी** असे नांव आहे. ही गाढ झोपेसारखी असून अशा योग्याला भानावर आणायला दुसऱ्याला प्रयत्न करावा लागतो. (परतो व्युत्थान). या सहाव्या भूमिकेवर आरूढ झालेला योगी ब्रह्मविद्वरीयान म्हणवितो. या सहा भूमिकांचा दीर्घकाल अभ्यास केल्यानेच **तुर्यगा** नांवाची भूमिका प्राप्त होते. ह्या सातव्या भूमिकेत प्रवेश झालेला ब्रह्मविद्वरिष्ठ आत्म्याच्या आनंदात पूर्ण बुडून गेलेला असतो. इतरांच्या प्रयत्नांनीसुद्धा तो जगाच्या भानावर येत नाही. ह्यालाच तुर्यातीत आणि विदेहमुक्त अशा संज्ञा आहेत. तो सर्व विधिनिषेधांच्या पलीकडे असतो.

| भूमिका | योगिक अवस्था | पदवी | जगाचे भान |
|---|---|---|---|
| शुभेच्छा | जाग्रत | अज्ञानी | पूर्ण |
| विचारणा | जाग्रत | अज्ञानी | पूर्ण |
| तनुमानसा | जाग्रत | अज्ञानी | पूर्ण |
| सत्त्वापत्ति | स्वप्न | ब्रह्मवित् | स्वप्नवत् |
| असंसक्ति | हलकी झोप | ब्रह्मविद्वर | स्वतो उत्थान |
| पदार्थाभावनी | गाढ झोप | ब्रह्मविद्वरीयान | परतो व्युत्थान |
| तुर्यगा | विदेही | ब्रह्मविद्वरिष्ठ | व्युत्थान नाही. |

## निष्काम कर्मयोग.

जीवन्मुक्त होऊन सुखाने रहा. अनासक्त वृत्तीने निःसंगपणे शास्त्रविहित कर्मे कर. ह्यानेच ज्ञान स्थिर होते, लोकोपकारही होतो आणि अहंभाव शिथिल होतो असे शास्त्राचे प्रमाण आहे. अभिमान हाच बंध आहे, त्याचा संबंध तोडणे हीच आत्मज्ञानाची

गुरुकिल्ली आहे असे विद्वान लोक सांगतात. आत्म्याचे अनुसंधान ठेवले कीं ‘मी’ आणि ‘माझे’ हे आपोआपच दुरावतात. मग मानापमानांच्या विचारांना वावच रहात नाही. ही स्थिती पक्की झाली की मग विषयवासना जागीच होत नाही. निरहंकार मनात वासना नसल्या की विकार येतच नाहीत. असे ज्याचे अंतःकरण स्थिर झाले आहे तोच खरा मुक्त म्हणावा. त्याची दृष्टी जिथे (ज्याच्यावर) पडेल तिथे समाधीचा उदय होतो. अशा रीतीने अहंकार न धरतां कर्मफळाचा त्याग करणारा लौकिक दृष्ट्या अज्ञ आणि बावळा असला तरी तो खात्रीने कर्मबंध तोडतो. तूं तर ज्ञानी आहेस. तुला बंधाची शंकासुद्धा नाही. मग मी सांगितल्याप्रमाणे वागण्याने तुला बद्धता कशी येईल? ज्याचा मनावर ताबा नसतो तोच विषयासक्त होतो आणि विषयांचा भोग न घेतांही त्यांचे आघात सोसत असतो. ज्याचे मन गुरुचरणी जडले आहे, तो विषयांचा उपभोग घेऊनसुद्धा आसक्त न होता अलिप्त असतो. त्याला कशी बद्धता येईल? व्यभिचारी स्त्री जशी घरातली सर्व कार्ये करतांनाही मनांत आपल्या याराचेच चिंतन करत असते. तसा जो आत्मस्वरूपांत रमले आहे तो बाहेरच्या जगाचे सर्व व्यवहार करूनही निःसंगच राहतो. हे बाळा, तूंही तसाच अनासक्त राहून मुक्त रहा. **मोक्ष मोक्ष जो म्हणतात तो न तर स्वर्गांत आहे ना जमिनीवर. तो असतो ज्याने अहंकाराचा नाश केला आहे त्याच्या अंतःकरणात तो असतो.** या अहंकाराला मारणे जाईचे फूल चुरगळण्यापेक्षा सोपे आहे. द्वैतातून स्फुरणारा मी-तूंपणा (आप-पर भाव), त्यापासून होणारा जगताचा भ्रम आणि संकल्प-विकल्पांची गति हे सर्व मनाचे खेळ आहेत. तुझ्यासारख्या ज्ञानी पुरुषाला ह्या स्पर्शूं शकत नाहीत. हा माझा उपदेश मनात धरलास तर हे सांसारिक संबंध तुला बाधणार नाहीत आणि कर्मबंध तुटून जाईल. पण मी तुझ्यावर हा निर्बंध लादत नाही तर क्वचित्काळ आपल्या आईवडिलांच्या प्रेमासाठी असा वाग. माझ्या बोलण्यावर विश्वास ठेव! पुढे ज्ञान हळूहळू पक्के होईल, शांती अंगात मुरेल आणि तू मुक्तीच्या आनंदाने डोलूं लागशील! ” 74 -91

ज्ञानाच्या सात भूमिका समजून देण्यात त्या योगभ्रष्टाला आपली नेमकी स्थिति लक्षांत यावी आणि त्याचा पुढचा साधनमार्ग स्पष्ट व्हावा असा विष्णुदत्ताचा उद्देश होता. त्याचेच अधिक निर्देशन या अठरा ओव्यात केले आहे. ज्याचा आत्मबोध पक्का झाला आहे, मी देह, इंद्रिये, मन, बुद्धी या सर्वांच्या पलीकडला, या सर्वांचा चालक, साक्षी, नित्य आत्मा आहे हे ज्याला कळले आहे, त्याला कर्मे बाधत नाहीत. त्याचे हे आत्मानुसंधानच अहंकाराला आणि ममत्वाला दूर ठेवते. हाच बोध त्याला देऊन त्याची कर्माचरणाविषयींची भीति विष्णुदत्ताने घालविली. हाच भगवद्गीतेत प्रतिपादलेला निष्काम कर्मयोग आहे. ज्ञान झाल्यावरही ते पक्के होईपर्यंत हा आचरला पाहिजे असा विष्णुदत्ताचा उपदेश आहे. निष्काम कर्मयोगाची इथे सांगितलेली लक्षणे नीट ध्यानांत घेणे आवश्यक आहे. आजकाल बहुतेक लोक स्वतःला कर्मयोगी म्हणवून आपण भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञान जगतो असा दावा करतात. पण भगवद्गीतेत नेमके काय सांगितले आहे त्याचा त्यांनी पुरेसा अभ्यास किंवा विचार केलेला नसतो. त्यासाठी पुनरुक्तीचा दोष पत्करूनही कर्मयोगाचे निकष इथे संक्षेपाने पाहूं या.

1. निषिद्ध आणि सकाम कर्मे टाकून केवळ शास्त्राने सांगितलेली विहित कर्मेच करावीत. शास्त्राने निषेध न केलेली सकाम कर्मे केली तरी त्या ठिकाणी संयम पाळावा.
2. मी कर्ता आहे हा अहंकार नसावा. शास्त्रे ही ईश्वराची आज्ञा असून मी त्याचा नियम्य (सेवक) आहे ह्या श्रद्धेने हा अहंकार सहजच क्षीण होतो.
3. ही कर्मे करतांना त्यांच्या फलांची अपेक्षा ठेवूं नये. सर्व कर्मे ईश्वराला समर्पण करावीत. एखादी वस्तू दुसऱ्याला अर्पण केली की मग तिच्या मोबदल्याचा विचारही मनांत आणणे गैर आहे.

वरील तीन निकषांवर आपला कर्मयोग बरोबर उतरला तर आपण योग्य मार्गाने जात आहोत असे मानायला हरकत नाही.

ह्या विष्णुदत्ताच्या बोलण्याचा प्रभाव पडून त्या मुलाने आपले वेडे चार बंद केले आणि त्याच्या घरी जाऊन जेवण केले. त्या सतीच्या हातचे अन्न पोटांत जातांच त्याचा भ्रम नाहीसा झाला. त्याची वृत्ती अशी शांत झालेली पाहून त्याच्या आईबापांनाही समाधान वाटले. ते म्हणू लागले “अहो! जो मुलगा जन्मापासून धड नीट बोललासुद्धां नाही त्याला ह्या ब्राह्मणाने चुटकीसरसा शुद्धीवर आणला! ” ते विष्णुदत्ताला म्हणाले, “आपण आमच्यावर मोठीच दया केलीत! असा काय उपाय आपण केलात की तो एवढ्या चटकन् स्वस्थ झाला! आम्हांला खरोखर आपण जीवदान दिले आहे.” असे बोलून त्यांनी विष्णुदत्ताला साष्टांग नमस्कार घातला आणि त्याचा निरोप घेऊन ते घरी गेले. तो मुलगाही त्यानंतर चांगला वागूं लागला. 92 – 96.

शास्त्राचे मुख्य तात्पर्य हेच आहे की अज्ञानी माणसाला पदोपदी भय असते. हा संसार ब्रह्ममय असूनही त्याला तो मायामय भासतो. आपले खरे स्वरूप विसरून तो स्वतःला कर्ता भोक्ता समजून तो भ्रमिष्ट अज्ञानी वायांच शिणतो. एखाद्या बाईने नथ काढून गळसरीला लावली आणि ते विसरून घरभर हिंडूं लागली. तिला कुणी तरी दाखवल्यावर ती नथ मिळाली असे म्हणू लागली. वास्तविक नथ ना हरवली होती ना सांपडली होती. तसेच अज्ञानी लोकांचे आहे. शास्त्राने आत्म्याचा बोध झाल्यावर आत्मा मिळाला असे म्हणतात. पण तो तर आपलेच अविनाशी नित्य स्वरूप आहे. शास्त्रे छोटी मोठी असतील; पण ती सर्वच बोधपर आहेत. असे गुरु बृहस्पतीचे वचन ऐकून इंद्राने त्यांना नमस्कार केला आणि आपण गुरूंच्या शिक्षणावर

आक्षेप घेतल्याबद्दल त्यांची क्षमा मागून आणि हा आपला अतिक्रम (आगाऊपणा) मनात न ठेवण्याची विनंति करून तो आपल्या घरी गेला. श्रीदत्तप्रभू कार्तवीर्य अर्जुनाला सांगतात, “शास्त्रांचे सार मनात ठेवावे. शास्त्राच्या अभ्यासाने परोक्ष ज्ञान मिळवूनच तू अपरोक्ष ज्ञानाचा अनुभव घेऊं शकशील. शास्त्रात वर्णिलेल्या कर्मांच्या फळांच्या किंवा सिद्धींच्या मागे मनाला धांवू देऊं नये. ती नश्वरच असतात. हंस जसा दूध घेऊन पाणी टाकून देतो तसा शास्त्रांचा अभ्यास करून आपल्या परम कल्याणाचा आशय घ्यावा.” हे दत्तप्रभूंचा सविस्तर उपदेश ऐकून तो कार्तवार्य अर्जुन त्यांना वंदन करून म्हणाला, “या सह्य पर्वतावर येऊन आपल्या जटामंडित मुखकमलाचे दर्शन झाले त्यानेच माझे घर समृद्ध झाले. त्यानेच वैराग्यही आले आणि (आपल्याकडून) शास्त्रतत्त्वसुद्धा समजले. तसेच आतां ज्ञान आणि विज्ञान हेही कळायला हवेत!”

अशा रीतीने सात गाथांमधून सर्व शास्त्रांचे तात्पर्य ईश्वरात आहे आणि सर्व शास्त्रे माणसाच्या आध्यात्मिक विकासाला साह्यभूत आहेत हा सिद्धांत विशद करून शेवटी समारोप केला आहे. शास्त्राचे सार ग्रहण करावे. ईश्वरप्राप्तीव्यतिरिक्त इतर गोष्टींना बाजूला सारावे. अन्यथा त्या त्या शास्त्रांच्या क्षुद्र, नाशिवंत फळांच्या नादी लागून आपण मुख्य मार्गापासून विचलित होऊं शकतो ही धोक्याची सूचनाही श्रीस्वामीमहाराजांनी शेवटी दिली आहे. आपल्या अंतिम कल्याणाच्या ध्येयावर सतत दृष्टी ठेवूनच शास्त्रांचा अभ्यास करावा हा भावार्थ. अर्जुनाच्या प्रश्नातून ज्ञान आणि विज्ञान या पुढील विषयांची सूचना दिली आहे.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा अकरावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय १२ वा.

**सृष्टिक्रम कथन। व्यष्टि समष्टि लक्षण। विक्षेप आवरण। सदाचरण गुरुसेवा।।२६।।**
**त्या क्रमें श्रवण मनन। परोक्षापरोक्षज्ञान। जीवरूप कथन। हें वर्णन बाराव्या अध्यायांत।।२७।।**

श्रीगुरुदत्त. गुरु वेदधर्मा दीपकाला पुढे सांगू लागले, "अर्जुनाची विनंति ऐकून दत्तप्रभू त्याला त्याच्या प्रश्नांची उत्तरे विस्ताराने सांगू लागले." 1

संसारातले हे मोहग्रस्त जीव शास्त्रावर श्रद्धा ठेवीत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर ईश्वराची अवकृपा होते आणि ते जीव संसारचक्रात फिरतच राहतात. खरोखर स्वतः चैतन्यरूप असून, तीनही अवस्थापेक्षा वेगळा असून आणि तसा अनुभव नित्य येत असूनसुद्धा ते जीव स्वतःचे खरे स्वरूप विसरून जातात. 'मी कर्ता, मी दाता', 'मी सुख-दुःखे भोगणारा' इत्यादि मिथ्या कल्पनानी त्याला जगात सर्वत्र भेद दिसू लागतो. खरे तर हा भ्रमच असतो आणि जर तो भ्रम गेला तर मुक्ति कांही दूर नसते. हे म्हणणेदेखील खऱ्या वेदांताच्या जाणकारांना औपचारिकच वाटते. मुळात बंधच नाही तर मग मुक्ति कशापासून मिळवायची? अज्ञ जीवांना कळावे म्हणून शास्त्रे आणि पुराणे तसे सांगतात. 2 – 6

ह्या आणि पुढील अध्यायात कार्तवीर्याला दत्तप्रभूंनी ज्ञानयोग सांगितला आहे. हा त्याचा उपक्रम आहे. ह्या विश्वातील यच्चयावत् सर्व जीव स्वरूपतः ब्रह्मस्वरूप – म्हणजेच सच्चिदानंदरूप आहेत. नित्य, शाश्वत, चेतन आदि सुखमय अशा आपल्या मूळ स्वरूपाला विसरून, देहाशी तादात्म्य पावून मी अमुक नांवाचा, अमुक जातीचा इत्यादि कल्पनानी सुख-दुःखांचे भोक्तृत्व घेऊन बरी-वाईट कर्मे करतो. ह्या भुलीतून सुटण्यासाठी वेद, शास्त्रे आणि पुराणे आईच्या कळवळ्याने उपदेश करीत असतात. पण श्रद्धेच्या अभावी ते जीव त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे ते संसारचक्रात फिरतच राहतात. ह्या भ्रमाचे स्वरूप जाणण्यासाठी तो कसा उत्पन्न झाला (अध्यारोप) आणि त्याचे स्वरूप कसे आहे हे जाणून मग तो दूर करण्याचा (अपवाद) शास्त्राने सांगितलेला उपाय अवलंबिला पाहिजे.

### सृष्टिक्रम.

**ब्रह्म :-** सत्य, ज्ञान आणि अनंत असे ब्रह्म सदोदित एकच आहे. इतर सगळी नावे आणि रूपे त्या ब्रह्मावर भ्रमाने कल्पिलेली आहेत. हे सर्व आपल्याला अनुभूतीला येणारे जग आहे ते सर्व आधी भेदरहित, सत्य, चैतन्य आणि सुखस्वरूप एक ब्रह्मच होते. त्याच्यासारखे दुसरे काहीच नसल्याने **सजातीय भेद** असूच शकत नाही. त्याच्याहून वेगळे अशीही इतर काही वस्तु नाही म्हणून त्याला **विजातीय भेद** नाही. सच्चिदानंदस्वरूप हे ब्रह्म अखंड आणि एकरस असल्याने त्याला **स्वगत भेद**ही नाही. वृक्षाला जसे काही भागात पाने असतात, काही भागात फुले असतात तर काही भागांत फळे असतात तसे ब्रह्माला कांही अंशात सत्य, कांही अंशात, चैतन्य तर कांही अंशात आनंद असे नसते. ते सर्व अंशात सच्चिदानंदस्वरूप असते. अग्नीचा प्रकाश जसा सर्वांशाने लाल आणि ऊष्ण असतो तसे हे आहे. *7 – 11.*

जगाच्या उत्पत्तीच्या क्रमाचा आरंभ ब्रह्मापासून होतो. हे एकमेवाद्वितीय आहे, सर्वव्यापी आहे, अखंडैकरस आहे. मानवी मनाच्या कल्पनेत ते बसू शकत नाही; मग ते वाचेद्वारा शब्दांकित कसे करता येईल. तरीही जिज्ञासू आणि मुमुक्षूंच्यासाठी कृपाळूपणे श्रुतिमाउलीने त्या ब्रह्माचे निरूपण केले आहे. त्यासाठी त्याची व्याख्या तीन प्रकारांनी केली आहे. प्रथम ते कसे आहे ते सांगितले आहे. यांना **विधिवाक्ये** म्हणतात. ब्रह्म सत्यरूप आहे, ज्ञानरूप आहे, आनंदरूप आहे, नित्य आहे, शुद्ध आहे, बुद्ध आहे, अनंत आहे, अशा अर्थाची ही वाक्ये आहेत. दुसऱ्या प्रकारची ब्रह्माची लक्षणे ते कसे नाही हे स्पष्ट करण्यासाठी सांगितली आहेत. ह्या अनुभवाला येणाऱ्या जगापेक्षा ते कसे विलक्षण आहे (अतद्व्यावृत्तिलक्षणे) ते बिंबवण्यासाठी ही लक्षणे आहेत. ब्रह्म निराकार आहे, अरूप आहे, अशब्द आहे, अस्पर्श आहे ह्या **निषेधवाक्यां**नी हे स्पष्ट केले आहे. अखंड, एकरस अशा ब्रह्माच्या कसलाही भेद नाही हे यांपैकीच आहे. भेद तीन प्रकारचे असूं शकतात. उदाहरणार्थ आंब्याचे झाड आणि वडाचे झाड. दोन्ही वृक्षच आहेत: पण त्यांच्या जाती भिन्न आहेत. ह्याला विजातीय भेद असे म्हणतात. ब्रह्मापेक्षा निराळे असे कांहीच नाही. म्हणून ते विजातीय भेदाने रहित आहे. वेगवेगळ्या आंब्याच्या झाडांत लहान, मोठे, गोड, आंबट इत्यादि भेद असतात. ते सजातीय भेद होत. पण ब्रह्मासारखे दुसरे कांहीच नाही म्हणून त्याला असा सजातीय भेदही नाही. एकाच आंब्याच्या झाडाचे बुंधा, पाने, फुले, फळे इत्यादि अवयव असतात. हे स्वगत भेदही ब्रह्म निरवयव असल्याने त्यात नाहीत. सत्य, ज्ञान आणि सुख ही लक्षणे वेगळी सांगितली तरी ब्रह्माची तशी विभागणी मात्र होत नाही. पाणी जसे सर्वांशाने प्रवाही, मधुर आणि शीतल असते तसेच ब्रह्म सर्वांशाने सत्-, चित्- आणि आनंद-स्वरूप असते. हेच मूळ दत्तस्वरूप होय. ब्रह्माच्या परोक्ष ज्ञानासाठी आणखी एका प्रकारची

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

लक्षणे वेदात सांगितली आहेत. त्यांना तटस्थ लक्षणे म्हणतात. भासणाऱ्या सापाचे अधिष्ठान जशी दोरी आहे तसेच ब्रह्म ह्या जगदाभासाचे अधिष्ठान आहे. जगाची उत्पत्ती, स्थिति आणि लय यांचे तेच **आदि कारण** आहे. सर्व जीवाच्या अंतरात साक्षित्वाने तेच चैतन्य स्थित आहे. ही सर्व **तटस्थ लक्षणे** होत.

**माया** :- निर्विकाराला विकार होत नाही यासाठी, सृष्टिक्रम जाणण्यासाठी, मायेचा स्वीकार करावा लागतो. माया ही परमेश्वराचीच निराकार शक्ति असल्याने तिच्यामुळे परमेश्वराला द्वैत येत नाही. शक्ति आणि शक्त हे अभिन्न आहेत हे लोकप्रसिद्धच आहे. त्यामुळे मायेमुळे ब्रह्माला द्वितीयत्व येते असे कसे म्हणता येईल? मातीचे निरीक्षण केले तर ह्या मातीचे पुढे घडे करता येतील असे कुणी ब्रह्माच्या संदर्भात म्हणेल तर त्यासाठी घड्यांचे आकार आणि नांवे मनात येतात. आणि सृष्टीच्या आधी मन किंवा जिह्वा नसल्याने ते गैरलागू ठरेल. ते अद्वितीय एकच ब्रह्म स्वतःच अनेक झाले. त्यामुळेच त्या एका ब्रह्माचे ज्ञान झाल्यावर विश्वातील सगळ्यांचे ज्ञान होते. 12 – 16.

माया म्हणजेच अनादि भ्रम. ही ब्रह्माचीच शक्ति आहे. सापाची नागमोडी गति जशी सापापासून वेगळी करता येत नाही तशी ही ब्रह्माहून वेगळी मानता येत नाही मायेलाच प्रधान, प्रकृति, ब्रह्मयोनी, पराशक्ति, परादेवी, अविद्या अशी नावे आहेत. ही त्रिगुणात्मक म्हणजे तिपदरी आहे. सत्त्व, रज आणि तम हेच तीन गुण किंवा तीन पदर होत. सत्त्व म्हणजे ज्ञानशक्ति, रज म्हणजे क्रियाशक्ति आणि तम म्हणजे द्रव्यशक्ति. मायेचे दोन प्रकार आहेत. शुद्ध सत्त्वगुणात्मक **विद्यामाया** आणि रजतमाने मलिनसत्त्वयुक्त **अविद्या** माया. माया अनादि असली तरी तिचा अंत होऊ शकतो म्हणून सांत आहे. मायेचे कार्य मिथ्या आहे म्हणून तिला सत्यत्व नाही. पण तिचे कार्य प्रत्यक्ष अनुभवाला येत असल्याने तिला असत्यही म्हणता येत नाही. यासाठी तिला अनिर्वचनीय किंवा मिथ्या असे म्हटले आहे. मिथ्या हा वेदांतातील पारिभाषिक शब्द असून ज्याला खरे किंवा खोटे म्हणता येत नाही असा त्याचा अर्थ आहे.

**आरंभवाद :-** कुणी म्हणतात कुंभार माती घेऊन आपल्या हाताने घडा करतो. ह्या ठिकाणी माती हे उपादान कारण आहे आणि कुंभार हे निमित्त कारण आहे. ह्याला आरंभवाद असे म्हणतात. जगाच्या उत्पत्तीच्या बाबतीत मात्र ईश्वर स्वतःच निमित्त आणि उपादान बनून स्वतःचे निर्विकारपण न सोडता सृष्टी करतो. कातीण जशी आपल्याच पोटांतून तंतु काढून जाळे करते, त्यांत राहते आणि काम झाल्यावर ते खाऊनही टाकते. त्याचप्रमाणे ईश्वर जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय यांचे एकमेव कारण आहे. इथे आरंभवाद लागूं पडत नाही. 17 – 19.

**परिणामवाद :-** आंबट पदार्थाच्या योगे दुधाचे दही होते तसे जग निर्माण होते हा परिणामवादही आत्मा निर्विकार असल्याने थिटा पडतो. 20

**विवर्तवाद :-** तेवढ्यासाठी विवर्तवाद सांगितला आहे. जसे शिंपल्यावर चांदीचा, किंवा दोरीवर सापाचा भास व्हावा तसा ब्रह्मावर जगताचा आभास होतो. ह्या ठिकाणी अधिष्ठान (शिंपले, दोरी, ब्रह्म) निर्विकार असते. (ब्रह्म आणि माया), जीव आणि ईश्वर, जगत आणि अविद्या हे सहा प्रकार अनादि मानले आहेत. हेसुद्धा कल्पितच आहेत; कारण मुळात अविद्याच नाही मग हे भेद कुठले? 'मग (अर्जुनाला दत्तप्रभू म्हणतात) तू म्हणशील श्रवणादि श्रम का करायचे?' पण हा भ्रम जरी लटकाच असला तरी ह्याच्यामुळे मोठाच अनर्थ घडतो. त्यासाठी सोन्यातील हीण जसा अग्नीने काढून टाकतात, तसा योगादिक उपायांनी हा भ्रम घालविला पाहिजे. हा भ्रमरूपी मळ योगाने दूर केला की स्वयंप्रकाश ब्रह्म आपोआपच प्रकाशते; मग आभासात्मकच असलेल्या द्वैताचे नांवनिशाणही रहात नाही. गारुडी जादूने पाणी दाखवतो त्याने लोक फसतातही, पण जमीन ओलावेल का? तसाच हा द्वैतरूपी जगदाभास आहे. संसार, त्यांतील सुखे तसेच दुखे, सर्वच आभासातूनच पसरलेले आहेत. हा भ्रम एकदा नाहीसा झाला की मग ना द्वैत उरते आहे ना प्रारब्ध! त्याच्या लेखी कर्माची उठाठेव वायाच आहे. आत्मज्ञानाची वाट धरणे हाच एक ह्या भ्रमाचा निरास करण्याचा उपाय आहे. ज्ञानयोगाची कांस धरणारा पुरुष भ्रमाचा निरास करून आनंदरूप होतो, कृतकृत्य होतो. 21 – 31.

जगाच्या उत्पत्तीसंबंधी सांख्यदर्शनांत मायेला प्रधान असे नांव दिले आहे आणि तेच सृष्टीचे मूळ कारण मानले आहे. हा परिणामवाद. कणादमुनींच्या वैशेषिक दर्शनात अणूंच्या संयोगापासून पासून जगताची उत्पत्ती मानली आहे. हे दोन्ही वेदांताला अमान्य आहेत. वेदांतानुसार जग हे निर्विकार, निष्क्रिय, संकल्परहित अशा ब्रह्मावर होणारा आभास आहे. त्याला सत्यत्वच नाही. त्याचे भ्रामक सत्यत्व हे त्याच्या अधिष्ठानामुळे आहे. जशी दोरी नसती तर सापाचा भ्रम झाला नसता तसेच ब्रह्माविना जग प्रकटत नाही. असा हा मिथ्या भ्रम असला तरी त्याच्यामुळेच प्रपंचरूपी अनर्थ घडतो आहे. स्वप्नांतल्या भयाला जसे जागे होणे हाच उपाय आहे (स्वप्नींचिया भया। ओखद चेवोचि धनंजया।। संत ज्ञानेश्वर) तसेच ह्या जगदाभासाने अनुभवाला येणाऱ्या दुःखपरंपरेला ह्या भ्रमाचे निराकरण हाच उपाय आहे. ह्या अध्यासाला अध्यारोप असे म्हणतात आणि तो दूर करण्याला अपवाद असे म्हणतात. हा अपवाद आत्मज्ञानानेच होतो. ह्या संसाररूपी अनादि दुःखपरंपरेतून सुटण्याचा (मुक्तीचा) हाच एक उपाय आहे. "ज्ञानादेव तु कैवल्यम्"! (श्रीमदाद्यशंकराचार्य).

## समष्टी.

**ईश्वर :-** हे दत्तप्रभूंचे बोलणो ऐकून अर्जुनाने त्यांना नमस्कार केला आणि म्हणाला, "प्रभो, हा योग आणि आत्मज्ञान हे कसे साधतां येतील ते कृपा करून मला सांगा. हे एक असलेले ब्रह्म अनेकरूप कसे झाले? हे दुःख कुठून आले? हा सर्व विवेक मला प्राप्त व्हावा! " यावर दत्तप्रभू सांगू लागले, "अर्जुना, आत्मस्वरूपांत कल्पनेलाच थारा नाही. त्याची नित्यमुक्तता आणि निर्विकार अभंग आहे. (मात्र) तेच ब्रह्म शुद्ध सत्त्वाने युक्त प्रकृतीत (मायेत) प्रतिबिंबित झाले की तोच वेदांमध्ये प्रतिपादलेला ह्या विश्वाचा निर्माता होतो. हाच ईश्वर ब्रह्मदेव, विष्णु आणि रुद्र ही तीन रूपे धारण करून सृष्टीची उत्पत्ती, स्थिति आणि लय करतो. तोच सर्वांच्या अंतरात राहतो आणि तोच भक्तांना तारतो. ह्या शुद्धसत्त्वगुणी प्रकृतीलाच विद्यामाया असे नांव आहे. ह्या ईश्वराची उपाधी असणाऱ्या प्रकृतीने सर्वज्ञता येते. " 31 – 37.

निर्विकार, क्रियारहित, एकच एक असे ब्रह्म आपल्या शक्तीमध्ये समाविष्ट झाले की त्याला ईश्वर ही संज्ञा प्राप्त होते. हाच तजोगुणाने सृष्टीचा जनक(ब्रह्मदेव) होतो, सत्त्वगुणाने विष्णुरूपाने तिचा सांभाळ(स्थिति) करतो आणि तमोगुणाने रुद्ररूपाने प्रलय करतो. हाच काल, धाता, विधाता, नारायण, हृषीकेश, भूत, भव्य, भवत्, हरि, स्वराट् या नांवांनी ओळखला जातो. अर्जुना, तो मीच आहे आणि ह्या सर्व वस्तुमात्रांत व्याप्त आहे आणि सर्वसाक्षी आहे. ह्या मिथ्या भ्रमाची निवृत्ती होण्यासाठी माझेच ध्यान करतात. (दत्तपुराण-4:1:3-5) शुद्धसत्त्वगुणात्मक माया ह्या ईश्वराची उपाधी असल्याने तो सर्वज्ञ आहे. पतंजलीने म्हटल्याने तो क्लेश, कर्म, विपाक आणि आशय ह्यानी अस्पृष्ट आहे आणि तोच जगाच्या सुरुवातीपासून सर्वांचा गुरु आहे. ईश्वर म्हणजेच **समष्टी** होय.

**जगत् :-** ह्या ईश्वराचा स्थूलदेह म्हणजेच हे चौदा भुवनांचे ब्रह्मांड आणि त्यांतील सर्व जीव होत. ह्या विश्वरूप ईश्वरालाच विराट, वैराज, वैश्वानर अशी नांवे आहेत. ह्याच्या तळपायांशी अतल, त्याच्यावर वितल, घोट्यांशी सुतल, जांघांत महातल, गुडघ्यांत तलातल, मांड्यांत रसातल, कमरेशी पाताल, बेंबीजवळ भूलोक, कुशीत भुवर्लोक, हृदयाशी स्वर्ग, गळ्यातं महर्लोक, मुखांत जनलोक, भुंवयांत तपोलोक आणि मस्तकावर सत्यलोक आहेत. त्याचे दांत म्हणजे तारका, माया त्याचे हास्य आहे, दिवस-रात्र त्याचे निमेषोन्मेष (पांपण्याची उघडझांप) आहेत; त्याच्या कटाक्षाने जगाची उत्पत्ती होते; समुद्र त्याची कूस आहे, नद्या त्याच्या नाड्या आहेत; वृक्ष त्याचे रोम आहेत; पर्जन्य हे त्याचे वीर्य आहे आणि पर्वत अस्थि आहेत. दिशा, वायु, वरुण, अश्विनीकुमार, त्याची ज्ञानेंद्रिये (अनुक्रमें कान, त्वचा, डोळे, जिव्हा, आणि नासिका) तर अग्नि, इंद्र, उपेंद्र यम आणि ब्रह्मदेव ह्या देवता कर्मेंद्रियें (वाचा, हात, पाय, गुद आणि लिंग) आहेत. हरि त्याचे अंतःकरण आहे, चंद्र मन आहे, ब्रह्मदेव बुद्धि आहे, रुद्र अहंकार आहे तर नारायण त्याचे चित्त आहे. असा हा समष्टीचा सूक्ष्म देह आहे. अविद्या समष्टीचा कारणदेह आहे आणि माया महाकारण देह आहे. ईश्वर हाच समष्टीचा प्रत्यगात्मा आहे. (दत्तपुराण 2:3:17-23)

## व्यष्टी.

**जीव :-** ह्यापेक्षा वेगळ्या, मलिन सत्त्वाने युक्त प्रकृतीत पडलेली ब्रह्माची प्रतिबिंबे म्हणजेच जीव होत. ते जीव पराधीन असतात. सर्वज्ञ ईश्वर समष्टीचा अभिमानी असतो तर किंचिज्ज्ञ जीव व्यष्टीची अभिमानी असतो. तो प्राज्ञ ईश्वरच सर्व अज्ञ जीवांचा नियंता आहे. 38.

## आवरण आणि विक्षेप

मायेच्या दोन शक्ति आहेत. स्वरूपाला झांकून ठेवणारी आवरण शक्ति ईश्वर आणि मुक्त यांच्याव्यतिरिक्त सर्वांना स्वरूपांचा विसर पाडते आणि ते आपल्याला अज्ञ समजूं लागतात. ह्या अज्ञानाने तो स्वतःला 'मी कर्ता, मी भोक्ता' अशी भ्रांति घेतो आणि नाना योनीत भ्रमण करतो. हे मायेच्या दुसऱ्या शक्तीचे – विक्षेपाचे कार्य आहे. हा विक्षेपच सुख-दुःखाचे, भूतभौतिकाचे आणि ह्या जगद्रूपी कार्याचे स्वरूप घेतो. अंधुक प्रकाशांत समोर पडलेली दोरी पाहून 'हा सर्प आहे,' अशी जी भावना होते तेच आवरण आणि त्यामुळे छातीत भरलेली धडकी आणि अंगाला सुटलेला कंप हेच विक्षेप होत. उजेडात दोरी स्पष्ट दिसली – तिचे ज्ञान झाले की सर्पाची भ्रांति जाते तरी धडकी आणि कंप मात्र थोडा वेळ राहतोच तरी अस्वस्थ करीत नाही. त्याचप्रमाणे एकदा अज्ञानाचे निरसन झाले की केवळ उर्वरित प्रारब्धरूपी विक्षेपाने जीवाला संसारात फिरावे लागत नाही. 39 – 47.

आवरण म्हणजे झांकण. आपले स्वरूप जोपर्यंत आपल्याला दिसत असते तोंपर्यंत ते विसरून दुसऱ्या स्वरूपाची भ्रांति होऊं शकत नाही. त्यामुळे आवरण शक्ति मुख्य आहे. ह्या शक्तीने स्वरूप झांकून टाकले की मग विक्षेप नावाच्या शक्तीने जीवाला लिंगदेह आणि स्थूलदेह यांचे भान होते आणि तो त्यांनाच आपले स्वरूप समजू लागतो. त्या देहांचीच सुखदुःखे त्या जीवाची सुखदुःखे होतात. त्या देहातून प्रत्ययाला येणारे जगच खरे वाटू लागते. अंधारात पडलेली दोरी ही दोरी नसून साप आहे हे आवरण. त्याच्यामुळे होणाऱ्या इतर प्रतिक्रिया हे विक्षेप असे महाराज सांगतात. दिव्याच्या प्रकाशात दोरी दिसली की तिचे ज्ञान होते. एकदा हे ज्ञान झाले की तो साप नाही हे वेगळे सांगावे लागत नाही. हे ज्ञान झाल्यावरही आभासिक सापाच्या भीतीने भरलेले कांपरे, छातीतली धडधड इत्यादि विक्षेप राहिले तरी ते यथाकाळ आपोआप थांबतात. त्याचप्रमाणे एकदा

आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले तरी उरलेले प्रारब्ध राहतेच. पण तो ज्ञानी पुरुष त्या प्रारब्धाने कष्टी होत नाही. हे सर्व मायेचे विक्षेप आहेत हे जाणून तो आपल्या स्वरूपानंदात राहतो. ते शेष प्रारब्ध संपले की तो विदेहकैवल्य पावतोच. अशा रीतीने अज्ञानाचा – मूळ भ्रांतीचा निरास (अपवाद) हेच मुख्य ध्येय आहे.

**लिंगदेह :-** ब्रह्मापासून प्रकृति, प्रकृतीपासून महत् तत्त्व, महत्तत्वापासून अहंकार आणि अहंकारापासून पंच महाभूते उपजतात. पहिले महाभूत आकाश, त्याचा गुण शब्द; त्यापासून वायु, त्याचे गुण शब्द आणि स्पर्श; त्यापासून तेज, त्याचे गुण शब्द, स्पर्श आणि रूप; त्यापासून जल (आप), त्याचे गुण शब्द, स्पर्श, रूप आणि रस; आणि शेवटी ,स्पर्श, रूप, रस आणि गंध या गुणांनी युक्त पृथ्वी अशी ही पांच महाभूते आपापल्या गुणांसहित निर्माण होतात. या भूतांच्या सत्त्वगुणात्मक अंशांनी अनुक्रमे श्रोत्र (कान), त्वचा (कातडी), डोळे, जीभ आणि नासिका ही ज्ञानेंद्रिये निर्माण होतात. या (पांचही) भूतांचे सत्त्वांश एकत्र मिसळून अंतःकरण बनते. ह्याचे वृत्तीच्या भेदाने पांच भाग होतात. निर्विकल्प ते अंतःकरण, संकल्पात्मक ते मन, निश्चय करणारी बुद्धि, अनुसंधान (स्मरण, चिंतन) करणारे चित्त आणि मीपणा असणारा अहंकार हेच अंतःकरणपंचक होय. कुणी कुणी अहंकाराचा समावेश बुद्धीत आणि चित्ताचा समावेश मनात करून मन आणि बुद्धि हे दोनच अंतःकरणाचे घटक मानतात. पंचमहाभूतांच्या रजोगुणापासून वाचा, हात, पाय, लिंग (उपस्थ) आणि गुद ही पांच कर्मेंद्रिये आणि प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान हे पांच प्राण होतात. हे क्रियात्मक आहेत. (अंतःकरणासहित) ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रियें आणि प्राण ह्या तिन्हींचा मिळून लिंगदेह होतो. हाच सर्व ब्रह्मांडात (नाना योनीत) फिरत असतो. ह्यालाच सूक्ष्म देह असेही नांव आहे. ह्या लिंगशरीराचेहि परत तीन कोश आहेत. (1) पांच कर्मेंद्रिये आणि पांच प्राण यांचा प्राणमय कोश, (2) (बहिर्मुख) ज्ञानेंद्रिये आणि अंतःकरण यांचा मनोमय कोश आणि (3) (अंतर्मुख) ज्ञानेंद्रिये आणि बुद्धि यांचा विज्ञानमय कोश. 47 – 60.

पंचमहाभूतांच्या सात्विक आणि राजसिक अंशांपासून लिंगदेहाचे घटक कसे निर्माण होतात ते इथे सांगितले आहे. प्रत्येक महाभूताचा एक एक विशिष्ट गुण (विषय) आहे. पहिले महाभूत आकाश आहे. त्याचा विषय शब्द आहे. आकाशापासून वायूची उत्पत्ती आहे. त्याचा विशेष गुण स्पर्श आहे. पण त्याचबरोबर वायूत आकाशाचा गुण शब्दही असतो. अशा रीतीने उत्तरोत्तर महाभूतांच्या गुणांची संख्या वाढते. पंचमहाभूतांच्या सत्त्वगुणांपासून ज्ञानेंद्रिये आणि अंतःकरणपंचक यांची उत्पत्ती होते. वर समष्टी देहाची इंद्रिये म्हणून ज्या देवता सांगितल्या त्याच व्यष्टीतील इंद्रियांच्या देवता होत. अंतःकरणाचे घटक त्या त्या घटकाच्या कार्यावरून ओळखले जातात. अंतःकरण हे निर्विकल्प म्हणजे वृत्तिशून्य असते. मन संकल्प-विकल्पात्मक असते. हे हवे, ते नको अशा मनाच्या वृत्तींना संकल्प आणि विक्लप अशी नावे आहेत. ह्यालाच आवड-नावड असे म्हणता येईल. बुद्धि विवेक करून निर्णय घेते, निवाडा करते. अहंकार मीपणाच्या वृत्तीला म्हणतात. मन आणि चित्त यांचा मनोमय कोश होतो आणि बुद्धि आणि अहंकार यांचा विज्ञानमय कोश होतो. ज्ञानेंद्रियें बहिर्मुख असतांना त्यांचा समावेश मनोमय कोशात होतो तर ती अंतर्मुख असतील तर त्यांचा समावेश विज्ञानमय कोशांत केला जातो.

**पंचीकरण आणि अन्नमय कोश :-** प्रत्येकमहाभूताचे दोन भाग करून एका अर्ध्या भागाचे पुन्हां चार चार भाग करायचे. असे चार भूतांचे एकेक भाग (अष्टमांश) पांचव्या भूताच्या अर्ध्या भागांत मिळवायचे. याला पंचीकरण अशी संज्ञा आहे, ह्या पंचीकृत महाभूतांपासूनच सर्व शरीरे घडतात. (पंचीकृत) पृथ्वीपासून रोम, त्वचा, मांस, नाड्या आणि हाडे ही होतात. (पंचीकृत) जलापासून लाळ, रक्त, घाम, वीर्य आणि मूत्र होतात. (पंचीकृत) तेजापासून भूक, तहान, कांती (शरीराचे तेज), निद्रा आणि आळस होतात. (पंचीकृत) वायूपासून चलन-वलन, गति, आकुंचन-प्रसरण हे होतात. (पंचीकृत) आकाशापासून काम, क्रोध, लोभ, मोह आणि भय हे होतात. हा अन्नमय कोश होय. राजा जसा खालचे वरचे मजले असलेल्या राजवाड्यात मजेत राहतो तसेच हे तीन कोश जीवात्म्याचे प्रासाद जाणावे. जीवात्मा स्थूलदेहात राहून जाग्रत अवस्थेत विषयांचा भोग घेतो तेव्हां त्याला 'विश्व' असे म्हणतात. तो सूक्ष्म देहाच्या आश्रयाने स्वप्नावस्थेत एकच असूनही अनेकत्व अनुभवीत प्रविविक्त भोग भोगतो तेव्हां त्याला 'तैजस' म्हटले जाते. कारणदेहात जाऊन निद्रावस्थेचा अनुभवतांना तो 'प्राज्ञ' म्हणवतो. जागा झाला की पुन्हा इंद्रियांच्या द्वारा विषयांमागे फिरतो. 61 – 70.

## पंचमहाभूतांपासून भौतिक शरीराची रचना.

| **महाभूत** | आकाश | वायु | तेज | जल | पृथ्वी |
|---|---|---|---|---|---|
| **विशेष गुण** | शब्द | स्पर्श | रूप | रस (चव) | गंध |
| **ज्ञानेंद्रिय** | कान | त्वचा | नेत्र | जिह्वा(रसना) | नासिका |
| **सत्त्वांश (मनोमय कोश)** | अंतःकरण, मन आणि चित्त | | | | **लिंगदेह (सूक्ष्म देह)** |
| **सत्त्वांश (विज्ञानमय कोश)** | बुद्धि आणि अहंकार | | | | |
| **रजोगुण (प्राणमय कोश)** | प्राण, अपान, व्यान, उदान, समान हे प्राण | | | | |

| | वाचा, हात, पाय, लिंग (उपस्थ) आणि गुद ही पांच कर्मेंद्रिये | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **पंचीकृत महाभूत (अन्नमय कोश)** | काम, क्रोध, लोभ, मोह आणि भय | चलन-वलन, गति, आकुंचन आणि प्रसरण. | भूक, तहान, कांति, निद्रा आणि आळस | लाळ, रक्त, घाम, वीर्य आणि मूत्र. | रोम,त्वचा, मांस आणि नाड्या |

स्थूलदेहाच्या निर्मितीसाठी पंचमहाभूतांची शुद्ध स्वरूपे (तन्मात्र) उपयुक्त नाहीत. त्यासाठी त्यांचे पंचीकरण आवश्यक आहे. प्रत्येक भूताच्या अर्ध्या भागाचे चार चार भाग (1/8) भाग करून ते उरलेल्या चार भूतांच्या अर्ध्या भागांत मिळवले की पंचीकृत भूते सिद्ध होतात. यांत त्या भूताचा अर्धा स्वांश आणि उर्वरित अर्धा इतर भूतांचा मिळून झालेला असतो. अशा रीतीने प्रत्येक पंचीकृत भूतामध्ये पांचही भूतांचे अंश समाविष्ट होतात. अशी ही पंचकोशात्मक शरीराची रचना वरील तालिकेत दर्शविली आहे. ह्या पंचकोशात जीव विहार करत असतो. कारणदेहाचा वर केवळ उल्लेख केला आहे. ह्याचा मुख्य घटक अज्ञान आहे म्हणून हा अज्ञानमय कोश ह्या नांवाने ओळखला जातो. ह्यालाच आनंदमय कोश असेही म्हणतात. यांत तीन प्रकारचे आनंद असतात. इष्ट वस्तूच्या दर्शनाने होणारा **प्रिय**, तिच्या प्राप्तीने होणारा **मोद** आणि तिच्या भोगाने होणारा **प्रमोद** हे तीन आनंद होत. सर्वांच्या आंत असणारा महाकारण देह म्हणजेच जीवात्मा (प्रत्यक्) होय. हा तुर्या (समाधि) अवस्थेत अनुभवाला येतो. यापूर्वी आपण हा विषय पाहिला आहेच. त्याची उजळणी म्हणून खाली तालिका दिली आहे.

## देहचतुष्टयविवरण.

| देह | अवस्था | अभिमानी | स्थान | आनंद | भोग | गुण | वाचा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **स्थूल** | जाग्रत | विश्व | नेत्र | विषयानंद | स्थूल | रज | वैखरी |
| **सूक्ष्म** | स्वप्न | तैजस | कंठ | स्वप्नानंद | प्रविविक्त | सत्त्व | मध्यमा |
| **कारण** | निद्रा | प्राज्ञ | हृदय | निद्रानंद | आनंद | तम | पश्यंती |
| **महाकारण** | तुर्या | प्रत्यक् | मूर्धा (शिर) | समाध्यानंद | परानंद | शुद्धसत्त्व | परा |

**कर्मयोग आणि संसरण :-** देह हे अधिष्ठान आहे, अहंकार हा कर्ता आहे, इंद्रियांचा समूह हे कारण आहे, वायू (प्राण आणि कर्मेंद्रिये) ही चेष्टा (क्रिया) आणि इंद्रियादिकांच्या देवता हे सगळे एकत्र येऊन काया, वाचा आणि मन ह्या करणांनी (instruments) शुभ आणि अशुभ कर्मे घडतात. इष्ट कर्मांने म्हणजे पुण्याने स्वर्गादि सुख प्राप्त होते. अनिष्ट कर्म म्हणजे पाप नरकादि दुःखांचे कारण होते. इष्ट आणि अनिष्ट असे पापपुण्यात्मक मिश्र कर्म मनुष्यजन्माला आणते. अशा या त्रिविध कर्माच्या तीन गती आहेत. कर्माच्या भोगासाठी अंडज, स्वेदज, उद्भिज, जारज आणि दिविज अशा पांच योनी केलेल्या आहेत. आपल्या शुभाशुभ कर्मानुसार जीव या योनीतून फिरत असतो. कोट्यवधी कल्पांपर्यंत तो फिरला तरी भोगल्याशिवाय कर्म सरत नाही. आत्मज्ञान हाच ह्या कर्मचक्रातून सुटण्याचा एकमेव उपाय आहे. वेद आणि शास्त्रानी असा सृष्टिक्रम दाखविला आहे. अज्ञानी माणूस ह्याला सत्य मानतो.71 – 76.

संत तुलसीदासांनी म्हटल्याप्रमाणे 'तुलसी यह तनु खेत है। मन-बच-कर्म किसान। पाप-पुण्य द्वय बीज हैं। जो बोएगा सो काटेगा निधान।।' जीवाचे तादात्म्य ह्या देहाशी झाल्याने त्या देहाला सुखद गोष्टींची ओढ (राग) आणि दुःखद गोष्टींचा तिरस्कार (द्वेष) वाटू लागतो. त्यामळे त्या आभासिक सुखांच्या – भोगांच्या प्राप्तीसाठी आणि दुःखांच्या प्रतिकारासाठी तो कर्मे करतो. अहंकार म्हणजेच मी हा पंचकोशात्मक देह आहे ही भावना. तीच ही सर्व कर्मे करायला प्रवृत्त करते. देहाची सुखदुःखे ज्ञानेंद्रियांच्या अनुकूल आणि प्रतिकूल विषयांशी होणाऱ्या संयोगातूनच घडतात. ह्या कर्माविषयी श्रीस्वामीमहाराजांनी आपल्या प्राकृत मननात असे म्हणतात. "पुण्य, पाप आणि मिश्र असें तीन प्रकारचें कर्म आहे. त्यांतून पुण्यकर्मानें देवशरीर, पापानें तिर्यक् (पशु, पक्षी आदि) शरीर आणि मिश्रानें मनुष्यशरीर प्राप्त होतें. तें उत्कृष्ट, मध्यम, सामान्य भेदानें प्रत्येक तीन प्रकारचें होतें. तें असें - उत्कृष्ट पुण्यानें ब्रह्मादि(देव)शरीरें, मध्यम पुण्यानें यक्षादिशरीरें, सामान्य पुण्याने राक्षस, भूतें, प्रेतादि शरीरें; उत्तम पापकर्मानें विषवृक्ष, कंटकादि वृक्ष, सर्प, वृश्चिक, व्याघ्रादि शरीरें; मध्यम पापानें पत्र-पुष्प-फलयुक्त लता, वृक्ष, खरोष्ट्र महिषादि शरीरें; सामान्य पापानें तुलसी, वट, अश्वत्थादि, गवाश्वादि शरीरें; आणि मिश्रोत्कृष्ट कर्मांने निष्कामकर्मानुष्ठान व ज्ञानयोग्य शरीरें; मध्यमानें काम्यकर्मयोग्य शरीरें; आणि सामान्य मिश्र कर्मांने किरात, म्लेंछादि शरीरें होतात. तेव्हां मनुष्यानें हें तारतम्य जाणून स्ववर्णाश्रमोचित कर्मे ईश्वरोद्देशाने करून मिश्रोत्कृष्ट कर्मफल साधून घ्यावें."

**सदाचरण आणि सद्गुरुसेवा :-** (या कर्मचक्रातून सुटण्यासाठी) अमानित्वादि सद्गुण आपल्या अंगी बाणवून घेऊन सद्गुरूंना शरण जावे आणि (त्यांच्याकडून) आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. फळाची अपेक्षा आणि कर्तृत्वाचा अभिमान टाकून स्वधर्माचे

आचरण केल्याने ईश्वराचे प्रेम मिळते आणि सद्गुरूंचे दर्शन होते. निर्वाणप्राप्तीकरिता सद्गुरूंना देवासमान मानून त्यांची श्रद्धेने निरंतर सेवा करून त्यांचा उपदेश श्रवण करावा. सद्गुरूंच्या कृपेनेच तो उपदेश मनात ठसेल. अन्यथा ते ज्ञान मनात स्थिर न होता हा सर्व वायाच शीण ठरेल. हे राजा, तू तुझ्या वर्णाश्रमासाठी शास्त्रात सांगितलेले कर्म निरपेक्षपणे केलेस. त्यामुळेच तू माझा भक्त झालास. आता तुला ज्ञान स्पष्ट सांगतो. भ्रम, मोह आणि मल घालविणारे श्रेठ वैराग्य तुला झाले असल्याने आता तुझ्यावर लवकरच विद्येचा प्रसाद होईल. *77 – 82*

शास्त्रात जीवदशा अनादि मानली आहे. पण ती सान्त आहे, म्हणजे तिचा शेवट करतां येतो. श्रीमदाद्यशंकराचार्यांनी या संसारचक्रांतून मुक्ती साधण्यासाठी किती टप्प्यांतून जावे लागते ते विवेकचूडामणि या आपल्या ग्रंथात असे सांगितले आहे.

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता। तस्माद्वैदिकधर्ममार्गपरता विद्वत्वमस्मात्परम्।।**

**आत्मानात्मविवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थिति। मुक्तिर्नो शतकोटिजन्मसु कृतैः पुण्यैर्विना लभ्यते।।2।।**

वर विविध कर्माच्या फलस्वरूप प्राप्त होणारी विविध शरीरे आपण पाहिली. भारतीय शास्त्रानुसार उद्भिज, जारज इत्यादि पांच प्रकारच्या चौऱ्यांशी लक्ष योनी आहेत. या सर्वात मनुष्य शरीरातच निष्काम कर्माचे अनुष्ठान आणि ज्ञानाची योग्यता असते. त्यामुळे ह्या सर्व प्रकारच्या जन्मात मानवजन्म श्रेष्ठ मानला आहे. त्यांतही पुरुषदेह आणि ब्राह्मणवर्णातच वैदिक धर्माचे आचरण शक्य आहे. असा जन्म मिळूनही आस्तिक्यबुद्धी आणि धर्माचरणाकडे प्रवृत्ती असली तरच विहित कर्माचे निष्काम अनुष्ठान होऊन चित्तशुद्धी होते. चित्तशुद्धि झाल्याची लक्षणे म्हणजेच अमानित्वादि सद्गुण अंगात बाणणे होय. हे गुण श्रीमद्भगवद्गीतेत (13:7-11) खालीलप्रमाणे दिले आहेत.

**अमानित्वमदम्भित्वमहिंसाक्षान्तिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।7।।**

**इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च। जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्।।8।।**

**असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु। नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु।।9।।**

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी। विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि।।10।।**

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्।**

**अमानित्व** म्हणजे मानसन्मानाचा वीट, **अदंभित्व** म्हणजे आपले पुण्य प्रकट न करणे, **अहिंसा** म्हणजे काया-वाचा-मनाने कुणालाही न दुखविणे, **क्षांति** म्हणजे कुठल्याही परिस्थितीत मनाचा क्षोभ न होणे, **आर्जव** म्हणजे सर्वांशी सारख्याच आपुलकीने आणि आदराने वागणे, **आचार्योपासन** माता, पिता, गुरु, वृद्ध इत्यादिकांची सेवा तत्परतेने करणे, **शौच** म्हणजे "बाहेरी कर्मे क्षाळिला, भीतरीं ज्ञाने उजळला", **स्थैर्य** म्हणजे दैन्य, दुःख, भय आणि शोक इत्यादींनी मनाची खळबळ न होणे, **आत्मविनिग्रह** म्हणजे मनावर ताबा ठेवणे, त्यासाठी **इंद्रियांच्या विषयांसंबंधी विरक्ती** आवश्यक आहे, **अहंकाराचा अभाव**, जन्म, मृत्यु, वार्धक्य, व्याधि, दुःख यांचे सतत (ते अनुभवाला येत नसतांनासुद्धा) स्मरण, स्त्री, पुत्र, घर इत्यादीविषयी अनासक्ती आणि उदासीनता, चांगल्या-वाईट प्रसंगांना सारख्याच वृत्तीने सामोरे जाणे (आलिया भोगासी असावे सादर), परमेश्वराच्या ठायी अव्यभिचारी भक्ति, एकांतसेवन, जनसमुदायाची नावड, अध्यात्मज्ञान (आपल्या स्वरूपाचे अनुसंधान) सतत राहणे, तत्त्वज्ञानाच्या अर्थाचा सतत अनुभव.

हे अमानित्वादि गुण - पर्यायाने दैवी संपत्ती मिळवल्यानंतर तो पुरुष ज्ञानाला योग्य होतो. ईश्वराचे प्रेम जागून मनात मोक्षाची तीव्र इच्छा (मुमुक्षा) निर्माण होते. आणि मग ज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे "सद्गुरु आपैसा भेटे." भगवद्गीतेच्या वचनानुसार त्या सद्गुरूंना शरण जाऊन, त्यांना साष्टांग नमस्कार करून, त्यांची सेवा करून, श्रद्धेने, जिज्ञासेने आणि विवेकाने त्यांना प्रश्न करावेत म्हणजे ते ज्ञानाचा उपदेश करतात. (तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः।।4:34।। ह्या श्लोकांत सद्गुरु कसे असतात तेही सांगितले आहे. तो अनुभवसंपन्न (ब्रह्मनिष्ठ) आणि व्युत्पन्न (श्रोत्रिय) असला पाहिजे. सद्गुरूंच्या उपदेशानंतर आत्मा आणि अनात्मा यांचा विवेक करून त्याचा अनुभव घतल्यावर आत्म्याचे ब्रह्माबरोबर ऐक्य करून त्या उत्तम अवस्थेत राहणे ह्याला मोक्ष असे नांव आहे. अशा प्रकारची सर्वदुःखांची निवृत्ती करणारी मुक्ति शंभर कोटी जन्माच्या पुण्याईविना लाभणे शक्य नाही असे श्रीमच्छंकराचार्यांचे म्हणणे आहे.

**आधुनिक वेदांती:-** सांप्रत वेदांताचा अभ्यास करण्याची जणू एक फॅशन झाली आहे. वेदांतावर प्रवचन करणारे, पुस्तके लिहिणारे विद्वान सर्वत्र प्रचुर आढळतात. ही प्रवचने ऐकणे किंवा ही पुस्तके वाचणे म्हणजे वेदांताचा अभ्यास नव्हे. वर सांगतल्याप्रमाणे जर शिष्याची पूर्वतयारी नसेल किंवा गुरु नुसता विद्वानच नाही तर आत्मानुभवाने संपन्न असेल तरच वेदांताच्या श्रवणाचा योग्य परिणाम होतो. आपल्या शास्त्रांच्या मताप्रमाणे संन्यास घेऊनच श्रवण करावे असे आहे. अन्यथा स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे ती केवळ एक बौद्धिक कसरत ठरेल. अनधिकारी व्यक्तीने अनधिकारीच व्यक्तीकडूनच वेदांत शिकायचा प्रयत्न केला तर बुद्धिभेद होऊन त्याचा आधीचा भक्तियोग वा कर्मयोग सुटू शकतो. श्रीस्वामीमहाराजाच्या पूर्वाश्रमात एक क्षयाने आजारी गृहस्थ त्यांच्याकडे आले. त्यानी त्या गृहस्थाला गुरुचरित्राची पारायणे करायला सांगितली. त्याने त्याची व्याधि खूप आटोक्यात आली. पुढे त्याला कुणी वेदांत सांगणारे भेटले. त्यांच्या उपदेशाने त्या गृहस्थांनी आपले संध्या, देवपूजा

इत्यादि नित्य कर्मही सोडले. परिणामी त्यांचा क्षय उलटला आणि ते परत वासुदेवशास्त्रींकडे आले. महाराजांनी त्यांची विहित कर्माचा त्याग केल्याबद्दल निर्भर्त्सना करून आपल्या त्या वेदांती गुरूंनाच उपाय विचारायला सांगितले. पुढे त्या व्याधीतच त्या गृहस्थाचा अंत झाला. पुस्तकी वेदांताचे वाचन करून वेदांती समजून शास्त्रविहित कर्म सोडून देणाऱ्याचा आध्यात्मिक अधःपातच होतो हे ध्यानांत ठेवावे. वेदांताविषयी जिज्ञासा असायला, त्याचा अभ्यास करायला हरकत नाही. पण चित्तशुद्धीशिवाय, अमानित्वादि गुण जोडल्याशिवाय, अधिकारी गुरूशिवाय ज्ञानमार्गात प्रगति होणे अशक्य आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

**परोक्ष ज्ञान आणि श्रवण :-** विद्या म्हणजेच ज्ञान. ते दोन प्रकारचे असते. परोक्ष आणि अपरोक्ष. गुरूंच्या मुखातून वेदांताचे श्रवण करून उपक्रमादि सहा लिंगानी त्याचे तात्पर्य जाणून घेणे हे परोक्ष ज्ञान होय. ब्रह्म एक आहे की अनेक (इत्यादि ब्रह्मासंबंधीचे) संशय निर्माण करणारी **संशयभावना** हे श्रवण केल्याने दूर होते. तसेच ब्रह्म नाही अशी बुद्धी – जिला **असत्त्वावरण** म्हणतात, तीही श्रवणाने दूर होऊन तेच श्रोते 'वस्तु (ब्रह्म) आहे" असे म्हणू लागतात. ८३ – ८६.

सद्गुरूंच्याकडून औपनिषद ज्ञानाचे श्रवण करण्याआधी ब्रह्माच्या स्वरूपाविषयी अनेक शंका असतात. ब्रह्म एक आहे का अनेक? निरनिराळ्या वेदांत सांगितलेली ब्रह्मे निरनिराळी आहेत का? इत्यदि शंकांना **संशयभावना** म्हणतात. हा आत्मज्ञानाच्या मार्गातला पहिला प्रतिबंध आहे. हा सद्गुरूंच्याकडून ज्ञानाचे श्रवण केल्याने दूर होतो. तसेच ब्रह्म खरोखरच आहे का असे वाटणे किंवा ब्रह्माच्या अस्तित्वाविषयींच शंका वाटणे याला **असत्त्वावरण** म्हणतात. हेसुद्धा श्रवणाने दूर होते आणि ब्रह्माच्या अस्तित्वासंबंधी निश्चय होतो. असे असले तरी हे ज्ञान अनुभवात्मक नसते. म्हणून त्याला परोक्ष ज्ञान असे म्हटले आहे. अपरोक्ष ज्ञानासाठी याच्यानंतर मनन आणि निदिध्यासन यांची आवश्यकता आहे.

**मनन :-** श्रवणाला अनुसरून मन स्थिर करून सावधानतेने मनन केले की ज्ञानमार्गातला दुसरा अडथळा (प्रतिबंध) **असंभावना** दूर होते. 'आपले ज्ञान तर मर्यादित आहे आणि आपण अपरोक्ष (प्रत्यक्ष अनुभवाला येणारे) आहो. याउलट (श्रवणाने समजलेला) ईश्वर सर्वज्ञ आहे पण परोक्ष (प्रत्यक्ष अनुभवाला न येणारा) आहे. मग आपले ईश्वराशी ऐक्य कसे होईल? ' असे वाटणे हीच असंभावना (?). (जाग्रती, स्वप्न आणि सुषुप्ती) या तीनही अवस्थांत सच्चदानंदरूप ज्ञान एकच असते. हाच प्रत्यक् आत्मा होय. (बुद्धि, मन, प्राण, स्थूल देह इत्यादि) उपाधीमुळे आणि त्याचा विवेक नसल्याने त्याच्या अज्ञत्वादि दिसतात. आत्मा सर्व काळी एकच असतो आणि जग स्वप्नाप्रमाणे मिथ्या आहे हे उपक्रम, उपसंहार इत्यादींच्या आधाराने पहात गेल्यास (प्रत्यगात्मा किंवा जीवात्मा आणि परमात्मा) ह्यांचे वेगळेपण उपाधीमुळेच आहे हे लक्षात येते. अशा रीतीने अध्यारोप (ब्रह्माच्या ठायी जीवाचा आभास) टाकून अपवादाचा (जीवाचे आत्म्याशी एकरूपत्व) गुरूपदेशाच्या श्रवणानुसार विचार करीत गेल्याने जीव आणि ब्रह्म यांचे एकत्व मननात येते. (म्हणजेच असंभावाना दूर होते). ८७ – ९१.

संशय दूर झाले तरी जीव, जगत आणि ब्रह्म हे परस्परांपासून भिन्न आहेत असे वाटणे म्हणजे **असंभावना**. हा ज्ञानमार्गातला दुसरा अडथळा आहे. ही गुरूंकडून श्रवण केलेल्या महावाक्याच्या मननाने जाते. हे मनन अन्वय आणि व्यतिरेकाने करावे लागते. जाग्रति, स्वप्न आणि झोप या तीन अवस्था आपल्या अनुभवाच्या आहेत. जागेपणीचा राजा स्वप्नात भिकारी होतो. भाकरीच्या तुकड्यासाठी व्याकुळतो. जागेपणीची समृद्धी तिथे उपयोगी पडत नाही. जाग्रतीतील देह, घर, संपत्ती, पत्नी, पुत्र इत्यादींचा तिथे अभाव असतो. यालाच व्यतिरेक म्हणतात. तोच राजा जागा झाला की तो स्वतःच्या स्वप्नाला हंसू लागतो. पण मीच स्वप्नात भिकारी झालो आणि मीच आता राजा आहे असे म्हणतो, जाणतो. आतां स्वप्नातल्या सृष्टीचा व्यतिरेक होतो आणि स्थूल देहाचा अन्वय. तसेच झोंपेत तो आपल्या देहालाही विसरून जातो. कशाचेही भान रहात नाही. पण तेथे तो निरतिशय आनंदाचा अनुभव घेतो. देह, इंद्रिये, मन ह्या सर्वांच्या अभावीसुद्धा तो आनंदात असतो. जागा झाला की तो म्हणतो, 'वा! छान झोप लागली. कांही कळलेसुद्धा नाही!' म्हणजेच झोपेत केवळ अज्ञान असते. म्हणजेच कारणशरीराचा अन्वय असतो. स्थूल देह आणि सूक्ष्म देह यांचा व्यतिरेक असतो. पण या तीनही अवस्था पाहणारा (साक्षी) एकच असतो. तेच आपले स्वरूप हे असे तर्काने पटू शकते. हा तर्क श्रुतीला अनुकूल असणे आवश्यक आहे. गुरूच्या उपदेशाला आणि वेदांत प्रतिपादलेल्या ब्रह्माला अनुकूल गोष्टी स्वीकारून आणि प्रतिकूल गोष्टींचा त्याग करून मनाचा निश्चय करीत गेल्याने – **म्हणजेच मननाने** ही असंभावना दूर होते आणि जीव, जगत आणि ब्रह्म यांच्यातील अभेद बुद्धीत ठसतो. त्यासाठी गुरूपदिष्ट महावाक्याचा विचार उपक्रम-उपसंहार इत्यादि सहा लिंगांच्या (निकषाच्या) आधाराने करायचा असतो. ही षडलिंगे आपण पुढच्या अध्यायात पाहणार आहोत.

**निदिध्यासन (ध्यान) :-** बुद्धीने जरी हे कळले तरी वस्तु दिसत नाही (अनुभवाला येत नाही आणि जगत खरेच भासते) त्याला **अभानावरण** म्हणतात. हे अभानावरण जाण्यासाठी मननाने निश्चित झालेल्या बह्मस्वरूपाचे निदिध्यासन करावे लागते. ह्यालाच ध्यान म्हणतात. ह्या ध्यानाच्या अभ्यासाने आपले आणि ब्रह्माचे अद्वैत स्थिर होते. सर्व संकल्पांचा त्याग करून एकांतात बसून रोजच्या रोज ध्यान केल्याने साधक स्वतः ब्रह्मरूप होतो. भ्रमराचे ध्यान करता करता कीडासुद्धा भ्रमर होतो हा

ध्यानाचा प्रभाव जगप्रसिद्धच आहे. जीव तर मुळातच ब्रह्मरूप आहे. तेव्हा तो जर स्वरूपाच्या ध्यानाने ब्रह्मरूप झाला तर कोण शहाणा त्याचे आश्चर्य मानील? 92 – 96.

जीव, जगत आणि ब्रह्म यांचे ऐक्य मननाने बुद्धीत ठसले तरी तसा अनुभव मात्र येत नाही. हेच अभानावरण किंवा **विपरीतभावना** ज्ञानमार्गातला तिसरा आणि शेवटचा अडथळा आहे. इथे बुद्धीचा उपयोग नाही. यासाठी साधकाने आपले चित्त सर्व बाह्य विषयांपासून आंत ओढून केवळ बुद्धीने जाणलेल्या ब्रह्मस्वरूपाकडे प्रवाहित करायचे आहे. प्रपंचातील सर्व व्यवहार सोडल्याविना हे शक्य नाही हे उघडच आहे. एका ठिकाणी आसनावर बसून, श्वास (प्राण) आणि चित्त स्थिर करून निरंतर ब्रह्माचे चिंतन करणे हाच उपाय आहे. जेव्हा हे चित्त अखंड तेलाच्या धारेसारखे ध्येयाकडे वाहू लागते तेव्हा ध्यान घडते. ह्या ध्यानाची परिपक्व अवस्था म्हणजेच समाधि होय. ह्या समाधीच्या प्रभावानेच साधक 'मी जीव आहे' ह्या अज्ञानाचा त्याग करून ब्रह्मस्वरूपात लीन होतो.

**सिंहावलोकन :-** 'ध्यान तरी कशासाठी करायचे?' असे विचारशील तर तुला (पुनश्च) सांगतो ते ऐक. त्याने तू कल्याण पावून कृतकृत्य होशील. अनिर्वचनीय अशा मायेने स्वरूपाच्या ठिकाणी दोरीच्या सापासारखा (जीवत्वाचा) भ्रम होतो. हा लटकाच असूनही अनर्थ करतो. अविद्या, काम आणि कर्म यांना मिळून हा जीवत्वाचा भास राग आणि द्वेष निर्माण करतो. त्यांच्या आहारी जाऊन जीव आपले अविनाशित्व हरवतो. त्यानेच त्रिविध (पाप-पुण्य-मिश्र किंवा कायिक-वाचिक-मानसिक) कर्मांचे आचरण करतो. कर्मामुळेच जन्ममरणरूपी संसारांत तो फिरत राहतो. अज्ञानी लोक, 'सूर्य राहूने गिळला' असे म्हणतात ते जसे आभासिक असते तसेच जीवावरचे हे आवरण भासमात्र असते. त्यापासून ज्ञानाशिवाय कोष त्याची सुटका करील? श्रनण, मनन आणि निदिध्यासन ह्या क्रमाने जे ज्ञानी होतात तेच परत आपल्या खऱ्या स्वरूपाला जाऊन मिळतात. (श्रवणाने झालेले) शाब्दज्ञान हे परोक्ष आहे. आत्मा तर प्रत्यक्षच आहे. तो ध्यानानेच (निदिध्यासनावे) अपरोक्ष होतो. तेवढ्यासाठी ध्यान हे केलेच पाहिजे. 97 – 103.

राजा, तू भाग्यवान आहेस. तुला वैराग्य झाल्याने तू उपदेशाला योग्य झाला आहेस! आता तुला मोक्षाची प्राप्ती निश्चितपणे होईल. मला सर्व कर्म अर्पण केल्याने तुझे अंतःकरण शुद्ध झाले आहे. त्यायोगे तुझी माझ्यावर दृढ भक्ती जडली आहे. आतां तुझ्याकडून निर्विघ्नपणे महावाक्याचे चिंतन होईल. मग अपरोक्षानुभूती घेऊन तू समाधीत लीन हो. तत्त्वज्ञान स्थिर करून, मनाचा भंग कर आणि वासनावन समूळ जाळून टाक. मग तू जीवन्मुक्त होशील आणि शेष प्रारब्ध भोगून झाले की विदेह कैवल्य पावून माझ्या रूपांत मिळशील ह्याची खात्री ठेव. राजा, आतां तू महावाक्याचा विचार कर म्हणजे निश्चयाने तुला लवकरच साक्षात्कार होईल. 104 -108.

.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा बारावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

अध्याय १३ वा.

**वाक्यविवरण पूर्ण। षड्लिंगांचें कथन। प्रत्येकाचें लक्षण। तत्त्वं पदार्थ लक्षणही।।२८।। तो विष्णु आत्मा तत्पदार्थ। जीव हा त्वं पदार्थ। लक्षलें यांचें ऐक्य यथार्थ। तेराव्यांत असे हें।।२९।।**

## महावाक्य.

श्रीदत्तप्रभूंच्या आश्वासक बोलण्याने उत्साहित झालेल्या अर्जुनाने नम्रपणे त्यांना वंदन केले आणि त्यांना विनयपूर्वक आणि भावभराने विचारले, 'हे महावाक्य कोणते आहे आणि त्याचे चिंतन कसे केले असतां अपरोक्षानुभूतीचा लाभ होतो ते कृपा करून मला सांगावे.' त्यावर दत्तप्रभू म्हणाले, 'ऐक! सामवेदांतर्गत छांदोग्योपनिषदांत श्वेतकेतूला त्याचा पिता आरुणी उद्दालकाने तत्त्वाचा उपदेश केला आहे. त्यांत "ते (ब्रह्म) तूं आहेस" हा उपदेश नऊ वेळां निरनिराळ्या प्रकारे युक्तिवाद करून केला आहे. हे महावाक्यच आहे. ते आतां मी तुला समजावून सांगतो. लक्षपूर्वक एकाग्रचित्ताने ऐक! ह्या महावाक्याच्या श्रवणाने, मननाने आणि ध्यानाने तुला साक्षात्कार होईल आणि तू हा संसारसागर तरून जाशील ही खात्री मनात बाळग!'

या ठिकाणी श्रीस्वामी महाराजांनी 'तें तूं आहेत' सामवेदांतील महावाक्य विचारासाठी घेतले आहे. एकूम प्रत्येक वेदांतील एक अशी चार महावाक्ये आहेत. संन्यासाश्रमात प्रवेश करतांना गुरू याच चार महावाक्यांचा उपदेश करतात. ह्याच महावाक्यांचे गुरुमुखांतून श्रवण करून, पुढे स्पष्ट केलेल्या सहा निकषांनी त्याचे तात्पर्य जाणून त्याच्या मननाने निश्चय करून शेवटी निदिध्यासनाने त्याचा अनुभव घेणे हेच संन्यासाश्रमाचे उद्दिष्ट आहे. सर्वसाधरणतः ज्या संन्यासांत शेंडी आणि जानवे यांचा त्याग करून, घरसंसाराचा त्याग करून भगवी वस्त्रे धारण करून भिक्षावृत्तीने निर्वाह केला जाते त्याला विविदिषा  संन्यास असे नांव आहे. घरांतच राहून बाह्य आचारांत फारसा फरक न करतां केवळ मनाने सर्व काम्य कर्मांचा त्याग करण्याला विद्वतसंन्यास असे म्हणतात. "**काम्याणां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।** " (भगवद्गीता 18:2). ही चार महावाक्ये खालीलप्रमाणे आहेत.

**प्रज्ञान**(च) **ब्रह्म** हे ऋग्वेदांतर्गत महावाक्य आहे. (ऐतरेय उ. 3:1:3). ह्या उपनिषदांत जगतांतील इंद्रादि देवतांपासून स्थावरांत सर्व चराचर जीवमात्रांच्या उत्पत्तीचे कारण, त्यांच्या इंद्रियांना संवेदनशील करणारे, त्यांच्या इच्छा, विचार, प्रवृत्ती, निश्चय इत्यादींची अभिव्यक्ती करणारे चैतन्य म्हणजेच प्रज्ञान असे प्रतिपादन करून, हा प्रज्ञानरूपी आत्माच ब्रह्म आहे असा सिद्धांत मांडला आहे.

**मी (च) ब्रह्म आहे**. हे यजुर्वदांतर्गत महावाक्य आहे. अधिकारी साधकांच्या बुद्धीत साक्षित्वाने अहं म्हणून स्फुरणारे चैतन्य (जीवात्मा) हा 'मी' शब्दाचा अर्थ. सर्वव्यापी सच्चिदानंद स्वयंपूर्ण परमात्मा म्हणजेच 'ब्रह्म'. 'आहे' या शब्दाने दोहोंचे ऐक्य दाखविले आहे.

**ते तू आहेस** हे सामवेदांतर्गत वाक्य आहे. सृष्टीच्या पूर्वी आणि प्रलयाच्या नंतरही जसेच्या तसेच राहणाऱ्या एकमेवाद्वितीय सच्चिदानंद परमात्मस्वरूपाला 'ते' म्हणून श्रवण करणाऱ्या शिष्याच्या स्थूल आणि सूक्ष्म देहांच्या पलीकडील चैतन्याचा 'तू' या शब्दाने (त्वंपदाने) निर्देश केला आहे. 'आहेस' शब्दाने हे दोन्हीचा अभेद प्रतिपादला आहे. या वाक्याचा अधिक विचार पुढे केला जाणार आहे.

***यमन***[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

**हा आत्मा ब्रह्म** हे अथर्ववेदांतील महावाक्य आहे. आपल्या अंतरांत प्रकाशून प्रतीतीला येणारा अपरोक्ष 'हा' अहंकाराने स्थूल देहाला बांधल्यासारखा भासणारा 'आत्मा'च (प्रत्यगात्मा) अनुभवाला येणाऱ्या सर्व जगताचे तत्त्व असलेले, परोक्ष 'ब्रह्म' आहे असा याचा अर्थ आहे.

या चार महावाक्यांपैकी 'ते तू आहेस' ह्या महावाक्याचा उपदेश दत्तप्रभूंनी कार्तवीर्याला केला आहे. त्याची हा उपदेश ग्रहण करण्याची तयारी म्हणजेच अधिकार आहे हे त्यांनी आधीच स्पष्ट केले आहे. पण आपल्यासाठी कृपाळूपणे महाराजांनी ही पूर्वतयारी कशी करायची ते स्पष्ट केले आहे. 1 – 5.

## साधनचतुष्टय

महावाक्यांचे श्रवण करण्यापूर्वी साधकाने प्रयत्नपूर्वक चार साधने जोडली पाहिजेत. यांच्याशिवाय श्रवण योग्य प्रकारे होत नाही व झाले तरीही त्याचा इष्ट परिणाम होत नाही. जमिनीत बीज पेरण्यापूर्वी जशी तिची मशागत करून ती पेरणीला योग्य करावी लागते तसेच आपले मन ज्ञानाच्या उपदेशासाठी तयार करावे लागते. त्यासाठी ही चार साधने अपरिहार्य आहेत.

१. **नित्यानित्यवस्तुविवेक** :- आपल्या अनुभवाला येणारे हे जग सतत बदलत असते. म्हणजेच ते परिवर्तनशील आहे. ह्यालाच अनित्य असे म्हणतात. ह्याउलट ब्रह्म किंवा परमात्मस्वरूप हे कधीही न बदलणारे आहे, त्रिकालाबाधित आहे. हा निश्चय होणे हे पहिले साधन आहे. तो झाला की जगातील तथाकथित सुखांचे आकर्षण कमी होते. जोपर्यंत हा निश्चय होत नाही तोंपर्यंत जगाच्या ऐंद्रिय सुखाकडे मन ओढ घेणारच. आत्मस्वरूप हे नित्य आहे हे एकदा पटले की तेच प्राप्त करून घेण्याकडे सहज प्रवृत्ती होईल. स्वप्नाची अनित्यता आपल्याला पटलेली असते. त्यामुळे आपण स्वप्नांतल्या राज्यासाठी व्याकुळ होत नाही. तसेच जगाच्या अनित्यतेची, परिवर्तनशीलतेची खात्री पटली की त्यांतील सुखांच्या मागे धावायचे आपले मन सोडून देईल. ह्यापासूनच आपल्याला पुढील दुसऱ्या साधनाची प्राप्ती होऊ शकेल.

२. **इहामुत्रार्थविराग** :- इह म्हणजे ह्या मनुष्यलोकातील आणि अमुत्र म्हणजे स्वर्गादि परलोकातील अर्थ म्हणजे इंद्रियांना सुखावणारे विषय यांचा विराग तिटकारा उत्पन्न होणे हे दुसरे महत्त्वाचे साधन आहे. ह्यालाच पतंजलींनी **दृष्टानुश्रविक-विषयवितृष्णा**, मनुष्य देहात अनुभवाला येणाऱ्या (दृष्ट) आणि ऐकून समजलेल्या परलोकांतील विषयांसंबंधी विरक्ती असे म्हटले आहे. हे वैराग्य असेल तरच मन बाह्य जगतांतील विषयांपासून परावृत्त होऊ शकेल. असे अंतर्मुख मनच अंतरातील आत्म्याचे ध्यान करू शकेल.

३. **षट्संपत्ती** :- शम, दम, उपरति, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान ह्या सहांची मिळून होणारी संपदा हीच साधकाच्या मोक्षमार्गावरचे पाथेय आहे. ही संपत्ती पुरेशी गांठीला असेल तरच हा प्रदीर्घ प्रवास पूर्ण करू शकेल. वैराग्यामुळे मनाची ओढ एकदम नाहीशी होत नाही. वारंवार समजावूनही ओढाळ जनावरासारखे मन विषयांकडे धांवतच असते. त्या मनाला, विषयसुख मिळवण्यासाठी लागणारे कष्ट आणि पैसे, त्यानंतरही मिळणाऱ्या सुखाची क्षणभंगुरता, परिणामी अधिकच वाढणारी इच्छा आणि अतृप्तता, कालांतराने त्या विषयांची गोडी इत्यादी दोषांची जाणीव करून देऊन मनाचे नियमन करणे ह्याचे नांव **शम** आहे. इतके करूनही बलवान इंद्रिये मनाला न जुमानता आपापल्या विषयाकडे-

जीभ रुचीकडे, त्वचा सुखद स्पर्शाकडे, नेत्र सुरूपाकडे, नाक सुगंधाकडे आणि कान सुरेल आवाजाकडे खेचली जातातच. अशा वेळी त्या इंद्रियांना आवरून धरणे, काबूत ठेवणे, त्यांना लगाम घालणे ह्याचे नांव **दम** आहे. अशी ही इंद्रिये आवरून धरली तरी त्यांच्याद्वारा मन, टाकीच्या छिद्रांतून गळणाऱ्या पाण्यासारखे जगतांत पसरते आणि विषयाकार होते. विषयांच्या ह्या ध्यानानेच त्यांचा संग, काम, क्रोध, संमोह आणि स्मृतिभ्रंश ही श्रीमद्भगवद्गीतेत (२:६१-६२) अनर्थकारी परंपरा सुरू होते. ह्यासाठी जगाच्या व्यवहारातूनच मन काढून घेण्याला **उपरति** असे नांव आहे. लौकिक जीवनांतील आकांक्षा कमी करीत गेल्यानेच हे शक्य होते. उपरत मनालाही बाह्य जगांतील शीत-ऊष्ण, तहान-भूक इत्यादि द्वंद्वांपासून होणारे दुःख बळेंच खेचून बाहेर आणते. त्यासाठी ही द्वंद्वें सहन करण्याचा अभ्यास म्हणजेच **तितिक्षा**. कसलाही प्रतिकार, चिंता किंवा आक्रोश न करतां येणारी दुःखे सोसता आली तरच मनाची स्थिरता टिकवता येईल. वरील संपत्ती जोडण्यासाठी लागणारे प्रयत्न, धैर्य आणि चिकाटी यांचा स्रोत सद्गुरु आणि शास्त्र यांच्यावरील **श्रद्धा**च आहे. ज्या गोष्टीचे आपल्याला ज्ञान नाही ते प्राप्त करण्यासाठी गुरूंच्या सांगण्यावर विश्वास ठेवणे भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांतही आवश्यक असते. इथे तर आपण अध्यात्मासारख्या सूक्ष्म विषयाचा विचार करीत आहो. अलीकडच्या काळांत श्रद्धेला अंधश्रद्धा म्हणून हिणविण्याची तथाकथित बुद्धिवाद्यांना संवयच असते. श्रद्धा कधीच डोळस असूं शकत नाही. डोळस असते ते ज्ञान! त्यामुळे डोळस आणि आंधळी असे श्रद्धेचे वर्गीकरण हास्यास्पद आहे. अंधश्रद्धा हा शब्द superstition या आंग्ल शब्दाचा अनुवाद म्हणून रूढ झाला. ख्रिश्चन धर्मप्रसारक बायबलवरील श्रद्धेला faith आणि परधर्मीयांच्या श्रद्धेला superstition म्हणायचे. आमच्या बुद्धिवाद्यांनी फारसा विचार न करतांच त्याचे भाषांतर अंधश्रद्धा असे केले. श्रीमद्भगवद्गीतेत श्रद्धेचे सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे प्रकार सांगितले आहेत.(१७:२-६). या विषयाचा आपण पूर्वी विचार केला आहेच. या ठिकाणी **श्रीगुरुवचनावर आणि धर्मशास्त्रावर प्रत्यक्ष ज्ञानाप्रमाणे असणाऱ्या विश्वासाला श्रद्धा म्हटले आहे**. आहे त्या परिस्थितीत मन संतुष्ट ठेवण्याला **समाधान** म्हटले आहे. "जैशी स्थिति आहे तैशापरी राहे। चित्तीं असों द्यावे समाधान।।" ह्या संत एकनाथमहाराजांच्या वचनाप्रमाणे अनुकूल आणि प्रतिकूल परस्थितीत चित्ताला चंचलता न येऊं देणे ह्यालाच समाधान म्हणावे. समाधान शब्दाचा दुसराही अर्थ केला जातो. चित्त सम्यक् (सं) म्हणजे उत्तम रीतीने आत्मस्वरूपांत स्थिर करण्यालाही (आधान) समाधान म्हणतात. दोन्ही अर्थांनी समाधान हे वरील पांच संपत्तीच्या द्वाराच मिळवतां येईल. समाधान हीच सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे असे समजायला हरकत नाही. वरील पांच साधनांचे साध्य हे समाधानच आहे.

४. **मुमुक्षा** : - संसाराची परिवर्तनशीलता जाणून '*पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननीजठरे शयनम्*' अशा जन्ममरणांच्या फेऱ्यांचा कंटाळा येणे, ह्या दुष्ट चक्रांतून सुटण्यासाठी उतावीळ होणे ह्याचे नांव मुमुक्षा म्हणजेच मोक्षाची इच्छा होय. मोक्ष म्हणजे सर्व दुःखांची आत्यंतिक निवृत्ती! हे कुणाला नकोसे वाटेल? तरीही जन्मजन्मांतरांच्या कर्माने मनांत जमा झालेल्या दुःखमूलक वासनांच्या मागे धांवणाऱ्या जीवाला आपल्या अंतरांतच असलेला सुखाचा ठेवा गंवसतच नाही. वर उल्लेखिलेले वैराग्य, शम, दम इत्यादि गुणांचा परिपोष झाला की विषयवासनांची झांपड थोडी उतरते,

या संसारांत 'सुख जवापाडे' आहे आणि दुःख मात्र पर्वताएवढे आहे याची जाणीव होऊं लागते आणि मगच त्यांतून सुटण्याची इच्छा – मुमुक्षा वाढीला लागते. प्रथम ती मंद असते. शास्त्रादींचे श्रवण, वाचन, अभ्यसन केल्याने ती मध्यम होते. या अवस्थेत मुमुक्षु संसारांत राहूनच सत्कर्म आणि उपासना यांचे अनुष्ठान करतो. परमेश्वरी कृपेने त्याला सत्संग घडतो आणि सद्गुरूंची भेट होते. त्यांच्या कृपेनेच मुमुक्षा तीव्रतर होते. घराला आग लागल्यावर घराचा मालक जसा अंगावरच्या कपड्यानिशी जीवाच्या आकांताने बाहेर पडतो तसा हा मुमुक्षु स्त्रीपुत्रधनादि सोडून सद्गुरूंना शरण जातो. हे ज्ञानमार्गावरील चौथे साधन आहे. अशी ही चार साधने अंगांत बाणली की त्या साधकाला सद्गुरूकडे जाऊन महावाक्यांचे श्रवण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. ६ – १०.

## गुरूपसत्ती

अशा अधिकारी पुरुषाने मागील अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे शब्दज्ञानाने आणि ब्रह्मानुभवाने संपन्न अशा शांत, निरिच्छ आणि दयाघन सद्गुरूंना शरण जावे. आपल्या ज्ञानाचा, लौकिक संपत्तीचा आणि मोठेपणाचा ताठा सोडून त्यांचे पाय धरावेत. अत्यंत नम्रभावाने, आदराने त्यांना साष्टांग नमस्कार करावा. त्यांची प्रसन्नता संपादन करावी आणि मृदु वाणीने त्यांची प्रार्थना करावी. "हे शरणागतबंधो! करुणासागर गुरुमहाराज! ह्या दुस्तर संसारसागरात बुडणाऱ्या मला दीनाला, आपण आपल्या दयार्द्र कटाक्षांनी माझ्यावर कृपारूपी अमृताची वृष्टी करून माझा उद्धार करावा. ह्या संसाररूपी वनाग्नीने मी चोहों बाजूंनी वेढला गेलो आहे. माझ्याच पापांचा झंझावात ह्या आगीला भडकवीत आहे. दुसरा कोणीही मला वांचविणारा मला दिसत नाही. भयग्रस्त होऊन मी आपल्याला शरण आलो आहे. माझे ह्या मृत्यूपासून आपण रक्षण करा! (विवेकचूडामणी:३७) हे सद्गुरो, हा भवसागर मी कसा तरून जाईन? त्यासाठी काय उपाय आहे? मी काय करूं त्यासाठी आपणच मला मार्गदर्शन करावे." अशा त्या संसारतापाने तप्त झालेल्या, आपल्याला शरण आलेल्या मुमुक्षूकडे कृपापूर्ण दृष्टीने पाहून सद्गुरू त्याला अभय देतात. "हे शिष्या भिऊं नकोस. भवसागराला तरण्याचा उपाय मी तुला सांगतो. वेदांताचे तात्पर्य जाणून त्याचा विचार केल्याने ह्या संसारांतील दुःखांचा निःशेष नाश होतो." मग सद्गुरू त्याला वेदांतावाक्यांचा उपदेश करतात. त्याचे श्रवण केल्याने हा जीवदशेच्या भ्रमाचा - संसारमूलक अध्यारोपाचा नाश होतो. ११ – १४.

## षड्लिंगतात्पर्यग्रहण

हे श्रवण करतांना त्यांचे तात्पर्य यथार्थपणे कळण्यासाठी शास्त्राने सांगितलेल्या सहा लिंगांचा – निकषांचा उपयोग केला पाहिजे ही सहा लिंगे अशी आहेत. १ उपक्रमोपसंहार, २ अभ्यास, ३ अपूर्वता, ४ फल, ५ अर्थवाद आणि ६ उपपत्ती, ह्या लिंगांचे स्पष्टीकरण "ते तू आहेस" हे महावाक्य ज्या छांदोग्य उपनिषदातले आहे त्याच्या आधारे केले आहे. हे सामवेदांतर्गत उपनिषद आहे. त्याच्या पांचव्या अध्यायात अरुणाचा पुत्र उद्दालकाने आपल्या श्वेतकेतू नांवाच्या मुलाला केलेला उपदेश आला आहे. बारा वर्षांच्या श्वेतकेतूला उद्दालकाने वेदाभ्यासासाठी गुरुगृही पाठविले. तिथे बारा वर्षे अध्ययन करून जेव्हां तो अभ्यास पूर्ण करून घरी आला तेव्हां त्याला आपल्या विद्येचा गर्व झालेला पाहून त्याच्या वडिलांनी त्याला बोलावून विचारले, "अरे श्वेतकेतू! तू स्वतःला इतका विद्वान समजतोस तर मला सांग की ज्या योगें न शिकलेलेही कळते, न जाणलेलेही समजते आणि न अनुभवलेलेही अनुभवाला येते असे ज्ञान तू मिळवलेस काय? " यावर श्वेतकेतू म्हणाला,"असे कसे असूं शकते?" तेव्हां त्याचे पिता म्हणाले, "असे पहा बाळा, मातीच्या एका ढेकळाचे ज्ञान झाले की मातीपासून झालेल्या सर्व पदार्थांचे ज्ञान होते ना?

मातीपासून बनवलेले गाडगे असो, वेळणी असो वा बाहुली असो, फक्त आकार वेगळाले असतात. असते ती केवळ मातीच! सोन्याचा हार, अंगठी वा मूर्ति करतात; पण ती सोन्यालाच रूपानुसार वेगवेगळी नांवे दिलेली असतात. त्यांतील तत्त्व सुवर्णच असते. मी तुला विचारलेले ज्ञान हे असेच असते. जे एक तत्त्व जाणल्याने हे सर्व नामरूपात्मक जगत जाणल्यासारखे होते ते तू शिकलास काय? " श्वेतकेतूने आपल्या आदरणीय गुरुजनांनी हे ज्ञान आपल्याला शिकवले नसल्याचे सांगून अत्यंत नम्रपणे प्रार्थना केली की "हे पूज्य पिताजी, कृपा करून मला हे ज्ञान आपण द्या" अशी प्रार्थना केली. "ठीक आहे," असे म्हणून पिताजींनी त्याला सांगण्यास आरंभ केला.

१. **उपक्रम आणि उपसंहार** :- "बाळा, आरंभी केवळ हे सत् होते. एक सद्वस्तूच काय ती होती. दुसरे कांहीच नव्हते." त्या सद्वस्तूपासूनच हे सर्व जग निर्माण झाले. हा उपक्रम होय. ह्या सर्व जगाला व्यापून असणारे सूक्ष्म तत्त्व सत्यच आहे, तोच आत्मा आहे आणि **ते तूं आहेस**, असा निष्कर्ष अध्यायाच्या अंतीं काढला आहे. तोच उपसंहार. यावरून ज्या एका सत्यापासून जग निर्माण झाले त्याच परमतत्त्वांत ते लय पावते असे तात्पर्य उपक्रम आणि उपसंहार या दोहोंनी मिळून होणाऱ्या पहिल्या लिंगाने (निकषाने) निघते.

२. **अभ्यास** :- अभ्यास म्हणजे 'ते तू आहेस' किंवा 'मी ब्रह्म आहे' याची पर्यायाने पुनः पुनः आवृत्ती करणे. आरुणीने या ठिकाणी नऊ अभ्यास सांगितले आहेत.

अ. "अन्नाशिवाय जीव फार काळ जगूं शकत नाही. त्यासाठी ह्या शरीराला अन्नमय म्हटले आहे. अन्न जलापासून होते. जलाचा उगम तेजात आहे आणि तेजाचे मूळ हेच सत् आहे. अशा रीतीने ह्या सर्व जीवांचे मूळ सत् म्हणजे ब्रह्मच आहे. हे ब्रह्मच त्यांचा आधार आहे आणि तीच त्यांची परमगति आहे. हे सौम्या, तेच तू आहेस." हा एक अभ्यास झाला. 15 – 20

आ. "पूर्वेकडे वाहणाऱ्या वा पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्या शेवटी सागरालाच मिळतात आणि एकदा सागराला मिळाल्या की ही गोदावरी, ही कृष्णा, ही कावेरी अशा ओळखतां येत नाहीत. त्या सागरच होतात व त्यांचे त्यांनाही वेगळेपणाचे, आपल्या नामरूपांचे भान रहात नाही. त्याच ब्रह्मापासूनच उद्भवलेले ह्या असंख्या जीवांना त्याची जाणीव नसली तरी वाघ, सिंह, लांडगे, किडे, मुंग्या इत्यादी जीव आणि हे सर्व जगत यांचे मूळ तेच सूक्ष्मतर परमतत्त्व आहे. हे सौम्या, तेच तू आहेस."

इ. "आणखी असे पहा मधमाशा निरनिराळ्या झाडांचा आणि फुलांचा रस गोळा करून त्याचा मध बनवतात. मग त्या रसांना निवडतां येत नाही. तसेच सर्व जीव अंती ब्रह्मात लीन झाले की ते ब्रह्ममयच होतात. तेव्हां त्यांना स्वतःला किंवा इतरांना त्यांची वेगवेगळी ओळख पटत नाही. सर्व ब्रह्मच होतात. हे सौम्या, तेच तू आहेस."

ई. वडाच्या फळाचे बीज अतिशय सूक्ष्म असते. फळ फोडून पाहिले तर ते दिसतसुद्धा नाही. पण योग्य जमीन, आवश्यक पाणी आणि अनुकूल ऋतु मिळतांच ते वाढीला लागून त्याचाच विशाल वटवृक्ष होतो. त्याचप्रमाणे सद्ब्रह्म संपूर्ण जगाचे सूक्ष्म आदिकारण आहे. हे सौम्या, तेच तू आहेस.

उ. "आतां पाचवा दृष्टांत ऐक. समुद्राच्या पाण्यापासून काढलेल्या मिठाचा खडा पाण्यात सोडली तर त्याचा मागमूसही रहात नाही; पण पाण्याला खारट चव येते. त्याचप्रमाणे ह्या जगाचे आदिकारण सद्ब्रह्म दिसत नसले तरी सगळ्या चराचर सृष्टीत व्याप्त आहे हे सौम्या, तेच तू आहेस."

ऊ. “मोठ्या झाडाची फांदी तोडली तर तेवढी फांदीच निर्जीव होऊन सुकते. झाड मात्र टवटवीत राहते. जीव शरीरांतून निघून गेला तर शरीर पांच महाभूतांत लीन होते. जीव मात्र कधीच मरत नाही. तो ब्रह्मरूप असल्याने त्याला जन्ममरणादि विकार नाहीत. हे सौम्या, तेच तू आहेस.”

ऋ. “एका माणसाला चोरांनी फलवून नेले आणि दूर देशांत नेऊन, त्याचे हात-पाय-डोळे बांधून निर्जन प्रदेशांत नेऊन सोडले. त्याचा आरडा-ओरडा ऐकून कुणी वाटसरू तिथे आला. त्याने त्याला सोडवले आणि त्याच्या देशाची वाट दाखविली. मग तो बुद्धिमान माणूस त्या दिशेने वाटचाल करून आपल्या घरी पोंचतो. मोक्षमार्गाचेही तसेच आहे. सर्वच जीव मायापाशांत बद्ध असून ज्ञानदृष्टीने वंचित आहेत. त्यांत ज्याला मोक्षाची इच्छा होते तो आध्यात्मिक, आधिभौतिक आणि आधिदैविक तापांनी भाजून सद्गुरूंना शरण जातो. ते गुरुनाथ करुणार्द्र होऊन त्याच्या बुद्धीवरचे मायेचे आवरण काढतात आणि त्याला मोक्षाचा मार्ग दाखवितात. मग तो साधक सद्गुरूंच्याच कृपेने त्यांनी दशर्विलेल्या वाटेने चालून, आपले मूळ स्वरूप जे सद्ब्रह्म ते पावतो. हे सौम्या, तेच तू आहेस.” ‘सद्गुरूवांचोनी सांपडेना (मुक्तीची) सोय (वाट)’ स्पष्ट करणारा हा सातवा अभ्यास आहे.

ऌ. “मृत्युशय्येवर पडलेल्या रुग्णाला पहायला त्याचे आप्त, इष्ट येतात आणि त्याला विचारतात ’मला ओळखले का?’, ’मला ओळखले का?’ कांही काळ तो त्यांना ओळखतो आणि तसे बोलतोही. मग जेव्हां त्याचा आवाज (आणि इतर इंद्रिये) मनांत लीन होतो तेव्हां तो त्यांना ओळखत असला तरी तसे सांगूं शकत नाही. नंतर त्याचे मन प्राणात लीन होते आणि तो त्यांना ओळखूंही शकत नाही. पुढे प्राण तेजांत लय पावतो आणि शेवटी तेज परमात्मस्वरूपी मिसळून जाते. मग कोण कुणाला ओळखेल? बायका-मुले, नातेवाईक आकरोश करीत त्याला बोलावतात तरी त्याची फिरलेली दृष्टी कांही परत येत नाही. त्याचप्रमाणे योगाभ्यास करणाऱ्या साधकाचे भान जाते, इंद्रिये चित्तांत लीन होतात, चित्ताचा विलय प्राणात होतो, प्राणाचा तेजात आणि तेजाचा परमात्मस्वरूपांत! अशा प्रकारे तो योगी ब्रह्मरूप होऊन जातो. त्यावेळी त्याला जगाचेचच भान नसते तर मग तो कुणाला कसा ओळखेल? मृत्यूकाळी आत्मस्वरूपांत लीन होऊन जगाला विसरलेला जीव परत जन्म-मरणाच्या चक्रांत फिरतोच. पण अभ्यासाने आत्मस्वरूपांत विलीन होऊन जग विसरलेल्या योग्याला पुनर्जन्म नसतो. तो या जन्ममरणरूपी संसारांतून मुक्त होतो. अशा रीतीने जगाच्या मुळाशी असलेले सर्वव्यापी सूक्ष्म तत्त्व हे आत्मस्वरूपच आहे, आणि हे सौम्या, तेच तू आहेस!”

ऍ. आतां योगाभ्यासाने आत्मलीन होणारा योगी आणि मृत्यूमुळे आत्म्यापर्यंत पोंचणारा जीव यांतील फरक आरुणीने स्पष्ट केला आहे. “राजाचे दूत चोरीचा आरोप असलेल्याला धरून नेतात. तो आपण चोरी केल्याचे मान्य करीत नाही. मग त्याला तापलेला शूल हातांत धरून दिव्य करायला सांगतात. त्या तप्त शूलाने त्याचा हात भाजला तर त्याला शिक्षा होते. हे त्याच्या पापाचे फळ असते. पण तो जर खरा चोर नसेल तर सत्यतेच्या प्रभावाने त्याचा हात भाजत नाही. तसेच आत्मज्ञानाच्या प्रभावाने अहंकाराचा त्याग करून निरभिमानी आणि निर्लिप्त झालेला साधक यमाच्या

दंडापासून मुक्त होतो आणि इहलोक आणि परलोक या दोन्हीतून सुटून जातो. सर्व जगाच्या मुळाशी तेच सूक्ष्म आत्मतत्त्व आहे. हे सौम्या, तेच तू आहेस. ”

अशा प्रकारच्या नऊ अभ्यासानी तू ब्रह्म आहेस हाच उपदेश अभ्यासकाच्या मनावर ठसवला आहे. हे सर्व अभ्यास मिळून दुसरे लिंग झाले. २१ - ५४

3. **अपूर्वता** :- आपल्या होणारे ज्ञान हे चार प्रकारे होते. आपल्या इंद्रियांद्वारा प्रत्यक्ष पाहिलेले, ऐकलेले, स्पर्शिलेले, चाखलेले किंवा हुगलेले आपल्याला जाणवते. ह्याला **प्रत्यक्ष प्रमाण** असे म्हणतात. हे ब्रह्म इंद्रियांना गोचर नाही. त्यामुळे ते जाणण्याला ह्या प्रत्यक्ष प्रमाणाची उपयोग नाही. कांही वेळा प्रत्यक्ष प्रमाणाने न जाणतां आलेले तर्काने कळते. उद्हरणार्थ अग्नि प्रत्यक्ष दिसला नाही तरी त्याच्याच अंशात्मक निघालेल्या धुराने त्याचे अनुमान करतां येते. हे दुसरे **अनुमान प्रमाण**ही आत्म्याला जाणण्यास असमर्थ आहे. कारण आत्मा निरंश आहे. कांही वेळां अनुभवाच्या कक्षेत न येणाऱ्या वस्तूचे ज्ञान तिच्यासारख्या वस्तूच्या साम्याने करून घेतां येईल. पण ब्रह्मासारखी दुसरी वस्तु त्रैलोक्यांत कुठेही नसल्याने हे तिसरे उपमान प्रमाणही तोकडेच ठरते. ह्या तीनही प्रमाणांच्या कक्षेत ब्रह्म बसत नाही. त्याच्या ज्ञानासाठी वेदांतवाक्य हेच एक प्रमाण आहे. त्यालाच आप्तवाक्य किंवा **शाब्द प्रमाण** असे म्हणतात. हे वरील तीन प्रमाणांनी होणाऱ्या वृत्तिज्ञानाहून विलक्षण असते. हीच ब्रह्माची अपूर्वता आहे. हेच तात्पर्यनिश्चयाचे चौथे लिंग आहे. ५५ – ५८. (क्रमशः

## बोध दत्तमाहात्म्याचा.

### डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १३ वा. (क्रमशः)

**वाक्यविवरण पूर्ण। षड्लिंगांचें कथन। प्रत्येकाचें लक्षण। तत्त्वं पदार्थ लक्षणही।।२८।। तो विष्णु आत्मा तत्पदार्थ। जीव हा त्वं पदार्थ। लक्षलें यांचें ऐक्य यथार्थ। तेराव्यांत असे हें।।२९।।**

**४. फल :-** ह्या वेदांतज्ञानाने जीव आपले सत्य स्वरूप जाणतो. ह्या सत्यस्वरूपाच्या ज्ञानाने तो सर्व दुःखांचे मूळ असणाऱ्या जन्ममरणरूपी संसारचक्रांतून सुटतो. अशा रीतीने ज्ञानी आभासिक जीवदशेपासून वेगळा होऊन आपल्या आनंदरूप आत्म्यात कायमचा स्थिरावतो. हेच तात्पर्य जाणण्याचे पांचवे लिंग आहे.

**५. अर्थवाद** :- प्रतिपाद्य विषयाच्या संबंधांत त्याचा श्रोत्याशी, म्हणजेच जीवाशी तसेच जगताशी असलेला संबंध स्पष्ट करणारी विधाने म्हणजे अर्थवाद असे साधरणपणे म्हणता येईल. ह्यांचाही तात्पर्यनिर्धारणात महत्त्वाची भूमिका आहे. या उदाहरणात सात अर्थवाद दर्शविले आहेत.

अ. **उत्पत्ति** :- सर्व चराचर सृष्टीचे आदिकारण ब्रह्म आहे. आपण मागच्या लेखांत पाहिल्याप्रमाणे ब्रह्मच या जगाचे निमित्त आणि उपादान कारण आहे. ब्रह्माच्याच संकल्पाने आणि ब्रह्मापासूनच विश्वाचा उद्भव होतो.

आ. **स्थिति** :- ते ब्रह्मच या जगताचे अधिष्ठान आहे. एकमेव सत् वस्तु ब्रह्म आहे. त्या ब्रह्मावरच जगग भासते. ब्रह्मच नसते तर हे जग भासले नसते. सायंप्रकाशांत दोरीच नसती तर सापाचा भास झाला नसता. जसे त्या खऱ्या दोरीच्या आधाराने खोटा साप दिसतो तसेच ब्रह्माच्या अधिष्ठानाने जगदाभास पसरला आहे.

इ. **लय** :- आणि त्याच्यातच ह्या जग अंती विलीन होते. दोरीचे ज्ञान झाले की साप आपोआपच नाहीसा होतो. तसेच ब्रह्माचे ज्ञान झाले की जगदाभास मावळतो.

ई. **प्रवेश** – पंचभूतांचा गोळा असलेला ह्या जड पंचकोशात्मक शरीराला चेतविण्यासाठी चैतन्यमय ब्रह्मालाच त्यांत प्रवेश करावा लागतो. सर्वत्र व्यापक, देश-कालादि परिच्छेदरहित ब्रह्माचा शरीरात प्रवेश कसा होऊं शकेल? अशी शंका साहजिकच उद्भवते. ह्या शंकेचे समाधान आरशांत किंवा पाण्यात बिंब जसे प्रतिबिंबरूपाने प्रवेशते तसे हे आहे. त्यावर ब्रह्माला आकार किंवा रूप नाही तर त्याचे प्रतिबिंब कसे होते असा दुसरा प्रश्न पडतो. तर हे चैतन्याचे लोहचुंबकासारखे प्ररोचन (Induction) समजावे. निकटच्या लोहादि चुंबकीय धातूंत चुंबक प्रवेश करतो असे म्हणण्यासारखेच ते आहे. आपली सर्व इंद्रियें ब्रह्माच्याच चैतन्याने सक्षम होतात. डोळ्यांना पहायला, कांनांना ऐकायला, नासिकेला हुंगायला, रसनेला चाखायला, हातांना देण्याघेण्याला, पायांना चालायला इत्यादि सर्व इंद्रियांना त्यांचे त्यांचे कार्य करण्याचे सामर्थ्य हेच शरीरात प्रविष्ट झालेल्या ब्रह्माचे स्वरूप आहे. आपल्याला आपल्याच भाषे समजून देण्याचा हा वेदांचा खटाटोप आहे. त्यांत भाषेच्या मर्यादांमुळे ह्या शंका निर्माण होतात.

उ. **नियमन** :- ह्या सर्वांत प्रवेश करून त्यांचे नियमन म्बणजेच नियंत्रण ब्रह्मच करते. हा पाचवा अर्थवाद.

ऊ. **पदार्थशोधन** :- वर पाहिलेल्या महावाक्यांच्या पदांचा अर्थ शोधणे त्याचे मनन करणे याला पदार्थशोधन असे म्हणतात. 'ते तूं आहेस'; ह्या वाक्यात तीन पदे आहेत, "ते", "तू" आणि "आहेस". यांतील प्रत्येकाचा विचार करून अर्थ समजून घेतला ह्या महावाक्यांचे लक्ष्य ब्रह्म आहे हे कळते.

***यमन***[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

ऋ. **फल** :- ब्रह्मज्ञानाने सर्व कामना पूर्ण होतात आणि अंती निखळ मोक्षाचा लाभ होतो, हे फल.

या सात अर्थवादांचे मिळून पांचवे लिंग होते. फल ह्या चौथ्या लिंगाची गणना इथे अर्थवादातही केली आहे. ५९ – ६७.

६. **उपपत्ती** :- उपपत्ती म्हणजे तर्क. मातीचा घडा होतो. घडा होण्यापीर्वी ती माती असते. घडा फडल्यावर पुन्हा तो मातीच होतो. मधल्या काळांतही तो घडा मातीनेच व्यापलेला असतो. सुरुवातीला पाहिल्याप्रमाणे, माती एकदां जाणून घेतली की सर्वच मातीचे पदार्थ जाणल्यासारखेच आहेत. निरनिराळ्या आकारांना अनुसरून आपण त्याच मातीला सुरई, रांजण, बाहुली, खेळणी अशी निरनिराळी नांवे देतो खरे; पण ते सर्व मातीचेच विकार आहेत. त्याचप्रमाणे ह्या जगांतील सर्व रूपे, रूपानुसार त्यांची नांवे वेगळी असली तरा, एका ब्रह्माचेच विकार आहेत. ही उपपत्ती हे तात्पर्यावधारणेचे सहावे लिंग आहे. ६८ – ७१.

## वाक्यविवरण.

या सहा निकषांच्या आधारे श्रवण करावे. त्यायोगे ब्रह्म आहे की नाही? ब्रह्म एक आहे की अनेक? इत्यादि संशयांचे निराकरण होते. आतां आपण “ते तू आहेस” या महावाक्याचे विवरण समजून घेण्याचा प्रयत्न करू या. या वाक्यात तीनच पदे आहेत. त्यांतील तिसरे पद हे पहिल्या दोन पदांचे ऐक्य दर्शविते. त्यामुळे यांत ती दोनच पदे समजून घेण्याची आवश्यकता आहे. यांपैकी ‘ते ’ या पदाचा (तत्पदाचा) अर्थ परब्रह्म असा आहे आणि ‘तू’ या पदाचा (त्वंपदाचा) अर्थ प्रत्यक् ब्रह्म असा केला जातो.

**त्वंपदार्थ** :- **‘तू’** म्हणजे श्रवण करणारा. जो स्वतः उपस्थित आहे. मीपणाने अनुभवाला येणारा म्हणजेच अपरोक्ष आहे. ह्यालाच प्रत्यक् म्हणजे अंतःस्थ ब्रह्म असे म्हणतात. हा पंचकोशात्मक देहाच्या आंत राहतो. मन आणि बुद्धी यांच्या वृत्तींना, पर्यायाने स्थूल देह, कर्मेंद्रिय आणि ज्ञानेंद्रियांच्या व्यापारांना हा जाणतो, पाहतो. ह्या स्थूल आणि सूक्ष्म देहाच्या जड घटकांचा, उपाधींचा हाच चैतन्यमय **साक्षी** आहे. त्यांच्याशी तो अहंकाराने जोडला गेलेला आहे. म्हणजेच तो या सर्वांचा अभिमानी आहे. ह्या सर्वांच्या क्रिया ‘मी’ केल्या आहेत असे समजतो. असे असले तरी घटादि जड पदार्थांना पाहणारा (द्रष्टा) हा त्यांच्याहून वेगळा असतो, तसाच हा द्रष्टा किंवा साक्षी ह्या स्थूल, सूक्ष्म आणि कारण देहांहून वेगळा आहे. तोच ‘तू’ या पदाचा अर्थ आहे.

जीवाला स्त्रीपुत्रादिक प्रिय असतात. पण त्यांच्याविषयी वाटणारे प्रेम त्यांच्या योगाने स्वतःला होणाऱ्या सुखामुळेच असते. विचार केल्यावर हे लक्षात येऊ शकते की सर्व प्रिय वस्तूंचे प्रेम अंततः स्वतःवरचेच - आत्म्यावरचेच प्रेम असते. आत्म्याच्या आवडीनेच सर्व कांही प्रिय होते अशा अर्थाच्या वेदवाक्याचे हेच मर्म आहे. हा ‘**प्रिय**’ आत्माच ‘तू’ या पदाचा अर्थ आहे. यामुळेच ‘मी असावे’ ही मनाची सहज आणि दृढ प्रवृत्ती असते. देह सुटला तरी हे स्वतःवरचे प्रेम सुटत नाही.

आपण पूर्वीच्या लेखांत पाहिल्याप्रमाणे जाग्रत अवस्थेतील क्षणोक्षणी बदलणारे मनाचे संकल्प आणि विकल्प तसेच बुद्धीचे विवेक आणि निश्चय जाणणारा, स्वप्नावस्थेत आपणच आपल्या चित्तांत निर्मिलेल्या आभासिक सृष्टीत रमणारा आणि झोंपेत अज्ञानात गढून आनंदाचा अनुभव घेणारा सर्व अवस्थांचा साक्षी हाच प्रत्यगात्मा आहे. हाच ‘तू’ या पदाचा अर्थ आहे.

स्थूल आणि सूक्ष्म देह, ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रिये हे सर्व पंचमहाभूतांपासून झालेले जड पदार्थ आहेत. ह्यांचा चेतन नियंता (controller) म्हणजेच ‘तू’ या पदाचा अर्थ आहे. त्याला या सर्वांचा बोध

म्हणजे ज्ञान आहे. तो ह्या सर्वांना फक्त पहात असतो. म्हणून तो साक्षी आहे. त्यांच्या व्यापारांशी, मनाच्या संकल्प-विकल्पाशी, बुद्धीच्या निश्चयाशी, इंद्रियांच्या क्रियांशी वा विषयसेवनाशी, याचा कांहीच संबंध नसतो. तो केवळ साक्षी आहे. अगदी निर्लिप्तपणे तो यांच्याकडे बघत असतो. तो अकर्ता आहे आहे. तसेच ह्या व्यापारांतून होणाऱ्या सुखदुःखांचा त्याच्यावर कांही परिणामही होत नाही. म्हणजेच तो **निर्विकार** आहे. ह्या सर्व जड उपाधींना त्याच्या चैतन्यानेच क्षमता येते. पण तो त्यांच्यापासून अलिप्त आहे, अस्पृष्ट आहे. जसे सर्व जग सूर्याच्या ऊर्जेवरच चालते. पण सूर्याचा न तसा संकल्प असतो न त्याचे सुखदुःख असते. सूर्य आपल्या स्वभावानुसार प्रकाश आणि ऊर्जा यांची उधळण करीत आकाशमार्गाने जातो. मग त्याच्या ऊर्जेने वाळवंट तापो, पाण्याची वाफ होवो, वनस्पतींचे हरिद्रव्य वाढो वा वनांत अग्नि पेटो. ह्या कशाचे त्याला कांही वाटत नाही. तसाच हा त्वंपदार्थ अलिप्त असतो. यालाच **कूटस्थ** असेही म्हणतात. कूट म्हणजे ऐरण. ऐरणीवर घणाच्या आघाताने अनेक हत्यारे घडतात. पण ऐरणीवर तिचा कांहीच परिणाम होत नाही. तसेच या प्रत्यक् ब्रह्माच्या अधिष्ठानाने जीवाचे सर्व व्यापार होतात. पण त्याच्यावर कांही परिणाम होत नाही.

असा हा देह, इंद्रिये, मन आणि प्राण यांच्याहून विलक्षण, निर्विकार, साक्षी, प्रिय, आनंदरूप, चैतन्यमय, बोधरूप असा प्रत्यगात्मा 'तू' या पदाचा अर्थ आहे. हा प्रत्यगात्मा म्हणजे मलीनसत्त्व मायेत पडलेले परमात्म्याचेच प्रतिबिंब आहे. ह्या जीवात्म्याच्या ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति आणि वस्तुशक्ति मर्यादित आहेत. म्हणजेच हा स्वल्पज्ञ, परतंत्र आणि परिच्छिन्न आहे. ७२ - ८२

**तत्पदार्थ** :- तत् म्हणजे ते. जे इथे नाही ते. जे प्रत्यक्ष अनुभवाला येत नाही ते. ह्यालाच **परोक्ष** असे म्हणतात. ह्या पदाचा अर्थ यथार्थतेने जाणला की सर्व अनर्थ आणि त्यांचे कारण हा आभासिक संसार मुळापासून नष्ट होतात. हा एकच एक आहे. ह्याच्याहून वेगळे सर्व आभासात्मक आहे. हा चांगला समजून येण्यासाठी प्रथम त्याच्यापेक्षां वेगळ्या भासणाऱ्या सर्व गोष्टी बाजूला साराव्या लागतात. ह्यालाच अतद्व्यावृत्ती – जे तत् नाही त्या सर्वांचे निराकरण, असे नांव आहे. अशा रीतीने चित्त जगदाभासातून काढून अंतर्मुख करून, वेदांनी विधिमुखाने निर्देश केलेल्या तत् (ब्रह्म) पदार्थावर केंद्रित करावयाचे आहे. विधिमुख म्हणजे ब्रह्म कसे आहे त्याचे विधान. अशा रीतीने निदिध्यासन केले की साधक स्वतःच ब्रह्मरूप होतो.

हा सर्वव्यापी परमात्मा (विष्णु) संसारधर्मांनी रहित आहे. तो स्थूल नाही की सूक्ष्म नाही; तो डोळ्यांनी पाहतां येत नाही, कानांनी ऐकतां येत नाही, जिभेने चाखतां येत नाही. तो सर्व इंद्रियांच्या अतीत आहे. निरतिशय आनंद हेच त्याचे स्वरूप आहे. तोच त्रिकालाबाधित सत्य आहे आणि तोच सर्व कांही जाणणारा आहे. हाच **सच्चिदानंद परमात्मा अपरिच्छिन्न आणि सर्वव्यापक** आहे. ही त्याची स्वरूपलक्षणे होत.

तोच **सर्वशक्तिमान, सर्वांचा ईश्वर आणि सर्वतंत्रस्वतंत्र** आहे. ज्याला जाणले की सर्व जाणल्यासारखे होते. तोच आपल्या माया नांवाच्या शक्तीने हे जग निर्माण करतो, धारण करतो आणि नष्ट करतो. ह्या आभासात्मक विश्वाचा तोच आधार (अधिष्ठान) आहे. या चराचर सृष्टीतीतल सर्व जीवांच्या शरीरांत प्रवेश करून (त्यांच्यात प्रतिबिंबित होऊन किंवा त्यांना भारून) त्यांना चेतविणारा आणि त्यांचे नियमन करणारा हाच तत्पदार्थ होय. त्यांच्या सर्व चांगल्या-वाईट कर्मांची तसतशी फळे हाच तत्पदार्थ देतो. पण हा स्वतः मात्र त्या कर्मांपासून अलिप्त असतो आणि म्हणूनच निर्विकार असतो. जगाच्या उत्पत्ति-स्थिति-लय-प्रवेश-नियमन इत्यादीशी संबंधित लक्षणांना **तटस्थलक्षणे** असेही म्हटले जाते. कारण

जगत आणि संसार अखंडैकरस परमात्म्याच्या ठिकाणी होणारे आभास आहेत. अध्यासात्मक आहेत. अंधारांत दोरीवर भासणाऱ्या सापाचा जसा दोरीशी संबंध नसतो तसाच जग आणि संसार यांच्याशी परमात्म्याचा संबंध होऊंच शकत नाही. असा हा नित्य, सच्चिदानंदस्वरूप, अमृताच्या झऱ्यासारखा तत् पदार्थ आहे. ८३ - ९१

**लक्षणा** :- त्वंपद म्हणजे जीवात्मा आणि तत्पद म्हणजे परमात्मा ह्यांचे सकृद्दर्शनी कळणारे अर्थ आपण संक्षेपाने वर पाहिले. यांना **वाच्यार्थ** अशी पारिभाषिक संज्ञा आहे. या दोन्हींच्या वाच्यार्थात खूपच अंतर दिसते. असे असतांना महावाक्याने 'असि' पदाने यांचे ऐक्य कसे दाखविले हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. यावरून सकृद्दर्शनी जाणवणारा वाच्यार्थापेक्षा वेदांना अभिप्रेत असणारा मुख्य अर्थ – **लक्ष्यार्थ**, वेगळाच असला पाहिजे असा निष्कर्ष निघतो. अशा ठिकाणी लक्ष्यार्थाचा बोध होण्यासाठी उपयोगांत येणाऱ्या विचारपद्धतीला लक्षणा असे म्हणतात. आपल्या नित्याच्या व्यवहारातही आपण लक्षणेचा उपयोग करीत असतो. उदाहरणार्थ कुणी एखाद्याला "फार शहाणा आहेस" असे म्हटले तर ते शब्दशः तसे नसते हे लक्षात यायला फारशा शहाणपणाची गरज नसते. इथे शहाणा हा अर्थ सोडून द्यायचा असतो आणि 'वेडा' असाच अर्थ घ्यायचा असतो. ज्या लक्षणेत वाच्यार्थ असा टाकून वेगळाच अर्थ निघतो तिला जहत् (टाकणे) लक्षणा असे नांव आहे. संधि होऊन ही जहल्लक्षणा होते. हिचे पारंपरिक उदाहरण 'गंगायां घोषः' म्हणजेच 'गंगेवरचा गोठा' हे आहे. इथे 'गंगेवर'चा अर्थ कांठावर असा घ्यायचा असतो; कारण गंगेवर गोठा राहूंच शकत नाही. कांही ठिकाणी अर्थ लावतांना वाच्यार्थाबरोबर आणखीही कांही अर्थ जोडावे लागतात. उदाहरणार्थ 'कावळ्यापासून अन्न राख' म्हणजे कावळे आणि इतरही पशुपक्षी यांच्यापासून अन्नाचे रक्षण करावे असा घ्यायला पीहिजे. कावळ्याना हांकलायचे आणि गाईगुरांना अन्न खाऊं द्यायचे असा नाही. ज्या लक्षणेत असा अधिक अर्थ जोडावा लागतो तिला 'अजहल्लक्षणा' असे नांव आहे.

ह्याशिवाय आणखी एक लक्षणेचा प्रकार असतो. श्रीस्वामी महाराजांनी इथे 'तो हा देवदत्त' हे उदाहरण घेतले आहे. ह्यांत 'तो' ह्या शब्दाने (पदाने) भूतकाळांत, इतरत्र, अन्य अवस्थेत पाहिलेला असे सांगायचे आहे. तसेच 'हा' शब्दाने आत्तां - वर्तमान काळांत समोर दिसणारा असा बोध होतो. ज्याला ऐकणाऱ्याने पूर्वी कधी तरी तारुण्यावस्थेत काशीमध्ये राज्य करीत असतांना पाहिला होता 'तो' देवदत्त आणि आत्तां आपल्यासमोर उपस्थित असलेला राज्य गमावलेला 'हा' म्हातारा देवदत्त ह्यांचे ऐक्य ह्या वाक्याने सांगायचे आहे. ऐकणारा सहजच या दोन पदांतील अवस्था – राजा आणि रंक, काळ - तारुण्य आणि वार्धक्य, देश – काशी आणि इथे हे सर्व विरुद्ध अर्थ टाकून देतो आणि आपल्या मित्राला देवदत्ताला ओळखतो. इथे विरुद्ध वाच्यार्थ टाकले आणि समान वाच्यार्थ घेतले म्हणून ह्या लक्षणेला **जहदजहल्लक्षणा** असे म्हणतात. ह्या लक्षणेत वाच्यार्थाचा कांही भाग सोडून दिला म्हणून तिला **भागत्यागलक्षणा** असेही नांव आहे. अशा रीतीने जो ग्राह्य अर्थ उरतो त्याला लक्ष्यार्थ असे म्हणतात. ९२ - ९६

आता आपण ह्या पद्धतीने 'तू' आणि 'ते' ह्या पदांच्या अर्थांचा विचार करू या. खालील तालिकेत त्वंपदाचे आणि तत्पदाचे वाच्यार्थ दिले आहेत.

| | त्वंपद | तत्पद |
|---|---|---|
| | सुखी-दुःखी (देह, इंद्रियें, मन, बुद्धी यांच्या अनुकूल आणि प्रतिकून संवेदनांनी सुखावणारा किंवा दुखावणारा) | निर्विकार |
| | कर्ता-भोक्ता (कर्माचे कर्तृत्व आणि भोकृत्व स्वतःकडे घेणारा) | अकर्ता |
| | किंचिज्ज्ञ. उपाधींच्या चष्म्यातूनच पाहणारा, जगाचा अनुभव घेत असल्याने त्याच्या ज्ञानाला त्यांच्या सीमा पडल्याने त्याचे ज्ञान मर्यादित आहे. | सर्वज्ञ |
| | अपरोक्ष | परोक्ष |

आतां हे सर्व विरुद्ध वाच्यार्थ सोडून विचार केला लक्ष्यार्थ सांपडतो. सुख आणि दुःख देहादि उपाधींचे आहे. जीवात्मा फक्त साक्षी आहे. विवेकाने विचार करून, अतत् लक्षणांना दूर सारून (त्यांची व्यावृत्ती करून) मनन केल्याने ह्या जीवात्म्यापर्यंत पोंचतां येते. त्या वेळी तो निर्विकार, चेतन आणि आनंदरूप  आहे अशीच प्रचीती येते. मदालसेचा पुत्र राजा अलर्क बंधूबरोबरच्या युद्धांत पराजय पावून, आईच्या आदेशानुसार दत्तप्रभूंना शरण आला आणि 'मी अत्यंत दुःखी आहे, मला यांतून सोडवा' अशी प्रार्थना करूं लागला. ही गोष्ट पुढे सविस्तर येणारच आहे. त्यावेळी भगवंतांनी त्याला तुझे दुःख कुठे आहे ते दाखवायला सांगितले. त्याने त्याप्रमाणे आपल्या अंतरांत त्याचा शोध केला. तेव्हां भगवान दत्तात्रेयांच्या कृपेने तो दुःख झालेल्या 'मी'ला शोधत आपल्या आत्मरूपापर्यंत पोहोंचला. तिथे तर केवळ सुखच सुख होते. दुःखाचा मागमूसही त्याला सांपडला नाही. अशी कथा आहे. अशा रीतीने जीवात्मा आनंदरूप आहे आणि दुःख आगंतुक आहे हे सिद्ध होते. तसेच जीवात्मा साक्षी आहे. इंद्रियादिकांचे कर्तृत्व भ्रमाने स्वतःवर लादून घेतो. देह, इंद्रिये, मन, बुद्धि हे सर्व आभासिक आणि पांचभौतिक असून जड आहेत. याउलट प्रत्यगात्मा सत्यरूप चेतन आहे. तो देहादिकांचा प्रकाशक आहे आणि म्हणूनच तो स्वयंप्रकाश आहे. तत्पदाची हीच सत्य, ज्ञान, आनंद लक्षणे वेदांनी प्रतिपादलेली आहेत. परमात्मा सच्चिदानंदस्वरूप आहे. अशा रीतीने दोन्ही पदांचे लक्ष्यार्थ समान होतात. ह्या महावाक्याच्या लक्ष्यार्थाच्या निदिध्यासनाने ह्या दोन्हींचे सामरस्य अनुभवून जीव मुक्त होतो. 'तें' ब्रह्म 'मी'. आहे आणि 'मी'च 'तें' ब्रह्म आहे ह्याची जाणीव शिष्याला करून देण्यासाठी या महावाक्यांची योजना आहे. सद्गुरूंकडून महावाक्यांचा लक्ष्यार्थ अवगत करून घेणे हेच श्रवण आहे. त्याचेच मनन करून तो अर्थ मनांत बिंबला की त्याच्या अखंड ध्यानाने संसाराचे बंध तुटून मुक्तीच्या अढळपदावर जीव विराजतो. ९७ – १०८

प्रत्यगात्म्याचे आणि परब्रह्मस्वरूपाचे अखंडैकरसत्व अनुभवणे हेच सर्व आध्यात्मिक साधनांचे अंतिम लक्ष्य आहे. ह्या संदर्भात साधकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असा प्रत्यागत्मा या विषयाचा आणखी एक पैलू, इथे श्रीस्वामी महाराजांनी उघड चर्चिला नसला तरी मननीय आहे. कठोपनिषदांत (२:१:१) असे म्हटले आहे की 'विधात्याने इंद्रिये बहिर्मुखच केलेली असल्याने ती बाहेरचेच विषय पाहतात; आंतला आत्मा पाहू शकत नाहीत. एखादाच धैर्यशाली पुरुष इंद्रिये आंत ओढून 'प्रत्यगात्म्या'ला पाहतो.' आपण

वर प्रत्यागात्म्याचे स्वरूप जाणण्याचा प्रयत्न केला. तो सत्य आहे, चेतन आहे आणि प्रिय म्हणजे आनंदरूप आहे. तो अपरोक्षपणे 'मी' म्हणणारा आहे. पण त्याला पाहणे म्हणजे काय? कुणी म्हणतील पाहणे म्हणजे जाणणे किंवा ओळखणे. पण तो एकमेवाद्वितीय जाणणारा आहे. त्याला कसे जाणतां येईल? कठोपनिषदात पाहणे (ऐक्षत) असा शब्दप्रयोग आहे. पाहणे याचा अर्थ अनुभवणे असा करतां येतो. आपल्या मनांत, चित्तात किंवा चिदाकाशांत ह्या प्रत्यागात्म्याचा अनुभव घेणे हा परमार्थमार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा आहे.

योगशास्त्रानुसार हा अनुभव येण्यासाठी कर्मसाम्यदशा निर्माण झाली पाहिजे. जीवाच्या पाप आणि पुण्याचे प्रमाण सारखे झाले पाहिजे. हे संत तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे '***संतचरणरज लागतां सहज***' घडते. भागवतांत जडभरताने रहूगणराजाला केलेल्या उपदेशांत ह्यालाच '***महत्पदरजोऽभिषेक***' म्हणजेच संतांच्या पदधूलीचा अभिषेक म्हटले आहे. हा झाला की '***वासनेचे बीज जळुनी जाय***'. 'मग रामनामी उपजे आवडी, सुख घडोघडी वाढों लागे.' क्षणाक्षणाला वाढणारे सुख, रामनामांत उपजलेली आवड ही लक्षणे प्रत्यागात्म्याच्या अनुभूतीची आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'मग जे जे कां निमिख। देखेल माझे सुख। तेतुलेनि अरोचक। विषयीं घेईल।।१२:१०४।। ' ह्या अभ्यासयोगानेच साधक 'तैसे भोगाआंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां। हळुहळू पंडुसुता।मीचि होईल।।१०९।।' अर्थात् आत्मरूप होईल असे संतश्रेष्ठांचे म्हणणे आहे.

संत म्हणजेच सद्गुरु! सद्गुरूंची कृपा झाली की मन अंतर्मुख होते आणि सतत वाढणारी अशी सुखद अनुभूति निर्माण होते. ह्याच अनुभूतीला पतंजलींनी '**प्रत्यक्चेतनाधिगम**' म्हटले आहे. ह्यालाच तंत्रशास्त्रात शक्तिपात असे नांव आहे. स्पर्शाने, दृष्टिक्षेपाने, मंत्रद्वारा किंवा संकल्पानेसुद्धा हे महात्मे असा शक्तिपात किंवा शक्तिसंक्रमण करू शकतात. ह्यालाच कुंडलिनीचे प्रबोधन (जागरण) असेही म्हटले जाते.

अशा रीतीने येणारे अनुभव हे साधकाच्या चित्तात प्रकाशलेले आत्मस्वरूपच असते. एकच वीज जशी माध्यमाच्या वैशिष्ट्याने नाद (रेडिओ, स्टिरिओ इ.), प्रकाश (बल्ब, ट्यूब् इ.), प्रतिमा (चित्रवाणी, चित्रपट) किंवा गति (पंखा, मिक्सर इ.) अशा विविध रूपांत अनुभवाला येते, त्याचप्रमाणे हा प्रत्यगात्मा प्रकाश, नाद, दर्शने, क्रिया अशा अनेक स्वरूपांत अनुभवाला येतो. हे सर्व साधकाच्या प्रकृतीनुसार होते. हे नाद, प्रकाश, प्रतिमा, आदेश, दर्शने, विविध क्रिया इत्यादि अनुभवांच्या मालिकांतून साधकाचे चित्त शुद्ध होत जाते. मनांत साचलेल्या जन्मोजन्मीच्या संस्कारांचा निचरा होतो. चित्त नितळ, भक्तिमय आणि पारदर्शक होत जाते. अष्ट सात्त्विक भाव साधकाच्या ठिकाणी प्रकटतात. त्यांत बिंबणारा प्रत्यगात्मा स्पष्टतर होत जातो. संत तुकाराम महाराजांच्या शब्दांत, '***कंठी बाष्प दाटे नयनी नीर लोटे। हृदयीं प्रकटे राम(आत्म)रूप***' साधकावस्थेत अनुभवाला येणारे आत्मस्वरूप हे त्याच्या मन, बुद्धि आदि कोशांतून परावर्तित झालेल असते. खिडकींतून येणारा सूर्यप्रकाश जसा खिडकीचा आकार, कांचेचा रंग इत्यादि धारण करतो तद्वत्‌च आत्मस्वरूप साधकाच्या मन-बुद्धि आदि उपाधींचे गुण धारण करतो. त्या त्या साधकाच्या आशयानुसार अनुभूतीचा घाट असतो. याविषयी भगवद्‌गीतेच्या २ऱ्या अध्यायांतला २९वा श्लोक विचारणीय आहे-

**आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः।**
**आश्चर्यवच्चैनमन्यच्छृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।।**

सद्‌गुरुकृपेने अंतरांतील शक्ति जागृत झाल्यावर जे अलौकिक अनुभव येतात त्यांनी तो आश्चर्याने भारावून जातो. कुणाला मूर्ति वा कुणाला अमूर्त प्रकाश दिसतो, कुणाच्या मुखांतून दिव्य वाणी निःसृत होते तर कुणाला दिव्य नाद ऐकायला येतात. मात्र हे सर्व अनुभव कुठून कसे आले हे कुणीहि जाणूं शकत नाही. व्यक्ति तितक्या प्रकृति ह्या न्यायाने ह्या अनुभवांमध्ये असीम वैविध्य आहे. अनेक तंत्रग्रंथांतून, संतवचनांतून ह्यांचे वर्णन वाचायला मिळते. दिव्य नाद, दिव्य स्पर्श, दिव्य रस, दिव्य रूप व दिव्य गंध तसेंच नाना

प्रकारच्या क्रिया, काव्यस्फूर्ति, दिव्य गायन, योगशास्त्रांतील बंध, मुद्रा इत्यादि साधकांकडून सहज घडतात. संत-सत्पुरुषांची दर्शने, देव-देवतांशी संपर्क, मंत्रशक्तीची जागृति, ध्यान-ध्यारणा-समाधि ह्या राजयोगाच्या भूमिका हे सर्व त्या आत्म्याचेच आविष्कार आहेत. हे उपाधिविशिष्ट आत्मस्वरूप आहे.

प्रत्यक् ब्रह्म हे अध्यात्ममंदिराचे प्रवेश द्वार आहे, तर व्यापक पूर्णब्रह्म ही त्या मंदिराच्या गाभ्यांतील सिंहासनाधिष्ठित मूर्ति आहे. हेच सर्व साधनांचे साध्य आहे. हीच आध्यात्मिक जीवनाची सफलता आहे. प्रत्यक् ब्रह्माच्या अनुभूतीत अहंकार सूक्ष्म वा क्षीण स्वरूपांत शिल्लक असतो. तो इथे पूर्ण नाहीसा होऊन जातो. हीच जीवन्मुक्तावस्था म्हणतात.

संत नामदेवांचे उदाहरण फार उद्बोधक आहे. त्यांच्या भक्तीने, तपस्येने प्रत्यक्ष पांडुरंग त्यांच्याशी बोलत, त्यांचा नैवेद्य ग्रहण करीत. हे प्रत्यक् ब्रह्माचेच उदाहरण आहे. पण इथे पांडुरंग माझा आहे, माझ्याशी बोलतो असा अहंकारही आहे. शिवाय पांडुरंगाला नामरूपाचे परिमाण आहे. त्यामुळेच संतांच्या सभेत गोरोबाकाकांच्या थापटीला हे 'मडके' कच्चे लागले. अगदी मुक्ताबाईसारख्या चिमुरडीसह सर्व संतांनी ह्याला दुजोरा दिला. हा अपमान नामदेवरायांना झोंबला. ते कळवळून पांडुरंगाकडे गेले. हे गाऱ्हाणे देवापुढे मांडले. देव तरी संतवचनाच्या कसा विरुद्ध जाणार? मग देवाच्या सांगण्यावरून नामदेव औंढ्या नागनाथला विसोबा खेचरांकडे गेले. विसोबा त्यांना महादेवाच्या पिंडीवर पादत्राणासहित पाय ठेवून बसलेले दिसले. नामदेवांनी त्यांचा निषेध केला तर विसोबांनी आपली अगतिकता प्रकट केली व नामदेवांनाच तो पाय उचलून पिंड नसलेल्या स्थानीं ठेवायला सांगितले ! नामदेवांनी तो पाय उचलून जिथे ठेवावा तिथे तिथे पिंड उगवावी ! ह्या चमत्काराने नामदेवरायांचा उरलासुरला अहंकार गळून पडला, उपाधींचा पूर्ण निरास झाला आणि सर्वव्यापक पूर्ण ब्रह्माचे दर्शन त्यांना झाले. गुरुकृपेच्या भट्टींत मडके पक्के भाजून निघाले.

हे कांही दुसरे नवे ब्रह्म आले असे नाही. एकच ब्रह्म, ज्यात बुद्ध्यादिक उपाधींच्या मालिन्याने विकार झाल्यासारखा भासत होता, त्याचेच शुद्ध, निष्कल, निर्विकार, स्वसंवेद्य स्वरूप आतां बुद्ध्यादिकांच्या शुद्धीनंतर अनुभवाला येते. अनुभवाला येते हासुद्धां शब्दप्रयोग तोकडा आहे. इतके दिवस आपले जे वेगळेपण जाणवत होते त्याचा निरास होऊन मीच सर्वव्यापी, अविनाशी, अखंडैकरस, आनंदघन, चिद्रूप, अद्वितीय आत्मा आहे असा प्रत्यय **आला की साधकाचा सिद्ध होतो.**

**असे हे गुरुदत्त साधन 'सुलभ, गोमटे' आहे; पण ते पूर्वपुण्याईनेच प्राप्त होते. *तुका म्हणे साधन सुलभ गोमटे। परी उपतिष्ठे पूर्वपुण्यें*।**

**प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा तेरावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.**

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय १४ वा.

जें स्वर्गोपविष्ट देवांही। सुख ठावें होत नाहीं। अष्टांगयोगें तेंही। मिळे निश्चित अभ्यासें।।३०।।
हें नृपा सांगे दत्त। यमनियमासन यथार्थ। प्राणायामादिक समर्थ। चौदाव्यांत बोलिला।।३१।।

## अष्टांगयोग

गेल्या तीन अध्यायात अर्जुनाला दत्तप्रभूंनी ज्ञानयोग समजावून सांगितला आहे. श्रीसमर्थांच्या शब्दांत 'ओळखावे आपणांस आपण, या नांव ज्ञान.' हे जगत आध्यासिक असून फक्त ब्रह्मच खरे आणि शाश्वत आहे. जीव हा दुसरा कुणी नसून ब्रह्मच आहे. (ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या, जीवो ब्रह्मैव नापरः) केवळ गुरुमुखांतून श्रवण केले तरी मनन आणि निदिध्यासनाने त्याचा प्रत्यक्ष () अनुभव घेतल्यावरच म्हणजे अपरोक्ष ज्ञानानेच मोक्ष लाभतो (ज्ञानादेव तु कैवल्यम्) असा अद्वैत वेदांताचा मुख्य सिद्धांत आहे. मोक्ष म्हणजे सर्व दुःखांचा शेवट होऊन पूर्ण, अक्षय, शाश्वत आनंदाची स्थिति. हेच मानवी जीवनाचे साध्य आहे, परम कर्तव्य आहे. हे सर्व करण्यासाठी मन स्थिर करण्याची नितांत आवश्यकता आहे. अर्जुनाने भगवद्गीतेत (6:34) श्रीकृष्णांना विचारल्याप्रमाणे मन खरोखर चंचल, बलवान आणि प्रक्षोभक आहे. त्याला आवर घालणे वाऱ्याची मोट बंधण्यापेक्षांही कठिण आहे. या मनावर ताबा मिळविण्यासाठी योगाचा अभ्यास आवश्यक आहे. कर्म, योग आणि ज्ञान या तीन मार्गांचा अन्योन्य संबंध गीतेच्या त्याच अध्यायात (6:3) सुरुवातीलाच स्पष्ट केला आहे. योगामध्ये प्रावीण्य मिळविण्यासाठी आधी विहित कर्माचे निष्काम आचरण केले पाहिजे. इथे योग या शब्दाने अष्टांगयोगच अभिप्रेत आहे. सहाव्या अध्यायात त्याचाच मुख्य उपदेश भगवंतांनी केला आहे. अष्टांगयोगांत प्रवीण्य मिळवल्यावर तो कर्माचा उपशम करून ज्ञानयोगाच्या अभ्यासाला योग्य होतो. म्हणजेच ज्ञानयोगाच्या प्राप्तीसाठी प्रथम कर्मयोग आणि अष्टांगयोग सिद्ध केले पाहिजेत असा श्रीकृष्णांचा उपदेश आहे.

अष्टांगयोग म्हटल्यावर बरेच लोक म्हणतात की 'तो आमचा मार्ग नाही. आम्ही भक्तिमार्गाचे (किंवा कर्ममार्गाचे अथवा ज्ञानमार्गाचे) उपासक आहो.' असे म्हणणे म्हणजे ह्यापैकी कुठलाच मार्ग किंवा त्या मार्गांचे ध्येय यांविषयींचे आपले अज्ञान प्रकट करणे आहे. प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांनी योगरहस्यात म्हटल्याप्रमाणे, "*भक्तिक्रियाज्ञानयोगान्मुक्तिरुक्तापि तत् त्रयम्। ज्ञेयं साष्टांगयोगांतर्गतं द्वैधमतोत्र नो।।5।।*" भक्ति, कर्म आणि ज्ञान या मोक्षाच्या तीनही मार्गांचा समावेश अष्टांगयोगांत होतो. त्यामुळे हा अष्टांगयोग हा कांही यांपेक्षा वेगळा असा मार्ग नाही. श्री टेंबे स्वामी महाराजांनीच इतरत्र म्हटल्याप्रमाणे *त्रिभिर्योगपथैरेव परस्परसहायकैः। ब्रह्माद्वंद्वं समं शांतं गम्यते नैकयोगतः।।3।।* कर्म, भक्ति आणि ज्ञान यां तीनही एकमेकांना पूरक आणि साह्यभूत असणाऱ्या योगमार्गांनीच द्वंद्वातीत, सम आणि शांत अशा ब्रह्माची प्राप्ती होते. यांपैकी एकानेच नव्हे. योगवासिष्ठांतही 'रामा, संसाराच्या हालाहलाच्या वेगाने होणाऱ्या दुःसह वेदना अष्टांगयोगाच्या गारुड मंत्रानेच शमतात.' ('*दुःसहा राम संसार-विषवेगविषूचिका । योगगारूडमंत्रेण पावनेनोपशाम्यति*' वचन आहे. 1 – 2.

आतां ह्या योगाला अष्टांगयोग का म्हणायचे ते पाहू या. पतंजलीप्रणीत योगात आठ अंगांचे प्रतिपादन आहे. ही अंगे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी अशी आहेत. यांपैकी यम आणि नियम हे मानवमात्रांत स्वाभाविकच असतात. वैदिक धर्माखेरीज भारतीय

---

***यमन***[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

आणि भारताबाहेरच्या धर्मातही अहिंसा, सत्य इत्यादि यम आणि तप, शौच आदि नियम मूलभूत मानले जातात. त्यामुळे ही दोन योगांगात न मोजता काही लोक षडंग योगाचे प्रतिपादन करतात. आणखी एक मान्यतेनुसार समाधीचे सविकल्प आणि निर्विकल्प हे दोन प्रकार वेगळे करून त्यापैकी निर्विकल्प समाधी हे योगाचे साध्य असल्याने त्याची गणना योगांगात करीत नाहीत. मात्र सविकल्प समाधी तेवढी योगाच्या अंगात धरून आठ अंगांचेच प्रतिपादन करतात. 3 - 4

## यम

यम या शब्दाचा अर्थ निर्बंध, लगाम किंवा नियंत्रण. आपल्या व्यावहारिक जीवनात सात्त्विकता आणण्यासाठी स्वच्छेने स्वीकारलेले निर्बंध म्हणजे यम. आपल्या जीवनांत रज आणि तम गुणांचे मालिन्य वाढविणाऱ्या दोषांपासून दूर राहण्यासाठी यमांची योजना आहे. हे श्रीस्वामी महाराजांनी दहा सांगितले आहेत. *अहिंसा सत्यमस्तेयं ब्रह्मचर्यं क्षमा धृतिः। दयार्जवं मिताहारः शौचं चैव यमा दश।।* (दत्तपुराण 7:1-2)

**अहिंसा** – जीवमात्रांना काया, वाचा अथवा मनाने त्रास न देणे हा पहिला यम आहे. महर्षि वेदव्यासांनी सर्व धर्माचे सार अर्ध्या श्लोकांत सांगितले आहे. 'परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्' कोणत्याही प्राण्याला त्रास देऊन केलेले पुण्य हे पापालाच कारण होते. सर्वांतर्यामी ईश्वरच आहे. तेव्हां कुणालाही केलेली पीडा ही ईश्वराचाच अपराध आहे ही भावना इथे मुख्य आहे. अर्थात् दूरगामी कल्याणाच्या उद्देशाने केलेली तात्कालिक हिंसा त्याज्य नाही हा विवेक इथे लक्षांत ठेवणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, शल्यशास्त्रज्ञाने रोग्याच्या शरीराची चिरफाड त्याच्या आरोग्यासाठी केलेली असल्याने ती दोषास्पद नाही. तसेच पाल्याला किंवा विद्यार्थ्याला त्याला चांगले वळण लावण्यासाठी केलेले वाचिक किंवा कायिक ताडन हिंसेत गणले जात नाही. या संदर्भांत संत ज्ञानेश्वर महाराजांनी केलेली व्याख्या अधिक समर्पक आहे. 'आणि जगाचिया सुखोद्देशे। शरीरें वाचा मानसें। राहाटणे तें अहिसे। नांव येथ।।6:114।।'

**सत्य** – हा वाचेचा यम आहे. बोलणे यथार्थ आहे. म्हणजे जसे आपल्याला माहीत आहे तसे! पण त्याचबरोबर ते मृदुसुद्धां असले पाहिजे. मनुस्मृतीत सांगितले आहे, '*सत्यं ब्रूयात्* प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्।' संतशिरोमणि ज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत, *'तैसे साच आणि मवाळ। मितले परि सरळ। बोल जैसे कल्लोळ। अमृताचे।।१३:२६९।।'* बोचरा परखडपणा सत्याच्या व्याख्येत बसत नाही. दुसऱ्याला खुपणारे सत्य एक वेळ न सांगितले तरी चालेल. तसेच सत्य ऐकल्याने त्याचा परिणाम ऐकण्याऱ्याच्या किंवा इतराच्या अहितात होत असेल तर ते न सांगणेच बरे. गाय शोधणाऱ्या खाटकाला तिचा खरा ठाव सांगणे निषिद्धच आहे. कुणाला अडचणीत आणण्यासाठी, त्याचा घात करण्यासाठी किंवा वर्मावर बोट ठेवण्यासाठी बोललेले सत्य पापातच जमा होते.

**अस्तेय** – इतराची वस्तु वा धन त्याने न देता, त्याच्या परवानगीशिवाय, त्याला न विचारता घेणे म्हणजे स्तेय किंवा चोरी. कुणाचीही गवताची काडीसुद्धा न चोरणे, त्याची इच्छाही न करणे याचे नांव अस्तेय. लोकांचे सामाजिक किंवा वैध अधिकार बळकावणे, दडपणे ही चोरीच आहे. तसेच आपल्या अधिकाराच्या दबावाने अडवणूक करून पैसे, वस्तु किंवा अन्य इष्ट मिळवणे हीसुद्धा चोरीच आहे. ह्या सर्वांपासून अलिप्त राहणे म्हणजेच अस्तेय.

**दया** – दीन, दुःखी, अगतिक जनांविषयी वाटणारी सहज, निरपेक्ष समवेदना म्हणजे दया. रंजल्यागंजल्यांना आपले म्हणणे म्हणजे दया. 'पराई पीड' जाणणे म्हणजे दया. 'बुडती हे जन

देखवेना डोळां। म्हणोनि कळवळा येतसे।' ही सर्वश्रेष्ठ दया आहे. भूतमात्रांच्या दुःखाचा पडसाद आपल्या चित्तांत उमटणे ही दया आहे. प्राणिमात्रांसंबंधी अपार करुणा हेच साधूचे व्यवच्छेदक लक्षण आहे. यासाठीच 'तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।' असे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज महणतात.

**ब्रह्मचर्य** – शरीराने, मनाने आणि सर्व अवस्थांत सदैव मैथुनाचा त्याग करणे म्हणजे ब्रह्मचर्य. मैथुनाचीही आठ अंगे शास्त्रात वर्णिली आहेत. कामवश होऊन केलेले (स्त्रीने पुरुषाचे किंवा पुरुषाने स्त्रीचे) **स्मरण**, कामक्रीडेचे **कीर्तन** (वर्णन), कामाच्या हेतून प्रेरित होऊन केलेली **क्रीडा**, कामेच्छेने स्त्रीकडे (किंवा पुरुषाकडे) पाहणे **(दर्शन)**, एकमेकांबरोर एकांतांत **भाषण**, संभोगाचा **संकल्प, अध्यास** आणि प्रत्यक्ष **संभोग** अशी मैथुनाची आठ अंगे आहेत. योगाभ्यासी माणसाने ह्या आठही प्रकारच्या मैथुनांपासून दूर राहणे आवश्यक आहे.

ब्रह्मचारी आणि संन्यासी साधकांसाठी हा नियम आहे. गृहस्थाश्रमांतील साधकांसाठी शास्त्राने 'ऋतुकाली भार्यागमन' अशीच ब्रह्मचर्याची व्याख्या आहे. ऋतुस्नात झाल्यापासून चौदा दिवसांचा काल शास्त्राने ऋतुकाल मानला आहे. त्यांतील अशुद्धीचे पहिले चार दिवस सोडल्यावर दहा दिवस राहतात. तेच मैथुनाला ग्राह्य मानले आहेत. त्यांतही एकादश्यादि व्रतांचे, श्राद्धाचे दिवस तसेच मघा आणि रेवती ही नक्षत्रे त्याज्य मानली आहेत. अशा प्रकारे संयमाने वागणाऱ्या गृहस्थांना नैष्ठिक ब्रह्मचर्याचेच फळ मिळते असे शास्त्र सांगते.

ब्रह्मचर्याचा अर्थ कामप्रवृत्तीचे नियंत्रण. इतर प्राण्यांत कामप्रवृत्तीला नैसर्गिकच मर्यादा असतात. सस्तन प्राण्यामध्ये वर्षातून एकदांच मादीला ऋतु प्राप्त होतो आणि त्या काळांतच ती समागमाला उद्युक्त होते. नरांनासुद्धा कांमोत्तेजना (rut) वर्षांत एकदाच होते. माणसाच्या कामप्रवृत्तीवर मात्र निसर्गाने फार मर्यादा ठेवल्या नाहीत. त्याचा अर्थ आजकालच्या शास्त्रज्ञांनी असा केला आहे की माणसाला अनिर्बंध कामसुखाचा उपभोग घेण्याची मुभा दिली आहे! कामसुखाचा शारीरिक (स्थूल physical) भाग हा फारच कमी महत्त्वाचा आहे. त्याचा मानसिक भाग आणि त्याचे दूरगामी परिणामी फार गंभीर आहेत. संभोगाच्या क्रियेतून माणसाच्या मनांत होणारी प्रचंड उलथापालथ आणि त्याच्या मेंदूच्या पेशीत होणारे महत्त्वपूर्ण जैवरासायनिक (Neurochemical) बदल अलीकडेच आधुनिक वैद्यक शास्त्राला कळूं लागले आहेत. संभोगामुळे पुरुष आणि स्त्री उभयतांच्या मेंदूत, अंतःस्रावी द्रव्यांत (Hormones) त्या दोघांत स्थायी आणि गहिरे भावनिक बंध निर्माण करणारे बदल आणि गरोदर स्त्रीच्या मेंदूच्या आणि अंतःस्रावी ग्रंथींच्या रासायनिक बदल यांतील निकटचे नातेही स्पष्ट होत आहे. संभोगकाळी युगुलांच्या मनांत उद्भवणारे परस्पर मानसिक बंध, आई आणि मूल यांच्यात गुंफले जाणारे गाढ भावनिक बंधांच्याच जातीचे आहेत. स्वैर कामसुखाच्या मागे लागून प्रत्यही नव्या जोडीदारांशी रमण्याने होणारी हानीकाराक मानसिक गुंतागुंत आधुनिक मानसशास्त्राने जाणली आहे. उच्च सस्तन प्राण्यांच्या जोड्यांतही निसर्गतः जी परस्पर निष्ठा आढळते त्याचे कारण हेच गहिरे जैवरासायनिक बदल आहेत. यामुळे लैंगिक स्वैराचाराचे तसेच दुराचाराचे दूरगामी मानसिक आणि शारीरिक दुष्परिणाम आधुनक संशोधकांना मान्य होऊ लागले आहे. विचारवंत पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांनाही ब्रह्मचर्याचे महत्त्व जाणवूं लागले आहे. प्रत्येक गोष्टीत तथाकथित विज्ञाननिष्ठेचा आधार घेऊन पारंपरिक अनुभवसिद्ध ज्ञानाचा उपहास करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे. आपल्या समाजात खोलवर रुजलेल्या नैतिक मूल्यांवर वॉशिंग्टनच्या कुऱ्हाडीसारखी ही विज्ञाननिष्ठा चालविण्यापूर्वी थोडा विवेक करावा अशी नम्र सूचना आहे.

भारतीय योगशास्त्राची अशी मान्यता आहे की ब्रह्मचर्याच्या पालनाने वीर्याचे (लैंगिक ऊर्जेचे) रूपांतर ओज नांवाच्या शक्तीत होते आणि ही शक्ति सहस्रार नांवाच्या मस्तकातील चक्रांत सांठविली

जाते. योगाच्या सिद्धीसाठी ही अत्यंत आवश्यक आहे. ह्या ब्रह्मचर्यापासून निर्माण होणाऱ्या ओजशक्तीनेच हनुमंत महाबली झाले आहेत. इंद्रजिताचा वध 12 वर्षे नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळलेल्या योद्ध्यालाच शक्य होता. त्यासाठीच लक्ष्मणाची योजना श्रीरामचंद्रांनी केली होती. ग्रीसच्या इतिहासांतही ब्रह्मचर्याचे पालन करणाऱ्या स्त्री (Amazons) आणि पुरुष योद्ध्यांचे वर्णन आढळते.

पातंजल योगशास्त्रात वरील चार यम आणि **अपरिग्रह** असे एकूण पाचच यम सांगितले आहेत. अपरिग्रह म्हणजे आपल्या नित्य आवश्यकतेपेक्षां अधिक धनादिकांचा संग्रह न करणे. यांत राहणीमानाचा साधेपणा अपेक्षित आहे. संन्याशाला तर कशाचाच संग्रह न करण्याची आज्ञा आहे. एक वेळच जेवायचे तेही भिक्षेचेच अन्न. **श्रीस्वामी महाराजांचे जीवन अपरिग्रहाचा आदर्शच होते.** चार लंगोट्या, दोन छाट्या, कधींमधीं एखादी धाबळी, दंड, कमंडलु, उपनिषदांची पोथी, पंचायतनाचा संपुष्ट, दोन दत्तमूर्ति आणि पाणी काढण्यासाठीं एक दोरी यापलीकडे कांहीं असलेच तर लिखाणाचें कांहीं साहित्य केव्हां केव्हां बरोबर असायचें. ऐन हिमालयाच्या थंडींतहि दोन छाट्या व एक धाबळी यापलीकडे वस्त्रांचा संग्रह त्यांनी केला नाहीं. **इतर आश्रमांसाठी परिमितच परिग्रह ठेवायची आज्ञा आहे. ब्राह्मणासाठी तर उद्याच्या अन्नाचाही संग्रह करू नये असा आदर्श आहे. सध्याच्या युगात राहणीमान वाढविण्यावर आणि ऋण काढून सण करण्यावर आणि आवश्यक वस्तूंचाच नव्हे तर भोगवस्तूंचाही अमर्याद संग्रह करण्यावर भर आहे. अपरिग्रह जरी या परिस्थितीत व्यवहार्य नसला तरी परिमिक परिग्रहाने मानवी जीवनांत सुख आणि समाधान वाढेल.**

**आर्जव** – आर्जव शब्द ऋजु या शब्दापासून झाला आहे. ऋजु म्हणजे सरळ. आर्जव म्हणजे सरळपणा. वागण्यात, बोलण्यात आणि विचारातसुद्धा वांकडेपणा नसणे यालाच आर्जव म्हणतात. सर्वसाधारण माणूस स्वतःशी किंवा आत्मीय व्यक्तीशीच सरळ वागतो. इतर लोकांशी आपापल्या मतलबानुसार वेगवेगळे वागतो व बोलतो. तसे न करतां सगळ्यांशी सारखे वागणे, आंत एक, बाहेर एक असे नसणे हे आर्जवाचे लक्षण आहे. श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत, 'पूर्वजन्मींच्या तपस्येविना साणसाच्या स्वभावांत सरळपणा येत नाही.'

**क्षमा** – शत्रूंनी काया-वाचा-मनाने त्रास दिला, अप्रिय, तिरस्कार, अपमान केले तरी तो बुद्धीचा क्षोभ न होऊ देता सहन करणे, तसेच सामर्थ्य असूनही त्यांना दण्ड न देतां शांत राहणे हे क्षमेचे लक्षण आहे. याविषयी रामायणातील एक श्लोक विचारणीय आहे. 'सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता, परो ददातीति कुबुद्धिरेषां। अहं करोमीति वृथाऽभिमानः स्वकर्मसूत्रे ग्रथितो हि लोकः।।' श्रीरामचंद्रप्रभूंना वनवासाला पाठविण्याविषयी कैकेयीला दोष देणाऱ्या गुहाला लक्ष्मण सांगतात, 'सुख किंवा दुःख हे कुणी दिल्याने होत नाहीत. दुसरा आपल्याला सुख वा दुःख देतो ही बुद्धीच चुकीची आहे. आपण करतो हा तर व्यर्थच अभिमान आहे. सर्व जीव आपापल्या कर्माच्या सूत्रांत बांधलेले असतात. गीतरामायणांतील "पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा" या पदांत हाच आशय आहे. आपले दांत आणि आपलेच ओठ अशी वृत्तीच कुणीही दिलेल्या दुःखाविषयी असणे म्हणजे क्षमा होय.

**धृति** – स्त्रीपुत्रादि प्रिय जनांचा वियोग, घरदार, धन, वृत्ती इत्यादींची हानी अशा घटनांनी खचून न जातां निर्विकार राहणे याला धृति म्हणजेच धैर्य असे म्हणतात. मानवी जीवनांत 'सुख जवापाडे' आहे आणि 'दुःख पर्वताएवढे', असे संतांचे सांगणे आहे. इथे निखळ सुखाची अपेक्षा ठेवणेच मुळांत चूक आहे. चार दिवस सुखाचे जातात न जातात तोंपर्यंत कांही तरी दुःखाला सामोरे जावेच लागते. या धक्क्यांना तोंड देण्यासाठी धैर्य पाहिजेच. अशा धक्क्यांनी विचलित होऊन माणूस कुमार्गाला लागतो, पापाला प्रवृत्त होतो, व्यसनांना बळी पडतो. सन्मार्गावर स्थिर राहायचे असले तर आयुष्यात येणाऱ्या चढ-उतारांना तोंड द्यायचे धैर्य हवेच हवे.

**मिताहार** – घेरण्ड संहितेत (5:16) म्हटले आहे की मिताहाराशिवाय जो योगाचा अभ्यास करायला प्रवृत्त होतो त्याला नाना रोग होतात आणि त्याची योगांत थोडीसुद्धा प्रगति होत नाही. आहाराशिवाय माणूस जगूं शकत नाही. यासाठी तो सोडून चालणार नाही. पुरेसा आहार जीवनाला आवश्यकच आहे. पण अधिक आहार आळस आणि निद्रा यांना कारण होतो. असा माणूस योगच काय पण व्यवहारसुद्धा चांगल्या प्रकारे करूं शकणार नाही. सर्वसाधारणतः आपण 'पोटभर' जेवतो. ते योगशास्त्राला मान्य नाही. अर्धे पोट अन्नाने भरायचे आणि पाव जलाने. पोटाचा उरलेला पाव भाग वायुसंचलनासाठी रिकामा ठेवावा यालाच मिताहार म्हणतात.

आहार केवळ मित असून भागत नाही. तो हित आणि मेध्यही असला पाहिजे. योगाभ्यासी पुरुषाला तो हितकर आणि मेध्य म्हणजे पवित्र असण्याची दक्षता घेतली पाहिजे. साधारणतः खारट, आंबट, तिखट, कडू हे रस टाळले पाहिजेत. जोंधळे, उडीद इत्यादि रुक्ष धान्य हे बेतानेच खावेत. पालेभाज्याही कमी खाव्यात. गीतेत सात्त्विक आहाराचे वर्णन (17:8) 'आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनः। रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः' असे केले आहे. आयुष्य, सत्त्व, बळ, आरोग्य, सुख, प्रेम यांचे पोषण करणारा त्याचप्रमाणे रसाळ, स्निग्ध, टिकाऊ आणि मनाला आनंद देणारा आहार सात्त्विक लोकांन आवडतो.

तसेच आहाराचे पावित्र्यही फार महत्त्वाचे आहे. आहार शुद्ध, निरामिष आणि स्वच्छ पदार्थांपासून केलेला तर असावाच. पण त्याचबरोबर तो शिजवणाराही चांगला हवा. भारतीय शास्त्रानुसार अन्नापासून केवळ शरीराचे धातूच बनतात असे नाही तर मनही अन्नापासूनच बनते. अन्न करणाऱ्याचे संस्कार त्या अन्नात उतरतात. त्याची वृत्ती, पाप-पुण्य, मनःस्थिति या सर्वांचा परिणाम अन्नावर होतो. यासाठीच विकतचे, खाद्यगृहांतले, अनोळखी माणसाने शिजवलेले इत्यादि अन्न घेऊं नये. देवाला निवेदन केलेले, यज्ञाचा शेष असलेले, प्रसादाचे असे अन्न उत्तम असते. स्वतःच किंवा माता, पत्नी, भगिनी इत्यादींनी शिजवलेले, नैवेद्य-वैश्वदेव केलेले अन्नच ब्राह्मणाने घ्यावे असे शास्त्र आहे. सध्यांच्या काळांत ते बहुतेकांना शक्य नसले तरी शक्य तेवढी पावित्र्याची जपणूक आपल्याच हितासाठी, विशेषतः योगाभ्यासी माणसाने केलीच पाहिजे.

सर्वांना सारखाच आहार योग्य होत नाही. आपल्या प्रकृतीनुसार, शरीरकष्टानुसार आहाराचे प्रमाणे निश्चित करावे. स्मृतिकारांच्या म्हणण्यानुसार 'अष्टौ ग्रासा मुनेर्भक्ष्याः षोडशारण्यवासिनः। द्वात्रिंशत्तु गृहस्थस्य यथेष्टं ब्रह्मचारिणम्।।' शारीरिक कष्ट कमी असणाऱ्या संन्याशाने आठ घांसांचाच आहार घ्यावा. श्रीस्वामी महारजांचा आहार असाच होता. त्यापेक्षा अधिक कष्ट असणाऱ्या वानप्रस्थांना सोळा घास तर गृहस्थांना बत्तीस घांसांचा आहार सांगितला आहे. ब्रह्मचाऱ्यांना मात्र गुरुसेवेसाठी खूप राबायचे असते म्हणून त्यांच्या आहाराला मर्यादा घातली नाही. योगाभ्यासी साधकांनी आपले वय, वृत्ती, प्रकृती इत्यादींचा विचार करून आपला आहार नियमित करावा. आपल्याला आवश्यक ती व तेवढी कर्मे करण्याला आवश्यक ते शारीरिक दाढ्‍र्य व शक्ती टिकावेत पण आळस मात्र येऊं नये इतकाच आहार ठेवावा.

**शौच** – हे दोन प्रकारचे सांगितले आहे. शरीराला मलमूत्रादि विसर्जनाने आणि इतरही अनेक कारणांनी जे मालिन्य येते त्याचा परिहार पाणी, माती इत्यादींनी करणे हे बाह्य शौच आहे. आंतरिक शौच म्हणजे कामक्रोधादींनी बरबटलेले मन स्वच्छ करणे. यासाठी ध्यान हा उपाय आहे. हे आपल्या इष्टदैवताचे (दत्तप्रभूंचे) किंवा आत्म्याचे असूं शकते. हा उपाय सर्वांना कदाचित जमणार नाही. त्यांच्यासाठी नामजप हा सोपा उपाय आहे. 'मन भावशुद्धी भरले। आंग क्रिया अळंकारिले। तैसे सबाह्य

जियाले। साजिरे जें कां।। 18:39।।' अशी शौचाची व्याख्या ज्ञानेश्वरीत केली आहे. बाह्य शौचाने स्वतःच्या शरीराचाच उबग येऊन (स्वांगजुगुप्सा) वैराग्य बळावते. आंतरशौचाने इंद्रियांवर ताबा मिळून मनाला स्थैर्य आणि प्रसन्नता येते. 4 - 11

## नियम

आपल्या जीवनात सात्त्विकता वाढविणाऱ्या गोष्टी सातत्याने करणे म्हणजे नियम होत. योगाला पोषक अशा गुणांचा संग्रह करणे म्हणजे नियम. हे नियम दहा सांगितले आहेत. *'तपः संतोष आस्तिक्यं दानमीश्वरपूजनम् । सिद्धान्तवाक्यश्रवणं ऱ्ही मती च जपो व्रतम् (हुतम्) ।। नियमा दश संप्रोक्ता योगशास्त्रविशारदैः ।।'*

**तप** – तपाची व्याख्या साधारणतः अशी केली जाते. '***उपवासपराकादि कृच्छ्रचांद्रायणादिभिः । शरीरशोषणं प्राहुस्तापसास्तप उत्तमम्***' शास्त्रात सांगितलेले एकादशी, प्रदोष, सोमवारादि उपवास करून देह झिजवण्याला तप असे नांव आहे. शास्त्रांत ज्ञात-अज्ञात पापांचा नाश करण्यासाठी चांद्रायणादि प्रायश्चित्तांचे वर्णन आहे. श्रीस्वामी महाराजांनी चांद्रायण केले होते. ह्या व्रतांत अमावास्येला उपास करून शुक्ल प्रतिपदेला एक घांस, द्वितीयेला दोन अशा रीतीने वाढवीत पौर्णिमेला पंधरा घासांचे जेवण घ्यायचे. पुन्हा कृष्ण प्रतिपदेला 14, द्वितीयेला 13 असा आहार कमी करून पुन्हां अमवास्येला निराहार करून मग पारणे करायचे. बारा वर्षे केवळ फलाहार करण्याला कृच्छ्र म्हणतात. अशा प्रकारच्या शरीरशोषणाला तप म्हणतात. *'वेदाभ्यासो हि विप्रस्य तपः परमिहोच्यते।'* असे मनू राजाचे वचन आहे. त्याप्रमाणे श्रुति, स्मृति इत्यादि पवित्र ग्रंथांचे अध्ययनही तप मानले जाते. 'मनसश्चेन्द्रियस्य ऐकाग्र्यं तप उच्यते' अशीही तपाची व्याख्या आहे. पण या दोनही प्रकारच्या तपांचा विचार पुढे स्वाध्याय आणि ध्यान यांच्या विवेचनांत येणारच आहे.

**संतोष** – आपल्या कर्माने आपल्याला जे कुल, पत्नी, पुत्र, धन, गृह आदि मिळतील त्यांत समाधान मानणे म्हणजे संतोष. संत तुकोबारायांच्या शब्दात, ***'ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्तीं असों द्यावें समाधान।।'*** ह्या सर्व गोष्टी प्रारब्ध कर्मानुसार निश्चित झालेल्या असतात. हा विवेक मनांत ठेवून कोणत्याच गोष्टीचा खेद न धरतां मन प्रसन्न ठेवणे याचे नांव संतोष. 'वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ। भोगणे ते फळ, संचिताचे।।'

**आस्तिक्य** – वेदवाक्यांवर प्रत्यक्षाप्रमाणे विश्वास म्हणजे आस्तिक्य. वेद या शब्दात श्रुति, स्मृति, पुराण, संतवचन, गुरुवाक्य इत्यादि सर्वांचा समावेश होतो. ही सर्व शास्त्रे या ईश्वराच्या आज्ञा आहेत आणि त्यांतून धर्म काय अधर्म काय यांचे मानवाला निश्चित मार्गदर्शन आहे अशी दृढ श्रद्धा म्हणजे आस्तिक्य. 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ' या भगवद्गीतेच्या श्लोकावर (16:24) भाष्य करतांना श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'शास्त्र म्हणेल सांडावे। ते राज्यही तृण मानावे। जें घेववी ते न म्हणावे। विषही विरुद्ध।।16:460)' ही ओवी आस्तिक्याचेच प्रतिपादन आहे. तिच्या वाचनाने पित्याच्या आज्ञेने क्षणांत राज्याकडे पाठ फिरवणारे श्रीराम आणि गिरिधर गोपालाच्या प्रसादाचा विषाचा पेलाही हंसत पिऊन टाकणारी मीरा यांची चित्रे डोळ्यांसमोर उभी राहतात.

**सिद्धान्तवाक्यश्रवण (स्वाध्याय)** - '*वेदान्तशतरुद्रीयप्रणवादिजपं बुधाः । सत्त्वशुद्धिकरं पुसां स्वाध्यायं परिचक्षते*' माणसाच्या चित्ताची शुद्धि करणाऱ्या, अधिकारी सद्गुरूंजवळ केलेले वेदांताचे श्रवण, उपनिषदे, रुद्र, पुरुषसूक्त इत्यादींचे पाठ किंवा ॐकाराचा जप यांना स्वध्याय असे म्हणतात. ह्यांतच प्रासादिक स्तोत्रांचे पाठ, हरिपाठादि संतवचने, ज्ञानेश्वरी, भागवत, दासबोध उत्यादि संतवाङ्मय यांचा

तसेच गुरूपदिष्ट मंत्राच्या जपाचाही समावेश होतो. जपाचा स्वतंत्र विचार पुढे केला आहे. मनाची शुद्धि होऊन त्यांत ईश्वरभक्ति निर्माण होण्यासाठी संतवाङ्मयाचे वाचन हा प्रभावी उपाय आहे असे प्रतिपादन श्रीस्वामी महाराजांनी केले आहे.

**दान** – 'योग्य योग्य समर्पण' ते कोणत्याही अपेक्षेने केलेले नसावे. ही श्रीस्वामी महाराजांची व्याख्या चपखल आहे. दान हे द्रव्याचे, धान्याचे, गाईचे किंवा इतर कोणत्याही वस्तूचे करतां येते. मात्र ते द्रव्य किंवा ती वस्तू स्वतः न्यायाने कमावलेली असली पाहिजे. '***न्यायार्जितं धनञ्चाल्पमन्यद्वा यत्प्रदीयते। अर्थिभ्यः श्रद्धया युक्तं दानमेतदुदाहृतम्।***' अर्थी म्हणजे दान घेणारा याचकही योग्यच पाहिजे. सात्विक, तपस्वी, विद्वान, अनुष्ठानशील ब्राह्मण सत्पात्र मानला आहे. दुराचारी माणसाला दान दिले आणि त्याने त्याचा अपव्यय (दारु, जुगार इत्यादींसाठी) केला तर दात्याला दोष लागतो असे शास्त्र म्हणते. अन्नदान श्रेष्ठ मानले आहे.भुकेल्याला अन्न देतांना, विशेषतः माध्याह्नी, जाती-गोताची चौकशी करू नये. पण द्रव्य मात्र चौकशीशिवाय देऊं नये. सत्क्षेत्रात केलेल्या दानाचे मोठे फळ सांगितले आहे. तसेच ग्रहणादी पर्वणीच्या काळी किंवा यज्ञयागाच्या वेळी दान विशेष फलप्रद सांगितले आहे. ज्याला

**ईश्वरपूजन -** '*स्तुतिस्मरणपूजाभिर्वाङ्मनःकायकर्मभिः। सुनिश्चला भवेद्भक्तिरेतदीश्वरपूजनम्*' । वाणीने ईश्वराची स्तुति, मनाने त्याचे स्मरण आणि शरीराने त्याच्या मूर्तीची अर्चना ह्यांनी भक्ति दृढतर होते; हेच ईश्वरपूजन होय. श्रीस्वामीमहाराजांनी यापेक्षांही श्रेष्ठ ईश्वरपूजन सांगितले आहे. सर्व म्हणजे मनाने, वाचेने आणि कायेने जे जे आपण करतो ते सर्वच सर्वव्यापी ईश्वराला समर्पण करणे म्हणजे ईश्वरपूजन असे ते म्हणतात. जे जे करायचे ते सर्व त्याच्या प्रीतीखातर (परमेश्वरप्रीत्यर्थम्) करायचे असा त्याचा अर्थ होतो. गीतेत (9:27) भगवंतांनीही हाच उपदेश केला आहे. 'यत् करोषि यदश्नासि, यज् जुहोषि ददासि यत्। यत् तपस्यसि कौन्तेय तत् कुरुष्व मदर्पणम्।।' श्रीमद्भागवतांतील पुढील श्लोकही आपल्या पाठext असतो. 'कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्। करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायाणायेति समर्पयेत्तत्।।'

नुसते ईश्वरासाठी करतो. असे नुसते म्हणण्याने ते समर्पित होत नाही. आपल्या सर्व क्रिया भगवंताच्या आवडीनुसार (आरल्या नव्हे), त्याच्या आज्ञेनुसार केवळ त्याच्यासाठीच करायच्या आणि त्यानंतर आपण हे केले असा किंचत् संशयसुद्धा मनांत ठेवायचा नाही! ज्यांनी आपले सर्व जीवनच परमेश्वरार्पण केले आहे अशा श्रीस्वामीमहाराजांसारख्या संन्याशालाच हे शक्य आहे. आपल्या दृष्टीने पहिली पारंपरिक व्याख्याच सोयीची आहे.

**-ही** - -ही म्हणजे लज्जा. शास्त्राने आणि लौकिकाने ज्या कर्मांना कुत्सित गणले आहे ती करण्याची लाज वाटणे म्हणजे ऱ्ही. 'जनीं निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे' ह्या समर्थोक्तीनुसार कुकर्माची लाज वाटणे हा महत्त्वाचा नियम आहे. ह्याच्या परिणामानेच सर्व यमांचे पालन सहज होते. ही लज्जा साधकाचे कुमार्गापासून संरक्षण करणारे जणूं कुंपणच आहे.

**मति** – वेदोक्तकर्माविषयी प्रीती म्हणजेच **श्रद्धा.** हिलाच मति सन्मति किंवा सद्बुद्धि असे म्हटले आहे. 'बुद्धि दे रघुनायका' अशी समर्थांनी मागितलेली हीच मति. वैदिक शास्त्रांवर श्रद्धा असली तरी इतर शास्त्रांची निंदा मात्र मुळीच करू नये. '*श्रद्धां भागवते शास्त्रे, अनिन्दामन्यत्र चापि हि*'.

**जप – सद्गुरूंकडून घेतलेल्या वेदानुकूल मंत्राचा नियमित अभ्यास म्हणजे जप.** मकार म्हणजे मन व त्रकार म्हणजे त्राण हे दोन्ही मिळून मंत्र हा शब्द झाला. अर्थात् मनाचे रक्षण करतो, मनाला सांभाळतो तो मंत्र होय. तसेच ज म्हणजे जन्ममरणरूपी संसारापासून सोडवणारा आणि प म्हणजे पापाचा नाश करणारा तो जप होय. 'यज्ञानां जपयज्ञोऽस्मि' या भगवद्वचनानुसार जप हा सर्वश्रेष्ठ यज्ञ आहे. मंत्रशास्त्रानुसार पुस्तकांत

वाचून मंत्रजप करण्याला निषेध आहे. तसेच सर्वच मंत्र सर्वांनाच अनुष्ठेय नसतात. वैदिक मंत्रांचा अधिकार फक्त उपनीत ब्राह्मणांनाच असतो. विशेषतः श्रीटेम्बेस्वामिमहाराजांच्या संप्रदायांत हा नियम कटाक्षाने पाळला जातो. मंत्र हा गुरुपरंपरेनेच घ्यावा. जपांतही वाचिक जपापेक्षा मानसिक जप श्रेष्ठ आहे. रहस्य म्हणजे जीभ व ओठ हलले तरी ज्याचा उच्चार होत नाही किंवा इतरांना ऐकायला जात नाही असा (उपांशु) जप मध्यम होय. जप करतांना डोळे मिटून भ्रूमध्यावर मन केंद्रित करावे. डोळे उघडे ठेवल्यास नासाग्र दृष्टी ठेवावी. इकडे तिकडे बघूं नये. जप करतांना बोलूं नये. बोटांनी, बोटांच्या पेरांनी किंवा शंख, मणि, प्रवाळ, स्फटिक, मोती, पद्माक्षी, सोन्याचे मणि आणि रुद्राक्ष यांच्या माळांनी जप करावा. हे सर्व एकाहून एक दसपट अधिक फळ देतात. म्हणजे बोटांच्या जपाच्या दसपट पेरांनी जप केल्याचे फळ, त्याच्या दसपट शंखांच्या माळेने केलेल्या जपाचे फळ इत्यादि. माळा १०८ मण्यांच्या असाव्या. स्त्रियांना - विशेषतः सुवासिनींना रुद्राक्ष व तुळशीच्या माळा निषिद्ध आहेत. जप करतांना माळ पडली, मेरुमणी ओलांडला किंवा झोप आली तर दोष सांगितला आहे. त्याची अधिक जपाने (किमान एक माळ) शुद्धि होते.

**व्रत** – एकादशी, प्रदोष, सोळा सोमवार इत्यादि उपवास तसेच सत्यनारायण, सत्यदत्त, अनंतादि व्रतांचे वर्णन विविध पुराण वाङ्मयांत तसेच शास्त्रांतही आढळते. ह्या व्रतांच्या अनुष्ठानांनी यम-नियमांचा कांही काळासाठी तरी अभ्यास घडतो आणि चित्तशुद्धी होते. कांही ठिकाणी व्रत या शब्दाच्या ठिकाणी '**हुत**' असा शब्द आढळतो. याचा अर्थ हवन किंवा यज्ञ आहे. गीतेमध्ये दैवयज्ञादिक बारा यज्ञांचे वर्णन आहे. (4:25 – 30) त्यांत घृतादींच्या आहुतीने सिद्ध होणारे **द्रव्ययज्ञ**, देवतांच्या पसन्नतेसाठी केले **दैवयज्ञ**, ब्रह्माग्नीत यज्ञकर्माचीच आहुती देणारा **ब्रह्मयज्ञ**, प्राणात अपानाची, अपानांत प्राणाची, प्राणात प्राणाची किंवा इंद्रिये आणि प्राण यांच्या कर्मांची संयमरूपी अग्नीत आहुती देऊन सिद्ध होणारे **योगयज्ञ**, स्वाध्यायाने सिद्ध होणारा **ज्ञानयज्ञ** इत्यादि यज्ञांचे प्रकार वर्णिलेले आहेत. ह्या सर्वांत जपयज्ञ श्रेष्ठ आहे हे आपण वर पाहिलेच आहे. 11 - 18

वरील सर्व यम जाति, देश, काल, समय यां सीमांनी बाधित न होता – अविच्छिन्नपणे सर्वत्र पाळल्याने (योगसूत्र 2:31) त्यांची फळे मिळतात. उदाहरणार्थ गाय अथवा मनुष्य यांना न मारणे म्हणजे अहिंसा ही जात्यवच्छिन्न अहिंसा झाली. तीर्थक्षेत्री हिंसा न करणे ही देशावच्छिन्न अहिंसा. एकादशी, श्राद्ध किंवा इत्यादि पर्वणीना हिंसा न करणे ही कालावच्छिन्न अहिंसा. अशा प्रकारच्या अहिंसेला महाव्रत म्हणता येत नाही. असेच सर्व यम आणि नियमांच्या विषयी आहे. जातिनिरपेक्ष, सर्व काळी आणि सर्व स्थळी हे सर्व यम आणि नियम काटेकोरपणे पाळले तर ते **सार्वभौम महाव्रत** होते. हे महाव्रत बारा वर्ष पाळले की ते सिद्ध होते. असे हे सर्व यम-नियम ज्याने सिद्ध केले त्याला सर्वश्रेष्ठ घडतो आणि त्याची सर्व कर्मे सफळ होतात. अहिंसा सिद्ध झाली की त्या योग्याच्या सान्निध्यात सर्व प्राणी आपापसातले वैर सोडून देतात (योगसूत्र 2:35). यामुळेच पूर्वीच्या काळी ऋषींच्या आश्रमांत उंदीर आणि मांचर, गाय आणि वाघ, साप आणि मोर असे परस्परांचे स्वाभाविक वैरी असणारे प्राणीही निर्भयपणे एकत्र खेळत. स्वतः स्वामी महाराजांच्या चरित्रांतही त्यांच्या सान्निध्यांत साप, वाघ इत्यादि प्राणी आपली हिंस्रता सोडत असल्याच्या घटना आहेत. सत्याचा यम ज्याला सिद्ध झाला त्याला मंत्रसामर्थ्य प्राप्त होते, त्याचे वचन कधीच खोटे ठरत नाही. ह्याचीही अनेक उदाहरणे श्रीस्वामी महाराज आणि इतर अनेक संत-सत्पुरुषांच्या जीवनांत पहायला मिळतात. अस्तेयसिद्धीने सर्व रत्नांची उपलब्धि होते (योगसूत्र 2:37). अपरिग्रहाच्या सिद्धीने पूर्वजन्माचे ज्ञान होते (योगसूत्र 2:39) ब्रह्मचर्याच्या पालनानो वीर्यलाभ (योगसूत्र 2:38), बाह्य शौचाच्या पालनाने आपल्या देहाचा उबग (स्वांगजुगुप्सा) येतो आणि वैराग्य बळावते (योगसूत्र 2:40). अंतःशौचाने म्हणजे चित्तशुद्धीने मनाची प्रसन्नता, एकाग्रता आणि इंद्रियांवर ताबा मिळून आत्मदर्शनाची योग्यता येते. (योगसूत्र 2:41). संतोषाने उत्तम सुख लाभते. संतोषाने उत्तम सुख लाभते.(योगसूत्र 2:42). तपाने देह आणि इंद्रियांची शुद्धि होते

(योगसूत्र 2:43) जपाने इष्ट देवतेचे दर्शन होते (योगसूत्र 2:44). ईश्वरभक्तीने समाधीचा लाभ होतो (योगसूत्र 2:45). इत्यादि फळांचे वर्णन पतंजलींनी केले आहे (योगसूत्र 2:36-45). 19 - 27

अर्थात् असे 'सार्वभौम महाव्रत' साधारण प्रापंचिक लोकांना जवळजवळ अशक्य आहे. त्यांनी या यमांचे आणि नियमांचे पालन आपापल्या शक्त्यनुसार करावे. देशकालांनी मर्यादित व्रत पाळल्याने त्याचा अभ्यास होतो व चित्तशुद्धि होते. उदाहरणार्थ तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी, व्रतपर्वांच्या काळांत, गुरुचरित्रादि पवित्र ग्रंथांचे पारायण करतांना हे यम-नियम कसोशीने पाळण्याचा हळूहळू अभ्यास करीत गेल्याने, प्रापंचिक जबाबदाऱ्यापासून निवृत्त झाल्यावर तरी महाव्रताचे आचरण करण्याची इच्छा होईल. आपल्या जीवनाला वळण लावणे, त्यातील सात्त्विकतेचा पोष करणे, चित्ताची शुद्धि करणे हा मुख्य हेतु आहे. भगवद्गीतेत वर्णन केल्याप्रमाणे 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।। 6:17।।'आहार, विहार, व्यावहारिक काम, झोप आणि जाग्रती या सर्वांनाच योग्य प्रमाणात ठेवणाऱ्याला दुःखाचा नाश करणारा योग सिद्ध होतो. 19 -28. हठयोगप्रदीपिकेनुसार (1:15)अति खाणे, अति श्रम करणे, अति बोलणे, अति नियम (रोज नक्त भोजन, नेहमीच फलाहार इत्यादी) करणे, नेहमी लोकात वावरणे आणि विषयासक्ती हे सहा दोष योगाला हानिकारक आहेत. याउलट साधनाविषयी उत्साह, योगाची सिद्धि मी सर्व प्रयत्नांनी मिळवीनच असा विश्वास, धैर्य, तत्त्वज्ञान, सद्गुरुवाक्यावर दृढ विश्वास, विषयासक्त लोकांच्या संगतीचा त्याग ह्या सहा गुणानी योगाची लवकर सिद्धी होते.

## स्थल आणि बैठक

योगरहस्यात श्रीस्वामी महाराज म्हणतात, '*सद्देशे मठिकामध्ये निश्चिन्तो गुरुशिक्षितः। कुशाजिनांशुकेष्वेव हठयोगं समभ्यसेत्।। 9।।* ' योगाच्या अब्यासाला पवित्र देशांत, लहानशी झोपडी करून, तीत प्रथम दर्भासन, त्यावर मृगाजिन आणि एक स्वच्छ, मऊ वस्त्र टाकून अभ्यासाला बसावे. गुरुशिक्षित हा शब्द महत्त्वाचा आहे. हा अभ्यास गुरूंच्या देखरेखीखालीच व्हावा असे त्यांतून सूचित होते. हठयोगप्रदीपिकेत (1:12) म्हटले आहे, '*सुराज्ये धार्मिके देशे सुभिक्षे निरुपद्रवे। धनुःप्रमाणपर्यंतं शिलाग्निजलवर्जिते।। एकान्ते मठिकामध्ये स्थातव्यं हठयोगिना।*' जेथे चांगले राज्य आहे, लोक धार्मिक आहेत, भूमी सुपीक आहे, चोराचिलटांचा उपद्रव नाही, लोकांची वर्दळ नसलेल्या, एक धनुष्य (चार हात) अंतरापर्यंत शिला, अग्नि किंवा पाणी नसेल अशा नीरव स्थळी लहनशा कुटीत योग्याने अभ्यास करावा. गीतेतही 'शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः। नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम्।।6:1।।' बसण्याचे आसन फार उंच किंवा फार खाली नसावे हा आणखी एक विशेष त्यांत आढळतो. प्रस्तुत गीताश्लोकावर ज्ञानेश्वरांनी केलेले सविस्तर भाष्य मुळांतूनच वाचण्यासारखे आहे. या झोंपडीचे एकच छोटेसे दार असावे, त्यांतील छिद्रे बुजवलेली असावीत आणि जागा सारवलेली असावी असे महाराज सांगताहेत. अशा आसनावर बसण्याचा विधि गीतेत सांगितल्याप्रमाणे शरीर, गळा, मान यांना सरळ ठेवून, इकडे तिकडे न पाहतां दृष्टी नासाग्र ठेवावी. (समकायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः। संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्।।6:13।। नेसूच्या वस्त्रावर बसल्याने स्वभाव दूषित होतो, दगडाच्या आसनावर बसल्याने दैन्य आणि व्याधि होतात; त्यासाठी ह्या आसनांवर बसूं नये. पांढऱ्या घोंगडीवर बसून जप केल्याने सुख, मृगाजिनाने ज्ञान, व्याघ्रासनाने मोक्ष तसेच कुशासनाने प्रज्ञा आणि दीर्घायुष्य प्राप्त होत असल्याने ह्यापैकी कोणत्या तरी आसनांवर बसूनच जप करावा. 38 - 42

# आसन

आसन हे योगाचे तिसरे अंग आहे. योगशास्त्राची अशी मान्यता आहे की जितक्य जीवजाति आहेत तितकी आसने आहेत. प्रत्येक जीवाची एक विशिष्ट स्वाभाविक बैठक असते. या बैठकीत त्या जीवाच्या मनाला आणि शरीराला विश्रांती मिळून तो सुखी होतो. हेच त्या जीवाचे आसन होय. शास्त्रांत 84 लक्ष योनींचे वर्णन आहे. म्हणजेच 84 लाख आसने आहेत. भगवान महेश्वरांनाच ती सर्व ठाऊक आहेत त्यांनी मानवांच्या हितासाठी यांतील 1600 आसने आणि त्यांतूनही 84 आसने निवडली आहेत. या आसनांच्या अभ्यासाने साधकाचे आरोग्य सुधारते, त्याच्या व्याधि नष्ट होतात, त्याचे शरीर, मन आणि प्राण सुखावतात. ह्या आसनांचा अभ्यास हाच मुख्यतः योगाभ्यास या नांवाने आज जगभर प्रचलित आहे. इथे आसनांचा विचार मुख्यतः आध्यात्मिक प्रगतीच्या दृष्टीने केला आहे. पतंजलींच्या म्हणण्यानुसार ज्या आसनावर दीर्घ काल सुखाने स्थिरपणाने बसतां येईल ते (योग्य) आसन होय. (स्थिरसुखमासनम्।।2:46।।. दत्तमाहात्म्यांत श्रीस्वामी महाराजांनी कांहीं निवडक आसनांचे वर्णन केले आहे.

**स्वस्तिकासन** – पायाचे तळवे मांड्यामध्ये ठेवून बसले की स्वस्तिकासन होते. (चित्र 1 टाकावे)

**गोमुखासन** – उजवा पाय डाव्या पुठ्ठ्याखाली आणि डावा पाय उजव्या पुठ्ठ्याखाली ठेवून दोन्ही हातांनी पाय धरून बसले की गोमुखासन होते. (चित्र 2 टाकावे)

**पद्मासन** – उजवा पाय डाव्या मांडीवर आणि डावा पाय उजव्या मांडीवर असे ठेवायचे ते पाठीमागून डाव्या आणि उजव्या हातांनी धरले की पद्मासन होते. (चित्र क्र. 3)

**सिंहासन** – गुडघे मुडपून दोन्ही पाय गुदद्वाराखाली ठेवायचे आणि दोन्ही हातांची बोटे गुडघ्यावर दाबून धरायची आणि मुखाचा जबडा पसरून नासाग्र दृष्टी करायची याला सिंहासन म्हणतात. (चित्र 4)

**सिद्धासन** – गुदद्वार आणि वृषण यांच्यामधील शिवणीला डावी टांच लावून उजवा पाय लिंगाच्या वर ठेवायचा. शरीर सरळ ठेवायचे, हनुवटी छातीला टेकवायची. आणि नासाग्र दृष्टी ठेवून बसायचे हे सिद्धासन होय. हे आसन सिद्ध झाले की तिन्ही बंध आपोआप लागून प्राणाची गति सुषुम्णेत होते आणि समाधि लागते. (चित्र 5) *गुदमेण्ढ्रोर्ध्वस्थगुल्फमासीनो यतगुः समः। भ्रूमध्यदृग्वाऽन्यपीठैः सिद्धं तत्राऽप्यदोऽस्ति सत्।। उत्पद्यते अनायासात् स्वयमेवोन्मनीकला। तथैकस्मिन्नेव दृढे सिद्धे सिद्धासने सति। बंधत्रयमनायासात्स्वयमेवोपजायते।।1:42।।*

**मयूरासन** – दोन्ही हात मागे पसरून जमिनीवर ठेवून दोन्ही कोपरावर बेंबी ठएवून शरीर त्यावर तोलून धरले की मयूरासन होते. (चित्र 6)

**भद्रासन** – हातांनी पाय धरून त्यांचे घोटे शिवणीला लावून पालथी मांडी घालून बसायचे आणि दृष्टी नासाग्र ठेवायची की भद्रासन होते. (चित्र 7)

**शवासन** – हात आणि पाय सरळ उताणे ठेवून पाठीवर प्रेताप्रमाणे पडून राहणे हे शवासन होय. (चित्र 8). ह्या आसनाने योगाभ्यासाचे श्रम माहीसे होतात. विशेषतः अशक्त साधकांसाठी आहे. फार काळ इतर आसनांवर बसणे ज्यांना शक्य नाही त्याना हे उपयुक्त आहे.

जेव्हा एखाद्या आसनानर दीर्घकाळ सुखाने, आरामांत बसतां यते तेव्हां ते आसन सिद्ध झाले असे समजावे. आसनजयाने सर्वजय होतो असे ह्याचे फळ सांगितले आहे. 29 – 37.

# प्राणायाम

प्राणमय कोशाचे वर्णन करतांना आपण प्राण या शब्दाचा थोडा विचार केला आहे. स्थूल देह म्हणजेच अन्नमय कोशाला आणि मनोमय कोशाला जोडणारा हा कोश आहे. हा वायुतत्त्वापासून बनलेला आहे. श्वसन, रक्ताभिसरण, अन्नाचे पचन, हृदयाचे स्पंदन इत्यादि शरीराच्या धारणेसाठी आवश्यक कार्ये प्राणच करतो. शरीरांतील सर्व धातूंचे चयापचय तसेच संतुलनही प्राणाचेच कार्य आहे. हात, पाय, वाणी, उपस्थ, गुद इत्यादि कर्मेंद्रियांचा समावेश प्राणमय कोशांतच होतो. कर्मेंद्रियाची कर्मे ऐच्छिक असतात तर आधी सांगितलेली प्राणाची कार्ये साधारणतः अनैच्छिक रीत्याच चालतात. पण त्यांवर कांही मर्यादेत ऐच्छिक नियंत्रण करतां येते. वर पाहिलेली प्राणाची कार्ये स्थूल देहाशी संबंधित अशी आहेत. प्राणाची गति मनाशीही जुळलेली आहे. यामुळेच प्राणावर नियंत्रण म्हणजेच प्राणायाम हा मनावर ताबा मिळवण्याचा मुख्य उपाय आहे. प्राणाच्या गतीवर नियंत्रण श्वासोच्छवासाच्या माध्यामातूनच होऊं शकते. श्वासोच्छासाच्या लगामाद्वारेच प्राणाच्या अश्वांना आवर घालता येतो. अर्थातच मनाच्या संकल्पानेच हे शक्य आहे. म्हणजेच मनाने प्राणाला आणि प्राणाने मनाला आवरायचे आहे.

द्विसाहस्रीत श्रीस्वामी महाराज म्हणतात, ‘चले प्राणे चलं चित्तं, निश्चले निश्चलं तयोः। नष्टे एकतरो नाशं द्वयोरपि स योगतः।।’ प्राण चंचल झाला की मनही चंचल होते. तसेच प्राण निरुद्ध केला की मनाचाही निरोध होतो. हा योगशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. क्रोध, शोक आदि भावनांनी मन क्षुब्ध झाले असता संथ आणि दीर्घ श्वसनाने मन शांत होते हा अनुभव कुणालाही घेता येण्यासारखा आहे. हजारो लोक दीर्घश्वसनाच्या तंत्राद्वारे मानसिक आरोग्याचा लाभ आजही जगात हजारो लोक घेत आहेत. हा एक योगाचाच प्राथमिक प्रकार आहे.

प्राणाचा नाश केला की मनाचाही नाश होतो हे ऐकायला थोडे भयानक वाटते. पण त्याचा अर्थ नीट समजून घेणे आवश्यक आहे. प्राणाचे जीवन म्हणजे त्याचे इडा (डावी नाकपुडी) आणि पिंगला (उजवी नाकपुडी) यांतून प्रवाहित होणे. तसेच मनाचे जगणे म्हणजे चित्तांत नाना विषयांशी संबंधित अनुकूल आणि प्रतिकूल वृत्तींचा उदय. प्राणाचे इडापिंगलातून वाहणे थांबणे हाच त्याचा नाश होय. आणि मनातल्या वृत्तींचा उदयास्त थांबणे हाच मनाचा नाश होय. हेच योगाचे अंतिम साध्य आहे. श्वास पूर्णपणे थांबला की केवल कुंभक होतो आणि मनाच्या वृत्ती थांबल्या की निर्विकल्प समाधि होते. हेच योगाची परम सिद्धि आहे. श्वास बंद होणे हे तर मृत्यूचे लक्षण आहे; तेव्हा हेच योगाचे साध्य असले तर त्यासाठी योगाभ्यासाची काय आवश्यकता? अशी शंका साहजिक आहे. पण योगाभ्यासाने माणसाला जिवंतपणीच हा अनुभव घेतां येतो. ‘आपुले मरण पाहिले म्यां डोळां’ ह्या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीचा हाच अर्थ आहे. असा अनुभव हजारो साधुसंतांनी घेतलेला आहे आणि आजही तेवढी प्रबल इच्छा असेल आणि तेवढे प्रयत्न करण्याची तयारी असेल तर घेतां येतो असे योगशास्त्राचे ठाम प्रतिपादन आहे. ह्या शास्त्रवचनावर दृढ विश्वास ठेवून चिकाटीने प्राणायामाचा अभ्यास केला तर प्राणावर जय मिळून श्वासोछ्वास बंद होतात. ह्या स्थूल देहाची नऊ द्वारे कोंडून प्राणाचा जय होतो. प्राण जिंकला की मनावरही विजय मिळतो. हे खरे असले तरी एक धोक्याची सूचना महाराजांनी दिली आहे. मन जिंकण्यासाठी आधी विरक्ती आवश्यक आहे. मनाची विषयांकडे असलेली ओढ जोंवर नष्ट होत नाही तोंवर प्राणजयानंतरही मनावरचा ताबा सुटूं शकतो. ते मन इंद्रियांचा क्षोभ करून साधकाला पुनश्च संसारांत ओढू शकते. यम-नियमांनी मन शांत केल्यावरच प्राणायामाचा इष्ट परिणाम होतो. प्राणायाम हा मन जिंकण्याचा प्रभावी उपाय असला तरी त्यांतील धोकेही समजून घेतले पाहिजेत. तसेच हा विषय

संपवतांना स्वामी महाराजांनी परमेश्वराचे ध्यान हासुद्धां मन जिंकण्याचा एक महत्त्वाचा सुलभ उपाय हे असे सुचविले आहे. 38 – 50

**सुषुम्णा** :- यानंतर श्रीस्वामी महाराज प्राणमय कोशांतील सर्वात महत्त्वाच्या सुषुम्णा या नाडीचे वर्णन करीत आहेत. ह्या साडेतीन हात लांबीच्या मनुष्य देहाचा मध्य गुद आणि लिंग यांच्या मधोमध येतो. तेथून बेंबीपर्यंत एक फुगीर लंबगोलाकृती कंद आहे. ह्या कंदापासून बहात्तर हजार नाड्या उगम पावतात. त्यांतही चौदा मुख्य आहेत. त्यांतही इडा, पिंगला आणि सुषुम्णा या तीन श्रेष्ठ आहेत. सर्वांत श्रेष्ठ सुषुम्णा नाडी आहे. इडा डाव्या नाकपुडीशी येऊन संपते. इडेलाच निशा किंवा रात्र म्हणतात. हिचा स्वामी चंद्र असून त्यावरून तिला चंद्रनाडी असेही म्हटले जाते. इडा ही नाडी सौम्य, सुखकर आणि शीतल आहे. उजव्या नाकपुडीशी येऊन थांबणारी पिंगला नाडीला दिन किंवा तिच्या दैवतावरून सूर्य नाडी असे म्हणतात. ही उग्र, उष्ण आणि तापकारक आहे. या दोन नाड्यांच्या मध्यात कंदापासून निघून ब्रह्मरंध्र म्हणजे टाळूला छेदून जाणारी सुषुम्णा नाडी आहे. कठोपनिषदात (२:१६) म्हटले आहे की हृदयातून जाणाऱ्या एकशे एक नाड्या आहेत त्यांतील एकच नाडी मस्तकाचा भेद करून जाते. हिच्यातून वर जाणारा मार्ग अमृतत्वाची प्राप्ती करून देतो. इतर नाड्या देहांतराला (पुनर्जन्माला) नेतात. श्रीदत्तपुराणात (१०:१-२) सुषुम्णेचे महत्त्व असे सांगितले आहे. सुषुम्णेचे ज्ञान झालेला पुरुष अथवा स्त्री, बाल, तरुण किंवा वृद्ध या सर्वांना योगाभ्यासाचा अधिकार आहे. तसेच त्यांनी उत्तम अभ्यास केला तर त्यांना अवश्य सिद्धी मिळेल. सर्व वर्ण आणि सर्व आश्रम यांना ह्या योगाचा अधिकार आहे. संन्याशांना विशेष अधिकार आहे कारण ब्रह्मचर्यादि यम-नियमांचे पालन त्यांना नियत आहे. 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ति चारी साधियेल्या।।' ह्या ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगात सुषुम्णेलाच देवाचे द्वार म्हटले आहे.

**कुंडलिनी** - पाठीच्या कण्यातून जाणाऱ्या ह्या सूक्ष्म नाडीच्या मुळाशी साडेतीन वेटोळे घातलेली कुंडलिनी शक्ति आहे. 'नागाचे पिले। कुंकुमें नाहले। वळण घेऊनि आले। सेजे जैसे।।२२।। तैशी ते कुंडलिनी। मोटकी औटवळणी। अधोमुख सर्पिणी। निजेली असे।।२३।।' असे तिचे वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी केले आहे. ती आपल्या एका मुखाने सुषुम्णेचे प्रवेशद्वार अडवून बसलेली असते. पायाच्या तळव्यापासून मस्तकावरील केसापर्यंत आपल्या हाताच्या बोटांनी ९६ बोटे इतके प्रमाण शरीराचे आहे. शरीराच्या बरोबर मध्यभागी ४८ बोटांवर कुंडलिनीचे निवासस्थान आहे. बाहेरच्या तोंडाने इतर नाड्यांतून पांच प्राणांचा व्यापार ह्याच शक्तीने होतो. हीच विश्वाचे सृजन करणारी शक्ति आहे. सत्त्व, रज आणि तम ह्या त्रिगुणांच्या वेटोळ्यांच्या पलीकडेही तिची व्याप्ति आहे. ॐकाराच्या साडेतीन मात्रा हेच तिची कुंडले आहेत. सर्व जग निर्माण करून उरलेली म्हणून हिला शेषा असेही म्हणतात. साधनविहीन मानवाला सुषुम्णा अडवून संसारांत फिरवणारी माया हीच आहे. मोक्षमार्गावर अग्रेसर होऊं इच्छिणाऱ्या साधकाला हिला चाळवून, जागवूनच सुषुम्णेचे दार उघडावे लागते. यासाठीच संत एकनाथांनी 'बया दार उघड' अशी प्रार्थना केली आहे. हिलाच कुंडली, कुटिलांगी, भुजंगी, ईश्वरी शक्ति आणि अरुंधती इत्यादि पर्यायी नांवे आहेत. हीच श्रीविष्णूंची महाशक्ति असून त्रिगुणात्मिका माया आहे. विष्णूंची महामाया जीवाच्या शरीरांत प्राणरूपाने स्थित आहे.

**कुंडलिनीचे जागरण** - हिला जागविण्याच्या अभ्यास रात्री किंवा दिवसाही करूं नये. ह्या ठिकाणी रात्र म्हणजे इडा नाडी आणि दिवस म्हणजे पिंगला नाडी. दिवसा म्हणजे श्वास पिंगलेतून वाहत असतांना म्हणजेच उजवी नाडी चालत असतांना किंवा रात्री म्हणजे इडा नाडी चालत असतांना अभ्यास होत नाही. पिंगलेतून वाहणाऱ्या वायूला प्राण आणि इडेतून वाहणाऱ्या वायूला अपान अशी नांवे आहेत. 'प्राणापानौ समे कृत्वा' याचा हाच अर्थ आहे. ह्या दोनही नाड्या समान झाल्या की प्राणाचा प्रवाह

सुषुम्णेतून होत आहे असे समजावे. ह्यासाठीच सुषुम्णेला रात्र आणि दिवस गिळून टाकणारी नाडी म्हणतात. त्रिगुणांचे वेढे घालून अधोमुख म्हणजे संसाराभिमुख झोपलेली कुंडलिनी जोंवर जाग्रत होत नाही तोंवर मोक्षाच्या साधनाचे सर्व खटाटोप व्यर्थ आहेत. कुंडलिनी जागणे म्हणजे प्राणाला मध्यम मार्ग मिळणे  एकदा प्राणाला सुषुम्णेची वाट सांपडली की मग तो ती नाडी शुद्ध करीत वर मस्तकांत असलेल्या सहस्रार चक्राकडे आपोआप चढूं लागतो. जाग्रत झालेली कुंडलिनी सहा चक्रांचा आणि तीनही ग्रंथींचा भेद करीत सुषुम्णा मार्ग शुद्ध करते.

कुंडलिनी जाग्रत करण्याचे अनेक उपाय शास्त्रांत वर्णन केलेले आहेत. योगाभ्यासाने, तीव्र वैराग्याने, ईश्वराच्या भक्तीने, ज्ञानयोगाच्या अनुष्ठानाने, प्राणायामाने आणि अधिकारी महात्म्यांद्वारां शक्तिपाताने कुंडलिनी जागते असे शास्त्रात सांगितले आहे. ह्या ठिकाणी श्रीस्वामी महाराजांनी प्राणायामाद्वारा शक्तिचालनाचे प्रतिपादन केले आहे. ५१ – ५७

**प्राणायाम** – प्राणायामाची तीन अंगे आहेत. पूरक म्हणजे श्वास घेणे, कुंभक म्हणजे श्वास कोंडणे आणि रेचक म्हणजे तो सोडणे. प्रथम इडेने म्हणजे डाव्या नाकपुडीने हळूहळू श्वास घ्यावा. ह्याचा काळ सोळा मात्रांचा सांगितला आहे. वायु छाती आणि पोट यांत पूर्ण भरून घेतल्यावर तो पूरकाच्या चौपट काळापर्यंत रोखून धरावा. त्या वेळी गळ्याच्या खळगीत हनुवटी दाबून धरावी. याला जालंधर बंध असे म्हणतात. यानंतर दुसऱ्या नाकपुडीने, पिंगलेने रेचक पूरकाच्या दुप्पट वेळांत करावा. वायूचे पूर्णपणे रेचन होण्यासाठी पोट पाठीकडे आंत ओढून धरावे. ह्याला उड्डियाण बंध असे नांव आहे. ह्यानंतर उलट प्रकारे म्हणजे पिंगलेने पूरक आणि इडेने रेचक करावा. ज्या नाडीने पूरक केले तिने रेचक करूं नये. हा अभ्यास वरचेवर सकाळ, दुपार, संध्याकाळ असा तीन वेळां करावा. ह्या कुंभकाच्या प्रकाराला अंतःकुंभक असे म्हटले आहे. दुसरा प्रकार आहे बहिःकुंभक. या प्रकारात प्रथम श्वास बाहेर सोडायचा (पूरक) आणि तो उड्डियाण बंधाने बाहेरच रोखून ठेवायचा. नंतर हळूहळू तो आंत खेचायचा (रेचक). ह्या दोन्ही कुंभकांचा अभ्यास करीत कुंभकाची मात्रा आणि प्राणायामांची संख्या वाढवीत जायची. हा अभ्यास केवळ कुंभक होईपर्यंत करावा. ५८ - ६३.

प्राणायामाचे कनिष्ठ, मध्यम आणि तीव्र असे प्रकार केले जातात. कनिष्ठ प्राणायामाने अंगाला घाम सुटतो. हा घाम अंगाला चोळावा. त्याने शरीराला सौष्ठव येते. मध्यम प्राणायामाने अंगाला कंप सुटतो. उत्तम प्राणायामाने प्राण ब्रह्मरंध्रांत (टाळूत) जाऊन श्वासोच्छवास थांबतो आणि शरीर निश्चल होते. अशा रीतीने प्राणायामाने इंद्रियांची शुद्धि होऊन जाग्रत झालेली कुंडलिनी सुषुम्णेतून वर चढली की आपल्या साधनेचे परिश्रम सफल झाले असे मानायला हरकत नाही. तोंपर्यंत सर्व सायास व्यर्थच होत. ज्यांना शरीरांत मेद किंवा कफ जास्ती असतात त्यांना हठयोगानुसार इंद्रियशुद्धीसाठी षट्क्रियांये वर्णन आहे. तसेच विशेष प्राणायामांचेही वर्णन त्यांत आहे. धौति, बस्ती, नेति, नौलि, त्राटक आणि कपालभाति अशी त्यांची नांवे आहेत.

जप आणि ध्यानासहित केलेल्या प्राणायामाला सबीज प्राणायाम असे नांव आहे. त्याविरहित नुसत्या प्राणायामाला निर्बीज असे म्हणतात. सबीज प्राणायाम योगशास्त्राने उत्तम मानलेला आहे. असे सबीज प्राणायाम रोज पांच पांच अशा क्रमाने वाढवीत ८०पर्यंत न्यावेत. रोज तीन वेळा ८० प्राणायाम करीत गेल्यास तीन महिन्यात २१६०० प्राणायाम होतात. हीच आपण रोज करीत असलेल्या श्वासोच्छवासांची संख्या पूर्ण होते. हे प्राणायामांचे एक पुरश्चरणच पूर्ण होते. ह्या योगाने सुषुम्णा मार्ग पूर्णपणे मोकळा होतो. मग कुंडलिनी जाग्रत झाली प्राण सहजपणे ब्रह्मरंध्राकडे चढायला लागतो. ६४ – ७४.

**षट्चक्रनिरूपण** – सुषुम्णामार्गाची रचना आधुनिक शरीरविज्ञानांतील मज्जासंस्थेच्या रचनेशी मिळती-जुळती आहे. सुषुम्णा नाडी मेरूदंडांतून जाणाऱ्या spinal cord शी संबंधित आहे. मेरूरज्जू (spinal cord)मध्ये जशा मज्जाग्रंथी (plexuses) आहेत तशाच गांठी किंवा चक्रे सुषुम्णेतही आहेत. मात्र ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत हे ध्यानांत ठेवले पाहिजे. देहाची चिरफाड करून spinal cord पाहतां येते तशी ही चक्रे पाहतां येत नाहीत. ती अतींद्रिय आहेत. सिद्ध योग्यांना ही दिव्य दृष्टीनेच पाहतां येतात. इथे ह्या चक्रांचे थोडक्यांत वर्णन दिले आहे. सुषुम्णा नाडी आणि तिच्यावरील ह्या सहा चक्रांत शेंकडो किंवा हजारों जन्मांचे संस्कार सांचलेले असतात. हे संस्कार काढून टाकण्याच्या प्रक्रियेलाच, इंद्रियशुद्धी, नाडीशुद्धी, चित्तशुद्धी अशी नांवे आहे. जसजसे हे संस्कार क्षीण होतात, त्यांचा लय होतो तसतशी सुषुम्णा मार्गाची शुद्धी होते. अर्थातच ही सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यास अनेक वर्षेच नाही तर अनेक जन्मही लागूं शकतात. यासाठीच श्रीमद्भगवद्गीतेत म्हटले आहे, ‘अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्।’ अनेक जन्माच्या साधनेनंतरच परम गतीची प्राप्ती होते. चिकाटी हा गुण योगाभ्यासाला किती आवश्यक आहे ते यावरून कळेल. ह्या सुषुम्णा नाडीच्या मार्गावर सहा चक्रे असतात. ह्या चक्रांचा भेद करून कुंडलिनी शक्ति सहस्रार चक्रातील परमशिवाला जाऊन मिळते आणि निर्विकल्प समाधीचा लाभ होऊन त्या साधकाची जीवदशा संपते. ह्या चक्रांनाच कमळेही म्हणतात. ही अधोमुख मिटलेली कमळे कुंडलिनीच्या संस्पर्शाने ऊर्ध्वमुख होऊन उमलतात असे वर्णन आहे. प्रत्येक कमळाची किती पाकळ्या (दले किंवा पत्रे) आहेत त्याचे वर्णन योगशास्त्रांत केले आहे. ह्या चक्रांची स्थाने, दलांची संख्या साधारणतः मेरुग्रंथींच्या स्थानाशी आणि त्या त्या ग्रंथीतून उगम पावणाऱ्या मज्जातंतूंच्या संख्यांशी जुळतात. योगशास्त्रांत या प्रत्येक चक्राच्या देवता, बीजे, वर्ण, चक्राच्या विकासाची लक्षणे, फळे आणि त्याने प्राप्त होणाऱ्या सिद्धी यांची वर्णने आहेत. आपण इथे श्रीस्वामीमहाराजांनी केलेले एक संक्षिप्त वर्णन फक्त पाहूं.

विघ्नेशाचें रूप धरी जो निवसे ह्या माझे शरिरीं।।
**मूलाधारीं** चतुष्पत्रीं वासांतीं त्या वंदूं।।१।।
**षड्दलचक्रीं** लिंगस्थानी देही बादिक लांतवर्णीं।।
चतुरास्याचें रूप घेउनी निवसे जो त्या वंदूं।।२।।
डाद्य फांतीं दशदलचक्रीं नाभिस्थानीं ह्या **मणिपूरीं**।।
श्रीविष्णूच्या रूपें शरिरीं निवसे जो त्या वंदूं।।३।।
हृदयस्थानीं **द्वादशकोणीं** माझ्या कादिक ठांत वर्णी।।
गौरीशंकररूप धरोनीं निवसे जो त्या वंदूं।।४।।
**विशुद्धचक्रीं** षोडशपत्रीं कंठीं सस्वरीं माझे गात्रीं।।
श्रीगुरुरूपा सेवुनी हरी निवसे जो त्या वंदूं।।५।।
**आज्ञाचक्रीं** भ्रुकुटिस्थानीं हक्षवर्णान्वित द्विकोणीं।।
वासुदेवस्वरूप होउनी निवसे जो त्या वंदूं।।६।।
**सहस्त्रपत्रीं** जो ह्या विवरीं सुसूक्ष्म होउनी निवास करी।।
दत्त सत्त्वस्वरूप हरी सुखकर जो त्या वंदूं।।७।।

विघ्नराज **गणेशा**च्या रूपाने माझ्या ह्या देहात मूलाधारांतील 'व' पासून 'स' पर्यंत (व,श,ष,स) चार वर्णांनी युक्त चतुर्दल (**मूलाधार**) चक्रांत निवसणाऱ्या देवाला नमस्कार असो. १.

लिंगस्थानातील सहा दलांनी युक्त अशा 'ब' ते 'ल' (ब.भ,म,य,र,ल) ह्या सहा वर्णांनी अंकित (**स्वाधिष्ठान**) चक्रांत चतु**र्मुख** ब्रह्मदेवाचे रूप घेऊन राहणाऱ्या त्या भगवंताला माझा नमस्कार असो. २.

'ड' ते 'फ' (ड,ढ,ण,त,थ,द,ध,न,प,फ) या दहा दलांनी युक्त दहा दलांच्या (**मणिपूर**) चक्रांत माझ्या देहाच्या नाभिस्थानी श्रीविष्णुरूपाने निवेस करणाऱ्याला माझे वंदन असो. ३.

हृदयाच्या स्थानी 'क' ते 'ठ' (क,ख,ग,घ,ङ,च,छ,ज,झ,ञ,ट,ठ) या वर्णांसहित बारा दलांनी युक्त अशा (**अनाहत**) चक्रांत गौरीशंकराच्या रूपाने निवास करणाऱ्याला माझे नमन असो, ४

माझ्या शरीरांत कंठामध्ये सर्व स्वरांसहित (अ,आ,इ,ई,उ,ऊ,ऋ,ॠ,ए,ऐ,ओ,औ,अं,अः) चौदा पाकळ्यांच्या **विशुद्ध** चक्रांत श्रीगुरुरूप धारण राहणाऱ्या हरीला माझा नमस्कार असो. ५.

(माझ्या) भ्रुकुटीमध्ये 'ह' आणि 'क्ष' या दोन वर्णांनी युक्त अशा द्विदल **आज्ञाचक्रां**त वासुदेवस्वरूपाने राहणाऱ्या देवाला माझा नमस्कार असो. ६

(तालुमूलाशी) असणाऱ्या **सहस्त्रदल** चक्रांतील (सुषुम्नेच्या) विवरांत अत्यंत सूक्ष्म रूपाने राहणाऱ्या संसारतापाचे हरण करणाऱ्या शुद्धसत्त्वस्वरूप आनंदकर दत्तप्रभूंना माझे वंदन असो. ७.

श्रीस्वामी महाराजांनी सहजपणे, एका सरल आणि गेय रचनेत हे षट्चक्रनिरूपण केले आहे. त्यांत त्यांनी अधिष्ठातृ देवतांचा निर्देश करतांना श्रीदत्तसंप्रदायाचा साजही चढविला आहे. हा विशेष आहे. तंत्रग्रंथात मूलाधारचक्राची अधिष्ठात्री देवता ब्रह्मदेव आहे. श्रीस्वामीमहाराजांनी अथर्वशीर्षाला अनुसरून मूलाधार चक्रांत श्रीगणेशाचे नमन केले आहे. तसेच स्वाधिष्ठान, मणिपूर आणि अनाहत या चक्रात अनुक्रमें ब्रह्मदेव, विष्णु आणि गौरीशंकरांचे ध्यान केले आहे. विशुद्ध चक्रांत श्रीगुरु, आज्ञाचक्रांत वासुदेव आणि सहस्रारात श्रीदत्त ह्या देवतांना नमन केले आहे. हे बदल सोडले तर षट्चक्रांचे वर्णन पारंपरिक तंत्रग्रंथांना अनुसरूनच केले आहे. **(इथे चित्र द्यावे).**

**षट्चक्रदर्शन**



**त्रिग्रंथीभेद** :- सहा चक्रांच्या भेदाबरोबरच महाराजांनी ब्रह्मा, विष्णु आणि शिव या तीन ग्रंथींच्या भेदांचेही वर्णन केले आहे. या ग्रंथी अनुक्रमे हृदय, कंठ आणि भ्रूमध्य या ठिकाणी असतात. प्राणायामाच्या अभ्यासाने साधकाच्या अंतराकाशांत विविध नाद प्रस्फुटित होतात. ह्या अनाहत नादांच्या अनुसंधानाने क्रमशः ह्या ग्रंथींचा भेद होतो. श्रीस्वामी महाराजांच्या योगरहस्य या प्रकरणावरील आपल्या टीकेत प.पू. योगिराज गुळवणी महाराज म्हणतात. "ह्या ग्रंथींचा हृदयातील अनाहतचक्रात असणाऱ्या ब्रह्मग्रंथीचा जेव्हां भेद होतो तेव्हा हृदयाकाशात भूषणांच्या ध्वनिसारखा ध्वनि उत्पन्न होतो ही ***आरंभावस्था***. प्राणवायू अपानाशी ऐक्य संपादून व नादबिंदू यांचे ऐक्य करून जेव्हा कंठस्थ मध्यचक्रात येऊन राहातो तेव्हा ती ***घटावस्था*** होय. त्या वेळी कंठस्थ विष्णुग्रंथीचा भेद होऊन कंठाकाशामध्ये भेरी शब्दासारखा शब्द ऐकू येऊ लागतो. प्राणायामाभ्यासाने प्राण भ्रूमध्याकाशात येऊन राहिला असता, त्याठिकाणी विशिष्ट वाद्यासारखा ध्वनि ऐकू येऊ लागतो व रुद्रग्रंथीचा भेद होतो. त्या वेळी चित्तवृत्तिरूप आनंद लुप्त होऊन स्वाभाविक आत्मानंद अभिव्यक्त होतो आणि त्रिदोषजन्य दुःखांच्या संवेदना, जरा, क्षुधा, तृषा, निद्रा या सर्वांतून तो योगी पूर्णपणे मुक्त होतो ही तिसरी ***परिचयावस्था*** होय. चौथ्या *निष्पत्ति* अवस्थेमध्ये प्राण ब्रह्मरंध्रात येऊन स्थिर होतो. त्या वेळी अत्यंत सूक्ष्म असा बासरीसारखा ध्वनि उजव्या कानामध्ये ऐकू येऊ लागतो. या अवस्थेत चित्त अत्यंत एकाग्र झालेले असते. यालाच राजयोग असे म्हणतात. या अवस्थेपर्यंत पोचलेला योगी, ईश्वराप्रमाणे सृष्टिसंहार करण्यास समर्थ होतो. याप्रमाणे नादानुसंधानाचे सविस्तर वर्णन हठयोगप्रदीपिकेच्या चतुर्थ उपदेशामध्ये केलेले आहे. तेच या **ठिकाणी** संक्षेपाने श्रीमहाराजांनी सुचविले आहे. **ब्रह्मग्रंथि, विष्णुग्रंथि व रुद्रग्रंथि या काही मांस, स्नायु यांच्या बनलेल्या गाठी नसून, रजोगुण, सत्वगुण व तमोगुण यांचीच विशिष्ट स्वरूपे आहेत.** प्रथम ब्रह्मग्रंथीचा भेद झाल्याबरोबर काम-क्रोधादि राजस भाव शांत होऊन प्रेम, दया, अहिंसा इत्यादि सात्विक भाव जागृत होतात. परंतु रुद्रग्रंथीचा भेद होऊन निद्रा, आलस्य, मोह, दंभ इत्यादि तामस भाव शांत होईपर्यंत ते सात्विक भाव दबून असतात. रुद्रग्रंथीचे स्थान आज्ञाचक्राच्या वर आहे. जिचा भेद सर्वांच्या मागाहून होतो. तो होणे अत्यंत कठीण आहे. या तीनही ग्रंथींचा भेद-उपशम, झाला असता मनुष्य त्रिगुणातीत होतो व त्याचा सहजानंद-आत्मानंद अभिव्यक्त होतो."

**शक्तीचालन** :- जाग्रत झालेली कुंडलिनी शक्ती सुषुम्णा मार्गातून प्रवाहित होऊन सहा चक्रांचा भेद करून सहस्रार चक्रांत सहज पोहोंचावी यासाठी हठयोगांत विविध कुंभकांचे वर्णन आहे. *सूर्यभेदनमुज्जायी सीत्कारी सीतली तथा। भस्त्रिका भ्रामरी मूर्छा प्लाविनीत्यष्ट कुंभकाः।।* सूर्यभेदन, उज्जायी, सीत्कारी, सीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्छा, प्लाविनी ह्या आठ कुंभकांचे वर्णन ह्या लेखाच्या मर्यादेत शक्य नाही. ह्या ठिकाणी बेंबीजवळ, मणिपूर चक्राच्या ठिकाणी अग्नीचे स्थान आहे. तिथे तर्जनीचे बोट टेकवून अग्नीचे आकुंचन रोज तीन वेळां करायला श्रीस्वामी महाराजानी सांगितले आहे. याशिवाय वज्रासनावर बसून हाताने दोन्ही पाय धरून ते कंदावर आपटावेत. ह्या कंदताडन क्रियेबरोबरच आठ वेळा भस्त्रिका प्राणायाम करावा. ह्यालाच कपालभाती असेही म्हणतात. कारण ह्या क्रियेने कपाळाच्या आत प्रकाश दिसतो आणि मन निर्विकल्प होते. ह्याच क्रयेबरोबर सगुण ध्यानांत मन ठेवले की प्राणाची गती ऊर्ध्व होते आणि मनाचे उन्मन होते. ह्या साधनेत दोन मुख्य अडथळे येतात. मनाला ग्लानी येऊन लय होतो म्हणजेच झोंप येते. दुसरा अडथळा आहे विक्षेप. यांत मन बाह्य विषयाकडे आकर्षित होऊन ध्यानापासून विचलित होते. प्रतिदिन अर्धा प्रहर हा अभ्यास केल्याने कुंडलिनी शक्ती सुषुम्णेतून वर चढून ब्रह्मरंध्रांत प्रवेश करते. शक्तिचालनाच्या अभ्यासाने योगी ४० दिवसात सर्व सिद्धी प्राप्त करून घेतो. ७६ – ७८.

अशा रीतीने ब्रह्मरंध्रांत प्रविष्ट झालेला प्राण (वायु) दोन पळे आणि पांच विपळे (५० सेकंद) स्थिर झाला कीं होणारा प्राणायाम सर्वश्रेष्ठ मानला आहे. या प्राणायामाने पापांचे शमन होते. त्याच्या बारा पट म्हणजे १० मिनिटे एवढा काळ प्राण ब्रह्मांडात स्थिर झाला की प्रत्याहार सिद्ध होतो. त्याचप्रमाणे २ तासांनी धारणा, २४ तासांनी ध्यान आणि बारा दिवसांच्या स्थैर्याने निर्विकल्प समाधी सिद्ध होते. हेच योगाचे परम साध्य आहे. ७९ – ८१.

**मुद्रा** :- याशिवाय हठयोगात दहा मुद्रांचेही वर्णन आहे.

*महामुद्रा महाबंधो महावेधश्च खेचरी। उड्ड्यानं मूलबंधश्च बंधो जालंधराभिधः।।*

*करणी विपरीताख्या वज्रोली शक्तिचालनम्। इदं हि मुद्रादशकं जरामरणनाशकम्।।*

ह्यापैकी उड्ड्यानबंध आणि जालंधरबंध आपण वर पाहिले आहेतच. मूलबंधांत सिद्धासनावर बसून टांचेच्या पार्श्वभागाने शिवणीवर दाब देऊन गुदद्वाराचे आकुंचन करण्याच्या क्रियेला म्हणतात. शक्तिचालन आपण पाहिले आहे. इतर मुद्रा जिज्ञासूंनी मूळ ग्रंथांतून पहाव्या. प्राणायामाच्या अभ्यासाप्रमाणेच मुद्रांचा अभ्यासही अधिकारी गुरूंच्या मार्गदर्शनाखालीच केला पाहिजे.

अशा रीतीने प्राणायामाचा अभ्यासाने नाडीशुद्धी आणि प्राणजय होतात. योग्याचा चेहरा तेजस्वी दिसतो, जठराग्नी प्रदीप्त होतो, तो निरोगी होतो, त्याच्या अंतरांत अनाहत नाद ऐकायला येतात, दृष्टी निर्दोष होते आणि बिंदु स्थिर होतो. आतां तो प्रत्याहाराने सुरू होणाऱ्या राजयोगाच्या अभ्यासाला योग्य होतो...

## प्रत्याहार.

श्रोत्र, त्वचा, चक्षु, रसना आणि घ्राण ही इंद्रिये आपल्या शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ह्या विषयांमध्ये रमलेली असतात. ती सतत मनाला बाहेर खेचत असतात. त्यांना आपापल्या विषयापासून परत फिरवून आपल्या स्थानात स्थिर करणे हा प्रत्याहार होय. यम, नियम, प्राणायाम इत्यादि उपायांनी चित्तांत विरक्ति निर्माण झाली की इंद्रियांच्या स्वाभाविक बहिर्मुखतेचा निरोध होऊन ती अंतर्मुख होतात. ती चित्ताला न ओढता चित्तच त्यांना आंत खेचूं लागते. अशा रीतीने इंद्रिये चित्ताच्या अधीन झाली की प्रत्याहार सिद्ध होतो. हा राजयोगाचा पहिला आणि अत्यंत कठिण टप्पा आहे. श्रीज्ञानेश्वरांनी (६:५६-५७) याला 'प्रत्याहाराचा आधाडा (तुटलेला कडा)' असे म्हटले आहे. इथे बुद्धीचेही पाय घसरतात आणि हठयोगीसुद्धा आपल्या निश्चयापासून ढळतात. पण चिकाटीने अभ्यास केला की हळूहळू याकड्यावरही साधकाचे पाय टिकू लागतील आणि तो घोरपडीसारखा चढ़ू शकेल असे त्यांचे मार्गदर्शन आहे यासाठीच श्रीस्वामी महाराजांनीही आळस सोडून पुनःपुन्हा प्रत्याहाराचा अभ्यास करायला सांगितले आहे. 'वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता' असे गीतेत (२:६१) भगवंतानी म्हटले आहे. त्यासाठी कामक्रोधादि विकारांचा संवेग सहन करतां आला पाहिजे असे गीतेतच सांगितले आहे. 'शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात्। कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः।।५:२३।।'. एकदा इन्द्रिये ताब्यांत आली की गीतेत सांगितल्याप्रमाणे त्यांना कासव जसा आपली अंगे कवचाखाली ओढून घेतो तशी इंद्रिये विषयांपासून ओढून घेता येतात. असाच साधक स्थितप्रज्ञ होतो. "यस्य संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः। इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।।२:५७।।" मग विषय समोर आले, उपलब्ध झाले तरी त्यांच्याकडे मन ओढ घेत नाही. हे फार महत्त्वाचे आहे. कारण एखादे इंद्रिय जरी ताब्यांतून सुटले तरी ते चित्ताचा क्षोभ करून साधनात विघ्न येते. तेवढ्यासाठी स्वामी महाराज वारंवार हा प्रत्याहार आदराने अभ्यासावा असे सांगत आहेत. इंद्रियांना बलाने विषयांपासून परावृत्त करण्याशिवाय आणखी चार प्रत्याहार महाराजांनी श्रीदत्तपुराणात सांगितले आहेत.( २:१:१०-११) सर्वत्र आत्मान्वयाने पाहणे म्हणजे 'सर्वं विष्णुमयं जगत्' अशी दृष्टी ठेवणे. कर्मफलाचा त्याग करणे हाही प्रत्याहाराचाच दुसरा प्रकार आहे. विषयांची नावड (वैरस्य) हा तिसरा आणि मनांत विषयांच्या दोषांचा निश्चय करणे हा चौथा प्रकार आहे.

प्रत्याहाराचे महत्त्व विशद करणारी स्वामी विवेकानंदांची एक आठवण इथे उद्बोधक ठरेल. रामकृष्ण परमहंसांकडे पूर्वाश्रमात साधन करीत असतां एकदा ते (त्यावेळचे नरेंद्र) आपल्या एका

गुरुबंधूंसह एका निवांत जागी ध्यानाला बसले. पण त्या जागेत डांस खूपच होते. त्यामुळे त्या गुरुबंधूंचे ध्यान कांही लागेना. डांस सारखे डसून त्रास देत होते. कांही वेळाने त्यांनी नरेंद्र कसा ध्यान करतो आहे ते पहावे म्हणून डोळे उघडले. तेव्हां त्याला दिसले की नरेंद्र अगदी तटस्थ निश्चल बसला असून त्याचे गाढ ध्यान लागले आहे. मात्र त्याच्या सर्व शरीरावर डांसांचे जणू पांघरूणच झाले आहे. त्याला त्याचे कांही भानच नव्हते. हे प्रत्याहाराचे उदाहरणच आहे. रमण महर्षींही साधकावस्थेत अरुणाचलम येथे ज्या तळघरांत ध्यानाला बसत तिथे किडे आणि उंदीर त्यांचे पाय कुरतडत असत. त्यांच्या शरीरावर ते वण पुढे आयुष्यभर दिसत असत. समर्थ रामदास स्वामींही गायत्री पुरश्चरण गोदावरीत कमरेइतक्या पाण्यांत उभे राहून जप करीत. त्यांना तेथील मासे चावत असत. त्यांच्या मांड्यावर व पिंढऱ्यावर यांचे वण पडले होते असे म्हणतात. असा प्रत्याहार एकदा साधला की पुढे धारणा, ध्यान आणि समाधि सुलभ होते असे महाराज सांगत आहेत. ८२ – ८९.

## धारणा.

पातंजल योगदर्शनात धारणा, ध्यान आणि समाधि यांच्या व्याख्या अशा दिल्या आहेत. ‘देशबन्धश्चित्तस्य धारणा’, ’तत्र प्रत्यैकतानता ध्यानम्’, ’तदेवार्थमात्रनिर्भासं स्वरूपशून्यमिव समाधिः’. एका जागेवर (ध्येयाशी) चित्ताला बांधून ठेवणे म्हणजे धारणा. त्याच ठिकाणी प्रत्ययाची एकतानता होणे म्हणजेच चित्त ध्येयाकडे अखंडित प्रवाहित होणे हे ध्यान. तेच ध्यान ध्येयाशी एकरूप होऊन त्याचे वेगळेपण नाहीसे होणे म्हणजे समाधि. समाधीत ध्याता, ध्येय आणि ध्यान एकरूप होऊन जातात. ह्या तीनही एकाच प्रक्रियेच्या अवस्था मानायला हरकत नाही. योगदर्शनांत या तिहींना मिळून संयम अशी एकच संज्ञा पतंजलींनी दिली आहे. धारणेत चित्त ध्येयाला बांधलेले असते. पण इतर वृत्तीही येत जात असतात. एखाद्या दोरीने बांधलेले वांसरू जसे सभोंवती चरत असले तरी फिरून पुन्हा खुंटीलाच येते, त्याप्रमाणे इतर वृत्तींचा उपशम झाला तरी धारणेने बांधलेले मन परत ध्येयाच्याच आश्रयाला येते.

ही धारणा निर्गुण आणि सगुण अशी दोन प्रकारची सांगतली आहे. पंचमहाभूते, प्राण, बुद्धि आणि आत्मस्वरूप ह्यांच्यावर धारणा करण्याची विधाने आहेत. ह्या शरारात नाभी, हृदय, वक्ष, कंठ, मुख, नासिकाग्र, नेत्र, भ्रूमध्य आणि मूर्धा (टाळू) अशा दहा ठेकाणी धारणाश्रयाची म्हणून सांगितली आहेत. सर्वोत्तम धारणा म्हणजे मन अभ्यासने आत्मरूपाशी संलग्न ठेवणे. विक्षेपाने ते विचलित झाले तर ते पुन्हां तिथेच आणावे. हा अभ्यास कांही विशिष्ट वा मर्यादित काळापुरताच नाही तर सतत करायचा आहे. ह्यालाच अनुसंधान असे नांव आहे.

अर्थातच निर्गुणावर म्हणजे गुरुमुखांतून श्रवण केलेल्या आणि मननाने निश्चित केलेल्या आत्मस्वरूपावर धारणा करणे हे कठिण आहे. त्यासाठी सगुणावर ते स्थिरावण्याचा अभ्यास करावा. श्रीदत्तप्रभू कार्तवीर्याला सांगतात, ‘अरे अर्जुना! मी खरातर निर्गुणच आहे. तरी भक्तांच्या उद्धारासाठी त्यांना अनुसंधानाला सुलभ व्हावे म्हणून हे सुंदर, सलक्षण मनोहर रूप मी धारण केले आहे.’ भगवंताचे इंद्रियगोचर सगुण रूपाची धारणा हाच सर्वांना सुलभ असा श्रेष्ठ योग आहे. श्रीदत्तपुराणात याचे आपादमस्तक असे रम्य वर्णन केलेले आहे. “वज्र, अंकुश, ध्वजा, कमल यांच्या चिह्नानी सजलेले कमळाच्या तांबस रंगाचे पायाचे तळवे; त्यावर भक्तांच्या हृदयांतील अंधार मालवणारी माणकासारखी तेजस्वी नखे; कासवाच्या पाठीसारखा फुगीर पायाचा पृष्ठभाग; पुष्ट आणि मांसल मांड्या; प्रशस्त बैठक; दुसऱ्या मांडीवर सहज ठेवलेला एक पाय;  दिगंबर,; सुंदर नाभीसह पातळ पोट; कपाटासारखी रुंद छाती; विशाल मांसल बाहूद्वय; शुभचिह्नांनी मंडित हात; शंखासारखा तीन वलयांनी युक्त गळा; स्निग्ध

आणि पांढरे डोळे आणि काळीशार बुबुळे; (कपाळावर) रुळणारी पिंगट जटा; चंद्रासारखी मनोहर कांती;, मुखकमलाला शोभविणाऱ्या स्वभावतः निर्मल अशा दंतपंक्ती; हृदयांतील अनुग्रहरूपी चंद्रम्याचे द्योतक असे चेहऱ्यावर विलसणारे मधुर स्मित; आपल्या दोन हातांनी भक्तांना आश्वासणाऱ्या अभय आणि वर मुद्रा!" अशी ही कितीही पाहिली तर पहातच रहावीशी वाटणारी, अखंड समाधीत बुडालेली मूर्तीच योग्याने निरंतर धारणेत ठेवावी. मन इकडे तिकडे गेले तरी खेद न करतां निश्चयाने पुनःपुन्हा अभ्यासाने त्या मूर्तीतच स्थिर करावे. भगवद्गीतेत हे पुढील शब्दांत सांगितले आहे. 'यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम्। ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत।।६:२६।।' ही मूर्ति साधारण टीचभर आकाराची असावी आणि तिची धारणा हृदयप्रदेशात (अनाहत चक्रांत) करावी असे योगरहस्यांत महाराजांनी स्पष्ट केले आहे. ही धारणा इतकी दृढ झाली पाहिजे की इतर कोणतेही व्यवहार करतांना चित्त कायम त्या स्वरूपाला सोडून जाऊं नये. अशा सगुण धारणेच्या अभ्यासाने निर्गुण धारणाही हळूहळू सहज जमू शकते.९० - ९७.

## ध्यान.

साधारणतः ध्यान-धारणा असा शब्दप्रयोग केला जातो. त्यांत प्रथम ध्यान आणि मग धारणा आहे. ते योग्य नाही. आधी धारणाभ्यास केला पाहिजे. तो पक्का झाला की मगच चित्त अखंडितपणे तेलाच्या धारेसारखे, ध्येयाकडे प्रवाहित होते. योगशास्त्रात ध्यानाला उपसमाधी म्हटले आहे. ध्यानाचे विस्मरण झाले की तीच समाधी होते. तेच ध्यान! धारणप्रमाणेच ध्यानसुद्धा सगुण आणि निर्गुण असे दोन प्रकारचे आहे. धारणेतही मन सारखे ध्येयाकडे लागलेले असते. पण त्यांत इतर वृत्तींचा विच्छेद असतो, खंड पडतो. ध्यान मात्र अविच्छिन्न असते. त्यासाठी महाप्रयास लागतात. योगरहस्यानुसार ध्यान अंगुष्ठमात्र मूर्तीचे कंठप्रदेशांत (विशुद्ध चक्रात) करावे. सतत २४ तास ध्यान टिकले की ते सिद्ध झाले असे समजावे. योग्यांच्या मते ध्यानाचे मुख्य लक्षण हे आहे की 'मा ध्याता, हे ध्येय ज्याचे मी ध्यान करतो आहे' अशी जाणीव असते. ध्याता, ध्येय आणि ध्यान ही त्रिपुटी असणे हेच ध्यान होय. संपूर्ण सगुण मूर्तीचे ध्यान स्थिर झाले की योग्याने मूर्तीच्या स्मितहास्यावरच मन केंद्रित करावे. ते हास्य सच्चिदानंदस्वरूप असते. त्यामुळे त्याचे ध्यान निर्गुण ध्यानच होऊन जाते. ९८ – १०१.

## समाधी.

ध्यानाच्या अभ्यासाने जेव्हां मन स्थिरावते, मी ध्याता हेसुद्धा विसरून जाते, ध्यानाचीही जाणीव नाहीशी होते आणि केवळ ध्येयाकारानेच उरते तेव्हा समाधी अवस्था होते. समाधीसाठी योगरहस्यांत अतिसूक्ष्म, शांत आणि तेजोमय भगवत्स्वरूप सांगितले आहे. समाधीचा अभ्यास ब्रह्मरंध्रांत (सहस्रार चक्रांत) करायचा आहे. बारा दिवस ही भगवत्स्वरूपाकार अवस्था झाली की समाधी सिद्ध झाली असे म्हणतात. अशी समाधी सिद्ध झालेल्या योग्याचा वध कुठल्याही शस्त्रांने होत नाही किंवा कोणत्याही मंत्रतंत्राचा त्याच्यावर परिणाम होत नाही असे फळ शास्त्रांत सांगितले आहे.

भगवद्गीतेत (६:१९) समाधीला मुळीच वारा नसलेल्या ठिकाणच्या दिव्याची उपमा दिली आहे. निर्वात स्थळीच्या त्या दिवाची शिखा जशी मुळीसुद्धा थरथरत नाही, अगदी निश्चल असते तसे समाधिस्थ योग्याचे मन स्थिर हाते. देहाची जाणीव तर जातेच पण आंतली (मन, बुद्धी इत्यादि) आणि बाहेरची (जगाची) शुद्धीही त्याला नसते. जाग्रती, स्वप्न आणि सुषुप्ती ह्या अवस्थांना पार करून तो उन्मनी अवस्थेत जातो. या तुर्यावस्थेत तो प्रवेशला की त्याचा अहंकारच मावळतो. देह, मन, बुद्धी इत्यादींशी बांधणारी अभिमानाची गांठ तुटून जाते. अशा रीतीने अज्ञानाचा समूळ नाश होतो. तिथे

योगी आपल्या आत्मस्वरूपाला पाहतो (जाणतो) आणि त्यांतच विलीन होतो. ह्या ज्ञानयोगाने आत्यंतिक म्हणजे कधीही न कमी होणाऱ्या सुखाची अनुभूती तो घेतो. गीतेत (६:२१) सांगितल्याप्रमाणे अतींद्रिय असे केवळ बुद्धीलाच ग्राह्य असलेले अतीव सुखाचा तो अनुभव घेतो. ही समाधी कर्मजन्य दैवाचा नाश करते. त्यामुळेच धर्माच्या वृष्टीने वासनाजालाला धुवून टाकणारा मेघ असे समाधीला नांव आहे. धर्म म्हणजे शास्त्राच्या आज्ञेने केलेले सत्कर्म. ते आपल्या पुण्याची वृद्धि करते आणि पापांचा क्षय करते. समाधी अवस्थेत साधकावर अशा पुण्याच्या राशींचा वर्षाव होत असल्याने समाधीला धर्ममेघ म्हटले आहे.

संत तुकाराम महाराजांनी 'अणुरणिया थोकडा' या अभंगात समाधी अवस्थेचेच वर्णन केले आहे. '**अणुरणिया थोकडा तुका आकाशाएवढा।**', हे 'अणोरणीयान् महतो महीयान' या शब्दांत उपनिषदांत प्रतिपादलेले आत्मस्वरूपच आहे. त्या आत्मस्वरूपाला जाणून आपण त्याच्याशी एकरूप झालो हेच संतशिरोमणी सांगत आहेत. '**गिळुनि सांडले कळिवर भवभ्रमाचा आकार**' या चरणात आपले देहतादात्म्य नष्ट झाल्याचे स्पष्ट केले आहे. चैतन्यरूप आत्म्याला जड आणि आभासमय अशा देहत्रयाशी बांधणारा अहंकार हीच चिदचिद्ग्रंथी आहे. ही गांठ तुटून प्रपंचरूपी भ्रमांतूनच आकारलेल्या कलेवराचा मी त्याग केला आहे असे त्यांनी खात्रीपूर्वक सांगितले आहे. '**सांडिली त्रिपुटी, दीप उजळला घटी**'' ह्या चरणात ते सांगतात की ध्येय, ध्याता आणि ध्यान ही त्रिपुटी मी सोडली असल्याने आत्मज्ञानाचा दीप या चित्तस्वरूपी घटांत प्रकाशला आहे. अशा या समाधी अवस्थेचा अनुभव घेतलेला साधक कृतकृत्य होतो, त्याला करायचे, मिळवायचे असे कांहीच रहात नाही. आपल्याकडे येणाऱ्या आर्त, अर्थार्थी, जिज्ञासू यांना मार्गदर्शन करणे एवढेच त्याचे कर्तव्य शिल्लक असते. म्हणून ते समारोप करतात, '**तुका म्हणे आतां उरलो उपकारापुरता.**'

"हे अर्जुना, सर्व विषादांचा नाश करणारा, सर्व दुःखांचा अंत करणारा, आणि जीवात्मा आणि परमात्मा यांचे ऐक्य करविणारा योग मी तुला मी सांगितला. श्रीमद्भगवद्गीते श्रीकृष्णांनी अर्जुनाला हेच सांगितले आहे.तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम्। स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा।।६:२३।।"

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चौदावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १५ वा.

सांगे अवधूतज्ञान। सजातीय प्रत्ययलक्षण। विजातीयनिरसन। निदिध्यासन यथार्थ।।३२।।
दत्त दावी अभ्यासमार्ग। तसा राजा करी सांग। समाधिस्थ हो मग। पंध्राव्यांत हे कथा।।३३।।

## योगाभ्यासानंतरही वाक्यविचाराची आवश्यकता.

श्रीदत्तप्रभूंनी केलेले हे योगाभ्यासाचे सविस्तर निरूपण ऐकून अर्जुनाला आनंद वाटला. तरी पण एक शंकाही त्याच्या मनांत उपस्थित झाली. तेव्हां पुन्हा एकदां दत्तगुरूंना नमस्कार करून तो म्हणाला, "आपण केलेले हे योगाभ्यासाचे मार्गदर्शन ऐकून मला खूप छान वाटले. पण एक प्रश्नही मला पडतो आहे. आपण वर्णिल्याप्रमाणे जर योगाभ्यासानेच साक्षात्कार होत असेल तर महावाक्यांचे मननादि करण्याचा वेगळा खटाटोप पुन्हां का करायचा? ही माझ्या मनातली शंका आपणच दूर करू शकाल अशी माझी खात्री आहे!"

अर्जुनाचा हा मार्मिक प्रश्न ऐकून तो आपले निरूपण लक्षपूर्वक करत असल्याचे आणि त्याचे मननही करीत असल्याचे दत्तगुरूंना जाणवून ते प्रसन्न झाले आणि त्याला पुढे सांगूं लागले. "कार्तवीर्या! आत्मज्ञानाविना केवळ योगाने मोक्ष होत नाही. त्यासाठी योग्याला ज्ञानाचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. प्राणायामाने मन स्थिर केल्यानंतर आपण पूर्वी गुरुमुखांतून श्रवण केलेल्या ज्ञानाचे मनन करणे आवश्यक आहे.

## विजातीय प्रत्ययांचा निरास आणि सजातीय प्रत्ययांत प्रवाहीकरण

मनन याचा अर्थ श्रवण केलेल्या अर्थातून प्रतीत होणाऱ्या परमात्म्याचे अखंड मनोवृत्तीने चिंतन होय. त्या परमात्मस्वरूपाकडे अखंड तैलधारेसारखे मन प्रवाहित करणे हेच मननाचे स्वरूप होय. आपण आधी पाहिल्याप्रमाणे महावाक्यातं ब्रह्माचे (आत्म्याचे) स्वरूप दोन प्रकारांनी स्पष्ट केलेले आहे. तो आत्मा कसा नाही, म्हणजेच तो अनुभवाला येणाऱ्या जगतापेक्षा कसा विलक्षण म्हणजे वेगळा आहे हे सांगणाऱ्या वाक्यांना **निषेध्य** असे म्हणतात. तो अशब्द आहे म्हणजे तो कानांना ऐकता येत नाही; तो अस्पर्श आहे म्हणजेच त्याचा स्पर्श त्वचेला जाणवत नाही; तसेच चक्षु, रसना, नासिका इत्यादि इंद्रियांना न कळणारा म्हणजेच अरूप, अरस आणि गंधहीन आहे. त्याला आदि आणि अंत नाहीत, तो नित्य आहे. तो एकमेवाद्वितीय आहे म्हणजेच त्याच्यापेक्षां वेगळी अशी कांही वस्तूच नाही. त्याला विजातीय अथवा सजातीय भेद असूंच शकत नाहीत. त्याला हात, पाय इत्यादि अवयव नाहीत म्हणून त्याला स्वगत भेदही नाही. त्याला वर्ण, गोत्र नाहीत. मन वा बुद्धीला त्याचे आकलन होत नाही म्हणून तो अवेद्य आहे. हे सर्व **निषेध्य** गुण होत. हेच नामरूपात्मक **विजातिप्रत्यय** होत. आत्म्याचे चिंतन करतांना हे सर्व दूर टाकायचे आहेत. त्यांचा निरास करायचा आहे.

याउलट आत्मा नित्य आहे, शुद्ध आहे, मुक्त आहे, सत्य आहे, ज्ञानरूप आहे, अनंत आहे, परब्रह्मस्वरूप आहे, अच्युत, असंग आणि सर्वश्रेष्ठ आहे. हे त्याचे **विधेय गुण** आहेत. हेच **सजातीय प्रत्यय** होत. या सजातीय प्रत्ययांत मन निरंतर प्रवाहित करायचे आहे. हे योगाभ्यासांत वर्णन केलेल्या ध्यानासारखे आहे. हेच निदिध्यासनाने प्रगाढ झाले की सविकल्प समाधी या संज्ञेला प्राप्त होते. श्रवणात सहा निकषांनी (लिंगांनी) निश्चित केलेला आणि लक्षणावृत्तीने हेरलेला अर्थच या मननांत स्थिर

---

***यमन***[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

होतो. मी तोच अखंड एकरस परब्रह्मस्वरूप आत्मा आहे. परात्पर, परमशिव परमश्रेष्ठ पुरुषोत्तम मीच आहे. असे हे मनन करतां करतां जेव्हां ध्येय, ध्याता आणि ध्यान सगळे एकच होऊन जातात तेव्हां मन निर्वात स्थळींच्या दीपशिखेसारखे निश्चळ होऊन ध्येयाकारच होऊन जाते. हीच निर्विकल्प समाधी होय. (समाधि हा शब्द संस्कृत भाषेत पुल्लिंगी आहे. मराठीत मात्र हा शब्द परंपरेने स्त्रीलिंगी झाला आहे.) ” १ – १६

## ब्रह्माकार मनोवृत्ती.

“ही निर्विकल्प समाधी अज्ञानरूपी अंधःकाराला दूर सारून प्रारब्धकर्माचे उपशमन करते आणि वासनांचे निबिड अरण्य जाळून टाकते. सर्वव्यापी स्वयंप्रकाश सच्चिदानंदघन चैतन्य त्या वेळी स्पष्टपणे प्रकट होते. अशा या आत्मदर्शनाने योगी बाह्य जगाचे आणि आपल्या जीवत्वाचेही भान हरवतो आणि अखंड, एकरस, अविकारी, अविचल, आनंदघन परमात्मस्वरूपात निमग्न होतो. ‘मी ब्रह्म आहे’ ही वृत्ती मनांत दाटलेल्या जन्मजन्मातरींच्या अज्ञानाचा काळोख निवारून निष्कल ब्रह्माला स्पष्ट करते. ह्या वृत्तीचा विषय केवळ ब्रह्म हाच असतो. ह्या ब्रह्माकार वृत्तीने मूळ अज्ञान आणि त्याचेच कार्य असलेली जीवदशा दोन्ही नष्ट होऊन जातात आणि सत्य, चैतन्य आणि आनंदरूप मायारहित ब्रह्मच उरते. ही जर मनाची वृत्ती असेल तर मन असणार आणि अद्वैतही असणार अशी शंका घेऊं नकोस. कारण साक्षात्काराचे कार्य झाले की मनासहित ती वृत्तीही त्या आत्मस्वरूपांत मुरून जाते. निवळीच्या बियेचा कल्क जसा गढूळ पाण्यात टाकला की ते पाणी स्वच्छ करून स्वतःही नाहीसा होतो तशीच ही ब्रह्माकार वृत्ती अज्ञानरूपी गढूळता नाहीशी करून स्वतःही विरून जाते. घडा फुटला की घटाकाश जसे महाकाशात विलीन होते तसेच जीवाला ब्रह्मापासून वेगळा (द्वैत) दाखविणारी आणि दुःखकारक संसारात फिरविणारी अविद्यामायारूपी उपाधि नाहीशी झाली की जीवच स्वयंप्रकाश आत्मा होऊन जातो. १७ – २५

## ब्रह्मज्ञानाची प्रक्रिया.

सर्वसाधारणतः आपल्याला कोणत्याही वस्तूचे ज्ञान होते तेव्हां ती अज्ञात वस्तु इंद्रियांच्या माध्यमांतून मनाला कळते. तसे ब्रह्माचे ज्ञान होऊं शकत नाही. कारण आत्मा किंवा ब्रह्म इंद्रियांना आणि मनाला अगोचर आहे. तो स्वयंप्रकाश आहे याचाच अर्थ इंद्रिये किंवा मन त्याला प्रकाशूं शकत नाहीत. त्याला कोणीच जाणूं शकत नाही. म्हणूनच त्याला अग्राह्य म्हटले आहे. तो सर्व इंद्रियांचा द्रष्टा आहे. तो दृश्य नाही. हा वेदांताचा सिद्धांत अबाधित आहे. मग हे आत्मज्ञान होते कसे? त्यासाठी आरशाचा दृष्टांत दिला आहे. माणूस आपला स्वतःचा चेहरा पाहूं शकत नाही. त्याला तो पहायचा असेल तर आरशात पहावा लागतो. खरे तर आरसा ही जड वस्तु आहे. त्याला ज्ञान कसे होईल? पण त्या जड उपाधीच्या माध्यमांतून आपणच आपला चेहरा पहात असतो. तसे पहात असतां आरशावरील मळ किंवा त्याच्यावरचे ओरखडे आपल्या चेहऱ्यावर उमटलेले दिसतात. मग आरसा स्वच्छ केला की चेहराही स्वच्छ दिसतो. त्याचप्रमाणे आपल्या मनातल्या रागद्वेषांच्या अशुद्धीने आपल्या मनांत बिंबलेले आत्मस्वरूपही मलीन भासते. शास्त्रांत सांगितलेल्या उपायांनी हे मळ घालवून टाकले की स्वच्छ मनांत आत्मस्वरूप प्रकाशते. आपल्या बुद्धीत (किंवा मनांत) प्रतिबिंबित झालेले आत्मस्वरूप म्हणजेच जीव होय. त्याला बाह्य विषयांचे ज्ञान होण्यासाठी इंद्रियांचे साह्य घ्यावे लागते. अंधारांत ठेवलेला घडा पहायचा असेल तर डोळ्याबरोबरच दिव्याचीही आवश्यकता असते. पण दिव्याला पहायला नुसते डोळे पुरेसे आहेत. त्याचप्रमाणे आपल्या बुद्धीत प्रतिबंबित आत्म्याच्या दर्शनासाठी केवळ मन पुरेसे आहे. कारण आपण स्वतःलाच पहात असतो. इतर आगंतुक साधनांचे तिथे कांहीच प्रयोजन नाही. दिवा

पहायला जसा दुसरा दिवा लागत नाही; कारण तो स्वयंप्रकाश आहे. तसेच स्वयंप्रकाश आत्म्याचे दर्शन मनाने किंवा इंद्रियांनी होत नाही. आत्म्यालाच आपल्या मनांत प्रतिबिंबित झालेल्या स्वरूपाची जाणीव होते. एऱ्हवी ती न होण्याचे कारण अज्ञान आहे. ते अज्ञान वर वर्णिलेल्या ब्रह्माकार वृत्तीनेच नाहीसे होते. ही अंतिम वृत्ती निर्माण व्हावी म्हणूनच सगळा श्रवणादिक खटाटोप करावा लागतो. दुसरा (योगादिक) उपाय तिथे चालत नाही. ती वृत्ती एकदां उद्भवली की अज्ञानाचा नाश करून स्वतःही आत्मस्वरूपांतच मुरून जाते. मग उरते ते निखळ आत्मस्वरूप! हीच निर्विकल्प समाधी होय आणि हीच परमगती आहे. २५ – ४०.

ह्या अखंड, एकरस ब्रह्माच्या अवस्थेत दुसऱ्या कशाचीही जाणीव नसते; कारण दुसरे कांही उरतच नाही. झोपेतही मन इंद्रियांपासून उपरत झालेले असते आणि बाह्य प्रपंचाचा लय झालेला असतो. तसेच सुखाची, आनंदाची अनुभूती असते. मग झोपेलाच समाधी का म्हणू नये? याचे उत्तर असे की झोपेत सर्व वृत्तींचा लय नसतो. अभावाचा प्रत्यय येत असतो. अभावाचा प्रत्यय हेच जिचे आलंबन (विषय) आहे अशी वृत्ती हीच पतंजलींनी केलेली निद्रची व्याख्या आहे. झोपेत येणारी सुखानुभूती वृत्तिज्ञानानेच येते. जाग्रती आणि स्वप्न या अवस्थातही आनंदाची येणारी अनुभूती वृत्तिज्ञानानेच येते. या दोन्हींचे अज्ञानाशी वैर नाही. वर वर्णिलेल्या अंतिम वृत्तीचे मात्र अज्ञानाशी वैर आहे. ती एकदा उद्भवली की अज्ञानाचा नाश करूनच मावळते. त्यानंतर संसाराचा मोह पुन्हा होत नाही. हे स्पष्ट करण्यासाठी सूर्यकांताचा दृष्टांत दिला आहे. साध्या उन्हांत वाळलेले गवत ठेवले तर ते जळत नाही. पण तेच उन्ह बहिर्गोल भिंगातून केंद्रित केले की गवताला जाळून टाकते. तसेच जाग्रत-स्वप्न-सुषुप्तीतील वृत्तिज्ञान अज्ञानाला बाधत नाही. पण मी ब्रह्म आहे हे वृत्ती अज्ञानाला नष्ट करते. ४१ - ४२.

## योगमार्गातील विघ्ने.

**सिद्धी** :- योगाभ्यासात आत्मज्ञानाच्या उद्देशाने प्रगती करणाऱ्या साधकाला आड येणारे एक प्रमुख विघ्न म्हणजे योगसिद्धी होत. सिद्धी म्हणजे अतिमानवी शक्ती. यांतील यमनियमांच्या पालनाने प्रकट होणाऱ्या कांही सिद्धींचे वर्णन मागच्या लेखांत आले आहे. इथे श्रीस्वामी महाराजांनी अणिमादि अष्टमहासिद्धींचा उल्लेख केला आहे. ह्या सिद्धी अशा – १. **अणिमा**. ह्या सिद्धीने शरीर अत्यंत सूक्ष्म करतां येते. मारुतीरायांनी लंकेत प्रवेश करतांना ह्या सिद्धीचा प्रयोग केला होता. २. **लघिमा**. ह्या सिद्धीने शरीर अगदी हलके करतां येते. ३. **महिमा.** शरीराचा आकार मोठा करणे. गोपाळकृष्णांनी गोकुळांत आलेल्या अनेक असुरांचा नाश त्यांच्या शरीरांत प्रवेश करून मग एकदम आपले शरीर मोठे करून केलेला वर्णिलेला आहे. ४. **प्राप्ती**. हवी ती वस्तु ह्या सिद्धीच्या द्वारा बसल्या ठिकाणी मिळते. ५. **प्राकाम्य** सिद्धी आपली कोणतीही इच्छा विनासायास पूर्ण करते. ६. **वशित्व** म्हणजे पंचमहाभूते, म्हणजेच सर्व भौतिक पदार्थांवर पूर्ण नियंत्रण. ७. भूतभौतिक पदार्थांची उत्पत्ती किंवा नाश करण्याच्या सामर्थ्याला ईशितृत्व किंवा इशित्व असे म्हणतात. ८. यत्रकामावसायित्व. ही सिद्धी प्राप्त झालेला योगी आपला कोणताही संकल्प पूर्ण करू शकतो. उदाहरणार्थ विषाचे अमृत करू शकतो ह्या महासिद्धी आहेत. ह्या सिद्धी, विशेषतः आठवी संकल्पसिद्धी असणारे योगी परमेश्वरी संकल्पाच्या विरुद्ध कांहीही करत नाहीत. त्यांचा संकल्प ईश्वरी संकल्पाच्या म्हणजेच समष्टी संकल्पाशी एकरूप झालेला असल्याने असा अनवस्था प्रसंग उत्पन्नच होत नाही.

ह्या महासिद्धीशिवाय परचित्तज्ञान, पूर्वजन्मज्ञान, दूरश्रवण, दूरदर्शन, कायव्यूहज्ञान, भुवनज्ञान, भूत-भविष्य-वर्तमानज्ञान इत्यादि अनेक सिद्धी योगाभ्यासाने प्राप्त करतां येतात. त्यांचे वर्णन पतंजलींनी योगदर्शनाच्या विभूतिपादांत केलेले आहे. तसेच ह्या सर्व सिद्धी समाधीच्या प्राप्तीतील विघ्ने

आहेत (३:३७) हेही स्पष्ट केले आहे. ह्या सर्व सिद्धींचे फळ संसारांतर्गतच असल्याने नश्वर आहे. ऐहिक ऐश्वर्याचा आणि ऐंद्रिय भोगांचा लाभ त्यांच्याकडून मिळतो पण त्यांच्यामागे लागल्याने आपल्या तपश्चर्येचा क्षय होतो आणि मोक्षमार्गावरून साधक घसरतो हे लक्षांत घेऊन मोक्षाच्या परमसुखाची इच्छा असेल तर यांच्यापासून दूरच राहावे. श्रीमद्भागवतांत राजर्षि ऋषभदेवांना महासिद्धी प्राप्त झाल्या असतां त्यांनी त्यांचा स्वीकार केवा नाही. कारण आपल्या मनाचा कांही भरंवसा देतां येत नाही. सिद्धींच्या द्वारां ते परत प्रयत्नपूर्वक सोडलेल्या विषयांच्याच मागे धावूं लागेल. शुद्ध आत्मज्ञानाने लाभणारा मोक्षच शाश्वत आणि खऱ्या सुखाचा ठेवा आहे हे मनांत पक्के धरून तोच प्रयत्नपूर्वक मिळवावा. ४३ - ४७.

**लय :-** चित्ताचा निरोध करतांना तमोगुणाच्या प्रभावाने झोंप येण्याची शक्यता असते. अशा वेळी आपल्या विवेकाने त्याला जागे करावे आणि मनन-निदिध्यासनांत लावावे.

**विक्षेप :-** विषयांच्या कामनेकडे आणि भोगाकडे ओढल्या गेलेल्या चित्ताच्या वृत्तींना विक्षेप असे म्हणतात. त्या चित्तवृत्तींचा वारंवार उपशम करून मन आत्मचिंतनात लावावे. यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम्। ततस्तोत नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत्।। भ.गीता ६:२६।। ज्या ज्या ठिकाणी हे चंचल मन धांव घेईल त्या त्या ठिकाणाहून त्याचे नियमन करून आत्मस्वरूपांतच वळवावे. असा गीतेचाही उपदेश आहे.

**कषाय :-** मनांत घर करून असणारे विषयांचे आकर्षण म्हणजे कषाय. तो प्रयत्नाने टाकून द्यावा. अशा रीतीने सम म्हणजे स्थिर केलेल्या चित्ताने स्वरूपानुसंधान करावे.

**रसास्वाद** :- समाधीच्या अभ्यासाने चित्तांत आनंद प्रकटतो. हे योगाचे सुखही पुढच्या प्रगतीचा अडसर ठरते. यासाठी विवेकाने त्यांतही न रमतां अभ्यासाकडेच लक्ष द्यावे. ४८

## योगीचर्या.

अशा नेटाने केलेल्या अभ्यासाने मन वारा नसलेल्या ठिकाणी ठेवलेल्या दिव्याच्या ज्योतीप्रमाणे निश्चल होऊन जाते. सर्व वृत्तींचा उपशम होतो आणि योगी कृतार्थ होतो. त्याच्या कर्मांचा नाश होतो. हृदयांतील ग्रंथी तुटून जातात. त्याच्या संशयाचे सर्व घडे फूटतात आणि शोक व मोह आटून जातात. इथे कर्मांचा नाश सांगितला आहे तो मुख्यतः संचित आणि क्रियमाण कर्मांचा. पण जन्माला येतांना बरोबर आलेले प्रारब्ध कर्म मात्र शिल्लक राहते. संचित म्हणजे जन्मोजन्मी करून ठेवलेला कर्मांचा सांठा. जन्माला येतांना जीव फक्त त्या जन्मापुरते कर्म घेऊन येतो. क्रियमाण म्हणजे ह्या जन्मात आपल्याकडून घडत असलेले कर्म. त्याची संचित कर्मांत भर पडत असते. निर्विकल्प समाधीच्या प्रभावाने संचित आणि क्रियमाण कर्मांचा नाश झाला तरी उरलेले प्रारब्ध जीवन्मुक्तालाही भोगावेच लागते. अर्थात ते शरीरापुरतेच मर्यादित असते. कारण त्याच्या मनाचा नाशच झालेला असतो. सुख वा दुःख मनालाच जाणवते. तेच नसल्याने प्रारब्धानुसार शरीराला जे भोग प्राप्त होतात त्यांचे त्याला कांहीच सुख वा दुःख वाटत नाही. सापाने टाकलेल्या कातीप्रमाणे त्या शरीराचा अभिमान मुक्त पुरुषाने सोडलेला असतो. असा योगी आत्माराम म्हणजे आत्मानंदातच रमलेला असतो आणि सुखदुःखाचा विचार न करतां कौतुकाने प्रारब्ध भोगीत असतो. ४९ – ५२.

हा असा योग जोंपर्यंत पूर्ण पक्का अंतःकरणात रुजत नाही तोंवर योग्याने मुग्ध (वेडा), अंध, बहिरा, मुका आणि पाङ्गळा होऊन रहावे. मुग्धोऽन्धो बधिरोऽजिह्वो योगी पङ्गुर्नपुंसकः। स्वात्मदृक् परमानन्दो भवेत्स्वैरगतिः सदा।। दत्तपुराण २५:६०।। सर्व इंद्रिये सक्षम असूनही विषयांच्या सान्निध्यात जो झोपलेल्या माणसासारखा अविचल राहतो. इतरांच्या दृष्टीने तो मुग्ध म्हणजे खुळाच गणला जातो.

श्रीमद्भगवद्गीतेतही स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगताना भगवंत म्हणतात की जेव्हा त्या योग्याची सर्व इंद्रिये आपापल्या विषयांपासून कासवाच्या पायांसारखी आंत ओढली जातात तेव्हा त्याची प्रज्ञा स्थिर झाली असे समजावे.(२:५८) उभा अथवा बसलेला असतांना किंवा चालतांनासुद्धा दृष्टी चार हातांपेक्षा दूर न जाणे हेच योग्याचे आंधळेपण होय. दुःखदायक आणि अप्रिय किंवा सुखदायी आणि प्रिय वार्ता तसेच कल्याणप्रद वा अकल्याणकारक बोलणे कानांवर पडूनही जो ते मुळीच मनावर घेत नाही त्याला लोक बहिराच मानतील ह्यांत काय नवल? गीतेच्या शब्दात 'दुखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः' असा तो होतो. जो अगदी कामापुरतेच सत्य आणि हितकारी भाषण बोलतो तसेच जेवतांना कडू-गोड, बेचव आणि रुचकर पदार्थ इतक्या उदासीनपणे सेवन करतो त्याला जीभ आहे की नाही अशी शंका यावी. आवश्यक शरीरधर्मांपुरतेच (मलमूत्रविसर्जन आणि भिक्षा) ज्याचे फिरणे आहे तो योगी पांगळाच समजावा. समोर कुमारी, तरुणी किंवा वृद्ध स्त्री आली तरी ज्याचे मन सारखेच निर्विकार राहतो त्याची गणना नपुंसकातच करावी. त्याचे मन सतत अंतरात्म्याच्या चिंतनातच रमलेले असल्याने तो निरतिशय आनंदाचा अनुभव घेत असतो त्यामुळे त्याची मनोवृत्ती बाह्य विषयांकडे जातच नाही. हा योग्यांचा आचार जो कटाक्षाने पाळणाऱ्या अंतर्निष्ठ मुनीला शहर, ग्राम किंवा वन हे सर्व सारखेच असतात. ही योग्याची जीवनचर्या संत तकाराम महाराजांच्या खालील अभंगांत व्यक्त झाली आहे.

मनाचा मवाळ वाचेचा रसाळ। त्याचे गळां माळ असो नसो।।
आत्मानुभवी चोखाळल्या वाटा। त्याचे माथी जटा असो नसो।।
परद्रव्या अंध परनिंदे मुका। त्याचे भाळी बुक्का असो नसो।।
परस्त्रीचे ठायीं जो कां नपुंसक। तोचि संत देख तुका म्हणे।।

महात्मा गांधींच्या तीन माकडांनी आपल्या डोळ्यांवर, तोंडावर आणि कांनांवर हात ठेवून हाच उपदेश दिला आहे. ५३-६०.

## योग कुणाला सांगावा?

ह्या ठिकाणी भगवंतांनी कार्तवीर्यार्जुनाला आठव्या अध्यायापासून केलेल्या उपदेशाचा समारोप होत आहे. योग आणि ज्ञान मार्गाचे प्रबोधन करणाऱ्या अष्टाध्यायीचा उपसंहार करतांना दत्तप्रभू कार्तवीर्याला म्हणतात, "अर्जुना! तुला मी हा योग सांगोपांग सांगितला आहे. हा तू फक्त श्रद्धावंत, अनासक्त आणि विनम्र अशाच शिष्यांना सांगावास." सांगोपांग या शब्दांतून ह्या योगाचे केवळ मौखिक निरूपणच श्रीदत्तप्रभूंनी केले नाही तर त्याचे प्रत्यक्षिक मार्गदर्शनही केले आहे असे ध्यानांत येते. तसेच त्या योगाचा अंगांसहित अभ्यासही करायला सांगितला आहे. योगाचे ज्ञान हे असे परंपरेनेच चालत आले आहे. ती परंपरा पुढे चालविण्यासाठी हे ज्ञान शिष्यांना दिले पाहिजे हे सुचवून ते कुणाला द्यायचे तेही स्पष्ट केले आहे. ह्यालाच शास्त्रात अधिकार (eligibility) अशी संज्ञा आहे. हिंसा, असत्य इत्यादींचा त्याग करून, दगड, लाकूड, सोने यांच्याविषयीं समानच बुद्धी ठेवून माझीच एकांतिक भक्ति करणारा योगीत मला अत्यंत प्रिय आहे हे सांगण्यातही भावी योग्यांचे इष्ट गुण दाखविले आहेत पुढे तुला हे ज्ञान तुझ्यांत हेच गुण पाहून, तुझी परीक्षा करूनच दिले आहे हे अर्जुनाला स्पष्ट केले आहे. अर्जुनाने सगुण भक्तीने श्रीदत्तचरणी मन लावले आणि वेदविहित यागांचे, शास्त्रप्रणीत सत्कर्मांचे आचरण करून आपले चित्त शुद्ध केले म्हणून त्याला हे योगाचे ज्ञान दिले. श्रीमद्भगवद्गीतेतही पार्थ अर्जुनाला भगवान श्रीकृष्ण हेच सांगतात. 'हे ज्ञान तू जो तपोहीन आहे, ज्याच्या मनांत भक्ति नाही, श्रवणाला तत्पर नाही आणि माझी निंदा करतो मुळीच सांगूं नकोस.' (१८:६७) ६१-६४.

# अर्जुनकृत स्तुती.

हे भगवान दत्तात्रेयांचे वचन ऐकून अर्जुन सद्गदित झाला आणि त्याने हात जोडून दत्तप्रभूंची स्तुति आरंभिली. अर्जुन सद्गदित झाला ह्यांतून त्याचे अष्ट सात्त्विक भाव जागे झाले असा अर्थ होतो. दत्तपुराणात दाटून आलेल्या गळ्याबरोबरच राजाचे मुखकमल प्रफुल्ल झाले होते, नेत्रांतून अश्रू ओघळत होते आणि अंगावर रोमांच उभे राहिले होते असे सविस्तर वर्णन आहे (इत्युक्तः प्रणतो राजा नत्वा प्राह सगद्गदम्। फुल्लास्याब्जो गलन्नेत्रो हृष्टरोमा तदाचिरात्।।२७:४।।)

इथे अर्जुनाने भगवंतांनी ह्या परमकल्याणकारी उपदेश केल्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त केला आहे. तसेच ह्या उपदेशाचा त्याच्यावर काय परिणाम झाला त्याची पावतीही आहे. "मोहाचा अंधार निमाला, त्रिविध तापांचा उपशम झाला आणि माझे मन तुझ्या स्वरूपात विसांवले. अशीच पावती पार्थ अर्जुनाने गीतेत दिली आहे. "नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत। स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव।।१८:७३।।" हे अच्युता! तुझ्या प्रसादाने माझा मोह नाहीसा झाला आहे, (माझ्या कर्तव्याची) स्मृति परतली आहे आणि मी संशयरहित झालो आहे. आतां तुझ्या सांगण्याप्रमाणे मी वागेन. हे कसे झाले? तर ज्ञानसूर्याच्या उदयाने मनांतला गाढ अंधार जळून गेल्यामुळे! हे प्रभो! आपल्या पदाच्या दर्शनाने जो आनंद उफाळला त्यांत सर्व भेदबुद्धी आणि तिच्यापासून होणारा शोकही लयाला गेला. इथे पद शब्द एकवचनी आहे. आपले पाय पाहिले असे न म्हणतां आपले पद असे म्हटले आहे. कठोपनिषदांत (२:१५) आणि भगवद्गीतेत (१५:४-५) अभिप्रेत असलेला पद शब्दाचा परमात्मस्वरूप हा अर्थ इथे लागू पडतो. ह्या प्रेमास्पद स्वरूपाच्या दर्शनाची ही मोठीच पर्वणी लाभल्याची कृतार्थता आणि धन्यता राजाने प्रकट केली आहे. सर्व तापांची शांति तर झालीच पण सर्व पापे तसेच काम, क्रोध, द्वेष इत्यादि चित्ताचे दोषही समूळ नष्ट झाले. कारण जीवत्वाचा मूळ भ्रमच आपण घालविला आणि आपले निष्काम धाम मला दिले. आतां हे देवाधिदेवा, आपल्या ह्या पदाची अनुभूती निरंतर राहो एवढीच माझी हौस आपण पुरवावी." ६५ – ७३.

वरील अभंगात केलेली स्तुती स्वानुभवात्मक आहे. यापुढे दहा ओव्यांत अर्जुन या अनुभवांतून आपल्याला जाणवलेले स्वरूप आणि त्याच्या प्राप्तीचा मार्ग संक्षेपाने सांगत आहे. "माझ्यासाठी, माता, पिता, गुरु, कुलदैवत, आप्त, इष्ट, बंधुजन इत्यादि सर्व कांही आपणच आहांत. आपल्यावांचून कुणीही माझा दाता नाही. आपण देह इंद्रिये, मन आदींच्या पलीकडे असला तरी आमच्या बुद्धीत राहून (गुहाश्रित) आपणच आमच्या इंद्रियांचे नियमन करतां. आपण बुद्धिद्वारा केलेल्या प्रेरणेनेच हा सर्व परमार्थ कळला आहे. मी कृतार्थ झालो आहे. आतां उगीचच इकडे-तिकडे भटकण्याची मला गरज नाही. भक्तिभावालाच गंवसणारा देव म्हणून तुझ्या आश्रयाला मी आलो त्या माझ्या भावाचे तू सार्थक केलेस. आतां आनंदाला सीमा राहिली नाही. कापड जसे धाग्याने गुंफलेले असते तसे तुझ्या रूपाने हे विश्व व्यापलेले आहे ते रूप आज मला कळून माझे चित्त निवाले आहे. हे सर्व चराचर जगत परमेश्वराचेच रूप आहे हा प्रत्यक्ष अनुभव ही आत्मज्ञानाची परिसीमा मानली गेलेली आहे. ती भूमिका कार्तवीर्याला लाभली होती हे इथे स्पष्ट होते. ७३ – ७८.

पुढील ओंव्यात अर्जुन संसारवृक्षावर राहणाऱ्या दोन पक्ष्यांचे औपनिषदिक रूपक सांगत आहे.. "मायेने मृगजलासारखा भासणारा हा संसारवृक्ष आहे. शेकडो वासना हीच याची मुळे आहेत; पाप आणि पुण्य अशी दोन बीजे आहेत; शब्द-स्पर्शादि पांच विषय याचे बुंधे आहेत; तीन गुण ह्या त्याच्या नाळा आहेत; महाभूतांच्या पांच शाखा आहेत; पांच ज्ञानेंद्रिये आणि पांच कर्मेंद्रिये असे दहा अंकुर आहेत; सुख आणि दुःख अशी दोन फळे आहेत. चैतन्याच्या आधाराने विस्तारलेल्या ह्या पुराण वृक्षावर जीव आणि

ईश्वर असे दोन पक्षी आहेत. (श्रीदत्तपुराण २७:१८) जीव गिधाडासारखा विषयासक्त असून तो वृक्षाभोवती घिरट्या घालीत सुख-दुःखाची फळे खात असतो. दुसरा ईश्वर हंसासारखा विवेकाने त्याग करणारा आणि साक्षित्वाने केवळ पहात राहणारा आहे. जीवाला जोंपर्यंत कर्मफळात रुचि आहे तोंवर तो जन्ममरणरूपी घिरट्या घालतो. त्याच्या चित्तांत हे तुझे रूप ठसत नाही. तुझे भक्त मात्र कर्मफळाची गोडी टाकून देतात..त्यांच्या चित्तांतले मळ झडून जातात आणि तीव्र वैराग्य उत्पन्न होते. मग ते तुझ्या उपासनेला लागतात आणि शेवटी त्याच्यावर तुझी कृपादृष्टी होते. हे मी माझ्या स्वतःच्या अनुभवाने पाहिले आहे. मन निष्काम झाले की तुझे (परमेश्वराचे) नाम गोड लागते. आणि अंतिम सत्य, परमगति आणि परमार्थस्वरूप अशा तुझे दर्शन होते. ते झाल्याने मी कृतकृत्य झालो आहे. मानवी जीवनाचे परम कर्तव्य मी केले आहे, अंतिम लक्ष्य मी प्राप्त करून घतले आहे आणि माझ्या मनाचा विलय तुझ्या पदीं केला आहे. हे भगवंता तू मन-वाणी-बुद्धी यांना अगम्य असलास तरी सद्गुरूंच्या कृपाप्रसादाने चित्तांत तुझा प्रकाश होतो. (*गुरो गुरुतरागम्य गुरुगम्य गुणाकर। गुरूत्तम नमस्तेऽस्तु सन्निधो भव सर्वदा।।२७:२२।।*) तुझी कुणाशीच तुलना होऊं शकत नाही. तू स्वभावतःच निरुपम आहेस." ७९ - ८५.

# शक्तिसंचार.

ह्या स्तुतीने प्रसन्न झालेले भगवान प्रेमभराने स्मित करीत अर्जुनाला म्हणाले, "कार्तवीर्या! माझ्या प्रसादाने तुला परमतत्त्वाचे ज्ञान झाले आहे. हे ज्ञान दृढ होण्यासाठी तुला स्थिरचित्ताने अभ्यास केला पाहिजे. ही इथे एक खोल, शांत आणि निर्भय गुहा आहे हिच्यांत प्रवेश कर. दृढ आसन घालून, मान आणि पाठ सरळ ठेवून दीर्घकाल, एकाग्र चित्ताने, लय आणि विक्षेप टाळीत आत्मस्वरूपात दृष्टी ठेवून मी सांगितलेला अभ्यास कर. ज्या वेळी तुझे ध्यान उतरून तू भानावर येशील तेव्हा तुला त्या अवस्थेत जे अनुभव आले ते मला येऊन सांग. भिऊं नकोस, गुहेत प्रवेश कर. " असे म्हणून दत्तप्रभूंनी राजाच्या मस्तकावर हात ठेवला. ह्यावरून हे केवळ शाब्दिक निरूपण नव्हते तर त्याच्या बरोबरच केलेला शक्तिसंचारही होता हे लक्षात येते.. ह्या प्रसंगाच्या वर्णनांतच दत्तपुराणात स्पष्ट उल्लेख आहे की असे बोलून दत्तप्रभूंनी आपला उजवा हात अर्जुनाच्या मस्तकावर ठेवला. (इत्युक्त्वा दक्षिणं हस्तं निदधौ तच्छिरस्यजः।।२७:२७।।) ह्या श्लोकाच्या टीकेत स्वामी महाराज म्हणतात, "हात ठेवला ह्या शब्दांतून शक्तिपात सूचित होतो. आत्मज्ञानाला गुरुप्रसाद हेच मुख्य कारण आहे." पुढे श्वेताश्वतर उपनिषदांतील 'यस्य देवे परा भक्ति' इत्यादि श्रुतीचा संदर्भ दिला आहे. ह्या ओंवीनंतर राजाने केलेली भावपूर्ण स्तुतीचे मर्म ह्या पार्श्वभूमीशिवाय ध्यानात येणार नाही. गीतेच्या उपदेशाचा समारोप करतांना 'सर्वधर्मान् परित्यज्य' ह्या श्लोकावरील भाष्यांत ज्ञानेश्वर महाराजांनीही भावपूर्ण आणि अर्थगर्भ असे वर्णन केले आहे. "मग सांवळा सकंकणु। बाहू पसरोनि दक्षिणु। आलिंगिला स्वशरणु। भक्तराज।।१४१८।। .... ऐसे जे कांही एक। बोलाबुद्धीसी अटक। ते द्यावया मिख। खेवाचे केले।।१४२०।। हृदयाहृदय येक झाले। ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडितां केले। आपणाऐसे अर्जुना।।२१।।" ह्या सर्वच ओंव्या मुळांतूनच वाचण्यासारख्या आहेत. शब्दाच्या माध्यमातून देण्यासारखे सर्व ज्ञान दिल्यावर सद्गुरु वाणी आणि बुद्धीच्या पलीकडचे असे कांही देतात त्यासाठी आलिंगन, मस्तकावर हात ठेवणे अशी काही क्रिया करावी लागते. तंत्रग्रंथांत असा शक्तिपात, ह्यालाच वेधदीक्षा असेही नांव आहे, दृष्टिक्षेपांतून (चाक्षुषी दीक्षा), शब्दाद्वारे (मंत्रदीक्षा) किंवा फक्त संकल्पानेही दिली जाते. यासाठीच सद्गुरु केवळ शब्दज्ञानाचा विद्वान असून भागत नाही तर तो 'परे निष्णात' असावा लागतो. 'यत्र शक्तिर्न पतति तत्र सिद्धिर्न भवति' असा तंत्रशास्त्राचा सिद्धांत आहे. ८६ -९०

या शक्तिसंचाराने रोमाचित झालेला राजा, दत्तप्रभूंची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांना प्रणिपात करून त्या गुहेत जाऊन बसला. त्याने स्थिर आसन घातले, श्वास आणि उछ्वास समान करून प्राणजय करून ध्यानमग्न झाला. वेटोळी मोडून ताठ झालेल्या कुंडलिनीने सुषुम्णेचे दार उघडले आणि ती सहा चक्रांचा भेद करून सहस्रांत चक्रांत विसावली. अर्जुनाची समाधी लागली. तीन दिवसांनी तो भानावर आला. पुनश्च आळस सोडून तो आसनावर बसला. त्या वेळी त्याची बारा दिवस समाधी लागली. ब्रह्मरंध्रांत प्राण एक पूर्ण दिवस (२४ तास) स्थिरावला की ध्यान होते आणि तो बारा दिवस स्थिर झाला की समाधी सिद्ध होते. बारा दिवसांनी उठल्यावरही त्याला आणखी अभ्यासाला बसावेसेच वाटले. तिसऱ्या वेळी त्याची समाधी तीन महिने टिकली. ती उतरल्यावर मात्र त्याला सद्गुरुदर्शनाची ओढ लागली. श्रीदत्तप्रभूंच्या चरणी येऊन त्याने वंदन केले. त्यांनी त्याला प्रेमभराने आलिंगन दिले आणि त्याला इतके दिवस गुहेध्ये राहून काय ज्ञान मिळविले आणि काय अनुभव घेतला ते विचारले. त्या अनुभवाने भारावून गेलेला राजा म्हणाला, "हे सर्व अवर्णनीय आहे. ध्येय, ध्याता आणि ध्यान ही त्रिपुटीच मावळली होती त्या अवस्थेचे शब्दात कसे वर्णन करणार? त्या वेळी मनात कसल्याच वृत्ती नव्हत्या. त्या अवस्थेचा आतां विचार केला की हे जाणवते की तिथे बुद्धी निश्चल होती. जाग्रती, स्वप्न किंवा सुषुप्ती ह्या आपल्या नित्य अनुभवाच्या अवस्थेतील कोणतीच अवस्था नव्हती. इंद्रिये लीन झाली होती आणि मनाची उन्मनी अवस्था झाली होती. पूर्वी उद्विग्न असलेले मन, संकल्पविकल्प सोडून निरतिशय आनंदांत डुबून गेले होते. त्या आनंदाचे वर्णन करतां येत नाही. अगदी मनापासून सांगतो, गुरुदेव, तो आनंद अनिर्वाच्यच आहे. ते आपलेच सच्चिदानंदरूप अनुभवत असतां पापताप नाहीसे झाले. तेच स्वरूप आंत-बाहेर अनुभवाला येत आहे. त्या सुखाला सोडून माझे मन राज्याकडे किंवा संपत्तीकडे अजिबात वळतसुद्धां नाही. आतां मनाची अशी अवस्था झाली आहे की राज्य टाकल्याने दुःख होणार नाही की राज्य केल्याने सुख! चराचर व्यापून राहणारा परमात्मा हे आपलेच निर्गुण रूप आहे. आणि तेच आपले सगुण रूपही आहे. आपण आपल्या कृपामृताने मला ज्ञानाला योग्य करून अमर करून ठेवले आहे." एवढे बोलून अर्जुनाने दत्तप्रभूंना साष्टांग दंडवत घातला आणि अत्यंत नम्रपणे उभा राहिला. ९१ – १०८.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पंधरावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

## बोध दत्तमाहात्म्याचा.

### डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १५ वा.

**जो अभ्यस्तयोग। त्याचें दार्ढ्य करवी मग। दत्त म्हणे असंग। प्रारब्ध भोग अर्जुना।।३४।।**
**आला अर्जुन स्वनगरीं। समुद्राचा गर्व हरी। यज्ञदानादिक करी। षोडशांतरीं हे कथा।।३५।।**

वेदधर्मा मुनी संदीपकाला सांगू लागले. "ज्यांच्या कृपेने मुक्यालाही वाचा येते अशा सच्चिदानंदस्वरूप साक्षात् दत्तात्रेयांचाच उपदेश झाल्यावर अर्जुन परमसिद्धीचा धनी झाला ह्यात काय आश्चर्य? दत्त ह्या नामानेच सर्व भयांचा नाश होत नाही का? " भय त्यालाच असते ज्याच्यापेक्षा वेगळा दुसरा कुणी असतो. एकमेवाद्वितीय अशा दत्तपदाशी एकरूप झाल्यावर भयाची कुठली वार्ता? श्री स्वामी महाराजांनीच एका अभंगात हे स्पष्ट केले आहे.

**भयाचें जें भय भक्तां दे अभय। ते हे दत्तात्रेयपाय वंद्य।।१।।**
**भासे जें द्वितीय तेंचि दावि भय। म्हणुनी हे पाय ध्यावे चित्तीं।।२।।**
**मुळी नसें द्वय तेथें कैंचे भय। बाळा जेवीं द्वय भासे छाया।।३।।**
**पाहुनी सावुली बाळक आपुली। भी, तसी ही बोली हो मायिक।।४।।**
**अंतर्दृष्टीनें हें दत्तपद ध्यातां। भयाची न वार्ता काळत्रयीं।।५।।**
**वासुदेव म्हणे स्वाभिन्न हें पद। ध्यातां भय खेद भेद कैंचा।।६।।**

'मूकं करोति वाचालम्' हे कदाचित् अलंकारिक किंवा अर्थवादात्मक कुणाला वाटेल. पण ते वस्तुस्थितीचेच वर्णन आहे ह्याची प्रचीती श्रीस्वामी महाराजांच्या चरित्रांतील एका घटनेत येते. तुंगभद्रातीरी हावनूर येथील चातुर्मासांतील एका समाराधनेच्या पंक्तीत अनेक बटु श्लोक म्हणत होते. त्यांत एक मुलगा मुका होता. महाराजांच्या मनांत त्याच्याविषयी करुणा उत्पन्न होऊन ते त्याला म्हणाले, "तू पण श्लोक म्हणतोस का? म्हण!" आणि काय आश्चर्य, तो जन्मापासून मुका असलेला मुलगा खणखणीत आवाजांत श्लोक म्हणू लागला!

## अर्जुनाची पुन्हां समाधी.

अर्जुनाने केलेल्या आत्मानुभूतीचे निवेदन ऐकून प्रसन्न झालेल्या दत्तप्रभूंनी त्याला विचारले की "आतां तुझ्या मनात काय इच्छा आहे ती सांग.". ही एक परीक्षाच होती. पण अर्जुनाच्या मनांत खरोखरीच कांही इच्छा उरलीच नव्हती. तो म्हणाला, "प्रभो! आपली जशी आज्ञा असेल त्याप्रमाणेच मी वागेन. माझ्या चित्तांत अन्य कोणताही भाव नाही. आपण जर पुन्हा गुहेत जाऊन बसायला सांगितले तर समाधी लावून बसेन. अन्यथा आपले हे मनोहारी रूप न्याहाळीत इथेच सुखाने बसेन." भगवंताच्या सगुण मूर्तीचे वर्णन स्वामी महाराजांनी *आसेचनका*, म्हणजे जिला पाहून मन भरतच नाही, अशी आहे. तेव्हां दत्तप्रभूंनी त्याला संध्यावंदनादि आह्निक करून भोजनोत्तर तो दिवस गुरुसेवेतच घालविण्यास सांगितले आणि दुसऱ्या दिवशी गुहेत जाऊन पुन्हा समाधिस्थ व्हायला सांगितले. त्याप्रमाणे तो दिवस तिथे राहून दुसऱ्या दिवशी श्रीदत्तप्रभूंना वंदन करून अर्जुन पुनश्च गुहेत जाऊन आसनावर बसला. मन समाहित करून त्याने सुषुम्णा मार्गाने प्राण ब्रह्मरंध्रात नेऊन लीन केला. प्रथम तीन महिन्यांनंतर आणि नंतर सहा महिन्यांनंतर तो देहभानावर आला. पण परत समाधी अवस्थेत गेला. असे एक वर्ष गेले तरी तो पुन्हा कांही देहभानावर आला नाही. म्हणजेच 'परतो व्युत्थान' या ज्ञानाच्या सहाव्या भूमिकेत त्याने प्रवेश केला होता. तेव्हा दत्तप्रभूंनी तिथे येऊन त्याची ती अवस्था पाहिली. आतां यापुढच्या भूमिकेत तो गेला तर त्याचा दृश्य जगाशी संबंध पूर्णतया तुटेल. त्याचे अजून बरेच जीवनकार्य उर्वरित

---

***यमन***[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

होते. म्हणून देवांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याची समाधी उतरविली आणि त्याला बळेच देहभानावर आणले. तरीसुद्धा अर्जुनाची इंद्रिये, प्राण आणि चित्त आंतच आत्मस्वरूपाकडेच ओढ घेत होते. सामान्य माणसाला देहात्मभाव सोडून अंतरात्म्याकडे वळवणे जितके कठिण त्यापेक्षाही ज्ञानी पुरुषाला आत्मस्वरूपी जडलेले मन काढून देहाकडे वळवणे अधिक कठिण असते. देहात्मभाव म्हणजे 'मी देह आहे' अशी भावना. श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांना एका भक्ताने त्यांच्या आईच्या आठवणी विचारल्या तेव्हां त्यांनी हेच सांगितले, "तुम्हाला देहभाव सोडणे जितके अवघड त्याहून अधिक मला देहभावावर येणे अवघड आहे!" त्याप्रमाणे अर्जुनाचे अंतःकरण आत्मस्वरूपापासून परत फिरत नाही हे पाहून योगिराज प्रभूंनी आपल्या संकल्पाने ते प्राण आणि इंद्रियांसह परत फिरवले. सद्गुरु अनुग्रहाने समाधी लावू शकतात तसेच निग्रहाने ती उतरवूही शकतात. असे निग्रहानुग्रहसमर्थ गुरूच आपल्या शिष्याचे परमकल्याण करू शकतात. १-१४.

## अर्जुनाला लोकसंग्रहाचा उपदेश.

अर्जुनाचा ब्रह्मरंध्रात स्थिरावलेला प्राण हळूहळू जसा सुषुम्णेतून क्रमाने खाली येऊं लागला तसतशी त्याच्या त्या त्या इंद्रियांत चेतना परत येऊं लागली. त्याने डोळे उघडतांच पुढे उभी असलेली दत्तप्रभूंची गोजिरी मूर्ती दिसली. त्याची दृष्टी त्या रूपावर कशी दृढ चिकटली त्याचे वर्णन करतांना गुळाला चिकटलेली माशीचा आणि पतिचरणी स्थिर झालेली पतिव्रता ह्यांचे दृष्टांत महाराजांनी दिले आहेत. आपल्याला अतीव प्रेमाने न्याहाळणाऱ्या अर्जुनाला भगवंतांनी हाताला धरून आपल्याजवळ बसविले. ते म्हणाले, "आतां खरोखर तूं माझा सेवक म्हणविण्याला योग्य झाला आहेस. मानवी जीवनाचे परम कर्तव्य पार पाडल्याने तू कृतार्थ झाला आहेस. आतां तू तुझ्या राजधानीला जा. अनासक्त वृत्तीने प्रजेचे पालन कर आणि माझे गुणगान करीत आयुष्य व्यतीत कर." अर्जुन अजूनही समाधीतून पुरता बाहेर आलेला दिसत नाही. तो म्हणाला, "आतां कुठले येणे-जाणे? आतां मला बोलण्याचीही इच्छा होत नाही. केवळ आपल्या चरणांपाशी बसून रहावे असेच वाटते." त्यावर दत्तप्रभू पुन्हा बोलले, "माझे बोलणे लक्ष देऊन ऐक. चित्त आत्मस्वरूपांत स्थिरावून बाह्य आचरण धर्माप्रमाणे करावे." 'जो अंतरीं दृढु। परमात्मरूपी गूढु। बाह्य तरी रूढु। लौकिकु जैसा' (ज्ञानेश्वरी ३:६८) इथे ज्ञानप्राप्तीनंतर जीवन्मुक्ताने कसे वागावे हे सांगितले आहे. पुढे द्वापर युगांत भगवान श्रीकृष्णांनी पार्थ अर्जुनाला हाच उपदेश केलेला आहे.(श्रीमद्भगवद्गीता ३:१७-२५) आत्मज्ञानी पुरुष हा कृतकृत्य झालेला आहे. याचाय अर्थ त्याला करावयाचे किंवा मिळवायचे असे कांहीच राहिले नाही. त्याला आतां देवादिकांचेसुद्धा भय नाही. तो कसाही वागला तरी संत तुकोबांच्या उक्तीप्रमाणे त्याला त्याचे पाप-पुण्य चिकटत नाही. ('लागों नेदों पापपुण्य अंगा'). असे असले तरी लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांना धर्माचरणावर स्थिर करण्यासाठी आणि परोपकारासाठी जीवन्मुक्ताने सनातन धर्मशास्त्राने घालून दिलेला आचार सोडू नये. ज्ञानी लोकच जर धर्माविरुद्ध वागूं लागले तर सगळेच आचार सोडतील. परिणामी धर्माची घडी विस्कटेल, लोक धर्मभ्रष्ट होतील आणि त्यामुळे संहार होईल. १५ - २६.

"लोकाचा उपद्रव होऊं नये म्हणून त्यांना विपरीत बाह्य आचरणाने भुलवावे." स्वतः दत्तप्रभू अनधिकारी लोकांना दूर ठेवण्यासाठी विपरीत आचरण करीत असलेले आपण यापूर्वी पाहिलेच आहे. बरेच सत्पुरुष लोकांच्या गर्दीपासून बचण्यासाठी बाल, उन्मत्त किंवा पिशाच वृत्तींचा अंगीकार करतात. अक्कलकोटचे स्वामी, शेगांवचे गजानन महाराज, पुण्याचे श्रीशंकरमहाराज ही अलीकडच्या काळांतील कांही ठळक उदाहरणे आहे. २७

"तू गृहस्थ आहेस. गृहस्थाश्रम हा इतर सर्व आश्रमांचे पोषण करणारा आहे. ब्रह्मचारी, वानप्रस्थ आणि संन्यासी उपजीविकेसाठी गृहस्थांवरच अवलंबून असतात. तुझा क्षत्रिय वर्ण आणि गृहस्थ आश्रम यांना अनुरूप कायिक, वाचिक आणि मानसिक अशी त्रिविध कर्मे मनात आसक्ति न ठेवतां तू करावीस.. अज्ञानी लोक आसक्ती ठेवून ज्या तत्परतेने कर्मे करतात त्याच तत्परतेने ज्ञानी माणसाने लोकसंग्रहासाठी अनासक्त वृत्तीने कर्मे करावीत. तू तर जीवन्मुक्त आहेस. तुला आसक्त करणारी अशी वस्तूच जगांत नाही. शहरांतल्या सुसंस्कृत पुरुषाला जसा खेड्यांतल्या गांवढळ स्त्रीचे आकर्षण वाटत नाही तसे मुक्ताला विषयांची ओढ नसते. त्याचे चित्त पूर्णपणे निर्विकार असते. सूर्याला गारवा आला, चंद्रापासून धग होऊं लागली किंवा अग्निच्या ज्वाला खाली पसरल्या तरी त्याचे त्याला नवल वाटत नाही. न तो कुणाला आपले मानतो न तो कुणाचा असतो. मी आणि तू हा भावच जीवन्मुक्ताला नसतो. तूही तसाच भाव प्रारब्ध आहे तोंपर्यंत, म्हणजे यावज्जीव ठेव. श्रेष्ठ लोक जसे वागतात ते पाहून सामान्य लोक त्याचप्रमाणे आपले वर्तन करतात. तू बालकाप्रमाणे असंग राहून गुण-दोष बुद्धीचा तूं त्याग कर. लहान मूल जसे हो चांगले, हे वाईट असा विचार न करतां सहज क्रिया करते. तसेच निरागस वृत्तीने तू कर्म करीत रहा म्हणजे कांही अतिप्रसंग होणार नाही." जो सतत आपल्या स्वरूपांत रमलेला, आत्मानंदाने तृप्त झालेला आणि आत्मानुभूतीने सुखावलेला असतो त्याचे कांही कार्य उरलेले नसते. (यस्त्वात्मरतिरात्मज्ञः स्वात्मतृप्तः सदात्मवान्। स्वात्मन्येवात्मना तुष्टस्तत्कार्यं क्वावशिष्यते।। दत्तपुराण २७:५६।। यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः। आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते।।भ.गीता३ः१७।।). पुण्य केल्याने न तो स्वर्गाला जातो ना पाप केल्याने नरकाला! असे असले तरी त्याने पुण्यमार्गानेच जावे, मन गुरुपदीं स्थिर करावे आणि निःसंगत्वाने लोकांत व्यवहार करावा. 'याकारणे अंतःकरणी। दृढता असावी श्रीगुरुचरणी। बाह्य देहाची रहाटणी। शास्त्राधारें करावी।।' (गुरुचरित्र ५:२७) २८:३८.

## अर्जुनाची बोळवण.

दत्तप्रभू अर्जुनाला पुढे सांगत आहेत. "अर्जुना! आता तू आपल्या नगरीला जाऊन प्रजेचे पालन कर (मनुष्ययज्ञ), यज्ञयागांनी देवांना तृप्त कर(देवयज्ञ) तसेच श्राद्धादिकांनी पितरांची तृप्त कर (पितृयज्ञ). गाई, भूमी, कन्या आणि सुवर्णादिकांच्या दानाने ब्राह्मणांना संतुष्ट कर आणि दीन, दुबळे आणि अपंग यांचे रक्षण कर. बाहेर तू कांहीही व्यवहार करीत राहिलास तरी माझ्या स्वरूपाचा तुला विसर पडणार नाही आणि तुला कधीही मोह होणार नाही. प्रारब्धाच्या प्रवाहात तुझ्या हातून जे कांही पाप-पुण्य घडेल त्याचा तुला केव्हांही दोष लागणार नाही. ते सर्व कर्म निष्फळच होईल; कारण तू जीवन्मुक्त आहेस. उर्वरित प्रारब्धाचा भोग असंगत्वाने भोगल्यावरच तुला विदेहमुक्ती लाभेल. माझ्या वचनावर दृढ श्रद्धा ठेव." हे दत्तप्रभूंचे धीर देणारे शब्द ऐकून अर्जुनाला आनंदाचे भरते आले. तो आनंद पोटांत न मावून प्रेमाश्रूंच्या रूपाने डोळ्यांतून वाहूं लागला. चित्तांत उसळणारे भावाचे उमाळे आंवरता आंवरेनात. देहाचे भानही टिकेना. आतां दत्तप्रभूंचे चरण आपल्याला दुरावणार ह्या कल्पनेनेच तो कासावीस झाला. त्याची ती अवस्था जाणून प्रभू म्हणाले, "माझ्या चरणांचे चिंतन तू करीत राहशील तर ते निरंतर तुझ्या चित्तांतच राहतील, अनुभवाला येतील. माझ्या वाक्यावर विश्वास ठेव!" असे अभिवचन देऊन देवांनी अर्जुनाला कवेत घेतले आणि अत्यंत मायेने त्याला निरोप दिला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे मनांत सतत त्यांचे पाय चिंतीत अर्जुन माहिष्मतीला परतला. ३८:४९.

# अर्जुनाचे माहिष्मतीत स्वागत.

अर्जुनाच्या आगमनाचे वृत्त त्याच्या आधीच राजधानीत पोंचले. पताका, ध्वज, तोरणे इत्यादींनी नगर सजवून सर्व नागरिक त्याला सामोरे गेले. वाजतगाजत समारंभपूर्वक त्याला गांवात आणले. मार्गांवर चंदनाचे सडे घातले होते, पुढे नाना वाद्ये वाजत होती आणि ब्राह्मण वेदोक्त मंत्रांनी आशीर्वाद देत होते. कळावंतिणी नृत्य करीत होत्या, भाट, बंदी राजाच्या यशाची गीते गात ललकाऱ्या देत होते आणि प्रजाजन जयजयकाराचा घोष करीत होते. उत्तम वस्त्रालंकारांनी नटून शहरांतल्या युवती माड्यांवर चढून आनंदाने राजाचे गुणवर्णन करीत त्याच्यावर लाह्या उधळीत होत्या. नागरिकांनी आनंदाची अभिव्यक्ति करण्यासाठी रस्तोरस्ती तोरणे उभारली होती, घरांघरांसमोर गुढ्या उभारल्या होत्या. अर्जुनाच्या एकाहून एक सुंदर अशा सोळा हजार स्त्रिया होत्या. अर्जुनाच्या दर्शनाला उतावीळ झालेल्या त्या स्त्रियां रत्नांनी भरलेली सोन्याची ताटे घेऊन आल्या. ती रत्ने त्यांनी राजावरून ओवाळून टाकली. ती रस्त्यावर पडलेली रत्ने वेंचून कित्येक रंक धनवान झाले. अशा अभूतपूर्व समारंभाने राजा आपल्या महालात परतला. त्या वेळी त्याच्या स्वागताला आलेल्या नागरिकांचा त्यांच्या त्यांच्या मानाप्रमाणे सत्कार करून राजाने निरोप दिला. ५०:५८.

# अर्जुनाचे राज्य.

श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने बलाढ्य झालेल्या अर्जुनाने सप्तद्वीप पृथ्वीचे एकछत्री राज्य केले. आजच्या मानवाची पोहोंच फक्त जम्बु नांवाच्या एकाच द्वीपापुरती मर्यादित आहे. या द्वीपाभोवती मिठाचा खारा समुद्र आहे. याच्या पलीकडे ऊंसाच्या रसाच्या समुद्राने वेढलेले प्लक्षद्वीप आहे; त्याच्यापलीकडे सुरासागराने वेढलेले शाल्मल द्वीप आहे; त्यानंतर क्रमशः तुपाच्या समुद्राने वेढलेले कुशद्वीप, दह्याच्या समुग्राने वेढलेले क्रौञ्चद्वीप, दुधाच्या समुद्राने वेढलेले शाकद्वीप आणि शेवटी गोड पाण्याच्या समुद्राने वेढलेले पुष्कर द्वीप अशी आणखी सात द्वीपे आहेत. कार्तवीर्याच्या राज्यकारभाराचे वर्णन सहाव्या अध्यायात आपण पाहिलेच आहे. आतां फरक इतकाच आहे की अर्जुन आत्मज्ञानी झाला आहे. मी राजा आहे, हे राज्य माझे आहे आणि मी ह्याचे रक्षण करीत आहे, ही त्याची भावना नष्ट झाली होती. आपण दत्तप्रभूंचे दास असून त्यांच्या आज्ञेचे पालन म्हणून हे राज्य आपण करीत आहोंत हीच भावना त्याच्या चित्तांत दृढावली होती. सूर्याप्रमाणे तो सर्व कांही पहात होता आणि वायूसारखा सर्वत्र अनिर्बंध संचार करीत होता.५८-६१.

ब्रह्मज्ञानी असूनही श्रीदत्तप्रभूंची आज्ञा पाळण्यासाठी प्रत्यक्ष अत्रि महर्षींसारख्या वेदवित् ऋत्विजांकरवी, सोन्याच्या वेदी घालून त्याने दहा हजार यज्ञ केले. यज्ञाचे मंडपही सोन्याचे होते. यज्ञासाठी देवतांना आवाहन केल्यावर देवता सूक्ष्म रूपाने येतात असे शास्त्रवचन आहे. पण कार्तवार्यार्जुनाच्या यज्ञांत देवता सपत्नीक अलंकृत मूर्त स्वरूपांत विमानांत बसून यज्ञाला उपस्थित राहून यज्ञाचा हविर्भाग यथेच्छ ग्रहण करीत. यज्ञांत येऊन गंधर्व गायन करीत, अप्सरा नृत्य करीत आणि सुवासिनी अर्जुनाची कीर्ति गात. यज्ञाला आलेल्या ब्राह्मणांना गाई, भूमी, सुवर्ण आणि उत्तम अन्न देऊऩ राजा तोषवीत असे. दक्षिणेसाठी तो राजकोष मुक्त करीत असे आणि ब्राह्मणांना यथेच्छ द्रव्य वाटीत असे. कार्तवीर्याच्या सिद्धींच्या प्रभावाने खजिनी कधीही रिता होत नसे. विविध रंगांच्या दुभत्या गाईं, त्यांच्या खुरांना चांदी, शिंगांना सोने लावून, त्यांचे दान सात्त्विक वृत्तीने करीत असे. सात्त्विक दानाची व्याख्या गीतेत अशी केली आहे. **दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे। देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्।।१७:२०।।**. ज्याने आपल्यावर कांही उपकार केलेला नाही, ज्याचे आपण कांही देणे

लागत नाही अशा व्यक्तीला केवळ द्यायचे म्हणून दिलेले, म्हणजेच त्यांत इतर कोणताही हेतू नसलेले, दान पवित्र क्षेत्रीं, पर्वणाच्या काळी योग्य काळी, योग्य पात्रीं (व्यक्तीला) दिलेले दानच सात्त्विक समजावे. चौदाव्या अध्यायात आपण याचा विचार केलेला आहेच. ६२:६९.

## धर्मराज्याची फलश्रुति.

'राजा कालस्य कारणम्' असे शास्त्रवचन आहे. राजा जर धर्माला अनुसरून राज्य करीत असेल तरच प्रजेला सुखसमाधान लाभते. हेच इथे श्रीस्वामी महाराज स्पष्ट करीत आहेत. कार्तवीर्य धर्माची मर्यादा पाळून राज्य करीत असल्याने त्याच्या राज्यांत कुणालाही अकाळी मरण येत नसे. भूकंप, पूर इत्यादि उत्पात होत नसत. वेळेवर पाऊस पडे, धान्यही भरपूर पिके आणि दुष्काळाचे नांवही ऐकायला येत नसे. त्यामुळे लोक उदार आणि दानशूर होते. कुणीही नारी वंध्या नव्हती किंवा विधवा नव्हती. झाडे पुष्पफळांनी डंवरलेली असत. चोराचिलटांचे भय नव्हते. अतिवृष्टि, अनावृष्टी, उंदीर, टोळधाड, पोपट वगैरे पक्षी, अंतर्गत बंडाळी किंवा परकी आक्रमण हे उपद्रव (अतिवृष्टिरनावृष्टिर्मूषकाः शलभाः शुकाः।। स्वचक्रं परचक्रं च सप्तैता ईतयः स्मृताः) अर्जुनाच्या राज्यांत उद्भवतच नव्हते. यथा राजा तथा प्रजा या न्यायाने सर्व लोक धार्मिक होते. धर्माविरुद्ध आचरण कुणीही करत नसे. तलवार, चक्र, धनुष्य-बाण इत्यादि आयुधे धारण करून धर्मात्मा अर्जुन इच्छागामी रथांत बसून पृथ्वीच्या सातही द्वीपांत संचार करती असे. क्वचित् कुणी चोरी केलीच तर स्वतः जाऊन त्याला धरीत असे. तो अपराधी ठरला तर त्याला ठार मारीत असे. राजा सर्वांचे अंतःकरण तत्काळ जाणणारा असल्याने तो निरपराध्याला शिक्षा करीत नसे आणि दोषी माणसाला शिक्षा केल्याशिवाय सोडीत नसे. भगवान शंकरासारखा तो विरक्त असल्याने क्रोधाने किंवा लोभाने त्याने कुणाला मारण्याचा प्रश्नच नव्हता. कुणी भलते-सलते सांगितले तर त्यावर तो विश्वास ठेवीत नसे किंवा अनुचित गळ घातली तर तो भीड घालत नसे. मात्र पूज्य व्यक्तींचा – विशेषतः ब्राह्मणांचा तो अत्यंत मान ठेवी आणि त्यांना वस्त्रे आणि द्रव्य देई. **अपूज्या यत्र पूज्यन्ते पूज्यपूजाव्यतिक्रमः। तत्र त्रीणि प्रवर्तन्ते दुर्भिक्षं मरणं भयम्।।** पूजनीयांचा जिथे सन्मान होत नाही आणि अयोग्य व्यक्तींचा मान केला जातो तिथे दुर्भिक्ष, मरण आणि भय यांचा प्रादुर्भाव होतो. अर्थातच अर्जुनाच्या राज्यांत यांचा मागमूसही नव्हता. अशा रीतीने चित्त अखंडित दत्तचरणात ठेवून विषयांच्या आहारी न जातां अनासक्त वृत्तीने तो जीवन्मुक्त राजा राज्य करीत होता. ७०-८१.

एकदा अर्जुनाने कर्कोटक नागाच्या पुत्राला दुराचरण करतांना पाहिले. त्याचे पारिपत्य करण्यासाठी तो त्याच्यावर चाल करून गेला आणि त्याला बाणांनी घायाळ करून बांधून ठेवले. त्याचे राज्य हिरावून घेऊन तिथे त्याने नर्मदातीरी नवीन शहर वसविले आणि आपल्या सहस्रावधी स्त्रियांसनवेत तिथेसुद्धां राहूं लागला. एकदां त्याने आपल्या हजार बाहूंनी नर्मदेला बांध घालून तिचा प्रवाह उलटा पूर्वकडे फिरवला आणि त्या प्रवाहात आपल्या हजार पत्नींसोबत श्रांगारिक क्रीडा करूं लागला. आकाशांतून ही क्रीडा पाहणारे देवही थक्क झाले, अप्सरा लुब्ध झाल्या आणि किन्नरी कामातुर झाल्या. मात्र नर्मदेचा पति पूर्वोदधी ह्या राजाच्या अतिप्रसंगाने खवळला. अत्यंत त्वेषाने तो राजावर धांवून आला. मात्र अर्जुनाने आपल्या सामर्थ्याने त्याला जागींच खिळवला आणि त्यांत उडी घालून आपल्या सहस्र हातांनी त्याला असा चोप दिला की समुद्र पळून जाऊं लागला. त्याच्या आश्रयाने राहणारे जलचर पटापट मरूं लागले. समुद्रातळींच्या पाताळलोकांत थरकांप झाला. अखेर साक्षात समुद्रदेवता रत्ने घेऊन प्रकटली आणि अर्जुनाला शरण आली. शरणागताचे रक्षण करणाऱ्या धर्मपर राजाने त्याला अभय दिले. ८१-९४.

## जीवन्मुक्ताचे औदासीन्य.

कार्तवीर्याच्या यापुढील चरित्रात आपल्याला तो दत्तचरणी लीन झालेला जीवन्मुक्त भक्त आहे हे ध्यानांत ठेवले पाहिजे. त्याचे हे सर्व जीवन प्रारब्धाच्या सूत्रानुसार घडले आहे. राजाच्या मनांत ना स्त्रियांची आसक्ति आहे, ना कर्तृत्वाचा अभिमान, ना राज्याची हांव, ना विजयाचा आनंद, ना पराभवाचे दुःख! आत्मज्ञानाच्या पूर्वीच सुरू झालेले प्रारब्ध कर्म देह पडेपर्यंत, एखाद्या संगणकाच्या प्रणालीसारखे (Computer programme) विविध अनुकूल व प्रतिकूल घटनांमधून उलगडत जात असते. आत्मज्ञानी पुरुष त्याने भुलत नाही. तो त्याकडे फक्त साक्षित्वाने पहात असतो. अनुकूल घटनांना चालना द्यावी किंवा प्रतिकूल घटनांना प्रतिकार करावा असे त्याच्या मनांतही येत नाही. तो आत्मानंदात रत असतो. प्रारब्धजनित काम म्हणजे विषयांचे भोग देहाला गुंतवतात; पण राजाच्या मनांत त्याची यत्किंचतही आसक्ति नसते. जशा नद्या अपार जल घेऊन सागराला मिळतात पण तो सागर कांही त्यांनी न उचंबळता स्थिर आणि निश्चल राहतो तसा आरब्ध कर्माने प्राप्त होणाऱ्या अलोट भोगांनी जो स्थितप्रज्ञ विकार पावत नाही त्यालाच शांति लाभते, भोगांचा हव्यास ठेवणाऱ्याला नाही. (**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्। तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी।।** भ.गीता २:७०।।) सारांश आपोआप कर्मानुसार मिळणाऱ्या विषयभोगांनी जीवन्मुक्ताचा इंद्रियसमूह प्रक्षुब्ध होत नाही. एका मराठी नाटकांत स्थितप्रज्ञाचा तुलना एका ठिकाणी हालचाल न करतां उभ्या असलेल्या गाढवाशी केली आहे. हा विनोद ठीक आहे. पण स्थितप्रज्ञ किंवा जीवन्मुक्त म्हणजे दगडासारखे बसणारा हे म्हणणे वेदांचा सिद्धांत माहीत नसलेल्या अज्ञानी लोकांचे आहे. शास्त्राप्रमाणे कर्म करूनच अज्ञानाचा नाश होतो आणि ज्ञानाची प्राप्ती होते. ह्या ज्ञानाचा नाश करण्याचे सामर्थ्य कोणत्याही कर्मात नाही. एकदां आत्मज्ञान झाल्यावर तो ज्ञानी कसाही वागला तरी त्याचे ज्ञान अबाधित राहते. ह्या ज्ञानाने अज्ञानावरणाचा नाश होतो. परंतु प्रारब्धाचा मात्र नाश होत नाही. जीवन्मुक्तालाही देहप्रारब्ध भोगावेच लागते. हे तत्त्व जाणून ज्ञानी पुरुष भोगांचा कंटाळा न करतां लोकांत राहतो. ‘आलिया भोगासी असावे सादर’ या तुकाराम महाराजांच्या उक्तीचे हेच गमक आहे. ९५-१०२.

## ज्ञानी आणि अज्ञानी यांचे प्रारब्ध.

‘प्राप्तं प्राप्तमुपासीत’ म्हणजे जे जे समोर येईल त्याचा स्वीकार करावा हाच उपदेश भागवतकारांनी आणि साधुसंतांनी केलेला आहे. हा ज्ञानी आणि अज्ञानी या दोघांनाही सारखाच लागूं पडतो. दोघांनाही सुखदुखांच्या भोगांना सामोरे जावे लागतेच. फरक एवढाच असतो की ज्ञानी पुरुष सतत आत्मानुसंधानांत असतो. त्याला हे सर्व भोग स्वप्नासारखेच वाटतात. त्यांचे त्याला कांहीच सुखदुःख नसते. त्यामुळे तो लोकांना सर्वथा उदासीन असलेला दिसतो. अज्ञानी लोकांत अनुकूल विषयांची ओढ (राग) आणि प्रतिकूल विषयांचा द्वेष असतो. तसा जीवन्मुक्ताला नसतो. त्यामुळे शोकाला वावच नसतो. त्याला ‘रामाच्या घरचे सगळेच छान!’ असते. अज्ञानी माणूस मात्र रागद्वेष आणि त्यामुळे होणारे शोक-मोह यांच्या दुथडीत सारखा डहुळत असतो. आणखी एक फरक असा आहे की अज्ञानी लोकांची कर्मे पाप-पुण्याला कारण होतात. कारण ती अहंकारयुक्त आणि फळाच्या अपेक्षेने केलेली असतात. जीवन्मुक्ताची कर्मे अनासक्तीने, निरपेक्ष बुद्धीने केलेली असतात आणि आत्मानुसंधानाच्या प्रभावाने सहजच परमेश्वरार्पण होत असतात. त्यामुळे त्यांची पुण्य (शुक्ल) आणि पाप (कृष्ण) अशी विभागणी होत नाही. ती निर्बीज असतात. अशा रीतीने राजा अर्जुन उदासीन वृत्तीने प्रारब्धाने आलेले भोग भोगीत होता. १०२ - १०८.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सोळावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १७ वा.

**नृप तो यज्ञ करी। तेणें देव भीती अंतरीं। अतिथि होऊन रवी ये द्वारीं। राख करी वृक्षांची।।३६।।**
**राजा धर्मिष्ठ असून। दैवें वसिष्ठ कोपून। शाप दे हे कथन। सत्राव्या अध्यायांत।।३७।।**

# कार्तवीर्याच्या अश्वमेधांचा देवांना धाक.

वेदधर्मा मुनि आपल्या प्रिय शिष्य दीपकाला पुढे सांगूं लागले की असा तो धार्मिकाग्रणी विवेकशील अर्जुन राजा निरंतर धर्मकार्यांत मग्न होता. आपल्या आत्मानुसंधानांत मुळीसुद्धा खंड न पडूं देतां तो प्रजेचे अगदी पोटच्या पोरांसारखे पालन तर करीतच होता पण त्याचबरोबर अनेक यज्ञ, व्रतवैकल्यादि तपाचरण, दान आणि ब्राह्मणांची पूजाही करीत होता. यज्ञांच्या अनुष्ठानाची त्याला विशेष आवड होती. श्रीदत्तप्रभूंना प्रसन्न करण्यासाठी तो अश्वमेध यज्ञ करायला करायला लागला. अश्वमेध यज्ञाचे अनुष्ठान चक्रवर्ती राजाच करूं शकतो. या यज्ञांत शामकर्ण घोडा समारंभपूर्वक सोडायचा. तो पृथ्वीवर सर्व दिशांनी फिरून परत आल्याशिवाय हा यज्ञ सिद्धीला जात नाही. ज्याला यजमान राजाचे आधिपत्य मान्य नाही ते हा घोडा अडवतात. त्यांच्याबरोबर युद्ध करून हा घोडा सोडवून पुढील संचाराला पाठवायचा असतो. पुराणातील महान सम्राटांनी अश्वमेध यज्ञ केल्याचे वर्णन सांपडते. प्रभु रामचंद्रांनी अश्वमेध यज्ञ केला होता आणि त्याचा घोडा लव-कुशांनी अडवला होता अशी कथा आहे. धर्मराज युधिष्ठिराच्या अश्वमेध यज्ञाचे असे महाभारतांत वर्णन केलेले आहे. कार्तवीर्याने सोडलेला अश्वमेधाचा घोडा अडविण्याचे साहस भूमंडळांत कुणीच करूं शकत नव्हते. त्याचा तसा दराराच पसरला होता. साहजिकच त्याचे अश्वमेध निर्विघ्न यथासांग पार पडूं लागले. शंभर अश्वमेध करणारा सम्राट स्वर्गाचा अधिपति होतो. त्यामुळे पृथ्वीवर कुणीही अश्वमेध यज्ञांचे अनुष्ठान करूं लागला की इंद्राचे आसन डळमळीत होते असे म्हणतात. अर्थात अर्जुनाच्या मनांत स्वर्गाचे राज्य घेण्याची इच्छा मुळीच नव्हती. पण इंद्राला त्यांची भीती वाटू लागली. त्याने या संकटाचा सामना करण्यासाठी देवांची सभा बोलावली. आपल्या पदांवरच गदा येणार या कल्पनेने भयभीत आणि चिंताग्रस्त झालेल्या देवांनी अर्जुनाच्या हळव्या जिह्वारीच वार करायचा प्रस्ताव मांडला. अर्जुनाला ब्राह्मण फार प्रिय आहेत. तो त्यांना प्रयत्नपूर्वक संतुष्ट करतो हे जगप्रसिद्ध होते. तेव्हां कुणा तरी देवाला ब्राह्मणाच्या रूपाने त्याच्याकडे पाठवावे आणि त्याच्याकडे असे कांही मागावे ज्याने त्याच्या पुण्याचा क्षय होईल आणि त्याचा अधःपात होईल. अखंड धर्माचरणाने त्याचे दिन प्रतिदिन वाढणारे बळ खच्ची करण्याचा हाच उपाय आहे असे ठरवून देवांनी मिळून आपल्या सर्वांत प्रभावी अशा भगवान सूर्यनारायणांची योजना केली. १-१०.

# सूर्याची अर्जुनाकडे याचना.

सर्व देवांच्या प्रेरणेने सूर्यदेव ब्राह्मणवेषाने भूमीवर अर्जुनाची राजधानी माहिष्मतीला आले. सकाळची धार्मिक कर्मे आंवरून भोजनाच्या आधी वैश्वदेव करून राज बलीहरण करायला बाहेर येण्याची नेमकी वेळ साधून सूर्यदेव राजासमोर उभे राहिले. अत्यंत कृश असा तो ब्राह्मण पाय अडखळत आलेला राजाने पाहिला. त्याचे खपाटीला लागलेले पोट, खोल गेलेले डोळे पाहून. त्याला फार नवल वाटले.

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

'आपण एवढे ब्रह्मण्य म्हणवून घेतो आणि या ब्राह्मणाची अशी दुर्दशा कशी झाली? हा कुठल्या देशांतून आला असेल? मी तरी इतका दीनवाणा ब्राह्मण पाहिलेला आठवत नाही.' असा विचार करीत राजाने पुढे होऊन त्या भूदेवाला नमस्कार केला आणि तो कोठून आला आणि त्याची अपल्याकडून काय अपेक्षा आहे ते विचारले. अगदी क्षीण आवाजांत तो ब्राह्मण बोलूं लागला. "हे राजा, तू अतिथीच्या सत्कारात, विशेषतः ब्राह्मणाना दान करण्यात कसलीही उणीव ठेवत नाहीस अशी तुशी कीर्ति ऐकून मी आलो आहे. तू उदार, दानशूर आणि दयाळू आहेस असा तुझा लौकिक त्रैलोक्यांत पसरला आहे. राज्य, धन,पुत्र किंवा स्त्री यांचाच काय अगदी आपल्या नाशिवंत शरीराचासुद्धा लोभ, दान करतांना तुझ्यासारखा दाता ठेवत नाही. तसेच माझी भूक शमविण्याला समर्थ या भूमंडळांत अन्य कुणी मला दिसत नाही. म्हणून तू मला तृप्त करशील या गाढ विश्वासाने मी आलो आहे." राजा म्हणाला, "स्तुति पुरे झाली. ब्राह्मण माझे दैवत आहेत. आपली तृप्ती कशाने होईल तेवढे मला सांगा. माझा देहसुद्धा त्यांत कारणी लागला तर चालेल; पण आपली क्षुधा शांत करीन." त्यावर तो ब्राह्मण म्हणाला, "राजन्, तुझे हे सात द्वीपाचे राज्य आहे त्यांतील वृक्ष, वेली इत्यादि सर्व वनस्पती मला खायला दे म्हणजे माझी भूक भागेल. याहून माझी दुसरी कोणतीच इच्छा नाही." हे जगावेगळे मागणे ऐकून अर्जुनाने ओळखले की हा कुणी सामान्य अतिथि नाही. बळीच्या दारी याचक वेषाने गेलेल्या भगवान विष्णूंच्या सारखा हा कोणी श्रेष्ठ देव माझ्याकडे आला आहे. हा आपला सन्मानच आहे असे मानून आणि देवांनाही उपकृत करण्याची संधी आलेली पाहून राजा मनातून हरखला. त्या सर्वज्ञ राजाने त्या ब्राह्मणाच्या तेजावरून तो सूर्यनारायणच असावा असे अनुमान केले आणि त्यांना उत्तरला. "ब्रह्मन्! आपली इच्छा मी अवश्य पुरवीन. मी आपले ईप्सित दिलेच असे समजा. पण मला आधी हे सांगा, आपण आहांत कोण? " ११-२६

## सूर्याच्या तृप्तीसाठी वृक्षांचे दहन.

त्यावर त्या ब्राह्मणाने सांगितले, "माझे नांव दिवाकर भट. माझी भूक मिटवण्यासाठी लोकालोक पर्वतावरून थेट इथे आलो आहे." लोकालोक पर्वत हे सूर्याचे स्थान आहे. राजा हर्षाने हंसूं लागला. आपल्या गृहस्थाश्रमाचे सार्थक झाले असे त्याला वाटले. 'प्रत्यक्ष सूर्यनारायण माझ्या दारी याचक म्हणून आले आहेत. खरोखर या पृथ्वीवर माझ्याइतका धन्य कुणीच नाही! एवढा थोर अतिथि घराला येण्यापेक्षां अधिक मोठे भाग्य ते काय? वनस्पतींचे काय, श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने माझ्याकडे ज्या सिद्धी आहेत त्यांच्या प्रभावाने मी त्या पुन्हा निर्माण करीन!' असा विचार करून पृथ्वीवरील सर्व वृक्षांचे दान करण्यासाठी तो सज्ज झाला तेव्हां सूर्यनारायणांनी आपले देवतास्वरूप प्रकट केले. त्या दर्शनाने सुखावलेल्या अर्जुनाने आपण देत असलेले हे वृक्षदान ग्रहण करण्याची त्यांना विनंति केली. सूर्यदेवांनी त्याला ते वृक्ष आपल्याला अग्नीच्या रूपाने खातां येतील असे सुकवून द्यावेत अशी मागणी केली. ते राजाने मान्य केले. पण हे सर्व वृक्ष वाळविण्याचे सामर्थ्य वा तेज आपल्याजवळ नसल्याचे स्पष्ट केले आणि सूर्यानेच ते द्यावे अशी विनंति केली.(न शक्याः स्थावराः सर्वे तेजसा स्वबलेन च।। निर्दग्धुं तपतां श्रेष्ठ त्वामेव प्रणतोऽस्म्यहम्।। दत्तपुराण २:१:२४।।) यावर सूर्याने त्याला त्यासाठी विशेष बाणांनी भरलेला भाता दिला. अर्जुनाने आपल्या हजार भुजांनी पांचशे धनुष्याना ते बाण जोडले आणि वृक्षांवर संधान केले. प्रत्येक बाणाचा पुन्हा हजार बाण होऊन तेवढ्या वृक्षांवर पडले. सर्व वृक्ष तात्काळ शुष्क होऊन गेले. शहरांत, गांवात, शेतीत, रानांत, अरण्यांत, नदीकांठी, सर्व ठिकाणच्या वृक्षांना बाणांनी वाळवून टाकले. लगेच ते वृक्ष, लता, झुडुपे या सर्वांना सूर्याने अग्नीच्या रूपाने जाळून टाकले. २७-३८.

# वसिष्ठ ऋषींचा अर्जुनाला शाप.

कार्तवीर्याने औदार्याच्या भरांत आणि दातृत्वाच्या अभिनिवेशांत हे साहस केले. पण त्याचा अर्जुनाच्या कल्पनेतही नसणारा आणि देवांना मात्र अपेक्षित असलेला परिणाम लगेचच झाला. पृथ्वीवरच्या सर्व वृक्षांच्या दहनांत साहजिकच ऋषींच्या आश्रमांतील झाडे-वेलीही जळून राख झाल्या. महर्षि वसिष्ठ त्यावेळी समाधींत होते. ते एकदम भानावर आले आणि त्यांनी आपल्या शिष्यांना ह्या जळीताचे कारण विचारले. शिष्यांनी हे राजा अर्जुनाने केल्याचे आणि आश्रमांतीलच नाही तर सर्व पृथ्वीवरील वनस्पती भस्मसात झाल्याचे सांगितले. हे ऐकून वसिष्ट ऋषींना क्रोध आला. 'हा राजा राज्याच्या मस्तीने माजला आहे आणि त्याची बुद्धीच बिघडली आहे. त्यामुळेच माझा आश्रम जाळण्याचे हे साहस त्याने केले आहे. याला आळा घालणारा कुणी प्रतिस्पर्धी पृथ्वीवर नाही. म्हणून आपल्या शौर्याचा गर्व याला झाला आहे. याचा हा उन्माद उतरवलाच पाहिजे. ' असा विचार करून वसिष्ठ ऋषींनी रागाच्या भरांत भयंकर शापवाणी उच्चारली, "अरे अर्जुना! तुझा हा गर्व आतां पुरे झाला! लवकरच जमदग्नी ऋषींना पुत्र होईल. तो तुझे हजार हात तोडून तुझे डोके उडवील! " त्या महान तपस्वी ऋषींची वाणी खोटी कशी होईल?

खरे तर अर्जुन हा ब्राह्मणांचा भक्तच होता. वसिष्ठ मुनीही शांतीची मूर्तीच होते. पण समष्टीचा संकल्प असाच होता. हीच दैवगती किंवा ईश्वराची करणी होय. वसिष्ठ काय आणि अर्जुन काय, कुणीही जीव स्वतंत्र नाहीत असे वेदवचनच आहे. श्रीमद्भगवद्गीतेतील (१८:६१) वचनानुसार ईश्वरच जीवमात्रांच्या अंतःकरणात राहून आपल्या मायेने कळसूत्राच्या बाहुल्यांप्रमाणे त्यांना नाचवीत असतो. (ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।।) अशा रीतीने सूर्याने देवांचे कार्य सिद्धीला नेले आणि तो सगळे वृक्ष जाळून स्वर्गलोकाला निघून गेला. इकडे अर्जुनाने आपल्या योगसामर्थ्याने पृथ्वीवरील वनस्पतींचे पुनरुज्जीवन केले. ३९-४८.

# कार्तवीर्याची स्वर्गावर स्वारी.

ब्राह्मणशापाच्या परिणामाने राजाची बुद्धीच पालटली. तो उद्दाम झाला आणि स्वर्गावर स्वारी करून देवांना जिंकावे असे त्याला खरेच वाटू लागले. आपल्या मोठ्या झालेल्या पुत्रांना राज्यकारभार सांभाळायला सांगून तो दिव्य विमानांत बसून स्वर्गावर चालून गेला. सर्व सिद्धी ज्याच्या दासी होत्या, ज्याची गति अकुंठित होती, ज्याची आज्ञा त्रैलोक्यांत कुणालाही अनुल्लंघनीय होती, अनेक देह धारण करून स्मरण करतांच जो पोंचायचा, सर्वांचे मनोगत जाणायचा आणि अत्यंत कठोर शासन करायचा अशा अतुलनीय ऐश्वर्याने संपन्न कार्तवीर्याने प्रथम कुबेराच्या चैत्ररथ नांवाच्या उद्यानांत जाऊन क्रीडा करायला आरंभ केला. त्याचा तो उद्धटपणा सहन न होऊन कुबेराचे सेवक यक्षगण आणि किन्नर त्याच्यावर धावून गेले. कुणाची मुखे घोड्याची होती तर कुणाचे देह घोड्याचे असून मुखे मानवी होती. अशा त्या विचित्र सैन्यवर अर्जुन आपल्या सहस्र बाहूंनी एकटाच लढू लागला. एकाच वेळी पांच-पांचशे धनुष्यांनी अस्त्रयुक्त बाण सोडून त्याने ते यक्ष-किन्नरांचे समूह छिन्नभिन्न केले. जीव हातीं घेऊन ते घाबरून पळत सुटले. तेव्हा त्यांना सोडून देऊन अर्जुनाने आपला मोर्चा स्वर्गाकडे वळविला. ही बातमी देवदूतांनी इंद्राच्या कानांवर घालेपर्यंत अर्जुनाने त्यांच्यावर घाला घातला. मोठेच तुमुळ युद्ध झाले. पण अर्जुनाच्या अचाट सामर्थ्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाही. देवसुद्धां घायाळ होऊन प्राणभयाने व्याकुळ झाले. त्यांना मोहनास्त्राने मूर्च्छित करून अर्जुनाने नंदनवनांत मुक्काम केला. एकदां शचीसह नंदनवनांत आलेल्या इंद्राने अर्जुनाला पाहिले. तेव्हां त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्वेषाने

त्याने आपले वज्र उचलले. तेवढ्यांत अर्जुनाने विमानासह इंद्र आणि शची यांनाच उचलले.आणि मोठ्याने गर्जना करीत आकाशांत फिरूं लागला. त्या वेळीं इंद्राचा आरडाओरडा ऐकून सगळे देवसैन्यच अर्जुनावर धावून आले. पण वज्रदेही महाबलाढ्य अर्जुनापुढे त्यांचे कांही चालेना. उलट अर्जुनाच्या माऱ्याने देवांचाच दैना उडाली. त्यांच्या हातांतली शस्त्रेच काय अंगावरची वस्त्रेही गळून पडली. कुणी लाजेने डोळे झांकून घेतले. कुणी भयाने तोंड फिरवले. तर कुणी हात जोडून अर्जुनाची विनवणी करूं लागले. तेव्हा त्या कार्तवीर्याने त्यांना सोडून दिले. ४९-७२.

## देवांचे ब्रह्मदेवांकडे गाऱ्हाणे.

ह्या लाजिरवाण्या पराभवाने खिन्न झालेल्या इंद्राने मेरू पर्वताचा आश्रय घेतला. तिथे देवांशी विचारविनिमय करून आणि मनुष्यांना दिलेला भूलोक ओलांडून हा मानव राजा देवांच्या स्वर्गावर अतिक्रमण करीत आहे. दत्ताच्या वराने कुणालाही न आटोपणारा हा अर्जुन आमचा नायनाट करील. आतां आपण आपले गाऱ्हाणे ब्रह्मदेवाकडेच न्यावे असे त्यांनी ठरविले. इंद्राला पुढे करून सर्व देव ब्रह्मलोकाला. गेले. तेथे चतुर्मुख ब्रह्मदेव मूर्तिमंत वेद आणि सनकादि ब्रह्मपुत्रांसह विराजमान होते. त्यांच्या दर्शनाने झालेल्या आनंदाने क्षणभर इंद्रादिक देव आपले दुःख विसरले. ब्रह्मदेवांना साष्टांग नमन करून ते हात जोडून उभे राहिले आणि ब्रह्मदेवांची स्तुति करूं लागले. “हे कमळावर बसणाऱ्या जगाच्या पित्या! चतुर्मुख विधात्या, आपणच या सृष्टीचे पालन करतां आणि तेथील सर्व जीवांना जगवितां. आपल्याला नमस्कार असो. आम्ही आपल्या आज्ञेनेच आपापली पदे सांभाळली आहेत. आपल्या ह्या सेवेनेच आम्ही स्वर्गाचे सुख उपभोगीत असतो. पण हे जगज्जनका, आमच्यावर दुःखाचे जणूं डोंगरच कोसळले आहेत. योगिराज दत्तात्रेयांच्या वराने उन्मत्त झालेल्या अर्जुनाने स्वर्गावरच चढाई केली आणि आम्हाला जर्जर करून सोडले. आमची शस्त्रे त्याच्यापुढे बोथट झाली आहेत. आमचा कांहीच उपाय त्याच्यापुढे चालत नाही. आम्ही आतां काय करावे. आपणच या कठिण प्रसंगांतून आम्हांला बाहेर काढा! ” ७३-८४.

ब्रह्मदेवांनी ‘सर्व देवांना भगवान लक्ष्मीरमण भक्तांचे कैवारी आहेत. तेच आपल्याला तारतील,’ असे सांगून त्याना घेऊन भक्तियुक्त चित्ताने त्या नारायणाचे स्मरण करीत आणि वाचेने त्यांचे भजन करीत सगळे वैकुंठाला आले. आनंदाचा कंद जो श्रीहरी त्याचे ते स्थान. अभाग्यांना त्याचे स्मरणही होणे कठीण! तिथे सूर्यादिकांच्या प्रकाशाची आवश्यकताच नसते कारण वैकुंठ स्वयंप्रकाश आहे. रोग, चिंता, क्लेश, शोक आणि मोह यांचे नांवही त्या पूर्णानंदाच्या धामांत नसते. गरुडवाहन विष्णूंचे ते स्थान सर्व काळी सुखदायकच असते. मनाच्या सर्व ऊर्मी शमविलेले, इंद्रियांचा पूर्ण निग्रह केलेले, निरहंकारी, निर्मत्सर, निष्काम भगवंतांचे भक्तच ती नारायणाची नगरी पाहूं शकतात. तिथे कल्पवृक्षाच्या बागांतून कामधेनूंचे कळप बागडत असतात. अमृताच्या सरोवरांना चिंतामणींचे घाट बांधलेले असतात. सोन्याच्या भिंती रत्नांनी मढविलेल्या आहेत. त्यावरील चित्रे सजीव असतात. अशा त्या वैकुंठाला इंद्रमुख्य देवांना घेऊन ब्रह्मदेव गेले. भगवान विष्णूंच्यासारख्याच मेघःश्याम जय आणि विजय ह्या द्वारपालांनी त्यांच्या आगमनाची सूचना विष्णूंना दिली. ८४-९६.

श्रीविष्णूंच्या आज्ञेने देवांसहित ब्रह्मदेवांनी द्वारांतून प्रवेश केला आणि ते त्रिभुवनमनोहर पीतांबरधारी शंख, चक्र, गदा धारण केलेले चतुर्भुज प्रसन्न सांवळे रूप डोळ्यांतून हृदयांत सांठवले. सर्वांनी साष्टांग नमस्कार केला आणि हात जोडून बोलायला आरंभ केला. “विश्वाच्या प्राणा, विश्वाच्या पालका, नारायणा! आपल्या भक्तांचा योगक्षेम तूच करतोस. जे अत्यंत नम्रपणाने तुला शरण येतात त्यांच्याकरितां तू कृपेचा सागर आहेस. भगवंता आपणच अवधूतांच्या रूपाने कार्तवीर्य अर्जुनावर कृपा

करून त्यांला हवे ते वर दिले. आज त्याने आम्हा देवांचीच स्थाने घेऊन आम्हाला पदभ्रष्ट केले आहे. आम्ही आपलेच सेवक आहोंत. आपल्या आज्ञेनेच आमची नेमून दिलेली कार्ये करीत असतो. आतां आपणच ह्या स्थितीचा प्रतिकार करून आम्हांला आमचे अधिकार प्राप्त करून द्यावेत अशी आपल्याला प्रार्थना आहे." ९७-१००.

हे देवांचे निवेदन ऐकून भगवान विष्णूंनी मनांत विचार केला की 'अर्जुनाला वसिष्ठ मुनींचा शाप तर झालेलाच आहे. अर्जुन त्या शापामुळेच असा पेटला आहे. वास्तविक तो जीवन्मुक्तच आहे. त्याच्या मनांत स्वर्गाचा अभिलाष यत्किंचितही नाही. प्रारब्धाच्या प्रेरणेने तो हे अहैतुक उद्योग करीत आहे. पण ह्या देवांना त्याच्या ह्या आचरणाचे रहस्य काय उमगणार? अर्जुनाचे प्रारब्धही आतां संपुष्टांत आले आहेच. त्याला मीच त्याच्याहून श्रेष्ठ वर्णाच्या योद्ध्याकडून मृत्यूचे वरदान दिले आहे. पण त्या अर्जुनाचा वध करण्याचे सामर्थ्य असणारा आज तरी भूमडळांत नाही. तेव्हां आतां मलाच अवतार घेऊन त्याचा देह रणांगणांत पाडून त्या माझ्या स्वभावतः पवित्र भक्ताला विदेहमुक्ति दिली पाहिजे.' असा विचार करून भगवान विष्णू देवांना बोलले, "मीच जमदग्नी आणि रेणुका यांच्या पोटी अवतरून अर्जुनाबरोबर युद्ध करून त्याला ठार करीन. तुम्ही चिंता न करतां आपापल्या स्थानी परत जा." हे भगवंताचे आश्वासन मिळाल्याने आनंदित झालेले देव त्यांचा निरोप घेऊन स्वस्थानाला परतले. १००-१०८.

ज्या परमात्म्याने अत्यंत प्रेमाने कार्तवीर्याला सर्व सिद्धी दिल्या, सप्तद्वीप पृथ्वीचे आधिपत्य दिले आणि अंतीं योग आणि ज्ञान यांचा उपदेश करून ब्रह्मज्ञानी केले तोच परमेश्वर त्याच्या वधासाठी अवतार घेणार आहे. तो कुणाचा पक्षपाती नाही की कुणाचा शत्रू नाही. सारख्याच उदासीनतेने तो सर्व जीवांना त्यांच्या कर्माची फळे देत असतो. ईश्वर एखाद्याला ऐश्वर्य देतो कारण तसे त्याचे पुण्य असते. एखाद्याला तो दरिद्री करतो कारण तसेच त्याचे पाप असते. जसा न्यायाधीश कुणाला निर्दोष सोडतो म्हणून त्याचा मित्र होत नाही किंवा त्याला कठोर शिक्षा दिल्याने निष्ठूर होत नाही तसेच ईश्वराचे आहे. ज्याचा त्याच्या प्रारब्धानुसार उत्कर्ष करायचा असतो त्याला देव सद्बुद्धि देतो. ज्याचे अधःपातकारी पाप फळाला येत असते त्याला तो दुर्बुद्धि देतो. तो गुहाश्रय आहे, बुद्धीचा प्रेरक आहे. ज्यांचा उद्धार करायचा आहे त्यांना तो सत्कर्माकडे प्रवृत्त करतो आणि ज्यांना नरकांत ढकलायचे असते त्यांना दुष्कर्मे करण्याची बुद्धि देतो. कौशीतकी ब्राह्मणातला हा सिद्धांत (३:८) कार्तवीर्याच्या चरित्रातून स्पष्ट कळून येतो.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सतरावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १८ वा.

**स्वधर्मानें मरण। दत्तापाशीं मागें अर्जुन। ऋचीकाचें आख्यान। विधिनें लग्न सत्यवतीचें ।।३८।।**
**वाखाणि भविष्य भृगुमुनि। शिव झाला जमदग्नी। विश्वामित्र राजा झाला मुनी। अठराव्यांत हे कथा।।३९।।**

देवांना भगवान विष्णूंनी दिलेल्या आश्वासनाची कथा ऐकून दीपकाला अनके प्रश्न पडलेले दिसतात. हे जमदग्नि ऋषि आणि रेणुका कोण? देवांनी त्यांच्या पोटीच कां अवतार घेतला? भगवंतानी स्वतः अवतार घेऊन अर्जुनाशी युद्ध केले ते कसे? तेही ब्राह्मणरूपाने आणि आपल्याच भक्ताला ठार करायला? त्याने अत्यंत नम्रपणे आपले गुरु वेदधर्मा यांना हे प्रश्न विचारले. आपल्या शिष्याची जिज्ञासा आणि उत्सुकता पाहून वेदधर्मा मुनींना आनंद झाला आणि शिष्याला लक्षपूर्वक ऐकायला सांगून ते बोलू लागले. १ – ४

## अर्जुनाचे दत्ताजवळ स्वधर्माने मरणाचे मागणे.

देव वगैरे सब झूठ मानून आयुष्यभर अपराध करूनही, संकटांनी ग्रासल्यावर मात्र 'देवा! मी तुझा आहे' असे म्हणून जो एकदां का होईना शरण येतो, त्याला अभय देणे हे ज्या भगवंताचे ब्रीद आहे. मगरीने धरलेला गजेंद्र, रावणबंधु बिभीषण इत्यादि अनेक उदाहरणांनी हे स्पष्ट होते. असे असतांना आपल्या एकांतिक, सतत चिंतन करणाऱ्या, आज्ञाधारक, अनन्य भक्त अर्जुनाला तो कसा दूर करील? एकदां तो जीवन्मुक्त अर्जुन दत्तप्रभूंच्या दर्शनाला गेला असतां त्याने त्यांना हात जोडून प्रर्थना केली कीं, 'देवा! माझा हा क्षत्रियाचा देह धारातीर्थीच पडणे योग्य आहे. पण युद्धांत माझा वध करण्याचे सामर्थ्य माणसांत काय, देवादिकांतही दिसत नाही. तेव्हां माझी अशी विनंति आहे की कीं आपणच माझा वध करावा!' प्रभूंनी विचार केला की हा एक महान योगी आणि दुर्जय योद्धा आहे. याचा वध करण्यला समर्थ असा वरचढ वीर ब्रह्मांडांत शोधूनही सांपडणार नाही. पण अर्जुनाल ते म्हणाले, "अरे अर्जुना! जरा विचार कर! आपण लावलेली विषाची वेलीसुद्धां माणसाला तोडवत नाही मी तुझा ज्या हातांनी आयुष्यभर प्रतिपाळ केला त्यांनीच तुझ्यासारख्या प्रिय भक्ताला मारायची मला कशी प्रवृत्ति होईल?." त्यावर अर्जुनाने पुन्हा काकळुत केली की "देवा! निदान मला हीनापासून किंवा अंथरुणात रुग्णावस्थेत तरी मरण येऊ नये असे करा! आपल्याला हे करवत नसेल तर आपल्यासारख्याच श्रेष्ठ पुरुषाकडून मला मरण यावे." तेव्हां देवांनी त्याला तसा वर दिला. ५ - १२.

## ईश्वराचे औदासीन्य.

देवांना अर्जुनाच्या नाशाचे अभिवचन देतांना विष्णूंच्या मनांत हेच वरदान होते. अर्जुन हा क्षत्रिय असल्याने त्याला मारण्यासाठी ह्या वरदानानुसार त्याच्याहून श्रेष्ठ वर्णांत म्हणजे ब्राह्मण कुळांतच जन्म घेणे प्राप्त होते. भगवान भक्तपराधीन आहेत. त्यांच्या इच्छेनेच ते उच्च किंवा नीच रूपें धारण करतात. त्याचा त्यांना कसला दोष? प्रलयकाळी तर तोच ईश्वर यच्चयावत् अवघ्या जीवांचा नाश करतो. त्याचा त्याला ना खंत ना खेद! जगाची उत्पत्ति करतांना, सर्व जीवांचा सांभाळ करतांना आणि अंतीं त्यांचा नाश करतांना त्याला सुख वा दुःख कांहीच नसते. तो उदासीन असतो. लहान मुलींनी भातुकलीचा संसार मांडावा आणि खेळ झाला की तो सहजच मोडून टाकावा. तशाच ह्या भगवंताच्या लीला आहेत. म्हणूनच त्याला जनार्दन (जनांचा घात करणारा) म्हटले आहे. शिवाय गीतेच्या

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

वचनानुसार जो जन्म पावतो त्याचा मृत्यु अटळ आहे आणि जो मृत्यु पावतो त्याचाही पुनर्जन्म निश्चित आहे. त्यामुळे ह्या अपरिहार्य गोष्टींचा शोक कां करावा?( २:२७). त्यामुळे तो देह सोडून जाणाऱ्या जीवाला त्याचा काहीच विकार नसतो. मग ज्याने आत्मज्ञानाच्या बळाने 'याचि देही याचि डोळां आपले मरण पाहिले' आहे अशा अर्जुनासारख्या जीवन्मुक्ताला देहपाताचे दुःख ते काय असणार? पाण्यावर उठणाऱ्या लाटा सारख्या उचंबळतात आणि पुन्हा विरून जातात. त्याचा पाण्यावर कांहीच परिणाम होत नाही त्याचप्रमाणे जन्म, वाढ, स्थिति, परिणाम, क्षय आणि नाश अशा विकारांनी ग्रस्त असलेले देह राहिले किंवा गेले तरी आत्मस्वरूपाचा कींही हानी होत नाही. मुमुक्षूने हाच अभ्यास चित्तात दृढ करायचा आहे. अशा रीतीने विचार केल्यावर हे स्पष्ट होते की ब्रह्मसूत्रांच्या (२:१:३४) सिद्धांताप्रमाणे परमेश्वरावर पक्षपाताचा किंवा निष्ठुरपणाचा आरोप करतां येत नाही. आतां आपण मूळ कथेकडे वळूं या. १३ – २१

## ऋचीक मुनींचा गाधीकन्या सत्यवतीशी विवाह.

आतां परशुरामाच्या चरित्राचा उपक्रम त्याचे पितामह ऋचीक मुनींच्या आख्यानाने केला आहे. कान्यकुब्ज देशांत गाधी नांवाचा एक धर्मपरायण सोमवंशी राजा होता. त्याला दैवयोगाने कांहीच संतति नव्हती. त्यामुळे त्याला विरक्ति उत्पन्न होऊन त्याने पत्नीसह वनांत राहून शंकराची आराधना केली. भगवान भोलेनाथांच्या कृपेने त्याला एक मुलगी झाली. तिचे नांव त्याने सत्यवती ठेवले. ती रूपवान, गुणवान आणि बुद्धिमान कन्या शुक्लपक्षाच्या चंद्रासारखी त्याच्या घरी वाढूं लागली. तिथे जवळच तप करणारा ऋचीक नांवाचा एक ऋषि आपल्या पित्याच्या दर्शनाला गेला असतांना त्याच्या पित्याने – भृगु ऋषींनी, त्याला पितरांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठी गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा दिली. गृहस्थाश्रमांत यज्ञांनी देवांना तोषवावे आणि पुत्रोत्पत्ति करून पितरांचे ऋणही फेडावे. त्यानंतर पाहिजे तर तपश्चर्येसाठी वानप्रस्थाश्रम घ्यावा अशा त्या काळच्या जीवनपद्धतीप्रमाणे भृगु मुनींनी पुत्राला उपदेश केला. पित्याची आज्ञा शिरसा वंदून ऋचीकांनी ध्यानाच्या द्वारे आपल्याला अनुरूप अशी कन्या शोधली. तेव्हां त्यांना सत्यवतीच आवडली. ते लगेच गाधी राजाकडे गेले व त्याच्याकडे सत्यवताला मागणी घातली. गाधी राजा बिचारा गोंधळून गेला. 'आपली लाडा-कौतुकाने वाढवलेली एकुलती सुकुमार कन्या या तापसाला कशी द्यावी? तिला वनवासाचे कष्ट कसे सहन होतील?' अशा विचारांत तो पडला. दुसरीकडे, 'ह्या तपोधन मनींना नकार दिला त्यांचा कोप होईल आणि प्रसंगी ते आपल्याला भस्मही करू शकतील,' अशा शृंगापत्तीत राजा सांपडला. विचार करून त्याने ऋषीला मुलासीठी कांही तरी अशक्यप्राय मागून निरोप द्यावा असे ठरविले. तो ऋचीक मुनींचा सन्मान करून म्हणाला, "ऋषिवर्य! माझ्या मुलीच्या रूपगुणांना भुलून अनेक राजांनी तिला मागणी घातली आहे. एनेक राजे माझ्यावर दबाव आणीत आहेत. याला उपाय म्हणून मी एक उपाय केला आहे. जो भाग्यशाली पुरुष मला एक हजार श्यामकर्ण घोडे आणून देईल त्यालाच माझी कन्या देण्याचा मी पण केला आहे. आता आपल्याला ह्या माझ्या प्रतिज्ञेची पूर्तता कशी काय जमणार? " आपण मागच्या अध्यायात अश्वमेध यज्ञाचा विचार केला आहे. त्या यज्ञातला घोडा हा श्यामकर्ण असावा लागतो. ह्या पांढऱ्या शुभ्र रंगाच्या घोड्याचे फक्त कान काळे असतात. म्हणून त्याला श्यामकर्ण असे म्हणतात. हा अत्यंत शुभ मानला जातो आणि दुर्मिळ असतो. एखादा श्यामकर्म घोडा मिळवणेही दुरापास्त असते. तेव्हां असे एक हजार घोडे मिळवणे ऋचीकासारख्या ब्राह्मणाला शक्य होणार नाही अशी राजाची खात्री होती. ऋचीक मुनींचा आपल्या तपःसामर्थ्यावर विश्वास होता. ते राजाला म्हणाले, "ठीक आहे! मी तुम्हाला हजार श्यामकर्ण आणून देईन. मग मात्र तुम्हाला कन्यादान करावेच लागेल. आपले वचन बदलूं नका." असे राजाला बजावून

ऋचीकाने ध्यानानेच एक हजार श्यामकर्ण कुठे मिळतील याचा मागोवा घेतला. तेव्हां त्याला वरुणदेवाकडे हजार श्यामकर्ण असल्याचे दिसले. लागलीच तो आकाशमार्गाने वरुणाला त्याच्या नगरीत जाऊन भेटला. त्याला त्याने आपण भृगुपुत्र ऋचीक असून पित्राज्ञेने गृहस्थाश्रम करण्यासाठी गाधीकन्या सत्यवती पसंत केली असल्याचे सांगितले. तसेच गाधी राजाने लावलेल्या पणासाठी एक हजार श्यामकर्ण हवे असल्याने त्यांची वरुणाकडेच मागणी केली. वरुणाला ऋचीकाच्या तपःसामर्थ्याची कल्पना होती. त्यामुळे तोही एकदम नकार देऊं धजला नाही. मग त्याने त्या ऋषिपुत्राला सांगितले की "माझ्याकडे हजार श्यामकर्म आहेत खरे, पण ते फार मस्तवाल आहेत. त्यांना कुणीच आंवरू शकत नाही. ते वाऱ्यासारखे पळतात. अहो, त्यांचे पायसुद्धां जमीनीवर ठरत नाहीत. माणूस पाहिला तर खायला धांवून येतात. पाहिजे तर मी तुम्हाला ते दाखवून देतो." असे ऋचीकाला सांगून त्याने त्या घोड्यांना दारू पाजविली आणि "तुम्हांला घेऊन जायचे तर हे घोडे खुशाल घेऊन जा," असा ऋचीकाला निरोप दिला. तो तपस्वी ऋचीक त्या श्यामकर्णांकडे आला. वरुणाने सांगितल्याप्रमाणेच ते अत्यंत उन्मत्त होते. पण ऋचीकाने आपल्या योगसिद्धींचा उपयोग करून त्यांना एका दृष्टिक्षेपांत शांत करून टाकले. पुराणांतील ह्या गोष्टी आपल्याला बिनबुडाच्या वाटण्याची शक्यता आहे. प.प.श्रीटेंबेस्वामींच्या जीवनांतच घडलेली एक घटना इथे विचारणीय आहे. पूर्वाश्रमांत ते एकदां आपल्या बहिणीकडे गेले असतां तिने त्यांना आपली गाय मारकी असल्याचे सांगितले. ती कुणालाही धार काढू द्यायची नाही कुणी जवळ आले की लगेच लाथ मारीत असे. वासुदेवशास्त्रींनी (स्वामींचे पूर्वाश्रमींचे नांव) कांही मंत्रप्रयोग केल्यावर ती गाय एकदम गरीब होऊन गेली व त्यांच्या बहिणीला तिचे दूध मिळू लागले. प्राणिमात्रांच्या स्वभावावर मंत्रसामर्थ्याचा किंवा योगसामर्थ्याचा प्रभाव पडतो हे यावरून स्पष्ट होते. अगदी अलीकडच्या काळांत होऊन गेलेले संत श्री पाचलेगांवकर यांचे सर्पांवरचे प्रभुत्व अनेकांनी पाहिलेले आणि अनुभवलेले आहे. असो. अशा रीतीने त्या हजार श्यामकर्णांचा कळप घेऊन तो ऋचीक वरुणाला आशीर्वाद देऊन जलमार्गाने पूर्वेकडील कान्यकुब्ज (कन्नौज) देशांत आला. गंगा नदीतून हे अश्व घेऊन जिथून बाहेर पडला ते स्थान सर्व पापांचा नाश करणारे अश्वतीर्थ या नांवाने प्रख्यात झाले. हे सहस्रमुखी गंगेजवळ आहे. ते हजार अश्व घेऊन ऋचीक गाधी राजाकडे आला आणि ते त्याला आपल्या शुभेच्छांसह देऊन त्याच्या वचनाची आठवण दिली. गाधी राजाही त्याचे ते अद्भुत योगबळ पाहून स्तंभित झाला आणि त्याला आनंदही वाटला. आपण ज्याला दरिद्री समजत होतो तो देवांहूनही अधिक शक्तिशाली आहे हे कळून त्याला आपली मुलगी देण्यास तो राजी झाला. 'ज्याच्या घरी सिद्धी राबताहेत त्याच्या घरी आपल्या मुलीला कांहीच कमी पडणार नाही. देवतासुद्धा याला अनुकूल आहेत आणि हा आपल्या पत्नीसह उत्तम गति पावेल' असा विश्वास त्याला वाटला. 'माझी कन्या तर कृतकृत्य होईलच पण माझ्याही कुळाचा उद्धार होईल' असा विचार करून त्याने चांगला मुहूर्त पाहून ब्राह्म विधीने ऋचीकाला आपली कन्या दिली. विवाहाचे आठ प्रकार शास्त्रांत वर्णिलेले आहेत. कुल, शील, विद्या यांनी संपन्न अशा अनुरूप वराला पिता आपली कन्या शास्त्रोक्त विधींनी, वस्त्रे आणि अलंकार यांच्यासह अर्पण करतो तो (१) **ब्राह्म** विवाह समजावा. यज्ञयाग करणाऱ्या ऋत्विजाला सालंकृत कन्या देणे हा (२) **दैव** विवाह होय. दोन गाईसह कन्यादान केले तर (३) **आर्ष** विवाह होतो. उभयतांना धर्माचरणाचा उपदेश करून सन्मानाने कन्यादान केल्यावर (४) **प्राजापत्य** विवाह संपन्न होतो. ज्या विवाहात वधुपिता स्वेच्छेने कन्येला, वराला आणि त्याच्या आईवडिलाना धन देऊन कन्यादान करतो त्याला (५) **आसुरविवाह** म्हणतात. आईवडिलांच्या परवानगीशिवाय वधुवरांनी पळून जाऊन केलेल्या विवाहाला (६) **गांधर्वविवाह** म्हणतात. मुलीला तिच्या इच्छेविरुद्ध घरांतून पळवून नेऊन केलेला विवाह (७)

**राक्षसविवाह** होतो. आईवडील, वधू, वर हे झोंपेत किंवा नशेत असतांना झालेला शरीरसंबंध (८) **पैशाच** विवाह होय. या सर्वांत ब्राह्म विवाह श्रेष्ठ मानला आहे. मोठ्या उत्सवाने विवाह संपन्न झाला. सत्यवती आणि ऋचीक ह्यांना विशेषच आनंद झाला. देवकन्येसारख्या सुंदर आणि गुणी, सूर्यसमान देवतांनाही भुरळ पाडणाऱ्या सत्यवतीचे ऋचीकासारख्या तपस्वी वराशी लग्न ही एक आश्चर्यकारकच घटना होती. इंद्रादि देवतांनाही हे अपूर्व वाटले. अशा रीतीने तो ऋचीक राजकन्येशी लग्न करून कांही दिवस मोठ्या आनंदाने सासुरवाडीतच राहिला. २१ – ६२.

## भृगु ऋषींचे ऋचीक आणि गाधि यांना संततीचे वरदान.

एके दिवशी गाधी राजाने संधि पाहून आपले जांवई ऋचीकमुनींना नम्रपणे प्रार्थना करून आपल्या निपुत्रिकत्वाची जाणीव करून दिली. "आपल्यामागे श्राद्ध-पक्षादिक पितृकर्मांचा (पिंडदान, तर्पण इत्यादिकांचा) लोप होऊन पितरांना पितृलोकांतून खाली यावे लागेल. त्यामुळे यांचा प्रतिकार करायलाआपणच समर्थ आहांत. मला तपस्वी, उदार आणि पुण्यवान पुत्र व्हावा, त्याची सर्व त्रैलोक्यांत आकाशांत सूर्य आणि चंद्र आहेत तोंवर सत्कीर्ति पसरावी. मीसुद्धा पितरांच्या ऋणांतून मुक्त होऊन मला सद्गति मिळेल." असे बोलून त्यांना नमस्कार केला. ऋचीक मुनींनाही त्याची करुणा वाटली आणि त्यांनी त्याला पुत्रप्राप्तीचा वर दिला. त्यानंतर आपले पिताजी भृगु ऋषींच्या दर्शनाला सत्यवतीसह जाण्याची इच्छा मनींनी राजाला सांगितली. राजाने सर्व व्यवस्था करून मानसन्मानाने त्यांना सपत्नीक निरोप दिला. ऋचीक मुनींनी पिताजींना सर्व वृत्तांत निवेदन केला आणि सत्यवतीला त्यांच्या पायीं घातले. ऋचीकाची कीर्ति त्यापूर्वींच भृगु ऋषींच्या कानांवर आलीच होती. आपल्या मुलाने आपल्या आज्ञेचे पालन उत्तम केल्याचे ऐकून आणि ती देवीसारखी सून पाहून मुनींना फार संतोष झाला. नवपरिणित दंपतीला आशीर्वाद देऊन मोठ्या प्रेमाने त्यांनी आपल्या जवळच राहवून घेतले. राजकन्या असूनही सत्यवतीने पातिव्रत्य धारण करून आपल्या सासऱ्यांची मनोभावे सेवा केली. तिने आपल्या शांत, प्रेमळ, ऋजु स्वभावाने श्वशुरांचे मन जिंकून घेतले. एके दिवशी ते तिला म्हणाले, "मुली, तूं तुझ्या स्वभावाने, वागण्याने आणि सेवेने मला संतुष्ट केले आहेस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तूं तुला पाहिजे तो वर माग!" त्या सुजाण राजपुत्रीने हात जोडून उत्तर दिले, "मामंजी! धर्मावर दृढ निष्ठा असावी आणि वाडवडिलांची सेवा घडावी हेच माझे इष्ट आहे! याशिवाय इतर कांही नको." भृगु ऋषि म्हणाले, "ते खरेच आहे. तरी तुझ्या मनांत कांही इच्छा असेल तर सांग. मी लगेच ती पूर्ण करीन." त्यांचा तो आग्रह पाहून सत्यवतीने आपल्या मातेला पुत्रसंतान नसल्याचे सांगितले आणि आपल्यालाही पुत्राची अपेक्षा असल्याचे सुचविले. भृगु ऋषि बोलले, "तुम्हां दोघींनाही पुत्र होतील. मी सांगतो तो उपाय श्रद्धापूर्वक करा. मासिक पाळीनंतर स्नानाने शुद्ध झाल्यानंतर परमेश्वराचे ध्यान करून तू पिंपळाच्या वृक्षाला जाऊन त्याची पूजा करावी आणि त्याला आलिंगन द्यावे. तसेच तुझ्या आईने ऋतुस्नानानंतर औदुंबराची पूजा करून त्याला आलिंगन द्यावे. यानंतर तुम्ही दोघींनीही ब्राह्मणांच्या मार्गदर्शनाने पुत्रकामेष्टि (पुत्रप्राप्तीच्या इच्छेने करावयाचा याग) करावी. ब्राह्मण तुला यज्ञांतील हवन केलेल्या भाताचा अवशेष (चरु) संस्कार करून तो ब्राह्म मंत्राने अभिमंत्रून तुला देतील. तो तू श्रद्धेने ग्रहण कर. तुला सर्व ब्राह्मणांत श्रेष्ठ, वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण पुत्र होईल; तो तिन्ही लोकांत पूज्य होईल. यज्ञांतील ब्राह्मण दुसरा चरु क्षात्र मंत्राने मंत्रून तुझ्या आईला देतील. तिने तो श्रद्धेने भक्षण केल्यावर तिला महान शूरवीर, सर्व पृथ्वीवर धाक गाजवणारा थोर क्षत्रिय पुत्र होईल यांत मुळीच शंका धरू नकोस! " याप्रमाणे सत्यवतीला सांगून भृगु ऋषी जवळच उभ्या असलेल्या ऋचीकांना बोलले, "तुम्ही उभयतां आतां तुझ्या सासुरवाडीला

जा. मी सत्यवतीला काय सांगितले ते तूं ऐकलेच आहे. त्यानुसार पुत्रकामेष्टि करून दोघींना चरूचा प्रसाद दे, म्हणजे दोघांचीही संतति वाढेल. " ६२ - ८८.

## पुत्रकामेष्टीच्या प्रसादांचा व्यत्यास.

वडिलाची आज्ञा घेऊन ऋचीकमुनि गाधी राजाकडे गेले. तिथे त्या दोघांनीही भृगु ऋषींच्या सांगण्याप्रमाणे यथासांग पुत्रकामेष्टी केल्या. यथाविधि मंत्रून दुधांत शिजवलेल्या भाताचे (चरु किंवा पायस)) हवन केल्यावर त्या पायसाचा प्रसाद घेतांना मात्र घोटाळा झाला. आईसाठी केलेला चरु सत्यवतीने खाल्ला आणि सत्यवतीचा चरु आईने खाल्ला. तिथे हे कुणाच्या ध्यानांत आले नाही. पण भृगुमुनींना हे अंतर्ज्ञानाने समजले. ते लागलीच तिथे आले आणि म्हणाले, "हे तुम्ही काय केले? प्रसादाची अदलाबदल झाली. आतां त्याच्या फळाची – पुत्राचीही अदलाबदल होणार! सूनबाई, तुझ्या पोटी आतां महाशूर क्षत्रिय येणार आणि तुझ्या आईच्या पोटी ब्रह्मर्षि येणार." सत्यवतीला हे ऐकून अत्यंत दुःख झाले. आपण विप्रपत्नी होऊनही आपल्या पोटी क्षत्रिय यावा हे तिच्या मनाला सहन होईना. ती रडायला लागली. म्हणाली, "मामंजी, मला वेदशास्त्रसंपन्न असा ब्राह्मणच पुत्र हवा आहे. तो तुमच्यासारखाच सूज्ञ, सर्वमान्य, सर्वज्ञानी व्हावा." भृगु मुनींनी तिला खूप समजावून सांगितले की आतां हे शक्य नाही. पण तिने पुनःपुन्हा त्यांचे पाय धरून करुणा भाकली. शेंवटी त्यांनी मंत्र फिरविण्याचे मान्य केले. पण "तुझा पुत्र ब्राह्मण झाला तरी नातू मात्र क्षत्रिय होईल" असे स्पष्ट केले. आपल्या कुलाला साजेसा ब्राह्मण पुत्र मिळावा म्हणून ते सत्यवतीने स्वीकारले. तिच्या आईने आणि गाधी राजाने विचार केला की आमच्या वंशात ब्राह्मण आला तर तो आपली कीर्ति वाढविणाराच असेल. ८८ - ९९

## जमदग्नि आणि विश्वामित्र यांचे जन्म.

पुत्रकामेष्टीच्या फलस्वरूप सत्यवती आणि तिचा माता दोघीही गरोदर झाल्या. त्यांच्या गर्भांच्या ब्राह्मणपणाचे सूचक असे डोहाळे त्यांना लागले. त्या दोघीही ब्रह्मज्ञानाचे निरूपण करूं लागल्या. स्वतः स्वामीमहाराजांच्या मातुःश्रींनाही असे डोहाळे लागल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत आहे. ही गाधी राजाला आनंदित करणारीच घटना होती. तीन महिने झाल्यावर पुंसवन संस्कार केला 'पुमान्सूयतेऽनेन पुंसवनं' ह्या संस्काराने पुरुष जन्माला येतो तो पुंसवन संस्कार. गर्भाधानाच्या नंतरचा हा महत्त्वाचा संस्कार होय. नऊ महिने पूर्ण झाल्यावर यथाकाळी दोघीही प्रसूत झाल्या. गाधी राजाने ब्राह्मणांना बोलावून जातकर्म (जन्माच्या वेळी करायचे संस्कार) केलें. ब्राह्मणांनी त्या दोन्ही बाळांचे जातक (भविष्य) वर्तविले की हे दोघेही ऋषि होतील. सत्यवतीच्या मुलाचे नांव जमदग्नि असे ठेवले. अत्यंत बुद्धिमान म्हणून त्याला सर्वत्र प्रसिद्धि मिळाली. पृथ्वीतलावर धर्मस्थापनेसाठी सत्यवतीच्या पावित्र्याने प्रसन्न होऊन प्रत्यक्ष भगवान शिवशंकरांनीच तिच्या उदरीं अवतार घेतला होता. गाधीचा पुत्र विश्वामित्र हा पुढे गायत्री मंत्राचा द्रष्टा म्हणून प्रसिद्धीला आला. क्षत्रियाच्या कुशीत जन्म घेतला तरी यज्ञाच्या पायसाच्या संस्कारांनी त्याच्या मनांत ब्राह्मण्याचे जन्मजात संस्कार दृढ होत. त्यामुळे त्याने ब्राह्मणत्व मिळविण्यासाठी प्रयत्न केले. सर्व ऋषींना त्याने आपल्याला ब्राह्मणांत समावेश करण्यासाठी विनवणी केली. त्यांनी सर्वांनी एकमताने हा निर्णय वसिष्ठांवर सोडला. वसिष्ठांकडून ब्राह्मण म्हणवून घेण्यासाठी विश्वामित्राने साठ हजार वर्षे तपश्चर्या करून ब्रह्मर्षित्व मिळविले ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा अठरावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय १९ वा.

राम धाकुटा पुत्र जमदग्नीचा। अवतार विष्णूचा। निरोप मानून पित्याचा। तोडी मातेचा गळा तो।।४०।।
त्या परशुरामें ख्याती केली। रेणुकेला वांचविली। पित्याची सेवा केली। एकुणिसाव्या अध्यायीं हें।।४१।।

## परशुरामाचा जन्म.

वेदधर्मा मुनि दीपकाला पुढील कथा सांगत आहेत. भगवान शंकारांनी अवतार घेतल्यावर माता जगदंबाही रेणू राजाच्या पोटी रेणुका नांवाने अवतरली. ती महान पुण्यवती कन्या बालपणापासूनच भगवान संकराच्या अनन्य ध्यानांत मग्न असे. मोठी झाल्यावर ती जमदग्नि हाच शिवशंकर आहे अशा पूर्ण श्रद्धेने त्यांच्या चरणकमलांचेच चिंतन करूं लागली. तिने आपला जमदग्नीशींच विवाह करण्याचा निश्चय आपल्या पित्याच्या कानांवर घातला. त्यानेही जमदग्नींची कीर्ति ऐकली असल्याने आनंदाने त्यांना पाचारण करून आपल्या कन्येचे त्याला विधियुक्त दान दिले. साक्षात पार्वती असलेल्या रेणुकेला अत्यंत आनंद झाला. ती आपल्या पतीसह त्याच्या आश्रमांत जाऊन राहिली व मनोभावाने व प्रेमाने त्याची सेवा करूं लागली. जमदग्नींनी अग्निहोत्र घेऊन तपश्चर्येला आरंभ केला. रेणुकेने पतीच्या मनाला अनुकूल आचरण करून पातिव्रत्याचा आदर्शच उभा केला. यथाकाल त्यांना चार पवित्र आणि पित्यासारखे तेजस्वी पुत्र झाले वसु, वसुमंत, सुषेण आणि विश्वावसु अशी त्यांची नांवे ठेवण्यात आली. त्यानंतर देवांना दिलेल्या वराप्रमाणे भक्तकैवारी, अजन्मा परमात्मा रेणुकामातेच्या उदरांत प्रकटला. वैशाख शुद्ध तृतीयेला, सिंह लग्नावर, माध्याह्नकाळी भगवान विष्णूंनी भार्गवराम नांवाचा हा सहावा (सत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह आणि वामन या पांच अवतारांनंतरचा) अवतार धारण केला. पुढचे राम, कृष्ण, बौद्ध आणि कल्कि हे चार धरून भगवान विष्णूंचे मुख्य दशावतार होतात. श्रीमद्भागवतांत चौवीस अवतारांचेही वर्णन आहे. याशिवायही अनेक अवतार क्वचित् प्रकट, क्वचित गुप्त असे झाले आहेत आणि होणार आहेत असे पुराणाचे प्रतिपादन आहे. भृगूच्या वंशांतला म्हणून भार्गवराम म्हटले आहे. हा परशु धारण करतो म्हणून याला परशुराम असेच मुख्यतः ओळखले जाते. १ - १०.

## परशुरामाचे विद्याध्ययन.

भृगु मुनींच्या वचनानुसार सत्यवतीचा हा नातू क्षत्रिय स्वभावाचा झाला. विधिपूर्वक ब्रह्मचर्याश्रम स्वीकारल्यावर याने वेदशास्त्रांचा अभ्यास केला खरा, पण नंतर तपश्चर्येने भगवान शंकारांना प्रसन्न करून घेऊन त्यांच्याकडून धनुर्वेदाचे शिक्षण घतले आणि तो शस्त्रास्त्रांत पारंगत झाला. शस्त्रे म्हणजे गदा, तरवार, परशु इत्यादि आयुधे. अस्त्रे ही मंत्रांसारखी असतात. यांच्या प्रयोगाने शस्त्रांत अदभुत सामर्थ्याचा संचार करतां यतो. अग्नि, वायु, पर्जन्य इत्यादि अस्त्रांच्या प्रयोगांनी त्या त्या महाभूतांची संहारक शक्ति त्या त्या अस्त्रांत संक्रमित होते. पुढे द्वापर युगांत गंगामातेने आपला पुत्र भीष्म याला परशुरामाकडूनच ही विद्या देवविली होती. अशा रीतीने शस्त्रास्त्रविद्या ग्रहण करून परशुरामाने भगवान शंकरांची आज्ञा घतली आणि तो आपल्या पित्याच्या आश्रमांत परत येऊन आईवडिलांच्या सेवेत निमग्न झाला. श्रीहरींचाच तो अवतार असल्याने विवेकशील आणि सेवेत तत्पर होता. सर्व ऋषीजन त्याला मानत असत. रोज वनांत जाऊन समिधा, फुले, फुळे इत्यादि वडिलांना आणून देऊन सदैव

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

त्यांच्या आज्ञेचे तो पालन करीत असे. त्याचे चारही भाऊ असेच पितृसेवातत्पर होते. त्यांच्या सहकार्याने जमदग्नि आपले अग्निहोत्राचे व्रत उत्तम प्रकारे चालवीत होता. ११ – १७.

## रेणुकेला गंधर्वराजाच्या शृंगाराचे दर्शन.

एकदां नित्याप्रमाणे रेणुका पतिस्मरण करीत स्नानासाठी एकटीच नदीवर गेली. त्याच वेळी एक गंधर्वांचा राजा (कांही पुराणात याला चित्ररथ म्हटले आहे) आपल्या अनेक स्त्रियांसह नदींत क्रीडा करीत असलेला तिला दिसला. गंधर्व ही एक देवयोनि आहे. विद्याधर, अप्सरा, यक्ष, राक्षस, गन्धर्व, किन्नर, गुह्यक, सिद्ध, पिशाच आणि भूत या दहा योनी आहेत असे अमरकोशांत म्हटले आहे. (१:१:११). हे पृथ्वीतलावर बहुधा पहांटेच्या वेळी, नदी, तलाव इत्यादि जलाशयांजवळ क्रीडेसाठी येतात असे म्हणतात. ह्या गंधर्वराजाची त्याच्या स्त्रियांसह चाललेली ती उत्तान कामक्रीडा रेणुकेच्या दृष्टीस पडली. त्यांच्या सुंदर, आकर्षक आणि चंदन, कस्तुरी इत्यादींनी माखलेल्या देहांवर दिव्य वस्त्रे पांघरलेली होती, नंदनवनांतल्या सुगंधी फुलांचा घमघमाट भ्रमरांना आकर्षित करीत होता, त्या सुकुमार गंधर्वस्त्रियांनी दिव्य रत्नजडित अलंकार घातले होते आणि त्यांच्यासह तो गंधर्वराज मदाने मस्त झालेल्या हत्तीसारखा विहरत होता. ते मनमोहक, लोभसवाणे दृश्य पाहून पतिव्रताशिरोमणि रेणुकेचेही मन किंचित् काळ तिथे गुंतले. त्या स्वर्गीय सुखाचा तिला हेवा वाटला आणि थोडा वेळ ती भारावलेल्या मनाने त्याकडे पहातच राहिली. दैवाची विचित्र गति पहा कशी असते! आदर्श पतिव्रता म्हणून जिची त्रैलोक्यांत ख्याति होती, जिने स्वप्नांतही परपुरुषाचे चिंतनही केले नाही, जी आपल्या पातिव्रत्याने ती वस्त्रांत पाणी भरून आणायची. ते मुळीसुद्धा गळत, झिरपत नव्हते, अशा सतीला त्या परपुरुषाचा शृंगार भावावा? ती त्या दृश्याकडे पहात असतांच एकदम तिने वस्त्रांत भरलेले पाणी गळून गेले. त्यावरून आपल्या पातिव्रत्याला न्यूनता आली हे तिने ओळखले आणि तिला एकदम आपल्या अपराधाची जाणीव झाली, तिच्या छातीत धडकी भरली. ‘आपण हे काय केले? असल्या उत्तान शृंगाराकडे माझे डोळे वळलेच कसे? अशा विचारांनी ती व्याकुळली. आपला सर्वज्ञ पति आतां खचितच आपला त्याग करील! मग माझी काय गति होईल?’ आपल्याला दुर्गतीला नेणाऱ्या फुटक्या नशिबाला बोल लावीत ती आपल्या पतीचा कोप न व्हावा म्हणून देवाची करुणा भाकूं लागली. अशी ती भयभीत, राजकन्या थरथर कांपत, डोक्यावर घड्यांत पाणी घेऊन आश्रमात परतली. १८ - ३१.

## पातिव्रत्य धर्म.

या ठिकाणी आपल्या मनांत साहजिकच असे येईल की दैवशात् अचानक समोर आलेल्या गंधर्वांच्या शृंगाराकडे पाहिल्याने पातिव्रत्याचा कसा काय भंग होऊं शकतो? त्यासाठी पातिव्रत्य हा विषय आपण नीट समजून घ्यायला हवा. पतीशी एकनिष्ठता हा अर्थ सकृद्दर्शनी दिसतो. पण पातिव्रत्य धर्माचा जरा सखोल विचार केला पाहिजे. तो सनातन वैदिक धर्माचा एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. प.प.श्री टेंबेस्वामीमहाराज म्हणतात की वैदिक धर्म योगारूढ आहे. म्हणजेच या धर्माला योगशास्त्राचे अधिष्ठान आहे. ह्या धर्माचे आचार, व्यवहार आदि योगशास्त्राच्या प्रयोगसिद्ध तत्त्वांवर आधारलेले आहेत. स्त्रियांना पतिव्रताधर्म हाच एक मोक्षाचा मार्ग असे वैदिक धर्माचे प्रतिपादन आहे. वैदिक धर्मात निर्दिष्ट सर्व धर्मांप्रमाणे याही धर्मांत व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीला प्राधान्य आहे. वैयक्तिक – विशेषतः .सांसारिक सुख गौण मानलेले आहे. जीवांची आध्यात्मिक प्रगती अनेक जन्मांच्या धर्माचरणाचा परिपाक असते. जीवाच्या वासनांची पूर्ति हे कांही अंतिम उद्दिष्ट नाही. पण त्यांची पूर्ति अगदीच दुर्लक्षितही नाही. जीवांच्या मनांतील धर्मानुकूल काम ही आपलीच विभूति आहे असे

भगवद्वचनच आहे. जीवाच्या वासनांच्या पूर्तीला धर्माच्या मर्यादांत वाव देऊन, त्याची यमनियमांची बैठक स्थिर करायची हा धर्माचा हेतू आहे. एकदा हा योगाचा पाया पक्का झाला की त्याला आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा ह्या पायऱ्यांनी ध्यानाच्या भूमिकेवर चढतां यावे हेच धर्माच्या आज्ञांचे उद्दिष्ट आहे. ह्या पायऱ्या ओलांडण्यासाठी अनेक मानवी जन्म लागतात. (अनेकजन्मसंसिद्धस्ततो यांति परां गतिम्। भ.गी. ६:४५) जसा जसा जीव वरच्या पायऱ्या ओलांडतो तसा तसा तो भौतिक सुखापासून विरक्त होत जातो. प्रत्याहार म्हणजेच इंद्रियांपासून मनाला परत खेंचणे. असे निरुद्ध मन ध्यानांत प्रवाहित केल्यावर ऐंद्रिय सुखांचा विक्षेप त्याच्या आध्यात्मिक सुखाला घातक ठरू शकतो. पतंजलींनी ध्यानासाठी विविध आलंबनांचा निर्देश केला आहे. पतिव्रतेसाठी पति हेच आलंबन आहे. तिचे मन अव्याहतपणे, अनन्यतया पतीकडेच प्रवाहित झाले पाहिजे. ही तिची ध्यानमग्नता, उठतां, बसतां, काम करतां, सर्व अवस्थांत टिकली पाहिजे. ध्यान हे एका ठिकाणी बसून शरीर निश्चल ठेवूनच करतां येते असे नाही. तिथे मनाच्या स्थिरतेला महत्त्व आहे. रेणुका, सीता, अनसूया, सावित्री इत्यादि जी पातिव्रत्याची उदाहरणे आपण पुराणात वाचतो त्यांची योग्यता फार वरची होती. त्यांनी पतीच्या निरंतर, अव्यभिचारी, अनन्य ध्यानाने आपल्या चित्तवृत्ती शांत केल्या होत्या. इंद्रियांचा निग्रह करून प्राण आणि मन यांच्या सामर्थ्याचा संचय केला होता. धरणात जसे पाणी अडवून पाण्याचा संचय करतात. मग त्या पाण्यापासून वीज निर्माण करतां येते. त्याप्रमाणेच पतिव्रतेच्या संकल्पात महाभूतांवरच काय काळावरही मात करण्याचे अमोघ सामर्थ्य असते. अशा निरुद्ध चित्ताला एक विक्षेपही खपत नाही. धरणाच्या भिंतीला बारीकसा तडाही जसा खपत नाही तसा! पांढऱ्या शुभ्र स्वच्छ वस्त्रावर जसा इवलासा काळा डागही खपत नाही तसा! आम्लाच्या थेंबाच्या अंशानेही दुधाची गोडी नासावी तसे या विक्षेपाने पतिव्रतेची तपश्चर्या भंग पावूं शकते. हेच रेणुकामातेच्या संदर्भात इथे झाले आहे.

इथे आपण सर्वांनीही थोडा धडा घेतला पाहिजे. रेणुकेसारख्या महान पतिव्रतेने गंधर्वराजाचा शृंगार कांही क्षण पाहिल्याने तिच्या निष्ठेला आघात पोहोंचला. आपण कलियुगांतील जीवांनी तर आपल्या निष्ठांना किती जपायला हवे? दूरदर्शनच्या माध्यमातून कलियुगांतील आधुनिक गंधर्वांचे शृंगार आपण सहकुटुंब सहपरिवार पहात असतो. त्याचे आपल्या मानसिक स्वास्थ्यावर, जीवननिष्ठांवर किती आघात होत असतील हा खरेच अस्वस्थ करणारा विचार आहे. पुढच्या पिढीवर आपण काय संस्कार करीत आहों याचा आईवडिलांनी विचार केला पाहिजे. दूरदर्शनवरच्या श्रांगारिक संगीताचे आणि कामुक नृत्यांचे अनुकरण करणाऱ्या मुलांचे आपण किती कौतुक करतो! त्यांना स्पर्धेत भाग घ्यायला उत्तेजन देतो आणि त्यांच्या त्या यशाचा उदो उदो करतो. आपल्या राष्ट्राची नीतिमत्ता ढांसळत असल्याची, समाजाची बांधणी खिळखिळी होण्याचीं, पर्यायाने माणसांतल्या माणुसकीचाच लोप होत असल्याची कारणे इतर कुठे शोधायची गरजच नाही.

## जमदग्नींचा क्रोध.

रेणुका घरासमोर येतांच तिला दारांतच उभे असलेले, नांवाप्रमाणे धगधगत्या अग्नीसारखे जमदग्नि ऋषि दिसले. त्यांनी रेणुकेला पाहतांच सर्व प्रकार त्यांच्या ध्यानांत आला. 'ही आपल्या धैर्यापासून ढळली आहे, हिच्या पातिव्रत्याला उणेपणा आला आहे, त्यामुळेच ती आपले ब्राह्म तेज गमावून दीनवाणी झाली आहे,' हे त्यांनी ओळखले. ते एकदम संतापून रेणुकेचा धिक्कार करीत म्हणाले, "यापुढे तूं तुझे तोंड मला दाखवूं नको. ह्या घराचे दार तुला आतां बंद झाले आहे! हे राजकन्ये! मी बोलून चालून वनांत राहणारा, वलक्ले नेसणरा, अंगाला राख फांसणारा एक दरिद्री ब्राह्मण आहे! आमचा कंदमूळांचा आहारसुद्धां आम्हांला रोज नियमित मिळेलच याची शाश्वती नाही.

तुझ्या केसांत माळायला जाई, जुई, चांफा, बकुळी अशी फुले तुला इथे स्वप्नांतही मिळणार नाहीत. इथे पाषाणाचेच पलंग-बिछाने आणि धुळीचेच अंगलेप! अशा ह्या आश्रमांत राहणे तुला फार कष्टाचे होईल. होमाचा धूर तुझे डोळ्यांतून घळघळां पाणी वाहवील. तू कसे हे कष्ट सोसशील? जिथे तुला सुख वाटेल तिथे मौजमजा करायला तू खुशाल जा! एखाद्या राजाचा हात धरलास तर तुला चांगलेचुंगले खायला मिळेल, उंची वस्त्रे ल्यायला मिळतील, अलंकारांनी नटशील, डोक्यावर पाणी वाहावे लागणार नाही. राजाची राणी होशील तर सुखी होशील. इथे कशाला येतेस? तेव्हा आतां तू हा उंबरठा ओलांडूं नकोस, परत फिर! आतां मला तुझा वाराही नकोसा झाला आहे. कोण तुझा प्रियकर असेल त्यांच्या मागे जा. पत्नीसाठी पत्नी प्रिय नसते तर आत्म्याच्या कामनेनेच ती प्रिय होते. सर्व कांही स्वतःवरील प्रेमानेच प्रिय होते हे उपनिषदांचे वचन सत्यच आहे. तुझ्या मनांतून मी उतरलो आणि तुला परपुरुषाची ओढ वाटली, तेव्हांच आपले नाते तुटले. परपुरुषाच्या प्रीतीने भारलेल्या स्त्रीचा त्याग करावा हे सूज्ञांचा सल्ला योग्यच आहे. तरी आतां तूं इथून जा आणि तुझ्या प्रियकराबरोबर रहा. हे मी मनापासून निक्षून सांगतो आहे. " ३१ – ४७.

जमदग्नींचा हा राग त्यांच्या नांवाशी कायमचा जोडला गेला आहे. पण खरे तर हा राग त्यांनी आपल्या पत्नीच्या कल्याणासाठीच धारण केला होता. आपल्या पत्नीच्या पातिव्रत्यावरचा कलंक त्यांना कायमचा, पूर्णपणे पुसून टाकायचा होता. त्यासाठी हा क्रोध आवश्यक होता. जमदग्नि हे अत्यंत विवेकी, शांत आणि स्थिरचित्त योगी होते. ह्या प्रसंगी ते क्रोधवश झाले असे भासत असले तरी तो क्रोध त्यांनी धारण केला होता आणि पूर्णपणे त्यांच्या ताब्यांत होता असेच अनुमान पुढील घटनांवरून काढावे लागेल.

## रेणुकेचा वध.

आपल्या तपस्वी पतीच्या ह्या कोपाने रेणुकेचा भयकंप अधिकच वाढला. तिची मति खुंटली आणि वाचाही बसली. डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहूं लागले आणि सर्वांगाला घाम सुटला. वस्त्रे ओली चिंब झाली. अंगाची लाहीलाही होऊन तिच्या अंगांत एक पाऊल टाकायचीही शक्ति राहिली नाही. तिचा धीर पार सुटला, चेहरा सुकून गेला आणि ती लाकडाच्या पुतळीसारखी जागच्या जागींच स्तंभित होऊन दारांतच उभी पाहिली. ती जागची हलत नाही असे पाहून ऋषींचा कोप अधिकच वाढला. तिचा उपमर्द करीत ते ओरडले, "आतां तूं इथून जातेस की नाही. माझा राग तुला ठाऊक नाही. आतां जर तूं गेली नाहीस तर मी तुझा प्राण घेईन!" रेणुकेने मनांत विचार केला की, 'आपल्या हातून एक अपराध झाला आहेच. आतां पतीचे चरण सोडून जाण्याचा दुसरा अपराध करायला नको. काय बरे-वाईट व्हायचे ते इथेच होऊं देत! पतीने ठार मारले तर आयती पापाची धुणी होईल आणि पुढची दुर्गती तरी टळेल.' अशा निश्चयाने उभ्या असलेल्या आपल्या पत्नीला पुनःपुन्हा सांगूनही ती जात नाही असे पाहून जमदग्नींनी आपला वडील मुलाला- वसुमंताला, बोलावून घेऊन अत्यंत क्रोधयुक्त वाणीने सांगितले, "वसुमंता, ह्या तुझ्या आईने पाप करून मला संतप्त केले आहे. ताबडतोब तिची मान कापून टाक. मुळीच अनमान करूं नकोस!" वसुमंताने हे पित्याचे भयंकर बोलणे ऐकून त्याचे पाय धरले आणि काकुळतीने विनवणी केली, "बाबा! आपण शांत व्हा! एवढा क्रोध बरा नाही. आईपरते दैवत नाही असे धर्मग्रंथांत लिगिले आहे.. ह्या मातेची हत्या मी केली तर मला आक्षय नरक भोगावा लागेल!" हे मुलाचे बोलणे जमदग्नींना अन्यायाचेच वाटले. 'मला शास्त्र शिकविण्याइतका हा शहाणा झाला काय?' असा विचार करून मुनी वसुमंताला म्हणाले, "अरे! पिता जिवंत असतांना त्याच्या वचनाचे पालन करण्यांतच पुत्राचे पुत्रत्व आहे, हे तूं जाणत नाहीस काय? त्या शास्त्राज्ञेचे तूं उल्लंघन केले आहेस. यासाठी तुला

मी भस्म करीत आहे.” ही शापवाणी उच्चारून जमदग्नींनी आपल्या पुत्रावर एक ज्वलंत रोषपूर्ण कटाक्ष टाकला मात्र, तो जळून राख झाला. मग ऋषींनी आपल्या दुसऱ्या मुलाला वसूला हांक मारली आणि त्वरित आपल्या आईचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली. वसू उत्तरला, “बाबा, पित्याच्या शतपट माता श्रेष्ठ आहे असे शास्त्रवचन असतां मी हे साहस कसे करूं?” “तर मग जा आपल्या मोठ्या भावाच्या वाटेने!” असे बोलून जमदग्नीने त्यालाही भस्मसात केले. त्यानंतर विश्वावसू आणि सुषेण हेही अशाच प्रकारे जमदग्नींच्या क्रोधाचे बळी झाले. चौघेही आपले न ऐकतां जळून गेले याचा जमदग्नींना खेद वाटला. ते धाकटा मुलगा राम वनांतून येण्याची वाट पाहूं लागले. तेवढ्यांत परशुराम वनांतून समिधा घेऊन आला. त्या आपल्या लाडक्या मुलाला पाहतांच जमदग्नी म्हणाले, “मी काय सांगतो ते ऐक! ह्या तुझ्या आईने महापाप केले आहे. उचल तो परशू आणि कापून टाक तिची मान! ह्यानेच माझ्या मनाला समाधान वाटेल.” ही पित्राज्ञा ऐकतांच क्षणाचाही विचार न करतां परशुरामाने परशूच्या घावाने आईची मान उडवून दिली! त्या परशुरामाच्या मनाचे काठिण्याचे काय वर्णन करावे? आईचे डोके उडवायला वडिलांनी सांगितले तरी ज्याचे मन थोडेसुद्धा विरघळले नाही. त्याची छाती दगडाची म्हणावी की लोखंडाची? पुढे त्याने पृथ्वी निःक्षत्रिय केली ह्याचे काय आश्चर्य? मातेचा शिरच्छेद करतांना जो थोडाही डगमगला नाही त्याचे धैर्य कधीतरी मावळेल काय? **झट्दिशीं परशु मारूनी। चट्दिशीं मान तोडूनी। पट्दिशीं टाकिली पाडूनी। खट्दिशीं मेदिनीवरी पडे।। ७७।।** ह्या ओंवींत अनुप्रास तर आहेच पण त्या प्रसंगाचे चित्र डोळ्यांसमोर उभे करीत परशुरामाच्या असाधारण धारिष्ट्याचे वर्णन असल्याने स्वभावोक्ति नांवाचा अर्थालंकार होतो. ४८ - ७७.

## रेणुकामातेचे पुनरुज्जीवन.

रामाच्या परशूने रेणुकामातेचे शिर धडापासून वेगळे होऊन तुटून पडले. धडही भूमीवर पडून त्यांतून भळभळां रक्त वाहूं लागले; पण रामाच्या डोळ्यांत न पाणी होते न त्याचा कंठ दाटला होता. हे त्याचे शौर्य पाहून आणि त्याच्या मनांतले पितृभक्तीची थोरवी जाणून हा खरा आर्य आहे असे वाटून जमदग्नि शांत झाले. त्यांनी रामाला गळ्याशी धरून त्याची पाठ थोपटली आणि म्हणाले, “तुझा पितृवचनावरचा परिपूर्ण विश्वास बघून मी प्रसन्न झालो आहे. मातृप्रेम, पाप-पुण्याचा संभ्रम, शास्त्रवचन असा कुठलाच विकल्प मनांत न येऊं देतां तू माझी आज्ञा पाळलीस त्याने मला फार आनंद झाला आहे. तू त्रैलोक्यांत सर्वमान्य होशील! तुला हवा तो वर मागून घे!” तेव्हां साक्षात् शिवस्वरूप अशा आपल्या त्या पित्याला अभिवादन करून राम म्हणाला, “बाबा, आधी माझ्या आईला आणि चारी भावांना जिवंत करा! तसेच मी चिरंजीव व्हावे आणि मातृवधाची स्मृति माझ्या चित्तांत नसावी. मी अजिंक्य व्हावे आणि माझा सर्वत्र विजय व्हावा.” जमदग्नींनी प्रसन्नपणे “तथास्तु!” म्हणतांच रामाने आईचे डोके धडाला चिकटवले आणि ती उठून बसली. तसेच चारी भाऊ पुन्हां जिवंत झाले. परशुरामाला आनंद झाला. ७८ - ८६.

परशुरामाचे मन कठोर होतेच. पण इथे त्याच्या आपल्या पित्याविषयींचा, त्याच्या विवेकावरचा आणि त्याच्या अलौकिक तपःसामर्थ्यावरचा विश्वास अधिक महत्त्वाचा आहे. तसेच कांही कारण असल्याशिवाय आणि परिणामांची पूर्ण कल्पना असल्याशिवाय आपले वडील आपल्याला अशी आज्ञा करणार नाहीत ह्याची रामाल मनोमन खात्री होती. ते क्रोधाच्या आहारी जाऊन आपल्याला मातृवधाला प्रवृत्त करतील असे त्याला वाटलेच नव्हते. आणि क्वचित् तशी संभावना मानली तरी त्यांचा क्रोध शांत झाल्यावर ते आपल्या तपःसामर्थ्याने आईचे पुनरुज्जीवन करतील याविषयींही त्याला शंका नव्हती. हाच त्याच्यांत आणि त्याच्या मोठ्या भावांत महत्त्वाचा फरक होता. धर्म आणि अधर्म यांच्यातील

मर्यादा कधीकधी फार अस्पष्ट होतात त्यावेळी सकृद्दर्शनी वाटणारा धर्मच अधर्म ठरतो आणि अधर्मच धर्म असे महर्षि व्यासांनी महाभारतांत म्हटले आहे. परशुराम हा विष्णूंचा अवतारच होता त्यामुळे त्याला त्याच्या भावांसारखा संभ्रम झाला नाही.

## जमदग्नींच्या क्रोधाचे प्रयोजन.

जमदग्नी ऋषींचा राग प्रसिद्धच आहे. पण आपण पुढे जे त्यांचे चरित्र पाहणार आहोंत त्यात ते अत्यंत विवेकी, धर्मज्ञ आणि प्रशांतचित्त दिसून येतात. त्यांच्या क्रोधाचे प्रयोजन आपल्या पातिव्रत्यापासून स्खलन पावलेल्या पत्नीचा उद्धार हेच होते. देहांत प्रायश्चित्ताशिवाय हे शक्य नव्हते. आपल्या कठोर शब्दांनी आणि तिचा त्याग करूनही तिच्या चित्ताचे मालिन्य पूर्णपणे दूर न झाल्याने तिचा वध करविणे त्यांना आवश्यक वाटले. हे त्यांच्या चार मोठ्या मुलांच्या लक्षांत आले नाही. पण भगवंताचा अवतार असलेल्या रामाने ते जाणले. रेणुकेचा देहपात झाल्यावर ती निर्दोष होऊन पातिव्रत्याच्या उच्च भूमिकेवर पुन्हा आरूढ झाली. अर्थातच आतां क्रोधाचे प्रयोजनही संपले आणि जमदग्नी शांत झाले.

## रेणुकेचा मनाला उपदेश.

अशा रीतीने आपली माता उठल्यावर रामाने प्रेमादराने तिचे पाय धरले. त्याला मायेने जवळ घेऊन रेणुकामातेने आशीर्वाद दिला. तिने त्याला सांगितले की “बाळा! तू मनांतकसलाही खेद धरू नकोस. माझ्यावर हा अनुग्रहच झाला आहे. हे माझे उदाहरण ज्या स्त्रियांना पातिव्रत्याची जोपासना करायची आहे त्यांनी लक्षांत ठेवावे. चित्तवृत्ती थोड्याही पतीला सोडून इतरत्र गेल्या की ही गति ओढवेल! ” यानंतरच्या ओंव्यांतून कामासक्त मनाला उपदेश केला आहे. ‘हे कामाकडे ओढ घेणाऱ्या मना! तूं खरोखर आम्हां सत्प्रवृत्तांच्या अधःपाताला कारण होतोस. तुझा धिक्कार असो! अजूनतरी (एवढ्या भयंकर प्रसंगांतून गेल्यावर तरी) कामापासून उपरत हो! काम हा मुळांतच चावट आहे. भल्याभल्यांचा – ब्रह्मदेवासारख्या देवांचा आणि विश्वामित्रांसारख्या ऋषींचा, ह्याने घात केला आहे. त्रैलोक्यांत साधुसंतांनाही अधःपाताच्या गर्तेत टाकणारा हा काम त्रिभुवनांत सर्वांत मोठा ठक आहे. हे चित्ता, अध्यात्ममार्गावरच्या पांथिकांचे सत्त्व लुटणाऱ्या ह्या चोराला मुळीच थारा देऊं नकोस. थोडासा सदसद्विवेक केलास तर तुला कळेल की मनांत उद्भवणाऱ्या कामनाच आपल्याला आपल्या ध्येयापासून, परमात्मरूपापासून दूर करतात. आपण आपल्या मनातील इच्छा जितक्या प्रमाणांत कमी करूं तितके आपण परमात्मस्वरूपाच्या जवळ जाऊं. कामना जर ठेवायचीच असेल तर, पतीचे चरण हेच ब्रह्मरूप आहेत ह्या दृढ भावाने त्यांच्या सेवेचीच ठेव. पतिसेवेचा कामच तुला निष्काम करील. आणि आपल्या स्वरूपांतच तूं रमशील. याहून वेगळा कामाचा उपशम नाही. हेच तुझे साध्य आहे.’ असे आपल्या मनाची समजूत घालून रेणुकेने त्याला पतिभजनाकडे प्रवृत्त केले आणि त्यांतच ती रात्रंदिवस रमून गेली. ८७ - ९६.

रेणुकामातेने आपल्या मनाला केलेला उपदेशाचे सर्वांनीच आपल्या मनाला केला पाहिजे. अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारले की माणसाला त्याच्या मनाविरुद्ध पाप करायला कोण बळजबरीने प्रवृत्त करतो? त्यावर भगवान म्हणतात ,”रजोगुणापासून उद्भवलेला हा काम, हाच क्रोध होतो. हा मोठा खादाड आणि महापापी आहे. हाच खरा वैरी आहे आणि माणसाला पाप करायला भाग पाडतो. ” (भगवद्गीता ३:३६-३७) आपल्या स्त्रीशिक्षा ग्रंथांत कामशमन या पदांत श्रीस्वामी महाराज सांगतात -

हा राजस खादड पापी । **वैरी** हा पहा बहुरूपी ।।

हा घालिल **तुज**ला टोपी ।। दुः**पूर**चि हा जग चेपी ।।
चाल ।। हा विद्व**द्वर्या** लोपी । हा **तुम**चीं **पुण्ये** कापी ।
हा **तुम**ची **थोरी**व दडपी । कोपरूपी **रोखी** हा करटा।।४।।
**इंद्रिये** आणि मन मति हे । तिनही किल्ले असति ग तूं हे ।
ठेवि स्वाधिन आन न पाहे । रंगरूपा नको **भुलूं मोहे**।।
।। चाल.।। दुजा शत्रु कामसम **नोहे** । हा **तुज**ला **देइल पोहे** ।।
तस्मात्त्वं जत्यबले हे । हरीभक्त्या हि बलिष्ठा।।५।।

रजोगुणापासून जन्मलेला हा काम अतिशय खादाड आणि दुष्पूर म्हणजे कितीही भोग दिले तरी तृप्त न होणारा. महाभारतांत ययातीने म्हटल्याप्रमाणे उपभोगाने काम शांत होत नाही. उलट तूपाची आहुती दिलेल्या अग्नीसारखा आणखीच भडकतो. काम हा बहुरूपी आहे. तो कधी कोणत्या रूपाने मोहवील ते सांगतां येत नाही. त्यासाठी परपुरुषाचा (किंवा पुरुषाला परस्त्रीचा) संग त्याज्य आहे. आधुनिक मानसशास्त्राचाही सिद्धांत आहे कीं हा काम (sexual impulse) आपल्या नकळत (subconscious) मनांत कार्यशील असतो. तो जाग्रत मनांत पोहोंचेपर्यंत इतका बलवान झालेला असतो की माणसाचा विवेक त्यापुढे टिकूंच नये. म्हणूनच तो जगांत सर्वांनाच आपल्या मुठीत ठेवतो. मोठमोठ्या विद्वानांचे शहाणपण ह्याच्यापुढे मावळते. हा आपल्या पुण्यांचा क्षय करतो आणि आपल्याला नैतिक उंचीवरून खाली खेंचतो. कोपाच्या रूपाने हाच आपल्या आध्यात्मिक वाटा अडवतो. ह्याचा प्रतिकार करायला आपण आपली इंद्रिये, मन आणि बुद्धि ताब्यांत ठेवली पाहिजेत हे जणूं तीन किल्लेच आहेत बाह्य सौंदर्याला आपण भुललो की इंद्रियांचा किल्ला पडला असे समजावे. त्या सौंदर्याचे चिंतन व्हायला लागले की मनाचा किल्ला काम नांवाच्या शत्रूने जिंकला असे ओळखावे. जेव्हां विषयाचे चिंतन तीव्र होते आणि आपली विचारशक्तीच बोथट होते तेव्हां बुद्धीचा बालेकिल्ला जिंकून कामाने आपल्याला विनाशाच्या गर्तेत ढकलून दिलेले असते. भगवद्गीतेतील पुढील श्लोकांचे वारंवार चिंतन केवे पाहिजे. ध्यायतो विषयान् पुंसः संगस्तेषूपजायते। संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते। क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः। स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति।। (भ.गी.२:६२-६३). विषयांच्या ध्यानाने कांम, कामाचाच क्रोध आणि त्यापासून संमोह, संमोहाने स्वरूपाचा विसर, स्मृतीचा लोप झाला की सदसद्विवेकबुद्धीचा नाश आणि बुद्धीच्या नाशाने सर्वनाश, अशी ही अनर्थपरंपरा कामाच्या आहारी गेल्याने ओढवते. अशा ह्या बलाढ्य कामहीच आपल्याला रेणुकामातेची शिकवण आहे.

यानंतर रेणुकेने आपल्या पतीचे चरण धरले आणि आपल्याकडून दुर्वासनेमुळे घडलेल्या परपुरुषाचा शृंगार पाहण्याच्या पापाचे शमन केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. “ माझ्या स्खलनाने हा महान अनर्थ झाला होता. आपण माझ्या पापाला धुवून टाकणारे हे देहांत प्रायश्चित्त देऊन आपण खरोखरीच माझ्यावर मोठी कृपा केली आहे. हा तुमचा कोप नाही तर उत्तम अनुग्रहच आहे. माझ्या पश्चात्तापाच्या आगीत माझे पाप जळून मी निष्पाप झाले आहे हा आपला मोठाच उपकार आहे. आपल्या कारुण्याला आणि दयालुत्वाला तोड नाही! आपल्यासारखा परोपरीने पत्नीला सांभाळून घेणारा, तिचा सन्मार्गावर स्थिर करणारा पति लाभला हे खरोखरच माझे महद्भाग्य आहे. आपण जो कठोरपणे मला उपदेश केला तो त्या वेळी विषासारख्या वेदना झाल्या तरी परिणामी मला अमृतासारखा देवत्व देणारा आहे. जन्मोजन्मी ह्याच पतिचरणाची सेवा लाभावी हीच माझी कामना आहे. पति हेच व्रत असणाऱ्या आम्हा स्त्रियांना पतीशिवाय कोण तारणार? आमचे इहपरलोकांचे कल्याण पतिसेवेतच आहे.” अशा नम्र आणि मधुर शब्दांनी रेणुकेने पतीचे मन प्रसन्न केले. जमदग्नींनीही आपल्या पत्नीच्या शुद्ध मनाची

ग्वाही दिली. अशा रीतीने रेणुका आणि जमदग्नि यांच्यात पहिल्यापेक्षांही अधिक प्रेम वाढले आणि ते आनंदाने नांदू लागले. रेणुकेला जमदग्नी हेच ब्रह्म होते. दोघांचीही मने एक झाली होती. ९७ - १०४.

साक्षात् विष्णुरूप परशुराम निष्कामपणे. शिव-पार्वतीस्वरूप आपल्या मातापित्यांची सेवा करीत होते. आपल्या संपूर्ण ऐश्वर्यासहित अर्जुनाला दिलेला वर सिद्ध करण्यासाठी भूमीवर विप्रकुलांत अवतरलेले नारायण होते. गाय नेल्याच्या निमित्ताने कार्तवीर्य अर्जुनाशी युद्ध करून त्याचा रणांगणांत वध करून परमपदाची प्राप्ती करून देतील,

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकोणिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

**बोध दत्तमाहात्म्याचा.**

**डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.**[1]

**अध्याय २० वा.**

**देव यन्महत्व ठेविती। त्या दैवाची केली स्तुती। मुनिगृहीं ये भूपती। आतिथ्य करी मुनि त्यांचें।।४२।।**
**राजा विधिवशें भुलुन। चाले धेनूस घेऊन। त्यावरी धांवें भृगुनंदन। हें कथन विसाव्यात।।४३।।**

# अनिवार्य दैवगति.

वेदधर्मा गुरूंना दीपकाने विचारले, “महाराज! कार्तवीर्य अर्जुनाजवळ सर्व सिद्धींची समृद्धि होती. शिवाय तो ब्राह्मणांचा भक्तही होता. तो तर मोठा दानशूर होता. अशा त्या राजाला गाय, आणि तीही ब्राह्मणाची, का चोरावी वाटली? मला हे अगदीच अतर्क्य वाटते. आपण माझी शंका दूर करावी अशी प्रार्थना आहे.” गुरु त्याला म्हणाले, “त्याची बुद्धि वसिष्ठांच्या शापाने भ्रष्ट झाली हेच खरे! एऱ्हवी निरंतर यज्ञयागादि निष्ठेने करणाऱ्या आणि ब्राह्मणांचा नितांत आदर करणाऱ्या राजाची अशी प्रवृत्ती कशी झाली असती. शेवटी त्याचे दैवच आडवे आले असे म्हणावे लागते. जो आपले वडिलार्जित राज्य स्वीकारयलासुद्धा तयार नव्हता इतका नीतिज्ञ, धर्मनिष्ठ आणि निरिच्छ राजाने दैवाच्या प्रभावानेच हे निंद्य कर्म केले.” यापुढे मुनींच्या तोंडून दैवाची गति कशी अटळ आहे ते सांगितले आहे. देवाने केलेले ते दैव. समष्टीस्वरूप परमेश्वराचा संकल्प म्हणजे दैव. इतरांची गोष्ट सोडा, पण ब्रह्मदेवांसारखेही ह्या दैवाच्या हातांतील खेळणी झाले आहेत. घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे ह्या दैवाच्या धाकानेच सूर्य सारखा फिरतो, ब्रह्मदेव जगाची उत्पत्ति करतो, विष्णु रक्षण करतो आणि रुद्र संहार करतो. हे दैवच सर्वांच्या सुखदुःखाला कारण आहे. हे कोणालाही – अगदी देवांनाही सोडत नाही. मग ते जीवन्मुक्तालाच कसे सोडील? सनत्कुमारांच्या शापाने त्याने प्रत्यक्ष भगवान विष्णूंच्या द्वारपालांना – जय आणि विजय यांना पृथ्वीवर जन्म घ्यायला लावले. नेहमीच आठ वर्षाचे कुमार दिसणारे सनक, सनातन, सनंदन आणि सनतकुमार ह्या ब्रह्मदेवांच्या मानसपुत्रांना जय-विजयांनी वैकुंठाच्या दारांत अडविले. तेव्हां त्या कुमारांनी त्या विष्णुदूतांना तीन वेळां पृथ्वीवर जन्म घेऊन भगवान विष्णूंशीच वैर करण्याचा शाप दिला. ह्या दैवानेच चंद्राला गुरुपत्नीशीं संग करविला आणि त्याच्यामागे कायमचा क्षय लावला. ह्या दैवामुळेच देवराज इंद्र कपटाने गौतमपत्नी अहिल्येशी रमला आणि त्याच्या अंगाला हजार व्रण पडले. ह्या दैवानेच ब्रह्मदेवांनाही आपल्या कन्येचा – सरस्वतीचा मोह पाडला. रावणासारख्या ज्ञानी आणि पराक्रमी असुराला सीतेला पळवायची बुद्धि देऊन त्याचा रामाकरवी नाश ह्या दैवानेच केला. दैवानेच दक्षप्रजापतीच्या यज्ञांत सतीचा अधिक्षेप करणाऱ्या पूषाचे दांत पाडले, भगाचे डोळे फोडले तर भृगूच्या दाढीमिशा उतरवल्या. तिचा पिता दक्षाचा शिरच्छेद करविला आणि त्याला बोकडाचे डोके लावले. नारदासारख्या देवर्षींनाही हे दैव एका ठिकाणी राहू देत नाही. अशा ह्या दैवाचे अतिक्रमण कुणी केल्याचे सकळ त्रैलोक्यांत उदाहरण नाही! १ - ११.

असे असले तरी कितीही बलवत्तर दैव असले तरी ते ज्ञानाची हानी करूं शकत नाही. ज्ञानी सत्पुरुषांच्या शरीरावर जरी दैवाचा अधिकार असला तरी त्यांचे ज्ञानावर मात्र दैवाचा जोर चालत नाही.

उत्पन्नस्यापि सर्वस्य ध्रुवो नाशोऽध्रुवत्वतः। किं विनष्टं हि भक्तस्य देहे नष्टे चिदात्मनः।।
ज्ञस्यापि यावदारब्धं चेष्टा भवति तेन किम्। हीयते तस्य स ज्ञानकाल एव स्थितिं गतः।। दत्तपुराण ४:६:१२-१३।।

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

आत्मसाक्षात्कारानंतरही उर्वरित प्रारब्ध कार्यरत असते. त्यानुसार त्याचे शरीर रहाटत असते. पण आत्मस्वरूपांत रमलेल्या ज्ञानी पुरुषाला त्याचे कांहीच सुखदुःख नसते. ज्ञान झाल्याक्षणींच त्याचा पंचकोशांशी संबंध तुटलेला असतो. शरीर वा मन यांच्या सुखाने तो आनंदित होत नाही किंवा त्यांच्या दुःखाने तो कष्टी होत नाही. जे जे उत्पन्न होते त्याचा नाश निश्चितच आहे. चैतन्यमय आत्म्याशी एकरूप झालेल्या भक्ताचे नाशिवंत देहाच्या नाशाने काय जाते? कर्मणैवेश्वरोऽप्यत्र चेष्टते न स्वभावतः। न तेन बाध्यते तस्मान्नात्र दोषो द्वयोरपि।। दत्तपुराण ४:६:१४।। ईश्वरसुद्धां जीवांच्या कर्मानुसारच त्यांना फळे देत असतो. आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे तो आपल्या स्वभावाने कांहीच करीत नाही. त्याचा त्याला कांहीच दोष लागत नाही. अशा रीतीने ज्ञानी आणि ईश्वर या दोघांनाही दैवाचा प्रतिकार करण्याचे प्रयोजन नसते. अशा रीतीने दैवामुळेच झालेल्या शापामुळे अर्जुनाने ब्राह्मणाची गाय धरून नेली, दैवाच्या योजनेनेच रामाला क्रोध आला आणि त्याने तद्या राजाचा शिरच्छेद केला. १२ - १५.

# जमदग्नींच्या आश्रमांत अर्जुनाचा पाहुणचार.

त्या काळच्या पद्धतीप्रमाणे कार्तवीर्य अर्जुन एकदां आपल्या हत्ती, रथ, घोडदळ, पायदळ अशा चतुरंग सेनेसह वनांत शिकारीसाठी गेला होता. सेना तिथून वाजत गाजत परततांना त्याला जमदग्नी ऋषींचा आश्रम दिसला. साहजिकच राजाच्या मनांत ऋषींच्या दर्शनाची इच्छा जाग्रत झाली. त्याने आपले सैन्य जवळच थांबवले आणि आपल्या दोन निवडक मित्रांसह तो पायीं मुनींच्या आश्रमांत दाखल झाला. जमदग्नींच्या तपश्चर्येने तो आश्रम निर्वैर झाला होता. वाघ-शेळी, सर्प-मोर इत्यादि प्राणीसुद्धां आपले जन्मसिद्ध वैर त्या आश्रमांत विसरून एकमेकांशी खेळतांना दिसत. अर्जुनाला तिथे पोहोंचतांच एकदम प्रसन्न वाटले. त्याचा थकवा निघून गेला आणि साक्षात् धर्मच या ठिकाणी राहतो आहे, थोडा वेळ इथेच थांबावे असे विचार करून त्याने आश्रमांत प्रवेश केला. त्याबरोबर त्याला मूर्तिमंत अग्नीप्रमाणेच प्रकाशणारा जमदग्नि आणि त्यांची पत्नी रेणुका यांचे दर्शन झाले. जणूं कांही गौरीशंकरच भेटले असे त्याला वाटले. तप हेच ज्यांचे धन आहे अशा जमदग्नींना त्याने साष्टांग नमस्कार केला. हर्षोत्फुल्ल चित्ताने त्याने मुनींची वारंवार स्तुति केली आणि मस्तकावर हात जोडून तो ऋषींसमोर उभा राहिला. जमदग्नींनीही त्याला अत्यंत प्रेमाने आशीर्वाद दिले आणि आपल्याजवळ उत्तम आसन देऊन त्याला बसवून घेतले. आपुलकीने त्यांनी त्याचे क्षेमकुशल विचारले. राजानेही नम्रपणे आसन ग्रहण करून आपले वृत्त सांगितले. तो म्हणाला, “ऋषवर्य! आपल्या आशीर्वादाने आमच्या घरी व नगरीत सर्व कांही कुशल आहे. राज्यांत पूर्ण समृद्धि आहे. आपल्या दर्शनाने फार छान वाटले. रेणुकामातांचे चरण पाहून मी पवित्र झालो! आपल्या यज्ञशाळेत गार्हपत्य, आहवनीय आणि दक्षिण या तीनही अग्नींचे दर्शन झाले. माझे भाग्यच उदयाला आले म्हणून आपली भेट झाली! आम्हा क्षत्रियांच्या कठोर मनाला आपल्या चरणाचे दर्शन दत्तांच्या पायांसारखेच आनंददायक आहेत. आतां एकच नम्र प्रार्थना आहे की आमच्याकडून कांही तरा सेवा घेऊन आम्हांला कृतार्थ करावे!.”

त्यावर किंचित् हंसून मुनि म्हणाले, “आम्हांला इथे कांहीच कमतरता नाही. पण तूं विचारतोच आहेस तर माझई अशी इच्छा आहे की आज तुम्ही इथे आमच्या आश्रमांतच भोजनप्रसाद घ्यावा.” राजा म्हणाला, “महाराज बरोबर मोठे सैन्य आहे. आम्ही दर्शनासाठी आलो त्याने आम्ही पावन झालो आहोत. आतां आम्हांला नगराला जाण्याची आज्ञा द्यावी.” राजाचा संकोच दूर करण्यासाठी जमदग्नींनी त्याला सैन्यासह भोजनाचे आमंत्रण दिले. ते स्वीकारून राजा भोजनासाठी थांबला. १६ – ३६

जमदग्नी ऋषींची होमधेनू ही कामधेनू होती. म्हणजे जे हवे ते, हवे तितके देणारी होती. तिची प्रार्थना करून मुनींनी राजाची व त्याच्या सैन्याची जेवणाची व्यवस्था केली. तिचे वर्णन वाचण्यासारखे

आहे. आजकाल अशा पद्धतीच्या पंक्ती दुर्मिळ होत चालल्या आहेत. अजूनही जेवणाच्या आधी "उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म" म्हणणारी मंडळी आहेत. पण जेवणांत मात्र यज्ञकर्माचे लक्षण शोधून सांपडत नाही. भोजनविधि हा खरोखरच होमाचा विधि आहे. आपल्या शरीरांतील जठराग्नीला अन्नाची आहुती समर्पण करावी असा यज्ञकर्म या शब्दाचा अर्थ आहे. यज्ञकर्म उभ्याने होत नाही. त्यांत पावित्र्याचा विचार करावा लागतो. यज्ञाची जागा परिसिंचनाने पवित्र करायची असते. त्यावर अन्नाचे पात्र स्थापन करायचे असते. तेच तर स्थंडिल आहे. डाव्या हातांत ताटली घेऊन फिरत फिरत खाण्याने यज्ञ कसा होईल? वाढलेले अन्न ईश्वराला समर्पण करून चित्र, चित्रगुप्त इत्यादि देवतांना आहुती घालावी. नंतर पांच प्राणांना पांच आहुती घालाव्या आणि मगच आपण जेवणाला आरंभ करावा तेव्हां भोजनाला यज्ञपण आले असे म्हणतां येईल. नाही तर ते उदरभरणच होते. असो. अर्थात् जमदग्नींनी राजापासून पाईकांपर्यंत सर्वांना आपापल्या मानाप्रमाणे आसने दिली. ती रांगोळ्यांनी सजवलेली होती. पात्राजवळ दिवे ठेवले होते आणि सुगंधी धूप जाळले होते. आतां अन्नांतील पदार्थांचे वर्णन आहे. त्याचबरोबर ते ताटांत कुठे वाढले होते तेही सांगितले आहे. चटणी, कोशिंबिर, रायते, कायरस, लोणचे, शिकरण, सांडगे पापड, कुरवड्या इत्यादि पदार्थ डावीकडे (जेवणाऱ्याच्या) वाढले होते. उजव्या बाजूला फळभाज्या, पालेभाज्या, कंदमुळाच्या इत्यादि भाज्या तसेच पायसान्न (दुधांत शिजवलेले गोड पदार्थ) वाढले होते. मध्यभागी साखरभात, चित्रान्न इत्यदि भाताचे प्रकार, सांभार, आमटी असे द्रव पदार्थ (उपसेचन) तसेच विलायची, केशर इत्यादींचा स्वाद असलेले श्रीखंडासारखे दूधातुपाचे पदार्थ वाढले होते. आले, मिरे, हिंग, हळद इत्यादि मसाल्याचा उपयोग केलेल्या षड्रसानी (गोड, कडू, तिखट, आंबट, खारट आणि तुरट) युक्त गरमागरम अन्नाचा घवघवीत वास येत होता. ते अन्न पाहूनच डोळे तृप्त होत होते. अशा रीतीने पंक्ती बसल्यावर स्वतः जमदग्नींनी पंक्तीत फिरून सर्वांना सावकाश जेवायची प्रार्थना केली. त्याच वेळी सैन्यांतील हत्तीघोड्यांच्याही दाणा-चंदीची उत्तम व्यवस्था करायला ऋषीमहाराज विसरले नाहीत! सर्व जण ते चतुर्विध अन्न (भक्ष्य=(घागरे ,अनारसे इत्यादि), भोज्य(पायस, खीर वगैरे), लेह्य (गूळ, मध, श्रीखंड इत्यादि) आणि पेय (पन्हे, सार इ.). याशिवाय चोष्य (ऊंसाच्या कांड्या, शेवग्याच्या शेंगा इ.) आणि चर्व्य (पापड, कुरुड्या, सांडगे इ.) धरून षड्विध अन्न असे म्हणण्याचीही पद्धत आहे.) यथेच्छ जेवून तृप्त झाले. सर्व पदार्थांची चव सर्वांना अलौकिक वाटली. तरी आग्रह करून वाढलेले अन्न पानांत शिल्लक राहिले. जेवून उठल्यावर सगळ्याना हात धुतल्यावर करशोधनासाठी कस्तुरी आणि चंदन दिले. मग मुखशुद्धीसाठा नाना परींची फळे, अमृतमधुर सुगंधी पाणी, विडे, विलायची आणि त्याबरोबर सुवासासाठी कमळे दिली. त्या वेळी सुवासाने भरलेल्या आश्रमांतील गार वाऱ्याने तेथील वातावरण स्वर्गतुल्यच झाले! जमदग्नींच्या आश्रमांतील पवित्र आणि रुचकर अन्नाच्या सेवनाने सर्वांनाच आपण पावन झालो असे वाटले. ३७ - ५०.

## राजाला कामधेनूचा अभिलाष.

राजाच्या मनावर मात्र या सर्वांचा विपरीतच परिणाम झाला. सर्व सिद्धी आणि नऊ निधि (महापद्मश्च पद्मश्च शंखो मकर-कच्छपौ। मुकुंद-कुंद-नीलाश्च खर्वश्च निधयो नव।।) बाळगणाऱ्या त्या विवेकशील अर्जुनाची बुद्धी पालटली. बुद्धि ही प्रारब्धाला अनुसरते असे म्हणतात. राजाचे प्रारब्धच संपत आल्याने त्याच्या मनांत नको तो मोह निर्माण झाला. त्याने जमदग्नींना विचारले, "महाराज, आपण अरण्यांत राहणारे दरिद्री ब्राह्मण आहांत. आपल्याकडे कांहीच संपत्ती नाही. तरी आपण आज आम्हां सर्वांना असे सुग्रास, रुचकर आणि यथेच्छ जेवण कसे घातलेत? खरंच सांगतो मुनिराज, मी सार्वभौम राजा आहे आणि माझ्याकडे दत्तप्रभूंच्या कृपेने सर्व समृद्धि आहे. तरीही हा असा सर्वगुणसंपन्न

जेवणाचा बेत करतां येणार नाही. आपल्यासारख्या लंगोटी घालणाऱ्या, वनवासी, दरिद्री ब्राह्मणाला हे कसे जसले? ” राजाचा प्रश्न ऐकून ते सरळ स्वभावाचे मुनि लगेच बोलले, “अरे राजा! ह्याचे कारण ही माझी गाय आहे. ही माझी होमधेनू आहे तिला तूं सामान्य समजूं नकोस. ही साक्षात् कामधूनूच आहे! हिचे सामर्थ्य अतर्क्य आहे. ही गाय नव्हे तर चिंतामणीच आहे. जी जी कल्पना करावी ते ते सर्व ही तात्काळ पुरवते. तिच्या प्रसादानेच मी आपल्याला आज ससैन्य इच्छाभोजन देऊं शकलो!” ५१ - ५८.

राजा म्हणाला, “माझ्याकडे अष्ट महासिद्धि आहेत, नऊ निधि आहेत; पण अशी कामधेनू नाही. मला ही कामधेनू आपल्या घरी असावी अशी प्रबळ इच्छा आहे. तरी तुम्ही आतां कृपा करा आणि माझा हा छंद पुरवा. ही गाय मला देऊन टाका. तिच्या बदल्यांत मी आपल्याला हजारो गाई देईन किंवा सोने, रत्नें – जे आपल्याला पाहिजे ते मी देईन. हेही कमा वाटले तर दास, दासी, सेवक घ्या. नाही तर माझ्या अनेक राज्यांतील एक राज्यच आपल्याला देतो. पण तुम्ही ही गाय मला द्याच! ” ५९ - ६१.

## जमदग्नींचा राजाला उपदेश

राजाचा हा अनाठायी आग्रह पाहून जमदग्नींनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, “अरे राजा! थोडा विचार कर. तूं दत्तभक्त आहेस. दत्तप्रभूंच्या चरणांचे तू नित्य ध्यान करतोस. त्यांपुढे ह्या गाईची काय मातब्बरी? असा अन्याय करूं नकोस. अरे मी कांही माझ्या लौकिक कामनांसाठी ही गाय ठेवली नाही. मला नित्य होम करायचा असतो. ही माझी होमधेनू आहे. हिच्या दुधानेच मी होम करतो. हिचा नाद तू सोड आणि सुखाने घरी जा. वेदांसारखी विद्या अवगत असणाऱ्याने कोकशास्त्राचा अभ्यास करण्यासारखे ते होईल! घरांतल्या सुंदर, प्रेमळ, निष्ठावान सतीला सोडून बाजारबसवीच्या नादी लागूं नये! ही यज्ञाची कामधेनू सोडून मला तुझे धनगोधन, दासदासी ह्यांचा काय उपयोग? ” ६२ - ६७.

## कार्तवीर्याकडून कामधेनूचे अपहरण.

मागच्या अध्यायांत वर्णन केल्याप्रमाणे अर्जुनाच्या मनांत कामधेनूच्या प्राप्तीचा काम इतका प्रवृद्ध झाला होता की तो हे कांहीही ऐकायलासुद्धां तयार झाला नाही. त्याचा विवेक नष्ट झाला होता. कसलाच विचार न करतां, आपल्या कृत्याच्या दुष्परिणामांचाही विचार न करतां आपली दुर्वासना पूर्ण करण्याचा हट्ट त्याने सोडला नाही. ‘हा ब्राह्मण आहे. दया, क्षमा शांति हीच याची संपत्ति आहे. हा आपल्याला विरोध करणे शक्य नाही. तेव्हां त्याच्या आश्रमांत विपुल धन आणि गाई ठेवून आपण ही कामधेनू घेऊन जावी,’ असा विचार करून राजाने आपल्या सेवकांना ती गाय सोडून घेऊन चलायची आज्ञा केली. त्या राजसेवकांनी त्याप्रमाणे ती गाय सोडून तिला घेऊन नगराकडे निघाले. गाईचे वांसरू हंबरूं लागले. ती गायसुद्धा त्याच्याकडे ओढ घऊं लागली. पण मन घट्ट करून तिच्याकडे लक्ष न देतां राजाने कांही न बोलतां मुनींना नमस्कार करून आपल्या नगराची वाट धरली.

जमदग्नी शांतपणे हा सर्व प्रकार पहात होते. समोर ठेवलेल्या धनाचा किंवा गोधनाचा त्यांनी स्वीकार केला नाही. राजाचा प्रतिकार करायचा तर त्याला शाप द्यावा लागेल. पण त्याने आपल्याच तपाचा क्षय होईल म्हणून त्यांनी तसे केले नाही. ‘धार्मिक राजा आहे. नेली एक गाय तर काय बिघडले? आणि कालांतराने त्याचा विवेक जागला की तो ती परतही आणून देईल’ असा विचार त्या क्षमाशील मुनींनी केला. मन क्षुब्ध होऊं न देतां ते ध्यानमग्न झाले. ६८ - ७७.

थोड्या वेळाने राम समिधांची मोळी डोईवर घेऊन वनांतून परतला. त्याने कामधेनूच्या वांसराचे हंबरणे ऐकले. आजूबाजूला पाहून रामाने त्या खोंडाच्या आक्रोशाचे कारण विचारले. तेव्हां त्याच्या भावांनी राजाचे आगमन, त्याला जेवायचे आमंत्रण आणि दळभारासहित त्याला दिलेले भोजन, त्याने याचे रहस्य विचारल्यावर ऋषींनी कामधेनूच्या प्रभावाचे केलेले वर्णन, ते ऐकून राजाला कामधेनूचा मोह कसा झाला आणि बाबांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करून त्याने सेवकांकरवी कामधेनूचे बळजबरीने केलेले अपहरण ही सर्व हकीकत सांगितली. भृगुमुनींच्या भाकितानुसार रामाचा पिंड क्षत्रियाचा होता. त्याला हे ऐकतांच एकदम इतका राग आला कीं तो ज्वलंत निखाऱ्यासारखा लालबुंद झाला. आतां हा सगळे त्रिभुवन जाळतो कीं काय असे भासूं लागले! आपल्या वडिलांचा विचार घेण्याचेही त्याला भान राहिले नाही. त्याच्या रागाचे वर्णन मुळांतच वाचायला हवे. स्वामी महाराजांनी इथे रौद्र रसाचा आविष्कार हृदयाला थरारणारा आहे. त्या रागाच्या भरांतच त्याने 'ह्या दुष्ट, उन्मार्गगामी, ब्रह्मद्वेषी राजाचे हजार हात तोडून मी त्याचा शिरच्छेद करीन,' अशी घोर प्रतिज्ञा केली. आपल्या वडिलांनी जरी याला त्याच्या सुदैवाने सोडले असले तरी आपण त्याची गय करायची नाही असा निर्धार त्याने केला. आपल्या शौर्याचा त्याला इतका आत्मविश्वास होता की 'प्रलयकाळच्या अग्नीसारखा मी ब्रह्माड जाळून टाकीन, माझ्यासमोर देव आणि दानवसुद्धा टिकाव धरणार नाहीत' ह्याविषयीं त्याच्या मनांत यत्किंचितही शंका नव्हती. राजाच्या अपराधाविषयीं पूर्ण खात्री, त्याला शासन करण्याची आवश्यकता, त्याच्या दुष्कर्मावरचा संताप आणि ते करण्याचे आपले सामर्थ्य ह्यांचा परिपाक म्हणून 'ह्या राजाचाच नाही तर त्याच्या अवघ्या कुळाचा नाश मी करीन' असा संकल्प परशुरामाच्या मनांत दृढावला. आपला निश्चय ठामपणे व्यक्त करून, वडिलांनाही न विचारतांच क्रोधावेशांत परशू हातांत घेऊन राम अर्जुनाच्या मागे धांवला. ७८ - ९२.

तो संतप्त राम हत्तींच्या कळपावर धांवून जाणाऱ्या सिंहासारखा गर्जत वेगाने कार्तवीर्याच्या सैन्यावर चालून गेला. प्रलयासाठी इंद्र ज्याची योजना करतो तो सांवर्तक नांवाचा सर्वनाशक मेघ अनुकूल वायु असतांना जसा गडाडतो तशा त्या परशुरामाच्या आरोळ्या होत्या. मूळचाच चंडप्रतापी भार्गवराम त्वेषाने चवताळून त्या राजाशी भिडायला उतावळा झाला होता. झंझावातासारखा वेगाने चालतांना त्याच्या पायांनी जमीन दणाणत होती. तेजःपुंज राम वाऱ्यासारखा पलतांना पाहून वाटेतील लोकांना कल्पांताच्या वेळी विश्वाचा संहार करण्यासाठी अवतरलेला रुद्रच भासला! अर्जुनाचा जीव घ्यायला त्याचे हात शिवशिवत होते. बघतां बघतां राम अर्जुनाच्या सेनेजवळ येऊन ठेपला. त्याबरोबर रामाने, "अरे चोरा! थांब! मागे फीर! चोरीचे हे निंद्य कर्म करून तू आपल्या क्षत्रिय कुळाला लांछन लावले आहेसच. आतां तुझी मान कशी कापून टाकतो पहा! ही गंमत समजूं नकोस!" रामाचा तो घनगंभीर आवाज ऐकून राजाने वळून पाहिले. त्याचा तो रुद्रावतार पाहून राजाने ओळखले की हाच भार्गवराम आहे. सूर्यासारखे दिपवणारे त्याचे तेज त्याने अनुमान केले की 'ही भगवान विष्णूंचीच मूर्ति आहे. नाही तर माझ्यावर चालून येणाची कुणाची हिंमत आहे? माझ्यापेक्षा वर्णाने श्रेष्ठ पुरुषच माझ्या मृत्यूला कारण होईल असे मला वरदान आहे. आणि हा ब्राह्मण आहे!' अर्जुन ब्रह्मज्ञानी होताच. त्याला आपल्या प्रारब्धाचा खेळ संपत आल्याचे लक्षांत यायला वेळ लागला नाही. आपला शेवट जवळ आल्यानेच आपल्याला ब्राह्मणाची संपत्ति चोरण्याची बुद्धि झाली. मी एवढा ब्रह्मण्य असूनही मला ही दुर्बुद्धि झाली याला प्रारब्धाशिवाय दुसरे काय कारण आहे? खरे तर अर्जुनाला आपली चूक लक्षांत आली. परशुरामाचा त्याला राग आला नाही. उलट आपण त्याच्या पित्याची गाय परत देऊन त्याला शरण जावे असाही विचार त्याच्या मनांत येऊन गेला. मग त्याने विचार केला की 'आतां मी हार पतकरली तरतो

माझे प्राण राखील. मग मी कुणाशी युद्ध करीन आणि रणांगणावर मरण्याची माझी इच्छा कशी पूर्ण होईल? आतां माघार घेणे योग्य नाही. दत्तगुरूंच्या कृपेने हा सुयोग जुळून आला आहे. आतां हा देह रणात पडून जावा यांतच माझी कृतकृत्यता आहे! भगवान विष्णूंना आतां युद्धानेच प्रसन्न करावे!' (इत्युक्तः स सुधी रामं ज्ञात्वा विष्णुं नृपोऽर्जुनः। क्षात्रधर्मेण तुष्ट्वामुं प्रयास्ये तत्पदं परम्।।३३।।). असा मनाचा निर्धार करून अर्जुनाने सैन्य मागे फिरवले आणि परशुरामासमोर युद्धाचा निश्चयाने सामोरा झाला! ९३ – १०८.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा विसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

**डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.**[1]

**अध्याय २१ वा.**

**श्रीविष्णोः कलेयं असें मानून। युद्ध करी अर्जुन। रामें परशु धरून। भुज तोडून टाकिले त्याचे।।४४।।**
**राम करी अर्जुनाचा नाश। पिता म्हणे दोषी त्यास। राम जाई तीर्थाटणास। एकविसाव्या अध्यायीं हें।।४५।।**

वेदधर्मा मुनि दीपकाला पुढे सांगू लागले. माहिष्मतीत प्रवेश करणाऱ्या अर्जुनाला त्याच्या सैन्यासह आव्हान देत परत फिरवून अर्जुन म्हणाला, "तुझा जन्म क्षत्रियकुळांत झाला असला तरी गाय पळवून कर्माने चोरच ठरतोस! जरा थांब! माझा पराक्रम पहा. त्रैलोक्यांत असा वीर नाही. स्वतःला विवेकशील म्हणवितोस? मग हे कर्म क्षत्रियाला शोभणारे आहे का? अरे, राजाने ब्राह्मणाला गाईचे दान करावे, त्यांचा प्रतिपाळ करावा ह्या सनातन धर्माचे तू उल्लंघन केले आहेस! एवढा अधर्म करून तुला ना इहलोकांत किंवा परलोकांत सुख लाभेल का? ह्या दुष्कृत्याचे फल द्यायलाच मी आलो आहे. आपले चिलखत सांभाळ! " ही रामाने केलेली आपली निर्भर्त्सना ऐकून राजा त्याला म्हणाला, "तुला काय राजाचा धर्म कळणार? आम्ही राजे लोक प्रयत्नपूर्वक रत्नांचा संग्रह कोषांत करत असतो. हे कामधेनूरूपी अभिनव रत्न मला आवडल्याने मी घेऊन जातो आहे. याच्या बदल्यांत मी भरपूर गाई आणी धन दिले आहे आणि नंतरच मी ते माझ्या राजधानीला नेत आहे. ते आतां मी मुळीच परत करणार नाही. तुझी हिंमत असेल तर माझ्याशी युद्ध कर. नाही तर हिचा नाद सोड!" राम उत्तरला, " अरे, हे तूं काय विपरीत बोलतो आहेस. ब्राह्मण कधी गाय विकतात का? तू ठेवलेली रत्ने, धन, गाई सगळे तसेच पडले आहे. ते कुणी स्वीकारले का? अरे करंट्या! ज्या कामधेनूवरून ब्रह्मांडाची कुरवंडी करावी तिची किंमत तुझ्या क्षुद्र हिऱ्यामाणकांत करून बळजबरीने तिला घेऊन जातोस? आतां तुझ्याशी युद्ध करून तुझे मस्तक धडावेगळे करीन तरच आईचे नांव सांगीन. नाही मला लोकांनी खुशाल चांडाळणीचा मुलगा म्हणावे! " याप्रमाणे भीषण प्रतिज्ञा करून राम परशु हातांत घेऊन पुढे सरसावला. त्याला असा चालून येतांना पाहून अर्जुनाने सैन्याला " असंबद्ध भाषण करून अन्यायाने आक्रमण करणाऱ्या ह्या आततायी रामाला तो ब्राह्मण असला तरी ठार करा! त्यांत कांहीच अन्याय नाही." अशी आज्ञा दिली. १-१४ "गुरुं वा बालवध्वौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतं। आततायिनमायांतं हन्यादेवाविचारयन्।।" (अन्यायाने प्राण घेण्याच्या हेतूने आपल्या अंगावर चालून येणाऱ्या आततायीला, तो गुरु, बाल, स्त्री अथवा विद्वान ब्राह्मण असला तरी विचार न करतां ठार मारावे.) ह्या मनुस्मृतीतील वचनाचा आधार अर्जुनाने इथे घतलेला दिसतो. खरे तर अर्जुनच खालील व्याख्येप्रमाणे आततायी आहे. "अग्निदो गरदश्चैव शस्त्रोन्मत्तो धनापहः। क्षेत्रदापहरश्चैतान् षड् विद्यादाततायिनः।। " (आग लावणारा, विष घालणारा, उन्मत्त शस्त्रधारी, धन लुटणारा, शेती बळकावणारा आणि स्त्री पळवून नेणारा हे सहा आततायी होत.)

## रामार्जुन युद्ध.

राजाची अशी आज्ञा होतांच ते प्रचंड सैन्य धनुष्य, बाण, तलवार, गदा, मुद्गल इत्यादि शस्त्रांनी परशुरामावर तुटून पडले. या सगळ्यांचा सामना एकट्या परशुधारी रामाने केला. स्वतःचा बचाव करीत समोरच्या सैन्यावर हल्ला करून त्याने कित्येकांची चिलखते फोडली, अनेकांची धनुष्ये मोडून टाकली, बऱ्याच योद्ध्यांचे मुकुट भंगले, रथ चिरडले, हातपाय तोडले आणि त्यांना ठार मारून टाकले. त्याच्या संहारातून हत्ती-घोडेसुद्धां सुटले नाहीत. बघतां बघतां रामाच्या तीक्ष्ण जीवघेण्या परशूने

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

अर्जुनाच्या सैन्याची दाणादाण केली. बहुसंख्य मेले, बरेच घायाळ झाले. एका सिंहानेच हत्तींचा मोठा कळप मारून टाकावा तसा त्या सैन्याचा रामाने धुव्वा उडविला. रामाच्या त्या झंझावाती वाऱ्याने सैन्य पाहता पागतां उध्वस्त झाले. त्या ठिकाणी रक्ताच्या नद्या वाहूं लागल्या आणि योद्ध्यांची प्रेते त्यांतून जलचरांसारखी वाहत चालली. त्यांचे केस शेवाळासारखे भासूं लागले. तुटून पडलेले हात सर्पा ढाला भोंवऱ्यासारख्या फिरत होत्या. रक्तामांसाच्या चिखलांत घोडे आणि हत्तीसुद्धां रुतून गेले. स्वर्गांतून पाहणाऱ्या देवांनाही नवल वाटले! हे सर्व वर्णन रौद्ररसाचे उत्तम उदाहरण आहे. रामाने एका परशूच्या बळावर एवढी मोठी सेना होत्याची नव्हती केली ह्याला श्रीस्वामी महाराजांनी सर्पांच्या समूहाला नष्ट करणारा गरुड, समुद्राला जाळणारा वडवानळ आणि सागर पिऊन टाकणारा अगस्ति असे समर्पक दृष्टांत दिले आहेत. परशुराम हा साक्षात विष्णूंचाच अवतार आहे याविषयी राजाची उरलीसुरली शंकाही आतां नाहीशी झाली. ‘दुसरे कोण माझ्या सेनासमुद्राचे शोषण करूं शकेल? सूर्य क्षितिजावर आल्याबरोबर अंधःकाराचे नांवही राहत नाही तशीच अवस्था ह्या रामाने माझ्या सेनेची केली. देव आणि दानवही युद्धांत माझ्यापुढे टिकत नाहीत तिथे मनुष्याची काय कथा? हा खचितच सामान्य ब्राह्मणाचा पोर नाही तर लक्ष्मीपती भगवान विष्णूचाच अवतार आहे! आतां क्षात्रधर्माला अनुसरून याला युद्धानेच प्रसन्न करावे आणि श्रेष्ठतम अशी वीरगति प्राप्त करून घ्यावी. ’ असा मनाचा निश्चय करून तो रामाला सामोरा गेला. रामाला हिणवीत तो बोलूं लागला, “आतां माझ्याशी गांठ आहे. तू सुकुमार ब्राह्मणाचा पोरगा आहेस. मी भयंकर कठोर क्षत्रिय आहे. माझ्या बाणांचा कठिण मारा कसा सोसशील? तुम्ही ऋषिकुमारांनी वनांत राहून, फळेमुळें खाऊन तपश्चर्या करावी. डांस चावले तर कळवळणारा तूं ब्राह्मण, माझ्या पोलादी बाणाचा मारा काय सहन करशील? माझ्यासमोर तूं उभाही राहूं शकणार नाहीस. फुकट मरशील! अरे, तुझ्या आईला किती दुःख होईल याचा तरी विचार कर. अजूनही उशीर झाला नाही. सुखाने घरी परत जा.” राम त्याला आव्हान देत म्हणाला, “अरे राजा, किती बोलतोस? माझी काळजी सोड. शब्दांचे संधान पुरे! शस्त्रे हातांत घेऊन काय तुझा पराक्रम आहे तो दाखव!” १५ - ४०.

मग अर्जुनाने श्रीदत्तप्रभूंचे स्मरण केले आणि आपल्या एक हजार हातांनी पांचशे धनुष्याना बाण लावले. सिंहासारखी गर्जना करीत त्याने रामावर बाणांचा पाऊस पाडून त्याला झांकोळून टाकले. हजारों धारांनी पर्वतावर वृष्टी करणाऱ्या मेघासारखा त्याने रामावर शस्त्रांचा वर्षाव सुरूं केला. रामाने आपल्या परशून ते सर्वही बाण बाजूला सारले. आकाशांत ते आनंददायक युद्ध पाहण्यासाठी उत्सुक देवांच्या विमानांची गर्दी झाली. रथावर बसलेला सहस्रबाहू अर्जुन सहस्ररश्मी सूर्यासारखा तळपत होता. पांच-पांचशें बाणांची लागोपाठ सरबत्ती करीत त्याने रामाला झांकून टाकले. तीक्ष्णतर बाणांचा अमोघ वर्षाव करणाऱ्या त्याच्या हातांची चपळाई पाहून रामालाही नवल वाटले आणि संतोषही झाला. “वा! वा! हा कार्तवीर्य खरोखरच मोठा शूर वीर आहे. ह्याचे युद्धांतले धैर्य आणि शौर्य अतुलनीय आहे. मानवच काय देव आणि राक्षसही त्याच्याशी लढूं शकत नाहीत! ” असे त्याचे मनोमन कौतुक करीत रामाने आपल्या परशूने त्याच्या बाणांचे जाळे मोडून टाकले. त्याच्या रथाचे घोडे आणि सारथी मारून टाकले झाडाच्या फांद्या तोडाव्यात तशा त्या कार्तवीर्याच्या भुजा तटातट तोडायला सुरुवात केली. पण काय आश्चर्य, जो जो हात अर्जुनाने तोडावा त्याच्या ठिकाणी पुन्हां नवा हात उगवावा! अर्जुनाने खूप वेगाने पुनःपुन्हां बाहू तोडले; तुटलेल्या हातांचे दोन्ही बाजूला पर्वत झाले. पण कांही उपयोग झाला नाही. अर्जुनाचे सहस्र बाहू तसेच त्याच वेगाने शरसंधान करीत होते. ह्याचे कारण न कळल्याने राम किंकर्तव्यमूढ झाला! आतां आपली प्रतिज्ञा तडीला जाते की नाही याविषयी तो साशंक झाला. वैफल्याने

आणि निराशेने तो खचून गेला. अखेरचा उपाय म्हणून त्याने मनाशीच संकल्प केला, "माझी पतिव्रता माता रेणुका, तपोधन पिता जमदग्नि आणि गुरुदेव भगवान शंकर यांची माझ्यावर कृपा असेल तर मला जय मिळून माझ्या हातून हा राजा मरण पावेल आणि माझी प्रतिज्ञा खरी होईल!" अशा रीतीने रामाने आपले सर्वस्वच जणूं पणाला लावते. त्या वेळी आकाशवाणी झाली, "अरे रामा! ह्या भुजा ज्या बीजापासून उगवत आहेत ते त्याच्या छातीत आहे. ते तूं सुकवून टाकून मग ते बाहू तोड! " ती दैवी वाणी कानांवर पडतांच रामाने आग्नेयास्त्राचे अर्जुनाच्या छातीवर संधान केले आणि ते बाहूंचे बीज जाळून टाकले. मग मात्र अर्जुनाचे बाहू तुटूं लागले. पाहतां हजार बाहू जाऊन कार्तवीर्याचे दोनच हात उरले. ते मात्र कांही केल्या रामाला तोडतां आले नाहीत. तरी आतां अर्जुनाचा वध सुकर झाल्याने रामाला हुश्श वाटले. ४१ - ६२.

## कार्तवीर्याचा मृत्यू.

रामाने बाहूंचे बीज शोषले तेव्हांच अर्जुन मनांतून उमजला की आतां मृत्यू जवळ आला आहे. आयुष्याची दोरी संपली आहे. ह्या शरीराचा आतां त्याग करायचा आहे! सदगुरु दत्तात्रेयांचे स्मरण होऊन त्यांच्याविषयींच्या कृतज्ञतेने अर्जुनाचे मन भरून आले! ख्यात्याधिकाच्या हातून समरांगणावर क्षात्रोचित मृत्यू यावा ही आपली मनोकामना त्यानीं पूर्ण केल्याच्या जाणिवेने त्याचे चित्त भक्तिभावाने भरून आले. त्याने स्वतःचे संपूर्ण अस्तित्व – शरीर, मन, बुद्धि यांच्यासह श्रीदत्तपदीं समर्पण केले. "मी दत्तस्वरूपच आहे! अखंड, अभेद, अछेद, एकरस सच्चिदानंदस्वरूप मी आहे." अशा रीतीने आत्मस्वरूपांत चित्त स्थिर करून इंद्रियांचा निग्रह करून ती त्याने मनांत जिरवली. मनाचा प्राणांत लय केला. प्राणाचा तेजांत आणि तेजाचा परमात्म्यात लय करून शेंवटी तो ब्रह्मरूप झाला. श्रीदत्तपुराणांत (३०:४९) स्वामी महाराज म्हणतात, **स्वस्वहेतौ लयं जग्मुः सर्वास्तस्य कलाः स्वयम्। श्रीदत्तेनैकतां प्राप राजा युक्तः समाधिना।।४९।।** या श्लोकावरील टीकेत त्यांनी हा प्रश्नोपनिषदाच्या 'गताः कला..' ह्या (३:२:७) मंत्राचा अनुवाद आहे असे म्हटले आहे. आत्मज्ञानी पुरुष जेव्हां मृत्यू पावतो तेव्हां त्याच्या सर्व पंधरा कला (दहा इंद्रियें आणि पांच तन्मात्रा) आपापल्या आधारांत लीन होत होत अंतीं आत्मस्वरूपांत समरसून जातात. पुढच्याच मंत्रात याला सागराला मिळून आपले नामरूप सोडून त्याच्याशी एकरूप होणाऱ्या नद्यांचा दृष्टांत दिला आहे. सामान्य जीवाच्या कला सूक्ष्म रूपाने उरतात तोच लिंगदेह! तोच पुनर्जन्माला कारण होतो.. गीतेच्या १५व्या अध्यायांत जीवरूपाने भगवंताचाच सनातन अंश, वाऱ्याने वासाला ओढावे त्याप्रमाणे, मन आणि इंद्रियांना आकर्षून पूर्वशरीराचा त्याग करतो आणि नवे शरीर धारण करतो. ज्ञानी पुरुषाने आत्मज्ञानाच्या प्रभावाने लिंगदेहाचा नाश केलेला असल्याने तो आत्मस्वरूपांत पूर्णतया विलीन होऊन जातो. ही वेदांतांतील प्रक्रिया सांगून श्रीमहाराज त्याबरोबरच घडलेल्या योगिक प्रक्रियांचेही थोडक्यांत वर्णन केले आहे. सर्व नाड्या आणि हृदय उजळून टाकीत प्राण सुषुम्णा मार्गातून ब्रह्मरंध्राकडे गेला. हे छांदोग्योपनिषदांतील (८:६:५-६) वर्णनाशी जुळणारे आहे. "शतं चैका च हृदयस्य नाड्यस्तासां मूर्धानमभिनिःसृतैका । तयोर्ध्वमायन्नमृतत्वमेति विष्वङ्ङन्या उत्क्रमणे भवन्ति" **हृदयाच्या एकशे एक नाड्यापैकी मस्तकांतून** बाहेर पडणारी एकच नाडी (सुषुम्णा) आहे. तिच्याद्वारां वरती जाणारा मोक्षाला पावतो. इतरांना पुनर्जन्म घ्यावा लागतो. त्याच वेळी रामाने आपल्या परशूने त्याचे मस्तक छेदून टाकले आणि राजाचे पार्थिव शरीर धाडकन भूमीवर पडले. आकाशात देवांनी जयजयकार केला. राजाच्या मस्तकाचा भेद करून त्याचे प्राण दत्तरूपांत विलीन झाले. त्याला देवादिकांनाही दुर्लभ अशी सायुज्य मुक्ती मिळाली. मरणाच्या आधीही तो जीवन्मुक्तच होता. मृत्यूनंतर तो विदेहमुक्त झाला. जन्मभर दत्तस्मरण करणाऱ्या त्या

अर्जुनाच्या चित्तांत साक्षात् दत्तप्रभूंचा निवास होता. त्याला कोण मारणार? ‘गोविंद गोविंद मना लागलिया छंद। मग गोविंद ते काया, भेद नाही देवा तया।।‘ ह्या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे कार्तवीर्य अर्जुन दत्तरूपच होता आणि दत्तरूपांतच समरसून गेला. राम केवळ निमित्तमात्र झाला.

श्रीदत्तपुराणांत ह्या प्रसंगाच्या टीकेत श्रीमहाराजांनी हे स्पष्ट केले आहे की जीवन्मुक्त पुरुष नित्य समाधि अवस्थेतच असतो. यालाच सहज समाधि असेही म्हणतात. क्वचित् भोगकाली त्याचे देहाशी तादात्म्य झाल्याचे भासले तरी त्याच्या आत्मज्ञानात फरक पडत नाही. देहाची रहाटी प्रारब्धानुसार होते. आत्मज्ञानी पुरुषावर त्याचा कांहीही परिणाम होत नाही. तो आपल्या आत्मस्वरूपांत स्थिर असतो. ‘नेदों लागों पापपुण्य अंगा’ अशीच त्याची स्थिति असते. आत्मक्रीड, आत्मरति आणि आत्मतृप्त असा तो अर्जुन अशा रीतीने दत्तरूप झाला. **श्रीदत्ताचा पूर्ण भक्त। सर्वसंग परित्यक्त। पूर्वीच होता जीवन्मुक्त। विदेहमुक्त आतां झाला।। ७२।।** ६३-७२.

## देवादिकांकडून रामाचे अभिनंदन.

इंद्रादिक देवांची झोंप उडवून टाकणारा अर्जुन रणांगणांत पडल्याचे पाहतांच देवांच्या आनंदाला उधाण आले. परशुरामाचा जयजयकार करून त्याच्यावर देवांनी नंदनवनांतल्या फुलांचा वर्षाव केला. स्वर्गांतल्या दुंदुभीच्या नादांनी आकाश दणाणून गेले. गंधर्व भार्गवरामाची कीर्ति गाऊं लागले आणि अप्सरांनी त्यांना नृत्याची साथ दिली. “हे पुरुषोत्तमा, भृकुकुलोत्पन्ना रामा, तुझा विजय असो! देव, असुर, गंधर्व, किन्नर यांनासुद्धां न आटोपणाऱ्या, रावणासारख्या मोठमोठ्या वीरांनासुद्धा बंदी करणाऱ्या कार्तवीर्याला तू ठार केलेस! तुझा पराक्रम असीम आहे. तूं आमचे मंगल केले आहेस. ” अशी स्तुति करीत देवांनी त्याच्यावर कल्पवृक्षाच्या फुलांची वृष्टी केली. आपली प्रतिज्ञा सफळ झाल्याने रामालाही आनंद झाला आणि होमधेनूला घेऊन राम घरी परतला. घरी येऊन त्याने वडिलांना वंदन करून आपण अर्जुनाचे हजार बाहू तोडून त्याचा शिरच्छेद कसा केला ते सांगितले. ७३ - ७९.

## जमदग्नींचा धिक्कार आणि रामाचा पश्चात्ताप.

पण जमदग्नि मुनींना ना आनंद वाटला न त्यांनी रामाचे कौतुक केले. त्यांचे पश्चात्तापाने खिन्न झाले. त्यांनी रामाचा धिक्कारच केला. ते त्याच्यावर रागावले आणि म्हणाले, “मला तोंड दाखवूं नकोस. केवढ्या मोठ्या पापाचा तू धनी झाला आहेस! अर्जुनासारख्या प्रजेचे प्रतिपालन करणाऱ्या, सर्वांना सुख देणाऱ्या पुण्यश्लोक राजाला ठार मारायचे असते का? ज्या राजाच्या संरक्षणा ने आमचे तप निर्विघ्नपणे चालत असते, जो आपल्या प्रजेचा मायबाप आहे त्याच्ावर काय म्हणून एवढा रागावलास? केवळ त्याने गंमतीने एक गाय नेली म्हणून? अरे मीसुद्धा त्याला शाप दिला नाही. थोडा विचार कर! सर्व सिद्धी दासी त्याच्या दासी होत्या. त्याने किती ब्राह्मणांना हजारों गाईंचे दान दिले. त्याला ह्या एका गाईची काय मातब्बरी? त्याने थट्टेने गाय नेली तर इतका क्रोध? त्याचा शिरच्छेद करून तू पापांचा डोंगरच शिरावर घेतला आहेस! 'दशश्रोत्रियसमो राजा' (महाभारत) हे स्मृतिवचन तू कसा विसरलास? राज्याभिषेकाने ज्याचे मस्तक संस्कत झाले आहे असा कुणीही राजा प्रजेला वंद्य असतो. हा तर दत्तभक्त, ब्रह्मण्य आणि पुण्यश्लोक राजा होता. हे धर्मविरुद्ध आणि अत्यंत निंद्य असे कर्म तू केले आहेस!” पित्याचे विवेकशील आणि धर्मयुक्त बोलणे ऐकून रामाला पश्चात्ताप झाला. आपल्या हातून खरेच फार मोठे पाप झाल्याची टोंच त्याच्या विवेकी मनाला लागली. अत्यंत कळवळून त्याने जमदग्नींचे पाय धरले आणि त्यांना प्रार्थना केली, “बाबा! खरोखऱ माझ्या हातून महत्पाप झाले आहे. पण हे अजाणतां झाले आहे. आतां यापासून माझे रक्षण करणारा आपल्यावांचून कोण आहे? मी

आपल्या आश्रयाला आलो आहे. कृपा करून मला या पापापासून मुक्त होण्याचा उपाय सांगावा. आपणच मला यांतून तारू शकतां.” रामाच्या मनाला होणारे क्लेश त्याच्या डोळ्यांतून अश्रूरूपाने वाहूं लागले. जमदग्नी किंचित्काळ गप्प असलेले पाहून रामाची काकुळत आणखीच वाढली. त्याने त्यांच्या पायांवर लोळणच घेतली. ह्या प्रसंगांतून जमदग्नींचा विवेक, साक्षेप, अनासक्ति, शास्त्रपरता आणि चित्ताची समता आपल्या ध्यानांत येतात. क्षमा हेच ब्राह्मणाचे शस्त्र आहे असे बारतांत म्हटले आहे त्याचा प्रत्यय इथे येतो. रेणुकावधाच्या वेळी त्यांच्या ठिकाणी दिसलेला क्रोध त्यांनी हेतुपुरःसर धारण केलेला होता असा निष्कर्ष त्यांतून सहजच निघतो. ८० - ९१.

## जमदग्नींचा परशुरामाला तीर्थयात्रेची आज्ञा.

जमदग्नींचे मन द्रवले. ते रामाला म्हणाले, “तू फार मोठे पाप केले आहेस. पण यावर एक उपाय आहे. या पवित्र भरतखंडांत असंख्य तीर्थे आहेत. माझ्या वचनावर श्रद्धा ठेवून तू या सर्वांची यात्रा करून त्यांच्या पावक जलामध्ये स्नान कर आणि त्याचे पान कर. गंगाजलाची कावड घेऊन ती रामेश्वरी दक्षिण सागराला समर्पण कर. समुद्रदर्शनानंतर रामेश्वराची सागरतीरावरची वाळू त्या कावडीत भरून ती गंगेच्या प्रवाहांत सोड. चार धामें, सात पुरी आणि बारा ज्यातिर्लिंगे यांचे दर्शन कर.” चार धामें म्हणजे भरतखंडाच्या चार दिशांची चार महान क्षेत्रे. बदरीनाथ, द्वारका, पुरी आणि रामेश्वर ही चार धामे आहेत. तसेच अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका। पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः।।. द्वादश ज्योतिर्लिंगांच्या विषयी खालील श्लोक प्रसिद्ध आहेत. 'सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम। उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम्।। केदारं हिमवत्पृष्ठे डाकिन्यां भीमशंकरम्। वाराणस्यां च विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे।। वैद्यनाथं चिताभूमौ नागेशं दारुकावने। सेतुबन्धे च रामेशं घृष्णेशं च शिवालये।। द्वादशैतानि नामानि प्रातरुत्शाय य: पठेत्। सर्वपापविनिर्मुक्तः: सर्वसिद्घफलो भवेत्।।' .९२ - ९७.

यावर रामाने पितृवचन शिरसा वंद्य मानून आईचा निरोप घेतला. पश्चात्तापाने चित्तमल दग्ध करून, रामाने आपल्या पापाचा उच्चार करून त्याच्या नाशासाठी तीर्थयात्रेचा विधिवत् संकल्प केला आणि यात्रेकरूचा वेष घेऊन निघाला. आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणे सर्वही यात्रेचा आचार रामाने केला. वस्तुतः राम हा प्रत्यक्ष विष्णूंचा अवतार होता. विष्णु म्हणजेच सर्वव्यापक. त्याला मुळांत अहंकारच नाही तर मग क्रोध कसा असेल? आपण आधी पाहिल्याप्रमाणे अहंकार असला तरच काम म्हणजे इच्छा होते. क्रोध हे कामाचेच परिणत स्वरूप आहे. देवकार्यासाठी सहस्रर्जुनाला ठार करण्यासाठीच भगवान भूतलवर अवतरले होते. त्यांत त्यांचे वैयक्तिक कारण कांहीच नव्हते. असूंच शकत नव्हते. पण भगवंत जेव्हां स्वेच्छेने आपल्या मायेच्या आश्रयाने मानव देह धारण करतात तेव्हां त्या देहाला उचित असे आचरण करतात. गीतेत सांगितल्याप्रमाणे (३:२१)‘यद्यदाचरति श्रेष्ठ तत्तदेवतरे जनः। स यत्प्रमाणे कुरुते लोकसत्दनुवर्तते।।’. अवतारादि श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करतात तसेच इतर लोकही वागतात. तो जो आदर्श निर्माण करतो त्याचेच सामान्य लोक अनुकरण करतात. हाच हेतू समोर ठेवून परशुरामाने पित्राज्ञेचे निमित्त करून लोकांसमोर तीर्थयात्रेचा आदर्श निर्माण केला. तीर्थ या शब्दाचा अर्थ तरणोपाय (‘तरति अनेन’ किंवा ‘तीर्यते अनेन’) असा आहे. भारतांतील गंगा-गोदावरी इत्यादि नद्यांच्या तीरांवर मंत्रदृष्ट्या ऋषींनी तपस्या केली आहे. श्रीस्वामी महाराज त्यांना ऋषिजुष्ट जल म्हणतात. जल हे स्वभावतःच मलनिःसारक आहे. ऋषींच्या सान्नध्याने त्याची निर्मलता आणखीच वाढली आहे. त्याच्या स्नानाने आणि पानाने कर्मानुष्ठानासारखाच दुरितांचा क्षय होतो. पापक्षयाचा हा सुलभ उपाय सर्वांना दाखवून देण्यासाठी परशुरामाने तीर्थयात्रा केली.

तीर्थयात्रेचा दुसरा महत्त्वाचा लाभ म्हणजे भारतवर्षांमधील पुरातन क्षेत्रांतील देवतांची दर्शने! श्रीगुरुचरित्रांत श्रीगुरु नृसिंहसरस्वतींच्या एका साळी ज्ञातीतील अनन्य भक्ताची गोष्ट आहे. हा साळी आपला प्रपंच सांभाळून रोज दोनतीव तासांचा वेळ काढून मठाचे आंगण झाडणे इत्यादि श्रीमहाराजांची सेवा करीत असे. एकदां त्याच्या भावकीचे लोक महाशिवरात्रीच्या पर्वणीला श्रीशैल्याला सल्लिकार्जुनाच्या दर्शनाला निघाले. तेव्हां त्याने, 'श्रीगुरूच माझे मल्लिकार्जुन आहेत आणि गाणगापूरच श्रीशैल्य आहे,' असे सांगून त्यांच्याबरोबर जाण्यास नकार दिला. पुढे शिवरात्रीच्या दिवशी श्रीगुरूंनी त्याला आपल्या बांधवांसह यात्रेला न जाण्याचे कारण विचारले. त्याने पूर्वीप्रमाणेच उत्तर दिले. तेव्हां श्रीगुरूंनी त्याला डोळे झांकून आपल्या पादुका धरायला सांगितले आणि क्षणांत श्रीशैल्याला नेऊन क्षौरादि आचार करून श्रीमल्लिकार्जुनाचे दर्शन घ्यायला सांगितले. त्याला देवळांत मल्लकार्जुन किंवा लिंग नसून श्रीगुरूच सर्वांची पूजा घेत आहेत असे दिसले. देवळाहून परतल्यावर त्याने श्रीगुरूंना आपाल अनुभव सांगितला आणि म्हणाला, "महाराज! आपणच सर्व विश्वाला व्यापून राहिलां आहांत! असे असतांना आपण जवळ असूनही आपल्याला सोडून हे भ्रांत लोक इतक्या दूर कां येतात? " श्रीगुरूंनी त्याला सांगितले की, "तू म्हणतोस ते खरे आहे. पण ही जी क्षेत्रे आहेत ती महान तपस्व्यांच्या वास्तव्याने पावन झालेली आहेत. त्यामुळे लोकांना त्या ठिकाणी परमेश्वरी अस्तित्वाची अनुभूति येते, त्यांच्या कामना पूर्ण होतात आणि त्यांचे पारलौकिक कल्याणही होते. " अशा भारतभूमीतील ही क्षेत्रे, ह्या विविध देवता ह्या आध्यात्मि ऊर्जेचे स्रोत आहेत (spiritual powerhouses) असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. ह्या महान देशांत परमेश्वरी शक्तीचा संग्रह करण्याचे फार पुरातन आणि प्रगल्भ शास्त्र आहे. काष्ठ, पाषाण, धातू, चित्र अशा कोणत्याही जड वस्तूत परमेश्वरी ऊर्जेचे संक्रमण आणि संवर्धन करण्याच्या प्रयोगसिद्ध शास्त्राचे माणगांव येथे प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी पूर्वाश्रमांत केले आहे. सर्वांच्या डोळ्यांदेखत त्यांनी एक महान दत्तस्थान निर्माण केले. हजारों लोकांनी त्याचा अनुभव घेतला व आजही घेत आहेत. कलकत्त्याजवळ दक्षिणेश्वर येथे श्रीरामकृष्ण परमहंसांनी असेच कालीमातेचे स्थान निर्माण केले आहे. अशा महान तपस्वी योग्यांची परंपरा आजही भारतांत अक्षुण्ण चालू आहे. भारतांतील मूर्तिपूजेचे हे रहस्य अवगत नसलेले परकीय लोक ह्याची निंदा करतांना दिसतात. पण ते त्यांचे अज्ञानच होय. अमूर्त परमेश्वराचा आविर्भाव मूर्तीत होतो. तसेच त्याचा लाभ सर्वसामान्य श्रद्धाळू लोकांना होऊं शकतो ह्याची अनुभूति आजही कोट्यविधी भक्त घेत आहेत व घेत राहतील.

आपल्या ब्रह्मज्ञानी पित्याच्या आज्ञेने रामाने बदरिकाश्रमांत जाऊन नारायणाचे दर्शन घेऊन गंगाजलाने कावड भरून यमुना, नर्मदा इत्यादि भरतखंडांतील पवित्र नद्यांत स्नान करूत, त्यांचे मलहारी जल प्राशन करीत दक्षिण समुद्रांत गंगाजला कावड रिती करून तिच्यात रामाच्या सेतूची वाळू भरून घेतली आणि कार्तिकेय, शिवकांची, विष्णुकांची, गिरीचा व्यंकटेश, श्रीशैल्याचा मल्लिकार्जुन, हंपीचा विरूपाक्ष, गोकर्णाचा महाबळेश्वर, कोल्हापूरची महालक्ष्मी, नाशिकचा त्र्यंबकेश्वर, सोरटीचा सोमनाथ, पुष्करचा ब्रह्मदेव इत्यादि देवतांची दर्शने घेत तो प्रयागला आला आणि वाळूची कावड त्याने त्रिवेणी संगमांत रिती केली. शेवटी काशीला जाऊन तीर्थयात्रेची सांगता केली. त्यानंतर परत वडिलांच्या आश्रमांत येऊन त्यांना तीर्थयात्रेचा सर्व वृत्तांत निवेदन केला. ९८ - १०८.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय २२ वा.

**अधर्मातें स्वीकारून। जमदग्नीची मान। तोडिती अर्जुनाचे नंदन। करी आक्रंदन रेणुका।।४६।।**
**तें क्षणि राम वनांतून। येई दुःखी होऊन। करी शत्रूंचें हनन। हें निरूपण बाविसाव्यांत।।४७।।**

दीपकाला वेदधर्मामुनि सांगूं लागले. इकडे माहिष्मतीत कार्तवीर्याला परशुरामाने युद्धांत ठार केल्याचे वृत्त समजले आणि त्यांच्यावर दुःखाचा जणूं डोंगरच कोसळला! इंद्रालासुद्धां पराभूत करणारा आपला अजिंक्य पिता एका ब्राह्मणपुत्राकडून मारला जावा हे त्यांना खरेच वाटेना. “त्रैलोक्यांत ज्याचा दरारा होता, देव-दानवच काय, प्रत्यक्ष काळालाही ज्याच्या धाकाने थरकांप सुटावा त्याचा एका ऋषिपुत्राने कसा वध केला? एक वेळ कांजव्याच्या तेजाने सूर्य झांकोळेल, कोल्हाही ऐरावताचा घास घेईल, गांडूळ शेषाला गिळूं शकेल अथवा उंदीर मेरू पर्वताला पोखरून पाडील पण आमच्या महापराक्रमी पित्याला यःकिश्चित ब्राह्मणाच्या पोराने ठार करणे शक्य नाही. हे निश्चितच आम्ही दुःस्वप्न पहात आहों. बारक्या बचनागाने आपल्या फण्याने गरुडाला झडपणे किंवा एकाद्या लहानग्याने खडा फेंकून चंद्रमंडळ उडवणे ह्यावर विश्वास ठेवतां येईल. पण आमच्या पित्यासमान प्रतापसूर्याचा अस्त एका विप्राकडून व्हावा हे असंभव आहे. हा नक्कीच भ्रम असला पाहिजे. ” असा विलाप करीत अर्जुनाचे सर्व पुत्र रणांगणावर जमले. आपल्या वडिलांचे शव पाहून त्यांना शोकाचा आवेग आवरेना. कांही तर दुःखाने मूर्छित झाले. त्या वेळी त्या सर्वांनी आपल्या पित्याची हत्या करणाऱ्याचा वध करून त्याचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. मग त्याचा यथाविधि अंत्यसंस्कार करून रामाचा माग काढीत आपल्या चतुरंग सेनेसहित जमदग्नींच्या आश्रमांत आले. त्यांनी आश्रमाला वेढा घातला. त्या वेळी दैवयोगाने राम आपल्या बंधूंसहित वनांत गेला होता. तेव्हा अर्जुनाच्या त्या शोकाविष्ट आणि संतप्त मुलांनी आश्रमांत सगळीकडे शोधाशोध सुरूं केली. तेव्हा त्यांना यज्ञशाळेत हवनकार्यात निमग्न असलेल्या जमदग्नींना पाहिले. गाईला पाहून धांवणाऱ्या खाटकांप्रमाणे ते जमदग्नींवरच धांवून गेले. यमदूतासारख्या भयावह अर्जुनपुत्रांनी ऋषींना धरलेले पाहून रेणुकामाता भयभीत झाली आणि कळवळून दीनपणे त्यांच्याकडे दयेची भीक मागूं लागली. “राजपुत्र हो! तुम्ही दयाळू आहांत. थोडा विचार करा. हे ब्रह्महत्येचे महापाप करूं नका. तुमच्या येथील आणि परलोकांतील कल्याणाचे ठरेल! तुम्ही दानशूर क्षत्रिय आहांत. मला माझ्या सौभाग्याचे दान द्या. मी तुमची बहीणच नाही का? तुम्हाला माझी शपथ आहे, माझ्या पतीच्या प्राणांचे रक्षण करा. तुम्ही श्रीमंत राजे आहांत. आम्ही तुमचे आश्रित आहों. मला माझ्या पतीच्या प्राणांचे दान द्या! एवढा माझा मान ठेवा आणि मला अभय देऊन माझ्या पतीला जीवदान द्या. आमच्या पुत्राने तुमचा अपराध केला आहे खरा. आमच्यावर तो काढूं नका. माझ्यावर दया करा.” अशी रेणुकेने पदर पसरून केलेली केविलवाणी प्रार्थना कानांवर पडूनही त्या अविवेकी राजपुत्रांचे मन कांही द्रवले नाही. तेव्हां जमदग्नी ऋषींनीही काकुळतीनेत्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, “राजकुमार हो! तुम्ही शांत व्हा. आपल्या कुळाचे रक्षण करायचे असेल तर आल्या पावली परत जा! ब्रह्महत्येचे पातक फार भयानक आहे. ते तुमच्या कुळाला निःशेष जाळून टाकील. तेव्हा विवेकाने क्रोध आवरा. आम्ही तुम्हांला गुरुस्थानी आहों. या गुरुहत्येपासून परावृत्त व्हा. ” पण प्रतिशोधाच्या भावनेने मतिभ्रष्ट झालेल्या त्या वैऱ्यांच्या चित्तांत हा उपदेश मुळीच ठरला नाही. त्यांनी जमदग्नींवर तलवारी उचलतांच रेणुका

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

मातेने आपली मान मधें घातली. म्हणाली, “मला आधी मारा! ” शोकाने करुणार्द्र आक्रोश करून जमदग्नींच्या अंगावर झेंपावणाऱ्या त्या मातेला पाहून खाटकाच्याही मनाला पाझर फुटला असता. पण त्या निष्ठुर अर्जुनपुत्रांवर त्याचा कांहीच परिणाम झाला नाही. तिला दूर ढकलून त्या निर्दय चांडाळांनी जमदग्नींचा शिरच्छेद केला! १ - ३४.

ह्यानंतर एका लहानशा धाव्यांत रेणुकेच्या हृदयद्रावक शोकाची अभिव्यक्ति आहे. करुणरसाचा परिपोष करण्यासाठी ओंवीच्या ऐवजी वेगळ्या छंदाचा प्रयोग केला. अनुप्रासाने त्याला सजवले आहे. शोकाने विह्वल झालेल्या रेणुकेच्या अगतिकतेचे, व्याकुळतेचे चित्र उभे केले आहे. साहजितकच ह्या ऐन संकटाच्या वेळी आपल्या पराक्रमी पुत्राची तिला तीव्रतेने आठवण झाली आहे. वारंवार ती त्याचा धांवा करते आहे. ३५-३७.

त्या महासतीच्या आक्रंदनाकडे दुर्लक्ष करून निष्ठुरतेने जमदग्नींचे मस्तक तोडून ते दुष्ट, पापी राजपुत्र रामाला शोधू लागले. तो आश्रमांत नसल्याचे लक्षात येतांच, “आम्हांला भिऊन राम लपून बसला आहे, उद्यां परत येऊन त्यालाही मारून टाकूं” असा विचार करून आणि जमदग्नीला ठार केल्याचा आनंद मानीत ते माहिष्मतीला परतले. इकडे आपल्यावर कोसळलेल्या दुःखाच्या पहाडाने व्यथित झालेली रेणुका मोठमोठ्याने आक्रोश करूं लागली. “कोणत्या पापाच्या बदल्यांत मला हे न संपणारे आणि असह्य वेदना देणारे फळ मिळते आहे? मी काय करूं, कुठे जाऊ? ” असे म्हणत ती पाय जमिनीवर आपटू लागली आणि हात छातीवर, डोक्यावर मारून घेऊ लागली. तिची ती तडफड पाहून जवळचे आश्रमवासी तिथे येऊन तिला समजावण्याचा प्रयत्न करूं लागले, धीर देऊं लागले. पण कांही केल्या रेणुकेचा शोक कमी होईना. “राम अजून कसा आला नाही!” असे सारखे म्हणत ती तळमळत होती. “रामा रे! तू कुठे गेलास? हीच शत्रूला संधि सांपडली! आतां कशी जगूं रामा! लवकर ये रे! आतां हे घर खायला उठते आहे. एकदां तुला पाहून मी प्राण सोडते! ह्या दुष्टांनी माझे सौभाग्यच लुटले! आतां ह्या फुटक्या कपाळाने जगण्यात काय अर्थ आहे? दैवाच्या ह्या विपरीत करणीने माझे जीवित संपले आहे. केवळ तझे गोजिरवाणे रुपडे पहाण्यासाठीच मी हे प्राण कसेबेसे धरून ठेवले आहेत. पतीविना जगणे असह्य झाले आहे. ते माझी वाट पहात आहेत. अंतकाळी तुझी भेट व्हावी यासाठी मी आतुर आहे!” असा केविलवाणा शोक ती महासती करूं लागली. ३८-५१.

इकडे परशुरामाला वनांत अपशकुन होऊं लागले. हरिण उलटे पळतांना दिसूं लागले, दिशा धुरकटलेल्या दिसूं लागल्या, अस्वल समोर येऊन भुंकूं लागले, सूर्यबिंबांत छिद्र दिसायला लागले, कांही कारण नसतां एकदम घसा कोरडा झाला, डावा डोळा आणि डावा दंड लवूं लागले. ह्या सर्व लक्षणांवरून रामाला कांही तरी भयंकर घडणार असल्याचे जाणवूं लागले. धास्तावलेल्या मनाने आपला परशू सांभाळत राम घाईघाईने आश्रमांत परतला. तिथे घडलेला अनर्थ पाहून तो दुःखावेगाने कोसळाच! स्वतःला कष्टाने सांभाळत तो विलाप करूं लागला. “बाबा आम्हां सर्वांना निराधार करून तुम्ही कसे गेलां? खरोखर आपल्या ह्या हत्येला मीच कारणीभूत झालो आहे! माझ्यावर सूड उगवण्यासाठीच शत्रूंनी आपला घात केला. मी तुमचा पुत्र म्हणवून घेण्यास योग्य नाही! मी आपला शत्रूच ठरलो! ” आपल्या पित्याचे सद्गुण, त्यांनी दिलेले प्रेम, शिक्षण आणि संस्कार यांच्या स्मरणाने रामाचा शोक अनावर झाला. “माझा आधार गेला! माझ्या पित्याच्या हत्येला मीच कारण झालो. आतां हे काळे तोंड कुणाला दाखवूं?” असे आक्रंदत राम भुईवर गडबडा लोळूं लागला. शोकाने आणि दुष्कीर्तीच्या भयाने तो इतका खचून गेला की आतांच मरण आले तर बरे होईल असे त्याला वाटायला लागले. थोडा शोकावेग कमी झाल्यावर त्याला आपल्या पित्याचा वध करणाऱ्या नराधमांचे

स्मरण झाले आणि त्याचा संताप जागा झाला. डोळे पुसून स्वतःला सावरत तो तडक माहिष्मतीला निघाला. म्हणाला, "माझ्या वडिलाच्या हत्यारांना ठार मारल्याशिवाय मी त्यांच्या ऋणांतून मुक्त होणार नाही! अन्यथा मी नरकात जाईन! " असे बोलून बाहेर पडणाऱ्या रामाला माता रेणुका आणि बंधूंनी समजावले तरी त्याने ते नीट ऐकलेसुद्धा नाही. गगनभेदी गर्जना करीत वायुवेगानं तो माहिष्मतीकडे निघाला. नगराच्या बाहेर उभा राहून त्यांना शत्रूंना युद्धाचे आह्वान दिले. "अरे भ्याडांनो, मी आश्रमांत नसतांना चोरासारखे येऊन माझ्या निरपराध पित्याला ठार करून तुम्ही काय मिळवलेत? मी तुमच्या पित्याला रणांगणांत मारले! तुम्हांला सूड घ्यायचाच होता तर माझ्याशी युद्ध करायचे होते. ते सोडून माझ्या वयोवृद्ध, तपोवृद्ध निरपराध पित्याला ठार करून तुम्ही चोरासारखे पळून आलांत? ह्यात तुम्हांला पराक्रम वाटला काय? आतां तो पराक्रम मला दाखवायला समोर या! " ५२-७३.

असे कठोर भाषण करून रामाने युद्धाला आरंभ केला. त्याच्या परशूने बघतां बघतां सर्व सैन्याचा नाश केला. कार्तवीर्याच्या सर्व मुलांची शिरे तोडून त्यांना ठार केले. त्यांचे राजवाडे पाडून जमीनदोस्त केले. तेथील सर्व वीरांचाही नाश केला. राजधानी तटबंदीसहित धुळीला मिळविली. आणि मगच तो परत फिरला. त्याने आश्रमांत येऊन आईला आपल्या पित्याच्या हत्याऱ्यांना मारून त्यांचे सैन्य आणि राज्याचा विध्वंस केल्याचे सांगितले. पण एवढ्याने त्याचा राग शांत झाला नव्हता. अजून अधर्माने वागणारे उन्मत्त क्षत्रियकुळ उरले होते. क्रोधाविष्ट परशुरामाने आपल्या मातेसमोर भीषण प्रतिज्ञा केली, तो आवेशयुक्त स्वराने म्हणाला, "एकवीस वेळा ह्या पृथ्वीवर फिरून माझ्या बाहुबळाने ती निःक्षत्रिय करीन. क्षत्रियकुळ निर्बीज करून त्यांच्या रक्ताने पांच तळी भरून त्या रक्ताने तर्पण करूनच मी पित्याच्या ऋणांतून मुक्त होईन!" ७४-८४.

रेणुकेला हे पुत्राचे वचन ऐकून समाधान वाटले. "छान, छान! रामा तू आपले वचन सत्य करच! पण त्याआधी मी माझ्या पतीचा मार्ग अनुसरीत सहगमन करून परलोकीं जाईन. हाच आमचा धर्म आहे. माझ्या सहगमनानंतर तूं आम्हां दोघांचे अंत्यविधि यथाशास्त्र कर. त्यानंतरच तू तुझी क्षत्रियसंहाराची प्रतिज्ञा पुरी कर. आतां मी सांगते ते नीट ऐक. अर्जुन हा श्रीदत्ताचा भक्त होता. त्याला तूं ठार मारलेस. त्यामुळे श्रीदत्तप्रभूंचा कोप होऊं शकतो. श्रीदत्तप्रभू भक्तवत्सल भक्ताभिमानी आहेत. आणि ते सर्वशक्तिमानही आहेत. ते तुलाच संपवतील! तेव्हां तुझी ही पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा खरी करायची असेल तर प्रथम भगवान दत्तात्रेयांची कृपा संपादन केली पाहिजे. हे माझे बोलणे त्रिवार सत्य आहे. त्याकडे तू अजिबात दुर्लक्ष करूं नकोस. मी त्यांना युक्तीने प्रसन्न करून तुला त्यांचे दर्शन घडवून देईन. तेच तुला तुझी प्रतिज्ञा खरी करण्याचे सामर्थ्य देतील. तुला त्यांच्या पदरांत घातल्यावरच मी सहगमन करीन. माझ्या सांगण्याप्रमाणे वागल्यानेच तुझे इष्ट कार्य निर्विघ्न सिद्धीला जाईल. अन्यथा बालिशपणाने कांही केलेस तर तुझीच फसगत होईल! एकदां दत्ताचा प्रसाद झाला की मग तूं साक्षात काळाचाही गळा घोटशील! मग या क्षत्रियांचा काय पाड?" रेणुकामाता पुढे सांगू लागली, "आतां तू एक कावड कर. एका पारड्यात ऋषींचे शरीर ठेव आणि दुसऱ्यात मला! आम्हांला याप्रमाणे उचलून घेऊन तू दक्षिण दिशेकडे चल. जिथे तुला आकाशवाणी ऐकायला येईल तिथेच तूं कावड ठेव. तिथेच तुला योगसंपन्न ब्राह्मण आचार्य मिळतील. त्यांच्या मार्गदर्शनाने माझे सहगमन आणि आमच्या अंत्यक्रिया तुला पार पाडतां येतील. "८५-९७.

परशुरामाने आईच्या आज्ञेप्रमाणे कावड तयार केली. तेलाच्या पात्रांत जमदग्नींचा देह आदरपूर्वक एका बाजूला ठेवला. दुसऱ्या बाजूला आईला काळजीपूर्वक बसविले. अशी ती कावड

उचलून खांद्यावर घेतली आणि कान्यकुब्ज देशांतून तो दक्षिणेकडे चालूं लागला. वाटेवर अनेक तीर्थे, तपस्वी मुनींचे आश्रम, लहान-मोठे पर्वत, अरण्ये, विविध देवतांची मंदिरे, प्रसिद्ध स्थाने ओलांडीत तो पितृभक्त, धर्मज्ञ भार्गवराम सह्य पर्वतावर येऊन पोंचला. त्याबरोबर तिथे आकाशवाणी झाली, “रामा! तुझ्या वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी हेच स्थान योग्य आहे. इथे तुला योग्य आचार्य मिळतील तसेच तुझे संकल्पित कार्य साधेल आणि मनोरथ पूर्ण होतील.” ही अशरीरी वाणी कांनांवर पडलेली रामाने आपल्या आईला सांगितली आणि तिनेही ती ऐकल्याची खात्री करून घेतली. आईची आज्ञा घेऊन त्याने कावड खाली ठेवली. म्हणाला, “माते! तू जसे सांगितलेस तसेच सर्व आता पार पाडतो. आतां माझ्या मनांत मुळीच संशय उरला नाही.” यावर रेणुकामाता बोलली, “होय रामा, तूं आतां आम्हांला खाली उतरून ठेव आणि ब्रह्मनिष्ठ आचार्यांचा शोध घे!” त्याप्रमाणे कावडीतून आईला उतरवून रामाने शोध घेतला तेव्हां त्याला तिथे जवळच एक आश्रम दिसला. त्या आश्रमांतील तपस्वी मुनींना बघून त्याला आनंद वाटला. ९८-१०८.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा बाविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

### डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[2]

### अध्याय २३ वा.

**ययावामलकीग्रामं सह्याद्रौ मुनिमण्डितम्।।२०।।**
**प्रशान्तबाधं निर्वैरं सर्वकालसुखावहम्।।**
**ऋषिभिः संवृतं रम्यं कन्दमूलफलान्वितम्।।२१।।**
**सिद्धविद्याध्रगन्धर्वकिन्नरोरगचारणैः।।**
**वृतं सह्याचलप्रान्ते ददर्शाश्रममुत्तमम्।।२२।।**

**श्रीदत्तः प्राह न विधिं निषेधं वा न वेद्म्यहम्।।**
**यथेष्टां गतिमाश्रित्य स्थितोऽस्मीह पिशाचवत्।।३१।।**
**अनाचारो न जानामि धर्मं वाऽधर्ममप्युत।।**
**इत्युक्तः प्राह रामस्तं त्वमेव मुनिसत्तम।।३२।।**

**विधिं** वेदोक्तं कर्मविधानम्। **त्वंन्हेंन्ल**धर्मादिरूपं प्रतिषेधं **त्वं स्र्न्डीँशंट्टिं** बाह्योक्तिः। अविदुषोऽविद्याव-
स्थायां कर्तृकरणाद्यनात्मदर्शनस्य विद्यमानत्वात् 'यत्र हि द्वैतमिव भवति
तदितर इतरं पश्यति यत्र वा अन्यदिव स्यात्तत्रान्योऽन्यत्पश्येत्' इत्यादि-
भेददर्शनश्रवणं तस्य ज्ञानाधिकारसंपत्तये श्रुत्या विधिनिषेधश्चोपदिश्यते।
ज्ञानिनस्तु 'यत्र त्वस्य सर्वमात्मैवाभूत्तत्केन कं पश्येत्' इति द्वैताभावान्न
विधिनिषेधो किं पुनरीशस्य।।३१।।

अंङ्क्ष्ट अंङ्क्ष्टट् द्नस्र्ंन्वहल्ळंन्विंन्ल त्वंस्र्न्वं
हल्ळंन्विंन्ल रु ट्टंडीव्लंश्ल् त्वं स्न्ट्टें श्लंह्मश्लं ह्मेंऽत्वंङ्क्ष्ट□। अंद्नट्टंवं शंट्टस्न्वं द्नश्लें-
ङ्ख्वंव्लंस्न्ट्टीँ।।३२।। **ख्रेंटट्टंट्टिंट्टस्न्ढ्ढशंल्लँ**हल्ळंन्वल्न्वींद्नद्नंन्वें□ ।।३३।।
द्नंक्लंव्ट्टंष्टें
इन्विंड्ढश्लैं□ हमद्नंह्नछ्नीं श्लेंख्रश्लं□ *हमद्नंहश्लं*□ हंळडंडश्लं अंवंहंडख्रेंट□ ट्टें त्वं स्न्त्वट्टें
श्लंह्मश्लंट्टंहमुक्लंट्टस्न्ट्टीँ। 'अहंळडंशंहमद्नंहँशंष्व द्नंशीँ' ईट्टं ह्नीट्टें□। *हम्व्लंस्न्श्लें ल्श्लेंश्लें* त्वं
व्लंस्न्ट्टंट्टिंश्लं**हम्व्लंस्न्श्लं**□ शंत्वेंऽख्रेंङ्क्षंष्टट्टस्न्ट्टीँ 'श्लंत्वंशंत्वंहम त्वं शंत्वींट्टें' ईट्टं ह्नीट्टेंष्टड्डिंहंह्मश्लं
शंशं **वीं ट्टें स्न्त्स्न्ट्टें**। त्वं वीं ट्टेंऽद्नं। द्नंक्लें श्लंह्नछ्नट्टस्न्ड**हमद्नंहश्लं**□ द्नंद्नं 'हम्हमंख्रें'
ह्मेंऽद्नं द्नंद्नं' इट्टश्लींक्ते□। अट्टं ल्स्**हम्व्लंस्न्श्लें** त्वंत्वत□। 'त्वंत्वत्वट्टें श्लंट्टंश्लेंऽद्नश्लंत्व
श्लैंष्टत्वंह्‌ व्लंख्ख्वंशंद्नंछ्नैं□।। 'व्लंक्लंस्न्हमट्टंड ष्टक्लेंश्लीश्लँट्टें व्लंख्र्ढ्वींह्नछ्नश्लें।। अह्लें
श्लंट्टंट्टस्न्शंट्टेंह्‌ स्न्ैष्टंख्रश्लंव्लंष्टशंत्वठंष्टशीँ' इट्टश्लींक्ते□।।३५।।

**शंट्टं□ हमस्र्‌ ट्टस्न्शेंस्न्वं स्न्वंडत्वंश्लिं द्नंष्टंस्न्ष्टं।।**
**ल्व स्न्ष्टिं शंह्लंशंश्लं ह्मूंह्निंछ्नह्मिंठंट्टश्लंत्वंट्टंवं ष्टटिं।।३८।।**
**ल्वैं स्न्वेंव ष्व द्नेंह्नीं ह्मिंठंट्टेंहम ट्टस्न्शंत्वंशंश्लं।।**
**डेंह्लेंत्विंड्ढश्लंशंत्वं□द्नंटंह्ल्वं ष्टेंव्लश्लें स्न्ष्वंक्लंटं।।३९।।**
**अत्वंशंश्लं** द्नंष्टटंशंट्टस्न्द्नं ट्टंट्टं□ द्नंष्टं अत्वंस्न्ङ्क्वंश्लिंट्टस्न्ट्टीँ। अष्वंक्लश्लंहमस्न्ष्व द्नंशंह्लडें

[2] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

र्ह्लेट्टं। ह्मंर्श्वंल्व ष्टटश्लंडीँ स्न्श्लंव् ट्टंष्व द्वेंटं ष्वंक्लश्लं अस्न्श्लंव् ट्टेंत्रंष्वंक्लश्लेंट्टश्लंठँ□।
त्र्वंत्रस्न्ह्मश्लं ड्वंख्डींट्टड्रंडक ट्टरुं क ठं् ड्वेंट्टीँ 'अड्वंरेंक शंँ' ईट्टं ह्लींट्टश्लींक्त् ड्ढंद्रंश्लंट्टीं्
'स्न्टंत्रंह्निंछ्न- ह्मंह्नछ्नंर्ट्टिं। ट्टांह्ल ह्मं्कश्लंरंट्टं द्रंकं ट्टं□ 'क त्रेंट्टश्लंह्ल- र्डेह्लेट्टं।
'ड्कंरंह्मंस्न्डंस्न्टेंह्लंट्टीँ' ईट्टं त्रश्लंश्लंट्टीँ। 'अड्वं ह्ल ह्मं्कश्लंद्रंकं ट्टंह्मट्टेंड्वेंऽ ळंदंट्टिंरं-
कंठंरुं। ष्टड्वंअंडैं ष्वेंह्लट्टेंड ष्वंक्लश्लेंह्लैं ह्मं्कश्लंट्टंह्मड्डंखं। ष्वेंह्लट्टेंडद्रंट्टश्लंभिज्ञा तेजोबन्नादिलक्षणाम्। प्रकृतिं
गमयेच्छ्रौतीमजाक्लृप्तिमधुत्ववत्'
इति। अनेन पररूपं दर्शितम्। स्त्रीवद्व्यवहारास्तु न तात्त्वि-
काः।।३९।।४०।।४१।।

**ह्मंट्टंह्मिंद्रंहँट्टंद्रंडद्रिंट्टेंऽख्रिंत्रं□ ह्रींह्रींव्लेंऽकँ ह्मंह्लह्यंस्न्ट्टीँ।।**
**द्रंटेंशींह्लँाह्नंट्टं□ ह्मंरुँ ड्कंक्कीं ष्ठ ड्कंड्केंड्वँश्लंत्स्न्त्रंरंशँ।।५०।।**

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय २३ वा.

**मग परशुराम मायबापांसी। घेऊन भेटे दत्तासी। रेणुका स्तवी दत्तासी। रेणुकेसी स्तवी दत्त।।४८।।**
**आवश्यक करून। रेणुका सिद्ध होऊन। करी सहगमन। हें निरूपण तेविसाव्यांत।।४९।।**

ह्या अध्यायाच्या आरंभीच श्रीस्वामी महाराजांनी वेदधर्मा गुरूंच्या मुखाने त्याला रेणुकाख्यान असे नांव दिले आहे. रेणुका हे महाराष्ट्र आणि कर्नाटकांत मुख्यतः पूजिले जाणारे एक महान दैवत आहे. माहूर येथील श्रीदत्तप्रभूंच्या निवासाजवळच ह्या देवीचे प्रमुख स्थान आहे. ह्या अध्यायांतील सर्व कथाभाग इथेच घडलेला आहे.

परशुरामाने आईवडिलांची कावड खाली ठेवून आश्रमांत प्रवेश केला. तो आश्रम तुळस, औदुंबर, पिंपळ, बेल, शमी आणि वड अशा पवित्र वृक्षांच्या घनदाट राईने नटला होता. श्रीदत्तपुराणांतील वर्णनानुसार तिथे काळ्या आंवळीची झाडे मोठ्या प्रमाणांत होती. त्यामुळे त्याला आमलकीग्राम असे नांव पडले होते. (**ययावामलकीग्रामं सह्याद्रौ मुनिमण्डितम्।। ययावामलकीग्रामं सह्याद्रौ मुनिमण्डितम्।। प्रशान्तबाधं निर्वैरं सर्वकालसुखावहम्। ऋषिभिः संवृतं रम्यं कन्दमूलफलान्वितम्।। सिद्धविद्याध्रगन्धर्वकिन्नरोरगचारणैः। वृतं सह्याचलप्रान्ते ददर्शाश्रममुत्तमम्।। ४:७:२०-२२।।**) तिथे त्याला अनेक तपस्वी मुनी दिसले. कंद, मूल आणि फळांची तिथे रेलचेल होती. सिद्ध, विद्याधर, गंधर्व, किन्नर, नाग आणि चारण इत्यादि देवयोनींचे तिथे वास्तव्य होते. सर्व प्रकारच्या बाधांचे प्रशमन झाले असल्याने तो आश्रम सर्व काळांत सुखकारक होता. तिथे सर्वच प्राणिमात्रांना आपल्या जन्मजात वैरांचाही विसर पडत होता. अशा त्या रम्य आणि पवित्र आश्रमांत पुढे गेल्यावर परशुरामाला एका अग्नीप्रमाणे तेजःपुंज अशा अवधूताचे दर्शन झाले. नारदपरिव्राजक उपनिषदांत संन्याशांच्या सहा श्रेणी सांगितल्या आहेत. बहूदक, कुटीचक, हंस, परमहंस, तुरीयातीत आणि अवधूत. ह्या सर्वांत अवधूत सर्वश्रेष्ठ असून तो सर्व नियमाच्या पलीकडे आहे. तो निरंतर स्वरूपनुसंधानात राहतो. तसेच तो अजगर वृत्तीने कुणाचेही अन्न ग्रहण करू शकतो. अवधूत उपनिषदांत म्हटले आहे :-

**‘अक्षरात्वाद्वरेण्यत्वाद्धूतसंसारबन्धनात्। तत्त्वमस्यादिलक्ष्यत्वादवधूत इतीर्यते।।१।।**
**यो विलङ्घ्याश्रमवर्णानामात्मन्येव स्थितः सदा। अतिवर्णाश्रमी योगी अवधूतः स कथ्यते।।२।।‘**

‘अ’ पासून अक्षर, ‘व’ पासून वरेण्य (श्रेष्ठ), ‘धू’पासून धूतसंसारबंधन (संसारपाश ज्याने धुवून टाकले आहेत) ‘त’पासून तत्त्वमसि आदि महावाक्यांच्या लक्ष्यांत (ब्रह्मात) स्थित असलेला असा तो अवधूत अशी व्याख्या आहे.

त्या अवधूताच्या मस्तकावर जटांचा जूट मुकुटाप्रमाणे शोभत होता. साक्षात लक्ष्मीचे निवासस्थान भासणारे, विकसित कमळाप्रमाणे सुंदर मुख, लांब, गुडघ्यापर्यंत पोंचणारे हात, शंखासारखा निमुळता घोटीव गळा, कपाटासारखी रुंद छाती असे ते अनुपम रम्य रूप पाहतांच अर्जुनाला तेच भक्तांचे कैवारी दत्तप्रभु आसल्याची खात्री पटली. आश्चर्यानंदाने भारावून रामाने आणखी पुढे येऊन पाहिल्यावर त्या अवधूतांच्या मांडीवर एक लावण्याची खाणच अशी स्त्री बसलेली पाहिली. तिच्या नखाच्या टोंकावरून अप्सरा ओवाळून टाकाव्यात, जिच्या मुखाकडे पाहून चंद्रालाही लाज वाटावी, जिच्या विशाल नेत्राना पाहून हरिणींनाही अचंबा वाटावा, पिकल्या तोंडल्याना संकोचविणारे तिचे ओठ होते, दांत हिऱ्यासारखे चमकत होते, तिच्या धारदार नासिकेने पोपटसुद्धा शरमत होते,

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

कंठासमोर शंख बेढब वाटत होते, जिच्या घेरेदार स्तनांनी गजघटांचा ताठा उतरावा, बेंबीच्या खोलीने भौंवऱ्याची खोली तुच्छ करावी, जिच्या कटीने सिंहालाही लाजवावे, तिच्या चालण्याने हत्तीही वरमावेत, हातांच्या नाजुक रेखीवपणापुढे पालवीनेही सुकून जावे, नितंबाच्या डौलाने पर्वतही झुकावेत अशा त्या रमणीला पाहून वाटावे कोटी मदनांना गाळून हे ब्रह्मदेवाने पहिलेच सर्वांगसुंदर स्त्रीरत्न घडवले असावे. जिचा रोम न् रोम सूर्यासारखा झळाळत होता अशी ती तेजस्विनी श्यामवर्ण दत्ताच्या मांडीवर मेघांत तळपणाऱ्या विजेसारखी भासत होती. अशा त्या अनघेला मांडीवर घेऊन, तिच्या गळ्यांत गळा घालून दत्तप्रभू प्रेमातिशयाने तिचे चुंबन घेत होते. नग्नावस्थेत त्यांची परस्परांशी चाललेली प्रणयक्रीडा रंगात आली होती. हावभाव, कूजन आदींनी ते एकमेकांत मिसळूनच गेल्यासारखे वाटत होते. मुळांतच ते दोघे नव्हते तर द्वैताचे नांव तरी कुठून येईल? १-१६.

हा सगळा मायेचा थाटच होता. ही परशुरामाची परीक्षाच होती ह्याच मायावी स्वरूपाने श्रीदत्तप्रभूंनी देवादिकांना पळवून लावलेले आपण पाहिले आहे. पण परशुरामही भगवंताचीच विभूति होती. हे सर्व पाहून त्याच्या मनांत कांहीच किंतु उत्पन्न झाला नाही. ज्याची श्रद्धा या सर्व विपरीत दर्शनाने थोडीसुद्धा विचलित होत नाही आणि जो धैर्याने पुढे जातो तोच परमधामाचा अधिकारी होतो. रामाची धिटाई पाहून दत्तप्रभू तसे नग्नच निर्लज्जपणे त्याच्यासमोर उभे राहिले. परशुरामाने अत्यंत नम्रपणे दोन्ही हात जोडून साष्टांग नमस्कार केला आणि आपली हकीकत सांगायला सुरुवात केली. दोन्ही हात जोडले याला महत्त्व आहे. देव, <u>गुरु, वडीलधारे यांना दोन्ही हातांनी वांकूनच नमस्कार केला पाहिजे.</u> एका हाताने नमस्कार निषिद्ध आहे. हाताने पदस्पर्श करतांनाही उजव्या हाताने उजव्या पायाला आणि डाव्या हाताने डाव्या पायाला स्पर्श करावा असे शास्त्र आहे. त्यासाठी हात एकावर ठेवावे लागतात. आजकाल वडील माणसांपुढे झुकल्यासारखे करून एक हात कसाबसा जमिनीला टेकून चटदिशी ताठ होण्याची पद्धत प्रचलित होत आहे. त्याने नमस्काराचा उपचार पुरा झाल्यासारखे कदाचित वाटत असेल. पण नमस्काराचे शास्त्रोक्त फळ मात्र मिळणार नाही. देव, गुरु, मोठी माणसे यांना नमस्कार करण्याचे फळ फार मोठे आहे. ज्येष्ठांना केलेल्या नमस्काराच्या साध्या क्रियेने आयुष्य, विद्या, कीर्ति आणि बळ यांची वाढ होते असे मनूचे सांगणे आहे. (अभिवादनशीलस्य नित्य वृद्धोपसेविने। तस्य चत्वारि वर्धन्त आयुर्विद्या यशो बलम्।।) १७-१९.

परशुराम म्हणाला, "माझे वडील जमदग्नि मरण पावले आहेत आणि माता रेणुका त्यांच्याबरोबर सती जात आहे. माझे नांव राम आहे. सर्वज्ञ प्रभो! आपण हे सर्व जाणतांच. आम्ही कान्यकुब्ज देशांतून आलो आहोत आणि इथे झालेल्या आकाशवाणीला अनुसरून मला आपल्या दर्शनाचे भाग्य लाभले आहे!"

तेव्हा दत्तप्रभू म्हणाले, "मला विधि, निषेध, उपाधि हे कांहीच कळत नाहीत. मी अस्पृश्य आणि अभाष्य आहे. धर्माला तर मी शिवतसुद्धा नाही." यावर रामाला कांही उत्तर सुचेना. तरीही नेटाने तो म्हणाला, " आपण योगेश्वर जगन्नाथ आहां! जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लयाचे कारक आहांत. नित्य आनंदस्वरूप, त्रिगुणांच्या पलीकडे असलेले अनंत आहांत. आपल्याला धर्म आणि अधर्माचा काय लाग? "

दत्तप्रभू म्हणाले, "अरे शहाण्या! हे तुझ्या बोलण्यातून तुझा निखळ मूर्खपणाच प्रकट दिसतो आहे! माझ्या अमंगळपणाची समोर दिसत असेली चिह्ने तुझ्या ध्यानांत येत नाहीत कां? गुण काय आणि दोष काय याचा तुला कांहीच विवेक दिसत नाही! मी स्त्रीलंपट आहे. धर्म आणि अधर्माचा त्याग करून स्वैराचाराने वागणारा मी पराधीन आहे. माझ्याशी संपर्क ठेवू नये किंवा भाषणही करू

नये असा मी आहे. नीट पहा!" सद्गुरूवांचून ज्ञान होत नाही ह्या वेदांच्या सिद्धांताला बळकटी आणण्यासाठी रामाने मौन धारण केले आहे. ह्या अवतारांत हे ज्ञान त्याला दत्तगुरूंकडूनच प्राप्त करून घ्यायचे असल्याने ह्या दत्ताच्या बोलण्याला उत्तर देण्याचे कार्य त्याने रेणुकामातेवर सोडले. १८-२७.

भार्गवराम निमूट उभा राहिला. स्वतः विष्णूंचा अवतार असूनही रामाने इथे अज्ञानाचे पांघरूण घेतले आहे असे वाटते. अवतारांनासुद्धा माणुसकीच्या मर्यादा पाळाव्या लागतात.

## रेणुकेने विशद केले श्रीदत्तस्वरूप.

बाह्यतः आत्मनिंदेसारख्या वाटणाऱ्या ह्या दत्ताच्या बोलण्यांत गूढ अर्थ आहे. अविद्येमुळे ज्याला द्वैत भासते, म्हणजे आत्मस्वरूपापासून जीव आणि जगत भिन्न भासतात त्यालाच कर्तृत्व, कर्म, करण आणि कार्य ह्यांचे भान असते. वेदांनी अशा अज्ञानी जीवांना ज्ञानाची योग्यता प्राप्त व्हावी यासाठीच विधि आणि निषेध सांगितले आहेत. आत्मस्वरूपांतच स्थित असलेल्या ज्ञानी महात्म्यांना आपल्याहून भिन्न असे कांहीच किंवा कुणीच दिसत नसल्याने ह्या विधिनेषेधांचे काय प्रयोजन? दत्तप्रभू तर साक्षात भगवंतच आहेत. आचरणाचे नियम, ज्याला कांही मिळवायचे आहे त्याच्यासाठीच असतात. 'नानवाप्तमवाप्तव्यं' (भगवद्गीता ३:२२) अशा परमेश्वराला आचाराचा काय संबंध? तसेच अस्पृश्य म्हणजे इंद्रियांना न जाणवणारा आत्मा हेच त्याचे स्वरूप आहे. अभाष्य म्हणजे ज्याची अभिव्यक्ति करण्याला चारी वाचा असमर्थ आहेत. असंभाव्य म्हणजे कल्पनातीत – मनालाही न आकळणारा. अशा मला विधिनिषेधाचा काय संबंध?

राम दिङ्मूढ झालेला पाहून, हा गूढार्थ जाणणाऱ्या, कावडीत बसलेल्या माता रेणुकेने दत्तप्रभूंना वंदन केले आणि तिने भाषणास आरंभ केला. "महाराज! हे आपले वचन अमृताहून गोड वाटते आहे. सकृद्दर्शनी कठिण असले करी ह्याच्या अंतरंगांत मधुर सार आहे. मी हे आपल्याला उकलून दाखवते. विधि-निषेधांची मर्यादा तीन गुणांच्या आंतच आहे. शास्त्रग्रंथांची धांव तीन गुणांच्या सीमेपुरतीच मर्यादित आहे. आपले अनन्य भक्तसुद्धां तीन गुणांना सहज उल्लंघून ब्रह्मस्वरूप होतात. (मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेव्यते। स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते।। भगवद्गीता १४:२६।।) मग आपण तर साक्षात् त्रिगुणातीत ब्रह्मच आहां! विधिनिषेधांची वार्ता तरी आपल्या कशी शिवूं शकेल? आपला स्त्रीबरोबर संग कसा घडेल? ही स्त्री म्हणजे मायाच आहे. ही नाही म्हणावी तर दिसते, अनुभवाला येते. आहे म्हणावी तर पाहतां पाहतां विरून जाते. अशी ती अनिर्वचनीय आहे. सशाचे शिंग हे बोलण्यातच येते. प्रत्यक्ष त्याला अस्तित्व नसतेच. अशा शब्दाला विकल्प असे नांव आहे. (शब्दानुपाती वस्तुशून्यो विकल्पः। योगसूत्र १:९) तसेच मायेचे स्वरूप आहे. अशी माया आपल्या जवळही फिरकूं शकत नाही. ही माया त्रिगुणात्मक आहे. त्या तीन गुणांच्या पलीकडे आपण आहां. आपण ह्या जगद्रूपी अध्यासाचे अधिष्ठान आहां. मन, बुद्धि, इंद्रियादि उपाधींनी घडलेल्या तीन देहांचे आपण केवळ साक्षी आहांत. शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे पांच विषय अनुक्रमें कान, त्वचा, डोळे, जीभ आणि नाक या पांच इंद्रियांनी ग्रहण करतां येतात. पण आपण त्यांचे साक्षी मात्र आहांत. विषयांची पोंच आपल्यापर्यंत नसल्याने आपण अस्पृश्य आणि अभाष्य आहांत हे खरेंच आहे! जीव मायेच्या गुणांना भुलून अध्यासाने उपाधींचा अभिमानी होतो, अर्थात् त्यांनाच आपले स्वरूप मानतो त्याला त्या मोहांतून सोडवण्यासाठीच वेदांच्या द्वारे आपणच धर्माधर्माचे, विधिनेषेधाचे निरूपण केले आहे. असे आपण सर्वतंत्रस्वतंत्र परमेश्वर आहांत. देह, त्याला कारणीभूत कर्म आणि त्याची इंद्रियें या सर्वांच्या पलीकडचे आहांत. असे असूनही केवढा चमत्कार आहे की भक्तीच्या भुकेने

आपण भक्तपराधीन होतां! आपले स्वातंत्र्य सोडून भक्ताच्या कार्यासाठी आपण परवशता स्वीकारता. हे कल्पित रूप धारण करतां. ह्या कल्पित रूपानेच आपण असंख्य भक्तजनांना अकल्पित अशा स्वस्वरूपाचे दान केले आहे! ही आपली लीला अगम्य आहे आणि अनिर्वचनीय आहे. म्हणूनच आपण अस्पृश्य आणि अभाष्य आहांत खरे! आपले सत्य स्वरूप जाणणे हीच आपली प्राप्ती होय. कारण आपणच सर्व आहांत. आपल्याहून वेगळे ह्या विश्वांत कांहीच नाही. आपल्याला जाणण्यासाठी वेदवाक्याचेच प्रमाण आहे. ते परोक्ष असले तरी त्याला मानून, त्यावर श्रद्धा ठेवून, त्याचे गुरुमुखांतून श्रवण करून मननाने ते निश्चयावे आणि मग त्याचे निदिध्यासन – निरंतर ध्यान, करावे. ह्याच मार्गाने अज्ञानाचे आवरण भंगून (असत्त्वावरण आणि अभानावरण अशी दोन आवरणे आहेत. असत्त्वावरण म्हणजे परमेश्वर अस्तित्वातच नाही असे वाटणे अभानावरण म्हणजे शास्त्राभ्यासाने तो आहे असे पटले तरी त्याचा अनुभव न येणे.) आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो. म्हणजेच आपले दर्शन होते. सारांश आपण स्वतःला अस्पृश्य आणि अभाष्य असे म्हणवून घेतले त्याचे हेच स्पष्टीकरण आहे. आपण त्रिकालातीत – वर्तमान, भूत आणि भविष्य यांच्या पलीकडे आहांत; आपण केवळ स्वसंवेद्य आहांत, स्वयंप्रकाश एकमेवाद्वितीय, अभेद्य, अछेद्य, अविनाशी परब्रह्म आहांत; आपणच अधिष्ठानरूपाने ह्या जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लयाचे कारण आहांत. जीवमात्रांना वंदनीय अशा आपणांस माझा नमस्कार असो! ” २८-४२.

## श्रीदत्तकृत रेणुकास्तुति.

हे रेणुकेने केलेली स्तुति ऐकून प्रमुदित झालेल्या दत्तांनी तिचेच गुणगान आरंभिले. “हे ॐकारस्वरूप जगदंबे, ह्या विश्वरूपाने तूच साकार झाली आहेस! हा सगळा जगताचा पसारा तुझाच आहे. हे महामाये, ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर ही रूपे धरून, ह्या जगाची निर्मिति, धारणा आणि अंत तूच करतेस. तरीही तू या सर्वांपासून अलिप्त आहेस. ह्या नामरूपात्मक जगांत अनेक रूपांनी भासणारे, तुझ्या व्यक्त रूपाहून विलक्षण असे तुझे सच्चिदानंदस्वरूप आहे. ते अज्ञानी जीवांना अलक्ष्य आहे. देह, इंद्रिये, मन, प्राण तसेच अहंकार या सर्वांची साक्षी चेतना तूच आहेस. हे साक्षित्वही गौणच मानावे लागते. कारण ज्यांची तुला साक्षी मानायची त्या देहादि उपाधि अध्यासात्मकच आहेत. भासमात्र आहेत. ‘अगा जे घडिलेचि नाही’ अशा ह्या जगाचे अधिष्ठान अध्यासन्यायाने तू आहेस. म्हणजे ज्या परमेश्वराशी तू एकरूप आहेस तोच जगदाधार आहे. म्हणून तूच सर्वांचा अंतर्यामी आधार आहेस. तुला मात्र आधार नाही. यासाठीच तुला एकवीरा म्हणतात. (**मातः सर्वं त्वमेवैका वन्दनीया परावरा। एकवीरा महामाया सृष्टिस्थित्यन्तकारिणी।।३८।। एकैवानेकरूपेषु स्थितासि त्वमनामया। देहेन्द्रियमनःप्राणाहंकारेभ्यो विलक्षणा।।३९।।**) हे जगन्माते! अशा तुझी स्तुति जेवढी करावी तेवढी थोडीच आहे.

इथे दत्तप्रभूंच्या मुखांतून जे मायेचे स्वरूप विशद झाले आहे ते परब्रह्मापासून अभिन्न आणि चेतन आहे. सांख्यदर्शनात जड आणि स्वतंत्र प्रकृतीचे प्रतिपादन आहे. त्यानुसार माती जशी घटाचे तशी जड प्रकृति (प्रधान) हे जगताचे उपादानकारण आहे. घट घडविणारा कुंभारासारखा परमात्मा निमित्त कारण आहे. त्याच्या विरुद्ध अद्वैत वेदांतानुसार साप आणि त्याची नागमोडी चाल हे जसे वेगळे करता येत नाहीत त्याचप्रमाणे माया ही बह्मापासून निवडतां येत नाही. हा शांकर अद्वैताचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. त्यामुळेच ब्रह्म - म्हणजेच परमात्माच, ह्या सृष्टीचा निर्माता आणि मूलतत्त्वही आहे. ह्यालाच अभिन्ननिमित्तोपादान कारण असे म्हणतात.

पुढे दत्तप्रभू म्हणाले. “सर्वांना वंद्य असे तुझे पति महान ऋषि आहेत. संपूर्ण त्रैलोक्यांत त्यांचा मोठा लौकिक आहे. साक्षात काळही त्यांचे नांव घ्यायलाही घाबरतो. त्यांच्या अलौकिक तपश्चर्येचे वर्णन करण्यास मी असमर्थ आहे. असे असतांना त्यांचा मृत्यु कसा काय झाला? ” ४२-५३.

## रामाच्या प्रतिज्ञेला दत्तप्रभूंचे अनुमोदन.

हा प्रश्न ऐकून रेणुका गप्प राहिली. तेव्हा रामाने पुढे येऊन क्षत्रियांनी सूडभावनेने, आपण आश्रमांत नसतांना अचानक हल्ला करून आपल्या वडिलांचा शिरच्छेद केल्याचे सांगितले. हे रामाचे बोलणे कानांवर पडतांच अत्रिनंदन दत्त एकदम क्रुद्ध झाले आणि त्यांच्या मुखांतून शापवाणी बाहेर पडली, “हे क्षत्रिय ब्राह्मणांचा द्वेष करून भूमितलावर उच्छाद मांडीत आहेत. तरी यांचा लवकरच कुलक्षय होवो! वनांत विहरणारी हरणे, पाण्यात राहणारे मासे आणि समाजांत वसणारे ब्राह्मण हे सर्व निरुपद्रवी असूनही, शिकारी, कोळी आणि दुर्जन अकारण यांचा घात करतात. ब्राह्मण यदृच्छेने लाभणाऱ्या जीविकेत संतुष्ट असतात; पण धनमदाने माजलेले राजेरजवाडे पापपुण्याचा विचारही करत नाहीत. अशांना लवकरच मरण येवो!” ही दत्तप्रभूंची रोषयुक्त वाणी ऐकतांच रेणुकेने रामाला खुणावले आणि तो पुढे सरसावला. निर्धास्तपणे हात जोडून तो नम्रपणे बोलूं लागला. “मी जेव्हां आश्रमांत येऊन हा क्षत्रियांनी केलेला अनर्थ पाहिला तेव्हां दुःखाच्या भरांत अशी प्रतिज्ञा केली की मी एकवीस वेळां पृथ्वीचे परिभ्रमण करून क्षत्रियांचे निर्दळण करून त्यांच्या रक्ताने पांच डोह भरून त्या रक्ताने पितरांचे तर्पण करीन! तेव्हांच मी पितृऋणांतून मुक्त होईन! या माझ्या प्रतिज्ञेची पूर्तता आपल्याच चरणांच्या प्रभावाने होऊं शकेल. ” दत्तप्रभूंनी यावर रामाला आश्वासन दिले की, “तुझ्या ह्या प्रतिज्ञेचा मी निश्चित मान करतो. माझ्या तेजाने प्रबळ होऊन सर्व क्षत्रियांचा पाडाव करून ह्या पृथ्वीवर तू तुझे अधिराज्य शीघ्रच स्थापन करशील.” आतां रामाचा धीर आणखीनच वाढला आणि त्याने दत्तप्रभूंना कार्तवीर्याने केलेल्या गाईचे हरण आणि आपण त्याचे केलेले पारिपत्य यांविषयी सांगून त्याच्याच मुलांनी आपल्या पित्याची हत्या केल्याचे स्पष्ट केले. पुढे त्याने “अर्जुन ब्राह्मणांचा आदर करणारा होता, तसेच तो आपला कृपापात्र शिष्य होता. अशा श्रेष्ठ, पुण्यश्लोक, ब्रह्मनिष्ठ, पूजनीय राजाची हत्या माझ्या हातून झाली. त्यासाठीच मी आपली क्षमा मागून आपल्या चरणांचा आश्रय प्राप्त करून घेण्यासाठी आलो आहे,” अशी विनवणी केली. दत्तप्रभू म्हणाले, “अरे रामा! मीच त्याला तसा वर दिला होता. ख्यात्याधिकाकडून आपला रणांगणांत वीरोचित मृत्यू व्हावा अशीच त्याची इच्छा होती. ह्यांत तुझा कांहीच अपराध नाही. हा तुझ्या मनांतला सल तूं काढून टाक. तूं माझीच विभूति आहेस. माझा मित्र आहेस. निश्चिंतपणे आपल्या प्रतिज्ञेनुसार एकवीस वेळा पृथ्वीभ्रमण करून क्षत्रियांचे निर्दलन कर.” ५४ - ७१.

## रेणुकामातेचे सहगमन.

मग रामाने दत्तप्रभूंना पित्याच्या अंत्यसंस्काराचे आचार्यत्व अंगीकारून ते कार्य शीघ्र पूर्ण करण्याची विनंति केली. “तथास्तु” असे म्हणून दत्तगुरूंनी तिळ, दर्भ इत्यादि साहित्य गोळा करून रामाला मातेसह स्मशानांत नेले, तिथे लांकडे आणि गोंवऱ्या जमविल्या आणि त्याला आपल्या आईच्या स्नानासाठी बाणाने सर्व तीर्थे तिथे आणायची आज्ञा केली. ह्यांत इतर लोकांचेही अनायासे कल्याण होईल असाही एक उद्देश होता. रामाने आपल्या बाणाने भूमंडळाचा भेद करून पाताळांतून सर्व तीर्थे आणली. मग दत्तप्रभूंच्या आज्ञेनुसार प्रथम रामाने आणि नंतर त्याच्या आईने विधिपूर्वक स्नान केले. प्रत्यक्ष दत्तप्रभूच संकल्प सांगत होते आणि रेणुकामाता स्नान करीत होती. त्यामुळे त्या

तीर्थाला मातृतीर्थ (वऱ्हाडात आजही मातापूर ह्या नांवाने हे क्षेत्र ओळखले जाते.) असे नांव पडले. मग त्यांच्याकडून दत्तप्रभूंनी आवश्यक प्रायश्चित्ते करवून घेतली आणि त्रेताग्नि (प्रेताच्या संस्कारासाठी केलेला आग्नि. यालाच क्रव्याद असेही म्हणतात.) प्रज्वलित केला. त्यानंतर रेणुकामातेने सुवासिनीची वस्त्रे आणि आभरणे धारण केली आणि हळद, कुंकू, डोळ्यात काजळ, भांगात शेंदूर इत्यादि सौभाग्यद्रव्यें लावली आणि ती सहगमनासाठी सिद्ध झाली. सूर्याला नमस्कार करून ती महासती अग्निकुंडाजवळ आली. रेणुकेचे सहगमन पाहण्यासाठी देवांच्या विमानांची आकाशांत गर्दी झाली. ऊर्वश्यादि अप्सरा आणि ऋषिपत्न्या तिची ओटी भरण्यासाठी आल्या. सप्त ऋषि आपल्या पत्नींसह तिथे आले. ऋषिपत्नींनी रेणुकेला हळदीकुंकू लावून तिची ओटी भरली. रेणुकेनेही प्रसन्न मनाने सर्वांचा सत्कार करून त्यांना संकल्पपूर्वक धन, वस्त्रे आणि दागिने यांचे दान दिले. मग श्रीदत्ताचार्यांची पूजा करून तिने अग्नीला प्रदक्षिणा केली. त्या वेळी रामाला तिने श्रीदत्तप्रभूंच्या आज्ञेत रहायला सांगितले. आपली प्रतिज्ञा खरी करून गोब्राह्मणांचे पालन करावे असा उपदेश केला. सांगितले. मिळवलेली सर्व भूमि ब्राह्मणांना दान करायला सांगून त्याला चिरंजीव होण्याचा आणि सुखी राहण्याचा वर दिला. आपल्या वियोगाने शोकाकुल झालेल्या रामाला दुःख आंवरायचा उपदेश केला. आपल्याला माहेरचे बोलावणे आल्याने पतीसह तिकडे जात असल्याचे सांगून त्याला निरविले. रामाला दत्तप्रभूंच्या स्वाधीन करून तिने त्यांना आपला वरद हस्त त्याच्या मस्तकावर सतत ठेवून त्याचा प्रतिपाळ करण्यासाठी प्रार्थना केली. मग त्यांना पुनश्च वंदन करून तिने अग्नीत प्रवेश केला. त्यावेळी तिची मनस्थिति पतीच्या मीलनाला उत्सुक असणाऱ्या नववधूसारखी होती. प्रसन्न चित्ताने आपल्या पतीच्या देहाजवळ ती राजकुमारी पहुडली. त्यावेळी देवता, त्रिकालज्ञानी ऋषि आणि मननशील मुनींनी पुष्पवर्षाव केला. स्वर्गांतल्या वाद्यांच्या गजराने आणि जयजयकाराने आकाश दुमदुमून गेले. सतीच्या सान्निध्याने अग्नीचा प्रकाशही सूर्यासारखा पांढरा लखलखीत दिसूं लागला. सतीच्या यशाने आसमंत उजळून निघाले. महान पुण्यशालिनी पतिव्रता रेणुकामाता पतीसह सहगमन करतांना प्रत्येक पावलागणिक अश्वमेध यज्ञाचे फळ पावत होती. तिने अग्नीला अर्पिलेल्या प्रत्येक रोमागणिक तिने ऋषिलोकांतील कोट्यवधी वर्षांचे वास्तव्य प्राप्त करून घेतले. स्त्रीच्या देहावर साडेतीन कोटी केस असतात असे म्हणतात. ते सर्व पातिव्रत्य धर्माने अग्निनारायणाला अर्पण केल्याने लाभलेल्या पुण्याचे कोण मोजमाप करूं शकेल? अशा त्या महापुण्यवान सतीला ऋषिपत्नींनी मनोमन नमस्कार केला आणि पति हाच स्त्रियांची गति असल्याने सर्व स्त्रियांना अशीच बुद्धी द्यावी अशी भगवंताची प्रार्थना केली. त्या म्हणू लागल्या, "या रणुकेने आपल्या पित्याचे, मातेचे आणि पतीचे अशा तीनही कुळांना पावन केले आहे! पतीचे ध्यान करीत देह अग्नीला समर्पण केल्याने तिला परमपदाची प्राप्ति झाली आहे. तिला आतां पुनर्जन्म येणार नाही. सती जाणाऱ्या स्त्रीचा पति जरी दुराचारी, पापी असला तरी ती त्याला स्वर्गाला घेऊन जाते. याउलट स्त्री जर दुराचरणी असेल तर ती वरील तीनही कुळांना घेऊन नरकाला जाते आणि यमाच्या दंडाला पात्र होते. सहगमन हे खरोखर सर्व पापांचे प्रशमन करते. यासारखा दुसरा महान यज्ञ नाही," अशा प्रकारे स्तुति करीत आणि रेणुकेला नमन करीत त्या सर्व ऋषिपत्नी आपापल्या घरी निघून गेल्या. ७२ - १०४.

दिवंगत पतीसह चितेवर दहन करून घेण्याचा धर्म आतां कालबाह्य झाला आहे. वर वर्णन केलेले सहगमनाचे माहात्म्य यथार्थच आहे. पातिव्रत्य धर्माचे श्रेष्ठत्व दत्तचरित्रात वारंवार वर्णिलेले आहे. तसेच अनसूया, कौशिक सती, रेणुका इत्यादि सतींच्या जीवनांतून त्याचा साक्षात्कारही घडविला आहे. सती जाण्याच्या प्रथेविरुद्ध अनेक तथाकथित सुधारकांनी खूप कांही लिहिलेले आहे.

त्यांत बरेच तथ्यही आहे. ह्या प्रथेचे समर्थन करण्याचा किंवा या धर्माचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रस्तुत लेखकाचा मुळीच हेतु नाही. वैदिक धर्मात ह्या सतींनी महान आदर्श निर्माण केले हे मान्य करूनही सती जाण्याच्या प्रथेत मध्ययुगीन काळांत मोठ्या प्रमाणावर विकृति निर्माण झाली होती आणि स्वार्थी लोकांनी धर्माच्या नांवाखाली असंख्य निष्पाप स्त्रियांचे खून पाडले हे विदारक सत्य आहे. धर्मशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना हे सहज लक्षांत येईल की सहगमन हे कितीही श्रेष्ठ मानलेले असले तरी त्याची यत्किंचितही सक्ती त्यांत अभिप्रेत नाही. शिवाय पतीचा देह जवळ नसेल, स्त्री गरोदर असेल किंवा तिला अंगावर पिणारे मूल असेल तर तिने सहगमन करू नये असा ठाम निषेधच आहे. पण 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' ह्या न्यायाने मध्ययुगीन काळांत सतीच्या नांवाखाली स्त्रियांवर घोर अन्याय झाले. त्याच बरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की आपल्या आदर्शांसाठी प्राणांचीही पर्वा न करणाऱ्यांचे समाज आजही कौतुकच करतो. पतीशी एकनिष्ठ राहणे, सर्व अवस्थांत त्याचे अनुसरण करणे हा प्राचीन भारतीय सतीचा आदर्श ऊठसूठ घटस्फोट मागणाऱ्या आधुनिक महिलांच्या आकलनाचा विषय होऊंच शकत नाही. भौतिकाच्या पलीकडे मानवी जीवनाचे अस्तित्वच नाकारणाऱ्यांना सती आपल्या अमूल्य मानवी देहाचे बलीदान करून काय मिळवते हे समजणे अशक्य आहे. त्यांच्यासाठी हे लिखाणच नाही. मात्र श्रद्धावंतांसाठी मात्र रेणुकामातेसमान महान सती दिव्यत्वाच्या प्रचीतीचा अखंड स्रोत आहेत हे मात्र खरे!

हा सर्व प्रसंग झाल्यावर दत्तप्रभूंनी परशुरामाजवळ असे उद्गार काढले की, "तुझी आई खरोखरच धन्य आहे!" हे शब्द कानांवर पडतांच रामाचा इतका वेळ कसा तरी धरून ठेवलेला धीर एकदम सुटला. आपल्या आईचे प्रेम आणि तिचे श्रेष्ठ गुण आठवीत राम भूमीवर शरीर टाकून हंबरून रडूं लागला. तेव्हां दत्तात्रेयांनी त्याला उपदेश केला की, "अरे रामा! तुझी आई अत्यंत श्रेष्ठ गतीला पावली आहे. तिचा कां उगीच शोक करतोस? हा केवळ मोह आहे. स्वतःला सांवर." ह्या दत्तप्रभूंच्या उपदेशाने रामाचा विवेक जागा झाला. त्याने धीराने शोक आवरला आणि दत्ताचार्यांना पुढील क्रियाकर्म पूर्ण करण्याची प्रार्थना केली.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा तेविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय २४ वा.

**तत्सुत राम करी क्रिया। पूजी दत्ताचार्या। दत्त पुनः दावी तया। मायबापांसी ते क्षणीं।।५०।।**
**क्षत्रियहनन करून। राम कश्यपा दे भूदान। राहे समुद्रतीरीं जाऊन। हें कथन चौविसाव्यांत।।५१।।**

वेदधर्मा गुरु दीपकाला पुढे सांगूं लागले, "रामाने विवेकाने शोक आंवरून आईवडिलांचे क्रियाकर्म करण्यासाठी दत्तप्रभूंनाच आचार्य होण्याची प्रार्थना केली. योग्यांचे ध्यान असलेल्या जगद्वंद्य दत्तप्रभूंनी त्याच्याकडून विधिपूर्वक मृत्तिकास्नान, रोज वाढणारी तिलांजली, तर्पण, पिण्डदान इत्यादि सर्व कर्मे यथासांग करवून घेतली. सर्व क्रियाकर्म झाल्यावर त्यांनी रामाला विचारले, 'अरे रामा! तुझे आईवडील कुठे आहेत ते तुला माहीत आहे का?'

# प्रमाणविचार

राम म्हणाला, "असे का विचारतां? ते मरण पावले. आपण ह्या उत्तरक्रियेद्वारां त्यांना उद्धरून उत्तम लोकांत पाठविले. आपल्या कृपेने माझे मायबाप तरले. यापरता मोक्ष तो काय?" किंचित् हसून दत्तगुरु म्हणाले, "रामा! तू पाहतां पाहता भुललास की! तूसुद्धा मनोमन केवळ प्रत्यक्ष प्रमाणावरच विश्वास ठेवतोस असे दिसते."

प्रमाण म्हणजे ज्ञानाचे साधन. आपल्याला ठाऊक नसलेली गोष्ट ज्या साधनाने कळते त्याला प्रमाण असे नांव आहे. प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे आपल्या डोळ्यांनी पाहणे, कानांनी ऐकणे, हाताने स्पर्शणे, जिह्वेने चाखणे आणि नाकाने हुंगणे. कोणत्याही नवीन वस्तूचे ज्ञान आपल्या या ऐंद्रिय प्रमाणांनीच होते. आपण या इंद्रियांच्या द्वारा होणाऱ्या ज्ञानाचीच खात्री मानतो. 'मी प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहिले, माझ्या आपल्या कांनांनी ऐकले ' इत्यादि प्रकारे आपण त्याची ग्वाही देतो. पण प्रत्यक्ष प्रमाणांनी होणारे ज्ञान हे व्यवहारांतसुद्धा आपल्याला पुरे पडत नाही. प्रत्यक्ष प्रमाणाने होणाऱ्या ज्ञानावरून तर्काने त्याच्या पलीकडचे ज्ञान आपल्याला होऊं शकते. उदाहरणार्थ एखाद्या जागेतून धूर येऊं लागला की आपण तिथे आग लागली असावी असे अनुमान करतो. चंद्रावर पाणी आहे, एव्हरेस्ट पर्वताची उंची अमुक आहे इत्यादि ज्ञान आपल्या अनुमानानेच मिळते. एवढ्यानेही भागत नाही. ही दोन्ही प्रमाणे जे ज्ञान देऊं शकत नाहीत ते शब्दप्रमाणाने मिळवता येते. रेल्वेच्या किंवा विमानाच्या येण्या-जाण्याच्या वेळा आपल्याला कुणाच्या तरी सांगण्यावरून – म्हणजे शब्दावरून कळतात. पण हा शब्द जाणकार आणि विश्वासार्ह माणसाचा असला तरच ते प्रमाण यथार्थ ज्ञानाचे साधन बनते. हा प्रमाणविचार अध्यात्मात फार महत्त्वाचा. या क्षेत्रांत प्रत्यक्ष प्रमाण (ऐंद्रिय ज्ञान) फारच तोकडे पडते. व्यक्तीच्याच नव्हे तर मानवी इंद्रियांच्या आणि अनुमानाच्या पलीकडील गोष्टींचे ज्ञान अध्यात्मात आवश्यक असते. तिथे शब्दप्रमाणाशिवाय गत्यंतर नाही. परमेश्वरापासून उछ्वासवत बाहेर पडलेले वेद हेच सर्व आध्यात्मिक ज्ञानाचे साधन आहे. हे ज्ञान मानवी संवेदनांच्या किंवा बुद्धीच्या आंवाक्यांतले नाही. मानवी इंद्रिये आणि विचारशक्ति यांच्या मर्यादा लक्षात येण्यासाठी मन तेवढे प्रगल्भ – शुद्ध, व्हावे लागते. तेव्हांच ही खात्री पटते की मानवी जीवनाचा सूक्ष्म अर्थ, त्याचा उद्देश्य, त्याच्या सफलतेचा मार्ग इत्यादि ज्ञान होण्यासाठी अतींद्रिय

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

प्रमाणांचीच आवश्यकता आहे. वेदांबरोबरच त्यांना अनुसरणाऱ्या स्मृति, सज्जनांचा आचार आणि शुद्ध अंतःकरण हीसुद्धां मनुस्मृतीत प्रमाणे मानली आहेत. ह्याची जाणीव करून देण्यासाठीच दत्तप्रभूंनी त्याचाही केवळ प्रत्यक्ष प्रमाणावरच विश्वास असल्याबद्दल टोकले आहे. त्याला कांही विशेष अतींद्रिय ज्ञान आपण देणार असल्याचा हा संकेत आहे. १-७.

## परशुरामाला मातापित्यांचे दर्शन

दत्तप्रभू पुढे सांगतात, " तुझे मातापिता मरण पावले आणि स्वर्गाला गेले इत्यादि कल्पना अज्ञानमूलक आहेत. (**श्रीशः प्राह मृतौ स्वर्गं गतावित्यज्ञभावना। न मृतौ न गतावेतौ पश्य लीलाविहारिणौ।।** दत्तपुराण ४:८:४।।) ते सामान्य मानव नव्हते. जगताचे जनक-जननी प्रत्यक्ष शिव-पार्वतीच अनेक धर्मांची संस्थापना करण्यासाठी भूमीवर मानवी रूपाने अवतरले होते. तुझी आई साक्षात जगन्माता आणि पिताजी जमदग्नि हे तारक परमशिव आहेत. आपले भूतलावरील नियत कार्य पूर्ण होतांच ते अंतर्धान पावले असले तरी ते आजही आपल्या सर्वव्यापी स्वरूपाने विद्यमान आहेतच. ते कुठे जात नाहीत वा कुठून येत नाहीत. आतांसुद्धा ते इथे आहेतच. पाहिजे तर तुला मी दाखवूंही शकतो! रामाने "दाखवा पाहूं" म्हणतांच खरोखरच त्याला अंगावर भस्माचे पट्टे ओढलेले, जटाधरी जमदग्नि पद्मासन घालून बसलेले दिसले. त्यांच्या गळ्यांत रुद्राक्षाची माळ होती, कानांत रुद्राक्षाचीच कुंडले, दंडावर मनगटांवरही रुद्राक्षाचेच अलंकार घालून, वल्कले नेसून आणि कृष्णाजिन पांघरून, गोमुखी हातांत धरून ते जप करीत, डोळे भ्रूमध्याकडे वळवून ते एकचित्तेने ध्यान करीत होते. त्यांच्या डाव्या अंगाला नानाविध अलंकाराने नटलेली तेजःपुंज, सौंदर्याची पुतळीच वाटणारी रेणुकामाता सर्व सौभाग्यालंकारांनी सजून बसलेली दिसली. तिच्या शरीराच्या सुगंधाने भुलून भुंग्यांचे थवे जमले होते. तिच्या तेजाने ते प्रकाशपुंजासारखे दिसत होते. तिची नखे चंद्राच्या कोरीसारखी होती तर दांत हिऱ्यासारखे चमकत होते. अतुलनीय लावण्याची मूर्ती भासणारी रेणुका लोभसवाण्या स्मितमुखाने आपल्या सुखाचे आगर असलेल्या पुण्यपुंज पतीच्या तेजस्वी मुखाकडे अतीव प्रेमाने पहात होती. ८-२१.

## रेणुकादेवीचा आविष्कार.

आपल्या प्रियतम मातापित्यांना पाहून रामाचे मन आश्चर्याने आणि मायेने भरून आले. वेगाने पुढे येऊन तो त्यांच्या पायांवर पडून देहभान विसरून हमसाहमशी रडूं लागला. "कां तुम्ही मला सोडून गेलां? तुम्ही दृष्टिआड झाल्यावर मी कसा जगूं शकेन, हा विचारही तुम्ही केला नाहीत. " असा विलाप करीत रामाने आईवडिलाच्या पायांवर लोळण घेतली, इतक्यांत ते अदृश्य झाले. रामाचा शोक पुन्हां उचंबळून आला. दरिद्री माणसाला मिळालेले धन अचानक हरवले तर जसा तो कळवळतो तसा तो विह्वल झाला. त्या वेळीं दत्तप्रभूंनी त्याला उपदोश केला. ते म्हणाले, "तूं अविवेकाने मोहित झाला आहेस. त्यामुळेच तुला हे तीव्र दुःख होत आहे. तूं चैतन्यरूप आहेस. देहाच्या उपाधीमुळे आई-वडील, भाऊ-बहीण इत्यादि नाती होतात. थोडा विचार करून आपले स्वरूप ध्यानात घे. नित्य, चेतन आणि आनंदरूप अशा तुझी कोण आई आणि कोण पिता? " रामाला हे समजले तरी तो आईच्या प्रेमाचा पाश त्याला तोडतां आला नाही. तो म्हणाला, "प्रभू, आपण यथार्थच उपदेश करीत आहां. पण आईच्या मायेचा बंध कसा तोडू? मातेच्या एका घडीच्या स्तनपानाला उतराई होण्यासाठी ब्रह्मांडाचे दानही तोकडेच पडते. याहून अधिक काय बोलूं? " असे बोलून राम खाली मान घालून रडूं लागला. एवढ्यांत मोठा आवाज होऊन जमीन दुभंगली आणि तिच्यातून रेणुकामातेचे मुख प्रकटले.

डोळेपुसत रामाने आपले तोंड पुढे केले आणि त्या मातृमुखाने त्याचे प्रेमभराने चुंबन घेतले. हे आईचा अगाध पुत्रप्रेमाचा आविष्कार पाहून आनंद झाला. त्या रेणुकामुखाच्या दर्शनाला आणि पूजनाल आजही असंख्य लोक जातात आणि त्यांना त्यांच्या पीडा दूर होण्याचे तसेच कामना पूर्ण होण्याचे अनुभवही येतात. माहूरला जाऊन मातृतीर्थांत स्नान करून रेणुकेच्या मुखाचे दर्शन घेणारे उभयलोकांत पवित्र होतात.

अखिल भारतांतील अठरा आणि महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी श्रीक्षेत्र माहूर हे एक पीठ आहे. नांदेड जिल्ह्यातील माहूर येथील गडावर रेणुकेमातेचे स्थान आहे. कोलापुरं महास्थानं यत्र लक्ष्मी सदास्थिता। मातुःपुरं द्वितीयं च रेणुकाधिष्ठितं परम् ।। तुळजापुरं तृतीय स्यात सप्तशृंग तथैव च।। कर्नाटकात हिला यल्लमा म्हणतात. महाराष्ट्रात ही 'यमाई' (औंध) व 'एकवीरा' या नावांनीही प्रसिद्ध आहे. ती महाराष्ट्रातील लाखो भक्तगणांची कुलस्वामिनी आहे. रेणुकेची तांबड्या रंगाची स्वयंभू मूर्ती आहे. वर पाहिल्याप्रमाणे मूर्ति म्हणजे केवळ मुखच आहे. तोंडाचा चुंबनासाठी करावा असा चंबू केलेला आहे. मंदिराच्या दक्षिणेला महालक्ष्मी आणि तुळजाभवनीचे मंदिर छोटे मंदिर आहे. मागच्या बाजूला ५० पायऱ्या उतरून गेल्यानंतर परशुरामाचे मंदिर आहे. देवीच्या मानसपूजा भोगीपूजा व अलंकार पूजा अशा तीन प्रकारच्या पूजा घातल्या जातात. जेवण झाल्यावर हस्तमुखप्रक्षालन, त्रयोदशगुणी तांबूलदान झाल्यावर २५ पासून ५०० पानांचा विडा देवीच्या तोंडातील तांबूलप्रसाद म्हणून घेतात. रेणुकेच्या शिखरावरच्या पूर्वेकडे दोन तीन मैलांच्या सपाटीवर दत्तमंदिर आहे. तिथे पादुका आणि शिवलिंग आहे. पारंपरिक मान्यतेनुसार हे श्रीदत्तप्रभूंचे निद्रास्थान आहे. या मंदिरापासून मैलभर अंतरावर सती अनुसयेचे मंदिर असून तेथे अनसूया व दत्तात्रेय यांच्या मूर्ती व अत्रीऋषींच्या पादुका आहेत. तिथे दत्तात्रयांचा जन्म झाला असे सांगतात. २२-३५.

# परशुरामाची प्रतिज्ञापूर्ति.

या अनुभूतीने रामाचे शांतवन झाले. त्याचे चित्त स्थिर झालेले पाहून दत्तप्रभूंनी त्याला त्याच्या प्रतिज्ञेचे स्मरण करून दिले. हे श्रीदत्तपुराणांत खालील श्लोकाने सांगितले आहे. **प्राहाश्लिष्य प्रभू रामं क्षत्रियाञ्जह्यधार्मिकान्। मच्चिदंशयुतस्त्वं तु सखे जिष्णुर्भविष्यसि।।४ः८ः६।।** दत्तप्रभूंनी रामाला गळ्याला लावून सांगितले, “मित्रा ह्या धर्मद्रोही क्षत्रियांचा नाश कर. तूं माझा अंशच आहेस; तू नक्कीच विजयी होशील!” यावरील टीकेत महाराजांनी गळ्याशी लावले याचा गूढ अर्थ त्याला शक्ति दिली असा सांगितला आहे. आलिंगनाच्या निमित्ताने दत्तप्रभूंनी रामांत शक्तिसंक्रमण केले. प्रभूंच्या आज्ञानुसाररामाने प्रणीता नदीत स्नान करून विधिपूर्वक संकल्प केला आणि हातांत परशू घेऊन पृथ्वी निःक्षत्रिय करण्याच्या आपल्या मोहिमेवर निघाला. आपल्या पित्याच्या वधाचा प्रतिशोध घेण्यासाठी केलेल्या प्रतिज्ञेने त्याचे हृदय कठोर झाले होते. कुरुक्षेत्रावर जाऊन त्याने सर्व क्षत्रियांना आह्वान दिले आणि त्यांचा युद्धांत संहार आरंभला. शस्त्रविद्येत निपुण असलेले क्षत्रियसुद्धा त्याच्यापुढे टिकाव धरू शकले नाहीत. कित्येक त्याच्या नुसत्या धाकानेच मरण पावले. त्याची गर्जना ऐकूनच कित्येक स्त्रियांचे गर्भ पडले. अशी प्रकारे एकवीस वेळां युद्ध करून पृथ्वीवरील क्षत्रिय नामशेष करून टाकले. आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे त्याने क्षत्रियांच्या रक्ताने पांच तळी भरली आणि त्या रक्ताने वडिलांचे तर्पण केले. ती तळी तेव्हांपासून स्यमंतपंचक या नांवाने प्रसिद्ध झाली. आजही कुरुक्षेत्रात त्यांचे दर्शन घेणाऱ्यांचे कल्याण होते. अखेर परशुरामाचा क्रोध शांत झाला आणि आपली शस्त्रे धुवून ठेवून दत्तप्रभूंच्या दर्शनाला परतला. ३६-४५.

# रामाचा पश्चात्ताप आणि पापपरिहारासाठी यज्ञ.

दत्तप्रभूंना नमस्कार करून म्हणाला, “प्रभो! केवळ आपल्या तेजानेच मी हा क्षत्रियसंहार केला. मला प्रतिज्ञापूर्तीचे समाधान मिळाले खरे! पण आतां मला माझ्या क्रोधाचा पश्चात्ताप होतो आहे. या क्रोधाने माणसाचा विवेकच नष्ट होतो. काय करावे आणि काय नाही ह्याचे भानच रहात नाही. माझे आर्यत्व विसरून अनार्यासारखा- असंस्कृत रानटी माणसासारखाच मी वागलो नाही का? रागाच्या भरांत मी क्षत्रियकुळाचाच संहार केला. एका राजाच्या हत्येचे प्रायश्चित्त म्हणून पिताजींनी मला संपूर्ण तीर्थयात्रा करायला लावली. आतां तर मी किती राजे मारले याची गणतीच नाही. हे पाप मी आतां कसे फेडूं? या महत्पापापासून आतां आपणच माझे रक्षण करू शकतां. मी आपल्या शरण आलो आहे. आपण पतितपावन आहां. माझ्यावर कृपा करावी. ” ४७-५१.

दत्तप्रभू त्याला म्हणाले, “अरे रामा! तू ह्या दुष्ट आणि उन्मत्त राजांचा संहार करून साधूंचे रक्षण केले आहेस. हे पाप तर मुळीच नाही. धर्माचे संस्थापन केले आहेस. हे ईश्वरी कार्य आहे. यासाठीच तुझा अवतार झाला आहे. याउप्परही तुला ह्याची एवढीच खंत वाटत असेल तर श्रेष्ठ ब्रह्मर्षींना बोलावून यथाविधि यज्ञ कर. ह्याने तुझ्या पापाचे क्षालनही होईल, देवांब्राह्मणांचा संतोष होईल आणि तुझी कीर्तीही दिगंत पसरेल. सर्व क्षत्रियांचा पराभव करून तू समस्त भूमडळाचा अधिपती झाला आहेस. यज्ञाच्या निमित्ताने हे सर्वस्व तू ब्राह्मणांना करून टाक. ही पृथ्वी कश्यप ऋषींना समर्पण कर. ह्या यज्ञाने तू अत्यंत पवित्र होशील असे निश्चित समज!” श्रीदत्तगुरूंची आज्ञा शिरसा वंद्य मानून रामाने मरीच्यादि सप्तर्षींना तसेच इतरही श्रेष्ठ ऋषींना पाचारण केले. त्यांचे शिष्य आणि प्रशिष्यही आले. दत्तप्रभूंना आचार्यपदी स्थापून यज्ञाला आरंभ केला. ज्याच्या स्मरणाने कुठल्याही कर्माचे न्यूनत्व जाऊन ते परिपूर्ण होते ते भगवंतच आचार्य झाल्यावर यज्ञा उत्तम रीतीने संपन्न झाला यांत काय आश्चर्य? ज्या ज्या देवातांसाठी हविर्भाग दिले जात होते त्या त्या देवता साक्षात येऊन तो तो हविर्भाग स्वीकारत होत्या. रोजच षड्रसाने परिपूर्ण अशा अन्नाने सर्व ब्राह्मणांना तृप्त केले. शिवाय वस्त्रे आणि भरपूर द्रव्यही परशुरामाने दान केरून सर्वांना तुष्ट केले. यज्ञाच्या सांगतेनंतर कश्यप ऋषींचे विधिपूर्वक पूजन करून राजाने सर्व पृथ्वीचे त्यांना दान देऊन दक्षिणेत विपुल धन आणि रत्ने दिली. शेवटी दत्तप्रभूंचे आचार्यपूजन करून त्यांनाही अमित द्रव्य दक्षिणेत दिले. दत्तप्रभूंनी ते तेथे जमलेल्या ब्राह्मणात वाटून टाकले. भक्ताने दिलेले सुमन म्हणजे फूल (किंवा पान, फळ, जळ) यांनेच प्रसन्न होऊन आवडीने ते स्वीकारणाऱ्या भक्तभावन भगवंताला धनापेक्षा शुद्ध मनाचीच (सुमनाची) मातबरी अधिक आहे, (भ.गीता. ९:२६) हेच इथे श्रीमहाराजांनी सुमन या शब्दाच्या योजनेने सुचविले आहे. ५२-६९.

या सामूहिक आनंदाच्या क्षणी दत्तप्रभू रामाला उद्देशून म्हणाले, “तू एवढ्या लहान वयांत धुरंधर जुलमी क्षत्रियांचा एकट्याने पराभव केलास, सर्वांना सुखी केलेस आणि हा महान यज्ञही केलास. हा मोठाच पुरुषार्थ केला आहेस. हा अलौकिक पराक्रम नारायणाशिवाय कोण करू शकेल? तू साक्षात विष्णुस्वरूप आहेस! खळांचा संहार आणि साधूंचे रक्षण करण्याची आपली ग्वाही पूर्ण करायला तू अवतार घेतला आहेस. हे तुझे पावन चरित्र जे गातील तेही पवित्र होतील. ” राम ही स्तुति ऐकून अतिशय संकोचला आणि नम्रपणे उत्तरला, “यात माझे काहीच कर्तृत्व नाही. हो आपलाच कृपाप्रसाद आहे. आपला अमोघ आशीर्वादच ह्या विजयाच्या रूपाने प्रकटला आहे.” हे त्या उभयतांचे बोलणे ऐकून उपस्थित मुनींनी त्यांचा जयजयकार केला आणि त्यांना वंदन करून

म्हणाले, “आपण दोघेही महान आहांत. तुमची गति तुम्हीच जाणतां. स्थूल दृष्टीने तुम्ही दोन दिसतां पण तत्त्वतः तुम्ही एकच आहां. लोकांच्या उद्धारासाठी विविध रूपे धरून अशा लीला तुम्ही करतां. ” असे बोलून आणि वारंवार त्या गुरुशिष्यांना नमस्कार करून सर्वजण परशुरामाची लोकपावक कीर्ति वर्णीत आपापल्या घरी गेले. ७०-७९.

## त्रिपुरारहस्य.

यानंतर रामाची आणि दत्तप्रभूंची दाट मैत्री झाली. दत्तप्रभूंनी अतिशय प्रेमाने रामाला आपल्याजवळ राहवून घेतले. यज्ञदानादिकांच्या निष्काम अनुष्ठानाने रामाचे चित्त शुद्ध झाले आहे, त्याने शम-दम-तितिक्ष-उपरति-श्रद्धा-समाधान या षट्संपत्तीची जोड केली आहे, त्याचबरोबर तो विवेक, वैराग्य आणि मुमुक्षा यांनी परिपक्व झाल्याने तो आत्मज्ञानाचा अधिकारी झाला आहे हे जाणून दत्तप्रभूंनी त्याला त्रिपुरारहस्याचा उपदेश केला. तीन पुरे म्हणजे स्थूल, सूक्ष्म आणि कारण शरीरे. ही आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे व्यष्टीत आणि समष्टीतही असतात. व्यष्टीत ह्या तीन देहांचे अभिमानी विश्व तैजस आणि प्राज्ञ, जाग्रति, स्वप्न आणि सुषुप्ति या अवस्थांचा अनुभव घेत असतात. हे सर्व ज्या चितिशक्तीचे जणूं तीन प्रासाद आहेत. हीच त्रिपुरा होय. हिलाच स्वयंप्रकाश रेणुकामाता असेही म्हणतात. हीच ब्रह्मा-विष्णू-महेश या रूपांनी जगताच्या उत्पत्ती-स्थिति-लयाचे कारण आहे. असे असूनही ती असंग, उदासीन, निर्गुण, निराकार, एकमेवाद्वितीय आहे हेच गोपनीय असे उपनिषदांत प्रतिपादलेले रहस्य आहे. याचे श्रवण मनन आणि निदिध्यासन केल्यानेच जगद्रूपी भ्रांतीचा निरास होऊन सच्चिदानंदस्वरूप आत्म्याचा साक्षात्कार होतो. ८०-८२.

यानंतर दत्तप्रभूंनी आपल्या मित्रत्वाची ग्वाही देऊन रामाला निरोप दिला. आपले सतत चिंतन करीत तपाला जाण्याची आज्ञा केली. ‘तुझ्यांत संक्रमण केले तेज मी पुढे दाशरथी रामाचा अवतार घेईन त्या वेळी शोषून घेईन. त्यानंतर हे वैवस्वत मन्ंवतर संपेपर्यंत तू समुद्रतीरावर तपश्चर्या करीत रहा. पुढच्या सावर्णिक मन्ंतरांत तुला महर्षिपद मिळेल आणि महाकल्पाच्या अंती तू मुक्त होशील.’ असा दत्तप्रभूंचा आशीर्वाद घेऊन रामाने आणखी कांही काळ त्यांच्या सेवेत राहून तेथून प्रयाण केले. ८३-८७.

दत्तप्रभूंच्या आज्ञेनुसार एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करणारा, ज्याच्या नुसत्या नांवाने दुष्टांच्या छातीत धडकी भरायची तो महापराक्रमी परशुराम दक्षिणेला समुद्रकांठी जाऊन तप करू लागला. तिथेही कांही दरिद्री ब्राह्मण त्याच्याकडे जाऊन दानाची याचना करूं लागले. रामाने त्यांना समजावून सांगितले की सर्व पृथ्वी त्याने कश्यपांना दिली आहे आणि सर्व धनादि ब्राह्मणात वाटून टाकले आहे. त्यावर त्यांनी त्याला विचारले की “सर्व पृथ्वी कश्यपाला दिली आहेस तर इथे कसा राहतोस. हा तर दिलेल्या दानाचा उपभोग होतो.” तेव्हां त्यांचे म्हणणे पटून परशुरामाने बाणाने समुद्राला हटवून बारा कोस रुंद आणि चारशे कोस लांब कोंकणपट्टी निर्माण केली. तीही ब्राह्मणानी मागून घेतली. त्यानंतर त्रेतायुगांत दाशरथी रामाचा अवतार झाला. सीतेला स्वयंवरांत जिंकून रामचंद्र मिथिलेहून अयोध्येला जातांना परशुरामाने त्यांना अडवून आपल्या शिवधनुष्याचा भंग केल्याबद्दल जाब विचारला. त्या वेळी रामाने त्यांचे तेज आकर्षून घेतले. त्यानंतर परशुराम चिपळूणजवळ समुद्रात गुप्त राहून आजवर तपश्चर्या करीत आहे. भावी सावर्णि नांवाच्या मन्वंतरांत तो महर्षि होणार आहे. ८८-९५.

# रेणुकामाहात्म्य.

अध्यायाच्या शेवटी रेणुकेचे माहात्म्य विशद करणारी एक आणखी कथा सांगितली आहे. पुरातन काळी नारायणाकडून मिळालेल्या वेदांच्या योगाने पंचपर्वा अविद्याच्या माध्यमांतून ब्रह्मदेवाने सृष्टी रचली होता त्याच अविद्येच्या प्रभावाने तो सर्व वेदच विसरून गेला. अर्थात् त्या वेदांतील सृष्टी करण्याचे ज्ञानही त्याला आठवेना. खूप प्रयत्न करूनही जेव्हां त्याचे स्मृति परत आली नाही तेव्हां विधात्याने माहूरला जाऊन एकवीरेची स्तुति केली, “हे वेदजननी गायत्री! वाङ्मयी ईश्वरी! माझ्यावर प्रसाद कर. मला सर्व वेदांची विस्मृति झाली आहे. त्या सर्वांना पुनश्च माझ्या बुद्धीत प्रकाश कर.” त्यावर रेणुका मातेने त्याला “दत्तप्रभूंना विचार, ते तुला सर्व सांगतील” असे सांगितले. ब्रह्मदेवांनी दत्ताकडे जाऊन त्याची प्रार्थना केली. “सर्व ज्ञान्यांत श्रेष्ठ आणि सर्व देवांना वंद्य असणाऱ्या दत्तात्रेया! सर्वांचा आधार असूनही तुला मात्र आधाराची आवश्यकता नाही. त्रिगुणात्मक असूनही तू निर्गुण आहेस. प्रभो, मला वेदांचे त्यांच्या अंगासहित आणि उपनिषदांसहित विस्मरण झाले आहे. हे बुद्धिप्रकाशका, वर्ण, मात्रा आणि स्वरांसहित त्यांचे मला निरूपण कर.” दत्तप्रभूंनी ब्रह्मदेवाला सांगितले की, “पंचपर्व अविद्येने मोहित झाल्याने तुला वेदांचे स्मरण होत नाही. सर्व वर्णांची प्रकाशक आणि एकमेव अधिष्ठान ही वर्णात्मक माता रेणुकाच आहे. हीच त्रिपुरसुंदरी सर्व वेदांची माता ब्रह्मरूपिणी सावित्री आहे. हीच एकमेव चित्कला असल्याने हिला एकवीरा म्हणतात. हीच ऊर, कण्ठ, शिर, जिह्वा, दात, नाक आणि ओठ या आठ स्थानांतून प्रकटणारी (अष्टौस्थानानि वर्णानामुरः कण्ठः शिरस्तथा। जिह्वामूलं च दन्ताश्च नासिकोष्ठौ च तालु च) वर्णमाला आहे. तरीही ब्रह्मवाचक ॐकार हेच तिचे एकमेव स्वरूप आहे. यासाठीच तिला ब्रह्मस्वरूपिणी म्हणतात. एकच असून अनेकरूपांनी प्रकटणाऱ्या त्या एकवीरेचे स्मरण तूं कर म्हणजे तुझी हरवलेली वेदांची स्मृति परत येईल. ” यावर ब्रह्मदेवांनी रेणुकामातेचे स्मरण केले. त्याबरोबत ती स्वयं तिथे प्रकटली आणि तिच्या मुखांतून सर्व वेद आपापल्या अंगोपांगासह आणि उपनिषदांसह बाहेर पडूं लागले. अशा रीतीने ब्रह्मदेवाला वेदांची पुनश्च प्राप्ती झाली. हर्षोत्फुल्ल चित्ताने आणि प्रसन्न मुखकमलाने ब्रह्मदेवांनी देवी एकवीरेची स्तुति आरंभली.

**ह्रीर्भीर्धीः श्रीस्त्वमेवैका श्रद्धा मेधा च धारणा। प्रज्ञा त्वमेव छन्दांसि तवाङ्गान्येव वाङ्मयि।।३८।।**
**स्वरवर्णात्मिकेऽनन्ते त्वमैवोङ्काररूपिणी।। एकवीरे प्रसीद त्वं सदा मे सन्निधा भव।।३९।।**

लज्जा, भय, बुद्धि, श्री, श्रद्धा, मेधा, धारणा आणि मेधा ही तुझीच स्वरूपे आहेत. हे वाङ्मयी वेद हे तुझेच अवयव आहेत. हे ॐकारस्वरूपी, असीम, स्वरवर्णात्मके एरवीरे माझ्यावर प्रसन्न हो आणि तुझे सान्निध्य मला नित्य लाभो. याप्रकारे स्तुति करीत ब्रह्मदेव सत्यलोकीं परतले. ९५-९९.

अशी प्रभावशाली जगदंबा केवळ रेणुराजाचा भाव पाहून त्याची कन्या झाली. ती केवळ भक्तिभावालाच आकळते. आजही माहुरांत निवास करून ती आपल्या भक्तांना संकटांपासून सोडवते आणि त्यांचा उद्धार करते. अनसूयेचे घर आणि दत्ताचा आश्रम यांच्या सान्निध्यांत असणाऱ्या रेणुकामंदिराच्या नुसत्या दर्शनानेही इष्टकामना पूर्ण होतात. तिथे असलेल्या काळ्या आंवळीचे दर्शन करणारे पुण्यवंत पावन होतात. रेणुकादेवीचे दर्शन घेऊन तेथील मातृतीर्थांत पिंडदान केल्याने पितर उद्धरून जातात. चांध्रीक नांवाच्या ऋषीचे पितर भयानक नरकांत पिचत होते. त्याने मातृतीर्थाला जाऊन पिंडदान केल्यावर त्यांना उत्तम गति प्राप्त झाली अशी कथा आहे. असे तात्काळ फळ देणारे ते तीर्थ आहे. त्याचप्रमाणे तेथील पद्मतीर्थ आणि सर्वतीर्थ नांवाची दोन तीर्थेही अत्यंत प्रभावशाली

आहेत. कन्येविषयीच्या कामवासनेने दूषित झालेल्या सूर्यनारायणाची या तीर्थांच्या सेवनानेच शुद्धि झाली. अशा या पवित्र स्थानींच अर्जुनाने योगाचा उपदेश करून त्याला मोक्षाचा लाभ करून दिला होता.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चोविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय २५ वा.

पुत्र तोचि सांगे पित्यासी। गालवें अश्व देऊनी ऋतध्वजासी। नेला यज्ञरक्षणासी। पातालकेतूसी तो वेधी।।५२।।
तो तीव्र बाणासह गेला पाताळीं। राजा मागें चालें त्यावेळीं। तया मदालसा भेटली। पंचविसाव्यांत हे कथा।।५३।।

## अलर्काख्यानाचा उपक्रम.

वेदधर्मामुनि आपल्या प्रिय शिष्याला – दीपकाला पुढे सांगू लागले. "अशा प्रकारे त्या योगभ्रष्ट पुत्राने आपल्या पित्याला दत्तचरित्रांतर्गत कार्तवीर्याचे आख्यान व त्याच्याच अनुषंगाने रेणुका आणि परशुराम यांची चरित्रे सांगितली. तो पुढे आपल्या पित्याला म्हणाला, 'बाबा, अर्जुनासारखाच आणखी एक अलर्क नांवाचा सम्राट राजा दत्तप्रभूंना शरण येऊन त्यांचा शिष्य झाला आणि त्यांच्या प्रसादाने योगसम्राट झाला.' हे ऐकून पित्याने मुलाला आपण दत्तचरित्राच्या श्रवणाला उत्सुक असल्याचे सांगितले. निर्गुण निराकार दत्तप्रभू सगुण साकार मानवी देह धारण करून आपल्या साकार (देहाभिमानी) भक्तांना निराकार (विदेही) अवस्थेला पोंचवतात. अशा दत्तलीलांच्या श्रवणाने तृप्ती होत नाही तर त्या ऐकण्यासाठी कान आणि मन अधिकच तहानेले होतात. वडिलांच्या या बोलण्याने सुखावून मुलाने त्यांना अलर्काचे आख्यान सांगायला सुरुवात केली. तेच मी आतां तुला सविस्तर सांगतो. " १ – ७.

## गालवमुनींच्या यज्ञाला असुरांचे विघ्न.

शत्रुजित नांवाचा एक सोमवंशांतला राजा होता. त्याला भगवान शंकारांच्या कृपेने एक तेजस्वी, पुण्यखाणी, सुंदर आणि सद्गुणी मुलगा झाला. त्याचे नांव त्याने ऋतध्वज असे ठेवले. यथाकाळ त्याची मुंज झाल्यावर त्याने सर्व विद्यांचे अध्ययन उत्तम प्रकारे केले. विशेषतः धनुर्वेदांत त्याचा कुणी हात धरू शकत नव्हता. अत्यंत शूर असून तो शरणागतांचे रक्षण करीत असे. नीतिशास्त्राचा त्याने केवळ अभ्यासच केला नव्हता तर तो निष्ठेने त्याचे पालन करीत असे. गरजू लोकांना तो औदार्याने साह्य करीत असे. विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेशां परिपीडनाय। खलस्य साधोर्विपरीतमेतज् ज्ञानाय दानाय च रक्षणाय।। दुष्ट प्रवृत्तीचे लोक विद्येने वाद घालतात, द्रव्याने माजतात आणि सामर्थ्याने लोकांना त्रास देतात. याउलट ऋतध्वजासारखे सत्प्रवृत्त लोक विद्या इतरांना शिकवतात, धनाने साह्य करतात आणि आपल्या सामर्थ्याचा उपयोग त्यांच्या रक्षणासाठी करतात. साहजिकच त्याची कीर्ति सर्वत्र पसरली आणि शत्रुजिताने त्याला युवराज केले. युवराज पदावर आरूढ होऊनही तो सर्वांशी नम्रतेने आणि आदराने वागत असे. त्या वेळी एक गालव नांवाचे एक महान ऋषि नर्मदातीरी आश्रम करून रहात होते. ते निरंतर आपल्या नित्यकर्मांत आणि ध्यानधारणेत निमग्न असत. एकदां एक पर्वकाळ आला. अधिक मास, संक्रांत, ग्रहण इत्यादि ज्योतिषशास्त्राने पवित्र मानलेल्या या काळांत केलेल्या सत्कर्मांचे अधिक फळ मिळते. म्हणून गालवमुनींनी श्रद्धेने एका यज्ञाला आरंभ केला. यज्ञांच्या अनुष्ठानाने देवांची शक्ति वाढते. मानवांनी केलेल्या यज्ञांच्या हविर्भागावरच देवांची उपजीविका असते. यज्ञांची उत्पत्ति ब्रह्मदेवाने सर्व मानवांच्या बरोबरच केली आहे (सहयज्ञाः प्रजाः स्रष्ट्वा..). त्याची मानवांना आज्ञा आहे की, "या यज्ञांचे तुम्ही अनुष्ठान करा म्हणजे तुमचा उत्कर्ष होईल आणि तुमच्या कामना पुरतील. ह्या यज्ञांच्या द्वारा तुम्ही देवांना प्रसन्न करा म्हणजे देवताही तुमच्या अभीप्सितांची पूर्ति करून तुम्हांला सुख देतील."

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

(भगवद्गीता ३:१०-१२) देवांचे बळ वाढवणाऱ्या यज्ञांना, त्यांच्याशी वैर बाळगणाऱ्या असुरांचा साहजिकच विरोध असतो. त्यामुळे गालवमुनींच्या यज्ञाला त्या काळांतला पाकालकेतू नांवाचा एक असुर विघ्न करीत असे. यज्ञ सुरू होऊन त्याचा धूर आकाशांत दिसूं लागला की लगेच तिथे येऊन तो महाकाय राक्षस हाडे, मांस, रक्त इत्यादि अपवित्र पदार्थ त्यांत टाकून यज्ञाचा नास करीत असे. आपले यज्ञ अशा रीतीने नासतांना पाहून गालवमुनींना दुःख व चीड येई. पण त्याला त्यांचा विरोध करतां येत नसे. यज्ञाची दीक्षा घेतलेली असल्याने त्याला क्रोध किंवा हिंसा करतां येत नव्हती. त्यामुळे सामर्थ्य असूनही त्या दैत्याला शाप देतां येत नव्हता. तसे केले तर तपोभंग होऊन पापच वाट्याला येणार! अशा दुविधेत सांपडल्याने मनि परमेश्वराची करुणा भाकूं लागले. 'भगवंता, दयाळा! आपण भक्तांचा योगक्षेम चालवितां असे आपले आश्वासन आहे. धर्मपालन हे आपले ब्रीद आहे. तर आपण आमची अशी उपेक्षा कां करतां? दैत्यांनी माझा छळ चालविला आहे. माझे यज्ञयाग त्यांनी बंद करून टाकले आहेत. माझ्या कर्माचा लोप होतो आहे. तुझ्या भरंवशावरच आम्ही हा यज्ञ आरंभिला आहे. आतां अधिक परीक्षा पाहूं नका. आमच्या सत्कर्मात विघ्न करणाऱ्या ह्या दैत्यांचा तुम्ही नाश करा. आम्हाला निराश करूं नका. ' ८- २२.

## यज्ञाच्या रक्षणासाठी ऋतध्वजाचे आगमन.

अशी गालवमुनींच्या आर्त प्रार्थनेला आकाशवाणीद्वारा ईश्वरी आश्वासन मिळाले. ते अभयवचन कानांवर पडते न पडते तोंच आकाशांतून एक दिव्य घोडा उतरला आणि आश्चर्यचकित झालेल्या गालवमुनींच्या शेजारी उभा राहिला. पाठोपाठ त्याला अशरीरी वाणीनेच परमेश्वराची आज्ञा झाली. 'मुने! हा घोडा घेऊन तुम्ही शत्रुजित राजाकडे जा. त्याचा पुत्र ऋतध्वज ह्या घोड्यावर बसून तुझ्या यज्ञाला विघ्न करणाऱ्या असुराला ठार करील. मग तू निश्चिंतपणे तुझा यज्ञ पूर्ण कर.' गालवमुनी लगेच शत्रुजित राजाच्या राजवाड्यावर पोहोंचला. राजाला त्याने आपला परिचय करून दिला. आपल्या यज्ञाला पातालकेतूचा होणारा उपद्रव तसेच आकाशवाणीबद्दल सांगून तो घोडा दाखविला. त्यानुसार राजाला ऋतध्वजाला आपल्याबरोबर पाठवायची विनंति केली. आपल्या मागणीचे समर्थन करतांना त्याने राजाला क्षत्रियधर्माची जाणीव करून दिलेली आहे. क्षत म्हणजे दुःख त्यापासून त्राण म्हणजेच रक्षण करणारा तो क्षत्रिय हा अर्थ त्याने सांगितला. राजाला मुनींचे बोलणे पटले आणि आपल्या पुत्रावर असलेल्या ईश्वरी प्रसादाचा आनंदही झाला. त्याने मुलाला गालव मुनींबरोबर जाण्याची आज्ञा दिली आणि "त्यांच्यासारखे तपोधन ऋषि पाठीशी असतांना तुला कसलेच भय नाही. सर्व ग्रह अनुकूल असतील आणि तुझ्याशी लढायची कुणाचीही हिंमत होणार नाही," अशी ग्वाही दिली. पित्याची आज्ञा शिरी धारण करून आणि आईवडिलांना वंदन करून ऋतध्वज त्या दिव्य अश्वावर स्वार झाला आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या आश्रमांत येऊन दाखल झाला. तिथे पोंचतांच त्याने ऋषींना तो दैत्य कुठे आहे ते विचारले. गालवमुनींनी त्याला सांगितले की "मी आतां यज्ञाला आरंभ करतो. यज्ञाचा धूर आकाशांत दिसूं लागला की तो असुर लगेच येईल. मग मी तुला दाखवून देईन. पण सावध रहा. तो दैत्य अत्यंत बलवान तर आहेच; पण त्याच्याकडे अनेक माया आहेत. तो निरनिराळी रूपे धारण करूं शकतो तसेच अनेक मायाजालांनी भूल पाडूं शकतो." त्यावर ऋतध्वज म्हणाला, "ऋषिवर्य! आपल्या दर्शनाने आम्ही पावन झाल्याने मला त्या राक्षसाचे भय वाटत नाही. आपल्या कृपेच्या प्रभावाने मी त्याला सहज ठार करीन. आपल्या कृपेचे छत्र शिरावर असतांना या युद्धांत तर आम्ही विजयी होऊंच; पण ह्या मानवी जीवनाचेही सार्थक करून उत्तम गती प्राप्त करूं यांत संशय नाही." २३-४०.

## राजपत्राकडून पातालकेतूचा वेध.

राजपुत्राकडून अशा रीतीने आश्वस्त झाल्यावर गालव ऋषींनी होमाचा संकल्प करून अग्नीची स्थापना केली. लगेच आश्रमांतून धूर बाहेर पडला आणि तो पाहून तो असुर रानडुकराच्या रूपाने गुरगुरत तिथे आला. त्याचे मोठे सुळे बाहेर आले होते आणि अंगावरचे सगळे केस ताठ झाले होते. त्याने आश्रमांत प्रवेश करतांच मुनींनी राजपुत्राला तो दाखवून दिला आणि त्याचा संहार करायला सांगितले. दिव्य घोड्यावर आरूढ झालेल्या ऋतध्वजाने आपल्या बाणाने त्या दैत्याला वेधले. दैत्याच्या हृदयांत तीर घुसूनही तो मेला नाही. जोंवर आयुष्याची दोरी बळकट असते तोंवर तीच मर्मस्थानांचे रक्षण करते. त्यामुळे मृत्यू दूर राहतो. हे एक महत्त्वाचे रहस्य इथे महाराजांनी जातां जातां सांगितले आहे. आजही आपल्या पाहण्यात अशा घटना येतात. छातीतून सळई आरपार जाऊनही माणूस जिवंत राहतो. डॉक्टरांनी सर्व आशा सोडून दिल्यावरही रोगी उठून बसतो. कधी कधी तर तिरडीवरूनही माणूस उठतो. प्रारब्धाने नियत केलेले आयुष्य हीच अशा घटनांची एकमेव कारणमीमांसा ठरते. ४१-४७.

## ऋतध्वज आणि मदालसेची भेट.

तो मर्मी बाण लागलेला रानडुक्कर (असुर) जीव वांचवून पळाला तो एका विवरांत घुसला. ती एक दाट अंधारी गुहा होती. माणसाला तिथे वाट सांपडणे अशक्य होते. पण त्या दैवी अश्वाने त्या असुराची पाठ सोडली नाही. ती गुहा म्हणजे पाताळाची वाटच होती. पाताळकेतू तिथून पळून गेला. त्याचा पाठलाग करणाऱ्या ऋतध्वजाने पातालांत प्रवेश केला. त्याला तिथे एक रत्नजडित गगनचुंबी प्रासाद दिसला. राजपुत्राने घोडा एका बाजूला बांधला आणि कुतूहलाने त्याचे निरीक्षण करूं लागला. सोन्याची शिखरे, रत्नाने मढवलेली गोपुरे, रत्नमय पायऱ्या, इंद्रनीळाच्या भिंती, मोत्याची तोरणे, प्रासादाच्या आंतबाहेर विवध उपवने हे सर्व अलौकिक वैभव पाहून आणि सूर्याची किरणेही जिथे पोंचत नाहीत तिथे हा स्वर्गतुल्य प्रासाद पाहून तो स्तंभितच झाला! तेवढ्यांत तिथे एक देवतातुल्य सुंदर युवती हातांत चेंडू घेऊन एकटीच दारांत बसलेली त्याने पाहिली. ऋतध्वजाला पाहून ती लगबगीने उठून जिना चढून माडीवर गेली. राजकुमारही तिच्या मागून वर गेला. त्याने त्या तरुणीच्या कक्षांत डोकावून पाहिले तेव्हा त्याला ती सुंदरी रत्नजडित पलंगावर चिंतामग्न होऊन बसलेली दिसली. इतक्यांत त्यांची दृष्टिभेट झाली आणि राजाला पाहतांच ती कन्या एकदम मूर्च्छित होऊन पडली. जवळच असलेल्या तिच्या मैत्रिणीने तिला सांवरले. तिने अशा बेशुद्ध अवस्थेत मान टाकलेली पाहून राजपुत्राला वाईट वाटले. 'मला पाहून ही अशी एकाएकी निश्चेष्ट होऊन मंचकावरून कां पडली?' याचे आश्चर्य करीत तो इकडे तिकडे पाहूं लागला. या वैभवसंपन्न विशाल महालांत या दोघीच तरुणी आहेत. कोणी पुरुषमाणूस बरोबर नाही. तेव्हा आपण इथे थांबणे योग्य नाही याची जाणीव होऊन तो तिथून मागे फिरला. तितक्यांत ती तरुणी सावध होऊन रडूं लागली आणि राजाला पाहून पुन्हा बेशुद्ध झाली. ४८-६२.

## मदालसेचे पूर्ववृत्त.

तेवढ्यात तिच्या सखीचे लक्ष राजाकडे गेले. तिने त्याची चौकशी केली. "आपण कोण, कुठून आलां? इथे यण्याचे कारण काय? आपण स्वस्थपणे बसा ना." राजाला तिथे कोणी पुरुष नसतांना विश्रांती घेण्यास थांबणे प्रसस्त वाटले नाही. त्याने त्या तरुणीलाच प्रश्न विचारायला सुरुवात केली. "तुम्ही दोघी कोण आहां? या निर्जन स्थळी कशा आणि कां आलां?" आतां शुद्धीवर आलेल्या तरुणीने

आपल्या सोबतिणीला आपली सर्व हकीकत सांगण्यास खुणावले. पुनश्च राजकुमाराला पाहून उसासे टाकीत ती बेसावध झाली. तिला पलंगावर नीट झोपवून पंख्याने वारा घालीत ती ऋतध्वजाशी बोलूं लागली. “आपल्यासारख्या मनमोहक पुरुषाने अचानक इथे येऊन दर्शन दिल्याने ती प्रणयविह्वल झाली आहे. त्यामुळेच तिची शुद्ध हरपली आहे. विश्वावसू गंधर्वाचे नांव आपण ऐकले असेलच. ही लावण्याची खाण त्याची कन्या मदालसा आहे. केवळ ईश्वरी योजनेनेच आपली व हिची भेट झाली आहे. पातालकेतू नांवाच्या दैत्याने हिला पळवून आणले आहे. इथे येतांच तो तिच्याशी समागम करूं पहात होता. तिने ‘आमच्याकडे लग्न केल्याशिवाय पुरुषाला स्पर्श करीत नाहीत. तूं कांही अतिप्रसंग केलास तर मी जीव देईन’ असे सांगून ती वेळ टाळली. पातालकेतूने लगेच दैत्यगुरु शुक्राचार्यांना बोलावून विवाहाचा मुहूर्त विचारला. उद्यांच त्रयोदशीचा मुहूर्तावर हिच्याशी तो राक्षस लग्न करणार आहे. पातालकेतूशी लग्न करण्यापेक्षा प्राण दिलेला बरा असा तिचा निर्धार आहे. काल तो दैत्य कुठे बाहेर गेला ही संधि साधून ती जीव द्यायला निघाली. त्या वेळी गोलोकांतून कामधेनू इथे आली आणि तिने तिला प्राणत्यागापासून परावृत्त केले. ती म्हणाली, ‘मदालसे! उद्यांच एक राजबिंडा, क्षत्रिय राजकुमार येऊन त्या राक्षसाला ठार करणार आहे. तोच तुला अनुरूप वर आहे. त्याच्याशीच तू लग्न कर. व्यर्थ आततायीपणे जीव टाकूं नकोस! तुझ्यावरील करुणेपायींच मी गोलोकांतून आले आहे.’ असे बोलून ती कामधेनू गुप्त झाली. तिच्या भाकिताची आजच प्रचीती आली. रानडुकराच्या रूपांतल्या पातालकेतू कुणाच्या तरी बाणाने विद्ध होऊन पाताळांत घुसला आणि पाठोपाठ आपण इथे आलां. त्याच वेळी माझ्या मनाची खात्री पटली की आपणच ते वीर आहांत. आपणच त्या दैत्याला जखमी केले आहे. आम्हांला या कठिण प्रसंगी आशेचा किरण दाखविणारे आपण निश्चितच कुणी देव असणार! माझे नांव कुंडला. मी एक ऋषिकन्या आहे. मी योगाभ्यास करीत हिमालयांत राहते. तिथे अनेक गंधर्वकन्या खेळायला येतात. त्यांतल्याच ह्या मदालसेशी माझे सख्य झाले. हा राक्षस हिला घेऊन आकाशमार्गाने जात असतां तिच्या किंकाळ्या माझ्या कानावर पडल्या. तिचा आवाज ओळखून मी तिला साह्य करण्याच्या हेतूने त्या दैत्याला मलाही बरोबर नेण्याची विनंति केली. ‘ही माझी जिवलग मैत्रीण आहे. माझ्याशिवाय हिला चैन पडणार नाही,’ असे सांगून मी गयावया केल्यावर तो तयार झाला. याप्रमाणे मी तिच्यासह आले खरी. पण काय करावे कांही कळत नव्हते. आतां आपली भेट झाली आणि माझ्या येण्याचे सार्थक झाले असे वाटते. आपल्या दर्शनाने मलाही समाधान वाटत आहे. आतां आपण आपला परिचय द्यावा. ” ६३-९१.

## ऋतध्वजाला मदालसेशी विवाह करण्याची कुंडलेची विनंति.

कुंडलेच्या विनंतीनुसार ऋतध्वजाने आपला परिचय दिला. “मी कोणी देव नाही तर भूलोकांतला राजा शत्रुजित याचे पुत्र असून त्याच्या आज्ञेनेच मी गालव मुनींच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या आश्रमांत आलो. तिथे रानडुकराच्या रूपांत आलेल्या एका दैत्याला मी बाणाने वेधले. पण तो पळाला. ऋषींची त्याला ठार करण्याची आज्ञा असल्याने त्याचा पाठलाग करीत मी इथे आलो तेव्हां तुमची भेट झाली.” कुंडला म्हणाली, “तुम्ही ज्याला विद्ध केले तो पातालकेतू नांवाचा दुष्ट राक्षस आहे. आपला धाकटा भाऊ तालकेतू याच्यासह तो इथे राहतो. लोकांना उपद्रव करणे हाच त्यांचा उद्योग! आत्तां ते जरी तुला भिऊन लपून बसले असले तरी लवकरच तुझ्या हातीं सांपडतील. आतां मी काय म्हणते ते ऐक. ही गंधर्वकन्या मदालसा निर्मळ आहे. हिचा तुम्ही

स्वीकार करा. ही तुमचा लौकिक वाढवील. अशी वधू तुम्हांला अन्यत्र मिळणार नाही. हिचे तुमच्यावर मन जडले आहे. तुमच्याशी विवाह झाला तर ती स्वतःला धन्य समजेल. तुम्ही क्षत्रिय आहांत. आपल्या ब्रीदाला अनुसरून तुम्हांला शरण आलेल्या ह्या मदालसेशी लग्न करून हिचे दुःख दूर करा. तुम्ही मानव असूनही देवयोनीतली ही नवरी तुमचा मोठेपणा वाढवीलच. ही कन्या तुमच्यासारख्या सिंहाचाच भाग आहे. तो पातावकेतूसारख्या कोल्ह्याने पळवावा हे तुम्हांला शोभून दिसणार नाही. हिची ही व्यथा आपल्याला निवेदन केली आहे. माझी आपल्याला हात जोडून विनवणी आहे कीं हिचा अव्हेर करू नका. एकदां माझ्या ह्या सखीला आपल्या स्वाधीन केल्यावर मी माझ्या तपश्चर्येला जायला मोकळी होईन. याउप्परही तुम्ही हिचे पाणिग्रहण न कराल तर कामधेनूचे वचन खोटे पडेल. दैत्याशी विवाह करण्याची वेळ आली तर ही नक्कीच प्राणत्याग करील. हे ईश्वराचेच देणे समजून पदरांत घ्या, नाही म्हणूं नका, ” अशी प्रार्थना करीत त्या कुंडलेने ऋतध्वजाचे पाय धरले. ९२-१०९.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पंचविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

### अध्याय २६ वा.

ती सुता गंधर्वाची। सखीकरवीं गुरुची। भेटी करवूनि भूपाची। भार्या साची जाहली।।५४।।
दैत्या निर्दाळूनि भूप ये पुरासी। कपटी फसवी मदालसेसी। तिणें देह दिला अग्नीसी। सव्वीसाव्यांत हे कथा।।५५।।

### ऋतध्वजाशी मदालसेचा विवाह.

दीपकाला वेदधर्मा गुरु पुढे सांगत आहेत. अशा प्रकारे कुंडलेने खूप विनवणी करूनही ऋतध्वजाला मात्र ते पटेना. त्याला मदालसा आवडली नव्हती असे मुळीच नव्हते. तोही तिच्यावर मोहित झाला होताच पण अशा रीतीने तिच्याशी लग्न लावणे त्याच्या मनाला रुचेना. आपल्या धर्मानुसार देवा-ब्राह्मणांच्या साक्षीने विधिवत् कन्यादान केल्याविना तिचा पत्नी म्हणून अंगीकार करणे त्याला योग्य वाटेना. मागे आपण शुद्ध अंतःकरण हे एक प्रमाण असल्याचे मनूचे मत पाहिले आहे. त्याचे हे उदाहरण आहे. ऋतध्वज धर्मशील होता. क्षत्रियांच्या संस्काराने त्याचे मन शुद्ध झाले होते. ऐंद्रिय सुखासाठी धर्मविरुद्ध आचरण तो करू शकत नव्हता. त्याने आपल्या इंद्रियांवर विजय मिळविला होता. इथे दुष्यंत राजाला कण्व मुनींच्या आश्रमांत शकुंतला दिसली त्या प्रसंगाचे कालीदासाने केलेले वर्णन आठवते. शकुंतलेला पाहतांच दुष्यंताचे मन तिच्यावर जडले. त्याच वेळी त्याच्या मनांत शंका उपस्थित झाली की, ‘मी तर क्षत्रिय आहे आणि ही ऋषिकन्या! हिच्याशी लग्न करणे हे धर्मसंमत नाही.’ पण तात्काळच त्याच्या मनाने कौल दिला की, ‘ज्या अर्थी माझे सुसंस्कृत क्षात्र मन हिच्याकडे आकर्षित झाले आहे त्या अर्थी ही निश्चितच क्षत्रियकन्या असली पाहिजे.’ आणि पुढे त्यानुसारच शकुंतला ही विश्वामित्राची कन्या असल्याचे समजून आले. हेही निर्मळ मनाच्या प्रामाण्याचेच उदाहरण आहे. ऋतध्वजाने आपल्या मनांतील शंका कुंडलेला बोलून दाखविली. कुंडलेने त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. ‘मदालसा गंधर्वकन्या आहे. तिने गांधर्वविवाह केला तिला तर कोण दोष देईल? तुम्हा क्षत्रियांतही स्वयंवराला मान्यता आहेच. दुष्यंताने शकुंतलेशी गांधर्वविवाहच केला होता.’ मात्र ऋतध्वजाचे या युक्तिवादाने समाधान झाले नाही. तेव्हां कुंडलेने लग्नाला साक्षी म्हणून आपल्या गुरूंना पाचारण करण्याचा पर्याय सुचवला. कुंडलेचे गुरु जर तिथे आले आपण आनंदाने मदालसेशी विवाह करू, असे राजाने मान्य करतांच तिने आपल्या गुरूंचे ध्यान केले. त्याबरोबर ते तिथे आले. कुंडलेने त्यांना सर्व परिस्थिति सांगितली. गुरूंनी संमती दिली आणि म्बणाले, “आत्तांच चांगला मुहूर्त आहे. सगळे दुष्ट ग्रह सहाव्या आणि बाराव्या स्थानांत आहेत. तसेच शुभ ग्रह त्रिकोणलाभस्थानांत आले आहेत. सप्तमांतला शुभ ग्रह तेवढा नीचीचा आहे. त्यामुळे कदाचित दुःख होईल. पण इतर उच्चीचे शुभ ग्रह त्याचे खचित निवारण करतील.” असे बोलून गुरूंनी विवाहविषयक अग्नीची स्थापना करून त्या दोघांचे यथाविधि लग्न लावून दिले. १-१६.

### कुंडलेचे स्वस्थानी गमन.

ऋतध्वजाने पाणिग्रहण केल्याने मदालसाला खूप आनंद वाटला. कुंडलेचे गुरु त्या नवदांपत्याला आशीर्वाद देऊन आपल्या आश्रमाला निघून गेले. मदालसेने कुंडलेला आलिंगन देऊन तिच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ती म्हणाली, “हे सखे, तुझ्या उपकाराला खरेच तुलना नाही. मी तुझी कशी

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

उतराई होऊ? प्रत्युपकाराची इच्छा धरणे म्हणजे एका दृष्टीने उपकारकर्त्यावर तसा कठिण प्रसंग यावा असे चिंतणे आहे. तेव्हां हा तुझा उपकार माझ्यांतच जिरून जावो!" मारुतिराय जेव्हां सीतामाईचा शोध लावून रामचंद्रप्रभूंकडे आले, तेव्हां त्यांनी याच शब्दांत आपली कृतज्ञता प्रकट केली होती. कुंडला म्हणाली, "आज खरोखरच दयासागर परमात्मा प्रसन्न झाला असे वाटते. तुला तुझ्या पतीच्या स्वाधीन केल्याने माझ्या मनावरचे मोठेच ओझे उतरले. आतां मी समाधानाने तपाचरणाला जाते. आतां आपल्या पतीची पातिव्रत्य धर्माने सेवा करून सुखाने संसार कर एवढेच पुनःपुन्हा सांगणे आहे. तुझे आतां चांगले दिवस आले आहेत. काळजी करू नको," असा धीर देऊन ती मदालसेच्या गळां पडली. मदालसा म्हणाली, "आईवडीलही दुरावले असतांना तूं माझ्याबरोबर आलीस आणि माझ्या हिताचे रक्षण केलेस. तू माझी खरी मैत्रीण आहेस!" दोघींच्याही डोळ्यातून अश्रू वाहूं लागले. एकमेकींचे सांत्वन करीत त्यांनी निरोप घेतला. कुंडला हिमालयांत आपल्या तपस्थानी निघून गेली. १७-२४.

## पातालकेतूचा वध.

कुंडलेचा निरोप घेऊन राजा पत्नीसह घोड्यावर स्वार होतो न होतो तोंच पातालकेतू आपल्या दैत्यसेनेसह तिथे येऊन ठेपला. त्याने ऋतध्वजाला आह्वान दिले, "अरे चोरा, मी घरी नसतांना घुसून तू माझे स्त्रीरत्न चोरून नेतोस काय? दुष्टा, तुला अजून माझा प्रताप ठाऊक नाही. देवादिकांना नमवणारा मी दैत्य आहे. तुझ्यासारख्या मानवाचा काय पाड? क्षणार्धात तुझ्या सर्व कुळाचा नाश करून टाकीन. " ऋतध्वज तितक्याच आवेशाने उत्तरला, "चोर कुणाला म्हणतोस? पोटाला बाण लागतांच जीवाच्या आकांताने कोण पळून गेला? गंधर्वाची ही कन्या तूच चोरलीस आणि निर्लज्जपणे माझ्यावर आरोप करतोस? ह्या मदालसेने माझ्याशी देवाब्राह्मणांच्या साक्षीने स्वेच्छेने लग्न केले आहे. आतां तुझे कांही चालणार नाही." हे ऐकून तो राक्षस आणखीनच चवताळून म्हणाला, "आतां मी तुझ्याशी युद्ध करूनच माझे स्त्रीरत्न परत मिळवीन." असे बोलून त्याने आपल्या सैन्याला राजावर चालून जायची आज्ञा केली. ऋतध्वजाने एकट्यानेच त्या सर्व सैन्यावर बाण सोडून त्यांचा निःपात केला. बहुतांशी असुर ठार झाले, कित्येक जखमी झाले आणि उरलेसुरले जीव घेऊन पळून गेले. शेवटी एका धारदार बाणाने त्याने पाताळकेतूला यमलोकाला पाठविले. अशा प्रकारे दुष्टांचे दमन करण्याच्या आपला क्षात्रधर्म प्रसिद्ध करीत राजा परत निघाला. पातालकेतूचा भाऊ तालकेतू जीव बचावून पळून जाऊन पाताळांत लपून बसला. २४-३६.

## ऋतध्वजाचे आपल्या राजधानीत पुनरागमन.

राजपुत्र मदालसेला घऊन प्रथम गालवांच्या आश्रमांत आला. तिथे त्याने गालवमुनींना सर्व वृत्तांत निवेदन केला. आपल्या यज्ञांना विघ्न करणारा दैत्य ठार झाल्याचे ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी नवदंपतीला भरभरून आशीर्वाद दिले. "तुझ्यामुळे माझे यज्ञयाग आतां निर्विघ्न पार पडतील. तू आतां निश्चिंतपणे घरी जा," असा त्याला अत्यंत स्नेहाने निरोप दिला. ३७-३९.

आपला मलगा दुष्ट दैत्याचा वध करून परत येत आहे हे वर्तमान समजतांच राजाचा आनंद गगनांत मावेना. त्याने ऋतध्वजाच्या स्वागताची जय्यत तयारी केली. त्याने संपूर्ण शहराची सजावट केली आणि सर्व सैन्य, मंत्रीजन, मख्य नागरिक यांच्यासह तो त्याला वाजतगाजत सामोरा गेला. समारंभपूर्वक, लोकांच्या जयघोषांत त्याला शहरांत आणून राजाने जाहीरपणे आपल्या पराक्रमी मुलाचे कुवलयाश्च असे नांव ठेवले. ब्राह्मणांना दक्षिणा वाटली, गांवात सर्वांना साखर वाटली. सर्व प्रजाजन आनंदी झाले आणि राजपुत्राची स्तुति करू लागले. ४०-४३.

राजवाड्यात आल्यावर कुवलयाश्वाने राजाला पत्नीसह नमस्कार केला आणि घडलेली सर्व हकीकत सांगितली. आपल्या पत्राने गंधर्वकन्येशी लग्न केले आणि देवलोकीची सून मिळाली हे समजून राजा हरखून गेला. ही अपूर्व घटना इतक्या सहजच घडली ह्या भाग्याचे त्याला कौतुक वाटले. यथावकाश मदालसेचा संसार मार्गी लागला. आपल्या नम्रतेने, सदाचरणाने, मनमिळाऊ स्वभावाने आणि पातिव्रत्याने तिने सर्वांची मने जिंकून घेतली. पती हाच परमेश्वर आहे असा भाव ठेवून ती त्याची सेवा अविश्रांत करीत असे. त्याचेही तिच्यावर जिवापाड प्रेम होते. दिवसरात्र एकमेकांना न विसंबणाऱ्या चक्रवाकांची उपमाही तोकडी पडावी इतके निःसीम त्यांचे प्रेम होते. ४४-४८.

## तालकेतूचे कपट-कारस्थान.

पातालकेतूचा भाऊ तालकेतू युद्धांत पळून गेला. ऋतध्वजाशी समोरासमोर लढायची आपली शक्ति नाही हे त्याच्या मनावर बिंबले होते. पण आपल्या भावाच्या वधाचा सूड या ना त्या प्रकारे उगवायचाच असा त्याचा निश्चय होता. एकदां कुवलयाश्व शिकारीच्या निमित्ताने अरण्यांत निघालेला पाहून त्याने आपल्या आसुरी मायेने तिथे एका तपोवनाची निर्मिती केली आणि स्वतः तपस्वी वेषाने तिथे आश्रमांत ध्यान करीत बसला. त्याच्या वाढलेल्या जटा, अंगावरच्या भस्माचे पट्टे, हातांतल्या गोमुखीत जपमाळ, नासिकाग्र दृष्टी पाहून कुणालाही त्याच्याविषयी आदर वाटावा. बाहेरून सफरचंदासारखे दिसणारे कंवडळ (कडू काकडी; bitter apple) आंतून जसे कडू जहर आणि परिणामी रेचक असते तसे त्या तालकेतूचे बाह्य सात्त्विक रूप दिसले तरी त्याच्या अंतरांत मात्र कपटी दुष्टावा भरलेला होता. कुवलयाश्वाने जेव्हां तिथून जातांना तो आश्रम पाहिला तेव्हां त्याच्या मनांत सादर जिज्ञासा निर्माण झाली. ते फलांनी बहरलेले वृक्ष, स्वच्छ झुळझुळत्या पाण्याचे झरे, वनांत परस्पर वैर विसरून शांतपणे संचरणारी श्वापदे यांवरून हा नक्कीच कुणा तपस्वी मुनींचा आश्रम असावा असे वाटून त्यांच्या दर्शनासाठी त्याने आश्रमांत प्रवेश केला. तिथे तालकेतूच्या सोंगाला तो संपूर्णपणे फसला. त्याला आदराने नमस्कार करून राजा म्हणाला, "महाराज! आपल्या दर्शनाने मी धन्य झालो! आपल्या कृपादृष्टीने मी कृतार्थ झालो. माझे जीवन सफळ झाले." राजाला आशीर्वाद देऊन तालकेतूने त्याची चौकशी केली. त्यावर कुवलयाश्वाने आपण राजपुत्र असून शिकारीच्या निमित्ताने वनांत निघाल्याचे सांगितले. तेव्हां अनपेक्षितपणे आपले दर्शन झाल्याने आपला अलभ्य लाभ झाल्याचे सांगितले. त्यावर तालकेतू म्हणाला, "हे राजपुत्रा, हे फार चांगले झाले. मी इथे एक यज्ञ सुरू केला आहे. यज्ञाची सर्व सिद्धता झाली आहे. पण एक अडचण आहे. माझ्याजवळ दक्षिणा द्यायला पैसे नाहीत. दक्षिणेविना केलेला यज्ञ शास्त्रानसार तामस यज्ञ समजला जातो. (विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम्। श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते।। भ.गीता.१७:१३. विधिरहित, अन्नदानाशिवाय, मंत्राविना, दक्षिणेवांचून किंवा श्रद्धेशिवाय केलेल्या यज्ञाला तामस मानतात.). " हे ऐकून ऋतध्वजाने आपण वनांत शिकारीसाठी आलो असल्याने बरोबर धन घेतले नाही तरी राजधानीला जाऊन आवश्यक ते धन आणण्याची तयारी दाखविली. त्या मायावी राक्षसाचा हेतू वेगळाच होता. त्याला पैसे नकोच होते. तेव्हां तो राजाला म्हणाला, " एवढे कष्ट तुला द्यायची माझी इच्छा नाही. आम्हा निरपेक्ष तपस्व्यांना धनाची हांव काय कामची? मला कांही फार पैसे नको आहेत. तुझ्या गळ्यांत जी कंढी आहे तेवढ्याने माझे काम भागेल. देत असलास तर बघ." ऋतध्वजाने विचार केला, "या कंठीने जर मुनिमहाराजांचे कार्य होत असेल तर तिचे काय महत्त्व आहे?" असा विचार करून त्याने लगेच गळ्यांतील कंठी काढून त्या तालकेतूच्या हातावर ठेवली. ४९-६८.

## ऋतध्वजाच्या मरणाच्या वार्तेने मदालसेचे आत्मदहन.

कंठी हस्तगत झाल्याबरोबर तालकेतू लगेच उठला आणि राजाला म्हणाला, “मी जाऊन वरुणाचे दर्शन करून येतो. तोंपर्यंत यज्ञाचे रक्षण करीत तूं येथेच थांब. मी लवकरच परत येईन.” त्याला खराच ऋषि मानून बिचारा ऋतध्वज तिथेच बसून राहिला. तो दुष्ट राक्षस तेथून निघाला थेट कुवलयाश्वाच्या राजधानीत पोंचला. राजासमोर जाऊन त्याने आपण ऋतध्वजाची बातमी आणली आहे अशी बतावणी करून त्याने मदालसेलाही बोलावून आणले. त्या दोघांसमोर त्याने दुःखाचे नाटक करून विलाप करायला सुरुवात केली. तो त्यांना म्हणाला, “ऋतध्वज जंगलांत शिकारीला गेला हे पातालकेतूचा भाऊ तालकेतू याला समजले. त्याने राजपत्राला एकटेच गांठले आणि आपल्या भावाचा सूड घेण्यासाठी युद्धाचे आह्वान केले. दर्दैवाने कुवलयाश्व युद्धांत मरण पावला. तालकेतू दिव्य घोडा घेऊन पळून गेला. मी त्या वेळी योगायोगाने तिथून जात होतो. अखेरच्या घटका मोजणाऱ्या राजाने मला जवळ बोलावले आणि आपली कंठी मला देऊन ती आपल्या प्रेमाची साक्ष म्हणून मदालसेला द्यायला सांगितली. त्यानंतर तो थोड्याच वेळांत मरण पावला. त्याचे तिथे वनांतच दहन करून मी ताबडतोब इथे आलो. तुमच्या दुःखांत मी सहभागी आहे. माझे काम झाले. मला आतां गेले पाहिजे.” असे बोलून ती कंठी मदालसेला देऊन तालकेतू परत त्याच वनांत निघून आला. ६८-७८.

पुत्राच्या मृत्यूची वार्ता ऐकून राजा धाय मोकलून रडूं लागला. आपल्या पराक्रमी मुलाच्या आठवणी काढत तो जमिनीवर डोके आपटून घेऊ लागला. मदालसेला तर जीवनच शून्य झाल्यासारखे वाटले. त्याच्या आठवणी काढीत ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. जळावेगळ्या मासोळीसारखी ती तळमळूं लागली. तिची तडफड पाहून ती आतां प्राणत्यागच करणार असे वाटू लागले. ‘आपला प्राणप्रिय पतीच गेल्यावर आतां हे रूप, लावण्य, संपत्ती आणि राज्य घेऊन काय करायचे आहे? हे हत्ती, घोडे, सैन्य काय कामाचे?’ पतीच्या सोबत केलेले राज्य ते साम्राज्य, पुत्रासाठी केलेले ते धर्मराज्य, पण ते दोघेही नसतांना वांट्याला आलेले ते यमराज्यच होय! पतीविरहित वैधव्याचे कष्ट सोसण्यापेक्षा पतीबरोबर सहगमन करण्याने तिन्ही कुळांचा उद्धार होऊन मी पतीसह परलोकांत आनंद पावेन,’ असा दृढ संकल्प करून, ऋतध्वजाची कंठी हातांत घेऊन आणि त्याचे रूप हृदयात सांठवीत मदासलेने अग्निप्रवेश केला. अशा प्रकारे पाहतां पाहतां मुलगा आणि सून यांचे मृत्यू पाहून शत्रुजित दुःखाने बेभान झाला. ‘बाल्यावस्थेत माता, यौवनांत पत्नी आणि वार्धक्यांत पुत्र यांचा चिरविरह होण्यासारखे अन्य दुःख नाही. आतां हे दुःखमय जिणे जगण्यापेक्षां मरणच पत्करावे,’ असा विचार करीत तो शिळेवर डोके आपटून प्राण देण्याच्या प्रयत्नांत बेशुद्ध होऊन पडला, ७९-९०.

## ऋतध्वजाचे शोकाकुल राजधानीत आगमन.

इकडे वनांत आलेल्या तालकेतूने ऋतध्वजाची प्रशंसा आरंभिली. “राजपुत्रा! तू खरोखर धन्य आहेस. तुझ्या औदार्याला तुलनाच नाही. केवळ तुझ्या मोठेपणाने माझे हे सत्कार्य सिद्धीला गेले. माझी इच्छा पूर्ण झाली, संकल्प सफळ झाले! मला मोठेच समाधान वाटते आहे. हा आश्रम तुझाच समज. तूं कितीही काळ राहूं शकतोस. मला त्याचा आनंदच वाटेल.” राजाने उत्तर दिले, “महाराज, मी इकडे एकटाच आलो असल्याने घरी सगळे चिंता करत असतील. इथे बराच वेळही गेला. आतां मला लवकर परतणे आवश्यक आहे. आपण आज्ञा द्यावी.” अशा प्रकारे त्या मायावी दैत्याला नमस्कार करून तो भोळा राजा आपल्या राजधानीकडे परतला. मार्गांत अपशकुन होऊं लागले. भारतीय ज्योतिषशास्त्रांत अनेक अपशकुनांचे वर्णन आले आहे. यांना संस्कृतमध्ये ‘निमित्त’ असे नांव आहे. अर्जुन श्रीकृष्णाला

गीतेच्या पहिल्या अध्यायात म्हणतो, “निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव। (अरे कृष्णा! मला ह्या वेळी अनेक वाईट शकुन होत आहेत.” शकुन हा शब्द मुख्यतः पक्ष्यांद्वारा होणाऱ्या संकेतांसाठी वापरतात. इथे ऋतध्वजाला घुबडाचे घूत्कार ऐकायला येत आहेत. हा अशुभ शकुन आहे. त्यानंतर त्याचे डावे अंग फडफडू लागले, हे अशुभ निमित्त आहे. असे अशुभाचे संकेत होऊं लागल्याने ऋतध्वजाच्या मनांत भय निर्माण झाले आणि त्याला आपल्या पित्याच्या क्षेमाविषयी चिंता वाटूं लागली. साहजिकच आपले वडील सुखरूप असावेत अशी प्रार्थना करीत तो विचारशील राजकमार परमेश्वराचे नामस्मरण करीत पुढे जाऊं लागला. शहरांत प्रवेश करतांच सगळीकडे शुकशुकाट पाहून त्याच्या मनांतील चिंता अधिकच वाढली. शहराच्या मुख्य रस्त्यांवरही वर्दळ नव्हती. आतां मात्र कुवलयाश्वाचा धीर सुटला. डोळ्यांतून नकळतच अश्रू वाहूं लागले. कांही विपरीत घडल्याची त्याची खात्री पटली. त्याने धांवत धांवतच राजवाड्यांत प्रवेश केला. त्याला तिथे हलकल्लोळ ऐकायला आला. तो तडक वडिलांकडे गेला. त्यांना सुखरूप पाहून त्याला थोडा धीर आला. त्याने त्यांच्या पायावर डोके ठेवले. आपला मुलगा जिवंत आपल्या समोर उभा पाहून राजाचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. हे स्वप्न तर नाही? की आपला मुलगा पिशाच होऊन आला अशा संभ्रमांत तो पडला. ‘भगवान शंकरांनीच माझ्या दुखाने द्रवून ह्याला परत पाठवला काय? किंवा त्या तपस्वी वेषांतल्या मुनीने आपल्याला मुलाच्या मृत्यूची खोटीच बातमी सांगितली नसेल? पण मग त्याच्याकडे ती कंठी कशी आली? हा खरोखरच कुवलयाश्व असेल तर त्याच्या पत्नीच्या मृत्यूची वार्ता त्याला कशी सांगावी? त्याच्या मनावर काय परिणाम होईल?’ अशा अनेक प्रश्नांनी गोंधळून गेलेल्या राजाला ऋतध्वजाने विचारले, “पिताजी, आपण असे दुःखी कां? आपल्या चेहऱ्यावर एवढी चिंता कां दिसते आहे?” हळूंहळूं हा आपलाच मलगा परतला आहे याची खात्री पटून त्याने त्याला घट्ट आलिंगन दिले. तो म्हणाला, “बाळा! तझ्या वियोगाने मला झालेले दुःख आतां तुला पाहून शांत झाले आहे....” ह्या राजाच्या वाक्यांत एक “पण ” अध्याहृत असल्याचे ऋतध्वजाला जाणवले आणि तो वडिलांच्या पुढील बोलण्याची वाट पाहूं लागला.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सव्वीसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय २८ वा.

**तो नृप स्त्रीच्या विरहें। भोग सोडून वनीं राहे। अश्वतर नाग सुतस्नेहें। नाग तत्स्नेहें दुःखी होती।।५६।।**
**दुःखास्पद सुत पाहूनी नाग। सरस्वतीवरें मग। शिवतोषें मदालसेला अव्यंग। मिळवी हें सत्ताविसाव्यांत।।५७।।**

## ऋतध्वजाची विरक्ति आणि वनवास.

गुरु वेदधर्मा दीपकाला पुढे सांगत आहेत. आपल्या प्रिय मुलाला पाहून राजाला आनंद वाटला तरी त्याला मदालसेच्या आत्मदहनाची दुःखद वार्ता सांगण्याला तो धजेना. त्याला असा कष्टी पण मौन झालेला पाहून राजाने पुनःपुन्हा त्याच्या खिन्नतेचे कारण विचारले. तो म्हणाला, “बाबा! तुमचा कुणी अपमान केला काय? तसे असेल तर त्याचा मी तत्काळ शिरच्छेद करीन याची खात्री बाळगा. किंवा कुणा बंदीवान अपराध्याची सुटका करायची असेल अथवा कुणाचे रक्षण करावयाचे असेल तर सांगा. मी लगेच तुमची इच्छआ पूर्ण करीन. कुणा रंकाला द्रव्य देऊन श्रीमंत करायचे असेल किंवा कुणा दुष्ठ धनिकाला लुटीयचे असेल तर तसे तुम्ही केवळ सांगायचा अवकाश, मी लगेच अंमलांत आणीन. तुमच्या मनांत जे कांही असेल ते मनमोकळेपणाने मला सांगा. मी प्रतिज्ञेवर सांगतो की मी तडकाफडकी तुमचे ईप्सित पूर्ण करीन. अगदी माझ्या प्राणप्रिय मदालसेचा त्याग करायची जरी आपण आज्ञा केली तरी मी यत्किंचितसुद्धां अनमान न करतां तिला सोडून देईन.” मदालसेचे नांव कानांवर पडतांच राजाचा धईर सुटला. तो चमकून कुवलयाश्वाकडे पाहून बोलला, “तिचे कशाला नांव घेतोस बाबा! तुला कसे सांगूं बाळा? तुझी पत्नी तुझ्या मृत्यूची वार्ता ऐकून तिने स्वतःला जाळून घेतले. मदालसे! हे काय केलेस? आपल्या पतीला सोडून कशी गेलीस?” असे म्हणून तो राजा एखाद्या मुलासारखा ढसढसा रडू लागला. कुवलयाश्वा दुःख, आश्चर्य आणि संभ्रम यांनी स्तंभितच झाला. त्याने वडिलांना सगळी हकीकत नीट सांगायची विनंति केली. शत्रुजित राजाने आपले दुःख आवरीत डोळे पुसत पुत्राला तो वनांत गेला असतांना एक जटाधारी तापसी आल्याचे आणि मोठ्याने आक्रोश करीत, त्याची कंठी समोर ठेवून त्याच्या मरणाची वार्ता कशी सांगतली, आणि ते ऐकतांच गंधर्वकन्या मदालसेने ती कंठी घेऊन आत्मदहन केले ती सर्व वार्ता मुलाला सांगितली. पुढे तो म्हणाला, “बाळा, हा कोण मुनी होता, ती तुझई कंठी त्याच्याकडे कझी आली ते कळत नाही. पण त्याच्यामुळेच हा सर्व अनर्थ घडला. माझी बिचारी सून व्यर्थ जळून मेली!” राजपुत्राने आपल्याला वनांत तो मुनी कसा भेटला, त्याने दक्षिणेच्या निमित्ताने आपली कंठी कशी घेतली आणि कावा साधला ते सांगितले आणि म्हणाला, “हा नक्कीच पातालकेतूचा भाऊ तालकेतू असला पाहिजे. पातालकेतूच्या वधानंतर हा पळून गेला. त्या वेळी मी त्याला सोडायला नको होते. पराक्रमी पुरुषाने शत्रूंचा पुरता नाश केला पाहिजे. अग्नि, कर्ज आणि शत्रू हे थोडेसुद्धां शिल्लक ठेवूं नयेत. ते कालांतराने वृद्धि पावून आपल्याच नाशाला कारणीभूत होतात ह्या वचनाची यथार्थता कळण्यासाठी माझ्या संसाराची राखरांगोळी व्हावी लागली! विरहाग्नीचे दाहक दुःख मला आतां जन्मभर भोगावे लागेल!” असे दुःख करून त्या आपल्या प्राणप्रिय पत्नीच्या ऋणांतून उतराई होण्यासाठी राजपुत्राने यावज्जन्म कोणत्याही दुसऱ्या स्त्रीशी संग न करण्याची प्रतिज्ञा केली. (चिरं विमृश्य संकल्पं प्रियानृण्याय सोऽकरोत्। इह जन्मनि चार्वङ्गीं न भोक्ष्ये तां विनेतराम्।।३८।।) एकदां भरजरी शालीचे वैभव ज्याने भोगले

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

त्याला कांबळे कसे भावेल? त्यामुळे गंधर्वकन्येबरोबर संसार केलेल्या कुवलयाश्वाला इतर स्त्रियांत रुचीच राहिली नाही. तो अत्यंत विरक्त झाला. राजधानी सोडून वनांत जाऊन राहिला. १ - २१.

## ऋतध्वजाची नागपुत्रांशी सख्य.

कुवलयाश्व असा वनांत रहात असतांना तिथे एकदां नागलोकांतून अश्वतर नागाचे पुत्र एकदां वेष पालटून फिरत आले. त्यांनी वानप्रस्थ मुनींचा वेष धारण केलेला होता. त्यामुळे त्यांना तपस्वी मुनींचे पुत्र समजून राजपुत्राने नमस्कार केला. ते म्हणाले, "आम्ही सहज मजेत खेळायला इथे आलो आहोंत. तुझी सात्त्विक वृत्ती पाहून आम्हांला तुझ्याशी मैत्री करावीशी वाटते." त्यावर राजकुमार उत्तरला, "ही तर भाग्याची गोष्ट आहे. आपल्यासारख्या साधूंच्या केवळ दर्शनानेच मी पावन झालो आहे. सत्संगतीनेच पाप-ताप दूर होतात. (**गंगा पापं शशिस्तापं दैन्यं कल्पतरुस्तथा। पापं तापं च दैन्यंच हरेच्छ्रीगुरुदर्शनम्।।** गंगा पापाचा, चंद्र तापाचा आणि कल्पवृक्ष दैन्याचा नाश करतात; पण पाप, ताप आणि दारिद्र्य या तिन्हींचा नाश श्रीगुरूंच्या दर्शनाने होतो.) मोक्षाची मार्ग सुकर होतो. आपल्याशी सख्य केल्याने आमच्या कुळाचाच उद्धार होईल असा माझा दृढ विश्वास आहे. " ते समवयस्क आणि समानशील असल्याने त्यांची मैत्री झाली. राजपुत्र देवगुरु बृहस्पतीसारखा बुद्धिमान, देवराज इंद्रासारखा पराक्रमी आणि कामदेवासारखा सुंदर (**बुद्धिविक्रमलावण्यैर्गुरुशक्रस्मरोपमम्।।**) असल्याने त्यांच्यांत दाट स्नेह निर्माण झाला. ते नागपुत्र रोज राजपुत्राकडे येऊं लागले. त्याच्याबरोबर खेळण्यांत, गप्पागोष्टीत आणि थट्टामस्करीत त्यांचा वेळ आनंदांत जाऊं लागला. त्यांना एकमेकांवाचून चैन पडेनासे झाले. तरीही राजकुमाराने आपल्या अंतःकरणांत सलणारे दुःख त्यांना सांगितले नाही आणि त्या नागपुत्रांनीही आपली खरी ओळख दिली नाही. एके दिवशीं राजपुत्राचे लाल झालेले डोळे पाहून नागकुमारांनी त्याची स्नेहाने थट्टा करायला सुरुवात केली, "काय आज वहिनींनी रात्र जागवली वाटते? त्यामुळेच तुझे डोळे लाल झालेले दिसतायत!" त्यांचा हा विनोद कुवलयाश्वाच्या मनांतली दुखऱ्या नसीला लागला आणि दुःख उचंबळून नेत्रांतून वाहूं लागले. तो म्हणाला, "हा विषय सोडून बोला!" त्याची ही अवस्था पाहून नागपुत्र कांवरेबावरे झाले. त्यांनी आस्थेने त्याला दुःखाचे कारण विचारले. म्हणाले, "आम्ही तुझे दुःख वांटून घेतल नाही तर आमच्या मैत्रीचा काय उपयोग. आपल्या सुहृदांना सांगण्याने दुःख हलके होते. तेव्हा तू तुझ्या दुःखाचे कारण आम्हांला निःसंकोच सविस्तर सांग." त्यावर राजकुमाराने आपली सर्व हकीकत विस्ताराने सांगितली. त्याची ती करुण कहाणी ऐकून नागपुत्रही अत्यंत दुःखित झाले. आपल्या मित्राचे सांत्वन कसे करावे हेही त्यांना कळेना. मुकाट्याने उठून गेले. आपल्या घरी गेल्यावरही त्यांच्या मनांतून राजकुमाराच्या दुःखाचा विचार जाईना. त्यांना खाणे-पिणे-झोपणे कांहीच गोड लागेना. त्यांची ही अवस्था त्यांचे वडील अश्वतरांच्या लक्षांत आली. तेव्हां त्यांनी त्याला आपली ही स्थिति एका मित्राच्या दुःखाने झाली असल्याचे सांगितले. तेव्हां अश्वतराने त्यांना विचारले, "असे काय दुःख तुमच्या मित्राला झाले आहे ते तरी सांगा. पाहूं या कांही त्याचा प्रतिकार आपल्याला करतां आला तर! तुमचा मित्र आहे म्हणतां ना? मग मित्राच्या दुःखावर उपाय शोधायला हवा." नागपुत्रा आपल्या वडिलांना सांगूं लागले. "आमचा मित्र कुवलयाश्व पृथ्वीवरील शत्रुजित राजाचा पुत्र आहे. त्याचे लग्न मदालसा नांवाच्या एका गंधर्वकुमारीशी झाले होते. त्या गुणवान लावण्यखनीवर त्याचे जिवापाड प्रेम होते. एकदां राजपुत्र वनांत शिकारीला गेला असतांना एका कावेबाज दैत्याने त्याची कंठी हस्तगर करून ती मदालसेला दाखवून तिला त्याच्या मृत्यूची खोटीच वार्ता सांगितली. ती वार्ता ऐकतांच त्या साध्वीने अग्नीत देह

समर्पण केला. वनांतून परतल्यावर राजपुत्राला भयंकर घटना कळाली. तो दुःखाने खचून गेला. यानंतर आपण कुठल्याही स्त्रीसह संबंध न ठेवण्याची घोर प्रतिज्ञा त्याने केली. त्याला असा विरहाग्नीत होरपळतांना पाहून आम्ही बेचैन झालो आहोत. सर्व इंद्रियांचा संतोष झाल्यावरच आत्मा शांत होतो. त्यानंतरच विषयांपासून परत फिरून आत्मचिंतनाला .योग्य होतो. हे आमच्या मित्राचे अकाली वैराग्य चित्तक्षोभाचेच आणि पर्यायने अनर्थाचेच कारण होणार नाही का? (**सर्वेन्द्रियनिधानात्मा भुक्तभोगः प्रशाम्यति। तद्वासनाग्निना दग्धो नश्यत्येवावशोऽन्यथा।।४७।।**). ह्या त्याच्या संकटांतून त्याची सुटका करण्याचा मार्ग आम्हांला दिसत नसल्याने आम्ही अस्वस्थ झालो आहोत." २२ - ४८.

## ऋतध्वजाच्या दुःखपरिहारासाठी नागराज अश्वतराची सरस्वतीची उपासना.

हे आपल्या पुत्रांचे भाषण ऐकून अश्वतराने त्यांना आश्वासन दिले की," मी हर प्रयत्नाने तुमच्या मित्राचे समाधान करीन आणि त्याच्या जीवनाचे हरपलेले सुख त्याला परत मिळवून देईन." असे त्यांना वचन देऊन आपला भाऊ कंबल नागाला घेऊन अश्वतर हिमालयांत प्लक्षतीर्थांत (सरस्वतीचे उगमस्थान) जाऊन तपश्चर्येला बसला. आहाराचे आणि इंद्रियांचे नियमन करून, आसन-प्राणायामादि योगसाधनानी मनाची एकाग्रता साधून त्याने सरस्वतीचे ध्यान आरंभिले. तो वेदजननी सरस्वती देवीची स्तुति करू लागला. हे माते तुझी स्तुति बाळाच्या बोबड्या बोलासारखी आहे. स्तुतीचे साधन जी वाणी ती तूंच आहेस. समुद्राचे पाणी समुग्द्रालाच अर्घ्य म्हणून देण्यासारखे किंवा सूर्याला दिव्याने ओंवाळण्यासारखे हे माझे स्तवन समज. सर्व बोलणे तुझ्याच प्रेरणेने घडते तेव्हां तूं जशी प्रेरणा करशील तशीच तुझी स्तुति घडेल यांत काय संशय? हे वाग्देवते, तू भारती आणि सरस्वती या नांवानी प्रसिद्ध आहेस. ह्या सर्व चराचर जगताचे तूच अधिष्ठान आहेस. तुझ्यावांचून इथे कांहीच नाही. मग हे माते, मी तरी तुझ्यापेक्षां वेगळा कसा असेन? हे सर्व जीव क्षर म्हणजे नश्वर आहेत तर परमात्मा अक्षर म्हणजे अविनाशी आहे. त्या दोन्हीपेक्षा श्रेष्ठ आणि त्यांची साक्षी तूं आहेस. पाण्यावर वायूच्या उपाधीने जसे बुडबुडे तसे तुझ्या स्वरूपावर अविद्येच्या मायेने जीव उद्भवतात आणि लय पावतात. मायेच्या उपाधीने तुझ्याच स्वरूपांत ईश्वराचा आविर्भाव होतो. अशा रीतीने जीव आणि ईश्वर ही तुझेच आविष्कार आहेत. तू ॐकारस्वरूप आहेत. त्यांतील तीन मात्रा सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या द्योतक आहेस. तू मात्र या तीन गुणांची स्वामिनी निर्विकार अर्धमात्रा आहेस. यागाच्या तीन संस्था, पाकयज्ञ, हविर्यज्ञ आणि सोमयज्ञ ही तुझीच अंगभूत आहेत. (औपासन, अष्टका, पार्वणश्राद्ध तसेच श्रावण, अग्रहायण (मार्गशीर्ष), चैत्र आणि आश्विन मासांच्या पौर्णिमांना करायचे यज्ञ हे सर्व मिळून सात पाकसंस्था; अग्न्य, अग्निहोत्र, दर्श पूर्णमास, आग्रयण, चातुर्मास्य, यज्ञपशुबंध आणि सौत्रामणी ह्या सात हविसंस्था; अग्निष्टोम, अत्यग्नि, उक्त्थ, षोडशी, वाजपेय, अतिरात्र आणि आप्तोर्याम ह्या सात सोमसंस्था मिळून होणारे २१ यागांचा ब्राह्मणांच्या नित्यकर्मात समावेश आहे.) तुझ्यावांचून हे याग सिद्ध होत नाहीत. वर्ण आणि अक्षरांनीच व्यवहार होतात आणि ह्या व्यवहारांतून भोग प्राप्त होतात. म्हणजेच तुझ्यावांचून भोगांचीही प्रप्ती होत नाही. सूर्यचंद्रादि जगाला प्रकाश देतात; पण त्यांना तूच प्रकाशतेस. बुद्धीची प्रेरक असल्याने वेद, शास्त्र आणि सर्व विद्या यांची तूच दात्री आहेस. या सर्व विश्वाचे आदिकारण आणि तूंच आहेस. तूंच आम्हा सर्वांचा आधार आहेस. अशा ह्या तुझ्या सर्वव्यापी स्वरूपाचा साक्षात्कार त्यालाच होतो जो सर्व ऐहिक आणि पारलौकिक भोगांकडे पाठ तुझ्या सेवेत स्वतःला वाहून घेतो. असाच विवेकी पुरुष आपल्या अंतःकरणांत तुझे ते परमश्रेष्ठ स्वरूप पाहतात. ४९-६४.

वरील ओंव्यातील सरस्वतीचे स्तवन हे श्रीदत्तपुराणांतील सरस्वतीस्तोत्राचा अनुवादच आहे. हे मूळ स्तोत्र अर्थपूर्ण आणि प्रासादिक आहे. ह्या स्तोत्राच्या पठणाने तोतरेपणा, अडखळत बोलणे इत्यादि जिह्वेचे दोष तेच मतिमांद्य यांचा परिहार करते असे त्याचे फळ श्रीस्वामी महाराजांनी स्तोत्राच्या शेंवटी सांगितले आहे. हे मूळ स्तोत्र मराठी भावार्थासह इतरत्र दिले आहे. यानंतर एक छोटेसे गेय, भक्तिरसपूर्ण पद श्रीस्वामी महाराजांनी दिले आहे.

ती वाग्देवता सरस्वती आम्हाला कल्याणकारी बुद्धि देवो. वेदसुद्धा जिची महती गातात तीच तू भारती आहेस. तू चैतन्यरूपाने सर्व क्रियांची प्रेरक आहेस आणि वाणीच्या रूपाने सर्वांना बोलवितेस. हे आई, ही स्तुति ऐकून तू धावून ये आणि आमचे मांद्य दूर करून आणि सन्मति देऊन आमचा या भवसागरांतून उद्धार कर. ६५-६७,

## सरस्वतीकडून नागबंधूंना नादरहस्याची प्राप्ती.

अश्वतराची स्तुति ऐकून शारदा माता प्रसन्न झाली आणि आपल्या सगुण स्वरूपांत त्या नागासमोर उभी राहिली. ती म्हणाली, “अश्वतरा, मी प्रसन्न झाले. तुला हवा तो वर मागून घे!” तिच्या प्रेरणेने नागाने डोळे उघडले. तेव्हां त्याला पांढऱ्या कमळांत, हंसावर आरूढ झालेली, शुभ्र वस्त्र नेसलेली, श्वेतांगी, चतुर्भुज देवी दिसली. तिने तिच्या चार हातांत वीणा, वरमुद्रा, दंड आणि माला धारण केल्या होत्या, नागाने तिला गायनकलेचा वर मागीतला. “आई, तू खरेच प्रसन्न झाली असशील तर मला ह्या कंबलाला उत्तम गातां यावे. आम्हांला संगीतकलेचे ज्ञान आणि प्रावीण्य लाभावे. आम्हांला इतके गोड, सुस्वर आणि रसाळ गाणे यावे की त्या कोमलआलापांनी भगवान शंकरही लुब्ध व्हावेत. आमच्या गायनाने प्रसन्न होऊन उमारमणाने आम्हांला हवा असलेला वर द्यावा.” सरस्वती मातेने त्यांना नादरहस्य दिले आणि आशीर्वाद दिला की, “तुम्ही आपल्या उत्कृष्ट, सुमधुर रागदारीने नटराजाला स्तब्ध कराल आणि त्याची तुम्हांवर कृपादृष्टी होईल. तुमचा ईप्सित वर तुम्ही लाभाल!” असा वर देऊन शारदा माता गुप्त झाली. ६८-७६.

## गायनाने प्रसन्न शंकरांचे मदालसेच्या पुनरुत्पत्तीचे वरदान.

तिथून कंबलाला घेऊन अश्वतर नाग कैलासपर्वतावर गेला. तिथल्या उपवनांत जाऊन त्या दोघां नागांनी गायनास आरंभ केला. अतिशय गोड आणि कोमल आवाजांत, सूर ताल, लय इत्यादींचा उत्तम मेळ बसवून, योग्य काळी योग्य राग आणि रागिणी यांचे गायन ते करूं लागले. त्या गायनाला त्यांनी वाद्यांचीही साथ देऊन ते अधिकच मनोहर केले. त्या गायनांतून नऊही रसांचा परिपोष करीत गेल्याने त्या गाण्याने भगवान शंकरांच्या चित्ताचा वेध घेतला. प्रसन्न मनाने भोलेनाथ त्या उपवनात येऊन त्या नागद्वयांचे गाणे ऐकत डोलूं लागले. त्या संगीताची मनमोकळेपणाने वाहवा करीत संतुष्ट झालेले शंकर भगवान त्यांना म्हणाले, “अरे अश्वतरा! किती आकर्षक हे तुझे गाणे आहे? सर्वांना आकर्षणारा – हरणारा म्हणून मला हर म्हणतात. त्या माझे मनसुद्धां तुम्ही तुमच्या गायनाने खेंचून घेतले आहे! माझे मन आनंदाने तुडुंबवले आहे. तुला पाहिजे तो ईप्सित वर मागून घे! ” ही शिवप्रभूंची वाणी कानांवर पडतांच अश्वतराची गानसमाधी भंगली आणि त्या नागांनी डोळे उघडले तेव्हां नंदीवर आरूढ झालेले स्मित करणारे शंकर त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांच्या डाव्या बाजूला पार्वतीमाता बसल्या होत्या. गजचर्माने वेष्टिलेले त्या कर्पूरगौर देहावर पांच मुखे शोभत होती. चंद्र, सूर्य आणि अग्नि यांचे तीन नेत्र प्रकाशत होते. निळ्याशार गळ्यावर आणि सर्वांगावर सर्पांची भूषणें शोभत होती. त्यांच्या दहा भुजांत अभय मुद्रा, शूल, वज्र, टंक, पाश,

अंकुश, खड्ग, घंटा, डमरू आणि अग्नि धारण केले होते. कपाळीं चंद्र झळकत होता आणि मस्तकावर गंगा वाहत होती. ह्या दिव्य दर्शनाने दोघांचीही हृदये भरून आली. अष्टसात्त्विकभाव जागे झाले. भारावलेल्या अंतःकरणाने दंडवत घालून अश्वतर म्हणाला, “मी जो वर मागणार आहे तो कुवलयाश्वासाठी! त्याची पत्नी मदालसा हिने दैत्यांच्या कपटामुळे आपला पति मरण पावला अशा भ्रमाने आपला देह अग्नीला समर्पण केला. ती मदालसा स्वरूपाने, वयाने जशीच्या तशी माझी पुत्री व्हावी. तिचे सर्व दया, क्षमा, शांति हे दैवी गुण, तिचे शील आणि तिचा स्वभाव पूर्वीप्रमाणेच रहावेत. तिला पूर्वजन्मीची स्मरण असावे. ती पतिव्रता, ब्रह्मज्ञानी योगिनी असावी. ती योगमाता असावी. (तिचे पुत्रही ब्रह्मज्ञानी व्हावेत.). हे खूप दुष्कर आहे; पण ते इतरांना! भगवंता, आपल्याला मुळीच कठिण नाही. हे मदनदहना, मला यापेक्षां वेगळा कोणताही वर नको. ” हे अश्वतराचे बोलणे ऐकून सुप्रसन्न झालेले उमारमण म्हणाले, “हे नागराजा! अगदी तूं म्हणतोस तसेच होईल. मनांत यत्किंचितही शंका ठेवूं नकोस. तू घरी जाऊन आपल्या पत्नीसह यथाविधि श्राद्ध कर. त्यांतील (तीन पिंडापैकी) मधला पिंड तुझ्या पत्नीला खायला दे. तिने मदालसेचे रूप मनांत आणून हा पिंड खातांच तिच्या श्वासांतून ती साध्वी प्रकटेल. ” एवढे बोलून शिव परमात्मा अंतर्धान पावले. त्यांना मनोमन नमस्कार करून दोघे भाऊ रसातलाला (नागलोक) परतले. ७७-९५.

## मदालसेचे पुनरुज्जीवन.

आपल्या घरी येऊन अश्वतराने भगवान शंकरांच्या आज्ञेनुसार यथाविधि श्राद्ध केले. **'पुत्रकामश्चेत्पत्नी मध्यमपिण्डं प्राश्नीयात्'** या गृह्यसूत्रांतील विधानाप्रमाणे त्याच्या पत्नीने मदालसेचे रूप मनांत आणून श्रद्धेने मधला पिंड भक्षण केला. त्याबरोबर तिचे श्वासोछ्वास वेगाने सुरू झाले. आणि तिच्या एका उछ्वासाबरोबर एक तेजःपुंज गोलक बाहेर पडला. त्यांत त्या सूक्ष्म गोळ्यांतही मदालसेच्या मदालसेची आकृति भासत होती. मुळांत अंगठ्याएवढा असणारा तो गोळा बघता बघतां मोठा झाला आणि पूर्णाकार डुबेहूब मदालसेच्या रूपाने दिसूं लागला. रंग, रूप, आवाज तर मदालसेचे होतेच. पण तिची बुद्धि, वृत्ती आणि स्मृति हेसुद्धा अगदी पूर्ववत आले. फक्त आपण आपले शरीर अग्नीत विसर्जन केल्याची आठवण मात्र तिला नव्हती. त्यापूर्वी ऐकलेली आपल्या प्राणप्रिय पतीच्या मृत्यूची वार्ता मात्र आत्तांच ऐकल्यासारखी तिच्या मनांत ताजी झाली आणि ती उच्च स्वराने शोक करूं लागली. “हे प्राणनाथ, आपण मला सोडून कसे हो गेला? असा मी काय अपराध केला म्हणून एवढी कठोर शिक्षा आपण मला करतां आहांत? दया करा आणि मला क्षमा करून परतून या! मी आपल्या दर्शनासाठी कासावीस झाले आहे. आपण जर आतां आलां नाहीत मी ही कंठी घेऊन अग्नीत प्रवेश करीन.” असे म्हणून ती नवजात मदालसा खरोखरच सहगमनाला सिद्ध झाली. हे पाहून नागराज अश्वतराला मोठेच आश्चर्य वाटले. हिची मागची सर्व स्मृति जरी आली असली तरी आपण केलेले आत्मदहन मात्र तिला आठवत नाही हे ओळखून त्याने तिचे कसेबसे सांत्वन केले आणि तिला आपल्या पत्नीजवळ आपल्या अंतःपुरांत ठेवून तिचा सांभाळ केला.

प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सत्ताविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय २८ वा.

नृपा शेषानें पाताळीं आणून। स्ववृत्त सर्व सांगून। दे मदालसा दान। पूर्ववत् तिला पाहून नृप हर्षे।।५८।।
दिसे इंदिरेपरी, तिला। नृप घेऊनि पुरा आला। एक पुत्र तिला झाला। बोधी त्याला अठ्ठाविसाव्यांत।।५९।।

## ऋतध्वजाचे पातालगमन.

वेदधर्मा गुरु संदीपक शिष्याला पुढे सांगूं लागले. अशा रीतीने मदालसेची प्राप्ती करुन घेतल्यावर अश्वतराने आपल्या मुलांना कुवलयाश्वाला घेऊन येण्यास सांगितले. पण त्याला झाल्या गोष्टीची वार्ता लागूं न देण्यासही सांगितले. अश्वतरालाही राजपुत्राच्या भेटीची ओढ लागली होती. तसेच काळाची अनुकूलता पाहून मदालसा त्याची त्याला अर्पण करायलाही तो उत्सुक होताच. वडिलांच्या आज्ञेने ते नागपुत्र नेहमीसारखे तापसवेषाने ऋतध्वजाकडे आले आणि त्याला म्हणाले, "आमच्या बाबांची आपल्याला भेटण्याची इच्छा आहे. आपण एकदां आमच्या आश्रमाला भेट द्यावी. आपण जाऊन लगेच परत येऊं. आतां अजिबात संकोच करूं नका." कुवलयाश्वालाही त्यांची ही आपुलकीची विनंती मान्य करावीच लागली. राजकुमार त्यांना म्हणाला, "मित्रप्रेमाची लक्षणेच अशी आहेत. आवडत्या गोष्टी देणे आणि घेणे (ददाति प्रतिगृह्णाति), मनांतले गुज सांगणे आणि विचारणे (गुह्यं आख्याति, पृच्छति) तसेच स्नेह्याकडे खाणे आणि त्याला खिलवणे (भुङ्क्ते भोजयते च एव) अशी सहा मित्रस्नेहाची लक्षणे आहेत. त्यानुसार मला आतां तुमच्याबरोबर आलेच पाहिजे." ते लगेच निघाले. गोमतीच्या किनाऱ्यावर आल्याबरोबर ते राजपुत्राला हाताने धरुन नदीच्या पाण्यांत घेऊन चालले. त्यांच्या घराचा मार्ग पाण्याच्या आंतून जातो याचे ऋतध्वजाला नवल वाटले. "ही तर वानप्रस्थाची मुले आहेत. हे पाण्यांत आपल्याला कां नेत आहेत?", असा प्रश्न त्याला पडला. तो त्यांना म्हणाला, "आधी तुम्ही खरे कोण आहांत ते सांगा. तुम्ही कांही मनुष्य वाटत नाही. कांही न लपवतां इत्थंभूत सांगा तरच मी तुमच्याबरोबर येईन." त्यावर थोडे हंसून त्या नागपुत्रांनी आपले स्वस्तिकादि चिह्नांनी युक्त, मण्यांनी तेजाळलेले फणाधारी नागस्वरुप प्रकट करुन त्याला सांगितले, "पाताळांत कंबल नांवाचा नाग थोर शिवभक्त आहे. तो शंकरावर मनःपूर्वक प्रेम करतो. त्याला सर्वही योगांचे ज्ञान आहे. आम्ही दोघे त्याचेच (खरे तर त्याचा भाऊ अश्वतराचे) पुत्र आहों. तूं अजिबात भीति बाळगूं नकोस. तुझी हकीकत ऐकून आमच्या पिताजींनी तुला मोठ्या प्रेमाने बोलावले आहे. तुला आज त्यांचे दर्शन घडेल!" असे त्याला आश्वासन देऊन त्यांनी त्याला योगबळाने पाताळांत नेले आणि आपल्या पित्यासमोर उभे केले. १ - १४.

## कुवलयाश्व आणि मदालसा यांचे पुनर्मीलन.

पाताळाच्या वैभवशाली सौंदर्याने, संगीत आणि सुगंधाने भारावलेल्या वातावरणाने ऋतध्वज स्तिमित झाला. आपण स्वर्गांतच आलो असे त्याला वाटले. त्याला घेऊन नागकुमार रत्नजडित सोन्याच्या सिंहासनावर विराजमान असलेल्या, दिव्य वस्त्रे, आभरणे आणि अलंकार परिधान केलेल्या अश्वतराकडे गेले. सर्वांनी वंदन केल्यावर कुमारांनी कुवलयाश्वाची आपल्या पित्याशी परिचय करुन दिला. राजाला खूप आनंद वाटला. "आज माझी फार काळची इच्छा पूर्ण झाली," असे म्हणून त्याने राजकुमाराला दृढ आलिंगन दिले. वात्सल्याने त्याच्या मस्तकाचे अवघ्राहण केले आणि त्याला आयुरारोग्य, यश, संपत्ती आणि सुख यांचा लाभ व्हावा असे भरभरुन आशीर्वाद दिले. ऋतध्वज त्याला म्हणाला, "मी आपल्या ह्या अपूर्व दर्शनाने धन्य झालो आहे! माझी धन्यता व्यक्त करायला शब्द अपुरे पडतील. माझ्या मित्रद्वयांनी मला पाताळांत आणून आपल्या चरणांचे दर्शन घडवून मला पावन केले आहे! मातीसाठी खणायले जावे आणि अमाप गुप्त धन लाभावे तसा हा योग आहे! मला किती कृतकृत्य वाटते आहे ते बोलून दाखवितां येणार नाही." अश्वतर म्हणाला, "माझ्या मुलांनी तुझ्याविषयी जे सांगितले ते ऐकून मलाही तुला भेटण्याची अतिशय उत्सुकता लागून राहिली होती. आतां तुला

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

पाहिल्यावर त्यांनी तुझे गुण थोडे कमीच वर्णन केले असे वाटते. तूं तर सर्वगुणसंपन्न आहेस! ऋतध्वजा, तूं तुला हवा तो वर मागून घे. " राजपुत्र उत्तरला, "महाराज, आपल्या कृपेने माझ्या वडिलांच्या राज्यात सर्व सुखसंपत्ती आहे. अशीच आपली कृपादृष्टी असावी, माझे मन धर्माच्या मार्गावर स्थिर असावे आणि वडिलांची सेवा अखंड घडावी, हेच मागणे आहे. " अश्वतर म्हणाला, "धार्मिक तर तूं आहेसच. पित्याची सेवाही तुझी आदर्शवत चालेलीच आहे. सगळे लोक तुला मानतात. तुला पाहिल्याबरोबरच इथे आणि परलोकी तुला यशच मिळणार आहे याचा विश्वास वाटतो. तू तुला मनापासून हवीशी वाटणारी एखादी गोष्ट सांग. ती पुरविल्याने मला खूप आनंद वाटणार आहे. " हे नागाचे बोलणे ऐकून राजपुत्राला साहजिकच मदालसेची आठवण आली. पण तिच्या प्राप्तीची इच्छा प्रकट करायला त्याला संकोच वाटला. तो कावराबावरा होऊन आपल्या मित्रांकडे पाहूं लागला. ते वडिलांना म्हणाले, "अहो बाबा! हा रात्रंदिवस मदालसेच्या विरहाग्नींत होरपळत आहे. तिच्या अकाली मृत्यूनंतर दुसरे कांहीच त्याला आवडत नाही की हवेसे वाटत नाही. " त्यावर नाग म्हणाला, "मदालसा तर जळून मेली. राजाला हवी तर हुबेहूब तिच्यासारखी मायेची भावली दाखवतां येईल! " असे म्हणून नागराजाने आपल्या दासींना सांगून पुनर्जीवित मदालसेला समोर आणण्यास खुणावले. त्याने राजाला लांबूनच तिला पहायला सांगितले. मदालसेला पाहतांच राजाचा धीरच सुटला. "मदालसे, माझ्या प्राणप्रिये!" असे म्हणत राजा ने तिच्याकडे धांव घेतली. पण अश्वतर नागाने त्याला थांबवले. आणि म्हणाला, "असा भुलून जाऊं नकोस. ही मी मायेची स्त्री केली आहे. ती दुरुनच पहायची असते. तूं जवळ जाऊन तिला स्पर्श करूं पाहशील तर ती अदृश्य होईल. अरे, तूं तर विवेकी विचारवंत आहेस. असा कसा मायेला भुललास? माया तकलादू असते, चंचल असते. तत्काळ नाहीशी होते." पण राजावर त्याच्या सांगण्याचा कांहीच परिणाम झाला नाही. मदालसेच्या ओढीने तो कासावीस झाला. "मला सोडा. माझ्या चिरविरहित प्रियेला मी भेटायला आतुर आहे. मला अडवूं नका, " असे म्हणत स्वतःला सोडवून "लाडके," असे तिला संबोधीत राजा धाडकन निपचित होऊन घरणावर पडला. मग मात्र अश्वतराने आणखी ताणले नाही. राजाला धरून उठवीत तो म्हणाला, "राजकुमारा, ही तुझी मदालसाच आहे बरं कां. मी थोडी गंमत केली. भगवान शंकरांच्या कृपाप्रसादाने ही आपल्याला परत मिळाली आहे. आतां तुम्ही दोघे सुखाने संसार करा." असे बोलून नागाने त्या दंपतीचे पुनर्मीलन करविले. नागाने ऋतध्वजाला जगन्माता सरस्वती चा अनुग्रह आणि भगवान शंकराचा कृपाप्रसाद कसा झाला आणि मदालसेच्या पुनरुज्जीवनाचा आपला हेतु कसा सफळ झाला ते सांगितले. मग त्या नागराजाने मदालसेचे विधिपूर्वक कन्यादान केले. पुण्यखाणी अश्वतराने ऋतध्वजाला नागलोकींची अमुल्य रत्नाभरणे आंदण दिली. अतिशय प्रेमाने त्या दोघांना नागलोकांत राहवून घेतले, त्यांना अमृतपान करविले आणि मग थाटामाटाने त्यांची पाठवणी केली. जातांना राजाने आपली कृतज्ञता व्यक्त केली. तो म्हणाला, "आपल्या ह्या उपकाराला प्रत्युपकार असा कांही नाहीच. मात्र याचे स्मरण मी आजीवन ठेवीनच. अन्यथा मला ब्रह्महत्येपेक्षांही भयंकर असा कृतघ्नतेचा दोष लागेल. थोडासाही कुणाचा उपकार विसरणारा माणूस अधमच होय." यानंतर कुवलयाश्व अश्वतराला वंदन करुन, आपल्या दिव्य अश्वावर आरुढ होऊन सपत्नीक आपल्या नगरीला परत गेला. १४-४१.

## कुवलयाश्वाचे मदालसेसह पुनरागमन.

आपल्या मित्रद्वयांसह कुवलयाश्व सपत्नीक नगराजवळ आल्यावर त्याने आपल्या वडिलांना निरोप पाठविला. हर्षनिर्भर होऊन राजा मुख्य नागरिकांसह लगोलग सामोरा आला. पुत्राला पाहून त्याचा आनंद दुणावला; पण त्याहीपेक्षां मदालसेला पाहून तो फारच आश्चर्यचकित झाला. सगळे पौरजन पहातच राहिले. मदालसा जशी त्यांनी आधी पाहिली होती तशीच्या तशी समक्ष उभी पाहून त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. रूप,वय, आकार, वागणूक अगदी हुबेहूब तसेच दिसले. राजा म्हणाला, "बाळा! माझी सून तर जळाली. आतां ही इथे कशी आली? ही खरीच मदालसा आहे की कांही प्रतिकृति केलेली आहे? तुला ही मिळाली तरी कोठे आणि कशी? " ऋतध्वजाकडून हळूहळू सर्व वृत्त समजल्यावर तो त्याच्या गळां पडून रडायलाच लागला. तो म्हणाला, "तू खरोखर धन्य आहेस. विवाह केलास तो एका देवकन्येशी. दैववशात्

तिचा मृत्यू झाला तरी पुनः तिलाच परत मिळवलीस! तुझी कीर्ति तिन्ही लोकांत गाजेल यांत शंका नाही. " ह्या वार्तेबरोबर नगरांत आनंदाची व नवलाची लहर पसरली आणि मदालसेचे दर्शन घेण्यास नगरवासीयांनी गर्दी केली. सगळे शहर सजविण्यात आले. उंड झेंडे उभारले, रस्त्यांवर चंदनाचे सडे शिंपले आणि नगाऱ्यांचा दणदणातांत नवागतांचे स्वागत करण्यांत आले. कुमारिकांनी राजा, मुलगा आणि सून यांच्यावर लाह्या आणि फुलांचा वर्षाव केला. अशा समारंभाने वाजतगाजत राजकुमार मदालसेसह राजवाड्यात आला. त्याने सर्व अभिजनांना सत्कारपूर्वक निरोप दिला. मग पित्याला साष्टांग नमस्कार करुन आपल्या नाग मित्रांचा परिचय करुन दिला. तो म्हणाला, "ह्या नागकुमारांच्या औदार्यानेच आपल्याला हा दिवस पहायला मिळतो आहे. मी मदालसेच्या विरहाने व्याकुळ होऊन अरण्यांत रहात असतांना ह्यांनी माझ्याशी सख्य केले. माझे दुःख जाणून ते आपला पिता अश्वतराच्या कानांवर घातले. त्या महान नागाने हिमालयात जाऊन तीव्र तपश्चर्येने प्रथम माता सरस्वती आणि मग भगवान शंकर यांना प्रसन्न करुन घेतले. त्यांच्या वरप्रसादाने माझी मदालसा परत आली. यांच्या वडिलांनी तिचे मला विधिपूर्वक थाटामाटाने कन्यादान केले." शत्रुजित राजाला हे सर्व ऐकून खूप आनंद झाला. शंकराची सती जशी आपला पिता दक्षाने केलेल्या यज्ञांत जळूनही पुनश्च पर्वतकन्या होऊन तिने परत शिवाचीच पतिरुपाने प्राप्ति करुन घेतली तशीच ही आपली पुण्यवती सून आहे असा भाव त्याने व्यक्त केला. तिच्या गंगाजळासमान पवित्र चारित्र्यामुळे आपले कुळ धन्य झाले असे त्याने बोलून दाखविले. ४२-६१.

## शत्रुजित् राजाचा वानप्रस्थाश्रम.

अशा रीतीने शत्रुजिताच्या सुखाचा घडा जणूं तुडुंब भरला. पण त्याने विचार केला की आतां फार काळ प्रपंचांत राहणे योग्य नाही. आपल्या वाढत्या वयाने हा राज्यभार चालविणे आपल्याला वरचेवर कठीण होत आहे आणि मानवी जीवनाचे खरे सार्थक आध्यात्मिक साधनांतच आहे असा विचार करुन तो कुवलयाश्वाला म्हणाला, "पुत्रा! तू माझा विनम्र आणि आज्ञाधारक औरस मुलगा आहेस. आतां ही राज्याची धुरा तू सांभाळायला हवी आहेस. मी क्षात्र धर्माला अनुसरुन वानप्रस्थ आश्रम स्वीकारुन मोक्षाचे साधन करावे असे ठरविले आहे. यांतच जीवनाचे सार्थक आहे आणि तोच सुखाचा खरा मार्ग आहे. या सांसारिक सुखांचा मोह मला सोडायलाच हवा." असे मुलाला समजावून त्याने आपल्या देखतच त्याचा राज्याभिषेक केला आणि मग समाधानाने तो वनांत गेला. तिथे जाऊन त्याने सद्गुरुंकडून साधन घेतले आणि आत्मज्ञानाची प्राप्ती करुन अंती शाश्वत मुक्ति घेतली. ६१-६६.

## मदालसेतील आंतरिक स्थित्यंतर.

कुवलयाश्वाने धर्मराज्य केले. प्रजेचे पुत्रवत् पालन केले. सर्व लोकही त्याच्या राज्यात सुखी असल्याने त्यांचे प्रेम आणि निष्ठा त्याने संपादन केली. मदालसा हुबेहूब पूर्वीसारखीच होऊन आली असे वर म्हटले असले तरी तिच्यात एक महत्त्वाचा, इतरांना सर्वसाधारणपणे न कळणारा, असा बदल झाला होता. भगवान शंकरांच्या कृपाप्रसादाने तिला आत्मज्ञानाची प्राप्ती झाली होती. ती आत्मनिष्ठ होती. म्हणजेच तिचा देहभाव पूर्णपणे नाश पावला होता. ती संसारात रमल्यासारखी भासली तरी तरी मनांतून तिची सर्व आसक्ति नाश पावली होती. पतिव्रताधर्माचे उत्तम पालन ती करीत होती. पतीचे चित्त सर्व प्रकारे रिझवीतही होती. त्याला हवे तसे शरीरसुखही ती देत होती. सारांश, पत्नीची सर्व कर्तव्ये ती कसोशीने पार पाडत होती. पण तिचे मन मात्र अलिप्त होते. 'तोही नेत्रीं पाहे। श्रवणी ऐकतु आहे। परी तेथिचा'सर्वथा नोहे। नवल देखें।।' या माउलींच्या ओंवीप्रमाणे (ज्ञानेश्वरी ५:४१) तिचे सर्व शारीरिक व मानसिक व्यापार आत्म्याच्या अधिष्ठानानेच होत होते. त्यांचे कर्तृत्व तिला बाधत नव्हते. कुठलीच क्रिया ती आपल्या वैयक्तिक सुखासाठी करत नव्हती. लोकसंग्रह हाच एकमेव उद्देश्य ठेवून शास्त्राने घालून दिलेले कर्म ईश्वराच्या प्रीतीसाठीच करत होती. ही संत-माहात्म्यांची अवस्था इतरांना कळणे अशक्य आहे. साधू ओळखायला साधूच झाले पाहिजे. अन्यथा त्या संताची कृपा तरी झाली पाहिजे तरच त्यांची थोडीफार ओळख पटूं शकते. ६७-६९.

# मदालसेचे अंगाईगीत.

यापुढील १८ कडवी अंजनीगीत या छंदांत आहेत. ब्रह्मज्ञानी मदालसेने ऋतध्वज राजाची पट्टराणी म्हणून संसार केला. निसर्गक्रमाने तिला पुत्र झाला. जन्मतःच रडणाऱ्या आपल्या मुलाचे शांतवन करण्याच्या निमित्ताने ती साध्वी त्याला उपदेश करूं लागला.

# तुझ्या ह्या दुरवस्थेचे कारण.

"जन्मांतरी तू सन्मार्गावरुन ढळलास. त्यामुळे चौऱ्याऐंशी योनींत फिरण्याचे हे कष्ट तुझ्या वांटेला आले. हे तुझ्याच कर्मांचे फळ आहे. तूं जर मनुष्यजन्मात असतांना देवाचे ध्यानपूजनादि केले असतेस तर तप्त लोखंडाच्या स्त्रीला आलिंगन देण्यासारख्या नरकयातना तुला भोगाव्या लागल्या नसत्या. तेव्हां अरे बाळा आतां तरी आपल्या मनाला आंवर घाल. विरक्त वृत्तीने भिक्षेचे अन्न सेवन करुन तप केले असतेस, नरकाची घाण तुझ्या तोंडीं आली नसती. स्त्रियांच्या रुपाला तूं भुलला नसतास तर नरकांत आणि अन्य योनींत तुझे्यावर डोळे फोडून घेण्याची पाळी आली नसती. नरकवासानंतर पापकर्माच्या फलस्वरुप विविध मानवेतर (तिर्यक्) योनी त तू फिरलास. तिथे तुला मुक्तीचा मार्ग कसा गंवसणार? तो मार्ग फक्त मानव योनींतच उपलब्ध होतो. आतां हा दुर्लभ नरदेह तुला मिळाला आहे. हा अशा व्यर्थ रुदनांत घालवूं नको. लटक्या भ्रांतीला भुलून न जातां तुझा मार्ग तूंच विचाराने काढायचा आहे. (उद्धरेदात्मानात्मानं नात्मानमवसादयेत्-भ.गीता). ७०-७६.

# आत्मानात्मविवेक

"तू जर जन्ममरणरुपी संसारा च्या भयाने रडत असशील तर त्यांच्याशी तुझा कांहीच संबंध नाही हे लक्षांत घे. जन्म, वाढ, स्थिति, परिणाम, क्षय आणि मृत्यू हे सहा विकार या पाञ्चभौतिक देहाचे आहेत. तूं निर्विकार, शुद्ध, बुद्ध, कालत्रयातीत, आनंदस्वरुप आत्मा आहेस. "

**शुद्धोऽस्यकं न ते नायं कल्पितः पाञ्चभौतिकः।**
**देहोऽपि ते ह्यसङ्गस्य कुतो रोदिषि सन्भवान्।।३५:२।।**

"मातेचे रक्त आणि पित्याचे रेत यांच्या संयोगांतून विष्ठामूत्राच्या मुशीत आकारलेला हा देह तूं कसा असशील? अस्थिमांसात्मक देहाशी अध्यासाने तादात्म्य पावून त्याचे संबंधी (माता,पिता, पत्नी, सुत आदि) हे आपले मानतोस हा केवढा मूढपणा आहे?"

**पितेति क्वापि मातेति प्रियेति च तवेति च।**
**ममेति भौतिकेष्वेषु मा कृथा दुर्मतिं सुधीः।।६।।**

# पंचकोशनिरसन.

"त्या देहाला कल्पनेनेच ठेवलेले नांव तू आपले नांव समजतोस. हाडामांसाच्या जुडीवर कातडीचे आवरण घातलेला हे स्थूल शरीर म्हणजे "मी" अशी भूल तुला पडली आहे. पण तूं त्याहून निराळा आहेस. कर्मेंद्रियांच्या द्वारां खाणे, पिणे, श्वास घेणे इत्यादि व्यापार करणारा हा अचेतन (जड) प्राण (प्राणमय कोश) तुझ्यापासून भिन्न आहे. ज्ञानेंद्रियांच्या आवडीनिवडीमागे सारख्या इतस्ततः धांवणाऱ्या ह्या चंचल मनापासून (मनोमय कोश) तू सर्वथा वेगळा आहेस. निश्चल आहेस. ज्ञानेंद्रियांवर नियंत्रण ठेवणारी, "मी कर्ता आहे " असा अभिमान बाळगणारी, सर्व क्रियांचा निश्चय करणारी बुद्धीसुद्धां (विज्ञानमय कोश) तुझ्याहून वेगळीच आहे. पूर्वकर्मांच्या परिपाकाने प्राप्त होणाऱ्या सुखभोगांनी प्रिय (आवडत्या विषयाच्या दर्शनाने होणारा आंनंद), मोद (प्राप्तीने होणारा आनंद) आणि प्रमोद (उपभोगाने होणारा आनंद) हे सर्व आनंद आनंदमय कोशाचे आहेत. तू तर स्वतःच निखळ आनंदस्वरुप आहेस. ह्या पंचकोशात्मक तीन देहांचा (स्थूल, सूक्ष्म आणि कारण) तूं फक्त साक्षी आहेस. पाहणारा आहेस. त्या आनंदरुप, व्यापक, प्रत्यगात्म्याचे ध्यान करून त्यांतच तू रमून रहा. तसे न करतां विषयभोगांच्या मागे लागलास तर जननमरणाट्या रहाटगाडग्यांतच फिरत राहशील." ७७-८७.

त्या नवजात अजाण अर्भकाला ती योगीमाता सतत बोध करून त्याचा द्वैतभावाचे – आपण आत्म्याहून वेगळे आहोत अशा भ्रांतीचे, अत्यंत करुणेने, कळकळीने निरसन करीत होती. त्याचे प्राणरक्षण व्हावे म्हणून तू त्याला दूधही पाजावयाची. अंगाईगीताच्या निमित्ताने त्याला निखळ वेदांतच सांगत होती. तिच्या बोधशक्तीने त्या मुलाची आत्मैक्यबुद्धी वाढीला लागत असे. मदालसा पुत्राला म्हणाली, "प्रमादरुपी मृत्यू तुझ्याबरोबरच जन्मला म्हणून तूं रडतोस का?" प्रमाद म्हणजे आत्मानुसंधानाकडे दुर्लक्ष असे वेदांतशास्त्राचे प्रतिपादन आहे. कारण आत्म्याकडचे लक्ष ढळले की देहाचे तादात्म्य येते. हेच आत्म्याचे हनन होय. ती पुढे सांगते, "तुला या प्रमादमृत्यूला भिण्याचे कारण नाही. कारण प्रमादाला कारण असणारे रागद्वेषादि मल तुझे नाहीतच म्हणून तूं शुद्ध आहेस. तुला दुःख होईलच कसे? ह्या अशुद्ध देहासाठी रडण्यात काय हशील? तो नाशिवंत आहे आणि एके दिवशी नाश पावणारच आहे. याच्या अभिमानाने तुला केवळ कष्टच होणार! तूं म्हणशील की 'मी आईच्या पोटांतून जन्म घेतला आणि आतां वाढतो आहे. अर्थात् मी देहपरिच्छिन्न आहे. तेव्हां मला दुःख होणारच1' हे खरे नाही. कारण या चराचर सृष्टीचा तूंच बाप आहेस; सर्व चतुर्दशभुवनात्मक ब्रह्मांड तुझ्या पोटांत आहे. तूं कुणाचा मुलगा कसा होशील? देहादि संघाताच्या अभिमानाने तू बहिर्मुख होतोस तेव्हां हे जग उत्पन्न झाल्यासारखे वाटते. म्हणून तू तुझे मन अंतर्मुख करून हळूहळूं आत्मस्वरुपांत स्थिर केले की ते जग विरून जाईल. मग शोकादि विकारांना वावच राहणार नाही. तू म्हणशील," हा देह वाढतो, शीत, उष्ण इत्यादींच्या संवेदना ह्याला आहेत, तसेच सुख आणि दुःख यांना जाणतो. मग तो जड कसा ?" हे त्याचे वाढणे हे अन्नपाण्याच्याच्या ग्रहणाने होते."

**भूतान्यन्योन्यसंबन्धं प्राप्यर्द्धिं यान्ति न स्वतः।**
**वृद्धिहानी न तेऽम्ब्वन्नदानाद्देहोऽस्य वर्धते।।४।।**

"एकावर एक विटा रचत गेल्यास भिंत वाढत जाते. तसेच आहाराची भर पडत गेली की देह वाढतो. आत्मा तर निर्विकारच आहे. तो कधीच वाढत किंवा घटत नाही. थंड, गरम इत्यादि संवेदना त्वचेला होत नाहीत तर तिला व्यापणाऱ्या चैतन्याला होतात. सुखदुखे ही मनाची वाटली तरी ते अज्ञानच आहे. मनसुद्धा अचेतनच आहे आणि चैतन्याचा संचार झाल्यावरच त्याला सुखदुःखाची जाणीव होते. ती ज्ञानशक्ति ब्रह्माचीच आहे. हे सुखदुःखही देहादिकांच्या अध्यासाने मोहित झालेल्या जीवांना असते. जीवांचे सुख विषयांवर अवलंबून असणारे पराधीन सुख आहे. क्षणभुगुर आहे. ज्ञानी पुरुष मात्र त्रयस्थपणे प्रापंचिक सुखदुःखांकडे पाहत असल्याने त्याच्या नित्य आनंदात फरक पडत नाही."

**दुःखैः संतप्यते मूढो विदस्तान्येव कानि हि।**
**पराधीनतयोत्थं कं तत्तुच्छं विरसं क्षणात्।।७।।**

"सारांश ह्या देहाचा संग सोड. पांच महाभूतांची ही हाडामांसाची गलिच्छ पेंडी म्हणजे मी ह्या भावनेचा (अहंकार) तसेच या देहाच्या संबंधितांविषयीच्या ममत्वाचा त्याग कर. त्यांच्यामुळेच तू बरी-वाईट कर्मे करतोस आणि संसारचक्रांत बांधला जातोस. आपले नित्य शुद्ध, बुद्ध, निर्विकार, आनंदमय स्वरुप ओळखून त्याचेच ध्यान कर. मग हा अनर्थकारक भ्रम क्रमशः निरसेल. ह्या दुर्लभ नरदेहाचे सार्थक होईल."

**शीजमानोऽत्र देहेषु व्रजेथा नैव मूढताम्।**
**अहंताममताद्युत्थैः कर्मभिर्बध्यसेऽन्यथा।।५।।**

अशा प्रकारे त्या तान्ह्या बाळाला ती माता वरचेवर अंगाईगीतांतून उपदेश करीत होती. त्याच्या चित्ताला द्वैताचा वाराही शिवूं देत नव्हती.

ही कथा श्रीस्वामी महाराजांनी मार्कण्डेय पुराणातून अनुवादलेली आहे. त्यांतील मदालसेच्या उपदेशाचे खालील श्लोक वाचकांना उपयुक्त वाटतील म्हणून देत आहे. सर्वसाधारण भावार्थ वर आलेलाच आहे.

शुद्धोऽसि रे तात न तेऽस्ति नाम। कृतं हि ते कल्पनयाधुनैव।
पञ्चात्मकं देहमिदं न तेऽस्ति। नैवास्य त्वं रोदिषि कस्य हेतोः।।
न वा भवान् रोदिते वै स्वजन्मा। शब्दोऽयमासाद्य महीशसूनुम्।

विकल्पमाना विविधा गुणास्ते-।ऽगुणाश्च भौताः सकलेन्द्रियेषु।।
भूतानि भूतैः परिदुर्बलानि। वृद्धिं समायान्ति यथैह पुंसः।।
अन्नाम्बुदानादिभिरैव कस्य। न तेऽस्ति वृद्धिर्न तेऽस्ति हानिः।।
त्वं कञ्चुकं शीर्यमाणेऽस्मिं- ।स्तस्मिंश्च देहे मूढतां मा व्रजेथाः।
शुभाशुभैः कर्मभिर्देहमेत-।न्मदादि मूढैः कञ्चुकस्ते पिनद्धः।।
तातेति किञ्चित्तनयेति किञ्चि-।दम्बेति किञ्चिद्दयितेति किञ्चित्।
ममेति किञ्चिन्न ममेति किञ्चित्। त्वं भूतसंङ्गं बहु मानयेथाः।।
दुःखानि दुःखापगमाय भोगान्। सुखानि जानाति विमूढचेताः।
तानेव दुःखानि पुनः सुखानि। जानाति विद्धानमूढचेताः।।
हासोऽस्थिसंदर्शनमक्ष्मियुग्म-।मत्युज्ज्वलं यत्कलुषं वसायाः।
कुचादि पीनं पिशितं घनं तत्। स्थानं रतेः किं नरकं न योषित्।।
यानं क्षितौ यानगतं च देहो। देहेऽपि चान्यः पुरुषो निविष्टः।
ममत्वमूर्व्यां न तथा यथा स्वे। देहेऽतिमात्रं च विमूढतैषा।।

नवजात, अजाण अर्भकाला राणीने वेदांताचा उपदेश केला आणि त्या उपदेशाने तो ब्रह्मज्ञानी झाला, हे आपल्याला आज असंभवनीय वाटणे स्वाभाविक आहे. पण यापूर्वी आपण गर्भगत भ्रूणालाही केलेला उपदेश सफल होतो हे पाहिले आहे. पुराणांत हिरण्यकश्यपूची पत्नी कयाधू हिला नारदांनी केलेल्या उपदेशाचा तिच्या गर्भांतील प्रह्लादावर प्रभाव पडला; तसेच श्रीकृष्णानी चक्रव्यूहाच्या भेदाची प्रक्रिया सुभद्रेला सांगितली ती गर्भस्थ अभिमन्यूने आत्मसात केली अशी उदाहरणे आहेतच. पण आधुनिक विज्ञानालाही गर्भावस्थेत 'बाहेरच्या' गंधांची आवाजांची जाणीव होते. एवढेच नव्हे तर त्यांची स्मृति जन्मोत्तर राहते. आईच्या पहिल्या तीन मबिन्यातील आहाराचा मुलाच्या आवडीनिवडीवर होणारा परिणाम वैज्ञानिक पद्धतीने मान्य केला आहे. या काळांत आईच्या आहारांत लसूण किंवा व्हॅनिला असतील तर पुढे मुलाला त्या पदार्थांची आवड असते. तसेच गर्भाशयांतील काळांत ऐकलेले संगीत त्याच्या लक्षांत राहते आणि ते त्याला प्रिय होते असेही आढळले आहे.[२] हे झाले सर्वसाधारण जीवांचे. मदालसेसारखी महान योगिनी जर माता असेल तर तिचे पुत्रही तसेच अधिकारी जीव असणार. तेव्हां त्यांना मातेच्या उपदेशाने ब्रह्मज्ञान होणे नक्कीच शक्य आहे. वेदांत गर्भातच ब्रह्मज्ञान झालेल्या वामदेव ऋषींचे वर्णन आहे. तेव्हां या आख्यानावर अविश्वास न दाखवितां त्याविषयी आपले मन ग्रहणशील ठेवायला हरकत नाही.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा अठ्ठाविसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

---

[२] **Foetal learning . a bridge over birth,** Minna Huotilainen, Ph.D., research fellow Collegium of Advanced Studies, University of Helsinki, Finland

# बोध दत्तमाहात्म्याचा.

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय २९ वा.

**नरेंद्र मूर्ख पुत्र जाणून। करी शोक अनुदिन। मग तया सांगे नंदन। माता हें ज्ञान दे आम्हां।।६०।।**
**वैरस्य तें मानून। मदालसेवरी नृप कोपून। प्रवृत्तिमार्गाचें स्तवन। करी एकुणतिसाव्यांत।।६१।।**

वेदधर्मा मुनी संदीपकाला पुढे सांगतात, “असा वेदांताचा बोध ती माता त्या नवजात बालकाला करत असतांनाच एका दासीने त्याचा पिता ऋतध्वजाला पुत्रजन्माची हर्षदायक वार्ता निवेदन केली. राजाने आनंदाने उत्सव केला. मुलाचे जातक वर्तविण्यासाठी ब्राह्मणाना पाचारम केले. त्यांनी ग्रहमान पाहून ‘भाव बरे आहेत’ असे मोघम सांगितले. राजाने यथाकाळ जातकर्म आणि पुत्रजन्माच्या निमित्ताने भरपूर दानधर्म केला आणि मुलाचे नांव विक्रांत वर्म असे ठेवले. सगळ्यांनी यावर आनंद व्यक्त केला. मदालसा मात्र ते ऐकून स्वतःशीच हसली. राजाने ते पाहिले. त्याला त्याचे जरा वैषम्य वाटले. ‘हिला आधी न विचारतां’नांव ठेवल्याने ती हसली असावी’ असा विचार करुन आणि सर्व लोकांपुढे त्याचे कारण राणीला विचारले तर आपलेच हंसे होईल असे वाटून तो गप्प राहिला.” १-६.

## विक्रांताला आत्मज्ञान.

विक्रांत जसजसा मोठा झाला तसतसा त्याच्या मनांत अद्वैताचा बोध अधिकाधिक ठसूं लागला. तो आत्मज्ञानी झाला. वरकरणी मात्र त्याने वेड्याचे सोंग घेतले होते. त्याचे वेडे चाळे पाहून राजाला काळजी वाटूं लागली. आपली पत्नी सुशील आणि पतिव्रता आहे, आपणही धर्माचरणाविषयी दक्ष आहों. असे असतांना आपला मुलगा असा मंदमति आणि वेडा कसा झाला? अशा चिंतेने तो व्याकुळ झाला. त्याला रात्रंदिवस हेच दुःख व्यथित करीत होते. आपला मुलगा खरे तर ज्ञानी आहे हा विवेक न करतां आल्याने तो तळमळू लागला. तो पुत्र विक्रांत मात्र ब्रह्मविद्वरिष्ठ या ज्ञानाच्या चरम भूमिकेवर आरुढ झाला. सदैव आत्मरत असल्याने त्याला बाहेरच्या जगाचे भानच नसायचे. त्याचे मन प्रवृत्तिनिष्ठ – बहिर्मुख कोण करणार? जन्मल्यापासून त्याच्या मातेने त्याला सतत बोध करुन त्याला आत्मनिष्ठ केला यांत आश्चर्य ते काय? संत महात्म्यांच्या केवळ कृपाकटाक्षाने बद्ध जीवांचे अज्ञान दूर होते. त्यांचा वरदहस्त मस्कावर झळकतो तो जीवसुद्धा शिवत्वाला पावतो. ( ‘हे असो दिठी जयावरी झळके। की हा पद्मकरु माथां पारुखे। तो जीवचि परि तुके। महेशेशी।। ज्ञानेश्वरी १०:९।।’). विक्रांताल तर मदालसेसारख्या आईचा सतत सहवास आणि निरंतर उपदेश लाभला होता. ७-१३.

## सुबाहूचा जन्म आणि त्याला उपदेश.

मदालसेला प्रारब्धयोगाने पुनः दिवस गेले. तिने आणखी एका पुत्ररत्नाला जन्म दिला. पित्याने अत्यंत प्रेमाने त्याचे नांव सुबाहु असे ठेवले. पुनश्च मदालसा तसेच हंसली. राजा कुवलयाश्व वरमला आणि कांही न बोलतां निघून गेला. त्या बाळाला उचलून मदालसेने त्याच्याही कानांत वेदांताचा उपदेश सांगायला सुरुवात केली. “हे हाडांच्या खांबावर उबे केलेले, नाड्यांच्या दोरांनी ठिकठिकाणी बांधलेले , रक्ताने लिंपलेले शरीर कुत्र्या-कावळ्यांनी लचके त्याचे लचके तोडूं नयेत म्हणून कातडीने मढवले आहे. (**मांसास्थिरक्तवद्धिंस्त्र-वञ्चनार्थं त्वगावृतम् ।।द्वि.सा.गुरुचरितम्३६।।**) भ.पू.पा. शंकराचार्यांनीही शतश्लोकीत मुनष्यदेहाचे ***'बाह्येऽस्थिस्नायुमज्जापलरुधिरवसाचर्ममेदोयुगन्तर्विण्मूत्रश्लेष्मपूर्णं स्वपरवपुरहो'***असेच वर्णन केले आहे. द्विसाहस्रीतच महाराजांनी पुढे हे शरीराची परिणती भस्म, विष्ठा आणि कीटक यांच्यातच होते असे सांगितले आहे. मलमूत्राने भरलेले हे शरीर स्वभावतःच अपवित्र आहे. स्वतःच्या शरीराचे हे किळसवाणे स्वरुप ज्याला जाणवले त्याला वैराग्यासाठी वेगळ्या कारणाची काय आवश्यकता? या देहा ला कांही केल्या पवित्र करतां येत नाही. अशा ह्या देहाचा मीपणा नित्य सहवासाने उगीच भुलून जाऊन तूं घेऊं नकोस. तूं हा देह होऊंच शकत

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

नाहीस. तसेच हा तुझा होत नाही. हा स्थूल देह, ही दहा इंद्रिये, हे पंच प्राण, मन, बुद्धि, अहंकार सगळे तुझ्या स्वरुपाहून – आत्म्याहून भिन्न आहेत. अनात्म आहेत. तूं यांना पाहतोस. हा माझा देह, ही माझी इंद्रिये, हे माझे मन, बुद्धि असा विचार करुं शकतोस. तूं यांचा द्रष्टा – पाहणारा आहेस. म्हणजेच यांच्याहून वेगळा आहेस. तूं सर्वांना प्रकाशणारा परंज्योतिस्वरुप आत्मा आहेस. तूं न जन्माला आला आहेस, न वाढशील, परिणत होशील, न क्षय पावशील,न नष्ट होशील. ह्या सर्व विकारांनी अस्पृष्ट असा निर्विकार आत्मा हेच तुझे खरे स्वरुप आहे. मग देहाच्या संबंधाने येणारे वर्ण, आश्रम तरी तुला कसे शिवतील? तुला ना माता आहे ना पिता. तूं स्वभावतःच आनंदरुप, सुखरुप आहेस. मग सुखासाठी तुला पत्नीची काय आवश्यकता? हाच तूं मनाशी निश्चय कर. तुला ज्याला लवमात्र खंड नाही असे सुखच सुख मिळेल. त्यासाठी तुला राज्याची गरज नाही. तू सर्व देवादिकांनासुद्धा पूज्य आहेस. तू एकच एक, अद्वितीय आहेस. तुला स्वगत, सजातीय वा विजातीय भेद नाहीत. आत्मा हाच तुझा लोक आहे. तो प्राप्त करण्यासाठी तुला पुत्राची गरज नाही. पुत्रादिकांमुळे सुख होते हा भ्रम मनांतून काढून टाक. बृहदारण्यक उपनिषदांत (४:४:२२) ह्याच परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करण्याच्या इच्छेने पूर्वीच्या ऋषिमुनींना संन्यास घेतला. संततीची इच्छा सोडली. ते म्हणतात, “संतती घेऊन आम्हाला काय करायचे आहे? त्यांच्यापासून न आम्हांला हा आत्मा प्राप्त होईल न हा लोक!” पुत्रैषणा, वित्तैषणा आणि लोकैषणा ह्यांचा त्याग करुन ते भिक्षेकरी झाले. हा श्रेष्ठ वेदांतविचार तूं मनांत दृढ कर. मग तुला कसल्याही आचारधर्माची आवश्यकता नाही. तूंच परमश्रेष्ठ आत्मतत्त्व आहेस हे चिंतन सतत करीत रहा. हाच तुझा धर्म. ” अशा प्रकारे त्याच्याशी संवाद करुन मदालसेने त्यालाही ज्ञानी केले. तो पुत्रही आत्मनिष्ठ होऊन भूमीवर पडून राहूं लागला. इतरांना मंदमति –जड, आहे असे वाटूं लागले. १४-२८.

## शत्रुमर्दनाचा जन्म.

कालांतराने मदालसा पुनश्च गरोदर झाली आणि तिने आणखी एका मुलाला जन्म दिला. ती वार्ता समजतांच राजा ऋतध्वज लगेच तिथे आला. त्याने ज्योतिषांना बोलावले आणि विचारले, “आतां ह्याचे ग्रह कसे आहेत पहा. हा तरी राज्याला योग्य होईल ना? ” त्यावर ज्योतिषांनी सांगितले की, “हा तुमचा मुलगा खूप हुशार आणि बुद्धिमान होईल. हा अपरिमित विद्या शिकेल. सामान्य माणसांना त्याच्या विद्वत्तेची कल्पनाही करतां येणार नाही. आयुष्यही याचे दीर्घ आहे. पण ह्याचे ग्रह मात्र उच्चीचे नाहीत. ” तेव्हा राजा म्हणाला, “एवढ्या ग्रहमानाच्या बळावर तो ही उणीव भरुन काढील. बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि दीर्घायुष्य यांच्या जोडीला त्याला राजकुळांत जन्म मिळाला आहे. हा सहजच सम्राट होऊन माझा वारसा चालवील.” असा विचार करुन त्याने त्याचे नांवही ‘शत्रुमर्दन ’ असे ठेवून टाकले. खरे तर आतां मदालसेला विचारुनच नामकरण करायचे असा त्याने निश्चय केलेला असूनही त्याचे त्याला विस्मरण झाले. ते नांवकानांवर पडतांच मदालसा पुनश्च पूर्वीसारखीच हंसली. राजाला आपलीच लाज वाटला. ‘यापुढे मात्र तिला विचारुनच नांव ठेवायचे ,’ असा पक्का निर्धार करुन तो कार्यमग्न झाला. २८-३८.

## शत्रुमर्दनाला उपदेश.

त्या बाळाला कुशीत घेऊन ती महायोगिनी त्याला विचारुं लागली.

**देह आणि आत्मा यांचा विवेक.** “अरे तूं कोण आहेस? कुणापासून झाला आहेस? आणि तूं कां रडतोयस? तुला कुणी भूल पाडली? या सगळ्यांचा तूं आतां विचार कर. तू जर असे मानशील की तू पूर्वी नव्हतास आणि आतांच नवा झाला आहेस तर तुला स्तनांत दूध असते आणि ते असे चोखून प्यायचे असते हे ज्ञान कुठून आले? तुला कुणी शिवले? हे सर्व चाळे तू पूर्वजन्मीच्या संस्कारामुळे करीत आहेस हे स्पष्ट आहे. पूर्वजन्मांत केलेल्या कर्मांनीच हा देह घडला आहे. ह्या जन्मातल्या नव्हे. म्हणजेच हा तुझ्याहून वेगळा आहे. प्रत्येक जन्मात वेगळाच देह प्राप्त होतो. ह्या देहाचा अभिमान धरुन आणि त्याच्या संबंधीयांची ममता बाळगून तू कायिक, वाचिक आणि मानसिक बरी-वाईट कर्मे करशील तर त्या कर्मानुसार तुला तसे तसे जन्म घ्यावे लागतील. पुन्हा चौऱ्यांशी लक्ष योनींचा फेरा सुरुं होईल.

**आत्मचिंतन हा उपाय.** हे संसरण जर टाळायचे असेल तर आपल्या नित्य, निर्विकार, जन्मरणरहित, सर्वव्यापी श्रेष्ठांहून श्रेष्ठ अशा आत्मस्वरुपाचे चिंतन कर. मी सर्व भूतांच्या अंतरांत वास करतो आणि सर्व जीव हे माझ्यातच स्थिरावलेले आहेत असे सतत ध्यान करुन द्वैतभावनेचा निरास कर.

**काम-क्रोध-लोभ यांचा धोका.** त्या आत्मस्वरुपाचा विसर पडला, विषयासक्तीच्या आहारीं जाऊन काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर आणि दंभ या सहा शत्रूंना वश होणारा आत्मघातकी आहे असे उपनिषदांचे सांगणे आहे. रजोगुणापासून होणारे काम क्रोध, लोभ हे चोरच माणसाला पापाकडे प्रवृत्त करतात. ह्यांनाच भगवद्गीतेत नरकाचे त्रिविध द्वार म्हटले आहे. ((१६:२१)) त्यामुळे ह्या तिघांपासून दूर रहावे.

**विषयासक्तीची अनर्थपरंपरा.** ह्या इंद्रियांचा स्वाभाविक ओढ आपापल्या विषयांकडे असते. पण ह्याच्या संस्पर्शाने मिळणारे सुख हे क्षणभंगुर, नाशिवंत आणि फसवे असते आणि त्यांची परिणति दुःखांतच होते. शहाण्यानी त्याना भुलूं नये असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. (ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते। आद्यंतवंतः कौन्तेय न तेषु रमते बुधाः।। ५:२२।।) ह्या विषयांचे चिंतन केलेस तर विषासारखे तुझ्या तिन्ही शरीरांत पसरतील. विषयांचे ध्यान केले की त्यांच्यात माणूस अडकतो (संग). मग त्यांच्याविषयी ओढ उत्पन्न होते (काम). ही ओढ चित्ताच्या क्षोभाला कारण होते (क्रोध). हा क्रोधच माणसाला भूल पाडतो (संमोह) आणि स्वतःच्या स्वरुपाचा विसर (स्मृतिभ्रंश) पाडून सर्वनाशकरतो (प्रणश्यति). ही भगवद्गीतेत सांगितलेली अनर्थपरंपरा (२:६२-६३) लक्षांत घेऊन तूं ह्या विषयांपासून दूर राहून स्वरुपांतच दृष्टी ठेवण्याचे व्रत घे. असे न केल्यास तुला घोर नरकयातनांना सामोरे जावे लागेल." ३८-५०.

**नारी नांवाचा नरक.** स्त्री ही सर्व विषयांचा संगम आहे. तिचे रुप, तिचा गंध, तिचा स्पर्श, तिचा आवाज हे सर्वच लोभसवाणे आहेत. त्यामुळे माणसाला बहिर्मुख करुन मोहित करण्याचे नारीचे सामर्थ्यही अचाट आहे. परमार्थी माणसाने तिच्याकडे दृष्टीसुद्धां टाकूं नये. मार्कंडेयपुराणांत म्हटले आहे कीं दंतास्थींच्या दर्शनाला हास्य म्हणतात, चरबीच्या चमकीला डोळ्यांचे तेज म्हणतात, मांसांच्या गांठींना घाटदार स्तन म्हणतात आणि ज्या देहात पुरुष आसक्त होतात ती सुंदरी नरकच नाही का? (हासोऽस्थिसंदर्शनमक्षियुग्मत्युज्ज्वलं यत्कलुषं वसायाः। कृष्णादि पीनं पिशितं घनं तत् स्थानं रतेः किं नरकं न योषित्।।२५:१७।।) भ.पू.पा.शंकराचार्यांनीही चर्पटपंजरिकास्तोत्रांत 'नारीस्तनभरनाभीदेशं दृष्ट्वा मा गा मोहावेशं। एतन्मांसवशादिविकारम् मनसि विचिन्तय वारं वारम्।।' असे म्हटले आहे. लाकडाची मादी पाहूनसुद्धा हत्तीला भूल पडते आणि तो खड्ड्यांत पडतो तर मांसमयी स्त्रीच्या दर्शनाने आपली अवस्था काय होईल याचा विचार करावा. इथे कुणाला असे वाटण्याचा संभव आहे की ही स्त्रीजातीची निंदा आहे. त्याचे उत्तर असे आहे की मदालसा आपल्या पुत्राला उपदेश करीत आहे. त्याला भविष्यात स्त्रीदेहाचे आकर्षण वाटण्याचा संभव आहे म्हणून त्या देहाची घातकता त्याच्या मनावर बिंबवण्यासाठी हा उद्देश आहे. संत एकनाथमहाराजांनी त्यांच्या चिरंजीवपद या साधकांना केलेल्या उपदेशपर प्रकरण ग्रंथात स्त्रियांच्या विषयीं साधकांचा दृष्टेकोन कसा असावा ते सांगतले आहे. ते इथे विचारणीय आहे. "नावडे स्त्रियांत बैसणे। नावडे स्त्रियांते पाहणे। नावडे स्त्रियांचे रगडणे। त्यांचे बोलणे नावडे।।३०।। नको नको स्त्रियांचा सांगात। नको नको स्त्रियांचा एकांत। नको नको स्त्रियांचा परमार्थ। करिती आघात पुरुषासी।।३१।।" ही निंदा स्त्रीजातीची नसून स्त्रीविषयीं पुरुषाला वाटणाऱ्या आसक्तीची, स्त्रियांकडे उपभोग्य वस्तु म्हणून पाहण्याची आहे. मदालसा ही स्त्रीच आहे आणि तिचा आणि तिच्या ब्रह्मज्ञानाचा गौरवच केलेला आहे हे कृपया लक्षांत घ्यावे. अनेक जन्माच्या संस्कारांनी मानवी मनांत दृढमूल झालेल्या कामसंकल्पनेवर आघात करणे हा उद्देश्य आहे. साधक स्त्रियांनीसुद्धा पुरुष देहाचा असाच विवेक करणे अपेक्षित आहे. ५१-५३.

**कांचन.** कामिनीसारखीच माणसाला मोहात पाडणारी वस्तु म्हणडे कांचनच होय. तांबे, चांदी आणि सोने हे सर्व लाल, पांढऱ्या आणि पिवळ्या रंगाचे मातीचेच प्रकार आहेत असा मनाचा निश्चय करुन त्यांना

स्पर्शही न करण्याचा उपदेश मदासलेने दिला आहे. असा स्पर्श अधोगतीला नेणारा ठरेल असा इशारा तिने दिला आहे. ५४.

**योग्याची जीवनचर्या.** परमार्थमार्गातील पथ्यांचे विवरण केल्यावर आतां मदालसा आतां थोडक्यांत योग्याने कसे रहावे ते सांगते आहे. अंगावर वस्त्र आहे की नाही याचीही चिंता न करतां भूमी च्या बिछान्यावर पडून रहावे पण झोंपूं नये. न मागतां जे मिळेल ते खाऊन संतुष्ट असावे. सर्व जीव अज्ञानरुपी तमांत निमग्न झाल्याने त्यांना आत्मस्वरुपाची विस्मृति झआलेली असते. त्या अज्ञानरुपी रात्री तूं जागा रहा म्हणजे आपल्या स्वरुपाचे अखंड अनुसंधान कर. ह्या अज्ञानरुपी झोंपेत हे सर्व अज्ञानी जीव हे जग स्वप्नवत् पहात आहेत. हे भ्रांतिमय जगत् खरे मानून त्यांतील सुखदुःखांचा भोग घेत आहेत. तिथे तू जाग्रत रहा – बाह्य व्यवहारांपासून अलिप्त रहा. (या निशा सर्वभूतांनां तस्यां जागर्ति संयमी। यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः।। भ.गीता २:६९।। ). अशी जीवननचर्या तूं अवलंबिलीस तर सुखी होशील. अन्यथा घोर संसारयातना भोगाव्या लागतील. अशा प्रकारचा ज्ञानोपदेश वरचेवर त्याही मुलाला आईने केल्याने तोही ज्ञानसंपन्न झाला. बाह्य जग मृगजळासारखे मानून त्याची आसक्ति सोडून देऊन, अंतरांतल्या आत्म्यांत मन स्थिरवून जड-मूढवत् जमिनीवर पडून राहूं लागला. ५५-५९.

## मदालसा कां हंसली?

कालांतराने मदालसाला पुन्हां दिवस गेले आणि तिने चवथ्या पुत्राला जन्म दिला. मात्र याच्या जन्माच्या वेळी पांच ग्रह उच्चीचे होते. राजाच्या ज्योतिषांनी त्याला भरंवसा दिला, “आतां तुम्हांला काळजी करण्याचे कारण नाही. पांच ग्रह उच्चीचे आहेत. आधीच्या तीनही मुलांचे असे ग्रहमान नव्हते. हा तुझा मुलगा मोठाच भाग्यवान आहे. हा सुप्रसिद्ध सम्राट होणार आणि तुझी कीर्ति वाढवणार याची खात्रा बाळग. हा तुझ्या कुळाचा उद्धर करील. ” ह्या जातकाच्या पुष्टीसाठीच जणूं त्या वेळी शुभशकुन झाले. राजाने हर्षोल्लासाने जातकर्म करुन दानधर्म केले. ह्या वेळी मात्र त्याने नांव ठेवतांना राणीला विचारले, “प्रिये, प्रत्येक वेळी मी मुलाचे नांव ठेवतांना तूं कां हसलीस? आतां या मुलाचे नांव काय ठेवायचे तूंच सांग.” ह्यावर मदालसेने मंद स्मित केले आणि बोलूं लागली. “मला हंसूं कां आले ते सांगते. विचारपूर्वक ऐका. क्रान्ति म्हणजे गति. एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. ज्या वस्तूला देश, काल यांचे परिच्छेद (मर्यादा ) त्याच जातात, येतात. सर्वव्यापी आत्मा सर्वदा सर्वत्र आहेच. तेव्हां त्याची गति कुठून, कशी होणार? मग त्याचे विक्रांत हे नांव व्यर्थच नाही का? आत्म्याचे अंश किंवा अवयव नसतात. त्याला आकारच नसतो. मग त्याला भुजा कशा असणार? अर्थात सुबाहू हे नांवही निरर्थकच नाही का? आत्मा एकच एक आहे. त्याच्याहून वेगळी वस्तूच नाही. (एकमेवाद्धितीय). त्याला स्वगत, सजातीय किंवा विजातीय भेदच नाहीत. मग त्याला शत्रू कसे असतील. तुम्ही कदाचित् म्हणाल बाहेरचे नसले तरी आंतरिक कामक्रोधादि शत्रु आहेतच की! हे काम-क्रोध वगैरे बुद्धीचे विकार आहेत. आत्मा बुद्धीच्या पलीकडचा, तिचा साक्षी परमपुरुष आहे. त्याला कुणी शत्रू असूंच शकत नाहीत. या आत्म्याचा न कुणी मित्र आहे ना शत्रु आहे. लाटांवर आपटून लाटा फुटतात तसेच जीवांकडून जीव नाश पावतात. (**क्व मित्रं क्व च वाऽस्यारिर्नायं हन्ति न हन्यते। भूतैर्म्रियन्ते भूतानि भङ्गैर्भङ्गा इवार्णवे।।दत्तपुराण ३५:२५।।**) नसलेल्या शत्रूंवर विजय मिळवणारा असे म्हणतांना जरा लाजच वाटते नाही का? त्यामुळे शत्रुजित हे नांवही मला अयुक्तिक वाटते. ” हे आपल्या पत्नीचे तत्वज्ञान ऐकून ऋतध्वजाला रागच आला. ते जाणून ती त्याला म्हणाली, “हे तत्त्वज्ञान एक वेळ सोडा. पण अहो, जो मुलगा एका जागेवरचा हलत नाही, सदा पडूनच आहे तो काय दिग्विजय करुन विक्रांत नांवाचे सार्थक करणार आहे का? बाहुबळाच्या जोरावर जग जिंकणाऱ्याला सुबाहु म्हणावे. हा तसा आहे कां? आणि जो अंगावरच्या माशा सुद्धा वारीत नाही त्याला शत्रुजित म्हणण्यात काय अर्थ आहे? मला त्यांच्या जन्माच्या वेळींच हे त्यांचे भविष्य कळाले होते. त्यामुळे मला हंसूं आले!” ५९-७९.

## अलर्क या नांवाची उपपत्ती.

यावर ऋतध्वज म्हणाला, “तू भविष्य जाणल्याने हंसलीस तर मग या मुलाचे अर्थाला अनुसरुन तूच नांव ठेव. ”मदालसा उत्तरली, “प्रापंचिक व्यवहारासाठी शरीरधाऱ्याचे नांव ठेवायचे असते. त्यानुसार तुम्ही यांचे नांव अलर्क असे ठेवा. अलर्क म्हणजे पिसाळलेला कुत्रा. हा विषयांच्या आसक्तीने पिसाळणार असल्याने त्याला हे शोभून दिसेल. याचे आणखी एक कारण आहे. ह्या नांवाचे अल् पद अलंकार शब्दाचे द्योतक असेल. विषयासक्तीचे ह्याचे पिसे शमल्यावर ह्याला वैराग्य उत्पन्न होईल आणि मग हा ज्ञानाने अलंकारित होईल. असे उभय अर्थांनी अलर्क हेच नांव त्याला योग्य आहे.” तिच्या सूचनेप्रमणे राजाने अलर्क नांव ठेवून ब्राह्मणाना धन वाटले. ८०-८४.

## विक्रांताचा वडिलांशी संवाद

पहिल्या तीन मुलांची अवस्था पाहून मात्र राजा अत्यंत व्यथित होत असे. त्यांच्यांत कांही सुधारणा व्हावी यासाठी त्याने खूप प्रयत्न केले. पण त्यांत त्याला कांही यश आले नाही. अकराव्या अध्यायात आपण ब्रह्मज्ञानी मलाने वेड्याचे सोंग घेतलेले पाहिले आहेच. खऱ्या वेड्यात उपायांनी सुधारणा व्हायची शक्यता असते. पण हे तर वेड पांघरलेले ज्ञानी होते. हे न कळाल्याने राजाला दुःख होत असे. तो आपल्या कर्माला बोल लावीत असे. अंगी साधुत्व बाणल्याखेरीज साधूला ओळखथां येत नाही. संतांची लक्षणे संतच जाणतात. मदालसेने परोक्ष रीत्या त्यांची अवस्था सूचित केली होती. ती राजाला कळली नाही. एकदां घाणीत लोळणाऱ्या विक्रांताला पाहून तो कळवळून बोलला, “काय ह्या पोराचे दैव आहे? राजाच्या घरी जन्म घेऊन उत्तम भोग भोगण्यांतच जीवनाचे खरे सार्थक आहे. अन्यथा असे जगण्यात काय अर्थ आहे? ” हे शब्द त्या विक्रांताच्या कानांवर पडले. त्यावर तो आपल्याशीच हंसला. ते पाहून राजाला जाणवले की ह्याला आपले बोलणे कळाले आहे. त्यालाच तो हंसत आहे. त्याने विक्रांताला उचलून घेतले आणि विचारले, “तूं तर शहाणा वाटतोस! मग हे जाणूनबुजून वेड्याचे सोंग कां म्हणून घतले आहेस? असा निष्क्रिय कां लोळत असतोस. अरे! तूं विद्याभ्यास कर. राज्य कर. विवाह करुन संसारांतील सुखें भोग. मोक्षासाठी यज्ञांचे अनुष्ठान कर. तुझी सगळे वाहवा करतील. सर्व लोकांचे रक्षण करुन पुण्यश्लोक सम्राट हो. ” हा वडिलांचा उपदेश ऐकून विक्रांत हंसूं लागला. “विद्याभ्यास माझआ लगळा झाला आहे. मातेने मला सर्व कांही शिक्षण दिले आहे. विवाहाचे म्हणाल तर निवृत्ति (विरक्ती) नांवाच्या स्त्रीशी माझे लग्न झाले आहे. तसेच स्वरुपसाम्राज्यावर मी आरुढ झालो आहे. त्यामुळे मला इतर कांही आवड (आसक्ती) राहिलीच नाही. मनुष्यजन्माला येऊन जे करायचे ते मोक्षसाधन मी केले आहे. आत्मानुभूती मिळवली आहे. आईच्या कृपेने आम्ही तिघेही भाऊ कृतार्थ झालो आहोत. चौथा अलर्कही त्याच वाटेने जात आहे. ” ८५-९७.

## राजाची मदालसेला समजावणी.

आपल्या मंदमति वाटणाऱ्या मुलाकडून हे सर्व मदालसेने केले आहे हे समजतांच राजाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तिघांही मुलांनी घरलेला निवृत्तीचा मार्ग त्याला मुळीच रुचला नाही. एखाद्या दुराचारी स्त्रियेला पतिव्रतेचे आचार कसे रुचतील? तो संतापून राणीकडे आला आणि तिची कानउघाडणी करायला सुरुवात केली. “मूर्ख स्त्रिये! हा काय कुळाचा नाश तूं आरंभिला आहेस? मुलांना ह्या अकल्याणाच्या वाटेला कां लावते आहेस? प्रवृत्तीमार्गाने देव पितर आणि मानव ह्या सर्वांनाच सुख लाभते. ते सर्व सुख सोडून पोटच्या पोरांना ह्या क्लेशकारक मार्गावर का ढकलते आहेस? (क्लेशोऽधिकतरस्तेषाम् अव्यक्तासक्तचेतसाम्। भ.गीता १:२५) देवाच्या प्रसादाने राज्य, हत्ती, घोडे, स्त्रिया, संपत्ती हे सर्व एखाद्या भाग्यवानालाच लाभते. ते सर्व भोगायचे सोडून त्याचा अव्हर करण्यात काय शहाणपणा आहे? तो देवद्रोहच ठरेल! ज्यांच्या हे कांहीच नाही अशा भाग्यहीनांनी फार तर निवृत्तीची वाट धरावी. त्यांच्यासाठीच देवाने ह्या मार्गाची योजना केली आहे. जे लोक असे विरक्त होतात ते पुढे आपल्याच दारी येतात ना? गृहस्थाश्रमच इतर तीन आश्रमांचा आधार आहे की नाही? मग हे सोडून काय हशील? तुझ्या ह्या मूर्खपणाच्या उपदेशाने कल्याण तर होणारच नाही, पण धर्मच बुडेल हे कसे तुझ्या लक्षांत येत नाही ? आपले पितर त्यांच्या त्यांच्या चांगल्या-वाईट कर्मांनी पितृलोकांत, पशुयोनीत किंवा पिशाचयोनीतही गेले असले तरी त्यांची भूक गृहस्थाने केलेल्या श्राद्धानेच भागते. ही

ब्रह्मदेवांचीच योजना आहे हे तूं जाणत नाहीस का? देव, पितर, भूतप्रेत, कीटक इत्यादि सर्व जीवांचा चरितार्थ गृहस्थाश्रमावर अवलंबून आहे हा सनातन धर्म आहे. (**नृदेवपितृभूताद्याः कृमिकीटादयोऽपि च।। गृहिभ्य एव जीवन्ति धर्म एष सनातनः।।**दत्तपुराण **३५:३९।।**) ह्याच धर्माचे रक्षण करण्यासाठी भगवान नारायण स्वतः वरचेवर अवतार घेतात. ह्या धर्माच्या आचरणाने दोष लागेल की काय? निदान आपल्या उद्धाराचा तरी विचार कर. 'अपुत्रस्य लोको नास्ति' हे वेदवचन तूं कधी ऐकले आहेस की नाही?. त्यासाठी हा चौथा मुलगा तरी तरूं दे. त्याला तरी प्रवृत्तीमार्गानेच जाऊं दे. पहिले तिघे तर तूं भ्रष्ट केलेच आहेत आणि त्याची कष्टकारक फळे ते भोगत आहेतच. निदान माझ्या ह्या अलर्काला तरी वांचूं दे. " ९८-११०

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकोणतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]


## अध्याय ३० वा.

ते अयुक्त जरी तरी। मदालसा स्वीकारी। अलर्काला व्यवहारी। हुशार करी नृपाज्ञेनें।।६२।।
साम्राज्य अलर्काचें पाहून। त्याला विरक्त करावा म्हणून। सुबाहू करी रण। हें कथन तिसाव्यांत।।६३।।

## मदालसेचे उत्तर आणि अलर्काला व्यवहाराचे शिक्षण देण्याचे आश्वासन.

वेदधर्मा मुनि शिष्य संदीपकाला पुढे सांगतात. राजा अशा प्रकारे संतापून मदालसेवर आग पाखडत होता. निवृत्तीपर मार्ग विचारांतही न घेतां प्रवृत्तीधर्माचे गोडवे गात होता. मदालसा शांतपणे ते ऐकून घेत होती. प्रवृत्ती (कर्ममार्ग) आणि निवृत्ती हे दोन्ही वेदांतच वर्णिलेले आहेत. वेदांच्या पूर्व भागांत मुख्यतः यज्ञयागदिक कर्मांचेच वर्णन आणि विधि आहे. त्याच वेदांनी उत्तरभागांत - उत्तरमीमांसा, वेदांत किंवा उपनिषद यांतून निवृत्तीचा – ज्ञानमार्गाचा उपदेश केला आहे. हे दोन्ही सकृद्दर्शनी वेगळे वाटले तरी ते एकमेकांना पूरकच आहेत. सर्वसाधारण माणसांना ज्ञानमार्ग रुचत नाही. कारण जन्मजन्मांतरांतील कर्मांच्या संस्कारांनी त्यांच्या चित्तांत संसाराचे संस्कार दृढमूल झालेले असतात. ह्या त्यांच्या चित्तांतील अशुद्धीमुळे ते ज्ञानमार्गाचा द्वेष करतात. **'महापापवतां नृणां ज्ञानयज्ञो न रोचते। प्रत्युत ज्ञानयज्ञस्तु प्रद्वेष्यो भासते स्वतः।।** सूतसंहिता २ः६८-६९'. **अशा** माणसांच्या चित्तशुद्धीसाठी कर्ममार्ग सांगितला आहे. राजाचा संताप आणि आवेश उतरल्यावर मदालसा म्हणाली, “आपण जरा शांतपणे माझे बोलणे लक्ष देऊन ऐकावे. मी या आपल्या पुत्राना केलेला उपदेश योग्यच आहे. याच्या परिणामी हे पुत्र तर मुक्त होतीलच. पण आपले सर्व पितरही निश्चितपणे तरतील. हे मी वेदांचेच मत मांडीत आहे. यापेक्षां वेगळी मुक्तीची वाटच नाही (नान्यः पंथा विद्यतेऽयनाय।। श्वेताश्वतर उ. ३:८) असे वेदांनीच ठामपणे सांगितले नाही का? पितर, भूत इत्यादि योनींत गेलेले सगळे त्यांच्या आपल्याच कर्मांनी गेले आहेत आणि आपल्याच कर्माने वांचणार आहेत. मनुष्यांचे तर आपले स्वतःचे जीवनही आपल्या हातांत नसते. आपण इतरांचा उद्धार करण्याची व्यर्थ भ्रांति घेतो. नारी, संपत्ती इत्यादि ऐहिक भोग भोगावे असे आपण म्हणतां तर मग वेदांनी वैराग्याचा उपदेश का केला आहे? (यदहरेव विरजेत् तदहरेव प्रव्रजेत। जाबालोपनिषत् ४). या वेदवचनाला नाकारल्याने पाखंडदोषच पदरी पडेल. वेदांनी सांगितलेल्या वाटेने जाणारा देवद्रोही कसा होईल? वैराग्यप्राप्तीनंतर संन्यास घेतल्यावर भिक्षा मागण्याने कमीपणा कसा येईल? संतोषाची संपत्ती गांठी असेल तर कष्ट तरी कसे वाटतील? या ज्ञानमार्गांत प्रथम जरी कष्ट वाटलेच तरी परिणामी ते सुखपर्यवसायीच आहे. (यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।। भ.गीता १८:३७।। प्रवृतीमार्ग जरी सुरुवातीला अमृतासारखा गोड वाटला तरी त्यांतून विषासारखी अनर्थकारी दुःखपरंपरा उद्भवणार आहे. या मानवजन्माला येऊन जर कुठला लोक मिळवायचा असेल तर तो आत्मलोकच होय. तो या भौतिक पुत्रांनी मिळणार नाही तर प्रबोध म्हणजे ज्ञान नांवाच्या पुत्रापासूनच मिळणार आहे. (प्रजया किं करिष्यामो येषां नोऽयमात्मा नायं लोकः।) तेव्हां मी जे केले आहे योग्यच केले आहे. ते तुम्हांला विपरीत वाटत असले तर आतां हा आपल्या चौथा मुलगा तुम्हाला हवा तसा प्रवृत्तीमार्गी होईल. मी ह्याला सर्व विद्या शिकवून राज्यकारभाराला योग्य करीन. तुम्हाला माझा भरंवसा वाटला तर ह्याला माझ्याकडे राहूं द्या. अन्यथा तुम्ही याला अध्ययनाला इतरत्र न्यायला हरकत नाही. ” राजा यावर थोडा विचार करुन म्हणाला, “सध्यां तरी त्याला तुझ्याकडेच ठेव. मी पुन्हा येऊन पाहीन आणि तू त्याला कशा प्रकारे शिकवशील त्यानुसार पुढेचे ठरवूं.” १-१३.

---


[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

# अलर्काला राजनीति, गृहस्थाश्रम आणि व्यवहार यांचे शिक्षण

असे बोलून राजा निघून गेला. मदालसेने हा आपल्या मुलाला आपण ब्रह्मज्ञानी करूं शकत नाही हे मान्य करावेच लागले. तिने भगवान दत्तप्रभूंचे स्मरण करून मनोमन त्यांची प्रार्थना केली, "ज्याच्या सामर्थ्याचा कधीच ऱ्हास होत नाही अशा (*अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मात् अधोक्षजः*) अत्रिपुत्रा, हा आतां तुमचा दायभाग आहे. माझ्याकडून कांही याला आत्मज्ञानाचा उपदेश होऊं शकत नाही. काय करणार? याचे कर्म आड आले आहे. पांच ग्रह उच्चीचे आले. त्यामुळे माझा निरुपाय झाला आहे. ग्रहांचा मान राखलाच पाहिजे. आतां सहासष्ट हजार वर्षे राज्य करील, सर्व राज्यभोग भोगील आणि मगच त्याच्या मनांत वैराग्या उपजूं शकेल. याचे दैव हे असे असल्याने मी हा माझा पुत्र आपल्या चरणी अर्पण करीत आहे. योग्य वेळी आपण याच्यावर कृपा करावी ." अशी दत्तप्रभूंची प्रार्थना करून तिने अलर्काला वेद, शास्त्र, आचार, व्यवहार इत्यादि सर्व विषयांचे शिक्षण द्यायला आरंभ केला. धर्म, अर्थ आणि काम हे पुरुषार्थ कसे सिद्ध करावेत, आपल्या वर्णाला आणि आश्रमाला उचित असे आचार, सहा प्रकारची राजनीति आणि प्रजेचे मन कसे जिंकावे हे सर्व शिक्षण मदालसेने अलर्काला दिले. धनुर्विद्येत त्याला प्रावीण्य मिळवून दिले आणि व्यवहाराचे सर्वांगीण शिक्षँही दिले. राजाला हे सर्व पाहून खूप समाधान वाटले. १४-२०.

मार्कंडेयपुराणांत मदालसेने अलर्काला दिलेल्या ह्या सर्व शिक्षणाचे विस्तारपूर्वक वर्णन आहे. राजनीतीच्या वर्णनाचा एक मोठा अध्यायच आहे. राजाने सात व्यसनांपासून सावध राहिले पाहिजे. कटु वचन, कठोर दण्ड, धनाचा अपव्यय, मदिरापान, स्त्रियांची आसक्ति आणि शिकार वगैरे खेळांत काळाचा अपव्यय ही ती *सात व्यसने* आहेत. वर श्रीमहाराजांनी उल्लेखिलेली *षड्विध राजनीति* अशी आहे. १.संधि म्हणजे समझोता , २.विग्रह म्हणजे युद्ध, ३.यान म्हणजे आक्रमण, ४.आसन म्हणजे योग्य वेळेच्या प्रतीक्षेत थांबणे, ५.द्वैधीभाव म्हणजे दुटप्पी धोरण आणि ६.समाश्रय म्हणजे सामर्थ्यवान राजाचा आश्रय करणे. राजकीय परिस्थितीनुसार ह्या सर्व गुणांचा अवलंब राजाने केला पाहिजे. राजाने आपल्या राज्यांत *आठ वर्गांचे* संरक्षण केले पाहिजे. शेती, व्यापार, किल्ले, पूल (आणि मार्ग, वाहतुकीची साधने), हत्ती आणि अन्य वन्य पशूंना पकडून त्यांचे पालन करणे आणि त्यांचा आवश्यक तेथे उपयोग करणे, आधीन राजांकडून (संस्थाने आणि संस्थांकडून) कर वसूल करणे आणि निर्जन भागांचे पुनर्वसन. काम, क्रोध, लोभ, मद, मान आणि हर्ष यांच्यावर ताबा ठेवला नाही तर ते आपल्या नाशाला कारणीभूत होतात हे उदाहरणांसह सांगितले आहे.

राजनीतीबरोबरच धर्मकारण आणि समाजकारण यांच्या सविस्तर उपदेशाचे अध्याय आहेत. केवळ श्राद्धकर्माचे वर्मन करणारा एक अध्याय आहे. गृहस्थधर्माची नित्य आणि नैमित्तिक कर्तव्ये स्वतंत्र अध्यायात सांगितली आहेत. मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपल्या उत्पन्नाचा चौथा भाग पारलौकिक कल्याणासाठी (दानधर्मासाठी) बाजूला काढावा. चौथा भाग भांडवली गुंतवणुकीत ठेवावा आणि उरलेल्या अर्ध्या भागांत आपल्या नित्याच्या गरजा भागवाव्यात असे तिचे मत आहे. परस्त्रीशी समागम मनुष्याच्या इष्ट आणि पूर्त कर्मांचा तसेच त्याच्या आयुष्याचा नाश करते. त्यामुळे तो कटाक्षाने टाळावा. अन्नादिकांत त्याज्य आणि ग्राह्य काय आहे, विविध द्रव्यांची शुद्धि कशी करावी, अजाणतां घडलेल्या छोट्यामोठ्या दोषांचे परिमार्जन कसे करावे इत्यादि सर्व वर्मन विस्तारपूर्वक केले आहे. तिने अलर्काला केलेल्या उपदेशाचे सार एका श्लोकांत असे सांगतां येईल.

"राज्य कुर्वन् सुहृदो नन्दयेथाः साधून् रक्षंस्तात यज्ञैर्यजेथाः।
दुष्टान्निघ्नन् वैरिणश्चाजिमध्ये गोविप्रार्थे वत्स मृत्युं व्रजेथाः।। मार्कंडेयपुराण २६:४१।।"

राज्य करतांना आपल्या नातलगांना आणि मित्रांना प्रसन्न करावे, साधूंचे प्रतिपालन करावे, यज्ञांद्वारा भगवंताला प्रसन्न करावे, रणांगणावर शत्रूंचा नाश करावा आणि गोबह्मणांसाठी प्राणांचीही पर्वा करूं नये.

# अलर्काचा राज्याभिषेक आणि ऋतध्वज आणि मदालसा यांचा वानप्रस्थाश्रम

अशा रीतीने मदालसेच्या तालमीत अलर्क वाढला. तो एक शूर, धुरंधर धनुर्धारी म्हणून प्रख्यात झाला. अनेक स्वयंवरांतून त्याने राजकन्यांशी विवाह केले. हे आपल्या पुत्राचे यश पाहून राजाचे मन हर्षाने भरुन गेले. त्याने अलर्काला युवराज केले आणि कालांतराने त्याला राज्याभिषेक करुन तो वानप्रस्थाश्रम स्वीकारुन वनांत जायला निघाला. मदालसाही त्याच्याबरोबर निघाली. जातांना अलर्काला पुन्हां तिने उपदिष्ट धर्मानुसार राज्य करायला आणि प्रजेचे पुत्रवत् पालन करण्याचा उपदेश केला आणि त्याला सांगितले, "बाळा अलर्का, तूं सहासष्ट हजार वर्षे निष्कंटक राज्य करशील. त्यानंतर तुझ्यावर एका दुर्धर शत्रूचे आक्रमण होईल. त्या वेळी तुला मार्गदर्शन म्हणन मी रेशमी वस्त्रावर हा सूक्ष्म अक्षरांत लेख लिहीत आहे. तो या छोट्या पेटीत जपून ठेव. तुझ्यावर संकट आल्यावरच तो उघडून तूं वाच. त्या पत्रांतील उपदेशांनुसार वागल्याने तुझे संकट दूर होईल. शत्रूच मित्र होतील आणि तुला साम्राज्य लाभून तूं सुखी होशील." असे बोलून मदालसेने अलर्काला आशीर्वाद देऊन त्याचा निरोप घेतला. आईला जातांना पाहून अलर्काला दुःख झाले. तिचे पाय त्याने अश्रूंनी भिजवले. आपल्याला असे सोडून जाण्यापासून तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मदालसा म्हणाली, "पातिव्रत्य हा स्त्रियांसाठी सर्वश्रेष्ठ धर्म आहे. मला पतीचे अनुसरण करुन जीवन कृतार्थ करायचे आहे. प्रारब्धानुसार एकत्र आलेले जीव नित्य सहवासांत रहात नाहीत. आपला एकमेकांजवळ राहण्याचा योग आतां संपला आहे. हा वियोग अटळ आहे हे लक्षांत घेऊन तूं आपल्या मनाला सांवर. " याप्रमाणे पुत्राचे समाधान करुन ती ब्रह्मनिष्ठ साध्वी पतीसह जाऊन अरण्यांत संतोषाने राहिली. तिथे तिने हळूहळू पतीला वेदांताचा उपदेश केला. त्याला आत्मचिंतनांत स्थिर केले. अशा कृतकृत्य होऊन पतीला उत्तम गती प्राप्त करवून मदालसेने शेंवटी विदेह मुक्ती मिळवली. इथे श्रीस्वामी महाराजांनी मदालसेची तुलना चूडाला या महान विदुषीबरोबर केली आहे. हिची गोष्ट योगवासिष्ठांत निर्वाण प्रकरणांत (सर्ग ७७-११०) आली आहे. सातव्या मन्वंतरांत द्वापरयुगांत उज्जयिनीत शिखिध्वज नांवाच्या राजाच्या ह्या राणीने ब्राह्मणपुत्र कुंभाचे रुप घेऊन राजाला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला असे आख्यान आहे. ते सर्व मुळांतूनच वाचण्यासारखे आहे. अशी ही महान योगीमाता प्रातःस्मरणीय आहे. तिच्या चरित्राच्या कीर्तनाने आणि श्रवणाने पापनाश होतो आणि चित्तशुद्धी होऊन मनुष्य ज्ञानमार्गाचा अधिकारी होतो. २१-३८.

# अलर्काचे राज्यशासन.

इकडे अलर्क आपल्या आईच्या शिकवणुकीला अनुसरुन राज्य करुं लागला. तो प्रतापसूर्यच असल्याने, धर्माच्या मर्यादा कांटेकोर पाळत असल्याने आणि राजनीतीत निपुण असल्याने त्याला शक्ति वा युक्तीनेही कोणा आह्वान देऊं शकत नव्हते. आपल्या प्रजेचे उत्तम रक्षण करुन त्यांना त्याने सुखांत ठेवले होते. त्यामुळे प्रजेचे प्रेम आणि निष्ठा त्याने संपादन केल्या होत्या. त्याच्या नांवानेच शत्रूंचा थरकांप होत असे. दुराचारी आणि उपद्रवी लोकांचा त्याने नायनाट केला. दोषी लोकांना तो धर्माला अनुसरुनच दंड करी; पण निर्दोषाला मात्र कधींच शिक्षा करीत नसे. लोभाने किंवा क्रोधाने त्याने धन कधीच मिळवले नाही. सदाचारी लोक त्याच्या राज्यांत सुखी आणि सुरक्षित असत. दरिद्री लोकांना तो द्रव्य वाटीत असे. आंधळ्या-पांगळ्यांचे आणि दीनदुबळ्यांचे पालन करण्याकडे त्याचे विशेष लक्ष असे. धर्म आणि अर्थ हे पुरुषार्थ संपादन करतांना त्यांच्यात त्याने कधी विरोध येऊं दिला नाही. संपत्ती जोडतांना त्याने धर्माच्या मर्यादा ओलांडल्या नाहीत. तसेच धर्माचे आचरण आपल्या आर्थिक क्षमतेनुसारच केले. कामपुरुषार्थासाठी – म्हणजे आपल्या वैयक्तिक सुखासाठी त्याने धर्मा किंवा अर्थ यांचे उल्लंघन केले नाही. त्याची वृत्ती समाधानी असल्याने तो सदैव प्रसन्न आणि आनंदी असायचा. तो नित्य यज्ञांचे आयोजन करीत असे. आणि ते यज्ञ उत्तम प्रकारे पारही पडत. ३९-४६.

# अपूर्व विधि आणि परिसंख्या विधि.

याप्रमाणे अलर्क राजा उत्तम प्रकारे राज्य करीत होता. त्याच्या धर्मपालनांत काटेकोरपणाही होता. पण धर्माच्या आज्ञांच्या समजुतीत एक गल्लत झाली होती. धर्माच्या करणात्मक (सकारात्मक) आज्ञांना विधि असे नांव आहे. मनुष्यालाकल्याणकारक कर्माकडे प्रवृत्त करण्यासाठी जे विधि आहेत त्यांना 'अपूर्व' विधि म्हणतात. यज्ञ, दान, तप इत्यादींचे विधि यांत मोडतात. वेदाने कांही विधि (आज्ञा) मनुष्यच्या नैसर्गिक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी केल्या आहेत. उदाहरणार्थ लोकांमध्ये लैंगिक सुख, मांसाशन आणि मदिराप्राशन यांच्याकडे स्वाभाविक ओढ असते. 'हे करा' असे त्यांना सांगायची आवश्यकता नसते. (लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जन्तोर्न हि तत्र चोदना। व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा।। श्रीमद्भागवत ११:५:११).

या नैसर्गिक वासनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेदांनी जे विधि सांगितले आहेत त्यांना 'परिसंख्या' असे नांव आहे. ऋतुकालांत, रात्रींच्या वेळी, पत्नीसह समागम करावा अशी शास्त्राची आज्ञा आहे. ऋतुकाल हा रजोदर्शनापासून चौदा दिवस सांगितला आहे. त्यांतील पहिले चार दिवस स्त्री अस्पृश्य मानलेली आहे. आसक्तीने रजस्वला स्त्रीशी किंवा निषिद्ध दिनी संभोग करण्याने नरकांत जावे लागेल असा धाकही श्रुतीने घातला आहे. उरलेल्या दहा दिवसांत सम रात्री संभोग केल्यास पुत्र आणि विषम रात्री संभोग केल्यास कन्या होतात. त्यांतही व्रतदिन (एकादशी वगैरे) श्राद्धदिन किंवा निषिद्ध दिन (मघा आणि रेवती नक्षत्रे) सोडायचे आहेत. ह्या विधीचा उद्देश लैंगिक संभोगाला उत्तेजन देण्याचा नाही तर त्याला व्यक्तीच्या, काळाच्या मर्यादा घालण्याचा आहे. तसेच संभोगाचा मुख्य उद्देश संतती हा अभिप्रेत आहे. आपल्याला आवडत नाही म्हणून पुरुषाने ऋतुकाळांत आपल्या पत्नीपासून दूर राहिल्याने भ्रूणहत्येचा दोष लागतो. यज्ञाचा अवशेष म्हणून (पुरोडाश) थोडे मांस घेण्याचा विधि मांसाशनाकडे प्रवृत्ती व्हावी म्हणून नाही तर त्याचा संकोच करावा म्हणून आहे. सौत्रामणी यज्ञ करुन यथेच्छ मदिरापान करण्याने धर्मपालन होत नाही तर मोठाच अधर्म घडतो. या श्लोकावरील भाष्यांत एकनाथमहाराज म्हणतात.

हे विषयांचे त्रिविध विंदान। मद्य-मांसभक्षण-सुरापान। यदर्थी निवृत्तीच प्रमाण। हे मनोगत पूर्ण वेदांचे।। विषयांपासूनि निवृत्ती। वेद विभागें हेंचि द्योती। परी धरावी विषयासक्ती। हे वेदोक्ति सर्वथा न घडे।। वेंचोनियां निजधन। सेवावें मद्यमांसमैथुन। हें वेदवचन कदा न घडे।। एकनाथी भागवत ५:२३९-२४१।।

अलर्क राजा मात्र हे सर्व अपूर्व विधीच आहेत अशा समजुतीने वागत होता. अनेक स्त्रियांशी विवाह करुन त्याने ऋतुकालाचा अडसर दूर केला आणि नित्य मिथुनसुखाचा उपभोग घेण्यांत धन्यता मानूं लागला. पशुसंस्थेचे यज्ञ करुन मांसभक्षणाची हौस पुरवून घेऊं लागला. अग्निष्टोमासारखे यज्ञ करुन सुरापानाचा आनंद भोगूं लागला. सहासष्ट हजार वर्षे एकछत्री राज्य करुनसुद्धा अलर्काच्या मनाला तृप्ती मिळाली नाही. तो त्यांत अधिकाधिकच आसक्त होत चालला. या अशा विपरीत धर्माचरणाने त्याची चित्तशुद्धी तर दूरच पण कुसंस्कारांची आणि पापांची मात्र जोड होते हे अलर्काचा भाऊ सुबाहू ह्याला जाणवत होते. ४७-६२.

# सुबाहूची भावाविषयी कळकळ

आपल्या सख्ख्या भावाची ही अधोगति सुबाहूला पाहवली नाही. 'हा संसारांत अगदीच बुडून चालला आहे. ह्याला आपण वर काढायला हवे अशी त्याला तळमळ लागली. हा यज्ञयाग करतो, न्यायाने राज्य करतो, दानधर्मही करतो हे खरे असले तरी तो अगदीं बहिर्निष्ठ आहे. बाहेर विषयांच्या मागे धांवणाऱ्या इंद्रियांच्याच लालनांत धन्यता मानतो आहे. पशूंनासुद्धां जे भोग उपलब्ध आहेत त्यांच्याच मागे हा लागला आहे. त्यांच्यापासून मिळणारे सुख हे केवळ आभासात्मक आहे, क्षणभंगुर आहे, मर्यादित आहे, पराधीन आहे. खरे आपल्याच अंतरांत असलेले स्वतःसिद्ध, अविनाशी, अवीट आणि परिपूर्ण असे आत्मसुखाकडे त्याचे लक्षच नाही. ह्याला ह्या ऐंद्रिय सुखाच्या भ्रांतीतून जागे करायला पाहिजे. अन्यथा माझ्या बंधुत्वाला मी जागलो नाही असे होईल.' सुबाहूने आपल्या भावाला तेव्हां त्याला जाणवले की या अनर्थाला मुख्य कारण आपल्या भावाचे

राज्य आणि त्यामुळे त्याला मिळालेली अमाप संपत्तीच आहे. श्रीमच्छंकराचार्यांनी म्हटले आहे, "अनर्थमनर्थं भावय नित्यं, नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।।" अर्थ म्हणजे पैसाच सर्व अनर्थाचे मूळ आहे. त्यांत खऱ्या सुखाचा लेशही नाही. पैशानेच विषयांचे हवे तसे भोग प्राप्त होतात. त्यांच्या भोगांतल्या सुखांतच माणूस गुंग होतो. देवदुर्लभ मानवी आयुष्याचा नाश करतो. पैसाच माणसाच्या अहंकाराला खतपाणी घालून त्याचा ताठा आणि गर्व वाढवतो. तेव्हां अलर्काची राज्यसंपदाच काढून घेतली तरच त्याचे डोळे उघडतील. असा विचार करुन सुबाहूने आपली जडमूढ वृत्ती सोडून दिली आणि वनांतून तो नगराला आला आणि राजापुढे जाऊन बोलूं लागला. ६३-६८.

## सुबाहूची राज्याची मागणी आणि अलर्काचा नकार.

त्याने अलर्काला स्पष्टच सांगितले की आपण वडील भाऊ असल्याने आपला राज्यावर अधिक अधिकार आहे. "तू सहासष्ट हजार वर्षे राज्य केलेस. आतां सिंहासनावर बसण्याची माझी पाळी आहे. हे जर तुला अवघड वाटले तर निदान मला माझा वाटा दे." अलर्काला ते पटले नाही. तो म्हणाला, "हे राज्य वडिलांनी माझी योग्यता पाहून मला दिले आहे. तुम्ही मोठे भाऊ असूनही तुमच्यात राज्यकारभाराचे सामर्थ्य नसल्यानेच त्यांनी असे केले आहे. तुम्ही रानांत जाऊन जपतप करावे हे बरे! आणि दादासाहेब, राज्य हे असे भीक मागून मिळते काय? लोकांत तुमची ख्याति मतिमंद अशी आहे. तुम्ही काय राज्य करणार? माझे संपूर्ण पृथ्वीवर एकछत्री राज्य आहे. मोठमोठ्या राजांनी माझे मांडलिकत्व अंगीकारले आहे. हिंमत असेल तर अशी याचना करण्यापेक्षां क्षत्रियांना उचित असा संग्राम करुन राज्य मिळवा. नाही तर मुकाट्याने वनांत जाऊन तपाचरण करा. तुम्ही दीनदुबळे म्हणून तुमचा आपुलकीने सांभाळ केल्याचे हे पांग फेडतां आहांत काय? आधी जर तुमच्या ह्या कुढ्या अंतःकरणाची कल्पना आली असती तर आम्ही योग्य तो बंदोबस्त केला असता. आतां माझा संताप आणखी वाढायच्या आंत इथून चालते व्हा. " अशा प्रकारे अलर्काची दुरुत्तरे ऐकून सुबाहू तिथून बाहेर पडला. त्याने विचार केला की आतां आपण एखाद्या समर्थ राजाचे साह्य घेऊन अलर्कावर आक्रमण करायला पाहिजे. त्याला विचार करतां काशीराजा या कामीं आपल्याला साह्य करायला समर्थ आणि अनुकूल आहे. त्याप्रमाणे त्याने काशिराजाकडे जाऊन आपले मनोगत सांगितले. तो म्हणाला, "काशिनरेश महाराज, आम्ही चौघे सख्खे भाऊ असतांना हा अलर्क एकटाच राज्य करीत आहे. मी सामोपचाराने माझा वाटा मागूनसुद्धा तो द्यायला तयार नाही. तेव्हां आतां मला न्याय मिळवून देणे हे तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही चिंता करूं नका. मी पुढाकार घेऊन युद्ध करीन. माझ्याजवळ सैन्य आणि इतर साधने नाहीत हे खरे. पण माझ्याजवळ योगाचे बळ आहे. मी सत्यसंकल्प आहे. विजयश्री आपल्यालाच गळ्यांत माळ घालणार याबद्दल मनांत थोडाही संशय ठेवूं नकोस. " काशिराजा उत्तरला, "सुबाहु महाराज, अलर्क हा सार्वभौम राजा आहे. माझ्यात एवढी शक्ति असती तर मी त्याचा मांडलिक राहिसो असतो का? " सुबाहूने पुन्हा त्याला क्षात्रधर्माची जाणीव करुन दिली. दीन होऊन आश्रयाला आलेल्यांचे रक्षण केले नाही तर त्याच्या क्षत्रिय बाण्याला बाट लागेल याचे स्मरण करुन दिले. युद्धांत समोरासमोर लढतांना मरण आले तर स्वर्ग मिळेल आणि विजय मिळाला तर राज्य मिळेल. (हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।।भ.गीता २:३७।।). त्याचप्रमाणे युद्धांत जिंकल्यानंतर आपण त्याच्या उपकारांचे अवश्य स्मरण ठेवूं असे मधाचे बोटही सुबाहूने लावले. शेवटी काशिराजा म्हणाला, "मी स्वतः एकदां अलर्काशी बोलून मध्यस्थी करतो. त्याने बऱ्या बोलाने वाटा दिला तर उत्तमच. पण जर त्याने आपलाच हेका चालूं ठेवला तर युद्धाला मी तयार आहे. " सुबाहून याला मान्यता दिली आणि काशिराजाने अलर्काला भेटून शिष्टाई केली. अलर्काला आपल्या सामर्थ्यावर विश्वास असल्याने त्याने काशिराजाच्या मध्यस्थीचा अव्हेर केला आणि "राज्य पाहिजे असेल तर युद्ध करा!" असा सडेतोड जवाब दिला. ६८-९०.

## अलर्काचा दारुण पराभव.

काशिराजाने सुबाहूला अलर्काचा निरोप कळविला. त्या दोघांनी चतुरंग सेना सज्ज करुन अलर्काच्या राज्याला वेढा घातला. सामंत राजांवर हल्ले करुन त्यांना सतावून सोडले. सीमेवरचे किल्ले जिंकून घेतले.

अलर्काचे कांही सेनापति आणि मांडलिक यांना साम-दाम-दंड यांच्या साह्याने आपल्या बाजूला वळवून घेतले. आणि मग अलर्काच्या नगरीवर हल्ला केला. अलर्क जातीने आपल्या सैन्यासह प्रतिकाराला उबा राहिला. खरे त्याचे सैन्य प्रचंड होते. त्याच्या तुलनेत काशिराजाचे सैन्य बरेत कमी होते. पण सुबाहूच्या योगसामर्थ्याने अलर्का ला समुद्रासारखे अफाट वाटूं लागले. त्याचे मन खचले. “आपण हा अविचार विनाकारण केला” असे त्याला वाटायला लागले. पण आतां शरण जावे तर लोकांत छी थू होईल या भीतीने त्याने आपल्या सैन्याला चढाईचे आदेश दिले आणि हिरीरीने लढायला आरंभ केला. सुबाहूच्या प्रेरणेने काशिराजाच्या सेनेच मनोबल उंचावले. त्यांच्यासमोर अलर्काच्या सैन्याचा टिकाव लागेना. त्या रणकंदनांत अलर्काचे सैनिक मोठ्या संख्येने मारले गेले. कांही पळून गेले तर बरेच काशिराजाला येऊन मिळाले. पाहतांपाहतां नगराची तटबंदी भेदून काशिराजाची सेना राजवाड्यात घुसली. मर्मांत घुसलेल्या कांट्यासारखा छोटासा शत्रूही कधीकधी सम्राटाचीसुद्धा भयानक हानि करुं शकतो या वचनाची प्रचीती अलर्काला आली. आपल्या पदरच्या काशिराजा विश्वासघात करुन आपल्या शत्रूचा साह्यकारी झाला तसेच आपले बरेच सैन्य, सरदार, मंत्री यांच्यासह फितूर झाले हे वृत्त अलर्काला समजले आणि त्याचे धैर्य गळून पडले. त्याचे सगळे उपाय खुंटले, प्रतिकाराचे सामर्थ्यच राहिले नाही. तो हताश आणि निराश झाला. त्याला जगावेसेही वाटेना. “संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते।।” (इज्जतदार माणसाची दुष्कीर्ति मरणाहून दुःसह असते.) ह्या गीतावचनाचा (२:३४) त्याला प्रत्यय आला.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा तिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ३१ वा.

**तें दुस्सह दुःख पाहून। करी अलर्क पलायन। मातृवचन स्मरून। भेटें येऊन श्रीदत्ता।।६४।।**
**त्या दुःखातें वारून। अलर्का प्रबुद्ध करून। दत्त उपदेशी ज्ञान। हे कथन एकतिसाव्यांत।।६५।।**

आपल्या भावाच्या सैन्याने वेढलेला, अटळ पराभवाच्या वाढत्या छायेने झांकोळलेला, सर्व बाजूंना निराश झालेल्या अलर्काने राज्य सोडून वनांत जाण्याचा निर्णय घेतला. सुबाहूला हे अपेक्षितच होते. त्यामुळे त्याने सर्व सैन्याला सूचना दिल्या होत्या की, 'अलर्क जर नगर सोडून जात असेल तर कुणीही अडवूं नये. उलट त्याच्या जाण्याच्या वाटा खुल्या ठेवाव्यात.' रात्रीची वेळ पाहून चिंताग्रस्त अलर्क एका घोड्यावर बसून वनांत एका आश्रमाजवळ येऊन थांबला. तिथे वनांत भूमीवर पडला असतांना त्याला आपण भोगलेल्या नाना सुखोपभोगांची आठवण आली. त्याचे दुःख अनावर झाले. प्रारब्धाची गति बुद्धीला अकुंठित करते याचा प्रत्यय येऊन तो आपण असे काय पाप केले आहे ज्यामुळे हा असह्य ताप आपल्या वाटेला आला आहे याचा विचार करूं लागला. साहजिकच त्याला आपल्या आईची आठवण आली. 'ती आज असती तर माझ्यावर हा प्रसंग कदापि आला नसता' असे त्याच्या मनांत आले. तेव्हा त्याला आईने वनांत जातांना आपल्याला हे भविष्य सांगितले होते याचे स्मरण झाले. सकाळी उठल्यावर स्नान करून तो मातेचा लेख वाचावा असे त्याने ठरविले. तो सकाळ होण्याची प्रतीक्षा करूं लागला. त्याच्या चित्ताच्या अस्वस्थतेमुळे त्याला झोंपही येईना. "अजून कशी रात्र सरत नाही? सूर्य उगवायला एवढा कसा वेळ लागतो आहे?" अशा आतुरतेने तळमळत त्याने ती रात्र काढली. सकाळी उठून त्याने आईचे पाय आठवले. स्नानादि उरकून त्या पत्राच्या मंजुषेचे पूजन केले आणि त्यांतील पत्र काढून वाचले. १-१२.

## मदालसेचे पत्र.

ते पत्र वाचतांना अलर्काचे हृदय आनंदाने भरून आले, अंगावर रोमांच उबे राहिले आणि डोळे प्रसन्नतेने विस्फारले असे वर्मन आहे. (तत्रैव लिखितं मात्रा वाचयामास पार्थिवः। प्रकाशपुलकाङ्गोऽसौ प्रहर्षोत्फुल्ललोचनः।। मा.पु. २७:२२।।). मदालसेच्या लेखांत केवळ शब्दच नव्हते तर त्याबरोबर एक चेतनाशक्ति होती. शब्दांइतकाच, किंवा अधिकही महत्त्वाचा परिणाम त्या पत्राच्या वाचनाने राजाच्या मनावर झाला याची ही सूचना आहे. हा एक प्रकारचा शक्तिपातच आहे. संतवाङ्मयात अशा प्रकारची ईश्वरी चेतना अनुस्यूत असते. त्यामुळे त्यांच्या वाचनाने चित्तशुद्धीचा अनुभव येतो. सद्ग्रंथांचे पठण हे एक महान परमार्थसाधन आहे. त्या पत्रांत खालील दोन श्लोक लिहिले होते.

*सङ्गः सर्वात्मना त्याज्यः स चेत् त्यक्तुं न शक्यते।*
*सद्भिः सह कर्तव्यः संतो सङ्गस्य भेषजम्।।*
*कामः सर्वात्मना हेयो हातुं चेच्छक्यते न सः।*
*मुमुक्षां प्रति कर्तव्यः सैव कामार्तिभेषजम्।।*

---

[१] **Email ID: Vasudeo@gmail.com**

मार्कंडेयपुराणांत (२७:२३-२४) हेच श्लोक थोड्या फरकाने आला आहेत. संग सर्वांचाच सोडावा. तसा तो सोडतां आलाच नाही तर संताचा करावा, कारण संत हेच संगदोषाचे – पर्यायाने संसारदुःखाचे औषध आहेत. तसेच इच्छा कशाचीच करू नये, करायचीच असेल तर मोक्षाची इच्छा (मुमुक्षा) करावी; कारण मुमुक्षाच इच्छेमुळे होणाऱ्या पीडेवर औषध आहे. संग हे आसक्तीचेच रूप आहे. 'संगात् संजायते कामः' असे भगवद्वचन आहे. संसार नांवाच्या व्याधीचे मूळ या संगांत आणि कामांत आहे. त्यांच्यावर सत्संग आणि मुमुक्षा ही दोन औषधे मदालसेने सांगितली आहेत. अलर्काने ते पत्र वारंवार वाचले आणि त्याचे मनन केले. त्या वाचनानेच त्याच्या मनांत निश्चय झाला की शाश्वत सुखासाठी मुमुक्षा निर्माण झाली पाहिजे, आणि ती जागण्यासाठी संतसंग झाला पाहिजे. आतां आपल्याला संत कसा भेटेल ह्याचीच उत्सुकता त्याच्या मनांत दाटून राहिली. शेवटी त्याने जवळच्या आश्रमांतील ऋषींकडे जाऊन त्यांना नमस्कार केला आणि आपली संतदर्शनाची इच्छा प्रकट करून असा संत कुठे भेटेल असे विचारले. आपण त्या संतांची सेवा करून आपल्या ह्या असह्य दुःखाचे प्रशमन करू इच्छितो असे आपले मनोगत त्याने त्या ऋषींपुढे व्यक्त केले. १३-१९.

## अलर्काला श्रीदत्तदर्शन.

त्या ऋषींनी त्याला दक्षिण दिशेस जायला सांगितले. तिथे सह्य पर्वतावर योग्यांचे राणे श्रीदत्तात्रेय प्रभू राहतात. मातापूर (माहूर) या नांवाने प्रख्यात असलेल्या गांवांत श्रीरेणुकामातेचा पवित्र आश्रम आहे. त्याच्यासमोरच दत्तात्रेयांचे निवासस्थान असलेले गिरिशिखर आहे. अनसूयानंदन श्रीदत्त योग्यांचे परम दैवत आहेत. सर्व साधुसंत त्यांना पूजतात. त्यांच्या दर्शनमात्रेकरून संसारचक्राचा भेद होतो. असे त्या मुनींचे वचन ऐकून अलर्काचे मन भक्तिभावाने भरून आले. ऋषींना वंदन करून अलर्क टाकोटाक निघाला आणि सह्याद्री पर्वतावर आला. तिथे श्रीदत्तप्रभूंचा आश्रम पाहून तो घोड्यावरून उतरून एकटाच पायीं निघाला. आश्रमांत प्रवेश करून त्याने त्याने त्या निःसंग, निर्मल, आनंदस्वरूप दत्तात्रेयांना अत्यंत आर्त भावाने साष्टांग नमस्कार केला. आंसवांनी भरलेल्या डोळ्यांनी आणि सद्गदित कंठाने त्यांची प्रार्थना केली, "हे भक्तवत्सला! दयाघना! मला अपार दुःख झाले आहे. मी निराशेने ग्रस्त झालो आहे. केवळ आपल्या कृपेनेच माझे दुःख दूर होऊन मी क्षेमसमाधान पावेन. आपल्या चरणांचाच काय तो आश्रय आतां मला दिसतो आहे." दत्तप्रभूंनी त्याला पाहतांच ओळखले. हे मदालसेच्या गर्भांतून प्रकटलेले रत्न आहे. हा अध्यात्मज्ञानाचा उत्तम अधिकारी आहे. सुबाहूसारख्या आत्मज्ञानी भावाने ह्याला अत्यंत करुणापूर्वक राज्यभ्रष्ट करून याच्या मनांत वैराग्य वाढवले आहे. ह्याचे मन अतीव पक्व झाले असल्याने ह्याला आत्मानुभवाची प्राप्ती करून देण्यासाठी फारसा प्रयत्न करावा लागणार नाही हे त्यांच्या तत्काळ ध्यानांत आले. ते म्हणाले, "तुला फार असह्य दुःख झाले आहे म्हणतोस? कुठे दुःख झाले आहे दाखव पाहू. आपण लागलीच त्याच्यावर उपाय करूं. आधी तू कोण आहेस ते सांग आणि दुःखाची नेमकी जागा दाखव म्हणजे त्यावर आपल्याला डाग देतां येईल!" आपण यापूर्वी कार्तवीर्य, परशुराम इत्यादि मोठमोठ्या भक्तांची दत्तप्रभूंनी कशी परीक्षा घेतली ते पाहिले आहे. अलर्काला मात्र अशा परीक्षेला सामोरे जावे लागले नाही. त्याला दत्तप्रभूंच्या वात्सल्याचा आणि कारुण्याचाच प्रत्यय आला आहे, हे लक्षणीय आहे. याचे कारण परीक्षेच्या निमित्ताने जी चित्तशुद्धि करायची असते ती अलर्काची माता आणि बंधु सुबाहू यांनी आधीच करून घेतली होती. आतां फक्त एका चैतन्याच्या स्फुल्लिंगाची आवश्यकता होती. मग तो

अलर्काच्या चित्तांत ज्ञानाग्नीचा भडका उडवणार होता. ह्या प्रश्नाच्या रूपाने दत्तप्रभूंनी त्या स्फुल्लिंगाचे क्षेपण केले. हाच शक्तिपात. चितिशक्तीचे प्रक्षेपण! २०-२९.

## मी कोण?

सद्गुरूंचा शब्द, स्पर्श, दृष्टी किंवा केवळ संकल्प अशा माध्यमांतून चिच्छक्ती जेव्हां शिष्याच्या अंतरांत प्रवेश करते तेव्हा त्याच्या पूर्वसंस्कारानुसार ती कार्य करते. अलर्क महान् योगिनीच्या पोटीं जन्माला आला होता. त्याचे तिघेही भाऊ ब्रह्मविद्वर या ज्ञानाच्या सहाव्या भूमिकेवर आरूढ झाले होते. त्याच्या सुषुम्णा मार्गांतील सर्व अडसर दूर झाले होते. अशा शिष्याला सद्गुरूंची कृपा झाल्याबरोबर आपल्या सच्चिदानंदस्वरूपाचा साक्षात्कार होतो. हेच अलर्काच्या बाबतींत झाले. आपण कोण आहोंत याचा तो विचार करूं लागला. “तूं कोण आहेस?” ह्या दत्तप्रभूंच्या प्रश्नाने त्याचा विवेक जागा झाला. आपल्या अंतरांत त्या “तूं” चा तो शोध घेऊं लागला. हिचेच नांव आन्वीक्षिकी विद्या. यालाच वेदांताच्या परिभाषेत “त्वंपदशुद्धि” असे म्हणतात.

प्रथम त्याने स्थूल देहाचा – म्हणजेच **अन्नमय कोशाचा** विचार केला. हा आकाशादि पंचीकृत भूतांनी बनलेला आहे आणि जड आहे. ह्याला जन्म-मरणादि नाना विकार होत असतात. मी चेतन आणि निर्विकार आत्मा आहे. हा देह परिच्छिन्न आहे तर आत्मस्वरूप हे पूर्ण आणि सर्वगत (सर्वव्यापी) आहे.

मग कर्मेंद्रियांना चाळवणारा, झोंपेंत जाड्य आणणारा, श्वसन-पचन-अभिसरणादि क्रियांचा चालक **प्राण** हे माझे स्वरूप आहे काय? ह्या सर्व क्रियांचा मी केवळ साक्षी (पाहणारा) असल्याने त्यांच्यापासून मी भिन्न आहे.

क्षणाक्षणाला इतस्ततः धांवणारे हे **मन** मी कसा असेन? मी तर सदा सर्वत्र व्यापकच आहे, स्थिर आहे, अचल आहे. मन माझे स्वरूप असूं शकत नाही. जागेपणी देहाला व्यापून राहणाऱ्या, झोंपेत मात्र लोप पावणाऱ्या,

विज्ञानमय कोश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या **बुद्धी**पासूनही मी वेगळाच आहे.

ह्या सर्व कोशांशी मला जखडणाऱ्या त्रिगुणात्मक **अहंकारा**पेक्षांही मी श्रेष्ठ आहे.

मी शुद्ध, बुद्ध, अमर आहे. हे पंचकोशात्मक मानवी शरीर हे माझे स्वरूप नाही. वरील पद्धतीने ‘मी कोण’ याचा आंतरिक शोध घेणे ह्याला आन्वीक्षिकी असे म्हणतात. आधुनिक काळांत या साधनमार्गाचा विशेष उपदेश अरुणाचलम् येथील महान संत श्री रमण महर्षी यांनी केला आहे. ३०-३७.

## दुःखाचे ठिकाण.

आपल्या धारदार विवेकाने पांचही कोशांचा निरास करून अलर्काने आपले सच्चिदानंदस्वरूप निश्चित केले आणि तो आपल्याला भेडसवणाऱ्या दुःखाचा विचार करूं लागला. शेंडीच्या केंसापासून पायाच्या नखापर्यंत शरीर धुंडाळूनही त्यांत त्याला दुःख सांपडले नाही. प्राणाला झालेच तहान आणि भूक यांचे दुःख होते. माझे सांप्रतचे दुःख प्राणाचे नाही. इंद्रियें माझ्या इच्छेने चालतात. तिथेही हे दुःख नाही. मग तो मनांत शोधूं लागला. तेव्हां त्याच्या ध्यानांत आले की हे मनच सर्व आवडी-नावडीचे मूळ आहे. आवडती गोष्ट मिळाली की हे सुखी होते आणि नावडती गोष्ट समोर आली की हे दुःखी होते. हेच सुखदुःखांचे भांडार आहे. पण हे मन तर अन्नापासूनच बनते आणि विविध विकारांनी भ्रमत असते. अशा परक्या मनाचा माझा काय संबंध? अशा रीतीने दुःखाची

जागा सांपडतांच अलर्क आनंदाने हंसला. तो म्हणाला, “मी दुखाचे स्थान शोधून काढले. ” ह्या ठिकाणी शोधन शब्दाच्या योजनेत त्याने त्वंपदशोधन केल्याचे सूचित केले आहे. ३८-४३.

## अलर्काचे निवेदन.

पुढे तो आपल्या शोधनाचे निष्कर्ष दत्तप्रभूंना सांगत आहे. “ आकाश, वायु, तेज, जळ आणि पृथ्वी ही पांच महाभूते जड आहेत. मी तर शुद्ध सच्चिदानंदस्वरूप निश्चल चैतन्य आहे. ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, पंचप्राण, मन, बुद्धि, अहंकार आणि चित्त हे सर्व ह्या जड भूतांचेच विकार आहेत. ह्या सर्वांहून विलक्षण, गुणातीत असे माझे स्वरूप आहे. या सर्वांच्या संघातानेच देह बनला आहे. भ्रांतीने ह्या देहरूपी पांच भूतांच्या मोळीचा अभिमान वाहणाराच दुःखी होतो. हे सद्गुरो! आपल्या कृपेने मी माझ्या रूपाचा शोध घेऊन स्वतःला ओळखले आहे. मोठमोठे ऋषीमिनीसुद्धा ज्याच्या अजून शोधीत आहेत ते आत्मस्वरूप मला आपण हातावरच्या आवळ्याप्रमाणे स्पष्ट करून दाखविले आहे. मी नित्य आणि निर्विकार आहे. माझी ना वाढ होते ना घट. सदैव परिपूर्ण अशा माझा ह्या सतत लहान-मोठ्या होणाऱ्या देहादिकांशी काय संबंध? धूररहित ज्योतीसारखा मी शुद्ध प्रकाशरूप आहे. निःसंग, निर्मल, असीम, परिणामदि विकाररहित अशा मला सुखदुःखाची वार्ताही नाही. पांचभौतिक स्थूल आणि सूक्ष्म शरीरे ही मातीच्या घड्यासारखी जड आहेत. ती स्वतःलाही जाणूं नाहीत तर दुसऱ्यांना कसे जाणतील? ह्या स्थूल देहाला कफ,वात आणि पित्त या त्रिदोषांच्या वैषम्याने ज्वर येतो. पण आपल्याला ताप आला आहे ही जाणीव त्या देहाला नसते तर त्याला पाहणाऱ्या (द्रष्टा) चैतन्याला असते. त्याचप्रमाणे सूक्ष्म देहाला कामादि विकारांच्या क्षोभाने ताप येतो. ते जाणणाऱ्या आत्म्याला मात्र मुळीच ताप नसतो, हे आतां माझ्या चांगलेच ध्यानात आले आहे. या सगळ्या दुःखाचे कारण अज्ञान आहे. तोच कारणदेह किंवा आनंदमय कोश. पण ज्ञानी माणसाला हे अज्ञान स्पर्शही करूं शकत नाही. आपल्या प्रश्नाच्या अनुरोधाने मी जेव्हां विचार केला तेव्हां मला दुःखाची जागा मनांत असल्याचे कळाले. मी तर जसाच्या तसा आनंदरूपच आहे. त्या मनाशी झालेल्या आध्यासिक तादात्म्याने ते पूर्वी मला माझेच दुःख वाटले होते. म्हणून आपल्याला विचारले. आतां माझ्या लक्षांत आले आहे की ते दुःख मला झालेच नाही! दुसऱ्या कुणाच्या दुःखाने मी कसा दुःखी होईन? तेव्हां आतां हे प्रभो! मी केलेल्या प्रश्नाचे उत्तर मीच देतो. सुख काय आणि दुःख काय, दोन्ही स्वप्नवत् आहेत. मन हा त्यांचा ठाव आहे. मी तर आपल्यांतच रमलेला, निरिच्छ आणि सर्वगत आत्मा आहे.”

नाहंकारो न च मनो बुद्धिर्नाहं यतस्ततः। अंतःकरणजं दुःखं पारक्यं मम तत्कथम्।।
नाहं शरीरं न मनो यतोऽहं पृथक्शरीरान्मनसस्तथाहं।
तत्सन्तु चेतस्यथवाऽपि देहे सुखानि दुःखानि च किं ममात्र।। मार्कंडेय पुराण.३७:३७-३८)
४४-६३.

राजाचे हे निश्चयात्मक बोलणे ऐकून दत्तप्रभू प्रसन्न झाले. म्हणाले, “तुझा जर असा निर्धार झाला असेल तर फारच छान. पण आतां मला सांग की तुला आतां काय हवे आहे? विजय पाहिजे, राज्य पाहिजे कीं दुःखाचा नाश? मनांत कांही न ठेवतां तू स्पष्टपणे मला सांग.”

अलर्क म्हणाला, “देवा, मला आतां या कशाचीच चिंता नाही. माझ्या मनांत राज्याविषयीं किंवा वैभवासाठी यत्किंचितही आसक्ति नाही. मी राज्य केले काय आणि माझ्या भावाने केले काय? दत्तगुरो! अगदी आण वाहून सांगतो की माझे मन तिकडे ओढ घेत नाही. सुबाहूचा देह माझ्या

देहापेक्षा वेगळा असला तरी एकच आत्मा दोन्हीत नांदत आहे हे मी प्रत्यक्ष अनुभवीत आहे. मग त्याच्या राज्याने मीही राजाच होतो ना!"

विझलेल्या अग्नीत एखादा निखारा तर राखेखाली राहिला नाही असे पहावे तसे आतां दत्तप्रभू अलर्काचे मन चाचपून पहात आहेत. ते म्हणाले, "असे तू म्हणतोस खरा, पण पहा बुवा. सिंहासनावर तूं नसलास तर लोकांपुढे तूं रंकच दिसणार. मागेपुढे चालणारे हत्ती, घोडे, ललकाऱ्या देणारे भालदार-चोपदार हे कांहीच नसेल. तुझे मनोरथ तर धुळीला मिळतीलच पण बसायला साधा रथही मिळणार नाही."

पण अलर्क खरोखरच निःसंग झाला आहे. तो उत्तरला, "गुरुमहाराज, मी पुन्हा शपथेवर सांगतो, आपल्या कृपेने माझे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. माझ्या हात, पाय आणि इतर अवयवांचासुद्धा संबंध माझ्या मनांतून गेला आहे. रथ-घोडे तर फार दूरचे आहेत. तिन्ही देहांचा संबंध जिथे निःशेष गेला आहे तिथे हत्ती-घोड्यांचे काय महत्त्व? मी स्वतःसिद्ध आहे. माझ्या व्यापक स्वरूपाचे ज्ञान झाल्याने हे सर्व माझीच अंगे आहेत ह्याची मला नित्य जाणीव आहे. दांतांनी जीभ चावली म्हणून कोणी दांत पाडते का? हाताने हातावर आघात झाला तर हात तोडायचा असतो का? अद्वैत भूमिकेत स्थिर झाल्यावर मला कोणी शत्रु नाही. मला राज्याची इच्छा नाही की कशाची खंत नाही.

*तस्मान्न मेऽरिर्न च मेऽस्ति दुःखं न मे सुखं नापि पुरं न कोषं।*
*न चाश्वनागादि बलं न तस्य नान्यस्य वा कस्यचिद्वा ममास्ति।।४१।।)*

ज्याच्या भ्रांतीने मोह होतो तो अध्यासच नष्ट झाला आहे. आतां आत्मसुखांत रममाण (आत्माराम)झालेल्या मला कशाचीच इच्छा नाही (निष्काम). सर्व इच्छा पूर्ण झाल्याचा आनंद मी उपभोगतो आहे(आप्तकाम). ६३-७८.

## अहंकार आणि ममता.

एकच आकाश जसे घर, घडा, घागर अशा उपाधींनी सीमित होऊन अनेक झाल्यासारखे वाटते तसा हा एकच आत्मा नाना देहांच्या उपाधींनी अनेकवत भासतो. उपाधी आहेत तोंवर भेद आहे. उपाधी नष्ट पावली की भेद गेला. घट फुटला कीं घटाकाश गेले. आकाश मात्र जसेच्या तसेच आहे. त्याच्यांत घटमठादि परिच्छेद कधीच नव्हते. हे पूर्वी मला ठाऊक नव्हते म्हणून दुःख वाटत होते. आतां मला ज्ञान झाल्याने दुःखाचे काय कारण? देहादि उपाधींचा अभिमान म्हणजे अहंकार हा लटका भ्रम आहे. अहंकारामुळे देहाचे संबंधी आपले वाटतात. हीच ममता. कुणी आपल्याला अपामानकारक बोलले किंवा वागले तर अहंकार दुखावतो आणि चित्ताला वेदना होतात, क्रोध उफाळतो. तसेच आपल्या मुलाला जरा कांही इजा झाली, ताप आला तर आपण चिंताग्रस्त होतो. मात्र शत्रूची मुले मेली तरी आपण दुःखी होत नाहीच पण कदाचित सुखीसुद्धा होतो. मांजराने चिमणी किंवा उंदीर खाल्ला तर त्याचे आपल्याला कांही वाटत नाही. पण आपण ममतेने पाळलेल्या पोपटावर त्याने घाला घातला तर मात्र क्षुब्ध होतो.

*मार्जारभक्षिते दुःखं यादृशे गृहकुक्कुटे। न तादृङ्ममताशून्ये कलविङ्केऽथ मूषिके।।* मा.पु. ३८:४).

हा सगळा अहंकार आणि ममतेचा खेळ आहे.

*तैसीं अहंममतेचिया लवडसवडी । मातें न पवतीच बापुडीं।*

*म्हणौनि जन्ममरणाची दुथडी। डहुळती ठेली।।  ज्ञानेश्वरी  ९:६२)*

आज आपण कृपेने अहंकारच मुळापासून (अज्ञानजन्य अध्यासापासून) उपटून टाकला आहे.

*ना ना चेवो आलिया पाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठीं।*

*तैसी अहंममता किरीटी। नुरेचि तया।।  " ज्ञानेश्वरी १८:४०८.*

आतां या सतत जागणाऱ्या विवेकाने मी अहंकार आणि ममत्व यांचे बंध तोडून मी प्रकृतीच्या पलीकडचे माझे स्वरूप पक्के ओळखले आहे.

*भगवंस्त्वत्प्रसादेन ममाविर्भूतमुत्तमम्।  ज्ञानं प्रधानचिच्छक्तिविवेककरमीदृशम्।।* मा.पु. ३९:१७)".

७९-८९.

अलर्काचे निश्चयात्मक भाषण ऐकून दत्तप्रभूंना संतोष झाला. ते म्हणतात, "माझ्या कृपाप्रसादाने तू पुण्यपापांना ओलांडून आपले आत्मस्वरूप जाणले आहेस. मीपणाची भावना सर्व संबंधांचा उगम आहे. हे संबंधच हृदयभेदी शोकांचे कारण आहेत. जोंपर्यंत जीव मनाच्या आवडीने संबंध जोडत असतो तोंपर्यंत त्याच्या हृदयांत शोकरूपी खिळे ठोकले जातात.

**यावतः कुरुते जंतुः संबंधान् मनसः प्रियान्।**

**तावन्तोऽस्य निखन्यंते[२] हृदये शोकशंकवाः।।** मा.पु. ९२।।)

माझे पणाने म्हणजे ममतेनेच संबंध जुळतो. ममता तुटली मग कसला संबंध? हे करणारा विवेकी पुरुष सर्व बंधनांतून मोकळा होतो.

*द्वे पदे बंधमोक्षाय न ममेति, ममेति च। ममेति बध्यते जंतुर्न ममेति विमुच्यते।।* मा.पु. *९४।।*

थोडक्यांत बंध आणि मोक्ष ह्यांचे रहस्य 'मम' आणि 'न मम' या दोन पदांत सामावलेले आहे. मम म्हणजे 'माझे, माझे' म्हणणारा बंधनांत पडतो आणि 'न मम ' '**माझे नाही**' म्हणणारा मुक्त होतो. मदालसेसारखी महान, ब्रह्मनिष्ठ, योगनिष्ठ , तपोनिष्ठ आणि वंदनीय माता तुला मिळाली, तिचे दुग्धपान करण्याचे भाग्य लाभले म्हणून तुझे अंतःकरण अतीव शुद्ध झाले. त्यानेच तुला क्षणार्धांतच ज्ञान झाले. हा संतसंगतीचा महिमा आहे. एका क्षणाच्या संतसंगतीसुद्धां स्वर्गसुखाहून श्रेष्ठ आहे. त्या सत्संगाच्या प्रभावाने तुझ्या चित्तांत वैराग्य पूर्णपणे बाणले. माझ्या एका प्रश्नानेच तूं अहंकार आणि ममता वावटळीने शेवरीच्या कापूसासारखी उडवून दिलीस आणि तुला आत्मज्ञान झाले!

मत्प्रश्नादेव ते ज्ञानमुत्पादितमिदमुत्तमम्। ममेति प्रत्ययो येन क्षिप्तं शाल्मलितूलवत्।। मा.पु. ३:८७।। "

९०-९९.

## संसारतरू.

या ठिकाणी संसारवृक्षाचे एक सुंदर रूपक आले आहे. गीतेच्या पंधराव्या अध्यायांत वरती मुळ्या, खाली फांद्या अशा अविनाशी अश्वत्थाचे वर्णन आहे. त्याच रूपकाचा हा एक उद्बोधक आविष्कार आहे. ह्या संसारवृक्षाचे बीज अज्ञान आहे आणि अहंकार हा अंकुर आहे. माझेपणाच्या मोठाल्या बुंध्यापासून घर, शेती, संपत्ती अशा मुख्य फांद्या पसरल्या आहेत. पत्नी, मुले, गणगोत इत्यादि पालवी डंवरलेली आहे. पाप आणि पुण्य ही दोन प्रकारची फुले बहरलेली आहेत. ह्यांच्यापासून अनुक्रमें दुःख आणि सुख ही विपुल फळे निर्माण होतात. असा हा संसारवृक्ष मोक्षमार्गाला अडवून पसरला आहे. दुःसंगतीच्या सिंचनाने हा वाढतो. विविध सकाम कर्मांच्या इच्छारूपी भुंगे याच्यावर

घोंघावत असतात. संसाराच्या बिकट वाटेवर चालून भागलेले जीव या वृक्षाच्या आश्रयाला येतात. पण मायिक ज्ञान आणि आभासिक सुख यांच्यात गुरफटून जातात. त्यांना खऱ्या आत्मसुखाची प्राप्ती कशी होणार? सत्संगाच्या दगडावर असंगाची धार लावलेल्या विद्यारूपी शस्त्राने हा ममतातरू तोडता येतो. ह्या वृक्षाला असे छेदल्यावरच पुढील निष्कंटक (वृत्तीरहित), स्वच्छ (निर्विकार), शीतल ब्रह्मरूपी वनांत जातां येते. तिथे ते शाश्वत परमपदांत एकरूप होऊन सुखाने राहतात. १००-१०४.

दत्तप्रभू अलर्काला पुढे सांगतात, "अलर्का, हे देह, इंद्रिय, मन, बुद्धि, अहंकार यांचे मिळून झालेले शेत आहे, ते सर्व मायिक आहे. यांच्याहून वेगळा असणाऱ्या शेतकऱ्याला जाणणारा धन्य होय. उंबराच्या फळांतील किडे किंवा पाण्यांतील मासे जसे वेंचावेत तसा हा चेतन क्षेत्रज्ञ ह्या मायिक क्षेत्रांतून वेगळा केला आहेस. असा तुझ्यासारखाच एका दृष्टिक्षेपानेच कृतार्थ होणारा शिष्य मिळावा. नाही तर सामान्य सेवेकरी शिष्य कांही कमी नाहीत."

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ३३ वा.

**तद्विष्णोः परमं पदं। असें सांगे जें वेद। तें कळावें विशद। म्हणूनी धारणाभेद सांगे दत्त।।६८।।**
**योग पदरीं पडावा म्हणून। अभ्यासाचे दोष गुण। दत्त करी निरूपण। तेतिसाव्या अध्यायीं।।६९।।**

वेदधर्मा मुनि आपल्या संदीपक नांवाच्या शिष्योत्तमाला पुढे सांगत आहेत. दत्तप्रभूंचे बोलणे ऐकून जिज्ञासा वाढलेल्या अलर्काने त्यांना नमस्कार करून विनंति केली कीं योगाभ्यासाचे गुणदोष आपल्याला विस्ताराने सांगण्याची विनंति केली जेणेकरून त्याचा अभ्यास निर्दोष होईल. तेव्हां दत्तप्रभू उत्तरले, “हे राजकुमारा, तुला प्रथम अभ्यासांत कोणते दोष नसावेत ते सांगतो. गुणदोष जाणून केलेला योगाभ्यास सफळ होतो असा विश्वास ठेव. ”

उपाशी पोटी, शरीर किंवा मनाला पीडा असतांना, चित्त क्रोधादिकांनी क्षुब्ध असतांना योगाभ्यास करूं नये हे मन शांत होऊं देत नाहीत.

**नाध्मातः क्षुधितः श्रान्तो न च व्याकुलचेतनः।**
**युञ्जीत योगं राजेन्द्र योगी सिद्ध्यर्थमादृतः।। मार्कंडेय पुराण ३९:४७।।**

तेव्हा भूक असेल थोडा आहार घेऊन योगाभ्यास करावा. कबीरांचे सांगणे आहे की भूक नांवाची कुतरी ध्यानांत विघ्न आणीत असेल तर तिला भाकरतुकडा टाकून मग निःसंग ध्यान करावे. क्रोधादिक विकारांचा उपशम करून मगच ध्यानाला बसावे. त्याचप्रमाणे वाईट लोकांची संगतीही योगांत मोठी विघ्ने उभी करते. तेव्हां दुर्जनांची संगती सर्वथा टाळावी. १-७.

कडाक्याच्या थंडीचा, कडक उन्हाळ्याचा, फार जोराच्या पावसाचा काळ योगाभ्यासाला अनुकूल नसतो. तसेच वावटळ सुटलेली असतां किंवा पुढे येणाऱ्या अनर्थाची चाहूल लागलेली असतां ध्यान करूं नये. नदीकांठी, श्माशानांत, वाळलेल्या झाडाखाली, उघड्यावर, पालापाचोळ्यांत ध्यानाला बसल्यास विघ्न येते हे ध्यानांत ठेवावे. गर्दी आणि गोंधळ असेल तर जुनाट, पडक्या, भयावह घरांत, वारुळाजवळ, विहीरीच्या जवळ, सर्पादिकांचा वावर असलेल्या ठिकाणी, दगडांच्या राशीजवळ योगाभ्यास करणे निषिद्ध आहे.

**नातिशीते नचोष्णे वै न द्वन्द्वेनानिलात्मके।।**
**कालेष्वेतेषु युञ्जीत न योगं ध्यानतत्परः।**
**सशब्दाग्निजलाभ्यासे जीर्णगोष्ठे चतुष्पथे।।**
**शुष्कपर्णचये नद्यां श्मशाने ससरीसृपे।**
**सभये कूपतीरे वा चैत्यवल्मीकसञ्चये।।**
**देशेष्वेतेषु तत्त्वज्ञो योगाभ्यासं विवर्जयेत्।**
**सत्त्वस्यानुपपत्तौ च देशकालं विवर्जयेत्।। मार्कंडेय पुराण ३९:४८-५०**

ह्या सर्व दोषांना टाळूनच योगाभ्यासाचे देश आणि काल निश्चित करावेत. मनांत सत्त्वगुणाचा (आनंद आणिसमाधान) उद्भव होत नसेल तर तो काळ आणि ते स्थान वर्ज्य करावे. जो मूढपणे अविचाराने अशा प्रतिकूल परिस्थितीत ध्यानाला बसेल तर त्याच्यावर संकटे येतात. त्याची स्मरणशक्ति जाऊं शकते, किंवा तो

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

बहिरा, मुका ,आँधळा किंवा वेडा होतो. उचकी लागणे, श्वास लागणे, वात, पित्त किंवा कफ ह्या त्रिदोषांचा क्षोभ होऊं शकतो. (युनक्त्येतेषु मूढश्चेत्ततो विघ्ना भवन्त्यमी। स्मृतिलोपश्च बाधिर्यं मूकत्वं जडतान्धता।।**दत्तपुराण**३७:२५।।) ८-१४.

## यवागू आणि चित्ताच्या धारणा.

यावर अलर्काने प्रभूंना विचारले, "अविचाराने कळत न कळत जर कांही चूक झाली तरविघ्ने उपस्थित होतील हे तर खरेच. पण अशा परिस्थितीत साधकाने ह्या विघ्नांपासून सुटका होऊन पुनश्च आरोग्य संपादण्यासाठी काय उपाय करावा ते आपण मला सांगा. " अलर्काने अत्यंत नम्रपणे विचारलेला प्रश्न ऐकून दत्तगुरूंनी स्नेहभराने त्याचे उत्तर द्यायला आरंभ केला. "राजा! नीट लक्ष देऊन ऐक. नको त्या देशांत, नको त्या वेळीं किंवा नको त्या परिस्थितीत योगाभ्यास करणे म्हणजे वरील विघ्नांना आमंत्रण देण्यासारखेच आहे. त्यावर हा उपाय आहे. अर्धा पाव (१२५ ग्रॅम) साळीचे तांदूळ सहापट पाण्यात मंद आंचेवर खूप वेळ अगदी मऊ शिजवावेत. ह्या पेजेला यवागू म्हणतात. (यवागुः षड्गुणजले रचिता विरलोदना।). (आयुर्वेदांत यवागूची प्रक्रिया आणि प्रकार यांचे वर्मन आहे. यवागुर्ग्राहिणी बल्या तर्पणी वातनाशिनी । असे तिचे वर्णन आढळते.) या यवागूच्या सेवनाने योगी लोक सर्व दोष दूर करतात. ही फार गुणकारी आहे. जे दोषांना दूर करायचे आहे त्यानुसार यवागूच्या अनुपानाची योजना करावी. साधारणतः गरम गरम यवागूंत तूप घालून हलवून ती प्यावी. मग जो दोष असेल त्याच्यावर चित्त एकाग्र करून शांत बसावे. त्या दोषाचे हळूहळूं निराकरण होते. शरीरांत ज्या ठिकाणी वातादिक दोष उद्भवलेले असतील तिथे चित्त स्थिर केल्याने ते ते दोष जातील. शरीरांत कंप होत असेल तर पर्वताचे ध्यान करावे म्हणजे कांपरे जाईल. बहिरेपणा आला असला तर कानांत चित्त लावावे म्हणजे ऐकायला येईल. बोलण्यांत दोष निर्माण झाला असेल तर जिह्वेवर मन कैंद्रित करावे म्हणजे वाचा सुधारेल. योगाभ्यासाने आलेले हे सर्व दोष या उपायांनी पूर्णपणे जातात. जन्मतः असलेले दोष मात्र पूर्ण बरे होणार नाही.

ध्यात्वा स्वेष्टफलं धार्या धारणा यत्र तत्र च।
**दाहे शीतां शैत्य उष्णां स्मृतिलोपे तु मूर्धनि**।। ३७:२८।।

आपला जसा दोष असेल तशी धारणा केल्याने त्यांचा परिहार होतो. अंगाची आग होत असेल तर बर्फासारख्या थंड पदार्थाची धारणा करावी म्हणजे अंगांत गारवा येईल. शरीर गारठले तर सूर्याचे ध्यान करावे म्हणजे शरीरांत ऊब येईल. (स्वतः श्रीस्वामी महाराजांनी अनेक वर्षे हिमालयांत नुसत्या एका छाटीवर आणि कांबळ्यावर घालविली आहेत. अग्निस्पर्श संन्याशाला निषिद्ध असल्याने नुसत्या अंगांतल्या ऊबेनेच हिमालयांतील थंडीचा सामना केला. अशा वेळी सूर्याचे ध्यान करून अंग गरम ठेवीत असे त्यांच्या बोलण्यात आले आहे.) " १५-३४.

## प्राणाच्या गतींत येणारे अडथळे.

आतां जीवजंतू आणि अमानवी शक्तींपासून होणाऱ्या विघ्नांविषयी सांगतात. वायु आणि अग्नि यांच्या ध्यानाने भूत-पिशाचादि पळून जातील. तसेच आकाश आणि पृथ्वीच्या ध्यानाने जीवजंतू लांब राहतील. योगाभ्यास करतांना कांही कारणाने प्राणाची गति भलतीकडेच होऊं शकते किंवा ब्रह्मरंध्रांत (टाळू) चढलेला प्राण खाली उतरत नाही. अशा वेळीं जवळच्या कुणी तरी जाणकार माणसाने प्रयत्नपूर्वक तो प्राण योग्य स्थानी आणला पाहिजे. टाळून प्राण अडकून राहिला तर

मस्तकावर तूप-तेल असे स्निग्ध द्रव्य लावून हलकीशी मालिश करावी. मग टाळूवर एखादे लाकूड ठेवून त्याच्यावर दुसऱ्या लाकडाने हळूहळू मारावे. म्हणजे मग फारसा त्रास न होतां किंवा अशक्तपणा न येतां प्राण तात्काळ खाली उतरेल. दुसरा उपाय असा आहे की योग्याच्या गळ्याच्या दोन्ही बाजूला तेल किंवा तुप लावून चोळावेत. किंवा उजव्या कानांत कर्णा हळूहळू वाजवला तरीही प्राण जागेवर येतो. कांही लोक दीर्घ ॐकाराचा उच्चार उजव्या कानाशी करतात.

## सौ.अन्नपूर्णामातांची गोष्ट.

ह्याविषयीं श्रीस्वामी महाराजांच्या चरित्रांतील एक गोष्ट आठवते. पूर्वाश्रमीं ते एका रात्रीं देवळाच्या गाभाऱ्यांत कांही वाचन करीत असतां त्यांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णा आल्या. एक-दोन हांका मारल्या तरी बुवांनी उत्तर दिले नाही म्हणून त्या तिथे दाराजवळच बसून राहिल्या; कारण गाभाऱ्यांत स्त्रियांना प्रवेश नव्हता. बसल्या ठिकाणींच त्यांचे ध्यान लागले. वाचन आटोपून बुवा बाहेर येत असतां त्याना पत्नी गाढ ध्यानावस्थेत बसलेली दिसली. त्यांनी बऱ्याच हांका मारल्या व त्यांना जोरांत हलवले तरी त्या भानावर आल्या नाहीत. त्या वेळी त्यांना जागे करण्यासाठी बुवांनी वरीलप्रमाणे उपाय करावे लागले. भानावर आल्यावर पत्नी म्हणाल्या, “तुम्ही मला उगाच जागे केले. मी खूप आनंदातं होते!”

## प.प.श्रीलोकनाथतीर्थ यांची गोष्ट.

आमचे श्रीगुरुचरण योगीराज गुळवणी महाराज यांच्या जीवनांतील आणखी एक घटना इथे स्मरते. ही श्रीगुरुमहाराजांचे ज्येष्ठ व अंतरंग शिष्य पू. वै. व्यंकटराव कुलकर्णी माढेकर यांनी स्वतः सांगितलेली आहे. बार्शीला श्रीगुरुमहाराज असतांना एकदां तिथे त्यांचे दीक्षागुरु प.प. लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचा मुक्काम २-३ महिने झाला. श्रीस्वामीमहाराजांचा निवांत बैठकीसाठी एक जुने घर दिले होते. श्रीगुरुमहाराज आणि व्यंकटराव सकाळी विहीरीवर स्नानासाठी जातांना स्वामी महाराजांचे आसन त्या जागेत करून जात. ते जाऊन स्नानादि आटोपून परत येईपर्यंत २-३तास स्वामी महाराज त्या ठिकाणी ध्यानाला बसत. एके दिवशी हे दोघे येऊन पाहतात तर स्वामी आसनावरूनखाली पडले आहेत. आसन तसेच बांधलेल्या अवस्थेत ते आडवे पडले असून त्यांच्या डोक्याला जखम झाली होती आणि रक्तस्राव होत होता. स्वामी महाराज बेशुद्धच होते. मोठाच कठीण प्रसंग ! अशा वेळी प्राण ब्रह्मरंध्रांतून उतरवतां आला नाही तर जड समाधी होण्याचीच शक्यता असते. त्यांनी त्या वेळी स्वामींना उचलून आसनावर सरळ बसविले. त्या वेळी श्रीगुरुमहाराजांनी दोन लांकडाचे तुकडे घेतले आणि स्वामींच्या टाळूवर एक तुकडा ठेवून दुसऱ्याने त्याच्यावर हलके प्रहार केले. व्यंकटरावांना त्यांनी स्वामींच्या उजव्या कानांत मोठ्याने ॐकार म्हणायला सांगितले. अशा क्रिया करून मध्ये थोडा वेळ थांबून पुन्हां त्या क्रिया करायच्या. असा प्रयत्न केल्यावर थोड्या वेळाने श्रीस्वामी महाराजांनी डोळे उघडले. तेव्हा या दोघांच्या जिवांत जीव आला. या कारणासाठी योगाभ्यास करणाऱ्याने आपल्या जवळपास कुणी जाणकार योगी आहे याची खबरदारी घ्यायची असते. महंमदपूरचे श्री टेंबे स्वामींचे शिष्य बाळा वैद्य यांना स्वामी महारजांनी योगाभ्यास करायला निषेध केला. त्याचे कारण हेच सांगितले की त्या भागांत जवळपास कुणी योगी नाही. प्रसंगी प्राण ब्रह्मरंध्रांत अडकल्यास तो खाली आणला नाही तर देहपात होण्याची शक्यता असते. ३५ -४१.

## मानवी शरीराची मौलिकता.

हे मानव शरीर तसे रक्त-मांस-अस्थी इत्यादि अशुद्ध वस्तूंचे बनलेले आणि घृणास्पद जरी असले तरी तेच मुक्तीचे दार आहे हे लक्षांत ठेवले पाहिजे. ह्याच देहांत आत्मदर्शनाची योग्यता आहे. योगयागादिक कर्मांचे अनुष्ठान, श्रवण-कीर्तनादि नवविधा भक्ति, वेदांताचे श्रवण-मनन-निदिध्यासन ही सर्व साधने ह्या मनुष्य देहांतच शक्य असतात. त्यामुळे देवादिकांनाही आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी या नरदेहाचाच आश्रय घ्यावा लागतो. हे ध्यानांत ठेवून या शरीराची काळजी घेतली पाहिजे. ह्या दुर्लभ देहाचे संरक्षण करीतच योगाचा अभ्यास चालूं ठेवायला हवा तरच योगाची सिद्धी शीघ्र होते. ४२-४५

## सिद्धीची लक्षणे.

यानंतर योगसिद्धीची चिह्ने सांगितली आहेत. आरंभीं इंद्रियांचे चांचल्य जाते. चित्त प्रसन्न राहूं लागते. अग्नि प्रदीप्त होतो व भूक चांगली लागते व अन्नाचे पचनही चांगले होते. शरीर साहजिकच निरोगी होते. विष्ठा आणि मूत्र यांचे प्रमाण कमी होते. आवाज चांगला होतो, दृष्टी स्वच्छ होते. सोलापूरचे संत प्रभाकर महाराज यांच्या एका शिष्याचा चष्मा गेल्याचे पाहण्यांत आहे. अंगाला सुगंध येतो. योगांतील प्रगतीची ही प्राथमिक लक्षणे आहेत.

**आलौल्यमारोग्यमनिष्ठुरत्वं गंधः शुभो मूत्रपुरीषमल्पं।**
**कान्तिः प्रसादः स्वरसोम्यता च योगप्रवृत्तेः प्रथमे हि चिह्नम्।।** मार्कंडेय पुराण ३९:६३।।

दुसऱ्या अवस्थेत शरीर कृश होते, मनांत आनंदाचा प्रदुर्भाव होतो, त्वचा तेजस्वी दिसूं लागते. लोक त्याच्यावर स्नेह करतात, त्याच्या पाठीमागेही त्याची स्तुति करतात. जीवजंतू त्याला भीत नाहीत.

**अनुरागी जनो याति परोक्षे गुणकीर्तनम्।**
**न बिभ्यति च सत्वानि सिद्धेर्लक्षणमुत्तमम्।।** मार्कंडेय पुराण ३९:६४।।

श्रीस्वामी महाराजांच्या पूर्वाश्रमांत ते जेवतांना उंदरासाठी घास काढून ठेवीत. उंदीरही न घाबरतां येऊन शांतपणे ते अन्न खात. मात्र दुसरे कुणी माणूस आले की पळून जात. मंडालेच्या तुरुंगांत लोकमान्य टिळकांच्या अंगाखांद्यावर पक्षी येऊन खेळायचे असे वर्णन त्यांच्या चरित्रांत आहे.

सिद्धीच्या तिसऱ्या अवस्थेत शीत-उष्णादि द्वंद्वांची जाणीवच रहात नाही. वर श्रीस्वामी महाराजांच्या हिमालयांतील वास्तव्याचे वर्णन आले आहेच. योगी निर्भय होऊन जातो. त्याला कशाचीच, कुणाचीच भीती अशी वाटतच नाही. मनाला अतीव स्थिरता प्राप्त होते.

**शीतोष्णादिभिरत्युग्रैर्यस्य बाधा न विद्यते।**
**न भीतिमेति चान्येभ्यस्तस्य सिद्धिरुपस्थिता।।** मार्कंडेय पुराण ३९:६५।। ४६-५०.

## योगाभ्यासांतील उपसर्ग - सिद्धी

योगाभ्यासात होणाऱ्या प्रगतीबरोबरच सिद्धी नांवाचे उपसर्गही समोर येतात. सिद्धी म्हणजे अलौकिक शक्ती. ह्या योग्याला आकर्षित करतात. आसनजय, प्राणजय आणि इंद्रियजय हे केलेल्या प्रगत साधकाला ह्या सिद्धी भुरळ पाडतात. त्यांच्याकडे ओढला गेलेला योगी आपल्या अभ्यासापासून ढळतो. ध्यानाभ्यास बाजूला राहतो आणि मग सिद्धींचाच अभ्यास सुरू होतो. इथे योग्याने सावधगिरी बाळगली पाहिजे. या सिद्धी हे उपसर्ग आहेत हे पक्के लक्षांत ठेवले पाहिजे. अन्यथा फसगत होते.

**जितासनो जितप्राणो यद्यप्येष जितेन्द्रियः।**

**जितात्मापि महासिद्धीर्दृष्ट्वा योगी विमुह्यति।।**
**सावधानेन राजेन्द्र योगिना सिद्धिमिच्छता।**
**तस्मात्सर्वप्रयत्नेन त्याज्या दूरेण सिद्धयः।।**
**सिद्धीनां यत्फलं तत्तु मायिकं क्षणभङ्गुरम्।**
**ज्ञानस्य यत्फलं तत्तु सर्वानर्थहरं ध्रुवम्।। दत्तपुराण ४:५: ४७-४९।।**

यावर अलर्काने विचारले, "प्रभो! हे योग्यांना पथभ्रष्ट करणारे उपसर्ग मला विस्ताराने सांगावेत." श्रीदत्तप्रभू म्हणाले, "अरे राजा! योगी जसाजसा योग्याच्या पायऱ्या चढत जातो तसतशा देवता अस्वस्थ होतात. त्यांना ते आवडत नाही. हा आपल्यालासुद्धा जड होईल अशी शंका त्यांना त्रस्त करते. मग ते त्याला सिद्धीची लालूच दाखवतात."

एकदां योगी या सिद्धीरूपी उपसर्गांच्या जाळ्यांत योगा सांपडला की त्याची योगाची आवडच नाहीशी होते. सुरुवातीला त्याला काम्य कर्माकडे प्रवृत्त करून त्या कर्मांची फळे त्याला लवकर मिळवून देतात. मग त्याला त्या सकाम अनुषाठानांचीच गोडी लागते. त्यांतूनच त्याला धन हवेसे वाटूं लागते. देव ते धनही त्याला भरपूर देतात. देवांच्या संकल्पाने सुंदर स्त्रिया त्याच्याकडे आकर्षित होतात. परिणामी नाना प्रकारच्या भोगांची इच्छा होते आणि ते अनायासेच मिळतातही. ऐहिक भोगच नाही तर दिव्य भोगसुद्धां त्याला देवांकडून प्राप्त होतात. तो इंद्रजाल, मंत्रजाल, रसायनक्रिया, किमया अशा नाना प्रकारच्या तांत्रिक विद्याच्या मागे लागतो आणि त्यांतून अधिकाधिक द्रव्य आणि सत्ताही मिळवायच्या मागे लागतो. देवता त्याला साह्य करीतच असतात. मग मोठमोठ्या राजकारणी, धनवान लोकांच्यांत ऊठबस सुरू होतात. त्यांच्याकडून मानसन्मान पूजा होते. आपला बडेजाव वाढविण्याकडे प्रवृत्ती होते. लोकांवर छाप टाकण्यासाठी तो अन्नत्याग करतो आणि त्याला प्रसिद्धी देतो. पाण्यावर चालणे, आकाशांत उडणे, भूतप्रेतांना वश करणे, दुसऱ्यांच्या मनांतले ओळखणे अशा नाना सिद्धींचे प्रदर्शन लोकांत करायला जातो. लोकांना भूत आणि भविष्य सांगून भुलवतो. लौकिक आणि प्रतिष्ठा यांच्यामागे लागल्याने त्याचा तपोभंग होतो. अत्यंत कष्टाने प्राणादिकांवर मिळवलेला जय निष्फळ होतो. विवेक आणि ज्ञान असेल तर या सर्वांचा तो त्याग करूं शकतो. सर्वांत उत्तम उपाय म्हणजे सद्गुरू आणि ईश्वर यांच्या ठिकाणी भक्ति! भक्ताचा भावच ह्या विघ्नांचा नाश करायला आणि योग्याला सिद्धींपासून परत फिरायला समर्थ आहे. ५१-७२.

या सर्व सिद्धींच्या मुळाशी योग्याच्या चित्तांतील सुप्त वासनाच असतात. त्यांचाच आधार घेऊन देवता त्याला योगापासून विचलित करीत असतात. आजही अनेक तथाकथित योगी, गुरु, महात्मे, बुवा, बाबा इत्यादींची प्रसिद्धी होतांना दिसते. परमेश्वरप्राप्तीचे ध्येय सोडून क्षुद्र संपत्ती, स्त्री, लौकिक अशा गोष्टींचे ध्यान करणाऱे हा व्यभिचार आहे. श्रीरामकृष्ण परमहंस अशा साधकांची तुलना वेश्येशी करतात. कुलस्त्रीच्या घरीं माणसांचा राबता नसतो. तो जर वाढूं लागला तर तिच्या शीलावर संशय येतोय तसाच साधकाचा लोकसंपर्क वाढूंलागला की तो पथभ्रष्ट झाला असे समजावे असे त्यांचे सांगणे आहे. योग्याच्या पूर्वसंचितानुसार विविध सिद्धी उपस्थित होतात.

**प्रातिभः श्रावणो दैवो भ्रमावर्तौ तथापरौ।**
**पञ्चैते योगिनां योगविघ्नाय कटुकोदयः।।** मा.पुराण ४०:६-७।।

कुणाला वेद, शास्त्र इत्यादींचे ज्ञान होते. कुणी शिल्पादि कलांत निपुण होतात. कुणाला सर्व मागच्या-पुढच्या, दूरच्या-जवळच्या सर्व गोष्टी स्पष्ट जाणवतात. ही प्रतिभा नांवाची सिद्धि आहे.

**वेदार्थाः काव्याशास्त्रार्थाः विद्याशिल्पान्यशेषतः।**

**प्रतिभान्ति यदस्येति प्रातिभः स तु योगिनः।।** मा.पुराण ४०: ७- ८ ।।

कांही लोकांना विविध भाषांतील शब्दांचे अर्थ समजूंलागतात तर कुणाला हजारो मैल दूरचे ऐकायले यते. ही श्रवण नांवाची सिद्धी किंवा उपसर्ग आहे..

**शब्दार्थानखिलान्वेत्ति शब्दं गृह्णाति चैव यत्।।**

**योजनानां सहस्रेभ्यः श्रावणः सोऽभिधीयते।** मा.पुराण ४०: ८- ९ ।।

देवांच्याप्रमाणे आठही दिशांतील सर्व कांही त्याला दिसायला लागले तो दैव उपसर्ग (सिद्धी) होय.

**समन्तादीक्षते चाष्टौ स यदा देवतोपमः।**

**उपसर्गं तमप्याहुर्दैवमुन्मत्तवद्बुधाः।।** मा.पुराण ४०:९ - १० ।।

पण योगाचा मात्र नाश होतो. आधाराशिवाय पाहिजे तिथे जाण्याच्या सिद्धीला विभ्रम हे नांव आहे. कारण ती सगळ्या आचारापासून योग्याचा भ्रंश करते.

**भ्राम्यते यन्निरालंबं मनोदोषेण योगिनः।**

**समस्ताचारविभ्रंशाद्भ्रमः स परिकीर्तते।।** मा.पुराण ४०:१० - ११।।

**आवर्तक** नांवाच्या सिद्धीने तो सर्वज्ञ होतो आणि त्याचे मन कुठेच अडत नाही. ह्या भ्रामक ज्ञानाच्या आवर्तांत (भोंवऱ्यांत) त्याला ही सिद्धी फिरवते म्हणून तिला आवर्तक म्हटले आहे. या सर्व सिद्धी योगमार्गांतील दारुण विघ्ने आहेत आणि त्यांनी योग्याची अवनतीच होते. योग्यांना आपल्या अभ्यासापासून चळविण्यासाठी देवच ह्या सिद्धी दाखवतात. ह्यांना वश होणारे योगी संकटांत जडतात. राजाला भेटायला जावे आणि वाटेत विविध तमाशे पहात राहिल्याने वेळ टळून जावी असाच कांहीसा हा प्रकार आहे. सिद्धींच्या भूलभुलय्यांत रमणारा आत्मज्ञानाला पारखा होतो. ह्याचे मुख्य कारण भक्तीचा अभाव हे आहे. आपल्या ध्येयावर दृष्टी स्थिर असल्याने जो इकडे तिकडे पहात नाही तो या सिद्धींचे फळ टाकून आत्मज्ञानी होतो. ईश्वरावर निष्ठा ठेवून अभ्यास करणारा भक्त ह्या सिद्धीरूपी उपसर्गांना भुलत नाही. ७३-८३.

स्वतः स्वामी महाराजांना माणगांवी पूर्वाश्रमांत योगाभ्यासाच्या प्रगत अवस्थेत समोर येणाऱ्या प्रत्येकाच्या मनांतले कळत असे. त्याने कांही बोलण्याच्या आधीच त्याच्या मनांतील उद्देश ते सांगत असत. यामुळे कांही लोकांना 'बुवांनी कर्मपिशाच तर सिद्ध केले नाही ना?' असा संशय येत असे. हा प्रकार जवळजवळ एक-दोन वर्षे चालूं होता. मग एकदां देवांचे सांगणे झाले, "हा काय बाजार मांडला आहेस?" मग बुवांनी आयुष्यांत त्या सिद्धीचा कधींच उपयोग केला नाही. श्रीस्वामी महाराजांना सर्व सिद्धी प्राप्त असूनही ते त्यांचा उपयोग अगदी क्वचितच करी असत.

## सात धारणा

प्राणाचा जय झाल्यावर प्रत्याहाराच्या अभ्यासाने इंद्रियांना वश करून ध्यायचे आणि चित्त एका ठिकाणी बांधायचा अभ्यास करावा. हीच धारणा होय. १४व्या अध्यायात ही विषय आपण पाहिला आहेच. त्यांत धारणेचे विविध देशही आपण पाहिले आहेत. इथे मार्कंडेय पुराणाला अनुसरून सात धारणा सांगितल्या आहेत. **सूक्ष्मास्तु धारणा सप्त भूराद्या मूर्ध्नि धारयेत ।। ४०१६।।** पृथ्वी आदि सात सूक्ष्म धारणांचे विधान आहे.

पृथ्वीची धारणा पायांपासून गुडघ्यांपर्यंतच्या भागावर, 'लं' बीजाने युक्त पिंवळ्या चौकोनांत करायची असते. या सुखकारी धारणेने योगी भूतत्त्वाशी तादात्म्य पावतो आणि गंध या विषयाचा

त्याग करतो. गुडघ्याच्या वर बेंबीपर्यंत ‘वं’ बीजयुक्त पांढऱ्या धनुष्याकृतींत जलतत्त्वाची धारणा केल्याने त्या तत्त्वाशी समरसून योगी रस विषयाचा त्याग करतो. नाभीपासून हृदयापर्यंत ‘रं’ बीजाने युक्त अशा लाल त्रिकोणांत अग्नितत्त्वाची धारणा करून योगी रूप या विषयाचा त्याग करतो. हृदयापासून भ्रूमध्यापर्यंतचा देशांत ‘यं’ बीजयुक्त धुरकट रंगाच्या ध्वजाकृतींत वायुतत्त्वाची धारणा करून योगी स्पर्श विषयाचा त्याग करतो. भ्रूमध्यापासून टाळूपर्यंत (ब्रह्मरंध्र) ‘हं’ बीजयुक्त निळ्या वर्तुळाकृतींत आकाशतत्त्वाची धारणा करून योगी शब्द विषयाच्या पलीकडे जातो. ह्या पांच धारणा केल्यावर पांचही महाभूतांशी एकरूप होऊन आणि त्यांच्या विषयांचा त्याग करून योगी निर्विकार होतो. ह्यानंतर चंद्रदेवतेच्या अधिष्ठानावर मनाचे ध्यान (मनावर धारणा) केल्याने योगी त्रिगुणरहित होतो. त्याचे मन अत्यंत सूक्ष्म होते. अंततः बृहस्पतीच्या अधिष्ठानाने निश्चयस्वरूपी बुद्धीचे ध्यान करून तो योगिराज संकल्प आणि विकल्प थांबवतो. अलर्का ! पांच भूते, मन आणि बुद्धी यांच्या सूक्ष्म स्वरूपांचे सम्यक् ज्ञान करून त्यांच्यापासून मुक्त झालेला योगी पुन्हा जन्माला येत नाही.

**परित्यजति सूक्ष्माणि सप्त त्वेतानि योगवित्।**
**सम्यग्विज्ञाय योऽलर्क तस्यावृत्तिर्न न विद्यते।। मा.पुराण ४०:२१।।**

अशा ह्या सर्व विषयांत अनासक्त असलेल्या योग्याचे वैराग्य परिपूर्ण होऊन ते “वशीकारसंज्ञा वैराग्य” या संज्ञेला पात्र होते. आपल्या सर्व इंद्रियांवर त्याचा पूर्ण ताबा असतो. तो निरोगी आणि सुखस्वरूप होतो. तो सर्वथा निःसंग होतो. तो इच्छामरणी होतो आणि देवादिकांनाही वंद्य होतो. त्याचा अहंकारच नाहीसा झाल्याने तो सतत ब्रह्मानंदांत बुडलेला असोत. अशा ह्या सात धारणांचा सतत अभ्यास केल्याने परमसिद्धी प्राप्त होऊन योगी स्थितप्रज्ञ होतो. ज्याने ह्या सात धारणा केल्या त्यानेच खरे आसनजय, प्राणजय आणि इंद्रियजय (प्रत्याहार) साधले. कारण हे सगळे जरी साधले आणि ह्या धारणा केल्या नाहीत तर तो योगी मेनकेला भुललेल्या विश्वामित्रासारखा सिद्धींच्या प्रलोभनाला बळी पडूं शकतो. एवढ्यासाठी साधकाने सावध राहून सिद्धींचा मोह न धरतां सात धारणा करून निश्चल ध्यानाचा अभ्यास करावा.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा तेहतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ३४वा.

**सुविरक्त व्हावें म्हणून। आणिमादि सिद्धींचें वर्जन। सांगे दत्त नृपा ध्यान। सगुणागुण भेदानें।।७०।।**
**योग मंद न व्हावा म्हणून। दत्त सांगे योगचर्या लक्षण। भिक्षेचेंही वर्तन। चौतिसाव्या अध्यायीं।।७१।।**

वेदधर्मा गुरुजी संदीपकाला म्हणतात, “पहा दीपका सर्व गुणांचा आश्रय असलेले सद्गुरु जेव्हा शिष्याचा अंगीकार करतात तेव्हा हर प्रकाराने त्याचे समाधान करतात. यत्किंचितही कसर ठेवीत नाहीत. अरे! आईचे प्रेमसुद्धा ममत्वांतून उद्भवते. आपला पुत्र ह्या स्वार्थी भावनेनेच तिचा सगळा कळवळा असतो. सद्गुरूंचे प्रेम मात्र पूर्णपणे निःस्वार्थी असते. शिष्याचे कल्याण हेच त्यांचे एकमेव लक्ष्य असते. शिष्याने कितीही आणि कसेही प्रश्न विचारले तर प्रयत्नपूर्वक त्याचे पूर्ण समाधान केल्याशिवाय ते रहात नाहीत. अलर्काचे महद्भाग्य म्हणून त्याला कल्याणाचा उपदेश द्यायला दत्तप्रभू भेटले. अलर्काची जिज्ञासाही वाढते आहेत. त्याने दत्तप्रभूंना विचारले की योगांत विघ्न आणणाऱ्या सिद्धी किती आहेत आहेत आणि त्यांची लक्षणे काय आहेत हे मला समजावून सांगावे जेणेंकरून मी त्याच्यापासून सावध राहूं शकेन. त्याचा हा विनयपूर्वक सादर प्रश्न ऐकून दत्तप्रभू प्रसन्न होऊन त्याला लक्षपूर्व ऐकायला सांगून बोलूं लागले.” १-७

## अष्टमहासिद्धी.

**अणिमा महिमा भूप गरिमा लघिमा तथा।।**
**प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः।।** दत्तपुराण ५:६:२।।

हे राजन्, सर्वांत प्रमुख आठ सिद्धी आहेत. साधनेच्या अंतिम अवस्थेत आत्मज्ञानाच्या सूचक (परं निर्वाणसूचकान् – मा.पुराण) असे हे ईश्वरी गुण असल्याने यांना अष्ट ऐश्वर्यें किंवा महासिद्धी असेही म्हणतात. अणिमा, महिमा, गरिमा आणि लघिमा ह्या चार सिद्धी देहाच्या सिद्धी आहेत.

पहिली **अणिमा** नांवाची सिद्धी ईश्वराच्या सूक्ष्मतम रूपांत धारणा केल्याने प्राप्त होते. या सिद्धीने आपला देह लहानांत लहान, अगदी अणुमात्र करतां येतो. ह्याच सिद्धीचा उपयोग करून मारुतिरायांनी लंकेत प्रवेश केला होता.

ह्या उलट पृथ्वीसारख्या मोठ्यांत मोठ्या रूपावर धारणा केल्याने आपल्या शरीराचा आकार पाहिजे तेवढा वाढवतां येतो. श्रीमद्भागवतांत भगवान गोपाळकृष्णांनी गोकुळांत त्यांना ठार करायला आलेल्या असुरांना झुंज देतांना ह्या सिद्धीचा उपयोग केल्याचे उदाहरण आहे. ते आपल्या प्राकृत बालरूपाने त्यांच्या मुखांत वा शरीरांत प्रवेश करीत आणि मग आपले शरीरा एकदम मोठे करून त्या असुराचा नाश करीत. हीच **महिमा** सिद्धी होय. महा या शब्दाचा अर्थ पूज्य असाही होतो. सर्वांत पूज्य अशा ईश्वराचे ध्यान करून विश्ववंद्यत्व मिळवणे हेसुद्धां महिमा सिद्धीचेच रूप आहे.

पर्वत, पहाड इत्यादि जड पदार्थांचे चिंतन करून योगी आपल्या शरीराचे वजन (गुरुत्व) अफाट वाढवूं शकतो. श्रीकृष्णांची तुला करतांना सुवर्णनगरी द्वारकेतील सगळे सोनेसुद्धा कमी पडले! ही **गरिमा** सिद्धी होय. सर्वांचा गुरू जो ईश्वर त्याचे ध्यान केल्याने जगद्गुरुत्व अंगीं येणे हीसुद्धा गरिमा सिद्धीच आहे.

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

कापसासारख्या हलक्या पदार्थाचे चिंतन केल्याने **लघिमा** सिद्धीने योग्याला त्याचा देह तसाच हलका करतां येतो. लघु या शब्दापासून लाघव हा शब्द होतो. त्याला अनुसरून मार्कंडेय पुराणांत 'शीघ्रत्वं लघिमा गुणः' (वेगाने कुठेही जातां येणे) अशीही लघिमेची व्याख्या केली आहे.

**प्राकाम्य** सिद्धी म्हणजे थोडासाच असलेला पदार्थ हवा तितक्या लोकांना तो वटून देतां येणें. हृषीकेशचे प्रसिद्ध योगी एकदां गरुडेश्वरला श्री थोरल्या (टेंबेस्वामी) महाराजांच्या भेटीला गेले असतां त्यांना असे दिसले की स्वामीमहाराज एका लहानशा कमंडलूंतील तीर्थ येणाऱ्या सर्व दर्शनार्थींना देत आहेत; पण दिवसभर शेंकडो भक्तांना तीर्थ देऊनही त्या कमंडलूंतील पाणी कमी झाले नाही. गुरुचरित्रांत भास्कर ब्राह्मणाने तिघांपुरत्या शिजवलेल्या अन्नात चार हजार लोक पाटभर जेवले असे वर्णन आहे. ही प्राकाम्य सिद्धीचेच उदाहरणे आहेत. सर्वव्यापी ईश्वराच्या चिंतनाने योग्यांतही ते व्यापित्व आल्याने ही सिद्धी प्रकट होते. (**प्राकाम्यमस्य व्यापित्वात्** – मा.पुराण. ४०:३२.)

कितीही दूरवरची वस्तु इच्छामात्रें हातीं येणे या सिद्धीला **प्राप्ती** म्हणतात. (**दूरस्थकामितयोगात्प्राप्तिः।**) ह्या सिद्धीच्या प्रभावाने योगी चंद्रालाही स्पर्श करूं शकतो. हिच्या प्रभावाने त्या योग्याला अप्राप्य असे कांहीच नसते. (**प्राप्तिर्नाप्राप्यमस्य यत्** – मा.पुराण ४०:३१)

**ईशित्व** म्हणजे पृथ्व्यादि पंचमहाभूते आणि त्यांपासून झालेले मनुष्यादिक भौतिक जीव यांच्यावर सत्ता. ही सिद्धी मिळाली की तो योगी ईश्वरच होतो. (**ईशित्वं चेश्वरो यतः** – मा.पुराण ४०:३२).

वर सांगितलेली भूते आणि भौतिक हे स्वाधीन असणे म्हणजे **वशित्व.** चांगदेव संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांच्या भेटीला वाघावर बसून आणि सापाचा चाबूक करून आले म्हणतात. पाण्यावर चालणे, आगीशी खेळणे इत्यादि वशित्वाचेच प्रयोग आहे. मार्कंडेयपुराणांत गरिमा ही सिद्धी वेगळी न सांगतां **यत्रकामावसायित्व** ही सिद्धी वर्णन केली आहे. ज्या ठिकाणी जाण्याची त्या योग्याची इच्छा तिथे तो उपस्थित होतो (यत्रेच्छास्थानम्) असे ह्या सिद्धीचे स्वरूप आहे. दत्तपुराणाच्या टीकेत (५:६:४) पूर्णता असे हिचे वर्णन आहे. ८-२३.

ह्या अष्टमहासिद्धींप्रमाणेच आकाशगमन, परकायाप्रवेश, इत्यादि दहा महासिद्धीही आहेत. पतंजलींनी ह्या सिद्धी कशा प्राप्त करतां येतात ह्याचे विभूतिपादांत वर्णन केलेले आहे. पण मुमुक्षू साधकांनी ह्या सिद्धींत लक्ष घालूं नये. पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे त्या समाधीला विघ्न करणाऱ्या आहेत. व्युत्थान दशेत त्या सिद्धी प्रकटतात. (ते समाधावुपसर्गाः व्युत्थाने सिद्धयः।। योगसूत्र ३:३७)

## सिद्धींचे प्रकार.

सिद्धी पांच प्रकारे प्रकट होतात. जन्म, औषधि, मंत्र, तप आणि समाधि.( योगसूत्र ४:१) पक्ष्यांना जन्मतःच आकाशांत उडतां येते किंवा माशांना पाण्यात धांवतां येते. कपिल महामुनि इत्यादीना जन्मतःच सिद्धी असतात. त्यांना जन्मसिद्ध असे म्हणतात. अंगावर कांही औषध चोळून अग्नीपासून रक्षण करणे किंवा अंजनाच्या प्रयोगाने अज्ञात घटना दिसणे इत्यादी औषधजन्य सिद्धी आहेत. मंत्रांच्या अनुष्ठानानेही मनुष्याला सिद्धी प्राप्त होतात. विश्वामित्रांनी मंत्रसामर्थ्याने प्रतिसृष्टि केली. तपाचरणानेही सिद्धी मिळवणारे व्यासादिक ऋषी आहेत. ह्या सर्वच सिद्धी योगाने मिळवतां येतात. जसे जसे व्हावे, जें जें करावें किंवा मिळवावें असें वाटेल तें तें योगाने मिळवतां, करतां येतें. असे योगाचे अफाट सामर्थ्य आहे. पण ही सर्व योगमार्गांतील विघ्ने आहेत हेच पुनःपुन्हां दत्तप्रभू अलर्काला सांगत आहेत. २४-३०.

# ध्यान.

धारणांचा अभ्यास दृढ झाल्यावर ध्यान करावे. तेलाच्या धारेप्रमाणे अखंड, अविचल चित्त एकाच आलंबनाकडे प्रवाहित करण्याला ध्यान म्हणतात. ह्या ध्यानाने मनांतील सर्व दोष दूर होतात आणि ध्याता संसारसागरांतून तरून जातो. ध्यानाचे सगुण आणि निर्गुण असे दोन प्रकार इथे सांगितले आहेत.

**सगुणं निर्गुणं ध्यानं तत्राद्यं विष्णुचिन्तनम्। द्वितीयं निर्गुणं ब्रह्म वाक्यलक्ष्यं सनातनम्।।** ५:६:७।।

श्रीदत्तस्वरूप विष्णुपरमात्म्याचे ध्यान हेच सगुण ध्यान आहे. निर्गुण ध्यान हे महावाक्यांनी निर्दिष्ट केलेल्या ब्रह्माचे ध्यान होय. स्वतःची इष्टदेवता हीच विष्णूंचे स्वरूप समजून तिचे ध्यान करावे. ध्यान हे जसे देहाचे करतां येते तसे ते गुणांचे आणि लीलांचेही करतां येते. अलर्काला त्याच्या आवडीचे दत्तप्रभूंनी आपलेच सगुण ध्यान करायला सांगितले आहे. जन्म-मरणादि विकाररहित, एकमेवाद्वितीय, अखंडैकरस, सच्चिदानंदघन, गुणातीत, विश्वव्यापी जगताच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचा कारण असलेला मी परमात्माच अत्रि आणि अनसूयेचा पुत्र झालो. आपल्या अनिर्वचनीय, त्रिगुणात्मक मायेचा अंगीकार करून, साधूंच्या रक्षणासाठी आणि दुष्टांच्या निर्दलनासाठी हा लीलादेह धारण केला. निष्कल अशा माझ्या रूपांत सोळा कला भासतात. अशा ह्या माझ्या रूपाचे जो प्रेमाने, भयाने किंवा द्वेषानेसुद्धां अखंड चिंतन करतो त्याला सद्गती मिळतेच मिळते. कारण हा माझा गुणधर्मच आहे. जसा जो कोणी स्पर्श करील त्याला भाजणे हा अग्नीचा गुणधर्म आहे. तिथे स्पर्श करणाऱ्याच्या भावनेने कांही फरक पडत नाही. पाणी किंवा विष म्हणूनही कुणी अमृत प्याला तर तो अमर होणारच! त्याचप्रमाणे कोणत्याही भावाने माझे ध्यान करणारा माझ्याशी एकरूप होतोच. इथे कुणी असे म्हणेल की पति, पत्र इत्यादि स्वकीयसुद्धां ब्रह्मरूप आहेतच. त्यांचेच ध्यान कां करू नये? तसे ते असले तरी त्यांच्यावर अज्ञानाचे आवरण आहे. त्यामुळे त्यांचे ध्यान संसारबंधन तोडूं शकत नाही. माझे हे सगुण रूप मात्र आवरणरहित आहे, विकाररहित आहे. म्हणून माझे ध्यान मोक्षाला कारण होते. ३१-४४.

# सगुण ध्यान.

हे पायापासून आरंभ करून मुखापर्यंत करायचे आहे. श्रीदत्तप्रभूंची अनेक ध्याने उपनिषदांत, पुराणांत आणि संतवाङ्मयांत आली आहेत. आपण इथे श्रीस्वामी महाराजांनी द्विसाहस्री गुरुचरितम् या ग्रंथाच्या आरंभींच्या श्रीगुरुस्तुतीत केलेले ध्यान थोडक्यांत पाहूं. प्रत्यक्ष पाहून केलेले हे वर्णन आहे.

**वज्राङ्कुशध्वजाब्जाङ्क-युग्रक्ताब्जाभपत्तलः। गूढगुल्फः कूर्मपृष्ठोल्लसत्पादोपरिस्थलः ।।१०६।।**
**जानुपूर्वकजङ्घश्च विशालजघनस्थलः। पृथुश्रोणिश्च काकुत्स्थश्चारुनाभिर्दलोदरः ।।१०७।।**
**अररोरा मांसलांसो युगव्यायतबाहुकः। सुचिह्नचिह्नितकरः कम्बुकण्ठः स्मिताननः।।१०८।।**
**स्नैग्ध्यधावल्ययुक्ताक्षश्चलत्-पिङ्गजटाधरः। चन्द्रकान्तिः प्रभुः कृष्ण-भ्रूरःश्मश्रुकनीनिकः।।१०९।।**
**भावशुद्धद्विजाकीर्ण-स्वास्याब्जोऽभीवरप्रदः। दत्तात्रेयः स भगवान्सदा वसतु मे हृदि।।११०।।**

हे ध्यान दिगंबर असून ह्यांत कोणत्याही वस्त्र, आयुध किंवा आभरणांचा उल्लेख नाही. हे ध्यान द्विभुज आहे.) वज्र, अंकुश, ध्वजा आणि कमल या चिह्नांनी युक्त, लाल कमळाच्या रंगाचे तळवे असलेले, कांसवाच्या पाठीसारखे फुगीर वरचा भाग असलेले आणि टांचा झांकलेले ज्याचे पाय आहेत, मांडीच्या वरच्या भागावर एक पाय गंमतीने ठेवलेला आहे; प्रशस्त बैठक असलेला, दिगंबर, सुंदर नाभीसह पातळ पोट असलेला, कपाटासारखी रुंद छाती असलेला, मांसल बाहूंचा, विशाल बाहूद्वयांनी युक्त, ज्याचे हात शुभचिह्नांनी मंडित आहेत, ज्याचा गळा शंखासारखा तीन वलयांनी युक्त

आहे, चेहऱ्यावर मधुर स्मित विलसत आहे, ज्याचे डोळे स्निग्ध आणि पांढरे आहेत, (कपाळावर) पिंगट जटा रुळत आहे, चंद्रासारख्या मनोहर कांतीचा, ज्याच्या दाढीमिशा आणि बुबुळे काळीं आहेत, स्वभावतः निर्मल अशा दंतपंक्तीने ज्याचे मुखकमल शोभत आहे असा आपल्या दोन हातांनी अभय आणि वर मुद्रा दर्शविणारा तो भगवान दत्तप्रभू सदैव माझ्या हृदयांत वास करो. पायापासून मुखापर्यंत असे हे मनोहर रूप चित्तांत स्थिर झाल्यावर मुखावर विलसणाऱ्या स्मितहास्यावर चित्तवृत्ती केंद्रित करायला सांगितली आहे. इतर सर्व विचार मावळल्यावर मन तन्मय होऊन त्या स्मितांतच हरवून जाते आणि परमानंदांत निमग्न होते. आरंभीं सगुण वाटणारे ध्यान मग निर्गुण होते.४४-४८.

## भजन आणि ध्यान.

ह्या ठिकाणी श्रीस्वामी महाराजांनी श्रीदत्तप्रभूंनी अलर्काला उपदेशिलेल्या योगपूर्वक आन्वीक्षिकी (ज्ञानयोगाचा प्रकार) आणि भक्तिमार्ग यांची हृद्य सांगड घातली आहे. योग, भक्ति आणि ज्ञान ह्या साधनापद्धतीत बहिरंगांत भिन्न वाटल्या तरी अंतरंगांत त्या सारख्याच आहेत. भजनांतही ध्यान होते आणि ध्यानांतही भजन अनुस्यूत असते हेच ह्या सगुण ध्यानाच्या द्वारे श्रीमहाराज दाखवीत आहेत.

## समाधि.

ह्या ध्यानांत ध्येय (श्रीमुखावरील स्मित हास्य), ध्याता (ध्यान करणारा योगी-भक्त) हे वेगळे असतात तेव्हांच ध्यान ही क्रिया असते. मन निश्चल झाले आणि ध्याता ध्येयाशी तन्मय झाला कीं मी ध्यान करतो ही जाणीवही विरून जाते. ध्येय-ध्याता-ध्यान ही त्रिपुटी लयाला जाते. त्या वेळी ध्यान संपते आणि ती समाधी होते! समाधी एकदां साधली कीं बुद्धीची चुळबुळ थांबते. तिच्यांत आधीच लान झालेली इंद्रिये आणि मन तिच्याबरोबरच आत्मस्वरूपांत लुप्त होतात. ज्याला ही समाधी साधली त्याचा देहादि सर्व उपाधीशी संबंध संपतो. शारीरिक आजार (व्याधि) किंवा मानसिक पीडा (आधि) त्याला बाधत नाहीत.

**अनेनास्य मनोभङ्गो वासनासंक्षयोऽपि च।**
**ततो न जायते योगी वर्धते न च नश्यति।।९।।**
**परिणामोऽस्य न क्लेदश्छेदो दाहश्च शोषणम्।**
**सर्गेऽपि नोद्‌भवो नान्तः प्रलयेऽप्येकरूपिणः।।१०।।**
**भूतभौतिकसंबन्धो नास्य शब्दादयोऽपि च।**
**न भोक्तायं न कस्यापि भोज्यो ह्येकत्वमास्थितः।।११।।**
**ये निर्दग्धा मला योगैर्नैक्यं क्वाप्यस्य तैः पुनः।**
**नासौ विश्लेषमाप्नोति ब्रह्मणास्यैक्यमिष्यते।।श्रीदत्तपुराण ५:६:१२।।**

या समाधीनेच त्याचा मनोनाश आणि वासनाक्षय होतो. त्याला जन्म, वृद्धि, नाश, परिणाम हे देहाचे विकार बाधत नाहीत. पाणी त्याला भिजवत नाही, अग्नि त्याला जाळत नाही, वारा त्याला सुकवत नाही वा शस्त्रांनी तो छिन्न होत नाही. (नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः। न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः।। भ.गीता २:२३) सृष्टीच्या उत्पत्तीबरोबर तो जन्मत नाही की कल्पांती मरत नाही. भूतांशी व भौतिक सृष्टीशी त्याचा संबंध राहत नाही. शब्दादि विषयांच्या तो पलीकडे जातो; कारण तो शुद्ध स्वरूपांतच राहतो. तो कुणाचा भोक्ता नाही वा कुणी त्याचे भोज्य नाही; कारण तो एकमेवाद्वितीय असतो. ४९-६०

# योगाची फलश्रुति.

हा धारणा-ध्यान-समाधिरूप योग जन्ममरणरूपी संसारांतून मुक्त करतो. योगाग्नीने चित्तांतील रागद्वेषादि मल जळून जातो आणि जीव आपल्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त होतो. आत्मरूपाशी झालेले हे ऐक्य कशानेही भंगत नाही.

**परेण ब्रह्मणा तद्वत्प्राप्यैक्यं दग्धकल्मषः।**
**योगी याति पृथग्भावं न कदाचिन्महीपते।।**
**यथा जले जलेनैक्यं निक्षिप्तमुपगच्छति।**
**तथात्मा साम्यमभ्येति योगिनः परमात्मनि।।** मा.पुराण ४०:४०४१।।

स्वतः ब्रह्मरूपांत स्थित होऊन तो आपल्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करतो. समुद्राला मिळणारे लहान-मोठे जलस्रोत जसे समुद्राशीच एकरूप होतात किंवा घटा-मठांच्या भंगानंतर घटाकाश, मठाकाश जसे महाकाशाशी एकरूप होतात तसाच ब्रह्माशी समरसलेला जीवात्मा ब्रह्मरूपच होतो. यासाठी भगवंतानी योग्याला तपस्वी, ज्ञानी आणि कर्मिष्ठ यांच्यापेक्षा योग्याला श्रेष्ठ ठरवून अर्जुनाला योगा व्हायला सांगितले आहे.

**तपस्विभ्योऽप्यधिको योगी ज्ञानिभ्योऽप्यधिको मतः।**
**कर्मिभ्योऽप्यधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन।।** भ.गीता ६:४६।।

असा हा योग संसाररूपी अरण्याला दावानलासारखा भस्मसात करून टाकतो. हा त्याचा द्वैत नाहीसे करणारा प्रभाव जाणून, हे अलर्का, त्याचेच अनुष्ठान क्षद्धापूर्वक कर. ६०-६७.

हे योगाचे उत्कृष्ट फळ जाणून त्या मार्गावर स्थिर राहून सुखपूर्वक वाटचाल करण्यासाठी अलर्काने दत्तप्रभूंना योग्याची जीवनपद्धती (योगिचर्या) कशी असावी असा प्रश्न केला. (भगवान योगिनश्चर्यां श्रोतुमिच्छामि तत्त्वतः। ब्रह्मवर्त्मन्यनुसरन् यथा योगी न सीदति।। मा.पुराण ४१:१।।) यावर प्रभूनी अलर्काला योगिचर्येचे निरूपण केले. चित्ताला उद्विग्नता न येतां ते प्रसन्न रहावे, त्याला स्थिरता यावी तसेच शरीरालाही स्वास्थ्य लाभावे अशी योगाच्या सिद्धीला पोषक जीवनपद्धती सांगितली.

सर्वांत प्रथम त्यांनी मानापमानाविषयीं सूचना दिली आहे. सर्वसाधारण लोक मान मिळाला कीं प्रसन्न होतात आणि मान करणाऱ्याविषयी प्रीती ठेवतात. याउलट अपमानाने चिडतात, उद्विग्न होतात आणि अपमान करणाऱ्याचा तिरस्कार करतात. म्हणजेच अज्ञानी सांसारिक लोकांना मान अमृतासारखा प्रिय वाटतो तर अपमान विषासारखा त्याज्य वाटतो. योग्याने याच्या अगदी उलट विचार केला पाहिजे. मान विषासारखा टाळला पाहिजे आणि अपमानाला मात्र अमृताप्रमाणे सामोरे जावे. अन्यथा मानाच्या आसक्तीने बंधनांत पडावे लागेल.

**मानापमानौ यावेतौ तावेवाहुर्विषामृते। अपमानोऽमृतं तत्र मानस्तु विषमं विषम्।।**
मा.पुराण ४१:३।। ६७-७७.

# शुद्धीकरण.

**दृक्पूतं विन्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलं। शास्त्रपूतं वदेद्वाक्यं चित्तपूतं च चिंतयेत्।।** ७८।।

डोळ्यांनी मार्गाची शुद्धता निश्चित करून पाय पुढे टाकावा. मार्गांत किडे, मुंग्यादि जीव आपल्या पायांखाली येऊन हिंसा घडूं नये याची काळजी घ्यावी असाही दृषिटिपूतं पदं न्यसेत् याचा अर्थ होतो. वस्त्राने गाळून पाणी प्यावे हे स्पष्टच आहे. शास्त्राने पडताळून बोलावे. आपले बोलणे शास्त्राला धरून

आहे की नाही ह्याचा विचार करूनच बोलावे. चित्ताला शुद्ध करील असेच ध्यान करावे. किंवा सारासार विवेकाने विचार करावा. मार्कंडेयपुराणांत 'सत्यपूतं वदेद्वाणीं बुद्धिपूतं च चिन्तयेत्।।४१:४।।' असे म्हटले आहे. विषयांच्या चिंतनांत मनांत राग (आसक्ति), द्वेष इत्यादींचा प्रादुर्भाव होऊन गढूळ होते. साहजिकच ते संसारबंधनात जखडायला कारणीभूत होते. ईश्वराच्या ध्यानाने मात्र तेच चित्त शुद्ध आणि स्थिर राहते. ७८-८०.

## भिक्षा.

यानंतर योग्यासाठी भिक्षा कुठे घ्यावी याचे नियम सांगितले आहे. सर्वसंगपरित्याग केलेल्या योग्यासाठी भिक्षावृत्तीच सर्वश्रेष्ठ मानलेली आहे. विशेषतः ब्रह्मचारी आणि संन्यासी यांना पक्वान्नभिक्षुक, रांधलेल्या अन्नाच्या भिक्षेवर निर्वाह करणारा असे म्हटले आहे.' **यतिश्च ब्रह्मचारी च पक्वान्नस्वामिनावुभौ**' असे पराशर स्मृतीत (१:४६) म्हटले आहे. यांखेरीज वाटसरू, ज्याचे चरितार्थाचे साधन नष्ट झाले आहे, विद्यार्थी आणि गुरूचे पोषण करणारा असे आणखी चार भिक्षुक शास्त्रसंमत आहेत.

अध्वगः क्षीणवृत्तिश्च विद्यार्थी गुरुपोषकः। ब्रह्मचारी यतिश्चैव षट् पक्वान्नस्य भिक्षुका ।।

**भिक्षाहारी निराहारी भिक्षा नैव प्रतिग्रहः। भिक्षाहारी प्रकुरुते सोमपानं दिने दिने।।** असे स्मृतीवचन आहे. यासाठीच भगवान शंकरांनीही भिक्षावृत्तीच स्वीकारली आहे.

भिक्षा अर्थातच गृहस्थाच्या घरी करायची असेत. (**यथा मातरमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः। वर्तन्ते गृहिणस्तद्वदाश्रित्येतर आश्रमाः**). अतिथिसत्कार हे गृहस्थाश्रमाचे परम कर्तव्य आहे. या ठिकाणी दत्तप्रभू भिक्षा मागायला जातांना भिक्षूने कसे वागावे ते सांगत आहेत. आधी न ठरवितां तीन, पांच वा सात घरी अन्नाची भिक्षा मागणे आणि जे मिळेल त्यांत संतुष्ट असणे याला माधुकरी म्हणतात. **(मनःसङ्कल्परहितान्गृहांस्त्रीन्पञ्च सप्त वा। सन्तोषपूर्वं भिक्षेत स्मृतं माधुकरं तु तत्**'). जे लोक आपल्याविषयी आत्मीयता दाखवतात त्यांच्याकडेच न जाता वेगवेगळ्या घरीं भिक्षा घ्यावी. ज्या घरी श्राद्ध असेल, गृहिणी रजस्वला असेल त्या घरी भिक्षेला जाऊं नये. जिथे यज्ञादि उत्सवाच्या पंक्ति बसलेल्या असतील तिथे भिक्षा घेऊं नये. ज्या घरी पुत्रजन्म झाला असेल तिथे एक महिना, मुलगी झाली असेल त्या घरी चाळीस दिवस, पित्याचा मृत्यूनंतर वर्षभर, आईच्या मृत्यूनंतर सहा महिने, तीन पिढ्यांतील पुरुष मेल्यावर तीन महिने, गोत्रजाच्या मृत्यूनंतर एर महिना, मुंज, विवाह किंवा गर्भाधान या समारंभानंतर सोळा दिवस आणि नांदीश्राद्धानंतर एक दिवस ते घर भिक्षेला वर्ज्य आहे.

गांवांतील चुलींचा धूर थांबला, त्यांतील अग्नि शांत झाला, लोकांची जंवणे झाली की भिक्षेला निघावे. अधिक वा रुचकर अन्नाचा विचार न करतां, मानापनाकडे दुर्लक्ष करून, मध्ये घर न सोडतां किंवा उलटसुलट न फिरतां एका दिशेनेच जाऊन तीन वा पांच घरी भिक्षा करावी. तीन घरांतूनच पुरेशी भिक्षा मिळाल्यास थांबावे. जास्तीची भिक्षा चोरी होते. अधिकांत अधिक सात घरीच भिक्षा मागावी. भिक्षा मागतांना मित व हळू बोलावे. आपले कौतुक करू नये. छिद्रांतून पाहू नये. भिक्षा घेऊन पुढे गेल्यावर परत फिरू नये. त्याच घरी रोज भिक्षेला जाऊं नये. ८१-९५.

जो ब्राह्मण भिक्षा मागून अग्निहोत्र करतो त्याच्या घरची भिक्षा पवित्र असते. पंच महायज्ञांचे अनुष्ठान ज्या घरांत होत नाही तेथील भिक्षा अपवित्र मानली आहे. कोरान्न भिक्षेवर गुजराण करणारा, इंद्रियांवर ताबा असलेल्या ब्राह्मणाची भिक्षा प्रशस्त मानली आहे. याव्यतिरिक्त जे वैदिक

आचारसंपन्न ब्राह्मणांची भिक्षा मध्यम जाणावी. इतरांची भिक्षा अधमांतच गणली गेली आहे. भिक्षेत तांदूळ, जव (गहूं), कंद, मूळ, पिकलेली फळे, दूध आणि ताक असे सात्त्विक पदार्थच घ्यावेत. दिवसांतून एकच वेळ भिक्षा आणून, देवाला नैवेद्य दाखवून चवीकडे लक्ष न देतां औषधासारखी सेवन करावी.

**लब्धाग्रभिक्षातुर्यांशं ब्रह्मादिभ्यः समर्प्य च।**
**निवेद्य विष्णवे शिष्टं तदद्यादौषधोपमम्।।** दत्तपुराण ८:८:५५)

भूक या व्याधीच्या परिहारासाठी हे आपण औषध घेत आहों अशी भावना असावी. (**क्षुद्व्याधिचिकित्स्यताम् भिक्षान्नं भुज्यताम्।**). पोट अर्धे भरेल एवढेच अन्न घ्यावे, उरलेल्यातील अर्धे पाण्याने भरून पाव एक चतुर्थांश पोट रिकामे ठेवावे. हे सर्वांनाच हितकारक आहे. प्राणरक्षणासाठीच जेवावे. दिवसांतून एक वेळ दुपारी आणलेल्या भिक्षेतून रात्रीसाठी किंवा दुसऱ्या दिवशी खाण्यासाठी शिल्लक ठेवूं नये. ९६-१०४.

## आधी केले मग सांगितले.

श्रीस्वामामहाराजांनी हे सर्व नियम जन्मभर पाळून लिहिलेले आहेत. आसोतुहिमाचल संचार करतांनाही त्यांनी दक्षिणी ब्राह्मणांखेरीज कुणाची भिक्षा घेतली नाही. त्यांतही ते पंचमहायज्ञ करणारे असतील तर! यामुळे त्यांना सलग दीड-दोन महिनेही खारीक, खोबरे इत्यादि कोरड्या भिक्षेवर काढावे लागले आहेत. भिक्षेला जातांना कोणी नमस्कार केला की त्या दिवशी उपास. पेलाभर ताक तेवढे घेत. वरील पद्धतीने तीन, पांच किंवा क्वचित प्रेमाग्रहामुळे सात घरची भिक्षा घेतल्यावर ती नदीच्या पाण्यात बुचकळून टांगून ठेवीत. म्हणजे मग रुचीचा कांही संबंधच रहात नसे. मग ती भिक्षेची झोळी गोमयलिप्त शुद्ध भुमीवर ठेवून तिचे तीन भाग करीत. एक देवाला व एक नदीला अर्पण करून तिसरा भाग फक्त सेवन करायचा. 'अष्टौ ग्रासा यतेर्भोज्याः।' या वचनानुसार आठ घांसाचेच त्यांचे जेवण असे. ज्वारीची भाकरी, भात, ताक, लिंबू आणि मीठ हेच पदार्थ सर्वसाधारणतः घेत. साखरेला तर ते शिवतही नसत. भिक्षा दिवसांतून एकच वेळ घ्यायची. असे सर्व नियम अवघ्या शंभर-सवाशे वर्षापूर्वी त्यांनी आचरून दाखविले म्हणूनच ते आचार्य पदवीला प्राप्त झाले.

## नियम.

श्रीदत्तप्रभूंनी योगाचे निरूपण आसन-प्राणायामापासूनच सांगितले आहे. आतां योगचर्येचा भाग म्हणून नियम सांगितले आहेत. अहिंसा, त्याग, अहिंसा, शांति, अस्तेय, गुरुसेवन, शौच, मिताहार, नम्रता आणि स्वाध्याय हे नियम सांगितले आहेत. स्वाध्याय म्हणजे शास्त्रांचा अभ्यास. शास्त्रे वाचतांना त्यांतील सार ग्रहण करावे. फार शास्त्राचे वाचनही योगाभ्यासाला विक्षेप ठरूं शकते. यासाठी तात्पर्याकडे लक्ष ठेवून वाचावे. हे जाणून घ्यावे, ते जाणून घ्यावे अशी तृष्णा नसावी. सर्व विद्या शिकायला आकल्प आयुष्यही कमीच पडेल. त्यासाठी आत्यंतिक जिज्ञासाही योगांत विघ्न होते हे ध्यानांत ठेवावे.

**अस्तेयं ब्रह्मचर्यं च त्यागो हिंसादिवर्जनम्।**
**अक्रोधो गुरुशुश्रूषा शौचमाहारलाघवम्।।**
**स्वाध्यायाभ्यास इत्येते नियमा योगसिद्धिदाः।**
**सारभूतमुपादेयं शास्त्रेष्वेषु बहुष्वपि।।**
**इदं ज्ञेयमिदं ज्ञेयमितीच्छंस्तृषितश्चरेत्।**

**कल्पेऽपि नाप्नुयात्पारं तत्त्यजेद्विघ्नकारणम्।।** दत्तपुराण ५:६:२६-२८।।

याप्रमाणे श्रीदत्तप्रभूंनी अलर्काला योग्याची जीवनचर्या कशी असावी ते सांगितले. हिचा अवलंब करणाऱ्या योग्याचे ध्यान लवकर सिद्ध होते.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चौतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला.
तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ३५ वा.

**सांगे परम योगसाधन। अनाहताचें अनुसंधान। करावया स्थिर मन। प्रणवध्यान सांगे दत्त।।७२।।**
**नृपोदंत सांगे विशद। साडेतीन मात्रांचा भेद। क्रममुक्तिपद। पस्तिसाव्या अध्यायीं।।७३।।**

वेदधर्मा मुनि संदीपकाला श्रीदत्तप्रभूंनी अलर्काला केलेला उपदेश सांगत आहेत. मागच्या अध्यायांत योगाभ्यासी साधकाची जीवनपद्धती सांगतली आहे. तोच विषय पुढे चालविला आहे. अशा जीवनचर्येचा अवलंब केलेल्या योग्याने जिथे मनुष्य, श्वापदे अथवा नैसर्गिक उपद्रवांपासून मुक्त, वर्दळीपासून दूर, एकांताची, जवळ पाणी असेल अशी जागा योगाभ्यासासाठी शोधावी. एखादी गुहा, गांवाबाहेरचे देऊळ किंवा ओसाड घर अशा जागा त्यांनी सुचविल्या आहेत. ही सर्व जीवनचर्या सर्वसंगपरित्यागी योग्यासाठी सांगितली आहे. त्याला अनुलक्षून आतां संन्याशाच्या वेषाचा महत्त्वाचा घटक जो दंड त्याविषयीं सांगत आहेत. संन्याशांनी बांबूचा दंड धारण करायचा असतो. इथे श्रीस्वामी महाराज आंतरिक दंडांचे महत्त्व सांगत आहेत योग हा मनाचा दंड, मौन हा वाचेचा दंड आणि निरिच्छता हा देहाचा दंड हेच खरे दंड आहेत. असाच संन्यासी खरा त्रिदंडी होय. वाशाचा दंड घेणारे पण वरीलप्रमाणे काया-वाचा-मनाचे दंड नसणारे, राग-द्वेषादि वृत्तींनी व्यापलेले ढोंगी आणि लबाड संन्यासी समजावेत. त्याचे तोंडसुद्धा पाहू नये. १-५.

## ज्ञान्याची लक्षणे.

आतां ब्रह्मज्ञानी पुरुषाची लक्षणे सांगत आहेत. ही श्रीमद्भगवद्गीतेत सांगितलेल्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणाशी जुळणारी आहेत. ज्याच्या मनांतून सर्व भेदभाव गेलेले आहेत, ज्याच्या मनाला कधीच खिन्नता येत नाही आणि जो कशाचीच रुची घेत नाही तो निःसंशय ब्रह्मज्ञानी जाणावा. 'हे विश्वचि माझे घर' या उक्तीप्रमाणे तो सर्व ठिकाणी स्वतःला पाहतो, सर्वांशीच आपुलकी ठेवतो. साहजिकच त्याला कुणी शत्रु नाहीत, कुणी मित्र नाहीत, सुहृद नाहीत, मध्यस्थ नाहीत, उदासीन नाहीत, बन्धु नाहीत.

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु।**
**साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशेष्यते।।** भ.गीता ६:९।।

अशी सगळ्यांविषयी अभेदबुद्धी असल्यावेर त्याचे कोणी आवडते नसते की नावडते. आत्मौपम्य दृष्टीने सर्वांकडे पाहिल्याने त्याची दृष्टी सम असते.

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।**
**शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः।।** भ.गीता ५:१८।।.

सुख वा दुःख, प्रिय वा अप्रिय निंदा वा स्तुति तसेच सोने, दगड आणि लांकूड ह्या सर्वांनाच सारखे मानणाराच खरा योगी जाणावा.

**समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः।**
**तुल्यप्रियाप्रियौ धीरस्तुल्यनिन्दात्मसंस्तुति।।** भ.गीता १४:२४।। ६-१०.

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

चार वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ आहे; पण त्याहून वेदपठण करणारा ब्राह्मण अधिक श्रेष्ठ आहे. त्याच्या सेवेने लोक पावन होतात. वेदपाठक ब्राह्मणापेक्षांही जप करणारा, जापकाहून यज्ञ करणारा, याज्ञिकाहून वेदांचे ज्ञान असलेला ब्राह्मण उत्तरोत्तर श्रेष्ठ होत. गरुडपुराणांत (धर्मकांड – प्रेतखंड १२:११) म्हटले आहे की

**भूतानां प्राणिनः श्रेष्ठास्तेभ्यो बुद्ध्युपजीविनः।**
**बुद्धिमत्सु नराः श्रेष्ठाः नरेषु ब्राह्मणाः स्मृताः।।**
**ब्राह्मणेषु च विद्वांसो विद्वत्सु कृतबुद्धयः।**

जीवमात्रांत प्राणी श्रेष्ठ, प्राण्यांत बुद्धिजीवी श्रेष्ठ, बुद्धिमानांत माणूस श्रेष्ठ आणि माणसांत ब्राह्मण श्रेष्ठ आहेत. ब्राह्मणांत विद्वान श्रेष्ठ आहेत आणि त्यापेक्षांही परमार्थ हेच जीवनाचे साध्य आहे असा निश्चय करणारा (कृतबुद्धि) श्रेष्ठ आहे. हेच थोडे

वेदज्ञ ब्राह्मणाहून ध्यान करणारा श्रेष्ठ आहे. ध्यानयोग्यापेक्षांही आत्मानुभवी ब्राह्मण श्रेष्ठ आहे. सर्वांत श्रेष्ठ निर्विकल्पसमाधीत स्थिरावलेला ब्राह्मण आहे. तोच ईश्वराला प्रियतम असा त्याचा भक्त असतो. इतर जे वैदिक, याज्ञिक इत्यादि ब्राह्मण आहेत ते कितीही श्रेष्ठ असले तर जर अद्वितीय आत्मस्वरूपाची ओळख नसेल तर तो शोक-मोहांनी ग्रासला जातोच. चारी वेद जाणले पण जर सूक्ष्म परब्रह्माची प्राप्ती झाली नाही तर वेदाचे व्यर्थ ओझे वाहणारा ब्राह्मणाच्या रूपांत तो गाढवच जाणावा.

**वेदाच्छ्रेष्ठा मखास्तेभ्यो जपं ज्ञानं ततस्ततः।।**
**ध्यानं ततोऽप्यनुभवो यं लब्ध्वा नावसीदति।।** दत्तपुराण ५:६:३४।। ११-१६.

# पराङ्मुखी मुद्रा.

ध्यानशीलतेचे हे महत्त्व अलर्काच्या मनावर बिंबवून दत्तप्रभू त्याला सतत ध्यानमग्न राहण्याचा उपदेश करीत आहेत. ध्यानाचा अभ्यास सोपा करण्यासाठी ते आतां एक साधन सांगत आहेत. सर्वसंगपरित्याग केल्यावर काम-क्रोधादिकांवर नियंत्रण ठेवून हे साधन करायचे आहे. दोन्ही अंगठे दोन्ही कानांत घालून ते बंद करायचे, दोन्ही तर्जनींनी डोळे झांकायचे, मधल्या बोटांनी नाकपुड्या बंद करायच्या आणि उरलेल्या चार बोटांनी तोंड दाबून घरावे.

**अंगुष्ठाभ्यामुभौ कर्णौ तर्जनीभां च चक्षुषी ।**
**नासापुटौ तथाऽन्याभ्यां प्रच्छाद्य करणानि च ।।**

ह्या मुद्रेला पराङ्मुखी मुद्रा असे नांव आहे. ह्या मुद्रेत बसून उजव्या कांनांत येणाऱ्या आंतरिक आवाजांकडे लक्ष द्यायचे असते. श्वास कोंडून घाबरल्यासारखे झाले तर डाव्या नाकपुडीने हळूंहळूं श्वास सोडावा व पुन्हां घेऊन कुंभक करावा. त्यानंतर तो उजव्या नाकपुडीने सोडून परत घ्यावा. हीच क्रिया वरचेवर करीत रहात उजव्या कांनातील नादांवर मन स्थिर करावे. स्थूल नादांकडे लक्ष न देतां ते सूक्ष्म नादांवर केंद्रित करावे. या अभ्यासाने समुद्राचा गाज, मेघांचा गडगडाट, धबधब्याचा गरज, गाडीचा खडखडाट, ज्वालांचा चट चट आवाज, भेरी, ढोल, दुंदुभी, मृदंग, शंख, घंटा, टाळ, झांजा, वीणा, बांसरी, भुंग्याचा गुंजारव इत्यादि अनेक प्रकारचे अनाहत नाद आपल्या अंतरांत ऐकायला येतात.

**आदौ जलधि-जीमूत-भेरी झर्झरसंभवाः। मध्ये मर्दल शंखोत्था घण्टाकाहलजास्तथा।।**
**अन्ते तु किङ्किणी वंशी, वीणा भ्रमर निस्वनाः। इति नानाविधा नादाः श्रूयन्ते देहमध्यगाः।।**

(हठयोगप्रदीपिका ४:८४-८५ )

# नादानुसंधान.

यांतील दहा नाद प्रमुख मानले आहेत. हे चिण्, चिण्चिण, घण्टा, शंख, वीणा, टाळ, बांसरी, मृदंग, भेरी आणि मेघ यांचे आहेत. ह्या नादांच्या श्रवणाचे शरीर-मनावर खोलवर संवेदना होऊन मन त्या नादांत विलीन होऊं लागते. हे नाद उत्तरोत्तर सूक्ष्म आणि श्रेष्ठ आहेत. हंसोपनिषदानुसार अंतरांत चिण् नाद उठला कीं अंगात झिणझिण्या येतात, चिञ्चिण नांदाने अवयव विदीर्ण झाल्यासारखी संवेदना होते, घंटा नादाने अंगाला घाम फुटतो, शंखनादाने मस्तक कांपायला लागते, पांचव्या वीणानादाने टाळूंतील सहस्रार चक्रांतून अमृतस्राव होऊं लागतो, टाळेच्या नागाने अमृतपानाचा अनुभव येतो, बांसरीचा आवाज ऐकणाऱ्याला गूढ विषयांचे ज्ञान होऊं लागते, आठव्या मृदंगनादाने वाक्सिद्धी प्राप्त होते, नववा भेरीचा नाद प्रकटल्यावर योग्याचा देह दिव्य होतो आणि नेत्र स्वच्छ होतात आणि दहावा मेघनादाने साधकाचे परब्रह्माशी ऐक्य होते. पहिले नऊ नाद सोडून साधकाने दहाव्या मेघनादांत मन लीन करावे. ह्या नादबिंदूपनिषदांत ह्या नादाला ॐकार असेही म्हटले आहे.

अशा नादानुसंधानांत चित्त लीन झाले की उन्मनी अवस्था प्राप्त होते व योग्याची समाधि लागते. भगवान शंकारांनी उपदेशिलेल्या चित्ताच्या लयाच्या सवा लक्ष साधनांत नादानुसंधानाने लागणारी समाधि ही श्रीमच्छंकराचार्यांनी सर्वश्रेष्ठ मानली आहे.

**सदाशिवोक्तानि सपादलक्षलयावधानानि वसन्ति लोके।**

**नादानुसंधानसमाधिमेकं मन्यामहे मान्यतमं लयानाम्।।**

**नादानुसंधान नमोस्तु तुभ्यं त्वां साधनं तत्त्वपदस्य जाने।**

**भवत्प्रसादात्पवनेन साकं विलीयते विष्णुपदे मनो मे।।** योगतारावली २, ४।।

ही समाधि सिद्ध झालेल्या योग्याचे मन सतत प्रसन्न राहते आणि परमेश्वराचा अनन्य भक्त होतो. तो अवध्य होतो. तो सर्व भौतिक बंधनांपासून पूर्ण मुक्त होतो. गुरुकृपेने ही ह्या मुक्तीच्या चरमावस्थेला प्राप्त झाल्यावर तिथून त्याला खाली आणण्याची कलिकाळालाही प्राज्ञा नसते. १७-२६.

# विश्वरूपाचे वर्णन.

अलर्काला निमित्त करून दत्तप्रभू ध्यानाचे विविध उपाय सांगत आहेत. त्यांतच हा नादानुसंधानाचा उपाय सांगितला आहे. व्यक्ति तितक्या प्रकृती या न्यायाने तोही मार्ग कठिण वाटला तर त्यासाठी आणखी सुगम साधन पुढे सांगत आहेत. ज्या साधकाचे पाप प्रबळ असते त्याचे मन स्थिर होत नाही. मन स्थिर होत नाही म्हणून त्याची तळमळ आणखीनच वाढते. अशा साधकाला विष्णूच्या विश्वरूपाचे ध्यान करायला सांगत आहेत. हजारो पाय, हजारो हात, हजारो शिरे, हजारो नेत्र असलेल्या त्या विराट रूपाने अवघे ब्रह्मांड पोटांत धारण केले आहे. सर्व प्रण्यांचे मस्तकादिक अवयव हे त्याचेच आहेत. त्रैलोक्य हे त्याचे शरीर आहे. अखंड आनंद आणि उदंड तेज त्याच्यांत सामावले आहे. त्याचे पायाचे तळवे अतल लोक, पायाचा वरचा भाग वितल, घोटे सुतल, पिंढऱ्या महातल, गुडघे तलातल, मांड्या रसातल आणि कंबर पाताल असा सप्तपातालांचे विष्णूंचे खालचे शरीर आहे. बेंबीशीं भूलोक, पोट हे भुवर्लोक, हृदय स्वर्लोक, कंठ महर्लोक, मुख जनलोक, भुंवया तपोलोक आणि मस्तक सत्यलोक असा त्या विश्वरूपाचा वरचा भाग आहे. जड वातावरण हा त्या विराज नामक देहाचा प्राण आहे तर पृथ्वी हा स्थूल देह आहे, ज्यांत चौदा भुवने सामावली आहेत. माया हे त्याचे हास्य आहे, मक्षत्रे दांत आहेत; त्याचे निमेषोन्मेष रात्र आणि दिवस आहेत; नद्या नाड्या आहेत; वृक्षादि वनस्पति त्याचे रोम आहेत; पाऊस हे त्याचे रेत आहे; पर्वत अस्थि आहेत;

वज्रधारी इंद्र त्याचा बलशाली हात आहे; त्रिनेत्र शंकर त्याचा कोप आहे; दिशा कान, त्वचा वायु, सूर्य नेत्र, जीभ वरुण आणि अश्विनीकुमार नासिका ही त्याची ज्ञानेंद्रियें आहेत अग्नि त्याची वाचा आहे, इंद्र हात, उपेंद्र पाय, निरृती गुद आणि प्रजापति लिंग अशी त्याची कर्मेंद्रियें आहेत. आतां विराट पुरुषाचा सूक्ष्म देह सांगतात. चंद्र त्याचे मन आहे; नारायण चित्त आहे; बुद्धि बृहस्पति आणि रुद्र हा अहंकार आहे. अशा ह्या विश्वमूर्तीचे ध्यान करावे. त्या ध्यानानेच मुक्तीचा महा सोहळा येतो. २७-४६.

## ॐकारोपासना.

अशा ह्या विश्वात्मकाचा वाचक म्हणजे बोधक ॐकार (प्रणव) आहे. (**तस्य वाचकः प्रणवः।** योगसूत्र १:२७). ॐकाराच्या जपाने आणि ध्यानाने ह्या विश्वव्यापी विश्वेश्वराचे दर्शन होते.

**दृष्ट्वा च परमात्मानं प्रत्यक्षं विश्वरूपिणं।**
**विश्वपादशिरोग्रीवं विश्वेशं विश्वभावनम्।।**
**तत्प्राप्तये महत्पुण्मोमित्येकाक्षरं जपेत्।** मार्कंडेयपुराण ४२:२-३।।

हा ॐर तीन अवयवांचा – ज्यांना मात्रा असे म्हणतात, मिळून होतो. अकार, उकार आणि मकार अशी तीनही मात्रा मनुष्याच्या स्थूल, सूक्ष्म आणि स्थूल अशा तीन देहांच्या, त्यांच्या आपापल्या तीन अवस्थांच्या (जागृति, स्वप्न, सुषुप्ति) आणि भूर्लोक, भुवर्लोक आणि स्वर्लोक या तीन लोकांच्या द्योतक आहेत.

ॐकार हा केवळ वेदमंत्रच नाही तर सर्व वेदांचे मूळ आहे. साहजिकच ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे त्याच्या तीन मात्रांशी संलग्न आहेत. सर्व वैदिक मंत्रांप्रमाणे ह्या मात्रांचेही ऋषि, छंद आणि देवता आहेत हे सर्व जाणून ॐकाराचा जप आणि ध्यान करावे असे दत्तप्रभू अलर्काला सांगत आहेत.

इथे एक नम्र सूचना वाचकांना करीवीशी वाटते. ॐकारोपासना ही अत्युच्च श्रेणीची वैदिक उपासना आहे. ह्या उपासनेचा अधिकार सर्वसंगपरित्याग विधिपूर्वक संन्यास घेतल्यावरच प्राप्त होतो. केवल ॐकाराचा जप हे संसाराचा नाश करणारे प्रभावी साधन आहे. गृहस्थांनी हा जप करूं नये असे सांगितले आहे. मुंज झालेल्या ब्राह्मणाला ॐकार.बीजाने युक्त अशा मंत्राचा (ॐ नमः शिवाय, ऩ नमो भगवते वासुदेवाय, हरि ॐ, ॐ राम इत्यादि) जप सद्गुरूंच्या आज्ञेने करायचा अधिकार आहे. स्त्रिया, ब्राह्मणेतरांना ॐकार जपाची शास्त्राची आज्ञा नाही. आध्यात्मिक संदर्भांत अधिकार ह्या शब्दाचा अर्थ इंग्रजीतील eligibility या शब्दाशी जुळणारा आहे. सत्ता किंवा हुकूमत असा अर्थ नाही. बारावी उत्तीर्ण झाल्याखेरीज वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी विद्यालयांत प्रवेशाचा अधिकार नाही तसाच संन्यासाशिवाय ॐकारजपाचा अधिकार येत नाही. संन्यासग्रहणाच्या वेळी गुरूकडून प्रणवाचा उपदेश मिळतो. यांत वेदमाउलीने सर्व जीवमात्रांच्या कल्याणाचाच विचार केला आहे. अनधिकार जपामुळे विपरीत परिणाम होऊं शकतात. विशेषतः प्रापंचिक माणसाने केवळ ॐकाराचा जप केला तर त्याच्या गृहस्थीचा नाश होऊं शकतो. शास्त्रे आणि पुराण यांतून अनेक साधनांचा उपदेश केलेला असतो. सर्व साधने सर्वांसाठीच उपयुक्त नसतात. प्रत्येकाने आपल्या सद्गुरूंच्या किंवा संतांच्या आज्ञेने आपल्याला योग्य असे साधन करावे. अशा रीतीने केलेले थोडे साधनही मृत्यूरूपी महाभयापासून सोडवूं शकते असे भगवद्वचन आहे. (**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्।** भ.गीता २:४०)

एकांतात स्थिर आसनावर बसून ॐकाराचा दीर्घ उच्चारपूर्वक जप करावा. वर सांगितलेल्या अकार, उकार आणि मकार या तीन मात्रांचा उच्चार होतो. याशिवाय जिचा उच्चार होत नाही अशी

अत्यंत सूक्ष्म मात्रा आहे. ॐ काराचा जप करणाऱ्या योग्यांनाचा ती आपल्या मस्तकांत मुंगीसारख्या सूक्ष्म गतीने फिरतांना अनुभवाला येते. ॐकाराचा ध्वनि जेव्हा मस्तकांत घुमतो तेव्हां ती गांधार स्वराने प्रस्फुटित होते. त्यामुळे तिला गांधारी असेही नांव आहे. ही योगम्य मात्रा जीवाला अत्यंत आराम देणारी आहे.

**त्रिगुणा योगिगम्यान्या चार्द्धमात्रोर्ध्वसंस्थिता। गांधारीति सा विज्ञेया गांधारस्वरसंश्रया।।**

**पिपीलिकागतिस्पर्शा प्रयुक्ता मूर्ध्नि लक्ष्यते। यथा प्रयुक्त ओंकारः प्रतिनिर्याति मूर्धनि।।**

**मार्कंडेयपुराण ४२ः५-६**

या साडेतीन मात्रांचा ॐकार रोज तीन वेळां मोठ्याने उच्चार करावा. सुरुवातीला तो साडेतीन मात्रा इतका दीर्घ असावा. मात्रांचे प्रमाण असे आहे. मुंगुसाच्या आवाजाची अर्धी मात्रा असते. नीलकंठाचा स्वर एक मात्रेचा, कावळ्याचा दोन मात्रांचा आणि मोराचा तीन मात्रांचा स्वर हे प्रमाण लक्षांत ठेवून प्रथम साडेतीन मात्रांचा ॐकार लांबवीत तो आधई सात आणि मग चौदा मात्रा इतका प्रदीर्घ करावा. तेव्हां हा उच्चार मस्तकांत घुमायला लागतो. त्यापासून मस्तकाच्या आंत अत्यंत मधुर असा गांधार स्वरासारखा नाद उमटतो. त्याची गोडी जसजशी वाढेल तसतसे मनाच्या वृत्ती क्षीण होत जातात. ॐकाररूपी धनुष्याला उपासनेची धार लावलेला बाण नेटाने लावून त्याने अचूक ब्रह्म ह्या लक्ष्याचा वेध घ्यावा. बंदुकीचा चाप ओढतांना शिकाऱ्याचे चित्त जसे आपल्या लक्ष्यावर एकाग्र होते, किंचितही त्यापासून ढळत नाही तसे प्रणवावर आरूढलेले मन ब्रह्मावर स्थिर करावे. ते थोडेसुद्धा विचलित झाले तर विक्षेपांनी ग्रस्त होईल आणि दारुण दुःख पावेल. मन ध्येयापासून विचलित होण्याला प्रमाद हे नांव आहे. मन प्रमत्त होऊं नये यासाठीच उपासना आहे. सावधानतेने आपले मन परमात्मतत्त्वावर स्थिर करणाराच अंती समाधान पावून जन्ममरणाचे फेरे चुकवतो.

**धनुर्गृहीत्वौपनिषदं महास्त्रं शरं ह्युपासानिशितं सन्दधीत।**

**आयम्य तद्भावगतेन चेतसा लक्ष्यं तदेवाक्षतं सोम्य विद्धि ।।**

**प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्मतल्लक्ष्यमुच्यते । अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत्तन्मयो भवेत् ।।**

मुंडकोपनिषत् २ः२ः४ ४५-६०.

यानंतर ॐकाराच्या साडेतीन मात्रांचे वर्णन आले आहे. ते सोबतच्या तालिकेत दाखविले आहे. या सर्वांची जाणीव ठेवून प्रणवाचे ध्यान करणाऱ्यांना शीघ्र मोक्षलाभ होतो. मानवशरीराच्या तीन स्थूल, सूक्ष्म आणि कारण या देहांचा विचार आपण बाराव्या अध्यायात पाहिला आहे. त्यांच्या अवस्था, वाचा, भोग आणि अभिमानी (आत्मा) यांच्यासह हे तीन देह ॐकाराच्या तीन मात्रांशी संलग्न आहेत. हा जीव म्हणजेच व्यष्टि. त्याचप्रमाणे समष्टीचेही स्थूल देह (विराज), सूक्ष्म देह (हिरण्यगर्भ किंवा सूत्रात्मा) आणि कारणदेह (अक्षर) आहेत. ॐकाराच्या तीन मात्राशी हे समष्टीचे देहही संलग्न आहेत हे जाणून त्या दोन्हीत समानता कल्पावी. व्यष्टीला व्यस्त किंवा पिंड म्हणतात आणि समष्टीला समस्त किंवा ब्रह्मांड असे म्हणतात. पिंडी ते ब्रह्मांडी हा लक्ष्यार्थानुसार ह्या दोहोंच्या अखंडस्वरूपाचे ध्यान ॐकारोपासनेत अनुस्यूत आहे. ६१-८१.

ॐकाराच्या मात्रांचे कांही विशेष पुढे अधिक स्पष्ट केले आहेत पहिली ऱ्हस्व मात्रा व्यक्त आहे, दुसरी दीर्घ मात्रा अव्यक्त आहे तर तिसरी प्लुत मात्रा चिच्छक्ति जाणावी. अगोचर अर्धमात्रा परब्रह्मस्वरूपच आहे.

**व्यक्तेयं प्रथमा मात्रा द्वितीयाऽव्यक्तसंज्ञिता।**

**मात्रा तृतीया चिच्छक्तिरर्धमात्रा परं पदम्।। दत्तपुराण५ः६ः६१।।**

ह्याच क्रमाने ज्ञानाच्या भूमिकाही जाणाव्यात. पहिल्या मात्रेची चौथी ब्रह्मविद्, दुसऱ्या मात्रेची ब्रह्मविद्वर, तिसऱ्या मात्रेची ब्रह्मविद्वरीयान् आणि चौथ्या भूमिकेची ब्रह्मविद्वरिष्ठ.

**अनेनैव क्रमेणैता विज्ञेया योगभूमयः।।**
**ओमित्युच्चारणेनैव जेतव्या आररुरुक्षुणा।। दत्तपुराण५:६:६२।।**

## प्रणवोपासनेची फलश्रुति.

प्रणवाचा जप करीत, मात्रांचे चिंतन करीत परब्रह्माचे ध्यान करावे. ॐ हे एक अक्षरच ब्रह्म आहे (**ओमित्येकाक्षरं ब्रह्म।**) असे श्रुतींचे प्रतिपादन आहे. प्रणव हे परब्रह्माचे नांव असे जरी मानले तरी नाम आणि नामी यांच्यात अभेदच असतो. यासाठी प्रणवोपासना सर्वश्रेष्ठ मानली आहे. मृत्यूची लक्षणे जाणून मृत्यूसमयीं स्वरूपाचे चिंतन करीत ॐकारोपासना करणारा योगी परब्रह्मांत लीन होतो. मृत्यू निकट असतां जर आपले मन ब्रह्मांत लीन होत नसेल तर केवळ वैखरी वाणीने ॐकाराचा जप करणाराही मुक्त होतो. सद्गुरू आणि इष्टदेवता यांच्या कृपाप्रसादाने प्रणवोपासना करून याचि देहीं याचि डोळां मुक्तीचा सोहळा पहावा. हे जर साधले नाहीच तर प्रणवोपासकाला क्रममुक्ती तर निश्चितच मिळते. क्रममुक्ती म्हणजे ब्रह्मलोकाची प्राप्ती होणे आणि मग ब्रह्मदेवाबरोबरच मुक्त होणे. परत मनुष्यजन्माला यावे लागत नाही. ८२-९०.

## अप्पा निगडीकरांची गोष्ट.

अंतकाली प्रणवाचा वैखरीने केलेल्या जपानेसुद्धां अज्ञानी साधकही संसारबंधनांतून मुक्त होतो या वरील औपनिषद सिद्धांताचे एक उत्तम उदाहरण श्रीस्वामी महाराजांच्या जीवनांतच सांपडते. ब्रह्मावर्त येथे १९०२च्या प्लेगच्या साथीत श्रीस्वामीमहाराजांबरोबर असलेल्या अप्पा निगडीकर नांवाच्या ब्राह्मणाला प्लेग होणार असे श्रीमहाराजांना “सांगणे” झाले. त्यावर त्यांनी अप्पांना मृत्यूची लक्षणे सांगून ठेवली. अप्पांना ती लक्षणे दिसायला लागतांच त्यांनी महाराजांजवळ आपली आतुर संन्यास घेण्याची इच्छा प्रकट केली. स्वामीमहाराजांनी त्याला संन्यास देऊन प्रेषोच्चार (प्रणवाचा उपदेश) करवून घेतला. त्यावेळी ॐकाराचा दीर्घ जप करीत असतांच अप्पांचे देहावसान झाले. ह्या वृत्ताच्या पत्रांत श्रीमहाराजांनी “हे मरण योग्यांनासुद्धां दुर्मिळ!” असे लिहिले आहे.

## क्रममुक्ती.

प्रणवोपासनेचा अभ्यास पूर्ण झालेला साधक (सिद्धयोगी) तर जन्मसंसारबंधनांतून मुक्त होतोच; शरीरपातानंतर त्याचे प्राण इतरत्र कुठेही न जातां (उत्क्रमण न होता) आत्मस्वरूपांतच विलीन होतात. तापलेल्या पाषाणावर पडलेले पाणी जसे जागच्या जागीच जिरून जाते तसे त्याचे स्वरूपांतच विरून जातात. पण ज्याची संचित कर्मे अजून संपलेली नाहीत असा साधकही त्याचा उपासनामार्ग न सुटतां प्रणवोपासनेने जन्मांतरी मुक्त होतो.

**अक्षीणकर्मबन्धोऽपि तारोपास्त्या भवान्तरे।**
**मुच्यते नात्र संदेहस्तारशक्तेर्यतोऽमृतम्।।** दत्तपुराण ५:७:८।।

अशा साधकांना सुषुम्णामार्ग मिळतो आणि ते ब्रह्मलोकाला जातात. ॐकारोपासनेतील त्याच्या प्रगतीनुसार त्याला पुढची गति मिळते. प्रणवाच्या प्रथम मात्रेचे (अकार) ध्यान झालेल्या योग्याला मृत्यूनंतर ऋग्वेद पुनश्च नरजन्मात ब्राह्मणकुळात आणतो तिथे ब्रह्मचर्य धारण करून तपश्चर्या करून ज्ञानी होतो. दोन मात्रांचं ध्यान झालेल्या योग्याला यजुर्वेद सोमलोकांत नेतो. तिथे दिव्य सुखांचा

उपभोग घेऊन पुन्हा भूलोकांत जन्म घेऊन ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त होतो. प्रणवाच्या तीन मात्रांचे ध्यान झालेल्या साधकाला सामवेद सूर्यलोकाला नेतो. तिथे सर्व पापांचा क्षय करून तो ब्रह्मलोकाला जातो आणि तिथे ध्यानाभ्यास करून मुक्त होतो. जगद्रूपी कार्याच्या पलीकडचा, प्रकृतीच्या बाहेरचा परमपुरुष जो निर्विकार, जन्ममरणरहित परमात्मा त्याच्या रूपांत तो प्रणवोपासक नामरूपांना ओलांडून समरसतो. त्याला शोक आणि मोह यांची वार्तासुद्धां नसते. साडेतीन मात्रांचे – म्हणजेच समस्त ॐकाराचे ध्यान झालेला योगी हा वर सांगितल्याप्रमाणे कुठे जात नाही वा येत नाही. तो परिच्छेदरहित, व्यापक परमात्म्याशी एकत्व पावतो. बा अलर्का! हे सर्व ज्ञान तुला प्रत्यक्ष प्रणवोपासना केल्यानेच, अनुभवानेच जाणतां येईल. .

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पस्तिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.



# ॐकाराच्या साडेतीन मात्रा.

| | अकार | उकार | मकार | अर्धमात्रा | नाद |
|---|---|---|---|---|---|
| ऋषि | अग्नि | वायु | सूर्य | वरुण | ब्रह्मा |
| देवता | ब्रह्मा | विष्णु | रुद्र | परमात्मा | परब्रह्म |
| छंद | गायत्री | त्रिष्टुप् | जगती | विराट् | अव्यक्त गायत्री |
| वर्ण | पीत | लोहित | श्वेत | अखिल | |
| बीज | क्लीं | श्रीं | ह्रीं | क्रों | |
| शक्ति | क्रिया | ज्ञान | द्रव्य | विज्ञान | चिच्छक्ति |
| अवस्था | जागृति | स्वप्न | सुषुप्ति | तुर्या | मनोन्मनी |
| लोक | भूः | भुवः | स्वः | भूर्भुवःस्वः | चिदाकाश |
| स्वर | उदात्त | अनुदात्त | स्वरितः | सर्व | |
| वेद | ऋग्वेद | यजुर्वेद | सामवेद | नाद | |
| आत्मा | विश्व | तैजस | प्राज्ञ | प्रत्यक् | अस्मितालय |
| गुण | रज | सत्त्व | तम | सर्व | |
| तत्त्व | पृथ्वी | आकाश | द्यौः | तीनही | |
| सवन | प्रातः | माध्यंदिन | तृतीय | तीनही | |
| अग्नि | गार्ह्यपत्य | दक्षिणाग्नि | आहवनीय | सांवर्तक | |
| भोग | स्थूल | प्रविविक्त | आनंद | निरतिशयानंद | |
| स्थान | नेत्र | कंठ | हृदय | मूर्धा | आकाश |
| वाचा | वैखरी | मध्यमा | पश्यन्ति | परा | |
| देह | स्थूल | सूक्ष्म | कारण | महाकारण | स्वात्मैक्यावस्थिति |

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

### अध्याय ३६ वा.

**भूपास सांगे दत्त। मृत्युज्ञान वर्षाचे आंत। योगी लावावया चित्त। शीघ्र विरत व्हावया।।७४।।**
**सर्वदा योग करितां। मध्येंच मृत्यु येतां। म्हणे ये क्रममुक्तता। छत्तिसाव्यांत श्रीदत्त।।७५।।**

वेदधर्मा संदीपकाला पुढे सांगतात. अलर्काला श्रीदत्तप्रभूंनी केलेला उपदेश हा केवळ त्याच्या वैयक्तिक कल्याणासाठी नव्हता, तर सर्व मानवजातीच्या परमकल्याणासाठी होता. या उपदेशामृतांत न्हाऊन धन्य झालेल्या अलर्काने सद्गुरुनाथांना वंदन करून प्रसन्न चित्ताने प्रर्थना केली. “कृपासागरा, चित्तचकोरचंद्रा, संतशिरोमणि प्रभो! तुला वारंवार नमस्कार असो. करुणेचा वर्षाव करणाऱ्या मेघा, आपल्या या बोधाने माझ्या मनांत असे कांही समाधान भरून राहिले आहे की त्यांत वासनेचा उद्भव व्हायला कांही वावच उरला नाही! मन निर्वासन झाले आहे. आपण असा उपदेश केला की मृत्यूची वेळ ओळखून त्या वेळी प्रणवाचा उच्चार करून देहाचा त्याग करावा. पण मृत्यू तर अचानक येतो असाच सर्व लोकांचा अनुभव आहे. त्याचा काळ कसा जाणतां येईल ते आपण मला सांगावे. म्हणजे मग त्यानुसार उपाय करतां येईल. ” ते ऐकून अत्रिपुत्र दत्तात्रेयांनी सांगायला आरंभ केला. १-७.

मृत्यूचे पूर्वज्ञान होण्यासाठी पहिला उपाय ज्योषशास्त्रीय आहे. आपल्या लग्नापासून दुसरे, तिसरे, सातवे आणि आठवे ह्या स्थानांना मारक असे म्हणतात. ह्या स्थानांचे जे अधिपती त्या त्या स्थानांत असतील त्यांच्यात जो सर्वांत बलिष्ठ असेल त्याच्या दशेच्या अंतीं मृत्यू येतो असे ज्योतिषशास्राचे मत आहे. किंवा मारकाबरोबर दुष्ट आणि घातक ग्रह असेल तो मरण दाखवितो. योगाभ्यासी साधकांना धारणेने आपला अंतकाळ समजतो. ९-१२.

ज्याला ज्योतिष किंवा योग या दोन्हींचे ज्ञान नाही त्याच्यासाठी पुढील लक्षणें सांगितली आहेत. ह्यांनाच अरिष्टे किंवा अपशकुन असे म्हणतां येईल. ही सोबतच्या तालिकेत दिली आहेत. १३-६१.

## मरणाची वेळ कळाल्यावरचे कर्तव्य.

ही लक्षणे विवेकाने पडताळून पहावीत. योगाभ्यासी पुरुषांना आपला अंतकाळ जाणण्यासाठी ही लक्षणे दिलेली आहेत. विशेषतः स्वप्नांतर्गत लक्षणांचा अर्थ लावतांना, स्वप्नाची वेळ, ज्याला स्वप्न पडले त्याची शारीरिक व मानसिक स्थिति इत्यादि अनेक संदर्भांचा विचार करावा लागतो. ते एक स्वतंत्र शास्त्रच आहे. आपल्या मृत्यूची वेळ आपल्याला आधी कळणे हे खरे तर ईश्वरी कृपेचे लक्षण आहे. त्यामुळे ही लक्षणे सर्वांच्याच अनुभवाला येतील असे नाही. क्वचितच कुणाला अंतकाळ कळतो. त्यामुळे ही लक्षणे समजली तर घाबरून जाऊं नये. ह्या भूलोकाला मृत्युलोक असेच नांव आहे. इथे जन्माला येणारा प्रत्येक जीव मृत्यू पावतोच. संतशिरोमणि ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे, “**अगा मर हा बोल न साहती। आणि मेलिया तरी रडती। परि असतें जात न गणिती। गहिंसपणे।।** ज्ञानेश्वरी९:५१३।।” रोजच्या रोज माणसे काळाचा ग्रास होत असतात पण राहणारे मात्र आपण कधीच मरणार नाही अशा थाटांत जगत असतात हेच जगांतले सर्वांत मोठे आश्चर्य आहे असे युधिष्ठिराने यक्षाच्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. समर्थ रामदास म्हणतात, “**मरे एक त्याचा दुजा शोक वाहे।**

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

**अकस्मात तोही पुढे जात आहे।।**” असा व्यर्थ शोक करण्यापेक्षां किंवा मरणाला घाबरण्यापेक्षां आपले उरलेले आयुष्य कसे कारणी लावतां येईल याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. गरुडपुराणात म्हटले आहे की दुराचारी स्त्री पतीच्या पुत्रप्रेमाला हंसते त्याप्रमाणे शरीर राखणाऱ्याला मृत्यू हंसत असतो. जे शरीर आपले नाहीच त्याचा सांभाळ किती करणार? काळ आला की तो बाल. युवा, वृद्ध, सुखी, दुःखी, शहाणा, मूर्ख असा कांही विचार न करतां घेऊन जातो.

**कालो भ्रूणाञ्छिशून्यूनो वृद्धानार्तान्सुखस्थितान् । मूढान् ग्रसत्यपि प्राज्ञान्निःशेषानमरानपि ।।३५।।**

यासाठी मरणाचे भय सोडून अंतकालपर्यंत मन ध्यानात लावावे.

**सोऽप्यासन्नमृतिर्ह्येवं मृत्यलक्ष्माणि वीक्ष्य सन्।**

**त्यक्त्वा भयं सदा योगं युञ्जीत मरणावधि।। दत्तपुराण५:७:४३।।**

ब्रह्मसूत्रकारांनी सांगितल्याप्रमाणे हे ध्यान मृत्यूपर्यंत करायचे आहे. (**आप्रायणात् तत्र हि दृष्टम्। ४:१:१२**) श्रीमद्भगवद्गीतेच्या वचनानुसार शरीर सोडतांना मन एकाग्र करून, भक्तियुक्त चित्ताने आणि योगाच्या सामर्थ्याने भ्रूमध्यांत (आज्ञा चक्रांत) प्राण सुस्थिर करून तो (योगी) त्या परमपुरुषाला पावतो.

**प्रयाणकाले मनसाऽचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव।**

**भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं पुरुषमुपैति दिव्यम्।।भ.गीता ८:१०।।**

कर्माचा प्रतिबंध नसेल तर तो योगी तिथेच मुक्त होतो. प्रारब्ध शेष असेल तर तो खचितच जन्मांतरी मुक्त होतो.ध्यानाचा अभ्यास कधीच व्यर्थ जात नाही हा वेदांचा सिद्धांत आहे आणि भगवंताचे अभिवचन आहे.

**न हि कल्याणकृत् कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति।। ६:४०।।**

या भगवद्वचनावर दृढ श्रद्धा ठेवून रात्रंदिवस योगाभ्यास करावा.

**सोऽप्यासन्नमृतिर्ह्येवं मृत्यलक्ष्माणि वीक्ष्य सन्।।**

**त्यक्त्वा भयं सदा योगं युञ्जीत मरणावधि।। दत्तपुराण ५:७:४३।।**

मार्कंडेय पुराणांत (४३:४१-४३)दिवसाच्या वा रात्रीच्या ज्या प्रहरांत वर सांगितलेल्यांतील अरिष्ट पाहिले असेल, त्याच वेळी मृत्यूच्या निर्दिष्ट दिवसापर्यंत अभ्यास करावा असे सांगितले आहे. असा साधक जरी दैवयोगाने ज्ञानप्राप्तीपूर्वीच मरण पावला तर त्याला गीतेत सांगितलेली योगभ्रष्टाची गति मिळते. अश्वमेधादि यज्ञ करणाऱ्यांना मिळणारे लोक प्राप्त होतात. तिथे जाऊन तो दीर्घ कालपर्यंत सुखांचा भोग घेतो आणि परत शुद्ध आचरणाने पुनीत आणि श्रीमंत अशा घरांत जन्म घेतो. किंवा योग्याच्याच कुळांत जन्मतो. तिथे त्याच्या पूर्वीच्या अभ्यासाचे संस्कार त्याला पुढच्या अभ्यासाकडे खेचून नेतात आणि तो पुनश्च सिद्धीसाठी प्रयत्नशील होतो श्रीगुरु-ईशकृपेने आत्मज्ञान संपादून जीवन्मुक्त होतो. ६२-७४.

## अंतकाळाला कसे सामोरे जावे.

वरील अरिष्टांवरून जाणलेली मृत्यूची वेळ आली कीं योग्याने मांडी घालून स्थिर बसावे. डावा पाय गुदद्वाराच्या वर शिवणावर दाबून धरावा व उजवा पाय त्याच्यावर ठेवावा. हे **सिद्धासन** होते. गुदद्वाराचे आकुंचन करून अपानवायू पुनःपुनः वर खेंचावा. ही **मूलबंधा**ची क्रिया आहे. मग हनुवटी छातीला टेंकवून (**जालंधर बंध**) कान, डोळे, नाकपुड्या आणि मुख ही सात छिद्रे दोन्ही हातांच्या बोटांनी बंद करावीत. या पराङ्मुखी मुद्रेचे वर्णन नादानुसंधानांत केले आहे. मन एकाग्र करून इंद्रियांचा मनांत आणि मनाचा प्राणांत लय करावा. पंचप्राण एकवटून सुषुम्णेत चढवावा. धैर्याने

सहाही चक्रे भेदून प्राण मस्तकांत न्यावा. मग ॐकाराचा दीर्घ उच्चार करीत आणि त्याचा वाच्य जो परमात्मा त्याचे चिंतन करीत टाळूचा भेद करून शरीराचा त्याग करावा आणि मुक्ती प्राप्त करून घ्यावी. संत तुकाराम महाराजांच्या **याचसाठी केला होता अट्टाहास। शेवटचा दीस गोड व्हावा।।** या उक्तीची प्रचीती येते आणि मुक्ती नांवाच्या नोवरीशी लग्न लागते.

रात्री अंधारांत उठून बाहेर जातांना दार दिसत नाही किंवा भलत्याच ठिकाणी त्याचा भ्रम होतो. पण उजेड असेल तर दार चटदिशी दिसेल व बाहेर पडणे सोपे होईल. असेच इथे आहे. नित्य योगाच्या अभ्यासाने जो सुषुम्णा मार्ग उजळतो त्याला मृत्यूच्या वेळीही तिच्यांत प्रवेश करणे सहज होईल. हृदयांतून जाणाऱ्या एकशे एक नाड्यांपैकी एकच नाडी टाळूचा भेद करून बाहेर जाते. तिच्याद्वारांच मोक्ष मिळतो. इतर नाड्यातून प्राण गेला तर पुनर्जन्म घ्यावा लागतो असे कठोपनिषदांत (२:१६) सांगितले आहे. यासाठी आळस सोडून नियमाने योगाचा अभ्यास केला पाहिजे. प्राण सुषुम्णेत चढवायचा अभ्यास केला पाहिजे. प्राणाचा सुषुम्णेत प्रवेश म्हणजे कुंडलिनीचे जागरण. ते करावयाचा सर्वांत सोपा आणि शास्त्रमान्य उपाय म्हणजे संत-सद्गुरूंची कृपा होय. ७५-८३.

प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराज हे अवतारी पुरुष होते. त्यामुळे जीवन्मुक्ताची सर्व लक्षणे त्यांच्या ठायीं प्रतीत होत होती. त्यांनी आपुले 'मरण आपुलिया डोळां' पाहिले होते. तरी पण आपल्या लीलादेहाचा त्याग करतांना त्यांनी लोकांना मृत्यूला कसे सामोरे जावे याचा वस्तुतपाठच जणुं दिला. श्रीस्वामी महाराजांना आपला देह केव्हा सोडायचा आहे याची पूर्ण कल्पना पूर्वीपासूनच होती. त्याप्रमाणे त्यांनी अनेक भक्तांना तशा पूर्वसूचनाही दिल्या होत्या. त्याच्या देहपाताचा नियत दिन ज्येष्ठ वद्य अष्टमी (इ.स. १९१४) हा होता. पण त्यांना तो दिवस टाळायचा होता. अशक्तपणामुळे त्यांना उठणेही अशक्य होते; पण दुसऱ्यांच्या साह्याने ते उठून बसले. तीन तास समाधि अवस्थेत बसल्यावर देहावर आले. त्यावेळी निर्याणाची वेळ टळल्याचे सर्वांना सांगितले. अमावस्येच्या दिवशी सकाळीच सर्वांना सांगितले की आज "अमावास्या संपतांच या स्थूल देहाचा त्याग करायचा आहे." त्याप्रमाणे रात्री अकराच्या सुमारास प्रतिपदा संपल्यावर उठून सिद्धासन घालून देवाभिमुख होऊन बसले. देवाकडे पाहून त्राटक केले, श्वासाचा निरोध केला आणि दीर्घ प्रणवाचा उच्चार करीत देहाचे विसर्जन केले आणि परमात्मस्वरूपांत लीन झाले.

याप्रमाणे अलर्काला योगाचे सर्वकष निरूपण केल्यावर त्यापासून ब्रह्मप्राप्ती कशी करून घ्यावी दत्तप्रभूंनी याचे दिग्दर्शन करणारा त्या सर्वांचा साररूप असा बोध शेवटी त्याला केला.

**एतत्सर्वं समाख्यातं तवालर्क यथार्थवत्।**
**प्राप्स्यसे येन तद्ब्रह्म संक्षेपात्तन्निबोध मे।। मा.पुराण ४३:४७।।**

चंद्रकांत नांवाचा मणी चांदण्यात धरला तर द्रवतो आणि सूर्यकांत (बहिर्गोल भिंग) सूर्याच्या किरणांत धरला तर अग्नि निर्माण करतो. त्या मण्यांत असलेले हे सुप्त सामर्थ्य जागविण्यासाठी जशी चंद्राची किंवा सूर्याची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे मानवांतील देव जागवायचा असेल तर योगसिद्धीची नितांत आवश्यकता. त्याशिवाय माणसाचे हे महान सामर्थ्य सुप्तच राहील. यासाठी निरलसपणे योगाचा अभ्यास करणे हे मानवमात्राचे कर्तव्य आहे.

**सूर्यचन्द्रकरावेशात्तत्कान्तौ वह्निवारिणी। शीघ्रं जनयतः सेयमुपमा योगसिद्धये।।४५।।**

# संसारांतील आसक्तीचा त्याग.

योगाभ्यासांत सर्वांत मोठा अडसर असतो घरदार, स्त्रीपुत्र इत्यादिकांचा. त्यासाठी त्यांनी घरांत वसणारे मुंग्या, किडे, उंदीर, पाली इत्यादी प्राण्याचा दृष्टांत दिला आहे. घर सुस्थितींत असतांना हे सर्व हक्काने तिथे राहतात. हा विषय समर्थ रामदासस्वामींनी दासबोधात (१:६:३४-५०) सविस्तर मांडला आहे. किडे-मुग्या पाली-झुरळे इत्यादींपासून पशु, नोकर-चाकर, पाहुणे, मित्र, कुटुंबीयच काय चोर आणि राजकर्मीसुद्धा "म्हणती आमुचे घर",

**समस्त म्हणती घर माझे। हें मूर्खही म्हणे माझे माझे।**

**शेवटी जड झाले ओझे। टाकिला देश।। १:६: ४७।।**

ज्यांना आपण माझे-माझे म्हणतो तेसुद्धा आपले रहात नाहीत. अगदी तळहाताच्या फोडासारखा वाढवलेला मुलगा म्हातारपणी वृद्धाश्रमांत टाकतो. घरी ठेवले तरी 'हा एकदांचा मरत कां नाही?' अशा वृत्तीने पशुतुल्य वागणूक देतात. ही जगरहाटी सर्वत्र पाहण्यांत येते. सगळे सुखाचे वांटेकरी आहेत. वृद्धापकाळी वैऱ्यांसारखे निर्दय होतात. अंतकाळी तर त्यांचा कांहीच उपयोग नाही. सगळीं तथाकथित प्रेमाची माणसे शेंवटी जवळ असावीत ही समजूत घातक आहेत. ते सुखाने मरूं देणार नाहीत ही वस्तुस्थिति आहे. त्यासाठी ह्या सर्वांविषयींची आत्मीयता अभ्यासाने कमी केली पाहिजे. ८४-९०.

# योगाभ्यासात चिकाटीचे आणि सातत्याचे महत्त्व.

योगाभ्यास दीर्घकाल सातत्याने केल्यानेच सफल होतो. 'स तु दीर्घकालनैरन्तर्येण सत्कारा सेवितो दृढभूमिः' असे योगसूत्रकार म्हणतात. थोडा थोडा अभ्यास नेटाने करणे महत्त्वाचे आहे. अगदी बारीकशी वाळवी मुखाने मातीची रास करते त्याप्रमाणे अल्पच अभ्यास दीर्घकाळ चिकाटीने केल्यावर थेंबें थेंबे तळें साचे या न्यायाने माणूस परमात्मप्राप्तीच्या ध्येयाकडे निश्चितच अग्रसर होतो. योगाच्या मार्गांत विघ्नें बरींच येतात. पण त्यांनी खचून जाऊं नये. धान्याचा कण घेऊन भिंतीवर चढणाऱ्या मुंगीचा दृष्टांत यासाठी दत्तप्रभूंनी दिला आहे. किड्यानी कुरतडला करी वृक्ष जसा वाढतो तसा योगाभ्यास विघ्नांनाही पुरून उरतो हे लक्षांत ठेवून उत्साहाने नित्य अभ्यास चालूं ठेवावा. योगाभ्यासाचे फळ एकदम दिसणार नाही. पण नियमित वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्याला योगाची सिद्धी मिळतेच मिळते. वासराची शिंगे जशी क्रमाक्रमाने वाढतात त्याप्रमाणे. ९०-९५.

जाग्रति, स्वप्न आणि सुषुप्ती या तीनही अवस्थांचा द्रष्टा, सर्व इंद्रियांचा नियंता अशा सच्चिदानंदघन आत्मस्वरूपाचे सतत ध्यान करावे म्हणजे ध्याता आत्मस्वरूप होतो. यासाठी पेशस्कार (कुंभारीण माशी) नांवाच्या भ्रमराची उपमा दिली आहे. ही माशी एक किडा आणून भिंतीवरच्या छिद्रांत ठेवते व त्याला वारंवार दंश करते. त्या योगे तिच्या भयाने तो किडा सतत तिचेच चिंतन करतो आणि परिणामी त्याच्या शरीराचे रूपांतर त्या भ्रमरांत होते. जीव तर मुळांतच ब्रह्म आहे. मग ब्रह्माचे ध्यान केल्याने तो ब्रह्मस्वरूप झाला तर त्यांत आश्चर्य काय? त्रिकाल ध्यानाभ्यास करणारा साधक संसाराचा ध्वंस करून परमेश्वर होतोच. हा अभ्यास वाढावा यासाठी ईश्वराची भक्ति करावी. ईश्वरभक्तीने योगांतील सर्व विघ्नांचा निरास होऊन योगी विनासायास योगसिद्धी मिळवतो. ९५-१००.

शरीर हे मोक्षाचे साधन आहे. ते आपल्याला पुण्याईच्या बळाने एक जन्मासाठी लाभले आहे. तसे ते परकेच आहे. शरीराची सर्व इंद्रिये हे रोजगारी मजूर मानावेत आणि मन या मुकादमाकडून त्याना साधनेत सक्रिय ठेवावे. मजूराहून मुकादमाला पगार जास्त असतो त्याप्रमाणे मन प्रसन्न

ठेवावे. त्यासाठी त्या मनाला नितांत आवडणाऱ्या माझ्या त्रैलोक्यसुंदर मूर्तीच्या ध्यानांत रमवावे. मग ते इंद्रियांच्या द्वारा आपले काम – योगसिद्धी, साधून देईल.

**अभ्यर्थितोऽपि तैः कार्यं करोति करणैर्यथा।**
**तथा बुद्ध्यादिभिर्योगी पारक्यैः साधयेत्परम्।।** मा.पुराण ४३:५८।। १०१ - १०६ .

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा छत्तीसावा अध्याय इथे पूर्ण झाला.
तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# मृत्यूची अरिष्टे (सूचक लक्षणे)

| मृत्यूचा काळ | लक्षण |
|---|---|
| एक वर्षात | नाकासमोर आपला हात मस्तकाकडे उभा धरला असतां तो अजिबात न दिसणे.<br>स्वतःच्या नाकाचा शेंडा, भुंवयांचा मध्य किंवा जिभेचे टोंक न दिसणे.<br>आकाशगंगा, शुक्र, ध्रुव किंवा अरुंधती ह्या चांदण्या न दिसणे. |
| अकरा महिन्यांत | सूर्याचे किरण न दिसणे. आणि अग्नीवर किरणांचा भास होणे. |
| दहा महिन्यांत | स्वप्नांत वा जागेपणी जो सोने, चांदी, मल, मूत्र ह्यांची वांति होणे. |
| नऊ महिन्यांत | जागेपणी भूतप्रेतांचे किंवा गंधर्वनगरीचे दर्शन होणे; सोनेरी वृक्ष दिसणे. |
| आठ महिन्यांत | शरीरप्रकृति अचानक पालटून रोड माणूस जाड होणे किंवा जाड रोड होणे. |
| सात महिन्यांत | धुळीत, भस्मात वा चिखलांत चालतांना पाऊन अर्धवटच उमटणे; टांच किंवा पंजाच उमटणे. |
| सहा महिन्यांत | गिधाड, कावळा, कवडा, दिवाभीत किंवा अन्य मांसभक्षी पक्ष्याचा डोक्याला स्पर्श होणे. |
| पांच महिन्यांत | अंगावर वस्त्रे नसतांना कावळ्याने डोक्यावर चोंच मारणे. |
| चार महिन्यात | आपली सांवली विरूप दिसून भय वाटणे. |
| तीन महिन्यांत | दक्षिण दिशेकडील आकाश निरभ्र असूनही जर वीज चमकलेली दिसणे.<br>पाण्यात इंद्रधनुष्य दिसणे. |
| दोन महिन्यांत | पाण्यात किंवा आरशांत आपल्या प्रतिबिंबाला डोके न दिसणे. |
| पंधरवड्यात | अंगाला प्रेतासारखी किंवा दारूसारखी दुर्गंधी येणे.<br>पाणी पीत असतांनाच टाळू कोरडी पडणे. |
| दहा दिवसांत | स्नान करतांनाच छाती कोरडी होणे; वाऱ्याच्या झोक्याने मर्मस्थानांत चिरल्यासारखे वाटणे; चांदणे उष्ण वाटणे. |
| अगदी निकट | लाल किंवा काळे वस्त्र नेसलेल्या स्त्रीने हंसत किंवा गात दक्षिणेकडे घेऊन जाणे; स्वप्नांत नागडा जैन मुनि हंसताना दिसणे; स्वप्नांत तेलाने माखलेल्या पुरुषाचे दर्शन; स्वप्नांत निखारे, भस्म, केस, हाडे, क्रुद्ध सर्प किंवा शुष्क, चिरा पडलेली जमीन दिसणे. भयानक, विकट, काळा पुरुष येऊन त्याने दांत खात, त्वेषाने शस्त्रांनी किंवा पाषाणाने मारणे; सूर्योदयाचे वेळी खोकड (भालू) समोर येऊन भुकणे किंवा त्याने डावी घालणे; जेवल्याजेवल्या भूक लागणे आणि दांत करकर चावले जाणे; अग्नीचा व धुराचा वास न समजणे; समोरच्याच्या डोळ्यांत आपले प्रतिबिंब न दिसणे; रात्रीं इंद्रधनुष्य किंवा दिवसा चांदण्या दिसणे; |
| व्याधिग्रस्ताचा मृत्यू लवकरच गांठणार अशी चिह्ने. | डाव्या डोळ्यांतून पाणी वाहणे; नाकाचा शेंडा वाकडा होणे; कानाच्या पाळ्या थंड गार पडणे; जिभेचे टोक काळे होणे; गाढव अथवा उंटाच्या वाहनांत बसून दक्षिँ दिशेला जात असल्याचे स्वप्न पडणे; स्वप्नांत लोकांनी बांधून किंवा ओढून नेणे; कान घट्ट बंद केल्यावर येणारा आवाज बंद होणे; बंद डोळ्यांवर बोट दाबल्यावर दिसणारा प्रकाश न दिसणे; भ्रांति होऊन डोळे उलटे होणे; बेंबी पोटांत जाणे; भुतांनी आपल्याला मारल्याचे स्वप्नांत दिसणे; स्वप्नांत आपण पाण्यांत. आगींत किंवा चिखलांत सांपडल्याचे दिसणे आणि तिथून बाहेर न येणे. पूर्वी ज्यांच्याशी नम्रपणे वागत असे त्यांच्याबरोबर अचानक उद्धटपणे वागून पूज्य व्यक्तींची निंदा करणे. |

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

### अध्याय ३७ वा.

नृप परमानंद पावून। करी दत्तगुरूचें स्तवन। बंधूचे उपकार मानून। भक्तिरस प्रगटवी।।७६।।
अदृश्य रूपाहून। सगुण अधिक मानून। अलर्क करी स्तवन। हें कथन सदतिसाव्यांत।।७७।।

## वंदनभक्ति

वेदधर्मा संदीपकाला म्हणाले, "साक्षात् दत्तप्रभूंच्या मुखांतून हा सगळा उपदेश ऐकत असतांना राजाचे मन आनंदाने भरून गेले. त्याचे अष्ट सात्त्विक भाव उमलले. तो मदालसानंदन अलर्क गहिंवरल्या कंठाने सद्गुरूंना म्हणाला, 'दयासागरा आपण माझ्या चित्तांत ज्ञानसूर्याचा उदय करून मला संसारसागरांतून वर काढले आहे! मला आनंदांत निमग्न केले आहे!! केवळ एका नमस्काराच्या मोबदल्यांत प्रसन्न होऊन माझे दुःख होत्याचे नव्हते केले आणि मला आत्मज्ञानासारखा दुर्लभ ठेवा दिला. ह्या वंदनभक्तीचे हे अपूर्व फळ अनुभवल्यावर आतां हिची कांस आयुष्यभर सोडूंच नये असे मला वाटते. देव, गुरु आणि वेदांत यांचे आजीवन सेवन केले पाहिजे. आधी मोक्षप्राप्तीसाठी आणि नंतर कृतज्ञता म्हणून. कारण ज्यांच्या सेवनाने हा दुर्लभ मोक्ष लाभला त्यांना विसरल्याने कृतघ्नतेचे पाप लागेल. ज्ञानी माणसाला हे सर्व जग परमेश्वरस्वरूपच दिसते. *इदं सत् एव* म्हणजे हे सर्व विश्व सच्चिदानंदरूप परमात्माच आहे. त्याच्याहून वेगळे असे कांहीच नाही. असा प्रत्यक्ष अनुभवच त्या ज्ञानी पुरुषाला सतत येत असल्याने तो जीवमात्रांना नमस्कारच करतो.'" संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायांत या नमनभक्तीचे सुंदर वर्णन केले आहे:-

**आदि ब्रह्मा करूनी। शेंवटीं मशक धरूनी। माजी समस्त हे जाणोनी। स्वरूप माझे।।२२१।। मग वाड धाकुटे न म्हणती। सजीव निर्जीव नेणती। देखिलिए वस्तू उजूं लुंटिती। मीचि म्हणोनि।।२२२।। आपुले उत्तमत्व नाठवे। पुढील योग्यायोग्य नेणवे। एकसरे व्यक्तिमात्राचेनि नांवे। नमूंचि आवडे।।२२३।।** १-८

## गुरु या मंत्राचे श्रेष्ठत्व.

अलर्क आपला हा भाव व्यक्त करीत पुढे म्हणतो, हा सर्वव्यापी ईश्वरच सद्गुरुरूपाने भेटतो. गुरु शब्दांतील रुकाराचा अर्थ आहे अविद्या. रु म्हणजे तिचा नाश करणारा अशी गुरु शब्दाची व्युत्पत्ती आहे. खालील श्रीगुरुगीतेतील श्लोकांचा हाच अभिप्राय आहे. गुकार म्हणजे अज्ञानरूपी अंधःकार आणि रुकार म्हणजे त्यांचा निरास करणारे तेज म्हणजेच गुरु. किंवा गुकार हा भवरोग हा रु त्याचा निरोध करणारा वैद्य गुणातीतांतील गुकार आणि रूपातीतांतील रुकार यांनी मिळून झालेला गुरु शब्द गुणरूपातीत परब्रह्माचा प्रापक आहे. गुकारांने मायेच्या गुणांचा भास होतो तर रुकार मायारूपी भ्रमाचा निरास करणारे आत्मतत्त्व आहे. निर्गुण आणि निराकार परमात्म्याचा बोधक असा हा गुरु शब्द आहे.

**गुकारश्चान्धकारो हि रुकारस्तेज उच्यते ।**

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

**अज्ञानग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः ।। ४४।।**

**गुकारो भवरोगः स्यात् रुकारस्तन्निरोधकृत् ।**
**भवरोगहरत्वाच्च गुरुरित्यभिधीयते ।। ४५।।**

**गुकारश्च गुणातीतो रूपातीतो रुकारकः ।**
**गुणरूपविहीनत्वात् गुरुरित्यभिधीयते ।। ४६।।**

**गुकारः प्रथमो वर्णो मायादिगुणभासकः।**
**रुकारोऽस्ति परं ब्रह्म मायाभ्रान्तिविमोचनम्।।४७।।**

**गुकारं च गुणातीतं रूकारं रूपवर्जितम्।**
**गुणातीतमरूपं च यो दद्यात् स गुरुः स्मृतः।।९१।।**

अलर्काने यानंतर गुरु ह्या आगमोक्त मंत्राचे स्पष्टीकरण केले आहे. ग हे गणेशबीज आहे तर र हे अग्नीचे बीज आहे. ह्या दोहोंना उ हे विष्णुबीज लावून गुरु हा दोन अक्षरी मंत्र मिळतो. त्याच्या अनुष्ठानाने चतुर्वर्ग म्हणजे चारही पुरुषार्थ सिद्ध होतात.

**गणेशवह्निसंयुक्तो विष्णुना च समन्वितः। वर्णद्वयात्मको मंत्रो चतुर्वर्गफलप्रदः।।**

या महामंत्राच्या अंगीकाराने आपण पवित्र झालो असून त्यामुळे आपल्या मनांत ऐहिक वा पारलौकिक अशा कोणत्याही वासना उरलेल्या नाहीत अशी ग्वाही अलर्काने दिली आहे. हा मंत्र श्रीगुरुचरित्राच्या दुसऱ्या अध्यायांत आला आहेत. कलीला पृथ्वीवर पाठवितांना ब्रह्मदेवांनी सद्गुरूंचे माहात्म्य समजावून सांगितले आहे आणि गुरुभक्ताला उपद्रव न करण्याची आज्ञा दिली आहे. ९-१४.

## अलर्काची कृतज्ञता.

अलर्क दत्तगुरूंना म्हणतो, "गुरुमहाराज! अंगावरच्या कातडीचे जोडे करून त्यांच्या पायांत घातले तरी हे ऋण फिटणे अशक्य आहे. हा आपला उपकार माझ्या अंगातच जिरून जावो. ह्या मनांत आपली स्मृति देहांतापर्यंत जागो हेच वारंवार मागणे आहे." हे अलर्काचे मागणे श्रीरामचंद्रप्रभूंनी मारुतिरायाला सांगितलेल्या वचनाची आठवण करून देते. ते म्हणतात, "हे तुझे उपकार माझ्या अंगातच जिरून जावोत. कारण माणूस संकटांत पडल्यावरच प्रत्युपकारासाठी योग्य होतो."

**मदङ्गे जीर्णतां यातु त्वयोपकृतं कपे।**
**नरः प्रत्युपकाराणामापत्स्वायाति पात्रताम्।।** उत्तरकांड ४०:२४।।

असे म्हणून अलर्काने वारंवार श्रीदत्तचरणी लोटांगणे घातली, आणि "मी धन्य झालो, मी धन्य झालो, केवळ वंदनानेच पावन झालो" असे म्हणूं लागला. यापुढे मी आयुष्यभर वंदनभक्तीच करीत राहीन.

**यद्भवान्वन्दनेनैव क्षणान्मामुद्दधार तत्।।**
**वर्ते वन्दनभक्त्या ते यावद्देहोऽत्र तिष्ठति।। दत्तपुराण ५:७:५२।।** १०-१७

# अलर्काची कृतकृत्यता.

धन्य माझी माता जिच्या पत्राने मला आपले चरण दाखविले आणि आपल्या देवदुर्लभ हस्ताचा माझ्या मस्तकी स्पर्श झाला. धन्य तो माझा भाऊ सुबाहू, माझे पशुतुल्य जीवन पाहून, माझ्यावरील करुणेने आपल्या अखंड आनंदरूप समाधीतून बाहेर येऊन माझ्यावर त्या अनुपम संताने माझ्या कल्याणासाठी प्रयत्न केले. त्याच्यासारख्या अलौकिक संताच्या वात्सल्यपूर्ण कृपाकटाक्षानेच मी कृतार्थ झालो. धन्य तो काशिराज ज्याने पूर्वीचा स्नेह सोडूनही मला राज्यभ्रष्ट करून हे माझ्या उद्धाराचे महान् कार्य घडविले. ते लुटलेले खजिने, ते नष्ट झालेले सैन्य, फितूर झालेले सरदार हे सर्व मला आतां माझे हितकर्ते वाटत आहेत. हा सर्व विनाश झाल्यानेच आईचा उपदेश आठवला आणि परमेश्वर आपल्य रूपाने भेटला." १५-२३

# ऐहिक समृद्धीची निंदा.

"खरोखर ऐहिक समृद्धी ही भगवंताच्या अवकृपेनेच मिळते असे वाटते. धन, कुटुंब, घर इत्यादिकांवर आलेले संकट हीच ईश्वरकृपा नाही का? तो संसाराला चिरा पाडीतच येतो असा संतांचा अनुभव आहे. सोन्यानाण्याची संपत्ती ही माणसाला माज आणते. त्याचे डोळे चढतात. ह्यांत काय आश्चर्य आहे? कनक म्हणजे सोने आणि कनक म्हणजेच धोतरा! धोत्र्याच्या सेवनाने उन्माद होतो हे सर्वश्रुत आहे. तसाच मी माझे राज्याच्या समृद्धीने उन्मत्त झालो आणि विषयसेवनांतच बुडून गेलो. त्या धुंदीत मी साधुसंतांनासुद्धां ओळखले नाही. ऋषिमुनींत मान्यता पावलेल्या माझ्या सख्खा भावाने वाटा मागीतला तेव्हां मी त्याला वाटा देणे तर दूरच पण मूर्खासारखी त्याचलाच दुरुत्तरे केली. त्या स्वानंदसम्राटाला खरोखर राज्याची काय पर्वा होती? केवळ निखल दयेपोटी त्याने हे दारिद्र्यरूपी अंजन माझ्या डोळ्यांत घातले आणि ज्ञानसूर्याचा प्रकाश मला दाखविला. खरोखरच माझी दयाळू माता धन्य आहे जिच्या कृपेने आपले चरण लाभले. ह्या चरणांचे धन्यत्व काय वर्णावे? ह्याच्या आश्रयामुळेच अज्ञानाचा अंधःकार निरसून जन्ममरणरूपी संसारांतून सुटका झाली.

**दिष्ट्या वो दर्शनं जातं दिष्ट्या विज्ञानमर्पितम्।।**

**कृतकृत्योऽस्म्यसंदेहो मातृभ्रातृभवद्दृशा।। दत्तपुराण ५ः७ः५६ ।। "**

शेंवटी अलर्काने शमदमादि दैवी संपत्ती आणि वैराग्य यांना दूर दवडणाऱ्या प्रपंचाविषयी वाट व्यक्त केला आणि घरादाराचा त्याग करून आत्मचिंतनासाठी वनांत जाण्याचा आपला निश्चय श्रीदत्तचरणी निवेदन केला. घरदाराचा संन्यास करणारा धीर पुरुष पुण्यकारक तीर्थांत न्हायल्यासारखा पावन होतो अशा अर्थाचे स्मृतिवचन आहे. त्याला विसरल्यास बुद्धी भ्रष्ट होऊन देवालाच विसरेल. २३-३७.

# ज्ञानोत्तर भक्ति.

हा अलर्काचा निर्धार ऐकून समाधानाने दत्तप्रभू म्हणाले, "अलर्का! तू आधी तुझा मोठा भाऊ सुबाहू याला जाऊन त्याचे पाय धरून कृतज्ञता व्यक्त कर. हे सर्व त्यच्याच परिश्रमाचे फलित आहे. तूं आतां कृतकृत्य झाल आहेस. तुला आतां मी आणि माझे हे मुळीच शिवणार नाही. बाह्य स्थिती तूं तुला आवडेल तशी ठेव. आत्मा असंग आहे आणि सर्व बाह्य जगत हे इंद्रजालासारखे मायिक (भासमात्र) आहे हे एकदां मनांत बिंबले की मग वासनातरंग उठणारच नाहीत. श्लोकाचा अन्वय – **आत्मा असंगः ततः अन्यत् तु मायिकं इन्द्रजालं स्यात् इति अचंचल निर्णीते मनसि वासना कुतो**

**भवति?** हे तुला झालेले ज्ञान वेदांच्या शब्दप्रमाणाने झाले आहे. यालाच आप्तवाक्य असेही म्हणतात. ह्या ज्ञानाला बाध आणील असे दुसरे कोणतेच प्रमाण त्रैलोक्यांत नाही. एकदां ताक घुसळून काढलेले लोणी जसे पुन्हां त्यांत मिसळत नाही तसेच एकदां प्रकट झालेले ज्ञानही कधीच मावळत नाही. त्यामुळे तुला आतां कोणतेही नियम असे नाहीत ‘जैसी स्थिति आहे तैशापरी राहे। कौतुक तूं पाहे संचिताचे’तुझ्या मनात जशी इच्छा उठेल तसे वागल्याने तुझे कांहीच अनिष्ट होऊं शकत नाही. तुला अधःपाताचे किंवा पुन्हां मायेच्या मोहांत सांपडण्याचे भय आतां उरले नाही. पाप वा पुण्य हे तुला स्पर्शूं शकत नाहीत. (नेदों लागों पाप-पुण्य अंगा।। संत तुकाराम) ”.असे आश्वासक देऊन श्रीदत्तप्रभूंनी त्या मदालसापुत्राला जवळ घेऊन आलिंगन दिले. जणू आलिंगनाच्या निमित्ताने त्यांनी उभयतांच्या ऐक्यावर शिक्कामोर्तब केले. त्या आलिंगनाने अलर्काला सात्त्विकाचे भरते आले. (**स्तम्भः स्वेदो ऽथ रोमाञ्च स्वरभङ्गोऽथ वेपथुः। वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्त्विकाः स्मृताः।।** स्तब्धता किंवा ताटस्थ, घाम, रोमांच, गद्गद वाचा, कंप, चेहढयाचा आणि शरीराचा रंग पालटणे, अश्रुपात आणि मूर्छा हे आठ सात्त्विक भाव जाणावेत.)) अंगावर रोमाच उभे राहिले, कंठ ,सद्गदित झाला आणि डोळ्यांतून पाण्याच्या धाका वाहूं लागल्या. राजा एकदम निस्तब्ध झाला, देहभान हरपला, मनाच्याही क्रिया थांबल्या आणि तो सुखाच्या डोहांत डुंबूं लागला. त्या सुखाला सीमाच नाही. योग्यांनासुद्धा दुर्लभ असणारी केवळ प्रेमळ भक्तांनाच अनुभवतां येते. कोट्यवधी जन्मांचे पुण्य फळाला आले तरच तो भक्त होतो. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी असे भक्तांच्या चार श्रेणी भगवंतांनी गीतेत वर्णिल्या आहेत. (**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन। आर्त जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरर्षभ।।** ७:१६।।) “त्यांपैकी आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी ह्या तिघांपेक्षां ज्ञानी हा सर्वश्रेष्ठ आहे. तो अनन्यभावाने सतत माझी भक्ति करतो. त्याचे माझ्यावर नितांत प्रेम असते तसेच माझेही त्याच्यावर अपार प्रेम असते. (**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते। प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं च स च मे प्रियः।।** ७:१७ ।।” ईश्वरप्रेमात निमग्न झालेल्या भक्ताला सायुज्य मुक्तीही नको असते. संत ज्ञानेश्वरही (ज्ञानेश्वरी ९:९१) म्हणतात, “**यया भक्तीची येतुली प्राप्ति। जे कैवल्याते परते सर म्हणती।**” अशा ह्या भक्ताला भगवंतांनी आपला आत्माच म्हटले आहे.( ७:१८) ३८-५०.

ज्ञानी भक्त भगवंताशी एकरूप झाल्याने नित्य मुक्त असतो. हीच खरी सर्वश्रेष्ठ मुक्तीची अवस्था आहे. ‘रसो वै सः’ (तैत्तिरीय उ. २.७.१) ह्या वेदवाणीचे मर्म तोच जाणतो कारण ह्या भक्तिप्रेमरसाच्या आनंदांत तो सतत निमग्न झालेला असतो. त्याचा परिपूर्ण आस्वाद तोच स्वच्छंदी भक्त अनुभवतो. स्वयं सच्चिदानंद स्वच्छंद परमात्मासुद्धां ह्या अपरिच्छिन्न आनंदाची चव चाखूं शकत नाही. म्हणून तर तो अवतार घेतो आणि सर्व अभिमान सोडून भक्तांच्या भावाला भुलून त्यांच्याजवळ सादर राहतो. नाथांच्या घरी पाणी भरतो, जनीला दळूं लागतो, राजसूय यज्ञांत उष्टी काढतो. भक्तांशिवाय त्याला करमतच नाही. तेवढ्यासाठी सर्व लाज सोडून तो त्यांच्या अधीन होऊन राहतो. अशी ही अनन्य, परमप्रेमस्वरूप ज्ञानोत्तर भक्ति आहे. हिच्यावरून चारी मुक्ती ओंवाळून टाकाव्यात. धन्य तो अलर्क ज्याला ही थोर भक्ति अनायसें लाभली. त्याच्या दैवाचे कौतुक किती करावे? ५०-५७

## भगवंताचे ध्यान.

इथे श्रीस्वामी महाराजांचा भक्तिभाव उचंबळून आलेला दिसतो. अलर्काने पाहिलेले श्रीदत्तप्रभूंचे गोजिरें रूप त्यांच्या हृदयाकाशांत प्रकटले असल्यास नवल नाही. ह्यापुढील त्यांनी त्या मनमोहन

छबीचे हृद्य वर्णन केलेले आहे. हे वर्णन मुखावरील लोभस स्मितापासून पायांपर्यंत केलेले आहे. सगुण ध्यानांचे पायांपासून मुखापर्यंत किंवा मुखापासून पायांपर्यंत ध्यान करावे असे दोनही प्रकार विहित आहेत. या ठिकाणी दुसरा पर्याय महाराजांनी अवलंबिलेला आहे. सुमधुर हास्याने विलसणारे मुखकमळ, प्रेमाने स्निग्ध असणारे तेजस्वी चंचल नेत्र, शंखाच्या आकाराचा गळा, वर आणि अभय ह्या मुद्रांनी भक्ताला आश्वासन देणारे हात, सुचिह्नांनी मंडित असे रुंद कपाटासारखी छाती, पानासारखे नितळ पोट, खोल भोंवऱ्यासारखी बेंबी, केळीच्या बुंध्यासारख्या मांड्या आणि वज्र, अंकुश, ध्वजा आणि कमळ यांनी चिह्नित अनुपम रेखीव पाय. हे आंखीव रूप म्हणजे लावण्याची जणुं परिसीमाच होय. ५८-६१

## अलर्काची भावसमाधी.

वरवर पाहतां हे सर्व वर्णन रूपाचेच आहे. पण पुढील ओंव्यांत श्रीमहाराजांनी ह्या रूपाची अलौकिकता दाखविली आहे. इतर सर्व रूपांपेक्षां हे कसे आगळे आहे ते दाखविले आहे. त्याला त्यांनी मनरूपी माशाला गुंतवणारे जाळे म्हटले आहे. सतत चौंहीकडे धांवणारे, कधीच न विसावणारे हे ओढाळ मन ह्या रूपांत जडून जातें. निरुद्ध होते. एकदां ह्या स्वरूपांत जडलेले मन प्रयत्न करूनही तिथून हलवितां येत नाही. हे चर्मचक्षूंना दिसणारे सामान्य रूप नाही. ही सविकल्प समाधी आहे. ज्यांतून सुटका होते ते काय मोहन (भूल)? खरे मनाचे मोहन तर हे अचिंत्य भगवंताचे ध्यानच आहे ज्यापासून मन कधीच परत फिरत नाही. (आतां न फिरे माघारी। बैसले गोविंदाचे शजारी।। संत तुकाराम). मधाला चिकटलेली माशी जशी उडूं शकत नाही आणि उडूं इच्छित नाही तसेच भगवद्रूपांत रमलेले मन तिथेच स्थिरावून जाते. मन हा इंद्रियांचा राजा आहे. साहजिकच ती त्याच्या अधीन असल्याने त्या ध्यानांतच लीन होतात. त्याला सोडून त्यांना जातां येत नाही. शिवाय त्यांच्या राजाला – मनाला ही मिळालेल्या प्रेमामृतभोजनाचे तेही वाटेकरी असतातच. चित्ताला व्यापून राहणारा तो आनंद मनांत झिरपतोच. त्यामुळे ती इंद्रियेही तृप्त होऊन जातात. अशा रीतीने इंद्रियांसहित अखिल मन भगवद्रूपांत तल्लीन होऊन जाते. ६२-७१.

अलर्काची ती निश्चल तटस्थ दत्तस्वरूपांत रमून गेलेली स्थिति पाहून जणुं त्याला भानावर आणण्यासाठीच दत्तप्रभूंनी त्याचा हात धरला आणि म्हणाले, “अलर्का! सावध हो आणि मी काय म्हणतो ते ऐक. तुझ्या चित्तांत आतां माझे ध्यान स्थिरावले आहे. ते ध्यान ते कधीच सोडणार नाही. आधीं तूं जाऊन सुबाहूचे दर्शन कर. त्यानंतर तूं वनांत जाऊन माझ्या रूपांत चित्ताचा लय कर. मग सतत माझ्याच ध्यानांत राहिल्याने ते चित्त निर्वासन होऊन जाईल.” अशी स्पष्ट आज्ञा झाल्यावर अलर्काला आपल्याला आतां दत्तचरणांपासून दूर जावे लागणार याची जाणीव झाली आणि त्याने चित्तांत दत्तमूर्ती साकारून त्यांचे स्तवन आरंभिले. भावाच्या उच्च अवस्थेत त्याच्या मुखांतून निःसृत झालेली ही स्तुति आहे. पहिल्या भागांत अनुप्रसयुक्त, सरल, गेय भक्तिरसपूर्ण आणि प्रासादिक असे पद आहे. ७२-७६.

## अलर्काची प्रार्थना.

प्रभो, आपणच ब्रह्मा, विष्णु आणि शिवस्वरूप आहांत. सज्जनांना सुखविणारे, दुष्टांना शासन करणारे, दुख आणि भय यांचा नाश करून शोकाची शांति करणारे आपण आहांत. अकिंचनासाठी मधासारखे गोड आहांत तर त्रस्त जनांचे बंधु आहांत. अशा हे केशवा, भवाचे म्हणजे संसाराचे दुःख (भाव) दूर करून माझा उद्धार करा. त्रिविध तापांची शांति करणारे सदाशिव आपणच आहांत आणि

पापांना चिरडून टाकणारे शंभूही (भव) आपणच आहांत. ह्या शरणागत जीवाला आपल्या चरणी विसांवा द्या. ७७-७९.

## अलर्ककृत स्तवन आणि निरोप.

आतां पुढील ओंव्यांत केलेली स्तुति ही दत्तात्रेयांच्या परमात्मस्वरूपाची स्तुति आहे. हिचे दत्तपुराणांतील अष्टकांत आहे(५:७:५९-६७). तेच इथे मराठी ओंव्यांतून विशद केलेले आहे. आपण दोन्हींचा भावार्थ एकत्रच पाहू या.

**वन्दे देवं हेत्वात्मानं सच्चिद्रूपं सर्वात्मानं। विश्वाधारं मुन्याकारं स्वेच्छाचारं वाग्हृद्दूरम्।।१।।**

अलर्क म्हणतो, "भगवंता आपणच सर्व जीवांच्या हृदयांतील प्रत्यगात्मा आणि सच्चिदानंद परमात्मा ही आपलीच स्वरूपे आहेत हे आतां मला स्पष्ट ध्यानांत आले. आपणच ह्या सर्व जगताचे आदिकारण (हेतु + आत्मानं) आहांत आणि अधिष्ठानरूपाने सर्व विश्वाला आधारभूत आहांत. हे मानवी मुनीरूप आपण केवळ स्वेच्छेनेच धारण केले आहे. कारण आपण सर्वतंत्रस्वतंत्र आहांत. आपले हे व्यापक स्वरूप हे मन आणि वाचा ह्यांना आकळत नाही. " ८०-८१.

**मायोपाध्या यो ब्रह्मेशोऽविद्योपाध्याप्यात्मानीशः। तत्त्वज्ञानान्मायानाशे तर्ह्येकस्त्वं नेशोऽनीशः।।२।।**

निरुपाधिक परब्रह्म हे मायेच्या उपाधीने ईश्वरस्वरूप भासते. तेच अविद्येच्या उपाधीने परतंत्र जीवदशेला येऊन शोक पावतो. (अनीशया शोचति) जीवाची अविद्या गेली की तोच प्रत्यगात्मा आहे. आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले की.परतंत्र जीव आणि स्वतंत्र ईश्वर हा भेद विरून जाऊन तुझे एकमेवाद्वितीय स्वरूप अनुभवाला येते. ८२-८३

**रज्ज्वज्ञानात्सर्पस्तत्र भ्रान्त्या भातीशैवं ह्यत्र। जीवभ्रान्तिस्त्वेषा मिथ्या सा मेऽद्यारं नष्टाऽऽप्तोक्त्या।।३।।**

अंधुक प्रकाशांत दोरीवर सापाचा भ्रम व्हावा तसे मायेच्या भुलीने तुझ्यावर हा जगद्रूपी भ्रम भासतो. आपण जीव आहोत अशी ही भ्रांति मिथ्या आहे. ही आत्मज्ञानानेच दूर होते. आधी नसलेले आणि अंतीही नसते असे मध्येच भासणारे जगत तिन्ही काळांत नसते. आदौ अंते च यत् न अस्ति तत् वर्तमाने अपि तथा (नास्ति एव)। दोरीवरचा साप जसा स्वच्छ प्रकाशाने नाहीसा होतो आणि दोरीच काय ती उरते तसेच आज मला अविद्येने भासणाऱ्या जगाचे मिथ्यत्व आपल्या कृपाप्रसादाने मला आकळले आहे. ८४-८७.

**धन्योऽस्म्यद्य त्वद्दृक्पूतो जातोऽस्म्यद्य ब्रह्मीभूतः। त्वं ब्रह्मैवासीशारूपो मायायोगान्नानारूपः।।४।।**

आपल्या पावन करणाऱ्या दृष्टिक्षेपाने मी खरोखर धन्य झालो आहे. माझे जीवपण जाऊन माझ्या अंगीं ब्रह्मत्व आले आहे. तू निर्गुण निराकार असा परमात्मा आहेस पण आपल्या मायेने नाना रूपे धारण करतोस. आतां ह्या अद्वैताच्या अनुभूतीने आपल्यांतील मी-तूंपणा जाऊन अभेद आला आहे. तरी पण भजनाच्या लालसेने माझे मन मी जीव तूं शिव अशा भेदाची कल्पना करते. 'मी भक्त तूं देव' असे द्वैत केल्याशिवाय भक्तिरसाची गोडी कशी चाखतां येईल? असा भाव धारण करून जे भजन होते त्यांत अमाप आनंद आहे. ह्या ह्या प्रेमळ भजनाने ध्याता, ध्यान, ध्येय ही

त्रिपुटी मावळून मन तुझ्या रूपांत मन लीन झाले तर ते पुन्हा जागवूं आणि पुनश्च भजनांत रमूं. हीच आमची करमणूक आहे. ८७-९४

**दत्तात्रेयः प्रज्ञामेयो वेदैर्गेयो योगिध्येयः। त्वं विश्वात्मा कस्त्वामीशः स्तोतुं ध्यातुं ज्ञातुं वेशः।।५।।**

आतां वरील वेदांनी गाइलेले दत्तप्रभूंचे निर्गुण निराकार ब्रह्मस्वरूप आणि त्यांनी स्वेच्छेने धारण केलेली मानवाकृती यांचे एकत्व प्रतिपादन केले आहे. जन्मादि षड्विकारांच्या अतीत असलेला विश्वात्मक परमात्म्यानेच अत्रि आणि अनसुया यांच्या पोटीं जन्म घेतला. ते सहा भुजांचे रूपच त्याच्या भक्तांना प्रिय आहे. "तुज सगुण म्हणों की निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे।।", हाच संत ज्ञानेश्वर महाराजांचा सिद्धांत या चरणांत प्रतिपादलेला आहे. हा गोविंद बुद्धिगम्य आहे आणि योगीजनांचे ध्येय आहे. त्याचे गुण गणवत नाहीत म्हणून त्याचे अनंत हे नांव सार्थक आहे. ९५-९६

**वृद्धः क्वापि प्रौढः क्वापि बालः क्वापि ब्रह्म क्वापि।**
**अंगी भोगी रोगी क्वापि त्यागी योगी संगी क्वापि।।६।।**

(जो) भक्तांची परीक्षा पाहण्यासाठी (ज्ञान व ऐश्वर्य यांनी संपन्न असूनही) बाल, उन्मत्त आणि पिशाचवत् वर्तन करतो; कधी बाल, कधी युवा, कधी जटाधारी वृद्ध तर कधी उघडपणे लोकांनी पाहिलेला ऋषि; कधी योगी, कधी उत्तम वेषांत तर कधी नग्न; कधी तुष्ट, कधी पुष्ट तर कधी कृश; कधी दंडधारी संन्यासी, कधी भिक्षु (दंडरहित परमहंस), कधी ब्रह्मचारी, कधी गृहस्थ, कधी वानप्रस्थ, कधी वर्णाश्रमांच्या विरुद्ध वागणारा, तर कधी क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र वर्ण धारण करणारा तर कधी संकर अशी अनेक अदभुत रूपें लीलेने धारण करतोस. ९७-९९

**स त्वं वृद्धः सिद्धः शुद्धः श्रद्धाबद्धोप्यन्याविद्धः। श्रीशो मायाधीशोऽधीशो विज्ञानेशो निर्वाणेशः।।७।।**

तूं वस्तुतः परमशुद्ध आणि मायेच्या गुणांनी अस्पृष्ट आहेस पण स्वतःला अशुद्धासारखा भासवतोस. कधी श्रद्धेने बांधल्यासारखा वाटलास तरी सर्वथा स्वतंत्र आहेस. तूं मायेचा स्वामी आहेस आणि लक्ष्मीचा पति आहेस. सर्वांचा अंतर्यामी आहेस. तरीही सामान्य दुबळ्या जीवांसारखे रूप घेऊन भक्तांना भुलवतोस. सर्व विज्ञानाचा आणि मुक्तीचा दाता आहेस. तुझ्या लीला ब्रह्मादि देव आणि ऋषींच्यासुद्धां मन आणि वाचा यांना न आकळणाऱ्या आहेत तर मानवांचा काय पाड?. १००-१०१

**धर्माधर्मातीतो गीतो वेदैर्भेदैर्हीनोनूनः। त्वां तं संतं भक्त्या मुक्त्या ईशं त्रीशं वन्दे वन्दे।।८।।**

अखंड, अभेद, अच्छेद्य असे ज्याचे वर्णन श्रुतींनी केले आहे त्या धर्म आणि अधर्म यांच्या अतीत, परिपूर्ण, सत्स्वरूप त्रैलोक्यनाथाला मुक्तीसाठी भक्तिपूर्वक वारंवार वंदन असो. १०२-१०४.

अशी स्तुति करून अलर्काने पुनश्च आपली कृतकृत्यता व्यक्त केली आहे. मानवी जन्माला येऊन जे कर्तव्य परमात्मसाधन, ते आपण केले आहे, जे प्राप्तव्य श्रीगुरुकृपा तीही मिळवले आहे, जे सगुण रूप पहायचे असते ते पाहिले आहे आणि जे आत्मस्वरूप अनुभवायचे असते ते अनुभवले आहे **कृतं कृत्यं प्रापणीयं मया प्राप्तं न संशयः।।** दत्तपुराण ५:८:५६।। त्या अनुभूतीमुळे खरे तर गुरु-शिष्य किंवा

देव-भक्त यांच्यांतले द्वैत नाहीसे झाले आहे.  तरी प्रारब्धानुसार आपण बोलणे क्रमप्राप्त असल्याने, “मी आपली आज्ञा शिरसा मानून बंधूच्या दर्शनाला जात आहे, ” असे म्हणून अलर्काने पुनश्च भावावेगाने श्रीदत्तप्रभूंच्या पायांवर मस्तक ठेवून त्यांचा निरोप घेतला.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सदतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# पञ्चमाष्टकस्थालर्ककृतस्तोत्रम्

वन्दे देवं हेत्वात्मानं सच्चिद्रूपं सर्वात्मानं।

विश्वाधारं मुन्याकारं स्वेच्छाचारं वाग्हृद्दूरम्।।१।।

मायापाध्यो यो ब्रह्मेशोऽविद्योपाध्याप्यात्मानीशः।

तत्त्वज्ञानान्मायानाशे तर्ह्येकस्त्वं नेशोऽनीशः।।२।।

रज्ज्वज्ञानात्सर्पस्तत्र भ्रान्त्या भातीशैवं ह्यत्र।

जीवभ्रान्तिस्त्वेषा मिथ्या सा मेऽद्यारं नष्टाऽऽप्तोक्त्या।।३।।

धन्योऽस्म्यद्य त्वद्दृक्पूतो जातोऽस्म्यद्य ब्रह्मीभूतः।

त्वं ब्रह्मैवासीशारूपो मायायोगान्नानारूपः।।४।।

दत्तात्रेयः प्रज्ञामेयो वेदैर्गेयो योगिध्येयः।

त्वं विश्वात्मा कस्त्वामीशः स्तोतुं ध्यातुं ज्ञातुं वेशः।।५।।

वृद्धः क्वापि प्रौढः क्वापि बालः क्वापि ब्रह्म क्वापि।।

अंगी भोगी रोगी क्वापि त्यागी योगी संगी क्वापि।।६।।

स त्वं वृद्धः सिद्धः शुद्धः श्रद्धाबद्धोप्यन्याविद्धः।।

श्रीशो मायाधीशो धीशो विज्ञानेशो निर्वाणेशः।।७।।

धर्माधर्मातीतो गीतो वेदैर्भेदैर्हीनोनूनः।।

त्वां तं संतं भक्त्या मुक्त्या ईशं त्रीशं वन्दे वन्दे।।८।।

इति श्री. प. प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचितं पञ्चमाष्टकस्थालर्ककृतस्तोत्रं संपूर्णम्।।

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ३८ वा.

तो भ्रान्ति वारून। नृप दत्ताज्ञेनें येऊन। स्वबंधूस भेटून। आत्मज्ञान निवेदितसे।।७८।।
अनसूयू सुबाहु काशिराजासी। बोधूनि जाई वनासी। पुत्र राज्य देऊनि वनासी। अलर्क ये अडतिसाव्यांत।।७९।।

संदीपक शिष्याला वेदधर्मा मुनि सांगत आहेत. दत्तप्रभूंची आज्ञा शिरसा धारण करून मदालसापुत्र अलर्क सुबाहूला येऊन भेटला. पूर्वीच्या अलर्काहून अगदी वेगळा असा अलर्क होता. अहंकार आणि ममता मनांतून नाहीशा झाल्याने त्याचे मन स्वस्थ होते. ना पराजयाचे दुःख ना शत्रूचे भय! कसलीही चलबिचल मनात नव्हती. प्रसन्न चित्ताने आणि स्मितमुखाने आपल्या भावाला त्याने आदरपूर्वक नमस्कार केला आणि काशीराजाला उद्देशून स्पष्ट वाणीने बोलूं लागला. "काशीराज! ऐका. हे राज्य मी तुम्हांला देतो आहे. माझा तुम्हाला कांहीच उपद्रव होणार नाही. तुम्ही सुखाने राज्य करा किंवा सुबाहूला द्या अथवा उभयतां वाटून घ्या. तुम्ही हे राज्य जरी लुटवले तरी माझी हरकत नाही. माझा आतां या राज्याशी कांहीच संबंध उरला नाही हे मी निश्टपूर्वक सांगतो. " १-६

## क्षत्रियांचा धर्म.

काशीराजा चकित होऊन म्हणाला, "अरे अलर्का, तूं क्षत्रिय आहेस. क्षात्रधर्माला हे शोभत नाही. महान सोमवंशाच्या चक्रवर्ती राजाला हे तुझे वागणे लज्जास्पद आहे. युद्धाला घाबरू नकोस. प्रधान मेला, सैन्याचा निःपात झाला तरी राजाने लढण्याचे सोडूं नये. निधड्या छातीने शत्रूला भिडावे आणि मारावे अथवा मरावे. पण कांही झाले तरी रणांगणांतून पळूं नये. युद्धांत मरण आले तर स्वर्गाची प्राप्ती होते. जिंकले तर राज्य मिळते. (**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्।।** भ.गीता २:३७।।) असा दोन्ही बाजूंनी लाभदायक असलेले हे दुर्लभ रण सोडून जाण्याचा करंटेपणा तू करूं नकोस. ह्या जगांत दोघेच सूर्यमंडलाचा भेद करून कृतार्थ होतात. योगाचा अभ्यास करणारा संन्यासी आणि समोरासमोर युद्धांत वीरगति पावणारा. (**द्वावेव कृतिनौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ। परिव्राड् योगयुक्तश्च रणे योऽभिमुखो हतः।।**). आग लावणारा, विष घालणारा, हाती शस्त्र घेऊन येणारा, धनाची चोरी करणारा, जमीन बळकावणारा आणि (दुसऱ्याची) बायको पळवणारा हे शास्त्राने आततायी ठरविले आहेत. (**अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः। क्षेत्रसीमापहर्ता च षडेते ह्याततायिनः।।**) असा आततायी आपल्यावर चालून येत असेल तर विचार न करतां त्याचा वध करावा. त्यांत कांहीच दोष नाही. (**आततायिनं आयान्तं हन्यात् एव अविचारयन्। न आतितयिवधे हन्तुः कश्चन दोषो भवति।**) त्याच्या मानवाधिकारांचा विचार मुळींच करूं नये. आतितायी येतांना पाहून जो पळून जातो त्याची ह्या लोकी दुष्कीर्ति होते आणि मरणोत्तर नरक मिळतो. अरे, क्षत्रियांसाठी युद्ध ही यज्ञयागांसारखी अपूर्व पर्वणी आहे. एवढे सोपे कल्याणाचे साधन दुसरे नाही." ७-१७.

काशीराजाचा हा उपदेश अगदीं योग्यच होता. अलर्कानेच म्हटले की, "माझेही असेच मत होते." हाच उपदेश भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णांनी अलर्काला केला आहे. आजच्या काळांत धर्माच्या विपरीत कल्पनांनी उन्मत्त झालेले आततायी जगभर धुमाकूळ घालत आहेत. भारत देशांत त्याची

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

झळ सर्वाधिक भासत आहे. अशा धर्मांध आततायींचे कठोरपणे पारिपत्य करणे हाच राज्यकर्त्यांचा धर्म आहे. अशा प्रसंगी मानवाधिकार, परधर्मसहिष्णुता इत्यादी कल्पना गैरलागू आहेत. अशा आततायींना शासन देण्यांत कुचराई करणे हाच मोठा अपराध आहे. पण आपल्या कर्तव्याच्या जाणीवेपेक्षां राज्यकर्त्यांना मतपेटीचे गणित महत्त्वाचे वाटते आहे. ही आपल्या देशाच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे.

# अलर्काचे उत्तर.

उपदेश तोच असला तरी भगवद्गीतेतील उपदेश मोहग्रस्त अर्जुनाला प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीच केला होता. इथे मात्र काशिराजाने अहं-ममतेने रहित अलर्काला केला आहे. अर्थातच पात्रभेदाने त्या उपदेशाचा परिणामही वेगवेगळाच झाला आहे. अलर्काला हंसूं आले. तो म्हणाला, "खरं आहे तुझे म्हणणे काशिराजा! माझेही असेच मत होते. आतां मात्र ते वाचार सगळे मावळले आहेत. आतां मी देह आहे ही माझी भावनाच समूळ नाहीशी झाली आहे. देहाला वर्णाश्रमादि असतात. मी देहच राहिलो नसल्याने मला क्षत्रियत्व कसे येईल? हा माझा स्थूल देह मातीच्या घड्यासारखा जड आहे. माझ्याहून वेगळा दृश्य अशा या देहाचे राहूं देत. ह्याला चाळवणारे प्राण, ही इंद्रिये आणि मन हे सर्वही माझ्यापेक्षां वेगळे असलेले मी स्पष्ट पाहतो आहे. हे सर्वच जड, अचेतन आहेत. माझ्या चैतन्यनेच हे सचेतन भासतात. मी फक्त ह्याना पाहणारा साक्षी, द्रष्टा आहे. माझ्या चैतन्याचे मला सतत पूर्ण भान आहे. मी माझ्याच देह, इंद्रियादिकांना चालवतो असे नाही तर ह्या विश्वांतील यच्चयावत स्थिरचर जीवांना मीच चेतवतो. माझ्यापेक्षां भिन्न असा कांही पदार्थच आतां मला दिसत नाही. मग हा मित्र, हा शत्रू, हा स्वकीय, हा परकीय असे वाटण्याची तर गोष्टच सोड.

**वर्णाश्रमादयो देहे मायया परिकल्पिताः'**
**चिच्छक्तिरेक एवायं यदा नान्योऽस्ति कश्चन।**
**तदा का नृपते ज्ञानान्मित्रारिप्रभुभृत्यता।। मा.पु. ४३::७८।।**

अरे काशीपती, हा तुमचाच उपकार माझ्यावर झाला आहे. तुम्ही केलेल्या पराभवाने आर्त होऊन मी श्रीदत्तचरणी धांव घेतली. त्यांच्या कृपादृष्टीने माझ्या चित्तांतले द्वैतच नाहीसे झाले! बाहेरच्या या रणांत मी हरलो खरा; पण इंद्रियरूपी आंतरिक शत्रूंना मत्र मी जिंकले आहे. चारी देहांत मी विजय संपादन केला आहे.

निर्जितारीन्द्रियगणस्त्यक्त्वा सङ्गमशेषतः। मनो ब्रह्मणि संधास्ये जयः सर्वत्र तज्जये।।१३।।

आतां पूर्ण समाधानाने मी वनाला प्रस्थान करीत आहे. मला आतां कुणीही शत्रू उरला नाही. हा माझा दादा सुबाहू आणि तूसुद्धा माझे उपकारकर्ते आहांत. खरे तर मी सर्वां ठायीच असल्याने **(हे विश्वचि माझे घर। ऐसी जयाची मति स्थिर। किंबहुना चराचर। आपणची जाहला।।** ज्ञानेश्वरी १२:२१३।।) तुम्ही आणि मी भिन्न नाहीच आहोंत." असे बोलून अलर्काने सुबाहूच्या पायांवर लोळण घेतली. १८-२६.

सुबाहूने हंसत हंसत आपल्या भावाला हाताने उठवून छातीला लावले. "आतां माझा वाटा मला मिळाला. आपण आतां समभागी झालो!" मग काशिराजाकडे पाहून तो म्हणाला, "मित्रा, जे मनांत धरून मी तुझ्याशी युती केली तो माझा उद्देश्य सफल झाला! मी संपर्ण समाधानाने वनांत परत जातो. तुझे कल्याण असो." २७-२९.

# काशीराजाचा संभ्रम.

काशीनरेश चक्रावूनच गेला. पैतृक राज्यासाठी युद्धाला प्रवृत्त झालेले ह्या भावांमध्ये वनाला जाण्याची चढाओढ कां लागली आहे ते त्याला  कळेना. तो सुबाहूला म्हणाला, “ काय गंमत आहे? राज्याचा वाटा मिळविण्यासाठी वनांतून येऊन मला अलर्कावर चालून जाण्याची गळ तूंच घातलीस. ‘अलर्काने आमचे वडिलोपार्जित राज्य स्वतःच बळकावले आहे;  त्याला पराजित करून माझा हक्क मला मिळवून दे’, असा आग्रह धरलास. आणि आतां हे असे कसे बोलतोस? एकदम वनांत जाण्याच्या गोष्टी करतोस. आधी वनांतच होतास की? तिथून येऊन एवढा सगळा खटाटोप केलास तरी कशासाठी? आणि हा अलर्क, जो पूर्वी कांहीच वाटा द्यायला राजी नव्हता तो पण वनांतच जायचे म्हणतो. मला जरासे कळेल असे सांगशील का?” ३०-३५.

सुबाहू त्याला म्हणाला, “अरे हे सर्व राज्यासाठी केले असे तुला वाटते काय? तुला खरे कारण सांगतो, ऐक. मी आणि माझ्या दोन्ही ज्येष्ठ बंधूंना आमच्या मातेने आमच्या तोंडांत जसे आपले दूध घातले तसाच आमच्या कांनांत बोध घातला. त्या बोधाने आम्ही आत्मज्ञानी झालो आणि ब्रह्मानंदाचा रसास्वाद घेत वायूचा आहारच घेऊन आनंदाने वनांत राहिलो. दैवयोगाने तो मातृबोध या अलर्काच्या कानांत पडला नाही. म्हणून तो पशुप्राय झाला. ”

**विद्वांसौ वातरशनौ विमुक्तौ भ्रातरौ मम।**
**तयोर्मम च यन्मात्रा बाल्ये स्तन्यं यथा मुखे।।२०।।**
**सिक्तं तथैव बोधोऽपि विन्यस्तः कर्णयोस्तथा।**
**नास्य कर्णेऽपतद्दैवात्पशुप्रायोऽनुजोऽभवत्।।२१।।**

“हा शरीरपर झाला आणि विषयसुखांतच कृतार्थता मानू लागला. आपला देह स्त्रियांच्या ताब्यां देऊन त्याने स्त्रीलंपटांचीच संगति धरली. ह्याची बुद्धि भ्रष्ट झाली आणि किडा जसा व्रणांत रमतो तसा हा लैंगिक सुखांत रममाण झाला. अनेक स्त्रियांशी विवाह करून स्वतःला सुखी मानूं लागला. क्षणभंगुर नाशिवंत, दुःखकारक ऐंद्रिय सुखाला भुलून तो आत्मसुखाला पारखा झाला. मूढपणे दुर्गतीच्या वाटेला लागला. एका आईच्या पोटी आम्ही जन्म घेऊनही एका भावाचा हा अधःपात मला पाहवेना. आतां ह्याला ह्या सुखाच्या भ्रांतींतून जागे करण्यासाठी दुःखच द्यावे लागेल. दुःखच वैराग्याला कारणीभूत होते असा विचार करून मी ह्याला राज्यभ्रष्ट करण्याचा हा उद्योग तुझ्या साह्याने केला. (**ततो मया विनिश्चित्य दुःखं वैराग्यकारणम्। कृतं भवत्सहायेन तथैवार्थोऽभवन्मम।।** दत्तपुराण ५:८:२५।।) आपला  हा प्रयत्न सफळ झाला. पराजयाच्या दुःखाने तप्त होऊन हा वनांत गेला. त्याच्या पुण्याईने त्याला श्रीदत्तप्रभूंची भेट झाली त्यांचा उपदेश ह्याच्या मनांत तात्काळ ठसला आणि हा असा निर्मम आणि निरहंकार होऊन इथे आला. माझे काम झाले. सर्व योग्यांत मान्य तापावलेली आमची भगवान.शंकरांच्या वराने धन्य झालेल्या थोर मातेचे तिचेच दूध प्यालेला हा अलर्क पतन पावूं नये यासाठीच माझी सगळी खटपट होती. ती आतां सार्थकी लागली. आपल्या बांधवांचा किंवा स्वजनांचा अधःपात होत असलेला पाहून जे उपेक्षाच करतात ते हातपाय असूनही विकलांगच समजावेत. **(उपेक्ष्यते सीदमानः स्वजनो बान्धवः सुहृत्। यैर्नरेन्द्र तान्मन्ये सेन्द्रिया विकला हि ते।। मा.पु. ४४:१५।।)** आतां हे सार्वभौम राज्यही घेऊन मला काय करायचे आहे? आमच्या मेरुतुल्य आत्मसुखापढे ते मोहरीसारखे आहे.” ३६-५३.

# काशीराजाची सुबाहूला विनंति.

काशीनृपती हे सर्व ऐकून एकदम प्रभावित झाला. सुबाहूच्या संगतीने त्याच्याही मनांत राज्याविषयी आणि राजभोगांविषयी वैराग्य निर्माण झाले. सुबाहूविषयीं धन्योद्गार काढीत तो म्हणाला, “हे सुबाहो, तूं आपल्या बंधूचे कल्याण केले आणि माझई मात्र उपेक्षा करतोस हे तुला शोभत नाही! मी असे ऐकले आहे की सत्पुरुषांबरोबर सात पावले जरी कुणी चालून गेला तर ते त्याला मित्र मानतात आणि तो महापापी जरी असला तरी त्यापासून ते त्याचा उद्धार करतात. सतां साप्तपदी मैत्री उरुतरात् अघात् पुनाति। असे ते संत दयेचा वर्षाव करणारे मेघच आहेत. पण मेघांप्रमाणे त्यांची वृष्टी केवळ वर्षाकालापुरती मर्यादित नसते तर ते सततच कृपाशील असतात. केवळ नमस्कारानेच संत फल देतात हे अलर्काचे उदाहरण आपल्या समोरच आहे. मी तर महिनाभर तुझ्यासोबत रात्रंदिवस राहतो आहे. (**फलदो हि सतां सङ्ग इत्युक्तिः कथमन्यथा। तस्मान्मामपि संसारात्समुद्धर विचक्षण।।३३।।**) तुम्हां संतांच्या ठायीं आपला-परका असा भेद अपेक्षित नाही. तुम्ही म्हणाल ‘जो जसा भजतो त्या प्रमाणांत त्याला फळ मिळते. अग्नीच्या जितक्या जवळ आपण जातो तितकी त्याची आंच जास्त जाणवते तसेच तारतम्य संतांच्या सेवेच्या परिणामांतही आहे.’ पण मी तर तुझा जवळचा मित्र आहे. आतां आपले ब्रीद सांभाळण्यासाठी तरी तूं माझा उद्धार केला पाहिजे. मी तुझ्या बोलाखातर सर्वस्वाचाही त्याग करायला तयार आहे. ” ५४-६५.

# सुबाहूचा उपदेश.

सुबाहू उत्तरला, “काशीराजा, तुझे बोलणे अगदी योग्य आहे. तू धार्मिक आहेस. मानवी जीवनांतल्या धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांतील पहिले तीन तर तू साधलेले आहेतच. चौथा मोक्ष साधण्यासाठी मात्र तुला प्रयत्न करावा लागेल. साधनावांचून आत्मज्ञान होत नाही आणि आत्मज्ञानाविना मोक्ष नाही. ते साधन मी तुला थोडक्यांत सांगतो. ‘मी’,’मी’, अशी जी प्रतीती आपल्या मनांत असते तिचे नेमके स्वरूप जाणून घे. हा मी कोण आहे? याचा तूं रात्रंदिवस चिंतनाने शोध घे. **(कस्याहमिति सञ्ज्ञेयमित्यालोच्य त्वयात्मना। बाह्यान्तर्गतमालोच्यमालोच्यापररात्रिषु।। मा.पु. ४४:२३।।)**. अव्यक्त म्हणजे परमेश्वरापासून झालेले आदि प्रधान नांवाचे तत्त्व त्यापासून ते भूतभौतिक सर्व जीव नामरूपात्मक आहेत. जे जे नामरूपात्मक आहे ते सर्व अनित्य – नाशिवंत आहे. त्या सर्व अनित्याला दूर करून तूं तुझे नित्य स्वरूप समजून घे. आपण ह्या देह, इंद्रियें इत्यादि अनात्माला आत्मा समजतो; जे आपले सत्य स्वरूप नाही त्यालाच मी म्हणतो. **अनात्मन्यात्मविज्ञानमस्वे स्वमिति मूढता।। मा.पु. ४४:२७।।** ही मूढता दूर करणारा **नित्यानित्य विवेक** पक्का झाला कीं आपोआपच तुझे मन ऐहिक आणि पारलौकिक भोगांपासून विरक्त होईल. (**वैराग्य**) मुक्तीच्या अविनाशी आनंदाची ओढ तुझ्या चित्तांत बळावूं लागेल. (**मुमुक्षा**). भुकेल्याला जशी अन्नाची भूक असते तशी ही मुमुक्षा तीव्र होईल. त्या वेळी तू सद्गुरूंच्या उपदेशाला योग्य होशील. ते तुला महावाक्याचा उपदेश करतील. त्या महावाक्याचा अर्थ समजून घेतला पाहिजे. अल्पबुद्धि, परतंत्र, शोकग्रस्त जीवाचे सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी आत्म्याशी असलेले ऐक्य ‘मी तोच आहे’ आणि ‘तोच मी आहे’ हे मनांत ठसले पाहिजे. (**श्रवण**). जीवात्मा आणि परमात्मा हे विषम गुण दूर करून चैतन्य, स्वयंप्रकाशत्व आणि आनंद ह्या समान गुणांचे एकत्व भागत्याग या लक्षणेने निश्चित केले पाहिजे. अशा प्रकारे निश्चित केलेल्या महावाक्याचे **मनन** आणि **निदिध्यासन** केल्यावर तुला आपल्या **आत्मस्वरूपाचा साक्षात्कार** होईल. हा माझा भाऊ अलर्क इतका कामलंपट

असूनही श्रीदत्तगुरूंच्या एका प्रश्नानेच सर्व कांही उमजला. त्याच्या मातृकृपेचा आणि पूर्वपुण्याईचा हा प्रभाव आहे. तूंही तसा पुण्यावनच आहेस. म्हणूनतर तुला सत्संगति लाभली आणि वैराग्य उत्पन्न झाले. पण ज्ञानाला अजून बरेच प्रतिबंध आहेत. त्यासाठी तुला राजपाट सोडून सत्संग केला पाहिजे. त्यानेच हा नित्यानित्य विवेक स्थिर होईल." ६६-८०

# अलर्काचा राजसंन्यास.

यापमाणे काशीराजाचे समाधान करून सुबाहू अलर्काला म्हणाला, "आतां आपण खरे भाऊ-भाऊ झालो! आतां वाटल्यास तू राज्य कर किंवा वनांत जा. कुठेही तूं आसक्त होणार नाहीस." अलर्क म्हणाला, "दादा, मी नोहग्रस्त होऊन वेड्यासारखा विषयांच्या चिखलांत बराच काळ रुतून बसलो होतो. तूं दया करून मला हात धरून बाहेर काढलेस. दुसरा कोण असा कृपाळू असेल? जगद्वंद्य मातेच्या पोटीं जन्म घतलेले आपण आतां सहोदर शोभतो. ही त्या मातेचीच कृपा होय! ". असे बोलून अलर्क सुबाहूच्या चरणी लागला. सुबाहूने त्याला निरवले आणि तपश्चर्येकरतां वनाची वाट धरली काशीराजालाही वैराग्य उत्पन्न झाल्याने काशीला जाऊन आपल्या पुत्राला राज्याभिषेक करून तो वनांत सुबाहूच्या जवळ जाऊन त्याच्या मार्गदर्शनाने मोक्षाचे साधन करूं लागला. अलर्कानेही आपल्या ज्येष्ठ पुत्राला राज्यवर बसविले आणि वनांत जाऊन श्रीदत्तप्रभूंची उपासना केली.सर्वसंगपरित्याग करून वैराग्य घारण केल्याने सुख-दुःख, इष्ट-अनिष्ट, इत्यादि सर्व द्वंद्वांपासून तो मुक्त झाला त्यामुळे त्याचे प्रारब्ध असून नसल्यासारखे झाले. (**एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा। हरिकृपें त्याचा नाश आहे।।**). श्रीदत्तगुरूंच्या कृपेने तो देहभान विसरून पृथ्वीवर संचार करूं लागला आणि उच्च स्वरांत पुढील गाथा गाऊं लागला. ८१-९१

# अलर्काची गाथा.

ह्या गीतांत त्याने आपला अनुभव सांगून त्या सुखाच्या प्राप्तीचा उपायही सांगितला आहे. तो म्हणतो अरेरे, ह्या अविचारी लोकांना सर्व उलटेच कसे दिसते? देव, दैत्य, किन्नर, मानव हे सर्वही मायेने भुलून पत्नी, पुत्र, आप्त इत्यादींच्या ममतेने बांधले गेलेले आहे. हा तीन गुणांचा स्नेहरूपी पाशांत काम-क्रोधादि शत्रू त्यांना बांधून मगरीसारखे घट्ट आंवळून दरदरां ओढत आहेत. हे सर्व अविद्येच्या भ्रांतीनेच झाले आहेत. मी मात्र अविकार मनाने त्यांना पहात आहे. मी-तूं ह्या द्वैताने हे कष्टत आहेत, अनंत वेदनांनी ते कळवळत आहेत. मलासुद्धां त्यांची खूप कींव यते. पण त्यांना मूर्खांना मात्र त्या दुःखाची कांहीच जाणीव नाही. मीसुद्धां पूर्वी त्यांच्यासारखाच सुखाच्या भ्रांतीने नरकांत लोळत नव्हतो का? कशी माझी बुद्धि भ्रष्ट झाली होती? राज्याची आसक्ति धरून विषयांचा स्वैर उपभोग घेऊनही मला त्याचा कंटाळा आला नाही. आतां मात्र मला पुरता वीट आला आहे. हे योगाचे सुख अनुभवल्यावर तो विषयांच्या ठिकाणच्या सुखभ्रमाचा निरास झाला आहे. ते सगळे आतां भातुकलीच्या खेळासारखे वाटते आहे (**अहो कष्टं यदस्माभिः पूर्वं राज्यमनुष्ठितम्। इति पश्चान्मया ज्ञातं नास्ति योगात्परं सुखम्।। द.पु. ४४:५१।।**) तृष्णा एकदां मागे लागली की एकाच माणसाला ब्रह्मांडांतील सर्व संपत्ती, स्त्रिया इत्यादि मिळाले तरी तृप्ती अशी वाटतच नाही. लोक हो, मी हे अनुभवून सांगतो की एकदां ती तृष्णा गुरुकृपेने ओसरली की चतकोर भाकरी खाऊन उघड्यावर पडलेल्या माणसाला तृप्त तृप्त वाटते! त्याची सर विषयसुखाला कशी येईल? (**तृष्णाक्षयसुखस्येदं कलां नार्हति षोडशीम्।। द.पु. ४४:५३।।** ). ते सुख कुठून बाहेरून मिळत नाही तर ते आपल्या अंतरांत असते. हे माझ्या भावाच्या वात्सल्याने आणि सद्गुरूंच्या उपदेशाने जाणून मी या श्रेष्ठ अवस्थेला

पावलो आहे. या माझ्या भाग्याचे मोजमाप कोण करू शकेल?

## अलर्काख्यानाचा समारोप.

असे लोकांना उद्देशून गाणाऱ्या अलर्काने श्रीदत्तगुरूंनी सांगितलेले साधन उत्तम प्रकारे करून निर्विकल्प समाधी प्राप्त केली आणि परमानंदांत निमग्न झाला. प्रारब्ध संपल्यावर आपल्या प्राणायामाने टाळूच्या जागी असलेल्या सहस्रार चक्राचा भेद करून त्याने स्थूल देहाचा त्याग केला आणि तो परब्रह्माशी ऐक्य पावला. नामरूपातीत झालेल्या त्या मदालसानंदनाचे चरित्र अजूनही साधुसंत गात असतात. ९२-१००.

दुसऱ्या अध्यायांत ज्या जडवत वाटणाऱ्या योगभ्रष्ट पुत्राने – मार्कंडेय पुराणांत याला सुमति असे म्हटले आहे, आपल्या पित्याला हे सर्व दत्तचरित्र सांगितले आहे. इथे त्याचा समारोप झाला आहे. वेदधर्मा संदीपकाला सांगतात की तो महाज्ञानी पुत्र वडिलांना – भार्गव मुनींना ह्या सर्व कथा ऐकवून वनांत गेला. भार्गव मुनीनीही वैराग्याने दत्तात्रेयांची अपासना केली आणि तोही लवकरच मुक्त झाला. अलर्क, आयुराजा, कार्तवीर्यार्जुन, यदु, प्रह्लाद, पिंगल नाग, साध्य ब्राह्मण हे सर्व दत्ताचे नित्य भक्त आहेत. ह्यांनी कालचक्राचाही भेद करून आपल्या भक्तीने ब्रह्मांड गाजविले आहे आणि शेवट गोड करून ते अखंड परमात्मरूपांत मिळून गेले. जे जे मानव असे भजन करतात ते सर्व संसारसागरांतून तरून जाऊन पुनरावृत्तीरहित सच्चिदानंदस्वरूपांत विलीन होतात. हे वेदमाउलीचे आश्वासन आहे. ह्याच्यावर श्रद्धा ठेवून सतत दत्तभजन करतात ते निश्चयाने मोक्ष पावतात. आतां पुढच्या अध्यायांत आयू राजाच्या आख्यानाला प्रारंभ होईल तो श्रोत्यांनी सावध चित्ताने ऐकावा.

.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सदतिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

याच्या पुढील ग्रंथांत प्रत्येक ओवीचे तिसरे अक्षरे एकापुढे एक अशी वाचली असतां

| | | |
|---|---|---|
| अ. ३९ आरंभापासून | अ. ४३ ओवी ९१ पर्यंत | मांडूक्योपनिषद |
| अ. ४३ ओवी ९२ पासून | अ. ४४ ओवी ६३ पर्यंत | भद्रं कर्णेभिः..' व 'स्वति नो' हे शान्तिपाठ |
| अ. ४४ ओवी ६४ ते | अ. ५० ओवी ४३ | ईशावास्य.. |
| अ. ५० ओवी ४४ ते | ओवी ७५ | पूर्णमदः ... |
| अ. ५० ओवी ७६ ते | अ. ५१ शेवटपर्यंत | 'अतो देवा' आदि मंत्र गुंफलेलें आहेत. |

ह्यामागे श्रीमहाराजांचा उद्देश वाचकाला श्रीदत्तमाहात्म्याच्या पठणाबरोबरच ह्या मंत्रांच्या अप्रत्यक्ष अनुष्ठानाचाही लाभ व्हावा असा असावा. स्त्रीशूद्रादिकांना हे मंत्र निषिद्ध आहेत. पण या ग्रंथांत हे असे गुंफल्याने नकळत त्यांचे पठण, शास्त्रमर्यादा न ओलांडता होते. जनसामान्यांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी श्रीमहाराजांची कळकळ यांतून स्पष्ट होते. अर्थात् केवळ हे मंत्र मात्र वाचूं नयेत.

---

## अध्याय ३९ वा.

पुरूरव्याचा लेंक। आयुनाम पुण्यश्लोक। पुत्र नाहीं म्हणून करी शोक। होई सेवक दत्ताचा ।।८०।।
तो वयःप्रमाण बरेंच। दत्तसेवेंत करी खर्च। मिळवी प्रसाद साच। कथन हेंच एकुणचाळिसाव्यांत।।८१।।

### भगवद्भजनाचा महिमा.

या अध्यायाच्या प्रारंभी आयुराजाच्या आख्यानाचा उपक्रम करण्यापूर्वी प्रार्थनेच्या निमित्ताने श्रीस्वामी महाराजांनी भक्तिमार्गातील कांही महत्त्वाचे सिद्धांत मांडले आहेत. भगवान दत्तात्रेय हे सर्वात्मक आहेत. विश्वात्मक आहेत. सर्व देवांचेही देव आहेत. त्यांचे भजन करणारा परंपरेने सर्वच देवांना, सर्वच विश्वाला तोषवितो. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या उक्तीनुसार "**जैसे मूळसिंचने सहजे। शाखापल्लव संतोषती।।** १:२५।। " हे भजन करणारा जरी पापी असला तरी भजनाने त्याचा उद्धार होणारच, हा दुसरा मोठा सिद्धांत आहे. पापांचा नाश करणे हा हरिनामसंकीर्तनाचा स्वभाव आहे. त्यामुळे दुष्टांच्याही मुखांत ते हरीचे नाम चुकूनही आले तरी पापनाशाला कारण होते. नकळत जरी पाय विस्तवावर पडला तरी भाजणार नाही काय? **'हरिर्हरति पापानि दुष्टचित्तैरपि स्मृतः। अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः'** श्रीमद्भागवताचेही हेच प्रतिपादन आहे. अजामिळाने आपल्या पुत्राला बोलावण्यासाठी घेतलेले नारायण हे नांव त्याच्या उद्धाराला कारण झाले. त्या वेळी यमदूतांना विष्णुदूतांनी हेच सांगितले आहे. भगवंताचे नांव हे संकेत म्हणून, थट्टेने, गाण्याच्या सुरांत किंवा किंवा अगदी अवहेलनेने जरी घेतले तर पापाच्या निःशेष नाशाला कारण होते. **साङ्केत्यं पारिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा। वैकुण्ठनामग्रहणमशेषाघहरं विदुः।। ३:२:१४।।** नाल्याचे पाणीसुद्धां गंगेला मिळाल्यावर गंगाजळच होत नाही का? हाच दृष्टांत श्रीज्ञानेश्वर माउलींनीही दिला आहे.

**तैसे तंवचि वहाळ वोहळ। जंव न पवती गंगाजळ।**
**मग होऊनि ठाकती केवळ। गंगारूप।।**

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

**कां खैरचंदन काष्ठें। हे विवंचना तंवचि घटे।**

**जंव न घापती एकवटें। अग्नीमाजीं।। ज्ञानेश्वरी ९:५८-५९।।**

ही हरिभजनाची शक्ति गीतेंतही ठामपणे मांडलेली दिसते. अत्यंत दुराचारी जरी असला तरी एकदां तो अनन्यभावाने भगवंताला शरण गेला की तो साधूच मानावा.

**अपि चेत्स दुराचारो भजते मामनन्यभाक्।**

**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः।। भ.गीता ९:३०।।**

यावर कुणी असा आक्षेप घेतील की श्रुति-स्मृतींतून भगवंतांनीच ज्या आज्ञा केल्या आहेत त्यांचा भग करणाऱ्यावर त्यांचा रोष होणार नाही कां? त्याचे उत्तर असे आहे की भजन तसाच भक्तही हे भगवंताला अत्यंत प्रिय आहेत. त्या प्रेमाच्या भरांत भक्ताचा अपराध देवाला दिसतसुद्धां नाही. दोषांचे अदर्शन हेच वात्सल्याचे लक्षण सांगितले आहे. तेव्हां कुणीही कसेही भगवंताचे भजन केले तर ते उद्धारालाच कारण होते हा सिद्धांत अबाधित आहे. यावरही हटवादीपणे जर कुणी हे मानले नाही तर तो त्यांचा दोष आहे. "**इथे कुणाचे काय बा गेले। ज्याचे त्यानेच अनहित केले।।**," हे उद्गार संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी त्यांना उद्देशूनच काढले आहेत. आप्त म्हणजे अधिकारी पुरुषाने निरपेक्षपणे सांगितलेले हितकर सत्य ऐकले नाही तर तो सांगणाऱ्याचा दोष ठरत नाही. १ – ४.

## अवताराचे माहात्म्य.

भगवान दत्तात्रेय हे करुणेचा सागर आहे. नित्य उचंबळणारी त्यांची करुणा अपार आहे. संसाराच्या वणव्यांत होरपळणारे हे जीव पाहून त्यांनी अत्रि ऋषींच्या पोटी जन्म घेतला. "**बुडती हे जन देखवेना डोळां। म्हणोनि कळवळा येतसे।**", हे त्या दयाघनाच्या अनुकंपेचेच पडसाद आहेत. ह्या लोकांना स्वात्मसौख्याची वाट दाखविण्यासाठी, सत्य, जाणीव आणि आनंद ह्यांचा निराकार असीम घन असे ज्याचे स्वरूप वर्णन करतात, त्या परमात्म्याने मायेचा आश्रय करून जन्मादि विकारांचा अंगीकार करावा ह्यापेक्षां त्याच्या दयालुत्वाची दुसरी साक्ष काय आहे? **अजोपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोपि सन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया।।** श्री.भ.गी.४।६।। हेच श्रीदत्तावताराचे प्रमुख कार्य आहे आणि त्यासाठीच ते अनेक रूपें धारण करतो. ह्या संसारांत सर्व कांही सुलभ आहे. पण जन्मरणांच्या अखंड फेऱ्यांतून सुटका होणे कठिण आहे. तेच आम्हाला सोपे करण्यासाठी दत्तप्रभू विविध रूपांनी ह्या लीला करतात. दुष्टांना दंड आणि सुष्टांचे पालन हेच त्या लीलांचे उद्देश्य आहेत. **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे।।** श्री.भ.गीता-४: ८।। इथे कुणाविषयी द्वेष नाही की कुणाचा पक्षपात नाही. दुष्टांचे दमन करतांना त्यांच्या दुष्टपणाचाच नाश होतो. त्यांचा परिणति आध्यात्मिक उन्नतीतच होते. उन्मार्गगामी दुष्टांना सन्मार्गाला लावणे हेच दत्तप्रभूंचे कार्य आहे. तसेच जे सज्जन आहेत त्यांच्यांतील दैवी संपत्तीची वाढ करणे हाच योगक्षेम आहे. अशा रीतीने तुझ्या लीला आम्हां सर्वच मानवांना तारक आहेत. ५:९.

### भगवल्लीलांचे माहात्म्य

अंतःकरणाची शुद्धी हेच सर्व आध्यात्मिक साधनांचे प्रमुख लक्ष्य आहे. यासाठीच तुकाराम महाराज म्हणतात, "**सकळांचे पायीं माझे दंडवत। आपुलाले चित्त शुद्ध करा।।**" ज्या प्रमाणांत चित्तशुद्धी होत जाते त्या प्रमाणांत परमेश्वर त्या चित्तांत प्रकाशतोच. त्या चित्तशुद्धीसाठी भगवंताच्या लीला सांगणे, ऐकणे, त्यांचे स्मरण करणे, करून देणे यांसारखा सोपा उपाय अन्य नाही असे ठाम प्रतिपादन श्रीस्वामी महाराज करीत आहेत. भगवंतांच्या गुणांच्या आणि लीलांच्या कथन-श्रवण-

स्मरणादिकांनी मन त्या अंतर्यामी हरीकडे, समुद्राला मिळणाऱ्या गंगेच्या ओघासारखे अविच्छिन्न प्रवाहित होते. हे भक्तीचे मुख्य लक्षण भागवतांत सांगितले आहे.

**'मद्‌गुणश्रुतिमात्रेण मयि सर्वगुहाशये । मनोगतिरविच्छिन्ना यथा गङ्गाम्भसोऽम्बुधौ ।।**
**लक्षणं भक्तियोगस्य निर्गुणस्य ह्युदाहृतम् ।।'** (भाग. ३।२९:११-१२)

अचपळ म्हणजे अतिचपळ असे ज्या मनाचे वर्णन समर्थांनी केले आहे ते ह्या हरिकथांच्या श्रवणांनी वेधून तात्काळ स्थिर आणि विकल्परहित होते. तुझ्या कथांचे सेवन करणाऱ्याला हे सर्व दृश्य ब्रह्मस्वरूप असल्याची अनुभूति सहज येते. भजन करण्यासाठी उपास्य आणि उपासक यांचे द्वैत कल्पावे लागते. ह्या कल्पित द्वैताचीच परिणति सर्व द्वैतांच्या निरसनांत होतो हे तुझ्या लीलांचे मोठेच कौतुक आहे. यासाठीच श्रीदत्तभावसुधारस या स्तोत्रांत महाराज म्हणतात.

**स्वलीलया त्वं हि जनान्पुनासि तन्मे स्वलीलाश्रवणं प्रयच्छ।।**
**तस्याः श्रुतेः सान्द्रविलोचनोऽहं पुनामि चात्मानमतीव देव।।१६।।**

# सगुणोपासनेची सुलभता आणि आनंद

परमेश्वराचे सर्वव्यापी निर्गुण स्वरूपाचे आकलन करण्यासाठी विवेक, वैराग्य, मुमुक्षा आणि शमदमादि दैवी संपत्तीची जोड करावी लागते. असा उत्तमाधिकार नसेल तर ते बुद्धीला ग्रहण करणे अशक्य आहे असे वेदांचे सांगणे आहे. गीताही अव्यक्ताच्या उपासकांना अतीव कष्टांना सामोरे जावे लागते तरीही ते दुष्प्राप्यच आहे, असेच सांगते (**क्लेशोधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम्। अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते।। १२:५।।** ) शास्त्राचा कितीही गाढा विद्वान असला आणि शास्त्रांची प्रमेये सर्वांना समजावण्यात आणि पटविण्यात कितीही कुशल असला तरी त्याची बुद्धि निर्गुणाला आकळूं शकत नाही. मग त्या स्वरूपांतला निरतिशय आनंद त्याला कुठून मिळणार? दत्तप्रभूंच्या सगुण रूपाच्या ध्यानाने तो आनंदही आम्हांला सुगम आहे. भागवतांत म्हटल्याप्रमाणे "तुझ्या पादपद्मांच्या ध्यानाने, भजनाने वा कथांच्या श्रवणाने जे आत्यंतिक सुख देहधारी मानवांना होते ते स्वयंभू ब्रह्मदेवालाही होत नाही, काळाच्या खड्गाने विमाने तोडल्यावर पुनश्च भूतलावर येणाऱ्या देवांची काय गोष्ट?"

**'या निर्वृतिस्तनुभृतां तव पादपद्म- । ध्यानाद्भवज्जनकथाश्रवणेन वा स्यात् ।**
**सा ब्रह्मणि स्वमहिमन्यपि नाथ माभूत् । किं स्वन्तकासिकुलितात् पततां विमानात् ।।'**

श्रीभागवत पुराण ४:९-१०।।

दत्तच सर्व जीवांचा एकमेव नियामक आहे. अर्थात तोच आपला एकुलता एक तारक आहे ह्यांत काय संशय? वस्त्रांत आडवा-उभा जसा एकच धागा गुंफलेला आहे तसेच हे सर्व जगत त्याच्या रूपाने व्यापलेले आहे. त्यांत द्वैत कुठून येणार? म्हणून स्वामी महाराज म्हणतात, "दत्तगुरो! मी तुझा आहे तरी तूं मात्र माझा नाहीस." कारण भ.पू.पा. आचार्यांनी म्हटल्याप्रमाणे तरंग समुद्राचा असतो तरी समुद्र मात्र तरंगाचा होत नाही.

**सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्।**
**सामुद्रो हि तरङ्गः क्वचनपि समुद्रो न तारङ्गः।।** षट्पदीस्तोत्र।।

ह्या प्रार्थनेच्या समारोपांत महाराज मागतात, "हा माझा भक्तिभाव आणि प्रेम असेच वाढत राहूं दे. ह्या सद्भावाच्या द्वारां तूंच आपले चरित्र वदवून घेतोस आणि माझ्या चित्ताला स्वतःच्या प्रेमरज्जूंत गुंतवून ठेवतोस. तुझे चरित्र म्हणजे तुझ्या भक्तांचेच चरित्र ! त्यांच्या श्रवणाने श्रोत्यांचे

मोह आणि शोक दूर होतात. आपले प्रिय शिष्य कार्तवीर्य आणि अलर्क यांची कथानके आपण माझ्याकडून वदविलीत. आतां इतरांचीही कथानके सांगण्याची माझी इच्छा पुरवावी. " १०-२४.

ही विनवणी ऐकून गुरुनाथांना कृपा उपजली आणि त्यांनी कवीच्या चित्ताला स्फूर्ति दिली. त्या स्फूर्तीच्या प्रभावाने दीपकाने गुरु वेदधर्मा यांना आयुराजाच्या कथेविषयी केलेल्या प्रश्नाचे स्मरण झाले. गुरुमुनींना दीपकाने विचारले, "आयुनांमक दत्तभक्त होऊन गेला त्याचे रसाळ आख्यान मला सांगा. या भक्तकथेची अशी अपूर्वाई आहे की देवादिकांनासुद्धा ती आनंददायक आहे. मग मानवांच्या मनांत भावभक्तीचा पूर त्यांनी यावा यांत नवल काय? ह्या कथांसारखे मनमोहन दुसरे कांहीच नाही या निश्चयानेच मी आपल्या चरणांचा आश्रय केला आहे. आणखी एक नवल असे आहे की ह्या हरिकथा ऐकत असतांना ज्या शंका निर्माण होतात त्यांचे समाधान त्यांच्या श्रवणानेच होत जाते." हे दीपकाचे लाघवी पण निश्चयाचे बोलणे ऐकून गुरुमुनि प्रसन्न झाले आणि महायोगी दत्तात्रेयांचे स्मरण करून त्यांनी सांगायला आरंभ केला. २५-३१

## आयुराजाचे दुःख.

सोमवंशांत पुरुरव्याला उर्वशीपासून झालेला पुत्र आयु राजाने दत्तभक्ति केला. तो राजा धर्मदक्ष आणि उदार होता. त्याने सर्व पृथ्वी जिंकून आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली होती. असा तो राजा आपल्या प्रजेचे पुत्रवत् पालन करी. गुन्हेगाराला शासन करण्यांत जसा तो दक्ष होता तसाच निरपराध्याला शासन होऊं नये ह्याचीही तो काळजी घेई. ब्राह्मणांचा मानसन्मान करीत असे. तो सत्यवचनी, प्रजावत्सल, शरणागतांचा त्राता आणि दुष्टांचा कर्दनकाळ होता. त्याला देवांनाही दुर्लभ अशी सर्व सुखे प्राप्त होती. पण त्याच्या घरी संतान नव्हते. ही एक उणीव त्याला सतत कांट्यासारखी सलत होती. ब्राह्मणांनी, वैद्यांनी सांगितलेले सर्व उपाय करून झाले. पण त्याच्या घरी बाळ जन्माला आले नाही. अखेर त्याने पुत्रकामेष्टी केली तरीही उपयोग होईना. तो वरचेवर निराश आणि खिन्न होत चालला. आपला वंश पुढे चालणार की नाही अशा घोर चिंतेने त्याच्या मनाला ग्रासून टाकले. आपल्या पितरांना आणि आपल्यालाही अधोगतीला जावे लागणार ह्या कल्पनेनेच तो कासावीस होऊं लागला. 'अपुत्रस्य लोको नास्ति' ह्या वचनानुसार ज्याला पुत्र नाही त्याला स्वर्गादि ऊर्ध्वलोकांत प्रवेश नाही. कुळाचा आणि गोत्राचा नाशच ओढवणार अशा भीतीने तो व्याकुळ झाला. पुत्रच झाला नाही तर आपण केलेल्या दानधर्माचा, होमहवनाचा, जपजाप्याचा काय उपयोग? अशा शंकांचे काहूर त्याच्या मनांत उठले. मग त्याने राज्यांतील कुशल ज्योतिष्यांना बोलावून त्यांना यावर उपाय विचारला. त्यांनी त्याची पत्रिका पाहून असे सांगितले की "तुझ्या कुंडलीत पुत्रप्राप्तीचा एकसुद्धां योग नाही. गुरूच्या स्थानाचा स्वामी कुंडलीतील सहाव्या, आठव्या किंवा बाराव्या घरांत असेल तर तो निपुत्रिक होतो. तसेच जन्मलग्न, पंचम स्थान आणि नवम स्थान यांचे स्वामी वरील तीनपैकी स्थानांत असले तरीसुद्धां संतती होत नाही." ज्योतिषशास्त्रांत एक असा दंडक आहे की एखादा पत्रिकेतील अशुभ योग सांगितला तर त्याचा कांही तरी उपायसुद्धां सांगितला पाहिजे. त्यानुसार त्या ज्योतिषांनी राजाला सांगितले कीं, "जे सद्गुरूचरणांची उपासना करतात म्हणजेच साधुसंताची सेवा करतात त्यांना ग्रह अनुकूल होतात. इंद्रियांना बाह्य विषयांपासून मिळणारे सुख टाकून देऊन जे आत्मस्वरूपांत रमले आहेत अशा ब्रह्मनिष्ठ सत्पुरुषाचे चरणसेवेने मानवाला काय दुर्लभ आहे?"

हे दैवज्ञांचे वचन ऐकून आयु राजाने त्यांचे पाय धरून काकुळतीने विनवणी केली. "तुम्ही सर्व श्रेष्ठ ब्राह्मण आहांत. भूलोकावरचे साक्षात् ब्रह्मच आहांत. मी तुम्हाला शरण आलो आहे. माझे रक्षण तुम्हीच करूं शकतां. देवादिकांनाही न कळणारे तुम्ही जाणतां. तेव्हां आपणच मला मार्गदर्शन करा !"

त्याच्या आर्त बोलण्याने ते ज्योतिषी कळवळले. ते म्हणाले, "राजा! तूं सह्यपर्वतावर जाऊन अत्रिपुत्र दत्ताचे पाय धर! मातापूर (आजचे माहूर) गांवासमोरच्या सह्याद्रीच्या शिखरावर तो अनसूयानंदन वास करतो. सर्वांच्या अंतरात्म्यांत आनंदरूपाने राहणारा देवच तो आहे. त्याची भक्ती केलीस की तो तात्काळ तुझ्या कामना पुरवील. साक्षात् परब्रह्मस्वरूप असलेले दत्तात्रेय भक्तांचे वाली आहेत. त्यांच्या चरणी लीन झालास तर तुला नक्कीच पुत्रप्राप्ती होईल. विधिलिखतही पालटूं शकणाऱ्या श्रीदत्तप्रभूंचा पदस्पर्श झाला तर अलभ्यांतले अलभ्यही सहज मिळते.भक्तांच्या प्रीतीसाठीच तो निराकार भगवंत दत्तरूपाने साकारला आहे. त्याची चाकरी केल्याने काय मिळणार नाही? पण एक लक्षांत ठेव. दत्तप्रभू भक्तांची परीक्षा पाहतात. तेव्हां तूं अजिबात घाबरूं नकोस. धीराने आणि भक्तिभावाने त्यांची सेवा कर म्हणजे हवा तो वर तो प्रभू तुला देईल. हे राजा! त्याची महती गातांना देवादिकसुद्धा शिणतात त्याचे महत्त्व आम्ही यःकिश्चित् मानव काय करणार? आम्ही हेच वारंवार सांगतो की तूं जाऊन त्या महात्म्याचे पाय धर. " ३२-६३.

## आयुराजाची दत्तसेवा.

त्यांच्या सांगण्याने राजाला धीर आला आणि तो टाकोटाक सह्याद्रीच्या शिखरावर दत्तप्रभूंच्या समोर उपस्थित झाला. सिद्धासनावर ध्यानस्थ असलेल्या श्रीदत्तप्रभूंना पाहून त्याने आनंदून त्यांना भक्तिभावाने साष्टांग दंडवत घातला. ती मूर्ति पाहून त्याचे सात्त्विक भाव उचंबळून आले आणि गहिंवरल्या कंठाने तो बोलूं लागला. "खरोखर मी आज पवित्र झालो! ह्या जगद्रूपी जाळ्यांत सांपडून अनेक योनींचे कष्ट भोगले. माझ्या पूर्वपुण्याईने आज हे योग्यांना आणि याजकांनाही दुर्लभ असे भगवद्दर्शन झाले." आयुराजा असे स्वतःशीच बोलत असतां दत्तप्रभूंनी एकदम चित्र पालटून टाकले. आपल्या अनिर्वचनीय मायेला तरुण स्त्रीचे रूप देऊन तिला मांडीवर घेतले आणि तिच्यासह आलिंगन-चुंबनादि प्रणयाचे चाळे सुरूं केले. ते पाहून राजाला थोडा वीट आलाच. पण त्याने विचार केला की 'मला मोहविण्यासाठी प्रभू लीला करीत आहेत. ह्या नानानाटकसूत्रधाराचा पार कुणी जाणला आहे? ' तो ह्या एवढ्याने परत फिरत नाही असे पाहून दत्तप्रभूंनी रुद्रावतार धारण केला. "अरे राजा! इथून ताबडतोब निघून जा! तुला कळत नाही का की मी संस्कारहीन, बहिष्कृत आहे? तूं इथवर यायलाच नको होते. आतां जर लगेच परतला नाहीस तर तुझ्या प्राणावर बेतेल! तूं एवढा धर्मनिष्ठ राजा आहेस तर मी वर्णबाह्य आहे. आतां जर तूं निघाला नाहीस तर तुला माझा शाप होईल." त्यावर राजाने पुनश्च नमस्कार केला व बोलला, "महाराज, सर्व वर्ण आण आश्रम ज्या वेदत्रयीने बांधलेले आहेत ती आपलीच तर वाणी आहे. आपल्या स्वरूपाला जाणणारेसुद्धां त्या वेदांना शिरोधार्य आहेत. मग आपले काय सांगावे?

वर्णा बद्धा यया त्वद्वाक् सा त्रयी तच्छिरस्यज। वर्तते त्वत्स्वरूपज्ञो बन्धस्ते किं पुनस्तया।।८।।

शिवाय, ज्ञानी पुरुष शाप देत नाहीत हे मी जाणतो. आणि मी तर आपला शरणागत आहे. मला आतां कोणतेच भय नाही. आपण समर्थ आहांत, शापिताला सोडवणारे आहां. आपण मला शाप द्याल हे मुळीच शक्य नाही. मी आतां आपले पाय सोडणार नाही." मग मात्र दत्तप्रभूंनी त्या राजाला खरेच मारायला सुरुवात केला. तरीही, "आपणच माझी माउली आहांत. आपल्या कृपाछायेत

आल्यावर आतां मी माघारी फिरणार नाही. आईने मार दिला तरी ती लेकराचे लाड पुरवतेच” असे लाघवी बोलून, दत्तगुरूंनी कितीही लोटले, बडवले तरी राजा मन घट्ट करून वारंवार पायांवर पडूं लागला. ६४-८१

अखेर त्याचे अंतःकरण ओळखून दत्तप्रभूंनी त्याला एका अटीवर आश्रमांत परवानगी दिली. ती अट म्हणजे राजाने दत्तप्रभू सांगतील ती सेवा चूपचाप करायची. आपण सेवेत कसलाही अनमान वा कसूर करणार नाही असे राजाने मान्य केले. लगेच प्रभूंनी त्याला रोज मानवी कवटींतून ताजे मद्य व मांस आणून द्यायची आज्ञा केली. राजाने विचार केला 'अखिल ब्रह्मांडाचा आणि त्यांना धारण करणाऱ्या वेदत्रयीचाही उद्गम ज्याच्यापासूनच झाला आहे अशा दत्तप्रभूंना मांस अर्पण करण्याने मला पशुयागाचे फळ मिळेल तसेच मद्यार्पणाने सोमयागाचे फळ मिळेल. ' म्हणून राजाने अत्यंत श्रद्धापूर्व ती सेवा आरंभिली

तथेति साक्षात्स पशुसोमबुद्ध्याऽण्डयोनये।
यथेष्टं संस्कृतं रुच्यं तथादाच्छास्त्रयोनये।। **श्रीदत्तचंपू ३:१७।।**

# आयुराजाला पुत्रप्राप्तीचा वर.

आणि ज्याला यज्ञांतील हवींनीही तृप्त करणे अत्यंत दुष्कर आहे असा तो परमात्मा आयुराजाने प्रीतिपूर्वक दिलेले मद्य व मांस सेवून तृप्त झाला. प्रसन्न होऊन दत्तगुरु त्याला महणाले, “राजा! तूं बोलल्याप्रमाणे वागलास. मला हवे ते देऊन तृप्त केलेस. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला हवा तो वर मी देतो.अरे, हे मंदमतीचे लोक माझे स्वरूप जाणत नसल्याने माझ्या वागण्याचा विपरीत अर्थ लावून मला दोष देतात. ते केवळ स्थूल दृष्टीनेच माझ्याकडे पाहतात म्हणून फसतात. माझे स्वरूप व्यापक दृष्टीनेच पाहिले तर समजते. माझे अभोक्तृत्व आणि अलिप्तत्व न समजल्याने मी यज्ञाचा भोक्ता आहे एवढेच लक्षांत घेतात. पण मी तर केवळ साक्षित्वाने पहात असतो. मी कांहीही भक्षण करीत नाही वा भोगत नाही. कर्मफळे भोगणाऱ्या जीवाचे मी फक्त निरिच्छ निरीक्षणच करतो. ती फळे कडू आहेत की गोड आहेत याच्याशी माझा कांहीच संबंध नसतो. मीच वैश्वानर (अग्नि) होऊन प्राणापानांच्या सह अन्नाचे पचन करतो (**प्राणापानसमायुक्तं पचाम्यन्नं चतुर्विधम्।।** भ.गीता १५:१४।।) हे खरेच आहे. मीच सर्वांचा चालक आहे. मी त्या वैश्वानराच्याही आंत आहे सर्व विश्वाप्रमाणेच तोही माझेच स्वरूप आहे. पण त्याच्या भुक्तीच्या क्रियेपासून अलिप्त आहे. कारण त्या क्रियेचा संकल्प, कर्तृत्व किंवा फल यांच्याशीं माझा संबंध नाही.. मी केवळ पाहणारा- साक्षी, आहे. असा मी कर्ता असूनही अकर्ता आहे हे जो जाणतो तोच कर्मबंधनांतून मुक्त होतो. (**कर्ताऽप्यकर्ता यैर्ज्ञातो बध्यन्ते कर्मभिर्न ये।** द्वि.सा. गुरुस्तुतिः८।) श्रीमद्भगवद्गीतेचे हेच प्रतिपादन आहे. मला कर्माच्या फलाची आसक्ति नसल्याने ती कर्मे मला चिकटत नाहीत असे मला जो जाणतो तोसुद्धा कर्माच्या बंधनांत अडकत नाही.

**न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा।**
**इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते।।४:१४।।** ” ८१-९२.

या दत्तप्रभूंच्या बोलण्याने आयुराजा आनंदाने हरखून बोलला, “आपल्या प्रसादानेच मी पवित्र झालो आहे. आपणच देवाधिदेव भगवान विष्णु आहांत. आम्हांला वर देऊन आमचे मनोवाञ्छित पुरवा. देवा, मी पुत्रहीन आहे. मला देव आणि पितरांचा भक्त असलेला सुपुत्र हवा आहे. सन्मार्गावर चालणारा, देवाब्राह्मणांचा आदर करणारा, सर्वज्ञ आणि पूज्य असा पुत्र मला द्या. माझ्या क्षात्रकुळाला साजेल असा शूर, वीर, रणमर्द योद्धा तो असावा. पण अनाथांचा नाथ, दीनांचा कैवारी, न्यायी आणि

कर्तव्यदक्ष, दूरदर्शी राजाही तो व्हावा. मांडलिकांना नमविणारा युद्धपटु तरीही धर्मनिष्ठ, दानशूर, यज्ञ करणारा आणि शरणागतांना अभय देणारा असा पुत्र मला हवा. तो प्रजेचे पितृवत् पालन करणारा असावा तसेच प्रजेलाही प्रिय असावा. वडिलांचा, गुरूंचा आणि अतिथींचा सन्मान करणारा असावा. त्याचे यशोगान वीरांनीसुद्धां गावे आणि सर्व सभ्य जनांत त्याची प्रतिष्ठा असावी. ”

राजाऽऽह पुत्रं सर्वज्ञं देवविप्रपरं प्रभुम्। सुरासुरैरप्रजेयं कविं दक्षं प्रजापतिम्।।१२।।
पूज्यं शूरं रणक्रूरं शरणागतवत्सलम्। धार्मिकं देहि भोक्तारं यज्वानं च बहुप्रदम्।।१३।।
पितृगुर्वतिथिश्लाघ्यं धन्यं स्यां येन पूर्वजैः। प्रभुः प्राह तथैवास्तु पुत्रो वैष्णव उत्तमः।।१४।।

असे त्या उर्वशीपुत्र आयूचे बोलणे ऐकून दत्तप्रभू म्हणाले, “हे तुझे मागणे किती दुर्लभ आहे! पण तुझे मन मोडवत नाही कारण तू माझा भक्त आहेस. आणि मी तुला वर देण्याचे मान्यही केले आहे. तेव्हां तुला तसा वर मी देतो. पण आयुराजा! हा संसार खरोखरच स्वप्नवत् नाशिवंत आहे. हे पुत्रादिसुख शाश्वत थोडेच आहे? सर्व कांही कालवश होणारेच आहे. तरी माझ्या मायेने भुलून तू नश्वर पुत्रसुखाचा वर मागतो आहेस? आतां तू मागितली असतीस तर तुला मुक्तीही मिळाली असती! माझी कृपा संपादन केल्यावरही तुला नश्वर पुत्र मागण्याची बुद्धि झाली याचा अर्थ अजून ज्ञानाला प्रतिबंध आहे. असो ही सकाम भक्तीसुद्धा पूर्वपुण्याईवांचून घडत नाही. कालांतराने सकाम भक्ताचीही चित्तशुद्धि होत जाऊन तो अंतीं मोक्षाचा अधिकारी होतो. यासाठींच गीतेत (७:१६-१८) आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी हे चारही प्रकारचे भक्त उदार म्हणजे श्रेष्ठच आहेत असे म्हटले आहे.सकाळी शिजवलेले अन्न रात्रीपर्यंत नासून जाते. अशा अन्नाच्या रसाने पोसलेला देह कसा कायम राहील? हा रोजचा अनुभव असूनही लोक मोहांत पडतातच. माझीच ही माया माझ्या कृपेवांचून दूर होणार नाही. ” असे बोलून दत्तप्रभूंनी मनाशी ‘राजाचा यांत काय बरे दोष?’ असा विचार केला आणि राजाला म्हणाले, “तुला हवा तसा सर्वमान्य आणि विख्यात पुत्र तुला होईल!” मग त्याच्या हातांत त्यांनी एक फळ टाकले आणि “हे तुझ्या पत्नीला खायला दे” असे म्हणून त्याला निरोप दिला. राजाने त्यांना साष्टांग नमस्कार केला आणि त्यांची आज्ञा घेऊन आपल्या गांवी निघून गेला. इथे नमस्कारंत सात अगें आणि आठवे मन आहे .शिर, नेत्र, मुख, छाती, हात, गुडघे आणि पाय ही सात अंगे भूमीला टेकवतांना त्यांत मनाचा समावेश केला की साष्टांग (स+अष्ट+अंग) नमस्कार होतो.

.

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकुणचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.
## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ४० वा.
राजा दिव्य फळ दे राणीला। तिला गर्भ राहिला। तिणें स्वप्नीं देव पाहिला। शौनकें कथिला तदभिप्राय।।८२।।
महावीर्य हुंडासुर। गर्भा माराया हो सादर। दत्तप्रसादें जन्मला कुमार। हा प्रकार चाळिसाव्यांत।।८३।।

## सकाम भक्तीची थोरवी.
वेदधर्मा मुनि सच्छिष्याला सांगतात, "याप्रमाणे पुत्रप्राप्तीचा वर मिळवून आयुराजा घरी परतला. दीपका, एवढ्या ज्ञानी राजालासुद्धां साक्षात् दत्तप्रभूंचा प्रसाद होऊनही पुत्रापलीकडे कांही मागण्याची बुद्धि झाली नाही. भगवान दत्तात्रेयांनीही 'हा अर्थार्थी भक्त आहे' असा विचार करून त्याच्या इच्छेनुसार वर दिला. आर्त किंवा अर्थार्थी भक्तीने जरी कुणी भगवंताकडे गेला तरी क्रमाक्रमाने तीच भक्ती क्रमशः परा – ज्ञानोत्तर, भक्तीत परिणत होते. आपल्या इप्सिताच्या प्राप्तीसाठी वा संकटपरिहारासाठी कां असेना, इतर क्षुद्र देवतांची उपासना न करतां जो परेश्वराचीच आराधना करतो तो उशीरां कां होईना मुक्तीचा अधिकारी होतोच. इतर क्षुद्र देवतांची उपासना करणारा जन्ममरणरूपी संसाराच्या चक्रांतून सुटत नाही. आपण हे प्राप्त केले असा अहंकार आणि विषयाकडची ओढ वाढतच जाते. गांठीला तशीच मोठी पुण्याई असली तरच भगवंताची सकाम भक्ती घडते. त्याच भक्तीच्या प्रभावाने तो भक्त उत्तरोत्तर निरिच्छ होत जातो. ह्याच सिद्धांताचे अधिक स्पष्टीकरण श्रीस्वामी महाराजांनी द्विसाहस्रीच्या ९व्या अध्यायांत केले आहे. ते म्हणतात, "अशा अलौकिक, लोकांना सुखकारक लीला भगवान भक्तीच्या प्रसारासाठी करतात. या ना त्या प्रकारे लोकांनी आपल्याला भजावे हाच त्यांचा हेतु असतो. उपकार करणाऱ्याविषयी मानवांची स्वाभाविक कृतज्ञता लक्षांत घेऊन ते या लीला करतात. ह्या योगें लोक भगवंताच्या पायीं शरण जातात. या भजनानेच त्यांच्या चित्तांतील कामक्रोधादिक दोषांचे परिमार्जन होते. चित्तशुद्धी झाली की तेच सकाम भक्त मुमुक्षु होतात. मग वैराग्य उत्पन्न होऊन भगवंताच्या ध्यानाचा ते अभ्यास करतात. ह्या उपासनेनेच त्यांना सद्गुरूंचा महाप्रसाद लाभतो. सद्गुरूंनी उपदेशिलेल्या महावाक्यानेच अंती त्यांना (जीव-परमात्म्यांच्या) ऐक्याचे ज्ञान होते. त्याने अविद्येचा नाश होऊन त्या आत्मस्वरूपांत असलेल्या शाश्वत शांतीचे ते अधिकारी होतात." (द्वि.सा. ९:४९-५३)

**ईदृश्योऽलौकिका लीलाः कृता भक्तिविधित्सया। भजेयुर्मां कथमपि लोका इत्याशयोऽस्य तु ।।**
**लोके प्रत्युपकारित्वं समीक्ष्य भगवान्विभुः। लौकिकानन्दजनकां चमत्कृतिमिहाकरोत् ।।**
हेतुनानेन तल्लोका भजन्ति भगवत्पदम्। भजनादेव निर्धूत-मला यान्ति मुमुक्षुताम् ।।
ततोऽभ्यासाच्च वैराग्यात्तं ध्यायन्त उपासते । महाप्रसादोऽनेनैव लभन्ते सद्गुरोर्नताः ।।
ऐक्यज्ञानं तदा लब्ध्वा महावाक्येन चात्मनोः। शान्तिं विनिहिताविद्यास्तत्संस्थां यान्ति ते ध्रुवाम् ।। १-६.

आयुराजाने घरी येऊन आपल्या प्रिय पत्नीस हे शुभ वर्तमान सांगून ते फळ तिला खाण्यास दिले आणि म्हणाला, "सर्व देवांचा प्रमुख असणारा, पुण्यवान लोकांना सुमख (प्रसन्न) आणि आपल्या भक्तांसाठी सदैव उन्मुख असणाऱ्या दत्तप्रभूंनी हे फळ दिले आहे. आतां चिंता सोड. हे फळ तूं खाल्लेस की तुला पुत्र होईल आणि आपण इह-परलोकी सुखी होऊं. आपल्या कुळाची अभिवृद्धि होईल." राणीने आनंदाने ते फल खाल्ले. त्यानंतर ऋतुस्नात अवस्थेत योग्य काळी विधिवत ती आयुराजाशी रत झाली.

---
[१] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

त्या समागमाच्या फलस्वरूप तिने लगेच गर्भ धारण केला. रतिसुखाने सुखावून ती झोंपली असतांना तिला स्वप्नांत एका चतुर्भुज महापुरुषाचे दर्शन झाले. हातांत कंकणे, भुजांवर केयूर, गळ्यांत मोत्याचे हार, कांनांत कुंडले आणि श्वेत वस्त्रे धारण केलेला तो दिव्य पुरुष आपल्या तेजाने दिशा उजळून टाकीत होता. त्याच्या भक्तांनाच दिसणारे त्याचे स्मित मनाला मोहवीत होते. त्याच्या शिरावर रत्ना-माणकांनी मढविलेल्या अगणित शेषाच्या फणाचे छत्र होते. प्रसन्नतेने हंसत त्याने तिच्या हातांत अमोल मोती दिले आणि हातातल्या शंखाने तिच्यावर दुधाचा अभिषेक केला. ते स्वप्न पाहून तिला परमानंद झाला परम आश्चर्यही झाले आणि ती एकदम जागी झाली. जागी झाल्यावरही तिला ते स्वप्न स्पष्ट आठवत होते तरी ते दिसेनासे झाल्याची खंतही मनांत होती. ती विचार करू लागली, 'हे जे मी पाहिले ते परमेश्वराचेच दर्शन झाले का? ते असे एकाएकी नाहीसे कां झाले? माझे कुठले पाप आडवे आले ज्यामुळे विषयापासून पराङ्मुख होऊन ज्याचे भजन केले तो देव असा दुरावला? त्या शेषशायी भगवंताने एवढ्या प्रसन्नपणे आणि प्रेमभराने स्वप्नांत दर्शन दिले! मग तो असा अचानक गुप्त कां झाला? ' अशा विचाराने राणी इंदुमती आतुरतेने इकड-तिकडे पाहू लागली. पण ते रूप दृष्टीस न पडल्याने डोळे झांकुन ते मधुरतम रूप मनांत आणून त्या आनंदाचा पुनःप्रत्यय घेऊं लागली. हा दत्तप्रभूंचाच प्रसाद असा निश्चय करून तिने आपल्याला झालेले स्वप्नदर्शन पतीला सांगितले. झोंपेतून उठल्याबरोबर ते नाहीसे झाले हेही सांगितले. राजाला खूप आनंद वाटला. हे फारच चांगले आणि सूचक स्वप्न आहे असे वाटून त्याने राणीला परत न झोंपण्यास सांगतले. कारण पहांटेच्या वेळी पडलेली शुभ स्वप्नें परत झोंपल्यास फळत नाहीत. अशा वेळी निद्रेचा मोह केला तर फसगत होते. इंदुमतीही त्याच्या आज्ञेप्रमाणे झालेल्या स्वप्नाचे ध्यान करीत बसून पाहिली. अरुणोदय होतांच उभयतांनी स्नानादिक प्रातःकाळची कर्मे केली आणि शौनक मुनींना इंदुमतीच्या स्वप्नाचा अर्थ विचारण्यासाठी बोलावणे केले. ७-३१.

## शौनक ऋषींकडून स्वप्नाचे स्पष्टीकरण.

शौनक मुनींना राजाने हे इंदुमतीला पडलेले सुमंगल स्वप्न निवेदन केले. त्यावर ऋषि प्रसन्न झाले. म्हणाले, "तूं भाग्यवान आहेस. हे तुझ्या राणीला झालेले स्वप्न अत्यंत शुभसूचक आहे. श्रीदत्तांनी दिलेल्या फळाच्या प्रभावाने तुझ्या राणीने गर्भ धारण केला आहे. तुझ्या प्रयत्नांना यश आले आहे. हा गर्भ दिक्पालांच्या अंशांनी युक्त असल्याने चक्रवर्ती सम्राट होईल. तो महान तेजस्वी, विष्णुभक्त, धर्मनिष्ठ, वेदज्ञ आणि सोमवंशाला भूषणास्पद असेल. त्याची त्रैलोक्यांत सुकीर्ति होईल. दीनांचे पालन आणि सज्जनांचे रक्षण करून हा हुंडासुराचा वध करील. देवांचा पुढारी अग्नि याचे सर्व दिशांनी रक्षण करो आणि वरुण प्रसूतीपर्यंत याचे मृत्यूच्या पाशांपासून संरक्षण करो." असा आशीर्वाद देऊन आणि राजाने केलेल्या सत्काराचा स्वीकार करून शौनक मुनि स्वस्थानी परतले. ३२-४०

हे शौनक ऋषींचे भाकित स्वर्गातल्या देवांनी ऐकले आणि त्या राजदंपतीवर पुष्पवृष्टी केली. स्वर्गांत हुंडासुराचा शत्रू पृथ्वीवर जन्माला आल्याचा मोठाच उत्सव झाला. नेमक्या ह्याच वेळी हुंडासुराची सुंदर कन्या नंदनवनांत आली होती तिने ते वृत्त ऐकले. आयुराजा ज्या वेळी सह्याद्रीवर दत्तसेवेसाठी गेला होता त्याच वेळी हुंड नांवाचा असुर पृथ्वीवर कांचननगरीत जन्मला होता. त्याने सर्व भूमंडळावर वर्चस्व स्थापन केले होते आणि देवांनाही त्याचा धाक झाला होता. त्याने एकदां शुकाची कन्या अशोकसुंदरीला (श्रीदत्तपुराणांत हिला शिवकन्या असेही म्हटले आहे) बलात्काराने धरले. पण तिने त्याला झिडकारून, "आयुराजाच्या पुत्राकडून तुझा नाश होईल" असा शाप दिला. तिने तिला बंदीवान करून आपल्या कारागृहांत ठेवले होते. त्याची पुत्री नंदनवनांत खेळायला गेलेली असतां तिथे दोन चारण (एक स्तुतिपाठक देवयोनी) आपसांत बोलत होते. आपले संभाषण हुंडासुराची मुलगी ऐकत असेल याची

कल्पना त्यांना नव्हती. ते म्हणाले, “हा हुंडासुर निश्चिंतपणे गाफील असतांना देवांच्या रक्षणासाठी त्याच्या मृत्यूची योजना झाली असे खात्रीने वाटते. आयूचा मुलगा नक्कीच त्याला मारून टाकणार. निष्काळजी, मदांध, कार्य आणि अकार्य न जाणणारा तसेच गाय आणि ब्राह्मण यांना त्रास देणाऱ्याला मृत्यू लवकरच ग्रासतो. ” हे त्यांचे भाषण ऐकून ती हुंडकन्या तडक कांचननगरीला परतली आणि तिने हे वर्तमान आपल्या पित्याच्या कानांवर घातले. ४१-५०.

## हुंडासुराचा प्रयत्नवाद.

धनुष्य आणि भाता शस्त्रागारांत ठेवून निवांत बसलेल्या हुंडासुराला धक्काच बसला आणि त्याला अशोकसुंदरीचा शाप आठवला. त्याने अदृश्य स्वरूपांत इंदुमतीच्या जवळ येऊन पाहतां त्याला तिचे स्तन पुष्ट झाले असून त्यांची टोकें काळी झाल्याचे दिसले. त्यावरून त्याने ती गरोदर असल्याचे अनुमान केले. हिच्या पोटांत वाढणाऱ्या ह्या आपल्या शत्रूला गर्भांतच नष्ट करून टाकावे असा विचार त्याच्या मनांत आला. तेवढ्यांत तिच्या सभोंवती वेगाने फिरणारे झगझगीत सुदर्शन चक्र पाहून त्याला भयाने कांपरेच भरले. मागे सरकून तो पाहूं लागला की, ‘हिचे रक्षण कोण करते आहे? हिच्या चेहऱ्यावरच्या कांतीवरून नक्कीच हिच्या पोटांत माझा बलाढ्य शत्रू आला आहे. हिला आत्तांच संपवावी.पण हे चक्र माझ्या आड येते आहे. आतां कांही आपला उपाय चालत नाही. माझी बुद्धि चालेनाशीच झाली आहे माझ्या आयुष्याची दोरी तुटली की काय? तरीही आपण जीव वांचविण्याचा प्रयत्न करायलाच हवा.‘ असा विचार करून त्या दैत्याने राणी इंदुमतीला भयानक स्वप्न दाखविले. आपण प्रसूत होऊन आपल्या पोटीं डोके नसलेले आणि पोट फाटलेले असे विचित्र मूल जन्मतःच मरून आले आहे असे स्वप्नांत पाहून ती राणी दचकून उठली. ‘मला दत्तप्रभूंच्या वराने गर्भ राहिला असतां हे असे दुःस्वप्न कां बरे झाले असेल? ’ असा विचार करीत ती दत्तगुरूंचे स्मरण करूं लागली. सकाळी उठून स्नानादि उरकून तिने सूर्यनारायणाची प्रार्थना केली. “देवा श्रीसूर्या, सर्वप्रकाशका, भयनाशना, दिवाकरा, सुरश्रेष्ठा, त्रिमूर्ते! माझ्या दुःस्वप्नाचे निवारण करून ते सुस्वप्न कर. (भो देव सवितर्विश्वं दुरितं मे परासुव। परासुव च दुःस्वप्न्यं भद्रं यत्तन्म आसुव।। श्रीदत्तपुराण ६:१:३९ ।।) माझ्या मनाला प्रसन्नता येऊं दे. योगीश्वर दत्तांनी दिलेले फळ स्थिर होऊन सुखाने जन्मूं दे आणि आमचा वंश वाढूं दे. तूं जगाचा पिता (सविता) आहेस आणि आनंददाता आहेस.” अशा प्रकारे सूर्याला नमस्कार करून ती स्वस्थ झाली. वरील श्रीदत्तपुराणांतला श्लोक, ***‘विश्वानि देव सवितुर्दुरितानि परासुव। यद्भद्रं तन्म आसुव’*** या वैदिक मंत्राचा अनुवाद आहे. ह्याचा दुःस्वप्ननाशासाठी मंत्रासारखा उपयोग होतो असा श्रीस्वामीमहाराजांचा अभिप्राय दिसतो.

आपल्याभोंवती फिरणारे ते अग्नीसमान लखलखीत सुदर्शन तिला दिसत नव्हते. पण त्या दैत्याला त्याचा धाक होता. म्हणून त्याने हा तिच्या गर्भाला पाडण्याचा हा मायावी खटाटोप केला. पण तोही व्यर्थच झाला. मुनींनाच ध्यानगम्य असणारा तो दत्तच स्वतः रक्षणकर्ता असल्यावर त्याला हानि पोंचवण्याला सर्व भूमंडळांत कोण समर्थ आहे? आनंदस्वरूपाचे निधान असणाऱ्या दत्ताला ठकविणारी माया विश्वांत कुठे तरी असेल काय? त्यामुळे त्या हुंडासुराचे सर्व प्रयत्न विफळच झाले आणि इंदुमती राणीचा गर्भ सुखरूप वाढला. हुंडासुर मात्र आपल्याला अनुकूल वेळेची वाट पहात दबा धरून बसला. ५१-७८.

राजाने वेदज्ञ ब्राह्मणांना बोलावून योग्य वेळी पुंसवन, अनवलोभन, सीमंतोन्नयन इत्यादि संस्कार विधिवत् केले. कुळाच्या अभिवृद्धीसाठी ब्राह्मणाना विपुल धनाचे दान केले. अशा रीतीने दहा महिने झाले तरी इंदुमती प्रसूत झाली नाही. तेव्हां राजाला चिंता वाटूं लागली. हे विघ्न निवारण्यासाठी त्यांने

ब्राह्मणांच्या सल्ल्याने अश्विनीकुमारांच्या मंत्राने पाणी अभिमंत्रून ते पाणी राणीला पाजले. ते पाणी पीतांच राणी विनासायास प्रसूत झाली आणि बाळ जन्माला आले,

हा मंत्र ही गर्भाच्या वतीने केलेली प्रार्थना आहे. **दस्रौ** हे अश्विनीकुमारानो **अदः वचः शृणुतं** ही माझी प्रार्थना ऐका **च** आणि **भीतं नाथमानं** भयाने तुमची याचना करणाऱ्या **सप्तवध्रिं** सप्तधातूंनी वेष्टिलेल्या **दशमास्यं ऋषिं** दहा महिने पूर्ण झालेल्या गर्भाची **यथासुखं मुञ्चतम्** सुखपूर्वक सुटका करा। (मूळ वैदिक मंत्र - **श्रुतं मे अश्विनौ हवं सप्तवध्रिं च मुञ्चतम्। भीताय नाधमानाय ऋषये सप्तवध्रये**) वैदिक मंत्राचे अनुष्ठान ब्राह्मणेतरांना करतां येत नाही. त्यासाठी श्रीमहाराजांनी खालील मंत्र सर्वांसाठी सांगितला आहे.

**श्रुतं हवं मेऽश्विनौ द्राक् सप्तवध्रिं च मुञ्चतम्।**

**नाथमानमृषिं भीतं दशमास्यं यथासुखम्।।**

ह्या मंत्राच्या बारा आवर्तनांनी पाणी अभिमंत्रून ते अडवलेल्या स्त्रीस दिले असतां सुखाने प्रसूति होते. ७९-८५.

## नहुषाचा जन्म.

जन्मतः त्या बाळाचा दिव्य प्रकाश पडला, जणुं काही विश्वांतले सगळे तेज एकवटून बाळाच्या रूपाने प्रकटले होते. त्या समयीं पांचही मुख्य ग्रह परमोच्चस्थानी (वर्गोत्तम) होते आणि शुभ योगांनी गर्दी केली होती. कोणत्याही ग्रहाचा अस्त नव्हता. पुरुषोत्तम दत्ताचा तो प्रसाद मध्यरात्रीं प्रकटला होता. रात्र असूनही त्या बाळाच्या तेजाने दिवे मंदावल्यासारखे भासले. राजाला हे वृत्त समजतांच तो आनंदून सूतिकागृहांत आला. आकाशांतला सूर्यच भूतलावर यावा अशा त्या तेजस्वी बालकाला पाहून आपण सर्व ऋणांतून मुक्त झालो अशी धन्यता त्याला वाटली. मग त्याने स्नानादि करून ब्राह्मणांना बोलावून जातकर्म केले. ब्राह्मणादिकांस भरपूर धन वाटले. नांदीश्राद्ध करून सोन्याच्या वाटीने बाळाला मध आणि तूप पाजले. त्या वेळी तेथे ज्योतिषज्ञ आले आणि बाळाची कुंडली मांडून भविष्य सांगूं लागले. "राजा! एवढा श्रेष्ठ राजयोग आमच्या ऐकण्यांतसुद्धां. हा पृथ्वीचा सम्राट तर होईलच, पण हा स्वर्गावरही आधिपत्य गाजवील असे योग आहेत. चंद्राला सोळाच कला असतात; हा चौसष्ट कलांचा आणि चौदाही विद्यांचा जाणता होईल. तीनही लोकांत हा प्रसिद्धी पावेल. तुझे मोठेच पूर्वपुण्य, म्हणून तुला असा महावीर, दानशूर आणि धर्मनिष्ठ पुत्र झाला आहे. हा गोरगरीबांचा कैवारी आणि दुष्टाचा वैरी आहे. परंतु हा बाल्यावस्थेतच तुमच्या शोकाला कारण होईल असे योग आहेत. याची तुलना कोणाशी करावी तेच आम्हांला समजत नाही." हे त्यांचे भविष्य ऐकून राजाने त्यांना एक गांवच दान दिला. त्या भाकिताने त्याला आनंद वाटला; पण भावि दुःखाची चिंताही वाटूं लागली. त्याचे निवारण व्हावे म्हणून त्याने ब्राह्मणांकरवी अनुष्ठाने करविली. आणि मनोमन आपल्याला पुत्ररूपी प्रसाद देणाऱ्या दत्तप्रभूंची प्रार्थना केली. "माझआ सगळा भार दत्तचरणांवरच. तेच आपले वचन सत्य करतील. अनन्य भावाने मी त्यांचे पाय धरले आहे. आतां वरचेवर काय मागायचे? 'सर्वांच्या हृदयांत मी सामावलेला आहे' असे त्यांचे आश्वासन आहे. त्या अंतर्यामी प्रभूला वेगळे कांही सांगायची आवश्यकता नाही. कांहीही दुखले-खुपले की आईकडे जाऊन रडणाऱ्या लेंकरासारखी आमची गत आहे. तो भक्तवत्सल आमच्या हांकेला धांवून येईलच!"

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

### अध्याय ४१ वा.

दानव मोहन घालून। नगरीं पोरा नेऊन। माराया दे, त्याचें रक्षण। अत्रिनंदन करिता झाला।।८४।।
दत्तेंच रक्षिला म्हणून। वसिष्ठाचें हातीं मिळून। नहुषाचें झालें रक्षण। हें एकेचाळिसाव्यांत।।८५।।

काशीक्षेत्रांत संदीपकाला गुरु वेदधर्मा पुढे सांगतात. "तो बालावस्थेतला राजपुत्र पाहूनसुद्झां हुंडासुराच्या छातीत धडकी भरली. त्याच्या तेजाने दिपून जाऊन त्याचा चेहरा पांढरा पडून विरूप झाला. हाच मोठा होऊन तारुण्यावस्थेत आपल्याला ठार करणार याची त्याला मनोमन खात्रीच पटली. त्याला लगेच मारून टाकण्यासाठी तो आतुर झाला. पण मनांत भीतीने घर केल्याने त्याला कांही सुचेना. नक्कीच कुणा तरी समर्थ देवाचे याला संरक्षण आहे. म्हणून आपला कांही उपाय चालत नाही असे पाहून तो विचारांत पडला." पृथ्वी, स्वर्गलोक, पाताळ यांचा मनाशी शोध घेऊनही त्याला एवढा बलिष्ठ कोणी दिसेना. मग त्याने निश्चय केला की 'ही नक्कीच मेघश्याम विष्णु असला पाहिजे. दुसऱ्या कोणावरही माझ्या मायेचा परिणाम झालाच असता. तेव्हां हा दैत्यांचा वैरी विष्णूच आहे. ह्याच्याशी लढायला मला महामायेच्याच चरणांचा आश्रय केला पाहिजे.' असा विचार करून अन्नपाणी सोडून सूतिकागृहाच्या बाहेरच थांबून त्या हुंडासुराने महामायेचा धांवा सुरू केला. 'जगदंबे, महामाये! मी तुझा दास आहे. मोठ्याच संकटांत सांपडून मी तुझे चरण चिंतीत आहे. तुझ्या पायांच्या सेवेनेच सर्व कष्ट दूर होतात. हा तुझा अजाण बालक तुला अनन्यभावे शरण आलो आहे. हा माझा शत्रु जन्माला आला आहे. हा बालकावस्थेतच माझ्या हाती लागूं दे. तुझी कृपा झाली तर कुणाचीही माझ्याशी शत्रुत्व करण्याची टाप होणार नाही. मीच सगळ्यांच्या छातीवर नाचेन. मी अन्नपाणी सोडून इथे तुझ्या कृपेची आंस धरून बसलो आहे. माझ्यावर तुझा कृपाकटाक्ष पडला तर मग शत्रु कितीही बलवान असला आणि त्याला साक्षात विष्णूंचे साह्य असले तरी मला पर्वा नाही. सांप्रत मला इथे या सूतिकागृहांत प्रवेशही करतां येत नाही. असा दीनवाणा मी इथे बसून आहे. लवकर माझ्यावर दया कर. मग मला कुणाचीही भीति नाही. हे जगन्माते तूं तर साक्षात् विष्णूलाही निद्रावश करतेस. मगच प्रळय होतो. मग इतरांची काय कथा? आतां अधिक अंत पाहूं नकोस. तू भक्तवत्सल आहेस. तुला मी मद्य आणि मासांचा नैवेद्य देईन. आतां जर आणखी उशीर केलास तर हे तुझे लेकरू मरून जाईल. तेव्हां हे जगदंबिके धांव आणि मला पाव! '

### आसुरी तप.

ही हुडासुराची भक्तीच आहे. पण श्रीस्वामी महाराजा म्हणतात ती राजसी भक्ति आहे. सत्त्व, रज आणि तम हे प्रकृतीचे – मायेचे, मायेपासून झालेले तीन गुण आहेत. हेच देहधारी अविनाशी आत्म्यालाही बंधनांत टाकतात. त्यांपैकी सत्त्वगुण हा निर्मल, स्वच्छ, शुद्ध असतो. त्यापासून सुख म्हणजेच आनंद आणि ज्ञान म्हणजे जाणीव ही सत्त्वगुणाची लक्षणे आहेत. रजोगुण हा सर्व प्रवृत्तीना कारण आहे. राग म्हणजे आसक्ति आणि तृष्णा ही रजोगुणाची लक्षणे आहेत. तमोगुणाचा उद्भव अज्ञानापासून आहे आणि सर्व जीवांना तो मोहांत पाडतो. प्रमाद, आलस्य आणि निद्रा ही तमोगुणाची लक्षणे आहेत. सत्त्वगुणाचे प्राधान्य झाले तर तो जीवाला सुखी करतो, रजोगुण वाढला तर कर्मे करतो आणि तमोगुण ज्ञानाला झांकून प्रमादाला कारण होतो. सत्त्वगुण जीवाच्या उत्कर्षाला, उद्धाराला कारण आहे. रजोगुण त्याला

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

संसारांतच फिरवतो आणि तमोगुण त्याच्या अधोगतीला नेतो. सर्व जीवांची श्रद्धा त्यांच्यांत कोणत्या गुणाचे आधिक्य आहे त्यानुसार सात्विक, राजस आणि तामस होते. हेच श्रद्धेचे शास्त्रीय वर्गीकरण आहे. आपल्याला आवडणारी किंवा आपली श्रद्धा आणि इतर श्रद्धा अंधश्रद्धा असे जे वर्गीकरण सांप्रत रूढ होत चालले आहे ते तर्कदुष्ट आहे. आपल्या ज्ञात नसलेल्या गोष्टीवर प्रत्यक्षाप्रमाणे विश्वास हीच श्रद्धेची व्याख्या आहे. त्यामुळे सर्वच ,सर्वांच्याच श्रद्धा आंधळ्याच असतात. ज्ञान डोळस असते. जिथे ज्ञान आहे तिथे श्रद्धेची आवश्यकताच नाही. जिथे ज्ञान नाही तिथेच श्रद्धेचे प्रयोजन आहे.

सात्विक श्रद्धा परमेश्वराच्या उपासनेला लावते. ती उपासना सकामही असली तरी तिच्यांत इतरांचा घात करण्याची प्रवृत्ती नसते. राजसिक श्रद्धा ही स्वतःचे सामर्थ्य वाढवण्यासाठी, भोगसाधनांच्या संग्रहासाठी आणि आपल्याच देहाच्या सुखासाठी प्रवृत्त करते. यांत दुसऱ्यांचा प्रसंगी घातही करायला तो कचरत नाही. तमोगुणी श्रद्धा भूत-प्रेतादि दुष्ट शक्तींच्या उपासनेने इष्ट विषयांच्या प्राप्तीसाठी आणि इतरांच्या घातासाठीच मुख्यतः प्रवृत्त करते.

राजसिक उपासक आसुरी तप करतो. ते शास्त्रात विहित नसलेले पण घोर असते. विशिष्ट कामनेने व आसक्तीने स्वतःच्या शरीराला आणि मनाला अत्यंत कष्टवून, अंतरात्म्यालाही झिजवून, दंभ, अहंकार आणि बळ यांनी युक्त असे जे तप ते आसुरी तप असते.

**अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः।**

**दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः।।**

**कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः।**

**मां चैवान्तःशरीरस्थं तानविद्ध्यासुरनिश्चयान्।।भ**.गीता १७:५-६।।

हुंडासुराची भक्ति म्हणजेच उपासना ही अशाच प्रकारची आहे. आपल्या शत्रूचा कशाही प्रकारे घात करणे हे त्याचे साध्य आहे. महामायेची उपासना ही त्या साध्याचे एक साधन मात्र आहे. अट्टाहासाने उपासतापास करून तो तिची आळवणी करतो आहे त्यांत तिच्याविषयींची भक्ति कमा व स्वतःच्या शरीराचा लोङ अधिक आहे. मद्य-मांसाच्या प्रलोभनाने तो देवीला वश करू पाहतो आहे म्हणूनच त्याला राजसी भक्ति असे श्रीस्वामी महाराजांनी म्हटले आहे. १-१८.

## दुष्ट ग्रहाचा संचार.

त्याची विनवणी फळाला आली आणि महामायेला त्याची दया आली. इंदुमतीच्या अंतःपुरांतील एक दासी बाहेर येऊन बसली. हुंडासुराला आनंद वाटला. त्याने लगेच त्या दासीच्या शरीरांत प्रवेश केला. राक्षस, पिशाचादि ग्रह मानवी शरीरांत कसा प्रवेश करतात त्याचा एक संकेत इथे महाराजांनी दिला आहे. त्या व्यक्तीची विज्ञप्ति म्हणजे जाणीव तीच त्या असुराने खेंचून घेतली आणि आपली शक्ति तिच्या शरीरांत पसरून त्या शरीराचा ताबा घेतला. हा एक प्रकारचा परकायाप्रवेशच आहे. ह्यालाच पिशाचाचा संचार असे म्हणतात. स्वस्थ मानवी शरीरांत सहजपणे राक्षसादि ग्रह प्रवेश करू शकत नाहीत. मल-मूत्रोत्सर्ग, रजोदर्शन, इत्यादीनी अशुद्ध असलेल्या शरीरांत समंधादि ग्रहांचा संचार होण्याची शक्यता असते. त्यासाठीच ह्या अवस्थांतून पाय धुणे, स्नान करणे इत्यादि योग्य कर्मांनी शुद्धता प्राप्त करून घ्यावी असे शास्त्र सांगते. विशेषतः संध्याकाळ, मध्यरात्र इत्यादि वेळी व निर्जन, ओसाड, स्मशानादि ठिकाणी अशुद्ध अवस्थेत खाणे-पिणे किंवा फिरणेही पिशाचबाधेला अमंत्रण देण्यासारखे आहे. १९-२२.

अशा रीतीने त्याने दासीच्या शरीराचा आश्रय करून गुप्त रूपाने सगळ्यांना चकवून तो प्रसूतिगृहांत प्रवेश मिळवला. ही त्या देवी महामायेचीच कृपा असे समजून त्याने प्रस्वापिनी मंत्राचा प्रयोग करण्याचे ठरविले. ह्या मंत्राच्या प्रभावाने अगदी ज्ञानी माणसालाही गाढ झोंप लागते. तो मायावी मंत्र तेथील

सर्वांवर टाकून त्याने ते सर्वजण सकाळ होईपर्यंत निद्रावश होतील आणि कुणालाही बाहेरचे कांहीच भान उरणार नाही अशी व्यवस्था केली. मग त्या बाळाला उचलून लगबगीने तो आकाशमार्गाने आपल्या घरीं गेला. २३-२८.

## कर्मगति अटळ आहे.

इथे एक शंका साहजिक मनांत येते कीं साक्षात् भगवान दत्तात्रेय ज्या बाळाचे रक्षण अहोरात्र करीत आहेत त्याचे अपहरण ह्या मायावी असुराने कसे केले. दत्तप्रभू सर्वज्ञ आहेत, सर्वव्यापी आहेत आणि सर्वशक्तिमान आहेत. भक्ताचे रक्षण हेच त्यांचे ब्रीद आहे एकवार आपले नाम उच्चारणाऱ्यालाही ते महत्संकटांतून वांचवतात. त्यासाठीच ते अनारत जागरूक असतात. ज्यांच्या नामस्मरणानेही मूळमायासुद्धा आपले कार्य जे जगत् त्यासह लय पावते त्याच्यासमोर ह्या आसुरी मायेचा काय पाड? .

**यन्नामस्मरणान्माया सकार्यापि विलीयते।।**

**तस्यातिमायिकस्याग्रे मायिदैत्यस्य का कथा।।** दत्तपुराण ६:२:५।।

परमेश्वर असला तरी जगाच्या उत्पत्तीच्या वेळी त्याने कांही नियमांच्या आधारनेच सृष्टि केली आहे. त्या नियमांचा तो आदरच करीत असतो. प्रत्येक वस्तूला आपले असे एक स्वतंत्र सामर्थ्य आणि कार्यक्षेत्र असते. कोणत्याही कारणाने त्यांत ढवळाढवळ भगवंतही करीत नाहीत. ह्या प्रसंगी दत्तप्रभूंनी मंत्रसामर्थ्याचा मान राखला. त्या मंत्राचे मोठेपण अबाधित राखणे त्यांना भाग आहे. ते त्यांनीच निर्माण केले आहे. तसेच कर्मसिद्धांताचेही आहे. आपण केलेली शुभ वा अशुभ कर्मांची फळे प्रत्येक जीवाला अवश्य भोगावीच लागतात. हा ईश्वरी नियम आहे. ईश्वरही त्यांत कांही अंतर करीत नाही. मात्र आपल्या भक्तांना ह्या कर्मगतींतून तो ते नियम अबाधित ठेवूनही सोडवतोच. त्यासाठी काही काळ जावा लागतो. ‘कालस्तावत् प्रतीक्ष्यताम्’ असाच उपदेश पांडवांनासुद्धा श्रीकृष्णाने केला आहे. “श्रद्धा आणि सबूरी” ह्या साईबाबांच्या सूत्राचे हेच गहस्य आहे. २८-३२.

## शुक्रनीति.

सूतिकागृहांतून पळविलेले ते बाळ आणून त्याने आपल्या पत्नीच्या हातीं दिले. लगेच त्याला कापून शिजवायला त्याने सांगितले. तो म्हणाला, “हा कोण आहे माहीतीय का तुला? आयुराजाने यज्ञ, तप इत्यादीनी हा पुत्र उपजवला आहे. याच्या हातून पुढे माझा वध होणार आहे. माझे नशीब बलवत्तर म्हणून मोठ्या कष्टाने प्रयत्नपूर्वक मी ह्याला आणले आहे. माझ्यावरचे गंडांतर टाळण्यासाठी मला आत्ताच्या आत्तां ह्याची न्याहरी करायची आहे. ” हे त्याचे बोलणे ऐकून त्याच्या पत्नीला भीतीच वाटली. ती म्हणाली, “अहो केवढासा हा बाळ! हा कसा तुम्हांला ठार करील? उगीच याला मारूं नका. हे बालहत्येचे पाप आपल्या कुळक्षयाचेही कारण होऊं शकते. अशा निंद्य आणि घोर कर्माने लोकांत आपली काय अब्रू राहील? ” त्यावर हुंडासुर अधिकच खवळला. म्हणाला “आली मोठी उपदेश करणारी! हा माझा दैवजात शत्रू आहे. आणि माझी माया पणाला लावून मी तो हस्तगत केला आहे. ह्याच्यावर दया दाखवून मी काय माझ्या मृत्यूला आमंत्रण देऊं? आपले गुरु शुक्राचार्य यांच्या उपदेशानुसार निषिद्ध कार्य करूनही प्रत्येकाने आपला जीव वांचविला पाहिजे. हा देह म्हणजेच आत्मा आहे. ह्याच्यामुळेच, पैसा, अडका, घर-दार, स्त्रीपुत्र इत्यादि सर्व प्रिय होतात तोच देहरूपी आत्मा प्रियतम आहे. **दारैः अपि धनैः अपि** स्त्री किंवा धन वेंचूनही **अत्र देहं** ह्या लोकीं शरीराचे **सदा रक्षेत्** सदैव रक्षण करावे। **पुनः दारा पुनः वित्तं** स्त्री काय किंवा धन काय (देह राहिला तर) पुन्हां मिळवतां येतील **देहात्मा न पुनःपुनः** हा देहरूपी आत्मा मात्र एकदां गेला कीं पुन्हां मिळणार नाही. हे आपल्या गुरुदेवांचे मत लक्षांत घेऊन लवकर ह्याला शिजवून दे.

आणि हे पहा, तूं त्याला स्वतःच्या समोर शिजव. ” असे पत्नीला बजावून तो दैत्य आपल्या कामांत व्यस्त झाला. ३३-४७.

हुंडासुराने जिचा दाखला दिला आहे ती शुक्रनीति भागवताच्या आठव्या स्कंधांतील १९व्या अध्यायाच्या शेवटी पहातां येईल. हिचे स्वरूप भारतीय परंपरेतील चार्वाक दर्शनासारखे आहे. आपल्या इंद्रियांना जाणवणारे तेच जगताचे अंतिम स्वरूप आहे. ह्यालाच प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात. देह हाच मुख्या आत्मा आहे. आपल्या देहाच्या सुखासाठी कांहीही केले तर ते योग्यच आहे. त्यात अपहार, दुसऱ्याचा घात, हिंसा, असत्य भाषण हे कांहीच दोष मानूं नयेत. राजा हाच ईश्वर आहे. असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. “**यावज्जीवं सुखं जीवेत ऋणं कृत्वा घृतं पिबेत। भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः।।**” हीच त्यांची विचारसरणी आहे. आधुनिक विज्ञानही ऐंद्रिय ज्ञानालाच अंतिम ज्ञान मानते. ते मानवांनीच सिद्ध केलेल्या उपकरणांनी वाढवतां येते इतकाच विशेष म्हणतां येईल. आकाश, प्राण, मन, बुद्धि इत्यादि सूक्ष्म पदार्थांचे अस्तित्व विज्ञानाला मान्य होत नाही. निखळ वैज्ञानिक दृष्टीचाच पुरस्कार करणारे ईश्वर किंवा अतींद्रिय शक्तीचे अस्तित्त्व नाकारतात. शुद्ध वैज्ञानिक निष्ठेचा अंगीकार केला तर चार्वाकाप्रमाणे देहच आत्मा मानावा लागेल. आपल्या देहाच्या सुखासाठी किंवा रक्षणासाठी इतरांचा घात किंवा अपहार करणे हे विशुद्ध विज्ञानाला निषिद्ध नाही. कोणत्याही सामाजिक वा नैतिक मूल्यांचे समर्थन अव्यभिचारी विज्ञाननिष्ठेने होऊंच शकत नाही. ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. माणसाच्या सामान्य सुखदुःखांची कारणमीमांसाही केवळ वैज्ञानिक सिद्धांतांनी करतां येणार नाही. विज्ञानाने मानवाला कल्पनातीत सुखसोयी मिळवून दिल्या आहेत. पण त्याच्या मर्यादा समजून न घेतां तीच जीवननिष्ठा करणे मानवाला किंवा समाजालाही हितावह होणार नाही. त्या दृष्टिकोनांतून शुद्ध विज्ञाननिष्ठेची गणना आसुरी श्रद्धेतच होते.

## हुंडाच्या तावडीतून बाळाची सुटका

हुंडपत्नीने ते मूल पायाने उलटे धरून एका विश्वासाच्या दासीकडे दिले. “हा माझ्या पतीचा वैरी आहे. ह्याला लगेच कापून त्याच्या न्याहरीच्या वेळेपर्यंत तयार ठेव. एकदा कां हा मेला की माझा नवरा अमर होईल.” असे त्या दासीला सांगून ती आपल्या कामांत गुंतली. त्या एकला नांवाच्या दासीने ते बाळ बल्लवाच्या हातांत दिले “ह्याला मोठ्या तलवारीने कापून, छान शिजवून हुंडासुराला न्याहरीला दे, ” असे त्या बल्लवाला सांगून तीही इतर कामाला लागली. त्याने उजव्या हातांत ते बाळ घेतेले आणि डाव्या हाताने एका रुंद पात्याच्या खड्गाने त्याच्यावर वार केला. तों काय आश्चर्य, त्या बाळाला कांहीच इजा न होतां त्या शस्त्राचे पातेच बोथट होऊन ते शस्त्र लांब जाऊन पडले. मग त्याने बाळाला व्यवस्थित जमिनीवर ठेवून एखाद्या बकऱ्यासारख धरून दुसऱ्या शस्त्राने त्याच्यावर जोराने वार केला. त्या वेळी खण् खण् असा आवाज होऊन ते खड्गच मोडून पडले. ते मूल मात्र हंसत राहिले. दत्तदेवांचे सुदर्शन त्या बाळाचे रक्षण करीत होते हे त्या बल्लवाला कसे दिसणार? त्या स्वयंपाक्याला फारच आश्चर्य वाटले. दुरून पाहणाऱ्या एकलेने तिथए येऊन त्याच्या हातांतून ते बाळ काढून घतले आणि म्हणाली, “आतां ह्याच्यावर श्सत्र चालवूं नकोस. ह्याला कोणा तरी मोठ्याचे पाठबळ आहे. कोण जाणे कुणाचा हा लेक आहे? पण लक्षणे तर राजपुत्राची दिसत आहेत. याचे नशीब बलवत्तर आहे. म्हणूनच तर आपल्या मनांतही दयेचा पाझर फुटला. आपले स्वामी कां हकनाक याच्या जिवावर उठलेत, कळत नाही. ह्या भाग्यशाली दिसणाऱ्या राजस बाळाला मारण्याचे हे नीच कार्य तूं करूं नकोस. ” त्या आचाऱ्यालाही तिचे ते म्हणणे पटले. तोही शांत झाला. तो म्हणाला, “तुझे म्हणणे खरे आहे. हा खरेच मोठआ नशीबवान आहे. कसा हंसतोय पहा. आपल्यासारख्या निर्दयांच्या काळजालाही पाझर सुटावा. मी दोन वेळां ह्याच्यावर शस्त्राने जोराचा प्रहार केला. ह्याला कांहीच झाले नाही. ह्याच्या अंगावर वज्राचे चिलखत आहे की काय?

ज्याचे दैव उजवे आहे त्याला कोण मारील? घोर संकटांतून अग्नि, विष वा अस्त्रहि त्याच्यापुढे हारच खाईल.देव तारी त्याला कोण मारी हेच खरे.

**येषां प्रदक्षिणं दैवं तेषां कर्मैव रक्षकम्।।**
**को हन्याद्देवगुप्तांस्तान्येषामिन्द्रो युवा सखा।।** ६ः२ः२६।।
**आपत्स्था अपि मुच्यन्ते दुर्गेभ्योऽपि नदीजवात्।।**
**को हन्यात्तान्विषाग्न्यस्त्रैर्येषामिन्द्रो युवा सखा।।** ६ः२ः२७।।

आतां मी ह्याच्यावर मुळीच शस्त्र चालविणार नाही. " दासीनेही त्याला अनुमोदन दिले. "कोण जाणे कउणा वंशाचा हा दिवा आहे? तूं त्याचा जीव राख आणि गुपचुप कुठे तरी नेऊन ठेव." सर्वांतर्यामी श्रीगुरु दत्तात्रेयच त्या हिंसकांच्याही अंतःकरणांत शिरला आणि त्याच्या प्रेरणेनेच त्या बल्लवाने त्या मुलाला गुप्तपणे नेऊन वसिष्ठाच्या आश्रमासमोर नेऊन ठेवले. नंतर एका हरणाचे पिल्लूं मारून ते बेमालूम शिजवून त्याने हुंडासुराला न्याहरीसाठी दिले. दैत्याने मोठ्या आवडीने ते आपल्या शत्रूचे मांस मानून खाल्ले आणि 'माझा शत्रू मी संपविला. माझ्या मृत्यूवर विजय मिळवला. मी आतां अमर झालो, ' अशा समजुतीने निश्चिंत झाला. प्रत्येक जन्माला आलेल्या प्राण्याच्या मृत्यूची वेळ निश्चित असते. ती कुणालाही टाळतां येत नाही. हे विसरून नाशिवंत देहालाच आत्मा म्हणणाऱ्या गुरुशास्त्राने काय होणार?

**यस्य यो विहितो मृत्युः स केनापि न वार्यते।।**
**इत्यज्ञात्वाऽध्रुवात्मेच्छोर्गुरुशास्त्रेण किं भवेत्।।** ६ः२ः१७।। ४७-७८.

दुसऱ्या दिवशी वसिष्ठ ऋषि नित्याप्रमाणे सूर्योदयापूर्वी पांच घटका घराबाहेर आले तों दारापुढेच एक तान्हे बाळ रडत असलेले त्याना दिसले. त्यांना आश्चर्य वाटले. कुतूहलाने इतरही आश्रमवासी तिथए जमले. 'कोण असेल हा बाळ? कुणी ह्याला इथे असा ठेवला असेल?' इत्यादि प्रश्न वसिष्ठ ऋषींच्या मनांत उद्भवले. त्यांनी ध्यान करून अंतर्दृष्टीने शोध घेतला आणि मग ते सर्व ऋषींना त्याची हकीकत सांगूं लागले. " महात्मा दत्तात्रेयांच्या वराने सोमवंशी आयुराजा आणि इंदुमती यांच्या पोटी उपजलेला हा बाळ आहे. शुक्रशिष्य हुंडासुराने याला हा आपला शत्रू असल्याचे जाणून त्याला ठआर करण्याच्या हेतूने पळवून आणला. पण सुदैवाने तो इथे येऊन पोंचला आहे. ह्या नवजात अर्भकाचे रक्षण स्वयं दत्तप्रभू करीत आहेत. याचा कुणाला तरी घात करतां येईल का? साक्षात् परमेश्वर स्वरूप सर्वव्यापी भगवान दत्तात्रेयांचा प्रसाद खोटा कसा होईल?. ह्या सुंदर राजस बाळाची लक्षणे अत्युत्तम आहेत. राजचिह्ने आणि दैवी लक्षणे यांनी हा मंडित आहेत. हा अजिंक्य असून लवकरच हुंडासुराचा वध करून हा चक्रवर्ती सम्राट होऊन सोमवंशाच्या प्रतिष्ठेत भर घालील." ही वसिष्ठांची निश्चयात्मक भविष्यवाणी ऐकून देवांनी स्वर्गातून पुष्पवृष्टी केली. ७९-८९

## बालाशिष.

मग वसिष्ठांच्या आज्ञेने तेथे जमलेल्या सर्व ऋषींनी त्या बाळाला आशीर्वाद दिला. "विश्वव्यापक, दुधाच्या फेसाप्रमाणे शुभ्र वर्णाचा, सर्व भूतादि दुष्ट ग्रहांचा नाश करणारा दत्तात्रेय ह्याचा सर्वकाळ सगळीकडून संरक्षण करो; तो ह्याच्या अंतर्यामी वसून सर्व अरिष्टांचे निवारण करो." अशी आशीर्वचन उच्चारून त्यांनी त्याचा अंगारा (विभूति) बाळाला लावली. ९०-९२.

श्रीदत्तपुराणांत ह्या आशीर्वादाचे श्लोक खालीलप्रमाणे आहेत. ह्यातील अखेरचा श्लोक हा वामदेवांनी सहदेवीचा बालक सोमक याला दिलेल्या वैदिक आशीर्वादाचा अनुवाद असल्याचे श्रीस्वामी महाराजांनी टीकेत स्पष्ट केले आहे.. म्हणजेच हे स्तोत्र मंत्रगर्भ आहे. लहान बालकांचे सर्व महामारी इत्यादि अरिष्टांपासून, वाईट दृष्टीपासून, भूत, ग्रह इत्यादी बाहेरच्या पीडांपासून रक्षण होऊन श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने

त्याचे आरोग्य उत्तम राहून त्याला दीर्घ आयुष्य लाभावे यासाठी ह्या स्तोत्राने मंतरलेला अंगारा बालकाला लावावा

स्वांशेनेदं ततं येन स त्वमीशात्रिनन्दनः।।
मुञ्च मुञ्च विपद्भ्योऽमुं रक्ष रक्ष हरे शिशुम्।।
प्रातर्मध्यंदिने सायं निशि चाप्यव सर्वतः।।
दुर्दृग्गोधूलिभूतार्तिगृहमातृग्रहादिकान्।।
छिन्धि छिन्ध्यखिलारिष्टं कमण्डल्वरिशूलधृक्।।
त्राहि त्राहि विभो नित्यं त्वद्रक्षालंकृतं शिशुम्।।
सुप्तं स्थितं चोपविष्टं गच्छन्तं क्वापि सर्वतः।।
भो देवावश्विनावेष कुमारो वामनामयः।।
दीर्घायुरस्तु सततं सहओजोबलान्वितः।। ६:२: ४३-४७।।

## अन्वय आणि मराठी भावार्थ

**(हे) ईश अत्रिनंदन हरे! येन स्व+अंशेन इदं ततं स त्वं अमुं शिशुं विपद्भ्यः मुञ्च मुञ्च रक्ष रक्ष च प्रातः मध्यंदिने सायं निशि सर्वथा अपि अव।**

पापताप दूर करणाऱ्या, ह्या सर्व जगाला आपल्या अंशाने व्यापून राहिलेल्या, अत्रिपुत्रा ईश्वरा! तूं ह्या बाळाला सर्व संकटांपासून सोडव आणि सकाळी, दुपारी, संध्याकाळी आणि रात्री सगळीकडून रक्षण करा.

**(हे) कमण्डलु+अरि+शूल+धृक्! दुर्दृक्, गोधूलि, भूतार्ति, गृहमातृ, ग्रह आदिकान् (अव)। अखिल अरिष्टं छिन्धि छिन्धि।**

कमंडलु, चक्र आणि शूल धारण करणाऱ्या दत्तप्रभो! वाईट दृष्टि, गोधूळ, भूतबाधा, गृहमाता आणि दुष्ट ग्रह यांच्यापासून (या बालकाचे) संरक्षण कर. सर्व अरिष्टांचा नाश कर.

**(हे) विभो! त्वत्+रक्षा+अलंकृतं शिशुं नित्यं सुप्तं, स्थितं, च उपविष्टं क्व अपि गच्छन्तं सर्वतः त्राहि त्राहि।**

हे सर्वव्यापी प्रभो! ह्या तुझ्या अंगाऱ्याने अलंकारलेल्या बाळाचा झोपल्या-बसल्या-उभ्या-चालत्या सर्व अवस्थांत सतत सर्व बाजूंनी सांभाळ करा.

**भो देवौ अश्विनौ एष वां कुमारः सततं अनामयः सह+ओजो+बल+अन्वितः दीर्घायुः अस्तु।**

अश्विनीकुमारांनो! हा तुमचा कुमार सतत, निरोगी, प्राण, इंद्रिय आणि शरीर यांच्या बलाने आणि तेजाने युक्त राहून दीर्घायुषी होवो.

त्या सुंदर, सुकुमार बाळाने वसिष्ठांचेही मन मोहून टाकले. त्यांनी ते मूल उचलून आपली सती अरुंधतीच्या हातांत दिले. अरुंधतीमातेला तर त्याला पाहून वात्सल्यातिशयाने पान्हाच फुटला. ही सगळी त्या जगद्रूपी यंत्र चालवणाऱ्या दत्तप्रभूंचीच लीला असते;पण ते स्वतः मात्र अलिप्तपणे सर्व पहात असतात..

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।**
**भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया।।** भ.गीता १८:६१।।

मग ऋषीश्रेष्ठ वसिष्ठांनी त्याचे नामकरण केले. नह् धातूचा अर्थ बांधणे असा होतो. हा आपल्या बळाने सर्व शत्रूंना बांधणारा होईल आणि देवांचा रक्षणकर्ताही होईल असे जाणून त्या अर्थज्ञ मुनींनी त्याचे नांव नहुष असे ठेवले (**नहनं बन्धनं योऽरेः कर्ताऽसौ निजशक्तितः।।४८।।**) आणि त्याला आशीर्वाद

दिला. सर्व आधिव्याधींपासून त्याचे रक्षण व्हावे म्हणून 'ॐ नमो दत्तात्रेयाय' ह्या मंत्राचा ताईत करून त्यांनी बाळाच्या गळ्यांत घातला. ९२-९९.

वसिष्ठ आणि अरुंधती यांनी त्या बाळावर पोटच्या पोरासारखा जीव लावला. त्याला क्षणभरसुद्धा दृष्टीआड केले नाही. परोपरीने त्याचा सांभाळ केला. वसिष्ठांनी तर प्रसंगी समाधिसुखालासुद्धां अंतरून त्याचे लालनपालन केले. नहुष त्या दोघांनाच आपले माता-पिता मानत होता. दुसरे आईबापच त्याला ठाऊक नव्हते. अशा रीतीने त्या आश्रमांत नहुष शुक्ल पक्षाच्या चंद्रासारखा वाढला. अकराव्या वर्षीं क्षत्रिय वर्णानुरूप वसिष्ठ ऋषींनी त्याची मुंज लावली आणि त्याच्या अध्ययनाला सुरुवात झाली. (**प्राप्तेऽथैकादशे वर्षे यथाविध्युपनीय तम्।।** क्षत्रियत्वादेकादशे ऽब्दे।।). राजकुळाला साजेशे सर्व शिक्षण त्याला मिळाले. चार वेद, सहा शास्त्रे, चौदा विद्या आणि चौसष्ट कला त्याने आत्मसात केल्या. विशेषतः धनुर्वेद आणि न्याय ह्या विषयांवर त्याचे प्रभुत्व मिळविले. अत्यंत आदरपूर्वक केलेल्या सेवेने प्रसन्न होऊन वसिष्ठ ऋषींनी त्या अस्त्ररहस्याचेही ज्ञान दिले. त्या सोमवंशीय राजपुत्राला सूर्यवंशाच्या गुरु वसिष्ठ ऋषींकडून सर्व ज्ञान मिळले. मात्र हे सर्व आयु राजाला आणि इंदुमतीला कांहीच ठाऊक नव्हते.

**सोमवंश्योऽपि नहुष एवं श्रीदत्तरक्षितः।।**
**संस्कारांश्चाददे विद्याः सूर्यवंश्यगुरोर्विधेः।।५८।।**

प.प.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.


## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]


## अध्याय ४२ वा.

**ते चक्षुर्बंधन मोहन। नासतां राणी उठोन। पुत्रातें न पाहून। दुःखी होऊन प्रलापी।।८६।।**
**आयुराजा तेथें येऊन। सर्वां धिःकारून। शोक करी दारुण। बेचाळिसाव्यांत हे कथा।।८७।।**

## राणी इंदुमतीचा शोक.

हुंडासुराने सगळ्यांवर टाकलेल्या प्रस्वापिनी मंत्राची भूल सकाळ होतांच उतरली. सगळ्यांबरोबर इंदुमतीही जागी झाली.आपल्या कुशींत बाळ नाबी हे पाहून तिच्या छातीत धस्स झाले! तिने दासदासीना जागे करून बाळासाठी शोधाशोध करायला लावली. बाळ कुठेच दिसत नाही हे पाहून तिचा धीर एकदमच सुटला आणि तिने हंबरडाच फोडला. हाहाकार करून तिने विलाप सुरू केला. “अशी कशी झोंप लागली मला? कुणी भूल पाडून माझा प्राणप्रिय पुत्र नेला? देवा रे! आतां काय करूं? कुठे माझ्या काळजाचा तुकडा शोधूं? तूं पहातोयस ना परमेश्वरा? तू दयाघन आहेस. मी आतां काय करूं? सोमवंशाचे भूषण असलेला माझा लाडका, मला या दुःखाच्या खाईंत लोटून कुठे बरे गेला असेल? कोणा दुष्टाने माझा सूड उगवला? तो इथे कसा आला? किती नवसा-सायासांनी मला मुलगा झाला. किती मनमोहन, राजस, सुंदर माझा बाळ आहे! जणुं स्वर्गातल्या देवासारखे त्याचे ते रूप असे कसा नाहीसे झाले? अहो, दत्ताने मला तो प्रसाद दिला आहे. तो अशा तीव्र दुःखाला कसा कारण झाला? त्याला कुणी कसे पळवूं शकेल? दत्ता, तुला सगळे देव नमतात, तुमचा महिमा अगाध आहे. कलिकाळालाही तुमचा धाक आहे. तुमचे वचन कसे वायां झाले? काय नवल आहे? माझ्या लडिवाळा, सुकुमारा, माझ्या राजसा, बाळा, जिवाच्या जिवा, लवकर तुझ्या आईच्या कुशीत परत ये! मी झोपी गेले म्हणून रुसलास का? नाही रे तुला विसंबून अशी पुन्हा झोंपणार.” १-१५

ह्या ठिकाणी करुणारसात्मक पदाच्या द्वारां श्रीस्वामी महाराजांनी इंदुमतीची मनःस्थिति व्यक्त केली आहे. ती स्वतःला बोल लागते आहे. ‘अशी कशी मला कुबुद्धि झाली. मी जागी राहिली असते तर हा अनर्थ ओढवला नसता.’ आपण गरोदरपणी आपल्या पुत्रविषयीं पाहिलेली स्वप्ने आठवून ती शोक करते आहे. ‘तूं राजकुळांत वाढून मोठा होशील. विद्वान, शूर, शत्रूंना जिंकणारा राजा होशील. वार्धक्यांत आमची काठी होशील. ते सगळे आतां स्वप्नवत झाले आहे. हा दुःखाचा डोंगर माझ्यावर कोसळला आहे. आतां कोण माझे पांग फेडील? तूच असा दुरावल्यावर मी कुणाची आशा करूं? ’ छाती पिटत, तळमळत ती राणी विलाप करते आहे. पण तिच्या जिवाला चैन कांही पडत नाही. आपला वेल्हाळ डोळ्यांपुढे नसल्याने तिला दाही दिशा शून्य वाटत आहेत. मग तिचे दुःखाने सैरभैर झालेले मन त्यालाच दोषी ठरवते आहे. ‘मला तुझा किती भरंवसा होता? माझा असा विश्वसघात करतांना तुझ्या काळजाला थोडासुद्धां पाजर फुटत नाही का?‘ असे ती त्याला विचारते आहे. तीव्र वैफल्याने तिला जगणेही नकोसे धाले आहे. १६-२५.

रडून भेकून, तिने भूमीवर डोके आपटून घ्यायला सुरुवात केली. “मला मरण कसे येत नाही?” असा प्रश्न ती स्वतःलीच विचारूं लागली. अंतरातल्या दुखाच्या दाहाने तिने ऊर जळते आहे. पुत्राच्या आठवणीने पान्हाही फुटतो आहे. चित्ताचे क्लेश असह्य होऊन ती तडफडते आहे. ह्या असह्य क्लेशांना


[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

कारण असलेला पुत्रच पोटीं आला नसतां तर बरे झाले असते असेही वाटते आहे. "बाळा कुठे रे तूं लपला आहेस. माझ्या स्तनांतले हे दूध वायां जाते आहे. मी काय असा अपराध केला की तू एकदांही माझ्या अंगावर न पीतांच नाहीसा झालास? माझ्या सुखाचा तूंचएकमेव ठाव आहेस. लवकर ये. मी तुझ्या तोंडात स्तन द्यायला आसुसले आहे. मला नाही आतां तुझा विरह सहन होत. मोठमोठे देवभक्तही पुत्रशोकाने खचून जातात. मी तर सामान्य स्त्री आहे. देवाच्या अवकृपेनेच हे असे झाले! तुझ्यासारखा तेजस्वी पुत्र पोटाला येऊनही मी न त्याचे कांहीच लाड वा कौतुक केले नाही. ना मांडीवर पळभर मांडीवर घेतले ना तुला पाळण्यांत घालून जोजवून अंगाई गाइली. बाळा रे, तुला मी न्हाऊ-माखूंसुद्धा घातले नाही. दारोदारी बसवलेल्या चौक्यांतून कुणी कसा माझा बाळ नेला असेल? चौकीदारांचे डोळे काय फुटले होते? सगळेच कसे स्वप्नवत् झाले. नऊ महीने तुला पोटांत वाढवले, विणेच्या वेदना सहन केल्या, तुझे जातकर्मही केले. सगळेंच वायां गेले. आतां तू पुन्हां दृष्टीला तरी पडशील कां? की मी अशीच तुझ्या शोकाने मरून जाईन. असे कसे माझे पापिणीचे दैव असेल? मला मरणही येत नाही. " २६-४२.

## राणीचा विवेक आणि कर्मविपाकाची जाणीव.

इथे त्या राणीचा विवेक थोडा जागा झालेला दिसतो. आपल्याला भोगावे लागणारे दुःख हे आपणच केलेल्या दुष्कर्माचे फळ आहे याची जाणीव तिला झाली आहे. आपण काय असे पाप केले असेल. त्या राजपत्नीला कर्मविपाकाचे ज्ञान आहे. त्याच्या अनुसंधानाने ती आपल्या ह्या दारुण दुःखाला कारण झालेल्या कर्माचे अनुमान करीत आहे. "मी जेवायला वाढतांना पंक्तिप्रपंच केला असेल का?कुणाचा विश्वासघात करून त्याचे धन लुबाडले असेल का? साप मारला की ब्राह्मणाला नागवले? ब्राह्मणाच्या धनाचा अपहार मोठमोठ्यांना घातक ठरतो. त्यांच्या संतानाचा आणि कुळाचाही नाश करतो. नक्कीच मी ब्राह्मणाचे धन बुडवले असावे. कीं कुणी विश्वासाने ठेवलेले पैसे मी खाल्ले म्हणून अशा पापाची धनीण मी झाले? कांही तरी असेच मोठे पातक मी केले असेल म्हणूनच माझ्यावर हा प्रसंग ओढवला! केवढे नवल आहे? माझ्या कुशींत पहुडलेले बाळ नाहीसे झाले? कुणाचे तरी रत्न मी चोरले असेल म्हणून माझे हे पुत्ररत्न हरपले. मी कुणाला भरल्या पानावरून तरी उठवले नसेन ना? " आपल्या ह्या दुर्धर शोकाला कारण होऊं शकणाऱ्या पापांचा पाढाच ती वाचते आहे. मित्रद्रोह, ब्राह्मणवध, बालहत्या, यतिक्षोभ, अतिथीला विन्मुख करणे, देवापुढचा दिवा मालवणे इत्यादि पापांचा तिने उच्चार केला आहे. त्यावरून तिचा पापपुण्यविवेक तर आपल्याला कळतोच पण त्याचबरोबर आपल्या जीवनांत अशा पापकर्मांपासून आपण सावध राहिले पाहिजे हा धडाही मिळतो. साधूचा सत्कार न करणे, दुसऱ्याच्या दैवताची (किंवा गुरूची निंदा करणे), चांगलेचुंगले करून आपणच एकट्याने खाणे, ब्राह्मणांचा अपमान करणे, गाईचा चारा पळवणे, आपल्या आप्तांतच भांडण लावणे, पतीच्या मनाला क्लेश देणे, पतीपत्नींत कलह लावणे अशी पापे केल्यानेच माझा हा गुणाचा बाळ माझ्यापासून दुरावला अशी तिची भावना आहे. "मला झालेल्या दुःस्वप्नाचे तर हे फळ नसेल? पण मग मी सूर्यनारायाणाची केलेली स्तुति वायां कशी जाईल?" ४३-६०.

आपल्या जिवाची होणारी तगमग कुणाला सांगावी? "कोण मला धीर देईल, माझ्या मनाचा उद्वेग शांत करील?" सर्व राजैश्वर्याचा तिला वीट आला. पुत्र हेच खरे धन आहे. पुत्रहीन वांझेच्या घरी यतीसुद्धा भिक्षा घेत नाहीत. संतानच नसेल तर संपत्तीचा काय उपयोग? स्वर्गांतले आपले स्थआन टिकवण्याच्या आशेने पितर पुत्राकडेच पाहतात. आतां असले हे निपुत्रिक म्हणून जगण्यापेक्षां आपण प्राणत्यागच केलेला उत्तम असेही विचार तिच्या मनांत उचल खाऊं लागले. असा आक्रांत करतां करतां इंदुमती राणीची शुद्ध हरपली. दासींनी तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करूनही ती उठेना. तेव्हां त्यांनी ते वृत्त राजाच्या कांनांवर घातले. ६०-७०

## आयुराजाचा विलाप.

आयु राजा धांवत-पळत तेथे आला आणि तेथील वृत्त ऐकून तोही दुखाने मूर्छित झाला. स्वतःला सांवरायचा प्रयत्न करूनही त्याला दशोक आवरेना. कपाळ बडवून घेत, रडत तो भूमीवर पडला. पुत्रजन्माच्या आनंदाने बहरलेले मन एकदम दुःखाच्या खोल खाईंत पडले. त्याचे मन एकदम सुन्न बधिर झाले. त्याला कांहीच सुचेना. दुःखावेगाने प्राण जातात की काय असे वाटूं लागले. त्याच्या डोळ्यांतून होणारा अश्रुप्रलय पावसाळ्यांतल्या मेघांनाही जणू लाजवीत होता. आपल्या रक्ताळलेल्या डोळ्यांनी त्याने कसेबसे राणीकडे पाहिले. तिचा आक्रोश पाहून त्याचा धीर सुटला आणि तोही मोठ्याने रडत शोक करूं लागला. “देवा दयाघना दत्ता! आम्हाला पुत्रप्राप्तीचा वर देऊन परत असे शोकसमुद्रांत का लोटतां आहांत? किती सायास करून मी मागून घेतलेले पुत्रसंतान माझ्याकडून हिसकावून घेण्यांत काय तुमचा हेतू आहे?” त्याला असे वाटायला लागले की आपली सर्व पुण्याई वायां गेली आहे. नशीबच फुटले आहे आणि देवांचा रोष आपल्यावर झाला आहे. “त्यांनी मला आनंदाच्या शिखरावरून माझा कडेलोटच केला आहे! आतां माझी जगण्याची इच्छाच नष्ट केली आहे. जगून काय करायचे? केवळ मृत्यूनेच माझी ह्या दारुण शोकांतून सुटका होईल.” ७१-८२.

## मानवी प्रयत्नांचे वैयर्थ.

मग तो विचार करूं लागला की “ह्या राजवाड्यातून राणी महालातून, दारादारांत बसवलेल्या चौक्यांतून, राजवाड्याभोंवती तैनात असलेल्या सज्ज सेनेच्या व्यहाचा भेद करून माझा पुत्र कसा पळवून नेला? मुळांत तो शत्रु इथे आलाच कसा? आणि आला तरी मुलाला घेऊन तो निघून गेला तरी कुणालाच कांही सुगावा लागूं नये? अशा सुरक्षादलाचा काय उपयोग? त्यांचा त्याने मनोमन धिक्कार केला. कुणा मनुष्याचे हे काम दिसत नाही. हे खात्रीने कुणा असुराचेच काम असावे. किंवा कांही मंत्राचा वा यंत्राचा प्रयोग कुणी केला असेल काय? अशा शंकांचे थैमान त्याच्या मनांत चालू होते. पण आतां त्याचा विचार करून काय उपयोग? व्हायचा घात तर झालाच होता. माझा वंशवृक्षच भंगला. कुलदेवतेची अवकृपा झाली. एवढा दानधर्म, तप, देवार्चन सगळे कांही निष्फळच ठरले! आतां मला नक्कीच पितरांसहित निपुत्रिकाची दुर्गति भोगावी लागणार. शेवटी त्या ज्योतिषांचे भाकितच खरे ठरले. माझ्या दैवांत पुत्र नाही हेच खरे.त्यांचे न ऐकतां मी हट्टाने केलेल्या तपश्चर्येचा काय उपयोग झाला? हा माझाच मूर्खपणा झाला..” असा विचार करीत तो राजाही स्वतःलाच दोष देऊं लागला. मानवी सामर्थ्याच्या मर्यादांची तीव्र जाणीव झाल्यावरच परमेश्वराच्या आधाराचे महत्त्व ध्यानांत येते. आपल्या प्रयत्नांची परिसीमा झाल्यावरच त्यपलीकडे असलेल्या शक्तीला मनुष्य शरण जातो. पण त्यासाठी श्रद्धा आणि विवेक यांची आवश्यकता आहे. ८३-९२

## परमेश्वराच्या आधाराकडे नेणारा विवेक.

आयुराजाच्या मनांतली श्रद्धा आणि विवेक जागे झाले. “प्रतिकूल दैवाचा प्रतिकार करण्यासाठी मी भगवान दत्तात्रेयांच पाय धरले. त्या भक्तवत्सल अत्रिनंदनाने प्रसन्न होऊन माझ्या हातांत दिलेले फळ कसे नाहीसे होईल? त्यांच्या वचनावरच मी विश्वासलो आहे. मग असे कसे होईल? त्याचा दास जगांत दीनवाणा दिसला तर त्यालाच त्याची लाज आहे. मी अनन्यभावाने त्यांचा आश्रय केला आहे. ते माझई उपेक्षा कशी करतील? माझी बद्धीच भ्रष्ट झाली कीं मला कांही भूल पडली? माझ्याकडून कांही प्रमाद तर झाला नसेल ना? भक्तासाठी नाना रूपांनी नटणाऱ्या त्या प्रभूचे माहात्म्य ब्रह्मादिक देव, महायोगी अशा थोरामोठ्यांनाही आकळत नाही.तर माझा काय पाड? आतां त्यालाच पुन्हा शरण जावे हे खरे.

जमिनीवरून घसरून पडलेल्याना जशी जमीनीचाच आधार असतो तसा प्रभूच्या अपराध्याला भगवंताचाच आधार असतो. (**यथाऽऽलम्बनं भूर्हि भूनिःसृताङ्घ्रेः**)" विवेकाने बळावलेल्या श्रद्धेने तो दत्तप्रभूंची करुणा भाकूं लागला. ९३-९९.

## आर्त भक्तीचा आविष्कार.

ह्यापुढील प्रार्थनेत आयुराजाची आर्त भक्ति आविष्करली आहे. अर्थार्थी भक्तापेक्षां आर्त भक्तीचा संवेग अधिक तीव्र असतो. अर्थार्थी भक्ताला आपण करीत असलेल्या सेवेचा अभिमान असतो. आर्त भक्त अगतिक असतो. आपली असमर्थता आणि दैन्य यांची त्याला पूर्ण जाणीव झाल्याने अहंकार गळून जातो आणि आर्त भक्त देवाच्या अधिक जवळ जातो. यासाठीच भगवंत म्हणतात, "**यस्यानुग्रहमिच्छामि तस्य सर्वं हराम्यहम्**" ज्याच्यावर पूर्ण कृपा करायची आहे त्याचे सर्व हरण करतो. संत तुकाराम महाराज म्हणतात की देव संसाराला चिरा पाडीत येतो. मानवी जीवन ही 'सुखदुखांची अलक्ष्य भेंसळ' आहे. इथे निखळ किंवा शाश्वत सुखाची अपेक्षा करणेच चूक आहे. हा मानवी जीवनाचा विशेषच मानवाच्या उन्नतीला कारण आहे. स्वर्गांतील देवसुद्धा मानवजन्माची आंस धरतात. कारण स्वर्गांत एकामागून एक, देव्य सुखांच्या अनुभूतींतच शेंकडो, हजारों वर्षांचा काळ जातो. ज्ञान असूनही भगवंताच्या उपासनेकडे लक्षच जात नाही. आणि पुण्य समान झाल्यावरच मानवी योनींत जन्म होतो. दोन्हींचाही भोग घेऊनच ते संपवावे लागतात. त्यांत दुःखांतच देवाची आठवण होते. '**पडतां जडभारी दासे आठवावा हरी**.' त्या दृष्टीने विचार केल्यास दुःख वरदानच आहे. कबीरही म्हणतात, 'दुख में सुमिरन सब करैं, सुख में करैं न कोय। सुख में सुमिरन करैं तो दुख काहे को होय?' गुरुतर दुःखांतही परमेश्वराचे श्रद्धेने स्मरण करणे हेच खऱ्या भगवद्भक्ताचे लक्षण आहे. आयुराजा हा खरा भक्त आहे. अशा भक्तांविषयींच श्रीदत्तपुराणांत म्हटले आहे.

ईश्वरे योऽनुरक्तोऽस्मिन्नार्तोऽर्थी वापरोऽपि सः।।
न नश्यति स्वयं तस्य समुद्धर्तास्ति हि प्रभुः।।६ः३ः२५।।

आर्थ, अर्थार्थी वा जिज्ञासूही जर परमेश्वराला प्रीतिपूर्वक भजत असेल तर त्याचा कदापि नाश होणे शक्य नाही. भगवान स्वयं त्याचे पाठीराखी आहेत. भगवद्गीतेत त्यांचे तसे स्पष्ठ अभिवचनच आहे.

**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्।।१२ः७।।**

माझ्या ठिकाणी चित्त स्थिर करणाऱ्या (माझ्या भक्तांना) या जन्ममरणरूपी संसारापासून मी अविलंब उद्धार करतो.

श्रीदत्तप्रभूच साक्षात् परब्रह्म आहेत अशा अनन्य निष्ठेने आयुराजाने मनोमन त्यांचे चरण वंदून प्रार्थना आरंभिली. "जगन्नायका, भक्तवत्सला दत्ता! तुझ्याविना या भक्ताचा कोण त्राता आहे? तूं भक्ताचे कुळ, तप, आचरण, विद्या, संपत्ती या कशाचाही विचार न करतां जे खऱ्या भावाने तुझए पाय धरतात त्यांचा तूं आश्रय होतोस. देवा माझ्या अपराधांची गणना आतां करूं नको. मोठे मोठे लोकसुद्धा पावलोपावली चुकतातच ना? मी तर बोलून चालून मंदमती आहे. किती वेळां चुकले असेन कोण जाणे! मी आर्त होऊन आपल्याला शरण आलो आहे. मला पदरांत घेऊन अभय द्या हीच वारंवार प्रार्थना आहे. मी अगतिक होऊन तुझी करुणा भाकीत आहे. ही वेळ माझा अंत पाहण्याची नाही. पुत्र हाच आत्मा आहे असे वेदवचन आहे. तो माझा आत्माच नाहीसा झाला आणि हे दीननाथा, मी व्याकुळ होऊन हतबुद्ध, आतुर होऊन आपल्या पायीं शरण आलो आहे.

पुत्र आत्मा स नष्टोऽतो नष्टोऽद्यार्तोऽस्मि भो हरे।।
दीनवत्सल मां पाहि श्रीदत्तानन्यमातुरम्।।२३।।

माझे सर्व अपराध पोटांत घेऊन माझ्या ह्या संकटाचा परिहार करा. मला दुसरा आश्रय नाही.” अशी प्रार्थना करीत दीनवाण्या आयुराजाने एकचित्ताने श्रीदत्तचरणी नमन केले. १००-१०८.

.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा बेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ४३ वा.

**दुःखित राजा जाणून। दत्त नारदा दे पाठवून। नारद तेथे येऊन। सांगे ज्ञान रायासी ।।८८।।**
**अस्वतंत्र आपणां जाणून। राजा राणी करिति स्तवन। श्रीदत्ताचें हें कथन। त्रेचाळिसाव्यांत।।८९।।**

## भक्तांच्या चार श्रेणी

मागील अध्यायाच्या शेंवटी “वेदांनी ज्याला आत्मस्वरूपच म्हटले आहे असा माझा पुत्रच नाहीसा झाला आहे.” असे आपले तीव्र दुःख आयुराजा दत्तचरणी निवेदन केले. आपल्या सर्व ज्ञाताज्ञात अपराधांची क्षमा याचीत तो राजा दुःखावेगाने धरणीवर पडला. या ठिकाणी श्रीस्वामीमहाराजांनी भगवद्भक्तांच्या चार वर्ग केले आहेत. ते श्रीमद्भगवद्गीतेच्या सिद्धांताल अनुसरूनच आहेत.

**चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।**
**आर्त जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।।७:१६।।**

थोडा क्रमांत फरक केलेला आहे. अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू आणि ज्ञानी असा क्रम दाखविला आहे. त्यापुढील विवेचनांत हे एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत असे प्रतिपादन आहे. हे सर्वच उदार म्हणजे श्रेष्ठ आहेत ह्या गीतेच्या सिद्धांताचाच पुनरुच्चार करून श्रीमहाराजांनी आपल्या प्रापंचिक कारणासाठीसुद्धा श्रीदत्तचरणी शरण जायलासुद्धां गाठीला पुण्य असावे लागते. ज्यांचा पापक्षय झाला आहे अशा पुण्यवंत लोकांनाच सांसारिक सुखासाठी भगवंताचाच आश्रय करायची बुद्धि होते. कारण त्यांच्या चित्तांतली भेददृष्टी नाहीशी झालेली असते.

**येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्।**
**ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः।।७:२८।।**

पुण्यकर्मांचे महत्त्वाचे असे एक फळ बुद्धीचा विकास हे आहे.. हा बुद्धीचा विकास झालेला नसेल तर संसार सुखाचा होण्यासाठी तो माणूस सर्वसामर्थ्यशाली परमेश्वराला सोडून क्षुद्र देवतांचा आश्रय घेतो. आपापल्या स्वभावानुसार त्या त्या देवतांचे नियम नियम पाळून त्यांची उपासना करतात. १-४.

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः।**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया।।**

### मुक्ताची स्थिति.

ह्यांतील सर्वश्रेष्ठ जो ज्ञानी भक्त तो मुक्तच असतो. त्याचे चित्त निरंतर इतके दृढतेने ईश्वराचे ठायीं निमग्न असते की की जगाचे त्याला भानसुद्धा नसते. जसा बाणाला धार लावण्यांत निमग्न असेल्या शरकाराला आपल्या दुकानासमोरून गेलेल्या राजाच्या मिरवणुकीचेही भान नसावे तसे त्याला प्रपंचाचे भान नसते. तो जरी झोंपलेला असला तरी त्याचे परमेश्वरचरणींचे अनुसंधान किंचितही ढळत नाही. परपुरुषावर मन जडलेली जारिणी जशी आपला संसार करतांनाही त्याच्याच चिंतनांत गढलेली असते तशी त्याची वृत्ती परमात्मरूपीं जडलेली असते. असा जो मनापासून केलेला निदिध्यास असतो तोच सम्यक् असतो. नुसते शरीराने केले कोणतेही कार्य दिखाऊच राहते. बहुतेक काळ मुक्ताचे चित्त

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

अंतर्मुखच असते. तो आंतल्या आत्मसुखांतच मग्न असतो. जरी तो बाह्य व्यवहार करतांना दिसला तरी त्या वेळीसुद्धां त्याचे आत्मानुसंधान स्थिरच असते. **तोही नेत्रीं पाहे। श्रवणीं ऐकतु आहे। परी तेथिंचा सर्वथा नोहे। नवल देखें।।** ज्ञानेश्वरी ५:४१।। हाच सर्वश्रेष्ठ ज्ञानी भक्त म्हणावा. ५-१०

ह्याच्यानंतरची श्रेणी मुमुक्षूची, ज्याला वर जिज्ञासू म्हटले आहे त्याची, आहे. तो प्रेमळ असला तरी संसारात त्याचे मन लागत नाही. म्हणून तो उदासीन असतो. भगवद्भजनाच्या आवडीने त्याला विषयसुखाचा वीट आलेला असतो. तो काम्यकर्माचा त्याग करून निष्काम कर्मयोगाचा अवलंब करतो. नित्य आणि नैमित्तिक कर्में परमेश्वराच्या प्रीतीसाठीच तो करतो. तो श्रद्धापूर्वक भागवतधर्माचे आचरण करण्यांतच सुख मानतो. ११-१३.

याच्या खालोखाल तिसऱ्या क्रमांकावर आर्त भक्त येतो. हा मुळांत प्रापंचिकच असतो. संसारांतील सुखेच त्याला खरीं वाटतात. त्याची सर्व धडपड स्वतःसाठी आणि स्वकीयांसाठी भोगवस्तूंचा संग्रह करण्यासाठीच असते. देवाची कृपा महणजे आपल्याला अधिकाधिक विषयसुखांची सामुग्री मिळणे अशीच त्याची धारणा असते. इष्ट, आप्त, धन, धान्य, घर, जमीन इत्यादि प्रपंचिक गोष्टींचाच हव्यास असतो. ह्या संसारांत फोफावलेल्या त्याच्या आशेचा एखाद्या दुर्घटनेने भंग झाला किंवा एखाद्या असह्य दुःखाचा प्रसंग पुढे आला की तो आर्त होतो. आर्थिक नुकसान, प्रिय व्यक्तीचा मृत्यू, असाध्य व्याधि, राजकीय संकट अशा कांही कारणांनी त्याचे मन कासावीस होते. ह्यालाच आर्त म्हणतात. पण आर्त माणूस परमेश्वराचा भक्त होईलच असे नाही. वर पाहिल्याप्रमाणे अशा प्रसंगी परमेश्वरावर श्रद्धा बसणे, भगवंताचाच आश्रय घ्यावा असे वाटणे हे केवळ पूर्वपुण्याईनेच शक्य होते. हाच आर्त भक्त क्रमशः जिज्ञासू भक्त होतो. जिज्ञासा ही ज्ञानाचीच पहिली पायरी आहे. १४-१६.

सर्वसामान्य प्रापंचिक माणूस इंद्रियजन्य सुखालाच खरे सुख मानून त्याच्याच मागे लागलेला असतो. त्याला खऱ्या सुखाचा झरा आपल्याच अंतरांत असतो हे ठाऊकच नसते. इंद्रियांपासून होणारे सुख हे क्षणिक, मर्यादित, परावलंबी असते. आपल्या जवळच नित्य, अमर्याद आणि निरपेक्ष सुख आहे हे त्याच्या गांवीही नसते. कारण त्याचा विवेक जागलेला नसतो. बुद्धीचा तेवढा विकास झालेला नसतो. अशा ह्या भ्रामक सुखाच्या मागे जवळजवळ सगळेच सागलेले दिसतात. भल्याबुऱ्या मार्गाने स्त्री, धन, पुत्र इत्यादींची प्राप्ति करून घेणे हेच मानवी जीवनाचे कर्तव्य अशी मान्यता दिसते. संत ज्ञानेश्वरमहाराजांनी ह्या अविवेकी लोकांचे असे वर्णन केले आहे.

**पाहे पां दूध पवित्र आणि गोड। पासीं त्वचेचिया पदराआड। परि तें अव्हेरूनि गोचिड। अशुद्ध काय नेघती।। कमलकंदा आणि दर्दुरीं। नांदणूक एकेचि घरी। परि परागु सेविजे भ्रमरीं। जवळिला चिखलुचि उरे।। नातरी निदैवाच्या परिवरीं। लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी। परि तेथ बैसोनि उपवासु करी। कां दरिद्रें जियें।। तैसा हृदयामध्ये मी रामु। असतां सर्व सुखाचा आरामु। कीं भ्रांतासी कामु विषयावरी।। बहु मृगजळ देखोनि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळितां गळाळा। तोडिला परिसु बांधिला गळां। शुक्तिकालाभें।। ९:५७-६१।।**

गाईच्या स्तनाला चिकटलेला गोचीड त्वचेच्या पडद्यामागील पवित्र आणि मधुर दुधाचा अव्हेर करून अशुद्ध रक्ताचाच स्वीकार करतो; कमळाचा मकरंद भ्रमर घेऊन जातात पण शेजारींच वास करणारा बेडूक मात्र चिखलात आनंद मानतो; आपल्या ओसरीतच पुरलेल्या हजारों मोहरांचे ज्ञान नसल्याने एखाद्या अभाग्याने दारिद्र्यांत उपासतापास करीत जगावे; तसा हृदयांतच असलेला सर्वसुखाचा कुंज जो मी आत्माराम त्याला सोडून हे भ्रांत जीव विषयाचीच इच्छा करतात. विपुल मृगजळ दृष्टीस पडल्यावर गळ्याशी असलेल अमृताचा घोट थुंकून टाकावा तसेच हे आहे. असा हा कामार्थी माणूस जर पुण्यवान

असेल तरच तो इच्छापूर्तीसाठी ईश्वराची उपासना करतो. पुण्यहीन पापी मनुष्य अन्य क्षुद्र देवतांच्या मागें लागतो. ह्या देवतांचा प्रेरक जो ईश्वर त्यालाच हा विसरतो. असे असले तरी ज्या ज्या देवतेची उपासना कामार्थी मनुष्य करतो त्या त्या देवतेच्या ठायीं ईश्वरच त्याला स्थिर श्रद्धा देतो. आणि त्याचे ईप्सितही त्याला मिळते. परंतु त्या अल्पबुद्धी लोकांना मिळणारे फळ टिकाऊ नसते. नाशिवंत असते. क्षुद्र देवतांची उपासना करणारे त्या क्षुद्र देवतांच्या अशाश्वत स्वरूपांत मिळतात. ते जन्ममपणाच्या फेऱ्यांतून सुटत नाहीत माझे भक्त मात्र माझ्या चिरंतन स्वरूपाला पावतात.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धया चिंतुमिच्छति।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम्।।७ः२०-२१।।**
**अन्तवत् तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम्।**
**देवान् देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि।।७ः२३।।**

परमेश्वरच देवतांचा प्रेरक आहे आणि तोच सर्व फलांचा दाता आहे हे जाणणाराच भगवंताची भक्ति करतो आणि अर्थार्थी भक्त होतो. ईश्वरभक्तीने इष्टप्राप्तीला थोडा वेळ लागतो. कारण भगवद्भजनाने पापक्षय झाल्यावरच देव त्याचे इष्ट फळ देतो. एवढ्यासाठीच संत साईबाबांनी श्रद्धेला सबूरीची जोड देण्याचा उपदेश केला आहे. १७-२३.

अशा रीतीने मनुष्याला भक्तीची वाट लाभणे किंवा न लाभणे हे त्याच्या पूर्वकर्मानुसार घडत असते. भक्तीच्या प्रभावाने अगदी सामान्य माणूसही पावन होतो. मग ती वरील चारपैकी कोणत्याही श्रेणीची कां असेना. परमेश्वराच्या भक्तीला लागलेल्याचा कधीही अधःपात होत नाही असे भगवंतांचेच वचन आहे. "**न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।** " भक्ति त्याला ऊर्ध्वगतीलाच नेते. त्यामुळेच मोक्षाच्या नाना मार्गांत भक्तीच सुगम आणि सुखाचे साधन आहे. प्रारब्धयोगाने जरी एखाद्या भक्ताचे पतन झालेही तर परमेश्वरच त्याच्यावर कृपा करून त्यांतून वर काढतो. भक्ताचे अधःपातापासून भक्ति रक्षण करते एवढेच नव्हे तर त्याच भक्तीमुळे त्याची वृत्ती पालटते. त्याच्या पापप्रवृत्ती आणि दुर्वासना उत्तरोत्तर क्षयाला जातात आणि त्यांला शम, दम, समाधान, विरक्ति इत्यादि दैवी संपत्तीचा लाभ होतो. शिष्य दीपकाला भक्तीचा हा महिमा सांगून वेदधर्मा मुनींनी पुढील कथाभाग सांगायला आरंभ केला. २३-३०.

"खरेच दीपका, हा ऊर्वशीपुत्र आयु मोठा पुण्यवान असला पाहिजे. आपल्या राजेपणाचा अभिमान इत्यदि सर्व सोडून, पुत्राच्या कामनेने कां होईना, पण त्याने दत्तप्रभूंचे दास्य केले. त्या सेवेने त्याच्या पापांचा नाश झाला आणि श्रीदत्तकृपेने पुत्रलाभही झाला. आतां दैवाच्या गतीने त्याचा पुत्र हरवला आणि तो आर्त झाला. ह्या आर्तीने त्याची भक्ति दुप्पट झाली. मग त्याला भक्तीच्या तिसऱ्या पायरीवर नेऊन – म्हणजे त्याचा जिज्ञासू भक्त करून त्याची भक्ति तिप्पट करावी अशा विचाराने श्रीदत्तप्रभूंनी नारदमुनींना त्याच्यकडे पाठविण्याचे ठरविले. नारदांना बोलावून त्यांना देवांनी सांगितले की 'हे नारदमुने! आयुराजा पुत्रवियोगाने शोकसंतप्त झाला आहे. दास्यभक्तीच्या तपश्चर्येने त्याचे अंतःकरण शुद्ध झाले आहे. पुत्रवियोगाच्या दुःखाने ते आतां ज्ञानाच्या उपदेशाला योग्य झाले आहे. तुम्ही जाऊन त्यांना उपदेश करावा.' " ३०-३७.

## नारदमुनींचे आगमन.

भगवान दत्तात्रेयांची आज्ञा घेऊन निरंतर भगवद्गुण गाणारे नारद मुनी आपल्या वीणेच्या परमपावन झंकारांनी आसमंत पवित्र करीत आयुराजाच्या घरीं आले. त्यांना पाहून राजाने त्यांना परम आदराने नमस्कार केला. "आपल्या आगमनाने मी धन्य झालो," असे म्हणून त्याने नारदमुनींना

उच्चासनावर बसवून त्यांची पूजा केली. अत्यंत विनम्रपणे राजा बोलूं लागला. “आजचा दिवस खचितच माझ्या भाग्योदयाचा आहे. संतचरणाची पूजा करण्याचा योग आला. लोण्याहूनही मृदु अंतःकरणाच्या दयाघन संतांचे अर्चन केल्याने सर्व देवता तृप्त होतात. अज्ञानरूपी निद्रेतून प्रबोधन करणाऱ्या संतांचे मानवांवर अगणित उपकार आहेत. (काय वानूं मी ह्या संतांचे उपकार। मज निरंतर जागवीती।। संत तुकाराम महाराज) या वेळी मी दुःखसागरांत निमग्न असतांना आपले येणे निश्चितच श्रीदत्तप्रभूंच्याच प्रेरणेने झाले आहे. त्या दयाघन परमात्म्यानेच आपल्याला माझ्याकडे पाठविले आहे! त्यांच्याच प्रसादाने मला पुत्र झाला खरा; पण त्याच्या वियोगाने होणारे हे दुःख माझे प्राणच शोषील की काय असे वाटते आहे. मुनीमहाराज! आपणच मला ह्याच्या शमनाचा कांही उपाय सांगावा.” ३८-४५.

राजाचे हे केविलवाणे बोलणे ऐकून नारदांनी हसकेसे स्मित केले आणि म्हणाले, “काय आश्चर्य आहे राजा? सर्व राज्यभोग सोडून माहूरला शंभर वर्षे राहून ज्या दत्ताची तूं सेवा केलीस त्याचे नुसते स्मरण केले तरीही संसाररूपी महान दुःखाचा नाश होतो. अरे, ‘पुत्र हा खरोखर आत्मा आहे’ (आत्मा वै पुत्र नाम आस।), ह्या श्रुतीचा अर्थ तुला नीट समजला नाही. इथे पुत्राला आत्मा म्हटले आहे पण ते गौण अर्थाने! स्त्री-पुत्र-धनादिक सर्व संसारच नश्वर आहे. इतकेच काय ज्या देहाच्या संबंधाने ही नाती जुळतात तो देहसुद्धां एके दिवशी पडणारच आहे. आत्मा तर अविनाशी आहे. आत्मस्वरूपाला विसरून तू ह्या देहालाच आपले स्वरूप मानल्यामुळे हा अनर्थ झाला आहे. एखाद्या क्रूर, सामर्थ्यशाली पुरुषाला सिंह म्हटले तर तो कांही खरा सिंह थोडाच होतो? तसेच पुत्राला आत्मा म्हटल्याने तो मुख्य आत्मा होत नाही.”

## प्रत्यगात्मा.

तुझा स्थूल देह, त्याला चाळवणारा प्राण, त्याला प्रेरणा करणारे मन आणि बुद्धि हे सर्व घटासारखे जड आणि विकारी आहेत. त्यांना साक्षित्वाने पाहणारा, त्यांच्यांत चेतना आणणारा तूं त्यांच्यापेक्षां वेगळा आहेस. पत्नी, पुत्रादिक ज्याला आवडतात, ज्याच्या कारणाने आवडतात तो आत्मा तूं आहेस. बृहदारण्यक उपनिषदाच्या (२:४:५) प्रतिपादनानुसार पति, पत्नी, पुत्र इत्यादीवरचे प्रेम हे आत्म्याच्या प्रेमाचीच प्रतिबिंबे आहेत. (आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।) **देह+इंद्रिय+मन+धियां साक्षिणं असंगं अजं परमात्मानं यो न वेत्ति स तु अनार्यः।**(५५). देह, इंद्रियें, मन आणि बुद्धि ह्यांचा साक्षी (वेगळेपणाने, तटस्थतेने केवळ पाहणारा) असंग आणि निर्विकार अंतरात्मा जो जाणत नाही तो तर असंस्कृत आहे. आपली बुद्धी लीन होते आणि आपण झोंपतो. ही सुषुप्ती अवस्था.. तीच बुद्धि जागी झाली की जाग्रतावस्थेत येतो. असा हा प्रपंच बुद्धिनिष्ठ आहे. पण या दोन्हीही अवस्थांचा अनुभव घेणारा बुद्धीच्या पलीकडचा आहे हे स्पष्ट नाही का? तुला पाहणारा किंवा पाहूं शकणारा कुणीच नाही. असा तूं निःसंग, निर्विकार आहेस; मग तुला शोक वा कष्ट कसे होतील? अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय कोशांपेक्षां विलक्षण, स्थूल सूक्ष्म आणि कारण या तीनही देहांचा चालक तूं आहेस. स्थूल देहाच्या जाग्रत अवस्थेत इंद्रियांच्या द्वारां विषयांचा भोग घेणारा तूंच आहेस; तसेच सूक्ष्म देहाच्या स्वप्नावस्थेत सूक्ष्म इंद्रियांनी सूक्ष्म विषयांचा (प्रविविक्त) भोग घेणाराही तूंच आहेस. गाढ झोंपेत बुद्धी अज्ञानांत लीन झाली असतां निद्रेच्या आनंदाचा भोग घेणाराही तूंच आहेस. त्या त्या अवस्थेत तुझा त्या त्या देहाशी संबंध (अन्वय) असतो. इतर दोन देहांचा मात्र व्यतिरेक (अभाव) असतो. याचाच अर्थ तूं ह्या तीनही देहांपेक्षां भिन्न, त्यांचा साक्षी आहेस. आपल्या जीवनासाठी, आपल्या सुखासाठी, आपल्या आवडीसाठी तूं हे स्त्री-पुत्र-धनादि जोडून घेतोस. तुझ्यासाठी ते आहेत. त्यांच्याकरितां तूं नाहीस. ते सर्व दृश्य प्रपंचाचा भाग आहेत. तूं या सर्वांपेक्षां विलक्षण, त्यांचा साक्षी मात्र, आहेस. ४६-५८

## जीव आणि परमात्म्याचे ऐक्य.

वरीलप्रमाणे पंचकोशविलक्षण, अवस्थात्रयातीत, आनंदरूप, चैतन्यघन असा प्रत्यगात्मा आयुराजाला दाखवून आतां नारदमुनि त्याचे आणि परमात्म्याचे ऐक्य प्रतिपादन करीत आहेत. “सर्वांपेक्षां श्रेष्ठ, सर्वज्ञ ईश्वरच जीवरूपाने सर्व शरीरांत लीला करीत असतो. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे तोच सर्व भूतमात्रांच्या हृदयांत राहून शरीररूपी यंत्रावर आरूढ झालेल्या त्या जीवांना आपल्या मायेने फिरवीत असतो. **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति। भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया।।**१८:६१।। त्या परमात्म्याला जाणले की सर्व जाणल्यांसारखे आहे. त्याच्याच प्रभावाने जीवाला कर्तेपण आहे आणि तोच त्या कर्मांची फळे जीवाला देत असतो. तो जरी सर्व जगाचे अधिष्ठान असला तरी ते जग त्याला स्पर्शू शकत नाही. स्थूल, सूक्ष्म इत्यादि विशेषणांनी त्याचे वर्णन करतां येत नाही. तो वाचेने वर्णवत नाही. सर्व आनंदाचे, सुखाचे निधान असा, परमकल्याणस्वरूप आत्मा म्हणजेच मी आहे असा निश्चय झाल्यावर मग दुःख, शोक, मोह, इच्छा, क्रोध, पाप, ताप यांना वावच राहत नाही.” ५९-६२.

## पुत्रासुखाचे वास्तव स्वरूप.

“हाच मुख्य आत्मा आहे. पंचकोशात्मक देहसुद्धां मिथ्यात्मा आहे. दुरून येणाऱ्या कोल्ह्याचे सिंहपण जसे मिथ्या असते तसेच या देहाचे आत्मत्व भ्रामक आहे. पुत्र वर सांगितल्याप्रमाणे गौणात्मा आहे. तो सततच दुःखाला कारण असतो. आधी मुलगा नाही म्हणून अभावरूपाने तो दुःखाला कारण होतो. मग गरोदरपणाचे कष्ट भोगवितो. प्रसूतीच्या वेळी तर मातेला मरणांतिक वेदना होतातच. एकदांचा जन्माला आल्यावर त्याला कांही पीडा-बाधा होऊं नयेत ही चिंता आईवडिलांना बेजार करते. मग त्याची एकामागे एक .येणारी आजारपणे मातापित्यांची झोंप उडवतात. थोडा मोठा झाला की शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या गाऱ्हाण्याना तोंड देऊन ते मेटाकुटीला येतात. पुढे शाळेला जायला लागला की त्याच्या शिक्षणाची काळजी सुरू होते. त्याला शिक्षणाचे वर्ग लावणे, त्याच्याकडून अभ्यास करून घेणे, वेळप्रसंगीं तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावा म्हणून पैसा आणि प्रतिष्ठा पणाला लावणे ह्या सर्व खटपटीनंतर एकदांचे त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तो कसाबसा नोकरी-व्यवसायांत टिकला की लगेच त्याच्या विवाहाची काळजी सुरू होते. योग्य वेळी लग्न न झाले तर आणखीच चिंतेचा विषय! एकदांचे त्याचे चार हात झाले तरी नवरा-बायको सुखाने नांदतीलच याची शाश्वती नसते. त्यांचा संसार मार्गी लागलाच तर संततीच न झाली तर? अशा रीतीने हा तथाकथित पुत्र नांवाचा (गौण) आत्मा कोणत्या ना कोणत्या कारणाने दुःखच देतो. म्हातारपणी तो आपल्याला सांभाळील ही शक्यताही कमीच. असा आजन्म मातापित्यांना जिवंतपणी जाळणारा हा अग्नीच आहे.“ ६३-७३.

## नारदमुनींचा दिलासा.

हे सांगून नारदमुनि राजाला म्हणतात, “हे पुत्राचेच काय, संसारालांतील प्रत्येक सुखाचे वास्तविक स्वरूप जाणून घे आणि त्या गौणात्म्याची माया टाकून आपल्या आत्मस्वरूपाची प्रीति धर. हाच या नाशिवंत संसारात समाधान पावण्याचा खरा उपाय आहे. आतां मी काय संगतो ते नीट ऐक. जो पुत्र नाहीसा झाला म्हणून तू दुःखाने तळमळतो आहेस तो हुंडासुराने आपला शत्रू आहे हे जाणून त्याला मारून टाकण्यासाठी आपल्या नगराला नेला होता. श्रीदत्तकृपेने तो त्या असुराच्या तावडीतून सुटून एका ऋषींच्या आश्रमांत पोहोंचला आहे आणि सुखांत आहे. योग्य वेळीं तो हुडासुराचा वध करून आणि तिकडेच लग्न करून पत्नीसह तुम्हांला भेटेल. त्याची चिंता तुम्ही श्रीदत्तप्रभूंवर सोडा. तो इथे पृथ्वीवर तर राज्य करीलच पण ह्याच मानवी देहाने तो इंद्रपदावर बसून स्वर्गाचेही राज्य करणार आहे. ” असा राजाला धीर देऊन नारदमुनि जसे आले तसे नामसंकीर्तन करीत आपल्या मार्गाने निघून गेले. ७४-७९.

नारद मुनींच्या गमनानंतर राजाने इंदुमती राणीला त्यांच्या उपदेशाचा विचार करायला सांगितले. त्यांनी जो आत्मा आणि अनात्मा यांचा विवेक सांगितला तो मनांत चांगला स्थिर करून सर्व शोकापासून मोकळे व्हावे असे सांगून तो पुढें म्हणाला, "खरेच ह्या सतत बदलत्या संसारांत कोण कुणाचा मुलगा? आपण अनादि मोहाला वश होऊन संसारांतील नात्यांशी उगीचच ममत्व वाढवतो. आपणच वाढवलेला हा स्नेहाचा बंध आपणच विवेकाने तोडायला हवा. आपल्याला मनांत सलणाऱ्या ह्या दुःखाला शांत करण्याचा हाच एक उपाय आहे. मी श्रीदत्तप्रभूंना प्रसन्न करण्यासाठी किती चिकाटीने किती काळ प्रयत्न केले? आणि ते प्रसन्न होऊन वर द्यायला लागले तर मी काय मागितले तर मुलगा? त्यांनी माझी इच्छा पुरी केली; पण ती दुःखपर्यवसायीच ठरली! माझ्या वंशाच्या वृद्धीच्या खुळाने मला वंचित केले, हे आत्तां माझ्या ध्यानांत आले. वेदाची वचने परोक्ष असतात. सकृद्दर्शनी ती कळत नाहीत. पुत्रच आत्मा आहे ह्या वचनांतील गोम आज नारदांच्या उपदेशाने मला समजली. हेच मी केलेल्या दत्तसेवेचे खरे फळ आहे. नाशिवंत आणि दुःखकारक असा पुत्र नव्हे! जप, तप, यज्ञ, दान इत्यादि पुण्यकर्मांनीही ज्याचे दर्शन होणे कठिण आहे तो आत्रेय दत्त मी पाहिला! तो केवळ भक्तीनेच पावतो. त्यांची कृपा खरोखर अगाध आहे. " ८०-८८.

राजाच्या गंहिवरल्या कंठांतून आलेले हे वचन ऐकून राणीचेही डोळे पाणावले. भक्तीने भरलेल्या मनाने तिने श्रीदत्तप्रभूंना नमस्कार केला. ती म्हणाली, "हे नाथ! हा नारदमुनींच्या सांगावा माझ्या मरणोन्मुख मनाला संजीवनी झाला आहे. सर्व वेदांचे सारभूत असलेले मुनींचे भाषण कानांवर पडतांच माझे मन निवले. माझ्या चित्ताची तगमग थांबली. नारदमुनींची फेरी आपल्याकडे झाली ही त्या सद्गुरुनाथ दत्तात्रेयांचीच कृपा आहे. आतां मनाचा भ्रम नाहीसा झाला आहे आणि भगवान दत्तात्रेयांच्या चरणीं भक्ति जडली आहे. " असे बोलून ती राणी दत्तप्रभूंची प्रार्थना करूं लागली. ८८-९१.

## इंदुमतीची प्रार्थना.

"हे भगवंता दत्ता! सर्व जीवांच्या देहरूपी पुरांत वसणाऱ्या कूटस्थ पुरुषा ! तू वास्तविक अनंत आहेस. अंतःस्थ अशा तुला पहाण्यासाठी इंद्रियें (अक्ष) आंत (अध) फिरवावी (अंतर्मुख करावी) लागतात म्हणून तूं अधोक्षज आहेस. ह्या सर्व जगताचा निर्माता, पोषिंदा आणि संहर्ता तूंच आहेस. आपल्या त्रिगुणात्मक मायेचा अंगीकार करून द्रव्यशक्ति(तमोगुण), क्रियाशक्ति(रजोगुण) आणि ज्ञानशक्ति (सत्त्वगुण) यांनी युक्त भासतोस. आणि अनुक्रमे महेश, ब्रह्मदेव आणि विष्णु ही रूपें धारण करून जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय करतोस. एकच तूं पार्वतीपति, सावित्रीपति आणि लक्ष्मीपति होतोस. ह्या आणि इतरही अनेक देवतांचा, ह्या सर्वच विश्वाचा तूं एकमेव आधार आहेस. तूं ह्या सर्व सगुणरूपांना धारण करीत असलास तरी ह्या सर्वांहून श्रेष्ठ (परात्पर) आहेस. **(हे) इंद्र, त्वं मायाभिः पुरुरूपः प्रतिरूपः रूपं रूपं विभासि। ते क्रिया भक्तानां उद्धाराय (अस्ति)।।९६।।** हे इंद्रा तूं आपल्या मायेने अनेक रूपें धारण करतोस आणि प्रत्येक रूपांत वेगवेगळा भासतोस. ही सर्व तुझी लीला भक्तांच्या उद्धारासाठीच केवळ असते. माझ्या अज्ञानजनित मोहाची बेडी तोडून टाक, ह्या देहाच्या खोड्यांतून मला मोकळी कर आणि. तुझ्या भजनाची गोडी लाव. इतके दिवस मला हे समजत नव्हते म्हणून मी ह्या विषयांच्या मागे लागून विविध छंद केले. आतां तुझ्या भक्तिरसांत मला भिजवून माझ्या चित्तांतले द्वैत नाहीसे कर. विषयांची कामना करणाऱ्या तुझ्या भक्तांना तूं विषय देतोस, मुमुक्षूंना मोक्ष देतोस आणि मुक्तांना आपल्या चरणकमली रिझवतोस. जो जो जें जें वांछील ते ते त्याला देणारा तूं जणुं चिंतामणीच आहेस.

**योऽदाद्दिव्यं सुतं तं स सर्वदा पातु सर्वतः।।**

**अनन्यायाः स विश्वात्मा भगवान्मेऽस्तु सद्गतिः।।४१।।**

जो दिव्य पुत्र तूं आम्हांला तूं दिला आहे त्याचे तो भगवंत सतत सगळीकडून रक्षण करो. तोच जगदात्मा आमची परम गति आहे. " ८८-१००.

## आयूची प्रार्थना.

इंदुमतीची प्रार्थना ऐकून आयुराजानेही अत्यंत प्रेमाने हात जोडून दत्तप्रभूंची प्रार्थना केली. ही प्रार्थना आपण सर्वांनीच नित्य करण्यासारखी आहे. हा सहा चरणांचा अभंग बऱ्याच ठिकाणी रोज आरतीच्या वेळीं म्हटला जातो.

"देवांच्याही देवा, दत्तात्रेया! तुझ्या अलौकिक लीला गात असतां आमचे चित्त तुझ्या चरणी स्थिरावूं दे. भगवंताचे गुणगान, त्याचे नामसंकीर्तन, त्याच्या लीलांचे वर्णन करण्याचे प्रयोजन या चरणांत सांगितले आहे. स्वभावतः बहिर्मुख असलेली इंद्रिये आणि त्यांच्या द्वारा मन सतत विषयांकडेच प्रवाहित होत असतात. त्यांना अंतर्मुख करण्याचे हे उपाय आहेत. दुसऱ्या एका अभंगांत श्रीस्वामी महाराज म्हणतात, "**सकळ इंद्रिये आणि मन हे तुझे हातिं आहे। यास्तव आतां तूं लवलाहे स्वपदीं मन रमवावे।**" कारण तोच हृषीकांचा, म्हणजे इंद्रियांचा ईश आहे. १.

माझी वाचा तुझ्या गुणांचे स्तवन करण्यांतच रमून जावी हीच संपत्ती माझ्या पदरांत घाल. सामान्यतः ईश्वराच्या भजनांत मनाला रस वाटत नाही; कारण तें विषयसुखाला चटावलेले असते. त्याला आंतरिक सुखाची गोडी लागण्यासाठी अभ्यासाची अपेक्षा आहे. तो संत ज्ञानेश्वरांनी बाराव्या अध्यायांत सांगितला आहे. "**अथवा हें चित्त। मनबुद्धीसहित। माझ्या हातीं अचुंबित। न देवों शकसी। तरी गा ऐसे करी। इयां आठां पहारांमाझारीं। मोटके निमिखभरी देतु जाय।। मग जे जे कां निमिख। देखेल माझे सुख। तेतुलेनि अरोचक। विषयीं घेईल।। ...तैसे भोगाआंतूनि निगतां। मजमाजीं रिघतां। हळूहळू पंडुसुता। मीचि होईल।।** १०४-१०६, १०९।।" २.

हे वरद प्रभो! ह्या माझ्या हातांकडून तुझ्या भक्तांची सेवा घडावी हाच वर मला दे. वरील अभ्यास दृढ व्हायला हवा असेल संतांच्या कृपेची नितांत आवश्यकता आहे. कारण संत तुकाराम म्हणतात, "**संतचरणरज लागतां सहज। वासनेचे बीज जळुनी जाय। मग रामनामीं उपजे आवडी। सुख घडोघडी वाढों लागे।।**".यासाठी या चरणांत देवाला तुझ्या भक्तांची – संतांची सेवा माझ्याकडून घडावी हे मागणे मागितले आहे. ३

तुझे गुणगान करीत असतां माझे चित्त द्रवो जेणेंकरून माझ्या संचिताचा क्षय होईल. अशा रीतीने जो भगवद्गुणगानांत रंगून जातो त्याचे चित्त द्रवीभूत होते. श्रीमधुसूदनसरस्वतींच्या प्रतिपादनानुसार चित्त पातळ होऊन धारेसारखे भगवंताकडे प्रवाहित होते. ह्या चित्ताच्या वृत्तीलाच भक्ति हे नांव आहे.

**'द्रुतस्य भगवद्धर्माद्धारावाहिकतां गता ।**
**सर्वेशे मनसो वृत्तिर्भक्तिरित्याभिधीयते ।।'**

(भक्तिरसायन १।३)

लाखेसारखे कठिण असलेले चित्त भगवद्भजनाने द्रवीभूत झाल्यानंतर त्यांत जो छाप उमटतो तोच आकार स्थिर होतो. एकदां भगवदाकार झालेले चित्त मग पुन्हा विषयाकार होत नाही. विषयचिंतनाने जरी चित्त थोडे विरघळल्यासारखे वाटले तरी ते धारावाहिक करण्याची क्षमता फक्त भगवद्भजनांतच आहे. हेच भक्तीचे मुख्य फळ आहे. ४.

त्या वेळी माझे अंग सात्त्विक भावांनी थरथरावे आणि ताठ रोमांचांनी फुलून जावें; हा उच्च हा नीच ही भेददृष्टीच नष्ट व्हावी.. अशा ह्या श्रवणकीर्तनादिरूप साधनभक्तीचा परिपाक साध्य भक्तीत होतो. म्हणजे अंतःकरण भगवदाकार होते. त्या वेळीं बाह्य देहांत अष्टसात्त्विक भावांचा उदय होतो. वर उद्धृ केलेल्या अभंगाच्या पुढच्या चरणांत तुकोबाराय म्हणतात, "**कंठीं बाष्प दाटे, नयनीं नीर लोटे। हृदयीं प्रकटे आत्मरूप।।**" ह्या सात्विक भावांचे पुढील श्लोकांत वर्णन केले आहे.

**स्तम्भः स्वेदोऽथ रोमाञ्च स्वरभङ्गोऽथ वेपथुः। वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्त्विकाः स्मृताः।।**

(स्तब्धता किंवा ताटस्थ्य, घाम, रोमांच, गद्गद वाचा, कंप, चेहऱ्याचा आणि शरीराचा रंग पालटणे, अश्रुपात आणि मूर्छा हे आठ सात्त्विक भाव जाणावेत.) हृदयांत रामरूप प्रकटल्याच्या ह्या बाह्य खुणा आहेत. हीच भक्ति परिपक्व झाली चित्तांत समत्व येते. मनांतील उच्च-नीच भाव मावळतात. सर्वांभूतीं परमेश्वराचे दर्शन होऊं लागते. ह्याच समचित्ततत्त्वाची याचना आयूने केली आहे. ५

कपोतादि पक्ष्यांसाठी अंथरलेले जाळे जसा श्येन पक्षी तोडून पळून जातो तसे माझे प्रपंचरूपी जाल तोडून टाक.. " संसाररूपी मायाजालांत सर्वसामान्य जीव गुंतून जातात आणि जन्ममरणाच्या येरझाऱ्या त्यांना चुकत नाहीत हे कवड्यासारखे आहेत. परमेश्वराची भक्ति करणारे मात्र श्येन पक्ष्यासारखे ते जाळे तोडून मुक्त होतात. ६

हा माझा भाव निरंतर तुझ्या पायीं स्थिर होऊन रहावा हेच माझे वैभव आहे. "**गुण गाईन आवडी, हेचि माझी सर्व जोडी।**" संत तुकाराममहाराजांच्या मागणीचाच हा अनुवाद आहे. आध्यात्मिक भाव प्राप्त होण्यापोक्षांही तो टिकून राहणे अधिक अवघड आहे. एकापेक्षा एक श्रेष्ठ भाव प्राप्त करून देणे म्हणजे योग आणि त्या भावांन स्थिर आणि पुष्ट करणे म्हणजे क्षेम. हे दोन्ही परमेश्वरानेच करायचे आहेत. "**योगक्षेमं वहाम्यहम्**" या भगवदुक्तीचे हेच मर्म आहे.

आयुराजाच्या प्रार्थनेत तीव्र मुमुक्षा आहे. कोणतेही प्रापंचिक मागणे त्यांत नाही. "**हेंचि दान दे गा देवा, तुझा विसर न व्हावा।**" असे निश्चयात्मक हे मागणें आहे. त्याची आर्त भक्ती नारदमुनींच्या उपदेशाने आतां जिज्ञासू भक्तीत परिणत झाली आहे. हेंच संतसंगाचे महिमान आहे. उन्मार्गावरून सन्मार्गाला आणणे, भगवद्भक्तीच्या मार्गाला लावणे आणि उत्तरोत्तर श्रेष्ठ भक्तीत तिला वृद्धिंगत करणे हे संतकृपेनेच होत असते. असा तो आयुराजा दत्तस्तुतींत निमग्न झाला. साहजिकच संसारसागर त्याला गाईच्या खुराने केलेल्या डबक्यासारखा क्षुद्र भासूं लागला.

.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा त्रेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[१]

## अध्याय ४४ वा.

**वनांत नहुष जाऊन। आकाशवाणी ऐकून। वसिष्ठापाशीं येऊन। घे जाणून सर्व तें।।९०।।**
**देवद्विजपीडकासुर। त्या माराया चाले कुमार। त्यांचें साह्य करिती सुर। हें चौवेचाळीसाव्यांत।।९१।।**

श्रीदत्तप्रभूंनी राखलेल्या, दिक्पालाचे अंश घेऊनच उपजलेल्या, त्या सूर्यासारख्या तेजस्वी आयुपुत्र नहुषाने हुंडासुराचा वध कसा केली ते सविस्तर जाणून घेण्याची आपली इच्छा निरहंकार दीपकाने गुरु वेदधर्म्याचे चरणी वंदनपूर्वक निवेदन केली. त्याची दत्तकथामृतपानाची ती तीव्र उत्सुकता पाहून प्रसन्न झालेले मुनि पुढे सांगत आहेत. १-३.

## नहुषाला आकाशवाणी.

**यस्य बाल्ये एव पितराः सगोत्राः वियुक्ताः सः नहुषः मुनिं निमित्तीकृत्य दत्तेन रक्षितः।** अर्भकावस्थेतच ज्याचे आईवडील आणि सर्व गणगोत दुरावले त्या नुहुषाचे रक्षण वसिष्ठ मुनींचे निमित्त करून स्वयं दत्तप्रभूंनीच केले. एऱ्हवी आत्मानंदांत सदैव निमग्न असणारे मुनि आपली समाधि सोडून नहुषाचे पालन कां करतील? श्रीदत्तप्रभूंनीच त्यांचे मन वळविले असेच मानावे लागते. अरुंधती आणि वसिष्ठ यांनाच मातापिता मानणारा तो नहुष त्यांच्या मार्गदर्शनाने देवांचे वैभव वाढविण्यास आणि असुरांचा तोरा उतरविण्यास समर्थ झाला. वेदांचा आणि धनुर्वेदाचाही अभ्यास त्याने सारख्याच चिकाटीने, उत्साहाने आणि निरलसतेने केला. शस्त्रास्त्रांच्या प्रयोगांत जसा तो पारंगत झाला तसाचा शास्त्रांचा ज्ञाता आणि वक्तही झाला. सरळ मनाने, नम्र वागण्याने आणि एकाग्र चित्ताने गुरु वसिष्ठांचे अनुसरण करून नहुषाने सर्व विद्यांमध्ये प्रावीण्य संपादन केले. आपल्या या सदाचरणी शिष्यावर अर्थातच वसिष्ठांचा खूप जीव होता. त्याची तयारी पाहून एके दिवशी त्याला बोलावून त्या ऋषिश्रेष्ठांनी सांगितलें, "अरे नहुषा! तूं धनुष्यबाण घेऊन अरण्यातील हिंस्र पशूंची शिकार कर." गुरूंची आज्ञा प्रमाण मानून नहुष सज्ज होऊन वनांत शिकारीला गेला. गाईंची, इतर निरुपद्रवी पशूंची तसेच माणसांचीसुद्धा हिंसा करणारे वाघ-सिंहादि अनेक पशु नहुषाने ठार केले. स्वर्गांतल्या देवांचे नहुषाकडे लक्ष होतेच. हाच आपल्याला उन्मत्त हुंडासुराच्या जुलुमांतून सोडवणार आहे अशा अपेक्षेने ते त्याच्या वयांत येण्याची प्रतीक्षा करीत होते. शिकारीतून प्रकट झालेले नहुषाचे युद्धकौशल्य पाहून त्यांना फारच आनंद वाटला. तोच त्यांनी आकाशवाणीच्या रूपाने व्यक्त केला. ४-१३

**" आयुःसुतोऽयं नहुष इन्दुमत्यात्मजो विधेः।।**
**मात्रा वियोजितो बाल्ये वसिष्ठेनाभिपालितः।।४७।।**
**दुःखितावस्य तातौ च शिवजाऽशोकसुन्दरी।।**
**एतमुद्वाहितुं तेपे हुण्डकारास्थिता तपः।।४८।।**

अरे नहुषा! तूं ऋषिपुत्र नाहीस! सोमवंशीय आयुराजा आणि त्याची राणी इंदुमति यांचा तूं मुलगा आहेस. जा, तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलेल्या तुझ्या वडिलांना भेटून त्यांचे दुःख निवारण कर! तसेच शिवकन्या अशोकसुंदरी तुझ्यावर वाटेकडे डोळे लावून बसली आहे. तिच्याशी विवाह कर! मानवांना केवळ भक्ष्यच मानणाऱ्या हुंडासुराच्या कैदेत ती आहे. त्याचा वध करून तिच्याशी लग्न करून मग तूं

---

[१] *Email ID: Vasudeo@gmail.com*

आईवडिलांचे दर्शन घे! भिऊं नकोस! श्रीदत्तांच्या वरप्रसादाने हुंडासुरासहित सर्व दैत्यांचा निःपात करण्याचे सामर्थ्य तुझ्याकडे आहे. सर्व चिंता सोड आणि आपले नियत कार्य संपन्न कर! ” १४-१७.

## वसिष्ठ ऋषींची आज्ञा व संग्रामाशिष.

ही आकाशवाणी ऐकून नहुष संभ्रमांत पडला. आपण तर वसिष्ठपुत्र आहोंत. ही आकाशवाणी माझा बुद्धिभेद तर करीत नसेल? ही आकाशवाणी देवांचीच आहे कां कुणा कपटी शत्रूची आहे. असे अनेक तर्कवितर्क करीत नहुष घरीं परतला. वसिष्ठ ऋषींना नमस्कार करून त्याने हा वृत्तांत निवेदन केला. तेव्हां त्यांनीही त्या देववाणीला पुष्टीच दिली. म्हणाले, “खरें आहे बाळा! श्रीदत्तप्रसादाने सोमवंशांतील आयुराजाची राणी इंदुमती हिच्या पोटीच तुझा जन्म झाला आहे. तो दत्तभगवंत सतत तुझ्या पाठीशी आहे. तुझ्या रूपाने आपला शत्रूच जन्मला आल्याचे जाणून हुंडासुराने तुला गर्भांतच नष्ट करण्याचे प्रयत्न केले. पण सतत तुझ्याभोंवती फिरणाऱ्या सुदर्शनचक्रापुढे त्याचे कांही चालेना. मग तुझा जन्म झाल्यावर त्याने आपली आसुरी माया पसरून सर्वांना भूल पाडून तुला पळवून आपल्या घरी नेले. तुझा लागलीच ग्रास करायच्या हेतून त्याने तुला आपल्या पत्नीकडे दिले. त्या नास्तिक दैत्यांच्या हातीं पडूनही तूं दत्तकृपेने बचावलास. हुंडपत्नीने तुला दासीच्या हातीं दिले. तुझा पाक करणाऱ्या स्वयंपाक्याचे शस्त्र तीन वेळां प्रयत्न करूनही चालेना. शस्त्रच तुटून पडले तरी तुला ओरखडाही उठला नाही. तेव्हां त्याने तुला गुपचुप माझ्या आश्रमांत आणून टाकले. आम्ही सर्वांनी तुला दुसरे दिवशी सकाळी पाहिले. मला ध्यानांतून तुझा पूर्ववृत्तातं लक्षांत आला. तुला पुन्हा असुरांचा उपद्रव होऊं नये यासाठी तुला तुझ्या घरीं न पाठवतां मी इथेच गुप्तपणे तुझे पुत्रवत् पालन केले.” १८-३५.

वसिष्ठ मुनि पुढे सांगतात, “आतां योग्य वेळ आली आहे. तूं लगेच निघून असुरांचा संहार कर. त्यानंतर तूं परत इथे येऊन माझा प्रसाद घेऊन मग आपल्या नगराला जाऊन सुखाने राज्य कर. ज्या अशोकसुंदरीने पूर्वीं हुंडासुराला तुझ्या हातीं मरण येईल असा शाप दिला होता, त्या शिवकन्येला हंडासुराने तुरुंगांत डांबून ठेवले आहे. ती तुझ्याशी लग्न करावें या इच्छेने तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. आतां अविलंब तूं हुंडासुराचा वध करून अशोकसुदंरीशीं विवाह करून आपल्या मातापित्यांचे दर्शन घे. त्या जगत्पालक दत्तात्रेय प्रभूचे चरणस्मरण करून युद्धाला जा. त्याचे कृपेनेच तूं असुरांचा संहार करून विजयी होशील.” असे बोलून मुनिवरांनी त्याला, “**पितराः ते वरदाः सन्तु, सुराः बलदाः सन्तु, मंत्राः ते यशोदाः सन्तु, द्विजाः आयुदाः सन्तु।।४३।।** ” (पितरांचा आशीर्वाद तुझ्यावर असो, देवता तुला बळ देवोत, मंत्र तुला यश मिळवून देवोत आणि ब्राह्मण तुला (दीर्घ) आयुष्य प्रदान करोत.) अशा अर्थाचे वैदिक संग्रामाशिष दिले. याशिवाय वसिष्ठांनी स्वतःकडून “तूं चिरंजीव होऊऩ तुझी कीर्ति दिगंत पोहोचेल,” असाही आशीर्वाद दिला. ३६-४४.

हर्षोत्फुल्ल मनाने नहुषाने नतमस्तक होऊन मुनींचा आशीर्वाद स्वीकारला आणि त्यांचे पाय धरून म्हणाला, “ताता! आपण माझे अंतःकरण जाणतां. मी अधिक काही बोलण्याची आवश्यकताच नाही. मला सर्वस्वी तारणारे हेच आपले चरण आहेत. कामक्रोधादि सहा मोठे वैरीसुद्धा ह्या आपल्या पदकमलांच्या सेवकाला भिऊन त्याचेच सेवक होतात. गरुडाची भरारी नुसती पाहूनच साप घाबरून पळून जातात. तसेच आपल्या सेवकांच्या धाकाने हे महाबलिष्ठ शत्रूही चारी दिशांनी पळत सुटतात. हुंडादि दैत्य तर त्यांच्या तुलनेंत यःकिश्चित आहेत. माझ्या हृदयांत सतत जागणाऱ्या आपली स्मृतीच्या जोरावर मी दैत्यांची मुंडकी पटापट धडावेगळी करीन.” वसिष्ठांनी अत्यंत वात्सल्याने नहुषाला उचलून हृदयाशी धरले, त्याच्या

मस्तकाचे अवग्रहण केले, आणि, "विजयश्री तुला खचितच माळ घालील" असा शुभाशीर्वाद पुनश्च दिला आणि 'ब्राह्मणासः पितरः' इत्यादि वैदिक मंत्रांनी संग्रामाशिष दिला.. त्याचा अर्थ असाः-

**ब्राह्मणाः पितरो देवा दुरितात्पान्तु रोदसी।।**

**पूषा च मा प्रभवतु दुःशंसः सर्वथा जय।।२।।**

ब्राह्मण, पितर, देव आणि सूर्य तुझे आकाशांत व पृथ्वीवर सर्व दुरितांपासून गक्षण करोत. शत्रूंचे अभिशाप निष्फल होवोत आणि तुझा सर्व बाजूनी विजय होवो. ४५-५१.

## नहुषाचे प्रार्थनापूर्वक युद्धाला प्रस्थान.

त्या महर्षींचे आशीर्वाद ग्रहण करून युद्धभूमीकडे प्रयाण करतांना नहुषाने मनोमन श्रीदत्तपादुकांचे स्मरण करून त्यांच्या प्रसादासाठी प्रार्थना केली. "मी नमस्कारसुद्धां न करतां ज्याने माझे गर्भावस्थेपासून आजवर रक्षण केले आणि पूर्ण कृपालोभ माझ्यावर ठेवला त्याचे चरणी नमन असो. तोच आमचे क्षेमकल्याण करो. युद्धांत विजय मिळवून देऊन आमची इच्छा पुरवो आणि आपल्या चरणांची सेवा आमच्याकडून घडवो. नास्तिकांना शिक्षा करणारा, आस्तिकांचे रक्षण करणारा दत्तभगवानच माझा वाली आहे. मनाला रमविणाऱ्या आत्माराम दत्ताचे पाय मनांत धरून मला लवमात्र कष्ट न होतां प्रचंड विजय लाभो. त्याचे गुण गातांना देवगुरु बृहस्पतीचीही बुद्धी तोकडी पडते, नागराज शेषाच्या दोन हजार जिह्वासुद्धा लुळ्या पडतात पण त्याचे गुणगान कोणीही कडेला नेऊं शकत नाही. म्हणून कांही न बोलतां निवांत हात जोडून.त्याच्या पायावर डोई ठेवावी हेच खरे! तोच माझी दाही दिशांनी राखण करो. समोरासमोर लढतांना, कपटाने कुणी मारतांना किंवा रणांगणावर कांही अकल्पित संकट आल्यास तोच माझे संरक्षण करो. माझे मार्ग सुगम व्हावेत, ठिकठिकाणी अन्न, जळ इत्यादि रसद मिळावी आणि सद्भाग्याने विजयी होऊन माझे सुखरूप पुरागमन व्हावे.

**सदा सुगोऽस्तु पितुमान्पन्था माऽवन्तु देवताः।।**

**विजये सुभगो मेऽस्तु पुनश्चागमनं सुखात्।।** दत्तपुराण **६:४:५।।**

'सदा सुगः' या वैदिक प्रार्थनेचा हा अनुवाद आहे." यानंतर त्याने तत्कालीन परंपरेला अनुसरून युद्धासाठी रणांगणावर जातांना 'यत इंद्र' या मंत्राने इंद्राचेही आवाहन केले आहे. "समरोन्मुख योद्धे भीतीवर विजय मिळवण्यासाठी ज्याचे आवाहन करतात तो इंद्र मला निर्भय करो," असा त्याचा अभिप्राय आहे.

**यं युध्यमाना अवस आह्वयन्तीन्द्र स त्वमित्।।**

**यतो बिभेमि मघवंस्ततो मामभयं कुरु।।६।।** ५२-६१.

## नहुषाला शुभशकुन आणि इंद्राचे साह्य.

रणांगणाभिमुख नहुषाची ही साक्षेपाने आणि दक्षतेने केलेली प्रार्थना ऐकून आणि त्याचे ते धैर्य पाहून आकाशस्थ देवांना खूप आनंद झाला. त्यांनी त्याच्या उत्साहाची दाद देत त्याच्या पुष्पवृष्टी केली आणि आकाशांत नगाऱ्यांचा निनाद केला.

**एवमुक्त्वा प्रतस्थेऽसौ हन्तुं हुण्डासुरं तदा।।**

**पुष्पाणि ववृषुर्देवा नेदुर्दुन्दुभयो दिवि।।** दत्तपुराण **६:४:७।।**

वेगाने दैत्याच्या नगरीवर चालून जाणाऱ्या नहुषाला शुभ शकुन झाले. गाई आणि कन्या समोरून आल्या; दही, फळे, फुलांच्या माळा आडव्या गेल्या; भरलेले कलश घेऊन दोन ब्राह्मण त्याला येतांना दिसले वनांतील हरीण उजवी घालून गेले. ते शुभ शकुन पाहून नहुषाला आनंद वाटून त्याचा उत्साह द्विगुणित झाला. इंद्रही हे सर्व पहातच होता. तो याचीच वाट पहात होता. तो देवांना उद्देशून

म्हणाला,"हा पहा आयुपुत्र नहुष! हा आमच्या कार्यासाठीच चालला आहे. मुनिपुत्राच्याच वेषांत जातांना याचे पाय दुखत असतील. याला आपण मदत करायलाच पाहिजे. मी माझा रथ त्याच्यासाठी भूमीवर पाठवीत आहे. तो हुंडासुराशी लढतांना तुम्हीही सर्वांनी जाऊन त्याला साह्य करा. आपल्याला हवी असलेली सुवर्णसंधि आली आहे. त्याच्या पाठीशी उभे राहून लढाल तर आतां जय तुमचाच आहे!" अशी सर्व देवांना आज्ञा करून इंद्राने आपला सारथि मातली याच्याबरोबर उत्तम घोडे जुंपलेला आपला सर्व सामग्रीसहित सज्ज केलेला रथ नहुषाकडे पाठविला. त्यांत चिलखत, मुकुट, कुंडले, बाणांचा भाता, धनुष्य आणि इतरही सर्व आयुधें ठेवली होती. रथावर सुंदर छत्र होते आणि त्यावर ऐटदार झेंडा फडफडत होता. इंद्राच्या आज्ञेप्रमाणे मातली तो रथ घेऊन नहुषासमोर येऊन उभा राहिला आणि त्याला "हा सुसज्ज रथ इंद्रमहाराजांनी आपल्याला या युद्धांत मदत म्हणून पाठविला आहे त्यांत बसून हुंडासुराला ठार करा!".असा निरोप कळविला.

**सवर्मेषुधिचापास्त्रं सच्छत्रमुकुटध्वजम्।।**
**रथमास्थाय हर्यश्वं दिव्यं हुण्डासुरं जहि।।** दत्तपुराण **६:४:११।।**

नहुषाने तो चकाकणारा रत्नजडित मुकुट शिरावर धारण केला; ती तेजस्वी कुंडले कानांत घातली आणि चमकदार, दृढ कवच मंत्रपूर्वक अंगावर चढविले. त्यानंतर त्या रथाला प्रदक्षिणापूर्वक नमस्कार करून विहित मंत्रांचा उच्चार करीत तो त्यावर आरूढ झाला. रथोतच असलेले मोत्यांचे हारही गळ्यांत घालून त्यने मातलीला वेगाने रथ चालवण्याची आज्ञा केली. भगवान दत्तात्रेयांचीच अनुकूलता असल्यावर कशाचीच कमतरता पडत माही. मातलीने घोड्याचे लगाम खेचून चाबकाचा आवाज करीत रथ पुढए काढला. ६२-७९

तेवढ्यांत इंद्राने पाठविलेले देवांचे सैन्यही तिथे येऊन ठेपले. आपण त्याच्या साहयासाठी आल्याचे त्यांनी सांगितल्यावर नहुष म्हणाला, "तुमच्या येण्याला कारण माझी सतत पाठराखण करणाऱ्या दत्तप्रभूंचीच प्रेरणा आहे. भक्तांच्या इच्छा पुरविणारा तो कल्पवृक्षच आहे. त्या योग्यांचा नायक पाठीशीं उभा असल्यावर कांहीच कमी पडत नाही हे मी शपथेवर सांगतो. मी नित्य श्रीगुरूंच्या आज्ञेनेच कार्य करतो ते एवढ्यासाठीच. तोच सर्व कष्ट दूर करून प्राण वांचवतो." असे बोलून महुष पुढे निघाला. ८०-८३.

## अशोकसुंदरीचा सांगोवा.

नहुष हुंडासुरावर चाल करून .येत असल्याची वार्ता तुरुगांत बंदिस्त असलेल्या अशोकसुंदरीला समजली तेव्हां ती आनंदाने मोहरून गेली. **या विभुं ईशं 'नहुषः मां वृणोतु' इति प्रार्थयन्ती सा तत्+आगमनं ज्ञात्वा तस्मै रंभां समीरयत्।८५।।** रात्रंदिवस भगवान शंकरांच्या चरणी "नहुषाशी माझे लग्न व्हावे" अशी प्रार्थना करणाऱ्या अशोकसुंदरीला त्याच्या आगमनाची बातमी कळतांच तिने आपली सखी रंभा हिला त्याच्याकडे पाठविले. ती नहुषापुढे जाऊन म्हणाली, "तुमची स्वारी येत असल्याचे ध्यानाने जाणून माझी सखी अशोकसुंदरी हिने मला पाठविले आहे. बिचारी हुंडासुराच्या तुरुंगात खितपत आहे; पण अहर्निश तुझेच चिंतन ती करीत असते. ती तुझी भावी पत्नीच आहे. तिला तूं सोडवायला हवें. ती साध्वी हुंडासुराच्या कैदेत असूनही निर्दोष आहे हे मी शपथेवर सांगते. आम्ही असत्य बोलत असलो तर आमचा स्वर्गातून अधःपात होवो! " नहुषाने थोडक्यांत आश्वासन दिले, "हे रंभे, मला सर्व आधीपासून हकीकत ध्यानांत आली आहे. आतां तूं परत जा. हुंडासुराचा अंत झाला की तिथेच पुन्हा भेट होईलच."

**राजाऽऽह रम्भे गच्छ त्वं ज्ञातं सर्वं मयाऽऽदितः।।**
**हते हुण्डासुरे देव्या दर्शनं मे भविष्यति।।१६।।**

रंभेने तो अनुकूल संकेत जाणला आणि हंसतमुखाने परत जाऊन आपल्या सखीच्या कानांवर घालून “लवकरच सुयोग येणार नैराश्य सोड,” असा दिलासा दिला. तिच्या आनंदाला पार राहिला नाही. ८४-९२.

## हुंडासुराचे रणांगणावर सैन्यासह आगमन.

इकडे नहुषाच्या आधिपुत्याखाली हुंडाच्या राजधानीबाहेर, देवांच्या सैन्यांतील विद्याधर, गंधर्व, यक्ष, किन्नर, नाग, गुह्यक इत्यादींनी मोठाच रणकल्लोळ केला. त्या गदारोळाने हुंड आपल्या सुखनिद्रेतून खडबडून जागा झाला. आपला त्रैलोक्यांत धाक असतांना कोणा शत्रूची एवढी हिंमत झाली हे त्याला कळेना. त्याने आपल्या खबऱ्याला पाठवून ह्या शत्रूची, त्याच्या सामर्थ्याची व सैन्याची माहिती काढायला सांगितली. दूताने जाऊन लवकरच सगळी माहिती जमा केली  आणि तो परत येऊन हुंडाला सांगू लागला. “महाराज! हा आयुराजाचा पुत्र नहुष तेहतीस कोटी देवांची सेना घेऊन आपल्यावर चालून येत आहे.” ही बातमी ऐकतांच हुंडासुराला धक्काच बसला. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. “त्या आयुराजाच्या कारट्याला तर मी केव्हांच शिजवून खाल्ला. आतां तो कसा इथे आला?” थोडा विचार करून त्याने आपल्या पत्नीला बोलावून विचारले. “तुला आठवते का? तो आयुपुत्र मी तुझ्याकडे दिला होता. त्याला तूं आपल्या समक्ष ठार केलेस ना? त्याला नक्की कुणी मारले, कसे मारले ते मला सांग!” त्याची पत्नी म्हणाली “अहो मी त्याला दासीकरवी माझ्या समक्षच मारविला. तुम्हीच नाही का खाल्ला त्या दिवशी? त्याची हाडे आणि कातडी तेव्हांच टाकून दिल्या.” हुंडाने त्या दासीला बोलावले आणि दरडावून विचारले, “खरे सांग, त्या बाळाला कुणी ठार केले?” त्या दासीने आपणच तो बालक ठार केल्याचे परोपरीने सांगितले आणि “राणीसाहेब तिथेच होत्या. हवें तर त्यांना विचारा! ” हुंडासुर विचार करूं लागला. ‘तो जर माझ्या पोटांत गेला तर मग हा कुठून आला?’ हुंडासुर पुरता गोंधळून गेला. अखेर ‘प्रथम समोरच्या दुष्मनाचा सामना करून त्याचा नाश केला पाहिजे. त्या बाळाची चौकशी नंतर करतां येईल’ असा विचार करून त्याने आपल्या सैन्याला सत्रूचा सामना करण्यासाठी सज्ज होण्याचे आदेश दिले. सर्व असुरांना टाकोटाक युद्धावर जाण्याची आज्ञा दिली. “युद्धाच्या भीतीने जर कुणी मागे राहतील तर आधी त्यांना मारून मी शत्रूचा समाचार घेईन,” अशी जरबही त्याने आपल्या सैन्याला घातली. आपल्या सैन्याचे पांच विभाग करून त्यावर पांच सेनापती नियुक्त केले आणि त्यांना विधिवत अभिषेकही केला. अशा रीतीने थोड्याच वेळांत हुंडाची सेना एकदिलाने स्वामीकार्यासाठी जिवावर उदार होऊन नगराबाहेत पडली. “जगलो तर धन्याकडून पुरस्कार मिळेल आणि मेलो तर स्वर्गांतील देव होऊं,” अशा निश्चयाने ते सर्व देवसेनेवर तुचून पडले. ९३-१०८.

.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा चव्वेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ४५ वा.

**सोडी प्राणहारक बाण। दैत्यसैन्य मारून। नहुष तो निर्भर्त्सून। मारी झुंजून हुंडासुरा।।९२।।**
**ख्याती सोमवंशाची करून। अशोकसुंदरीस वरून। मायबापां भेटे तो येऊन। हें पंचेचाळीसाव्यांत।।९३।।**

## मृत्यूला कोण जिंकतो?

वेदधर्मा दीपकाला म्हणाला, "पहा कशी गंमत आहे, हे जीव जन्मापासून मृत्यूपर्यंत सर्व अवस्थांत, सर्व काळी परतंत्र आहेत. जो जो म्हणून जन्माला येतो, तो मृत्यूचा ग्रास होतोच! ही वस्तुस्थिति सर्वांना प्रत्यक्ष अनुभवाला येत असूनही आपण चिरंजीव व्हावे, अमर व्हावे असेच सर्वांना वाटते. "**जातस्य हि ध्रवो मृत्युः**" हे गीतावचन प्रसिद्धच आहे. मृत्यू अटळ आहे हे विदारक सत्य सर्व जाणतात पण त्या मृत्यूला टाळण्याचाच सगळे प्रयत्न करतात. ही त्यांची केविलवाणी धडपड देहालाच आत्मा – आपले सत्य स्वरूप, मानल्याने चालली आहे. देह क्षणोक्षणी पालटत असतो. जुना देह निरंतर झिजत असतो आणि नवा देह घडत असतो. **निगमाः जडस्य पांचभौतिकदेहस्य प्रतिक्षणे प्रलयोत्पत्तिः कथयन्ति, अग्नेः अर्चिषां इव।** वेदांचे असे प्रतिपादन आहे की ह्या पंचमहाभूतांपासून बनलेल्या देहाची प्रतिक्षणी प्रलय आणि उत्पत्ति होत असते. अग्नीची ज्योत कितीही स्थिर वाटली तरी, ती जशी सतत बदलत असते, तसाच हा देह सारखा घडत-मोडत असतो. पण 'असु' म्हणजे प्राणातच रमणारे, जड देहालाच सर्वस्व मानणारे ते 'असुर'. ते मूढपणे या नाशिवंत देहाला टिकवायचा प्रयत्न करतात, मृत्यूला चकवूं पाहतात. पण घोर काळाचा घाला आला असतां कोण बिचारा जीव त्याचा प्रतिकार करूं शकेल? दीपका! तुला सांगूं का, मृत्यूला कोण जिंकतो? परमेश्वराची कांस धरतो तोच भाग्यशाली पुरुष काळालाही जिंकतो. मृत्यूच त्याला भीतो म्हण ना! कारण भगवंताची भक्ति करणाराच आपले देहातीत स्वरूप – अविनाशी आत्मा, जाणतो. नाशिवंत जड देहाविषयींचा आपलेपणा– अहंकार, टाकून जो प्रत्यगात्म्यांत स्थिरावतो त्याला मृत्यू स्पर्शूंही शकत नाही. मात्र हा प्रत्यक् आत्म्याचा विचार ज्याला ठाऊक नाही तो सुर असला तरी त्याची असुरांतच गणना करायला हरकत नाही. त्याला कुठले अमरत्व येणार? आपल्या मर्त्य देहाला अजरामर करण्याच्या इच्छेने धडपडणाऱ्या हुंडासुराला अखेर दैववश मृत्यूने गांठलेच! " १-८.

## हुंडाच्या सैन्यापुढे देवांची माघार.

आपले सैन्य घेऊन सर्व शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन तो हुंडासुर रणांगणावर आला. समोर पाहतांच त्या देवांच्या वैऱ्याला, इंद्राच्या रथांत बसलेला, किरीचकुंडले ल्यालेला, सूर्यासारखा तेजस्वी नहुष दृष्टीस पडला आणि त्याच्या छातीचा ठोकाच चुकला! स्वतःला सांवरून त्याने आपल्या सेनापतींना हत्तीदळ, घोडदळ, पायदळ, रथी, महारथी यांच्यासह नहुषावर आक्रमण करायला सांगितले. जो युद्धशास्त्रनिपुण रथी एकटाच दहा हजार धनुष्यधारी योद्ध्यांशी लढूं शकतो तो 'महारथी' म्हणवतो. **'एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम्। शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः।।** जो वीस हजार योद्ध्यांना एकटाच तोंड देतो तो 'अतिरथी' होय. **अयुतान्योधयेद्यस्तु संप्रोक्तोऽतिरथो हि सः।** एक हजार योद्ध्यांशी लढणारा 'रथी' आणि त्यांपेक्षां कमी योद्ध्यांशीच लढूं शकणारा 'अर्धरथी' म्हणतात. असे एकाहून एक मोठे दैत्यवीर देवसेनेवर तुटून पडले. रणभेरी, शंख, धनुष्याचे टणत्कार, बाणांची सणसण आणि योद्ध्यांच्या आरोळ्या, गर्जना,

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

हत्तीचे चीत्कार आणि घोड्यांच्या खिंकाळ्या यांचा एकच गदरोळ आसमंताला भेदीत गेला. असुरांच्या शूल, तोमर, शक्ति, परशु, गदा आणि बाण इत्यादि शस्त्रांचा घणाघाती मार देवांवर पडूं लागला. दैत्यांचे तेज देवांना साहवेना आणि ते जर्जर झाले. दैत्यांच्या पुढे त्यांचा टिकाव लागेना. अगतिक होऊन देव युद्ध सोडून जाऊं लागले ते पाहून नहुषाने पुढे जाऊन हुंडासुराला आह्वान दिले. "काय तुझे सामर्थ्य आहे ते मला दाखव. येऊं दे तुझे सेनानी माझ्यापुढे! त्यांना लगेच यमपंथाला पाठवतो, " असे म्हणत तो सरसावला. ९-२०

## नहुषाने केलेली दैत्यसेनेची दाणादाण.

तो हंडासुराला उद्देशून गरजला, "तुम्हां देवाब्राह्मणांच्या पीडकांचा निःपात करण्यासाठीच मी आलो आहे. देवांची स्थाने बळकावून तुम्ही सर्वांना त्रास देत आहांत. तुमचा हा माज उतरविणारा आतां आला आहे! तुम्हांला चिरडून टाकल्याशिवाय माझा हा राग शमणार नाही. तुमच्यासारख्या अनार्यांना मारल्याने परमेश्वराला संतोषच होईल. तेव्हां आतां आपल्या दुष्कर्मांची फळे भोगायला तयार व्हा." असे बोलून नहुषाने त्वेषाने इंद्राचे धनुष्य उचलून त्याच्या दोरीचा टणत्कार केला. त्या आवाजानेच दैत्यांच्या काळजाचे पाणी पाणी झाले. कुणी कुणी तर त्या भयंकार नादानेच बेशुद्ध पडले. मग त्याने त्या धनुष्यातून बाणांचा पाऊसच जणुं असुरांच्या सेनेवर पाडला. सर्व आकाश त्या बाणानी अंधारून गेले. दैत्यांनी सोडलेली असंख्य शस्त्रे त्या बाणांनी तुटून पडायला लागली. हुंडासुराच्या सेनापतींनी मग त्याच्यावर सैन्याच्या लाटाच्या लाटा लोटायला सुरुवात केली. त्या शूरवीर नहुषाने त्या सर्वांची खांडोळी केली. दैत्यांच्या आणि नहुषाच्या शरजालाने इतका अंधार झाला की ते एकमेकांना दिसेनासे झाले. ते सारे बाणांचे जाळे तोडून महावीर नहुषाने दैत्यांचा संहार करायला प्रारंभ केला. दैत्यांची शस्त्रे, हत्ती, घोडे, रथ धडाधड मोडून टाकले आणि दैत्यांच्या योद्ध्यांचे कंदन आरंभिले. कुणाची चिलखते फोडली, कुणाचे हात तोडले, कुणाचे पाय मोडले, कुणाच्या मान कापल्या तर कुणाची मस्तके फोडली. दैत्यसैन्याचा महाभयंकर संहार सुरूं झाला. त्यांचे धैर्य खचूं लागले. त्यांनी लपून-छपून युद्ध करायला सुरुवात केली. पण नहुषाने चतुराईने त्यांना शोधून काढून ठार करायचा सपाटा लावला. २१-३४

असुरांना ठार मारतांनाही तो त्यांना क्रोधावेशाने म्हणूं लागला, "भोगा आपल्या पापांची फळे! तुमची घटका भरली आहे. आतां तरी सन्मार्गाची आवड धरा. **ये धर्मे समरे मृताः ते शुद्धाः सूर्यमंडलं भित्वा याताः यथा विरजसः योगिनः यतयः।** जे धर्मयुद्धांत मरण पावतात ते शुद्ध होऊन, शुद्धांतःकरणाच्या योगी संन्याशासारखे सूर्यमंडलाचा भेद करून (उत्तम गतीला) जातात. (**द्वाविमौ पुरुषौ लोके सुर्यमण्डलभेदिनौ | परिव्राट् योगयुक्तश्च रणस्याभिमुखे हतः ||** या भूलोकावर दोनच पुरुष सूर्यमंडलाचा भेद करणारे आहेत. योगवित् संन्यासी आणि युद्धांत सामोरा मारला गेलेला.) भयाने पळून कां जातां? असे समोर येऊन युद्ध करा म्हणजे तुम्हांला वीरगती प्राप्त होईल. सुवर्णचोरी, ब्रह्महत्या, सुरापान, गुरुतल्पगमन अशा महापापांचे क्षालन करून तुम्ही श्रेष्ठ गतीला. जाल! " असा उपदेश करीतच त्या नहुषाने अगणित दैत्यांना यमलोकाची वाट दाखविली. रक्ताचे पाट वाहूं लागले आणि दैत्यसैन्याची दाणादाण उडाली. आपले बहुसंख्य वीर धारातीर्थावर पडलेले असून सेनेत हाहाकार माजला आहे असे पाहून सरसावून नहुषाच्या पुढ्यांत येऊन उभा राहिला. ३५-४१.

## हुंडासुर आणि नहुष यांचा संवाद.

नहुषाचा अधिक्षेप करीत तो बोलूं लागला, "अरे माणसाच्या पोरा! कां उगीच जिवावर उदार झाला आहेस? तुझ्या आईवडिलांना किती दुःख होईल त्याचा तरी थोडा विचार कर! माझा लौकिक तुला ठाऊक

नसावा. मी सर्वतंत्रस्वतंत्र असा लोकशासक आहे. त्रिभुवनांत माझ्यासमोर युद्धाला उभा राहणारा कुणीच नाही. तूं अजाण बालक आहेस म्हणून तुला सांगतो, तुला जर जीव प्यारा असेल तर लगेच शरण ये. फुकट मरण्यापेक्षां माझे पाय धरण्यांतच तुझे कल्याण आहे. याउप्परही तूं लढणारच असशील तर ह्या सर्व देवसेनेसह तुला मी थोड्याच वेळांत ठार तरीन." त्या राक्षसाच्या ह्या धाकदपटशाला भीक घालणाऱ्यांतला नहुष नव्हता. तोही तितक्याच आवेशाने म्हणाला, "तुम्हां असुरांना डोके थोडे कमीच असतेसे वाटते. सोमवंशाचा दरारा तुला माहिती नाही काय? तुझ्या तोंडातच खूप बळ दिसते. माझ्याशी युद्ध करून तुझे बाहुबळ काय आहे ते पाहूं दे जरा! आपली आपणच स्तुति करून तूं मला उपदेश करीत आहेस. तुला धर्म कशाशी खातात ते तरी ठाऊक आहे का? स्वतःच्या दुष्कर्मांची थोडी जाण ठेव! मला अर्भकावस्थेतच पळवून ठार करण्याचा तुझा बेत होता. माझ्या मातापित्यांना दुःखाच्या खाईंत लोटून तूं मला खाण्याची स्वप्ने पाहिलीस. अरे साक्षात दत्तप्रभूंचे मला संरक्षण आहे. मला कोण मारूं शकेल? माझा केसही तूं वाकडा करूं शकत नाहीस. माझ्या दृष्टीने तूं मेल्यांतच जमा आहेस! तुला मी मुळीच घाबरत नाही.

**मलिनाः, कुदृशाः, हिंस्राः, घातकाः परवंचकाः ते सर्वे स्वकर्मणैव सहसा स्वयं म्रियन्ते।**

पापी, दुष्ट नजरेचे, हिंस्र, घात करणारे आणि दुसऱ्याला फसविणारे हे सगळे आपल्याच कर्माने आपणच आपोआप मरतात! अशा तुझ्या दुष्ट घातकाचा मी कर्दनकाळ आहे. आतां न भीतां काय तुझा पराक्रम असेल तो दाखव. तुझा मृत्यू जवळ आल्याने तूं जीभ लांब करून हवे तसे बडबडतो आहेस. तुझ्या बढाया खूप झाल्या. तुला मी चांगलाच ओळखतो. युद्धाला सज्ज हो! " ४२-७५.

## हुंडासुराचा वध.

अशा प्रकारे हुंडाची निर्भर्त्सना करून नहुषाने आपल्या धनुष्याला देवांनी दिलेला बाण जोडला आणि हुंडाचे चिलखत भेदून त्याचे धनुष्य मोडून टाकले. हुंडानेही नहुषावर कंकाचे (करकोच्यासारखा पक्षी) पंख लावलेले असंख्य बाण सोडले. ते सर्व नहुषाने आपल्या बाणांनी.हवेतच तोडून टाकले. मग त्या असुराने आपली माया पसरून नहुषाला भूल पाडली. जिथे तो असुर असायचा तिथे तो न दिसतां भलतीकडेच दिसूं लागला. पण त्या मायेने नहुष फसला नाही. तो हंसून मातलीला म्हणाला, "हा दैत्य जिकडे दृष्टीस पडतो त्याच्या बरोबर उलट्या दिशेला रथ फिरव." त्याप्रमाणे मातली रथ चालवूं लागला आणि नहुषाने हुंडावर संधान साधले. अशा रीतीने हुंडाच्या मायेला निष्प्रभ करणारा नहुष, त्या दैत्याला मात्र तेजस्वी सूर्यासारखा तळपतांना दिसला. त्याने दिपून गेलेल्या हुंडाने नहुषावर हातीं येतील ती असंख्य शस्त्रें सोडली. नहुषाने ती सर्व शस्त्रे निकामी करून टाकली. मग हुंडाने हा शत्रू कांही आपल्याला आवरत नाही असे पाहून आपली एक अमोघ प्राणघातक शक्ति, तोमर बाणावर प्रेरून नहुषावर सोडली. नहुषाने त्तकाळ तोही बाण तोडून टाकला आणि एकदम अगणित बाणांनी हुंडाचा वेध घेतला. त्या बाणांनी छिन्नभिन्न झालेला तो रक्तरंजित दैत्य शुद्ध हरपून लाल फुलांनी बहरलेल्या पळसासारखा रथांत कोसळला. थोडा श्वास घेऊन तो सावध होऊन पुन्हा नहुषावर बाणांचा वर्षाव करूं लागला. त्या बाणांनी नहुषाला झांकून टाकले. नहुष दिसेनासा झाल्याबरोबर हुंडाने विजयाची गर्जना केली. "मी जिंकलो! शत्रूला ठार मारून मी विजयश्री प्राप्त केली!" असे मोठमाठ्याने गर्जूं लागला. नहुष दृष्टीस न पडल्याने व हुंडाची विजयाची गर्जना ऐकून आकाशांतील देव आणि ऋषिमुनि खिन्न झाले. एवढा पराक्रमी नहुष, ज्याने या हुंडाला मूर्च्छितही केले, त्याची सर्व माया नाहीशी केली त्याला ह्या दैत्याने शेंवटी ठार कलेच, अशा आशंकेने ते सर्व कासावीस झाले. ज्याच्या भरंवशाने आम्ही युद्धाला आलो तोच राजकुमार रणांत पडला अशा कल्पनेने देव बिचारे दैन्यवाणे झाले. तेवढ्यांत नहुषाने उठून एकाच बाणाने ते सारे शरजाल छिन्नभिन्न केले. त्यापाठोपाठ त्याने चपलतेने एकामागे एक असे बाण सोडून हुंडाचे धनुष्य, त्याचा सारथि, घोडे आणि रथसुद्धां तोडून टाकले. हुंडासुर

दुसऱ्या रथावर चढून शरलंधान करूं लागला. ते त्याचे समरकौशल्य पाहून प्रसन्न झालेल्या आकाशस्थ सिद्ध, ऋषी इत्यादींनी त्याला “तुझे क्षेम असो आणि तुला विजय प्राप्त होवो!” असे आशीर्वाद त्याला दिले. हुंडासुराने मग आपल्याजवळची एक अत्यंत भेदक शक्ति नहुषावर सोडली; पण नहुषाने तिचेही लीलया तुकडे-तुकडे केले. त्यानंतर नहुषांने श्रीदत्तप्रभूं आणि गुरु वसिष्ठ यांचे मनोमन स्मरण करून त्या दैत्याच्या मृत्यूसाठी प्रार्थना केली आणि आपल्याजवळचे दोन तीक्ष्ण अर्धचंद्राकृती बाण एकाच वेळीं धनुष्याला जोडून त्या असुरावर असे सोडले की त्याचे दोन्ही बाहू खांद्यापासून अलग होऊन त्याच्या हातांतील अस्त्रांसहित जमिनीवर पडले. हुंडासुराने भयंकर आरोळी ठोकत आपले तोंड पसरून नहुषाला खाण्यासाठी त्याच्यावर उडी मारली. त्या राजकुमाराने तेव्हां पुनः तसेच दोन बाण सोडून त्या राक्षसाचे पाय तोडून टाकले. धाडदिशी खाली पडलेला तो दैत्य तसाच सापासारखा सरपटत दांत-ओठ खात नहुषावर चालून आला. त्यावर नहुषाने श्रीदत्तचरणांचे स्मरण करीत आपल्याजवलची ऐंद्री शक्ति हुंडावर सोडली. तिच्या माऱ्याने तो भग्न होऊन मरून गेला. उरलेसुरले दैत्यसैन्य सैरावैरा धावत रसातळाकडे पळून गेले. आश्चर्यचकित होऊन हे सर्व युद्ध पाहणारे देव आणि ऋषी हुंडाच्या वधाने हरखून गेले आणि नहुषाचा जयजयकार करीत त्याच्यावर पुष्पवृष्टी करूं लागले. त्यांनी नहुषाचे अभिनंदन करून त्याला इष्ट वर मागण्यास सांगितले. नहुषाने आपली धर्मावर निरंतर श्रद्धा असावी असा वर मागितला. “तथास्तु” म्हणून सर्व देवगण हुंडाकडून सुटलेली आपापली पदे सांभाळण्यासाठी स्वर्गाला गेले. ५६-८८.

## वसिष्ठांच्या आश्रमांत परत आणि अशोकसुदरीशी विवाह.

हुंडाच्या वधानंतर मुक्त झालेली अशोकसुंदरी आपल्या रंभा नांवाच्या सखीसह हातांत माळ घेऊन नहुषासमोर आली आणि आपला स्वीकार करण्याची प्रार्थना करूं लागली. नहुषाने त्यावर इथे वडीलधारे कुणी नसतांना परस्पर विवाह करणे योग्य नसल्याचे तिच्या निदर्शनाला आणून “आपण वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत जाऊन त्यांच्या आज्ञेने विधिपूर्वक विवाह करूं,” असे आश्वासन देऊन तिला आणि रंभेला रथांत बरोबर घेतले. त्यानंतर हुंडासुराची सर्व संपत्ति बरोबर घेऊन तो वसिष्ठ ऋषींच्या आश्रमांत परतला. सर्व संपत्ती ऋषींच्या चरणी अर्पण करून तो म्हणाला, “श्रीदत्तकृपेने आणि आपल्या परिपूर्ण आशीर्वादाने आणि खंबीर आधारानेच मला हा विजय मिळाला आहे. हे सर्व धन आपलेच आहे.” असें बोलून नहुषाने त्यांच्या पायांवर डोके ठेवले. त्याच्या सात्त्विक भावाने प्रसन्न झालेल्या वसिष्ठांना बरोबर आलेल्या अशोकसुंदरीनेही नमस्कार केला आपला हात नहुषाच्या हातीं देण्याची विनंति केली. आधीच वर्तविलेल्या भविष्यानुसार मुनिश्रेष्ठांनी तिची भलावणी करीत त्याच दिवशी शुभ मुहुर्तावर त्यांचा विवाह यथाविधि संपन्न केला. त्यानंतर त्यांनी नहुषाला आतां अधिक वेळ न दवडतां पत्नीसह आपल्या नगराला जाऊन आईवडिलांची भेट घेऊन त्यांचा शोक दूर करायची आज्ञा दिली. नहुषाने अत्यंत जड अंतःकरणाने वसिष्ठ आणि माता अरुंधती यांचा निरोप घेतला. “मातापित्यांना अंतरलेल्या ह्या लेकराचे आपणच आजवर पालन केले. ते आजन्म विसरतां येणार नाही. आपला विरह मला कसा सहन होईल?” अशा शब्दांत त्यांच्याविषयींची कृतज्ञता व प्रेम साश्रु नेत्रांनी व्यक्त केली. वसिष्ठांनी त्याचे सांत्वन करून त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. मग नहुषाने मातलीला रथ इंद्राकडे परत नेण्यास सांगितले आणि रंभेलाही त्याच्यासह स्वर्गांत पाठविले. तो स्वतः अशोकसुदरीसह आपल्या घरीं निघाला. ८९-१०३.

## मातापित्यांची भेट.

घरी येतांच त्याने प्रथम मातापित्यांना वंदन केले आणि आपण त्याच्या दुःखाला कारणीभूत झाल्याबद्दल क्षमायाचना केली. त्याचबरोबर ह्यांत आपल्या हातीं कांहीच नव्हते हेही स्पष्ट केले. आयुराजा

आणि इंदुमती मदन आणि रतीशी सौंदर्यांत स्पर्धा करणारा आपला मुलगा आणि सून पाहून हरखून गेले. आपल्या पुत्राचा पराक्रम राजाच्या कानी आलाच होता. त्याने नहुषाला समजाविले की श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने आमचे दुःख शांत झाले आहे. नंतर आयुराजाने नहुषाला यथाविधि राज्याभिषेक केला आणि तो इंदुमतीसह वनांत गेला. तिथे त्या दोघांनीही श्रीदत्तप्रभूंची उपासना करून सायुज्य मुक्तीचा लाभ करून घेतला. श्रीदत्तप्रभूंची सकाम भक्ति करूनही आयुराजा क्रममुक्तीचा अधिकारी झाला. असा हा दत्तभक्तीचा महिमा आहे. भगवान दत्तात्रेयांचा कोणताही (अर्थार्थी, आर्त, जिज्ञासू वा ज्ञानी) भक्त कधीच अधोगतीला जात नाही.

**एवं श्रीदत्तमर्थार्थी भजन्मुक्तः क्रमान्नृपः।**

**तद्भक्तिमहिमा त्वेष कोऽपि भक्तो न नश्यति।। श्रीदत्तपुराण ६ः४ः६७।।** १०४-१०७.

नहुष पुढे महापराक्रमी सार्वभौम सम्राट झाला आणि मानवदेहानेच इंद्रपदावर आरूढ होऊन त्याने स्वर्गावरही राज्य केले. खरोखर दत्तभक्ताला अप्राप्य असे काय आहे? १०८.

.श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पंचेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ४६ वा.

**विनवितां गुरूसी। गुरु सांगे दीपकासी। ययाती वरी देवयानीसी। केली दासी शर्मिष्ठा।।९४।।**
**पुरूपकार जाणून। त्या दे ययाती सिंहासन। दुःखें यदु वनीं जाऊन। दत्ता भेटे शेचाळीसाव्यांत।।९५।।**

## दीपकाची श्रवणाची वाढती तहान.

दीपक श्रीदत्तलीलारूपी अमृताच्या आकंठ पानानेही तृप्त झालेला नाही. लौकिक रसपान केले की पोट भरते आणि मग त्या रसाची गोडी कमी होते. पुढे तर त्या रसाचा वीट येऊं लागतो. पण अमृताच्या पानाचा कधीच वीट येत नाही. त्याची गोटी अवीट असते. दत्तलीलांच्या श्रवणाने मन भरून आले तरी त्यांच्या श्रवणाची तहान वाढतच राहते. गुरुचरित्राचा श्रोता नामधारकही सिद्धांना असेच म्हणतो आहे.

**श्रुतो गुणानुवादोऽपि हरेस्तृप्तिर्न मे गुरोः । अतीव वर्धते तृष्णा शश्वच्छ्रवणपानतः** ।।द्वि.सा. २२ः१।।

श्रीमद्भागवताचा श्रोता परीक्षित राजाचाही हाच अनुभव त्याने शुकाचार्यांसमोर सांगितला आहे. सात दिवस अन्न, पाणी, झोंप न घेतांही त्याचा श्रवणाचा उत्साह सतत वाढतच गेला आहे. सर्वसाधारण श्रोत्यांना हा अनुभव येत नाही. ह्या तीनही श्रोत्यांच्या मनांत श्रवणभक्तीचा तसाच उत्कर्ष झालेला आहे. त्यांना सांगणारे वक्तेही मोठे अधिकारी आहेत. त्यांच्या वाचेत केवळ रसिक्तवच नाही तर परतत्त्वस्पर्शही आहे. संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिपादनानुसार “**वाचे बरवे कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व। रसिकत्वीं बरवें। परतत्त्व-। स्पर्शु जैसा।।१८:३४७।।** ” साध्या बोलण्यापेक्षां छंदोबद्ध कानांला गोड वाटते. छंदोबद्ध रचनेत जर शृंगारादि नवरसांची जोड असेल तर ते मनाला अधिकच भावते. अशा रसाळ वाणीला जेव्हां परतत्त्वाचा स्पर्श होतो तेव्हां चित्त तदाकार होते. आनंदरूपच होते. कीर्तनभक्तीचा हा परमोत्कर्ष दीपकाच्या अनुभवाला आला आहे. १-२.

## संतांचे दुकान.

“सच्चिदानंदघन परमात्म्याचे मूर्त स्वरूप असलेले दत्तप्रभू भक्तांच्या भक्तीचा स्वीकार करून तिच्या मोबदल्यांत आत्मस्वरूपरूपी मोक्ष देतात अशी त्यांच्या प्रेमाची थोरवी आहे. त्या भक्ताच्या अंतरांत स्थिरावून राहतात. त्या देहाच्या तो भगवंत इतरांना उपलब्ध होतो. त्या संताचा देह जणूं देवाचे दुकानच होऊन जाते. देवाने उदारपणे दिलेला मोक्षरूपी मालाचे तितक्याच औदार्याने संत आपल्याकडे येणाऱ्या मुमुक्षूंना विकतात. तुकाराम महाराज आपल्या ह्या व्यापाराचे वर्णन खालील अभंगांत करतात.

सकळिकांच्या पायां माझी ‡वनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ।।१।।
अहो श्रोते वक्ते सकळ ही जन । बरें पारखुन बांधा गांठी ।।धृ।।

फो‡ड› भांडार धन्याचा हा मा› । मी तंव हामा› भारवाही ।।२।।

---

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

तुका म्हणे चा›ी जा›ी चहूं दे„ी । उतर›ा कसीं खरा मा› ।।३।।

बहुतेक ग्राहकांजवळ आवश्यक त्या संपत्तीची चणचणच असते. मग संतांचा व्यापार उधारीचाच होतो. इतके करूनही देवाला गिऱ्हाइक मिळतच नाही. ज्या चित्तांत देव सांठवायचा तेच प्रापंचिक वासनांनी भरलेले असेत. देव फुकच मिळाला तरी ठेवणार कुठे?

देव घ्या कोणी देव घ्या कोणी । आइता आ›ा घर पुसोनी ।।१।।
देव न लगे देव न लगे । सांटवणेचे रुधले जागे ।।धृ।।
देव मंदला देव मंदला । भाव बुडाला काय करूं ।।२।।
देव घ्या फुका देव घ्या फुका । न लगे रुका मोल कांहीं ।।३।।
दुबळा तुका भावें विणें । उधारा देव घेतला रुणें ।।४।।

तरीही भक्त ह्या व्यापाराला कंटाळत नाहीत की उबगत नाहीत. ज्या ज्या ग्राहकाचा जसा जसा अधिकार असेल तसा त्याला माल दाखवितात. मुळींच आळस करीत नाहीत. त्यांचे दुकान कधीं बंद होत नाही की त्यांचा माल घटत नाही. तो माल कितीही विकला तरी आहे तसाच व तेवढाच राहतो. तो पूर्ण असतो व त्यांतून पूर्णच्या पूर्ण काढला तरी पूर्णच उरतो. त्यांना कधी घाटा होत नाही किंवा त्यांचे दिवाळेही निघत नाही. तो परमेश्वरच त्यांचा सतत सांभाळ करतो. असे हे जगावेगळे व्यापारी सर्वांशीच स्नेहपूर्ण व्यवहार करतात. साहजिकच त्यांच्याविषयीं सर्वांना आदरच वाटतो आणि त्यांच्या पायांवर डोई ठेवण्यांत सगळे आपल्याला धन्य समजतात. ते संत सर्वांचे इंगित जाणतात; पण त्यांची गति मात्र माणसांनाच काय देवांनाही कधीच कळत नाही. त्यांच्या व्यापाराची रीत तेच जाणोत. त्यांनी ह्या सर्वस्व गमावलेले असते; तरीही आपले आणि परके सर्वच त्यांना मान देतात. अशा ह्या आपल्या दुकानावर मी दीन होऊन आलों आहे. मला हवा असलेला माल उधार देण्याइतके सामर्थ्य आणि मनाचे मोठेपण खचितच आपल्याजवळ आहेत. आयुराजाचा जसा उद्धार केला त्याचप्रमाणे दत्तप्रभूंनी यदुराजालाही संसारसागरांतून तारले असे माझ्या कांनांवर आले आहे. ती दत्तप्रभूंची लीला मला सांगा. भगवंताची लीला नित्य नवीनच वाटते ती कुणाला नकोशी होईल? ज्या कुणा दुष्टाला ती नको असेल त्याचा विषयच नको. यज्ञ, दान, कर्म या सर्वांपेक्षांही दत्तलीलांचे श्रवण हीच मोठी तपश्चर्या आहे असा माझ्या मनाचा निश्चय आहे. ” ३-१५

# अवधूतगीता.

दीपकाची ही भावपूर्ण विनवणी ऐकून वेदधर्मा मुनींच्या चित्ताला पाझर फुटला. ते म्हणाले ऐक तर आतां. योगेश्वर दत्ताने यदूला अवधूत वेषाने सांगितलेली गीता तुला सांगतो. ही अत्यंत रहस्यपूर्ण असून तिच्यांत उपनिषदांचे सार सामावले आहे. ह्या उपोदघातांतच ही अवधूतगीता वेदांताची सारभूत आहे हे स्पष्ट केले आहे. वेदांत हा ज्ञानमार्गाचा विषय आहे. मग दत्तमाहात्म्यासारख्या भक्तिमार्गाच्या ग्रंथांत त्याचे काय प्रयोजन? असा प्रश्न कदाचित कुणाला पडेल. पण तसे वाटायचे कारण नाही. कर्म, भक्ति आणि ज्ञान ह्या तीन निष्ठा वेदांनीच प्रवर्तिलेल्या आहेत. पण हे तीन भिन्न मार्ग नसून एकाच अध्यात्मपथाचे तीन टप्पे आहेत. आपपापल्या अधिकारानुसार क्रमाक्रमाने ह्या तिन्हींचेही अनुसरण करणारा मोक्षाच्या अंतिम ध्येयाला पावतो. योगरहस्याच्या आरंभींच हे श्रीस्वामी महाराजांनी स्पष्ट केले आहे. “**भक्तिं विना न साफल्यं कर्मणः कर्मणा विना। न च ज्ञानं विना ज्ञानान्न मोक्षो यस्य कस्यचित्।।२।।**” कर्माची सफलता भक्तीवांचून नाही; तसेच कर्माने चित्तशुद्धी

केल्याखेरीज ज्ञानाची योग्यता येत नाही आणि ज्ञानाशिवाय मोक्ष कुणालाही प्राप्त होत नाही. भक्तीची परिणती आत्मज्ञानांतच व्हायला हवी. अन्यथा ती निष्प्रयोजनच ठरेल. श्रीमद्भगवद्गीतेचे हेच प्रतिपादन आहे. “**भक्त्या मामभिजानाति यावन्यश्चास्मि तत्त्वतः। ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम्।।१८:५५।।**” भक्तीने (भक्त) मला, मी कोण, कसा, किती आहे ह्याचे तत्त्वतः जाणून मग तो माझ्यांत प्रवेश करतो. त्यामुळे आत्मज्ञान हेच भक्तीचे साध्य आहे हे स्पष्ट आहे. १६.

ही अवधूतगीता प्रथमतः द्विसाहस्री गुरुचरिताच्या चौथ्या अध्यायांत आली आहे. ÁÉ +vªÉÉªÉÉÆiÉÒ±É 3 iÉä 40 ½äþ 38 श्±ÉÉäEò VÉºÉäSªÉÉ iÉºÉä ¸ÉÒnùkÉ{ÉÖ®úÉhÉÉiÉ (6:5:9-46)) +ÉlhÉ ¸ÉÒnùkÉÉjÉäªÉ¹ÉÉäb÷¹ÉÉ´ÉiÉÉ®úSÉf®újÉÉiÉ (15:8-45) fnù±Éä +É½äþiÉþ. ÁÉ 38 श्±ÉÉäEòÉÆxÉÉ ¸ÉÒº´ÉÉ¨ÉÒ ¨É½þ®úÉVÉÉÆxÉÒ ¸ÉÒnùkÉ{ÉÖ®úÉhÉÉSªÉÉ ]õÒEäòiÉ "¸ÉÒ+´ÉvÉÚiÉMÉÒiÉÉ" +ºÉä xÉÉÆ´É fnù±Éä +É½äþ. श्रीदत्तमाहात्म्याच्या अंतिम पांच अध्यायांत श्रीस्वामीमहाराजांनी ह्याच अवधूतगीतेचे विस्तृत प्रतिपादन केले आहे. यावरून ह्या गीतेचे दत्तसंप्रदायात किती महत्त्वाचे स्थान आहे याची कल्पना येऊं शकेल. श्रीमद्भागवतपुराणाच्या 11व्या स्कंधातील 7 ते 9 अध्यायांत आलेल्या 120 श्लोकांच्या यदु-अवधूतसंवादाची छाप अवधूतगीतेवर स्पष्ट दिसून येते. शब्दयोजना, प्रतिपादनशैली आणि आशय या सर्व दृष्टींनी विचार करतां ही अवधूतगीता ह्या यदु-अवधूतसंवादाचा संक्षिप्त अनुवादच आहे असे जाणवते.

## अवधूत.

इथे अवधूत ह्या संज्ञेचा किंचित् विचार करणे आवश्यक आहे. नारदपरिव्राजक उपनिषदांत संन्याशांच्या सहा श्रेणी सांगितल्या आहेत. बहूदक, कुटीचक, हंस, परमहंस, तुरीयातीत आणि अवधूत. ह्या सर्वांत अवधूत सर्वश्रेष्ठ असून तो सर्व नियमाच्या पलीकडे आहे. तो निरंतर स्वरूपनुसंधानात राहतो. तसेच तो अजगर वृत्तीने कुणाचेही अन्न ग्रहण करू शकतो.

अवधूत उपनिषदांत म्हटले आहे :-

**‘अक्षरात्वाद्वरेण्यत्वाद्धूतसंसारबन्धनात्। तत्त्वमस्यादिलक्ष्यत्वादवधूत इतीर्यते।।१।।**
**यो विलङ्घ्याश्रमवर्णानामात्मन्येव स्थितः सदा। अतिवर्णाश्रमी योगी अवधूतः स कथ्यते।।२।।’**

‘अ’ पासून अक्षर, ‘व’ पासून वरेण्य (श्रेष्ठ), ‘धू’पासून धूतसंसारबंधन (संसारपाश ज्याने धुवून टाकले आहेत) ‘त’पासून तत्त्वमसि आदि महावाक्यांच्या लक्ष्यांत (ब्रह्मात) स्थित असलेला असा तो अवधूत अशी व्याख्या आहे.

प्रस्तुत अर्वाचीन अवधूतगीतेशिवाय आणखी एक प्राचीन अवधूतगीता दत्तसंप्रदायात मान्यता पावलेली आहे. त्याच्या आठव्या अध्यायात अवधूत शब्दाचा अधिक उहापोह केलेला आहे.

**आशापाशविनिर्मुक्त आदिमध्यान्तनिर्मलः। आनन्दे वर्तते नित्यं अकारस्तस्य लक्षणम्।।६।।**
**वासना वर्जिता येन वक्तव्यं च निरामयम्। वर्तमाने च वर्तेत वकारस्तस्य लक्षणम्।।७।.**
**धूलिधूसरगात्राणि धूतचित्तो निरामयः। धारणाध्याननिर्मुक्तो धूकारस्तस्य लक्षणम्।।८।।**
**तत्त्वचिन्ता धृता येन चिन्ताचेष्टाविवर्जितः। तमोऽहंकारनिर्मुक्तस्तकारस्तस्य लक्षणम्।।९।।**

इथेही अवधूत शब्दांच्या चार अक्षरांचे वेगवेगळे अर्थ लावलेले दिसतात. ‘अ’कार म्हणजे आशेच्या बंधनातून पूर्णपणे सुटलेला, आद, मध्य आणि अंती दोषरहित असलेला आणि सदैव आनंदात राहणारा; ‘व’ म्हणजे वासना ज्याने वर्जिलेल्या आहेत, ज्याचे वक्तव्य विकाररहित आहे आणि जो

सदैव वर्तमानात राहतो; 'धू' म्हणजे ज्याचे अवयव धुळीने माखलेले आहेत, चित्तांतले दोष धुवून टाकल्याने जो निर्विकार आहे आणि समाधीत स्थिरावल्याने धारणा आणि ध्यान त्याने सोडलेले आहेत; 'त' म्हणजे आत्मतत्त्वाच्या चिंतनाने चिंता आणि कर्म सोडलेला, अज्ञानरूपी तम आणि अहंकार यांनी रहित, ही सर्व त्याची लक्षणे आहेत.

मूळ भागवतांत '**अवधूतं द्विजं कच्चित्**' एवढाच उल्लेख आहे. एकनाथमहाराजांनीही '**संकल्पविकल्परहित। शुद्ध सर्वांगी विभूत। यालागीं बोलिजे अवधूत। एऱ्हवी विख्यात ब्राह्मणु**।।७: २७०।।' असेच म्हटले आहे. मात्र अवधूतगीतेच्या समारोपात मात्र '**तो अवधूत जाण दत्तात्रेया। तेणें आलिंगूनि यदुराया। निजरूपाचा बोधु तया। अनुभवावया दीधला।। दत्तात्रेयशिष्यपरंपरा। सहस्रार्जुन यदु दुसरा। तणें जनार्दनु तिसरा। शिष्य केला खरा। कलियुगीं।।** ९: ४२९- ३०।। ' असे स्पष्ट प्रतिपादन केले आहे. त्यालाच अनुसरून श्रीस्वामी महाराजांनी 'श्रीदत्तो यदुना पृष्टो..' असाच संक्षिप्त उपोद्घात केला आहे.

या लेखांत द्विसाहस्री गुरुचरितम् या ग्रंथांतील श्लोकांच्या व त्यावरील श्रीस्वामीमहाराजंच्या स्वोपज्ञ टीकेच्या आधारे या गीतेचा भावार्थ जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. ४थ्या अध्यायाच्या टीकेच्या प्रास्ताविकांत ह्या अध्यायाचे प्रयोजन, आत्मविद्येचे निरूपण करण्यासाठी त्याला पुष्टि देणारे असे ब्रह्मज्ञानाच्या उपदेशात्मक उपाख्यान असे सांगितले आहे. ब्रह्मसूत्रातील पारिप्लवाधिकरणाच्या (११:४:२३) आधारे ह्या औपचारिक कथा नसून आत्मविद्येच्या प्रतिपादनाचा अंगभूत घटक आहेत असे प्रतिपादन केले आहे.

## पूर्वपीठिका

अवधूतगीतेची पूर्वपीठिका म्हणून यदूचा वृत्तांत सांगितला आहे. शुक्राचार्यांनी असुरांचे गुरुत्व अंगीकारून त्यांना साह्य केले. त्यांच्या संजीवनी मंत्रांच्या प्रभावाने युद्धांत मृत झालेले असुरही जिवंत होऊं लागले. देवगुरु बृहस्पतींनी आपला पुत्र कच याला शुक्राचे शिष्यत्व घेण्यास पाठविले. कचाने सेवाभावाने त्यांचे मन जिंकले. पण त्याचे कापट्य दैत्यांच्या ध्यानांत येऊन त्यांनी त्याला ठार केले. शुक्रकन्या देवयानीचे मन कचावर जडल्याने तिने आपल्या पित्याला कचाचे संजीवन करायला लावले. असे दोन-तीन वेळां झाल्यावर असुरांनी कचाला मारून त्याचे भस्म मधांत मिसळून केलेले पेय शुक्राचार्यांनाच पाजले. पण देवयानीच्या आग्रहाखातर शुक्राचार्यांना तिला मंत्रोपदेश करून मग कचाचे पुनरुज्जीवन केले. त्या वेळी मरण पावलेल्या आपल्या पित्याला देवयानीने संजीवनी जपून जिवंत केले. अशा रीतीने कचाने तीन वेळां ऐकून तो मंत्र आत्मसात केला. आपले काम झाले म्हणून त्याने घरी जाण्यास शुक्राचार्यांची आज्ञा मागितली. त्या वेळी देवयानीने आपल मनोगत उघड करून विवाहाचा प्रस्ताव केला. "शुक्राच्या उदरांतून माझा पुनर्जन्म झाला तेव्हां तूं माझी बहीण लागतेस; तसेच माझे प्राणरक्षण केल्याने तू माझी माताच होतेस. तेव्हां हा अधर्माचा विचार मनांतून काढून टाक," असे म्हणून कचाने तिला नकार दिला. तेव्हां संतापून देवयानीने त्याला "तूं ही मंत्रविद्या विसरून जाशील, " असा शाप दिला. त्या वेळी कचानेही "तुला ब्राह्मणेतर पति मिळेल," असा उलट शाप दिला. शुक्राचार्यांचा मंत्र षट्कर्णी होऊन निष्प्रभ झाला होता. त्याचा उद्देश सफल करून तो स्वर्गात परत गेला.

देवयानी, आणि दैत्यराज वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा, एकदां वस्त्रे काढून विहीरीत जलक्रीडा करीत असतां कुणी पुरुष आल्याने त्यांनी घाईघाईने कांठावर येऊन वस्त्रे नेसली. त्यांत शर्मिष्ठेने आधी येऊन आपले वस्त्र नेसलेले पाहून देवयानी चिडली. त्या वेळी झालेल्या बाचाबाचीत शर्मिष्ठेने

देवयानीला विहिरीत ढकलून दिले आणि तशीच घरी निघून गेली. योगायोगाने राजा ययाति तिथे आला आणि देवयानीच्या रडण्याचा आवाज ऐकून तिला तिची हकीकत विचारली. त्याने आपले अर्धे वस्त्र तिला नेसायला देऊन तिला बाहेर काढले. वर आल्यावर देवयानी त्याला म्हणाली की, "हे राजा, तूं माझा हात धरला आहेस तेव्हां मी ब्राह्मणकन्या असूनही तुझी पत्नी झाले आहे. मला कचाचा तसा शाप झाला आहे." तिचे पूर्वापार वृत्त जाणून राजाने तिचा स्वीकार केला. शुक्राचार्यांनी त्यांचा यथाविधि विवाह करून दिला. वृषपर्वाला ही हकीकत समजतांच त्याने शर्मिष्ठेसह येऊन तिच्या अपराधाबद्दल देवयानी व शुक्राचार्य यांची क्षमा मागितली. देवयानीने शर्मिष्ठेला आपली दासी करावी अशी अट घातली. अशा रीतीने राजा ययाति देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्यासह आपल्या राजधानीला परतला. त्यांना निरोप देतांना त्रिकालज्ञ शुक्राचार्यांनी ययातीला शर्मिष्ठेशी शरीरसंबंध न करण्याविषयीं बजावले. १७-२४.

ययातीबरोबर देवयानीचा संसार सुरू झाला. यथाकाल त्यांना यदु आणि तुर्वसु असे दोन मुलगे झाले. या काळांत राजकन्येची दासी झालेली शर्मिष्ठा त्यांची सेवा करीत होती. राजाबरोबर एकांतांत असतां शर्मिष्ठेने त्याला आपला स्वीकार करण्याची प्रार्थना केली. तिची करुणा येऊन म्हणा अथवा तिच्याकडे आकृष्ट होऊन म्हणा ययातीने तिची इच्छा पूर्ण केली. देवयानीच्या परोक्ष ययातीपासून शर्मिष्ठेला तीन पुत्रही झाले. देवयानीच्या हे लक्षांत येतांच तिने आपल्या वडिलांकडे तक्रार केली. शुक्राचार्यांनी आपली अवज्ञा केल्याबद्दल ययातीला "तूं लगेच म्हातारा होशील! " असा शाप दिला. तत्क्षणी ययातीच्या अंगांतील त्राण गेले, त्याच्या त्वचेवर वळ्या पडल्या, डोक्याला टक्कल पडले, तो सारखा खोकूं लागला आणि क्षीण झाला. शरीर जरी असे वार्धक्याने जर्जर झाले तरी त्याच्या मनांतली कामवासना मात्र जशीच्या तशी धगधगत होती. देवयानीच्याही मनांतील भोगवासना शमलेली नव्हती. आपल्या पतीची ही अवस्था पाहून तिला आपल्या वडिलांकडे गाऱ्हाणे नेल्याचा पश्चात्ताप झाला. आपलेच कामसुख या शापाने हिरावून नेल्याचे पाहून ती राजासह शुक्राचार्यांकडे गेली आणि त्यांना पतीचे तारुण्य परत देण्याची विनवणी केली. शुक्रालाही त्यांची दया येऊन राजाला आपल्या एखाद्या पुत्राला आपले वार्धक्य देऊन त्याचे तारुण्य मागून घेण्याचा उपाय सांगितला. २५-३६.

राजाने आपल्या पांचही पुत्रांना बोलावून त्यांच्यापैकीं कोण आपले म्हातारपण घेऊन त्याच्या बदलीं स्वतःचे तारुण्य देण्यास तयार आहे ते विचारले. त्यापैकीं चार ज्येष्ठ पुत्रांनी सपशेल नकार दिला. सर्वांत धाकटा जो पुरु त्याने मात्र वडिलांच्या सुखासाठी आपल्या यौवनाचा त्याग केला आणि पित्याचे म्हातारपण भोगायचे सान्य केले. तेव्हां राजाने यदु आणि इतर तिघां मोठ्या पुत्रांना शाप दिला की, "तुम्हांला आणि तुमच्या संततीलासुद्धां छत्र आणि सिंहासनाचा अधिकार राहणार नाही." अर्थातच पुरूलाच यौवराज्यपद प्राप्त झाले.पण तो बिचारा म्हातारा होऊन दिवस कंठूं लागला. ३५-४०.

## ययातीची गाथा.

अन्नमयादि पंचकोशात्मक देहापेक्षां आपण (आत्म) वेगळे आहों हाच आत्मा आणि अनात्मा यांचा विवेक आहे. हा विवेक नसलेला पुरुष देहालाचा आत्मा मानतो. देहाच्या सुखांतच सुख मानतो. देहाचे सुख – म्हणजेच विषयसुख क्षणभंगुर असते, मर्यादित असते, आभासिक असते, परावलंबी असते आणि मुख्य म्हणजे ते परिणामीं दुःखालाच कारण होते. आत्मानात्मविवेक असणारे शहाणे लोक त्यांत रमत नाहीत. **ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते। आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधाः।। भ.गीता ५:२२।।** ययाति राजाला हा विवेक नसल्याने त्याने शरीरसुखाच्या लालसेने आपल्याच मुलाचे तारुण्य उधार घेतले. ४१.

पुरूच्या यौवनाचा अशा रीतीने शंभर वर्षांपर्यंत उपभोग घेतल्यावर दैवयोगाने त्याचे मन विषयोपभोगाला कंटाळले. इतकी वर्षे यथेच्छ कामसेवन करूनही आपल्या मनांतील काम शांत होत नाही याचा त्याला उद्वेग आला. तो देवयानीला समजावूं लागला, “हे देवि, खरोखरच कामवासना कामाच्या उपभोगाने शमत तर नाहीच, पण तुपाच्या आहुतींनी अधिकच प्रज्वलित होणाऱ्या अग्नीसारखी ती भडकतच राहते. **न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति | हविषा कृष्णवर्त्मेव पुनरेवाभिवर्धते।। श्रीमद्भागवत ९:१९:१४।।** ही कामवासना कुणाला कधी कशी भुलवील हे सांगतां येत नाही. कुणीही हिचा विश्वास धरू नये. वृद्ध असलेल्या स्त्रीपुरुषांनीही शारीरिक जवळीक रू नये. सुप्त कामाचा कधी उद्रेक होईल ते सांगतां येणार नाही. अगदी महान तपस्वी मुनींनासुद्धा हा नागवतो. अगदी आई, मुलगी किंवा बहीणही असली तरी तिच्याबरोबर एका आसनावर बसूं नये. स्त्रीपुरुष निकट आले की कामाची धग लागणारच. ” अशा रीतीने कामाची दुष्पूरता ययातीच्या चित्तांत स्थिर झाल्यावर त्याने विषयवासनेचा त्याग पुरूला त्याचे तारुण्य परत केले आणि त्याला राज्यावर बसवून आपले म्हातारपण घेऊन देवयानीसह आत्मकल्याणाच्या शोधांत वनाला निघून गेला. ४२-४७.

## यदूचे वैराग्य.

आपल्यापेक्षां कनिष्ठ आणि आपल्या आईच्या दासीचा पुत्र पुरु राज्यावर बसलेला पाहून यदूचे मन त्रस्त झाले. पुरूला हत्ती, घोडे इत्यादि राज्यवैभव भोगतांना, अप्सरातुल्य स्त्रियांशी रमतांना पाहून तो कष्टी झाला. आतां आपल्याला आपण ज्येष्ठ राणीचे ज्येष्ठ पुत्र असूनही त्याच्यासमोर मान वांकवावी लागणार हा अधिक्षेप त्याला सहन होईना. असे जगण्यापेक्षां वनवास पत्करला असा विचार त्याच्या मनांत घर करू लागला. स्वभावतःच विवेकी असल्याने त्याने विचार केला की हे सर्व माझ्याच पूर्वकर्माचे फळ आहे. जन्मांतरी जसे चांगले-वाईट कर्म केलेले असेल तेच दैवरूपाने उपस्थित होते. **अवश्यमेव भोक्तव्यं कृतं कर्म शुभाशुभम्।** तेव्हां ह्या नासक्या संसारांत सुख शोधणे व्यर्थ आहे. विवेकाच्या मागे वैराग्य चालून येते. असा हा विवेक-वैराग्यसंपन्न यदु राजभोगांचा मोह सोडून माक्षाचे साधन करण्यासाठी वनांत निघाला. ४८-५६.

## यदूला अवधूताचे दर्शन.

यदू हा बालपणापासूनच दत्ताचा भक्त होता. श्रीदत्तप्रभूंचे त्याच्यावर लक्ष होते. तो विवेक-वैराग्यसंपन्न होऊन वनांत आलेला पाहून त्यांना आनंद वाटला. खऱ्या भक्ताला देव संसाराचे सुख फार काळ मिळूं देत नाही. तो संसाराला चिरा पाडीतच येतो ही तुकाराम महाराजांची उक्ती सर्वथा सार्थ आहे. यदूला राज्यभ्रष्ट करण्यांतच श्रीदत्तांची कृपा आहे. जो खरा भक्त असतो तो विपत्तीतच परमेश्वरी कृपेचा प्रकाश पाहतो. “विपदैव सन्तु मे शश्वत्।” ह्या कुंतीच्या प्रार्थनेचे हेच रहस्य आहे. यदूचे मन अशा रीतीने संसारांतून उडाले आणि तीव्र मुमुक्षेने तो वनांत निघाला यानेच त्याचा ज्ञानाचा अधिकार सिद्ध झाला. तो संन्यासाला योग्य झाला. त्याला आत्मज्ञानाचा उपदेश करण्याच्या हेतूनेच यदु वनांत संचार करीत असतांनाच श्रीदत्तप्रभू अवधूत रूपाने त्याच्यासमोर प्रकट झाले. त्या निर्जन वनांत, एकाएकी त्या दिगंबर मुनीला निर्भय आणि निश्चिंत असे भूमीवरच पहुडलेले पाहून यदु राजाला फारच आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. “**कां दर्शनाचिये प्रशस्ती। पुण्यपुरुष।।**१३:१८१।।” या ज्ञानेश्वरीच्या लक्षणांवरून त्या अवधूताचे माहत्म्य जाणून यदु राजा त्यांच्या जवळ जाऊन श्रद्धाभक्तीने त्यांना वंदन करून नम्रपणे त्यांना म्हणाला. “आपण या घोर अरण्यांत जवळ कुणीही नसतांना एकटेच कसे बरे राहतां? आपला चरितार्थ इथे कसा होतो? मनुष्यमात्राची प्रवृत्ती संपत्ती, आयुष्य, कीर्ति, समृद्धि यांच्या

प्राप्तीसाठी धर्म, अर्थ आणि काम या चार पुरुषार्थाकडेच आहे. क्वचितच कुणी मोक्षासाठीही प्रयत्नशील असतात. अशी कांहीच प्रवृत्ती नसेल तर निष्क्रियता माणसाला सहन होत नाही. आपल्याला तर या कशाचीच ओढ दिसत नाही. कसल्याही करमणुकीवांचून आपण स्वस्थ, निश्चल आणि समाधानी कसे राहू शकतां? सर्वही मानवी जीव काम, क्रोध, लोभ यांच्या ज्वालांनी होरपळत असतात. आपल्याला मात्र त्यांची कांहीच धग लागतांना आढळत नाही. संपत्ती, लौकिक, इतकेच काय जीविताचीसुद्धां तुम्हांला पर्वा दिसत नाही. अशी निष्क्रियता, उदासीनता एखाद्या अज्ञानी, कर्तृत्वशून्य, विकलांग किंवा कसलेही कौशल्य नसलेल्या माणसाच्या ठिकाणीच संभवते. पण आपण तर मला ज्ञानी, सशक्त, दक्ष आणि निपुण दिसतां. आपण कांहीच न करतां इतक्या निर्जन स्थानी कांहीच न करतां संतोषाने कसे राहतां? आपला निर्वाह कसा चालतो? घर-दार, स्त्रीपुत्र, सर्व सुखसोयी असूनही आम्ही प्रापंचिक लोकांना सुख लाभत नाही. आपणांजवळ मात्र ह्यांतील कांहीच सामुग्री नसतांना आपण आनंदपूर्ण आहांत ह्याचे मला फार आशच्य वाटते. आपल्या ह्या निरुपचारिक सुखाचे काय रहस्य आहे? आपण मला सांगाल काय? खरे तर आपल्याला हे प्रश्न विचारणे हे माझे साहसच आहे. परंतु माझी जिज्ञासा खरी आहे. आपण मला क्षमा करून माझ्या ह्या प्रश्नांची उत्तरे देण्याची कृपा कराल काय? " (**श्र्यायुःकीर्त्यृद्धिहेतुना न्नर्थसक्तो ऽन्यथा भवान्। कल्पः स्वंगो ज्ञोऽप्यकर्ता कुतोऽत्रातृट् समुत्त्विति।।१।।** श्री+आयुः+कीर्ति+ऋद्धि+हेतुना नृ अर्थसक्तः (पुरुषार्थसक्त)। भवान् अन्यथा। कल्पः (हुशार) स्वंगः (धडधाकट) अपि कुतः अत्र अतृट् (निरिच्छ) समुत् (आनंदी) तु इति। ) ६७-७३.

# २४ गुरूंपासून घेतलेले ज्ञान.

यदूच्या प्रश्नांची सरबत्ती ऐकून त्या अवधूताने स्मितहास्य केले आणि तो बोलूं लागला. "अरे राजा! चित्त एकाग्र करून ऐक. मी आत्मतत्त्वाचे ज्ञान करून घेतले आहे. त्यामुळेच मी असा निरिच्छ, आत्मतृप्त, सुखरूप झालो आहे. हे तत्त्वज्ञान मी मोठ्या प्रयत्नांनी २४ गुरूंपासून मिळविले आहे. तेच ज्ञान मी आतां तुला सांगतो आहे. ते ऐकून (श्रवण) त्याचेच मनन करून ब्रह्मस्वरूप नीट समजून घे आणि त्या ब्रह्माचे निदिध्यासन कर म्हणजे त्याचा साक्षात्कार होईल. श्रवण-मनन-निदिध्यासनात्मक हा विचार मनुष्यालाच शक्य आहे. इतर जी शरीरे आपण पाहतो ती केवळ आहार आणि विषयोपभोगासाठीच आहेत हाच मानवदेहाचा विशेष आहे. आपल्या आत्मस्वरूपाची अनुभूती (विज्ञान) करून घेणे हेच नरजन्माचे प्रमुख साध्य आहे. हे शास्त्रांत म्हणजे वेदांतादि ग्रंथांत उत्तम प्रकारे मांडले आहे. गुरुमुखाने ते ग्रहण करून श्रुतीला अनुकूल अशा तर्काने त्याचे मनन आणि निदिध्यासन करावे. मग ते आपल्याच चित्तांत प्रतिबिंबित असलेले ब्रह्म तदाकार मनोवृत्तीद्वारा कळून येते. पूर्वी (अध्याय १५:२५-४२) पाहिल्याप्रमाणे आत्मा मनाचा विषय होत नसल्याने इतर विषयांप्रमाणे तो फलव्याप्तीने (आभासाने) जाणला जात नाही. परंतु शुद्ध चित्तांत स्वयंप्रकाश आत्म्याचे प्रतिबिंब पडते व त्याचा साक्षात्कार होतो. यालाच वृत्तिव्याप्ती असे म्हणतात. (**ब्रह्मण्यज्ञाननाशाय वृत्तिव्याप्तिरपेक्षते। स्वयं स्फुरणरूपत्वादाभासो नोपयुज्यत** ' वाक्यवृत्ती ३९-४१.) त्यानेच संसाराचे मूळ कारण जे अज्ञान ते नष्ट होते आणि जन्ममरणाच्या परंपरेतून सुटका होते.हाच मोक्ष होय. " ७४-८१.

"मी २४ गुरूंपासून प्राप्त केलेले हे तत्त्वज्ञान हेय (त्याज्य) आणि उपादेय (ग्राह्य) असे दोन्ही प्रकारचे आहे. विवेकशील पुरुषाला जगांत ह्या दोन्ही प्रकारचे ज्ञान सतत अनुभवाला येते. जे अहितकारी आहे ते टाकून आपल्या हिताच्या गोष्टींचा आदराने संग्रह करावे. हा विवेक ज्याला नाही तो दोन पायांचा पशूच जाणावा. तो गवत खात नाही हे पशूंचे सद्भाग्यच! देहपातापूर्वीच हे आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे अन्यथा मोठाच विनाश (जन्ममरणरूपी) ओढवतो असे बृहदारण्यक उपनिषदाचे प्रतिपादन

आहे. तेव्हां हेच ज्ञानसाधन हे मनुष्यमात्राचे कर्तव्य आहे. परंतु बहुतेक लोक श्रुतींनी निषेध केलेल्या विषयांच्या मागे लागलेले दिसतात. " ८१-८६.

यानंतर अवधूतांनी आपण आपल्या बुद्धीनेच केलेल्या ह्या २४ गुरूंची अनुक्रमणिका दिली आहे. ही मूळ भागवतांत अशी आहे. भागवत पुराणांत (एकादश स्कंद) या ठिकाणी त्या चोवीस गुरूंची यादी दिली आहे. 'पृथिवी वायुराकाशमापोऽग्निश्चंद्रमा रविः। कपोतोऽजगरः सिन्धुः पतङ्गो मधुकृद् गजः।। ७: ३३।। मधुहा हरिणो मीनः पिङ्गला कुररोऽर्भकः। कुमारी शरकृत्सर्प ऊर्णनाभिः सुपेशकृत्।। ७: ३४।।'

**१. पृथ्वी. २. वायु. ३. आकाश. ४. जल. ५. अग्नि (पंचमहाभूते).**

**६ चंद्र. ७. सूर्य. ८. कपोत. ९. अजगर. १०. समुद्र.**

**१२. पतंग. १३. हत्ती. १४. मधमाशी. १५. मृग. १६. मत्स्य**

**१७. वेश्या. १८. टिटवी. १९. बालक. २०. कुमारी कंकण.**

**२१. सर्प.**(२२) **२२. शरकार.**(२१) **२३.कुंभारीण माशी.** (२४) **२४. कोळी.** (२३)

श्रीस्वामीमहाराजांनी अवधूतगीतेत हे सर्व २४ ही गुरु घेतले असले तरी अंतिम चार गुरूंच्या क्रमांत मात्र थोडे पण मार्मिक बदल केले आहेत. वरील यादीत श्रीमद्भागवतांतील क्रम कंसांत दिला आहे. त्याविषयी आपण पुढे विचार करणार आहोत.. ८७-९४.

अवधूत पुढे सांगतात, "ह्या २४ गुरूंपासून मला जो बोधाचा सागर प्राप्त झाला त्यांत स्नान करून माझ्या सर्व पापांचे क्षालन केले आणि ज्ञानसंपन्न झालो. त्यामुळेच मी असा निर्भय होऊन इथे पहुडलो आहे. ह्याच विवेकरूपी संपदेमुळे माझ्या मनाची सर्व अस्वस्थता नाहीशी झाली आणि सुखाने परिपूरित झालो आहे. आत्मचिंतनात रमून गेल्याने मला ऐंद्रिय सुखदुःखांचा वारासुद्धां लागत नाही. मी माझ्या शाश्वत, पवित्र, ज्ञानमय आणि बंधमुक्त स्वरूपांत स्थिरावल्याने मी सर्व बाह्य विषयांचा त्याग केला आहे. मला कशाचीही आसक्ती राहिलेली नाही." ९४-९८.

## इतके गुरु कां केले?

"तुला अशी शंका येईल की वेद आणि पुराणांत श्वेतकेतू, भृगु इत्यादि अनेक साधक एकाच गुरूला शरण जाऊन विशुद्ध ज्ञान पावून कृतार्थ झाल्याचे वर्णन आहे. मग मी इतके २४ गुरू कां केले? आपल्या आवडीने अनेक पती करणाऱ्या स्त्रीला जसे व्यभिचारिणी म्हणतात. त्याप्रमाणे आपल्या बुद्धीला अनुसरून अनेक गुरू केल्याने व्यभिचारच होत नाही कां? त्याचे उत्तर असे आहे की वरील मुमक्षूंनी एकाच गुरूकडून उपदेश घेतला आणि त्याचा विचार करून ते मुक्त झाले. गुरूचा उपदेश हा मार्गदर्शनात्मक असतो. शिष्याची तशी योग्यता असेल तर तेवढ्यानेच ज्ञानसंपन्न होऊं शकतो. बहुतेक साधकांना त्या उपदेशाचे मनन लागते. मननाने तो उपदेश साधकाच्या चित्तांत स्थिर करावा लागतो.. हे मनन करीत असतांना पूर्वसंस्कारानुसार असंभावना, संशय आणि विपरीतभावना ह्या दोषांचा प्रतिबंध होतो. सर्व वेदांचे तात्पर्य म्हणजे एक ब्रह्मच आहे अशा श्रवणाने संशयभावनेचा निरास होतो. विपरीत भावना निदिध्यासनानेच नाहीशी होते. असंभावना ह्या दोषांचे निरसन करण्यासाठी तर्काचे साह्य होते. पण हा तर्क वेदांताला अनुकूल असा असला पाहिजे. कुतर्काने संशय अधिकच वाढतात. **बुद्धिं विशुद्धं ब्रह्मविज्ञानं न आरोहति इति चेत् वेदानुकूल तर्केण तर्क्यताम्। मा कुतर्क्यताम।।१०४।।** (निःसंशय ब्रह्मज्ञानावर बुद्धी आरूढ झाली नाही तर तिचा निश्चय करण्यासाठी श्रुतीला अनुकून असा तर्क करावा; पण कुतर्क करू नये.). तर्काच्या मर्यादांचेही भाव साधकाने ठेवायला हवे. तर्क केवळ द्वैतावरच करतां येतो. ब्रह्मा हे द्वैताच्या पलीकडे आहे, अद्वैत आहे. तिथे तर्काला, अनुमानाला वावच नाही. " ९९-१०५.

“अशा रीतीने गुरूपदिष्ट ज्ञान मननाने पक्के व्हावे यासाठी तर्कजन्य विवेकाची आवश्यकता आहे. तो विवेक ह्या २४ गुरूकडून मी ग्रहण केला आणि असंभावनादि दोषांचा निरास केला. ब्रह्म हे सूक्ष्म म्हणजेच अतींद्रिय आहे. ते जाणण्यासाठी हे गुरू करण्यात काय दोष आहे? ” १०६-१०७.

अवधूतांच्या हा उपदेश ऐकतांना राजाच्या चित्तांत आनंदाच्या लहरी उठत होत्या. त्यांना ‘**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया**’ या भगवद्वचनानुसार पुनश्च नमस्कार करून राजा पुढे नम्रपणे आणि प्रामाणिक जिज्ञासेने आपल्या मनांतील संशय दूर करण्याच्या हेतूने प्रश्न विचारीत आहे.

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सेहेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा सत्तेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ४८ वा.

त्या राजासी सांगे अवधूत। जलशिक्षणें झालों पूत।
अग्निशिक्षणें वीट। घालवून नीट राहिलों।।९८।।
ह्या जाग्रदादि अवस्था सोडाया। चंद्रार्क गुरु केले म्हणे म्यां।
कवडा गुरु स्नेह सोडाया। अठ्ठेचाळीसाव्यांत दत्त वदे।।९९।।

## ४. पाणी.

**पावित्र्य**:- ज्यांना आदि म्हणजे जन्म तसेच अंत म्हणजे मृत्यू हे नाहीत असे अवधूतवेषधारी दत्तप्रभू यदूला आपल्या चतुर्थ गुरूचे - उदकाचे गुण सांगत आहेत. उदक म्हणजे पाणी हे स्वभावतःच स्वच्छ - पवित्र, असते. तसेच आपण व्हावे. पाणी केवळ स्वतःच स्वच्छ रहाते असे नाही तर इतरांचेही मल धुवून टाकते. योग्यानेही आपले पावित्र्य रक्षण करीत असतांनाच इतरांच्याही दोषांचे परिमार्जन करावे.

**माधुर्य**:- पाणी जसे आपल्या गोडीने लोकांना आकर्षित करते, त्यांना प्रसन्न करून त्यांची तहान भागविते, तसेच साधूने आपल्या मधुर आणि मित वाणीने लोकांची मने जिंकावीत. '**साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ अमृताचे।।** ज्ञानेश्वरी।।' पाण्याला संस्कृतमधे आप म्हणतात. अश्नुवंति - व्यापणारे, सर्वांशी समरस होणारे ते पाणी अशी आप या शब्दाची व्युत्पत्ती आहे. तसा योगी सर्वांत मिसळणारा, त्यांच्या रंगांत रंगणारा असावा, 'पानी तेरा रंग कैसा। जिस में मिलावे वैसा।' त्याचप्रमाणे योग्याने सर्वांशी स्नेहपूर्ण वागावे.

**पावकता:**- पाणी अंगावर शिंपडून, त्याचे आचमन करून, पाण्याकडे पाहूनही पावित्र्य येते. स्नान करणाऱ्याला तर येतेच येते. नदी किंवा समुद्राच्या पाण्यावर किती तरी उद्योग-धंदे होत असतात, पाण्याला प्रदूषित करतात तरी ते पाणी न कंटाळतां ती सर्व घाण दूर करीत राहते. साधूनेही तीर्थजळाप्रमाणे आपल्या संपर्काने, आपला आदर करणाऱ्या, आपली सेवा करणाऱ्या लोकांचे दोष घालवून त्यांची मनें शुद्ध करावीत. साधुसंतांच्या चरित्रांत आपण हेच पाहतों. आपला आदर करणाऱ्यांचेच नव्हे तर तिरस्कार करणाऱ्याही लोकांचे अपराध, दोष पोटांत घालून साधुसंत त्यांच्या कल्याणांतच सदैव रत असतात. हे संत परमेश्वरी साक्षात्काराने कृतार्थ झालेले असतात. केवळ 'उपकारापुरते उरलेले' असतात. हाडामांसाची कातडी पिशवी असलेल्या नरदेहापासून जे साधायचे ते त्यांनी साधलेले असते. उरल्यासुरल्या प्रारब्धाच्या आधीन तो देह ठेवून ते केवळ लोकोद्धारासाठी ह्या भूलोकांत विचरत असतात. पाणी आपल्या सामर्थ्याने मोठमोठी झाडे उन्मळून टाकते; मात्र नम्र लव्हाळ्यांचे मात्र रक्षण करते. तसेच हे संत-महात्मे ताठर, गर्विष्ठ लोकांची उपेक्षा करतात आणि लीनतेने शरण येणाऱ्याचे पाप हरण करीत त्याचा उद्धार करतात. १-२२.

**रस्यः स्निग्धः प्रकृत्याच्छो ज्ञोऽब्वद्धाम्ना पुनाति नृन्।** द्वि.सा. ४:७।।
**स्वच्छः प्रकृतितः स्निग्धो माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम्।**
**मुनिः पुनत्यपां मित्रमीक्षोपस्पर्शकीर्तनैः।।** भा.पु.११:७:४४।।

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

## ५. अग्नि.

आतां अवधूत प्रभू पांचवा गुरु जो अग्नि त्याच्यापासून घेतलेली शिकवण सांगत आहेत.

अग्नि जसा सतत धगधगत असतो त्याप्रमाणेच योग्याने तपोरत असावे. त्या तपाच्या तेजाने लोकांत प्रदीप्त दिसावे. लोकांना ज्ञानाचा प्रकाश द्यावा, संसाराची थंडी घालवून मायेची ऊब द्यावी. नको तेव्हां राखेखाली धुमसणाऱ्या अग्नीप्रमाणे  हे तेज लपवून ठेवावे. अग्निप्रमाणे सर्वत्र संचार करून, जे मिळेल ते भक्षण करावे पण त्यांतील दोष जाळून टाकावेत आणि आपले पावित्र्या अबाधित राखावे.

अग्नीला कुंडांत स्थापन करून त्याला आहुती देणाऱ्या यजमानाच्या आधीन राहून त्यांच्या कामना तो पूर्ण करतो. ते ज्या देवतेच्या नांवाने हवि घालतील तो त्या त्या देवतांना पोंचवितो. योग्यानेही आपल्याला वंदन करणाऱ्या, आपल्याला अन्न घालणाऱ्या लोकांचे ऐहिक आणि पारलौकिक कल्याण करावे. लोक आपल्याला जे देतील ते घ्यावे आणि त्यांच्या भावनेप्रमाणे त्यांना फळ द्यावे. त्यांची सेवा त्यांच्या उपास्याला पोंचते. कुणी कुणी अग्नि उघड्यावर ठेवतात (अजस्र पक्ष) व त्यांत इंधनाचा गोळा घालतात तर कुणी तो झांकून ठेवून होमापुरतां उघडतात. योग्यानेही आपल्याला जसे ठेवले आहे तसेच समाधानाने रहावे. लाकूड, गोंवरी इत्यादि जे इंधन मिळेल ते अग्नि जाळून टाकतो, कांहीही शिल्लक ठेवीत नाही. साधूनेही संग्रह करू नये.

ज्या ज्या काष्ठांत वा इंधनांत अग्नि प्रवेश करतो त्याचा जो आकार असेल तोच तो धारण करतो. अग्नीला स्वतःचा असा कोणताही आकार नसतो. लहान-मोठे, लांब-रुंद, वाटोळे-चौकोनी, जसे ते लांकूड असेल त्याच आकाराचा अग्नि दिसतो. ह्यावरून आपल्याला परमात्वतत्त्वाचे स्वरूप कळते. निर्गुण निराकार आत्मतत्त्व देहादिक उपाधींत प्रविष्ट झाले की तसेच दिसायला लागते. ते आनंदमय चैतन्य वस्तुतः आकारशून्य आहे. सर्वही प्राण्यांच्या देहाना चाळविणारे तेच एकच चैतन्य आहे. आपण वरच्या उपाधींना भुलून अनेकांची कल्पना करतो. '**रूपं रूपं प्रतिरूपं बभूव**' ह्या श्रुतिवचनानुसार एक परमात्माच विश्वातील विविध रूपांनी प्रकटला आहे. अग्नीप्रमाणेच हे चैतन्य मात्र एकच एक आहे हीच शिकवण आपण ह्या पांचव्या गुरूकडून घ्यायची आहे. **सकलाः विमताः जीवाः ध्रौव्यादाकारवर्जिताः (सन्ति)। तेषां तारतम्यं तु तत् काष्ठाश्रित वह्निवत् (अस्ति)**।।३९।। अविनाशी जीव सगळे भिन्नभिन्न वाटतात खरे, त्यांचे ते सान-थोरपण काष्ठाला व्यापणाऱ्या आगीसारखे जाणावे. लाकडाला जाळणारा वह्नि त्याचाच आकार घेऊन वाढत जातो आणि शेवटी त्याला जाळून टाकतो. अग्नीच्या ज्वाळा उपजतात आणि विलय पावतात तसेच हे देह उद्भवतात आणि नाश पावतात. निर्वात ठिकाणी अग्नीची ज्वाळा कधी कधी स्थिर वाटली तरी तो निरंतर जळत राहणाऱ्या वायूंचा संतत प्रवाह असतो. तशीच उत्पत्ति आणि लयांच्या प्रवाहरूप असलेला हा संसार स्थिर वाटला तरी तो तसा नाही हेच अग्नीकडून शिकायचे आहे. देहाचे क्षणभंगुरत्व जाणून त्याचा अध्यास सोडायचा आहे आणि नित्य, शुद्ध, बुद्ध, सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याशी तादात्म्य करायचे आहे. २३-५०.

**छन्नः स्पष्टोऽपि काम्यर्च्यः प्रागुदग्दात्रघं दहन्।।**
**क्वापि भुङ्क्ते तपस्तेजो-दीप्तोऽक्षोभ्योऽपरिग्रहः।**
**मलास्पृक्सर्वभक्षोऽपि ज्ञोऽग्निवच्चेन्धसीयते ।।**
**तत्तद्रूपः स्वमायोत्थोच्चासत्स्थेशोऽग्निहेतिवत् ।**
**कालान्नित्येऽपि दृश्येते नात्मभूतोद्भवक्षती ।।** द्वि.सा. ४ः७-९।।
**स्वमायया सृष्टमिदं सदसल्लक्षणं विभुः।**
**प्रविष्ट ईयते तत्तत्सरूपोऽग्निरिवैन्धसि।।** भा.पु.११ः७ः४७।।
**कालेन क्षोभवेगेन भूतानां प्रभवाप्ययौ।**

**नित्यावपि न दृश्येते आत्मनोऽग्नेर्यथार्चिषाम्।।** भा.पु.११:७:४९।।

## ६.चंद्र.

जन्म, वाढ, स्थिति, विकास, क्षय आणि नाश हे सहा विकार देहाचे आहेत, त्यांचा आत्म्याशी कांहीच संबंध नाही, हे ज्ञान मी चंद्रापासून शिकलो असे दत्तप्रभू यदुराजाला सांगत आहेत. भारतीय ज्योतिष्यानुसार चंद्र आणि ग्रह हे जलमय आहेत आणि सूर्य हा तेजाचा गोल आहे. चंद्र आणि सूर्य हे जेव्हां एका नक्षत्रांत असतात तेव्हां चंद्र सूर्याने झाकल्यामुळे दिसत नाही. हीच अमावास्या होय. चंद्र(**ग्लौः**) वेगाने(**जवात्**) पुढे(**पुरतो**) जातो(**याति**) सूर्याची(**रवेः**) सावकाश (**स्वस्था**) दैनंदिन **(अनु+अहं)** चाल (**गतिः**) असल्याने एका वर्षांत त्याच्या सरासरी (**मध्या**) ५९(**गोक्षाः**) कला(**कला**) होतात तर चंद्राच्या **इंदोः** (७९०)**अभ्रगोऽश्वमिताः** कला होतात. **कला**।। ५५।। एका नक्षत्राचे अंतर कापायला चंद्राला साठ कला (एका दिवसापेक्षां थोडा कमी वेळ) लागतो तर सूर्याला तेरा दिवस-रात्र लागतात. अर्थात् चंद्राचा वेग सूर्याच्या पंधरा पट आहे. अमावास्येच्या दुसऱ्या दिवशी (प्रतिपदा) सूर्याचा केवळ पंधरावा भाग चंद्रांत प्रतिबिंबित होतो. ही चंद्राची एक कला. ह्या वेगाने दर दिवशी एका कलेने वाढत (शुक्ल पक्ष) पंधरा दिवसांनी चंद्र सूर्यापासून तेरा नक्षत्रे अंतरावर, म्हणजेच सूर्याच्या समोर येतो, त्या वेळी सूर्याचे पूर्ण प्रतिबिंब चंद्रांत पडते. हीच पौर्णिमा. त्यानंतर कृष्ण पक्षांत चंद्र परत सूर्याकडे सरकतो आणि पंधरा दिवसांनी परत अमावास्येची स्थिति येते. अमावास्येला चंद्राची पहिली कला धरून मोजल्यास पौर्णिमेपर्यंतच्या पंधरा कलांसह एकूण सोळा कला होतात. आपण स्थूल बुद्धीने पाहून चंद्र लहान-मोठा होतो असे समजतो. वास्तविक चंद्र आहे तेवढाच, आहे तसाच असतो. पण आपल्या डोळ्याना मात्र तो कलांनी घटणारा किंवा वाढणारा दिसतो. हे जसे आहे तसाच देह विकारांनी बदलतांना दिसला तरी त्यांतील चैतन्य मात्र अविकारी आहे. ते सदैव परिपूर्ण अक्षय आहे.

असे जर आहे तर सगळे देह सारखेच का वागत नाहीत? त्यांचे व्यवहार भिन्न भिन्न कां होतात असा प्रश्न पडतो. जसा चंद्र हा जलाचा गोल असल्याने त्यांत सूर्याचे प्रतिबिंब पडल्यावर ते शीतल वाटते. म्हणजेच चंद्रमंडलांतील पाण्याचा गुण त्याला लागतो. तसाच आत्म्याचा प्रकाश देहांतील अंतःकरणांत पडतो. त्यामुळे अंतःकरणांतील संस्कारामुळे त्याला पंचविषयात्मक जग भासूं लागते. आत्मा केवळ साक्षीभूत असतो. त्याला कोणताच विकार स्पर्शूं शकत नाही. हे आत्म्याचे अविकारित्व आणि अविनाशित्व आपण चंद्राकडून शिकलो असे दत्तप्रभू सांगत आहेत. ५१-७०.

**देहः कलावद्विकारी कालेनात्माब्जवद् ध्रुवः ।**
**भात्यात्मा तत्स्थवद्व्यक्तौ न स्वस्थो बुध्यतेऽर्कवत् ।।** द्वि.सा. ४:१०।।
**विसर्गाद्याः स्मशानान्ता भावा देहस्य नात्मनः।**
**कलानामिव चन्द्रस्य कालेनाव्यक्तवर्त्मनः।। भा.पु.११:७:४८।।**

## ७. सूर्य.

आतां सूर्यापासून घेतलेल्या बोधाचे निवेदन अवधूत करीत आहेत. आपल्या रोजच्या व्यवहारांत आपण हे सगळे देह सारखे फिरतांना पाहतो. त्यावरून आत्माही त्या देहांबरोबर फिरणारच. मग त्या आत्म्याला अचल कां म्हणतात? तसाच त्या सर्व देहांत प्रवेश केल्याने तो आत्मा तितक्या देहांत विभागला जाणार नाही कां? मग त्याला आकाशासारखे भेदरहित कसे मानतां येईल? त्याचे उत्तर असे की, व्यक्ति ही जीव आहे आणि पंचकोशात्मक देह ही उपाधि आहेत. ह्या सर्वात आत्मा प्रविष्ट आहे

ही चुकीची समजूत आहे. हे नीट कळण्यासाठी एक साधा प्रयोग आहे. एका मोठ्या पात्रांत पाणी भरून घ्यावे. ते दिसा उघड्यावर मोकळ्या जागी ठेवले की त्यांत सूर्याचे प्रतिबिंब दिसते. आतां ते पात्र उचलून दुसरीकडे ठेवा. त्या पात्राबरोबर ते सूर्याचे बिंबही दुसरीकडे जाते ना? एवढेच नाही तर पाण्यांत तरंग उठले की त्या बिंबांत विकृतीही येते. आतां ह्या बिंबाच्या गतीचा वा विकारांचा मूळ सूर्यावर कांही परिणाम होतो का? अर्थातच नाही. त्याचप्रमाणे आत्मा जीवमात्रांच्या देहादि उपाधींत केवळ प्रतिबिंबित होतो; त्यांच्यात प्रवेश करीत नाही. त्यामुळे देहादिकांचे विकार आत्म्याचे प्रतिबिंब जो जीव त्याच्यावर दिसून आले तरी आत्मा त्यांपासून सर्वथा मुक्त आहे. केवळ साक्षी मात्र आहे. हा सूर्यापासून घेतलेला पहिला धडा असे अवधूत म्हणतात.

**सूर्यो थिल्लरामाजी (डबक्यात) बिंबला। मूढ म्हणती थिल्लरी बुडाला। त्याचेनि कंपे कंपु मानिला। डहुळला म्हणता तो।।५१।। त्या थिल्लराते नातळतां। गगनीं अलिप्त जेवीं सविता। तैसीच योगियांची योग्यता। देहातीतता देहकर्मी।।५२।। ए.भागवत. अ.७।।**

सूर्यापासून आणखी एक गोष्ट मी शिकलो असे ते पुढे सांगत आहेत. सूर्यनारायण ग्रीष्म ऋतूंत अवघ्या पृथ्वीवरचे पाणी आपल्या किरणांनी शोषून घेतात. पुढे वर्षाकाळ आला की ते सर्व पाणी परत भूमीला देऊन टाकतात. कांही शिल्लक ठेवीत नाहीत. माणसाने असेच करावे. जिथे जिथे आपल्याला जे जे उपयुक्त असे दिसेल ते ते सर्व ग्रहण करावे. त्याचा संग्रह करावा. पण त्यांत आसक्त होऊं नये. योग्य वेळी योग्य पात्री त्याचे निरपेक्षपणे दान करावे. कांहीही जवळ ठेवूं नये. तुकाराम महाराज म्हणतात, "**उत्तम व्यवहारें जोडूनियां धन। उदास विचारें वेंच करी।।**" ते मिळाल्याचा हर्ष करूं नये आणि संपून गेल्याचा विषाद करूं नये. अनासक्त वृत्तीने, विनासायास जे कांही मिळेल त्याच्या संग्रहाने दोष लागत नाही. रघुवंशांत कालीदासांनी रघुवंशीय राजांचे वर्णन **त्यागाय संभृतार्थानां** असे केले आहे. ते अर्थार्जन करीत ते त्यागाच्या हेतूनेच करीत. ही दुसरी शिकवण आपल्याला सूर्याकडून घ्यायची आहे. ७१-८४.

**स्थूलबुद्ध्यार्कवद्गोभिर् गो यथास्वं गुणैर्गुणान्।**
**आदत्ते विसृजत्यत्र सदा योगी न युज्यते।। द्वि.सा. ४::११।।**
गुणैर्गुणानुपादत्ते यथाकालं विसृजति।
न तेषु युज्यते योगी गोभिर्गा इव गोपति।। भा.पु.११:७:५०।।

## ८. कपोत. (कवडा)

स्त्रीपुत्रांवर अनिर्बंध प्रेम करण्याने बंधांत सांपडून नाश होण्याची शक्यता आहे. तेव्हां माणसाने संयम आणि विवेक यांचा अभ्यास केला पाहिजे हे आपण एका कवड्याकडून शिकलो असे दत्तगुरु सांगत आहेत. एका वनामध्ये घरटे करून एक कवडा आपल्या मादीसह रहात होता. दोघांचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. वनांत अन्नाच्या शोधांत उभयतां एकत्रच बाहेर पडायचे, एकत्रच वावरायचे आणि एकत्रच घरट्यांत परतायचे. घरट्यांतही ते एकमेकांना घास घालीत, चुंबनालिंगनादीनी एकमेकांना रिझवीत आणि एकत्रच झोंपून जात. एकमेकांना जराही विसंबत नसत. पुढे त्या मादीने अंडी घातली. ती दोघांनी मिळून जोपासली. कालांतराने त्या अंड्यातून इवलीशी पिले बाहेर पडली. त्या दोघांची मने हर्षाने भरून गेली. आतां दोघेही त्या पिलांच्या पोषणासाठी आणि रक्षणासाठी झटूं लागली. त्यांना घरट्यांत मऊ गवताची शय्या करून झोंपविणे, त्यांना चांगचुंगला चारा आणून चोंचीत भरविणे इत्यादीतच ते सुख मानू लागले. परंतु जो (**यः**) आपल्या आधीन असलेले (**स्वाधीनं**), सहज मिळणारे (**सुलभं**) आणि उच्चतम (**परमं**) आत्मसुख (**निजानंद**) ग्रहण करीत नाही (**न अश्नुते**) तो (**सः**) पत्नी

मुले इत्यादीपासून होणारे (**स्त्रीपुत्रादिभवं**) सुख (**सौख्यं**) भोगूनही (**भुक्त्वा अपि**) समाधान पावत नाही (**न तुष्यति**). त्या पिलांना कवटाळीत; आपल्या पोटाला चिमटा काढून ते त्यांना अन्नकण भरवीत. हळूंहळूं मुले मोठी झाली. त्यांच्या भुकाही वाढल्या. मग दोघांनीही चारा आणायला बाहेर पडावे. रानोरान हिंडून त्यांच्यासाठी उत्तमोत्तम चारा आणावा. असेच ते दोघही घरांत नसतांना एक पिल्लू घरट्याच्या बाहेर आले. नेमकी हीच संधि साधून एका फांसेपारध्याने ते आपल्या जाळ्यांत धरले. एकामागून एक सगळींच पोरे त्या जाळ्यांत अडकली. तेवढ्यांत वनांत गेलेली माताही परतली आणि त्या पिलांना सोडवण्याच्या धडपडीत तीही बिचारी त्या जाळ्यांत फसली. मग तो कवडा घरी येतो तोच त्याला आपले सोन्यासारखे घरटे ओस पडलेले आणि मादी आणि पिले जाळ्यांत तडफडतांना दिसली. सगळा संसार उध्वस्त झाल्याचे पाहून तोही वैफल्यग्रस्त झाला आणि 'आतां आपण तरी जगून काय करायचे?' असा विचार करून त्यानेही जाळ्यांत उडी घेतली. यावरून आपल्याला हे शिकले पाहिजे की, विषयोपभोगांच्या मागे लागून संसारांतच सुख मानून जे, हे देवदुर्लभ मानवी आयुष्य आत्मचिंतनावांचून व्यर्थ घालवतात, त्यांना काळरूपी पारधी कधी येऊन बांधून नेईल ते सांगतां येत नाही. मुक्तीचे उघडे दार (**मुक्तिद्वारमपावृतम्।**) अशी ज्याची संत थोरवी गातात ते हे नरशरीर नष्ट होऊन पुनश्च संसारदुःखच वाट्याला येते. ८४-१०८

**नाऽतिस्नेहप्रसङ्गात्तो नश्येद्दीनः कपोतवत् ।**
**कश्चित्कपोतः कपोती क्रीडादौ चेरतुर्वने ।।**
**प्रेम्णाऽशङ्कं मिथोबद्धध्यक्षङ्गौ पाति स श्रमात्।**
**तर्पयन्ती साऽसूतार्भास्-तांस्तौ पुपुषतुर्मुदा ।।**
**कदाचिल्लुब्धको नीडाद् बहिःस्थांस्ताञ्छिचाददे।**
**क्रोशन्तीं पतितां दुःखात्-तां तं चापस्मृतिं तथा।। द्वि.सा. ४ः१२-१४।।**
**एवं कुटुम्ब्यशान्तात्मा, द्वन्द्वारामः पतत्रिवत्।**
**पुष्णन्कुटुम्बं कृपणः सानुबन्धोऽवसीदति।।**
**यः प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम्।**
**गृहेषु खगवत्सक्तस्तमारूढच्युतं विदुः।।भा.पु.११ः७ः ७३-७४।।**

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा अठ्ठेचाळिसावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ४९ वा.

म्हणे वांछा सोडाया आर गुरु। गांभीयार्थ समुद्र गुरु।
रूप सोडाया पतंग गुरु। सार घ्यावया गुरु मधुकर।।१००।।
स्त्रियेस सोडाया गज गुरु। भिक्षार्थ मधुहर गुरु।
गीत-रस सोडाया मृग-मत्स्य गुरु। हें एकुणपन्नासाव्यांत।।१०१।।

### ९. अजगर.

दयासागर ऋषिश्रेष्ठ दत्तप्रभू यदूला आपण, नववा गुरू जो अजगर, त्याच्यापासून घेतलेला बोध सांगत आहेत. आपण कवड्याच्या उदाहरणावरून हे पाहिले की स्त्रीपुत्रांच्या लालसेने ऐन्द्रिय सुखांतच गुंग झालेल्या माणसाचा एकाएकी कधी अधःपात होतो ते कळतसुद्धां नाही. एवढ्यासाठी गृहत्याग करावा. हा उपदेश इथे संन्याशांसाठी केलेला आहे. वैराग्य आल्याशिवाय, विषयांपासून पूर्ण उपरति झाल्याशिवाय संन्यास घेऊं नये अशीच शास्त्राज्ञा आहे. ह्या चोवीसही गुरूंचा उपदेश मुख्यतः संसारापासून विरक्त झालेल्या मुमुक्षूंसाठी आहे. आपण आपापल्या अधिकारानुसार त्यांतील सार ग्रहण करायचे आहे. १-२.

माणूस आयुष्यभुर सुखासाठी धडपड करीत असतो. नाना प्रकारचे बरे-वाईट उद्योग तो सुखाच्या अपेक्षेने करतो; पण ते सुख त्याला कितपत मिळते आणि मिळाले तरी कितपत टिकते हा विचारणीय प्रश्न आहे. बहुतेकांची अवस्था "सख सुख म्हणतां दुःख ठाकोनि आले" ह्या समर्थोक्तीप्रमाणे असते. दुःखासाठी कांही कुणी प्रयत्न करीत नाही; पण दुःख वाट्याला यायचे ते येतेच. विचार केल्यावर हे लक्षांत येते की सुखाचेही तसेच आहे. आपल्या दैवांत सुख असले तर ते प्रयत्नांवांचूनही येते. अन्यथा कितीही प्रयत्न केले तरी दैवांत नसलेले सुख कांही आपल्याला मिळणार नाही. कुणी म्हणतील हा दैववाद झाला. पण तसे नाही. आपल्याला मिळणारी सुखे आणि दुःखें ही आपल्याच कर्माची फळे आहेत. फलाभिमुख झालेले कर्म म्हणजेच **प्रारब्ध**. हे कुणाला बदलतां येणार नाही. बंदुकीतून सुटलेल्या गोळीसारखे ते आहे. आपले बरेच चांगले-वाईट कर्म **संचित** असते. एका जन्मापुरता आपल्या संचितातला भाग आपण ह्या जन्मी घेऊन येतो. तो सगळा भोगणे अपरिहार्य आहे; चांगला असो की वाईट असो. आत्तां आपण जे कर्म करीत असतो त्याला **क्रियमाण** - घडत असलेले, कर्म म्हणतात. हे संचितांत जमा होत असते. ही सर्व कर्मे बीजरूप आहेत. त्यांना फळण्यासाठी वेळ जावा लागतो. आंब्याची कोय लावल्यावर तिचे फळ यायला किती वर्षे जावी लागतात? तसेच कर्माचे आहे. फलाभिमुख झालेले कर्म प्रारब्धरूपाने आपल्याला मिळते. अशा रीतीने मानवी जीवनाकडे विचक्षण बुद्धीने पाहिले असतां सुखे आणि दुःखे ही आपाततःच येत असलेली दिसतात. इंद्रियसुख हे या प्रारब्धाचेच फळ आहे. मानवांनाच ते मिळते असे नाही. पशुपक्ष्यांना, किड्यापांखरांनाही तेच ऐंद्रिय सुख त्यांच्या प्रारब्धाने मिळतांना दिसते. नरकांतल्या जीवांनाही त्यांच्या कर्मानुसार हे विषयसुख मिळतच असते. इंद्राला इंद्राणीपासून जे सुख मिळते तेच कुत्र्याला कुत्रीपासून मिळते. पण हे सुख परतंत्र आहे. स्वतंत्र नाही. आपल्या आधीन नाही. ते बाह्य विषयांच्या माध्यामांतून प्राप्त होते. प्रारब्धांत नसेल तर

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

ते कितीही धडपड करून मिळणार नाही. मिळाले तरी वैषयिक सुख टिकाऊ नाही. जिलेबी जिभेवर आहे तोंवरच तिच्या गोडीची मजा आहे. एकदां जिभेपासून वेगळी झाली कीं मग कुठली गोडी? सर्व ऐंद्रिय सुखाचे असेच आहे. आणि ह्या क्षणभंगुर सुखांच्या आभासांच्या मध्ये दुःखच दुःख आहे. गीतेत हेच सांगितले आहे. **ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते। आगमापायिनोऽनित्यांस्तांस्तितिक्षस्व भारत।।** भ.गीता।। ३-९.

"असे हे आभासात्मक सुख प्रारब्धानुसार प्राणिमात्रांना बसल्या ठिकाणी मिळतच असते. त्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता नाही. हे समजण्यासाठी मी अजगराला गुरु केले आहे. तो आपल्या आहाराची कांहीच चिंता न करतां स्वस्थ पडून राहतो. त्याचा आहार त्याच्याकडे आपोआप येतो. जेव्हा जे खायला मिळेल ते अख्खे (अशेष) खाऊन तो संतुष्ट राहतो. ते लहान आहे की मोठे, रुचकर आहे की नाही याचा हर्ष वा खेद न मानतां तो समाधानाने एकाच ठिकाणी झोंपून राहतो. कधी आहार मिळाला नाही तरी तसाच धैर्याने पण सावधपणे निजलेला असतो. त्याची ही उदासीन वृत्ती अनुकरणीय आहे. साधकाने जेव्हां जे शिळे-ताजे, कडू-गोड अन्न, जेवढे पदरांत पडेल, ते खाऊन स्वस्थ रहावे. कांहीच न मिळाल्यास दैवावर विश्वास ठेवून धीराने आत्मानुसंधान करीत बसून रहावे. अन्न मिळविण्याचे सामर्थ्य असूनही तो यत्न करूंच नये. असे निराहार बसल्याने सर्व इंद्रिये क्षीण होतात व मन आयतेच अंतर्मुख होते. "आयुरन्नं प्रयच्छति" माणसाची नियत आयुर्मर्यादाच अन्न पुरवीत असते; आपल्या प्रयत्नांच्या अभावी ते थांबत नाही हा दृढ विश्वास धारण करून अनुसंधानात रहावे. हीच अजगरवृत्ती धारण करून मी या ठिकाणी सुखाने पडून आहे." **स्वप्नजागृती मुकला। सुषुप्ती सांडोनि निजेला। शून्याचा पासोडा झाडिला। निजीं पहुडला निजत्वें।। ए.भा.८:४०।।** महान विष्णुभक्त प्रह्लादालाही श्रीदत्तप्रभूंनी हाच उपदेश केलेला आहे. ११-१९

**क्वाप्यस्त्यैन्द्रियसौख्यं तन्-नैच्छेदाजगरोऽक्रियः ।**
**यदृच्छयाप्तं महान्तं ग्रासं वाल्पं रसारसम् ।।**
**भक्षेच्चेन्नाप्तोऽनशनो दैवभुक्सर्पवत्स्वपन् ।**
**विनिद्रोऽक्रियबल्यङ्ग-धृग्गोमानपि नेहते ।। द्वि.सा. ४:१६-१७।।**
**ग्रासं सुमृष्टं विरसं, महान्तं स्तोकमेव वा।**
**यदृच्छयैवाप्तं ग्रसेदाजगरोऽक्रियः।।** भा.पु.११:८:२।।
**ओजाः सहोबलयुतं बिभ्रद्देहमकर्मकम्।**
**शयानो वीतनिद्रश्च नेहतेन्द्रियवानपि।।भा.पु. ११:८:२।।**

## १०. समुद्र.

अवधूत यदुराजाला सांगत आहेत. "अजगरासारखे पडून राहिल्याने कधी भोग मिळतील तर कधी मिळणारही नाहीत. अशा दोन्ही अवस्थांत हर्ष किंवा विषाद न मानतां मन समतोल राखण्यासाठी मी समुद्राला गुरु केले आहे. पावसाळ्यांत समुद्राला येऊन मिळणाऱ्या नद्यांना पूर आलेला असतो. त्या पाण्याच्या समृद्धीने फुगून जाऊन समुद्र कधी आपली सीमा ओलांडीत नाही. त्याच नद्या उन्हाळ्यांत कोरड्या पडतात. त्यांचे पाणी आटून गेल्याने समुद्र कांही दुःखाने वाळून जात नाही. तोच कित्ता आपण गिरवावा. सुखोपभोगांची रेलचेल झाली तर हर्षाने फुलून जाऊं नये आणि खायचीसुद्धां भ्रांत झाली तरी खंतीने खचून जाऊं नये. मन समतोल राखून आपल्या धर्माचे पालन निष्ठापूर्वक करीत सागराप्रमाणे सदैव धीरगंभीर असावे.

"समुद्राचा कुणाला थांग लागत नाही. तो किती लांब, रुंद आणि खोल आहे, त्याच्या पोटांत किती रत्ने आहेत, किती अगणित जीवांना त्यात आश्रय आहे हे जाणणे जसे दुरापास्त आहे तसेच

योग्याने असावे. आपली योग्यता, आपले गुण, आपले ज्ञान ह्यांचा थांगपत्ता लोकांना लागूं देऊं नये. बाह्यतः सदा सर्वदा प्रसन्नताच असावी. २०-२८.

**पूर्णो हीनोऽप्यजपरो न सर्पति न शुष्यति ।**
**ज्ञोऽब्धिवत्सिन्धुभिर्निम्नोऽनन्तपारो दुरत्ययः।। द्वि.सा. ४:१८।।**
**सदाऽक्षोभ्यो दुर्विगाह्यः प्रसन्नः स्तिमिताब्धिवत् ।**
**मुनिः प्रसन्नगम्भीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः।**
**अनन्तपारो ह्यक्षोभ्यः स्तिमितोद इवार्णकः।।**
**समृद्धकामो हीनो वा नारायणपरो मुनिः।**
**नोत्सर्पेत न शुष्येत सरिद्भिरिव सागरः।। भा.पु.११८५-६।।**

## ११. पतंग.

**शब्दादिभिः पञ्चभिरेव पञ्च पञ्चत्वमापुः स्वगुणेन बद्धाः।**
**कुरङ्गमातङ्गपतङ्गमीन- भृङ्गा नरः पञ्चभिरञ्चितः किम्।।** विवेकचूडामणि:७८।।

शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या एकेका विषयाच्या ओढीने हरीण, हत्ती, पतंग, मासा आणि भुंगा हे मृत्यूचे भक्ष्य होतात तर या पांचही विषयांच्या अनिवार ओढीने माणसाचे काय होत असेल बरे? या श्रीमच्छंकराचार्यांच्या श्लोकांत दर्शविलेल्या पांच गुरूंचे वर्णन आतां अवधूत करीत आहेत. हे सगळेच काय त्याज्य आहे (हेय) ते सांगणारे गुरु आहेत. ह्या पांच गुरूंकडून आपण विषयांचा त्याग करायला शिकले पाहिजे. ह्या विषयाची ओढ आपल्याला झोंपेत जाणवतसुद्धां नाही. झोंपलेल्या माणसापुढे पंचपक्वान्नांचे ताट वाढून ठेवले तरी त्याच्या तोंडाला मुळीच पाणी सुटत नाही. जागा असलेला माणूस मात्र असे ताट पाहून ते खायला अधीर होऊन जातो. समोर असलेले विषयसुद्धा (**सतोऽपि विषयान् एव**)) झोंपलेल्याला (**स्वपन्**) जसे जाणवत नाहीत (**यथा न जानाति**) त्याचप्रमाणे (**तथैव**) जागपणीही (**जागरूकः**) जाणवले नाहीत (न जानाति **चेत्**) कोण (संसार)पाशांतून (**बंधनात्**) मुक्त होणार नाही ( **न मुच्येत**)?(३०)

पतंग दिव्याच्या ज्योतीकडे आकर्षित होतो आणि तिच्यावर झेंप टाकून स्वतःला जाळून घेतो. त्याप्रमाणे जो पुरुष स्त्रीच्या सौंदर्याला भुलून तिच्या नादीं लागतो तो आपल्याच नाशाला कारण होतो. साजशृंगाराने सजविलेल्या ज्या रूपाचे आकर्षण वाटते त्याच्या आंत अस्थि-मांसादि गर्ह्य वस्तूंचा संग्रह आहे असा विचार करावा. त्या देहांतील चैतन्य गेले तर त्यालाच आपण प्रेत म्हणून शिवायलाही कचरतो. अशा नाशिवंत आणि घृणास्पद अमंगळ देहावर केवळ वरवरचा दिखावा पाहून आपण मोहून जातो आणि आपलाच घात करून घेतो. याची असंख्य उदाहरणे इतिहास-पुराणांत प्रसिद्ध आहेत. त्या देहापासून कामसुख मिळावे म्हणून ही ओढ आहे असे कुणी म्हणतील. पण ह्या कामसुखाचे खरे ओंगळवाणे स्वरूप श्रीस्वामी महाराजांनी इथे मांडले आहे. परस्पर अवयवांच्या संयोगाने होणाऱ्या क्षणभंगुर स्पर्शसुखासाठी माणसाने आपली इभ्रत आणि प्राणही पणाला लावणे ही संमोहाची परमावधी आहे. सध्यां पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांनी ह्या कामवासनेचे महत्त्व अवास्तव वाढवून ठेवले आहे. त्यांचे स्वैराचाराला पुष्टि देणारे सिद्धांत सर्वच स्त्रीपुरुषांना अधोगतीला नेणारे आहेत. वर आपण पाहिल्याप्रमाणे हे सुख पशवादिकांनाही मिळते. मानवाने ह्या कामविकाराचे नियमन केले तरच त्याला याच्यापेक्षां उत्कृष्ट, शाश्वत सुख, आपले आपल्यांतच सांपडणार आहे. शाहीर राम जोशी म्हणतात, “दो दिवसांची तनु ही साची। सुरतरसाची करुनि मजा। गमजा करितां मनिं उमजा ना। हे सुख पुढे न पडेल वजा।। भाइ सावध व्हा।।” २९-३७.

**नाऽवशोऽग्नौ विवन्नश्येत् स्त्रीलीलारूपमोहतः ।। द्वि.सा. ४:१९।।**

## १२. भृंग.

भृंग किंवा मधुकृत् दोन प्रकारचे आहेत. मधाचे कृंतन करणारा - म्हणजेच फुलांफुलांतून मध वेंचणारा हा मधुकृत् म्हणजे भुंगा. ह्याच्यापासून हे शिकायचे आहे की नाना शास्त्र-पुराणादींतून सार ग्रहण करावे. सर्व शास्त्र किंवा ग्रंथ आयुष्यभर वाचूनही संपणार नाहीत. तेव्हां त्यांच्यांतल्या आशयाचा तेवढा संग्रह करावा. "**बहुशास्त्रगुरूपासनेपि सारादानं षट्पदवत्।**" (सांख्यदर्शन ४:४). तसेच आणखी एक मर्म ध्यानांत ठेवावे. अधिक किंवा रुचकर रसाच्या अभिलाषेने एकाच कमळांत फार वेळ राहणारा भुंगा ते कमळ मिटल्यावर अडकून पडतो. त्याप्रमाणे अवधूताने एखाद्या घरी चांगली व भरपूर भिक्षा मिळाली म्हणून तेच घर धरले तर स्नेहपाशांत अडकून अनुसंधान सुटायची भीती असते.

दुसरा मधुकृत् म्हणजे प्रत्यक्ष मध करणारी मधमाशी. ही तो मध, न स्वतः सेवन करते न इतरांना देते, उंच झाडावर पोळ्यांत सांठवून लपवून ठेवते. पण मध गोळा करणारे त्या पोळ्यांचा छडा लावतातच आणि मधमाशांना जाळून तो सगळा मध घेऊन जातात. जे लोक स्वतःही भोग न घेतां, पोटाला चिमटा काढून धन जमवतात, कुटुंबीय, इष्ट, मित्र इत्यादिकांना कुणालाही देत नाहीत, त्यांचे ते धन, चोर किंवा राजा (आयकर अधिकारी) घेऊन जातात; अथवा ते आगीत, पुरांत वा भूकंपांत नष्ट होऊन जाते. वित्ताला तीनच गति आहेत, दान, भोग आणि नाश. जो कुणाला दानही देत नाही किंवा स्वतःही त्याचा उपभोग घेत नाही त्याच्या संपत्तीचा नाश निश्चित आहे. "**दानं भोगो नाशस्तिस्रौ गतयोर्भवन्ति वित्तस्य। यो न ददाति न भुङ्क्ते तस्य तृतीया गतिर्भवेत्॥**" हा संग्रहामागील वृत्ती सूर्याच्या संग्रहच्या नेमकी उलटी आहे.३८-५०.

**गृण्हीयात्सर्वतः सारं रमेन्नैकत्र चाल्पभुक् ।**
**संग्रहे नाशबीजेऽपि मधुकृद्वन्मुनिः सदा ॥** द्वि.सा. ४:१९॥
**अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः।**
**सर्वतः सारमादद्यात्पुष्पेभ्य इव षट्पदः॥** भा.पु. ११:८:१०॥
**सायंतनं श्वस्तनं वा न सङ्गृहीत भिक्षुकः।**
**मक्षिका इव सङ्गृह्णन्, सह तेन विनश्यति॥** भा.पु. ११:८:१२॥

## १३. हत्ती.

परस्त्रीचा अभिलाष तर घातक आहेच; पण आपल्याही पत्नीची अनिवार प्रीति माणसाला बंधनांत टाकते. चिरंजीवपदांत एकनाथ महाराज म्हणतात, "**स्वस्त्रीसही कार्यापुरते। पाचारावे स्पर्शावे निरुते। परी आसक्त होऊनि तेथे। सर्वथा चित्ते नसावे॥**" अगदी लाकडाची केलेली स्त्रीची प्रतिमा असेल तरी तिला पायानेसुद्धां शिवू नये (हे मुख्यतः संन्याशांसाठी आहे) हे शिक्षण आपण हत्तीपासून घेतल्याचे अवधूत सांगत आहेत. एका सिंहावांचून कुणालाही न आटोपणारा बलिष्ठ हत्तीसुद्धां त्याच्यासमोर ठेवलेल्या लांकडी मादीकडे ओढला जातो आणि त्याच्यासाठी करून ठेवलेल्या खड्ड्यांत पडतो. हत्तीला पकडण्यासाठी प्रशिक्षित हत्तिणींचा उपयोग करतात. हत्तीच्या वाटेत तिला उभी करतात आणि अलीकडे एक खड्डा खणून तो झांकून ठेवतात. एऱ्हवी सावध असणारा हत्ती मादीच्या वासाने मस्त होऊन बेसावधपणे आपल्यासाठी खणलेल्या गर्तेत सांपडतो आणि जन्माचा दास होऊन जातो. खऱ्या हत्तीणीच्या जागी लाकडी प्रतिमाही वापरतात. काष्ठमयी स्त्री इतकी घातक आहे तर हाडामांसाची स्त्री किती बरे अनर्थ करू शकेल? खऱ्या हत्तिणीच्या मागे लागलेल्या नराला दुसरे बलिष्ठ हत्ती येऊन मारून टाकतात. तसेच एखाद्या रूपवतीच्या मोहांत पडलेल्या पुरुषाला इतर बलवान पुरुषांपासून धोका असतो. आपल्या स्वार्थासाठी पुरुषांना नादीं लावणाऱ्या कामिनींचा सोस करणारा अंती नरकाचाच धनी होतो. स्त्रीदेहाविषयी वाटणाऱ्या आकर्षणाला आळा घालण्यासाठी त्या देहाच्या अमंगळपणाचा विचार करावा.

मल-मूत्रा-अस्थि-मांस इत्यादींनी भरलेली ही कातड्याची पिशवी आहे. असा विचार करावा. दुसरा एक विवेक करावा कीं स्त्रीची योनी हेच पुरुषाचे जन्मस्थान आहे. तिच्याकडे केवळ भोग्य वस्तू म्हणून पाहणे ही किती निंद्य आहे? ही हत्तीसारखी प्रवृत्ती नरकालाच नेणारी आहे. ५१-५७.

कामप्रवृत्ती ही नैसर्गिक आहे, सहज आहे हे जितके खरे आहे तितकेच तिचे नियमन माणसाला निःसंशय आवश्यक आहे. हे कठिण असले तरी अशक्य नाही. हे नियमन करण्यासाठीच शास्त्राने विवाह, ऋतुकाल इत्यादि बंधने घातली आहेत. ह्या शास्त्रमर्यादांच्या पालनाने कामप्रवृत्तीवर नियंत्रण करतां येते. जन्मोजन्मीच्या अशा नियंत्रणाच्या अभ्यासाने जे पुरुष वयांत आल्यापासूनच नैष्ठिक ब्रह्मचर्य धारण करतात, स्त्रियांचा स्पर्शही होऊं देत नाहीत ते भगवान शंकरांप्रमाणे वंदनीय आहेत. नारायण ऋषींच्या तपश्चर्येचा भंग करायला इंद्राने स्वर्गातील अप्सरा (स्वर्वेश्या) पाठविल्या. पण त्यांना त्यांचा यत्किंचतही मोह पडला नाही. त्यांनी आपल्या मांडीपासून त्या अप्सरांचा रूपाभिमान नष्ट करणारी एक अप्सरा (उर्वशी) इंद्रालाच भेट म्हणून पाठविली. असे ब्रह्मचर्य पाळणारे महात्मे परब्रह्मस्वरूपच जाणावेत. इथे श्रीस्वामी महाराजांनी स्त्रीला रात्रीची (तमिस्रा) उपमा दिली आहे. तिचा विलास हा त्या रात्रीचा काळोख आहे. हिला पाहतांच योगी सिद्धासनावर बसून जागरूकपणे मनाचे नियमन करतात. कामाचे उद्दीपन स्वाधिष्ठान चक्रांत प्राणाच्या गतीने होते. सिद्धासनावर बसल्याने सहज मूलबंध होऊन तो प्राण ऊर्ध्वगति होतो. ५८-६५

वरील वर्णनांत जरी मुख्यतः पुरुषाच्या दृष्टीने केले असले तरी कामप्रवृत्ती ही स्त्री-पुरुष या दोघांनाही सारखीच घातक आहे. जो विवेक पुरुषांनी स्त्रीदेहाविषयी करायला सांगितला आहे तोच विवेक स्त्रीनेही पुरुषदेहाविषयी करावा. अशा प्रकारचे विवेचन पुराणांतून केलेले आहे. इथे विस्तारभयास्तव देतां येत नाही.

**बध्येत नाऽङ्गनास्पर्शाच्-छूरैर्हन्येत वेभवत् ।**
**पदाऽपि युवतीं भिक्षुर्न स्पृशेद्दारवीमपि।**
**स्पृशन्करीव बध्येत करिण्या अङ्गसङ्गतः।।** भा.पु. ११:८:१३।।

## १४. मधुहा.

आपण मधमाशीची संग्रहबुद्धी कशी त्याज्य आहे ते वर पाहिलेच आहे. त्या मधमाशीने कष्टपूर्वक, दीर्घ प्रयत्नाने, दूरदूरच्या फुलांतून वेंचून आणलेला मध, स्वतःसुद्धां न घेतां सुरक्षित जागी राखून ठेवलेला मध, तिला वारून घेऊन जाणाऱ्या मधुहाकडूनही अवधूतांनी ज्ञानोपार्जन केले आहे. यावरून उदरभरणासाठी आपणच कष्ट केले पाहिजेत असे नाही हे ध्यानांत येते. मधमाशांप्रमाणेच गृहस्थ दिवसभर कष्ट करून, गांवोगांव हिंडून, पैसा मिळवतो. त्यानंतर त्या पैशांनी धान्य, इंधन, भाजी इत्यादि विकत आणून पत्नीला देतो. ती त्यापासून स्वयंपाक करून अन्न सिद्ध करते. अशा वेळी माध्याह्नकाळी जो कुणी ब्रह्मचारी वा संन्यासी माधुकरी मागायला येतो त्याला ते अन्न आधी मिळते व नंतर त्या गृहस्थाला आणि त्याच्या कुटुंबियांना! एवढ्यासाठी विद्यार्जनासाठी, तपश्चर्येसाठी, मोक्षसाधनासाठी ज्याने घरदाराचा त्याग केला आहे त्याने हा अन्न मिळविण्यासाठी कष्ट न करतां भिक्षा मागून त्या मधुहाप्रमाणे आयते अन्न ऐन वेळेस माधुकरी मागून घेऊन यावे. ही वृत्ती फक्त सर्वसंगपरित्याग करणारा संन्यासी किंवा विद्याभ्यास करणारा ब्रह्मचारी यांच्यासाठीच सांगितली आहे. "**यतिश्च ब्रह्मचारी च पक्वान्नभिक्षुकावुभौ।**" (पराशरस्मृति १:४६). 'पुत्रैषणा, वित्तैषणा, लोकैषणा ह्या सर्वांचा त्याग करून भिक्षावृत्तीचा अंगीकार करावा.' (बृहदारण्यक उपनिषद ३:५:१). ह्यांनी पैसा मिळविण्यांत किंवा स्वयंपाकपाणी करण्यात वेळ घालवूं नये यासाठी ही शास्त्राने केलेली सोय आहे.

केवळ उदरभरणासाठी भीक मागणे हे केव्हांही गर्हणीयच आहे. गृहस्थाचाही या भिक्षा घालण्याने मोठा लाभ आहे. गृहस्थाला पांच महापापांचा दोष रोज लागत असतो. उखळ, जाते, चूल, रांजण आणि झाडू यांच्या उपयोगाने लागणाऱ्या दोषांना **पंचसूना** असे म्हणतात. **कण्डणी पेषणी चुल्ली उदकुम्भी च मार्जनी। पञ्चसूना गृहस्थस्य ताभिः स्वर्गं न विन्दति।** (पराशरस्मृति). दुपारच्या वेळी अतिथीला भिक्षा घातल्याने ही पांच पापें दूर होतात. घरांत जरी वैश्वदेव होत नसला तरी दुपारच्या वेळी आलेल्या अतिथीला अन्न घातले तर त्या दोषाचा परिहार होऊन यज्ञाचे फल प्राप्त होते. याउलट अतिथि विमुख पाठविला तर तो त्या गृहस्थाचे पुण्य घेऊन जातो. ते घर वनाप्रमाणे समजावे. ६६-८२.

**अन्योऽकात्सञ्चितं लुब्धैर्न भुक्तं नार्पितं धनम्** ।। द्वि.सा. ४:२१।।
**भुङ्क्तेऽकार्जितगृह्यन्नं प्राग्भिक्षुर्मधुहेव च ।**

## १५. हरीण.

अत्यंत जलद गतीने धांवणारे चपळ हरीण पकडण्यासाठी पारधी त्याच्या नादलुब्धतेचा उपयोग करतात. उत्तम गवई आणि वादक आपला साज घेऊन ज्या वनांत हरीण आहेत तिथे जाता आणि मधुर स्वरांच्या आलापांनी त्या मृगांना आकर्षित करतात. त्या स्वरमाधुरीने लुब्ध झालेले हरीण आपली शुद्ध हरपून त्या ठिकाणी धांवत येतात आणि पारध्यांच्या जाळ्यांत अनायासेच सांपडतात. यावरून आपण नादलुब्धतेपासून सावध रहावे हा धडा घ्यायचा आहे. संगीत ही मोठी कला आहे. चित्ताचा वेध घेण्याचे सामर्थ्य त्यांत आहे. स्वर, ताल, लय साधून गायक-गायिका विविध रागरागिणींचा आविष्कार करतात, ते आपण दुरूनच ऐकावे. ऐकायचेच असले तर ॐकाराने समृद्ध झालेले सामगायन ऐकावे किंवा भक्तिभावाने गाइलेले भजन ऐकावे. पण ज्यांत भगवंताच्या गुणांचे वर्णन नाही असे गाणे कितीही सुस्वर असले तरी केवळ आक्रोश आहे किंवा कोल्हेकुई आहे. रामायणांत हरिणीपासून जन्मलेल्या ऋष्यशृंग मुनींची कथा आहे. ते स्त्रियांचे गायन ऐकून भुलले आणि तपश्चर्येपासून भ्रष्ट झाले. एवढ्यासाठी उत्तान, कामोद्दीपक गायनाचे स्मरणसुद्धां अधःपाताला कारण होते म्हणून हेय आहे, हा बोध मी मृगाला गुरु करून घेतला असे अवधूत सांगत आहेत. ८२-९४.

**ना बध्येतैणवद्गीतान्-नृत्याद्वाप्यृष्यश्रृङ्गवत्** ।। द्वि.सा. ४:२२।।
**ग्राम्यगीतं न शृणुयाद्यतिर्वनचरः क्वचित्।**
**शिक्षेद्धरिणवन्मृगयोर्गीतमोहितात्।।**
**नृत्यवादित्रगीतानि जुषन् ग्राम्याणि योषिताम्।**
**आसां क्रीडनको वश्य, ऋष्यशृङ्गो मृगीसुतः।।** भा.पु. ११:८:१७-१८।।

## १६. मासा.

पाण्यांत राहणारा अतिचपळ मासा एरवी हाताला लागत नाही. पण जिह्वालौल्यामुळे गळाला लागतो. रसासक्ती सुटल्यावांचून शाश्वत सुखाची आशासुद्धां करतां येत नाही हेच तो मासा सांगतो आहे. हा रस नांवाचा विषय असा आहे की आपल्याला आवडणाऱ्या खाद्याचे नुसते स्रण केले तरी तोंडाला पाणी सुटते. त्या पदार्थाचा वास आल्यानंतर तर त्या माणसाला कुणीच आंवरू शकत नाही. ह्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी माणूस काय करीत नाही? देशोदेशी भटकून, प्रसंगी बायका-मुलांना विकूनही माणूस आपल्या जिभेचे सोस पुरवितो. शूर, वीर योद्धेसुद्धां ह्या रसनेपुढे हतबल झालेले दिसतात. एवढेच काय, अगदी महापंडित, सभा जिंकणारे मोठे वक्तेसुद्धां जिह्वेच्या आधीन होतात. डावे-उजवे थोडेही कमीजास्त झाले की क्रुद्ध होतात. अशा अनेक नरश्रेष्ठांनाही ही चार बोटांची जिभली राखतां येत नाही हे केवढे आश्चर्य आहे? ह्या रसनेला जिंकण्यासाठी अभ्यासाचीच आवश्यकता आहे.

वर सांगितलेल्या प्राणवृत्तीचा (शरीरांतर्गत वायु) सराव जर हळूहळू केला तर जीभ आपल्या ताब्यांत आणतां येते. जोंपर्यंत रसाची आसक्ती सुटत नाही तोंपर्यंत जितेंद्रिय म्हणवितां येणार नाही. एक जीभ (म्हणजेच रस हा विषय) जिंकली की सर्व विषयांना जिंकल्यासारखेच आहे. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे आहार सोडला तर इतर सर्व विषय ओसरतात; पण रस मात्र हटत नाही. तो परमात्मदर्शनानंतरच सुटतो.

**विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः।**
**रसवर्ज्यं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते।।** भ.गीता २:५९ ।।

“मत्स्याला गुरु करून मी हाच बोध घेतला आणि क्रमाक्रमाने रसनेवरही विजय मिळवून इथे असा सुखमग्न पहुडलो आहे.”

**प्रमाथिजिह्वया नैति बडिशैर्मत्स्यवल्लयम् ।**
**जय्याल्पभुज्या साऽसक्त्या जितं सर्वं जिते रसे।।** द्वि.सा. ४:२३ ।।
**इन्द्रियाणि जयन्त्याशु निराहारा मनीषिणः।**
**वर्जयित्वा तु रसनं तन्निरन्नस्य वर्धते।।** भा.पु. ११:८:२० ।।

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा एकूणपन्नासावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ५० वा.

मनस्समाधानार्थ। गुरु केले हे यथार्थ।
पिंगला वेश्या बाळ ख्यात। कुरर म्हणजे टिटावू।।१०२।।
गुरु मीं केले म्हणे दत्त। स्त्रीकंकण सर्प शरकार ख्यात।
पेशस्कार कोळी देह विश्रुत। पन्नासाव्यांत बुद्धीबळें।१०३।।

## १७. पिंगला वेश्या.

माणसाच्या अंतःकरणांत विवेक जागा असेल तर तो सर्वांकडून बोध घेऊं शकतो. काय ग्राह्य आहे आणि काय त्याज्य आहे ह्याचा विवेक म्हणजे हेयोपादेय विवेक. अवधूत म्हणतात, "मी पिंगला नांवाच्या वेश्येला गुरु करून आशारहित झालो." वास्तविक वेश्या वैवाहिक बंधनाचा त्याग केलेली, दर वारी (दिवशी) नवाच पति करणारी म्हणून वारांगना म्हणविली गेलेली, पावित्र्याच्या सर्व कल्पनांचा अव्हेर करणारी स्त्री. स्त्री या संज्ञेलाही ती विटाळणारी आहे. तिचे मदिरायुक्त चुंबन हे अधोगतीचे महाद्वारच! विदेही जनकाच्या मिथिला नगरीतील अशा एका वेश्येकडून अवधूतांनी हेय बोध घेतला आहे. भावात्मक ज्ञान मिळविले आहे! त्या पुण्यवंतांच्या नगरीत ही पिंगला रहात होती. सोन्यासारखी तिची कांति होती. तिचे यौवनाने बहरलेले लावण्य भल्याभल्यांना नादीं लावत असे. त्या काळांतही वेश्यांना पुरुषांना रिझविण्याचे शिक्षण मिळत असले पाहिजे. जपानमध्ये गैशांना असे शिक्षण दिले जाते. भारतांतही अशा परंपरा आहेत. ह्यांत संगीत, नाट्य, संभाषणचातुर्य, विनोद, कपट, कौटिल्य इत्यादींचा समावेश होतो. एका ओंवीत श्रीमहाराजांनी त्याची सुरेख उजळणी केली आहे. आपल्याकडे येणाऱ्या पुरुषांची संपत्ती कशी सफाईने हस्तगत करायची, त्याला आपल्या मोहांत कसे गुंतवायचे इत्यादि कला त्या पिंगलेला अवगत होत्या. दुर्गुणांची जणूं खाणच अशा त्या कपटी स्त्रियेला पैशांची अनिवार आशा होती. तिचे पुरुषावरचे प्रेम हे त्याच्या खिशांतल्या पैशांप्रमाणे वाढत-घटत असे. बरेच दिवस तिने कित्येक पुरुषांना याप्रमाणे लुबाडले. पुढे तिचा हा लोभीपणा तिच्या कामलंपट गिऱ्हाइकांनाही कळून चुकला. तिचे यौवनही ओहोटीला लागले. हळूंहळूं तिच्याकडे येणारे पुरुष कमी झाले. तरी ती रोज संध्याकाळी नटूनथटून दारांत उभी राहत असे. एकदां ती अशीच पुरुषाची वाट पहात आपल्या दारी उभी राहिली. पण तिच्याकडे कुणी पाहीना. झोक्याप्रमाणे दाराच्या आंतबाहेर घुटमळून ती बेजार झाली. आपल्याकडे कुणी तरी येईल आणि पैसे आणि रतिसुख देईल या आशेने तिने रात्र जागविली. पण तिच्याकडे कुणीही पुरुष आला नाही. ह्या घोर वैफल्याने तिला एकाएकी वैराग्य आले. आपल्या दुराचरणाची, अनिवार धनतृष्णेची तिची तिलाच घृणा वाटूं लागली. कदाचित तिची ही केविलवाणी धडपड पाहणाऱ्या श्रीदत्तगुरूंचीच तिच्यावर कृपा झाली असावी. तिच्या बुद्धीवरील कामवासनेचे आणि द्रव्यलोभाचे पटल बाजूला झाले. आपल्या मूर्खपणाची तीव्र जाणीव तिला झाली. तिच्या मनांतला विवेक जागा झाला. आपले सुख खरोखर आपल्याजवळच आहे हे तिच्या ध्यानांत येऊं लागले. बाहेरील पुरुषापासून मिळणारा काम आणि पैसा ह्यांनी समाधान होणार नाही. आपली तृष्णा वाढतचे जाते आणि भीति, मोह आणि शोकच वाट्याला येतात. आपल्या अंतरांतच जो परमपुरुष आहे तोच खरा शाश्वत आणि निरतिशय सुख देणारा आहे. "तो विश्वाधारच परमपुरुषार्थ देऊन मला कृतार्थ

[1] *Email ID: Vasudeo@gmail.com*

करील. असे हे माझ्याच जवळ असलेले सुख सोडून मी परपुरुषाची आशा धरून बसले? मला धिक्कार असो! आतां मी माझा देह अंतरींच्या रमणाला अर्पण करून त्याच्याशीच रममाण होईन." असा विचार करून त्या पिंगलेने आशा नांवाचा बेडी तोडून टाकली आणि सुखाने झोंपली. आशा ही एक अशी बेडी आहे जिने बद्ध झालेला सारखा धावत असतो आणि जिच्यापासून सुटलेला पांगळ्यासारखा स्वस्थ बसून राहतो. (**आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला। यया बद्धाः प्रधावन्ति, मुक्तास्तिष्ठन्ति पंगुवत्।।**) यावरून आशा हीच दुःखाचे मूळ आहे आणि निराशेतच परम सुख आहे हा धडा आपण पिंगला वेश्येकडून घेतला असे अवधूत यदुराजाला सांगत आहेत. "**निराशः सुखी पिंगलावत्।**" सांख्यसूत्र(१४:९) १-१६ .

**वेश्यैकार्थदकान्ताशा-ध्वस्तनिद्रा सुखावहं ।**
**चिन्ताहेतुं हि निर्वेदं गत्वाऽत्मस्थं रतार्थदम्** ।। द्वि.सा. ४:२४।।
**रामं हित्वा कुवृत्त्यान्यं भीशुङ्मोहदमध्रुवम् ।**
**काङ्क्षे धिङ्मात्मनात्मानं रमे क्रीत्वाऽमुनेति सा**।। द्वि.सा. ४:२५।।
**मत्वा तथाऽभूद्ध्याशाऽकं नैराश्यं परमं सुखम् ।**
**आशा हि परमं दुःखं नैराश्यः परमं सुखम्।**
**यथा संछिद्य कान्ताशा सुखं सुष्वाप पिङ्गला**।। भा.पु.११:८:४३।।

## १८. टिटवा.

आशा सोडल्याविना सुखाने झोंप येणार नाही हे जसे खरे आहे तसेच परिग्रह सोडल्यावांचून चित्ताला स्वस्थता येणार नाही हेही खरे आहे. परिग्रह म्हणजे संग्रह. आपले पोट भरल्यावर थोडे संध्याकाळसाठी किंवा उद्यासाठी राखून ठेवणे ह्याला परिग्रह म्हणतात. ह्या परिग्रहाचा त्याग करायला आपल्याला एका टिटव्याने शिकविले असे अवधूत सांगत आहेत. एकदां सगळे टिटवे आपसांत वाटून मांस खात होते. ते मांस खाऊन संपविल्यावरही एका टिटव्याने थोडे आपल्या चोंचीत राखून ठेवले. इतर टिटव्यांच्या हे लक्षांत येतांच सगळे त्याच्या मागे लागून टोचूं लागले. शेवटी बेजार होऊन त्या टिटव्याने तो मांसाचा घास टाकून दिला तेव्हा त्या टिटव्यांनी त्याला सोडले आणि तो हुश्श म्हणून स्वस्थ बसला. यावरून योगी पुरुषाने अन्नाचा वा अर्थाचा परिग्रह करूं नये हे समजते. वर अग्नीपासून हेच शिक्षण आपण उपादेयबोधाने घेतले तेच टिटव्याकडून हेयबोधाने घेतले. जेव्हा जे मिळेल तेव्हा ते ग्रहण करावे; पण शिल्लक ठेवूं नये. भविष्याची तरतूद म्हणून संग्रह केला तर मन त्याच्या विचारांत राहते आणि आत्मानुसंधान सुटते. गांठीला धन बांधून ठेवणारा कितीही धनी झाला तरी त्याला सुखचैन नसते. हातावरचे पोट असणारा मात्र सुखाची झोंप झोंपतो. १७-२५.

**परिग्रहोऽकाय तज्ज्ञोऽस्वोऽप्यनन्तसुखायते** ।। द्वि.सा. ४:२६।।
**सामिषं कुररं हन्ति शूरोऽतो व्यामिषः सुखी ।**
**सामिषं कुररं जघ्नुर्बलिनो ये निरामिषाः।**
**तदामिषं परित्यज्य स सुखं समविन्दत**।। भा.पु.११:९:२।।

## १९. बालक.

मान आणि अपमान ह्यांचा विचार सोडायला आपण बालकाला गुरु केले असे श्रीदत्तप्रभूंचे प्रतिपादन आहे. लहान अर्भक सर्व ठिकाणी सारखाच रमतो. चिखल असो की भस्म असो, सुगंधी अत्तर असो कीं दुर्गंध असो, त्याचा कुणी सत्कार करो कीं तिरस्कार करो, बालकाला त्याचे कांही सुखदुःख नसते. ज्या निर्भयतेने तो दोरीशी खेळतो त्याच निर्भयतेने सापाशीही खेळतो. हे पाप आहे म्हणून करून नये किंवा हे पुण्य आहे म्हणून करावे असा विचारही त्याला नाही. (**नेदों लगो पापपुण्य**

**अंगा। संत तुकाराम**.) घरांतल्या चांगल्या-वाईट परिस्थितीची त्याला चिंता नाही. इष्ट आणि अनिष्ट घटनांनी त्याच्या मनाची समता भंगत नाही. (**नित्यं च समचित्तत्वं इष्टानिष्टोपपत्तिषु।** भ.गीता।।) अर्थोपार्जन, कुटुंबपोषण इत्यादि सर्व विवंचनांपासून तो मुक्त आहे. आपणच आपल्याशी खेळण्यात मग्न असतो. भूक लागली की तेवढ्यापुरते रडायचे; पोट भरले की पुन्हां खेळांत मग्न.(**आत्मक्रीड, आत्मरति**). ह्या बालकाला जर आपण गुरु केले तर आपले मन सहजच अंतर्निष्ठ होईल. बसल्या ठिकाणी आपण आपल्या घर-परिवाराच्याच नव्हे तर जगभरच्या चिंता करत असतो. आपल्या हातांत असलेल्या किंवा नसलेल्या गोष्टींचीही काळजी आपल्या मनाला घोर लावत असते. आपल्याला सारखं 'हे पाहिजे, ते नको' असे वाटत असते. धन, मान यांसाठी चाललेली आपली धडपड कशी व्यर्थ आहे हे अनेकदां अनुभवाला येऊनही आपण रोज नवीन मनोरथांची रचना करीतच असतो. असे हे चौखूर धांवणारे मन कसे आत्मचिंतनाला लागणार? जर आनंदमय बालवृत्तीचा आपण अंगीकार केला, आहे त्यांत समाधान ठेवले तरच चित्त अंतर्मुख होईल. बृहदारण्यक उपनिषदांत तर पांडित्य विसरून जाऊन ज्ञानी पुरुषाने बाल्यवृत्तीने रहावे असे सांगितले आहे. २६-३८

**मानावमानचिन्तोनः स्वक्रीडः स्वरतिः सुखी।।**
**बालवद्धि जडोऽज्ञोऽर्भश्-चात्मानन्दो गुणातिगः।** द्वि.सा. ४:२७-१/२।।
**द्वावैव चिन्तया मुक्तौ परमानन्द आप्लुतौ।**
**यो विमुग्धो जडो बालो, यो गुणेभ्य परं गतः।।** भा.पु.११:९:४।।

## २०. कुमारी.

आतां एकांतवासांत उपासना चांगली होते हे शिक्षण आपण कुमारीपासून घेतले असे दत्तप्रभूंचे म्हणणे आहे. **विविक्तदेशसेवित्वं** हे भगवद्गीतेच्या तेराव्या अध्यायांत ज्ञानाचे लक्षण सांगितले आहे. त्यासाठी हा कुमारीकंकणाचा सांख्यसूत्रांतील (४:१०) दृष्टांत विसाव्या गुरूच्या रूपांत अवधूत सांगत आहेत. एका सुसंस्कृत घरांतील सुशील मुलीच्या वधूपरीक्षेसाठी मुलाकडची मोठी माणसे आली. त्या वेळी घरांतली सर्व मंडळी कुढे बाहेर गली असल्याने त्यांच्या स्वागताची आणि पाहुणचाराची जबाबदारी त्या मुलीवरच पडली. त्या मंडळींना बैठकीत बसवून ती स्वयंपाकाची तयारी करूं लागली. तिने साळी कांडायला घेतल्या तर हातातल्या कांकणांचा आवाज होऊं लागला. त्या आवाजावरून आपणच साळी कांडत असल्याचे पाहुण्याना समजेल म्हणून तिने हातांतली कांकणे काढून दोन-दोनच कांकणे प्रत्येक हातांत ठेवली; पण त्यांचाही आवाज होऊं लागला. तेव्हां आणखी एकेक कांकण काढून प्रत्यक हातांत एकेकच कांकण ठेवले. तेव्हा आवाज थांबला आणि ती निश्चिंत मनाने साळी कांडूं लागली. त्यावरून मी बोध घेतला कीं पुष्कळ लोकांसह राहिले तर भांडण होतेच पण ह्या कलीयुगांत दोनही माणसे एकत्र राहिली तर गप्पागोष्टी तरी होतात किंवा वादविवाद तरी होतात. संग हा प्रमादाचा जनक आहे असे ज्ञान मला त्या कुमारीकडून प्राप्त झाले. ४०-४७.

**भङ्क्त्वैकैकं महारावान् रणन्तौ द्वौ कुमार्यपि।।** द्वि.सा. ४:२८।।
**पाण्योर्धृत्वैकैकशङ्खं रहःकृत्येऽलभत्सुखम् ।**
**कलिर्भूम्नि द्वयोर्वार्ता ह्येकतस्तच्छङ्खवच्चरेत्।।** द्वि.सा. ४:२९।।
**वासे बहूनां कलहो भवेद्वार्ता द्वयोरपि।**
**एक एव चरेत्तस्मात्कुमार्या इव कङ्कणः।।** भा.पु.११:९:१०।।

## २१. सर्प.

असे हे एकांतस्थानसुद्धां कायम एकच नसावे हे मी सापापासून शिकलो. आपले निवासस्थान जर सर्व लोकांना ठाऊक झाले तर लोकांचा उपद्रव होणारच. त्यासाठी सर्पाचे आवाज न करतां, लोकांच्या नजरेत न पडतां एकटेच फिरणे, गुप्त बिळांत राहणे, सावधपणे झोंपणे, अकारण कुणावर फडा न उगारणे इत्यादि गोष्टी मी शिकलो. साधूने कायमस्वरूपी घर न करतां, इतरांनी केलेल्या घरांतच आयत्या बिळांत नागोबा होऊन रहावे. अगदी पर्णकुटीही बांधली तरी तिथे आसक्त होऊन राहणारा दुःखीच होतो. घर बांधण्याचा हव्यास पूर्ण होण्यापूर्वीच हे मर्त्य शरीर पडूं शकते ह्याचे भान ठेवावे. अगदी पूर्णायुषी पुरुषालाही त्याच्या कर्माचा नदीच्या पुरासारखा लोंढा एकाच ठिकाणी राहूं देईलच असे नाही. हे शिक्षण आपण सर्प ह्या एकविसाव्या गुरूकडून संपादन केले, असे अवधूत यदुराजाला सांगतात. ४८-५५.

**एकचार्यप्रमत्तोऽल्प-वाग्गुहास्थोऽगृहो मुनिः।**<br>
**एकोऽहिवद्‌गत्यलक्ष्यो गृहारम्भोऽध्रुवात्मनः।।**<br>
**विफलोऽकाय सर्पोऽन्य-कृतधाम्न्येधते सुखम्** । द्वि.सा. ४:३०-१/२।।<br>
**एकचार्यनिकेतः स्यादप्रमत्तो गुहाशयः।**<br>
**अलक्ष्यमाण आचारैर्मुनिरेकोऽल्पभाषणः।।**<br>
**गृहारम्भोऽतिदुःखाय विफलश्चाध्रुवात्मनः।**<br>
**सर्पः परकृतं वेश्म प्रविश्य सुखमेधते।।** भा.पु.११:९:१४-१५।।

## २२. शरकार.

वरील सर्व गुरूंकडून प्रयत्नपूर्वक उपार्जित केलेल्या ज्ञानाचे उद्दिष्ट ध्यानाभ्यास हेच आहे. आतां ह्या ध्यानाभ्यासासाठी अत्यंत आवश्यक अशा दोन गोष्टी - आसनजय आणि प्राणजय, आपण शरकार ह्या २२व्या गुरूपासून शिकलो असे अवधूत यदुराजाला सांगत आहेत. ध्यानाचा अभ्यास हे पूर्वीच्या गुरूंकडून घतलेल्या बोधाचे साध्य आहे हे लक्षांत घेऊन शरकाराच्या आधी सर्पाची योजना केली आहे. मुळांत एकविसावा असलेला शरकार श्रीस्वामीमहाराजानी अवधूतगीतेत बाविसावा केला आहे. त्यानंतरचेही क्रम असेच साधनांच्या अवस्थानुसार लावले आहेत. समाधीचा बोध करविणारा पेशस्कर आधी घेऊन अद्‌वैतज्ञानाचा बोधक कोळी शेंवटी ठेवला आहे.

एकदा एक शरकार आपल्या दुकानांत एका बाणाला धार लावण्यांत एतका निमग्न झाला की समोरच्या हमरस्त्यावरून राजा आपल्या दळासह गाजत वाजत गेला तरी त्याचे त्याला भानही झाले नाही. ही चित्ताची एकाग्रता ध्यानाभ्यासात आली पाहिजे. अशी मनाची एकाग्रता झाली की मग समोर येऊन कुणी मोठ्याने ओरडतो आहे किंवा शिव्यागाळी करतो आहे ह्याचेही भान रहात नाही. योगी आसन स्थिर करून आणि प्राणाचाही निरोध करून, वैराग्याने इंद्रियांना आंकळून अभ्यासाने चित्त स्थिर करतो. द्‌वैताचे - म्हणजेच बाह्य जगताचे भान तो हरपतो आणि समाधिस्थ होतो. चित्ताच्या वृत्तींचा संपूर्ण लय न होऊं शकला तर सगुण रूपाचे ध्यान करावे. आसन पक्के झाले असेल आणि प्राणावर पूर्ण नियंत्रण असेल तरच पुढे मनाचा जय करतां येतो हे योगाचे रहस्य आहे. आसन-प्राण जिंकले नसतील तर योगाभ्यासाला विघ्ने येतात. '**अभ्यास-वैराग्याभ्यां तन्निरोधः।**' असे योगसूत्रच आहे. श्रीमद्भगवद्‌गीतेतही "**अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते।**" असा अचपळ मनावर ताबा मिळविण्याचा उपाय सांगितला आहे. अशा सततच्या ध्यानाभ्यासाने चित्तांतील सत्त्वगुण अग्नीसारखा प्रज्वलित होऊन रजोगुण आणि तमोगुण यांना इंधनाप्रमाणे जाळून टाकतो. अशा रीतीने चित्ताचा लय

झाल्यावर आंतले आणि बाहेरचे कसलेच भान रहात नाही हाच धडा मी त्या शरकारापासून घेतला. ५६-६५.

**'इषुकारवन्नैकचित्तस्य समाधिहानिः'** (सांख्यसूत्र ४:१४)
**जितश्वासासनेनेशे वैराग्याभ्यासबद्धहृत्** ।। द्वि.सा. ४:३१।।
**संयुक्तं वासनां मुक्त्वा सत्त्ववृद्ध्यैत्यनिन्धनम्** ।
**निर्वाणं वेत्त्यतो नान्तर्-बहिःस्थं मुनिरात्मदृक्** ।।
**यथेष्वितात्मेषुकृन्नो वेदेनं यान्तमग्रतः** । द्वि.सा. ४:३२-१/२।।
**मन एकत्र संयुज्याज्जितश्वासो जितासनः।**
**वैराग्याभ्यासयोगेन ध्रियमाणमतन्द्रितः।।**
**यस्मिन्मनो लब्धपदं यदैतच्छनैः शनैर्मुञ्चति कर्मरेणून्।**
**सत्त्वेन वृद्धेन रजस्तमश्च विधूय निर्वाणमुपैत्यनिन्धनम्।।**
**तदैवमात्मन्यवरुद्धचित्तो न वेद किञ्चिद्बहिरन्तरो वा।**
**यथेषुकारो नृपतिं व्रजन्तमिषौ गतात्मा न ददर्श पार्श्वे।।** भा.पु.११:९:११-१३।।

## २३. पेशस्कर.

पेशस्कार म्हणजे मातीच्या भिंतीला छिद्रे पाडून त्यांत घर करणारी कुंभारीण माशी. हा पंख असलेला एक कीटकविशेष आहे. हा आपल्या घरांत एक आळी आणून ठेवतो. (ती जीवशास्त्रदृष्ट्या त्या कुंभारणीचे डिंभ (larva) असते.) तिच्यावर तो आपल्या नांगीने वारंवार दंश करतो. त्यामुळे ती आळी त्या कुंभारीण माशीचा धोसराच घेते. अशा रीतीने तिचे ध्यान तीव्र होत होत एके दिवशी त्या आळीला पेशस्काराचेच रूप प्राप्त होते. हा निसर्गांतला एक चमत्कार पाहून अवधूतांनी असा निष्कर्ष काढला की आपण तीव्र संवेगाने ज्याचे ध्यान करतो तेच आपले स्वरूप होऊन जाते. ती आळी जर त्या पेशस्काराच्या धाकाने तद्रूप होते तर मग अविचल भक्तिप्रेमाने परमेश्वराचे ध्यान करणारा मानव ईश्वरत्वाला कां पावणार नाही? आपले कुल, जाति, वर्ण इत्यादि सर्व अभिमान सोडून विश्वात्मक भगवंताचे एकनिष्ठ ध्यान करणारे भगवद्रूपच होतात हा महत्त्वाचा सिद्धांत इथे श्रीदत्तप्रभूंनी प्रतिपादला आहे. हे ध्यान प्रेमानेच केले पाहिजे असे नाही. भयाने किंवा द्वेषानेही ध्यान करणारे कंस-शिशुपालादीही श्रीकृष्णाच्या तीव्रतर ध्यानाने सायुज्य पावले असे भागवतांत वर्णन आहे. तात्त्विक दृष्ट्या जीव हा ब्रह्मच आहे. मग मुळांतच ब्रह्म असलेला जीव ध्यानाच्या प्रभावाने ब्रह्म होतो यांत नवल कांहीच नाही. **ब्रह्मैव सन् ब्रह्माप्येति** –(बृ.उ. ४:४:५१) ६५-७३.

**प्रेम्णाप्यचलहृद्ध्यानाद्-विष्णोः सारूप्यमेति ना** ।।
**प्राग्रूपमुत्सृजन्पेशस्कृद्ध्यानात्कीटवद्द्रुतम्** । द्वि.सा. ४:३३-१/२।।
**यत्र यत्र मनो देही धारयेत् सकलं धिया।**
**स्नेहाद्द्वेषाद्भयाद्वाऽपि याति तत्तत्स्वरूपताम्।।**
**कीटः पेशस्कृतं ध्यायन् कुड्यां तेन प्रवेशितः।**
**याति तत्साम्यतां राजन् पूर्वरूपमसन्त्यजन्।।** भा.पु.११:९:२२-२३।।

## २४. कोळी (कातीण)

आतां आपल्या बेंबीपासूनच धागा काढून त्याचे डाळे विणणाऱ्या, त्या जाळ्यांत विहरणाऱ्या आणि काम संपले की जाळे परत खाऊन टाकणाऱ्या कांतिणीपासून आपण अद्वैताचे ज्ञान प्राप्त केले असे दत्तप्रभूंचे प्रतिपादन आहे. पूर्वी ब्रह्म एकमेवाद्वितीयच होते. आपल्या संकल्पमात्राने झालेल्या मायेचे केवळ ईक्षण (अवलोकन) तो सर्व चौदा भुवनात्मक विश्वाची उत्पत्ती करतो. ह्याच मायेला प्रधान महत्तत्त्व किंवा सूत्रात्मा अशाही संज्ञा आहेत. ह्याच कारणभूत, क्रियाप्रधान समष्टीस्वरूप

सूत्राने हे विश्वात्मक जाल गुंफले जाते. ह्या एका सूत्रांतच सर्व लोक आणि जीवात्मे बांधलेले आहेत असे याज्ञवल्क्यांनी गौतमांना सांगितले आहे. (बृ.उ. ३:७:२). यानंतर विश्वाच्या प्रलयांचा काळ आला की तोच परमेश्वर सत्त्व, रज आणि तम या तीनही गुणांची साम्यावस्था करून ह्या विश्वाच्या पसाऱ्याचा आपल्यांतच लय करतो. अशा रीतीने परमेश्वर परत एकटाच उरतो. विश्वांतील स्तंबापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व जीव ह्या अखंड, अद्वय ब्रह्मस्वरूपांत आपल्या संचित कर्मासह लीन होतात. कालांतराने ह्या संचित कर्माची बीजे फलोन्मुख झाली की त्या निर्गुण, निराकार, निर्विकार ब्रह्माच्या ठिकाणी विश्वसृष्टीचा संकल्प अंकुरतो आणि पुन्हां त्याच्या मायेच्या माध्यमांतून विश्वाची निर्मिति होते. अशा रीतीने कोळी हाच जसे जाळ्याचे एकच अभिन्न निमित्त आणि उपादान कारण आहे तसाच परमात्मा हाच आपल्यापासूनच स्वतःच हे विश्व निर्माण करतो. हा परमात्मा आपल्यापासून वेगळा नसून तोच सर्वव्यापी आहे. तेच माझे खरे स्वरूप आहे. ७४-८७.

**यथोर्णनाभिस्ततोर्णां विहार्यान्तेऽत्ति तां तथा।।**
**प्राक्स्वमायासृष्टमेकः संहृत्याभूत् क्षयेऽद्वयः।**
**शक्त्याखिलाश्रयः सर्वेट् कालेनात्मानुभावतः।।**
**साम्येतसत्त्वादिशक्तिः प्रधानपुरुषेडजः ।**
**व्युपाधिः परमानन्दो मोक्षाख्यः सपरावरः ।।**
**गुणत्मिकां स्वमायां स क्षोभयन्स्वानुभावतः।**
**तया सृजति सूत्रं सा त्रिगुणा शक्तिरासृजत्।।**
**विश्वं यस्मिन्प्रोतमेतद् येन संसरते पुमान् ।** द्वि.सा. ४:३४-३७१/२।।
**केवलात्मानुभावेन स्वमायां त्रिगुणात्मिकाम्।**
**संक्षोभयन् सृजत्यादौ तया सूत्रमरिन्दम।।**
**तामाहुस्त्रिगुणव्यक्तिं सृजन्तीं विश्वतोमुखम्।**
**यस्मिन्प्रोतमिदं विश्वं येन संसरते पुमान्।।**
**यथोर्णनाभिर्हृदयादूर्णां संतत्य वक्त्रतः।**
**तथा विहृत्य भूयस्तां ग्रसत्येवं महेश्वरः।।** भा.पु.११:९:२२-२३।।

हे चोवीस गुरूंपासून ग्रहण केलेले ज्ञान जर आपल्या चित्तांत रुजून, वाढून सुफलित व्हायचे असेल तर वैराग्याची नितांत आवश्यकता आहे. हे वैराग्य अंगी बाणवायला आपला ह्या पांचभौतिक देहालाच गुरु करायला अवधूत सांगत आहेत. देह ज्या वेळी पडतो त्या वेळी तो जाळला तर भस्म होतो, पुरला तर किड्यांचा होतो किंवा कोल्ह्याकुत्र्यांचे भक्ष्य होऊन विष्टामय होतो. असा हा पूर्णपणे परक्यांचा देह आहे हे जाणून त्याविषयींची आपलेपणा सोडावा.

मातेचे रज आणि पित्याचे रेत मिळून गर्भाशयाच्या उकडहंडीत शिजलेल्या या देहाच्या मागे जन्माच्या आधीपासूनच मृत्यू लागलेला आहे. अशा ह्या नाशिवंत आणि घृणास्पद देहापेक्षां मोठे वैराग्याचे कोणते दुसरे कारण आहे? विष्णुपुराणातं असे म्हटले आहे की आपल्याच देहाच्या घाणीने आणि दुर्गंधीने न उबगणाऱ्याला वैराग्याच्या कोणत्या वेगळ्या कारणाचा उपदेश करावा? **स्वदेहाशुचिगन्धेन न विरज्येत यः पुमान्।। विरागकारणं तस्य किमन्यदुपदिश्यते।।**

पृथ्वी आदि पांच महाभूतांचा बनलेला हा देह वृक्षासारखाच उद्भवतो, वाढतो आणि पुनर्जन्माला कारण अशी कर्मरूपी बीजे ठेवून नष्ट होतो. जन्मभर नाना वासनांनी प्रेरित होऊन विविध संकल्प करून, चांगली, वाईट आणि मिश्र कर्मे करीत राहतो. एका पुरुषाच्या अनेक स्त्रिया त्याची कुतरओढ करीत असतात तशी इंद्रिये ह्या जीवाला आपापल्या विषयाकडे ओढीत असतात.(**बह्व्यः सपत्न्य इव**

**गेहपतिं लुनन्ति।।** भा.पु.११:९:२६). त्यांची तृप्ती करण्यांत सगळे आयुष्य संपते पण वासना मात्र वाढतच राहतात.

असा हा देह सर्व दुःखांचे मूळ आहे. तरी ह्या दुःखपरंपरेतून सुटण्यासाठी मानवदेहाचीच आवश्यकता आहे. देवादिक देहसुद्धां केवळ भोगयोनीच आहेत. त्या देहांनी कितीही सुखांचा उपभोग करतां आला तरी आध्यात्मिक प्रगतीसाठी, ईश्वरप्राप्तीसाठी त्यांचा उपयोग नाही. यासाठीच देवादिकसुद्धां या दुर्लभ मानवदेहाचीच इच्छा करतात. ब्रह्मदेवांनी आपल्या शक्तीने प्रथम नानाविध स्थावर-जंगम जीवांची निर्मिति केली; पण त्यांपासून त्याला समाधान वाटले नाही. शेवटी त्याने जेव्हां ब्रह्मावलोकनाची क्षमता असलेला हा मानव देह निर्माण केला तेव्हां त्याचा आनंद गगनांत मावेना!( भा.पु.११:९:२८) ह्या मानवदेहाने जे साधायचे ते साधन मी साधले आहे. म्हणूनच मी असा निःशंक इथे पहुडलो आहे. हे यदुराजा! (**हे भूप**) ह्या पूर्वी सांगितलेल्या सर्वही गुरूंकडून शिकलेल्या वेदानुसारी तर्कांनी (**पूर्वोक्तभिः युक्तिभिः**) त्या संस्कारित बुद्धीने निरंतर(**यया धिया सततं**) आत्मस्वरूप विवेकाने निश्चित करून (**स्वात्मरूपं विविच्य**) मी ब्रह्मरूपच झालो आहे (**ब्रह्मभूतः अस्मि**) यांत संशय मानूं नकोस (**असंशयः**)! ।।९९।। ८८-९९.

**देहात्स्तो बोधवैराग्ये पारक्यात्सोद्भवक्षयात्।।**
**आत्मेष्टभृत्सृष्टबीजः प्रियेच्छुर्नश्यति द्रुवत् ।**
**गावः स्वार्थे सपत्नीवत्तं लुनन्ति हि दुर्लभम्।।**
**मत्वा नृजन्मात्तवित्क्ष्मां चरे मुक्तोऽनहंकृतिः।** द्वि.सा. ४:३८-३९१/२।।
**देहो गुरुर्मम विरक्तिविवेकहेतुर्बिभ्रत्स्म सत्त्वनिधनं सततार्त्युदर्कम्।**
**तत्त्वान्यनेन विमृशामि यथा तथापि पारक्यमित्यवसितो विचराम्यसङ्गः।।** भा.पु.११:९:२५।।

हे त्या अवधूतांनी उपदेशिलेले ज्ञान श्रवण करून यदुराजाने हे साक्षात दत्तप्रभूच आहेत हे ओळखून त्यांना वंदन केले. त्याने विनम्रपणे त्यांन निवेदन केले की, "आपण सांगितलेले हे ज्ञान मी दंभ, दर्प, अतिमान, क्रोध, मर्मभेदी वचन आणि अज्ञान या आसुरी संपदेचा (भ.गीता १६:४) त्याग करून आत्मसात केले आहे. मी आपल्या या ज्ञानदानाने पवित्र झालो आहे आणि मला कशाचीही इच्छा राहिली नाही. ब्रह्मा विष्णु आणि महेश या तीनही रूपांचा अंतर्भाव असलेल्या आपल्या या रूपाची आराधना करीत मी माझे उर्वरित जीवन व्यतीत करीन. आपल्या ह्या उपदेशाने माझ्या मनांतले सर्व द्वैत नष्ट झाले आहे." असे बोलून पुनःपुन्हा नमस्कार करीत त्याने श्रीदत्तप्रभूंचा निरोप घेतला आणि स्वच्छंदपणे पृथ्वीवर संचार करूं लागला. इथे हे लक्षांत घ्यायचे आहे की '**शाब्दे परे च निष्णात**' अधिकारी सद्गुरूंचे ज्ञान चित्तांत ठसावण्यासाठी आधी त्या चित्तांतून आसुरी संपत्तीचे उच्चाटन झाले पाहिजे. तरच अद्वैत ब्रह्मबोधाचे फळ मिळूं शकते. १००-१०३.

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांच्या श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथाचा पन्नासावा अध्याय इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

।। श्रीगुरुःशरणम्।।

# बोध दत्तमाहात्म्याचा.

## डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख.[1]

## अध्याय ५१ वा.

पन्नास अध्यायांत निरूपिलेल्या दत्तचरित्राची अवतरणिकेच्या रूपांत उजळणी करून श्रीस्वामी महाराजांनी एकावन्नाव्या अध्यायांत समारोप केला आहे. सुरुवातीला आपल्या ह्या ग्रंथरचनेचे प्रयोजन पुनश्च अधोरेखित केले आहे. मानवी जीवनाचे परम साध्य निर्गुण, निराकार परब्रह्म हेच आहे. पण मानवी बुद्धीला त्याचे आकलन सहज होत नाही. त्यासाठी प्रथम परमेश्वराच्या सगुण रूपाची - भगवान दत्तात्रेयांची, ओळख करून घ्यावी लागते. तेच सगुण ब्रह्म आपण ह्या दीपक आणि वेदधर्मा यांच्या संवादांतून ह्या ग्रंथांत मांडले आहे. पन्नास अध्याय आणि पांच हजार चारशे ओंव्या अशी ग्रंथसंख्या इथे दाखविली आहे.

हा ग्रंथ महत्पूर येथे अकराव्या चातुर्मासांत केला आहे. ‘श्रीदत्तपुराण संस्कृत भाषेत असल्याने ते सर्वांच्या आटोक्यांत येत नाही; तरी एक सविस्तर दत्तचरित्रात्मक ग्रंथ मराठी भाषेत करावे’, असा भक्तमंडळींचा आग्रह पाहून श्रीस्वामीमहाराजांनी हा ग्रंथ केल्याचा त्यांच्या श्रावण शु।। ११ च्या पत्रांत उल्लेख आहे. “..ओवीबद्ध तृतीयाष्टकापासून सहाव्या अध्यायापर्यंत आजपर्यंत ओव्या लिहिल्या. प्रायः प्रत्यही १०८ होत गेल्यामुळे तेवढाच अध्याय ठेवला. उद्यां पन्नासावा अध्याय पुरा होईल. सुमारे साडेपाच हजार ग्रंथ झाला. आतां पुढे लिहिण्याची इच्छा होत नाही. नारायण. ”

या सगुणब्रह्माच्या मांडणीत आपण भक्तीबरोबरच ज्ञान आणि वैराग्य यांचीही योजना केली असल्याचे ते पुढच्याच ओवीत सांगत आहेत. ज्ञान आणि वैराग्य यांत कर्म, भक्ति आणि योग हेही अभिप्रेत आहेत. द्विसाहस्रीच्या एकोणिसाव्या अध्यायांत त्यांनी स्पष्ट केले आहे की, **“त्रिभिर्योपथैरेव परस्परसहायकैः। ब्रह्माद्वंद्वं समं शांतं गम्यते नैकयोगतः।।३।।”** (कर्म, भक्ति आणि ज्ञान या तीन परस्परसहायक योगमार्गांनीच अखंड, द्वंद्वातीत, सम आणि शांत ब्रह्माचा साक्षात्कार होतो; कोणत्याही एकाच मार्गाने तो होऊं शकत नाही.) योगरहस्यांत त्यांनी स्पष्टच सांगितले आहे की , भक्ति, कर्म आणि ज्ञान ह्या तीनही योगांचा अंतर्भाव एकाच अष्टांगयोगांत होतो. (**भक्ति-क्रिया-ज्ञानयोगान्मुक्तिरुक्तापि तत् त्रयम्। ज्ञेयं साष्टाङ्गयोगांतर्गतं द्वैधमतोत्र नो।।५।।** अर्थातच हा जरी भक्तिरसप्रधान ग्रंथ असला तरी त्यांत कर्म, उपासना आणि योग हे विषय येणे अपरिहार्य आहे. हे ध्यानांत ठेवूनच आपण अवतरणिकेचे चिंतन करायला हवे. खाली ह्या अवतरणिकेतला विषयानुक्रम तालिकेच्या स्वरूपांत दिलेला आहे.

श्रीदत्तमाहात्म्यांतील विषयानुक्रम

| अध्याय | विषय |
|---|---|
| १ | मंगलाचरण, नवविध भक्ति, सृष्टिक्रमण, दत्तात्रेयाचे मातापिता, दीपकाख्यान |
| २ | योगभ्रष्ट पुत्राची कथा, कौशिकसतीचा सूर्याला शाप, देवाच्या विनंतीनें अनसूयेचें आगमन. |
| ३ | कौशिकाचें संजीवन, मांडव्य ऋषींची सुटका, दत्तावतार. |

[1] ***Email ID: Vasudeo@gmail.com***

४ कार्तवीर्याचा जन्म, गर्ग ऋषींचा त्याला उपदेश व दत्तमाहात्याचें कथन.
५ दैत्यांकडून पराभूत देवांची दत्तसेवा व दत्तप्रभूंकडून त्यांना स्वर्गाची प्राप्ति.
६ कार्तवीर्याची दत्तभेट, परीक्षा व त्याला दत्तप्रभूंचें वरदान व राज्यारोहण.
७ कार्तवीर्याची विरक्ति, दत्तप्रभूंकडे आगमन, स्तुति, पुनः परीक्षा व त्याचे प्रश्न.
८ बृहस्पति-इंद्र संवाद, सप्तगाथा, शिल्पज्ञ कथा, कामशास्त्रज्ञ ब्राह्मण कथा.
९ गायत्रीजापक सुशीलाची सात समंधांपासून मुक्ति, विष्णुदत्ताची कथा.
१० रोगग्रस्त ब्राह्मणाला कर्मविपाकाचा उपदेश व त्याला आरोग्य, झोटिंगाचें बंधन, शास्त्रतत्त्वनिरूपण.
११ जीवाचें विविध योनींत भ्रमण, गर्भवास, अवस्था, लक्षण, "जड" पुत्राला आश्वासन.
१२ सृष्टिक्रम, व्यष्टि-समष्टि, विक्षेप-आवरण, सदाचरण, गुरुसेवा, श्रवण, मनन परोक्षापरोक्ष ज्ञान, जीवरूपाचें वर्णन.
१३ वाक्यविवरण, षड्लिंग व तत्त्वंपदार्थ, तत् व त्वं यांचें ऐक्य, यांचें निरूपण.
१४ अष्टांगयोग, यम, नियम, आसन, प्राणायाम यांचा राजाला उपदेश.
१५. अवधूतज्ञान, सजातीयप्रत्ययलक्षण, विजातीयनिरसन, निदिध्यासन याच्या अभ्यासानें समाधीचा राजाला उपदेश व त्याला समाधिलाभ.
१६ राजाला अनासक्त प्रारब्ध भोगण्याचा उपदेश व पाठवणी. कार्तवीर्याकडून समुद्राचें गर्वहरण, यज्ञ, दानादिक अनुष्ठानें.
१७ अतिथिरूप सूर्याला वृक्षांचें दान व त्यामुळें वसिष्ठांचा राजाला शाप.
१८. ऋचीक-सत्यवती विवाह, जमदग्नि व विश्वामित्र याचा जन्म.
१९ परशुरामावतार, मातेची हत्या व संजीवन, पितृसेवा.
२० कार्तवीर्याचें जमदग्नींच्या आश्रमांत आतिथ्य व राजाकडून कामधेनूचें हरण.
२१ परशुरामाचें व कार्तवीर्याचें युद्ध व अर्जुनाचा वध, पित्याकडून त्याला दुषण व प्रायश्चित्तासाठीं तीर्थयात्रेची आज्ञा.
२२ अर्जुनाच्या पुत्रांकडून जमदग्नींची हत्या, रेणुकेचा शोक, रामाचें आगमन व शत्रूंचें हनन.
२३ मातापित्यांना घेऊन परशुरामाचें दत्ताश्रमांत आगमन, रेणुका-दत्त यांची परस्परांची स्तुति, रेणुकेचें सहगमन.
२४. रामाला क्रियाकर्मानंतर मातापित्यांचें पुनर्दर्शन, रामाकडून क्षत्रियहनन, कश्यपाला भूमिदान व समुद्रतीरीं वास.
२५. गालवाच्या यज्ञरक्षणासाठीं ऋतध्वजाचें पातालकेतूसह युद्ध, पातालगमन व गंधर्वकन्या मदालसेची भेट.
२६. ऋतध्वजाचा मदालसेशीं विवाह व नगरास आगमन, पातालकेतूच्या भावाच्या कपटानें मदालसेचा अग्निप्रवेश.
२७. विरहातुर राजाची नागपुत्राशीं सख्य व त्यांच्याद्वारें अश्वतर नागाला राजाच्या व्यथें ज्ञान. नागाला सरस्वतीचा वर तसेंच शिवाप्रसादानें मदालसेची प्राप्ति.
२८. अश्वतर नागाकडून मदालसेचें राजाला दान व पुत्रप्राप्ति. पुत्राला मातेचा तत्त्वबोध.
२९. पुत्राचें जाड्य पाहून राजाचा शोक; मातकडून ज्ञानप्राप्तीचें पुत्राकडून कथन; राजाचा कोप व मदालसेपुढें प्रवृत्तिमार्गाची स्तुति.
३० राजाच्या इच्छेनुसार अलर्काला व्यवहार ज्ञान व त्याला साम्राज्य. त्याचा अधःपात पाहून सुबाहूचें त्याच्याशीं युद्ध.
३१ अलर्काचा पराजय व मातृवचनास अनुसरून दत्तप्रभूंकडे गमन व बोध.
३२. अलर्काला तत्त्वज्ञानाचा तसेंच मनोभंगा व वासनाक्षय याच्या उपायांचा तसेंच अष्टांगयागाचा उपदेश.
३३. धारणा, अभ्यासाचे दोष व गुण.

३४. अणिमादि सिद्धींचा निषेध, सगुण व निर्गुण ध्यान, योगचर्या व भिक्षा याचें निरूपण.

३५. योगसाधन, नादानुसंधान, प्रणवध्यान, ॐकाराच्या साडेतीन मात्रा व क्रममुक्ति.

३६. मृत्युज्ञान

३७. अलर्काची दत्तस्तुति, बंधूच्या उपकाराची जाणीव व दत्ताज्ञेनें बंधूभेट.

३८. सुबाहूचा काशीराजाला उपदेश व वनास गमन. अलर्काच्या पुत्रास राज्याभिषेक व अलर्काचें वनास प्रयाण.

३९. आयुराजाची पुत्रप्राप्तीकरितां दत्तसेवा व दत्तप्रसाद.

४० राणीची गर्भधारणा व स्वप्नांत दत्तदर्शन. हुंडासुराच्या प्रयत्नांस अपयश व दत्तकृपेनें नहुषाचा जन्म.

४१. नहुषाचें हरण, त्याचें रक्षण व वसिष्ठाश्रमांत संगोपन.

४२. पुत्र दिसेनासा झाल्यानें राणीचा व आयुराजाचा शोक.

४३. दत्तप्रेरणेनें नारदाचें आगमन व उपदेश.

४४. नहुषाला वनांत आकाशवाणी व वसिष्ठांकडून स्वतःच्या इतिहासाचें ज्ञान व देवांच्या साह्यानें हुंडासुरावर आक्रमण.

४५. हुडासुराचा वध, नहुष व अशोकसुंदरीचा विवाह व मातापित्यांशीं भेट.

४६. ययाती-देवयानीचा विवाह, ययातीचा शर्मिष्ठेशीं संयोग व शुक्रशापानें वार्धक्य, पुरूनें वार्धक्य घेतल्यानें त्याला राज्य, दुःखित यदूची वनांत दत्ताशीं भेट.

४७. यदु-अवधूत संवाद. पृथ्वी, वायु आणि आकाश यांचे उपादेय गुण.

४८. जल, अग्नि, चंद्र, सूर्य व कवडा यांच्यापासून घेतलेलें शिक्षण.

४९. अजगर, समुद्र, पतंग, मधुकर, गज, मधुहर, मृग, मत्स्य यांचे हेयलक्षण गुण.

५०. पिंगला (वेश्या), टिटवी, बाळक, स्त्रीकंकण, सर्प, शरकार, पेशस्कार, कोळी. देहापासून शिक्षण.

यानंतर समारोपाच्या आधी पुनश्च ह्या ग्रंथांत विविध धर्म, भक्ति आणि ज्ञान यांचे रसाळ वर्णन आहे ह्याची पुनरुक्ती आहे. ह्यावरून श्रीस्वामीमहाराजांना वाचकांच्या मनांतून कर्म, भक्ति, उपासना हे तीन वेगळे साधनमार्ग आहेत ही धारणा पूर्ण पुसून टाकायची आहे हे स्पष्ट होते. हे दत्तमाहात्म्य परब्रह्माचे मूर्त स्वरूपच आहे हे ठाम प्रतिपादन त्यांनी पाठकांची श्रद्धा दृढ करण्यासाठी केले आहे. वास्तविक ब्रह्म हे अमूर्त आहे, आकार व गुण यांनी रहित आहे. नेत्रादि इंद्रियांना अगोचर आहे. प्रत्यक्ष प्रमाणांना अग्राह्य आहे. त्यासाठी उपनिषदांची वाक्ये हीच प्रमाणे आहेत. उपनिषदांत प्रतिपादलेल्या ब्रह्माचे श्रवण, मनन आणि निदिध्यासन (ध्यान) करूनच ते मानवी बुद्धीत प्रकाशते. ह्या वेदांताचा सिद्धांताचे प्रतिपादन श्रीमहाराजांनी केले आहे.

पण कलियुगांत मंद अधिकारीच अधिक आहेत. त्यांना उपनिषदांत सांगितलेले ज्ञान उमजत नाही. तरीही जे श्रद्धावान आहेत, मुमुक्षु आहेत अशांसाठी हे श्रीदत्तमाहात्म्याचे लेखन दयार्द्र अंतःकरणाने श्रीदत्तप्रभूंनी करविले आहे. तीव्र संसृतीरूपी ह्या उन्हाळ्यांत त्रिविध तापांनी भाजून निघणाऱ्या मुमुक्षूंना ही कृपेची साउली करुणासागर श्रीदत्तप्रभूंनी केलेली आहे. ह्या ग्रंथाचे हे स्वरूप उघड करून शेंवटी श्रीमहाराजांनी समर्पणात्मक प्रार्थना केली आहे.

"विष्णुरूपाने जगाचा सांभाळ करणाऱ्या, ब्रह्मदेवाच्या रूपाने सृजन करणाऱ्या आणि शंभुरूपाने जगाला तारणाऱ्या मनोहर दत्ता, तुला वंदन असो! भूमीवर लीलाविग्रहाने अवतरून तूच साधूंचे संरक्षण करतोस आणि दुष्टांना शासन करतोस, सर्व मानवी जीवांच्या उद्धारासाठी ही ग्रंथरचनेची लीलाही तूंच करीत आहेस. परमश्रेष्ठ, सर्वप्रकाशक आणि स्वयंप्रकाश अशा तुझी लीला कुणाला आकळली आहे?

तुझा आपल्या भक्तांच्या हृदयांत सतत वास असतो आणि तूं भक्तपराधीन आहेस हे जाणून मी हे आर्जवाचे मागणे मागीत आहे की ह्या ग्रंथांत तुझा नित्य वास असावा. युगमानानुसार मंद अशा जीवांवर अनुग्रह करण्यासाठी, ह्या ग्रंथाचे वक्तृत्व सर्वथा तूंच केले आहे, श्रोत्यांच्या अंतःकरणांत राहून तूंच श्रवण करीत आहेस आणि त्यांच्या चित्तांतील शंकांचे निरसन करण्यासाठी तूंच प्रश्न करतोस; कारण तूंच जगांतील सर्व जीवांच्या बुद्धीचा प्रचोदकही आहेस आणि प्रकाशकही आहेस. ह्या ग्रंथाचा निर्विकार असा तूंच एक ग्राहक आहेस! भ्रमराची ओढ कमलिनीकडे असते तर तो चांफ्याकडे फिरकतही नाही. तशा भ्रमरवृत्तीच्या लोकांच्या रूचि-अरुचीचा विचार न करतां हा ग्रंथ केवळ तुझ्या संतोषासाठी पूर्ण केला आहे.” या ओवीचा थोडा वेगळा अर्थही लावतां येतो. भ्रमर जसा कमलिनीच्या बोलावण्याने जात नाही किंवा चांफ्याच्या विरोधाने फिरत नाही तर केवळ आपल्या अंतःप्रवृत्तीनेच कमलिनीकडे ओढला जातो तशी कवीने श्रीदत्तप्रभूंच्या भक्तिप्रेमाने प्रेरित होऊन ग्रंथरचना केली आहे.

शालिवाहन शके १८२३ म्हणजेच कलीच्या ५००३ऱ्या वर्षी क्षिप्रातीरीवर हा ग्रंथ झाला.

श्रीवासुदेवानंदसरस्वती यांचा श्रीदत्तमाहात्म्य ग्रंथ इथे पूर्ण झाला. तो श्रीगुरुचरणी समर्पित असो.

## चिंतनिकेचा उपसंहार.

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

तीन वर्षांहून अधिक काळ लोटल्यावर आज श्रीदत्तमाहात्म्याची ही चिंतनिका समर्थ श्रीगुरु योगिराज गुळवणी महाराजांच्या अमोघ कृपेने पूर्णत्वाला जात आहे. वेदांताचे ज्ञान, भाषेची व्युत्पत्ती, शब्दज्ञान किंवा आध्यात्मिक अनुभव ह्यांतील कांहीच गांठीशी नसतांना या महान ग्रंथाच्या मननाला प्रवृत्त होण्यास माझी अनधिकार वेडी लालसाच कारणीभूत आहे. प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांसारख्या अवतारी सत्पुरुषांच्या सिद्ध लेखणीतून साकारलेल्या ह्या ग्रंथराजाला स्पर्शही करण्याची कसल्याही प्रकारची ह्या अनुवादकाची पात्रता नाही हे तीव्रपणे जाणवते. त्यांच्या प्रियतम शिष्याच्या अहैतुकी कृपेच्या अभिसिंचनानेच ही सलगी करण्याचे माझे साहस झाले असेच म्हणावे लागेल. हा संकल्प यथाशक्ति यथामति सिद्ध झाला आहे याला एकमेव कारण माझ्या सद्गुरूंचे आणि परमगुरूंचे वात्सल्यच आहे. **'एथ सलगी करूं बिहो तरी निवों कें पा?'** ह्या श्रीज्ञानेश्वरमाउलींच्या शब्दांनीच ह्या श्रीदत्तमाहात्म्याशी केलेल्या लगटीचे समर्थन करतां येईल. माझ्या बोलांचे हे लेंडओहळ श्रीदत्तमाहत्म्याच्या गंगेला मिळून पावन व्हावेत हीच एक अभिलाषा आहे.

श्रीदत्तमाहात्म्य हा ग्रंथ मुळांतच, सरल, प्रासादिक आणि रसपूर्ण ग्रंथ आहे. भाषा आज थोडी संस्कृतप्रचुर वाटत असली तरी समजायला तशी सोपी आहे. ग्रंथाच्या विषयप्रवेशांत उल्लेख केल्याप्रमाणे हा ग्रंथांतला आशय आणखी सुबोध व्हावा आणि कालांतराने पुसट झालेले संदर्भ स्प्ट व्हावेत हाच ह्या चिंतनिकेचा मुख्य उद्देश होता. तो कितपत पूर्ण झाला हे वाचकांनीच ठरवायचे आहे. ह्या ग्रंथाचा आंवाका फार मोठा आहे. अरूपाला रूप देणारा, अनिर्वचनीयाला शब्दांकित करणारा हा ग्रंथ श्रीदत्तप्रभूंची वाङ्मयीन मूर्ति आहे असे स्वतः स्वामीमहाराजच म्हणतात. भक्ति, ज्ञान, योग इत्यादि सर्व सूक्ष्मतर विषय विस्ताराने मांडले आहेत. केवळ १०८ ओव्यांच्या ५० अध्यायांत हे सर्व ज्ञान ग्रथित करणे हे केवळ श्रीस्वामीमहाराजांच्या अलौकिक प्रतिभेलाच शक्य होते. त्यांत पुन्हां ग्रंथाचे शेवटचे १३ अध्याय मंत्रगर्भ आहेत. साहजिकच कांही ठिकाणी संक्षेप तर कांही ठिकाणी केवळ निर्देश आले आहेत.

आजच्या वाचकाला ते कदाचित सकृद्दर्शनी लक्षांत येत नाहीत. यासाठी आधुनिक भाषेत थोडे विवेचनात्मक चिंतन करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकासाठी हा एक उद्‌बोधक आणि उपकारक अनुभव ठरला आहे. वाचकांचा या चिंतनिकेने किती लाभ होईल तो होईल; पण विवेचन करणाऱ्याच्या बोधकक्षा नक्कीच विस्तारल्या इतके खरे. भारतीय परंपरेतील संतसाहित्याचा एक गुण असा आहे की त्याचे जितके अधिक मनन करावे तितके त्यांतील नवनवीन भावार्थ चित्तांत फुलून येतात. वाचकाचे चित्त बोधाच्या आणि सुखाच्या नित्य नूतन तुषारांनी भिजवून टाकतात. श्रीदत्तमाहात्म्य हा ग्रंथ याच परंपरेतला असल्याने हे ज्ञानाचे आणि आनंदाचे अक्षय भांडारच आहे! मात्र प्रत्येक वाचकाची श्रद्धा, मननशीलता, संवेदनशीलता या भिन्न असतात. ज्याची जितकी झोळी तितकीच भिक्षा पदरांत पडते. साहजिकच लेखकाच्या मतीच्या मर्यादा ठिकठिकाणी जाणवतील. वाचकांनी अशा ठिकाणी क्षमाशील वृत्ती अंगीकारावी ही नम्र प्रार्थना आहे. जे कांही ज्ञानकण वेचून आणले आहेत ते सर्व श्रीस्वामीमहाराजांचे देणे आहे. त्यांत जे कांही उणे-अधिक असेल ते लेखकाचे आहे अशा नीरक्षीरन्यायाने ग्रहण करावे हीच प्रार्थना आहे.

ह्या ग्रंथाच्या लेखनाला मला प्रवृत्त करणारे "ग्रहसंकेत" मासिकाचे विद्‌वान संपादक मा. संदीप खाडिलकर यांच्या ऋणाचा निर्देश इथे आवर्जून केला पाहिजे. त्यांना श्रीदत्तमाहात्म्याविषयी असलेल्या श्रद्धेने ह्या ग्रंथाचे अशा प्रकारचे विवरण व्हावे असे तीव्रतेने वाटले. श्रीवासुदेवनिवास आश्रमांत त्यांना आमच्या "श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वाध्याय मंडळां"त आम्ही श्रीदत्तमाहात्म्याचे सामुदायिक वाचन केल्याचे समजले. त्यावरून त्यांनी या लेखकाला प्रवृत्त केले. वरचेवर उत्तेजन दिले आणि मुख्य म्हणजे तीन वर्षांहून दीर्घ काळ ही लेखमाला "ग्रहसंकेत"च्या प्रभावी माध्यमांतून महाराष्ट्रांत सर्वदूर पसरविली. लेखकाच्या हातून ही वाङ्मयी सेवा करवून घेतली त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच होतील.

या ग्रंथाच्या लेखकाच्या आणि वाचकांच्याही परमकल्याणाला ही चिंतनिका अंशतः तरी कारणीभूत व्हावी ही प्रार्थना करून ती श्रीगुरुचरणी समर्पित करू या.

**समानी वोस्त्विहाकूतिः समानहृदयानि वः।**
**समानमस्तु वो दत्ते मनोऽनोव्यात् त्र्यधधीश्वरः।। श्रीदत्तपुराण ८:८:६८।।**

## श्रीगुरुचरणारविंदयोऽर्पणमस्तु।